म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

निबंध

आषाढस्य प्रथम दिवसे

# आषाढस्य प्रथम दिवसे

प्र ल्हा द  के श व  अ त्रे

# आषाढस्य प्रथम दिवसे

'मराठा'तील अग्रलेख

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 76302

प्रल्हाद केशव अत्रे

संकलक

व. ब. आगाशे

ओ. दि. 3.1.72

प्रकाशन क्रमांक
३८१

ग. पां. परचुरे प्रकाशन-मन्दिर, मुंबआी ४

मूल्य पंचवीस रुपये

सर्वाधिकार सुरक्षित

प्रकाशक : विष्णु गजानन परचुरे, ग. पां. परचुरे प्रकाशन-मन्दिर
गोरेगावकर चाळ क्रमांक २, गिरगाव, मुंबअी ४

आवृत्ती पहिली : १०-११-१९६९ मुखपृष्ठ सजावट : मोहन वाघ

मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, 'शिव-पार्वती'
४६१/४ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ३०

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ९१०५० दि:
क्रमांक नों. दि.

## कृतज्ञता

साहेब, तुम्ही अगदीं अचानक न बोलतां निघून गेलांत. त्यामुळें सारे कसें सुनेंसुनें वाटत आहे. तेवीस वर्षांपूर्वी प्रकाशन-व्यवसायाला सुरुवात केली तेव्हांपासून आजपावेतों तुमच्याच आशीर्वादानें मी यशस्वी होत गेलों. तुमच्या निधनानें आमच्या प्रकाशन-मंदिराचा आधारस्तंभच धाडकन् कोसळून पडला. परचुरे प्रकाशन संस्था पोरकी झाली.

साहित्याचा मुसळधार पाऊस पाडून मराठी साहित्याचीं सर्व दालनें तुम्हीं शिगोशिग भरून टाकलींत. तुम्हीं पाऊस पाडावा व मी कालवे खणावे असा हा अुद्योग गेलीं कित्येक वर्षें चालू आहे. तुमचीं तीन पुस्तकें दिवाळीला प्रसिद्ध करीत आहें. तुम्ही साहित्य सिद्ध ठेवलेंच होतें. कागदवाल्यानें कागद दिला. मुद्रकांनीं पुस्तकें छापून दिलीं. अितर सर्व

संस्कार होऊन ती ठरल्या वेळीं प्रसिद्ध होतीलच. पण मनाला सारखी अेकच टोंचणी लागली आहे. हीं पुस्तकें पाहून तुम्हांला झालेला आनंद मी पाहूं शकणार नाहीं. 'वा ! फारच छान !' अशी शाबासकी तुमच्याकडून मला मिळणार नाहीं.

आतां मनाला मुळीं अुत्साहच वाटत नाहीं. रोज दिवस अुजाडतो आहे, मावळतो आहे. जिवंत असेतों व्यवसाय करावाच लागणार आहे. पण तुम्ही असतांनाचा जिवंतपणा, मिजास त्यांत राहणार नाहीं. तसा पाऊस आतां पडणार नाहीं. तशीं शेतें आतां पिकणार नाहींत.

साहेब, तुम्हीं मला सारें काहीं खूप, खूप दिलेंत. त्याच शिदोरीवर यापुढें तुमचा 'परचुरे' मानानें जगणार आहे.

ग. पां. परचुरे

# अनुक्रम

## पहिला विभाग


| | | |
|---|---|---|
| १ | आषाढस्य प्रथम दिवसे | १ |
| २ | महाकवी कालिदासाला अभिवादन | ५ |
| ३ | संत नामदेव | १२ |
| ४ | आजची आषाढी | १८ |
| ५ | आजची आषाढी | २४ |
| ६ | कार्तिकी | ३२ |
| ७ | तुकाराम बीज | ३६ |
| ८ | श्रीतुकोबांचे निर्याण | ३९ |
| ९ | तुकोबांचे निर्याण | ४६ |
| १० | श्रीकृष्णजन्म | ५२ |
| ११ | श्रीतुळजाभवानी | ५७ |


## दुसरा विभाग


| | | |
|---|---|---|
| १ | तीनशे वर्षांपूर्वीचा शिवदिग्विजय | ६१ |
| २ | शिवरायांचा जयजयकार | ६७ |
| ३ | झाशीची राणी | ७१ |
| ४ | महात्मा फुले | ७५ |
| ५ | राजद्रोहाचा लोकमान्य शिक्षक | ७८ |
| ६ | लोकमान्य टिळक नि महात्मा गांधी | ८४ |
| ७ | मामनुस्मर युध्य च। | ९३ |
| ८ | लोकमान्यांचे पुण्यस्मरण! | ९७ |
| ९ | मानवतेचे महान दैवत | १०२ |
| १० | गोपाळ कृष्ण गोखले | १०७ |
| ११ | महाराष्ट्राचा सुधारक संत | ११५ |

| | | |
|---|---|---|
| १२ | नेताजी | १२३ |
| १३ | नेताजी आणि नेहरू | १२८ |
| १४ | नेताजीभवन | १३४ |
| १५ | आंबेडकर जयंती | १४१ |
| १६ | वीर सावरकर | १४५ |
| १७ | मृत्युंजय सावरकर | १४९ |
| १८ | गोविंद नारायण माडगावकर | १५४ |
| १९ | महाराष्ट्राचे सेनापती | १५९ |
| २० | सेनापती दीर्घायू होवोत ! | १६३ |
| २१ | संत विनोबा | १६७ |
| २२ | विनोबांची जयंती | १७२ |
| २३ | बर्ट्रान्ड रसेल | १७७ |
| २४ | चर्चिल | १८१ |
| २५ | मावळते राष्ट्रपती | १८७ |
| २६ | सयाजी–जन्मशताब्दी | १९१ |
| २७ | स्वातंत्र्याचा महाकवी | १९७ |
| २८ | दादासाहेब खापर्डे | २०३ |
| ३० | मावळते श्रीप्रकाश | २११ |
| ३१ | एसेम दीर्घायू होवोत ! | २१६ |
| ३२ | यशवंतरावांचे अभीष्टचिंतन | २२२ |
| ३३ | श्रीपाद अमृत डांगे | २२७ |
| ३४ | महाराष्ट्राचा माळकरी मार्क्सवादी | २३७ |
| ३५ | प्रबोधनकार ठाकरे | २४७ |


## तिसरा विभाग


| | | |
|---|---|---|
| १ | केशवसुत | २५१ |
| २ | कवींचे कवी : ‘ बी ’ | २५८ |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

३ प्रतिभेचा सम्राट २६४
४ आठवतात तेवढे गडकरी ! २७१
५ बालकवी २९४
६ केळकर : उदात्त आणि धीरगंभीर विभूती ३००
७ पुन्हा बांदेकर होणार नाही ३०८
८ बांदेकरांचे स्मरण ३१४
९ दत्तू बांदेकराचा स्मृतिदिन ३१६
१० भाषाप्रभू चर्चिल ३१९
११ अप्टन सिंक्लेर ३२६
१२ महाराष्ट्राचा समाजवादी लेखक ३३४
१३ प्रा. श्रीकृष्ण क्षीरसागर ३४०
१४ आधुनिक रंगभूमीचे सुधारक ३४३
१५ नाट्यसंमेलनाध्यक्ष श्री. स. अ. शुक्ल ३४८
१६ प्रा. रामचंद्र श्रीपाद जोग ३५३
१७ पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे ३५८
१८ सोपानदेव ३६२

## चवथा विभाग

१ नव्वद–नाबाद ! ३६९
२ ब्रह्मर्षी सातवळेकर ३७५
३ शतायुषी ब्रह्मर्षी ३८१
४ गाडगेबाबांचे पुण्यस्मरण ३८७
५ श्रीसमर्थांचा नवा अवतार ३९३
६ राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज ३९९
७ ‘ गुरुकुंजा ’तील ती संध्याकाळ ! ४०३
८ नानांचे पुण्यस्मरण ४०८
९ ‘ महाराष्ट्ररत्न ’ बाबूराव जगताप ४१५

१० प्राचार्य बाबूराव जगताप ४१८
११ दत्तो वामन पोतदार ४२३
१२ मराठी भाषेचे भीष्माचार्य ४३०
१३ रोमचे डॉ. सुखात्मे ४३५
१४ देवाची मुले ४४०
१५ डॉ. जगदीशचंद्र जैन ४४५
१६ पत्रपंडित गाडगीळ ४५१
१७ वसंत–मालती ४५६
१८ दयेचे काव्य–गाय ४६३
१९ नीलकंठ ४६७
२० आनंदवन ४७२


## पाचवा विभाग


१ रंगभूमीचा राजराजेश्वर ४७७
२ बालगंधर्व साठ वर्षांचे झाले ! ४८३
३ बालगंधर्व ४९०
४ बालगंधर्व ४९३
५ परि मनाला नटवर झाला मंत्र महान ४९९
६ बालगंधर्वासंबंधी जेवढे आठवले तेवढे ! ५०४
७ बालगंधर्व रंगमंदिर ५२०
८ ‘ ते ’ गणपतराव कुठे आहेत ? ५२६
९ नटवर्य दाते ५३५
१० बाबूरावांचे पुण्यस्मरण ५४२
११ दुर्गा खोटे ५४७


卐

# पहिला विभाग

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शा. क्र. १६३०२

१

# आषाढस्य प्रथम दिवसे

आज आषाढ महिन्याचा पहिला दिवस. त्याची आठवण झाली की कवि-कुलगुरू कालिदासाच्या ‘ मेघदूता ’मधल्या ‘ आषाढस्य प्रथम दिवसे मेघमाश्लिष्ट-सानु । वप्रक्रिडापरिणतगजः प्रेक्षणीयं ददर्श ’ ह्या अमर पंक्ती ओठांवर खेळू लागतात; आणि आकाशातल्या मेघाकडे सहज डोळे वळून कारण नसतानाही मेघदूतातल्या यक्षाप्रमाणे आपले हृदय एकदम व्याकूळ होते. (‘ आनंदी ही विकल हृदयी पाहता मेघ दूर, तो कैसा हो प्रियजन मिठी ज्यास देण्या अधीर ? ’) भारतीय मनावर कालिदासाचे इतके सूक्ष्म संस्कार उमटलेले आहेत की, मानवी जीवनात अशी कोणतीही भावना किंवा अनुभव नसेल की, जिच्या उत्कट अवस्थेत रसिक आणि सुसंस्कृत माणसाच्या मुखातून कालिदासाची एखादी अन्वर्थक ओळ आपोआप उचंबळणार नाही. सौंदर्याच्या दर्शनाने आणि संगीताच्या श्रवणाने चांगला सुखी माणूससुद्धा अस्वस्थ होतो. त्याच्या मनाला एकदम कसली तरी हुरहुर वाटू लागते. त्याबरोबर ‘ रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान् । पर्युत्सुकी भवति यत्सुखिनोऽपि जन्तुः ॥ ’ ह्या ओळींचे एकदम स्मरण होते. अगदी फाटक्यातुटक्या कपड्यात एखादी सुंदर तरुणी चाललेली बघून ‘ सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यम् । मलिनपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति । इयमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी । किमिवहि मधुराणां मण्डनं नाकृ-तीनाम् ? ’ (‘ जातीच्या सुंदराला काहीही शोभते ! ’) ह्या पंक्ती कोणाच्या मुखातून बाहेर पडत नाहीत ? लाखात एक अशी एखादी लावण्यवती बालिका

पाहिली म्हणजे, 'हे न हुंगलेले फूल, हे न हात लावलेले कोवळे पान आणि हा न आस्वाद घेतलेला मधु, परमेश्वरानं कोणासाठी निर्माण केला आहे?' 'न जाने भोक्तारं कमिह समुपस्थास्यति विधिः!' हाच विचार कालिदासाप्रमाणे आपल्या मनात येत नाही काय? मनुष्याच्या भोवती ऋतुचक्राचे भ्रमण तर एकसारखे चाललेले असते. पण त्यामुळे निसर्गाच्या आणि भावनेच्या सृष्टीत जे आंदोलन होते, त्याचे मनोज्ञ स्पंदन कालिदासाच्या काव्याखेरीज इतरत्र कुठे प्रतीत होणार?

सांसारिकांच्या मन्मथाला उपशांत करणारा 'प्रचंडसूर्यः स्पृहणीयचंद्रमाः' असा तो निदाघकाल, कामीजनांना प्रिय असणारा घ्यानगम, 'प्रकामकामं, प्रमदाजनप्रियं' असा शिशिर आणि हातात भ्रमराचे धनुष्य नि आम्रमंजिरीचे बाण घेऊन प्रेमीजनांची शिकार करण्यास येणारा वसंत योद्धा ह्यांचे अद्भुतरम्य वर्णन कालिदासाखेरीज जगात दुसऱ्या कोणत्या कवीने केले आहे? कालिदास हा शृंगाराचा तर सम्राट आहेच. स्त्री-पुरुषांच्या अंतःकरणाचे सूक्ष्म व्यापार कोमल कौशल्याने चित्रित करण्याची त्याने कमाल केली आहे! तथापि पुरुषांपेक्षाही स्त्रीहृदयातील प्रणयाच्या लपंडावाचे त्याला जेवढे आकलन आहे, तेवढे शेक्सपिअरलादेखील नसेल. स्त्रिया प्रेम कशा करतात? कालिदास सांगतो, 'स्त्रीणामाद्यं प्रणयवचनं विभ्रमो हि प्रियेषु' (स्त्रीची कांताजवळि पहिली प्रेमभाषा विलास।) आपल्या प्रियकराला बघण्याची त्यांची इच्छा असते. पण लाजेने वर डोळे उचलवत नाहीत. 'कुतूहलवानपि निसर्गशालिनः स्त्रीजनः'; तथापि, विनय आणि लज्जामुग्ध अशा भारतीय स्त्रीच्या कोमल शृंगाराचे जे अपूर्व सुंदर चित्र 'शाकुंतल'मध्ये कालिदासाने रेखाटले आहे, त्याला जागतिक वाङ्मयात तुलना नाही. पाहा. 'वाचं न मिश्रयति यद्यपि मद्वचोभिः। कर्णं ददात्यभिमुखं मयि भाषमाणे'—पण मराठीतच त्याचा भावार्थ सांगितलेला बरा. तो राजा दुष्यंत म्हणजे, 'मी बोलत असताना ती मधेच बोलत नाही. मी काय बोलतो ते ती ऐकते. ती माझ्याकडे बघत नाही, पण माझ्याखेरीज दुसरीकडेही बघत नाही. ती आपले प्रेम प्रकटही करीत नाही किंवा लपवीतही नाही. पायाला दर्भांकुर रुतला म्हणून ती थांबते आणि हळूच चोरून माझ्याकडे पाहते. काट्याला पदर अडकला म्हणून तो सोडवण्याचे निमित्त करून ती थांबते. अन् पुन्हा मला नीट न्याहाळून बघते!' वाहवा! जगातले सारे प्रेमाचे वाङ्मय एवढ्या वर्णनावरून ओवाळून टाकावे असे वाटते. आणि गंमत ही की, शृंगाराच्या गगनात

एवढ्या उत्तुंग भराऱ्या मारून कालिदासाने भारतीय संस्कृतीच्या मर्यादा ओलांडल्या नाहीत! किंबहुना कन्या, पत्नी आणि माता ह्या तीन उदात्त अवस्थेतच स्त्री-जीवनाचे साफल्य आहे हे दाखविण्यासाठी त्याने 'अभिज्ञानं-शाकुंतल' हे अमर नाट्य लिहिले. कन्या ही आपली नव्हे! 'अर्थोहि कन्या परकीय एव।' पत्नीचे कर्तव्य काय तर? 'गृहिणी सचिवः सखीमिथः प्रिय-शिष्या ललिते कलाविधौ' विग्रहित स्त्रीचे एवढे वास्तववादी आणि काव्यमय वर्णन जगात कोणत्या कवीने केले आहे? एवढेच नव्हे तर पतीवर प्रेम करणाऱ्या स्त्रीने आपल्या पतीबरोबर सतीच गेले पाहिजे. कारण अचेतन निसर्गाचा तोच कायदा आहे. 'शशिना सह याति कौमुदी। सहमेघेन तडित्प्रलीयते' (चंद्राच्या मागे कौमुदी जाते, मेघाच्या मागे वीज जाते.) असा 'सतीचा उदात्त आदर्श' त्याने 'कुमारसंभवात' चितारलेला आहे. सारांश, राजाच्या अंतःपुरापासून तो पर्वताच्या शिखरापर्यंत, गृहस्थाच्या संसारापासून तो अरण्यातील ऋषींच्या आश्रमापर्यंत कालिदासाच्या प्रतिभेने मोठ्या विश्वासाने आणि विलासाने संचार केलेला आहे. संस्कृत भाषा ही तर देवांची भाषा आहे! इतकी समृद्ध आणि सुंदर भाषा जगात दुसरी कोणतीही नसेल. पण ह्या देवभाषेचे 'नंदनवन' ह्या पृथ्वीतलावर जर साक्षात कोणी निर्माण केले असेल तर ते कालिदासाने! कालिदास हा भारताचा एकमेव सर्वश्रेष्ठ महाकवी समजला जातो. त्याच्यानंतर म्हणूनच नाव घेण्यासारखा दुसरा कवीच सापडत नाही.

पुरा कवीनां गणनाप्रसंगे कनिष्ठिकाधिष्ठित कालिदासः।
अद्यापि तत्तुल्यकवेरभावात् अनामिका सार्थवती बभूव ॥

एकदा कवींची गणना करताना कालिदासाच्या नावाने करांगुली मोडल्यानंतर आंगठीच्या बोटासाठी त्याच्या तोडीच्या दुसऱ्या कवीचे नाव काही सापडेना म्हणून 'अनामिका' हे त्याचे नाव सार्थ ठरले. भारतामध्ये अशी एकही प्रादेशिक भाषा नाही, की जिच्या वाङ्मयाला कालिदासाच्या शेकडो सुभाषितांनी भूषविले नाही. 'मरणं प्रकृतिः शरीराणाम्। विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः', 'भिन्नरुचिर्हि लोकाः', 'एकोहि दोषो गुणसंनिपाते', 'शरीरमाद्यं खलु धर्म-साधनम्', 'विषमप्यमृतं क्वचित् भवेत्', 'निसर्ग फलानुमेयः प्रारंभाः', 'शरीरनिपुणाः स्त्रियः', 'परदुःखं शीतलं', 'कामी स्वतां पश्यति', 'अति स्नेहः पापशंकी', 'भवितव्यता खलु बलवती', 'नीचैर्गच्छत्युपरि च दशां चक्रनेमिक्रमेण', अशी किती म्हणून सांगायची?

जवळ जवळ दोन हजार वर्षे झाली तरी महाकवी कालिदासाचे काव्य आणि नाट्य काश्मीरातल्या एखाद्या रमणीय सरोवरात उमललेल्या मनोहर कमलाप्रमाणे उन्मादक आणि आल्हाददायक वाटते. भारतीय संस्कृतीमध्ये जे जे म्हणून सत्य, शिव आणि सुंदर आहे, त्या त्या सर्वांचा अद्भुतरम्य समन्वय कालिदासाच्या वाङ्मयात झाला आहे. म्हणून वाल्मीकी आणि व्यास ह्यांच्या बरोबरीने कालिदासाचे नाव घेतले जाते. प्राचीन भारतीय संस्कृतीची तीन विविध स्वरूपे या तीन महाकवींनी प्रकट केली आहेत. भारताचे नैतिक सामर्थ्य 'रामायणा'त आढळते, तर 'महाभारता'त भारताच्या बौद्धिक बलाचा परमोत्कर्ष दृष्टीस पडतो अन् कालिदासाच्या वाङ्मयात भारतीय जीवनातील सौंदर्याच्या विविध विलासांचा देदीप्यमान साक्षात्कार घडतो. म्हणून श्री. अरविंद म्हणतात की, वाल्मीकी, व्यास आणि कालिदास ह्यांच्या व्यतिरिक्त भारतामधले सारे वाङ्मय नष्ट झाले, तरी भारतीय संस्कृतीची काहीही हानी होणार नाही. हिमालय, गंगा, काश्मीर किंवा अजिंठा ह्यांचें दर्शन ज्यांनी घेतले नाही, त्यांचे भारतीयत्व ज्याप्रमाणे अपूर्ण मानले जाते, त्याप्रमाणे कालिदासाचे 'मेघदूत' किंवा 'शाकुंतल' ज्याने वाचले नसेल, त्याच्या भारतीयत्वात फार मोठा उणेपणा राहिला आहे असे समजावयाला हरकत नाही. भारतीय जीवनात कालिदासाचे स्थान ध्रुवाप्रमाणे अढळ आहे. कारण वाङ्मयाचा अमर सिद्धांत त्याने सांगून ठेवला आहे की, 'भाषेची पार्वती नि अर्थाचा परमेश्वर ह्यांचा समन्वय झाल्यावाचून चिरंतन साहित्य मुळी निर्माणच होत नाही!' म्हणून त्या पार्वती-परमेश्वराला कालिदासाच्या काव्यात वंदन करून हे त्याचे स्मरण संपवू.

वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥

मराठा : २२-६-६०

२

## महाकवी कालिदासाला अभिवादन

दोन हजार वर्षे होऊन गेली. भारतात अनेक मोठमोठे कवी आणि नाटककार होऊन गेले. पण महाकवी कालिदासाशी ज्याची तुलना होऊ शकेल, निदान त्याच्या नंतर तरी ज्याचे नाव घेता येईल असा एकही कवी डोळ्यांसमोर दिसत नाही. 'कनिष्ठिकाधिष्ठित' कालिदासाने अनामिकेला जे एकदा 'सार्थवती' करून ठेवले आहे, त्या परिस्थितीत अजून काही बदल झालेला नाही. कालिदासाच्या जीवनाविषयी निश्चित अशी काही माहिती मिळत नाही. त्याच्या नावाशी निगडीत अशा अनेक दंतकथा उपलब्ध आहेत, पण त्यांना ऐतिहासिक महत्त्व काही नाही. कालिदासाच्या काळाची अद्याप निश्चिती झाली नाही. विक्रम संवत ज्याने ख्रिस्त शकापूर्वी सत्तावन्नाव्या वर्षी सुरू केला, त्या उज्जयिनीच्या विक्रमादित्याच्या पदरी कालिदास होता अशी सर्वसामान्य समजूत आहे. त्याच्या 'विक्रमोर्वशीय' नाटकावरूनही या समजुतीला दुजोरा मिळतो. हे जर खरे असेल तर कालिदास अदमासे दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेला असे मानायला हरकत नाही. पण गुप्त वंशामध्ये जो दुसरा चंद्रगुप्त राजा होऊन गेला त्यालाही विक्रमादित्य ही पदवी होती. तो इसवी सन ३४५ मध्ये राज्यावर बसला आणि त्याने एकूणसत्तर वर्षे राज्य केले. ह्याच्या पदरी कालिदास होता असे कोणी समजतात. ते खरे मानले तर कालिदास हा दीड हजार वर्षांपूर्वी होऊन गेला असे ठरते. अनुमानधपक्याने बोलायचे झाल्यास कालिदास हा दीड दोन हजार वर्षांपूर्वी होऊन गेला असे म्हणता येईल.

हा जो कोण विक्रमादित्य राजा असेल त्याचा कालखंड भारताच्या इतिहासामधला एक अत्यंत उज्ज्वल काल असला पाहिजे. नाना कला, विद्या आणि शास्त्रे ह्यांचा त्या काळी फार मोठा उत्कर्ष झाला असला पाहिजे. त्या वेळचे सामाजिक जीवन हे अतिशय सुसंस्कृत आणि सुखासीन असावे असे वाटते. त्या वेळच्या सर्व कला नि विद्या ह्यांच्यामध्ये कालिदास चांगलाच पारंगत असावा असे दिसते, आणि त्याचा सारा जन्म विलासी आणि समृद्ध वातावरणात गेलेला असावा असे वाटते. सर्व भारतवर्षात त्याने प्रवास केलेला असावा. कारण हिमालयापासून तो कन्याकुमारीपर्यंतचा देशाचा सर्व विस्तार त्याला परिचित होता. हिमालयामधील अनेक अद्‌भुतरम्य दृश्यांची त्याने जी अप्रतिम वर्णने केली आहेत ती काय न पाहताच ? काश्मीरमधील केशराच्या फुलांचे त्याने वर्णन केले आहे, त्याअर्थी इतरत्र कोठेही न आढळणारे ते दुर्मिळ दृश्य त्याने डोळ्यांनी पाहिले असले पाहिजे हे उघड आहे. भारतीय सौंदर्य, कला आणि संस्कृती ह्या त्याने आपल्या रोमरोमात भिनवल्या होत्या म्हणून लोकोत्तर प्रतिभेच्या सामर्थ्यावर तो आपल्या साहित्यात भारताचा आत्मा प्रकट करू शकला.

भारतीय जीवनात विचाराचे, भावनेचे, कल्पनेचे आणि कलेचे जेवढे म्हणून काही सौंदर्य असेल, त्याचे सर्वांगसुंदर दर्शन फक्त कालिदासाच्या काव्यात घडते. सौंदर्याचा एवढा साक्षात्कार जगामध्ये कोणत्याही कवीला झाला नसेल. कालिदासाचा एकेक शब्द नि एकेक ओळ म्हणजे अमृताचे कारंजे आहे. संस्कृत भाषा म्हणजे आधीच मधुरातील मधुर भाषा. तिला देवांची भाषा म्हणतात, ते काही उगाच नाही. पण ह्या भाषेतील ध्वनीमध्ये, शब्दामध्ये आणि रचनेमध्ये माधुर्याचे नि सौंदर्याचे जास्तीत जास्त सामर्थ्य किती भरले आहे ह्याचा आल्हादकारक प्रत्यय केवळ कालिदासाच्या काव्यात येतो. त्याच्या भाषेची ऐट, डौल आणि नखरा ह्यांचे काय वर्णन करावे ? एखादी महान नर्तकी पायात पैंजण घालून गिरक्या घेत जशी जाते तशी कालिदासाच्या कवितेची एकेक ओळ जाते आहे असा भास होतो. ती वाचताना वाचणाऱ्याच्या मनात विविध संवेदनांच्या आणि भावनांच्या इतक्या सूक्ष्म आणि कोमल छटा प्रतीत होतात की, आपण एखाद्या स्वप्नसृष्टीतच वावरतो आहोत असे त्याला वाटल्यावाचून राहवत नाही. दीड दोन हजार वर्षे होऊन गेली तरी कालिदासाच्या काव्याचे हे सौंदर्य आणि सामर्थ्य अजूनही जसे होते तसे प्रफुल्लित आणि प्रभावी आहे.

अलौकिक सौंदर्याचा असा महान उद्गाता भारतवर्षात आजपर्यंत झाला नाही. म्हणून कालिदासाचे नाव कानी पडले म्हणजे अजूनही प्रत्येक भारतवर्षीयाची मान आदराने खाली लवते.

कालिदास हा जितका भावनासौंदर्याचा उपासक होता, तितकाच तो निसर्ग-सौदर्याचा भक्त होता. किंबहुना निसर्ग आणि भावना ह्यांचा मनोहर समन्वय साधण्याचा त्याने प्रयत्न केलेला आहे उदाहरणार्थ, त्याचे 'मेघदूत' हे काव्य घ्या. जगाच्या वाङ्मयात 'मेघदूता' सारखे अलौकिक काव्य आढळणार नाही. कविप्रतिभेच्या उन्मेषाचा तो देदीप्यमान उच्चांक होय. निसर्गसौंदर्याच्या चौकटीत मानवी भावनेचे एवढे हृदयंगम चित्रण कोणीही केले नसेल. 'पूर्व-मेघात' निसर्गसौंदर्याचे वर्णन आहे, तर 'उत्तरमेघा'त मानवी हृदयाचे चित्रण आहे. पण दोन्ही भागांचा जो कालिदासाने इतका समन्वय सुंदर साधलेला आहे, की ह्यापैकी कोणता भाग अधिक आकर्षक ह्याचा वाचकांना भ्रम पडतो. निसर्ग आणि मानव ह्यामध्ये कालिदासाने एक अभिनव दुवा निर्माण केलेला आहे. ही एक भारतीय परंपरा आहे. निसर्ग, मानव आणि परमेश्वर ह्यामध्ये भारतीय विचारवंतांनी कधीच भेद मानलेला नाही. वेदांत आणि उपनिषदांत निसर्ग-वर्णनाची जी अमर सूक्ते आहेत त्यांचे स्वरूप हेच आहे. पाश्चात्त्य देशांतील कवींना निसर्गाची आणि मानवाची सांगड घालण्याची ही दृष्टी एकोणिसाव्या शतकापर्यंत आलेली नव्हती. मानवी जीवनाचा आणि भावनेचा संदर्भ सोडून कालिदासाने निसर्गाचे कधीही वर्णन केले नाही. त्यामुळे निसर्गसौंदर्याची त्याची वर्णने केवळ अंतश्चक्षूंनाच आनंद देत नाहीत तर अंतःकरणातील भावनांच्या तारा कंपित करतात. निसर्ग हा मानवी भावनेला कशी साद देतो ह्याची अत्यंत हृदयंगम चित्रे 'शाकुन्तल' नाटकात जागोजाग विखुरलेली आहेत. शकुंतला जेव्हा श्वशुरगृही जावयास निघते तेव्हा वनदेवता तिला आशीर्वाद देतात. रत्नांचे नि वस्त्रांचे आहेर करतात. वनदेवीचा संदेश कोकिळ तिला देतो. ती जेव्हा जाऊ लागते तेव्हा

उद्गलित दर्भकवला मृगाः परित्यक्तनर्तना मयूराः
अपसृत पांडु पत्रा मुंचत्यश्रूणीव लताः ॥

(हरिणाच्या तोंडातून गवताचे कवळ गळून पडतात. मोर आपले नाचण्याचे काम सोडून देतात. वेलींची पिकलेली पाने गळतात. जणू काय त्या अश्रूच ढाळीत आहेत.)

शकुंतलेच्या मैत्रिणी ज्या लतावेली त्यांनी आता सासरी जाणाऱ्या आपल्या प्रियसखीला निरोप द्यावा अशी कण्वमुनी त्यांना विनंती करतात, तेव्हा तर काळजाला अक्षरशः पीळ पडतो.

पातुं न प्रथमं व्यवस्यति जलं युष्मास्त्रपीतेषु या
नादत्ते प्रियमंडनापि भवतां स्नेहेन या पल्लवम् ।
आद्येवः कुसुमप्रसूनि समये यस्या भवत्युत्सवः
सेयं याति शकुंतला पतिगृहे सर्वैरनुज्ञायताम् ।।

( तुम्हाला पाणी घातल्याखेरीज जी कधी पाणी पीत नाही, नटण्याची हौस असूनही केवळ तुमच्या प्रेमामुळे ती फूलसुद्धा तोडत नाही, तुम्हांला फुले येतात तेव्हा तर तिच्या आनंदाला पारावार राहात नाही, ती शकुंतला आता सासरी जात आहे. तरी सर्वांनी तिला निरोप द्यावा. )

'ऋतुसंहारा'त निरनिराळ्या ऋतूंच्या सौंदर्याचे वर्णन आहे. पण त्यात कालिदासाने मानवी भावना गुंतवल्या आहेत. म्हणून ते अत्यंत हृदयस्पर्शी वाटते. हे वसंताचे वर्णन वाचा.

प्रफुल्लचूताङ्कुरतीक्ष्णसायको द्विरेफमाला विलसद्धनुर्गुणः ।
मनांसि वेद्धुं सुरतप्रसंगिनां वसंतयोद्धा समुपागत प्रिये ।।

( हे प्रिये फुललेल्या आम्रमंजिरीचे तीक्ष्ण बाण आपल्या धनुष्याच्या भ्रमर-मालारूपी दोरीला लावून प्रेमीजनांची हृदये विद्ध करण्यासाठी हा पाहा 'वसंत' योद्धा आलेला आहे. )

त्यानंतर आता हे ग्रीष्माचे वर्णन पाहा.

प्रचंडसूर्यः स्पृहणीयचन्द्रमाः सदावगाहक्षतवारिसंचयः
दिनान्तरम्योऽभ्युपशान्त मन्मथो निदाघकालोऽयमुपागतः प्रिये !

( प्रिये, ज्या वेळी सूर्य प्रखर आणि चंद्र सुखकारक वाटतो, जेव्हा जलाशयाचे पाणी पोहणारे एकसारखे उडवीत असतात, अन् जेव्हा संध्याकाळची वेळ रम्य असते आणि कामभावना आळसलेली असते, तो हा ग्रीष्मकाळ आता आला आहे ! )

कालिदासाच्या काव्यातील निसर्गसौंदर्याचे शेकडो उतारे देता येतील. पण ते हे स्थळ नव्हे. एक सुप्रसिद्ध आंग्ल टीकाकार कालिदासाबद्दल म्हणतो, 'निसर्गाचे इतके अचूक आणि हुबेहूब वर्णन क्वचितच दुसऱ्या कवीने केले असेल. कालिदासाच्या काव्याचे रसग्रहण करायचे असेल तर एखाद्या वनात

किंवा पर्वतांच्या सान्निध्यातच जाऊन बसावे लागेल. म्हणजे वृक्ष, वेली आणि फुले कालिदास म्हणतो त्याप्रमाणे जिवंत असल्याचा साक्षात्कार होईल !

निसर्गाच्या सौंदर्याइतकाच कालिदास हा मानवी सौंदर्याचा वेडा होता. स्त्रीसौंदर्याचे वर्णन करण्यात तर त्याचा हात धरणारा कवी अजून पृथ्वीतलावर जन्माला यावयाचा आहे. तथापि, स्त्रीसौंदर्याकडे त्याची पाहण्याची दृष्टी विशुद्ध पावित्र्याची होती. कामुकतेचा लवलेशही तिच्यात आढळणार नाही. मानवी सौंदर्य ही काही तरी एक दिव्य शक्ती आहे अशी त्याची भावना होती. ' विक्रमोर्वशीय ' नाटकातले हे उर्वशीचे वर्णन पाहा.

अस्याः सर्गविधौ प्रजापतिरभूत् चंद्रो नु कान्तिप्रदः
शृंगारैकरसः स्वयं नु मदनो मासो नु पुष्पाकरः ।
वेदाभ्यासजडः कथं स विषय–व्यावृत्तकौतूहलो
निर्मातुं प्रभवेन्मनोहरमिदं रूपं पुराणो मुनिः ।।

( हिला निर्माण करणारा हिचा निर्माता एक तेजस्वी चंद्र तरी असावा, किंवा मूर्तिमंत शृंगाररस जो मदन तो तरी असावा, नाहीतर फुलांचा राजा जो वसंत ऋतू तो असावा. ऐहिक गोष्टीवरून ज्याचे लक्ष उडालेले आहे, तो वेदाभ्यासजड आणि जुनापुराणा ब्रह्मदेव असे मनोहर सौंदर्य कसे बरे निर्माण करू शकेल ? )

दुष्यंत जेव्हा शकुंतलेला प्रथम पाहतो तेव्हा तिचे ते दिव्य सौंदर्य पाहून एकदम त्याच्या मनात हा प्रश्न उभा राहतो.

मानुषीषु कथं वा स्यादस्य रूपस्य संभवः ।
न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् ।।

( मनुष्याच्या कुळात एवढे सौंदर्य कसे संभवते ? तेजस्वी तारका ही पृथ्वीवर थोडीच प्रकट होते ? )

तथापि, ' शाकुंतल ' नाटकाच्या दुसऱ्या अंकात शकुंतलेचे जे वर्णन केले आहे, त्यात कालिदासाने सौंदर्याबद्दलच्या आपल्या कल्पनांचे सर्वस्व प्रकट केले आहे.

अनाघ्रातं पुष्पं किसलयमलूनं कररुहैः
अनाविद्धं रत्नं मधु नव–मनास्वादितरसम् ।
अखण्डं पुण्यानां फलमिव च तद्रूपमनघं
न जाने भोक्तारं कमिह समुपस्थास्यति विधिः ।।

( तिचे निर्दोष रूप कसे आहे? तर न हुंगलेल्या फुलासारखे. नखांनी न तोडलेल्या कोवळ्या पानासारखे. छिद्र न पाडलेल्या रत्नासारखे. आस्वाद न घेतलेल्या ताज्या मधूसारखे. पुण्य कृत्याला प्राप्त झालेल्या संपूर्ण फळासारखे. विधात्याने कोण हिचा उपभोक्ता निर्मून ठेवला आहे काही कळत नाही! )

ह्या वर्णनात अनेक वस्तूंशी तिची तुलना केली आहे. त्याची मौज बघा. फुलाप्रमाणे आणि पानाप्रमाणे ती प्रफुल्लित आणि सुंदर आहे असे सांगताना, त्यांच्याप्रमाणे ती कोमल आणि क्षणभंगुर आहे असे सुचविले आहे. त्याच्या उलट रत्नाप्रमाणे तिचे सौंदर्य चिरकालिक आहे असेही सांगितले आहे. 'अनास्वादित मधू'शी तुलना करून तिच्या सौंदर्याची एक निराळीच 'रुची' सूचित केली आहे; आणि ती पुण्य कृत्याच्या फळासारखी आहे असे सांगून तिच्या सौंदर्याभोवती एक पावित्र्याचे वलय निर्माण केले आहे.

'मेघदूता'मधे यक्षाने आपल्या पत्नीचे जे वर्णन केले आहे ते अविस्मरणीय आहे.

तन्वी श्यामा शिखरिदशना पक्वबिंबाधरोष्ठी<br>
मध्ये क्षामा चकितहरिणी प्रेक्षणा निम्ननाभिः ।<br>
श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्यां ॥<br>
या तत्र स्याद्युवतिविषये सृष्टिराद्येव धातुः

( सडपातळ, श्यामल, टोकदार दंतपंक्ती असलेली, पिकलेल्या तोंडल्याप्रमाणे जिचा अधर आहे अशी, अरुंद कंबर असलेली, घाबरलेल्या हरिणीप्रमाणे डोळे असलेली, खोल नाभीची, नितंबभाराने मंद चालणारी आणि स्तनभाराने किंचित वाकलेली, जणू काही ब्रह्मदेवाने निर्माण केलेली ती पहिलीच स्त्री आहे. )

अशा रीतीची स्त्री-शरीराच्या सौंदर्याची विविध वर्णने कालिदासाच्या काव्यात आढळून येतील. पण ती वाचल्यानंतर आपले अंतःकरण विशुद्ध आनंदाने भरून जाते. ईश्वरी सामर्थ्याचे आपणाला कौतुक वाटते, आणि मन पवित्र आणि उदात्त भावनेने भारावून जाते. सुखवादाचा किंवा भोगवादाचा पुरस्कार कालिदासाने आपल्या काव्यात कुठेही केलेला नाही. आनंद आणि मनःशांती हीच मानवी जीवनाची ध्येये आहेत असे तो मानतो. आपल्या पतीच्या नेत्रांना आनंद देणे हाच स्त्रीच्या सौंदर्याचा आणि शृंगाराचा हेतू आहे असे 'कुमारसंभवा'त त्याने म्हटले आहे. स्त्रीपुरुषांचा सुखसंगम घडवून

आणणे हा प्रेमाचा उद्देश आहे असे त्याने प्रतिपादलेले आहे. सारांश, भारतीय संस्कृतीचे सारे तेज, चैतन्य आणि पावित्र्य कालिदासाच्या काव्यात प्रकट झालेले आहे. म्हणून वाल्मीकी आणि व्यास ह्यांच्यानंतर कालिदासाचे नाव घेतले जाते. प्राचीन भारताच्या संस्कृतीचे हे तीनच प्रतिनिधी मानले जातात. श्री. अरविंद म्हणतात की, ह्या तिघांच्या व्यतिरिक्त भारतातील बाकीचे सारे साहित्य नष्ट झाले तरी भारतीय संस्कृतीची काही हानी होणार नाही. भारताच्या या सर्वश्रेष्ठ महाकवीला आमचे अभिवादन असो.

नवयुग : २६-६-१९६०

०१०६६ निबंध ३२१९४ १०५५

# ३

## संत नामदेव

संत नामदेवमहाराज हे तेराव्या शतकात होऊन गेले. त्यांचा जन्म कार्तिक शुद्ध एकादशी शके ११९२ ( २६ ऑक्टोबर १२७० ) रोजी झाला. त्यांच्या निर्वाणाची निश्चित तिथी आढळत नाही. तथापि, त्यासंबंधीची आख्यायिका आहे. तिजवरून वयाच्या ऐंशीव्या वर्षी आषाढ वद्य त्रयोदशी शके १२७२ ( इ. स. १३५० ) मध्ये पंढरपूरला त्यांनी आपला देह ठेवला. एका आठवड्यापूर्वी त्यांची सहाशे-अठरावी पुण्यतिथी महाराष्ट्रामध्ये सर्वत्र भक्तिभावाने साजरी झाली. ही गोष्ट सर्वविख्यात आहे, की महाराष्ट्राच्या साधुसंतांनी भागवत धर्माच्या मंदिराची महाराष्ट्रात प्राणप्रतिष्ठा केली. त्या महान कार्यात संत ज्ञानेश्वरांबरोबर नामदेवांचा नि त्यांच्या संतमेळ्याचा फार मोठा वाटा आहे. भोळ्याभाबड्या बहुजनसमाजाच्या सगुण भक्तीला ज्ञानेश्वराने डोळस केले आणि भागवत धर्माच्या मंदिराचा पाया महाराष्ट्रात घातला, तर संत नामदेवाने त्या पायावर सर्वांना सुलभ नि सुगम अशा नामभक्तीचे विस्तीर्ण मंदिर बांधले, आणि त्या भक्तियोगाचा चौघडा महाराष्ट्रापासून तो उत्तरेकडे थेट पंजाबपर्यंत त्यांनी वाजविला. संत बहिणाबाई म्हणतात,

संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ॥
जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥

भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥

ज्या भागवत धर्माच्या देवाल्याचा पाया संत ज्ञानेश्वरांनी घातला आणि ज्यावर अखेर तुकोबांनी नामसंकीर्तनाचा कळस चढवला, त्या देवालयाचा प्रचंड विस्तार जो महाराष्ट्रात झाला, त्यात संत नामदेवांचा फार मोठा वाटा आहे, यात काय शंका ? दुर्दैवाने नामदेवांचे समग्र आणि साधार चरित्र अद्याप उपलब्ध नाही. त्यामुळे महिपतीबाबांनी लिहिलेल्या त्यांच्या आख्यानपर चरित्रावरच आपल्याला अवलंबून राहावे लागते.

तीच स्थिती त्यांच्या गाथेची पण आहे. विष्णुबुवा जोगमहाराज यांनी संपादित केलेल्या आणि 'चित्रशाळे'ने प्रकाशित केलेल्या नामदेवाच्या गाथ्यात २५८८ अभंग आहेत. सर्वच अभंग नामदेवाचे असतील अशी ग्वाही देता येत नाही. संत नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन असून एकमेकांचे अत्यंत जिव्हाळ्याचे स्नेही होते, या गोष्टीचा उल्लेख आजमितीपर्यंत अनेक संतकवींच्या ग्रंथांमध्ये केलेला आढळतो. तथापि, उभयतांची भाषा वेगवेगळी आहे, ह्या मुद्द्यावर ज्ञानेश्वर-नामदेवांची जोडी फोडण्याचा प्रयत्न महाराष्ट्रातल्या काही विलक्षण टीकाकारांनी अलीकडे केलेला आहे. पण ती गोष्ट आजच्या पुष्कळशा विद्वानांना मान्य नाही. त्यांच्या मते 'ज्ञानेश्वरी'कर्ते ज्ञानेश्वर आणि संत नामदेव एकाच काळात होऊन गेलेले आहेत. किंबहुना नामदेवाच्या आणि ज्ञानदेवाच्या भाषेमध्ये वेगळेपणा नसून पुष्कळच सारखेपणा आहे आणि दोघांच्याही लेखनातील विचारांची साम्यस्थळे अनेक आढळतात असे त्यांचे म्हणणे आहे. नामदेवाचे गुरू कोण या प्रश्नाबाबतही थोडासा वाद आहे. स्वतः नामदेव पारमार्थिक दृष्टीने विसोबा खेचर यांना आपले गुरू मानतात. पण 'नामयाचा गुरु । तो हा सोपान सद्गुरु' असे जनाबाईने म्हटलेले आहे. ह्या विसंगतीचा खुलासा स्वतः विसोबा खेचर यांनी केलेला आहे. ते सांगतात की, ज्ञानेश्वरांनी श्रीसोपानदेवाकडून आपल्याला योगदीक्षा देवविली. यावरून जनाबाईने सोपानदेवांना 'नामयाचा गुरू' असे म्हटले असावे. म्हणून नामदेवांचे गुरू विसोबा खेचर, त्यांचे गुरू सोपानदेव आणि त्यांचे गुरू ज्ञानेश्वर अशी ही एकंदर गुरुपरंपरा लागते.

नामदेवांचे आईबाप दामाशेटी आणि गोणाई हे विठ्ठलोपासक होते. दामाशेटी कापड विकण्याचा आणि कपडे शिवण्याचा धंदा करीत असे. म्हणून बालवयापासून नामदेव हा विठ्ठलभक्त झाला. नामदेवाने शिंपी कामाच्या धंद्यात किंवा कापडाच्या व्यापारात मुळी मनच घातले नाही. संसाराला लागला तर तो

ताळ्यावर येईल, म्हणून वडिलांनी त्यांचे लग्न राजाईशी करून दिले. विठ्ठलाच्या नावाने नवरा अहर्निश टाळ कुटीत बसतो, म्हणून राजाई त्याला खूप रागावून बोलायची. पण बायकोच्या विरोधामुळे नामदेवाची विठ्ठलनिष्ठा कधीही डळमळीत झाली नाही. त्याच्या ह्या महान विठ्ठलभक्तीचा डंका ज्ञानेश्वरादी संतमंडळींपर्यंत थेट आळंदीला जाऊन पोचला. ह्याच सुमारास 'माझ्यासारखा भक्त मीच!' असा गर्व म्हणे नामदेवाला चढला. म्हणून नामदेवाचे 'कच्चे मडके' गोरोबा-काकाकडून मुक्ताबाईने चांगले पारखून घेतले. गोरोबांनी केलेल्या त्या परीक्षेत पारमार्थिक दृष्ट्या नामदेव कच्चा ठरला. पुढे तो आंवढ्या नागनाथाच्या देवळात गेला. तेथे महादेवाच्या पिंडीवर पाय ठेवून विसोबा खेचर खुशाल झोपलेले दिसले. त्यांनी नामदेवाला अद्वैतभक्तीची दीक्षा दिली. श्रीनामदेवाची श्रीज्ञानदेवाशी पंढरपुरी गाठ पडली नि दोघांमध्ये मैत्री जडली, म्हणून श्रीज्ञानेश्वरांना पंढरी सांप्रदायाबद्दल प्रेम वाटू लागले नि ते या सांप्रदायाचे पहिले अध्वर्यू बनले.

त्यांच्याभोवती निरनिराळ्या जातीजमातीमधल्या भक्तांचा नि संतांचा मेळा जमला. त्या मेळाव्याचे ज्ञानेश्वर अध्यक्ष झाले तर त्याचे नेतृत्व साहजिकच नामदेवाकडे गेले. या संतमेळ्याने अद्वैतभक्तीचा प्रचारभजनकीर्तनाच्या द्वारे सर्वत्र करून सारा महाराष्ट्र दुमदुमून टाकला, तर ते भक्तिसांप्रदायाचे लोण नामदेव-ज्ञानेश्वरांनी पंजाबापर्यंत नेऊन पोहोचविले. कारण दोघांनी मिळून पुढे सर्व उत्तर हिंदुस्थानचा प्रवास केला. ते कऱ्हाडमार्गाने पंढरपुराहून निघाले. हा मार्ग अद्याप पाहावयास मिळतो. या तीर्थयात्रेत त्यांची नि अनेक साधुसंतांची गाठ पडली नि त्यांना त्यांनी आपला परमार्थ मार्ग समजावून सांगितला. ही महायात्रा संपवून ते उभयता शके १२१८ च्या कार्तिक शुद्ध एकादशीला पंढर-पूरला परत आले असावेत. तो उत्सव संपल्यानंतर आळंदीला जाऊन 'जिवंत समाधी घेण्याची आपली इच्छा आहे' असे ज्ञानदेवांनी नामदेवांना सांगितले. तेव्हा नामदेव नि इतर अनेक मोठे संत श्रीज्ञानेश्वरादि भावंडांबरोबर पंढरपुराहून आळंदीला गेले. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर पुढे संत नामदेव जवळ जवळ चौपन्न वर्षे हयात होते. त्या काळात परधर्मीयांची राजवट महाराष्ट्रात सुरू झाली. त्याचा तडाखा महाराष्ट्रातल्या वारकरी पंथालाही जाणवला असल्यास नवल नाही. तथापि, तशाही प्रतिकूल परिस्थितीत 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' ह्या ज्ञानेश्वरांच्या शिकवणुकीचा प्रचार त्यांनी गुजरात, उत्तर प्रांत आणि

पंजाब या भागांतल्या लोकांमध्ये पुन्हा दुसऱ्यांदा दौरा करून केला. आपल्या आयुष्यातील शेवटची वीस वर्षे नामदेवांनी पंजाबात काढली असावीत असे वाटते; आणि त्या भागात त्यांनी विठ्ठल संप्रदायाचा आणि भक्तिमार्गाचा प्रचार करून आपले आयुष्य सार्थकी लावले. श्रीज्ञानेश्वरांच्याबद्दल नामदेवांना किती आदर वाटत होता, ते नामदेवांच्या एकाच अभंगावरून समजण्यासारखे आहे.

ग्रंथामाजी ग्रंथ । श्रेष्ठ ज्ञानदेवी ।
एक तरी ओवी । अनुभवावी ॥

देह विसर्जन करण्यासाठी अखेर नामदेव पंढरीला आले आणि विठ्ठलाच्या महाद्वारी त्यांनी समाधी घेतली. तीच 'नामदेवाची पायरी' म्हणून प्रसिद्ध आहे. नामदेवांच्या चरित्रामध्ये अनेक लोकविलक्षण चमत्कारांचा उल्लेख करण्यात येतो. विठ्ठलमूर्तीला दूध प्यायला लावणे, आंवढ्या नागनाथाचे देऊळ फिरवणे किंवा बादशहाच्या सांगण्यावरून मेलेली गाय जिवंत करणे, असे चमत्कार त्यांनी केल्याचे काही चरित्रकार सांगतात. अर्थात चरित्रनायकाला अलौकिकत्वाच्या कोटीत बसवण्यासाठी त्याच्याभोवती अशा असंभवनीय गोष्टी निर्माण करण्याची हौस फार पुरातन आहे. त्याच्यावर जाणत्यांनी विश्वास ठेवण्याचे कारण नाही. बालपणी ज्याच्या हातून पांडुरंग दूध प्याला होता, तो नामदेव तरुणपणी दरोडेखोर झाला, असाही एक प्रवाद नामदेवाच्या चरित्रात कोणीतरी घुसडलेला आहे. पण तो सकृद्दर्शनी इतका हास्यास्पद आहे की, त्याच्या सत्यासत्यतेबद्दल विचारही करण्याचे कारण नाही.

नामदेवाच्या अभंगांत आत्मचरित्रात्मक अभंग बरेच आहेत. तथापि ते अभंग कितपत विश्वासार्ह आहेत यासंबंधी संशय आहे. तरी देखील ज्ञानदेव, निवृत्तिनाथ, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांच्या समाधीचे जे अभंग नामदेवाने लिहिलेले आहेत आणि जे 'तीर्थावळींचे अभंग' म्हणून प्रसिद्ध आहेत, ते प्रत्यक्ष त्या समाधिप्रसंगी नामदेवांनी उपस्थित राहून लिहिलेले आहेत. म्हणून त्यामध्ये त्यांच्या स्वतःच्या चरित्रावर अन् भावनात्मक जीवनावर जो हृदयस्पर्शी प्रकाश पडतो, तो अत्यंत उद्बोधक आहे. नामदेवांनी आपली सर्वच अभंगरचना मनाच्या अत्यंत तळमळीमधून केलेली आहे. त्यांची रचना अत्यंत सुबोध आणि प्रासादिक असून त्यातून त्यांच्या मनाची आर्तता आणि व्याकुळता अत्यंत जिव्हाळ्याने व्यक्त झाली आहे. भक्तीचे आणि कारुण्याचे मिश्रण त्यांच्या अभंगांत ठिकठिकाणी इतके सुंदर झाले आहे की, ते वाचताना कंठ गद्गदून येतो. सर्वच

भक्तिमार्गाचे उपासक आपापल्या उपास्य दैवताचे नाव घेऊन बोलत असतात. नामदेवांची सर्व अभंगरचना अर्थातच विठ्ठलाला उद्देशून आहे. विठ्ठलाचे रूप, विठ्ठलाचे गुण, विठ्ठलाची पंढरी आणि विठ्ठलाचे नाम याविषयी उत्कट भावना उत्पन्न करताना त्यांनी अतिशयोक्ती आणि पुनरावृत्ती या दोषांकडेही दुर्लक्ष केलेले आहे. विठ्ठल हा दीनांचा कैवारी आहे, भक्तजनांची माउली आहे, पतितपावन हे त्याचे बिरुद आहे. पंढरीपुढे स्वर्ग, वैकुंठ आणि कैलास तुच्छ आहेत, असे त्यांनी पुनःपुन्हा आपल्या अभंगांतून सांगितले आहे. नामाची थोरवी वर्णन करताना भक्तिमार्गात नामस्मरण आणि नामसंकीर्तन याखेरीज दुसऱ्या कोणत्याही आचारधर्माचे अवडंबर नाही, असे ते सांगतात.

' नामेविण पाही । आम्हांपाशी काही नाही ॥ '

किंवा

' नामे भक्ति जोडे । नामे कीर्ती वाढे<br>
नामे सदा चढे । मोक्ष हाता ॥ '

असा नामाचा श्रेष्ठ गुणधर्म नामदेव वर्णन करतात. त्याचप्रमाणे भक्तीचे आदर्श संत असून अद्वैती भक्तियोगाचे मूर्त स्वरूप संतांच्या रूपाने पाहावयास मिळते, असे ते सागतात आणि

' संता अखंड भजावे । तेणे भेटे देव आपोआप ॥ '

असा संतांचा ते महिमा गातात. सारांश, नामदेवांची संतवाणी भावमाधुर्याने ओथंबलेली आहे, प्रेमळपणाने फुललेली आहे, प्रासादिक रसिकतेने मोहरलेली आहे आणि वात्सल्य व कारुण्य यांनी बहरलेली आहे. ' त्यांच्या शब्दाशब्दात विठ्ठलप्रीतीची आर्तता आणि उत्कटता दिसून येते. आत्मसमर्पणाची असीम ओढ व्यक्त होते. सांसारिक जीवनाबद्दल तीव्र अनुताप आणि आत्मविकासाची अनिवार उत्कटता प्रकट होते. वृत्तीचा कडवटपणा किंवा तुकोबाप्रमाणे शब्दाचा तिखटपण त्यांच्या अभंगात कुठेही आढळत नाही. त्यांच्या भावकोमल आणि भावमधुर अशा आत्मनिष्ठ काव्यरचनेमुळे मराठी साहित्यात भावकवितेचे नवे दालन उघडले जाऊन महाराष्ट्र शारदेला भावसंपन्नतेचे अलौकिक ऐश्वर्य लाभलेले आहे, ' असे जे उद्गार प्रा. शेणोलीकर यांनी ' नामयाची अमृतवाणी ' या आपल्या ग्रंथात काढलेले आहेत, ते अक्षरशः खरे आहेत.

वारकरी संप्रदायाचे ' निष्ठावंत ' प्रचारक, भागवत धर्माचे महान संस्थापक,

महाराष्ट्रातल्या बहुजनसमाजाला विठ्ठलभक्तीची आणि नामसंकीर्तनाची दीक्षा देणारे प्रभावी प्रसारक म्हणून नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतशिरोमणींच्या मालिकेत त्यांचे स्थान अढळ नि अभंग आहे. गुरुदेव रानडे ह्यांनी श्रीनामदेवांचे वर्णन ‘ लोकमतानुवर्ती कालाचे प्रवर्तक ’ असे केले आहे. महाराष्ट्रात परमार्थाचे मंदिर उभारणाऱ्या या महान संताचे विस्मरण अठ्ठावीस युगे चंद्रभागेच्या काठी विटेवरी समचरण उभ्या असलेल्या रखुमाईवल्लभ पांडुरंगाची अमर आरती महाराष्ट्रातले हजारो वारकरी जोपर्यंत रोजच्या रोज भक्तिभावाने म्हणत आहेत, तोपर्यंत होणे कधीतरी शक्य आहे काय ?

आषाढी कार्तिकी भक्त जन येती,
चंद्रभागेमाजी स्नाने जे करती,
दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ति,
केशवासी ‘ नामदेव ’ भावे ओवाळीती ’

मराठा : ३०-७-१९६८

ग्रंथ संग्रहालय,
दि:
अनुक्रम...
नोंद दि:

# ४

## आजची आषाढी

आज आषाढी एकादशी ! महाराष्ट्रातल्या वैष्णवांची नि भागवत धर्मीयांची पवित्र दिवाळी. गळ्यात तुळसीमाळा घालून, कपाळाला अबीरबुक्का लावून आणि खांद्यावर पताकांचे भार घेऊन हजारो वारकरी आज चंद्रभागेच्या वाळवंटी विठ्ठल-नामाचा गगनभेदी गजर करतील. म्हणून ' शिवशक्ती 'च्या प्रांगणात आपणही ' मराठ्या 'चे वाचक ही आषाढी साजरी करू या. तुकोबा म्हणतात.

पंढरीची वारी आहे माझे घरीं ।
आणिक न करी तीर्थव्रत ॥
व्रत एकादशी करीन उपवासी ।
गाईन अहर्निशी मुखी नाम ॥
नाम विठोबाचे घेईन मी वाचे ।
बीज कल्पांतीचे तुका म्हणे ॥

आषाढी पाळल्यानंतर दुसरे कोणतेही तीर्थव्रत पाळण्याची जरुरी नसते. मोक्षाच्या मार्गावरचे ते सर्वांत सोपे व्रत होय ! दिवसभर उपवास करावयाचा आणि तोंडाने ' रामकृष्णहरी ' हा नाममंत्र जपावयाचा, म्हणजे पडलेच आषाढीचे पुण्य तुमच्या पदरात. वारकरी संप्रदायात एकादशी या महाव्रताचे फार माहात्म्य आहे. पंधरा दिवसांनी एक दिवस उपोषित राहून दिवस नि विशेषतः रात्रहरिभजनात घालविणे हा या उपवासाचा हेतू असतो. सर्व धर्मांनी मन, वाणी आणि शरीर ह्यांचे शुद्धीकरण करण्याच्या दृष्टीने उपासाला महत्त्व दिलेले आहे.

वारकरी सांप्रदाय हाच महाराष्ट्राचा भागवत धर्म होय. तो काही वेगळा असा क्रांतिकारक धर्म नव्हे किंवा ते वेदाविरुद्ध किंवा कर्मठपणाविरुद्ध बंडही पण नव्हे. वेदधर्माचेच ते सर्वसंग्राहक, मनोहर नि लोकप्रिय असे स्वरूप आहे. महाराष्ट्रात हा वारकरी सांप्रदाय फार जुना आहे. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्याही पूर्वीपासूनचा आहे. ह्या सांप्रदायाचे एकंदर पंधरा सिद्धांत आहेत. त्यातला 'महाव्रत' हा अकरावा सिद्धांत आहे. तो असा : एकादशी व सोमवार, आषाढी व कार्तिकी, दोन्ही वेळीं पंढरीची वारी अवश्य. किमानपक्षी एक नियमित करून ती चुकू न देणे, महाशिवरात्र अवश्य.' एकादशीचे महाव्रत तुकोबांनी जन्मभर आचरिले. एवढेच नव्हे तर एकादशी न करणारांचा आपल्या कीर्तनात त्यांनी तीव्र शब्दांनी निषेधही पण केलेला आहे.

एकादशीस अन्नपान । जे नर करिती भोजन
श्वान विष्ठेसमान । अधम जन ते एक ॥

उपासाने शरीर हलके, मन तरतरीत नि बुद्धी सूक्ष्म होते. ईश्वरभजनाचे कार्य उत्तम होते. एकादशीला रोजचे अन्न न घेता, दहा वेगवेगळे चमचमीत पदार्थ करून खाणे याचाही तुकोबांनी धिक्कार केलेला. कोणी म्हणेल, 'एकादशीचे एवढे काय मोठे महत्त्व आहे? कोणी भोजन करील. फराळ करील. नाही तर निरशन करील. त्याचे एवढे प्रस्थ कशाला पाहिजे?' कोणी विचारील, 'उपास चांगला जर असेल तर तो वाटेल तेव्हा करता येईल. एकादशीलाच नेमका तो का करावयाचा?' या आक्षेपांना किंवा शंकांना उत्तरे नाहीत. कोणताही सांप्रदाय म्हटला की त्याला नियम आलेच. ज्या समाजात किंवा सांप्रदायात मनुष्य वाढतो, त्याचे मुख्य मुख्य नियम पाळल्याखेरीज त्याला त्या समाजाशी वा सांप्रदायाशी एकरूप होता येत नाही. नियमावाचून सांप्रदाय नाही, आणि सांप्रदायाचे अनुष्ठान केल्याखेरीज ज्ञानाची सिद्धी नाही. समाजाचे नियम त्या त्या समाजात एकरूप होण्याच्या आनंदासाठी म्हणजे स्वतःच्याच हितासाठी पाळावयाचे असतात. 'आज हरिदिनी आहे. मला उपास आहे. रात्री कीर्तनाचा आनंद लुटायचा आहे.' या विचारापासूनच चित्तशुद्धीला आरंभ होतो. गंगास्नान, निराहार वा अल्पाहार, भाविकांच्या भेटी, मृदुंग-टाळांचे मधुरध्वनी, नामघोष हे सारे लाभ एकादशी व्रताचा अंगीकार केल्यापासून होऊ लागतात. तेवढ्यापुरता तरी संसाराचा विसर पडतो. काही काळ तरी चित्त हरिस्वरूपी रमते. आणि हा एक दिवसाचा अनुभव घेता घेता तो नित्याचाच अंगवळणी

पडतो आणि त्यापासून पुढे परमार्थलाभ होतो, असा अनेकांचा अनुभव आहे. नुसती एकादशी करून तिचे काही पुण्य लागत नाही. नामसंकीर्तन केले तरच ती एकादशी सार्थकी लागते. वसंत ऋतूत जसा आम्रवृक्षाला मोहर येतो आणि त्याचा परिमळ सर्वत्र दरवळतो, त्याप्रमाणे एकादशीच्या दिवशी कीर्तनाचा नि नामस्मरणाचा सुगंध सभोवती सर्वत्र दरवळला नाही, तर—

आणि फिटले माझे कोडे, भवदुःखाचे साकडे,
कोंदाटले पुढे, परब्रह्म सावळे !

अशा अनिर्वचनीय ब्रह्मानंदाचा अनुभव कसा येणार? मग एकादशी केल्याचा फायदा तो काय मिळणार? वारकऱ्यांचे मुख्य साधन म्हणजे भजन नि कीर्तन. देवापुढे कोणी उंच नाही, कोणी नीच नाही; कोणी ब्राह्मण नाही, कोणी महार नाही; कोणी पुण्यवंत नाही, कोणी पापी नाही. देवापुढे सर्वच दीनदुबळे आहेत. म्हणून सर्वांना कीर्तनाचा अधिकार आहे. कोणाही भाविकाला कीर्तनाच्या आनंदाचा अनुभव मिळतो. कीर्तन करणारा स्वतःही तरतो नि इतरांनाही तारतो. 'कथा त्रिवेणी संगम । देव, भक्त आणि नाम' हरिकीर्तनात देव, भक्त आणि नाम ह्यांचा त्रिवेणीसंगम होतो. हरिकथा पवित्र आहे. ती गाणारे शुद्ध भावाने गातात नि ऐकणारे आदराने नि श्रद्धेने ऐकतात. म्हणून लोकशिक्षणाचे आणि आत्मोद्धाराचे कीर्तनापेक्षा अधिक चांगले नि प्रभावी दुसरे काय साधन आहे? प्रेमळ भक्त जेथे हरिगुण अत्यंत आवडीने गातात तेथेच देव उभा असतो. भगवंतांनीच प्रत्यक्ष सांगितले आहे की :

नाहम् वसामि वैकुण्ठे, योगिनाम् हृदये, रवौ ॥
मद्भक्ता यत्र गायन्ति, तत्र तिष्ठामि नारद ॥

तुकोबा तेच सांगतात, 'माझे भक्त गाती जेथे । नारदा, मी उभा तेथे !' सारांश, कीर्तनात देवभक्तनामाचा संगम असतो. म्हणून ब्रह्मदेवानेही लाळ घोटावी असे अपार भक्तिसुख लहानथोरांना कीर्तनात आयते मिळते. तेव्हा पंढरीची वारी काय आहे ती कळली. एकादशी व्रत ध्यानी आले. सत्समागमाचे महत्त्व समजले. नामसंकीर्तनाच्या आनंदाची कल्पना आली. पण काही केले तरी ही सर्व साधने साध्य होत नाहीत का? सद्भावाची जोड मिळाली तरच ती सफल होतात. नाही तर ती सारी कुचकामी होऊन नुसत्या मानदंभाला कारण होतात. भाव असेल तरच देव मिळेल. 'भाव तोच देव' असे संतांनी ठायी ठायी सांगितले आहे. भावावाचून ही सारी साधने फोल आहेत. नुसती फोलकटे.

टरफले. नुसत्या बाह्योपचारांनी भगवान प्रसन्न होत नाही. पराकाष्ठेचा सद्भाव असला तरच साधने ही साध्यरूप होतात, आणि साध्यसाधनांच्या एकात्मतेचा अनुभव प्रत्ययाला येतो. उसना भाव टिकत नाही. कारण, मग ते एक नुसते थोतांड होते. भाव ही देवाची देणगी आहे. भावाचा डोळा उघडला की हे सारे विश्व त्यारेच दिसू लागते. 'सापडे हा देव भाविकाच्या हाती । शहाणे मरती तरी नाहीं.' ज्ञानाचे डोळे उघडले म्हणजे फार झाले तर ग्रंथ समजेल. त्याचे रहस्य उलगडेल. पण भावावाचून ते आपलेसे होणार नाही! देव जोडण्यास मुख्य भावच पाहिजे.

'भाव तैसे फळ । न चले देवापाशी बळ ॥
तुका म्हणे केले । मन शुद्ध हे चांगले ॥'

देव दगडाचा असतो आणि देवळाची पायरीही दगडाची असते. एकाची आपण पूजा करतो आणि दुसरीवर आपण पाय ठेवतो. नळातूनही पाणी वाहते आणि गंगेमधूनही पण पाणीच वाहते. पण नळाच्या पाण्याला कोणी तीर्थ म्हणत नाही. सारांश, भावानेच दगडाला देवपण येते आणि गंगोदकाला तीर्थपण येते. आता हा निर्मळ आणि शुद्ध भाव मनात कसा निर्माण करावयाचा? वारकरी संप्रदायाला मान्य असलेला त्याच्या साधनाचा मार्ग तुकोबांनी आपल्या अठ्ठावीस अभंगांत तपशिलाने वर्णन केलेला आहे. ही सर्व साधने स्वतः आचरणात आणण्याचा तर तुकोबांनी आमरण प्रयत्न केला. चित्त शुद्ध करण्याचे आणि निर्मळ भाव मनात निर्माण करण्याचे त्यांच्या दृष्टीने रामबाण साधन म्हणजे परोपकार! 'जे जे भेटे भूत । ते ते भासे भगवंत' असा तुकोबांना सर्व भूतमात्रांत भगवद्भावाचा साक्षात्कार होत असल्याने, प्रत्येक प्राणिमात्राची सेवा करताना जणू काही आपण नारायणाचीच सेवा करतो आहोत, ह्या भावनेने तुकोबा ती करीत असत. भूतसेवेला परोपकार केव्हा म्हणता येते? परोपकार म्हणजे देहाच्या बाजूने ज्यांचा नि आपला यत्किंचितही संबंध नाही, अशा पराची सेवा करणे होय. अशा उपकारांमध्ये प्रतिफळाची आशा नसते किंवा नुसत्या स्तुतीची वा आशीर्वादाचीही अपेक्षा नसते. भूतमात्राच्या सेवेसाठी भगवत्प्रीत्यर्थ काया–वाचा–मनाने चंदनाप्रमाणे झिजणे म्हणजेच परोपकार. अशा परोपकारामुळे आणि लोकसेवेमुळे अनेक लाभ होतात. एक तर निष्काम कर्म करण्याची सवय लागते. दुसरे म्हणजे केवळ स्वतःसंबंधी वाटणारी ममता आणि आसक्ती आपोआप गळून पडते आणि आत्मभावाचा विकास होऊन

त्याची व्यापकता प्रत्ययास येते. त्याचाच अर्थ शरीराचे महत्त्व झडते आणि सर्वांतर्यामी नारायण प्रसन्न झाल्याच्या आनंदोर्मी उठू लागतात. तुकोबा म्हणतात :

भावे गावे गीत । शुद्ध करूनिया चित्त ॥
तुज व्हावा आहे देव । तरी हा सुलभ उपाव ॥
तुका म्हणे फार । थोडा तरी परउपकार ॥

अशा रीतीने देवप्राप्तीच्या उपायात तुकोबांनी परोपकाराचाही अंतर्भाव केलेला आहे. तुकोबांचे जीवन हे चमत्कारांनी भरलेले नसून, अनंत लहान-मोठ्या परोपकारांनी भरलेले आहे. एखादा पांथस्थ वाटेत त्यांना अकस्मात भेटला की, तुकोबांनी त्याचे ओझे ममतेने आपल्या डोक्यावर घ्यावे नि त्याला काही काळ विसावा द्यावा. कोणी पावसात भिजला तर त्याला कोरडे वस्त्र देऊन निवाऱ्याची जागा द्यावी. यात्रेकरूंचे पाय सुजले असले, तर कढत पाण्याने ते स्वतः शेकावेत. गायबैल निर्बल नि निरुपयोगी झाल्यामुळे धन्याने त्यांना घरातून हाकून लावले असतील तर त्यांना चारापाणी द्यावे. चालताना पायतळी जीव चिरडतील म्हणून हलक्या पावलांनी जपून चालावे! कीर्तनात फार उकाडा झाला तर स्वतः श्रोत्यांना वारा घालावा. नदीचे पाणी आणताना कोणी थकले भागले, तर त्याची घागर स्वतः घरी पोचवावी. अशा रीतीने मनुष्य नि पशुपक्षी ह्यांत भेदभाव न पाहता जीव येथून तेथून सर्व नारायणस्वरूप मानून त्यांच्यासाठी पडतील ते काबाडकष्ट वाहण्यात तुकोबांनी आपुल्या आयुष्यातला कण अन् कण वेचला. म्हणून त्यांच्या अंगातला आपपरभाव नाहीसा झाला. 'वसुधैव कुटुंबकम्' अशी त्यांची उदारचरित वृत्ती झाली. 'भूतांची दया' हे त्यांचे भांडवल झाले. 'रंजल्या गांजल्या' ना ते आपले म्हणू लागले. आणि 'तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता' एवढेच त्यांचे इहलोकी अस्तित्व उरले.

त्यांच्या प्रयाणाला आता तीन शतके उलटून गेली, तरी त्यांचे अभंग जडजीवांच्या उद्धाराचे ज्या अर्थी कार्य करीत आहेत, त्या अर्थी त्यांची अभंगवाणी हे त्यांच्या परोपकारबुद्धीचे चिरंतन स्मारकच नाही काय? 'चित्त-शुद्ध करण्याचे' वारकरी संप्रदायाचे जे अनेक लहानमोठे साधनमार्ग सांगितले आहेत, त्यांत 'परोपकार' हा 'राजमार्ग' म्हणूस समजावयाला हरकत नाही. त्याखेरीज परद्रव्य, परनिंदा नि परनारी वर्ज्य मानावेत! आहार, विहार, निद्रा नि भाषण युक्त नि परिमित असावे, वर्तनाचा ढिला राहून भगवद्भक्तांच्या

मेळ्यात नुसते भजन करील तर ते फुकट आहे, आणि नीतीचा दृढ असूनही जर तो भजन सांडील तर तेही व्यर्थ आहे. 'लोकांनी बरे म्हणावे म्हणून परमार्थ करू नये.' 'देवाचिये चाडे आळवावे देवा'. सर्व भूतमात्राशी निर्वैर असावे. भूतांचा मत्सर आणि संतांची निंदा ही दोन पापे आपल्या हातून कधी न घडतील ह्याची काळजी घ्यावी. अशी जी चित्तशुद्धीची इतर साधने सांगितलेली आहेत, त्याचा स्थलाभावामुळे केवळ नुसता निर्देशच करतो. श्रीहरीच्या सगुणरूपाची भक्ती करणे हीच वारकरी सांप्रदायाची मुख्य उपासना आहे. उपासकाच्या चित्ताची शुद्धी झाली म्हणजे त्याच्या हृदयातली ध्यानमूर्ती त्याच्यापुढे साक्षात प्रकट होते. या सगुण साक्षात्काराचे 'बीज' (म्हणजे मुख्य साधन) 'हरीचे नामस्मरण' होय. आणि त्याचे फळ (म्हणजे तो झाल्यावरही) तेच, म्हणजे 'हरीचे नामस्मरण'च होय. अर्थात, नामस्मरणाने हरी जोडावयाचा आणि हरी जोडल्यानंतरही नामस्मरण करीत राहायचे.

सारांश, 'हरिनाम बीज । हरिनाम फळ' म्हणजे नामसंकीर्तन हे वारकरी सांप्रदायाप्रमाणे साधन नि साध्य समजले जाते. तुकोबा वारकरी घराण्यात जन्मले. वारकरी सांप्रदायात प्रविष्ट झाले. तोच सांप्रदाय त्यांनी वाढवला आणि त्याला महाराष्ट्रातील बहुजनाच्या धर्माचे स्वरूप त्यांनी मिळवून दिले. म्हणून त्यांच्याच अभंगवाणीच्या आधाराने आषाढी एकादशीचे येथवर थोडक्यात माहात्म्य सांगितले. आषाढी एकादशीचे व्रत जो शुद्ध चित्ताने, निर्मळ भावाने नि श्रद्धायुक्त भावनेने नामस्मरण आणि नामसंकीर्तन करून पाळील, त्यालाच तिचे पुण्य लाभेल असा 'विठोबा'ची आण वाहून तुकोबांनी दिलासा दिला आहे. ह्यापेक्षा 'संतांची उच्छिष्टे उत्तरे' बोलून वाचकांचा अधिक वेळ का घ्यावा? बोला, पुंडलीक वरदा हरि विठ्ठल! ज्ञानदेव तुकाराम!

मराठा : २९-६-१९६६

# ५

# आजची आषाढी

मराठी जनतेच्या जीवनात फक्त दोनच सण आहेत. एक आषाढी आणि दुसरी कार्तिकी. हे सण भोजनाचे नव्हेत. उपवासाचे आहेत. एकादशीचे व्रत ह्या दिवशी पाळावयाचे आणि विठ्ठलाचे नामस्मरण करावयाचे. आम्ही स्वतः हे दोनच सण पाळतो.

नाम विठोबाचे घेईन मी वाचे ।
बीज कल्पांताचे तुका म्हणे ॥

ह्या दोन सणांचा अपूर्व सोहळा फक्त पंढरीसच पाहावयास मिळतो. चंद्रभागेच्या वाळवंटात त्या दिवशी विठ्ठलनामाचा प्रचंड बाजार भरलेला असतो. वैकुंठीचे सर्व 'केणे' तेथे ह्या दिवशी आलेले असते. कैवल्याच्या राशीच्या राशी त्या ठिकाणी येऊन पडलेल्या असतात. पंढरीच्या वारकऱ्यांना ही मोक्षाची पेठ त्या दिवशी इनाम मिळालेली असते. कोणीही यावे आणि तिला पाहिजे तितके लुटून न्यावे. पंढरी ही महाराष्ट्रातल्या सर्व वारकऱ्यांची मिरास आहे. महाराष्ट्रातील जनतेला मोक्षासाठी काशी-वाराणशीला जाण्याची मुळीच जरुरी नाही. पंढरपूर हे सकल तीर्थांचे आणि साऱ्या मंगलाचे माहेर आहे. सर्व चित्तांचा चोरटा, आनंदाचा कंद, भक्तांचा वत्सल आणि दीनांचा सोयरा प्राणिमात्रांना भवपार नेण्यासाठी कर कटी ठेवून चंद्रभागेच्या तीरी सदैव सिद्ध आहे. आषाढी-कार्तिकीला पंढरीची वारी केली म्हणजे लक्ष चौऱ्यांयशींच्या येरझारा चुकतात.

तुका पंढरीसी गेला ।
पुन्हा नाही जन्मा आला ॥

पंढरीनाथाखेरीज मराठी माणसांना इतर दैवतांना भजण्याचे कारण नाही. सूर्य उगवला म्हणजे सारे दिवे जसे आपोआप निस्तेज होतात, सागर समोर दिसला म्हणजे सर्व नद्या जशा त्याला शरण जातात, त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या ह्या दैवतापुढे बाकीचे सारे देव आणि धर्म व्यर्थ आहेत. महाराष्ट्राचा देव विठोबा. मोक्षपीठ पंढरपूर आणि आषाढी–कार्तिकीची वारी हाच महाराष्ट्राचा धर्म !

जाय जाय तू पंढरी ।
होय होय वारकरी ॥
सांडोनिया वाळवंट ।
काय इच्छिसी वैकुंठ ? ॥
खांद्या पताकांचे भार ।
तुळशीमाळा आणि अबीर ॥
साधुसंतांच्या दाटणी ।
तुका जाय लोटांगणी ॥

पंढरपूरला जाऊन साधुसंतांच्या पायांवर लोटांगणे घालण्याचे भाग्य सर्वांनाच लाभते असे नाही. वारीचे व्रत फार कठीण आहे. एकदा वारी धरली की जन्मभर चुकविता येत नाही. अरे, वारी नाही तर नाही, पण—

होऊन खडे गोटे । चरणरज सान मोठे ॥
पंढरीचे वाटे । संतचरणी लगिन ॥

अशी मनीषा धरावयाला काय हरकत आहे ? आता तेवढेही नाही जमले, तर निदान तुकोबांनी नामामृताचा जो अभंग आणि अथांग डोह मराठी भाषेत भरून ठेविला आहे, त्यामध्ये थोडा वेळ डुंबायला काय हरकत आहे ! देवाला आई म्हणावयाचे हा मंत्र महाराष्ट्रातल्या संतांनी आम्हांला शिकवला.

तू माझी जननी । तू माझा जनिता ।
रखुमाईच्या कांता । पांडुरंगा ॥
आमुची कृपाळू । तू होशी माऊली ।
विठ्ठले साऊली । शरणागता ॥
पाळशील लळे । दीन वो वत्सले ।



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. २५
अनुक्रम.................. दि: ..............
क्रमांक .................................. नों: दि: ..............

विठ्ठले कृपाळे । जननिये ॥
कृपाळुवे पांडुरंगे । अंगसंग जिवलगे ।
लावी स्तना । ईश्वरे ॥

असे विठ्ठलाला ' आई ' संबोधून तुकोबांनी किती परोपरीने आणि वात्सल्याने आळविले आहे. देवाला आई म्हटले म्हणजे त्याच्या कुशीत वाटेल तेव्हा शिरता येते. ' लावी स्तना ईश्वरे ' असा त्याच्या कृपेचा पान्हा त्याला हक्काने मागता येतो. त्याच्या पायाला घट्ट मिठी मारता येते. देवाचे प्रेम मिळविण्याची संतांनी ही फार सुंदर युक्ती शोधून काढली आहे. देवाला आई म्हणून हाक मारल्यावर त्याची काही गडबडच चालत नाही. जगात अनेक तऱ्हेच्या सत्ता आहेत, पण प्रेमाच्या सत्तेसारखी दुसरी सत्ताच नाही.

प्रीती करी सत्ता । बाळा भीती मातापिता ॥
काय चाले त्याशी बळ । आळीं करता कोल्हाळ ॥
पदरी घाली मिठी । खेदी मागे पुढे लोटी ॥
बोले मना आले । तुका, साहिले विठ्ठले ॥

आईबापावर मुलाची सत्ता आहे, म्हणून ती त्याला भितात. मुलाने हट्ट धरला अन् भोकाड पसरले म्हणजे आईबापाचे सगळे बळ संपलेच म्हणून समजा. तो त्यांचा पदर ओढील, मागे पुढे ढकलून त्रास देईल अन् तोंडाला येईल ते बोलेल. आईबापांना ते मुकाट्याने सहनच केले पाहिजे. उलट बालकाच्या ' आरुष ' बोलांनी आईला हर्षच होतो, आणि तिला ममतेचा पान्हा फुटतो.

संतोषे माऊली । आरुषा वचनी ॥
वोरसोनि स्तनी । लावी बाळा ॥

जगात भांडल्यावाचून काही मिळत नाही; परमेश्वराशी देखील भक्ताला भांडावे लागते. मुलांनासुद्धा मातापितराशी कलह करावा लागतो. झगडा केल्यावाचून कोणी काही देते का ?

प्रीतीचा कलह । पदरासी घाली पीळ ॥
सरो निदी बाळ । मागेपुढे पित्यासी ॥

आईबापांच्या पदराला पीळ घालून त्यांना एका ठिकाणी डांबून ठेवावे, तेव्हा ते प्रसन्न होतात. बोलून-चालून हे प्रेमाचे भांडण आहे. इथे काही हेवा-देवा थोडाच आहे ? प्रेमाच्या भरात मूल भलते-सलते बोलून जाते. म्हणून

आईबापांनी ते काय लक्षात ठेवायचे असते ? उलट त्याचे वेडेवाकडे बोल त्यांनी गोडच करून घ्यावयाचे असतात.

प्रीतीचिया बोला नाही पेचपाड ।
भलतैसे गोड करूनि घेई ॥
वेडेवाकडे बाळकाचे बोल ।
करिती नवल मायबाप ॥

आपले मूल वाईट बोलले ह्याचेच आईबापांनी उलट कौतुक करावयाला हवे. एवढेच नव्हे तर मूल जितके खोडकर तितके आईने त्याजवर जास्त प्रेम करावयाला हवे. चांगल्या मुलाला आईच्या प्रेमाची काय जरुरी आहे ? घरात बसलेल्या माणसाला सावली कशाला पाहिजे ? उन्हाने तापलेल्या डोक्यालाच छायेचे सुख वाटते.

उष्णे छाये सुख वाटे ।
बाळे माते पान्हा फुटे ॥

बाळाला पाहिले म्हणजेच मातेला पान्हा फुटतो. तो तिचा देहस्वभावच आहे. आणि खरे पाहिले तर, आईमध्ये आणि बाळामध्ये काही वेगळेपणा आहे का ?

दुजेपण भाव नाही हे आशंका ।
—जननी बालकामध्ये भेद नाही ॥

म्हणूनच आईला बाळावाचून कोणी नको असते. गाय आपल्या वासराखेरीज कोणाला जवळ येऊन देते का ?

धेनु येऊ नेदी जवळी आणिका ।
आपुल्या बाळकाविण वत्सा ॥

आणि मुलाला तरी आईखेरीज दुसरे कोणी चालते का ? कोणी नाही. आईचा वियोग त्याला क्षणभरही सहन होत नाही. आई डोळ्यांपुढून जरा दूर झाली की त्याचा जीव कासावीस होतो. कोणी कितीही त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, तरी त्याची समजूत पटत नाही. दुसऱ्याचे बोलणे त्याला मुळी आवडतच नाही. त्याला आईच हवी असते. आई दिसली की तो कसा थयथय नाचावयाला लागतो !

बाळ मायेविण । क्षणभरि न राहे ॥
न देखता होय । कासाविस ॥

आणिक उदंड । बुझाविती जरी ॥
छंद त्या अंतरी । माऊलीचा ॥
तुका म्हणे बाळ । मातेपुढे नाचे ॥
बोल आणिकांचे । नावडती ॥

तहान लागो, भूक लागो, मुलाला आपल्या आईची आठवण होते. ‘ भूक लागली ’ म्हणून तो रडेल ओरडेल, पण तो ‘ खाऊ ’ची वाट पाहणार नाही. तो आईची वाट पाहात बसेल.

भुकेलिया बाळ । अति शोक करी ॥
वाट पाहे परी । माऊलीची ॥

बालकाच्या ह्या खुणा आई बरोबर जाणते. ती जर जाणणार नाही तर ती आई कसली ?

नोळखे तानुले । माय ऐसी कोण ? ॥
वोरसे देखून । शोक त्याचा ॥

मूल रडू लागले की आईला पान्हा फुटलाच पाहिजे. ती का त्याच्यावर रागावते ? रडणाऱ्या मुलाला शांत जी करते तीच आई. मुलाला काय हवे काय नको हे आई बरोबर ओळखते. आणि ते तिने ओळखलेच पाहिजे. नऊ महिने तिने त्याला पोटात बाळगलेले असते. त्या वेळी त्याचे हृदय तिच्या हृदयात असते.

पोटा आले बाळ । त्याचे जाणावे सकळ ॥

बालकाला स्वतःच्या दुःखाची चिंता करावयाचे काय कारण ? त्याची चिंता आईने करावयाची.

बालकाशि चिता । काय पोटवेचा ॥
जया शिरी । मायबाप ॥

आई-बापांना पुष्कळ चिंता असतील, पण मुलाला त्याची काय पर्वा ? ते डोळ्याला जे दिसेल तेच मागणार आणि हट्ट धरून बसणार. त्यांनी त्याचा तो हट्ट पुरवलाच पाहिजे. तुकोबाचे देवाजवळ सुद्धा हेच म्हणणे होते. देवाच्या काय अडचणी असतील त्या आम्हांला माहीत नाहीत.

मूल जे काही मागेल ते जसे आई देते, तसे आम्ही जे जे मागू ते ते आम्हांला देवाने दिलेच पाहिजे, आणि आमची स रज्त काढली पाहिजे.

काय कळे बाळा । बाप सदैव दुबळा ॥

आहे नाही हे न कळे । हाती काय कोण्या वेळे ? ॥
देखिले ते दृष्टि । मागे घालूनिया मिठी ॥
तुका म्हणे भावे । माझ्या मज समजावे ॥

मुलाच्या भावनेने आई विचार करते, तसा भक्ताच्या भावनेने भगवंताने विचार करावयाला हवा. मुलावर प्रेम करावयाला आईला काही सांगावे लागत नाही. मूळच तिच्या अंतःकरणातल्या प्रेमाची जोपासना करीत असते.

माऊलीसी सांगे कोण । प्रेम वाढवीत तान्हे ॥
अंतरिचा कळवळा । करितसे प्रतिपाळा ॥

आईच्या हृदयात जो प्रीतीचा कळवळा असतो, तोच तिला आपल्या मुलाचा विसर पडू देत नाही. तुकोबा देवाला तेच म्हणतात. देवा, मग तुला आमचा विसर कसा पडेल रे ? अरे, तू एवढ्या ब्रह्मांडाचा चालक आणि आमची का रे अशी दशा ?

कामधेनूचे वासरू ? । खाया न मिळे काय करू ॥
बैसोनी कल्पद्रुमातळीं । पोटासाठी तळमळीं ॥

हे तुला बघवते कसे ? आम्ही वाईट आहोत, ओंगळ आहोत, पातकी आहोत. असू, सर्व काही असू. म्हणून काय झाले ? तू आमची आई ना ? आम्ही कसेही असलो तरी आमचा सांभाळ तुला केलाच पाहिजे. तुझ्या मुद्रा आम्ही धारण केल्या आहेत ना ? तुझ्यासारख्या समर्थाची आम्ही बाळे—आणि आमची तोंडे पाहावीत तर ती केविलवाणी ! लक्तरे अंगावर घालून आम्ही हिंडतो आहोत. देवा, जग आम्हांला हसत नाही बरे. तुला हसते आहे.

समर्थाचे बाळ । किविलवाणे दिसे ॥
तरी कोणा हसे । जन देवा ? ॥
समर्थाचे बाळ । पांघरे वाकळ ॥
हासती सकळ । लोक कोणा ? ॥
अवगुणी जरी । झाले ते वोंगळ ॥
करावा सांभाळ । त्वरे त्याचा ॥
तुका म्हणे तैसा । मी एक पतित ॥
परि मुद्रांकित । झालो तुझा ॥

देवा, आम्ही तुझ्याशी एवढी सलगी करतो अन् वाटेल तसे तुला बोलतो पण आम्ही लहान आहोत. मुले आहोत. आमचे सारे बोलणे तुला सहन केले



मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम..................

पाहिजे. आम्ही सारखे तुझ्याकडे मागतच राहणार. तू दे किंवा देऊ नकोस. मागणारा कधी कंटाळत नाही किंवा कष्टी होत नाही.

मागऱ्याची कोठे । घडते निरास ? ।।
लेकरा उदास । नाही होत ।।

पण देवा, असे मात्र करू नकोस—

कोणी एकाचिया । पोरे केली आळी ।।
ठावे नाही पोळी । मागे देखी ।।
बुझावले होती । देऊनी खापर ।।
छंद करकर । वारियेला ।।
तुका म्हणे माय । बापाचे उचित ।।
करावे ते हित । बालकाचे ।।

मुलाने 'पोळी' मागितली अन् त्याच्या हातात 'खापर' देऊन बापाने त्याची समजूत काढली, असे नको. बालकाचे हित करणे हेच आई–बापांना उचित आहे. त्यांनी मुलाचे अहित केले तर मुलाने कुठे जावे ? कोणाच्या मागे दडावे ?

माता कापी गळा । तेथे कोण राखी बाळा ।।

असे म्हणून तुकोबा आर्त स्वराने विठोबाला बोलावतात—

धाव घाली आई । आता पहातेसी काई ।।
धीर नाही माझे पोटी । झालो वियोगे हिंपुटी ।।
करावे सीतल । बहु झाली हळहळ ।।
तुका म्हणे डोई । कधी ठेवीन हे पायी ।।

मातेचे अंतःकरण तुकोबांनी जितके जाणले होते तितके कोणी जाणलेले नाही. मायलेकरांच्या जिव्हाळ्याची आणि जीवनाची रसभरित वर्णने जाईजुईच्या कळ्यांप्रमाणे पावलोपावली त्यांच्या अभंगात विखुरली आहेत, किंबहुना, भक्तिरसाला त्यांनी वात्सल्याचेच रूप दिलेले आहे. देवाची भक्ती आणि आईची प्रीती ह्यात त्यांना मुळीं फरकच दिसत नाही. नाही तर अडाणी माणसांना देवाची ओळख कशी करून द्यावयाची ? माणूस महापंडित झाला म्हणून देवाला का तो ओळखू शकेल ? आईला कोणीही ओळखतो. म्हणून मातेच्याच रूपाने देवाला कल्पून संतांनी त्याला आळवलेले आहे. देवाचे आणि भक्ताचे संपूर्ण ऐक्य होणे ही भक्तियोगाची शेवटची पायरी मानली जाते.

तुकोबांना हे संपूर्ण ऐक्य मान्य नाही; आईने आईच राहावे. आणि मूलाने मुलच राहावे. भिन्नतेच्या भावनेतच प्रेमाची लज्जत आहे.

अद्वैती तो माझे । नाही समाधान ॥
गोड हे चरण । सेवा तुझी ॥
देवभक्तपण । सुखाचा सोहळा ॥
ठेवून निराळा । दावी मज ॥

अद्वैताची भानगड आपल्याला नको. आपण आपले सदैव भक्तच राहू या आणि परमेश्वरभक्तीच्या सुखाचा सोहळा यथेच्छ भोगू या. देवाला आईबापाची उपमा देणे बरे नाही हे तुकोबा ओळखून होते—नाही असे नाही.

मायबापांची उपमा । तुज देऊ मेघश्यामा ॥
तेही साजेना पाहता । जिवलगा पंढरीनाथा ॥
माय पाळी संसारी । परलोकी राही दुरी ॥
तैसा नव्हेसी अनंता । काळावरी तुझी सत्ता ॥

आईच्या प्रेमाचा लाभ इहलोकीच्या संसारातच होतो. परलोकी गेल्यावर काही तिचे प्रेम मिळत नाही. तसे ईश्वराचे नाही. त्याची अनंत काळावर सत्ता आहे. त्याचे प्रेम सर्व काळात अन् सर्व लोकांत भरलेले आहे. हे जरी खरे असले तरी, जोपर्यंत आपले इहलोकी वास्तव्य आहे, तोपर्यंत येथलेच गंगाजळ पिऊन आपल्याला स्वर्गातल्या अमृताची कल्पना केली पाहिजे. आईचे प्रेम हेच ह्या संसारातले गंगाजळ आहे. आईकडे आम्ही ज्या डोळ्यांनी पाहतो, त्याच डोळ्यांनी आम्ही देवाकडे पाहणार. आईला आम्ही जी हाक मारतो, त्याच हाकेने आम्ही देवाला आळवणार. आईच्या पायाला आम्ही जशी मिठी मारतो, तसेच परमेश्वराचे चरण आम्ही घट्ट आवळणार. ह्याखेरीज भक्तिरसाच्या गोडीची चव आम्हांला मुळी चाखताच येणार नाही. असो. उत्कट भक्तिभावाने ओथंबलेल्या आपल्या अभंग-वाणीने 'माऊली' म्हणून जिला पदोपदी हाक मारली आहे, त्या महाराष्ट्राच्या 'विठोबा माऊली'च्या चरणावर आषाढीच्या दिवशी माथा ठेवून आपण तिला म्हणू या :

शेवटचा घास गोड करी माते ॥
अगे, कृपावंते पांडुरंगे ॥

अनुक्रम........ दि: ........

६

## कार्तिकी

आज कार्तिकी शुद्ध एकादशी. पंढरपुराला चंद्रभागेच्या काठी आज दिंड्या-पताका, टाळ मृदुंग ह्याची कोण झुंबड उडणार ? 'ग्यानबा तुकाराम' आणि 'पुंडलीक वरदा हरि विठ्ठल.' हा लक्षावधी वारकऱ्यांच्या मुखातून उठणारा गगनभेदी गदारोळ ऐकण्यासाठी आकाशामधे तेहतीस कोटी देवांच्या विमानांची आज दाटी होत असे असे सांगतात. तुकोबा म्हणतात :

कार्तिकीचा सोहळा । चला जाऊ पाहू डोळा ।।
आले वैकुंठ जवळा । पंढरिये सन्निध ।।
नामामृत कल्लोळ । वृंद कोंदली सकळ ।।
आले वैष्णव दळ । कळिकाळे कापती ।।
आस करिती ब्रह्मादिक । देखून वाळवंटीचे सुख ।।
धन्य धन्य मृत्युलोक । म्हणती भाग्याचा कैसा ! ।।
मरणमुक्ति वाराणसी । पितृऋण गया नासी ।।
उधार नाही पंढरीसी । पायापाशी विठोबाच्या ।।
तुका म्हणे आता । काय करणे आम्हा चिंता ? ।।
सकळ सिद्धीचा दाता । तो सर्वथा नुपेक्षी ।।

पंढरीच्या विठोबाच्या पायांपाशी उधार काही नसते. तेथे 'मोक्षा'चे नाणे ठणाठण वाजवून घ्यावे. विठोबा हा सकळ सिद्धींचा दाता आहे. तो कोणाचीही उपेक्षा करीत नाही 'मूढ मतिहीन दुष्ट अविचारी । ते होती पंढरी दयारूप ।।'

किंवा ‘ उत्तम चांडाळ नरनारी बाळ । अवघेही सकळ चतुर्भुज ॥ ’ म्हणून तुकोबा म्हणतात, की, ‘ तुका पंढरीसी गेला । पुन्हा जन्मा नाही आला ॥ ’ महाराष्ट्रातील जनता अनेक देवदैवतांची पूजा करते आणि दरवर्षी अनेक सण पाळते; पण महाराष्ट्राचे अंतःकरण जर खरे कशामधे गुंतले असेल, तर ते फक्त ‘ युगे अठ्ठावीस विटेवरी उभ्या राहिलेल्या पांडुरंगाच्या समचरणांवर ’ ! आणि महाराष्ट्रातील जनता जर कोणते दोन सण धार्मिक निष्ठेने आणि श्रद्धेने पाळीत असेल, तर ते म्हणजे आषाढी आणि कार्तिकी एकादशी ! महाराष्ट्रातील सर्व लहानथोर नरनारी हे दोन सण अत्यंत आवडीने आणि जिव्हाळ्याने पाळतात. म्हणून आजचा हा कार्तिकीचा सोहळा शेकडो वर्षांच्या परंपरेप्रमाणे महाराष्ट्रात सर्वत्र अत्यंत भाविकतेने पाळला जाईल, ह्याबद्दल आमच्या मनात मुतराम शंका नाही.

तथापि, महाराष्ट्राच्या पूर्वीच्या काळात आणि आजच्या काळामध्ये जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे. पांडुरंग तर चंद्रभागेच्या काठी अवघ्या एका विटेवरी अठ्ठावीस युगे ‘ समचरण ’ उभा राहून महाराष्ट्रामधे घडत असलेल्या बऱ्या-वाईट लहानमोठ्या घटनांचे कमरेवर हात ठेवून अगदी तटस्थतेने निरीक्षण करतो आहे ! अठ्ठावीस युगे म्हणजे Exactly किती हे काही कोणाला सांगता येणार नाही. पण एक युग म्हणजे अदमासे दोन हजार वर्षे असे मानले जाते. म्हणजे पांडुरंग काय चंद्रभागेच्या काठी छप्पन्न हजार वर्षे उभा आहे ? असेलही कदाचित. ह्या देवमंडळींचे काय सांगावे ? पण पंढरपूरचा विठोबा हा दोन हजार वर्षांचा जुना आहे असे काही इतिहासकार सांगतात. तथापि, महाराष्ट्राचा इतिहास आज जो आमच्या स्मरणात उरलेला आहे, तो अवघा सात-आठशे वर्षांचा. ह्या काळात पांडुरंगांनी महाराष्ट्राच्या उन्नतीच्या आणि अवनतीच्या अनेक अवस्था पाहिल्या असतील. यावनी सत्तेच्या वरवंट्याखाली ठेचलेला आणि असहाय झालेला महाराष्ट्र त्यांनी पाहिला असेल. त्यानंतर संतमंडळाने त्याच्याच पायाशी साद घालून महाराष्ट्रामधे घडवून आणलेले अलौकिक धार्मिक उत्थापन त्यांनी बघितलेले असेल. नंतर शिवरायांनी हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा तोरणगडावर जो फडकवला, त्याला त्यांनी आशीर्वाद दिला असेल. मराठी सत्तेच्या अस्तोदयाची सर्व भव्य नि भयानक दृश्ये त्यांनी पाहिली असतील. त्यानंतर आलेल्या ब्रिटिश साम्राज्याला नष्ट करण्याचा महाराष्ट्रामधल्या मर्दांनी जो प्रयत्न केला, तोही त्यांनी डोळे भरून बघितला असेल.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम.................. दि:

तथापि काँग्रेसच्या राज्यात महाराष्ट्राला आज जी भुकेकंगाल अवस्था प्राप्त झालेली आहे, ती बघून तर पांडुरंगाच्या काळजाचे पाणी पाणी झाले असेल, नाही का? श्रीविठ्ठलाची आम्हांला जी कीव वाटते ती ही की, त्यांनी महाराष्ट्रात चांगल्यापेक्षा वाईटच फार पाहिले. म्हणून पायापासून तो मस्तकापर्यंत त्याचे सर्वांग एवढे काळे ठिक्कर पडले आहे! अहो, ज्यांनी महाराष्ट्राचे छत्रपती श्रीशिवराज डोळ्यांनी पाहिले, त्यांना आज त्याच डोळ्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर मारुति कन्नमवार बसलेले पाहावयाला लागावेत, ह्यापेक्षा अधिक भयानक संकट गेल्या अठ्ठावीस युगांत त्याच्यावर कधी कोसळले असेल काय? म्हणूनच आम्हांला विठोबाचा फार राग येतो. आम्ही त्याच्या समचरणाला मिठी मारून अगदी कळवळून त्याला विचारतो की, "पांडुरंगा, कमरेवर हात ठेवून तुझ्या भक्तांवर आलेली ही सर्व संकटे तू तिऱ्हाईतपणे कशी पाहू शकतोस रे? चल, काढ कमरेवरचे ते हात. घे हातात श्रीरामचंद्राप्रमाणे धनुष्यबाण. श्रीसमर्थांच्या तेजस्वी वाणीने आम्ही तुला विचारतो,

येथे का उभा श्रीरामा-
मनमोहन मेघश्यामा?
चापबाण काय केले?
कर कटावरि ठेविले!
कां बा धरिला अबोला,
दिसे वेष पालटला!
काय झाली अयोध्यापुरी?
येथे वसविली पंढरी!
किल्किलाट वानरांचे,
थवे न दिसती तयांचे.
दिसे हनुमंत एकला
हा का सैन्यातुन फुटला!
काय झाली सीतासती?
येथे बहुत जन दिसती!

पांडुरंगा, आम्ही तुला इतके लावून बोलतो, म्हणून आमच्यावर तू रागावू नकोस; आम्ही आमचे बोलणे आटपते घेतो. आम्हांला तुला एकच गोष्टीची आठवण करून द्यायची आहे. ती ही की, तू 'समचरण' आहेस. म्हणजे

समतेचा-आज ज्याला आम्ही समाजवाद म्हणतो-त्या समाजवादाचा तू पुरस्कर्ता आहेस. 'यातायाती अमंगळ भेद' तुझ्या अंतःकरणात नाहीत. दामाजीपंतासाठी तू 'विठू महार' झालास. जनाबाईसाठी तू धुणी धुतलीस. एकनाथाच्या घरी तू पाण्याच्या 'कावडी' वाहिल्यास. सावता माळ्याच्या शेतात तू शेतमजुरी केलीस. कबिरासाठी तू शेले विणलेस. सारांश, तू श्रमजीवी कामगारांचा, शेतकऱ्यांचा आणि पददलितांचा पालनहार आहेस. ह्या वर्गावर आज महाराष्ट्रात फार मोठे संकट आलेले आहे. अरे, मुंबई शहर जी तुझ्या आवडत्या महाराष्ट्राची राजधानी, तिथे तर तुझ्या कामगारांची नि भक्तांची आज कार्तिकी एकादशीला अगदी ह्या क्षणी फार मोठी कसोटी लागणार आहे. आज आमच्या महापालिकेची निवडणूक आहे. ह्या निवडणुकीत भांडवलवाले दैत्य आणि श्रमजीवी कामगार ह्यांच्यापैकी कोणाच्या मागे पांडुरंग उभा आहे ह्याबाबत राज्यकर्त्यांनी कौल लावलेला आहे. पांडुरंगा, आम्ही काही तुला असे सांगत नाही की अमक्याच उमेदवाराला मत देण्याची मतदारांना तू सद्बुद्धी द्यावीस. आमची तुला एवढीच विनंती आहे की, ह्या निवडणुकीत 'सत्याचाच जय होवो!' एवढाच तुझा आशीर्वाद आम्हांला हवा आहे!"

अहाहा, वाचकहो, 'तथास्तु' अशी दिव्य आकाशवाणी या क्षणी आमच्या कानावर पडली. आता आमच्या आनंदाला पारावार राहिला नाही. कारण 'सत्य' कामगारांच्याच बाजूला आहे अशी आमची शंभर टक्के खात्री आहे. म्हणून कामगारांचा जो खरा प्रतिनिधी असेल तोच ह्या निवडणुकीत यशस्वी होईल. चला, मतदारांनो, आजच्या कार्तिकी एकादशीच्या परममंगल दिनी पुढील भजन गात गात मतदानकेंद्रावर चला आणि कामगारांचा सर्वात आवडता जो प्रतिनिधी आहे ना, त्याच्याच गळ्यात यशाची माळा घाला.

ग्यानबा तुकाराम। कॉंग्रेसचे काय काम?
प्र. स. ला रामराम। 'सांडू'ला आला घाम
भगवान थोरातांचे। सर्वांनी घ्यावे नाम!
बोला, 'पुंडलीक वरदा हार विठ्ठल'!
कॉंग्रेस-प्र. सो. चे थोबाड फुट्टल!

मराठा : २९-१०-१९६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम........................ दि. ........
क्रमांक ........................

७

# तुकाराम बीज

आज ' तुकाराम बीज. ' तीनशे बारा वर्षांपूर्वी आज इंद्रायणीच्या काठावर हरिनामाच्या गजरात हजारो लोकांच्या समोर तुकोबा अंतर्धान पावले. ' अंतकाळी विठो आम्हांसी पावला । कुडिसहित झाला गुप्त तुका ॥ ' तुकोबांच्या अभंगवाणीने गेली तीन शतके मराठी जनतेला अक्षरशः जागविले आहे. ' काय सांगो आता संतांचे उपकार । मज निरंतर जागविती ॥ ' खरोखर, ज्या महाराष्ट्रात तुकोबासारख्या महान संताने जन्म घेतला तो महाराष्ट्र खरोखर धन्य होय. ' पवित्र ते कुळ, पावन तो देश । जेथे हरिचे दास जन्म घेती ॥ ' संतांची जी लक्षणे स्वतः तुकोबांनी सांगितली आहेत, ती त्यांनाच स्वतः सर्वांपेक्षा जास्त लागू पडतात. पैलतीराला पोहोचविण्यासाठी उदकात जशी नाव असते, तेच कार्य संसारात संत करीत असतात. ' जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारे ॥ भूतांची दया हे भांडवल संता । आपली ममता नाही देही ॥ ' संतांची खरी कसोटी ही आहे. सांसारिकांची सारी आसक्ती आपल्या देहावर असते. ज्याला आपला देह निरसता येतो, तोच संत होऊ शकतो. देह निरसणे, म्हणजे काही देहाचा त्याग करणे नव्हे, ' तुका म्हणे देही । संत जाहले विदेही ॥ ' देही राहून विदेही व्हावयाचे ही किमया केवळ संतांनाच साधते. संतांना आपला ' मीपणा ' मारून टाकावा लागतो. ' माझ्या मीपणावर पडो पाषाण । जळो हे भूषण नाम माझे ॥ ' त्यांचे बळ आणि बुद्धी ही केवळ जगावर उपकार करण्यासाठी असतात. ' तुका म्हणे आता । उरलो

उपकारापुरता ॥ '

मनुष्याच्या अंगी हे संतपण काही फुकाफुकी येत नाही. त्यासाठी अग्निकाष्ठे भक्षण करावी लागतात. 'नाही संतपण मिळत हे हाटी । हिंडता कपारी रानीवनी ॥ ' सर्वस्वाचा जेव्हा मोबदला द्यावा, तेव्हा संतपण प्राप्त होते. 'तुका म्हणे मिळे जिवाचिया साठी । नाही तरी गोष्टी बोलू नये ॥ ' हिऱ्याची कसोटी कोणती ? तर ऐरणीवर ठेवून त्याच्यावर घणाचे घाव घातले तरी तो फुटत नाही. त्याप्रमाणे संतांना समाजाचे सारे घाव पचवावे लागतात. 'तुका म्हणे संत । सोसी जगाचे आघात॥ ' एवढ्या साऱ्या अग्निदिव्यातून गेल्याखेरीज त्याची देहावरची नम्रता नष्ट होत नाही आणि मन, बुद्धी, काया नि वाचा शुद्ध होऊन सर्वांभूती समतेची भावना त्यांच्या अंगी निर्माण होत नाही. 'तुका म्हणे सुख पराविया सुखे । ' केवळ दुसऱ्याच्या सुखातच आपल्याला सुख वाटणे हीच खरी सिद्धावस्था. गाईच्या चित्तात सदैव तिचे वासरू असते आणि आईच्या मनात सदोदित तिचे लेकरू असते. तसा जगावर निःस्वार्थी प्रेम करण्यासाठीच संतांचा जन्म असतो. 'ऐसी कळवळ्याची जाति । करी लाभाविण प्रीति ॥ ' संतांच्या सृष्टीत निर्मळ प्रेमाखेरीज दुसरे काहीही मिळणार नाही. 'संताचिया गावी प्रेमाचा सुकाळ । नाही तळमळ दुःख लेश ॥ ' विष्णुदासांच्या गावी कशाचीही चिंता नाही. तेथे आनंदाने आनंद आणि गोविंदाने गोविंद पिकवावयाचा हा एकच धंदा चालतो.

रंजल्या गांजल्यांना जवळ करावयाचे. अनाथांना आणि अपंगांना हृदयाशी धरायचे. 'दया करणे जे पुत्रासी । तेचि दासा आणि दासी ॥ ' ही साधुत्वाची पराकाष्ठा होय. पोटच्या पोरावर जसे प्रेम करावयाचे तसेच नोकरावर करावयाचे. आपण ज्या तऱ्हेचे अन्न खायचे तेच भिकाऱ्यांना द्यायचे असे साम्ययोगी संत समाजात जेव्हा निर्माण होतात तेव्हाच सर्वत्र आराणूक नांदू लागते. 'प्रेम देवाचे देणे । देहभाव जाय जेणे ॥ न धरावी मने । शुद्धी देशकाळाची ॥ ' स्वतःच्या देहाची तर राहोच. पण देशकाळाची शुद्ध न बाळगता मानवतेवर प्रेम करावे येथपर्यंत तुकोबांची मजल जाऊन पोहोचली आहे.

संपूर्णपणे प्रेमस्वरूप झालेल्या अशा संतांत लवमात्र दोष आढळणार नाही. अमृतात आणि गंगाजळात अवगुण आढळतो का ? कापूर कांडताना कोंडाकणी सापडते का ? 'तुका म्हणे तैसे जाणा संतजन । सर्वत्र संपूर्ण गगन जैसे ॥ ' चंदनाचे हात अन् पाय जसे चंदनाचेच असतात, दिव्याच्या पाठी नि पोटी

जसा उजेडच असतो, तसे संतांचे संपूर्ण अस्तित्वच सुगंधित आणि प्रकाशमान असते. संतांच्या अंगामधला हा अथांग चांगुलपणा त्यांना मुळी लपविताच येत नाही. चंदनाच्या अंगी सुवास आहे काय असे त्याला विचारावयाची का जरूर असते ? जगाला जागे कर म्हणून सूर्याला काय सांगावे लागते ? मोरांना नाचविण्यासाठी मेघांना आमंत्रण का पाठवावे लागते ? तसे जगावर प्रेम कर म्हणून संतांना निरोप पाठवण्याची काही आवश्यकता नसते. ' अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी । लपविता खरे येत नाही ।। ' असे महान संत जेव्हा समाजात निपजतात तेव्हा ते आपल्या अमृत वाणीने आणि प्रभावी करणीने साऱ्या समाजाला ' आपुल्यासारिखे करिती तात्काळ । नाही काळवेळ तयांलागी ।। ' एखादी वस्तू अग्नीत गेली म्हणजे ती जशी अग्निरूप होते, परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचा जसा दागिना होतो, नद्या नि ओढे गंगेला मिळाले म्हणजे त्यांची जशी गंगा होते, चंदनाच्या स्पर्शाने नि वासाने इतर वृक्ष ज्याप्रमाणे चंदन होतात, त्याप्रमाणे संतांच्या संगतीने समाजामधे चांगुलपणाचा महापूर येतो. पापातापाची ' तुटी ' होते. आणि सर्व दैन्य ' उठाउठी ' निघून जाते. दया, क्षमा आणि शांती हे तीन अभंग बाण हाती घेऊन जे ' विठ्ठलाचे गाढे वीर ' मानवतेच्या उद्धारासाठी सिद्ध होतात त्यांच्यापेक्षा अधिक बलवान या भू-मंडळात कोणी असू शकत नाही, प्रत्यक्ष कळिकाळ त्यांच्या पायावर लोटांगण घालतो, असा निर्वाळा तुकोबांनी जो दिलेला आहे, त्याचा पडताळा आज तीन शतकांनंतरही महाराष्ट्र आपल्या कायेची कुरवंडी करून ती तुकोबांवरून ओवाळून टाकीत आहे यावरून आल्याखेरीज राहणार नाही.

मराठा : २३-३-१९६२

अनुक्रम ........................
क्रमांक ........................

८

# श्रीतुकोबांचे निर्याण

आज फाल्गुन वद्य द्वितीया. श्रीतुकाराममहाराज शके पंधराशे एकाहत्तराच्या फाल्गुन वद्य द्वितीयेला ' कुडीसहित गुप्त ' झाले. तेव्हा आजच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी श्रीतुकाराममहाराजांखेरीज दुसरे कोणाचे स्मरण करावे ? राजकारण हे नित्याचे पाठीस लागलेले आहे. त्याची लक्तरे धुण्याचे काम रोजच्या रोज चाललेलेच असते. एखाद्या दिवशी त्यात खंड पडला अन् सत्पुरुषांच्या सेवेचे हातून पुण्य घडले तर ते कोणाला नको का आहे ? आज हजारो वारकरी देहूची वाट चालताहेत. इंद्रायणीच्या काठावर आज शेकडो मुखांतून ' ग्यानबा तुकाराम 'चा जयघोष उमटतो आहे. साऱ्या मराठी जनतेला भारून टाकणारा एवढाच दोन शब्दांचा एक मंत्र आहे. ' ग्यानबा तुकाराम । ग्यानबा तुकाराम । '

ज्ञानेश्वर आणि तुकाराम ह्या दोन महापुरुषांनीच ज्ञानाचा आणि भक्तीचा मार्ग अतिशय सोपा केला, आणि महाराष्ट्रातल्या अज्ञ आणि भोळ्या जनतेला तिच्या उद्धाराचा राजमार्ग दाखवून दिला. म्हणूनच ' ग्यानबा–तुकाराम ' हे शब्द कानी पडताच भोळीभाबडी मराठी जनता देहभान विसरून नाचू लागते. आज देहूला जमलेले हजारो वारकरी जेव्हा ' ग्यानबा तुकाराम 'चा गगनभेदी गजर करतील, तेव्हा साक्षात वैकुंठच तेथे प्रकट झाल्यासारखे सर्वांना वाटेल ह्यात काय संशय ? अन् मग स्वतः तुकाराममहाराजांनी जे देहूचे वर्णन केले आहे, ते सार्थ ठरेल.

—धन्य देहू गाव, पुण्यभूमि ठाव,

तेथे नांदे देव पांडुरंग ॥
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे,
उच्चारिती वाचे नामघोष ॥
कर कटी उभा विश्वाचा जनिता,
वामांगी ते माता रखुमादेवी ॥
तेथे दास तुका करितो कीर्तन
हृदयी चरण विठोबाचे ॥

तुकाराममहाराजांना जाऊन आज तीन शतके आणि एकोणीस वर्षे पूर्ण होतात, तरी त्यांची अभंगवाणी महाराष्ट्राच्या कानांत आज दुमदुमते आहे. त्यांच्या कीर्तनाची पताका अद्यापि महाराष्ट्राच्या मस्तकावर फडकते आहे. ह्याचे कारण ज्या भागवतधर्माचा पाया सहाशे वर्षांपूर्वी ज्ञानोबांनी घातला, त्याचे तुकोबा हे कळस होते! 'ग्यानबा तुकाराम' हा भागवत धर्माचा आत्मा होय. ग्यानबा हा भागवत धर्माचा श्वास, तर तुकाराम हा भागवत धर्माचा निःश्वास होय. मराठी भाषेतून आणि मराठी जीवनातून 'ग्यानबा तुकाराम' जर वजा केले तर बाकी काय राहील! सद्विचारांचे आणि सद्भावनेचे केवढे गडगंज धन त्यांनी महाराष्ट्रावर उधळून ठेवले आहे. ज्ञानेश्वर हे तर बोलून चालून ज्ञानाचे सागरच. त्या सागरात विहार करणे हे सामान्य माणसाचे काम नव्हे. फार मोठा अधिकार लागतो त्याला. पण तुकोबांनी त्या सागरात भक्तीच्या मोटा सोडल्या आणि त्यातले पाणी घरोघर पोहोचवून साऱ्या महाराष्ट्रात शांतीचे आणि समाधानाचे मळे पिकविले. म्हणूनच 'ग्यानबा-तुकाराम' ही महाराष्ट्रातल्या गोरगरिबांच्या देवघरातली दैवते होऊन बसली आहेत. ग्यानबाची पूजा करताना महाराष्ट्राला तुकारामाची आठवण होते, अन् तुकोबांचे स्मरण करताना ग्यानबाचे नाव ओठांतून आपोआप बाहेर पडते. जनतेच्या कृतज्ञतेची भावना व्यक्त करणारा ह्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान समास कोणत्याही भाषेत असेल असे आम्हांला वाटत नाही. म्हणून आज श्रीतुकाराममहाराजांची निर्याणतिथी असली तरी देहूचा परिसर आणि इंद्रायणीचा काठ 'ग्यानबा-तुकाराम'च्या आरोळ्यांनीच दुमदुमून जाईल ह्यात शंका नाही!

ईश्वरप्राप्तीचा अत्यंत सोपा मार्ग तुकोबांनी बहुजनांना दाखवून दिला. 'विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा। करी पापा निर्मूळ ॥' रामनाम म्हणजे दोन अक्षरांचे काम. त्याला काही खर्च करावा लागत नाही. 'संध्या कर्म ध्यान जप तप

अनुष्ठान । अवघे घडे नाम उच्चारिता ॥' नाममंत्राचे हे माहात्म्य तुकोबांनी शेकडो अभंगांमध्ये अत्यंत रसाळपणे वर्णन करून ठेविलेले आहे. त्यांतले किती किती उतारे म्हणून द्यावयाचे ? जीवनात नामसंकीर्तनासारखा आनंद नाही. 'सोपे वर्म आम्हा सांगितले संती । टाळ दिंडी हाती घेऊनी नाचा ॥ समाधीचे सुख साठा ओवाळून । ऐसे हे कीर्तन ब्रह्मरस ॥' समाधीचे सौख्य हे केवळ योग्यांनाच प्राप्त होते. पण सर्वसामान्य जनाला त्या ब्रह्मानंदाचा लाभ कीर्तनाने होतो असे तुकोबा सांगतात. मतोवृत्तींना तल्लीन करून टाकण्याचे पराकाष्ठेचे सामर्थ्य कीर्तनात आहे. कीर्तन करता करता अंगात प्रेमाचे भरते एकसारखे चढत जाते अन् मग शेवटी अशी अवस्था येते की 'दीपकी कर्पूर कैसा तो विराला । तैसा देह जाला तुका म्हणे ।' सर्व भूतमात्रात देव भरला आहे, त्याचा प्रत्यय कीर्तनामधूनच येतो. आणि मग :

जिकडे पाहे तिकडे उभा ।
अवघ्या गगनाचा गाभा ॥
डोळा बैसले बैसले
रूप राहोनी संचले ॥
न वर्जिता दाही दिशा
जिकडे पाहे तिकडे सरिसा ॥
तुका म्हणे समपदी
उभा दिठीचिया आधी ॥

ह्या विश्वामध्ये सर्वत्र परमेश्वर भरला आहे, ह्या भावनेने हृदयात कृतार्थतेची केवढी भावना उत्पन्न होते ! परमेश्वराचा साक्षात्कार ह्यापेक्षा काही निराळा असू शकत नाही. आणि असा साक्षात्कार झाला, की साहजिकच मुखातून धन्योद्गार उचंबळतात :

धन्य दिवस आजी, डोळिया लाधला
आनंद देखिला धणीवरी ॥
धन्य झाले मुख, निवाली रसना,
रामनारायण घोष करू ॥
धन्य हे मस्तक, सर्वांग शोभले
संतांची पाऊले लागताती ॥
धन्य आणि पथे चालती पाऊले,

टाळिया शोभले धन्य कर ।।
धन्य तुका म्हणे आम्हांसी फावले
पावलो पावले विठोबाची ।।

सर्व चराचरात अन् प्राणिमात्रात ईश्वरी तत्त्व भरलेले आहे म्हणूनच तुकोबांनी आपल्या विठ्ठलाला 'समचरण' म्हटले आहे. त्यापुढे उचनीच कोणी नाही. सर्व सारखे. ह्या सर्वांभूती भरलेल्या विठ्ठलाचे दर्शन नामसंकीर्तनाने कोणालाही होऊ शकते हे तुकोबांच्या शिकवणुकीचे थोडक्यात सार आहे. तुकोबांचे कर्तृत्व आणि कवित्व जसे विलक्षण तसे त्यांचे निर्याणही पण अद्भुत! ह्या त्यांच्या निर्याणासंबंधी निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या कल्पना बांधून ठेवल्या आहेत. त्यांचा ह्या ठिकाणी विचार करणे वावगे होणार नाही. तुकोबांच्या निर्याणकालासंबंधी मतभेद नाही. त्याचा उल्लेख त्यांच्या अभंगातच आहे.

शालिवाहन शके पंधराशे एकाहत्तर ।
विरोधी नाम संवत्सर उत्तरायणी ।।
फाल्गुन वद्य द्वितीया दिवस सोमवार ।
प्रथम प्रहर प्रातःकाळ ।।

प्रत्यक्ष मृत्यू येईपर्यंत जीवन जगत राहावे ही गोष्ट त्या वेळच्या सत्पुरुषांना मान्य नसावी असे दिसते. आपले अवतारकार्य समाप्त झाल्याची जेव्हा त्यांना जाणीव झाली, तेव्हा तुकोबांनी इहलोकामधून निघून जाण्याचे ठरविले. आळंदी येथे एका एकादशीला कीर्तन करता करताच त्यांनी हा निश्चय केला. निर्याणासंबंधीचे त्यांचे जे अभंग उपलब्ध आहेत त्यांत 'कुडीसहीत गुप्त' होण्याचा त्यांचा मानस स्पष्ट दिसून येतो.

कुडीसहीत तुका जाईल वैकुंठासी ।
हे गुज तुम्हांसी कळले नाही ।।
पुढे जे होईल ते जाणे विठ्ठल ।
लौकिका कळेल काय तेथे ।।
तुका म्हणे आता काया ब्रह्म झाली ।
विमाने उतरली आम्हांलागी ।।

त्याचप्रमाणे 'हातावरीहात मारुनि जातो तुका । परि कोणा एका उमजेना ।।' किंवा 'अंतकाळीं विठो आम्हासी पावला । कुडीसहीत झाला तुका गुप्त ।।'

हे उल्लेख निःसंदिग्ध आहेत. अर्थात हे अभंग तुकोबांचे नाहीत, ते कोणीतरी मागून घुसडले आहेत असे म्हणणारांना काय उत्तर द्यावयाचे? 'आता मी लौकरच माझ्या प्राणेश्वरास भेटावयास जाणार आहे' असें तुकोबांनी आधीपासूनच सर्वांना सांगून ठेवले. पण त्यांच्या त्या बोलण्यावर फारसा कोणी विश्वास ठेवला नसावा. अखेर आपल्या पत्नीचा निरोप घेऊन फाल्गुन वद्य प्रतिपदेला रात्री नांदुरकीच्या झाडाखाली तुकाराममहाराज शेवटच्या कीर्तनाला उभे राहिले. सबंध रात्र कीर्तनाचा गजर चाललेला होता. तुकोबांच्या अभंग-वाणीतून त्या दिवशी अमृताचा मुसळधार वर्षाव झाला असला पाहिजे, हे काय सांगायला पाहिजे? देहभान विसरून ब्रह्मानंदाच्या अथांग डोहामध्ये सारे डुंबू लागले, आणि अशा सामुदायिक तल्लीनतेच्या परम क्षणी तुकाराम महाराज 'दिव्यामध्ये कापूर जसा विरावा' त्याप्रमाणे परब्रह्मात सदेह विलीन होऊन गेले. ते केव्हा नाहीसे झाले, कधी नाहीसे झाले, हे कोणाच्याच ध्यानी आले नाही. त्यांच्या भक्तमंडळींनी पुढे तीन दिवस ते कीर्तन तसेच चालू ठेवले. पंचमीला त्यांची टाळ, वीणा अन् गोधडी सापडली. तेव्हा तुकाराम-महाराज सदेह वैकुंठाला गेले, असे सर्वांनी मान्य केले आणि व्यथित हृदयाने जो तो घरी परतला.

भगवान विष्णूच्या विमानात बसून तुकाराममहाराज वैकुंठाला गेले, ही तदनंतर भोळ्याभाबड्या जनतेमध्ये कल्पना प्रसृत झाली. तिजवर अक्षरशः विश्वास ठेवण्याचे कारण नाही. पण कीर्तन करता करता श्रीतुकाराममहाराज नाहीसे झाले आणि पुढे त्यांची कुडी कुठेच कोणाला सापडली नाही, ह्यासंबंधी मात्र कोणालाही संशय नाही! ह्या गोष्टीला ऐतिहासिक पुरावाही आहे. तुकोबांचे पुत्र श्रीनारायणबावा ह्यांनी आपल्या वडिलांच्या निर्याणाची माहिती सन १७०४ मध्ये दुसऱ्या शिवाजीमहाराजांना कळविली. त्यात 'तुकोबा गोसावी देहू येथे भगवत्कथा करता अद्रश झाले, ही गोष्टी विख्यात आहे' असे त्यांनी म्हटलेले आहे. तुकोबांचे समकालीन जे रामेश्वरभट्ट त्यांनीही 'मागे कवीश्वर झाले थोर थोर, नेले कलेवर कोण सांगा ॥' अशी ग्वाही दिली आहे. तुकोबा अदृश्य झाले आणि त्यांची कुडी कोणासही नंतर आढळली नाही. ह्या दोन गोष्टी एकदा गृहीत धरल्या, म्हणजे मग ते 'कुडीसहीत गुप्त' कसे झाले ह्यासंबंधी चार तर्क संभवतात. एक, ते परब्रह्मात विलीन झाले. दुसरा, त्यांनी स्थलसमाधी घेतली. तिसरा, त्यांनी जलसमाधी घेतली. चौथा, त्या गर्दीत



मराठा ग्रंथ संग्रहालय, ...

त्यांच्या वैऱ्यांनी त्यांचा खून करून त्यांचे शरीर मुद्देमालासकट कुठेतरी नाहीसे केले. पैकी, शेवटच्या तर्काला कोणीही विचारी आणि समंजस माणूस आपल्या मनात थारा देईल असे वाटत नाही. तुकोबांचे चरित्र प्रसिद्ध आहे. ते जर खरे असेल, तर आपल्या सामर्थ्याच्या जोरावर सर्व छळातून ते सुरक्षितपणे निभावून बाहेर पडलेले आहेत. अशा सत्पुरुषाचा शेवटी खून होईल हे जरी क्षणभर शक्य मानले, तरी तो खून आजपर्यंत गुप्त राहील ही गोष्ट सर्वथैव अशक्य आहे. शिवाय ज्यांनी कोणी खून केला त्यांनी 'तुका कुडीसहित गुप्त झाला' अशा अर्थाचे खोटे अभंग करूनही त्यात घुसडले असले पाहिजेत येथपर्यंत कल्पनाशक्ती ताणावी लागते, ही गोष्ट निराळीच !

आता उरलेल्या तीन तर्कांपैकी जलसमाधी आणि स्थलसमाधी ह्या दोन शक्यतांचा विचार करू. अशा तऱ्हेच्या समाधी त्या काळचे सत्पुरुष घेत असत ह्यात शंका नाही. तथापि इतरांना त्यांचा यत्किंचित सुगावा न लागू देता अशा तऱ्हेने समाधी घेणे ही गोष्ट काही आम्हांला संभाव्य वाटत नाही. स्थलसमाधी घेणे ही गोष्ट तर एकट्या माणसास सर्वस्वी अशक्यच आहे; पण अंगाला दगड बांधून इंद्रायणीच्या डोहात त्यांनी उडी मारली असे समजले तरी पाण्यातील त्यांच्या अवशेषांचा सुगावा कुणालाही लागू नये ही गोष्ट काही विश्वसनीय वाटत नाही, आणि तत्कालीन जनतेमध्ये इंद्रायणीच्या डोहात तळापर्यंत बुड्या मारणारे कोणीच लोक नव्हते, असे मानण्याचे मुळीच कारण नाही. सर्व दृष्टींनी विचार करता कीर्तनप्रसंगी तुकोबांनी 'काया ब्रह्म'च केली असावी, असेच मानावे लागते. त्याखेरीज तुकाराममहाराज सदेह वैकुंठाला गेले, ही कल्पना तीन शतकेपर्यंत जनमनात एवढी रूढ होऊन बसली नसती.

लौकिक समजुती ह्या अतिशयोक्त असतात, हे खरे. पण त्याला अजिबात मूळच नसते, असे काही म्हणता येणार नाही. आजपर्यंत अशा रीतीने काया ब्रह्म केलेल्यांची उदाहरणे अत्यल्प असली किंवा काया ब्रह्म करता येते की नाही या गोष्टीवर आजच्या लोकांचा विश्वास नसला, म्हणून तुकाराममहाराज परब्रह्मात सदेह विलीन झाले नाहीत, असे म्हणता येणार नाही. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात योगबलाने आपल्या शरीरासह आकाशात कसे लुप्त होता येते ते विस्ताराने सांगितले आहे. (ओव्या २९३ ते ३२३) "योग्याच्या शरीरातल्या शरीरातच पृथ्वी, आप व तेज ह्या तीन महाभूतांचा लोप झालेला असतो. पृथ्वीचा अंश आपात विरतो. आपाचा अंश तेजात जिरतो आणि तेजाचा अंश

हृदयातील पवनात शिरतो. मग शेवटी एकटा पवनच राहतो. मात्र तो शरीराच्या देखाव्याने उरतो. मग काही कालगतीने तोही आकाशात समरस होऊन लोप पावतो. इ. इ. " हे वर्णन म्हणजे काही कादंबरी नव्हे. तुकोबा हे अलौकिक भक्त होते आणि भक्तीच्या जोरावर त्यांच्या अंगी महान योगसामर्थ्य निर्माण झालेले होते. त्यामुळेच त्यांचा आत्मा शरीरासह परमात्म्यात विलीन होऊ शकला. ज्यांची श्रद्धा असेल त्यांनीच ह्या गोष्टीवर विश्वास ठेवावा. त्याबद्दल काही कोणाची जबरदस्ती नाही. तुकोबाच्या कायाब्रह्मावर मोठमोठ्या सत्पुरुषांचा विश्वास होता. रंगनाथस्वामींचे त्यासंबंधीचे पद फारच सुंदर आहे.

जड देहा घेऊनि वाणी ।
गेला ती ऐका वाणी ॥
घट फोडूनि जनकादिक ते ।
अनुभवते झाले माती ॥
हा नोहे तुकया तैसा ।
घट राखूनि धरिली माती ॥
इतर ते हारुनि दुग्धा ।
परिणामक घेती लोणी ॥
हा नोहे तुकया तैसा ।
दुध राखुनि चाखे लोणी ॥

'घट न फोडता माती धरणारा आणि दूध न घुसळता लोणी चाखणारा' तुकोबा हा एक अलौकिक सामर्थ्याचा भगवद्भक्त ह्या महाराष्ट्र भूमंडळी होऊन गेला आहे, असा अनेक सत्पुरुषांनी निर्वाळा दिलेला आहे. शेवटी तुकोबारायांच्या निर्याणानंतर प्रत्यक्ष पांडुरंगाने जे उद्गार काढले तेच उद्गार त्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी श्रीतुकाराममहाराजांच्या चरणी आपण भक्तिभावाने वाहू या.

माझा प्रेमाचा पुतळा । तुका टाकोनिया गेला ॥
माझ्या जिवी त्याचा छंद । पांडुरंग रडे फुंदे ॥
काय सांगो तुज गोष्टी । दुःख न माये ते पोटी ॥
म्हणे रुक्मिणीचा कांत । माझे संबोधावें चित्त ॥
सर्व गुणांतील गोड । तुका लावण्याचे झाड ॥

मराठा : ७-३-१९६९

# १

## तुकोबांचे निर्याण

या महाराष्ट्रात भगवद्भक्तीच्या ज्या परमपावन देवालयाचा पाया ' ज्ञानदेवे रचिला ' आणि त्यावर ज्यांनी आपल्या अभंगवाणीने सुवर्णकळस चढविला, ते संतशिरोमणी तुकोबा ' आम्ही जातो आपुल्या गावा । आमुचा रामराम घ्यावा ॥ ' असे म्हणत म्हणत सदेह वैकुंठाला ज्या दिवशी गेले, तोच आजचा दिवस ' फाल्गुन वद्य द्वितीया '—ज्याला आपण ' तुकाराम बीज ' म्हणतो. त्या गोष्टीला आज तीनशेअठरा वर्षे होत आहेत. तुकोबांच्या प्रयाणकालाबद्दल निरनिराळीं मते आहेत. तुकोबांचे लेखक संताजी जगनाडे ह्यांच्या पुत्राने आपल्या वहीत स्वहस्ताने लिहिले आहे की, " श्रीनृप साळीवाहण सक १५७२ वीक्रुति नाम संवतसरे फळगुण वदि २ द्वीतीया वार सोमवार ते दीवशी तुकोबा गोसावी वैकुंठास गेले. स्वदेहनिसी गेले. " देहू येथील देहूकरांच्या पूजेच्या अभंगाच्या वहीत लिहिले आहे की, " सके १५७१ वीरोधीनां शंवछरे शीमगा वद्य द्वीतीया : वार सोमवार. ते दीवसी. प्राथःकाळीं : तुकोबांनी तीर्थास प्रयाण केले. " महिपतीबाबांनी आपल्या ' भक्तिलीलामृता 'त हीच तिथी मान्य केली आहे. तथापि, शके १५७० च्या फाल्गुन वद्य द्वितीयेला सोमवार येत असल्यामुळे तेच साल पत्करावे असे इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात. ह्या तिन्ही लेखांत ' फाल्गुन वद्य द्वितीया ' ही तिथ दिली आहे ती सर्वस्वी प्रमाण आहे. म्हणून तिच्याविषयी शंका नाही. पण वाद जो आहे तो वाराचा नि शकाचा. कारण शके १५७०–७१ किंवा १५७२ ह्यापैकी कोणत्याही वर्षाच्या फाल्गुन

वद्य द्वितीयेला सोमवार येत नाही. म्हणून 'वार' सोडून देऊन निदान तिथी आणि साल तरी नक्की केले पाहिजे. ऐतिहासिक दृष्टीने विचार करता शके १५७० ते १५७२ या तीन सालांपैकी कोणत्या तरी साली तुकोबांचे प्रयाण झाले असले पाहिजे.

वैकुंठाला जाण्याचा 'टकळा' (वेध) तुकोबांना फाल्गुन शुद्ध १० पासून लागला होता. त्या दिवशी तुकोबांना भेटावयाला देव वैकुंठीहून आले होते. त्यांचा पाहुणचार करण्यास योग्य ते साहित्य तुकोबांजवळ नव्हते. म्हणून कण्या पाण्यात रांधून तुकोबांनी देवाला जेवू घातले. त्याचे स्मारक म्हणून फाल्गुन शुद्ध १० ला 'कण्याची दशमी' असे म्हणतात. प्रयाणापूर्वी तुकोबांनी आपल्या पत्नीस जो अखेरचा बोध केला त्यात 'दिनशुद्ध सोम सकाळी पातला । द्वादशी घडला पर्वकाळ' असे त्यांनी स्वतः म्हटले आहे. तेव्हा वैकुंठीला जाण्याचा तुकोबांचा निर्धार फाल्गुन शुद्ध द्वादशीस सोमवारी झाला हे उघड आहे. त्यानंतर अवघ्या पाचच दिवसांनी फाल्गुन वद्य २ येते. पण त्या दिवशी शनिवार येतो. म्हणून हा वार नि ही तिथी निर्याणाचे वर्ष शके १५७१ धरले, तरच जमतात. सारांश, 'शके १५७१ फाल्गुन वद्य २, शनिवारी सकाळी' तुकोबांचे प्रयाण झाले, असे निश्चितपणे समजावे असे तुकाराम चरित्रकार पांगारकर म्हणतात, आणि सगळ्यात गंमत अशी की, ३१८ वर्षांनंतर विद्यमान शके १८८९ मधे फाल्गुन वद्य द्वितीया ही आज पुन्हा शनिवारी येत आहे. हा तरी एक महान योगायोगच नव्हे काय ?

आता तुकोबांच्या प्रयाणकालाप्रमाणेच त्यांच्या जन्मशतकाबद्दलही चार निरनिराळी मते आहेत. त्या वादात आम्ही या ठिकाणी पडत नाही. पण तुकोबांच्या जन्मशतकाबद्दल इतिहासाचार्य राजवाडे ह्यांनी आपल्या विक्षिप्तपणाचे जे प्रदर्शन केले आहे, त्याचा उल्लेख येथे करणे जरूर आहे. राजवाड्यांना वाईप्रांती म्हणे एक वंशावळ सापडली. तिच्यात 'तुकोबांचा जन्म शके १४९०' असा दिलेला त्यांना आढळला. तेव्हा तोच शक ते घट्ट पकडून बसले. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणे तुकोबांचा जन्म शक १४९० हा मानला तर त्यांच्या प्रयाणसमयी म्हणजे शके १५७१ साली तुकोबा ८१ वर्षांचे होते असे मानावे लागते. पण तसे मानण्यात एक मोठी अडचण उत्पन्न होते. ती ही की, तुकोबांच्या प्रयाणसमयी त्यांची स्त्री जिजाबाई ही पाच महिन्यांची गरोदर होती. शिवाय जिजाबाई ही तुकोबापेक्षा पाचसहा वर्षांनी लहान होती ही गोष्टही राजवाड्यांनी



मराठी ग्रंथ ...
अनुक्रम.............................. दि: ..........................

कबूल केली आहे. म्हणजे तुकोबांच्या प्रयाणसमयी जिजाबाई पाऊणशे वर्षांची होती, असे राजवाड्यांच्या मतानेच ठरते. एवढ्या उतारवयात तुकोबापासून जिजाबाई गरोदर राहणे शक्य आहे काय ? पण त्या गोष्टीकडे राजवाड्यांनी सपशेल दुर्लक्ष केले आहे. उलट निजामउल्मुलुख ( वय ८० ) आणि जर्मन कवी गटे ( वय ७० ) ह्या दोघांना आणि ' गुरुचरित्रां 'तल्या एका पाऊणशे वर्षांच्या वांझोट्या वृद्धेला मुले झाल्याची उदाहरणे देऊन आपलेच म्हणणे खरे असल्याचा हास्यास्पद हेका राजवाड्यांनी शेवटपर्यंत सोडला नाही. तेव्हा या प्रश्नाबाबत ' इतिहासाचार्यां 'च्या नादी लागण्यात अर्थ नाही.

उपलब्ध साधनांच्या साधकबाधक विवेचनाच्या आधाराने तुकोबांचा जन्मशक १५३० हाच आहे असा पांगारकरांसारख्या समंजस संशोधकांनी निर्णय दिला आहे. त्यावरून प्रयाणकाळी तुकोबांचे वय ४१ वर्षांचे असले पाहिजे असे दिसते. आता आपण तुकोबांच्या निर्याणाच्या प्रश्नाकडे वळू. तो तर सर्वांत मोठा वाद आहे. निर्याणाचे वर्णन तुकोबांच्या ( किंवा प्रक्षिप्त ) अभंगांच्या आधारे जे केले जाते, ते असे आहे. इहलोकीचे तुकोबांचे कार्य पूर्ण झाले. त्यांच्या प्रयाणाचा समय प्राप्त झाला.

बीज भाजुनी केली लाही !
आम्हां जन्ममरण नाही ॥
साकरेचा नव्हे ऊस !
आम्हां कैचा गर्भवास ? ॥

' बीज भाजून त्याची लाही केली की ते पुन्हा पेरणीच्या उपयोगाचे राहात नाही. त्याप्रमाणे आमचे कर्म ज्ञानाग्नींत भस्म झाल्यामुळे आम्ही जन्ममृत्यूपासून सुटलो आहोत. उसाची साखर होते. पण साखर झाल्यावर ऊसपणाला परतता येत नाही. त्याप्रमाणे देहाश्रय करून आम्ही ब्रह्मस्थितीला आलो. आता मागुती देहसंभव नाही. सर्वांघटीं पांडुरंग आहे. आमचा देह प्रत्यक्ष देव झाला आहे. आता विनाशी देहाचा आमचा संबंध उरला नाही ' असे आत्मज्ञान झाल्याने तर साहजिकच वैकुंठीला जाण्याचा तुकोबांना वेध लागून राहिला.

सोमवारी शुद्ध द्वादशीस त्यांनी जिजाईस पूर्णबोध केला. ' उद्या आपण वैकुंठपुराला जाणार ' असे त्यांनी आपल्या सर्व शिष्यांना सांगितले. जिजाबाईनाही त्यांनी निरोप पाठविला की, ' उद्या आम्ही वैकुंठास जाणार आहोत तर तुम्हीही बरोबर यावे. ' पण ' मी पाच महिन्यांची गरोदर आहे, मुले लहान आहेत.

म्हणून येता येत नाही ' असा तिने परत जबाब पाठविला. तेव्हा मग त्यांनी आपल्या शिष्यांस उपदेश केला आणि नामस्मरण करीत करीतच ते देवळाबाहेर पडले. त्यांच्याबरोबर त्यांचे चौदा शिष्य होते. तुकोबा कोठे जात आहेत, ह्याची कोणालाही कल्पना नव्हती. तुकोबा शिष्यांसहवर्तमान इंद्रायणीच्या तीरी आले आणि गोपाळपुरा येथे नांदुरकीच्या झाडाखाली वद्य १ ला रात्री त्यांनी कीर्तनाला प्रारंभ केला. तुकोबांची कुडी ज्ञानभक्तियोगाने ब्रह्मरूप झाली होती. नामसंकीर्तन-भक्तीची तुकोबांनी त्या दिवशी पराकाष्ठा केली. प्रेमामृताच्या भोजनाने सर्वांना संतृप्त केले. " आता दिसो नये जना । ऐसे करा नारायणा ॥ तुका म्हणे मज आठवा । ' मूळ ' लवकरी पाठवा ॥ " अशी त्यांनी ईश्वराला साद घातली. ' नामसंकीर्तन—भक्तिसुखापुढे मोठमोठ्या ब्रह्मज्ञान्यांना लाळ घोटावयाला ' लावीन असे त्यांनी आत्मविश्वासाने त्यांना बजावले. कीर्तन संपत आले. विठ्ठलनामोच्चाराचा सर्वांच्या मुखांतून उसळणारा गजर गगनाला भिडला. तोच ' पैल आले हरि । शंखचक्र शोभे करी ॥ ' तुकोबांना नेण्यासाठी प्रत्यक्ष वैकुंठपीठच घरा आल्यावर मग काय विचारावयाचे ? तुकोबांचे सर्व शरीर अत्यंत दिव्य नि तेजःपुंज होऊन गेले. त्या तेजाने सर्वांचे डोळे दिपून गेले. तुकोबांची काया ' ब्रह्म ' झाली, ' अंतकाळीं विठो आम्हांसी पावला । कुडीसहित झाला गुप्त तुका ॥ ' लोक डोळे उघडून पाहतात, तो तुकोबा कोठेच दृष्टी पडेनात. सर्व शोकमग्न झाले.

अशा रीतीने तुकोबा द्वितीयेला गुप्त झाले. पंचमीला त्यांची टाळ व वीणा गोधडी सापडली. पाच दिवस भक्तमंडळींनी कीर्तन भजन महोत्सव केला. तुकोबा सदेह वैकुंठाला गेले, सबब ह्यांचे क्रियाकर्मांतर करण्याचे कारण नाही, असा सप्तमीस रामेश्वरभटांनी शास्त्रार्थ दिला. तो सर्वांनी मान्य केला. त्या वेळेपासून तुकाराममहाराजांच्या प्रयाणाचा महोत्सव देहूस फाल्गुन वद्य २ ते ५ पर्यंत दरसाल होत असतो. तुकोबांचा देह कीर्तन करता करता अदृश्य झाला. तुकोबांना घेऊन जाण्यासाठी देव स्वतः विमान घेऊन आले आणि तुकोबा सदेह वैकुंठाला गेले. ह्यासंबंधी अनेक आधुनिक विद्वानांनी संशय व्यक्त केला आहे त्या गोष्टीचे अनेकांनी खंडनमंडन केले आहे. तेव्हा अखेर शेवटी सत्य घटना काय घडली, हा प्रश्न शिल्लक राहतोच.

खरे पाहता हा अध्यात्मयोगाचा भाग आहे. योगसामर्थ्याने शरीराचा पार्थिवांश आपात, आपाचा तेजात याप्रमाणे ' पिंडी पिंडाचा ग्रास ' करून म्हणजे

‘ काया ब्रह्म करून ’ पंचभूतांच्या देहाचा पाहता पाहता लय करून तुकोबा वैकुंठाला गेले, असे त्या विषयाच्या ज्ञात्यांचे म्हणणे आहे. ‘ देहासकट वैकुंठाला जाता येते ’ असे श्रीगुलाबराव महाराजांचे म्हणणे होते. ह्याबाबत संतांचे शब्दप्रामाण्य तर पुष्कळच आहे. रामेश्वरभट म्हणतात, ‘ मागे कवीश्वर झाले थोर थोर । नेले कलेवर कोणे सांगा ? ॥ ’ मोरोपंत म्हणतात, ‘ की सतनु मुक्त झाला योगाची सिद्धि हे तुकारामी ॥ ’ ज्ञानोबांची बहीण मुक्ताबाई अशाच पाहता पाहता गुप्त झाल्या. कबीरही वयाच्या १०१ व्या वर्षी गुलाबपुष्पांच्या शेजेवर अंगावर शाल घेऊन झोपले असताना, त्या शालीखालून आपल्या हिंदु-मुसलमान शिष्यांच्या देखत नाहीसे झाले. गुरू नानकांचाही अंत्यसंस्कार हिंदुधर्माप्रमाणे करावा का मुसलमानी धर्माप्रमाणे करावा, याचा त्यांच्या शिष्यमंडळीत वाद चालला असताना, एकाने त्यांच्या मृत शरीरावरील वस्त्र उचलले, तो मृत शरीर नाहीसे झाल्याचे आढळले.

तुकोबांच्या सदेह वैकुंठगमनाखेरीज त्यांच्या निर्याणासंबंधी आणखी तीन चार मते प्रचलित आहेत. कोणी म्हणते, ते नैसर्गिक रीतीनेच आपल्या घरी मृत्यू पावले. कोणाच्या मते ते शेवटी काशीयात्रेला गेले. कोणी म्हणतात, त्यांनी स्थलसमाधी घेतली, तर कोणी म्हणतात त्यांनी जलसमाधी घेतली. इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्याप्रमाणेच ‘ महाराष्ट्र-सारस्वत ’ कार वि. ल. भावे हे एक विक्षिप्त संशोधक होते. तुकोबांच्या मृत्यूची त्यांनी अत्यंत विचित्र नि हास्यास्पद उपपत्ती लावली आहे. ते म्हणतात, “ तुकोबांनी इंद्रायणीजवळ किंवा पलीकडे एक समाधिस्थान बांधविले होते. त्यात त्यांनी ज्ञानेश्वराप्रमाणेच समाधी घेतली. आत शिरल्यावर समाधीचे दार बंद करून टाकण्यात आले. तीन दिवस त्या समाधिमंदिरातून आवाज येत होता. पंचमीचे दिवशी आवाज थांबला नि सर्वत्र सामसूम झाले. तेव्हा तुकोबांचा प्राण गेला असे जाणून मंडळी घरोघर परतली. ” तुकोबांनी जर अशा तऱ्हेने समाधी घेतली होती, तर ती त्यांची समाधी नाहीशी कशी झाली ? आणि भावे यांनी हा अजब ‘ शोध ’ लावीपर्यंत ती गोष्ट गुप्त कशी राहिली ? तात्पर्य, वि. ल. भावे ह्यांची स्थलसमाधीची उपपत्ती धादांत खोटी आहे.

पण हे तर काहीच नाही. तुकोबा कीर्तन करीत असता देहू गावच्या भटांनी त्यांना इंद्रायणीच्या डोहात बुडवून जबरदस्तीने जलसमाधी दिली, असा पाजीपणाचा शोध स्वतःला ‘ सत्यशोधक ’ म्हणविणाऱ्या ज्या काही हलकट

लेखकांनी लावलेला आहे, ते दुर्दैवाने अद्याप हयात आहेत. त्यांच्यापुढे काय डोके फोडायचे ? साधुसंतांबद्दल असली बेजबाबदारपणाची भाषा केवळ अडाणी आणि मतलबी लोकच करतात असे नव्हे, तर चांगले सुशिक्षित आणि विद्वान साहित्यिकसुद्धा त्याबाबत शेण खायला कमी करीत नाहीत. आमचे मित्र श्री. विठ्ठलराव घाटे (भूगोलफेम) ह्यांनी 'दिवस असे होते' ह्या आपल्या आत्मचरित्रात (पान ४९८) ज्ञानेश्वरमहाराजांनी घेतलेल्या समाधीबाबत काय अकलेचे तारे तोडले आहेत ते वाचा : "आत्महत्येवर माझा विश्वास आहे. ज्ञानेश्वरांनी ऐन उमेदीत बुद्धी निकोप असताना आत्महत्या केली. अवतारकृत्य संपले होते. प्रेम आणि भक्ती भरपूर लाभली होती. जगण्याचे प्रयोजन उरले नव्हते." ज्ञानेश्वरांनी घेतलेल्या समाधीची अशी राक्षसी विटंबना करणारा नराधम गेल्या सहाशे वर्षांत महाराष्ट्रात काही निपजला नसेल ! हे विधान जर ह्या विठ्ठल-बुवांनी आळंदीला जाऊन ज्ञानोबांच्या समाधीसमोर उघडपणे केले असते, तर ते आळंदीहून पुण्याला काही सदेह परत आले नसते. साधुसंतांच्या चरित्रातील काही घटनांवर ज्या कोणा आधुनिकांचा विश्वास बसत नसेल, त्यांनी निदान त्यांच्याबद्दल 'विश्वास अन् आदर' बाळगून तरी त्यांच्या जीवनाचे नि वचनांचे अध्ययन आणि विवेचन करावे.

तुकोबांच्या निर्याणाचा आजचा पुण्यदिन आपण विनोबांच्या पावनवाणीनेच साजरा करू या ! "ग्यानबा-तुकाराम या भाविक मनाला मुग्ध करणाऱ्या महामंत्रात भागवत धर्माच्या सर्व साधुसंतांचा समावेश झाला आहे. ज्ञानोबा आचार्य आणि तुकोबा प्रचारक. महाराष्ट्रात ज्ञानाचा सार्वत्रिक प्रसार तुकोबा-इतका कोणीच केला नाही. ज्ञानोबांनी ज्ञानाचे भांडार भरून ठेविले. तुकोबांनी हमाली पत्करून ते 'भांडार फोडले' आणि 'धन्याचा माल' गरीबगुरिबापर्यंत पोहोचविला. म्हणून महाराष्ट्रातील जनता कृतज्ञतापूर्व या दोघांच्या नावाचा एकत्र जयजयकार करीत असते—ग्यानबा-तुकाराम !" बोला पुंडलीकवरदा हरिविठ्ठल ! ज्ञानदेव तुकाराम !

मराठा : १७-३-१९६

१७३०२

१०

# श्रीकृष्णजन्म

आज गोकुळ अष्टमी. अदमासे पाच सव्वापाच हजार वर्षांपूर्वी श्रावण महिन्याच्या विद्य अष्टमीस मध्यरात्रीच्या सुमारास बाहेर शिळंधार पाऊस पडत असताना अभिजित नक्षत्राच्या विजयी मुहूर्तावर मथुरेचा राजा जो कंस, त्याच्या कारागृहात त्याची चुलतबहीण जी देवकी तिच्या पोटी श्रीकृष्णाचा जन्म झाला. राजा उग्रसेन ह्याला कैदेत टाकून त्याचा ज्येष्ठ आणि दुष्ट पुत्र जो कंस ह्याने मथुरेचे राज्य बळकावले होते. वसुदेव नावाच्या यादव सरदाराला उग्रसेनाची पुतणी देवकी दिलेली होती. मगध देशाचा बलाढ्य राजा जरासंध हा कंसाचा सासरा. ह्या आपल्या श्वशुराच्या जोरावर कंस एवढा उन्मत्त होऊन आपल्या प्रजेला छळीत होता. तेव्हा त्याचा निःपात करण्यासाठी भगवान विष्णूंनी देवकीच्या आठव्या पुत्राच्या रूपाने अवतार घेण्याचे ठरविले. तेव्हा देवकीला होतील तेवढी तिची सारी मुले मारून टाकण्यासाठी म्हणून वसुदेव-देवकीला कंसाने आपल्या राजवाड्यात आणून कैदेत ठेवले. देवकीला मुलगा झाला रे झाला की कंस त्याला दगडावर आपटून ठार मारी. अशा रीतीने त्याने तिचे सहा पुत्र मारले. सातव्या वेळी भीतीने तिचा गर्भ गळूनच गेला. आठव्यांदा जेव्हा ती गर्भार राहिली तेव्हा तिच्याभोवती कंसाने कडेकोट बंदोबस्त ठेवला. पण देवकी आठव्या महिन्यातच अकल्पितपणे बाळंत होऊन श्रीकृष्णाचा जन्म झाला. त्यामुळे पहारेकऱ्यास त्या गोष्टीचा सुगावा लागला नाही. श्रीकृष्णाला घेऊन वसुदेव यमुनेच्या पाण्यातून चालत पैलतीरावरील

नंदाच्या गोकुळात गेला. तेथे नंदपत्नी यशोदा नुकतीच बाळंत होऊन तिला मुलगी झाली होती. तिच्या जागी श्रीकृष्णास ठेवून वसुदेव त्या मुलीला घेऊन परत कारागृहात आला. देवकीला आठव्या वेळी मुलगी झाली असे कंसाला भासविण्यात आले. तरीही त्याने तिला ठार मारावयाचा प्रयत्न केला. पण ती दिव्य देह धारण करून आणि कंसाला भयंकर शाप देऊन आकाशात वरचेवर निघून गेली. अशी श्रीकृष्णजन्माची अद्‌भुतरम्य कथा भारतामधील आबाल-वृद्धांच्या परिचयाची आहे.

श्रीरामाप्रमाणेच श्रीकृष्णास भारतीय जनता परमेश्वराचा पूर्ण अवतार मानते. कारण, श्रीकृष्णाच्या अंगी अलौकिक सौंदर्य, अद्वितीय बुद्धिमत्ता आणि असामान्य पराक्रम ह्यांचा समन्वय झाला असल्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाभोवती ईश्वरी तेजाचे दिव्य वलय निर्माण झाले होते. योगी लोक श्रीकृष्णास तर योगेश्वर असे मानतात. भारतातील भक्तिमार्गी लोक तर भगवत्कृपा प्राप्त करण्यासाठी श्रीकृष्णाचे सर्वत्र भजन करतात. चंद्रभागेच्या काठी पंढरपूर येथे विठ्ठलाचे रूप घेऊन अठ्ठावीस युगे श्रीकृष्ण वैकुंठाचा मार्ग दाखवीत उभा आहे. श्रीकृष्णाच्या गोकुळातील बाललीला, यमुनेच्या तीरावर गोपिकांशी त्यांनी केलेल्या रासक्रीडा आणि कुंजवनात मुरलीच्या नादाने मोहित झालेल्या राधेशी त्याने केलेला शृंगार हे भारतीय काव्याचे, नृत्याचे आणि संगीताचे अमर विषय होऊन बसलेले आहेत. आणि एवढे केल्यानंतर भारतवर्षीय जनतेला आपल्या ऐहिक उद्धाराचा मार्ग दाखविण्यासाठी श्रीकृष्णाने अठरा अध्यायांची भगवद्गीता सांगितली आणि भारतीय वेदान्ताचा नि तत्त्वज्ञानाचा पाया घातला. श्रीकृष्णाच्या चरित्राने आणि तत्त्वज्ञानाने गेली पाच हजार वर्षे भारतीय जीवनाला जी विलक्षण मोहिनी घातली आहे आणि त्यावर जे विविध संस्कार केले आहेत ते कालत्रयी नष्ट होणार नाहीत. भारतीय जनतेला श्रीकृष्णाविषयी जे परमावधीचे प्रेम आणि आदर वाटतो त्याचे कारण हे आहे. श्रीकृष्णाचे उदात्त आणि रमणीय चरित्र भारतात इतके लोकप्रिय होण्याचे कारण म्हणजे महर्षी व्यासांच्या अमरवाणीमधून ते भारतीयांना प्रथम ऐकावयाला मिळाले.

भारतीय संस्कृती ही रामायण आणि महाभारत ह्या दोन महाकाव्यांच्या पायावर उभी राहिली आहे. रामायणाला आद्यकवी वाल्मीकिच्या प्रतिभेचे कोंदण मिळाले, तर सर्व जगाला उच्छिष्ट करणारा व्यासासारख्या आद्य इति-हासकार महाभारताला लाभला. ह्या महाभारताच्या सुवर्ण सिंहासनावर श्रीकृष्ण-

चरित्र आरूढ झालेले असल्याने त्याला एवढी देदीप्यमान शोभा प्राप्त झाली आहे. भारताचार्य चिंतामणराव वैद्य ह्यांनी आपल्या ग्रंथात श्रीकृष्णचरित्राचे जे मर्म सांगितले आहे, ते मनन करण्यासारखे आहे. भारतीय युद्धाचा म्हणजे श्रीकृष्णाचा काळ म्हणजे भरतखंडाच्या अत्यंत ऊर्जितावस्थेचा काळ होता. ह्या देशात राहणाऱ्या आर्यांची स्थिती अगदी उत्कर्षाच्या कळसाला जाऊन पोहोचली होती असे म्हटले तरी चालेल. नीती, शौर्य, विद्या या सर्व गुणांचा परमोच्च विकास झाला होता.

तथापि, कोणताही देश किंवा समाज उत्कर्षाच्या परमोच्च बिंदूवर फार काळ स्थिर राहू शकत नाही. किंबहुना तो त्या बिंदूला पोहोचला, की त्या क्षणापासून त्याच्या अवनतीला प्रारंभ झाला असे समजायला हरकत नाही. ज्याला सृष्टीचा 'चक्रनेमिक्रम' म्हणतात त्याच न्यायाने हे घडते. समाजाचे आधिभौतिक आणि अध्यात्मिक सद्‌गुण जोपर्यंत समतोल राहतात तोपर्यंत समाज प्रगतीच्या शिखरावर राहतो. पण त्या समतोलपणामधे बिघाड झाला म्हणजे समाजाचा अधःपात होऊ लागतो. सत्ताधाऱ्यांची भोगेच्छा वाढू लागते. त्यामुळे महत्त्वाकांक्षा आणि जुलूम ह्यांचे प्राबल्य सुरू होते आणि शेवटी वैरभाव उत्पन्न होऊन समाजाचा किंवा राष्ट्राचा नाश होतो.

त्या काळात कंस, जरासंध आणि दुर्योधन अशा तीन लोभी अणि महत्त्वाकांक्षी व्यक्ती उत्पन्न झाल्या. कंसाने बापाला तुरुंगात घालून त्याचे राज्य बळकावले. जरासंधाने शेकडो क्षत्रियांना कारागृहात टाकले. दुर्योधनाने पांडवांची संपत्ती नि राज्य कपटाने हरण करून ती बळकावली. त्याचा परिणाम भारतीय युद्धात होऊन भयंकर रणसंग्राम झाला आणि अपरंपार प्राणहानी झाली. अठरा अक्षौहिणी सैन्यातून दहाच माणसे शिल्लक राहिली. म्हणूनच भारती युद्धापासून कलियुग सुरू झाले असे मानण्यात येते. मानव धर्मावर अशा रीतीने जे भयानक संकट त्या वेळी ओढवले, त्या संकटातून भारताचा उद्धार करण्यासाठी आणि धर्मसंस्थापना करण्यासाठी श्रीकृष्णाचा अवतार झाला. श्रीकृष्णाला दोन तऱ्हेचे कार्य करावयाचे होते. एक, भोगपरायण झालेल्या समाजाला त्याला निवृत्तीचा धडा शिकवावयाचा होता. तर दुसरे, समाजात त्या वेळी वैराग्याचे जे अवास्तव स्तोम माजले होते त्याला आळा घालण्याचे काम त्याला करावयाचे होते. तेवढ्यासाठी त्यांनी भगवद्गीतेचा दिव्य उपदेश करून प्रवृत्ती आणि निवृत्ती ह्यांचा सुवर्णमध्य साधला आणि नवीन भक्तिमार्गाचे प्रतिपादन केले. प्राचीन आर्यावर्तात

यज्ञयागांचे बंड फार माजले होते. यज्ञात पशू मारून त्यांचे मांस आणि सोम— प्राचीन आर्य इंद्रवरुणादी देवतांस अर्पण करीत आणि त्यांच्यापासून सुंदर स्त्रिया, वीर पुत्र आणि तेजस्वी घोडे यांची याचना करीत. स्वतः ते सोमरस पीत आणि मांस भक्षण करीत. त्यांचे अंतिम साध्य स्वर्ग असून त्या ठिकाणी सर्व प्रकारचे सौख्य आणि ऐश्वर्य आपल्याला प्राप्त होईल अशी त्यांची कल्पना होती. सारांश, मोठमोठी यज्ञकर्मे करून स्वर्गसुख प्राप्त करून घ्यावे यातच ब्राह्मण-क्षत्रियांना त्या वेळी इतिकर्तव्यता वाटत होती. ह्या मार्गाचा अतिरेक झाल्या-नंतर मोक्षाकडे त्यांचे लक्ष वळले. स्वर्गापेक्षा मोक्ष हाच परमपुरुषार्थ आहे असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे यज्ञाची जागा तपाने घेतली. निरिच्छ वृत्तीने अरण्यात जाऊन तप करण्यात किंवा ब्रह्माचे चिंतन करण्यातच मनुष्यजन्माचे साफल्य आहे असे विचारवंतांना वाटू लागले. त्यामुळे जो उठला तो वनात जाऊन तप करू लागला, किंवा खुशाल संन्यास घेऊन ब्रह्मज्ञानाचा मार्ग चोखाळू लागला.

अशा वेळी समाजास ताळ्यावर आणण्यासाठी श्रीकृष्णांनी भगद्गीता प्रतिपादिली. त्यात त्यांनी सांगितले की, " संसार सोडून अरण्यात जाऊन राहणे म्हणजे काही संन्यास नव्हे. तसे केल्याने काही संसार सुटत नाही. शारीरिक कर्माचा आत्यंतिक त्याग करणे ही गोष्ट अशक्य आहे. कर्म काही तसे सुटत नाही. बरे, संसारात डोक्यापर्यंत बुडून राहिल्यानेही काही मनुष्यास खरे सुख मिळत नाही. सारांश, इंद्रियांचे संपूर्णपणे दमन करणे हे जसे हानिकारक आहे त्याप्रमाणे इंद्रियांना मनसोक्त मोकळीक देणेही घातकारक आहे. तेव्हा हे दोन्हीही एकांतिक मार्ग सोडून द्यावयाचे. कर्म करताना त्यातील फलाचा त्याग करणे हाच खरा संन्यास. कर्म सोडणे हा नव्हे. कर्म सिद्धीस जाईल किंवा नाही ह्याचा विचार मनात न आणता परमेश्वरावर भरंवसा ठेवून त्यालाच अर्पण करण्याच्या बुद्धीने ते करीत राहणे आणि ते करीत असताना धर्म आणि नीती याला अनु-सरून भौतिक सुखाचा युक्त आहारविहार मार्गाने जो उपभोग घेत राहील तोच परमगतीला जाईल. "

त्याचप्रमाणे संन्यास, योग किंवा यज्ञ हे परमेश्वरप्राप्तीचे मार्ग त्या वेळेपर्यंत ब्राह्मण आणि क्षत्रिय या उच्चवर्णीयांनाच मोकळे होते. सर्वसामान्य अज्ञ आणि दलितवर्गाला मोक्षाचा रस्ता बंद करून टाकण्यात आला होता. श्रीकृष्णाचा सारा जन्म बहुजनसमाजात गेलेला असल्याने, ' मला जे अनन्यभावाने शरण

येतील, त्यांना मोक्ष मिळेल.' हा अत्यंत साधा आणि सरळ भक्तिमार्ग त्यांनी जनसामान्यांना सांगून ठेवला. तेव्हापासून या भरतखंडात परमेश्वरप्राप्तीचे बाकीचे सारे मार्ग हळूहळू मागे पडून श्रीकृष्णाने सांगितलेला हा भक्तिमार्गच सर्वांत लोकप्रिय होऊन बसला आहे. श्रीकृष्णाच्या अलौकिक लोकप्रियतेचे दुसरे एक कारण म्हणजे श्रीकृष्ण जरी आपण परमेश्वराचा अवतार मानीत असलो तरी अवतारी पुरुषामागे अचाट आणि अद्‌भुत पराक्रम करण्याच्या भानगडीत तो कधी पडला नाही. त्याचे सर्व चरित्र मानवी कोटीतले आहे. यामुळे कोणत्याही इतर देवदेवतांपेक्षा भारतामधील सर्वसामान्य माणसाला श्रीकृष्णाबद्दल जास्त जिव्हाळा आणि आपलेपणा वाटतो. म्हणूनच, श्रीकृष्णजन्माचा सण हा प्रत्येक भारतीयाला पुत्रजन्माच्या सोहळ्याइतकाच आनंदकारक आणि मंगलदायक वाटतो, आणि तो त्या दिवशी सद्‌गुरू गाडगेबाबांप्रमाणे 'गोपाला, गोपाला, देवकिनंदन गोपाला' असे भजन करीत हर्षभराने घरोघर नाचत सुटतो.

मराठा : ९-२-१९६१

## ११

# श्रीतुळजाभवानी

कोणी खरे माना किंवा खोटे माना, अथवा आम्हांला मूर्खात काढा. महाराष्ट्राची मायमाउली श्रीतुळजाभवानी काही दिवसांपूर्वी आम्हांला मुंबई शहरात प्रत्यक्ष भेटली. तिने आम्हांला सांगितले की, " कन्नमवारांच्या छातीवर मी नाचेन, सावंत मोहिते ह्यांचा तर मी निःपात करीन, आणि सर्व संकटांतून मी तुझी सुटका करीन!" आम्ही आधुनिक विचारांचे सुशिक्षित अन् बुद्धिवादी 'विद्वान'! 'आई'ने आम्हांला सांगितले, त्यावर आम्ही कसा विश्वास ठेवणार? आम्ही मनातल्या मनात हसलो नि गप्प बसलो. पण 'आई'चे म्हणणे अखेर खरे ठरले. शब्दन् शब्द खरा झाला. कन्नमवार गेले. सावंत–मोहित्यांचे वाटोळे झाले नि आम्ही सहीसलामत सुटलो. तेव्हा 'आई' आम्हांला भेटावयाला आपल्या सोनपावलांनी चालत चालत आमच्या घरी आली अन् म्हणाली की, " आता तुळजापूरला मला भेटायला कधी येतोस रे माझ्या पुता?" मनात विचार केला की, बाकीच्या सर्व कार्यक्रमांना वाटेल त्या सबबी सांगून काट देता येईल, पण तुळजापूरचे हे 'आई'चे बोलावणे कसे नाकारता येईल? मुंबईमध्ये आमच्या धंद्याच्या अनेक अडचणी होत्या. त्यामुळे बाहेरगावी एका दिवसासाठी सुद्धा जाणे सर्वस्वी अशक्य होते. पण त्या सर्व अडचणी 'आई'च्या कृपेनं आपोआप दूर झाल्या नि दि. २४ डिसेंबर १९६३ रोजी सकाळी श्रीतुळजाभवानीच्या दर्शनाला आम्ही स्वतः सहकुटुंब नि सहभगिनी सादर झालो. त्या दर्शनाच्या कार्यक्रमाचा इत्थंभूत तपशील

आम्ही ह्या ठिकाणी सांगत नाही. त्याचे विशेष महत्त्व नाही. पण क्षेत्र तुळजापूर येथे महाराष्ट्राच्या आदिमायेचे जे जागृत पीठ वसलेले आहे, त्याची माहिती आम मराठी जनतेला करून देणे, हे आम्ही आमचे पवित्र्य कर्तव्य समजतो.

भारतात शक्तीची उपासना प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. परमेश्वराची क्रियाशक्ती आदिमायेच्या रूपाने विश्वाची उत्पत्ती, स्थिती अन् लय करते. ह्या गृहीत तत्त्वावर ही उपासना आधारलेली असल्यामुळे भारताच्या कोठल्याही भागात शक्तीची उपासना ह्या ना त्या स्वरूपात पाहावयास आपणाला मिळते. महाराष्ट्रात ह्या शक्तीची साडेतीन पीठे आहेत. त्यामधे सर्वांत श्रीतुळजामातेचे पीठ हे अत्यंत चैतन्यदायी नि स्फूर्तिदायक आहे. मराठवाड्यामधील उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर हे गाव सोलापूरपासून अठ्ठावीस मैलांवर बालेघाटाच्या कडेपठारावर वसलेले आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची अडीच हजार फूट आहे. श्रीतुळजाभवानी ही महाराष्ट्राची तर माता आहेच, पण तिचे भक्त अखिल भारतामधे पसरलेले आहेत. कन्याकुमारीपासून तो गौरीशंकरापर्यंत अनेकांनी तिला कुळदेवता मानलेली आहे. भोसल्यांच्या घराण्यामधे ह्या शक्तीची उपासना दहाव्या शतकापासून चालू आहे. श्रीतुळजाभवानी म्हणजे महाराष्ट्राचे क्षात्रतेज. वीरांची नि क्षत्रियांची ही देवता आहे. श्रीतुळजामातेच्या मंदिरात गेल्या तीन शतकांतील अनेक ऐतिहासिक पुरुषांची जतन करून ठेवलेली पत्रप्रभावळ वाचून पाहिली, म्हणजे श्रीतुळजामातेच्या महानतेचा साक्षात्कार पटतो अन् अंतःकरणात भावना दाटून येतात. "राज्याभिषेक शके २७ वीक्रमनाम संवत्सर अश्वीन सुध सप्तमी भोम वासरे क्षत्रीये कुलावतंस श्री राजा शीव छत्रपती याणी" लिहिलेलं हे पत्रच वाचा. त्याची मूळप्रत आम्ही आमच्या डोळ्यांनी तुळजापुरी वाचलेली आहे. ते पत्र येणे प्रमाणे : "श्री. स्थळ तुळजापूर हे मुख्यपीठ बहुत जागृत देव व स्वामीचे कुलदैवत येथील पुजा उछाह ताम्राचे धामधुमे करीत चालत नाही म्हणोन श्रीचे पुजकानी येऊन वीदीत केले त्यावरून मनास आणीता 'हे राज्य श्रीच्या वरदेचे आहे' तेथील पुजा उछाह सांग चालला पाहिजे. इ. इ." ह्याखेरीज श्रीशहाजी महाराज, सेनापती धनाजी जाधव, हंबीरराव मोहिते, पेशवे बाळाजी बाजीराव, थोरले माधवराव, महादजी शिंदे ह्यांचीही पत्रे त्या मंदिराच्या बासनात आढळून येतात.

तुळजापूर गावच्या पश्चिमेला एका कड्याच्या पोटात हे मंदिर आहे. महाद्वारापासून मुख्य मंदिरापर्यंत जाण्यास तीन टप्पे लागतात नि पुष्कळशा दगडी पायऱ्या उतरून आत जावे लागते. मूळ मंदिराचे शिल्प हेमाडपंती असले, तरी आधुनिक काळात त्याच्यावर वेळीवेळी सुधारणांचे जे संस्कार झालेले असतील, त्यांनी त्याचे जुने स्वरूप नष्ट करून टाकलेले आहे. श्रीशहाजी राजे नि श्रीशिवछत्रती ह्यांच्यापासून तो गेल्या तीनशे वर्षांतले नाना तऱ्हेचे संस्थानिक, सरदार नि राजेमहाराजे ह्यांनी श्रीभवानीमातेला जे वेगवेगळे अलंकार अर्पण केलेले आहेत, ते अत्यंत प्रेक्षणीय आहेत. श्रीशिवाजी महाराजांनी दिलेल्या पुतळ्याच्या माळेवरील प्रत्येक पुतळीवर दोन ओळीत ' राजे सीवछत्रपति ' ही अक्षरे कोरलेली आहेत. आणि या शिवाय हिरे, माणिक, पाचू अशा रत्नांचा मुकुट आणि माळेची मूल्यवान रत्नखचित पदके ही भाविकांच्या जिवंत श्रद्धेची साक्ष असून, श्रीतुळजाभवानीला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेमध्ये केवढे मोठे स्थान आहे, त्या गोष्टीचा त्यावरून प्रत्यय येतो.

आश्विन महिन्याचे विजयादशमीचे नवरात्र आणि पौष महिन्यातील शाकंबरीचे नवरात्र हे नियमित उत्सव असून, या वेळी श्रीची श्रमनिद्रा होत असते. श्रीची रोज चार वेळा पूजा होते. सकाळी चरणतीर्थ पूजा, दुपारी नि सायंकाळी महापूजा, रात्रीची प्रक्षाळपूजा, ह्या वेळी पंचामृतस्नान नि अभिषेक होत असतो. श्रीजगदंबेची संपूर्ण मूर्ती आणि तिचे शिल्प ही ह्या वेळी दाखविण्यात येते. तुळजापुरची ही श्रीतुकाई (तूं-का-आई ?) ही खरीखुरी मराठमोळ्याची माता आहे. तिचे भक्त राजे-महाराजे नि सरदार जहागिरदार असले, तरी तिच्या दरबारात ह्या बड्या बड्या लोकांचा फाजील बडेजाव मुळीच नाही. अनेक श्रीमंतांच्या देणग्या नि नैवेद्य तेथे होत असतात. परंतु, श्री तुळजामातेला पूजेनंतरचा पहिला नैवेद्य हा निखालस बालेघाटी पद्धतीचा म्हणजे भाजीभाकरीचा असतो. आंबाड्याची भाजी आणि जोंधळ्याची भाकरी या नैवेद्याची न्याहरी केल्यावाचून ' आई 'च्या दरबारात पक्वान्नांची ताटे मुळी येऊच शकत नाहीत. केवढे मोठे वैशिष्ट्य आहे हे ! महाराष्ट्रातल्या गोरगरिब लेकरांची ती खरीखुरी आईच आहे. म्हणूनच प्रत्येक वेळी ' आईराजा ' ह्या नावाने उदेकाराची साद घालण्यास प्रत्येक मराठी मनाला हर्ष नि अभिमान वाटतो. श्रीतुळजामातेचा हा विशेष असामान्य आहे.

कृतयुगातली जी ' श्रीमहिषासुरमर्दिनी ', त्रेतायुगातली जी ' श्रीयोग-

वरदायिनी', द्वापारयुगातली जी 'श्रीदुर्गाभवानी' तीच कलियुगामधे श्रीशिवछत्रपतीला 'भवानी तलवार' देऊन त्याच्या पाठीशी सदैव उभी असलेली ही आमची 'श्रीतुळजाभवानी!' महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्राच्या परंपरा नि महाराष्ट्राची संस्कृती ह्यांचे हे अमर श्रद्धास्थान आहे. भारतामधल्या तमाम वीरांची ही देवता आहे. महाराष्ट्रातील मराठ्यांप्रमाणे नेपाळचा गुरखासुद्धा ह्या वीरमातेचा निस्सीम भक्त आहे. म्हणूनच नेपाळसारख्या अती दूरच्या प्रांतामधेसुद्धा 'श्रीतुलाजाई का मंदिर' आढळते. सारांश, क्षेत्र तुळजापुरच्या श्रीभवानीमातेपुढे दक्षिणोत्तर अशा संपूर्ण भारतामधून भक्तीचे पोत प्रतिदिनी अन प्रतिक्षणी पाजळले जातात, आणि त्यामुळेच ही जशी महाराष्ट्राची कुलस्वामिनी माता म्हणून मानली जाते, तशी ती भारताची भाग्यभवानी आहे, असे समजण्यात येते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक श्रीमंतीची ही महालक्ष्मी महाराष्ट्राबरोबरच अखिल भारताच्या सर्वांगीण समाजवादी समृद्धीसाठी भारताच्या विद्यमान 'निधर्मी' राज्यकर्त्यांना योग्य ती प्रेरणा देवो, हीच तिच्या चरणी आमची प्रार्थना!

बोला आईराजा, उदो, उदो, उदो, उदो!

मराठा : २९-१२-१९६३

# दूसरा विभाग

१

# तीनशे वर्षांपूर्वीचा शिवदिग्विजय

१० नोव्हेंबर १९५९ रोजी पुण्यामध्ये शनिवारवाड्यासमोर ' शिवदिग्विजय दिन ' साजरा झाला. कारण तीनशे वर्षांपूर्वी म्हणजे १० नोव्हेंबर १६५९ रोजी दुपारी दोन वाजता प्रतापगडाच्या डोंगराळ परिसरात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्रीशिवछत्रपती ह्यांनी स्वराज्याचा दुष्मन जो अफजुलखान ह्याचा मोठ्या शौर्याने आणि शर्थीने वध केला. शिवछत्रपतींच्या आयुष्यातील प्रत्येक घटना म्हणजे यशस्वी पराक्रमाचा उच्चांक होता. त्यांच्यासारखा लोकोत्तर पुरुष आजपर्यंत जगात झाला नाही आणि पुन्हा होणार नाही. अशा अद्वितीय महा-पुरुषाचा महान वारसा महाराष्ट्राच्या सौभाग्याने त्याला लाभल्यामुळे त्याचे मर्द आणि मानी मस्तक ह्या भारतवर्षात कल्पांतापर्यंत उन्नत राहील ह्यात काय संशय ? गेली तीनशे वर्षे ह्या महाराष्ट्राला प्रत्येक निःश्वासाबरोबर आणि उच्छ्-वासाबरोबर जर कोणाचे स्मरण होत असेल तर ते शिवछत्रपतींचे. महाराष्ट्राने दुसऱ्या कोणाचे स्मरण करावयाचे ? ' शिवरायाचे आठवावे रूप आणि शिव-रायाचा आठवावा प्रताप ' असा समर्थांनीसुद्धा निर्वाळ दिला आहे. पण शिव-रायांच्या सर्व ' प्रतापा 'मध्ये अफजुलखानाचा वध हा अद्वितीय प्रताप आहे. असा प्रताप ह्या भूमंडळावर कोणी केल्याची इतिहासात नोंद नाही. म्हणून अफजुलखानवधाचा लोकोत्तर ' शिवदिग्विजय ' शिवरायांच्या पुण्याने मोठ्या दिमाखाने साजरा करावा हे यथायोग्यच होते. वस्तुतः ह्या दिग्विजयाचा उत्सव सर्व महाराष्ट्रात साजरा व्हावयाला पाहिजे होता. पण सध्या महाराष्ट्रात पक्षीय

राजकारणाचा इतका अतिरेक झालेला आहे की, त्या गलबल्यात त्याला स्वतःच्या ऊर्जस्वल इतिहासाचेसुद्धा विस्मरण झाल्यासारखे झाले आहे.

पुण्याला हा जो शिवदिग्विजय दिन साजरा झाला त्याचे अध्यक्ष केशवराव जेधे होते, आणि प्रमुख वक्ता मी होतो. हादेखील एक मोठा अपूर्व योगायोग म्हटला पाहिजे. कारण जेधे घराण्याचे पूर्वज कान्होजी नाईक जेधे आणि अत्रे घराण्याचे पूर्वज रघुनाथ बल्लाळ अत्रे हे दोघेही अफझुलखानवधाच्या वेळी श्रीशिवछत्रपतींच्या सल्लासमलतीत होते. स्वराज्यसंस्थापनेच्या कार्यात श्रीशिव-छत्रपतींची सेवा करण्याचे भाग्य ज्या कित्येक थोर घराण्यांना लाभले होते, त्यात आम्हा उभयतांचे पूर्वज समाविष्ट होते ही जाणीव आम्हांला तरी विलक्षण स्फूर्तिदायक वाटत होती, ह्यात काय संशय? छत्रपतींनी अफजुलखानाचा वध कसा आणि कोणत्या परिस्थितीत केला ह्याची माहिती आजच्या काळात फारच थोड्यांना असेल. किंबहुना पुष्कळांनी ह्या महान पराक्रमाला विपरीत स्वरूप देऊन छत्रपतींची यथेच्छ निंदा करण्याची पर्वणी साधून घेतली आहे. एवढेच नव्हे, तर अफजुलखानाला भेटावयाला बोलावून शिवाजीमहाराजांनी त्याला विश्वासघाताने ठार मारले, हा शिवचरित्राला लागलेला एक काळाकुट्ट डाग आहे, असा कित्येक प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासकारांनी छत्रपतींना ठपका दिलेला आहे. शिवरायांच्याबद्दल त्यांची मने द्वेषाने सडली आहेत किंवा त्यांच्या इतिहासाबद्दल ज्यांच्या डोक्यात संपूर्ण अज्ञान भरले आहे, अशा मत्सरी आणि अडाणी लोकांनी अफजुलखानाच्या वधाला विकृत स्वरूप देऊन शिवरायाची निर्भर्त्सना केलेली आहे. म्हणून दहा नोव्हेंबर रोजी पाळण्यात आलेला हा शिवदिग्विजय दिन म्हणजे अफजुलखानाच्या वधाचा खराखुरा इतिहास लोकांच्यापुढे माडण्याची एक अमूल्य 'सुवर्णसंधी' होती ह्यात काय संशय?

पुण्याचे एक सुप्रसिद्ध इतिहासकार व संशोधक श्री. ब. मो. पुरंदरे ह्यांनी राजा शिवछत्रपति' ह्या नावाचे जे एक दहा खंडांचे अत्युत्कृष्ट शिवचरित्र लिहून नुकतेच प्रसिद्ध केले आहे, त्याच्या तिसऱ्या खंडात अफजुलखानाच्या वधाचे प्रकरण सर्व उपलब्ध ऐतिहासिक पुराव्यानिशी सांगोपांग वर्णन केले आहे. आमच्या मते मराठी भाषेत एवढे अधिकृत आणि विश्वसनीय वर्णन आजपर्यंत कोणाही इतिहासकारांनी दिलेले नाही. मराठी स्वराज्याचा अंमल शिवछत्रपती महाराष्ट्रात जेव्हा झपाट्याने प्रस्थापित करू लागले, तेव्हा विजापूरच्या आदिल-

शाही सत्तेने ' बंडखोर शिवाजी 'चा नायनाट करण्यासाठी प्रचंड सैन्य आणि युद्धसाहित्य देऊन अफजुलखानाची रवानगी केली. हरउपायाने शिवाजीला दगा करून ठार मारावयाचा हुकूम त्याला देण्यात आला.

अफजुलखानाचे वर्णन पुरंदरे ह्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे. " तो एक भयंकर माणूस होता. त्याची ताकद महिषासुरासारखी होती. शरीराने आडवा, धिप्पाड अन् उंचही भाल्यासारखा पुरा. उभा राहिला की चिरेबंदी बुरुजासारखा भासे. लोक त्याला भीत. सज्जनांनाही त्याची भीती वाटे. कारण, होता, त्याचा देह जसा राक्षसी, तसाच त्याचा स्वभावही राक्षसी होता. तो अत्यंत शूर तितकाच क्रूरही होता. कपटीपणा आणि दगाबाजी ही त्याची नीती होती. तो स्वतःला ' मूर्ती आणि मूर्तिपूजकांचा विध्वंसक ' म्हणवून घेत असे." शिवछत्रपतींच्या घराण्याचा तो मोठा द्वेष्टा होता. त्यांचे सख्खे थोरले भाऊ संभाजी राजे ह्यांना कर्नाटकातील कनकगिरीच्या वेढ्यात अफजुलखानाने कपटाने ठार मारविले होते. शिवरायांचे वडील शहाजीराजे ह्यांना एकदा हातापायांत बेड्या घालून विजापूरच्या रस्त्यातून अफजुलखानानेच अपमानास्पद रीतीने फिरविले होते. त्यामुळे शिवाजीराजांना ठार मारण्याची ही कामगिरी अफजुलखानाने मोठ्या उत्साहाने पत्करली.

खान विजापुराहून जो निघाला तो तुळजापुरावर आला. तेथे मराठ्यांची जी कुलस्वामिनी तुळजाभवानी तिच्या मूर्तीवर घणाचे घाव घालून तिचा त्याने चुराडा केला. पंढरपुरासही देवस्थानाची त्याने अशीच नासधूस केली. असे ठिकठिकाणी अवन्वित अत्याचार करीत खान शेवटी वाईस आला आणि तेथे तळ देऊन बसला. महाराष्ट्रावर आणि शिवरायांनी स्थापन केलेल्या स्वराज्यावर आलेले अफजुलखान हे एक महान संकट होते. उघड्या मैदानात त्याच्याशी युद्ध खेळणे अशक्यच होते. कारण शिवरायांजवळ एवढे सैन्य आणि युद्धसाहित्य कोठून असणार ? खानाशी वाटाघाटी करून तह करावा असा जवळच्या सर्व मंडळींनी त्यांना सल्ला दिला, पण खानाशी तह करावयाचा म्हणजे जिंकलेला सर्व मुलूख हातचा घालवून बसायचे. खान आपल्याला ठार करण्यासाठी आलेला आहे हे शिवराय ओळखून होते. म्हणून वाटेल त्या उपायांनी त्याचा नाशच केल्यावाचून गत्यंतर नाही असा त्यांनी निष्कर्ष काढला.

ह्या वेळीं जावळीच्या अवघड मुलखात घुसण्याचे मनसुबे खान रचीत होता. ती बातमी समजताच शिवाजीराजांनी प्रतापगडावर आपला मुक्काम

हालविला. खानाने आपला हेजीब कृष्णाजी भास्कर ह्याला प्रतापगडावर पाठवून शिवाजीराजांनी जिंकलेले सर्व किल्ले नि मुलूख आपल्याला परत देऊन टाकावा आणि वाईला येऊन आपल्याला भेटावे असा निरोप पाठविला. शिवाजीराजांनी पंताजी गोपीनाथ नावाच्या एका वृद्ध पण अत्यंत हुषार आणि हिकमती मुत्सद्द्याला वकील म्हणून खानाकडे पाठविले. आपण सर्व मुलूख परत द्यावयाला तयार आहोत, पण आपणाला वाईला यावयाला भीती वाटते त्यापेक्षा खानानेच आपणाला येऊन जावळीला भेटावे, असा आपल्या वकिलामार्फत शिवाजीराजांनी खानाला निरोप पाठविला. पंताजी गोपीनाथांनी ही सर्व शिष्टाई इतक्या कावेबाज-पणाने केली की, शिवाजी खरोखरच अत्यंत घाबरलेला आहे अशी खानाची समजूत झाली आणि तो प्रतापगडाखाली शिवाजीराजांना भेटावयास तयार झाला. उंच उंच पर्वतांनी आणि जंगलांनी वेढलेल्या जावळीच्या अवघड प्रदेशात आपल्या प्रचंड सैन्यसामग्रीसह अफझुलखान येऊन दाखल झाला. अशा रीतीने पंताजी गोपीनाथांनी घमेंडखोर अफझुलखानाला सपशेल बनवून एका विलक्षण पेचात आणून ठेवले. पण खानाला त्याची कल्पनाही नव्हती. शिवाजी आपल्या हातात आता नक्की सापडणार ह्याच खुषीमधे तो मशगूल होऊन गेला होता.

उभयतांच्या भेटीचे स्थळही असेच अवघड निवडण्यात आले होते. प्रताप-गडचा निम्मा डोंगर चढून गेल्यानंतर एका पठारावर खास शामियाना उभारला होता. खानाच्या छावणीतून ही जागा दिसत नव्हती. अशी अडचणीची ही जागा निवडण्याचा हेतू हा की, खानाने कदाचित दगाबाजी केली तरी त्याचे सैन्य तेथे सहजासहजी येऊन पोहोचू नये. १० नोव्हेंबर १६५९ चा दिवस. पंताजी गोपीनाथ हे बारा वाजण्याच्या सुमारास खानाला पालखीतून घेऊन शामियान्यात आले. त्यांच्याबरोबर त्याचे दहा सशस्त्र जवान होते. शामियान्याची सुंदर सजावट पाहून खान थक्क झाला. शिवाजीराजे थोड्या वेळाने मागाहून आले. त्यांच्याबरोबरही त्यांचे दहा जवान होतेच. मात्र शामियान्यात उभयतांची जेव्हा भेट झाली तेव्हा त्यांच्या दोन वकिलांखेरीज तेथे कोणीही हजर नव्हते. पुढील वर्णन पुरंदरे ह्यांच्या शब्दांतच सांगितलेले बरे. 'खानाने महाराजांना आलिंगन देण्याकरिता दोन्ही हात पसरले. मृत्यूचा जबडाच तो. त्या जबड्यात तो स्वराज्याचा नि देवाधर्माचा जणू एकदम घासच घेत होता. खानाने एकदम महाराजांना मिठी मारली. धिप्पाड खानापुढे महाराज अगदीच खुजे होते.

त्यांचे डोके खानाच्या छातीला लागले, आणि खानाने एकदम महाराजांची मान आपल्या डाव्या काखेत पकडली. एकच क्षण. पापणीही लवली नाही. खानाने एकदम कट्यार काढली आणि दातओठ खाऊन खसकन् महाराजांच्या कुशीत खुपसली. टर्रकन् अंगरखा फाटला. कट्यार खरखरली. आत चिलखत होते. तेवढ्यात महाराजांनी अत्यंत चपळाईने बिचव्याचे तीक्ष्ण पाते खसकन् खानाच्या पोटात खुपसले. एकदम खानाने प्राणांतिक आरोळी मारली. भळकन् त्याची आतडी बाहेर पडली. रक्ताचा धबधबा सुरू झाला. कसे घडले हे कोणाला समजलेच नाही !

एवढ्यात कृष्णाजी भास्कर वकील महाराजांवर चालून आला. त्याचा महाराजांनी एका घावात फडशा उडवला. खानाचा शरीररक्षक सय्यद बंडा आत धावला, पण जिवा महालीने त्याचा निकाल लावला. रक्तबंबाळ खानाला पालखीत घालून त्याचे भोई पळवू लागले, पण संभाजी कावजींनी भोयांचे पाय छाटले आणि खानाचे मुंडके कापून ते महाराजांना आणून दिले. एवढ्यात गडावरून खुणेची तोफ झाली. त्याबरोबर शिवाजीराजांचे जंगलात दडलेले सैन्य एकदम झेप टाकीत खानाच्या सैन्यावर तुटून पडले आणि गनिमाचा त्याने फन्ना उडवला.'

अशा रीतीने शिवछत्रपतींनी आणि त्यांच्या सैनिकांनी त्या दिवशी पराक्रमाची शर्थ करून अलौकिक दिग्विजयाच्या दुंदुभी साऱ्या भूमंडळात वाजविल्या, त्याचे वर्णन करताना शाहीर अज्ञानदास म्हणतो, 'धन्य जिजाऊचे कुशी। राजा अवतार जन्मला। जिकडे जाती, तिकडे यश राजाच्या खड्गाला। यश जगदंबेचे। तुळजा प्रसन्न शिवरायाला' शिवरायांचा हा दिग्विजय मोठमोठ्या कवींनी, कथाकारांनी आणि नाटककारांनी आपल्या रसवंतीने जगाच्या अंतापर्यंत आळवावा एवढ्या तोलामोलाचा आहे. स्वराज्यावर आणि महाराष्ट्रावर आलेले हे भयंकर संकट आपल्या अचाट बुद्धीने आणि अफाट शौर्याने शिवछत्रपतींनी अशा रीतीने निपटून टाकले नसते, तर भारतीय इतिहासाचा ओघ तीनशे वर्षांपूर्वीच अडून बसला असता ह्याचा कोणी विचार केला आहे काय ?

अफजुलखानाचा वध शिवरायांनी विश्वासघाताने केला अशी या अलौकिक दिग्विजयाची जे निंदा करतात त्यांच्यासारखे पातकी आणि राष्ट्रद्रोही तेच ! अजजुलखानाचा वध करून शिवरायांनी एक महान संदेश ह्या राष्ट्राला कायमचा देऊन ठेवलेला आहे. तोच पुण्याच्या सभेत आम्ही श्रोत्यांना समजावून

सांगितला. तो हा की अफजुलखानाप्रमाणे जेव्हा कोणतेही संकट ह्या देशाच्या स्वातंत्र्यावर येईल तेव्हा त्या संकटाचा ‘ कोथळा ’ आपल्या प्रखर ‘ वाघनखांनी ’ फोडणे ह्यातच त्या राष्ट्राच्या शिवशक्तीची खरी कृतार्थता आहे !

नवयुग : १५-११-१९५९

# २

## शिवरायांचा जयजयकार

आजचा दिवस मोठ्या पर्वणीचा. शुभदिवस आहे. महाराष्ट्राच्या युग-पुरुषाचा आज जन्मदिवस आहे. हा दिवस आज सव्वातीनशेपेक्षाही अधिक वर्षे महाराष्ट्रातील प्रत्येक मनुष्य मोठ्या मनोयज्ञाच्या समारंभाने साजरा करीत आहे. लोकमान्य टिळकांनी ह्या मनोयज्ञाला अभिमानाचे स्वरूप देऊन तोच समारंभ राष्ट्रीयत्वाच्या उच्च पातळीवर अधिष्ठित करून, महाराष्ट्राचाच केवळ नव्हे तर उभ्या भारताचा एक मानबिंदू म्हणून केला. महाराजांचे कर्तृत्वच तसे होते. हे कर्तृत्व महाराष्ट्राच्या रक्तातूनच उद्‌भवले नि त्या कर्तृत्वाने महाराष्ट्राला शौर्यप्रवण केले. त्यानेच त्याला स्वातंत्र्यप्रवण आणि नीतिप्रवणही केले. आजही स्फूर्तीचा तो झरा खंडित झालेला नाही. लांब कशाला ? पर्वाचे संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेले आंदोलन पाहा. त्यातही शौर्य दिसते. स्वातंत्र्य दिसते. महाराष्ट्राची नीतिमत्ता दिसते. परंतु ह्या सर्वांपेक्षा अत्यंत महत्त्वाची गोष्ट स्पष्ट रीतीने दिसून येते, ती म्हणजे कार्याचा निश्चय. हा निश्चय महाराजांच्या प्रत्येक कार्यात दिसून येतो.

रोहिडेश्वरापुढे महाराजांनी आपल्या सवंगड्यासह घेतलेल्या हिंदवी स्वराज्याच्या शपथेमध्ये तोच निश्चय. शिरवळच्या हल्ल्यात तोच निश्चय. तोरणा त्याच निश्चयाने काबीज केला. अफजल प्रसंग काय किंवा शाहिस्तेखानावरील छापा काय, पुरंदरचा तह काय किंवा आग्र्याहून सुटका काय, ह्या सर्व प्रकरणांत महाराजांचा अढळ निश्चयच दिसून येतो. त्यांचा राज्याभिषेक म्हणजे कोण

आनंदाचा नि अभिमानाचा दिवस ! पण त्यालाही महाराष्ट्रात थोडाफार विरोध झाला. पण महाराजांनी जे एकदा त्याबाबत पाऊल टाकले, ते त्यांनी निश्चयाने शेवटास नेले.

महाराजांच्या अंगचे शौर्य, स्वातंत्र्याची दुर्दम्य इच्छा, मोहजाल भोवताली पसरले असताना त्यांचे दिसून येणारे अतुल नीतिमत्त्व नि आरंभिलेल्या कार्यात अवश्य लागणारी त्यांची धृती अन् निश्चिती ह्या गुणांमुळेच शिवाजीमहाराजांना भारताच्याच केवळ नव्हे तर अखिल जगाच्यासुद्धा राजमंडळात अद्वितीय स्थान मिळाले आहे.

जगातील गेल्या अडीच तीन हजार वर्षांच्या इतिहासात झालेल्या राजांपैकी कोणताही राजा घेतला अन् त्याची महाराजांशी तुलना केली तर तुलनेत महाराजच श्रेष्ठ ठरतात. इराणचा बादशहा दारियस, जगज्जेता अलेक्झांडर, कार्थेजचा बादशहा हॅनिबॉल, हूणांचा सम्राट ॲटीला, जगप्रसिद्ध ज्यूलियस सीझर किंवा पाश्चात्त्य देशांतील शार्लमेन, फ्रेडरिक आणि पीटर द ग्रेट ह्यांच्यासारखे सम्राट ह्यांपैकी कोणाचीही महाराजांशी तुलना केली तर ते कमीच पडतील यात काय शंका ? एवढेच नव्हे तर आपल्या इकडील पौर्वात्य राजे अन् सम्राटदेखील या तुलनेत उणे पडतील. सम्राट अशोक हा मोठा खरा, त्याने युद्धेही पुष्कळ केली अन् जयही पुष्कळ मिळविले, पण त्याच्या हातून बेसुमार हत्या झाली. एक लाख माणसे कलिंगाच्या युद्धात मृत्युमुखी पडली. दीड लाख माणसे कैद झाली. आपल्या हातून झालेले हे मानवजातीचे कंदन पाहून अशोक सम्राटाला उपरती झाली. शिवाजीमहाराजांच्या हातून अशी बेसुमार मानवहत्या कधीही झाली नाही, आणि त्यांनी सुद्धा काही कमी युद्धे केली नाहीत. आपल्या-इकडील पुलकेशी नि सम्राट हर्ष हे असेच मोठे राजे होऊन गेले. ह्यांचा प्रताप शिवाजीमहाराजांच्या सारखाच अन् कर्तृत्वही त्यांच्यासारखेच. पण त्या दोघांनाही अखेर हार खावी लागली.

मोगल बादशहांची महाराजांशी तुलना आम्ही मुद्दामच करीत नाही. बापाला तुरुंगात डांबणे नि भावांचे खून करून त्यांना आपल्या महत्त्वाकांक्षेच्या मार्गातून दूर करणे ह्यावरच आपल्या राजकारणात भर देणाऱ्या बादशहाशी महाराजांची तुलना व्हावी तरी कशी ? शौर्याने मिळविलेले राज्य समाधानाने आपल्या गुरूच्या झोळीत टाकणारी संस्कृती कुठे आणि आपल्या जबऱ्या महत्त्वाकांक्षेला अन सत्तालालसेला आपल्याच रक्ताच्या जातगोताला

बळी देणारी संस्कृती कुठे ?

महाराजांचे सर्व जीवनच अद्भुत चमत्कारांनी भरलेले आहे. पंधराव्या वर्षी रोहिडेश्वरासमोर हिंदवी स्वराज्याची शपथ, एकोणतिसाव्या वर्षी अफजल-खानासारख्या प्रचंड शत्रूशी गाठ नि त्यात मिळालेले यश, छत्तिसाव्या वर्षी एखाद्या मुरलेल्या मुत्सद्द्याप्रमाणे राजे जयसिंगाशी केलेला पुरंदरचा तह, आग्र्याच्या मोगल बादशहाच्या दरबारात दाखविलेली प्रतिष्ठा, समयसूचकता अन् सुटकेत दाखविलेले प्रसंगावधान, चव्वेचाळिसाव्या वर्षी सर्व मराठ्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडण्यासाठी केलेला राज्याभिषेक, एकूणपन्नासाव्या वर्षी केलेला दक्षिण दिग्विजय, नि पन्नासाव्या वर्षी निर्याण हे महाराजांच्या जीवनातील प्रसंग पाहिले म्हणजे त्यांचे अद्वितीय कर्तृत्व मनाला पटल्याखेरीज राहात नाही, आणि हे त्यांचे कर्तृत्व अगदी प्रतिकूल अशा परिस्थितीत दिसून येते. शिवाजीमहाराजांचे वडील शहाजीराजे ह्यांना स्वराज्य स्थापनेचे आपले जे स्वप्न साकार करता आले नाही, ते त्यांच्या मुलाने—शिवाजीमहाराजांनी केले. शहाजीमहाराजांच्या काळी मोठमोठी मातबर मराठी कुटुंबे महाराष्ट्रात होती. पण त्यांचे मुत्सद्दीपण आणि मर्दुमकी सुलतानाच्या सेवेत वेचली जात होती. वतनासाठी त्यांची आपापसात क्षुल्लक भांडणे चालू होती.

महाराष्ट्रातील कर्तबगार कुळांत आढळून येणारी ही बजबजपुरी शिवाजी-महाराजांनी नाहीशी केली. मराठ्यांच्या वृत्तीमध्ये त्यांनी एक प्रकारची क्रान्तीच घडवून आणली. व्यक्तीच्या स्वाभिमानाऐवजी त्यांनी लोकांचा स्वाभिमान नि वतनाच्या निष्ठेऐवजी त्यांनी देशाची निष्ठा निर्माण करून आणि ह्या दोहोंच्या भोवती धर्माचे वलय निर्माण केले. शिवाजीमहाराजांनी जे स्वराज्य स्थापिले ते अशा रीतीने मराठी लोकांचे होते म्हणूनच त्याला हिंदवी स्वराज्य असे म्हणत. ह्याचा अर्थच मुळी हा की, हे स्वतःचे राज्य हिंदू राष्ट्राचे राज्य कोणत्याही एका जमातीचे नव्हे किंवा कोणत्याही एका धर्माचे नव्हे. जरी हे हिंदवी स्वराज्य होते तरी ते धार्मिक राज्य नव्हते. सर्वांना सारखाच राज्यकारभार. सर्वांना सारखाच न्याय अन् सर्वांना सारखीच संधी असे. हिंदवी स्वराज्य स्थापनेचा हा प्रयत्न शिवाजीमहाराजांनी पस्तीस वर्षे अव्याहत केला. त्यात सर्व महाराष्ट्राने त्यांना निष्ठेने साह्य केले. त्यासाठी युद्धे केली. त्यासाठी गड बांधले. सैन्याची जमवाजमव केली, आरमार हळूहळू रचले. देवदेवतांचे रक्षण केले. हिंदू धर्म राखला. गोब्राह्मणांचे प्रतिपालन केले. नंतर ह्या सर्व प्रयत्नांना धार्मिक मंगल

स्वरूप द्यावे अन् त्याला इतर सत्ताधाऱ्यांची मानमान्यता मिळावी म्हणून महाराजांनी राज्याभिषेकाचा विचार मनात आणला. त्याला काशीच्या गागाभट्टांनी शास्त्रोक्त मान्यता दिली. ते म्हणाले, "राजे शिवाजी, तुम्ही आपल्या अंगच्या शौर्याने सुलतानांचा पराजय केला. आपला देश स्वतंत्र केला. तुम्ही सिंहासनस्थ होण्यास योग्य आहात. मुसलमानी सत्तेला आव्हान म्हणून नि तुमच्या शौर्याचे पवित्र भूषण म्हणून तुम्ही सिंहासनावर बसा. आम्ही तुम्हांस पवित्र जलाने अभिषेक करून तुमच्या हिंदवी स्वराज्याला मांगल्य अन् पावित्र्य आणून देऊ!" राज्याभिषेक झाला. समारंभ पाच दिवस चालला. अन्नदान झाले. अहेर झाले. मुकुट, छत्र, शिक्का, डक्का, ध्वज वगैरे राजचिन्हे महाराजांना अर्पण केली. अष्टप्रधानांच्या नेमणुकी झाल्या. हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. प्रतिपदेच्या चंद्राच्या कलेप्रमाणे विश्वाने वंदन केलेली नि सारखी वाढणारी ही शहाजीचा पुत्र शिवाजीमहाराजांची मुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी सारखी शोभायमान होत आहे. तीच शिवमुद्रा महाराष्ट्राचे सतत कल्याण करो. शिवजन्मतिथीच्या उत्सवाच्या निमित्ताने कवींद्र परमानंदाने आपल्या शिवभारतात महाराष्ट्राच्या विकासासंबंधी जी भावना प्रकट केली तीच आम्ही या मंगल दिनी प्रकट करतो की 'महाराष्ट्र समृद्धजनतान्वितः भवतु'"

मराठा : ६-५-१९६२

३

# झाशीची राणी

आज अठरा जून. भारताच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांशी लढता लढता शंभर वर्षांपूर्वी झाशीची राणी ह्याच दिवशी धारातीर्थी पडली. ह्या अलौकिक रण-रागिणीचे पुण्यस्मरण सारा भारतवर्ष आज अत्यंत प्रेमाने आणि भक्तिभावाने करील ह्यात काय शंका ? महाराष्ट्रामधले तर घर न् घर झाशीच्या राणीच्या गुणगानाने आज निनादल्यावाचून राहणार नाही. भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचे बलिदान करणे हा तर महाराष्ट्राचा कुलधर्म आहे. ह्या कुल-धर्माच्या असिधाराव्रताचे आजपर्यंत ज्या ज्या महाराष्ट्रीय नरनारी रत्नांनी पालन केले, त्यांच्या मालिकेत ' झाशीची राणी ' एखाद्या देदीप्यमान हिरकणीसारखी चमकत आहे.

अवघ्या तेवीस वर्षांच्या आपल्या आयुष्यात राणी लक्ष्मीबाई जो अभूतपूर्व पराक्रम करून गेली त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. एवढ्या लहान वयात राज्यक्रांतीचे शास्त्र आणि तंत्र तिने आत्मसात कसे केले असावे ह्याचा अचंबा वाटतो. आपल्या मुत्सद्देगिरीने तिने इंग्रजांच्या देखील डोळ्यांत धूळ टाकली आणि झाशीवर राज्य करण्याचे अधिकारपत्र इंग्रजांकडून बोल बोल म्हणता तिने मिळविले. अकरा महिने तिने झाशीचे राज्य पराकाष्ठेच्या कर्तबगारीने चालवून इंग्रजांशी लढण्याची संपूर्ण सिद्धता केली.

राणीला प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य ज्या वरसईकर गोडसेभटजींना लाभले होते, त्यांनी तिच्या दैनिक कार्यक्रमाचे जे वर्णन केले आहे ते अतिशय स्फूर्तिदायक

आहे. “ पहाटेस उठून कसरतशाळेत जाऊन जोर, जोडी, मलखांब करावा. नंतर घोड्यावर बसून फिरावयास जावे. घोडा मंडळावर धरावा. कुंपणावरून उडवावा. खंदकाचे पार घालवावा. एकदम खाली बसवावा. इत्यादी नाना प्रकारच्या घोड्याच्या कसरती कराव्या. कधी कधी हत्तीवरही बसत असत. याप्रमाणे सात-आठ वाजेपर्यंत मेहनत झाल्यानंतर मग त्या खुराक खात... दरबारात त्या कधी पुरुषवेष धारण करीत. पायात पायजमा, अंगात जांभळ्या आंबऱ्याची बंडी, डोकीस टोपी घालून वर पागोट्यासारखी बांधलेली बत्ती. कमरेस काच्या किंवा जरीचा दुपेटा. त्यास लटकवलेली तलवार. ह्या प्रकारच्या पोषाखाने ती गौरवर्ण उंच मूर्ती गौरीप्रमाणे दिसत असे...”

कचेरीत सर्व दिवाणी, फौजदारी, मुलकी कामे होत असत. बाईसाहेब बुद्धीच्या फार चपळ असल्यामुळे हकीगत ताबडतोब समजून भराभर हुकूम सांगत असत. स्वतः लिहिता वाचता येत असल्यामुळे कधी मजकूर जुळवून आपण हुकूम लिहीत. मालकम नावाच्या त्या वेळच्या एका इंग्रज लष्करी अधिकाऱ्याने असे लिहिले आहे की, “ लक्ष्मीबाईंचे चारित्र्य श्रेष्ठ प्रतीचे आहे. झाशीत प्रत्येक जणाच्या ठिकाणी राणीविषयी आदर आहे. ”

राणीने आपल्याला फसविले हे इंग्रजांच्या लक्षात यावयाला अठ्ठावन्न सालचा फेब्रुवारी महिना उगवला. ‘ बाई जिवंत सापडल्यास त्यांना कैद करून कलकत्त्याला पाठवावे ’ असे गव्हर्नर जनरलने फर्मान काढले.

एप्रिल महिन्यात सर ह्यू रोजने झाशीला वेढा घातला. तेव्हा ‘ मेरी झांशी मैं नहीं दूंगी ’ अशी राणीने एखाद्या वाघिणीप्रमाणे गर्जना केली. अकरा दिवस राणीने वेढा लढविला. आपल्या पराक्रमाची शर्थ केली. पण शेवटी झाशी पडली. तेव्हा इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन राणी रातोरात किल्ल्यामधून मोठ्या हिमतीने आणि हिकमतीने पसार झाली. अंगात चिलखत, कमरेस जांबिया, काखेत तलवार, पाठीला रेशीमकाटी धोतराने बारा वर्षांचा आपला दत्तक मुलगा बांधलेला. अशा रीतीने आपल्या पांढऱ्या खंद्या घोड्यावर स्वार होऊन अन् बरोबर निवडक स्वार नि सरदार घेऊन राणीने इंग्रजांचा वेढा फोडला अन् सरळ काल्पीची वाट धरली.

पाठीवर शत्रू आला असताना त्यांना कंठस्नान घालीत राणीने जो भरधाव घोडा पिटाळला तो दुसऱ्या दिवशी मध्यरात्री त्या मुक्कामाला पोहोचल्या. सतत चोवीस तास घोडदौड करणारी अशी वीरांगना कोणत्या देशाच्या इतिहासात

निर्माण झालेली आहे ? काल्पीहून पुढे ग्वाल्हेरपर्यंत सतत दोन अडीच महिने राणी एखाद्या सिंहिणीसारखी त्वेषाने लढत होती. तिचे रौद्र स्वरूप नुसते पाहिल्याबरोबर ग्वाल्हेर क्रांतिकारकांच्या हाती पडले. पण त्या विजयानेच त्यांचा घात केला. राणी एकसारखी कानउघाडणी करीत असताही क्रांतिकारक विजयानंदाने धुंद होऊन गाफील राहिले. १७ जूनला सर ह्यू रोजने ग्वाल्हेरला वेढा घातला. राणी साक्षात महिषासुरमर्दिनीसारखा रणांगणावर संचार करताना बघून पहिल्या दिवशी इंग्रज सैनिकांचे डोळे दिपले. पण दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ जूनला इंग्रजांनी क्रांतिकारकांच्या सैन्यावर जबरदस्त हल्ला चढवला आणि त्यांची दाणादाण करून टाकली. ह्या युद्धात अकस्मात गोळी लागून राणी लक्ष्मीबाईंना रणांगणावर वीरोचित मरण आले. इंग्रजांचा सेनापती सर ह्यू रोज ह्यांनी राणी लक्ष्मीबाईला वाहिलेली श्रद्धांजली अविस्मरणीय आहे. " Although a lady she was the bravest and the best military leader of the rebels. A man among mutineers ! " (ती स्त्री असली तरी बंडखोरामधे ती सर्वांत शूर आणि उत्तम लष्करी सेनानी होती. बंडखोरांत खरी मर्द तीच !) सत्तावनी स्वातंत्र्ययुद्धाची तर ती स्फूर्तिदेवताच होती. तिच्या अलौकिक शौर्याने आणि महान बलिदानाने सत्तावनी स्वातंत्र्ययुद्धाचे निशाण सर्वांत जास्त उंच केलेले आहे.

हिंदी साहित्यातील विख्यात उपन्यासकार श्री. वृन्दावनलाल शर्मा म्हणतात की, " The Rani fought for Swarajya, died for Swarajya and turned herself into a stone for the foundation of Swarajya " (राणी स्वराज्यासाठी लढली, स्वराज्यासाठी मरण पावली. राणीने आपल्या देहाला स्वराज्यमंदिराच्या पायाची कोनशिला केली.) म्हणूनच 'झाशीच्या राणी'च्या पराक्रमाचे पोवाडे आणि गाणी गेली शंभर वर्षे भारतवर्ष हर्षाने आणि स्वाभिमानाने गातो आहे.

गेल्या वर्षी स्वातंत्र्यशताब्दीचा जो महोत्सव साजरा झाला, त्यामध्ये झाशीच्या राणीचा जेवढा जयजयकार झाला तेवढा कोणाचाच झाला नाही. भारतभूमीच्या स्वातंत्र्यमुकुटात अमर तेजाने तळपणाऱ्या ह्या तेजस्वी चंद्रिकेचे शतसांवत्सरिक पुण्यस्मरण आता शाहिराच्याच शब्दात करू या !

अशि नाही कोणत्या काळीं । कुठेही झाली ।
शत्रूची खाऊनी गोळीं । जी लढता लढता मेली ।

ती धन्य आर्यमाऊली। जिने प्रसवली।
मर्दानी झाशीवाली।

मराठा : १८-६-१९५८

## ४

# महात्मा फुले

आज सत्तावीस नोव्हेंबर. अडुसष्ट वर्षांपूर्वी ह्याच दिवशी महात्मा फुले ह्यांनी आपला अवतार समाप्त केला. छत्रपती शिवाजीमहाराज आणि लोकमान्य टिळकांप्रमाणेच ते तीन कोटी मराठ्यांचे दैवत आहे. म्हणून आजच्या दिवशी सारा महाराष्ट्र भक्तिभावाने आणि आदराने त्यांचे स्मरण करील. महात्मा फुले ह्यांचा मोठेपणा कशात आहे हे त्यांच्या जिवंतपणी जसे पुष्कळ लोकांना कळले नाही तसे आजही अनेक लोकांच्या ध्यानात आले नाही. ज्या काळात फुले जन्माला आले त्या काळात त्यांच्याएवढा द्रष्टा क्रांतिकारक कोणीच नव्हता. म्हणून त्यांचे कार्य आणि विचार ह्यांचे महत्त्व एकट्या न्यायमूर्ती रानड्यांखेरीज कोणाला आकळलेच नाही.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी तर त्यांची चेष्टाच केली. हिंदुस्थान देशाला काय रोग जडलेला आहे, ह्याचे अचूक निदान या देशात पहिल्याने जर कोणी केले असेल तर ते महात्मा फुले ह्यांनी, दुसऱ्या कोणीही नाही. अठराशे अठरा साली आपले राज्य गेले आणि इंग्रजांचे राज्य आले. त्या वेळी शस्त्रबलाने इंग्रजांना ह्या देशातून हाकून लावावे आणि स्वातंत्र्य मिळवावे असा विचार पुष्कळांच्या डोक्यात आला. फुलेसुद्धा प्रारंभी शस्त्रक्रांतीचे पुरस्कर्ते होते. पण पारतंत्र्यापेक्षा त्यांना हिंदुसमाजातील विषमता आणि अन्याय ह्यांची अधिक चीड आली. ब्राह्मणांच्या लहान मुली विधवा होताच त्यांचे केशवपन व्हावे, महार तहानेने व्याकुळ होऊन तडफडत असला तरी त्याला कोणी पाणी पाजू

नये, सार्वजनिक जीवनात अब्राह्मणांचा पदोपदी ' शूद्र ' म्हणून धिक्कार व्हावा ह्या गोष्टी पाहून त्यांच्या मस्तकात तिडीक उठली आणि त्यांच्या डोक्यातला राष्ट्रवाद एकदम नाहीसा झाला. ते म्हणाले, " ह्या देशाचा शत्रू इंग्रज नाही. जातिभेद, अस्पृश्यता आणि अज्ञान हे ह्या देशाचे खरे शत्रू आहेत. शस्त्रबळाने इंग्रजांना ह्या देशामधून हाकून दिले तरी धर्मातील विषमता त्यामुळे कशी नष्ट होऊ शकणार ? स्वराज्य आले तरी धर्म बदलता येणार नाही आणि धर्म बदलल्याखेरीज हिंदुसमाजातले विषमतेचे आणि विटाळाचे विष नष्ट होणार नाही. ही गोष्ट ज्योतिबांच्या जेव्हा ध्यानात आली तेव्हा स्वराज्याचे महत्त्व त्यांना वाटेनासे झाले. ते आपल्या राष्ट्रवादी मित्रांना म्हणाले, " इंग्रजांचे राज्य इथे येऊन पंचवीस वर्षे झाली नाहीत तर तुम्हांला त्यांची गुलामगिरी असह्य झाली अन् आम्ही शूद्रातिशूद्र पंचवीसशे वर्षे ह्या वर्णाश्रम धर्माची गुलामगिरी सहन करतो आहोत ! कशी सहन करतो आहोत ते इतरांना काय समजणार ? " जीस तन लागे वह तन जाने । बीजा क्या जाने गव्हारा रे ? " म्हणून राजकीय पारतंत्र्याविरुद्ध बंड पुकारण्याऐवजी त्यांनी माणसांसारख्या माणसांना जनावरापेक्षाही हीन मानणाऱ्या भिक्षुकी धर्माविरुद्ध बंड पुकारले. ज्ञानाचे भांडार शूद्रातिशूद्रांच्या आणि स्त्रियांच्या हाती ज्या दिवशी येईल त्या दिवशी हिंदुस्थान अंतर्बाह्य स्वतंत्र होईल हा साक्षात्कार ज्योतिबांना विसाव्या वर्षाच्या आत झाला; ह्यावरून ते केवढे द्रष्टे होते हे ध्यानात येईल.

पुण्यात पहिली मुलींची शाळा ज्योतिबांनी काढली. अस्पृश्यांसाठी शाळा काढणारे भारतवर्षामधले महात्मा फुले हे पहिले सुधारक होत. ब्राह्मण जातीतल्या कित्येक बालविधवा अजाणपणाने वाममार्गाला जाऊन गरोदर झाल्या तर त्या आत्महत्या तरी करीत; नाहीतर भ्रूणहत्या करीत. त्यांच्यासाठी त्यांनी स्वतःच्या घरात प्रसूतिगृह आणि बालहत्याप्रतिबंधक गृह काढले. सर्व समाजाचा विरोध धाब्यावर बसवून सुधारणेची केवढी एकेक अवघड कामे ज्योतिबांनी त्या वेळी अंगावर घेतली होती, ह्याचा आज विचार केला म्हणजे मन थक्क होते. शूद्रातिशूद्रांचा, अनाथअपंगांचा आणि पतितांचा उद्धार कसा करता येईल हा एकच विचार रात्रंदिवस त्यांच्या डोक्यात घोळत होता. त्यातूनच ' सत्यधर्मा 'ची त्यांची कल्पना निर्माण झाली. ह्या विश्वाच्या मुळाशी एक तत्त्व आहे हे त्यांनी ओळखले. सृष्टीचा निर्माता जर एक तर जगात नाना धर्म का असावेत हे त्यांना कळेना. सर्व मानवांचा एकच धर्म

असावा, आणि तो म्हणजे सत्यधर्म हा आत्मबोध त्यांना झाला. ईश्वर कधीही कोणाला दिसणार नाही. त्याला भेटण्याच्या भानगडीत कोणी पडू नये. त्याने दिलेल्या बुद्धीचा आणि गुणांचा विकास करणे हीच खरी त्याची भक्ती होय असे त्यांचे सांगणे असे. धार्मिक विधी भिक्षुकांच्या मार्फत आणि संस्कृत भाषेतून न करता प्रत्येकाने स्वतः आपल्या मातृभाषेतून करावे असा त्यांचा कटाक्ष असे. 'हिंदी राष्ट्रीय सभे'ला ते 'राष्ट्रीय सभा' म्हणावयास तयार नसत. ते म्हणत, "ज्या सभेत महारमांगांना आणि अतिशूद्रांना स्थान नाही ती कसली राष्ट्रीय सभा ?" हिंदुसमाजातील जातिभेद आणि अस्पृश्यता नाहीशी व्हावी, माणुसकीला डांबर फासणारे हिंदू धर्मातील जे वेडगळ आचार आणि विचार आहेत ते नष्ट व्हावेत आणि सामाजिक समतेवर अन् न्यायावर समाजाची उभारणी होऊन सर्वांनी सत्याचे उपासक व्हावे एवढ्यासाठी महात्मा फुले ह्यांनी आपल्या जिवाचे रान केले. जे जे त्यांनी सांगितले ते ते करून दाखविले. महात्मा फुल्यांची थोर शिकवण हिंदुसमाजाने यापूर्वीच आचरणात आणली असती तर बौद्ध धर्मात जाणाऱ्या लक्षावधी अस्पृश्यांना आज त्याला मुकावे लागले, ते लागले नसते !

मराठा : २८-११-१९५६

५

# राजद्रोहाचा लोकमान्य शिक्षक

आज एक ऑगस्ट. लोकमान्यांची अठ्ठाविसावी पवित्र पुण्यतिथी; आणि स्वतंत्र भारतातील लोकमान्यांची पहिली पुण्यतिथी. गेली सत्तावीस वर्षे लोकमान्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी अत्यंत निष्ठेने आणि भक्तिभावाने भारतवर्ष त्यांची आठवण करीत आलेला आहे. पण भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आज येत असलेल्या लोकमान्यांच्या या अठ्ठाविसाव्या पुण्यतिथीच्या दिवशी भारताला स्वातंत्र्याचा महामंत्र शिकविणाऱ्या लोकमान्यांची जनतेला विशेष जिव्हाळ्याने आठवण होईल. गेल्या वर्षी पंधरा ऑगस्ट रोजी इंग्रजांच्या दास्यातून भारतवर्ष मुक्त झाला. त्याच्या हातापायात दीडशे वर्षे खळाळत असलेल्या गुलामगिरीच्या शृंखला तोडण्यासाठी अनेकांनी आपल्या रक्ताचे अर्घ्य दिले आणि प्राणांच्या आहुती टाकल्या हे अगदी खरे आहे.

अमक्याचा त्याग तमक्यापेक्षा कमी आणि अमक्याचा पराक्रम तमक्यापेक्षा मोठा अशी त्यागाची आणि पराक्रमाची वर्गवारी करता यावयाची नाही. तसे करणे व्यावहारिक दृष्ट्या बरोबर दिसत नव्हते, तरी देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्यवीरांच्या तेजस्वी मालिकेमध्ये अग्रपूजेचा मान निर्विवादपणे लोकमान्य टिळकांकडेच जातो ही गोष्ट अगदी सूर्यप्रकाशाप्रमाणे स्वच्छ आहे. एकोणीसशे सहा साली कलकत्ता येथे महर्षी दादाभाई नौरोजी यांनी स्वराज्याचा प्रथम उच्चार केला. पण तो स्वराज्याचा महामंत्र काश्मीरपासून कन्याकुमारी-पर्यंत आणि कराचीपासून कलकत्त्यापर्यंत कोट्यवधी जनतेच्या अंतःकरणात

निनादत ठेवण्याचे कार्य लोकमान्य टिळकांनीच केले.

ज्या काळात लोकमान्य टिळक जन्माला आले तो ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या वैभवाचा आणि सामर्थ्याचा काळ होता. ब्रिटिश सत्तेचा धाक आणि दरारा त्या वेळी एवढा होता की, तिच्याकडे वाकडा डोळा करून वर पाहण्याची कुणाचीही छाती नव्हती. जनतेची दुर्बलता आणि असहायता त्या वेळी अगदी पराकाष्ठेला जाऊन पोहोचली होती. अठराशे सत्तावन साली स्वातंत्र्य मिळविण्याचा ज्या धाडसी वीरांनी प्रथम प्रयत्न केला होता त्यांच्या हाडांची राखरांगोळी होऊन ती धुळीत मिळून गेली होती. त्यांनी देशाला दिलेली क्रांतीची आणि पराक्रमाची शिकवण दडपशाहीच्या वरवंट्याखाली ब्रिटिशांनी ठेचून जवळ जवळ नाहीशी केली होती.

त्यानंतर साम्राज्यशाहीने भयंकर उग्र असा जो नारसिंहावतार धारण केला त्यामुळे जनता अतिशय भेदरून गेली होती. जगाच्या अन्तापर्यंत हा देश आता पारतंत्र्याच्या काळोखात मेल्यासारखा पडून राहणार अशीच देशातील बहुतेक सुजाण लोकांची भावना होऊन बसली होती. इंग्रज लोकांनीच या देशावर राज्य करावे असाच जणू नाही परमेश्वराचा संकेत दिसतो आणि त्यांचे प्रभुत्व मान्य करण्यातच हिंदी जनतेचे खरेखुरे कल्याण आहे असे देशातील मोठमोठ्या विद्वानांनाही वाटत होते. इतका त्यांच्या विद्वत्तेचा अधःपत होऊन बसलेला होता. स्वर्गातले तेहतीस कोटी देव जरी खाली उतरले असते तरी निष्क्रियतेच्या आणि निराशेच्या महासागराच्या तळाशी रुतून बसलेल्या या खंडप्राय राष्ट्राला वर खेचून बाहेर काढणे त्यांना अशक्य झाले असते अशी त्या वेळची एकंदरीत परिस्थिती होती.

अशा काळात लोकमान्यांचा अवतार झाला. खरोखर त्यांचा अवतार ही एक प्रकारची ऐतिहासिक विधिघटनाच होय. जेव्हा जेव्हा धर्मावर ग्लानी येते आणि अधर्माला उन्माद चढतो तेव्हा तेव्हा मानवतेच्या उद्धारासाठी परमेश्वर अवतार घेतो अशी या देशातील जनतेची श्रद्धा आहे. ही श्रद्धा दैवी आणि अद्‌भुत आहे. असे वरवर पाहणारा वाटले तरी तिच्यामधील भावना निरर्थक आहे असे मात्र कदापि म्हणता येणार नाही. अधोगतीला गेलेल्या समाजाचा आणि राष्ट्राचा उद्धार करणारे महापुरुष योग्य वेळीच अवतीर्ण होतात असा सर्व देशातल्या इतिहासाचा दाखला आहे. भारतवर्षासारखा अफाट लोकसंख्येचा आणि प्रचंड सामर्थ्याचा देश शतकानुशतके परकीयांच्या गुलामगिरीत राहील ही

गोष्ट ऐतिहासिक नीतीच्या दृष्टीने मुळी अशक्यच होती.

जगातल्या सर्व राष्ट्रांमध्ये हा देश अतिशय दुर्दैवी आहे यात मुळीच शंका नाही. लोभी आणि लुटारू राष्ट्रांच्या आक्रमणाला आणि महत्त्वाकांक्षेला हा देश जेवढा बळी पडलेला आहे, तेवढा दुसरा कोणताही देश कधी पडला नसेल. तथापि देशावर वरचेवर कोळसणाऱ्या या खडतर दुर्दैवाची परंपरा केव्हाना केव्हा तरी संपावयास हवीच होती. भूतकाळात या देशावर ज्या ज्या परकी राज्यकर्त्यांनी राज्य केले त्या सर्वांमध्ये ब्रिटिश साम्राज्यसत्ता ही अधिक जुलमी आणि लुटारू होती यात मुळीच शंका नाही. देशाच्या सामर्थ्याला जेवढ्या जळवा लावता येतील आणि जनतेची शक्ती जेवढी पिळून काढता येईल तेवढी त्यांनी काढली होती. भारताचा अधःपात यापेक्षा अधिक होणे अशक्य होते. म्हणून त्याच्या उद्धाराचे कार्य हाती घेण्यावाचून इतिहासाला दुसरा मार्गच नव्हता.

गेले शतक अस्तंगत होण्याच्या सुमारासच इतिहासाच्या डोळ्यावरची ही अनेक शतकांची ग्लानी दूर होण्याची चिन्हे दिसू लागली होती. नवविचारांचे आणि नवचैतन्याचे वारे देशामध्ये चहूकडे वाहू लागले होते. स्वातंत्र्याचे लहान-मोठे भाट स्फूर्तीची गाणी गात वातावरणामधून वावरू लागले होते. महा-पुरुषाच्या आगमनाची चिन्हे चहूकडे स्पष्टपणे दिसू लागली होती, आणि त्यांच्या पावलांचे पडसाद जनतेच्या अंतःकरणात उमटू लागले होते. भारताच्या उद्धाराचा काळ आता समीप येऊन ठेपलेला आहे ही गोष्ट ब्रिटिश राज्यकर्त्यां-खेरीज सर्वांना मनोमन कळून चुकलेली होती. सत्तेचा उन्माद नोकरशाहीच्या डोळ्यांवर चढलेला असल्यामुळे भारताचा उद्धारकर्ता महापुरुष लोकमान्य टिळकांचे रूप धारण करून येत आहे हे त्यांना मुळीच दिसले नाही.

अनेक दुर्धर रोगांनी पछाडलेल्या एखाद्या श्रीमंत रोग्याच्या बिछान्यापाशी ज्याप्रमाणे अनेक वैद्यांची आणि डॉक्टरांची गर्दी जमते आणि मग त्यांपैकी प्रत्येकजण आपापल्या दृष्टीने त्या रोग्याच्या प्रकृतीचे निदान करून आपापल्या औषधाचे अनुपान देत असतो, तशी त्या वेळीं या देशाची स्थिती झाली होती. देशाच्या प्रकृतीची चिकित्सा करण्याच्या कामी त्या वेळीं मोठमोठ्या पंडितांची आणि मुत्सद्यांची स्पर्धा लागून राहिली होती.

या देशात अस्तित्वात असलेले सर्व धर्म आणि पंथ नेस्तनाबूत करून त्या ठिकाणी एका नवीन धर्माची संस्थापना केल्यावाचून या देशाचा उद्धार होणार

नाही असे कोणी म्हणत होते तर कोणाच्या मते हिंदुसमाजातील अठरापगड जाती नष्ट करून टाकल्याखेरीज या देशातील जनतेची उन्नती होणार नव्हती. औद्योगिक सुधारणेखेरीज देशाचे दारिद्र्य नष्ट होणे अशक्य आहे असे कुणी प्रतिपादीत होते, तर सहकारी पतपेढ्यांखेरीज देशाचा तरणोपाय नाही असे कोणी छातीवर हात मारून सांगत होते. देशाच्या व्याधीसंबंधीची ही निर-निराळी निदाने आपापल्या परीने बरोबर असली तरी देशाच्या प्रकृतीत ताबड-तोब सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने त्यांचा मुळीच उपयोग नव्हता ही गोष्ट लोकमान्य टिळकांनीच प्रथम ओळखली.

ब्रिटिशांच्या हातातली देशाची राज्यसूत्रे जनतेच्या हाती आल्याखेरीज देशाची उन्नती होणे शक्य नाही हे भारताच्या उद्धाराचे खरे निदान लोक-मान्य टिळकांनीच प्रथम केले. ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये या देशातील जनतेचे कल्याण होणे कालत्रयीही शक्य नाही म्हणून ती राजवट नष्ट करणे हा या देशातील लोकांचा जन्मसिद्ध हक्क आहे ही स्वराज्याची गगनभेदी घोषणा लोकमान्य टिळकांनीच प्रथम केली. ‘ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी ते घेईनच घेईन ’ ही लोकमान्यांच्या महामंत्राची संहिता होती. तिचा अर्थच मुळी हा होता की, ‘ इंग्रजांना या देशातून हाकून देऊन त्यांची येथील सत्ता नष्ट करणे हे माझे आद्य कर्तव्य असून ते मी पार पाडीनच पाडीन ! ’ ‘ छोडो भारत ’ची क्रांतिकारक घोषणा बेचाळिसच्या आठ ऑगस्टला महात्माजींनी केली तिचा पहिला निस्संदिग्ध उच्चार करण्याचे श्रेय लोकमान्य टिळकांनाच द्यावयाला पाहिजे.

कोणत्याही एका राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही, एवढेच नव्हे जे लोक दुसऱ्याचे स्वातंत्र्य हरण करतात ते सैतान होत म्हणून इंग्रजांचे या देशातले राज्य हे सैतानांचे राज्य आहे असे छातीठोकपणे लोकमान्य टिळकांनी या देशातल्या परकीय राज्यकर्त्यांना खडसावून सांगितले होते. ब्रिटिशांचे राज्य हे सैतानाचे राज्य आहे असे म्हणणाऱ्या वीराच्या हृदयात धैर्याचा आणि सामर्थ्याचा केवढा सागर हेलावत असला पाहिजे याची केवळ कल्पनाच केलेली बरी.

इंग्रज लोक आपल्या देशात जसे राज्य करतात तशी आम्हाला आमच्या देशात राज्य करण्याची संधी मिळणे याचे नाव स्वराज्य अशी टिळकांनी स्वराज्याची अत्यंत सोपी आणि सुटसुटीत व्याख्या केली होती. देशाला स्वराज्य

मिळाले तरच त्याची सर्वांगीण उन्नती होईल, कारण स्वराज्यामध्येच सर्व सुधारणांचा समावेश होतो ही गोष्ट लोकांना समजावून सांगताना लोकमान्य असे म्हणाले होते की, ' मुंबईचे एक तिकीट काढल्यानंतर अधल्यामधल्या सर्व स्टेशनांचा त्यात समावेश होतो. त्यासाठी वेगळी तिकिटे काढण्याची जरुरी नसते. स्थानिक स्वराज्य किंवा कायदेमंडळ यांच्या मार्गांनी स्वराज्य मिळवू पाहणे म्हणजे जाळ्यांमधून आणि खिडक्यांमधून घरात शिरण्याचा प्रयत्न करण्यासारखे हास्यास्पद आहे. घरात प्रवेश करायचा म्हणजे मुख्य दरवाजानेच तो केला पाहिजे, त्याप्रमाणे स्वातंत्र्याचा दरवाजा उघडून आत शिरल्याखेरीज स्वराज्य मिळणे अशक्य आहे. '

कोट्यवधी जनतेच्या अन्तःकरणात स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करण्याचे कार्य या भारतवर्षात लोकमान्य टिळकांनीच प्रथम केले. सर व्हॅलेंटाइन चिरोल यांनी त्यांना ' हिंदी अस्वस्थतेचे जनक ' अशी पदवी दिली होती. तथापि आमच्या मते लोकमान्य टिळकांना ' ब्रिटिश अस्वस्थतेचे जनक ' अशी पदवी दिली असती तर ते अधिक बरे झाले असते. हिंदुस्थानातील जनतेला अस्वस्थ करण्यापेक्षा ब्रिटिश राज्यकर्त्यांनाच लोकमान्यांनी अधिक अस्वस्थ करून सोडले होते यात मुळीच शंका नाही. ब्रिटिशांनी या देशातील जनतेवर केलेले अनन्वित अत्याचार आणि अक्षम्य अन्याय निर्भयपणे वेशीवर टांगून ब्रिटिश राजवटी-विरुद्ध देशव्यापी असंतोषाचा वणवा लोकमान्य टिळकांनी पेटवला. ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध बंड करणे हिंदी जनतेचे कर्तव्य आहे अशी राजद्रोहाची पहिली शिकवणूक या देशातील जनतेला लोकमान्य टिळकांनीच पहिल्याने दिली. त्या दृष्टीने जनतेला राजद्रोहाचे शिक्षण देणारे लोकमान्य टिळक हे पहिलेच राजद्रोही शिक्षक होत.

ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध द्रोह करून निर्भयपणे कारागृहात जाण्याचा मार्ग देशाला टिळकांनीच दाखवला. ब्रिटिशांविरुद्ध उठाव करण्याचे जे जे मार्ग आणि जी जी साधने त्या वेळी जनतेला त्यांनी दाखवून दिली त्यांचाच अवलंब महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली त्यानंतर राष्ट्राने केला. राजद्रोहाचा जो प्रचंड वणवा टिळकांनी या देशामध्ये पेटवून ठेवला तो पुढे वाढत वाढत एवढा भयंकर झाला की त्यामध्ये या देशातले ब्रिटिशांचे राज्ययंत्र जळून खाक झाले. गेल्या वर्षी पंधरा ऑगस्टला देशाला स्वातंत्र्य मिळाले ते लोकमान्य टिळकांनी जनतेला दिलेल्या राजद्रोहाच्या शिकवणुकीचे फळ होय. यापुढे कोणतीही राजसत्ता या

देशांतील जनतेवर राज्य करू शकणार नाही. जनतेच्या हक्काची पायमल्ली करण्याचा गुन्हा जी कोणती सत्ता, सरकार किंवा राजवट करील तिच्याविरुद्ध बंडाचे निशाण उभारून ती हुकूमशाही नष्ट करणे आणि सत्तेची सर्व सूत्रे आपल्या हाती घेणे हे जनतेचे आद्य कर्तव्य आहे, हा लोकमान्य टिळकांच्या क्रांतिकारक जीवनाचा महान संदेश आहे. लोकमान्यांच्या अठ्ठाविसाव्या पुण्य-तिथीच्या दिवशी या संदेशाचे स्मरण या देशातील असंख्य जनता करील आणि त्यापासून ज्यांना जो बोध घेणे अवश्य आहे तो ते घेतील असा आम्हास विश्वास आहे. लोकमान्य टिळकांच्या राजद्रोहाचा जयजयकार असो. हिंदी स्वातंत्र्याचा जयजयकार असो.

नवयुग : १-८-१९४८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नों: दि: ....................

# ६

# लोकमान्य टिळक नि महात्मा गांधी

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्यांना जाऊन आज तेहतीस वर्षे झाली. गांधीजी हे भारताच्या स्वातंत्र्याचे जनक आहेत असे मानले जाते. ते खरे आहे, पण ते सगळे खरे नव्हे. ते अर्धे सत्य आहे. लोकमान्य हेही महात्माजींप्रमाणे भारताच्या स्वातंत्र्याचे जनक आहेत. हिंदुस्थानातील इंग्रजांचे राज्य टिळक आणि गांधी ह्या दोघांनी उखडून काढले, तेव्हा देशाला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजी सत्तेविरुद्ध असंतोषाची आग आधी टिळकांनी ह्या देशात पेटवली, मग त्यात असहकाराचे घासलेट गांधीजींनी ओतून ती आग भडकविली, तेव्हा ह्या देशातली परकी सत्ता जळून खाक झाली. असंतोष आणि असहकार ह्या दोन शक्तींच्या जोरावर भारताला स्वातंत्र्य मिळाले.

टिळकांचे वर्णन ' असंतोषाचे जनक ' असे केले जाते. तर गांधीजी हे असहकाराचे प्रणेते होते, म्हणून टिळक आणि गांधीजी हे दोघेहीजण भारताच्या स्वातंत्र्याचे जनक आहेत. स्वातंत्र्याला दोन जनक असले म्हणून ते काही हिणकस ठरत नाही. टिळकांच्या नावामागे ' लोकमान्य ' हे विशेषण कायमच चिकटून बसले आहे. टिळक हे लोकमान्य तर होतेच, पण त्या विशेषणाने त्यांच्या खऱ्या स्वरूपाचा बोध होत नाही. चिरोलसाहेब हे टिळकांचे शत्रू होते; पण त्यांनी टिळकांचे जितके अचूक वर्णन केले, तितके कोणी केले नाही. ब्रिटिश राज्याविरुद्ध ह्या देशात जनतेच्या मनात जर प्रथम असंतोष कुणी उत्पन्न केला असेल, तर तो टिळकांनी. ही गोष्ट चिरोलसाहेबांनी बरोबर

ओळखली होती.

टिळकांच्या आधी किंवा वेळी देशात काही विद्वान माणसे नव्हती असे नाही. 'लोकहितवादी', न्यायमूर्ती रानडे किंवा नामदार गोखले विद्वत्तेत आणि बुद्धिमत्तेत टिळकांच्या तोडीचे होते. पण इंग्रजी राज्य हे ह्या देशावरचे संकट आहे हे काही त्यांना उमगले नाही. 'लोकहितवादी' तर आपल्या देशबांधवांनाच संतापून म्हणत की, "तुमचे राज्य गेले ते योग्यच झाले. तुमच्यासारखे मूर्ख आणि अज्ञानी लोक जगाच्या पाठीवर नाहीत!" न्यायमूर्ती रानडे हे 'लोकहितवादी'पेक्षा अधिक तत्त्वज्ञानी होते. ते म्हणत, "आमचे राज्य गेले आणि इंग्रजांचे राज्य ह्या देशात आले हे परमेश्वराच्या इच्छेनुसारच झाले. तेव्हा इंग्रजांकडून आधी शहाणपणा शिका अन् मग त्यांच्याकडून राज्य मागा."

नामदार गोखले हे न्यायमूर्ती रानड्यांचेच शिष्य. त्यांनी जन्मभर राजकीय चळवळ केली, पण इंग्रजांना कधीही वाईट म्हटले नाही किंवा इंग्रजांचे राज्य देशातून गेल्यावाचून जनतेचा उद्धार होणार नाही असेही तीव्रतेने त्यांना कधी वाटले नाही. पण इंग्रजांचे नाव काढले की टिळकांच्या सर्वांगाचा भडका उडत असे. त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जाई. धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या इंग्रज हे आपल्यापेक्षा हीन आहेत असे त्यांना मनापासून वाटे. ते म्हणत, "आम्ही उपनिषदांसारखे ग्रंथ लिहीत होतो, तेव्हा इंग्रजांचे पूर्वज रानावनातून अर्धे नागवे भटकत होते. ह्यांची आमच्यापुढे काय पत्रास ?"

इंग्रजांच्या गुणांविषयी टिळकांना मुळीच आदर नव्हता. इंग्रज बुद्धिमान किंवा कर्तबगार असतील. पण ते दुष्ट, ढोंगी आणि कपटी आहेत ह्याबद्दल त्यांना मुळीच शंका नव्हती. इंग्रजांच्या पोशाखाचे, चालीरीतींचे किंवा विचारांचे अनुकरण केल्याने ह्या देशातील राष्ट्रीयत्वाचा ऱ्हास होतो आहे असे त्यांना मनापासून वाटे. म्हणून इंग्रजी सत्तेची पाळेमुळे ह्या देशातून खणून काढल्यावाचून ह्या देशाचे कल्याण होणार नाही असे त्यांचे अगदी ठाम मत होते. इंग्रजी सत्तेचा एवढा द्वेष करणारा ज्वलज्जहाल पुढारी त्या काळात देशाला मिळाला म्हणून त्याने हजारो लोकांच्या हृदयात असंतोषाची आग भडकवून दिली !

म्हणून इंग्रजांना टिळकांचे भय वाटे. टिळक आपले मित्र नाहीत, ते आपले द्वेष्टे आहेत हे इंग्रज पुरते ओळखून होते. टिळक इंग्लंडला गेले, तेव्हा कोणाही

साहेबाने त्यांना आपल्या घरी जेवावयाला बोलावले नाही किंवा त्यांच्या कोणत्याही गुणांचे कौतुक केले नाही. ह्याच्या उलट, गांधींनी इंग्रजांना ह्या देशात राज्य करणे अशक्य केले, पण इंग्रजांना गांधींची भीती म्हणून कधीही वाटली नाही. टिळकांप्रमाणे गांधीही इंग्रज सरकारला 'सैतानी सरकार' म्हणत, पण त्याबरोबर इंग्रज लोक आपले मित्र आहेत असेही ते म्हणत. म्हणून इंग्लंडमध्ये इंग्रजी जनतेने गांधींचे जास्तीत जास्त कौतुक केले. बादशहानेसुद्धा गांधींना भेटावयाला बोलावले. साहेबाच्या टेबलावरच पंचा नेसून आणि स्वतःचे अन्न घेऊन गांधीजी जेवत. इंग्रजांच्या संस्कृतीशी आणि जीवनाशी गांधीजींनी असहकार केला होता, पण साहेबाच्या पंगतीला जेवायचीसुद्धा टिळकांची तयारी नव्हती. साहेब आपल्यापेक्षा कमी आहे, आपण त्याजबरोबर जेवावयाला बसावे अशी त्याची मुळी लायकीच नाही, असेच जणू काही साहेबाशी त्यांचे वागणे असे.

आरंभापासून काही गांधीजी असहकारवादी नव्हते. इंग्रजांशी सहकार करण्याचा गांधीजींनी पुष्कळ प्रयत्न केला. पण तो निष्फळ ठरल्याने शेवटी नाइलाजाने त्यांनी असहकाराचे शस्त्र उपसले. गांधीजींचे जीवनात एक सारखे प्रयोग चालू होते. आपल्या हातून चुका होत आहेत ह्याची त्यांना जाणीव होती. ते आपल्या चुका प्रामाणिकपणे कबूल करीत असत. त्याच्या उलट टिळकांचा स्वभाव होता. त्यांची बुद्धिमत्ता प्रचंड असल्याने कोणत्याही बाबतीत एकदा त्यांनी निर्णय घेतला म्हणजे मग पुन्हा तो बदलण्याची त्यांना कधीही आवश्यकता वाटत नसे. टिळक गणिती होते. त्यामुळे त्यांचे जीवन सिद्धांतस्वरूप होते. बे दुणे चार म्हणजे बे दुणे चारच. पाच कधी व्हावयाचे नाहीत. इंग्रजांच्या राज्याबद्दल एकदा त्यांनी जो निष्कर्ष काढून ठेवला. तो उभ्या आयुष्यात पुन्हा त्यांनी कधीही बदलला नाही. इंग्रजांचे राज्य म्हणजे सैतानाचे राज्य हे ध्रुवपद शेवटपर्यंत त्यांनी सोडले नाही. त्यामुळे टिळक एकदा बोलले म्हणजे ते वज्रलेप. त्यात चूक कधी व्हावयाची नाही, अशी जनतेची त्यांच्याबद्दल दृढ श्रद्धा असे. उभ्या आयुष्यात टिळकांच्या मनात आणि पोषाखात कधी बदल झाला नाही. टिळकांची पगडी, अंगरखा, उपरणे नि धोतर आरंभापासून शेवटपर्यंत होते तसे होते. त्याच्या उलट सूट, बूट, हॅट अन् नेकटायपासून गांधीजींची नुसत्या पंचापर्यंत उत्क्रांती होत गेली. गांधीजींनी जो निष्कर्ष शेवटी काढला, तो टिळकांनी प्रारंभीच काढला. दोघांच्या स्वभावपिंडामध्ये असा मूलभूत फरक होता.

शत्रूशी त्यांच्याच शस्त्रांनी लढून त्याला पराभूत करावयाचे, आपल्या धैर्याने आणि तेजाने त्याचा पाडाव करावयाचा आणि त्याच्या हृदयात दरारा उत्पन्न करावयाचा ही टिळकांची पद्धती असे. उदाहरणार्थ, टिळक जरी इंग्रजांचा द्वेष करीत असले, तरी इंग्रजांचे अंतःकरण टिळकांनी चांगले ओळखले होते. प्रत्येक मनुष्याचे जीवनात काही मूलभूत हक्क आहेत आणि ते त्याला मिळालेच पाहिजेत ह्या गोष्टीवर इंग्रजांची दृढ श्रद्धा आहे हे टिळकांनी पक्के जाणले होते. स्वातंत्र्य हा त्या मूलभूत हक्कांचा आत्मा असून त्याच्या संरक्षणासाठी इंग्रजांनी आपल्या कायद्याचा प्रचंड किल्ला उभारलेला आहे हे टिळकांनी हेरले होते. हक्क आणि कायदा हे इंग्रजांचे श्वास आणि निःश्वास आहेत. तेव्हा त्यांच्याच कायद्याने आपल्याही मूलभूत हक्कांचे समर्थन केले पाहिजे हा महान शोध टिळकांनी लावला. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी घेणारच घेणार' ह्या घोषणेचा हेतू भारताच्या जनतेला जागृत करण्यापेक्षा भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांना जागृत करावे हा होता.

हक्काची भाषा इंग्रजांना बरोबर समजत होती, आणि म्हणून 'मी माझ्या हक्कासाठी लढतो आहे' असे म्हटल्याबरोबर इंग्रजांची आपोआपच दातखिळी बसत असे. इंग्रजांचा कायदा टिळकांना जसा समजत होता तसा फारच थोड्या लोकांना समजत असेल. कायद्याच्या कचाट्यात न सापडता इंग्रजांशी कशी टक्कर द्यावयाची ही विद्या त्यांना उत्तम माहीत होती. तसे नसते तर इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांना जन्मभर तुरुंगात डांबून ठेवले असते. आठ सालच्या खटल्यात त्यांनी आपल्या कायद्याच्या ज्ञानाने सरकारला काही कमी हैराण केले नाही. अर्थात सरकारने त्यांना शिक्षा द्यावयाचा निश्चयच केलेला होता, म्हणून टिळकांचा नाइलाज झाला.

इंग्रजांचे कित्येक कायदे वाईट आहेत, ते अन्यायी आणि कपटी आहेत हे टिळकांना माहीत होते, पण इंग्रजांचा पराभव झाला तर तो कायद्याच्या रणांगणावरच होईल ही टिळकांनी आपल्या मनाशी पक्की खूणगाठ बांधली होती. म्हणून इंग्रजांच्या कायद्यावर माझा विश्वास नाही किंवा मी तो पाळणार नाही अशी भाषा जन्मात त्यांच्या तोंडून कधी निघाली नाही. टिळक हे तसे पक्के घटनावादी ( Constitutionalist ) होते.

ह्याच्या उलट गांधीजींचे तंत्र होते. त्यांनी इंग्रजांच्या कायद्याचा इंग्लंडात जाऊन अभ्यास केला होता, पण इंग्रजांच्या कायद्यावर त्यांचा पहिल्यापासून

मुळी विश्वासच नव्हता. हिंदुस्थानात इंग्रजांच्या कायद्याला जे भयानक स्वरूप प्राप्त झाले होते ते बघून तर त्यांना कायद्याची शिसारी आली होती. म्हणून यावज्जन्म न्यायालयात पाऊल टाकणार नाही असा निश्चय करूनच ते तेथून बाहेर पडले.

गांधीजी हे मानवतावादी होते. हक्काची आणि कायद्याची भाषा त्यांना कळत नव्हती. स्वातंत्र्य हा माझा हक्क आहे आणि तो मिळेपर्यंत मी झगडणार असे टिळक म्हणत, तर स्वातंत्र्य हे माझे जीवन आहे, पारतंत्र्यात मी मुळी जगूच शकत नाही, ही गांधीजींची भाषा होती. माझ्याभोवती हा जो पिंजरा तुम्ही उभा केला आहे आणि मला येथे डांबून ठेवले आहे तो बेकायदेशीर आहे. त्यातील गज न् गज मी तुमच्याच कायद्याच्या जोरावर मोडून टाकीन असे इंग्रजांना टिळक धमकावीत, तर तुम्हांला मजवर राज्य करण्याचा मुळी नैतिक अधिकारच नाही. तुम्ही जर माझ्या हातातल्या ह्या पारतंत्र्याच्या शृंखला काढल्या नाहीत तर मी असा येथल्या येथे मरून जाईन हा गांधीजींचा युक्तिवाद होता. टिळकांचा इंग्रजांच्या कायद्यावर विश्वास होता, त्यांच्या चांगुलपणावर मुळीच नव्हता, तर त्याच्या उलट गांधीजींचा इंग्रजांच्या चांगुलपणावर विश्वास होता, पण त्यांच्या कायद्यावर मात्र मुळीच नव्हता. ह्या कपटी आणि कावेबाज इंग्रजांच्या तंगड्या मी बरोबर त्यांच्या गळ्यात घालीन आणि त्यांची फटफजिती करून त्याला ह्या देशातून घालवून लावीन, ही टिळकांची जिद्द होती तर ब्रिटिशसत्ता ही सैतानी सत्ता असली तरी माझ्या नैतिक वर्तनाने आणि त्यागाने मी तिच्या हृदयाचे परिवर्तन घडवून आणीन आणि तिला ह्या देशातून सन्मानाने आणि सद्‌भावाने जावयाला लावीन अशी गांधीजींची प्रतिज्ञा होती.

माझे राजसत्तेविरुद्ध बंड नाही. इंग्लंडमधला राजा बदलला जावा असे मी म्हणत नाही. तो एडवर्ड असो वा जॉर्ज असो. परमेश्वराप्रमाणे तो जोपर्यंत अप्रकट आहे तोपर्यंत त्याच्याशी माझे भांडण नाही. माझे भांडण आहे येथल्या व्हाइसरायाशी, गव्हर्नराशी आणि गोऱ्या नोकरशाहीशी. त्यांना येथून काढून टाका आणि माझ्या देशाची सूत्रे माझ्या हातात द्या असे म्हणण्यात राजद्रोह कसा आला ? फार झाले तर तुम्ही मला नोकरद्रोही म्हणा. राजद्रोही म्हणू नका, असा टिळकांचा युक्तिवाद असे. तर गांधीजी म्हणत की माझे भांडण परकीय राजसत्तेशी आहे. ही राजसत्ता मला ह्या देशात नको. ती जोपर्यंत आहे तोपर्यंत तिच्याविरुद्ध मी बंडच करीत राहणार. मी राजद्रोही

आहे. आणि राजद्रोहाचा प्रचार करणे हा माझा धंदा आहे अशी महात्माजींची भूमिका होती.

टिळक आणि गांधी ह्या दोघांवरही राजद्रोहाचे खटले झाले, आणि इंग्रजांच्या दृष्टीने दोघेही ' राजद्रोही ' ठरून त्यांना सहा सहा वर्षांची शिक्षा झाली. पण त्या खटल्यात दोघेही निरनिराळ्या तऱ्हेने वागले. टिळक म्हणाले, " मी राजद्रोहाचा गुन्हा केला नाही. मी निरपराधी आहे. मला सोडा. " गांधीजी म्हणाले, " मी राजद्रोहाचा गुन्हा केला आहे. मी गुन्हेगार आहे. मला जास्तीत जास्त शिक्षा द्या ! "

टिळकांची भाषा इंग्रजांना समजत असे, कारण ते त्यांच्याच भाषेत बोलत. त्यामुळे टिळक कोण आहेत ह्याबद्दल इंग्रजांना कधी संशय पडला नाही. पण गांधीजींची भाषा इंग्रजांना समजण्यासारखी नव्हती. कायद्याची भाषा इंग्रजाला समजते, पण नीतीच्या भाषेने तो गोंधळून जातो. काय करावे हे त्याला कळत नाही.

टिळकांचे आणि माझे मार्ग भिन्न आहेत असे गांधीजी म्हणत. ह्या त्यांच्या म्हणण्याचा पुष्कळांना अर्थ कळलेला नाही. मार्ग म्हणजे साधने नव्हेत. गांधी आणि टिळक ह्या दोघांना दिल्लीलाच जावयाचे होते. दोघेही आगगाडीतून तिकिटे काढूनच जावे असे म्हणत होते. फक्त टिळक कायद्याच्या फाट्याने जावे असे म्हणत, तर गांधीजींचा कायदेभंगाच्या फाट्याने जावे असा आग्रह होता. ह्यापेक्षा काही नाही. आगगाडीमधून बिनतिकिटाने प्रवास करावा किंवा तिच्यातील अधिकाऱ्यांशी धक्काबुक्की अन् दंगामस्ती करावी असे दोघांपैकी कोणाचेही म्हणणे नव्हते. स्वराज्य मिळविण्याची राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी आणि बहिष्कार ही जी तीन साधने टिळकांनी वापरली, त्यांचाच गांधीजींनी थोड्याफार फरकाने स्वीकार केला.

टिळकांचा बहिष्कार आणि गांधीजींचा असहकार ह्यात तत्त्वतः काहीच फरक नाही. टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचे स्वरूप गांधीजींच्या असहकारितेपेक्षा वाटते तेवढे भिन्न नाही, आणि सत्तेचाळीस साली गांधीजींच्या डोळ्यांदेखतच काँग्रेसला टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचे धोरण अखेर स्वीकारावेच लागले. गांधीजी सत्य आणि अहिंसा ही भाषा उघडपणे बोलत असत. ती टिळक नेमक्या त्या शब्दात बोलत नसत, एवढेच काय ते. पण ' टिळकांपेक्षा माझे मार्ग भिन्न आहेत. ' ह्या गांधीजींच्या विधानाचा ह्या एका गोष्टीमुळे पुष्कळांनी

असा विपर्यास केला आहे की, टिळकांना राजकारणात ‘ सत्य आणि अहिंसा ’ मान्य नव्हती. साधनांच्या शुचितेबद्दल त्यांचा विशेष कटाक्ष नव्हता. अन् प्रसंगच पडला तर असत्याचा किंवा हिंसेचा आचार करण्यात आपल्या हातून मोठे पातक घडते आहे, असे त्यांना मुळींच वाटत नव्हते.

केवळ सामान्य माणसांचा टिळकांच्या मार्गाबद्दल असा गैरसमज आहे असे नव्हे, तर आचार्य भागवतांसारख्या चिकित्सक विद्वानांनीसुद्धा “टिळकांचा कर्मयोग ‘ शठे शाठ्यम् ’ या तत्त्वावर तर गांधींचा सत्याग्रह ‘ शठं प्रति सत्यम् ’ या तत्त्वावर उभारला आहे ” असा टिळकांच्या नि गांधींच्या मार्गामधला फरक दाखविला आहे. ‘राजकारणात साधुत्वाने वागून यश मिळत नाही’ असे टिळकांनी एकदा गांधीजींना लिहिले होते. त्यावरून राजकारणात ‘ असाधु ’ वर्तनाचा टिळकांनी पुरस्कार केला आहे असे आचार्य भागवत समजतात. म्हणून टिळकांची भूमिका स्पष्टपणे समजावून घेतली पाहिजे.

टिळकांनी आपल्या सबंध राजकीय आयुष्यात अत्याचाराचे नि वाममार्गाचे अवलंबन वा समर्थन कधीही केलेले नाही. राजसत्तेविरुद्ध सशस्त्र बंड करणे हे टिळकांना महापातक वाटत नव्हते, पण त्यासाठी सर्व राष्ट्राची तयारी व्हावयाला पाहिजे. फुटकळ अत्याचार करून उपयोग नाही असे ते म्हणत. बंडाची तयारी करणे निरर्थक आहे. तो क्षण आला म्हणजे ते आपोआप उद्भवते असा त्यांचा युक्तिवाद असे. परकीय राज्यकर्त्यांवर देशात कोठे एखादा अत्याचार घडला तर गांधीजींप्रमाणे ते त्याचा निषेध करीत नव्हते, पण त्याचे ते अभिनंदनही करीत नव्हते. ‘ अशा अत्याचाराच्या प्रसंगी मी सहानुभूती दाखवावी असे माझे आणि इंग्रजांचे काय मोठे प्रेमाचे नाते आहे ? ’ अशी त्यांची वृत्ती असे.

तथापि, आपल्या भाषणात वा लेखनात असत्याला किंवा हिंसाचाराला उत्तेजन मिळावे असा एक शब्द कधी टिळकांनी लिहिला नाही. चौदा साली तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांनी जो जाहीरनामा काढला त्यात त्यांनी असे स्पष्ट म्हटले आहे की, “ हिंदुस्थानातल्या निरनिराळ्या भागात अत्याचाराचे जे प्रकार घडून आलेले आहेत, ते माझ्या स्वभावाला प्रतिकूल आहेत. इतकेच नव्हे तर अशा कृत्यांच्या योगाने आमच्या राजकीय प्रगतीचे पाऊलही दुर्दैवाने बरेचसे मागे पडले असेही माझे मत आहे. ”

एवढेच नव्हे तर ‘ इंग्रजांचे राज्य उलथून पाडण्यासाठी देशातील अत्या-

चाराच्या कृत्यांना टिळकांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष चिथावणी दिली' असा चिरोलसाहेबांनी आपल्या पुस्तकात त्यांच्यावर जो आरोप केला त्याने आपली बदनामी झाली असे टिळकांना वाटले आणि म्हणून चिरोलवर टिळकांनी बेअब्रूची फिर्याद केली. असे असता 'शठे शाठ्यम्' ह्या तत्त्वाचा किंवा 'असाधु मार्गा'चा टिळकांनी राजकारणात पुरस्कार केला असे आचार्य भागवत कसे म्हणू शकतात ?

टिळक आज हयात असते तर त्यांनी चिरोलप्रमाणे भागवतांवरही अब्रू-नुकसानीची फिर्याद ठोकली असती. 'शठे शाठ्यम्' असे टिळक जेव्हा म्हणत, तेव्हा त्याचा अर्थ "शठाने आपल्या थोबाडीत मारली, तर आपण त्याच्या पाटीत गुद्दा मारावा असे नव्हे." तर शठ जेव्हा आपल्या थोबाडीत मारावयाला येईल, तेव्हा त्याचा हात पकडावा. त्याचा प्रतिकार करावा पण प्रतिकार करताना तो निर्वैर बुद्धीने करावा. त्याच्यावर सूड उगवण्याचा किंवा आपल्या शक्तीचे प्रदर्शन करण्याचा प्रयत्न करू नये असे टिळकांचे म्हणणे होते. दुष्ट माणसाचा आधी साधुत्वाने प्रतिकार करावा. अन् तो यशस्वी नच झाल्यास मग आपण 'जशास तसे' ह्या न्यायाने नव्हे तर 'जितक्यास तितके' ह्या पद्धतीने प्रतिकार करावा, अशी टिळकांची विचारसरणी होती. ह्या विचारात 'शाठ्य' आणि 'असाधुत्व' कुठे आले ?

आचार्य भागवत ह्यांनी गांधीजींच्या सत्याग्रही तत्त्वज्ञानाचे असे स्पष्टीकरण केले आहे की, दुष्टांचा प्रतिकार न करता आपल्या प्रेमाच्या बळावर त्याचे हृदयपरिवर्तन घडवून आणावे हा त्याचा उद्देश होता. टिळकांनी निर्वैरत्वावर जोर दिला तर गांधींनी प्रेमभावनेवर भर दिला. पण दोघांच्या तत्त्वज्ञानात तो फरक नव्हता. दुष्टांचा प्रतिकार करावा किंवा न करावा ह्याबाबत दोघांच्या भूमिकेत अंतर होते. टिळकांना प्रतिकार मनापासून आवडत होता असे नव्हे. पण ते म्हणत की, समाजाच्या अपूर्ण अवस्थेत केवळ 'अपरिहार्य' म्हणून तो केल्यावाचून नाइलाज आहे, तो पण निर्वैर बुद्धीने केला म्हणजे त्यामधला दोष जातो. त्यावर गांधीजींचे म्हणणे असे होते की, 'दुर्जनाची हिंसा ही देखील हिंसाच असल्याने सत्याग्रहाच्या दृष्टीने तो मानवाचा धर्म बनू शकत नाही.' अपरिहार्य परिस्थितीत देखील हिंसा करू नये असा गांधीजींचा आग्रह होता. ह्यालाच 'साधुपणाचे वागणे' असे टिळक म्हणत.

व्यवहारधर्मात यतिधर्माची गल्लत होऊ नये ही टिळकांची दृष्टी होती.

टिळक आणि गांधी ह्यांच्या तात्त्विक दृष्टिकोणात असा मौलिक भेद असला तरी सर्व भूतांचे कल्याण व्हावे हे दोघांचेही समानच उद्दिष्ट होते. म्हणून टिळकांची आणि गांधींची तुलना करताना हा कमी आणि तो श्रेष्ठ, हा साधू आणि तो असाधू अशी तुलना करण्याचा कोणीही प्रयत्न करू नये. 'टिळकांच्या कर्मयोगापेक्षा गांधीजींच्या सत्याग्रहात जीवनाचा अधिक सूक्ष्म विचार केला आहे' हा आचार्य भागवतांचा प्रयत्न आम्हांला अशा स्वरूपाचा वाटतो.

साम्राज्यवादी इंग्रजांचे आणि जातीयवादी मुसलमानांचे 'हृदयपरिवर्तन' गांधीजींच्या 'सत्याग्रहाने' झाले आहे काय ? हा प्रश्न विचारण्यासारखा आहे. स्वातंत्र्यासाठी देशाची फाळणी करणे 'अपरिहार्य' आहे अशी गांधीजींनादेखील शेवटी 'सत्याला' मुरडच घालावी लागली. मग त्यांच्या 'सत्याग्रही तत्त्वज्ञाना'त 'अपरिहार्यते'ला कुठे जागाच नाही असा गवगवा करण्यात काय हशील आहे ? गांधी आणि टिळक ह्यांच्या तात्त्विक भूमिकेतला फरक समजून घ्यावा, पण त्यांची तुलना करू नये. हरिहरांची कसली तुलना करावयाची ? दोघेही महादेव आहेत. त्यांनीच ह्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले, म्हणून दोघेही भारतीय स्वातंत्र्याचे जनक आहेत असेच आम्ही समजतो.

नवयुग : ९-८-१९५३

७

# मामनुस्मर युध्य च।

लोकमान्यांच्या आजच्या या पंचेचाळिसाव्या पवित्र पुण्यतिथीला त्यांचे पुण्यस्मरण कोणत्या सार्थ नि प्रभावी मंत्राने होईल, ह्याचा आम्ही विचार करीत असताना, एकदम आमच्या डोळ्यांसमोर गीतेच्या आठव्या अध्यायामध्ये भगवान कृष्णांनी दिलेला तो तेजस्वी संदेश उभा राहिला. 'तस्मात् सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च!' (म्हणून सर्वकाळी म्हणजे नेहमीच माझे स्मरण करीत जा आणि युद्ध कर.) लोकमान्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात भगवंतांनी दिलेल्या ह्या आदेशाच्या परिपालनाखेरीज दुसरे काही केले नाही. 'माझे सदैव स्मरण कर, आणि ते करीत करीत लढ.' लोकमान्यांनी तसेच केले, जनताजनार्दनाचे स्मरण करून त्यांनी आपली सर्व हयात देशाच्या स्वातंत्र्यासाठी तळहातावर शिर घेऊन लढण्यात घालवली. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध असंतोषाचा भयानक वणवा त्यांनी चाळीस कोटी भारतीयांच्या अंतःकरणात पेटवला, म्हणून महात्मा गांधींना ब्रिटिशांवर असहकाराचे शस्त्र उगारणे सोपे झाले. लोकमान्य झाले नसते तर महात्मा गांधी मुळी झालेच नसते.

गीतेचे रहस्य जर खरोखर कोणाला समजले असेल तर ते फक्त लोकमान्यांनाच! गीतार्थाचे वर्षानुवर्षे मंथन करून त्यांनी त्यातून कर्मयोगाचे रहस्य बाहेर काढले. 'फळाची आशा न धरता तू एकसारखे सतत कर्म करीत राहा' हाच तो कर्मयोग. महात्माजींना संस्कृत फारसे येत नसल्याने त्यांना गीतेचा अर्थ मुळी समजूच शकला नाही. 'अनासक्तियोग' हेच गीतेचे

रहस्य आहे अशी त्यांनी आपली समजूत करून घेतली. ती त्यांची समजूत चुकीची होती. 'फळाची आशा धरू नको' यात अनासक्ती आलीच. पण नुसत्या अनासक्तीने काय होणार ? 'अनासक्तिपूर्वक तू कर्म कर' असा भगवंताचा संदेश आहे. महात्माजींनी कर्मापेक्षा अनासक्तीला जास्त महत्त्व दिले आहे. त्याचा सूड आज सत्तेवर असलेले त्यांचे अनुयायी सत्तेची, सन्मानाची आणि संपत्तीची जास्तीत जास्त आसक्ती धरून त्यांच्यावर उगवीत आहेत.

लोकमान्य कर्माला जास्त प्राधान्य देत होते. कर्म करावयाचे ते अनासक्तिपूर्वक हे खरे, पण कर्म करायचे नसेल तर त्या अनासक्तीला काही किंमत नाही. बरे, कर्म करायचे म्हणजे काय करायचे ? कर्म करायचे म्हणजे परमेश्वराचे स्मरण करून युद्ध करायचे ? आणि युद्ध करायचे म्हणजे तरी काय करायचे ? तर जगातील अन्यायी आणि दुष्ट प्रवृत्तींचा 'प्रतिकार' करावयाचा. दुष्टांशी असहकार करून काही त्या दुष्टांचा विनाश होत नाही. त्यांचा प्रतिकार केल्या-खेरीज त्यांचा पाडाव होत नाही. अनेक हिंस्र आणि दुष्ट व्यक्तींनी आणि प्रवृत्तींनी भरलेल्या या जगात सर्वसाधारण व्यवहारी माणसाने कसे वागावे ह्याचे भगवंतांनी गीतेत जे मार्गदर्शन केलेले आहे, ते लोकमान्यांनी नेमके वेचून जगाला दाखवले आहे.

सर्वभूतहिताच्या म्हणजे एकंदर प्राणिमात्राच्या कल्याणाच्या दृष्टीने आपण वागले पाहिजे. अशा वर्तनाची गुरुकिल्ली म्हणजे 'आत्मौपम्य-बुद्धी'. आपण आपल्या स्वतःशी ज्या रीतीने वागतो त्याच रीतीने आपण दुसऱ्याशी वागावे हा आत्मौपम्य-बुद्धीचा अर्थ. समाजात मनुष्यांनी एकमेकाबरोबर कसे वागावे, यासंबंधीचा हा जो सुलभ आणि व्यापक नियम गीतेने सांगितलेला आहे, त्याचे निरूपण 'गीतारहस्या'त करताना लोकमान्य म्हणतात, "आत्मवत समबुद्धीने दुसऱ्याशी वागत जा, असा एकदा निर्बंध घालून दिल्यावर लोकांवर दया करा, त्यांना यथाशक्ति मदत करा, त्यांचे कल्याण करा, त्यांच्यावर प्रेम करा, त्यांना दुखवू नका, त्यांना फसवू नका, त्यांचे द्रव्य हरण किंवा हिंसा करू नका, असा वेगवेगळा उपदेश करण्याची जरुरी राहात नाही." महात्माजींनी 'सत्य आणि अहिंसा' ह्यांना वेगळे काढून त्यांना इतर गुणांपेक्षा जे अधिक महत्त्व दिले आहे, त्यावरून त्यांना गीतेने उपदेशिलेली 'आत्मौपम्य-बुद्धी' मुळी समजलेलीच नाही हे उघड आहे. म्हणूनच त्यांच्या 'अहिंसे'ने आज देशात एवढा गोंधळ उडवून दिला आहे. 'मामनुस्मर युध्य च' म्हणजे

परमेश्वराला स्मरून युद्ध कर, यात अहिंसा सुचित होतेच. कारण परमेश्वराला स्मरून जो लढतो, तो काही दुसऱ्याच्या प्राणाचे, देशाचे आणि संपत्तीचे अपहरण करण्याच्या बुद्धीने लढत नाही. 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्' म्हणजे क्रोध शांतीने जिंकावा आणि दुष्टास साधुपणाने जिंकावे, असे जरी असले तरी साधुपणाने दुष्टाला जिंकता आले नाही तर ?

इथे लोकमान्य आणि महात्माजी ह्यांच्या तत्त्वज्ञानामध्ये महत्त्वाचा फरक आहे. महात्माजी सांगत की, दुष्टाचे हृदयपरिवर्तन करावे. 'हृदयपरिवर्तन' ही नुसती शब्दांची भुलावण आहे. जगामध्ये आजपर्यंत दुष्टांचे हृदयपरिवर्तन देवांनादेखील करता आले नाही. रावणाचे हृदयपरिवर्तन रामाला करता आले नाही. कंसाचे किंवा दुर्योधन-दुःशासनाचे हृदयपरिवर्तन कृष्णाला करता आले नाही. जीनांचे हृदयपरिवर्तन महात्मा गांधींना करता आले नाही. हिटलर- मुसोलिनीचे हृदयपरिवर्तन दोस्त राष्ट्रांना करता आले नाही. म्हणून 'हृदयपरिवर्तन' ही नुसती फसवणूक आहे. लोकमान्य म्हणतात की, दुष्टाला साधुत्वाने जिंकता आले नाही, तर त्याचा प्रतिकार केला पाहिजे. किती प्रतिकार केला पाहिजे ? जितक्यास तितका ! जशास तसा नाही. एखाद्या माणसाने आपले नाक कापले, म्हणजे आपण त्याचा किंवा त्याच्या भावाचा गळा कापायचा नाही, तर आपण त्याला आपले नाकच मुळीं कापू द्यायचे नाही. म्हणजे तो हातात शस्त्र घेऊन आपल्या अंगावर धावून आला, म्हणजे त्याचे मनगट पकडून त्याच्या हातातले शस्त्र काढून घ्यायचे नि त्याला निःशस्त्र करावयाचे. सूडबुद्धीने प्रतिकार करायचा नाही, यावर लोकमान्यांचा जास्त कटाक्ष आहे.

भारताची फाळणी होण्यापूर्वी मुस्लिम लीगने या देशाच्या निरनिराळ्या भागात जे हिंस्र अत्याचार केले, ते कमरेवर हात ठेवून काँग्रेसवाले नुसते लांबून पाहात बसले. वस्तुतः लोकमान्यांच्या आदेशाप्रमाणे काँग्रेसवाल्यांनी त्यांचा त्या वेळीं जोरदार प्रतिकार करावयाला पाहिजे होता. मुस्लिम लीगच्या अत्याचारापुढे काँग्रेसवाल्यांनी अक्षरशः लोटांगण घातले आणि त्यामुळे देशाची फाळणी करावयाला तयार झाले. 'मामनुस्मर युध्य च' ह्या मंत्रात सांगितल्याप्रमाणे जर काँग्रेसवाले मुसलमानांच्या जातीयवादी अत्याचाराविरुद्ध लढले असते, तर ह्या महान देशाचे तीन तुकडे करण्याची पाळी त्यांच्यावर कदापि आली नसती. 'मामनुस्मर युध्य च' या गीतेच्या संदेशाचे गेल्या सतरा वर्षांत काँग्रेसच्या राज्यकर्त्यांना विस्मरण पडले, म्हणून देशाच्या आणि राज्यकार-

भाराच्या प्रत्येक आघाडीवर त्यांची पिछेहाट झालेली दिसून येते.

देशावर आक्रमण करणाऱ्या शत्रूशी काँग्रेस पक्षीय राज्यकर्ते लढावयाला मुळी तयारच होत नाहीत. या कर्माला काय करावे ? ते 'यूनो'कडे तरी धावतात नाहीतर आक्रमक राष्ट्रांना निषेधाचे खलिते तरी पाठवतात. त्यामुळे भारत हे एक भ्याड राष्ट्र आहे, अशी सर्व जगात त्याची बदनामी झालेली आहे. म्हणून लोकमान्यांच्या या परमंगल पुण्यतिथीच्या दिवशी त्यांनी या देशाला दिलेल्या 'मामनुस्मर युध्य च' या प्रभावी गीतामंत्राचे परिपालन करण्याची प्रेरणा जर आमच्या राज्यकर्त्यांना झाली, तरच यापुढे देशाचा निभाव लागणार आहे. 'सत्यमेव जयते' हे ह्या राष्ट्राचे ब्रीदवाक्य आहे, ते काढून टाकून त्याच्याऐवजी 'मामनुस्मर युध्य च' या ब्रीद वाक्याचा भारताने अंगिकार केला पाहिजे. अंती सत्याचा जय होतो खरा, पण सत्याचा जय होण्याच्या आधी आपला अंत होऊ देता कामा नये, आणि सत्याचा जय काही आपण कमरेवर हात ठेवून विठोबासारखे उभे राहिल्याने होत नाही. सत्यासाठी आपण लढले पाहिजे, सत्यासाठी सत्यानेच लढले पाहिजे, तरच सत्याचा जय होतो. म्हणून लोकमान्यांनी उपदेशिलेला 'मामनुस्मर युध्य च' हाच भारताचा खरा तारक मंत्र आहे.

मराठा : २-८-१९६५

८

# लोकमान्यांचे पुण्यस्मरण !

आज लोकमान्य टिळकांची चव्वेचाळिसावी पुण्यतिथी ! चव्वेचाळीस वर्षे म्हणजे तसा काही फार काळ नव्हे ! पण एवढ्यातच लोकांना टिळकांचे विस्मरण पडले आहे. देशात होऊन गेलेले एक मोठे पुरुष एवढीच लोकांना त्यांच्याबद्दलची ठोकळ आठवण असेल. त्यांच्या कर्तृत्वाचा किंवा विद्वत्तेचा तपशील तर फारच थोड्यांना माहीत असेल. काँग्रेसच्या राज्यकर्त्यांना तर सार्वजनिक सुट्टी देण्याच्या योग्यतेचेसुद्धा ते राष्ट्रपुरुष नाहीत, असे पूर्वी वाटत होते. टिळकांचे स्मरण हा आज एक नुसता उपचार होऊन बसला आहे. महात्मा गांधींपेक्षा मोठा माणूस या देशात कोणी होऊन गेला नाही, अशी आजच्या राज्यकर्त्यांनी जनतेची समजूत करून दिलेली आहे, ती चूक आहे. टिळक झाले नसते, तर गांधी मुळी होऊच शकले नसते. गांधीजी हे भारतीय स्वातंत्र्याचे जनक असले, तर टिळक हे भारतीय राष्ट्रवादाचे जनक होते. स्वातंत्र्याची आरोळी पहिल्यांदा टिळकांनी ठोकली अन् राष्ट्राला जागे केले. मग गांधीजींच्या नेतृत्वाखाली त्या जागृत राष्ट्राने परकीय सत्तेशी लढा देऊन स्वातंत्र्य मिळविले. स्वराज्याच्या लढ्याचे सर्व मंत्र अन् तंत्र टिळकांनी निर्माण केले. गांधीजींनी त्यांना सामुदायिक स्वरूप देऊन प्रभावी बनविले. टिळकांचे महत्त्व गांधीजींनी ओळखले होते, म्हणून त्यांचे नाव घेऊनच त्यांनी आपल्या स्वराज्य मोहिमेला प्रारंभ केला. वस्तुतः भारतीय स्वातंत्र्याचा जेथे जेथे उल्लेख होईल, तेथे तेथे गांधीजींबरोबर टिळकांचे नाव उच्चारणे आवश्यक आहे.

टिळकांनी अन् गांधींनी ह्या आमच्या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले असे म्हणण्याचा आपण प्रघात ठेवला पाहिजे. कारण असे म्हणणे हेच खरे सत्याला आणि इतिहासाला धरून होईल.

भारतीय स्वातंत्र्यवीरांच्या मालिकेत टिळकांचे नाव जसे अलौकिक आहे, त्यापेक्षाही अधिक अर्थाने आधुनिक तत्त्वज्ञान्यांमध्ये टिळकांचे स्थान अद्वितीय आहे. गेल्या शंभर वर्षांत टिळकांइतका तेजःपुंज प्रतिभेचा अन् बुद्धिमत्तेचा पुरुष क्वचितच आढळून येईल. भगवद्गीता हा आपल्या धर्मग्रंथांपैकी एक अत्यंत तेजस्वी अन् निर्मळ हिरा असून सांसारिकांना शांती नि समाधान देऊन पुरुषार्थाची ओळख करून देणारा नि निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा असा दुसरा ग्रंथ जगातल्या कोणत्याही वाङ्मयात सापडणे दुर्मिळ आहे, असे टिळकांनीच 'गीतारहस्या'च्या प्रारंभी सांगितले आहे. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा देऊन ब्रिटिश सरकारने भारतीय तत्त्वज्ञानावर फारच मोठे उपकार केले ह्यात काही शंका नाही. आधुनिक काळात 'गीतारहस्या'सारखा अद्भुत ग्रंथ ह्या भारतवर्षात दुसरा झालेला आम्हांस माहीत नाही. मानवी बुद्धीचा हा एक महान विक्रम आहे. विद्वत्तेने आणि पांडित्याने ह्याजपुढे लोटांगणे घालावीत असा हा प्रतिभेचा चमत्कार आहे. मराठी भाषेच्या ओजाची आणि सामर्थ्याची तर ही परिसीमा होय. ह्यापेक्षा अधिक चांगले मराठी वाङ्मयात काहीही नाही. आम्ही तर असे म्हणतो की, 'ज्ञानेश्वरी' आणि 'गीतारहस्य' ही मराठी साहित्याची कांचनगंगा आणि गौरीशंकर ह्यासारखी अत्युच्च शिखरे होत. ह्या शिखरावर जो कोणी पोहोचला तो खचित मुक्त झाला असे समजायला हरकत नाही. भारतीय तत्त्वज्ञानातले आणि साहित्यातले सारसर्वस्व एकत्र करून टिळकांनी ह्या ग्रंथात मांडलेले आहे. आध्यात्मिक आणि तात्त्विक विचारांचा हा ग्रंथ असून त्यातील विवेचन नाटकापेक्षाही चित्तवेधक आणि भाषा कादंबरीपेक्षाही मनोरंजक आहे.

विज्ञानाप्रमाणे तत्त्वज्ञानात संशोधनाला विशेष अवकाश नसतो. पण गीतासागराचे सतत बेचाळीस वर्षे मंथन करून टिळकांनी त्यातून निष्काम कर्मयोगाचे जे रहस्य बाहेर काढले आहे तो भारतीय तत्त्वज्ञानामधला न्यूटन किंवा आईन्स्टाइन ह्यांच्या तोडीचा जीवनव्यापी शोध आहे. हिंदूंच्या प्राचीन धर्मग्रंथांचे तात्त्विक विवेचन बहुधा ऐहिक संसारापासून अलिप्त असलेल्या ऋषींनी आणि संन्याशांनी केलेले असल्यामुळे त्याजवर त्यांच्या वैराग्यपर अथवा

निवृत्तिपर विचारांची गडद छाया पडलेली आहे. भगवद्‌गीता ही वस्तुत प्रवृत्तिमार्गाचे प्रतिपादन करण्यासाठी लिहिली असतानाही सांप्रदायिकांच्या तडाख्यात सापडल्यामुळे तिच्या अर्थाचा विपर्यास झाला. सर्व कर्म सोडून संन्यास घेतल्याखेरीज मोक्षप्राप्ती होणार नाही, असे गीतेचे तात्पर्य आद्य शंकराचार्यांनी काढले. शंकराचार्यांनंतर जे जे भाष्यकार झाले त्यांनीही गीते-मधून कर्मसंन्यासाचाच संदेश बाहेर काढला. ज्ञानेश्वरांनी गीतेचा स्वतंत्र अर्थ लावण्याचा 'मराठीचिये नगरी' प्रथम प्रयत्न केला, पण तसे करताना त्यांनी पूर्वीच्या 'भाष्यकारांनाच वाट पुसिली.' ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्य सांसारिकां-साठी भक्तिमार्गाचे उद्‌घाटन करून दिले. पुढे महाराष्ट्रातल्या साधुसंतांनी ह्याच मार्गाने जाऊन लोकजागृतीचे प्रचंड कार्य केले हे खरे. पण ह्या सर्व साधुसंतांनी त्याजबरोबर वैराग्याचा आणि कर्मत्यागाचा संदेश दिला हे विसरून चालणार नाही. भगवद्‌गीता कर्मयोगप्रधान आहे, हे ह्यांपैकी कोणीच सांगितले नाही. तो अर्थ बाहू उभारून प्रथम टिळकांनीच भारताला सांगितला. मनुष्याच्या जीवनात पावलोपावली कर्म आणि अकर्म किंवा धर्म आणि अधर्म ह्यांसंबंधी संशय उत्पन्न होतो. अशा वेळीं काय करावे हे मोठमोठ्या बुद्धिमान अन् कर्तृत्ववान माणसांनासुद्धा कळत नाही. मग सामान्य मनुष्याची काय स्थिती होत असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. अशा प्रसंगी सर्वसामान्य नीतिनियमांनी किंवा शास्त्रोक्त मार्गांनी काम भागत नाही. अनेक वाद उत्पन्न होतात. तारतम्याने वागावे लागते ही गोष्ट वैदिक धर्माखेरीज इतर धर्मांनी ओळखलेली नाही, हे टिळकांनी आपल्या 'गीतारहस्या'त सांगितले आहे.

गीतेमधले हे रहस्य गांधींना अजिबात कळलेले नाही. सत्य आणि अहिंसा ह्या दोन पराकाष्ठेच्या नीतिधर्मांवर त्यांनी आपल्या गांधीवादाची उभारणी केली. सत्य, दया, शांती, क्षमा, अहिंसा हे नीतिधर्म समाजाच्या पूर्णावस्थेत अपवाद-रहित आणि नित्य रूपाने शिल्लक राहतात ह्यात संशय नाही. पण समाजाच्या अपूर्णावस्थेत या नीतिधर्मांचे निरपवाद पालन करणे अशक्य आहे. एवढेच नव्हे तर साधू पुरुषांनाही अपवादात्मक नीतिधर्म स्वीकारावे लागले आहेत, ह्याचे टिळकांनी आपल्या ग्रंथात विवेचन केले आहे. 'नास्ति सत्यात् परोधर्मः' एवढी हिंदू धर्मात सत्याची महती गायिलेली आहे. पण ह्या सत्यधर्माला देखील मनुस्मृतीत आणि महाभारतात अपवाद सांगितलेले आहेत. सत्यधर्म हा केवळ शब्दोच्चारापुरता निघालेला नसून ज्या वागणुकीने सर्वांचे कल्याण होते, ती

वागणूक केवळ शब्दोच्चारण अयथार्थ आहे एवढ्याचमुळे गर्ह्य मानता येत नाही, हे टिळकांचे सत्यावरचे भाष्य गांधीजींच्या सर्व सत्यविषयक लेखनात तुम्हांला कोठेच आढळणार नाही. ‘अहिंसा परमो धर्मः’ असे सांगणाऱ्या आपल्या शास्त्रांनी अत्याचारी हिंसकांचा प्रतिकार करू नये, असे कुठेही सांगितले नाही. किंबहुना महाभारतात तर अहिंसेचे खरे पालन आईबापांची सेवा करणारा एक खाटिक करीत होता, असे सांगितले आहे. सत्य आणि अहिंसा ह्या शब्दांना गांधीजींनी अत्यंत ढोबळ अर्थ दिले आणि त्याचे अक्षरशः पालन केले पाहिजे असेच जवळजवळ प्रतिपादन केले. त्यामुळे ह्या दोन सद्गुणांचा आज देशात एवढा बोजवारा उडालेला आहे. मानवाच्या शाश्वत कल्याणासाठी झगडणाऱ्या महात्म्यांनी कर्तव्याग्नीत आपल्या प्राणांची आहुती देणे हे गीतेला मान्य असले, तरी हिंसकांचे हृदयपरिवर्तन व्हावे म्हणून दुर्बल किंवा निःशस्त्र माणसांनी आपले खुशाल बलिदान होऊ द्यावे, ह्या गांधीजींच्या शिकवणुकीला हिंदु-धर्माचा किंवा गीतेचा कोठेही आधार नाही. केव्हाही आणि कोठेही डोळे मिटून आपले सत्याने आणि अहिंसेने वागावे हे गांधीजींचे सांगणे अशास्त्रीय आणि अव्यवहार्य असून सर्वांचे कल्याण होईल अशा समबुद्धीने आपण आपले कर्तव्य करावे, हे टिळकांनी गीतेचे काढलेले तात्पर्यच योग्य आणि श्रेयस्कर आहे.

अहिंसेसंबंधी गांधीजींच्या भोंगळ विचारसरणीने आज देशात एवढा गोंधळ माजवून दिलेला आहे की, अफझुलखानाचा वध करणारे शिवाजीमहाराज हे कित्येक गांधीभक्तांना ‘वाट चुकलेले देशभक्त’ वाटतात. आता काय सांगावे ? एवढेच नव्हे तर भगवद्‌गीतेमधून कर्मयोगाचे रहस्य बाहेर काढणारे लोकमान्य टिळक हेसुद्धा कित्येक गांधीवादी आचार्यांना हिंसावादी आणि शठनीतीचा पुरस्कार करणारे वाटतात. ‘शठं प्रति शाठ्यम्’ ह्या तत्त्वाचा टिळक आपल्या भाषणात आणि राजकारणात नेहमी पुरस्कार करीत असत. त्यावरून गांधी-वाद्यांनी आपली चुकीची समजूत करून घेतली आहे. आततायी पुरुषांना मारल्याने जसा अहिंसाधर्म बिघडत नाही, तद्वत दुष्टांस योग्य शासन केल्याने साधुपुरुषांच्या दयार्द्र बुद्धीस किंवा विश्वकुटुंबीय वृत्तीस काहीच कमीपणा येत नाही. उलट दुष्टांच्या अन्यायाचा प्रतिकार करून इतरांस बचावल्याचे श्रेयमात्र त्यांना मिळते.

ज्या परमेश्वरापेक्षा कोणाचीही बुद्धी सम नाही तो परमेश्वर जर साधूंच्या संरक्षणासाठी नि दुष्टांचा नाश करण्यासाठी वेळोवेळी अवतार घेऊन लोकसंग्रह

करतो, तर इतर पुरुषांची काय कथा ? लोकमान्य हयात असते तर फाळणीच्या खडकावर देशाचे तारू इतक्या असाहाय्यपणे किंवा हताशपणे त्यांनी फुटू दिले नसते अशी आमची खात्री आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही भारताचा जो सर्वांगीण अधःपात झालेला आहे त्यापासून त्याचे रक्षण करून भारताचा उद्धार करण्याचे सामर्थ्यसुद्धा टिळकांच्या ' गीतारहस्या 'तच आहे. लोकमान्य टिळक आज हयात असते तर आजच्या लोकशाहीविरोधी राजवटीविरुद्ध त्यांनी बंड पुकारले असते किंबहुना आज ते हयात असते तर हल्ली जो राजकारणाचा काळाबाजार झाला आहे तो झाला नसता. स्वराज्य म्हणजे स्वभाषेत चाललेले राज्य अशी त्यांची स्वराज्याची व्याख्या होती. म्हणूनच त्यांनी लोकशाही स्वराज्य पक्षाच्या जाहीरनाम्यात भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कार केला नि त्यांच्या या धोरणाचा गांधींनी बेळगाव काँग्रेसमध्ये पुनरुच्चार केला. टिळकांनी कधीही प्रमाद केले नाहीत. गांधींनी हिमालयाएवढा चुका केल्या. पण टिळकांनी चुका केल्या नाहीत. याचे कारण त्यांच्या तत्त्वज्ञानाचा पाया तर्कशास्त्रावर उभारलेला होता. त्यांचे राजकारण शुद्ध व्यवहारवादावर आधारलेले होते. त्यात दांभिकता नव्हती. गांधीजींनी आपल्या राजकारणात नीतिबाजी घुसडली त्यामुळे सर्वत्र ढोंगाचे पेव फुटले ! अंगावर खादीचे कपडे चढवले आणि डोक्यावर गांधीटोपी घातली, की कोणत्याही लबाड माणसाला आजकाल एकदम ' देशभक्त ' बनता येते. लोकमान्यांच्या काळी अंगी विद्वत्ता आणि त्यागबुद्धी असल्याखेरीज कोणालाही राजकारणात स्थान मिळत नसे. गांधीजींच्या राजकारणात विद्वान माणूस औषधालाही सापडणार नाही. सर्वत्र बनिये आणि व्यापारी ह्यांचेच राज्य होऊन बसले आहे. त्यामुळेच अठरा वर्षांत स्वराज्याचा एवढा अधःपात झाला आहे. लोकमान्यांसारखा असामान्य कर्मयोगी नेता जेव्हा पुन्हा कधी ह्या देशाला लाभेल तेव्हाच ह्या भारताचा उद्धार होईल !

मराठा : २-८-१९६४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 70302
ग्रंथ शाखा

१

# मानवतेचे महान दैवत

आज तीस जानेवारी. गांधीजींना जाऊन आज बरोबर एक वर्ष झाले. आज गांधीजींचे पहिले वर्षश्राद्ध. स्वतंत्र भारतातील तीस कोटी जनता आज अत्यंत दुःखित अंतःकरणाने आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी राष्ट्रपित्याचे स्मरण करील. मरण हे माणसाला कधी चुकत नाही. जो मनुष्य जन्माला आला तो केव्हा ना केव्हा तरी मृत्यू पावणार ही गोष्ट तर खरीच आहे. तथापि माणसाच्या आयुष्याचा शेवट योग्य वेळीं आणि नीटपणे झाला म्हणजे तेवढेच दुसऱ्यांना समाधान वाटते. गांधीजींच्या हयातीत त्यांची आणि ख्रिस्ताची तुलना अनेकदा जरी केली जात होती तरी ख्रिस्ताप्रमाणे गांधीजींच्याही आयुष्याचा शेवट क्रूर हत्येने होईल असा कुणाच्या स्वप्नातदेखील विचार आला नसेल. प्रत्येक युगात आणि प्रत्येक देशात अवतारी पुरुषांचा अनन्वित छळ झालेला आहे. तथापि प्रत्येकालाच बंदुकीच्या गोळ्यांनी किंवा लोखंडाच्या खिळ्यांनी मृत्यू आलेला नाही. अनेक महापुरुषांच्या आयुष्यावर काळाने अगदी नाटकातल्याप्रमाणे अतिशय शांतपणे मखमलीचा पडदा टाकलेला आहे. मानवतेच्या कल्याणासाठी ज्यांनी आपल्या रक्ताचे पाणी केले आणि हाडांची काडे केली अशा अनेक महात्म्यांना मोठ्या सुखाचे आणि समाधानाचे मरण प्राप्त झाले असल्याचा दाखला इतिहास देतो.

जगातील अन्याय आणि विषमता नष्ट करण्यासाठी प्रत्येक वेळी आपले प्राण पणाला लावावयाचे हा जरी गांधीजींनी आपल्या जीवनाचा कायदा केलेला

होता, तथापि त्या महान प्रयत्नात अखेर त्यांची आहुती पडेल अशी कोणालाही कल्पना नव्हती. अठ्याहत्तर वर्षांच्या गांधीजींच्या जीवनातील प्रत्येक क्षण न् क्षण अद्भुत आणि अलौकिक होता. त्या त्यांच्या जीवनाच्या अलौकिकतेवर मृत्यू अशा विपरीत तऱ्हेने मात करील याची कोणाला तरी कल्पना होती का? गेल्या वर्षी याच दिवशी एका माथेफिरू मूर्खाने गांधीजींची अमानुष हत्या केली ही गोष्ट त्यांच्या महात्मेपणास साजेल अशीच झाली, कारण त्या हत्येमुळे गांधीजींच्या महात्मतेवर हुतात्मतेचा कळस चढविला गेला असे त्या वेळी कित्येकजण म्हणाले. तथापि हा विचार मागून सुचलेला असल्यामुळे निव्वळ कविकल्पनेपलीकडे त्याला किंमत नाही. गांधीजींचे जीवन हे परतंत्र भारताचे अमर भूषण असले तरी त्यांचे मरण हे स्वतंत्र भारताच्या कीर्तीला कायमचे लागलेले एक लाजिरवाणे लांछन आहे यात मुळीच शंका नाही. प्राचीन ऋषींच्या पुण्याईने, साधुसंतांच्या आशीर्वादाने आणि देशभक्तांच्या तपश्चर्येने भारतवर्षाला मोठ्या कष्टाने प्राप्त झालेले हे अद्वितीय नररत्न त्याला शेवटपर्यंत काही नीटपणे सांभाळता आले नाही अशीच नोंद इतिहासाला करावी लागेल.

या हिंदुस्थानात आजपर्यंत पुष्कळ मोठी मोठी माणसे होऊन गेली असतील. पण कोट्यवधी लोकांनी ज्याच्या प्रत्येक गुणाचे आणि कृतीचे कौतुक केले आणि ज्यावर प्राणापलीकडे प्रेम केले असे गांधीजी हे एकच भारतीय पुरुष होत. मातृभूमीच्या सेवेसाठी गांधीजी ९ जानेवारी १९१५ रोजी आफ्रिकेहून या देशात परत आले. तेव्हापासून तो ३० जानेवारी १९४८ पर्यंत म्हणजे तेहतीस वर्षांतील प्रत्येक क्षण न् क्षण या देशाच्या सेवेसाठी त्यांनी खर्च केला. या जवळजवळ तीन तपांच्या काळात देशाखेरीज त्यांनी जसा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही, तसाच देशानेही त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही पुरुषाचा विचार केला नाही. या कालखंडात गांधीजी जसे देशाशी समरस झाले तसा हा देशही पण त्यांच्या जीवनाशी समरस झाला.

देशाची नाडी गांधीजींनी ओळखली तसे गांधीजींचे अंतःकरणही पण देशाने ओळखले. देशाच्या अंतःकरणात शतकानुशतके दडपलेल्या आकांक्षा गांधीजींच्या मुखावाटे प्रथम बोलक्या झाल्या. देशाच्या पोटात वडवानलाप्रमाणे युगानुयुगे धुमसणारी आग गांधीजींनी प्रथम प्रकट करून दाखविली. वर्षानुवर्षे जे या देशाला बोलावयाचे होते पण जे त्याला बोलावयाचे धैर्य होत नव्हते ते गांधीजींनी प्रथम बोलून दाखविले. त्यामुळे गांधीजी बोलू लागले तसे या



मराठी ग्रंथ संग्रहालय, ...

देशातील लक्षावधी लोक बोलू लागले. गांधीजी चालू लागले तसे या देशातील कोट्यवधी लोक चालू लागले. गांधीजींच्या जीवनाशी सारा भारतवर्ष इतके तादात्म्य पावला की मानवी देहामध्ये प्राणाचे जे स्थान ते भारतीय जीवनात गांधीजींना प्राप्त झाले असे म्हटले तर त्यात मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. एक हडकुळा, पंचा नेसलेला, वृद्ध माणूस हातात काठी घेऊन पुढे चाललेला आहे आणि त्याच्यामागून कोट्यवधी लोक जात आहेत असे दृश्य मानवतेच्या इतिहासात आजपर्यंत कधी कुणी पाहिले नसेल. आजपर्यंत या जगात मानवांचे अनेक नेते होऊन गेले असतील, पण कोट्यवधी लोकांच्या अंतःकरणावर एखाद्या सम्राटाप्रमाणे राज्य करणारा असा गांधीजींएवढा प्रचंड नेता या पृथ्वीतळावर दुसरा कोणी क्वचितच निर्माण झाला असेल.

आजपर्यंत जगामध्ये जे लोकोत्तर महापुरुष होऊन गेले त्यांमध्येही गांधीजींचे स्थान निःसंशय अद्वितीय आहे असेच म्हणावे लागेल. किंबहुना दुसऱ्या कोणत्याही महान पुरुषाशी गांधीजींची मुळी तुलनाच करता येणार नाही असेच गांधीजींचे सारे जीवन घडले. मानवी जीवनाची मूल्ये आणि सामर्थ्ये वाढविण्यासाठी गांधीजींनी जे निरनिराळे संशोधन आणि प्रयोग केले त्याला मानवतेच्या इतिहासात तर दुसरी तोड नाही असेच म्हणावयाला पाहिजे. स्वातंत्र्याचा झगडा आजपर्यंत या जगामधे शस्त्रावाचून कोणी केलेला आहे काय ? पण ही अद्‌भुत गोष्ट गांधीजींनी करून दाखविली आहे. दीडशे वर्षे ब्रिटिश साम्राज्यशाहीने आपल्या पोटात गिळून ठेवलेले या भारताचे स्वातंत्र्य केवळ अहिंसात्मक प्रतिकाराच्या सामर्थ्यावर गांधीजींनी परत मिळवून दाखविले. मानसिक बळ हे तोफांच्या आणि बंदुकीच्या सामर्थ्यापेक्षाही श्रेष्ठ आहे याचे गांधीजींनी जगाला एक महान प्रात्यक्षिक दिले. गांधीजी अवतीर्ण होण्यापूर्वी राजकारण हे एक धूर्तांचे आणि बदमाषांचे क्षेत्र आहे अशी जगाची समजत होती ती गांधीजींनी साफ बदलून टाकली. नैतिक पातळीवर राजकारण आणून ठेवल्यावाचून मानवतेचा उद्धार अशक्य आहे हा महान संदेश गांधीजींनी प्रथम जगाला दिला. भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न नैतिक सामर्थ्याच्या जोरावर सोडवून गांधीजींनी मानवतेला आत्मोद्धाराचा एक प्रभावी मार्ग दाखवून दिला.

प्रत्येक महापुरुषाचा त्याच्या त्याच्या हयातीत अनन्वित छळ आणि उपहास झालेला आहे. पुष्कळ वेळा त्या महापुरुषाचे महात्म्य त्याच्या मरणानंतरच

जगाला पटलेले आहे. गांधीजींच्या हयातीत त्यांना जेवढा विरोध झाला किंवा त्यांची जेवढी विटंबना झाली, तेवढी दुसऱ्याची क्वचितच झाली असेल. त्यांची हत्या ही तर त्यांच्या छळाची परमावधीच होय ! सबंध आयुष्यभर गैरसमजाच्या, टीकेच्या आणि निंदेच्या आगीचा वर्षाव गांधीजींना एकसारखा सहन करावा लागला. असे असूनही गांधीजींएवढे प्रचंड यश कोणत्याही महापुरुषाला त्याच्या डोळ्यांदेखत पाहण्याचे भाग्य क्वचितच लाभले असेल. गांधीजींना वेडे म्हणणारे लोकच स्वतः पागल ठरले. गांधीजींना मूर्खात काढणाऱ्या व्यक्तीच स्वतः महामूर्ख ठरल्या. गांधीजींना बेवकूफ म्हणणाऱ्या टीकाकारांनाच शेवटी गांधीजींना शरण जाऊन त्यांच्या पायांवर डोके ठेवावे लागले ! गांधीजींनी आपल्या विरोधकांची आणि टीकाकारांची जेवढी बंमेरी उडविली आणि फटफजिती केली तेवढी दुसऱ्या कोणीही आजपर्यंत केली नसेल !

सत्याचा आग्रह धरणारा आणि सत्यासाठी लढणारा एवढा शूर आणि निर्भय माणूस आजपर्यंत या पृथ्वीतलावर कधी होऊन गेला नसेल. भय किंवा भीती हा शब्दच मुळी गांधीजींच्या शब्दकोशात नव्हता. आपली बाजू न्यायाची आहे याबद्दल त्यांची एकदा खात्री झाली की, सारे जग जरी आडवे आले तरी ते आपले पाऊल मागे घेत नसत. एका बाजूला एकटे एक गांधी आणि त्यांच्या विरुद्ध बाकीचे सारे राष्ट्र असा देखावा पाहण्याचे प्रसंग काही कमी आले नाहीत. पण प्रत्येक वेळी बहुसंख्य विरोधाला झुगारून देऊन शेवटी गांधीजींनी आपलेच म्हणणे खरे करून दाखविले आहे. संकटांनी निराश होणे, परिस्थितीला शरण जाणे किंवा तडजोडीसाठी तत्त्वाला मुरड घालणे या गोष्टी गांधीजींना अज्ञात होत्या. हिंदुमुसलमानांचे ऐक्य ही एक अशक्य गोष्ट आहे अशीच पूर्वी पुष्कळांची समजत होती आणि देशाच्या फाळणीमुळे तर ती समजूत आता जास्त दृढ झालेली आहे. पण ही राष्ट्राला अशक्य वाटणारी गोष्ट मी शक्य करून दाखवीन ही गांधीजींची जिद्द होती ! हिंदुमुसलमानांच्या हृदयातला परमेश्वर मी अखेर जागृत करून दाखवीन अशी गांधीजींनी प्रतिज्ञा केलेली होती.

गांधीजींच्या जीवितातला हा त्यांचा शेवटचा निदिध्यास होता. ह्या कामी गांधीजींना यश आले नाही देशाची फाळणी झाली आणि गांधीजींचा वध झाला. पण हे गांधीजींचे अपयश नाही किंवा हे गांधीजींचे लांछनही नाही. देशाची फाळणी आणि गांधीजींचा वध ही या देशातील हिंदुमुसलमानांच्या

तोंडाला लागलेली काळोखी आहे! एका महान ध्येयासाठी गांधीजींनी आपल्या प्राणांचा बळी दिला आहे. हे बलिदान काय व्यर्थ झालेले आहे? आम्हाला असे वाटत नाही. भारतवर्षाच्या फुटलेल्या दोन्हीही तुकड्यांना आज ना उद्या केव्हातरी गांधीजींच्या पुतळ्यासमोर अश्रुपूर्ण नेत्रांनी आणि अवनत मस्तकांनी एकत्र येऊन कबूल करावे लागेल की, " गांधीजी, आमच्या हातून भयंकर चूक झाली. आपलेच म्हणणे बरोबर होते. आम्हाला क्षमा करा!"

गांधीजींच्या वैचारिक भूमिकेवर पुन्हा या खंडित देशाचे ऐक्य होईल. एवढेच तऱ्हे तर आज एकमेकांच्या नरडीचा घोट घेऊ पाहणाऱ्या या जगातल्या परस्परविरोधी मानवांच्या कळपांना गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा अंगीकार केल्यावाचून शाश्वत सुख प्राप्त होणार नाही. दोन महायुद्धे लढून मानवतेला अद्यापि शहाणपणा आलेला नाही. तिसरे राक्षसी महायुद्ध हातात ॲटमबॉंब घेऊन आणि गळ्यात नररुंडमाळा घालून वाटचाल करीत आहे. हे तिसरे युद्ध टाळण्याचे सामर्थ्य किंवा दुर्दैवाने ते घडून आले तर त्यामध्ये जळून खाक झालेल्या मानवतेला पुन्हा जिवंत करण्याचे सामर्थ्य केवळ गांधीजींच्या तत्त्वज्ञानात आहे. गांधीजींच्या मृत्यूनंतर आज त्यांचे माहात्म्य जगाने मान्य केलेले आहे, पण गांधीजींचे खरे माहात्म्य जगाला अद्याप पटलेले नाही.

तिसऱ्या महायुद्धाचा प्रलयकाल जेव्हा जगावर ओढवेल तेव्हा साऱ्या मानवतेला गांधीजींच्या नावाने अक्रोश करावा लागेल, आणि त्याच वेळी गांधीजींच्या महात्मतेचा खरा अर्थ जगाला कळून येईल आणि तसे झाले म्हणजे भारतवर्षाच्या जीवनमंदिरात देवस्वरूप पावलेली ही महान विभूती मानवतेच्या मंदिरातले एक दैवत होऊन बसेल! मूर्ख लेकाचा गोडसे, साऱ्या मानवतेने ज्याची पूजा करावी असा, एक दिव्य पुरुष तुमच्या आमच्या नशिबाने आपल्या देशात जन्माला आला होता, त्याला या गाढवाने गोळ्या घालून की हो ठार मारले! पण नको ती आठवण—गांधीजींचे स्मरण करण्याच्या आजच्या या पवित्र दिवशी संतापाचा हा असह्य भडका नको. आमच्या या महान राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या आणि आमच्यावर उपकारांचे उत्तुंग हिमालय रचून ठेवणाऱ्या या अलौकिक महात्म्याच्या चरणी आमची अनंत वंदने आणि असंख्य लोटांगणे असोत!

नवयुग : ३०-१-१९४९

# १०

# गोपाळ कृष्ण गोखले

‘ भारत-सेवक-समाजा ’चे संस्थापक, महात्मा गांधीजींचे गुरू आणि घटनावादी राजकारणाचे महान प्रणेते नामदार गोपाळ कृष्ण गोखले हे एकावन्न वर्षांपूर्वी आज म्हणजे १९ फेब्रुवारी १९१५ रोजी वयाच्या एकुणपन्नासाव्या वर्षी मधुमेहाच्या विकाराने पुणे येथे आपल्या ‘ समाजा ’च्या वास्तूत निधन पावले. तो दिवस आम्हांला अगदी ठळकपणे अजून आठवतो आहे. कारण त्या वेळी आम्ही ‘ फर्ग्युसन कॉलेज ’मध्ये पहिल्या वर्षात नुकतेच प्रविष्ट झालो होतो. गोखल्यांच्या निधनाची वार्ता ऐकताच आम्ही काही विद्यार्थी तडक धावत ‘ भारत-सेवक-समाजा ’त गेलो. तेथे गोखल्यांच्या गौरवर्ण आणि सुंदर पण निश्चेष्ट देहाचे अंत्यदर्शन आम्ही अगदी जवळून घेतले. जिवंतपणी आम्ही गोखल्यांना कधीच पाहिले नव्हते किंवा त्यांचे भाषणही पण कधीच ऐकले नव्हते. आम्हांला घडलेले तेच त्यांचे पहिले नि शेवटचे दर्शन. त्यानंतर गोखल्यांची जी विराट अंत्ययात्रा पुणे शहरातून निघाली, तिच्यात लक्षावधी लोक सामील झाले. जिवंतपणी पुणेकरांनी गोखल्यांची फारशी कदर केली नव्हती, पण त्यांच्या पार्थिव देहाला निरोप देण्यासाठी ओंकारेश्वराच्या स्मशानात जो अमर्याद जनसमुदाय त्या वेळी जमला होता, तो पाहिल्यानंतर पुणेकरांनी आपल्या पूर्वीच्या उपेक्षेची संपूर्ण भरपाई करून टाकली अशीच सर्वांची खात्री झाली.

लोकमान्य टिळक आणि नामदार गोखले ह्यांच्यामधले राजकीय वितुष्ट त्या

काळीं अगदी विकोपाला गेले होते. आधल्याच आठवड्यात ' तुमच्या आमच्या गोवऱ्या आता ओंकारेश्वरावर गेल्या आहेत ' असे बैतागाने टिळकांनी गोखल्यांना उद्देशून उद्गार काढले होते. ते इतक्या तडकाफडकी अक्षरशः खरे ठरतील असे कोणालाच वाटले नव्हते. म्हणून व्याकुळ अंतःकरणाने लोकमान्य टिळक सिंहगडावरून धावत आले आणि गोखल्यांना श्रद्धांजली अर्पण करताना त्यांनी श्रोत्यांच्या काळजांना पीळ पाडणारे भाषण केले. सर रामकृष्ण भांडारकरां-सारख्या वयोवृद्ध विद्वानानेसुद्धा गोखल्यांना श्रद्धांजली वाहिली. माझ्या शेजारी राम गणेश गडकरी बसले होते. त्यांनी कागदाच्या तुकड्यावर तेथल्या तेथे पुढील ओळी भराभर लिहिल्या.

साऱ्या शहर पुण्याची पुण्याई काळवंडली का ही ?
आनंदाची माया हासत खेळत कुठेच का नाही ?
भारतसेवा–मंडल–सदनाभंवती उदास वदनांनी
अश्रूंची पुष्करिणी केली का ? काय जाहली हानी ?
श्री फर्ग्यूसन–मंदिरी शोकाचा पूर लोटला का हा ?
हे भिंतीचे दगडहि रडुन म्हणति सारखेच का ? हा ! हा !

त्या दिवसाचे सारे स्मरण अगदी काल घडल्यासारखे मला आता आहे. टिळक आणि गोखले हे त्या काळीं महाराष्ट्राचेच नव्हे तर भारताचे सूर्य-चंद्र होते. भारताला स्वराज्य मिळावे म्हणून देशातल्या ज्या दोन राजकीय प्रवृत्तींचे द्वंद्वयुद्ध त्या काळी चालू होते, त्यांचा टिळक-गोखले हा एक द्वंद्व समास होता. टिळकांवाचून गोखल्यांना शोभा नव्हती आणि गोखल्यांवाचून टिळकांना तेज नव्हते. दोघांच्या विचारसरणीमधे जेवढा विरोध होता, तेवढेच साम्य होते.

१८८४ साली वयाच्या अठराव्या वर्षी पुण्याच्या ' डेक्कन कॉलेज 'मधून गोखले बी. ए. झाले आणि लागलेच आपटे–आगरकर–टिळक ह्यांनी स्थापन केलेल्या ' फर्ग्युसन कॉलेज 'मधे महिना पाऊणशे रुपयांवर आजन्म सेवक झाले. कॉलेजमधे टिळक आणि गोखले गणितच शिकवीत असत. पुढे नव्वद साली टिळक कॉलेजातून बाहेर पडले, तरीदेखील ' सार्वजनिक सभे 'च्या राजकीय कार्यात दोघेही काही काळ एकत्र वावरत होते. गोखले हे वयाच्या एकविसाव्या वर्षी ' सार्वजनिक सभे 'चे चिटणीस होते. एवढेच नव्हे, तर ' सभे 'च्या इंग्रजी त्रैमासिकाचे ते संपादकही पण होते. पुढे ' सार्वजनिक सभे 'तील रानडे-टिळक पक्षाचे मतभेद विकोपाला गेले. तेव्हा रानडे पक्षीय मंडळीं ' सार्वजनिक सभे '-

तून बाहेर पडली आणि त्यांनी पुण्यात 'डेक्कन सभा' नावाची दुसरी एक राजकीय संस्था स्थापन केली. तिचे गोखले हे चिटणीस झाले. आगरकरांच्या संपादकत्वाखाली निघणाऱ्या 'सुधारका'च्या इंग्रजी विभागाचे गोखले हे चार वर्षे संपादक होते. 'केसरी' आणि 'सुधारक' ह्यांचा एकमेकांवर नेहमी शाब्दिक भडिमार चालू असे. त्यामुळे टिळक आणि गोखले ह्यांचे राजकीय मतभेद एकसारखे वाढत गेले. तरी देखील १८९५ मधे पुणे येथे काँग्रेसचे जे अधिवेशन भरले होते, त्याचे सरचिटणीस दिनशा एदलजी वाच्छा होते, आणि त्यांचे दुय्यम चिटणीस टिळक आणि गोखले हे दोघेजण होते. त्यानंतर मात्र उभयतांमधील राजकीय अंतर इतके वाढत गेले की, पुन्हा ते शेवटपर्यंत एकत्र कधीही येऊ शकले नाहीत. १८९४ सालापासून गोखले ह्यांनी काँग्रेसच्या राजकारणाला सर्वस्वी वाहून घेतले. त्या वर्षी लाहोर काँग्रेसचे नियोजित अध्यक्ष दादाभाई नौरोजी, एम. पी. हे पुण्यास आले असताना नागरिकांनी त्यांची हिराबागेपर्यंत घोड्यांच्या गाडीतून मोठी मिरवणूक काढली. त्या गाडीत गोखल्यांना बसावयाला जागा नव्हती, तरी देखील ते मोठ्या आनंदाने गाडीच्या कोचमनशेजारी बसले, एवढा काँग्रेसबद्दलचा त्यांचा उत्साह अगदी शिगोशिग उचंबळत होता.

न्या. रानडे आणि गणेश व्यंकटेश जोशी ह्यांच्या मार्गदर्शकत्वाखाली गोखले ह्यांनी अर्थशास्त्राचा अत्यंत सखोल अभ्यास करून त्यात पराकाष्ठेचे प्रभुत्व मिळविले. त्यामुळे १८९७ साली 'वेल्बी कमिशन'पुढे भारताच्या वतीने साक्ष देण्यासाठी इंग्लंडमधे त्यांनाच पाठविण्यात आले. ते त्या वेळीं अवघे एकतीस वर्षांचे होते. कमिशनने त्यांना वेडेवाकडे नि आडवेतिडवे प्रश्न विचारून त्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न केला. पण गोखले ह्यांनी त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला बिनचूक उत्तरे देऊन त्यांची बंमेरी उडविली. त्यांच्या साक्षीत त्यांनी भारतीय अर्थशास्त्राच्या इतिहासातील महत्त्वाच्या गोष्टींचे विश्लेषण केले. हिंदी सैन्याची घटना आणि त्यावर होणारा खर्च ह्यांची त्यांनी चांगलीच हजेरी घेतली. कर देणाऱ्या जनतेपेक्षा गोऱ्या नोकरशाहीच्या हितसंबंधांना जास्त महत्त्व देण्याच्या आणि वरिष्ठ नोकऱ्यांमधून हिंदी लोकांना वगळण्याच्या सरकारी धोरणावर त्यांनी कडक टीका केली. ह्याच सुमारास पुणे शहरात प्लेगची भयंकर साथ चालू होती. त्या वेळीं सोजीर लोकांनी नागरिकांवर जे अत्याचार केले, त्यांची भयानक वर्णने पुण्यातील गोखल्यांच्या काही मित्रांनी पत्रातून

त्यांना विलायतेला कळविली. त्यामुळे गोखल्यांचा संतापही अनावर झाला. त्यांनी त्या पत्रांच्या आधारावर 'मँचेस्टर गार्डियन'मधे कडक लेख लिहून हिंदुस्थानातल्या गोऱ्या सैनिकांची निर्भर्त्सना केली. त्यामुळे इंग्लंडमध्ये नि हिंदुस्थानात खूपच खळबळ उडाली. पुढे गोखले जेव्हा परत हिंदुस्थानात आले, तेव्हा गोऱ्या सैनिकांवर त्यांनी विलायतेत केलेल्या आरोपांचा मुंबई सरकारने त्यांना जाब विचारला; पण ज्यांनी गोखल्यांना ही माहिती पुरविली होती, त्यांनी पुरावा देण्याच्या बाबतीत अक्षरशः 'शेपट्या' घातल्या. तेव्हा गोखल्यांना सरकारची माफी मागण्यावाचून दुसरे गत्यंतरच नव्हते. त्यांच्या त्या माफीमुळे त्यांच्या टीकाकारांनी त्यांच्यावर खूपच गहजब केला. पण मित्रांनी विश्वासघात केल्यानंतर कोणत्याही सभ्य आणि स्वाभिमानी माणसाने तोच मार्ग पत्करला असता.

गोखले 'सुधारक' पंथाचे असल्याने आणि त्यानंतर वारंवार ते इंग्लंडला गेलेले असल्याने त्यांच्या टीकाकारांनी त्यांच्या आहाराविहाराबद्दल नाना तऱ्हेच्या अफवा पसरवलेल्या होत्या. पण इंग्लंडच्या पहिल्या वारीत त्यांच्याबरोबर दिनशा एदलजी वाच्छा होते. 'गोखल्यांच्या आठवणी'त ते लिहितात, 'He never forgot that he was a Hindu, who could not touch an egg or even smell a fish. His food consisted of bread, butter, vegetable soup and fruits He would not touch a spoonful of pudding for fear it might be made of eggs.' इंग्लंडमध्ये असताना ते नारिंगी रंगाची जरीची पगडी डोक्याला घालून हिंडत. त्यामुळे ते सर्वांच्या आकर्षणाचा विषय झाले होते. विलायतेत पहिल्या वेळी ते तीनच महिने राहिले, पण ह्या तीन महिन्यांत त्यांनी जॉन मोर्ले, आयरिश होमरूल पक्षाचे नेते जॉन रेडमंड, तर विल्यम वेडरबर्न, टी. पी. ओकॉर्नर, सर विल्यम हंटर ह्या मोठमोठ्या मुत्सद्द्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्याशी हिंदी राजकारणावर सविस्तर चर्चा केली. दादाभाई नौरोजींच्या व त्यांच्या रोज बैठकी होत होत्या.

इंग्लंडहून परत आल्यानंतर त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वामधे आमूलाग्र फरक झाला. १९०१ मधे ते 'मुंबई कायदेमंडळा'त निवडून आले. तेथे गोखल्यांच्या अमोघ इंग्रजी वक्तृत्वाचे प्रथम दर्शन झाले. १९०१ मधे मुंबई जमीन महसूल कायदा दुरुस्तीचे एक विधेयक सरकारने आणले होते. ते तहकूब

करावे म्हणून सर फिरोझशहा मेहतांनी ठराव मांडला. त्याला पाठिंबा देतान गोखल्यांनी एवढे जबरदस्त भाषण केले की सरकारला ते विधेयक मागेच घेणे भाग पडले. १९०२ मधे 'व्हॉइसरॉयच्या कौन्सिल'मध्ये बिनसरकारी सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. छत्तिसाव्या वर्षी गोखल्यांना हा बहुमान मिळाला. सतत सहा वर्षे ते त्या कौन्सिलमधे होते. त्या वेळीं लॉर्ड कर्झन हे व्हाइसरॉय होते. १९०२ पासून तो १९०८ पर्यंत सतत सात वर्षे गोखल्यांनी जी अर्थसंकल्पावर भाषणे केली, तो अर्थशास्त्राच्या व्यासंगाचा, तर्कशुद्ध निर्भय टीकेचा नि वक्तृत्वाचा उच्चांक होता. भारतीय राजकारणाचा अभ्यास करणाऱ्यांना ही भाषणे आजही वाचल्याखेरीज गत्यंतरच नाही. बजेट कसे तयार करावे आणि त्यातील शिलकी रकमा कशा खर्च कराव्यात ह्याचे झणझणीत धडे त्यांनी सरकारला त्या भाषणातून दिलेले होते. स्वतःचा संयम न सोडता, एकही वावगे अक्षर न उच्चारता डोळे पांढरे होईपर्यंत सरकारला कसे ठोसे लगवावेत ह्याचे जणू काही प्रात्यक्षिकच गोखल्यांनी ह्या भाषणातून दिलेले आहे.

१९ सप्टेंबर १९०२ रोजी त्यांनी 'फर्ग्युसन कॉलेज'चा निरोप घेतला. त्या वेळचे त्यांचे भाषण अत्यंत हृदयद्रावक होते. त्या भाषणात त्यांनी समुद्राच्या किनाऱ्यावर राहणाऱ्या एका माणसाची गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "तो माणूस त्या किनाऱ्यावरील आपल्या झोपडीत सुखाने राहात होता. पण त्याचे सारे लक्ष त्या अफाट समुद्राकडे लागलेले होते. एक दिवस त्याचे ते वेड अनावर झाले. तो होडीत बसला आणि सरळ समुद्राच्या प्रवासाला निघाला. तशी माझी आज स्थिती झाली आहे. ह्या कॉलेजात मी सुखासमाधानाने राहात आहे. पण माझे सारे लक्ष सार्वजनिक जीवनाच्या त्या तुफान आणि चंचल सागरावर खिळलेले आहे. माझा 'आतला आवाज' त्या मार्गाने तू जा असे मला सांगतो आहे. म्हणून देशकल्याणासाठी कर्तव्यबुद्धीने मी ह्या कॉलेजचा निरोप घेतो आहे. या देशात फर्ग्युसन कॉलेजपेक्षा दुसरी पुष्कळ कॉलेजे असतील, पण परांजपे आणि राजवाडे ह्यांच्या त्यागाने या संस्थेभोवती जे तेजोवलय निर्माण झाले आहे, ते अपूर्व आहे." अवघ्या तीस रुपये महिना पेन्शनवर गोखले सेवानिवृत्त झाले.

१९०५ साल हे गोखल्यांच्या आयुष्यातले सर्वांत महत्त्वाचे. त्या वर्षी १२ जून रोजी त्यांनी पुण्याला 'भारत-सेवक-समाजा'ची स्थापना केली. नवा भारतवर्ष निर्माण करण्यासाठी त्यागी आणि व्यासंगी समाजसेवकांचा एक

आश्रम स्थापन करण्याची गोखल्यांची ही कल्पना जितकी अभिनव तितकीच प्रभावी होती. ह्यावरून त्यांच्या महान द्रष्टेपणाची कल्पना येते. ह्याच वर्षी व्हॉइसरॉय लॉर्ड कर्झन ह्यांनी बंगालची फाळणी करून साऱ्या भारतवर्षावर जणू काही एक बॉंबगोळाच टाकला. ह्या फाळणीतून स्वातंत्र्यवादी आणि राष्ट्रवादी आंदोलनाचा जन्म झाला. ब्रिटिश मालावर बहिष्कार आणि स्वदेशीचा पुरस्कार ही नवीन अस्त्रे भारतीय जनतेला त्यामुळे प्राप्त झाली. 'वंदे मातरम्' ही राष्ट्रगीताची गर्जना देशाच्या कानाकोपऱ्यातून निनादू लागली. लॉर्ड कर्झनच्या दडपशाहीचा वरवंटा साऱ्या देशाच्या डोक्यावरून फिरू लागला. तेव्हा भारतामधली राजकीय परिस्थिती इंग्लंडमधल्या मुत्सद्द्यांना आणि जनतेला समजावून सांगण्यासाठी गोखले आणि लाला लजपत राय विलायतेला गेले. विलायतेमधे गोखल्यांनी आकाशपाताळ एक केले. पन्नास दिवसांत घसा फाटेपर्यंत त्यांनी पंचेचाळीस व्याख्याने दिली. शेवटी परत येताना बोटीवर त्यांना आपल्या घशावर शस्त्रकर्म करणे भाग पडले. मुंबईत आणि पुण्यात त्यांचा प्रचंड सत्कार झाला. त्या सत्कारात लोकमान्य टिळक सामील झाले. साहजिकच त्या वर्षी वाराणशी येथे भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या विसाव्या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी गोखले ह्यांचीच निवड झाली. त्या वेळी गोखले ह्यांचे वय अवघे एकोणचाळीस वर्षांचे होते. इतका तरुण अध्यक्ष कॉंग्रेसला कधीच मिळाला नाही. मागेही नाही अन् पुढेही नाही. (१९२९ साली नेहरू लाहोर कॉंग्रेसचे पहिल्याने अध्यक्ष झाले. त्या वेळी त्यांना एकेचाळिसावे वर्षे चालू झालेले होते.) वाराणशी कॉंग्रेसचे त्यांचे अध्यक्षीय भाषण अत्यंत ज्वलज्जहाल आणि तडफदार झाले. भाषणाच्या प्रारंभीच त्यांनी लॉर्ड कर्झनची औरंगजेबाशी तुलना केली. नंतर बंगालच्या फाळणीचे त्यांनी वाभाडे काढले. ब्रिटिश मालावर बंगालने घातलेल्या बहिष्काराचे त्यांनी समर्थन केले. स्वदेशीचा पुरस्कार हा देशभक्तीचा परमोच्च आविष्कार आहे असा तिचा गौरव केला. सेक्रेटरी ऑफ स्टेट मोर्ले ह्यांनी भारताचा कसा विश्वासघात केला ते सांगितले. कॉंग्रेसचा ध्येयवाद काय आहे आणि तिला कोणकोणत्या सुधारणा तात्बडतोब हव्यात त्याची रूपरेषा सांगितली आणि भारताच्या भवितव्याचे न्या. रानडे ह्यांनी जे चित्र रेखाटलेले होते, त्याचे दिग्दर्शन करून त्यांनी आपले भाषण संपविले.

वाराणशी कॉंग्रेसनंतर गोखल्यांची राजकीय उंची देशामध्ये शतपटीने वाढली. १९०६ च्या डिसेंबरमध्ये कलकत्ता येथे दादाभाई नौरोजी ह्यांच्या अध्यक्षतेखाली

काँग्रेसचे अधिवेशन भरले. त्यात बंगालच्या फाळणीमुळे खवळलेल्या जहाल मताच्या काँग्रेस तरुणांनी खूपच वादळ माजविले. कदाचित त्याच वर्षी काँग्रेसचे अध्यक्षपद लोकमान्य टिळकांना मिळाले असते. पण बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी त्यांना आडवे आले. तथापि, सर फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बानर्जी आणि अनेक मवाळ मताचे पुढारी ह्यांचा त्या अधिवेशनात अपमान झाला. त्यांना बोलू दिले नाही. ह्या अधिवेशनात ‘ स्वराज्य, बहिष्कार, स्वदेशी आणि राष्ट्रीय शिक्षण ’ ही जी देशोद्धाराची चतुःसूत्री मान्य करण्यात आली, तिचे जनक गोखलेच होते. १९०७ साली गोखल्यांनी संयुक्त प्रांत आणि पंजाब ह्या भागात दौरा काढून स्वदेशी, हिंदुमुसलमान ऐक्य आणि विद्यार्थ्यांची कर्तव्ये यांवर काँग्रेसची भूमिका काय आहे हे निरनिराळ्या शहरांत व्याख्याने देऊन त्यांनी समजावून सांगितले आणि प्रचलित राजकीय परिस्थितीबाबत लोकमत जागृत केले. अलिगडमधल्या मुसलमान जनतेने त्यांचा प्रचंड सत्कार केला.

१९०८ साली सुरतेच्या अधिवेशनात काँग्रेसचे तारू फुटले, आणि टिळक पक्ष काँग्रेसमधून बाहेर पडला. त्यानंतर पुन्हा काँग्रेसच्या कार्याला गोखल्यांनी स्वतःला वाहून घेतले. पुढे लौकरच ते दक्षिण आफ्रिकेत गेले आणि गांधीजींच्या सत्याग्रहाच्या मोहिमेला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला. १९०९ च्या काँग्रेस अधिवेशनात तर गांधीजींच्या सत्याग्रहाची त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आणि त्यांचे मूलभूत तत्त्वज्ञान काव्यमय भाषेत सांगून त्यांनी श्रोत्यांना मंत्र-मुग्ध केले. १९०९ ते १९१४ पर्यंत मध्यवर्ती कायदेमंडळ हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते. १९१४ मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडलेला जहाल पक्ष आणि आत असलेला मवाळ पक्ष ह्यांचे फिरून ऐक्य करण्याचा प्रयत्न झाला. प्रारंभी त्या प्रयत्नाला गोखल्यांचा पाठिंबा होता, पण टिळक काँग्रेसमध्ये आल्यानंतर पुन्हा त्याच जुन्या कटकटी वाढतील आणि कार्यनाश होईल म्हणून गोखल्यांनी नंतर आपला पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे टिळक-गोखले ह्यांच्या पक्षामधले वितुष्ट भलतेच विकोपाला गेले, आणि त्याच वातावरणात काळाने गोखल्यांवर अकस्मात झडप घालून देशाची अपरिमित हानी केली.

गांधीजींनी ज्यांना गुरू मानले, ते गोखले असामान्य कोटीतले स्वार्थत्यागी, चारित्र्यसंपन्न आणि ज्वलज्जहाल देशभक्त होते ह्यात काय शंका ? देशसेवेचे असिधाराव्रत स्वीकारणारे आणि आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्याचे पालन करणारे ते आदर्श भारत-सेवक होते. सरकारने देऊ केलेली ‘ सर ’

पदवी त्यांनी लाथाडली. एवढेच नव्हे तर व्हाइसरॉयाच्या कार्यकारिणीतही जाण्यास त्यांनी नकार दिला. इंग्रजी भाषेतले त्यांचे वक्तृत्व म्हणजे त्यांचे महान सामर्थ्य होते. त्यांच्या वक्तृत्वात वेग होता. गती होती. तेज होते. पण आरडाओरडा आणि धांगडधिंगा नव्हता. अर्थशास्त्र हा त्यांच्या वक्तृत्वाचा पाया. वस्तुस्थिती हे त्यांच्या वक्तृत्वाचे सामर्थ्य. प्राचीन इतिहासाला किंवा भूतकाळातील सुवर्णयुगाला आवाहन करून श्रोत्यांच्या भावना प्रक्षुब्ध करण्याच्या भानगडीत ते कधीही पडत नसत. त्यांचा युक्तिवाद सुस्पष्ट, तर्कशास्त्र अभेद्य आणि पुरावे अचूक असत. टीकाकारांना निरुत्तर करण्याचे जबर सामर्थ्य त्यांच्या वक्तृत्वात असे. न्या. रानड्यांसारख्या साधुपुरुषाचे ते सच्छिष्य होते. परमेश्वरावर त्यांचा पूर्ण भरवसा होता. म्हणून वाराणशी काँग्रेसच्या अध्यक्षीय भाषणाच्या अखेर ते म्हणाले, "सर्व भविष्यकाळ आपल्या डोळ्यांना स्पष्टपणे दिसत नाही, म्हणून निराश होण्याचे कारण नाही.

Our times are in His hand
Who saith 'A whole I planned,'
Youth shows but half,
Trust God, see all, nor be afraid!"

मराठा : २०-२-१९६६

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम.................... दि:

११

# महाराष्ट्राचा सुधारक संत

भारतरत्न महर्षी अण्णासाहेब कर्वे हे आज शतायुषी झाले. शंभर वर्षांचे आयुष्य ह्या भारतीय जीवनाचा आदर्श समजला जातो. ' जीवेत् शरदः शतम् ' हजारो वर्षांपासून ' शतायुषी व्हा ! ' असे आशीर्वाद ह्या देशातील वृद्ध माणसे तरुणांना देत आलेली आहेत. अर्थात हे आशीर्वाद ज्यांच्या बाबतीत सफळ झाले अशी भाग्यशाली माणसे फारच थोडी निघतील हे सांगावयाला नको. शंभर वर्षे जगणाऱ्या माणसांना ' भाग्यशाली ' असे विशेषण वापरताना आमचे मन थोडेसे कचरले खरे. आयुष्याचा मोह ह्या जगात कोणाला सुटला आहे ? जितके जगता येईल तितकी जगण्याची माणसाची इच्छा असतेच. पण शंभर वर्षे जगणाऱ्या सर्वच माणसांना खरोखरच आपण धन्य आहोत किंवा भाग्यवान आहोत असे खरोखरच वाटते काय ? सर्वच सौभाग्यवतींना ' अष्टपुत्रा भव 'चे आशीर्वाद मिळतात, पण हे आशीर्वाद सफल होत असताना किंवा झाल्यानंतर त्या सुखी असतात काय ? शंभर वर्षे जगणे हे सुखाचे असते तर ' शंभर वर्षे भरली ! ' अशी म्हण प्रचारात आली असती काय ? पण इतके सगळे बोलून झाल्यानंतरही ' शतायुषी अण्णा 'सारखा सुखी आणि भाग्यशाली पुरुष आज भारतामधे कोणी नसेल असेच आम्हांला वाटते.

अण्णा ज्या काळात जन्माला आले तो काळ निदान महाराष्ट्रात तरी अल्पायुषी महापुरुषांचा होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर अवघ्या बत्तिसाव्या वर्षी निधन पावले. आगरकर एकोणचाळिसाव्या वर्षी गेले. न्यायमूर्ती तेलंग आणि

नामदार गोखले पन्नाशीच्या आतच कालवश झाले आणि लोकमान्य टिळकांचा काळ जरी चौसष्ठाव्या वर्षी झाला असला तरी ते अल्पायुषी होते असेच म्हणावयाला हवे. ह्या सर्व महापुरुषांचा उदयास्त अण्णांना आपल्या डोळ्यांनी पाहावयाला मिळाला. खरोखरच, अण्णा म्हणजे भारताच्या इतिहासातील एका क्रांतिकारक शतकाचे मूर्तिमंत साक्षीदार आहेत. एवढेच नव्हे, तर महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे ते एक महान शिल्पकार होत.

साठ वर्षांपूर्वी अनाथ स्त्रियांच्या उद्धाराचे जे एक लहानसे रोपटे अण्णांनी एरंडवनामधे लावले त्याचे रूपांतर हजारो महिलांच्या मनीषा तृप्त करणाऱ्या एका प्रचंड कल्पवृक्षामधे झालेले 'ह्याच देही अन् ह्याच डोळा' बघण्याचे भाग्य अण्णांना लाभले ही अण्णांची केवढी मोठी पुण्याई म्हटली पाहिजे. भारतामधून इंग्रजी सत्तेची पाळेमुळे खणून काढण्यासाठी ज्या लोकमान्यांनी सबंध आयुष्यभर हालअपेष्टांचे हालाहल प्राशन केले त्यांना आपला मायदेश स्वतंत्र झालेला डोळ्यांनी पाहण्याचे भाग्य काही लाभलेले नाही. ते भाग्य महात्मा गांधींना लाभले खरे, पण दीडशे वर्षांनी प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचा लाभ भारतामधल्या कोट्यवधी जनतेला कसा मिळेल ह्याची विवंचना करण्यास त्यांनी प्रारंभ केला नाही तोच निर्दय दैवाने त्यांच्या आयुष्याची दोरी मधेच तोडून टाकली. पण अण्णांनी आपल्या आयुष्यात जे जे म्हणून काही मनोरथ रचले होते ते सारे यथासांग पूर्ण होऊन त्यांची संपूर्ण प्रगती आणि समृद्धी झालेली बघण्याइतके निरामय आणि निरपवाद दीर्घायुष्य अण्णांना लाभले. खरोखर स्वर्गातल्या देवांनीसुद्धा हेवा करावा असे स्थान आणि असा मान स्वतंत्र भारतामधे आज अण्णांना प्राप्त झालेला आहे.

अण्णा ज्या काळात जन्माला आले तो काळ भारताच्या इतिहासामधला अत्यंत बिकट आणि भयानक असा होता. गेलेले स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भारताने केलेला पहिला अचाट प्रयत्न पराभूत होऊन धुळीस मिळालेला होता. क्रोधाने आणि अपमानाने बेफाम झालेली इंग्रजांची व्यापारी राजसत्ता भारतीय जनतेवर राक्षसी सूड उगविण्याच्या उद्योगाला लागली होती. देशात सर्वत्र निराशेचे आणि भीतीचे गडद वातावरण पसरले होते. तथापि, भारताला राजकीय दास्यातून मुक्त करणारे लोकमान्यांसारखे क्रांतिकारक वीर ह्याच काळात जन्माला आले. वास्तविक पाहता हा काळ राजकीय कर्तृत्व वा पराक्रम करणाऱ्या पुरुषांच्या अवताराला अनुकूल होता असे असता ह्याच काळात

हिंदुसमाजामधील एका राक्षसी रूढीविरुद्ध बंड करणारा अण्णांसारखा धाडसी सुधारक जन्माला यावा हे मोठे नवल म्हटले पाहिजे. त्या काळीं बहुजन-समाजाच्या मनावर रूढ धर्माचा एवढा जबरदस्त पगडा बसलेला होता की, त्यामध्ये यत्किंचितही हस्तक्षेप करू इच्छिणाऱ्या माणसाचा समाजसुसरीने चावून चावून प्राण घेतला असता. ह्या देशामध्ये अद्यापही अशी विलक्षण परिस्थिती आहे, की राजकीय क्रांतिकारकांना जनता आपल्या डोक्यावर घेऊन नाचते. पण सामाजिक क्रांतिकारांना ती हत्तीच्या पायांनी तुडवते. राजकीय क्रांतिकारकांना जास्तीत जास्त भीती तुरुंगात जाण्याची किंवा फार झाले तर फासावर लटकण्याची, पण सामाजिक क्रांतिकारकांना केवळ जन्मभरच नव्हे, तर पिढ्यान् पिढ्या काळ्यापाण्याची शिक्षा भोगावी लागते अन् रोजच्या रोज मरणापेक्षाही भीषण यमयातना भोगाव्या लागतात. म्हणून राजकीय 'क्रांतिकारकां'च्या तुलनेने समाज सुधारकांची संख्या कोणत्याही काळामध्ये नेहमी अल्पच असलेली आढळून येईल.

अण्णांचा पिंड हा खरोखर संताचा आहे. जगातले दुःख पाहून ज्याचे आतडे कळवळते आणि त्या दुःखाचे निवारण करण्यासाठी जो आपले सर्वस्व त्यांच्या सेवेत अर्पण करतो तो संत अशी आमची संताची अगदी साधी आणि सोपी व्याख्या आहे. इंग्रजांचे राज्य येण्यापूर्वी ह्या देशातली सारीच जनता आंधळी होती असे म्हणावयाला हरकत नाही. समाजात कोण खरा दुःखी आहे हे कोणाला दिसतही नव्हते अन् त्या दुःखाच्या यातना असह्य झाल्यामुळे कोण रडते आहे किंवा विव्हळते आहे हे कोणालाही ऐकू येत नव्हते. पण पारतंत्र्य आले अन् हिंदुसमाजाचे डोळे हळूहळू उघडू लागले. पश्चिमेकडे उगवलेल्या ज्ञानाच्या सूर्याच्या प्रकाशात आपली सारी व्यंगे आणि दोष उघडे पडले. शूद्रांची नि अतिशूद्रांची दुःखे महात्मा फुल्यांना दिसली, तर स्त्रियांची व्यथा आगरकरांनी जाणली. अण्णा हे आगरकरांचे शिष्य. त्यांच्या ओळखीची एक गतभर्तृका वाकडे पाऊल पडल्यामुळे गरोदर राहिली. समाजाच्या भीतीमुळे तिला गर्भपात करावा लागला अन् त्यानंतर आपल्या पातकाचे क्षालन करण्यासाठी ती नरसोबाच्या वाडीला रात्रंदिवस दत्ताची सेवा करू लागली. ती अण्णांच्या एकदा सहज दृष्टीस पडली. त्याबरोबर अण्णांचा जीव कळवळला. त्यांना त्या वेळीं काय वाटले हे त्यांच्याच शब्दांत सांगितलेले बरे. "आम्ही तिजकडे पाहिले. तिनेही आम्हांकडे पाहिले. पुन्हा परस्परांकडे पाहण्याचे धैर्यच

कोणाला होईना. एक चकार शब्दही न बोलता आम्ही दोघे परतलो...त्या बाईने आपल्या पापाचे क्षालन कोठे केले असेल? बिचाऱ्या अर्भकाचे काय झालें असेल? तिचे तिलाच माहीत. बा निसर्गा, कसली अजब मोहिनी तू जीवसृष्टीत भरून ठेवली आहेस? आणि सुधारलेल्या मनुष्यकोटीत पापपुण्याच्या कल्पनेशी तिचा संबंध जोडून देऊन केवढ्या दुःखपरंपरेचे अमोघ बीज तिच्या कोशात लपवून ठेवले आहेस!" त्या दुर्दैवी विधवेच्या दर्शनाने अण्णांच्या आयुष्यामध्ये क्रांती घडवून आणली.

पासष्ट वर्षांपूर्वी हिंदुसमाजात आणि विशेषतः ब्राह्मण जातीमधे विधवेबरोबर विवाह करणे म्हणजे केवढे महापातक होते ह्याची आज कोणालाही कल्पना येणे शक्य नाही. एखाद्या माणसाने आपल्या घरात एक सोडून दहा रखेल्या आणून राजरोस ठेवल्या असत्या तर समाजाला त्याचे काही वाटले नसते. उलट समाजाने त्याच्या 'अनन्यसाधारण पौरुषा'चे कौतुकच केले असते; पण विधवेशी लग्न करावयाचे! हरे राम, समाजाच्या दृष्टीने ह्या अघोर पातकाला सीमा नव्हती आणि क्षमाही नव्हती! अण्णांनी केलेल्या विधवाविवाहाने हिंदुसमाजावर जणू काही बॉंबगोळाच टाकला! मूठभर सुधारक पत्रांनी त्यांचे अभिनंदन केले, पण बाकीची अनेक सनातनी पत्रे वाघाप्रमाणे त्यांच्या अंगावर तुटून पडली. त्यांच्या दुष्ट आणि गलिच्छ टीकेचे काही नमुने इथे देण्यासारखे आहेत.

मुंबईचा 'वार्ताहर' म्हणाला,. "ही वधूवरे—गोदूबाई जोशी ( अठ्ठावीस वर्षे वयाची बालविधवा असून यांच्या केसांची दुष्ट चालीने विटंबनाही झालेली होती. परंतु पंडिता रमाबाईच्या शारदासदनात ह्या जाऊ लागल्यापासून त्यांच्या अंतःकरणात लख्ख उजेड पडला आणि त्या कारणाने त्यांनी आता केशभार बाळगून देहाला सुरूपता आणली आहे ) व फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर धों. के. कर्वे ही होत." पुण्याच्या 'प्रांतिक समाचारा'ने लिहिले, "प्रो. कर्वे ह्यांची प्रकृती साधारण. किंबहुना लक्षात येण्यासारखी अशक्तच आहे. तेव्हा पहिला संबंध सुटला असून हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे जन्माचे सार्थक असा उभय कुळांस पाणी देणारा एक पुत्र असून त्यांनी हा विवाह करून घेतला हे एक गैर झाले." 'पुणे वैभव' तर त्याच्याही पुढे गेला. "ह्यास 'पाट' किंवा 'पुनर्विवाह' ह्यांपैकी एकही नाव देता येणार नाही. वस्तुतः पाहिले तर षड्विकारांच्या स्वाधीन होऊन ज्यांनी आपल्या कुळात कधीही न झालेला प्रकार केला, त्यांच्या

मानसिक धैर्याची तारीफ करणे सुधारक बचांखेरीज इतरांना कधीही शोभावयाचे नाही.” पुण्याच्या ‘श्रीशिवाजी’ने तर कमालच केली. “या विधवात्मदान प्रकरणात धेडगुजरी प्रकार झाला नाही. तेव्हा त्याजपासून होणाऱ्या संततीस ‘क्रॉस ब्रीड’ हे नाव देता येणार नाही. तथापि, आज दहा पंधरा वर्षे तिने वैधव्यात काढून त्या स्थितीस आपलीशी करून घेतली, तिजवर इतका अनुग्रह करण्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या नवीनच तयार झालेलीवर ही अनुकंपा केली असती, तर हल्लीच्या संबंधातील वधूवरांचा आज कित्येक वर्षांचा स्नेहसंबंध असल्याकारणाने जो कमीपणा येतो, तो तरी आला नसता.” धारवाडच्या ‘कर्नाटकपत्रा’ने नवीन शोध लावला! “या पुनर्विवाहाचे पर्यवसान काय होणार म्हणाल तर नवी एक गोळकांची जात पैदा होणार. अशी गोळक जात त्या जुन्या गोळक जातीच्या गुलामांचीही बरोबरी करू शकणार नाही. गोव्यांच्या किरिस्तावांचीच उपमा हिला साजेल.” नाशिकच्या ‘गंगालहरी’नी उधळलेली गटारगंगा तर बघण्यासारखीच आहे. “खऱ्या ब्रह्मबीजी ब्राह्मण बचाकडून असे कधीही व्हावयाचे नाही!”

त्या वेळच्या बहुसंख्य वृत्तपत्रांनी अण्णांवर अशा तऱ्हेची आग पाखडली तर त्यांच्या मुरुड गावामधल्या ग्रामस्थांनी ‘गावकी’ भरवून अण्णांच्या विरुद्ध पुढील ठराव मंजूर केले : (१) धोंडोपंतांना एका बैठकीवर घेऊन बसू नये. (२) ते ज्या सभेत असतील त्या सभेला कोणी जाऊ नये. (३) मे महिन्यामधे ते गावी येऊन आपल्या कवाडीत पुन्हा पाऊल टाकतील तर त्यांचे वडील बंधू भिकाजीपंत ह्यांच्यावर बहिष्कार टाकावा. पहिल्या दोन शिक्षांचे अण्णांना विशेष दुःख झाले नाही, पण वडील बंधूंच्या ज्या घरात त्यांच्या मातोश्री आणि आवडती बहीण राहात होती त्या घरात पाऊलही टाकावयाचे नाही नि आईचे अन् बहिणीचे दर्शनही घ्यावयाचे नाही ही शिक्षा मात्र त्यांना असह्य झाली. त्याबद्दल आत्मवृत्तात ते लिहितात, “आईच्या व अंबाताईच्या दुःखाचा तर कळस झाला. मी त्यांच्या दुःखाचा वाटेकरी होणे अशक्य होते. ह्या सर्व गोष्टींनी माझ्या मनाची स्थिती काय झाली हे माझे मलाच ठाऊक!” आपल्या आश्रमासाठी वर्गणी गोळा करण्याला रस्त्यावरून अण्णा जाऊ लागले की कोणीही सनातनी माणूस त्यांना सरळ हटकून चार शिव्या हासडीत असे. “व्यभिचारावर पांघरूण घालण्यासाठी पुनर्विवाह करून आता हे धंदे आरंभले आहेत काय हो?”

त्याहीपेक्षा अण्णांच्या पत्नीच्या छळाला तर सीमाच नव्हती. त्यांना समाजामधून उघडपणे वावरण्याची देखील चोरी होऊन बसली. वाटेत कुठे कोणाला त्या दिसल्या तर स्त्रिया—विशेषतः विधवा स्त्रिया—त्यांना अगदी उघडपणे विचारीत की, " काय ग, लग्नाच्या वेळीं तुला किती महिने गेले होते ? " एवढा अमानुष छळ करूनही अण्णा आणि आनंदीबाई ह्यांच्या मनावर त्याचा यत्किंचितही परिणाम होत नाही, उलट त्यांचा नवा संसार सुखासमाधानाने चालला आहे हे पाहून तर समाजाच्या संतापाला सीमाच राहिली नाही. मग लोकांनी ह्या उभयता विरुद्ध नाना तऱ्हेच्या कंड्या उठवण्याला प्रारंभ केला. ' ह्या दोघांचे म्हणे पटत नाही. रोज त्यांची भांडणे होतात. दोघेही एकमेकापासून विभक्त होण्याच्या खटपटीत आहेत ' अशा एक ना दोन, अनेक वेड्यावाकड्या भुमका त्यांच्या विरुद्ध उठवण्याची समाजकंटकांनी शिकस्त केली. पण त्या सर्व अग्निदिव्यातून अण्णा आणि त्यांच्या पत्नी मोठ्या धैर्याने आणि संयमाने सुखरूप बाहेर पडल्या.

अण्णांचे व्यक्तिमत्त्व जितके विलक्षण तितकेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. पहिली गोष्ट म्हणजे अण्णांची शरीरयष्टी. ती पहिल्यापासून इतकी क्षुल्लक आणि सामान्य आहे, की पुनर्विवाह करतानासुद्धा त्यांच्या टीकाकारांना आश्चर्य वाटून राहिले की, हा माणूस अशी प्रकृती असताना विधवेशी लग्न का करतो आहे म्हणून. अण्णा कोणाच्याही डोळ्यात भरण्यासारखे नसल्यामुळे ते फार वेळ खुपण्याचा मुळीं प्रश्नच उत्पन्न होत नाही. त्यातून अण्णा पडले अबोल. कधी कोणाच्या तोंडाला लागायचे नाहीत किंवा कधी कोणाच्या वाटेला जावयाचे नाहीत. आपल्याच लहानशा पायवाटेने मुकाटपणे अन् बिनबोभाट जावयाचे हा त्यांचा शिरस्ता. त्यामुळे सनातनी हिंदुसमाज कितीही राक्षसी असला तरी त्या मानाने त्याने अण्णांना फारच कमी छळले असे कबूल करावयाला हवे. त्यातून अण्णांचे वर्तन धुतल्या तांदळासारखे शुद्ध अन् शिस्त पोलादासारखी कठोर. वर्षानुवर्षे अण्णा एकच गोष्ट ठरलेल्या वेळीं आणि ठरलेल्या रीतीने एखाद्या तपस्व्याच्या कठोर निर्धाराने करीत आलेले आहेत. त्यांच्या नियमितपणापुढे घड्याळे झिजली असतील अन् वेळापत्रके फाटली असतील.

लहान मुंग्या प्रचंड वारुळे बांधतात ह्याचे आपणांस आश्चर्य वाटते. पण मातीचे कण जमा करणाऱ्या त्या मुंग्या असंख्य असतात. पण अण्णांनी केवळ एकट्याच्या बळावर एखाद्या मुंगीप्रमाणे वर्षानुवर्षे प्रतिक्षण आणि प्रतिदिन निरलसपणे खपून महाराष्ट्रामधे संस्थांचे अन् कार्यकर्त्यांचे जे प्रचंड वारुळ,

नव्हे पर्वत उभा केला आहे तो आजच्या काळातला एक चमत्कार समजला गेला पाहिजे, आणि एवढे प्रचंड कार्य करून पुन्हा अण्णा आपले नामानिराळे. त्यांना कशाचेच काही नाही. अभिमान नाही, निराशा नाही की दुःख नाही. अण्णांचे वैराग्य आणि अनासक्ती मोठमोठ्या ऋषिमुनींनासुद्धा लाजवील अशीच आहे. शंभर वर्षांच्या आयुष्यात ते एक क्षणभरसुद्धा स्वतःच्या सुखा-साठी किंवा भोगासाठी जगले नाहीत.

स्त्रीजातीच्या उद्धारासाठी अण्णांनी हे जे अभूतपूर्व बलिदान केले त्याला भारताच्या इतिहासात तुलना नाही. स्त्रियांच्या संस्था ह्या देशात चालवणे म्हणजे सर्वांत कठीण गोष्ट. कोणत्या वेळीं काय संकट उद्भवेल हे सांगता येत नाही. त्या दृष्टीने महात्मा गांधींनासुद्धा आपल्या आश्रमामधले स्त्री-पुरुषांचे संबंध निरपवाद राखता आले नाहीत. ते केवळ 'महात्मा' होते म्हणूनच त्यांच्या स्त्री-पुरुष अनुयायांमधले अनन्वित प्रकार झाकून गेले, पण अण्णा गेली पन्नास वर्षे स्त्रियांच्या संस्था चालवीत आहेत पण आजतागायत त्यांनी कधी कोणाचे फट् म्हणून घेतले नाही. आजच्या घटकेला महाराष्ट्रात—नव्हे, भारतात अण्णा हे असे एकच पुरुष आहेत, की ज्यांच्याविरुद्ध एकही शब्द कोणाला उच्चारता येणार नाही. अण्णांनी समाजाच्या कल्याणासाठी आजपर्यंत आपल्या आयुष्याचा जो होम केला त्याचे सर्वांत मोठे फळ हे आहे. उगाच नाही 'भारतरत्न' ही पदवी त्यांच्या पायांवर आपण होऊन येऊन पडली. उगाच नाही भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू त्यांचा सन्मान करण्यासाठी दिल्लीहून आज ह्या नगरमधे येत! म्हणूनच आम्ही प्रारंभी म्हणालो की, महाराष्ट्रात आजपर्यंत कधीही कोणाला जो मान मिळाला नाही असा अभूतपूर्व मान आणि असे अनन्यसाधारण स्थान आज अण्णांनी मिळवले आहे.

शंभर वर्षे वयाचा हा महावृद्ध पुरुष अक्षरशः एखाद्या लहान मुलाप्रमाणे निरागस अन् निर्व्याज आहे असे सांगितले तर आश्चर्य वाटेल! अण्णांच्या ह्या स्वभावाचे वर्णन त्यांच्या पत्नीच्याच शब्दात सांगितलेले बरे! "कर्वे हे खाण्यापिण्याच्या बाबतीत इतके साधे होते म्हणूनच माझे निभले. मी जे खायला घाली ते ते खात. कधी कुठल्याच गोष्टीला त्यांनी नावे ठेविली नाहीत. किंवा अमुक पदार्थ आज असा का झाला नाही म्हणून डोक्यात राख घातली नाही. गार असो, गरम असो, खारट असो, तुरट असो प्रत्येक गोष्ट त्यांनी गोड करून घेतली. अजूनही घेतात. त्यांना सवय अशी कोणतीच नाही. नाही

म्हणावयास फिरण्याची आहे. फिरावयास त्यांना डोंगर किंवा रस्ता हवा असे नाही. घराचा व्हरांडासुद्धा चालतो. कोणी म्हटले, ' हा मासा चांगला आहे. वास येत नाही. खाऊन पाहा ' की ते खाऊन पाहतील. कोणी विचारले, ' दारूची चव पाहता का? तर पितील थोडी. कसलाच आग्रह नाही. "
' बायांनी ' केलेल्या ह्या अण्णांच्या स्वभाववर्णनात त्यांच्या माहात्म्याचे बीज आहे. अण्णासारखे वैराग्यशाली कर्मयोगी ह्या भारतात आजपर्यंत फारच थोडे होऊन गेले असतील. ' पारंपरिक अध्यात्मवादा 'च्या क्षेत्रामध्ये जर अण्णा पडले असते तर आज भारतामध्ये ते सर्वात ' मोठे बुवा ' झाले असते हा विचार आमच्या थट्टेखोर मनात या क्षणी आल्यावाचून राहात नाही. पण अण्णा पडले अत्यंत प्रामाणिक आणि व्यवहारी. जन्मभर पै-पैचा नि कवडी-कवडीचा हिशेब करीत बसले. त्यांनी दाढी राखली ती काही ' बुवाबाजी 'साठी नव्हे. रोजच्या रोज दाढी करण्याची ऐट अन् कटकट नको म्हणून. असो. आज शतायुषी होत असलेल्या ह्या भारताच्या सुधारक संताच्या चरणी महाराष्ट्राच्या वतीने अभिवादन करून आम्ही त्यांचा आशीर्वाद मागतो.

नवयुग : २०-४-१९५८

# १२

# नेताजी

आज तेवीस जानेवारी. नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांची जयंती. नेताजींचे स्मरण झाले की मनाची काय अवस्था होते? काय वाटते जिवाला? पहिला प्रश्न समोर उभा राहतो, तो हा की, नेताजी खरेच मरण पावलेत का जिवंत आहेत? सारे सांगतात की, नेताजी १८ ऑगस्ट १९४५ रोजी तैहोकू (म्हणजे फोर्मोसा) बेटात दोन वाजून अडतीस मिनिटांनी विमानाच्या प्राणघातक अपघातात सापडले आणि रात्री नऊ वाजता मरण पावले. पुढे वीस ऑगस्ट रोजी त्यांच्या शवास त्याच बेटात अग्निसंस्कार देण्यात आला आणि आठ सप्टेंबर रोजी नेताजींचे सहकारी कर्नल हबीबुर रहिमान, जे नेताजींच्या बरोबर विमानात होते, पण जे त्या अपघातातून मोठ्या शर्थीने वाचले, ते नेताजींच्या अस्थी घेऊन टोकियोला आले. त्या अस्थी गेली पंधरा वर्षे जपानच्या रेंकोजी मंदिरात पडून आहेत. ह्यापेक्षा नेताजींच्या मृत्यूचा अधिक पुरावा काय हवा? मग इतकी वर्षे झाली तरी नेताजींच्या अस्थी भारतात का आणल्या जात नाहीत हो?

नेताजींच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी भारत सरकारने ५ एप्रिल १९५६ रोजी एक समिती नेमली. त्या समितीचे अध्यक्ष होते नेताजींच्या 'आझाद हिंद फौजे'चे एक अधिकारी मेजर जनरल शहानवाझ खान अन् नेताजींचे थोरले बंधू सुरेशचंद्र बोस होते त्या समितीचे एक सदस्य. नेताजी आपल्या अखेरच्या प्रवासात आशियाच्या अतिपूर्वेकडील ज्या ज्या भागात गेले, त्या त्या भागात ही समिती गेली, आणि तेथे मिळालेल्या सर्व साक्षीदारांच्या तिने

साक्षी घेतल्या. पण आश्चर्याची गोष्ट ही की, ज्या तैहोकू वेटात विमानाचा अपघात झाला आणि ज्यात नेताजी मरण पावले असे सांगतात, त्या तैहोकू वेटात सदर समिती अजिबात गेलीच नाही. अखेरच्या प्रवासात नेताजींबरोबर विमानामधे जे जे जपानी अधिकारी होते, त्यांना नेताजी विमानात नक्की कोठे बसले होते ह्याचा नकाशा काढावयास सांगण्यात आला. पण त्यांनी काढलेल्या एकाही नकाशाचा दुसऱ्याशी मेळ जमला नाही. जळालेल्या विमानातून नेताजी कसे बाहेर पडले आणि इस्पितळात त्यांना कसे नेण्यात आले ह्याबाबतही निरनिराळ्या साक्षीदारांनी भिन्न भिन्न मते दिली. कोणी म्हणतो की, त्यांच्या संपूर्ण अंगावर कपडे होते, आणि ते जळाले होते. तर कोणी म्हणतो की, ते पूर्णपणे विवस्त्र होते, आणि तशाच नग्नावस्थेत त्यांना इस्पितळात आणण्यात आले. त्यांना अखेर काय औषधोपचार करण्यात आला ह्याबाबत डॉक्टरांच्या साक्षीतही फरक आढळून येतो.

नेताजींच्याबरोबर विमानात तेरा लोक होते. त्यांपैकी त्या अपघातात एकट्या नेताजींखेरीज कोणीही दगावला नाही, हे आश्चर्य नव्हे काय? चारपाच जणांना बारीकसारीक दुखापती होऊन नेताजींबरोबर इस्पितळात आणण्यात आले. पण त्यांपैकी एकानेही नेताजींचे प्रेत डोळ्यांनी पाहिले नाही. कर्नल हबीबुर रहिमानखेरीज नेताजींचे प्रेत पाहिल्याचे प्रत्यक्ष कोणीही सांगत नाही. प्रेतयात्रेमध्ये नेताजींचे शव दफनपेटीतून नेण्यात आले असे सांगतात, पण त्या दफनपेटीचे झाकण शेवटपर्यंत उघडण्यात आले नाही. दफनपेटीसह त्या शवाचे दहन करण्यात आले. दुसरे दिवशी नेताजींची राख आणि हाडे काढण्यात आली. ती मात्र नेताजींची होती ह्याबद्दल सर्वांची खात्री पटली! 'राख' हा नेताजींच्या मृत्यूचा 'शहानवाझ समिती'ला मिळालेला सर्वांत मोठा पुरावा. त्या राखेच्या भांड्याचे आणि ते भांडे जेथे ठेवले आहे, त्या रेंकोजी मंदिराचे चार फोटो मात्र समितीने आपल्या अहवालात न विसरता छापले आहेत. नेताजींच्या प्रेताचा फोटो घेण्यात आला होता, असे कर्नल हबीबुर रहिमान ह्यांनी आपल्या साक्षीत सांगितले खरे, पण नेताजींच्या प्रेताचा तो फोटो समितीच्या अहवालात छापलेला कुठेच आढळत नाही. एवढ्या महत्त्वाचा तो फोटो कुठे बेपत्ता झाला असावा बरे? अखेर 'शहानवाझ चौकशी समिती'ने विमानाच्या अपघातात नेताजी मरण पावले असा आपल्या सर्व चौकशीचा निष्कर्ष काढला.

नेताजींचे बंधू सुरेशचंद्र बोस हे त्या समितीचे सभासद होते, पण त्यांनी तो

निष्कर्ष मान्य केला नाही. त्यांनी भिन्न मतपत्रिका लिहिली. त्यात ते म्हणतात की, 'विमानाच्या अपघातात नेताजी मरण पावले ही एकच गोष्ट सिद्ध करण्याच्या दृष्टीने ज्या ज्या साक्षी मेजर जनरल शहानवाझ ह्यांना अनुकूल वाटल्या, त्या त्या त्यांनी घेतल्या. साक्षीदारांना त्याबाबत ते अगदी उघड उघड सूचना देत होते. त्यांची वृत्ती आणि त्यांचे वर्तन त्यांच्या न्यायालयीन भूमिकेशी अत्यंत विसंगत होते. एखाद्या अत्युत्साही पक्षपात्याप्रमाणे किंवा ज्याला कोणत्याही बऱ्यावाइटाचा विधिनिषेध नाही अशा एखाद्या निर्ढावलेल्या सरकारी वकिलापेक्षाही त्यांचे वर्तन अत्यंत वाईट होते.'

पण सगळ्यात गंमतीची गोष्ट ही की, ह्याच मेजर जनरल शहानवाझांनी २३ जानेवारी १९५१ रोजी कलकत्ता येथे एक लाख बंगाली लोकांच्या सभेत भाषण करताना, 'पुढील जयंतीच्या पूर्वी नेताजी आपल्यामधे येऊन दाखल होतील अशी माझी श्रद्धा आहे', असे उद्गार काढले होते. म्हणजे एकावन्न साली नेताजी जिवंत असल्याची ज्या गृहस्थाला खात्री होती, तोच गृहस्थ काँग्रेसमधे शिरून नेहरूंच्या मंत्रिमंडळाचा एक सदस्य झाल्यानंतर सत्तावन्न साली 'विमानापघातात नेताजी निश्चितपणे मरण पावल्याबद्दल' छातीवर हात मारून निर्वाळा देऊ लागला!

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर युद्धगुन्हेगारांची चौकशी करण्यासाठी जे एक आंतरराष्ट्रीय न्यायमंडळ नेमण्यात आले होते, त्यामधे न्यायमूर्ती डॉ. राधाविनोद पाल हे भारताचे एक प्रतिनिधी होते. ते जपानमधे अनेक वर्षे राहिले होते. तेथे असताना नेताजींच्या मृत्यूसंबंधी त्यांनी अत्यंत बारकाईने चौकशी केली होती, आणि त्या बाबतीतील आपले मत त्यांनी टोकियोच्या श्री. ए. एम. नायर ह्या एका गृहस्थांना जे कळविले ते असे. "फोर्मोसा बेटात नेताजी मरण पावले ह्या गोष्टीची सत्यता मी मान्य करू शकत नाही. काही असले तरी ह्या सर्व प्रकरणाची अत्यंत कसून चौकशी व्हावयाला पाहिजे. सुभाषबाबूंच्या मृत्यूबाबत प्रचलित असलेल्या गोष्टींच्या सत्यतेबद्दल काही व्यक्तींनी केलेल्या त्रोटक विधानांनी माझी खात्री पटणार नाही. या सत्यतेबाबत संशय घेण्यासारखी मजजवळ कारणे आहेत." नेताजींच्या मृत्यूच्या चौकशीसाठी भारत सरकारने जी समिती नेमली त्या समितीचे अध्यक्षपद डॉ. राधाविनोद पाल ह्यांना देण्यात यावे अशी शिफारस पंडित नेहरूंना करण्यात आली, पण नेहरूंनी ती अमान्य केली. कारण, विमानापघातात नेताजी मरण पावले आहेत, असे ठरविण्यासाठी



मराठी ग्रंथ संग्रहालय, ...
अनुक्रम........................ नि: ..............

जेथे नेहरूंनी सदर समिती नेमली, तेथे विमानापघात मुळीं झालाच नाही अशी ज्यांची मनोमन खात्री आहे, त्या डॉ. राधाविनोद पालसारख्या गृहस्थाला त्या समितीवर नेहरू कसे नेमतील बरे ?

असो. कर्नल हबीबुर रहिमान आणि ‘शहानवाझ समिती’ ह्यांच्या मते १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी तैहोकू बेटात विमानापघातात मरण पावले. पण सुभाषबाबूंच्या विमानी अपघाताची ब्रिटिश आणि अमेरिकन सरकारच्या गुप्तहेर खात्याने त्या काळीं जी चौकशी केली तिच्यात त्यांनी असे म्हटले आहे की, “हबीबुर रहिमान ह्यांचा वृत्तांत असमाधानकारक आहे. विमानापघाताची त्यांनी प्रथम टोकियोमध्ये जी हकीगत सांगितली आणि मागाहून नंतर ते जी हकीगत सांगू लागले, त्यात प्रचंड विसंगती आहे. कर्नल रहिमान हे नेताजी-बरोबर विमानात होते असे सांगण्यात येते. त्यांचे हात आणि तोंड भाजलेले दिसते. पण हा काही निर्णायक पुरावा नव्हे. ह्या जखमा त्यांना दुसऱ्या अपघातात झाल्या असण्याचा संभव आहे.” कर्नल हबीबुर रहिमान ह्यांची साक्ष किती बनावट असावी ह्यावर प्रकाश टाकणारा दुसरा आणखी एक पुरावा मिळतो. विमानाच्या अपघातात नेताजींच्या हातातले जळालेले एक ‘रिस्टवॉच’ कर्नल रहिमान ह्यांनी भारतात आणले, आणि नेताजींची आठवण म्हणून पंडित नेहरूंना त्यांनी ते नजर केले. नेहरूंनी ते घड्याळ नेताजींचे थोरले बंधू शरच्चंद्र बोस ह्यांना भेट म्हणून दिले. हे ‘जळके घड्याळ’ नेताजींच्या मृत्यूचा पुरावा म्हणून पुढे करण्यात आले. हे घड्याळ कर्नल रहिमान ह्यांना कसे मिळाले ? ते म्हणाले, ‘ज्या जपानी इस्पितळात नेताजी मरण पावले, त्या इस्पितळाचे डॉक्टर योशिमी ह्यांनी ते घड्याळ त्यांना दिले. डॉक्टर योशिमी ह्यांना त्याबद्दल जेव्हा विचारण्यात आले, तेव्हा ते म्हणाले, ‘मला त्या घड्याळाबद्दल काहीही स्मरत नाही.’ पण सगळ्यात गंमतीची गोष्ट ही की, हे जळके घड्याळ चौकोनी आकाराचे होते आणि नेताजींचा नोकर कुंदनसिंग ह्याने आपल्या साक्षीत असे सांगितले की, ‘नेताजी चौकोनी आकाराचे घड्याळ कधीही वापरीत नसत.’ आता ह्यावर कोणाला काय म्हणावयाचे आहे ?

सारांश, नेताजींच्या विमानापघातातील मृत्यूसंबंधी जे जे पुरावे पुढे आले आहेत, त्यांची जशी जशी छाननी करावी तशी तशी त्यांचा मृत्यू म्हणजे एक विलक्षण कपोलकल्पित कादंबरी आहे असे वाटू लागते. आता हा आमचा सर्व युक्तिवाद वाचून कोणी आम्हाला विचारील की, ‘जर नेताजी त्या विमाना-

पघातात मेले नाहीत असे तुम्ही म्हणता, तर मग त्यांचे पुढे काय झाले? कुठे आहेत ते? ह्या सर्व गोष्टीला आता पंधरा वर्षे होत आली. नेताजी जिवंत असते तर आतापर्यंत ते भारतात परत नसते का आले? ज्या अर्थी ते आले नाहीत त्या अर्थी ते मरण पावले असले पाहिजेत हे अगदी उघड आहे.' ह्याला आमचे उत्तर असे आहे की, एखादा माणूस वर्षानुवर्षे स्वदेशी परत आला नाही, म्हणजे तो मरण पावला असा त्याचा थोडाच अर्थ निघू शकतो? समजा, आज नेताजी पृथ्वीतलावर कुठे जरी असले, तरी त्यांनी भारतात केव्हा परत यावयाचे हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांच्या विराट योजनेचे आकलन तुम्ही आम्ही लहान माणसे कसे करू शकणार? आज नेताजी जिवंत आहेत की नाहीत आणि असेलच तर ते कुठे आहेत ह्या प्रश्नांना आम्हीच काय, पण कोणीही उत्तरे देऊ शकणार नाही; पण एक गोष्ट मात्र छातीवर हात मारून आम्ही सांगू शकतो. ती ही की, १८ ऑगस्ट १९४५ रोजी तैहोकू बेटात विमानाच्या अपघातात नेताजी मरण पावले ही धादांत खोटी गोष्ट आहे. इंग्रज आणि अमेरिकन सरकारचे तेच मत आहे, आणि न्यायमूर्ती डॉ. राधाविनोद पाल ह्यांचेही तसेच मत आहे. पण त्या अपघातात नेताजी मरण पावले ह्याबाबत पंडित नेहरूंची मात्र पूर्ण खात्री आहे. २ मार्च १९५२ रोजी लोकसभेत नेहरू म्हणाले, "नेताजी सुभाषचंद्र बोस मरण पावले याबद्दल माझ्या मनात मुळीच संशय नाही. तेव्हाही नव्हता. आजही पण नाही. म्हणून मी म्हणतो की, नेताजींचा मृत्यू ही संशयातीत आणि निश्चित गोष्ट आहे. त्याची चौकशी-सुद्धा करण्याचे कारण नाही." आणि एवढी खात्री असूनही नेहरूंनी छप्पन्न साली नेताजींच्या मृत्यूबद्दल चौकशी करण्यासाठी सरकारी समिती नेमली! यातच ज्यांना काही समजावयाचे ते त्यांनी समजावे. नेताजींचे रहस्यमय भवितव्य जेव्हा प्रकाशात येणार असेल तेव्हा येईल, पण भारताच्या इतिहासात नेताजी हे अमर आहेत हे त्रिवार सत्य आहे.

मराठा : २३-१-१९६१

# १३

# नेताजी आणि नेहरू

आज नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांची जयंती आहे. नेताजींच्याबद्दलची आमची मते सुप्रसिद्ध आहेत. १८ ऑगस्ट १९४५ रोजी तैहोकू येथे विमानापघातात ते मरण पावले ही जी सार्वत्रिक समजत आहे ती खोटी असून, साम्राज्यवाद्यांच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठी त्यांनी आपल्या मृत्यूची ती एक कादंबरी त्या वेळीं रचली होती. नेताजी आज हयात असून कुचबिहार जिल्ह्यातील फालाकाटा गावी असलेल्या शौलमारी आश्रमाचे संचालक साधू श्रद्धानंदजी म्हणून जे आहेत, तेच नेताजी आहेत ह्याबद्दल आमच्या मनात तिळमात्र शंका नाही. मग ते का प्रकट होत नाहीत ह्या प्रश्नाला उत्तर नाही. असामान्य कोटीतले महापुरुष कोणती गोष्ट का करतात आणि कोणती गोष्ट का करीत नाहीत ह्याची चिचक्षणा सामान्य माणसांनी करू नये. त्यांनी धीर धरावा आणि वाट पाहावी. पण त्याबद्दल आज आम्ही लिहिणार नाही. नेताजी आणि नेहरू ह्यांना एकमेकांविषयी काय वाटत होते ( आणि अजून काय वाटते ? ) हा आजच्या आमच्या अग्रलेखाचा विषय आहे. ह्याचा विस्तार आम्ही पुढे मागे करू. आज अगदीच त्रोटक स्वरूपात लिहितो.

१९२८ साली मद्रासच्या काँग्रेसच्या अधिवेशनात पं. नेहरू आणि सुभाषचंद्र बोस यांची काँग्रेसच्या सरचिटणीसपदावर नेमणूक झाली. प्रारंभी पंडित नेहरू आणि सुभाषबाबू ह्यांची भयंकर गट्टी होती. पंडित मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या कमिटीने ' डोमिनियन स्टेट्स ' ( ब्रिटिश साम्राज्यांतर्गत

स्वराज्य )च्या ज्या ध्येयाची शिफारस केली होती, त्याला उभयतांचा कट्टर विरोध होता. कलकत्याच्या काँग्रेस अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव सुभाषबाबू आणणार होते, पण महात्मा गांधींनी तडजोडीचा ठराव मांडला की, "सध्या आपण 'डोमीनियन स्टेट्स'चा ठराव मान्य करू या. तो जर ३१ डिसेंबर १९२९ च्या आत ब्रिटिश पार्लमेंटने मान्य केला नाही तर मग आपण ब्रिटिश सरकारविरुद्ध असहकारितेची आणि करबंदीची चळवळ करावयाला मोकळे आहोतच." ह्या ठरावाला सुभाषबाबूंनी उपसूचना मांडली की, "संपूर्ण स्वातंत्र्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही ध्येयाला आम्ही मान्यता देणार नाही." त्या उपसूचनेला जवाहरलालांनी पाठिंबा दिला. ती उपसूचना प्रचंड बहुमताने पास होऊन महात्माजींचा मूळ ठराव नापास झाला असता, पण तसे झाले असते तर महात्माजी त्रागा करून काँग्रेसमधून बाहेर पडले असते. म्हणून त्यांची अब्रू राखण्यासाठी सुभाषबाबूंनी आपल्या उपसूचनेबद्दल आग्रह धरला नाही आणि म्हणून ती नापास झाली.

त्यापुढचे १९२९ चे काँग्रेसचे अधिवेशन लाहोरला भरणार होते. देशामधल्या डाव्या आघाडीचा जोर वाढत चालला होता. नेहरू आणि सुभाषचंद्र ह्यांच्या अध्यक्षतेखाली देशामध्ये ठिकठिकाणी युवक परिषदा भरत होत्या. त्यामुळे महात्माजी चिंतेत पडले. काँग्रेसमधल्या डाव्या मंडळींचे सामर्थ्य जर असेच वाढत राहिले तर काँग्रेसची सूत्रे आपल्या हातून जाणार हे महात्माजींनी अचूक ओळखले. म्हणून काँग्रेसमधल्या डाव्या आघाडीची ही अभेद्य फळी फोडण्याचे एक भयंकर कारस्थान महात्माजींनी रचले आणि ते हे की, त्या डाव्या आघाडीतून त्यांनी जवाहरलाल नेहरू ह्यांना फोडून निराळे काढले आणि लाहोर काँग्रेसच्या अध्यक्षपदावर त्यांची निवड केली. गांधी आणि जवाहरलाल ह्यांच्या 'राजकीय गट्टी'चा येथून खरा प्रारंभ झाला, आणि तेव्हापासून काँग्रेसमधल्या डाव्या गटाशी जवाहरलाल नेहरूंचा संबंध सुटला आणि सुभाषबाबूंच्या नि त्यांच्या राजकीय विरोधाला सुरुवात झाली. डाव्या गटातून जवाहरलाल गेल्यामुळे त्या गटाची बाजू लंगडी पडली खरी, पण लाहोरच्या काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर केला, हा खरे पाहता डाव्या गटाचा म्हणजे सुभाषबाबूंचा प्रचंड विजय होता. लाहोरच्या अधिवेशनात जवाहरलालांच्यापेक्षा सुभाषबाबूंच्याच क्रांतिकारक व्यक्तिमत्त्वाचा सर्वांच्या मनावर अधिक प्रभाव पडला.


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ.
अनुक्रम

१९३१ मधे सरदार पटेल ह्यांच्या अध्यक्षतेखाली कराचीची कॉंग्रेस भरली. त्याच दिवशी ब्रिटिश सरकारने भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु ह्यांना फाशी दिले. जनतेचा क्रोध अनावर झाला. गांधीजी कराचीला आले तेव्हा त्यांना काळीं निशाणे दाखविण्यात आली. कराचीत भरलेल्या ' नवजवान परिषदे 'च्या अध्यक्षस्थानावरून सुभाषबाबूंनी गांधीजींची सडकून हजेरी घेतली. १९३७ सालापर्यंत सुभाषबाबूंची लोकप्रियता कळसाला जाऊन पोहोचली होती. भारता-मधील कोट्यवधी लोकांच्या तोंडी त्यांचे एकट्याचेच नाव खेळत होते. त्यामुळे १९३८ च्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षपदी सुभाषबाबू ह्यांची बिनविरोध निवड झाली. हे हरिपुरा अधिवेशन फारच गाजले. त्यानंतर पुढल्या वर्षात सुभाषबाबूंनी देशभर दौरा काढून जनतेत प्रचंड जागृती घडवून आणली. एक वर्ष बोल बोल म्हणता निघून गेले. त्रिपुरी कॉंग्रेसचा समय समीप येऊन ठेपला. कॉंग्रेसमधल्या डाव्या आणि उजव्या शक्तींचा संघर्ष विकोपाला गेला. त्रिपुरी कॉंग्रेसचे अध्यक्षपद जर सुभाषबाबूंना पुन्हा मिळाले तर कॉंग्रेसमधून आपल्याला गाशा गुंडाळावा लागेल, अशी कॉंग्रेसश्रेष्ठींच्या छातीत धडकी बसली. म्हणून सुभाषबाबूंच्या अध्यक्षपदाला त्यांनी कसून विरोध करावयाचे ठरविले. त्यांनी त्यांच्याविरुद्ध डॉ. पट्टामि सीतारामय्या ह्यांना उभे केले. पण सुभाषबाबूंनी पट्टामीचा २०३ मतांनी पराभव केला. तेव्हा गांधीजींनी पत्रक काढले की, ' हा पट्टाभींचा पराभव नसून व्यक्तिशः माझा पराभव आहे.' सुभाषबाबूंशी असहकार करण्यासाठी कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीवरील बारा सभासदांनी ताबडतोब राजीनामे देऊन टाकले.

त्रिपुरी अधिवेशनाचे वेळीं सुभाषबाबू अतिशय आजारी होते. पण कॉंग्रेस-श्रेष्ठींनी त्यांची पदोपदी अवहेलना आणि अडवणूक करण्याचा प्रयत्न केला. गांधीजींच्या नेतृत्वावर विश्वास प्रकट करणारा आणि त्यांच्याच सल्ल्याने कॉंग्रेसच्या अध्यक्षाने आपली ' वर्किंग कमिटी ' निवडावी अशी शिफारस करणारा ठराव त्यांनी पास करून घेतला. हा ठराव म्हणजे सुभाषबाबूंवरील अविश्वासाचाच ठराव होता. त्रिपुरीचे अधिवेशन कसेबसे संपवून सुभाषबाबू कलकत्त्याला परत गेले. वर्किंग कमिटी नेमण्याबाबत गांधीजींनी सुभाषबाबूंशी असहकार केला. शेवटी सुभाषबाबूंनी अ. भा. कॉंग्रेस कमिटीची बैठक कलकत्त्याला आपल्या घरी बोलाविली. त्या बैठकीत तडजोडीचे सर्व प्रयत्न विफल झाल्यामुळे देशाचे ऐक्य अबाधित राहण्यासाठी सुभाषबाबूंनी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन

टाकला, आणि त्यांच्या जागी राजेंद्रबाबूंची निवड झाली. पुढे काही दिवसांनी कॉंग्रेसच्या आज्ञेविरुद्ध बंगालमधे सुभाषचंद्र ह्यांनी सत्याग्रह करून कॉंग्रेसचा शिस्तभंग केला, ह्या आरोपावरून त्यांना बंगाल प्रांतिक कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून दूर करण्यात आले, एवढेच नव्हे तर तीन वर्षेपर्यंत कोणत्याही कॉंग्रेस कमिटीचे सभासद होण्याची त्यांना मनाई करण्यात आली. लागोपाठ दोन वर्षे कॉंग्रेसचा अध्यक्ष होण्याचा थोर मान ज्याला लाभला त्या सुभाषचंद्रांसारख्या श्रेष्ठ पुरुषाची कॉंग्रेसमधून हकालपट्टी करून महात्मा गांधींनी त्यांच्यावर 'अहिंसात्मक' सूड उगवला.

महात्माजींच्या ह्या सुभाषविरोधी कारस्थानात पंडित नेहरू हे भागीदार होते. कॉंग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर देशत्याग केल्यावाचून त्यांना गत्यंतरच उरले नाही. भारतामधून अकस्मात नाहीसे होऊन जेव्हा सुभाषबाबू जपानमध्ये प्रकट झाले, तेव्हा 'देशद्रोही' म्हणून त्यांची जास्तीत जास्त बदनामी जर कोणी केली असेल तर ती जवाहरलाल नेहरूंनी. वस्तुतः, सुभाषबाबूंची आणि त्यांची वीस वर्षांपेक्षाही अधिक काळपर्यंत मैत्री होती. सुभाषबाबूंच्या ज्वलज्जहाल देशभक्तीची त्यांना पूर्णपणे ओळख होती. असा महान देशभक्त पुरुष भारताच्या शत्रूंशी संगनमत करणे शक्य आहे काय याचा क्षणमात्र विचार न करता १९४२ साली पंडित नेहरूंनी सुभाषबाबूंना जाहीर आव्हान दिले की, "जपानी सैन्याचे सेनापतित्व पत्करून जर सुभाषचंद्रांनी भारतावर स्वारी केली, तर मी त्यांच्याशी लढेन!" वाहवा, पंडितजींच्या शौर्याची आणि पराक्रमाची काय तारीफ करावी? पंडितजींच्या या आव्हानाच्या लक्षावधी सचित्र प्रती छापून ब्रिटिशांनी त्या वेळी या देशात वाटल्या.

लाल किल्ल्यात 'तीन आझाद हिंद वीरां'वर जेव्हा ब्रिटिशांनी लष्करी खटला भरला, तेव्हा आपला जुना बॅरिस्टरी झगा खांद्यावर टाकून त्यांच्या कायदेशीर रक्षणाला धावून जाण्याचे नाटक नेहरूंनी केले खरे, पण लाल किल्ल्यावर तिरंगी झेंडा फडकावण्याच्या सुभाषबाबूंच्या मूळ कल्पनेची १५ ऑगस्ट १९४७ रोजी प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याच्या महान ऐतिहासिक प्रसंगी पंडित नेहरूंनी सुभाषबाबूंचे नाव देखील आपल्या तोंडून उच्चारले नाही. सुभाषचंद्रांवर सूड घेण्याचे जे कार्य महात्मा गांधींनी १९३९ साली सुरू केले, ते पंडित नेहरूंनी देशासाठी आपले रक्त सांडणाऱ्या हजारो 'आझाद-वीरां'ची स्वतंत्र भारतात धूळधाण करून पूर्ण केले! नेताजी सुभाषबाबू

विमानापघातात मरण पावले नसून ते अद्यापि जिवंत आहेत असे ह्या देशातील लक्षावधी लोकांना वाटते. पण विमानापघातात सुभाषबाबू मरण पावले आहेत ह्याबाबत महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू ह्यांची शंभर टक्के खात्री आहे. नेताजींच्या मृत्यूची चौकशी करण्यात यावी अशी सूचना खासदार एच. व्ही. कामथ ह्यांनी ५ मार्च १९५२ रोजी लोकसभेत केली. त्या वेळी नेहरू म्हणाले, "सुभाषचंद्र मरण पावले याबद्दल माझ्या मनात मुळीच संशय नाही—तेव्हाही नव्हता—आजही पण नाही—म्हणून मी म्हणतो की नेताजींचा मृत्यू ही संशयातीत आणि निश्चित गोष्ट आहे. त्याची चौकशीसुद्धा करण्याचे कारण नाही." पुन्हा २९ सप्टेंबर १९५५ रोजी तोच प्रश्न खासदार कामथ ह्यांनी उपस्थित केला असता नेहरू म्हणाले, "सुभाषबाबूंच्या अपघाताची घटना जपानच्या हद्दीत घडली. त्याचा सर्व पुरावा तेथेच आहे. तेव्हा खरे पाहता ही चौकशी जपान सरकारनेच करावयाला हवी. आम्हांला जपानी प्रदेशात जाऊन चौकशी कशी करता येईल ?" शेवटी, लोकांचा आग्रह जेव्हा शिगेला जाऊन पोहोचला तेव्हा जे पंडित नेहरू नेताजींच्या मृत्यूच्या चौकशीला इतकी वर्षे विरोध करीत होते त्यांना डिसेंबर १९५५ मध्ये नेताजींच्या मृत्यूची चौकशी करण्याकरता 'शहानवाझ समिती' नेमणे अखेर भाग पडले. पण ही शहानवाझ समिती म्हणजे शुद्ध ढोंग होते. त्या समितीवर सुभाषचंद्रांचे एक बंधू सदस्य होते. त्यांनी त्या समितीच्या निष्कर्षावर सही न करता आपली तीनशे पानांची भिन्न मतपत्रिका लिहिली.

'शहानवाझ' हा नेहरूंच्या मंत्रिमंडळातला उपमंत्री होता. तो संपूर्णपणे नेहरूंचा हस्तक होता. नेहरूंच्या इच्छेप्रमाणे त्याने रिपोर्ट लिहिला आणि जपानमधल्या रेंकोजी मंदिरातली सुभाषबाबूंची 'राख' हाच त्यांच्या मृत्यूचा ठणठणीत पुरावा गृहीत धरून विमानापघातात सुभाषबाबू निश्चितपणे मरण पावले असा निर्णय दिला. जेथे अपघात घडला त्या तैहोकू बेटात 'शहानवाझ समिती' गेली नाही. आपल्या अहवालात तिने दुसरे अनेक फोटो छापले, पण सुभाषबाबूंच्या 'प्रेताचा फोटो' काही तिला छापता आला नाही. विमानापघातात नेताजी मरण पावले ह्या शहानवाझ समितीच्या निर्णयावर लोकसभेने शिक्कामोर्तब केले, आणि अशा तऱ्हेने भारताच्या इतिहासातून पंडित नेहरूंनी सुभाषबाबूंची विल्हेवाट लावून टाकली खरी ! पण जपानमधून सुभाषबाबूंची 'राख' भारतात आणण्याची अजून काही भारत सरकारला हिंमत होत नाही !

ह्या सर्व हकीगतीवरून नेताजी आणि नेहरू ह्यांचे 'संबंध' काय आहेत ह्याची वाचकांना कल्पना येईल. भारत सरकारच्या दरबारात आज सुभाषबाबूंना कोठेही स्थान नाही. भारतीय लष्करात सुभाषबाबूंचा 'फोटो' लावण्याची बंदी आहे. ह्या सर्वांचे कारण एकच. पंडित नेहरूंना सुभाषबाबूंबद्दल मनातून अतिशय मत्सर वाटतो. कोणाला वाटेल की हा आमचा निष्कर्ष आहे. नाही, हे खुद्द सुभाषबाबूंचे स्वतःचे मत होते आणि ते त्यांनी २८ मार्च १९३९ रोजी जवाहरलालना वीस पानांचे प्रदीर्घ इंग्रजी पत्र पाठवून त्यात व्यक्त केले आहे. (पाहा, A Bunch of Old Letters by J. Nehru, पाने ३१९ ते ३४०) त्या पत्रातल्या काही ओळी येथे देतो. "प्रिय जवाहरलाल, मला असे वाटते की, कित्येक दिवसांपासून तुमच्या मनात माझ्याविषयी भयंकर अप्रीती निर्माण झालेली आहे. कारण मी पाहतो आहे की, माझ्याविरुद्ध तुम्हाला जेवढे बोलणे शक्य आहे, तेवढे तुम्ही मोठ्या उत्साहाने बोलताहात. माझे राजकीय शत्रू माझ्याविरुद्ध जे बोलतात ते सर्व तुम्हांला मान्य असते आणि त्यांचे दोष तुम्हांला मुळीं दिसतच नाहीत...(त्रिपुरी) कॉंग्रेसच्या अध्यक्षीय निवडणुकीनंतर वर्किंग कमिटीच्या बारा सदस्यांनी मिळून माझी जेवढी बदनामी केली नसेल, तेवढी तुम्ही एकट्याने करून जनतेत माझी नाचक्की करण्याची पराकाष्ठा केली आहे. खरोखरच तुम्हांला वाटते तेवढा जर मी नीच (Villani) माणूस असेन, तर साऱ्या जगात माझी फटफजिती करण्याचा तुम्हाला हक्क आहे—नव्हे ते तुमचे कर्तव्यच आहे. पण महात्मा गांधी, स्वतः तुम्ही आणि सात-आठ प्रांतांची सरकारे ह्यांच्या विरोधाच्या छातीवर पाय ठेवून ज्याअर्थी हा 'सैतान' कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी पुन्हा निवडून आला आहे, त्याअर्थी त्याच्या अंगी काही तरी गुण असले पाहिजेत आणि त्याने या देशाची काही तरी सेवा केली असली पाहिजे हे तुम्हांला कळून येईल. इ. इ." हे सर्वच पत्र अत्यंत हृदयद्रावक आहे. ते सर्व वाचल्याखेरीज नेताजींच्याबद्दल नेहरूंच्या मनात एवढा डंख का ह्याचा बोध वाचकांना होणार नाही.

मराठा : २४-१-१९६३

# १४

## नेताजीभवन

नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांचे वास्तव्य काही काळ ज्या घरात होते आणि जेथून त्यांनी वेषांतर करून भारताबाहेर निर्याण केले, त्या 'नेताजीभवना'चे गेल्या आठवड्यात दर्शन घेऊन आम्ही अत्यंत कृतार्थ झालो. कलकत्याच्या एल्जिन रोडवरील ३८।२ हा त्या घराचा क्रमांक आहे. फार चांगल्या वस्ती-मधला हा भाग आहे. घर तीन मजली असून वर गच्ची आहे; आणि ह्या घराचे नाव 'नेताजीभवन' असे ठेवण्यात आलेले आहे. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर उजव्या बाजूला नेताजींचा संगमरवरी अर्धपुतळा बसवण्यात आलेला आहे. आणखी बरेच पुढे गेल्यावर डाव्या बाजूला आझाद हिंद वीरांनी मलायामधे जो स्मारक स्तंभ उभारलेला आहे, त्याची प्रतिकृती उभारण्यात आलेली आहे. त्यानंतर पुढे गाडीघर (Garage) आहे. त्यात ज्या मोटार-गाडीतून १६-१७ डिसेंबर १९४१ च्या रात्री नेताजी त्या घरातून पसार झाले ती BLA ७१६९ नंबरची काळ्या रंगाची मोटारगाडी ठेवण्यात आलेली आहे, आणि तिच्या पलीकडे अंदमान बेटात आझाद हिंद सरकारचे प्रमुख म्हणून नेताजी जी मोटार वापरीत होते, ती ठेवलेली आहे. तिचा नंबर FORD V8 AN २६५ असा आहे. ती सरकारनेच ह्या मंडळींना दिलेली आहे. मागल्या भागातून जो जिना खाली उतरतो त्यावर एक पाटी लावलेली आहे. ती अशी की, निर्याणापूर्वी याच जिन्याने नेताजी खाली उतरले.

आता या घरात कोणीच राहात नाही. तळमजल्यावर लहान मुलांच्या रोगाची

तपासणी करण्याचा दवाखाना कै. शरच्चंद्र बोस ह्यांचे द्वितीय चिरंजीव डॉ. शिशिरबाबू हे चालवीत असतात. त्याचप्रमाणे आरोग्य आणि शरीरशास्त्र शिकविण्याचे मोफत वर्गही ते आणि त्यांचे सहकारी डॉक्टर चालवीत असतात. दुसऱ्या मजल्यावर रस्त्याच्या बाजूकडील इमारतीच्या भागात नेताजींची खोली आहे. त्या खोलीत पाऊल टाकताना अंगावर रोमांच उभे राहतात. डाव्या बाजूला भिंतीवर कालीमातेची रंगीत तसवीर आहे. पुढे खाली नेताजींच्या पादत्राणांचा लाकडी स्टँड ठेवलेला आहे. त्यावर पठाणी चप्पल आणि तीन वहाणांचे जोड आहेत. मागल्या बाजूला दोन छत्र्या आणि एक काठी आहे. त्याच्या पलीकडे त्यांच्या कपड्यांच्या स्टँड आहे. वरच्या बाजला सहासात धोतरे घड्या घालून ठेवलेली आहेत. त्याच्या खालच्या दांडीवर त्यांचे खादीचे सदरे टांगलेले आहेत. स्टँडच्या एका कोपऱ्यावर त्यांची रुंद आकाराची भगवी काश्मिरी टोपी आहे. उजव्या बाजूला दोन पलंग आहेत. त्यांनीच जवळ जवळ ती खोली भरून गेली आहे. पहिला पलंग खूपच मोठा आहे. तो नेताजींच्या आईचा. त्याच्या पलीकडे नेताजींचा पलंग आहे. तो आकाराने लहान आहे. त्यावर त्यांची गादी, चादर, उश्या, ब्लँकेट होते तसेच ठेवले आहे. गादीच्या मधोमध दहा दिवसांच्या प्राणांतिक उपोषणानंतर तुरुंगातून सुटलेल्या नेताजींचा दाढी वाढलेला फोटो आहे. पलंगाच्या उशाला एका वाटोळ्या मेजावर हाक-घंटा (Call-bell) आणि दोन-तीन लहान लाकडी डब्या आहेत. पलंगाच्या मागे एका चौरंगावर नेताजींच्या लाकडी खडावा ठेवलेल्या असून, पुढल्या बाजूला मोठे व्याघ्राजिन अंथरलेले आहे. त्यावर चंडीपूजेचे आणि आणखी दोन-तीन धार्मिक ग्रंथ आहेत. भिंतीवर नेताजींच्या आजोबांच्या, वडिलांच्या आणि कुलगुरूंच्या मोठ्या तसबिरी लावलेल्या आहेत. नेताजींच्या आजोबांना मोठी दाढी असून त्यांचा चेहरा फारच रुबाबदार दिसतो. त्यांचे वडिलही तसेच भव्य चेहऱ्याचे आहेत. त्यांना दाढीमिश्या नाहीत. पोशाख विलायती पद्धतीचा अगदी ऐटबाज आहे. भिंतीवर एक बंद पडलेले घड्याळ असून त्यात पाच वाजलेले आहेत. हे घड्याळ कोणत्या दिवशी बंद पडले ते कळायला मार्ग नाही.

नेताजींच्या खोलीलाच लागून शरदबाबूंची खोली आहे. त्या खोलीच्या मधोमध त्यांचा मोठा पलंग आहे. एका बाजूला त्यांचे लिहिण्याचे प्रशस्त टेबल आणि खुर्ची आहे. भिंतीवर शरदबाबूंचे निरनिराळे फोटो आहेत. भारतीय राजकारणामधल्या ह्या भीमार्जुनांच्या निवासवास्तू बघून हृदय अनेक विचारांनी

आणि भावनांनी भारावून जाते. त्याच मजल्यावर मागच्या बाजूला सुभाषबाबू जेव्हा कॉंग्रेसचे प्रेसिडेंट होते त्या वेळचे त्यांचे ऑफीस होते, तसेच ठेवण्यात आलेले आहे. मधोमध प्रशस्त टेबल, मागे त्यांची भव्य खुर्ची, समोर भेटा-वयास येणाऱ्या लोकांसाठी ठेवलेल्या खुर्च्या आणि कोचे आहेत. मागल्या बाजूला पुस्तकांची दोन कपाटे, समोरच्या बाजूला सुभाषबाबूंना मिळालेल्या मानपत्रांचे चांदीचे करंडे आणि जरतारी हार ठेवलेले आहेत. त्या कपाटाच्या बाहेरच्या अंगाला एक चिमुकला लाकडी चरखा तोंड लपवून बसलेला आढळतो. त्या चरख्यावर सुभाषबाबूंनी सूत काढले असेल काय हा नुसता विचारच हास्यास्पद वाटतो. ते काढले असते तर महात्माजींचे नि त्यांचे नक्की 'सूत' जमले असते, नाही का ?

नंतर आम्ही तिसऱ्या मजल्यावर गेलो. ह्या सबंध मजल्यावर नेताजींच्या वस्तूंचा, पत्रांचा नि चित्रांचा संग्रह व्यवस्थित रीतीने ठेवलेला आहे. डॉ. शिशिर-कुमार बोस ह्यांनी 'नेताजी रिचर्स ब्यूरो' नावाची एक संस्था काढलेली आहे. नेताजींच्या जीवनावर आणि कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या सर्व वस्तू एकत्रित करून त्यांचा एक प्रचंड संग्रह तयार करावयाचा असा ह्या संस्थेचा उद्देश आहे. सध्या 'नेताजीभवना'तल्या सात खोल्या ह्या संग्रहालयासाठी वापरण्यात आलेल्या आहेत. पहिल्या खोलीमधे नेताजींच्या बालपणासंबंधीच्या गोष्टी ठेवलेल्या आहेत.

सुभाषबाबूंचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक येथे झाला. त्यांच्या जन्माची नोंद त्यांचे वडील जानकीदास ह्यांनी आपल्या डायरीत केलेली आहे. आधल्या दिवसाच्या नोंदीत 'प्रभा'चे (सुभाषबाबूंची आई) पोट दुखू लागल्याचा उल्लेख आहे. दुसऱ्या दिवसाच्या नोंदीत 'सकाळपासून प्रभा अत्यंत अस्वस्थ आहे. दुपारी मुलगा झाला' असा उल्लेख आहे. तथापि त्या ठिकाणी सुभाषबाबूंच्या जन्माची वेळमात्र नमूद केलेली नाही. ती दोन-तीन दिवसांनी केली आहे. कारण सुभाषबाबूंचा जन्म जेव्हा झाला तेव्हा जानकीदास कोर्टात गेले होते. तथापि, सुभाषबाबूंच्या जन्माची नक्की वेळ त्यांना मिळालीच नाही. ते आपल्या डायरीत लिहितात, 'He was born a few minutes after 12'. नंतर लिहितात, 'between 12 and 1.' नंतर डायरीच्या एका पानावर आपल्या सर्व मुलांच्या नि मुलींच्या जन्माच्या तारखा नि वेळा जानकीदासांनी लिहून ठेवल्या आहेत, पण त्यात सुभाषबाबूंच्या जन्मतारखेपुढे वेळेसाठी

केलेला कंस मोकळाच आहे. सुभाषबाबूंना एकंदर सहा भाऊ आणि सहा बहिणी होत्या.

पहिल्या खोलीत १८९७ ते १९२९ पर्यंतच्या वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत. त्याच खोलीत दुसऱ्या बाजूच्या एका कपाटात कॉंग्रेस स्वयंसेवक दलाचे सुभाषबाबू जेव्हा जनरल ऑफिसर कमांडिंग होते तेव्हाचा त्यांचा गणवेष ठेवण्यात आलेला आहे, आणि शेजारी त्याच पोषाखातला त्यांचा रुबाबदार फोटो आहे. त्यावरून सुभाषबाबूंना पहिल्यापासून लष्करी गणवेषाची आवड होती हे स्पष्ट दिसून येते. दुसऱ्या खोलीत १९३० ते १९३८ पर्यंतच्या वस्तू आहेत. कलकत्त्याचे जेव्हा ते महापौर झाले त्या वेळचे त्यांचे फोटो आहेत. त्याचप्रमाणे १९३८ मध्ये ते हरिपुरा कॉंग्रेसचे जेव्हा अध्यक्ष झाले त्या वेळचा व्यासपीठावरचा त्यांचा फोटो आहे. त्यांच्या उजव्या बाजूला महात्मा गांधी आणि दरबार गोपाळदास बसलेले आहेत. डाव्या बाजूला जवाहरलाल नेहरू उभे आहेत. का कोण जाणे, जेथे जेथे सुभाषबाबूंबरोबर जवाहरलालांचा फोटो आहे, तेथे तेथे जवाहरलालांचा चेहरा अत्यंत दुःखी आणि गंभीर वाटतो. (येथे सहज मनात कल्पना आली की, जवाहरलाल मोकळ्या मनाने हसताहेत असा त्यांचा फोटो कोठे तरी उपलब्ध आहे काय ?) तिसऱ्या खोलीत १९३८ ते १९४० पर्यंतच्या वस्तू आहेत. १९३९ मध्ये गुरुदेव टागोर ह्यांनी सुभाषबाबूंचा आपल्या शांतिनिकेतनमध्ये सत्कार केला त्या प्रसंगाचा ऐतिहासिक फोटो आहे. सुभाषबाबूंनी आत्मचरित्र लिहिण्यास एकदा सुरुवात केलेली होती. ते दोन-तीन प्रकरणांच्या पुढे गेले नाहीत. त्याची पाने या खोलीमध्ये ठेवण्यात आलेली आहेत. चौथ्या खोलीत १९४०–४१ या कालखंडातील स्मृतीचा संग्रह आहे. तुरुंगातून शरदबाबूंना सुभाषबाबूंनी जी महत्त्वाची पत्रे लिहिली ती तेथे पाहावयास मिळतात. त्याचप्रमाणे तुरुंगात प्राणांतिक उपोषण जाहीर केल्यानंतर सुभाषबाबूंनी ब्रिटिश सरकारला जे अत्यंत खरमरीत पत्र लिहिले तेही तेथे ठेवलेले आहे. काबूलमधून नेताजी ऑरलॅण्डो मझोट्टा या इटालियन नावाचा पासपोर्ट घेऊन युरोपात गेले त्या वेळी त्यांची आणि काबूलमधल्या इटालियन वकिलाची गाठ पडली असता त्याने आपल्या सरकारला सुभाषबाबूंबद्दल जो खाजगी रिपोर्ट पाठवला आहे, तो ह्या ठिकाणी पाहावयाला मिळतो. पाचव्या खोलीत १९४१ ते १९४३ या कालखंडातील नेताजींच्या जर्मनीमधील वास्तव्याच्या स्मृती ठेवलेल्या आहेत. युरोपातील त्यांच्या हालचालींच्या

तत्कालीन युरोपीयन वृत्तपत्रात ज्या बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत, त्यांची कात्रणे तेथे वाचावयाला मिळतात.

पण सर्वांत अत्यंत महत्त्वाची अशी सहा-सात चित्रे प्रकाशित काचेच्या पार्श्वभूमीवर प्रदर्शित केलेली आहेत. युरोपमधून अतिपूर्व आशियाकडे नेताजींनी पाणबुडीमधून जो प्रवास केलेला आहे, त्याची ही ऐतिहासिक चित्रे आहेत. नाविक दलामधील लष्करी अधिकाऱ्याच्या पोषाखातल्या नेताजींचे दर्शन अत्यंत स्फूर्तिदायक वाटते. जर्मन पाणबुडीत बसतात, तोही फोटो येथे ठेवलेला आहे. ह्या ठिकाणी आम्हांला नेताजींचे एक महत्त्वाचे पत्र वाचायला मिळाले. त्याचा येथे अवश्य उल्लेख केला पाहिजे. हे पत्र नेताजींनी हिटलरला उद्देशून पण फॉन रिबेन्ट्रॉपच्या नावाने लिहिले आहे. त्यात पुढील मजकूर आम्हांला अत्यंत महत्त्वाचा वाटला. तो असा '...यापुढे जर्मनीत मला राहण्याची आवश्यकता वाटत नाही. अतिपूर्वेकडे माझ्या उपस्थितीची जरुरी आहे. म्हणून तुम्ही मला पाणबुडीने म्हणा, जहाजाने म्हणा किंवा विमानाने म्हणा तिकडे पोहोचवण्याची व्यवस्था करावी. आता या प्रवासात अनंत धोके आणि अडचणी आहेत ह्याची मला जाणीव आहे. पण I have great faith in my destiny and I am bound to succeed in my undertaking. (माझ्या दैवावर माझा फार मोठा विश्वास आहे. आणि माझ्या अंगीकृत कार्यात मी यशस्वी होईनच होईन.)' सुभाषबाबूंचा हा विराट आत्मविश्वास अंतःकरण हेलावून टाकणारा आहे.

सहाव्या आणि सातव्या खोल्यांत आझाद हिंद सरकारचे प्रमुख असताना नेताजींनी जी निरनिराळी फर्माने काढली ती किंवा सैनिकांची संचलने घेतली त्यांचें फोटो आहेत. अंदमान बेटामध्ये काळ्या पाण्याच्या भयानक कारागृहाची पाहणी करताना नेताजींचा जो फोटो घेतलेला आहे, तो अत्यंत प्रभावी आहे. नेताजींची I. N. A, ची लष्करी टोपी आणि गुडघ्यापर्यंतचे उंच बूटही येथे ठेवलेले आहेत. ज्या विमानाला अपघात झाला असे सांगण्यात येते त्या विमानातून एका ठिकाणी उतरतानाही नेताजींचा फोटो आहे आणि त्यावर नेताजींची स्वाक्षरी आहे. असे हे नेताजींच्या स्मृतिसंग्रहालयाचे थोडक्यात वर्णन आहे.

आम्ही ह्या 'नेताजीभवना'ला दोनदा भेट दिली आणि प्रत्येक गोष्टीचे अगदी बारकाईने निरीक्षण केले. पण आमची काही तृप्ती झाली नाही. एखाद्या

देवालयापेक्षाही आम्हांला हे भवन अत्यंत पवित्र आणि स्फूर्तिदायक वाटते. सबंध कलकत्त्यात अत्यंत प्रेक्षणीय असे जर कोणते स्थळ असेल तर ते हे. सुभाषबाबूंचे पुतणे डॉ. शिशिरकुमार बोस हे लहान मुलांच्या रोगांचे अधिकारी तज्ज्ञ म्हणून समजले जातात. ते ह्या नेताजीभवनाचे सरचिटणीस आहेत. त्यांनी आमचे ह्या भवनात स्वागत केले. त्यांच्याशी मुलाखतही झाली व बातचीतही झाली. पण ह्या भवनातून नेताजी कसे निसटले त्याची शिशिरकुमारांनी आम्हांला जी हकीगत सांगितली ती येथे देतो. ते म्हणाले, "मी त्या वेळी अठरा-एकोणीस वर्षांचा तरुण होतो. कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजमधे शिकत होतो. हिंदुस्थानाबाहेर जाण्याचा जो अचाट कट सुभाषबाबूंनी आखला होता त्यात माझे वडील शरद्बाबू ह्यांचाही भाग होता. फार प्रचंड योजना होती ती. ठिकठिकाणी त्यांनी अनेक व्यक्तींशी गुप्त संबंध जोडले होते. त्यासाठी खूप पैसा खर्च केलेला होता. ज्या मोटारीतून सुभाषबाबू या घरातून पळून गेले, ती मोटार हाकण्याच्या कामावर त्यांनी माझी स्वतःची योजना केलेली होती. खाली पोलिसांचा पहारा होता. त्यांना संशय येऊ नये म्हणून रोज रात्री अकरा वाजता वुडबर्न रोडवरील माझ्या राहत्या घरामधून ह्या घरात मी ह्या मोटारीने येत असे आणि पहाटे अडीच वाजता बाहेर जात असे. असा सतत एक महिनाभर मी राबता ठेवला. त्यामुळे पोलिसांना माझ्या जाण्यायेण्याचा संशय आला नाही. १६ डिसेंबर १९४१ रोजी रात्री आपल्या राहत्या खोलीतून सुभाषबाबू वेषांतर करून मागल्या जिन्याने बाहेर पडले आणि माझ्या मोटारीत मागल्या बाजूला खाली दबून बसले. मी झटकन् मोटार बाहेर काढली आणि बिहारच्या सरहद्दीवर गोमोह नावाचे जे रेल्वे स्टेशन आहे तेथे त्यांना रातोरात घेऊन गेलो. तेथे ते आगगाडीत बसले." असा नेताजींच्या निर्याणाचा थोडक्यात इतिहास आहे.

'नेताजीभवना'तून मी बाहेर पडलो आणि वर बघू लागलो तो त्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावर सरकारच्या भारत संरक्षण खात्याने एक भला मोठा नेताजींचा फोटो लावून त्याच्यापुढे पुढील मजकूर लिहिला आहे. 'I will always be prepared to shed even the last drop of my blood for the preservation of India's freedom.' (भारतीय स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी माझ्या रक्ताचा शेवटचा थेंब सांडायला मी नेहमीच सिद्ध राहीन!) आणि गंमत ही की, हेच नेताजी जेव्हा भारतीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी ब्रह्मदेशात आपले रक्त प्रत्यक्ष सांडीत होते त्याच वेळी 'पूर्वे-

कडील आक्रमक सैन्याच्या अग्रभागी जर सुभाषचंद्र बोस असतील, तर त्यांचा प्रतिकार करण्यासाठी मी शेवटचा रक्ताचा थेंब सांडिन!' ह्या नेहरूंच्य उद्गाराची जाहिरात त्यांच्या फोटोसह ब्रिटिश सरकार सर्वत्र करीत होते. 'कालाय तस्मै नमः' दुसरे काय म्हणायचे ?

मराठा : १०-६-१९६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र...
अनुक्रम.................... वि: ....................

१५

# आंबेडकर जयंती

आज बाबासाहेब आंबेडकरांची एकाहत्तरावी जयंती. त्यांच्या पवित्र चरणी आमची अनंत अभिवादने असोत. त्यांना जाऊन आता साडेपाच वर्षे पुरी होताहेत. ह्या काळात असा एक दिवस गेला नसेल की, बाबांचे स्मरण आम्हांला झाले नाही. कारण, असत्याविरुद्ध आणि अन्यायाविरुद्ध आकाशपाताळ एक करणारा त्यांच्यासारखा सिंहपुरुष अनेक शतकांमधे या भारतात झाला नाही. काँग्रेसच्या राज्यकर्त्यांनी गेली पंधरा वर्षे जनतेचा जो अनन्वित छळ चालविलेला आहे, तो आता अगदी असह्य झाला आहे. अशा परिस्थितीत नेहरूंचा कान पकडून त्यांच्या पातकांचा पाढा त्यांच्या तोंडावर खडाखडा वाचून दाखविण्याचे धैर्य ज्यांच्या अंगी आहे, असा एकही छातीचा पुरुष आम्हांला आमच्या डोळ्यांसमोर आज दिसत नाही. आंबेडकर हे एकच असे वीरपुरुष होते की, आज जर ते हयात असते तर त्यांनी काँग्रेस सरकारचे वाभाडे काढून त्यांची लक्तरे साऱ्या जगाच्या वेशीवर टांगली असती. अहो, नेहरूंच्या गुरूंची त्यांनी उभ्या हयातीत कधी पत्रास बाळगली नाही, ते नेहरूंना आणि त्यांच्या काँग्रेस सरकारला काय धूप घालणार ? महात्मा गांधी जेव्हा या देशामधे लोकप्रियतेच्या परमोच्च शिखरावर विराजमान झाले होते, त्या वेळी त्यांना विरोध करून साऱ्या देशाचा राग आणि शिव्याशाप त्यांनी आपल्यावर ओढवून घेतले होते.

एकतीस साली गांधीजींची नि त्यांची पहिली भेट झाली; तेव्हाच गांधीजींची त्यांनी अशी सडकून हजेरी घेतली की, ती ऐकून त्यांची दातखिळी बसली.

आंबेडकर त्यांना म्हणाले, "तुम्ही 'महात्मे' असाल, पण तुमच्यासारख्या कोणाही महात्म्यावर आम्ही विश्वास ठेवू शकत नाही. कारण महात्मे म्हणजे चंचल आभास. ते धूळ उडवतात पण समाजाची पातळी उंचावू शकत नाहीत. (Mahatmas are like feeting phantoms. They raise dust, but no level.)" उभ्या आयुष्यात गांधीजींच्या तोंडावर त्यांना असे कोणी बोलले नसेल. आंबेडकरांचे ते उद्गार ऐकून गांधीजी क्षणमात्र सर्द झाले. ते नरमून म्हणाले, "तुम्ही माझ्याबद्दल काहीही म्हणालात तरी मी तुम्हांला देशभक्त मानतो!" त्यावर आंबेडकर विकट हास्य करून म्हणाले, "मी अन् देशभक्त! अहो काय, म्हणता काय हे? ज्या देशात आम्हांला हजारो वर्षांपासून कुत्र्या-मांजरापेक्षाही वाईट वागवले जाते, ज्या देशात आम्हांला पाणीदेखील प्यावयाला मिळत नाही, त्या देशावर मी प्रेम करणे कधी शक्य आहे काय? कोणीही स्वाभिमानी अस्पृश्य या देशावर प्रेम करणे शक्य नाही. तुम्ही मला देशभक्त पुष्कळ म्हटले तरी तुमचे लोक मला देशद्रोही म्हणतात. पण त्याचे मला बिलकुल वाईट वाटत नाही. हो, आहेच मी देशद्रोही!"

त्यानंतर 'वर्तुळ सभे'त गांधीजी आणि आंबेडकर ह्यांचा लढा विकोपाला गेला. 'अस्पृश्यांचा पुढारी मी आहे, तुम्ही नाही.' असे आंबेडकरांनी गांधीजींच्या तोंडावर निक्षून सांगितले. तेव्हा गांधीजी संतापून त्यांना म्हणाले, "सारे अस्पृश्य खिस्ती झाले किंवा मुसलमान झाले तरी चालतील, पण तुम्ही म्हणता त्याप्रमाणे अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देऊन मी हिंदू समाजाची फाळणी करून देणार नाही!" एवढेच बोलून गांधीजी थांबले नाहीत तर आंबेडकरांच्या विरुद्ध मुसलमानांशी संगनमत करण्याच्या हीन कारवाया करावयालासुद्धा गांधीजींनी कमी केले नाही. पुढे रॅम्से मॅक्डोनल्डनी जेव्हा अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला, तेव्हा महात्माजींनी प्राणांतिक उपोषण आरंभिले. त्या वेळी सारा देश आंबेडकरांविरुद्ध खवळून उठला. पण आंबेडकर डगमगले नाहीत. ते म्हणाले, "या देशात असे पुष्कळ महात्मे आले नि गेले, पण अस्पृश्य लोक अस्पृश्यच राहिले. देशातील अस्पृश्यता निवारण करण्यासाठी गांधीजी का प्राणांतिक उपोषण करीत नाहीत? गांधीजींचे प्राण वाचविण्यासाठी मी काय माझ्या लोकांना मारू? तुम्ही मला रस्त्याच्या कंदिलाच्या खांबावर फाशी द्या, पण माझ्या सात कोटी लोकांचा मी विश्वासघात करणार नाही." तथापि अखेर आंबेडकरांनीच 'महात्मेपण' दाखवून गांधीजींचे प्राण वाचविले, त्याबद्दल

एखादी काँग्रेसवाल्याने आंबेडकरांना धन्यवाद दिले असतील तर शपथ !

लोकमान्य टिळक ज्याप्रमाणे म्हणाले की, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे', त्याप्रमाणे आंबेडकरांनीही घोषणा केली की, 'अस्पृश्यतेचा नायनाट करणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. अस्पृश्य म्हणून मी जन्माला आलो खरा. त्याला माझा इलाज नव्हता. पण अस्पृश्य म्हणून मी मुळीच मरणार नाही. अस्पृश्यतेचा जो भयानक अन्याय शतकानुशतके माझे बांधव सहन करीत आले आहेत, तो जर मी नष्ट करू शकलो नाही तर स्वतःच्या छातीत गोळी मारून घेऊन मी आत्महत्या करीन !'

हिंदू समाजातील जातिभेद आणि विषमता नष्ट करून समतेच्या पायावर हिंदू समाजाची पुनर्रचना करण्यासाठी आंबेडकर शेवटपर्यंत लढले. तो प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर मग धर्मांतराचा मार्ग त्यांना स्वीकारावा लागला. आंबेडकर हे हिंदू धर्माचे शत्रू आहेत असे जे म्हणतात त्यांना आंबेडकर सुतराम समजले नाहीत. हिंदू धर्म आणि हिंदू समाज सुधारण्याचा आटोकाट प्रयत्न करूनही तो जेव्हा अयशस्वी ठरला तेव्हा भगवान बुद्धाला शरण जाण्यावाचून त्यांना दुसरे गत्यंतरच उरले नाही. बुद्ध धर्माची दीक्षा घेताना ते म्हणाले, "माझ्या या धर्मांतराने भारतीय इतिहासाच्या आणि संस्कृतीच्या परंपरेला धक्का न लागेल अशीच मी काळजी घेतलेली आहे." म्हणून हिंदू धर्मावर सूड घेण्यासाठी आंबेडकरांनी बुद्ध धर्म स्वीकारला ही गोष्ट निखालस खोटी आहे. हिंदू धर्मावर त्यांना खरोखरच सूड घ्यावयाचा असता तर त्यांनी इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला असता, पण "भारताच्या इतिहासात देशाचा किंवा धर्माचा विध्वंसक म्हणून माझे नाव राहावे अशी माझी इच्छा नाही" असे ते नेहमी म्हणत.

भारताच्या अखंडत्वावर त्यांची गाढ श्रद्धा होती. घटना समितीच्या पहिल्याच बैठकीत "हिंदुस्थान हा काही झाले तरी अखंडच राहिला पाहिजे. मुस्लिम लीगचे पाकिस्तानचे धोरण चूक आहे !" अशी घोषणा करून आपल्या प्रखर राष्ट्रीय बाण्याने आपल्या सर्व विरोधकांचे डोळे त्यांनी दिपवून टाकले होते. आंबेडकरांना जर कशाची अत्यंत चीड असेल तर ती विभूतिपूजेची आणि ढोंगाची. गांधी आणि जीना या दोन पराकाष्ठेच्या अहंमन्य पुढाऱ्यांनी ढोंग आणि विभूतिपूजा यांचा अतिरेक करून या देशाचा नाश केला असे आंबेडकरांचे मत होते. "गांधी आणि जीना मला आवडत नाहीत. कारण

भारतदेश मला अधिक आवडतो. " असे ते नेहमी म्हणत.

एकभाषिक राज्याचा त्यांच्यासारखा कट्टर पुरस्कर्ता आणि मिश्रभाषिक राज्यांचा त्यांच्यासारखा कडवा दुष्मन आजपर्यंत भारतात दुसरा झाला नसेल. " मिश्रभाषिक राज्ये लाथेच्या ठोकरीने उडवा " असे ते संतापून म्हणत. मुंबईचा समावेश महाराष्ट्रातच व्हावयाला पाहिजे या भूमिकेचा आग्रही पुरस्कार त्यांच्याएवढा कोणी केला नाही. मुंबईची आणि महाराष्ट्राची गाठ देवाने बांधली आहे. ती देवाच्या बापाला तोडता येणार नाही ! असे ते गर्जून सांगत. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला हा खरोखरच आंबेडकरांच्या तत्त्वाचा विजय होय. कॉंग्रेसचा विध्वंस झाल्यावाचून या देशात लोकशाही आणि समाजवाद नांदणार नाही असे ते खणखणून म्हणत. प्रखर सत्य ज्वलज्जहाल शब्दांत निर्भयपणे सांगणारा त्यांच्यासारखा झुंजार वीर आधुनिक भारतात दुसरा झाला नाही. ह्या त्यांच्या सत्यप्रीतीचा आणि निर्भय वृत्तीचा संचार जर महाराष्ट्राच्या अंगात संपूर्णपणे झाला तर समग्र आणि समाजवादी महाराष्ट्रासाठी जो लढा कॉंग्रेसशी यापुढे आपल्याला द्यावा लागणार आहे तो लढण्याचे सामर्थ्य नि हिंमत महाराष्ट्राच्या अंगी निश्चितपणे येईल अशी आमची श्रद्धा आहे. भारताच्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी सारा जन्म ज्यांनी जुलूम, असत्य आणि ढोंग ह्यांच्याशी निकराने झुंज दिली, अशा लोकोत्तर धैर्याच्या, वज्रकठोर छातीच्या अन् कुसुम-कोमल हृदयाच्या या महापुरुषाच्या चरणी महाराष्ट्राच्या वतीने आमची अनंत लोटांगणे असोत !

मराठा : १५-४-१९६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नों दि: ..........

# १६

# वीर सावरकर

वीर सावरकर ह्यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी झाला. कालपासून त्यांना अठ्याहत्तरावे वर्ष सुरू झाले. वस्तुतः, दोन जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा त्यांना २४ डिसेंबर १९१० रोजी झाली. म्हणजे त्या दोन्ही शिक्षा जर त्यांनी संपूर्णपणे भोगल्या असत्या तर ह्या वर्षाअखेर त्यांची सुटका झाली असती, आणि मग त्यांच्या दर्शनाचे भाग्य आपल्याला लाभले असते. भारताला स्वातंत्र्य प्राप्त व्हावे म्हणून ऐन तारुण्यात ज्यांनी मृत्यूच्या जबड्यात उघड्या डोळ्यांनी उडी घेतली, अंदमानच्या काळ्या पाण्यातल्या राक्षसी यातनांचे हालाहल ज्यांनी शंकराप्रमाणे गिळून टाकले, भारताच्या स्वातंत्र्याखेरीज ज्याने आपल्या आयुष्यात दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही, तो हा महाराष्ट्राचा मृत्युंजय महापुरुष आम्हाला चेतना आणि प्रेरणा देण्यासाठी अद्याप आमच्यामध्ये सुखरूप आहे, ह्या जाणिवेने कोणाचे ऊर हर्षाने भरून येणार नाही ?

अर्धशतकापूर्वी विलायतेच्या कारागृहातून पत्ररूपाने आपल्या मित्रांचा वीर सावरकरांनी जेव्हा निरोप घेतला, तेव्हा त्यांनी आपल्या भयानक भवितव्याचे पुढीलप्रमाणे चित्र रेखाटले होते. ‘ माझा देहपात होऊन माझ्या अस्थी आणि रक्षा कोठे पडतील ह्याचा नेम नाही. अंदमानचे वातावरण आधीच निर्जन व भेसूर आहे. तेथे वाहणाऱ्या नदीनाल्यांचा उदासवाणा आवाज मूळच्या निर्जन-पणाला अधिकच भेसूर बनवीत असतो. कदाचित माझ्या अस्थी अन् रक्षा त्या

उदास नदीनाल्यांच्या जवळ पडून राहतील!' स्वतःविषयी सावरकरांनी वर्तविलेले हे भविष्य खोटे ठरेल असे त्या वेळी कोणाला तरी वाटले असते का? खरोखर, मृत्यूची एवढी फजिती आजपर्यंत कधी कोणी केली नसेल. ह्या दृष्टीने वीर सावरकरांच्या दीर्घायुष्याचा जेवढा गौरव आणि कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.

गेल्या शतकामधे ह्या भारतात जे क्रांतिकारक वीर पुरुष होऊन गेले, त्यांच्यामधे वीर सावरकरांचे स्थान अद्वितीय आहे ह्यात काय शंका? ज्या स्वातंत्र्यवीरांची देदीप्यमान रत्नमाळा महाराष्ट्राने भारतमातेच्या गळ्यात घातली, तिच्यातले आद्यरत्न श्रीशिवछत्रपती होत आणि अखेरचे रत्न वीर सावरकर होत; किंबहुना श्रीछत्रपतींनी भारताची पारतंत्र्यामधून मुक्तता करण्यासाठीच वीर सावरकरांच्या रूपाने पुन्हा ह्या महाराष्ट्रात अवतार घेतला किंवा काय, असे त्यांचे चरित्र वाचल्यानंतर वाटू लागते. शिवरायांच्या लोकोत्तर इतिहासाचे रहस्य ह्या महाराष्ट्रामधे समर्थ रामदासांनंतर जर कोणी ओळखले असेल तर ते वीर सावरकरांनी! पारतंत्र्य आणि गुलामगिरी म्हटली की सावरकरांचे रक्त संतापाने खदखदून उसळ्या मारू लागे. 'गुलामगिरिची वेडी पायी तशीच घरिता ना? गुलामगिरिच्या नरकामाजी तसेच पिचता ना? स्वातंत्र्याच्या सु-खनीमाजी जन्म स्वतंत्रांचे! गुलामगिरिच्या उकिरड्यापरि गुलाम निपजाचे! श्वानहि भरिते पोट बापुडे चघळुनिया तुकडे! शेणामाजी बांधुनि वाडे नांदति शेणकिडे!' असले तापलेल्या सांडसाचे डाग त्यांनी काळजाला देऊन सारा महाराष्ट्र जागा केला!

त्या वेळी लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात की, 'स्वातंत्र्य ही राष्ट्राची नाडी आहे. ते राष्ट्राचे निश्वसित आहे. बालवयापासून माझ्या तारुण्यातील या क्षणापर्यंत मी जर झोपेत कशाची स्वप्ने पाहिली असतील आणि जागृतावस्थेत कशाचा विचार केला असेल तर तो एकाच विषयाचा केला आहे. देशाच्या स्वातंत्र्याची झालेली हानी आणि ते स्वातंत्र्य परत मिळविण्याची शक्यता हा एकच माझ्या चिंतनाचा विषय झाला आहे.' आणि ह्याच दृष्टीने विलायतेत गेल्यावर ते जागतिक इतिहासाचे संशोधन करू लागले. कोणकोणत्या परतंत्र देशांनी कोणत्या कोणत्या मार्गांचा अवलंब करून स्वातंत्र्य मिळविले हा त्यांच्या अभ्यासाचा एकमेव विषय झाला, आणि त्या वैचारिक मंथनातून त्यांनी 'सत्तावनी स्वातंत्र्य समर' हा आपला अद्भुत ग्रंथ निर्माण केला. आजपर्यंत

जगात एवढा ज्वालाग्राही ग्रंथ कोणाही लेखकाने लिहिला नसेल. गेल्या पन्नास वर्षांत जे जे भारतीय क्रांतिकारक होऊन गेले, त्या त्या सर्वांनी ह्या ग्रंथाची 'सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाची गीता' म्हणून पूजा केलेली आहे. अठ्ठावीस साली भगतसिंगांनी ह्या ग्रंथाचे पुनर्मुद्रण करून घेतले. नेताजी सुभाषचंद्रांच्या 'आझाद हिंद फौजे'त तर हा ग्रंथ पाठ्यपुस्तक म्हणूनच वापरला होता. असा अमर ग्रंथ वयाच्या अवघ्या चोविसाव्या वर्षी लिहून भारतीय क्रांतिकारकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेचे ते संचालक बनले.

'१० मे १८५७ रोजी आमचा स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला आहे; तो ज्या १० मेच्या दिवशी भारत स्वतंत्र झालेला दिसेल त्याच दिवशी थांबेल!' ही वीर सावरकरांची त्या वेळची युद्धघोषणा होती. बंगालच्या फाळणीनंतर भारतात सर्वत्र क्रांतिकारकांचे जे उत्थापन झाले त्याची सूत्रे विलायतेमधून वीर सावरकरच हालवीत होते. अशा ज्वलज्जहाल क्रांतिकारकाला फार दिवस ब्रिटिश सरकार मोकळे ठेवणे शक्यच नव्हते. दोन जन्मठेपींची शिक्षा ठोठावून वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्यांची रवानगी अंदमानच्या काळ्या पाण्यावर करण्यात आली. ही भयानक शिक्षा जेव्हा न्यायमूर्तींनी सांगितली त्या वेळी वीर सावरकरांनी जे उद्गार काढले ते त्यांच्या अपरंपार धैर्याचे आणि निर्भयतेचे द्योतक आहेत. 'तुमच्या नियमनिर्बंधानुसार तुम्ही जी परमावधीची शिक्षा मला सांगितली आहे, ती निमूटपणे सोसण्याला मी सिद्ध आहे. आमची मायभूमी तात्कालिक नसली तरी शाश्वतीच्या विजयाप्रत पोचावयाची ती हालअपेष्टा नि स्वार्थत्याग ह्या मार्गांनीच पोहोचेल अशी माझी श्रद्धा आहे.'

भारतीय स्वातंत्र्यासाठी वीर सावरकरांनी जेवढे बलिदान केले, तेवढे दुसऱ्या कोणीच केले नाही. भारतीय स्वातंत्र्याची मुहूर्तमेढच त्यांनी या देशात रोविली. म्हणून 'भारतीय स्वातंत्र्याचे जनक' ही पदवी जर कोणाला यथार्थपणे देता येईल, तर ती एकट्या वीर सावरकरांनाच, याविषयी आमच्या मनात तिळमात्र शंका नाही. वीर सावरकरांचे चरित्र आणि कर्तृत्व एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे भारताचे आणि महाराष्ट्राचे चिरंतन मार्गदर्शन करीत राहील अशी आमची श्रद्धा आहे. ज्या ज्वलंत राष्ट्रवादाची आणि प्रखर बुद्धिवादाची वीर सावरकरांनी आजन्म तपश्चर्या केली, त्यांचा प्रभाव ह्या देशातील लोकमनावर अधिकाधिक पडो नि भारताला प्रज्ञाहत आणि पौरुषहीन करणारा गांधीवाद ह्या देशातून नष्ट होवो, ह्यापेक्षा वीर सावरकरांना

दीर्घायुरारोग्य इच्छिताना परमेश्वराजवळ दुसरी काय प्रार्थना करता येण्यासारखी आहे ?

मराठा : २९-५-१९६०

# १७

# मृत्युंजय सावरकर

स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांना २४ डिसेंबर १९१० रोजी पहिल्या जन्मठेपेची शिक्षा मिळाली आणि त्यानंतर ३० जानेवारी १९११ रोजी दुसऱ्या जन्म-ठेपेची शिक्षा झाली. अशा रीतीने दोन जन्मठेपींची म्हणजे पन्नास वर्षांची शिक्षा ठोठावून अकरा सालच्या जूनमध्ये त्यांची रवानगी 'महाराजा' बोटीने अंदमान बेटावर करण्यात आली. त्या प्रसंगाचे वर्णन त्यांच्याच शब्दात केलेले बरे. 'महाराजा आगबोटीवरील जन्मठेप्याचे चढणे म्हणजे प्रेताच्या तिरडीवर जिवंतपणीच बांधले जाणे होते. आजपर्यंत जे शेकडो हजारो जन्मठेपी त्या बोटीवर चढून काळेपाण्याकडे गेले त्यातून हजारी दहाही जिवंतपणी देशास परत येऊ शकले नाहीत. मनुष्य एकदा तिरडीवर बांधला गेला म्हणजे जसे त्याचे आप्तइष्ट तो ह्या जगातून कायमचा जात आहे म्हणून समजतात, त्याच-प्रमाणे काळेपाण्यास जाणाऱ्या बोटीवर जन्मठेपी चढू लागले म्हणजे ते स्वदेशास मेले असेच लोक समजतात. त्याच दृष्टीने ते माझ्याकडे पाहात होते. मी खरोखरच तिरडीवर चढविला जात होतो. फरक इतकाच की, प्रेताला तिरडीवर चढवताना ज्या भावना प्रेक्षकांस कासावीस करतात, त्या भावना प्रेतास कळत नसतात. पण मी तिरडीवर बांधला जात आहे आणि माझी प्रेतयात्रा निघत आहे हे मला कळत होते.' ४ जुलै १९११ रोजी अंदमानच्या तुरुंगाने आपल्या लोखंडी बिजागरांच्या दाढा करकर करीत आपल्या दरवाजाचा राक्षसी जबडा उघडला आणि सावरकरांचा घास गिळला. तुरुंगाच्या इंग्रज

अधिकाऱ्याने त्यांना विचारले, ‘ पन्नास वर्षांची शिक्षा भोगून तू या तुरुंगातून परत जिवंत बाहेर जाशील असे तुला वाटते का ? ’ त्यावर सावरकर हसून म्हणाले, “ माझ्या मातृभूच्या पायातील पारतंत्र्याची बेडी कायमची टिकणार आहे काय ? ” ती सावरकरांची वाणी अक्षरशः खरी ठरली. पन्नास वर्षांच्या आतच भारतातील इंग्रजांचे राज्य धुळीला मिळाल्याचे दृश्य सावरकरांना स्वतःच्या डोळ्यांनी पाहावयाला मिळाले. पण त्यापूर्वी किती तरी आधी म्हणजे २१ जानेवारी १९२१ रोजी सावरकरांची अंदमानातून सुटका होऊन त्यांना रत्नागिरीच्या तुरुंगात आणून ठेवण्यात आले आणि पुढे तीन वर्षांनी म्हणजे ६ जानेवारी १९२४ रोजी कारागृहातून त्यांची सुटका होऊन त्यांना रत्नागिरी येथे स्थानबद्ध करण्यात आले. त्यानंतर १९३७ च्या मे महिन्यात त्यांच्यावरचे सर्व निर्बंध दूर होऊन ते संपूर्णतया मुक्त झाल्यावर मुंबईस येऊन स्थायिक झाले.

वीर सावरकरांना ज्या वेळी दोन जन्मठेपींची शिक्षा झाली त्या वेळी ते ती शिक्षा भोगून जिवंत परत येतील असे कोणाला तरी वाटले असेल का ? मुळीच नाही; आणि समजा, दोन जन्मठेपींची शिक्षा भोगीपर्यंत ते परमेश्वरी कृपेने वाचले असते तर ते केव्हा सुटले असते, तर २४ डिसेंबर १९६० रोजी. अकरा साली ह्या तारखेची कोणाला तरी कल्पना करता आली असती का ? पण पन्नास वर्षांचा हा प्रचंड कालखंड संपून ती चोवीस तारीख अखेर शेवटी आज उगवली. हा वीर सावरकरांनी कालपुरुषावर म्हणजे साक्षात मृत्यूवर मिळवलेला केवढा मोठा विजय होय ! म्हणूनच त्यांचा ‘ मृत्युंजय दिन ’ आज आपण हर्षभराने साजरा करीत आहोत. खरोखरच वीर सावरकर हा भारतीय इतिहासातील एक चमत्कार होय. पौराणिक काळामध्येच चमत्कार घडत होते असा ज्यांचा भ्रम आहे, त्यांनी त्यांच्या चरित्राकडे एकवार दृष्टी टाकावी. डोळे दिपवून टाकतील असे अनेक अद्‌भुत पराक्रम त्यांच्या जीवनात भरलेले आहेत. इंग्रजांनी हा देश जिंकून निःशस्त्र केल्यानंतर ह्या देशातल्या शौर्याच्या नि धैर्याच्या सर्व लढाऊ परंपरा हळूहळू नष्ट झाल्या. इतक्या की, स्वातंत्र्याचा शाब्दिक उच्चार करण्याचेही सामर्थ्य कोणात राहिले नाही. परकीय राज्य-कर्त्यांच्या लांगूलचालनाचे पर्व सर्वत्र सुरू झाले. पौरुषाची नि स्वाभिमानाची राखरांगोळी होऊन गेली. ती राख पुन्हा पेटवून तिच्यातून स्वातंत्र्यप्रीतीचा आणि देशभक्तीचा अंगार ज्यांनी बाहेर काढला, त्या ज्वलज्जहाल क्रांति-

कारकांचे वीर सावरकर हे निःसंशय कुलपुरुष आहेत.

भारतीय शौर्याचा नि पराक्रमाचा तेजस्वी वारसा घेऊन सावरकर जन्माला आले. इतिहासाच्या धगधगत्या कुंडामधून त्यांचा पिंड अन् प्रज्ञा तावून सुलाखून निघाली. सत्तावनच्या स्वातंत्र्यसमराची धग त्या वेळीं देशातून नष्ट झाली नव्हती. किंबहुना वासुदेव बळवंताच्या आत्मयज्ञाच्या वातावरणामधेच सावरकरांचा जन्म झाला. देशबांधवांचा राक्षसी छळ करणाऱ्या उन्मत्त इंग्रज अधिकाऱ्याचा बळी घेऊन चाफेकर बंधू फासावर चढले. त्यांच्या प्राणज्योतीने चेतवलेले यज्ञकुंड एकसारखे भडकवीत ठेवणे हे आपले कर्तव्य आहे असा त्यांना साक्षात्कार झाला. घरातल्या अष्टभुजा देवीपुढे त्यांनी शपथ घेतली की, देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मी मारता मारता मरेतो झुंजेन!' वयाच्या चौदाव्या वर्षी मृत्यूला आव्हान देण्याची प्रतिज्ञा सावरकरांनी केली आणि ती विलक्षण रीतीने खरी करून दाखविली. साक्षात मृत्यूच्या जबड्यात जाऊनच मुळीं त्यांनी बारा वर्षे मुक्काम ठोकला. मृत्यूची फजिती आतापर्यंत कोणी केली नसेल म्हणून की काय, त्याच्यावर प्रसन्न होऊन मृत्युंजयाने त्यांना आजचा दिवस दाखवला आहे. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने जाण्याची केवळ प्रतिज्ञा करूनच सावरकर स्वस्थ बसले नाहीत, तर परकीय राज्यकर्त्यांविषयी व्देष आणि पारतंत्र्याबद्दल चीड ह्या भावनांची आग तरुणांच्या हृदयामधे पेटवून त्यांची डोकी भडकवण्याचे कार्य ऐन तरुणपणी सावरकरांनी मोठ्या प्रखरतेने आणि प्रभावाने केले. अग्निरसाच्या कारंजाप्रमाणे स्वातंत्र्याची ज्वलजहाल काव्ये सावरकरांच्या अलौकिक प्रतिभेमधून उचंबळू लागली आणि महाराष्ट्रातील आबालवृद्धांच्या ओठावर नाचू लागली. स्वातंत्र्यासाठी भारताच्या इतिहासात ज्या वीरांनी आपले रक्त सांडले होते, त्यांची स्फूर्तिदायक चरित्रे आपल्या प्रतिभेच्या हजाऱ्यातून सावरकरांनी सर्वत्र उधळून दिली आणि स्वातंत्र्याच्या नि देशभक्तीच्या उन्मादक सुगंधाने सारा देश धुंद करून टाकला.

स्वातंत्र्यलक्ष्मीला अरिरुधिराचे स्नान घातल्यावाचून ती प्रसन्न होणार नाही, ह्या मंत्राची जाहीर दीक्षा देशातील तरुणांना देऊन सशस्त्र क्रांतीची मुहूर्तमेढ सावरकरांनी ह्या शतकाच्या प्रारंभी ह्या देशात रोवली. सशस्त्र क्रांतीचे शास्त्र शिकण्यासाठी ते मातृभूमी सोडून विलायतेला गेले. इंग्लंडमधल्या स्वतंत्र वातावरणात पाश्चात्त्य क्रांतिकारकांच्या जीवनाचा नि तत्त्वाचा अभ्यास करण्याची त्यांना भरपूर संधी मिळाली. मॅझिनी, गॅरिबाल्डी नि काव्हूर या

इटालियन देशभक्तांच्या विचाराची नि क्रांतितंत्राची त्यांच्या मनावर विशेष छाप पडली. हळूहळू सावरकरांभोवती भारतीय क्रांतिकारक तरुणांचा गट जमू लागला आणि 'अभिनव भारता'ची लंडनमध्ये स्थापना झाली. मॅझिनीचे चरित्र आणि सत्तावनी स्वातंत्र्यसमर हे ग्रंथ लिहून भारतीय क्रांतिकारकांमध्ये त्यांनी नवचैतन्य निर्माण केले. सत्तावनी स्वातंत्र्यसमर ह्या ग्रंथासारखा अलौकिक ग्रंथ वयाच्या पंचविसाव्या वर्षी सावरकरांनी लिहिला हा त्यांच्या प्रतिभेचा अद्‌भुत चमत्कार होय. ह्या ग्रंथाला पुढे सारे भारतीय क्रांतिकारक 'सशस्त्र क्रांतीच्या तत्त्वज्ञानाची गीता' असे संबोधू लागले. आझाद हिंद सेनेच्या स्थापनेची स्फूर्ती नेताजी सुभाषचंद्रांना ह्याच ग्रंथाने दिली. एकोणीसशे सात साली सत्तावनी स्वातंत्र्यसमराला पन्नास वर्षे पूर्ण झाली. ह्याच सुमारास बंगालच्या फाळणीची लॉर्ड कर्झनने घोषणा करून देशातील क्रांतिकारकांना आव्हान दिले, ते वीर सावरकरांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वीकारले. भारतात क्रांतिकारकांच्या गुप्त संघटना स्थापन करून स्फोटकाची विद्या त्यांना शिकविण्यासाठी त्यांनी आपल्या काही सहकाऱ्यांची तावडतोब भारतात रवानगी केली. सात सालच्या अखेरपासून देशात बॉंबचे नि पिस्तुलाचे आवाज ऐकू यावयाला लागले. सत्तावनी क्रांतियुद्धात अमर झालेल्या हुतात्म्यांची शपथ घालून सावरकरांनी भारतामधील क्रांतिकारकांना त्या वेळी बजावले की, '१० मे १८५७ रोजी सुरू झालेला भारताचा स्वातंत्र्यसंग्राम अद्याप संपला नाही. सौंदर्यसंपन्न भारताच्या डोक्यावर विजयाचा देदीप्यमान मुकुट जेव्हा चढेल तेव्हाच हा स्वातंत्र्यसंग्राम संपेल.' अशा रीतीने वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी सावरकर हे भारताच्या सशस्त्र क्रांतीचे एकमेव सूत्रधार बनले आणि ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या राजधानी-मध्ये बसून भारतामधील तिच्या साम्राज्याला सुरुंग लावण्याचे महान ऐतिहासिक कार्य त्यांनी हाती घेतले. नामदार गोखले ह्यांनी त्यांना सांगितले, 'देशाचे स्वातंत्र्य मिळविण्याचा तुमचा मार्ग अव्यवहार्य आहे.' त्यावर सावरकरांनी त्यांना उत्तर दिले, 'मी इतिहाससिद्ध मार्गाने जातो आहे. मला इतिहासाचा पाठिंबा आहे. तुम्हांला नाही.' ब्रिटिश सरकार आणि भारतीय क्रांतिकारक ह्यांचा जीवनमरणाचा झगडा सुरू झाल्यानंतर ब्रिटिश सरकार सावरकरांना लंडन-मध्ये आपले क्रांतिकार्य निर्वेधपणे करून देईल हे मुळी शक्यच नव्हते. त्यांनी सावरकरांच्या भोवती आपले पोलादी जाळे टाकून त्यांना पकडले. 'मोरिया' बोटीत घालून त्यांना स्वदेशी परत आणण्यात येत असता मार्सेल्स येथे

बोटीवरून समुद्रात उडी मारून त्यांनी निसटण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने तो निष्फळ ठरला. ही त्यांची महान उडी त्रिखंडात गाजली.

त्यानंतर मुंबई हायकोर्टात खास न्यायाधीश मंडळापुढे त्यांच्यावर खटला होऊन त्यात त्यांना दोन जन्मठेपींच्या काळ्यापाण्याची शिक्षा झाली. अशा रीतीने सात साली वीर सावरकरांच्या ज्या सशस्त्र क्रांतिपर्वाला प्रारंभ झाला तो अकरा साली समाप्त झाला. भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाला आंतरराष्ट्रीय स्वरूप देणारे सावरकर हे पहिले क्रांतिकारक होते. म्हणूनच भारतीय क्रांतिकारकांचे मुकुटमणी असे त्यांना म्हटले जाते. भारताच्या सशस्त्र क्रांतीचा वीर सावरकर हे 'पाया' असून नेताजी सुभाषचंद्र हे तिचा कळस होत. सत्तेचाळीस साली भारतामधील इंग्रजी सत्ता नष्ट होऊन देश स्वतंत्र झाला, ह्याचे श्रेय गांधींना आणि टिळकांना जसे आहे, तसे वीर सावरकर आणि नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांनाही आहे. तथापि, सशस्त्र क्रांती आणि हिंसा हे एक महान पाप असून रक्ताचा एक थेंब न सांडता देशाला स्वातंत्र्य मिळाले अशा तऱ्हेचा विकृत प्रचार आजचे राज्यकर्ते करीत आहेत. त्यावरून भारताच्या स्वातंत्र्यासाठी सावरकरांपासून सुभाषचंद्रापर्यंत ज्या असंख्य देशभक्तांनी सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करला आणि आपल्या रक्ताचे अर्घ्य ओतले, ते त्यांचे बलिदान व्यर्थ होते, असा त्यांच्या म्हणण्याचा निष्कर्ष निघतो. एवढेच नव्हे तर भारताचा पूर्वीचा सर्व इतिहासच मुळी चूक आहे असे ठरविण्यापर्यंत काही काँग्रेसश्रेष्ठींची मजल गेली आहे. इतिहासाशी कृतघ्न होणे हा राजकारणातला नित्याचाच खेळ आहे. तथापि स्वातंत्र्याच्या इतिहासातून सावरकर-सुभाषचंद्रांची नावे पुसून टाकण्याचा काँग्रेसवाल्यांनी कितीही प्रयत्न केला तरी तो निष्फळच ठरेल. कारण स्वातंत्र्याचा इतिहास लोकांच्या अंतःकरणावर लिहिला जातो; कागदावर नाही. भारताच्या इतिहासातील एक तेजस्वी कालखंड रक्तामांसाच्या रूपात वीर सावरकरांच्या मूर्तीने आज आपणांसमोर वावरतो आहे हे आपले केवढे परम भाग्य! देशाच्या स्वातंत्र्याखेरीज उभ्या आयुष्यात ज्यांनी दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार केला नाही, स्वातंत्र्यलक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी ज्याने मरणाचे हालाहल पचविले, त्या भारताच्या आद्य क्रांतिकारकाच्या—त्या मृत्युंजय सावरकरांच्या चरणी आमची अनंत लोटांगणे असोत!

मराठा : २८-५-१९६३


मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम.......... दि: ..........

१८

# गोविंद नारायण माडगावकर

अर्वाचीन महाराष्ट्राच्या इतिहासातील अगदी प्रारंभीच्या काळात होऊन गेलेल्या चार श्रेष्ठ वाङ्मयसेवकांपैकी गोविंद नारायण माडगावकर म्हणून एक होते. त्यांच्या निधनाला गेल्या महिन्याच्या पंधरा तारखेला शंभर वर्षे पूर्ण झाली. त्यांचे स्मरण वस्तुतः गेल्याच महिन्यात आम्ही करावयाला पाहिजे होते, पण अनवधानाने ती गोष्ट तशीच राहून गेली. पण आमचे मित्र प्रा. अ. का. प्रियोळकर ह्यांनी त्या गोष्टीकडे आमचे लक्ष वेधले आणि त्यांनीच माडगावकरांची सर्व चरित्रविषयक माहिती आम्हांला पुरविली. म्हणून त्याच्या आधारे आम्ही हा अग्रलेख लिहितो आहोत.

अर्वाचीन महाराष्ट्राच्या प्रारंभीचे पहिले चार वाङ्मयसेवक कोण होते, त्यांची नावे प्रत्येक मराठी माणसाने लक्षात ठेवावयाला हवीत. पहिले, सदाशिव काशिनाथ छत्रे. दुसरे, बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर. तिसरे, हरि केशवजी पाठारे अन् चवथे गोविंद नारामण माडगावकर. त्या काळात आडनावे लावण्याची पद्धत नव्हती. मराठीचे सुप्रसिद्ध व्याकरणकार दादोबा पांडुरंग ह्यांचे आडनाव 'तर्खडकर' असे होते. पण ते 'दादोबा पांडुरंग' ह्याच दोन-तृतीयांश नावाने प्रसिद्ध आहेत. तसेच गोविंद नारायण माडगावकर हे 'गोविंद नारायण' किंवा 'गोविंदजी' ह्याच नावाने त्या काळात प्रसिद्ध होते. गोविंद नारायण ह्यांचा जन्म ज्याला 'व्हडले गोय' म्हणतात ना, त्या जुन्या गोव्यात पेरी या गावी झाला. त्यांच्या घराण्याचे मूळ उपनाव 'शेणवी' किंवा 'शेणवी घोडे' असे

असावे असा तर्क आहे. गोविंदजींचे वडील पोर्तुगाली तपकिरीचा धंदा करीत असत. तंबाकू ही हिंदुस्थानात प्रथम पोर्तुगीजांनी आणली. तिचे मूळ स्थान 'ब्राझील'. तंबाकूची पाने ब्राझीलहून पोर्तुगालात नेऊन त्यांची पूड करीत, आणि तिकडून तिची गोव्यात आयात होई. गोव्यात तपकिरीला 'पूड' असे म्हणतात. 'पूड' विकणाऱ्यांना गोव्यात 'पूडकार' असे म्हटले जात असे. गोविंदजींचे वडील हे पूडकार होते. हा व्यापार मुंबईत जास्त किफायतशीर होईल, म्हणून ते गोवे सोडून १८२४ च्या सुमारास मुंबईला आले, आणि काळबादेवी रस्त्यावर त्यांनी आपले तपकिरीचे दुकान काढले. त्या काळी मुंबईत तपकिरीचे लोकांना विलक्षण वेड होते. एवढेच नव्हे तर ते व्यसन शाळेच्या विद्यार्थ्यांमध्येही पसरले होते. आपले संस्कृत पंडित तंबाकूचे अस्तित्व प्रत्यक्ष इंद्र आणि ब्रह्मदेव ह्या देवांपर्यंत नेऊन भिडवतात. एका संस्कृत सुभाषितात असे म्हटले आहे की, या जगामध्ये 'सारभूत' काय आहे, असा एकदा इंद्राने ब्रह्मदेवाला प्रश्न केला. तेव्हा ब्रह्मदेव आपल्या चारही तोंडांनी एकदम उद्गारले की 'तंबाकू-तंबाकू-तंबाकू-तंबाकू!'

बिडौजाः पुरा पृष्ठवान् पद्मयोनि, धरित्रीतले सारभूतं किमस्ति ? ।
चतुर्भिर्मुखैरित्यवाचद्विरिंचिः तमाखुस्तमाखुस्तमाखुस्तमाखुः ।।

गोविंदजींचे वडील जरी तपकिरीचे व्यापारी होते, तरी स्वतः गोविंदजी हे तपकिरीच्या अत्यंत विरुद्ध असत. त्यांनी तपकिरीविरुद्ध पुष्कळच प्रचारात्मक लिखाण पुढे केले.

गोविंदजी हे 'एल्फिन्स्टन नेटिव एज्युकेशन इन्स्टिट्यूशन'च्या शाळेत इंग्रजी शिकले. पुढे ते 'जनरल असेंब्ली'च्या शाळेत शिक्षक झाले. १८४४ ते १८५६ पर्यंत त्यांनी 'ओरिएंटल ख्रिश्चन स्पेक्टेटर' या मासिकाच्या व्यवस्थापकाचे नि प्रकाशकाचे काम केले. गोविंदजी हे हिंदू असूनही डॉ. वुइल्सन प्रभृती त्या वेळच्या ख्रिस्ती मिशनऱ्यांशी त्यांचा उत्तम स्नेहसंबंध होता. १८४८ मध्ये मुंबईत एक 'उपयुक्त प्रसारक' नावाची सभा स्थापन झाली. तिच्यामार्फत पुढे १८५० सालापासून 'ज्ञानप्रसारक' नावाचे एक मासिक निघू लागले. त्यात गोविंदजींनी अनेक झणझणीत लेख लिहिले. मराठी भाषेत एक 'ज्ञानकोश' निर्माण व्हावा ही कल्पना त्यांनी १८५६ मधे त्या मासिकात एक लेख लिहून मांडली. त्या लेखात ते म्हणतात, "या ज्ञानप्रसारक सभेकडून मराठी भाषेची सुधारणूक होऊन तीत अनेक तऱ्हेचे ग्रंथ व्हावे. मराठी भाषेत

‘ सर्वसंग्रह ’ नावाचा एक ग्रंथ असावा ज्यास इंग्रजीमधे ‘ सायक्लोपीडिया ’ म्हणतात. असे ग्रंथ आपल्या भाषेत नसल्यामुळे ती भाषा पूर्णतेस आलेली नाही. हे काम सिद्धीस नेण्यास जर आमचे सभासद मनावर घेऊन किमानपक्ष वर्षातून एकेका विषयावर निबंध लिहून तयार करतील, तर हे काम सहज सिद्धीस जाईल. ”

१८५९ साली ‘ ज्ञानप्रसारक मंडळा ’पुढे भाषण करताना गोविंदजींनी तात्कालिक देशपरिस्थितीचे अत्यंत निर्भीड असे विश्लेषण केले. ते म्हणाले, “ हल्ली आम्हांस चाकरी करण्याचा फार नाद लागला आहे. मोठा असो किंवा गरीब असो. जो उठला तो चाकरी करावयास धावतो. जे गरीब आहेत त्यांनी मात्र चाकरी करावी हे योग्य आहे. परंतु, जे श्रीमंत आहेत त्यांनी आपापल्या मुलांस अनेक प्रकारचे धंदे शिकवावे. जेव्हा आम्हामध्ये पुष्कळ व्यापारी, देश-पर्यटण करणारे, कलाकौशल्य शिकणारे असे लोक होतील, तेव्हाच आम्हांमध्ये स्वतंत्रपणा येईल. ” ‘ स्वतंत्रपणा ’ म्हणजे, ‘ देशाचे स्वातंत्र्य ’ असाच अर्थ गोविंदजींना अभिप्रेत असला पाहिजे हे काय सांगावयाला पाहिजे ? यावरून त्या काळीही स्वातंत्र्याची भावना लोकांमध्ये जागृत होती ही गोष्ट उघड आहे.

गोविंदजींचे शिष्य डॉ. भाऊ दाजी लाड यांनी तर त्या काळीं केलेल्या भाषणात भारताच्या निर्भेळ स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. ते म्हणाले, “ जर कवी असे वदून आले की, माझ्या देशात सुधारणूक आणि ज्ञान यांची वृद्धी होऊन तो आपली राज्यव्यवस्था आपण करण्यास योग्य झाला, तर दिवसेंदिवस मानुषधर्म वृद्धी पावत चालला आहे, त्यावरून मला असा भरंवसा येतो की, इंग्लंड देश ती गोष्ट कबूल करून उदारपणे आपणास साम्राज्याच्या ओझ्यापासून मुक्त करून घेण्यास राजी होईल, आणि माझ्या स्वदेशीय जनांस विद्या शिकवून त्यांचे एक स्वतंत्र लोकांचे राज्य केल्याचे जे यश त्यांस प्राप्त होईल तितक्यातच संतोष मानून राहील. ” मुंबईची पहिली राजकीय संस्था ‘ धी बॉम्बे असो-सिएशन ’ हिचे डॉ. भाऊ दाजी एक संस्थापक होते. त्याच संस्थेमधून मुंबईची ‘ प्रेसिडेन्सी असोसिएशन ’ आणि तिच्यातूनच पुढे हिंदी राष्ट्रीय सभा निघाली.

गोविंदजींचे खाजगी मराठी नि इंग्रजी शिक्षणाचे वर्ग असत. त्याच्यामधे मुंबई-मधे पुढे नावारूपाला चढलेल्या अनेक पुरुषांनी शिक्षण घेतल्याचे आढळते. न्यायमूर्ती रानडे, रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक, डॉ. रामकृष्ण भांडारकर ह्या त्या काळातल्या तरुणांना गोविंदजींपासून स्फूर्ती मिळाली. नव्या

पिढीमध्ये नीती आणि ज्ञान ह्यांची वाढ झाल्यावाचून तिच्यामधे ‘ स्वतंत्रपणा ’ रुजू शकणार नाही अशी त्यांची भावना होती, आणि म्हणून त्या दृष्टीनेच त्यांनी आपले सारे वाङ्मय लिहिले. गोविंदजींनी मराठी भाषेत पुढील ग्रंथ लिहिले : ( १ ) शुचिर्भूतपणा ( १८४९ ). ( २ ) ऋणनिषेधक बोध ( १८५० ). ( ३ ) नीतिसंवाद ( १८५० ). ( ४ ) हिंदु लोकांचा रीती सुधारण्याचा बोध ( १८५१ ). ( ५ ) सृष्टीतील चमत्कार ( १८५१ ). ( ६ ) सत्यनिरूपण ( १८५२ ). ( ७ ) दारूपासून अनर्थ ( ८ ) उद्‌भिदजन्य पदार्थ ( १८५६ ). ( ९ ) वृक्षवर्णन ( १८५७ ). ( १० ) लोखंडी सडकांचे चमत्कार ( १८५८ ). ( ११ ) व्यवहारोपयोगी नाटक ( १८५९ ). ( १२ ) भोजनबंधू पानतंबाखू ( १८६० ). ( १३ ) सुलेखनविद्या ( १८६० ). ( १४ ) मुंबईचे वर्णन ( १८६३ ). हा त्यांचा अगदी शेवटचा आणि सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाचे पुनर्मुद्रण मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने अगदी अलीकडे केलेले आहे. ( १५ ) पत्रावळी व द्रोण ( १८५७ नि १८६१ ). ह्यांपैकी चार ग्रंथांचे गुजराती भाषांतर त्याच वेळी पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. त्याखेरीज त्यांचे अनेक निबंध आणि व्याख्याने ‘ ज्ञानप्रसारक ’ मासिकातून त्या काळी प्रसिद्ध झालेली आहेत.

वस्तुतः इंग्रजी भाषेच्या अभ्यासाने गोविंदजी प्रारंभी भारून गेले होते. त्यामुळे मराठी भाषेचा तिरस्कार त्यांच्या मनात उत्पन्न झालेला असतानाही त्या वेळच्या खिस्ती मिशनऱ्यांच्या प्रेरणेने मराठी भाषेच्या अभ्यासाकडे गोविंदजींचे लक्ष वळले, आणि मग त्यांनी मराठी भाषेत एवढी स्वतंत्र वाङ्मयनिर्मिती केली. तत्कालीन अनेक बड्या बड्या इंग्रज अधिकाऱ्यांचा नि गोविंदजींचा स्नेह होता, आणि त्यांच्याशी त्यांनी पत्रव्यवहार करून त्यात अनेक विद्याविषयक गोष्टींवर चर्चा केली होती. तो पत्रव्यवहार दुर्दैवाने उपलब्ध नाही. गोविंदजींच्या लेखनशैलीचा एक लहानसा नमुना देतो. ‘ सत्यनिरूपण ’ या निबंधात ते म्हणतात, “ मनुष्यास जे गुण व नेम लावून दिल्हे, त्यात सत्य म्हणून जो अप्रतिम नेम, तो सर्वांस प्रिय असून कल्याणकारक व त्यांच्या सर्व सुखांत उपयोगी आहे. सत्याच्या साह्यावाचून प्रपंचसंबंधी एकही कर्म सुरळित व्हावयाचे नाही. जर आज ह्या पृथ्वीवरून सत्य अगदी नाहीसे झाले, तर मोठा अनर्थ होईल. त्यामुळे कोणी कोणावर विश्वास ठेवणार नाही. आईबाप व मुले यांचा परस्परांवरील भरंवसा नाहीसा होईल. भाऊबहिणींचा एकमेकांवर विश्वास राहणार नाही. तसाच, बायकोस नवऱ्याच्या बोलण्याचा खरेपणा वाटणार नाही.

धनी व चाकर यांचाही परस्परांवरील प्रामाणिकपणा राहणार नाही. याप्रमाणे सर्व प्रकारचा अव्यस्थितपणा माजला जाईल. यास्तव परम दयाळू भगवंताने आम्हांस सत्य हा मोठा सुखदायक नेम लावून दिल्हा. त्याचा जर आम्ही धिक्कार केला तर आमचा नाश होईल, यात अगदी संशय नाही. ”

एकंदरीत गोविंदजींची भाषा अत्यंत साधी, गोड आणि परिणामकारक आहे. मधूनमधून उदाहरणादाखल ते मौजेच्या गोष्टी सांगून आपले लेखन चटकदार करीत. शुचिर्भूतपणा, सत्य, नीती हे तर राष्ट्रीय सद्‌गुण आहेत. या सद्‌गुणांना जे राष्ट्र वंचित झाले, त्याला स्वातंत्र्य लाभणार नाही—लाभले तर ते टिकणार नाही. ‘ सत्यमेव जयते ’ हे आपल्या भारताचे ब्रीदवाक्य आहे. त्याचे रूपांतर ‘ हुल्लडमेव जयते’मध्ये सध्या झालेले आहे. अशा वेळीं गोविंदजींची ही जुनी पुस्तके पुनर्मुद्रित करून मुलांच्या नि साक्षर प्रौढांच्या हाती स्वस्त दरात किंवा मोफत पाडायची महाराष्ट्र सरकारने व्यवस्था करावी अशी त्यांना आमची आग्रहाची विनंती आहे.

मराठा : ५-४-१९६५

## १९

# महाराष्ट्राचे सेनापती

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचे सेनापती बापट ह्यांच्या वयाची व्यायशी वर्षे संपून त्यांना आज त्र्यायशीआवे वर्ष लागत आहे. भारताच्या स्वातंत्र्या-साठी ज्यांनी आपल्या सर्वस्वाचा होम केला असे दोनच महाराष्ट्रीय महापुरुष तुमच्या आमच्या भाग्याने अद्याप आपल्यामधे आहेत. एक स्वातंत्र्यवीर सावरकर आणि दुसरे सेनापती बापट. क्रांतिशास्त्राचे धडे दोघांनी एकाच वेळी विलायते-मधे जाऊन घेतले. वयाच्या सोळाव्या वर्षी भगूर ( जि. नाशिक ) येथे आपल्या घरातील अष्टभुजा देवीपुढे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मी मारता मारता मरेतो झुंजेन' अशी ज्याप्रमाणे शपथ घेतली होती, त्याप्रमाणे वयाच्या विसाव्या वर्षी पुण्याच्या 'डेक्कन कॉलेजा'तील आपल्या खोलीत नंग्या तलवारीवर हात ठेवून सेनापती बापटांनीही अशी शपथ घेतली की, "माझ्या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी मी आजपासून यावज्जीव कायावाचामनाने झटेन आणि तिची हाक येताच तिच्या सेवेसाठी धावत येईन. या कामी मला देहाचा होम करावा लागला तरी मी फिरून याच भरतखंडात जन्म घेईन, व अपुरे राहिलेले काम करून दाखवीन."

उच्च शिक्षणासाठी म्हणून सेनापती विलायतेला गेले खरे, पण तेथे ते क्रांति-कारकांच्या वेटोळ्यात सापडले. बंगभंगाविरुद्ध सारा भारतवर्ष खवळून उठला होता आणि ती चळवळ ठेचून टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने हातात दडप-

शाहीचा प्रचंड वरवंटा उचलला होता. 'माझी भारतमाता—माझी आई पारतंत्र्यात आहे, तिला मी कशी मुक्त करू?' हा एकच निदिध्यास सेनापतींना विलायतेत लागून राहिला होता. बॉम्बगोळा हे जागतिक क्रांतिशास्त्रातले एक महान अस्त्र म्हणून त्या वेळी समजले जात होते. त्या अस्त्रनिर्मितीची विद्या शिकण्यासाठी सेनापती हे लंडनहून पॅरिसला गेले. १९०८ साली बॉम्बगोळे तयार करण्याचे सारे वाङ्मय आणि पिस्तुले घेऊन सेनापती मुंबई बंदरात उतरले. तेथून ते सरळ कलकत्त्याला गेले.

त्या वेळी सारा बंगाल पेटला होता. बॉम्बगोळ्याची विद्या सेनापतींनी प्रथम भारतात आणली खरी, पण तिचा बंगालमध्ये दुरुपयोग होऊ लागला. तेथे हत्याकांडाला प्रारंभ झाला नि भलतीच माणसे बळी पडू लागली. विलायतेत त्या भारतीय क्रांतिकारकांनी ठरवलेल्या कार्यक्रमापेक्षा निराळाच कार्यक्रम बंगाली क्रांतिकारकांनी सुरू केला. त्यामुळे सेनापती निराश होऊन पुण्याला परत आले आणि लोकमान्य टिळकांना भेटून आपला कार्यक्रम त्यांनी त्यांच्यापुढे मांडला. पण एवढ्यात लोकमान्यांवर राजद्रोहाचा खटला होऊन त्यांना सहा वर्षांची शिक्षा झाली. ह्याच सुमारास माणिकतोळा येथे बॉम्बगोळ्यांचा गुप्त कारखाना बंगाली क्रांतिकारकांनी काढला होता. तो सरकारने हुडकून काढला, त्यात अनेक क्रांतिकारकांना पकडण्यात आले. त्यांपैकी एक नरेंद्रनाथ गोस्वामी हा माफीचा साक्षीदार झाला, आणि त्याने सेनापती बापट हेच बॉम्ब कटाचे मुख्य सूत्रधार आहेत, असे सांगून टाकले. ती बातमी वृत्तपत्रावरून सेनापतींना पुण्यात कळताच त्याच दिवशी ते अदृश्य झाले. १९०८ ते १९१३ पर्यंतच्या पाच वर्षांच्या काळात सेनापती हे अज्ञातवासात होते. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज सरकारने जंग जंग पछाडले, पण ते काही त्यांच्या हाती लागले नाहीत. त्यांनी मोगलाईत काही दिवस काढले. काही खानदेशात. काही इंदूर संस्थानात. काही गुजरातेत तर काही उत्तर भारतात. ह्या अज्ञातवासात त्यांना नाना तऱ्हेची नामांतरे, वेषांतरे आणि व्यवसाय करावे लागले. अखेर एका माणसाच्या विश्वासघाताने सेनापती पकडले गेले. पण एका महिन्यापेक्षा अधिक काळ काही त्यांना अटकेत राहावे लागले नाही. बंगालमधील अत्याचारांशी त्यांचा काहीही संबंध नव्हता, अशी सरकारची जेव्हा खात्री झाली, तेव्हा नुसता जामीन अन् जातमुचलका घेऊन त्यांना सोडण्यात आले.

त्यानंतरचा म्हणजे १९१४ ते १९२१ पर्यंतचा सेनापतींचा काळ वृत्तपत्र-

व्यवसायात आणि समाजसेवेत गेला. हातातील पिस्तुल नि बॉंब टाकून त्यांनी लेखणी, झाडू आणि खोर घेतले. रोज सकाळी हातात खराटा घेऊन गटारे झाडताना आणि ढकलगाडीत कचरा आणि मैला भरून वाहून नेताना त्या काळात त्यांना पाहिले असल्याचे अनेकांना स्मरत असेल. मुंबईत स्थायिक झाल्यानंतर अगदी परवा परवापर्यंत त्यांचा हा दैनिक कार्यक्रम चालूच असे. झाडूचे तंत्र महात्मा गांधींनी भारतात आणले, अशी जी पुष्कळांची समजूत आहे ती चूक आहे. बॉंबगोळ्याप्रमाणे झाडूच्या शास्त्राचे या देशातील जनक सेनापती बापटच होते.

१९२१ साली पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यात धरण बांधून मुंबईला वीज पुरवण्याची एक मोठी योजना टाटा कंपनीने काढली. ह्या धरणाच्या पाण्यात सबंध मुळशी पेट्यातील चौपन्न गावे बुडून दहा हजार मावळे देशोधडी लागणार होते. पंधरा हजार खंडी पीक बुडणार होते. या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सारा महाराष्ट्र खडबडून जागा झाला. त्याने सत्याग्रही लढा पुकारला आणि त्या लढ्याचे नेतृत्व सेनापतींकडे आले. 'सेनापती' ही पदवी ह्याच सत्याग्रहापासून त्यांना प्राप्त झाली. ह्या टाटाविरोधी सत्याग्रहाला साहजिकच सरकारविरोधी लढ्याचे स्वरूप आले. सरकारने सत्याग्रह्यांची धर-पकड करून त्यांना येरवड्याच्या तुरुंगात कोंबण्याचा सपाटा लावला. या सत्याग्रहात सेनापतींना चार वेळा शिक्षा दिल्या. शेवटची शिक्षा सात वर्षांची होती. ती भोगून १९३१ साली ते सुटले. म्हणजे १९२१ ते १९३१ हा कालखंड सेनापतींच्या आयुष्यातले कारागृहपर्वच होय.

त्यानंतर ते महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. सेनापती जरी कॉंग्रेसचे नेते होते तरी ते काही निर्भेळ अहिंसावादी नव्हते. रत्नागिरी येथे त्यांनी एक भाषण केले ते हिंसेला उत्तेजन देणारे आहे ह्या आरोपावरून सरकारने त्यांच्यावर खटला भरला. त्यात पुन्हा त्यांना सात वर्षांची शिक्षा झाली. १९३७ साली कॉंग्रेस सरकार अधिकारावर आले तेव्हा त्यांना बंधमुक्त करण्यात आले. 'चले जाव' आंदोलनात पुन्हा त्यांना एक वर्षाची शिक्षा झाली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषावार प्रांतरचनेच्या विचाराला जेव्हा प्रारंभ झाला आणि संयुक्त महाराष्ट्राची मागणी पुढे येऊन कॉंग्रेसश्रेष्ठींनी जेव्हा तिला विरोध केला, तेव्हा सेनापतींच्या अंतःकरणाला सर्वांपेक्षा जास्त वेदना झाल्या. प्रत्यक्ष संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होण्यापूर्वी सेनापतींनी महाराष्ट्राच्या



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम.................. दि: ..................

निरनिराळ्या भागांत दौरे, प्रभातफेऱ्या काढून, व्याख्याने देऊन आणि शेकडो छापील गाणी नि पत्रके वाटून ह्या प्रश्नाबाबत लोकमत जागृत करण्याचा निकराने प्रयत्न केला. १९५५ साली गोमंतकमुक्तीचा जो लढा महाराष्ट्राने केला, त्यात सेनापती अग्रभागी होते. त्याच वर्षी १८ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे संयुक्त महाराष्ट्राच्या सत्याग्रहाचा लढा जो सुरू झाला, त्याचे सेनापतिपद त्यांनाच देण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राच्या पाच वर्षांच्या आंदोलनामधील प्रत्येक अवस्थेत सेनापती भीष्माचार्यांप्रमाणे अग्रभागी तळपत होते. त्या आंदोलनातील त्यांची काही काही वक्तव्ये अत्यंत ज्वलज्जहाल होती, ती लोक अद्यापही विसरले नसतील.

स्वातंत्र्यासाठी आपल्या सर्वस्वाचे हवन करणाऱ्या ह्या महापुरुषाच्या जीवनाला तेवढीच तेजस्वी आध्यात्मिक बाजू आहे. गीतेचे तत्त्वज्ञान त्यांच्या रोमरोमांत भिनले असल्यामुळे स्थितप्रज्ञतेच्या अवस्थेला जाऊन ते पोहोचले आहेत. आज भारतात त्यांच्याइतके अध्यात्माच्या उच्च भूमिकेवर वावरणारे फार थोडे पुरुष आहेत. सानेगुरुजींनी त्यांचे एके ठिकाणी फार सुंदर वर्णन केलेले आहे, ते देऊनच ह्या लेखाचा आम्ही समारोप करतो. "त्यांच्या सर्व कृतीत श्रीहरि भरलेला आहे. त्यांच्या जीवनाला देशभक्तीचा वास आहे, पण देशभक्तीला देवभक्तीने अधिकच मधुर केले आहे. ते फुलाहून कोमल अन् वज्राहून कठोर आहेत. त्यांच्या ठिकाणी वीराची वीरता अधिक आहे की संन्याशाची संन्यस्तता अधिक आहे हे सांगता येणे कठीण आहे. ते निसर्गाप्रमाणे आहेत. क्षणात रडतील, क्षणात हसतील. सूर्यप्रकाशासारखे ते कोठेही जातील. जेथे जातील तेथे फुलवतील, मलिनता दूर करतील. देशाला आणि महाराष्ट्राला जागे करावयाला त्यांनी जेवढे म्हणून काही देता येईल तेवढे दिले आहे. त्यासाठी त्यांनी पिस्तुल घेतले, झाडू घेतला, लेखणी घेतली. सेनापती हे शिवाजी, रामदास व तुकाराम ह्यांची त्रिमूर्ती. सेनापती म्हणजे लोकमान्य, महात्माजी नि स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांचे अपूर्व मधुर मिश्रण. भक्ती, ज्ञान नि सेवा ह्यांची ही मूर्तिमंत त्रिपदा गायत्रीच!" भारताच्या नि महाराष्ट्राच्या प्रेमाने तुडुंब भरलेल्या ह्या महापुरुषाचे छत्र आमच्यावर उदंड काळ असेच राहो, हीच श्रीहरीच्या चरणी आमची प्रार्थना!

मराठा : १२-१-१९६२

२०

# सेनापती दीर्घायू होवोत !

भारताच्या स्वातंत्र्यासाठी नि उद्धारासाठी आपल्या संपूर्ण आयुष्याचे आणि सर्वस्वाचे हवन करणाऱ्या आपल्यासारख्या अलौकिक क्रांतिकारक राष्ट्रभक्ताचे नि देशसेवेसाठी संन्यास पत्करलेल्या आपल्यासारख्या स्थितप्रज्ञ संतपुरुषाचे आज सहर्ष स्वागत करताना बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापौर आणि सभासद ह्यांना अतिशय धन्यता वाटत आहे.

आपली जीवनकथा एकाहूनही एक अशा विलक्षण अद्‌भुतरम्य चमत्कारांनी भरलेली आहे.

> चमत्कारमयी माझी कहाणी मज वाटते ।
> मदर्थ हरिचे कष्ट पाहुनी प्रेम दाटते ॥

तथापि आपण स्वतःसंबंधी आणि आपल्या पूर्वायुष्यासंबंधी एक चकार शब्द् काढीत नसल्याने आपल्या चरित्राचे रोमहर्षक रामायण अद्यापपावेतो अज्ञातातच राहिलेले आहे, याचे आम्हांस राहून राहून दुःख वाटते.

आपण मॅट्रिक्युलेशन परीक्षेत संस्कृतची जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळवून सन्मानाने विश्वविद्यालयात प्रवेश केलात. १९०२ साली पुण्याच्या डेक्कन कॉलेजात असताना नंग्या समशेरीवर हात ठेवून आपले सारे आयुष्य मातृभूमीच्या सेवेसाठी स्वातंत्र्यार्थ खर्च करीन, अशी शपथ आपण घेतलीत आणि त्या प्रतिज्ञेचे आपण आजतागायत पालन केलेत. बी. ए. झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी आपण विलायतेत गेलात. तेथे तेथील भारताच्या स्वातंत्र्याचाच

निदिध्यास आपणास लागून राहिला. एडिंबरो विश्वविद्यालयाच्या ' क्वीन्स रायफल्स ' पलटणीत एक वर्ष आपण लष्करी शिक्षण घेतले. ' भारतमें अंग्रेजी राज ' या विषयावर अत्यंत ज्वलज्जहाल भाषण करताना, ' परकीय राज्यकर्ते नि हिंदी लोक ह्यांच्यामधील स्वातंत्र्याचा प्रश्न सोडविण्यासाठी इतर अनेक साधनांबरोबर ह्या गोलिकायंत्राचाही उपयोग आम्हांला करावा लागेल ! ' असे उद्‌गार काढून आपल्या जवळचे भरलेले पिस्तुल आपण दाणकन् अध्यक्षांच्यापुढे टेबलावर आदळलेत व सारे वातावरण हादरून सोडलेत. त्यामुळे मुंबई विश्वविद्यालयाने आपली शिष्यवृत्ती बंद केली. त्यानंतर सुप्रसिद्ध क्रांतिकारक श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या ' इण्डिया हाऊस 'मध्ये आपण दाखल झालात.

याच वेळी भारतात वंगभंगाच्या चळवळीचा प्रचंड धुमधडाका सुरू झाला. दडपशाहीचा वरवंटा भारताच्या महान नेत्यांच्या मस्तकावरून फिरू लागला. तेव्हा " पार्लमेंटची बैठक चालू असता तेथे जाऊन बॉम्ब टाकतो आणि सारे पार्लमेंट हाऊस उडवून देतो ! " अशी गर्जना करण्यापर्यंत आपल्या क्रोधाचा भडका उडाला. त्यानंतर अस्त्रनिर्मितीची विद्या शिकण्यासाठी आपण पॅरिसमध्ये गेलात आणि जागतिक क्रांतिशास्त्रातले महान अस्त्र जे बॉम्बगोळा त्याचे सारे तंत्र आपण एका रशियन युवतीकडून शिकलात आणि ते सारे वाङ्मय आणि पिस्तुले घेऊन १९०८ साली आपण भारतात परत आलात. तथापि माणिकतोळा बॉम्ब-कटाच्या खटल्यातील माफीचा साक्षीदार नरेंद्र गोस्वामी ह्यांनी सेनापती बापट हेच ह्या बॉम्ब–कटाचे मुख्य सूत्रधार आहेत असे सांगून जेव्हा आपले नाव त्यात गुंतविले तेव्हा १९०८ पासून १९१३ पर्यंत आपण भूमिगत झालात. बी. ए. असूनही आपण पुन्हा मॅट्रिकच्या वर्गात नाव घातलेत आणि पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालात.

१९१४ साली आपण मुक्त झाल्यावर बॉम्बगोळा फेकून दिलात आणि हातात झाडू घेतलात. बॉम्बगोळ्याप्रमाणेच झाडूच्या शास्त्राचे या देशातील जनक आपण आहात. १९२१ साली मुळशी पेठ्यात धरण बांधण्याची टाटा कंपनीने योजना काढली. त्या धरणाच्या पाण्यात मुळशी पेठ्यातील ५४ गावे बुडून दहा हजार मावळे देशोधडीला लागणार होते नि पंधरा हजार खंडी पीक पाण्याखाली बुडणार होते. ह्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी महाराष्ट्राने सत्याग्रही लढ्याचे रणशिंग फुंकले आणि लढ्याचे सेनापतित्व आपल्याकडेच

आले. तेव्हापासून सारा महाराष्ट्र आपणाला 'सेनापती बापट' असे संबोधू लागला.

वस्तुतः आपण स्वभावतः सशस्त्र क्रांतीचे पुरस्कर्ते. पण सहकार्याची शिस्त पाळून आपण अहिंसात्मक सत्याग्रहाचे निष्ठापूर्वक परिपालन केलेत. ह्या व यापुढील सर्व आंदोलनांत आपणाला तीन वेळा सश्रम कारावासाची शिक्षा झाली. १९२१ ते १९३७ ह्या आपल्या आयुष्यातील कालखंडाला 'कारागृह-पर्व' म्हणता येईल.

१९४८ सालापासून आपल्या चरित्रातल्या 'महाराष्ट्रपर्वा'ला प्रारंभ झाला. प्रत्यक्ष संयुक्त महाराष्ट्राची संस्मरणीय चळवळ सुरू होण्यापूर्वी आपण अखिल महाराष्ट्रात दौरे, प्रभातफेऱ्या काढून व व्याख्याने देऊन ह्या प्रश्नाबाबत लोकमत जागृत केले. १९५५ साली गोमंतकमुक्तीच्या संग्रामात महाराष्ट्रातर्फे आपण अग्रभागी राहून लढ्याचे नेतृत्व केले आणि सालाझारशाहीचा क्रूर अत्याचार प्रत्यक्ष सहन केलात. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्रासाठी सत्याग्रही जनआंदोलन मुंबई शहरात सुरू झाले, त्याचे सेनापतिपदही आपल्याकडेच आले. पुढे सतत पाच वर्षे संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या प्रत्येक संघर्षात भीष्माचार्यांप्रमाणे आपण अग्रभागी तळपलात. ह्या काळात—

महाराष्ट्र मेला, तरी राष्ट्र मेले।
मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले ॥ १ ॥
खरा वीर वैरी पराधीनतेचा।
महाराष्ट्र आधार या भारताचा ॥ २ ॥

हा आपला महाराष्ट्र-मंत्र चार कोटी मराठी माणसांच्या कानात निनादत होता. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला हे आपल्याच सक्रिय आशीर्वादाचे व तपस्येचे फळ होय.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या प्रत्येक आंदोलनात आपण अग्रेसर राहिलात. सशस्त्र क्रांतिकारकांच्या अद्य प्रयत्नात 'स्वातंत्र्यवीर सावरकरां'च्या बरोबर आपण होतात. लोकमान्य टिळकांच्या 'होमरूल' चळवळीतही आपण होतात. अहिंसेच्या तत्त्वावर फारसा विश्वास नसताना महात्मा गांधींच्या अनत्याचारी असहकाराच्या लढ्यातही आपण भाग घेतला. रशियात १९१७ साली क्रांती होऊन लेनिनची साम्यवादी राजवट आली तेव्हा तिचे महाराष्ट्रात पहिल्याने आपणच स्वागत केलेत आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या

' फॉरवर्ड ब्लॉक'चा झेंडा महाराष्ट्रात आपणच उभारलात.

या तेजस्वी राजकीय कर्तृत्वाचे लेणे आपण स्वातंत्र्यदेवतेच्या अंगावर चढवलेत आणि तितक्याच ओजस्वी वाङ्मयाचे लेणे सरस्वतीदेवीवर देखील चढविलेत. संस्कृत, इंग्रजी व मराठी या भाषांतून आपण केलेली काव्यरचना मौलिक व मूलगामी स्वरूपाची आहे. ' गीताहृदय ', ' Holy Song ' व महर्षी अरविंद घोष यांच्या ' Life Divine ' व इतर अनेक ग्रंथांचे आपण केलेले मराठी अनुवाद हा महाराष्ट्र सारस्वताच्या गळ्यातील गद्यपद्य ललित अलंकार होय. काव्य व तत्त्वज्ञान या दोन्ही ठिकाणी आपली लेखणी व वाणी सारखीच तळपत राहिली. आपल्या सर्व वाङ्मयाला गीता व उपनिषदे यांच्या तात्त्विक बैठकीची जोड मिळालेली आहे.

गीतेचे तत्त्वज्ञान आपल्या रोमरोमांत भिनले असल्यामुळे अध्यात्माच्या उच्चतम अवस्थेला आपण जाऊन पोहोचला आहात. आपल्या सर्व कृतीत ' श्रीहरि ' भरलेला आहे. आपण फुलाहून कोमल नि वज्राहून कठोर आहात. आपल्या ठिकाणी वीराची वीरता अधिक आहे की संन्याशाची संन्यस्तता अधिक आहे हे सांगणे कठीण आहे. सानेगुरुजी म्हणतात त्याप्रमाणे, " आपण शिवाजी, रामदास आणि तुकाराम ह्यांची त्रिमूर्ती आहात. आपण लोकमान्य, महात्माजी आणि सावरकर त्यांचे अपूर्व मधुर मीलन आहात. सारांश, भक्ती, ज्ञान व सेवा ह्यांची आणि मूर्तिमंत त्रिपदा गायत्री आहात." शौर्य आणि साधुत्व ह्यांचा अपूर्व मनोहर संगम आपल्या व्यक्तिमत्त्वात झाला असल्याने भारताच्या इतिहासात आपले अनन्यसाधारण स्थान आहे. स्वतंत्र भारत, संयुक्त महाराष्ट्र आणि विमुक्त गोवा स्वतःच्या डोळ्यांनी पाहण्याचे जसे भाग्य आपणांस लाभले, तसे समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र निर्माण झालेला पाहण्याचे भाग्य आपणांस लाभण्यासाठी परमेश्वराने आपल्याला दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य द्यावे अशी महामुंबईच्या जनतेतर्फे मी परमेश्वराच्या चरणी प्रार्थना करतो.

मराठा : १४-११-१९६७

# २१

# संत विनोबा

आम्ही स्वतः विनोबांचे भक्त आहोत. विनोबांएवढा महापुरुष आज तरी भारतात दुसरा कोणीही नाही. आद्य शंकराचार्यांनंतर आमचे विनोबा हे आमचे अत्यंत प्रामाणिक मत आहे. तथापि गांधीवादाने ह्या आमच्या विनोबांचे वाटोळे करून टाकलेले आहे असे अतिशय दुःखाने आम्हांला म्हणावे लागते. तुकोबांनी म्हटले आहे :

ढेकणांच्या संगे । हिरा जो भंगला ।
कुसंगे नाडला । साधुजन ॥

तशी विनोबांची स्थिती झाली आहे. ढेकणाच्या संसर्गाने हिऱ्याला तडे पडतात हे वैज्ञानिक ज्ञान आम्हाला नाही, पण वाईट माणसाच्या संगतीने सज्जन माणसे बिघडतात, ह्या तुकोबांनी सांगितलेला सिद्धान्त खरा आहे. अगदी ह्या क्षणापर्यंत खरा आहे.

मोरारजीसंगे । जवाहर भंगे ।
बाकीचे ते नंगे । मंत्रिजन ॥

असे महाराष्ट्रातल्या एका महाकवीचे म्हणणे आहे. विनोबांचे वय जसे वाढत चालले आहे, तसा त्यांच्या प्रामाणिकपणाचा आणि शहाणपणाचा अधःपात होत चाललेला आहे, असे आमच्या निदर्शनाला आलेले आहे. तीच हकीगत आज आम्ही सांगणार आहोत.

कलकत्याहून परवा आमचा एक बंगाली मित्र आला. त्याने तेथल्या

'अग्नि-मित्र' पत्राचा एक अंक आम्हांला दाखवला. तो वाचून तर आम्ही अक्षरशः हतबुद्ध होऊन गेलोत. विनोबा हे कलकत्त्याला नुकतेच जाऊन आले. दोन आठवड्यांचा त्यांचा तेथे दौरा होता. ह्या दौऱ्यात त्यांचा त्या ठिकाणी जो प्रचंड फजितवाडा झाला, तसा आजपर्यंत भारतामधल्या कोठल्याही राज्यात त्यांचा झालेला नसेल. कलकत्त्याच्या लोकांनी विनोबांची अशी काही म्हणता दुर्दैवडी उडवली की काही विचारू नका! कलकत्त्याच्या वास्तव्यात विनोबा हे राज्यसरकारचे पाहुणे होते. 'जय जगत्' ही त्यांची घोषणा आहे, पण एखाद्या तालुक्याची सरहद्द त्यांनी ओलांडली, तरी ते त्या सरहद्दीवर दोन्ही तालुक्यांच्या लोकांकडून सत्कार करून घेतात. सर्व जगावर प्रेम करणारा हा माणूस, पण ह्याच्या आगमनामुळे कलकत्त्याच्या रस्त्यामधली रहदारी चार तास स्थगित झाली. ट्रामगाड्या आणि बसगाड्या ह्यांची वाहतूक बंद पडली. ह्यांच्या पदयात्रेला पोलिसांचा एवढा कडक बंदोबस्त होता, की जेवढा नेहरूंच्या आगमनाच्या वेळीसुद्धा नसेल. पुढे पोलीस-मागे पोलीस-दोन्ही बाजूंला पोलीस, मधोमध विनोबा आणि त्यांचे काही मूठभर सहकारी पायांनी रस्त्यावरून मोठ्या रुबाबाने चालत होते. पण त्यांच्या ह्या पदयात्रेच्या बंदोबस्तासाठी बंगाल सरकारचा रोजचा खर्च एक हजार रुपयांचा होता. विनोबांच्या पदयात्रेचा सर्व खर्च बंगाल सरकारने केला. हा काय चावटपणा आहे? विनोबांच्या पदयात्रेचा खर्च कोणत्याही राज्याच्या सरकारने झाले तरी काय म्हणून करावा हो? विनोबा हे काय मंत्री आहेत, राज्यपाल आहेत का राष्ट्रपती आहेत? बरे, गंमत ही की, विनोबा आणि त्यांच्या बरोबरीची काही माणसे पायी चालत होती, तर त्यांचे काही अनुयायी 'जीप' आणि 'ॲम्बेसडर' मोटारगाड्यांमधून त्यांच्या मागून चाललेली होती, आणि ह्या मोटारगाड्यांच्या पेट्रोलचा खर्च कोणाचा हे तुम्हांला माहीत आहे? बंगाल सरकारचा! विनोबांच्या पदयात्रेच्या एका दिवसासाठी बंगाल सरकारचे जवळ जवळ दहा हजार रुपये खर्च झाले असे अधिकृत रीत्या जाहीर करण्यात आले.

ही तर शहरातली गोष्ट झाली. पण बंगालच्या खेडेगावामध्ये जमीनदारांनी आणि व्यापाऱ्यांनी विनोबांच्या पदयात्रेसाठी अक्षरशः हजारो रुपये खर्च केले. 'सुंदरबन' प्रदेशात सध्या दुष्काळी परिस्थिती आहे. तेव्हा तेथल्या लोकांनी विनोबांना अशी विनंती केली की, "तुम्हाला ह्या प्रदेशात स्वतः यावयाचे असेल, तर जास्तीत जास्त पन्नास माणसे घेऊन या. जास्ती माणसे आणू

नका !" पण विनोबा प्रत्यक्ष जे गेले ते तीनशे पुरुष अन् बायका घेऊन गेले. आणि विनोबांच्या पदयात्रेच्या बंदोबस्तासाठी बंगाल सरकारची एक उपमंत्रीण खास नेमण्यात आली. विनोबांच्या पदयात्रेचा रोजचा खर्च एक हजार रुपायांचा आहे असे आताच आम्ही सांगितले. पण त्या खर्चात पेट्रोलच्या किंवा सरकारी गुप्त पोलिसांच्या खर्चाचा समावेश होत नाही. १५ जून रोजी कम्युनिस्टांनी कलकत्त्यामध्ये एक प्रचंड निदर्शन केले. त्या निदर्शनाच्या वेळीं पोलिसांचा जेवढा बंदोबस्त नव्हता, तेवढा विनोबांच्या पदयात्रेच्या वेळीं होता.

विनोबांचा 'आहार' ही एक प्रचंड गंमत आहे. हा शंभर पौंड वजनाचा हाडकुळा माणूस रोज काय खात असेल ते सांगा पाहू ? शक्यच नाही. तुम्हाला सांगताच येणार नाही. त्यांना रोज गाईंचे सात शेर दूध लागते. तेवढ्यासाठी त्यांनी १२ गाई बाळगलेल्या आहेत. बंगाली गाई थोडे दूध देतात, पण त्यांच्याइतके स्वादिष्ट आणि रुचकर दूध ह्या भारतातल्या कोणत्याही राज्यामधल्या गाई देत नाहीत, हे तुम्हांला माहीत आहे काय ? विनोबांचा आहार म्हणजे फक्त दूध आणि मध. त्यांचे दूध रोज सकाळीं सात वाजता त्यांना पोहोचलेच पाहिजे. त्यापैकी पुष्कळशा दुधाचे ते दही बनवितात, आणि त्यात मध मिसळून ते खातात. सर्वसाधारणपणे ते पाच शेर दही चार हप्त्याने खातात. त्यातला थोडासा अंश जरी उरला, तरी त्यांचे शिष्य तो मोठ्या आवडीने त्यांचा प्रसाद म्हणून सेवन करतात.

विनोबांची पदयात्रा म्हणजे एक फार मोठे कंत्राट आहे. ते एकटे पायी चालतात खरे, पण त्यांचे सर्व सामान घेऊन एक मोठी लॉरी त्यांच्यामागून चालते, आणि त्यांच्या अनुयायांसाठी एक स्टेशन वॅगन, दोन जीप्स आणि एक मोटारगाडी इतकी वाहने लागतात. पदयात्रेत त्यांच्याबरोबर फक्त बारा शिष्य पायी चालतात. बाकीचे त्यांच्या मागून मोटारीत बसून येतात. विनोबांचा तळ जेथे पडतो तेथे पोलीस बंदोबस्त अत्यंत कडक असतो. लॉरी भरून पोलीस आणण्यात येतात, आणि एक पोलीस-जीप बाहेर सारखी उभी असते. दोन पोलीस कमिशनर्स तरी कमीत कमी विनोबांच्या तैनातीत असतात. कलकत्त्याची गंमत अशी, की त्यांच्या प्रत्येक प्रार्थनेच्या सभेला बंगालच्या राज्यपाल कुमारी पद्मजा नायडू ह्या उपस्थित होत्या. विनोबांच्या पदयात्रेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा हा सरकारी प्रयत्न होता. कोठेही गेले तरी विनोबांच्या पदयात्रिकांची दोन जेवणे होतात. एक जेवण जाहीर आणि दुसरे जेवण खाजगी. जाहीर जेवण

अगदी साधे आणि अगदी भिकार. ते लोकांना पाहण्यासाठी, पण त्यानंतर ताबडतोब जे खाजगी जेवण ह्या मंडळींना त्यांच्या खोल्याखोल्यांमधून पुरवण्यात येते, ते मात्र अगदी तुंबळ! फळे काय अन् मिठाई काय, काही विचारू नका!

तथापि, बंगालमध्ये त्यांची एवढी सरबराई होऊनसुद्धा, त्यांना बंगाली जनतेकडून कवडीचा मान मिळाला असेल तर शपथ! जेथे जेथे ते गेले तेथे तेथे बंगाली लोकांनी त्यांची फजिती केली. छीः थूः केली. कारण, आपल्या भाषणात त्यांनी वाटेल त्या विषयावर जे अकलेचे तारे तोडले ते पाहून बंगाली लोक त्यांच्यावर भयंकरच चिडले. १८ जून रोजी कलकत्यामध्ये त्यांनी एक अत्यंत मूर्खपणाचे भाषण केले. ते म्हणाले, "चीनच्या आक्रमणापासून देशाचे संरक्षण करण्यासाठी आज आपले सरकार जे परदेशातून शस्त्र खरेदी करते आहे, ते त्याचे धोरण अगदी चूक आहे. त्यांपासून देशाचे संरक्षण होण्याऐवजी देशाचा विध्वंसच होईल. चीनला भारताने मुळींच विरोध करू नये. महात्मा गांधीजींच्या तत्त्वाप्रमाणे जर ह्या देशाचे संरक्षण करावयाचे झाले, तर देशावर चीनने लष्करी हल्ला केला, तर त्याच्या सैन्याला तोंड देण्यासाठी आपण निःशस्त्र मुलांची एक पलटण पाठवावी. 'मुले' ह्याच आमच्या अहिंसात्मक 'गोळ्या' होत. ही आमची मुले त्या चिनी सैनिकांना विचारतील की, 'का तुम्ही आमच्या देशावर स्वारी करता आहात? काय तुम्हाला आमच्यापासून पाहिजे आहे?' त्याबरोबर, चिनी सैनिक माना खाली घालून माघारी पळत जातील."

विनोबांचे हे भाषण ऐकून बंगाली लोकांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. ते म्हणाले, "ज्याला स्वतःच्या पोटची मुले नाहीत, तोच थेरडा भारतीय मुलांना 'गोळ्या' म्हणून अशा रीतीने वापरण्यास तयार होईल!" आणि समजा, चिनी सैन्याला तोंड द्यावयाला गेलेल्या या हिंदी मुलांच्या हातावर लिमलेटच्या गोळ्या ठेवून आणि त्यांना कडेवर घेऊन चिनी शिपायांनी त्यांना पळवून नेले तर? तर, साऱ्या जगात भारताचे हसू होईल! पण संत विनोबांना त्याचे काय? कलकत्याच्या विनोबांच्या मुक्कामात पंतप्रधान नेहरूसुद्धा त्यांना भेटावयाला आले होते. एका जाहीर सभेत विनोबा म्हणाले, "बंगालमधल्या कित्येक व्यापाऱ्यांनी मला लिहून दिले आहे की, आपण अन्नधान्यात भेसळ करणार नाही. किंवा कुळांना दिलेल्या कर्जावर व्याज आकारणार नाही!" तेव्हा बंगाली श्रोते पोट धरधरून हासले. पण, आपल्या व्याख्यानात जेव्हा

विनोबांनी बंगाल्यांच्या कालीपूजेवर आणि शिखांच्या ‘ किरपाणा ’वर टीका केली, तेव्हा मात्र लोक त्यांच्यावर भलतेच उखडले. शिवपूरच्या प्रार्थना-सभेत विनोबा म्हणाले, “ बंगाली लोक कालीमातेच्या पुढे पशूंचे जे बलिदान करतात तो त्यांचा शुद्ध रानटीपणा आहे, आणि अणुबाँबच्या ह्या युगात शिखांनी आपल्या अंगावर प्राचीन काळातले ‘ किरपाण ’ हे शस्त्र वापरणे तर हास्यास्पदच आहे. ” त्याबरोबर बंगाली श्रोत्यांनी त्यांचा नुसता धिक्कारच केला नाही तर त्यांची सभा उधळून लावली. एक शीख मोठ्याने ओरडून त्यांना म्हणाला, “ मग आधुनिक संस्कृतीच्या या युगात तुम्ही स्वतः गुळगुळीत दाढी करण्याऐवजी ही गवताची पेंढी आपल्या हनुवटीवर कशाला वाढवता आणि मोटारीतून प्रवास करण्याऐवजी आपल्या टाचा कशाला झिजवता हो ? ” दुसरा एक शीख म्हणाला, “ तुम्ही आमच्या जुन्यापुराण्या किरपाणावर टीका करता पण मुसलमानांच्या सुंता पद्धतीवर का टीका करीत नाही ? फाळणीच्या वेळी पंजाबात शीख-मुसलमानांचे एवढे दंगे झाले, पण एकाही शिखाने त्या वेळी आत्मसंरक्षणासाठी किरपाणाचा उपयोग केलेला नाही हे तुम्हांला माहीत आहे काय ?”

कलकत्यामधे जेथे जेथे म्हणून विनोबा गेले, तेथे तेथे त्यांनी असलाच काहीतरी मूर्खपणा करून स्वतःचे हसू करून घेतले. कलकत्ता विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसमोर तर त्यांनी आपली जास्तीत जास्त फजिती करून घेतली. ‘ विद्यार्थ्यांनी आपले संघ स्थापन करणे हा मूर्खपणा आहे ! ’ असे उद्गार त्यांनी आपल्या तोंडातून काढताच विद्यार्थ्यांनी त्यांच्या अंगावर धावून त्यांना मारावयाचेच काय ते बाकी ठेवले ! सारांश, भूदान, ग्रामदान आणि सर्वोदय ह्यांचा प्रचार करण्यास बंगालमध्ये गेलेल्या ह्या गांधीवादी संताने त्या विषयांवर भाषणे करण्याऐवजी, भलत्याच गैरलागू आणि विसंगत गोष्टींवर बकवा करून स्वतःची ‘ न भूतो न भविष्यति ’ अशी फजिती करून घेतली ! केवळ महाराष्ट्रातूनच संत विनोबाला पळून जावे लागले असे नाही, तर बंगालमधून त्यांना पळता भुई थोडी झाली !

मराठा : २१-७-१९६३

मराठी ग्रंथ
अनुक्रम ... १७१

# २२

## विनोबांची जयंती

मृत माणसाची जयंती करतात. जिवंत माणसाची नाही. पण विनोबा हे जन्ममरणाच्या पलीकडे जाऊन केव्हाच अमर होऊन बसले आहेत, म्हणून आजच्या त्यांच्या जन्मदिवसाला आम्ही जयंती असेच म्हणतो. पंच्याण्णव सालच्या अकरा सप्टेंबरला त्यांचा जन्म झाला, म्हणजे आज त्यांच्या वयाला त्र्याहत्तर वर्षे पूर्ण झाली. पण हे जन्मदिवसाचे नि वाढदिवसाचे हिशेब सामान्य माणसाने करावेत नि स्वतःचे कौतुक करून घ्यावे. विनोबांना त्याचे काय ? वैदिक काळामधला एखादा क्रान्तदर्शी ऋषीच त्यांच्या रूपाने आज भारतात वावरतो आहे. त्या दृष्टीने पाहिले तर त्यांचे वय आज चार हजार वर्षांचे आहे असेच म्हटले पाहिजे. विनोबांना जे येत नाही आणि ज्याचे त्यांना गम्य नाही असे भाषेचे, ज्ञानाचे नि तत्त्वज्ञानाचे कोणते क्षेत्र आहे ? एका प्रस्तावनेत ते लिहितात, " रामदासाच्या साध्य लिखाणाने आध्यात्मिक साहित्यात अगदी सहजपणे आणि न कळत माझा प्रवेश झाला. तिथून मागे जात जात ज्ञानदेवा-पर्यंत आणि पुढे संस्कृतद्वारा वेदांपर्यंत ओघाओघाने दर्शन घडले. पुष्टीसाठी अनेक भाषांतील आणि अनेक धर्मांचे साहित्य अवलोकनात आले. या सर्वांच्या मदतीने विचारांचे चांगले पचन झाले आणि सारभूत अंशाचे ग्रहण होऊन असारभूत अंश गळून पडला ! "

एखाद्या ऋषीप्रमाणे ते सूत्रबद्ध बोलतात. जेवढा महत्त्वाचा विचार असेल तेवढाच आवश्यक शब्दांत ते सांगतात. त्याहून एक अक्षरही अधिक नाही !

म्हणूनच ते म्हणतात, “शंकराचार्य, इसाप नि युक्लिड हे माझे आदर्श आहेत.” कमीत कमी शब्दांत किंवा चिह्नात जास्तीत जास्त किती सांगता येईल हा जो चमत्कार त्या तीन महापुरुषांनी पूर्वी करून दाखविला, तो आज विनोबा करून दाखवीत आहेत. वेद, उपनिषदे, गीता, संत-साहित्य या समुद्रात विनोबांनी अगदी तळापर्यंत जाऊन त्यांतील सारी मौक्तिके वेचून आपल्या स्मरणात जपून ठेवली आहेत. कोणत्या ग्रंथाची त्यांनी किती पारायणे केली आहेत, हे सांगताही येणार नाही. त्यांची स्मरणशक्ती म्हणजे एक चमत्कार आहे. ‘गीता’ तर त्यांची माऊलीच. तिच्याखेरीज अनेक ग्रंथ तर त्यांना समग्र पाठ येतात. त्याखेरीज वेद, उपनिषदे, सूत्रे, भाष्ये ह्यांपैकी किती हजारो ओळी त्यांना मुखोद्गत आहेत ते कोणी सांगावे? तसेच कुराण, बायबल, जपजी या धर्म-ग्रंथांशी त्यांची जीवश्चकंठश्च मैत्री आहे. मूळ कुराण वाचण्याकरिता ते अरबी शिकले. कुराणातला पुष्कळसा भाग त्यांना पाठ आहे. बायबलचा त्यांचा अभ्यास तर मी मी म्हणणाऱ्या मिशनऱ्याला लाजवणारा आहे. कोणता विषय वा विचार बायबलमधे कुठे आला ते नेमके पान उघडून ते दाखवितात. वेदांत तर कोणता शब्द किती वेळा आला नि कुठे आला ते क्षणाचाही विलंब न करता धाडकन् ते सांगतात. त्यांच्या अभ्यासाची जातच निराळी आहे. भारतीय भाषांवरील त्यांच्या प्रभुत्वाबद्दल तर विचारूच नका. बंगाली प्राध्यापक भेटला तरी त्याच्याशी ते अस्खलित बंगालीमधे चर्चा करतील. गुरुदेव टागोरांची बंगाली ‘गीतांजलि’ तर त्यांना तोंडपाठ आहे. उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतातल्या भाषा शिकायला अत्यंत कठीण. त्यांचा द्राविडी खडखडाट कानांवर पडताच ऐकणाऱ्याची घाबरगुंडी उडते. पण त्याही द्राविडी भाषा विनोबांनी अगदी आत्मसात केलेल्या आहेत. पण सगळ्यात आश्चर्याची गोष्ट म्हणजे विनोबा चिनी भाषादेखील शिकले आहेत. चिनी भाषेची लिपी आणि उच्चार हे जगामधल्या मोठमोठ्या भाषापंडितांना प्रचंड आव्हान आहे, पण विनोबांनी तो विकट अभ्यास काही महिन्यांतच पूर्ण केला.

विनोबांच्या भूदान-यात्रीदलातील त्यांच्या एका तरुण सहयात्रिणीने त्यांच्या प्रवचनाचे जे एक विलक्षण शब्दचित्र रेखाटलेले आहे ते वाचण्यासारखे आहे. “...‘तितक्यात ‘पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते—’ असा गंभीर आवाज ऐकू आला. तो विसाव्या शतकातला आवाज नव्हता. हजारो वर्षांपूर्वी एखाद्या गुहेत तपस्या करणारा ऋषीच उपनिषत्सूक्तांचे पठण करीत असल्याचा

भास झाला. मी चमकून वर मान केली. ओठ तर विनोबांचेच हालत होते, पण आवाज मात्र त्यांचा नव्हता. 'असतो मा सद्गमय—' डोळे मिटून ध्यानस्थ बसलेल्या विनोबांच्या मूर्तीवर सर्वांची दृष्टी खिळून बसली होती. विनोबांची ध्यानस्थ मूर्ती आणि त्यांच्या मुखाने प्रकट होत असलेली ऋषिवाणी ह्यापलीकडे साऱ्या जगाचा श्रोत्यांना विसर पडला होता. गीतेतला स्थितप्रज्ञाच्या लक्षणांचा पाठ संपला. कुराणातला भाग सुरू झाला. त्या वेळी तो कोणी वैदिक काळातला ऋषी वेदपठण करीत नसून पैगंबराच्या प्रथम शिष्यांपैकीच एखादा कुराण म्हणत आहे असा भास झाला. अस्खलित अरबी उच्चार कानांवर पडत होते. कुराणाचा पाठ संपला व इतर धर्मांतील प्रार्थनेचा एकेक भाग म्हटला गेला. प्रत्येक वेळीं वाटायचे की दुसरीच कोणी व्यक्ती म्हणत आहे. जणू त्या त्या धर्माच्या आद्यप्रचारकांपैकी एकेकाचा ध्वनी कुठून तरी दूरवरून अज्ञात भूत-कालातून कानावर पडत आहे असे वाटत होते. प्रार्थना संपली. प्रवचन सुरू झाले. त्यांचे डोळे मिटलेले होते. विशाल जनसमुदायातील प्रत्येकाच्या हृदयात एकेक शब्द कोरला जात होता—'...तुमच्या हृदयात वास करीत असलेल्या परमेश्वराला मी आज जागवीत आहे...जागिये रघुनाथ कुँवर पंछी बन बोले—हृदयस्थ परमेश्वराला जाग—पक्ष्यांची किलबिल सुरू झाली आहे. सेवेला लाग।' विनोबांची वाग्धारा एकदा वेगाने सुरू झाली म्हणजे त्यांच्या सभेतल्या विराट जनसमुदायाला वाटते की 'यह विनोबा नहीं बोल रहा है। विनोबाके मुखसे भगवान बोल रहा है!'"

देशभर संचार करणारे विनोबा हे एक चालतेबोलते आचार्यकुल किंवा जंगम विद्यापीठ आहे. भारतीय जनतेला ज्ञानदान आणि नवविचार देण्याचे विनोबांचे कार्य गेल्या कित्येक वर्षांपासून अखंड चालू आहे. ते ग्रहण करण्याची आमची शक्तीच अपुरी पडते. 'परमेश्वर अनंत हस्तांनी देतो. ते आपल्या लहानशा दोन हातांनी आपण घ्यायचे तरी किती?' विनोबा म्हणतात त्याप्रमाणे भारतात दोन धारा अखंड वहात आहेत : ज्ञानधारा आणि दानधारा. ज्ञान मिळाले नाही असा एकही दिवस गेला, तर तो व्यर्थ गेला असे समजा. लिहितावाचता येत नसेल, तर श्रवण करावे, पण ज्ञानाविना दिवस जाऊ देऊ नये आणि ज्ञानधारेत स्नान करून जीवन पवित्र बनवावे, हाच संदेश सांगण्यासाठी देशात आज त्यांची भूदानयात्रा सुरू आहे.

वैदिक धर्माचे नि भारतीय संस्कृतीचे ते महान उद्गाते आहेत. वैदिक धर्म

ह्या अद्वैताचा धर्म आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे म्हणूनच शंकराचार्य हे त्यांचे दैवत आहे. भारतीय संस्कृतीचे देदीप्यमान स्वरूप जगाला दिसावे म्हणूनच असंख्य भारतीयांची जीवने बदलण्याचा महान प्रयोग त्यांनी आज देशात सुरू केला आहे. त्यांच्या मते हृदयपरिवर्तन, जीवनपरिवर्तन आणि समाजपरिवर्तन ही क्रांतीची त्रिविध प्रक्रिया आहे. क्रांती प्रथम हृदयात होत असते आणि मग समाजात. दिव्याने दिवा लागतो. तसे पेटलेले एक हृदय दुसऱ्या हृदयाला पेटविते. क्रांतीचा मार्ग क्रांतदर्शी कवींनी पूर्वीच दाखवून ठेवलेला आहे. भारतात कोणत्या मार्गानें क्रांती होऊ शकते, हे पाश्चात्त्यांपेक्षा आम्हांलाच अधिक ठाऊक आहे. याचे विवरण करताना एकदा विनोबा म्हणाले, " वेदांपासून तो गांधींपर्यंतचे सर्व विचार मी कोळून प्यालो आहे. म्हणूनच मी असे घोषित करतो की, भारताचे स्वतःचे असे क्रांतीचे एक वेगळे तंत्र आहे– तत्त्वज्ञान आहे. राजसत्ता क्रांती कधीच करू शकत नाही. क्रांती ऋषीच करू शकतात. राजसत्तेचा आणि ऋषिसत्तेचा धर्म वेगवेगळा असतो. लोकमत निर्माण करण्याचे काम ऋषी करीत असतात, तर राजसत्ता आधीच तयार झालेल्या लोकमताच्या आधारे काम करीत असते. समाजाला पुढे नेण्याचे काम क्रान्तदर्शी ऋषींचे असते. भारताने राजांची किंवा सम्राटांची सत्ता किंवा श्रेष्ठता कधीच मान्य केली नाही. आमच्या जनतेला अशोक व अकबरासारख्या महान सम्राटांचे देखील स्मरण राहात नाही. पण बुद्ध, तुलसीदास नि कबीर यांचे स्मरण राहते. कुठल्याही छापखान्याचा आधार घेतल्याविना तुळसी रामायणाचा इतका प्रसार झाला. राजे आले आणि गेले पण तुलसी रामायणाची सत्ता भारतीय जनतेच्या मनावर आजही होती तशीच कायम आहे ! "

' सबै भूमि गोपालकी किंवा संपत्ती सब रघुपतिके आही ' म्हणजे सारी जमीन आणि सारी संपत्ती ईश्वराची आहे, तिजवर व्यक्तीची मालकी राहू नये म्हणून समाजाच्या भूमिविषयक आणि संपत्तिविषयक स्वामित्वाच्या भावनेचे विसर्जन करण्याचा जो महान प्रयोग विनोबांनी चालविलेला आहे, तो भारतीय संस्कृतीच्या शिकवणुकीशी सर्वस्वी सुसंगत आहे. भूदानाचे तंत्र समजावून सांगताना उपनिषदातल्या ' श्रिया देयं, ऱ्हिया देयं, भिया देयं, धिया देयम् ' ह्या श्लोकावर अत्यंत प्रभावी भाष्य विनोबा करतात. वेदोपनिषदांतील जुन्या श्लोकांचा उपयोग नवीन क्रांतिकारी विचार समजावून सांगण्यासाठी ते फारच विलक्षण कौशल्याने करतात. भूदानामागची तत्त्वज्ञानाची बैठक विशद करताना

ते नेहमी म्हणतात, " आपल्याला परमेश्वराने दिलेली संपत्ती, बुद्धी, शक्ती ही आपल्या स्वार्थाकरता नसून समाजाच्या सेवेसाठी आहे. ज्याप्रमाणे पूर्वीचे ऋषी यज्ञाच्या वेळी म्हणत, ' इन्द्राय इदं न मम । ' त्याप्रमाणे आपण म्हटले पाहिजे. ' समाजाय इदं न मम । राष्ट्राय इदं न मम । ' आपले सारे काही समाजाला अर्पण करून मग समाजाकडून प्रसाद म्हणून मिळेल तेवढेच ग्रहण करावे. " म्हणून धर्मचक्र प्रवर्तनाचे जे कार्य अडीच हजार वर्षांपूर्वी भगवान बुद्धांनी केले, ते कार्य करण्यास आज विनोबा सिद्ध झाले आहेत.

' न हि वेरेण वेराणि समन्ती च कुदाचन । अवेरेन च समन्ति एस धम्मो सनन्तनी ' (वैराने वैराचा नाश होत नाही. निर्वैरतेनेच होतो, हे एक सनातन धर्मतत्त्व आहे) असा मैत्रीचा नि करुणेचा संदेश अडीच हजार वर्षांपूर्वी भगवान बुद्धांनी जगाला सांगितला. प्रेमाने नि अहिंसेने जगाचे हृदय जिंकण्याचे ते बुद्धाचे कार्य जणू काही परमेश्वराने आपल्यावर सोपविले आहे या विनम्र श्रद्धेने भगवान बुद्धाचा, त्या संदेशाचा विनोबा आज पुनरुच्चार करीत आहेत :

' क्षुधार्त विश्व के लिये जमीन दो, जमीन दो ।
नवीन धर्म के लिये जमीन दो, जमीन दो ।
सुरम्य शांति के लिये जमीन दो, जमीन दो ।
महान् क्रांति के लिये जमीन दो, जमीन दो ! '

हे क्रांतिगीत गात गात आणि भारतीयांच्या हृदयातील धर्मचक्राला वेगाची गती देत देत आज विनोबा साऱ्या भारतामधून अनिरुद्ध संचार करीत आहेत. सर्वनाशापासून विश्वाचे संरक्षण करण्यासाठी सर्वोदय धर्मचक्राचे प्रवर्तन करीत असलेल्या ह्या युगप्रवर्तक क्रान्तदर्शी महर्षीला महाराष्ट्राचे अभिवादन असो! जय जगत् !

मराठा : १२-९-१९६८

# २३

## बर्ट्रान्ड रसेल

जगातील सर्वश्रेष्ठ मानवतावादी आणि तत्त्वज्ञानी अर्ल बर्ट्रान्ड रसेल ह्यांच्या वयाला १८ मे रोजी नव्वद वर्षे पूर्ण झाली. ह्याबद्दल जगातल्या मोठमोठ्या राष्ट्रांनी आणि महापुरुषांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. भारताचे पंतप्रधान नेहरू, रशियाचे क्रुश्चेव्ह, घानाचे अध्यक्ष एन्क्रुम्हा, 'यूनो'चे सरचिटणीस यू थान्ठ ह्यांनी त्यांना दीर्घायुरारोग्य इच्छिले. भारताचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् ह्यांनी तर त्यांना एक प्रदीर्घ संदेश पाठवून अशी इच्छा व्यक्त केली की, "जगातले अणुस्फोटाचे प्रयोग थांबले पाहिजेत आणि जागतिक युद्धाच्या नि शांततेच्या प्रश्नांचे नियंत्रण करणारे आणि विविध राष्ट्रांच्या सांस्कृतिक मूल्यांच्या अभिव्यक्तीला अन् विकासाला प्रेरणा देणारे एक विश्व-शासन प्रस्थापित झाले पाहिजे. हे जे तुमचे स्वप्न आहे ते साकार होईपर्यंत तुम्हांला दीर्घायुष्य लाभो!" डॉ. राधाकृष्णन् ह्यांनी अर्ल रसेलच्या ह्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या ग्रंथात त्यांजविषयी पुढीलप्रमाणे गौरवोद्गार काढले आहेत. "अखिल जगातील सर्व पुरोगामी विचारवंतांना अर्ल रसेलच्या जीवनाबद्दल आणि कार्याबद्दल पराकाष्ठेची कृतज्ञता वाटते. अणुशस्त्राविरुद्ध त्यांनी काढलेली मोहीम हे जगाच्या इतिहासात सर्वनाशाविरुद्ध मानवतेने पुकारलेले बंड म्हणून नमूद होईल. या महान ध्येयवादी, महान मानवतावादी आणि महान लेखकाचे नाव माहीत नाही अन् त्याचे लिखाण जेथे वाचले जात नाही, असे जगात एकही सुसंस्कृत घर आढळणार नाही.

मानवाच्या प्रतिष्ठत आणि महत्त्वात अर्ल रसेल ह्यांनी आपल्या कार्याने मोलाची भर घालून हे जग समृद्ध केले आहे!" राष्ट्रपती राधाकृष्णन् ह्यांनी अगदी मोजक्या नि उत्कृष्ट शब्दांमधे अर्ल रसेल ह्यांच्या कार्याचा यथार्थ गौरव केलेला आहे. इंग्लंडचे मुख्य प्रधान मॅकमिलन आणि अमेरिकेचे अध्यक्ष केनेडी ह्या दोघांनी मात्र अर्ल रसेलच्या अभिनंदनावर बहिष्कार टाकलेला आहे. ह्याचा अर्थ जाणत्यांना समजण्यासारखा आहे.

ह्या नव्वदाव्या वाढदिवशी काही वार्ताहरांनी रसेल ह्यांची जी मुलाखत घेतली आहे, ती अत्यंत मनोरंजक आणि उद्बोधक आहे. त्यांनी विचारले की, 'इतके दीर्घजीवन तुम्हाला कशामुळे लाभले?' अर्ल रसेल म्हणाले, 'ही एक निसर्गाची लहर आहे. तथापि, दीर्घजीवनाचा संबंध शरीरातल्या ग्रंथींशी (Glands) असावा असे वाटते. माझ्या ग्रंथी ठीक दिसताहेत.' रसलेच्या आहाराविहाराबद्दल वार्ताहरांनी जेव्हा विचारले तेव्हा तो म्हणाला, "मी सपाटून धूम्रपान करणारा माणूस आहे. माझी ही 'पाईप' सबंध दिवसभर क्षणभर न थांबता गेली सत्तर वर्षे मी ओढीत आहे." त्याच्या समोरच्या मेजावर व्हिस्कीची अर्धी भरलेली बाटली होती. तिजकडे अंगुली दाखवून रसेल म्हणाला, "मला दारू आवडते नि ती मी घेतो." "तुमचे आयुष्यातले ध्येय काय?" असे वार्ताहरांनी विचारताच रसेल म्हणाला, "पूर्वेकडच्या नि पश्चिमेकडच्या राष्ट्रांनी मानवतेचा नाश करावयाचा ठरविले आहे. त्याची मला चिंता वाटते. म्हणून माझ्या जीवात जीव आहे तोपर्यंत मी त्यांच्याशी झगडेन! रशिया आणि अमेरिका यांनी अणुस्फोटाच्या सध्या ज्या चाचण्या चालविल्या आहेत त्याची मला भीती वाटते. तथापि, सध्या परिस्थिती थोडीशी बरी आहे!"

आयुष्यातल्या गेल्या पन्नास वर्षांत बंडखोर विचार प्रगट करून जगाला धक्के देणे हाच बर्ट्रान्ड रसेलचा एकमेव धंदा होऊन बसला आहे. पण अण्वस्त्रांच्या प्रयोगाविरुद्ध त्यांनी एकट्यांनी जगात जो बंडाचा झेंडा उभारला आहे, तो त्याच्या वैचारिक धाडसाचा परमोच्च कळस होय. आपल्या नव्वदाव्या वाढदिवसानिमित्त त्यांनी जे एक निवेदन प्रसिद्ध केले आहे, ते सर्वच्या सर्व येथे देण्यासारखे आहे. पण स्थलाभावामुळे त्यापैकी काही भाग देतो. ते या निवेदनात म्हणतात, "माझे असे एक आवडते स्वप्न होते की, म्हातारपणी आपण निवृत्त व्हावे आणि तरुण वयात जे महान ग्रंथ वाचावयाचे राहिले होते, ते

वाचण्यात आपले उरलेले आयुष्य घालवावे. १९१४ पर्यंतच्या जगात मी कसा तरी सुखाने जगलो. त्या वेळीं जगात वाईट गोष्टी नव्हत्या असे नाही. पण ह्या गोष्टी हळूहळू कमी होत जातील असे वाटत होते. मी काही मूळचा बंडखोर नव्हतो. पण १९१४ नंतर जगात ज्या एकेक गोष्टी घडू लागल्या त्या मुकाट्याने सहन करणे मला अशक्यच झाले आणि माझ्या स्वभावात नसलेला बंडखोर वाढू लागला. १९१४ साली पहिले महायुद्ध सुरू झाले त्या वेळीं आम्हाला असे सांगण्यात आले की, जगातली युद्धे नष्ट करण्यासाठी ते युद्ध लढले जात आहे. पण त्या युद्धाने जगातली युद्धे काही नष्ट झाली नाहीत, पण जगातली शांतता मात्र कायमची नष्ट झाली. माझ्या ब्रिटिश राष्ट्राची मी गोष्ट सांगतो. ह्या राष्ट्राने जर आपले सध्याचे धोरण बदलले नाही तर ब्रिटिश बेटातल्या सर्व लोकांचा एक दिवस विध्वंस झाल्याखेरीज राहणार नाही. कधी कधी मनात विचार येतो की, मंगळ आणि शुक्र या ग्रहांवर तरी सुखी आणि शहाणे प्राणी राहात असतील. पण ही तेथली अवस्था काही फार काळ टिकण्यासारखी नाही. कारण, जीवनविध्वंसाचा जो उद्योग आपण या पृथ्वीवर चालवला आहे, तो त्या ग्रहापर्यंत जाऊन पोहोचल्याखेरीज राहणार नाही. म्हणून त्या ग्रहांच्या कल्याणासाठी एकच आशा करावी लागेल की, पृथ्वीवरचा हा मूर्खपणा सर्व अंतरिक्षात पसरण्यापूर्वी पृथ्वीवरची मानवजात युद्धाच्या खाईत नष्ट होऊन जावी. पण अशी आशा करण्याने कोणाचे समाधान होणार ? ”

पॅसिफिक महासागरामधील ‘ ख्रिसमस ’ बेटावर अमेरिका जो अणुस्फोट करणार आहे तेथे प्रत्यक्ष जाऊन सत्याग्रह करण्याचा अर्ल रसेल ह्यांनी निर्धार केला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये महात्मा गांधींच्या सत्याग्रहाचा हा प्रथमच उपयोग केला जाणार आहे, आणि तो इतका समर्पक आहे की, महात्मा गांधी जर आज हयात असते तर त्यांनीदेखील ह्या सत्याग्रहात भाग घेतला असता. कारण, अणुस्फोट हा मानवतेविरुद्ध एक राक्षसी गुन्हा होय ! आणि मानवता जर वाचावी असे वाटत असेल तर अणुस्फोटाचे प्रयोग करणाऱ्या राष्ट्रांनी कोणत्याही अटी इतर राष्ट्रांना न घालता आपण होऊन हे प्रयोग ताबडतोब थांबवले पाहिजेत आणि अण्वस्त्रांचा त्याग केला पाहिजे. महात्मा गांधींना ‘ राष्ट्रजनक ’ मानणाऱ्या भारताने ह्या कामी पुढाकार घेऊन अण्वस्त्रप्रयोग थांबवण्यासाठी जर एखादी जागतिक चळवळ उभी केली असती तर तिच्यामुळे भारताचे नैतिक बळ सहस्रपटीने वाढले असते. अर्थात

अण्वस्त्रांना आणि अणुस्फोटांना भारताने पहिल्यापासून सतत विरोध केलेला आहे, हे खरे आहे. पण त्या कामी रशिया वा अमेरिका या राष्ट्रांविरुद्ध प्रत्यक्ष काही कृती केली तर ते 'शत्रुकृत्य' ( Hostile act ) होईल, असा पंडित नेहरूंनी अभिप्राय व्यक्त केल्यामुळे, केवळ मतप्रदर्शनापलीकडे भारताची याबाबत जास्त मजल जाऊ शकत नाही.

तथापि, महात्मा गांधींचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान आंतरराष्ट्रीय पातळीवर नेऊन बसवणारा अर्ल रसेलसारखा एक इंग्रज तत्त्वज्ञानी निघावा ही जितकी आश्चर्याची तितकीच आनंदाची गोष्ट आहे. सोव्हिएट रशिया करीत असलेल्या अणुस्फोटाविरुद्ध अर्ल रसेल का सत्याग्रह करीत नाही ? अमेरिकेच्या विरुद्धच तेवढे त्याने सत्याग्रहाचे शस्त्र का उपसले आहे असा कोणी प्रश्न विचारील. त्याला रसेलचे उत्तर असे आहे की, "जागतिक अणुयुद्धाचा प्रारंभ रशियापेक्षा अमेरिकाच अगोदर करण्याचा जास्त संभव आहे. कारण, रशियामध्ये सत्ता एकाच्याच हाती केंद्रीभूत झालेली आहे. म्हणूनच अणुयुद्धाच्या सर्व धोक्यांचा संपूर्णपणे विचार होऊन मग त्याबाबतचा निर्णय अत्यंत वरिष्ठ पातळीवर घेतला जाईल. तशी अमेरिकेची स्थिती नाही. कारण, तेथे अध्यक्षांची इच्छा असो वा नसो, लष्करी सेनापती अणुयुद्ध सुरू करण्यास त्याला भाग पाडतील !" अर्ल रसेल ह्यांचा हा युक्तिवाद सर्वांनाच मान्य होणार नाही, पण त्यात फार मोठे तथ्य आहे. असो. अणुयुद्धाच्या राक्षसी विध्वंसापासून मानवतेचे रक्षण करण्यासाठी प्राणांची पर्वा न करता बाहू उभारून नव्वदाव्या वर्षी उभ्या असलेल्या ह्या अलौकिक महापुरुषाच्या चरणी आमची अनंत अभिवादने असोत !

मराठा : २३-५-१९६२

# २४

# चर्चिल

येत्या नोव्हेंबर महिन्यात चर्चिलला नव्वदावे वर्ष लागणार आहे. गेल्या आठवड्यात ' हाऊस ऑफ कॉमन्स 'च्या चौसष्ट वर्षांच्या सदस्यत्वाला त्याने पूर्णविराम दिला, आणि आपल्या दोन बोटांनी विजयाची आकृती दाखवीत अन् आपल्या ओठांतला लठ्ठ चिरूट फुंकीत फुंकीत आपल्या संसदीय समरभूमीचा त्याने अखेरचा निरोप घेतला. ब्रिटिश पार्लमेंटच्या आठशे वर्षांच्या इतिहासात सतत चौसष्ट वर्षे त्या महान संसदेचा सभासद असलेला चर्चिलसारखा दुसरा पुरुष आजपर्यंत होऊन गेलेला नाही. संसदीय हक्कांचा आणि परंपरांचा प्राणपणाने पुरस्कार करणारा असा लोकशाहीचा झुंजार नेता आजपर्यंत जगात दुसरा झाला नसेल. ब्रिटिश सरकारात असे एकही सत्तास्थान नसेल की, जे त्यांनी भूषविले नसेल. त्याच्या राजकीय कर्तृत्वाचा कळस दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं झाला. हिटलरच्या संकटापासून चर्चिलखेरीज दुसरा कोणीही वीर पुरुष आपणाला वाचवू शकणार नाही; असे जेव्हा ब्रिटिश जनतेला आढळून आले, तेव्हा पंतप्रधानपदावर त्याची स्थापना करण्यात आली आणि युद्धाचे सर्वाधिकारी नेतृत्व त्याच्याकडे सोपविण्यात आले. चर्चिलने दुसऱ्या महायुद्धाच्या भयानक विध्वंसापासून केवळ ब्रिटनचेच नव्हे, तर साऱ्या जगाचे आणि मानवतेचे संरक्षण केले. जीवनाच्या आणि राजकारणाच्या सर्व क्षेत्रांत चर्चिलने एकापेक्षाही एक अलौकिक पराक्रम केले. किंबहुना त्याचे सारे आयुष्य अनेक रोमहर्षक धाडसांनी आणि देदीप्यमान चमत्कारांनी भरलेले आहे.

विसाव्या शतकात त्याच्याएवढा झुंजार आणि बहादूर पुरुष जगाच्या इतिहासात दुसरा झाला नाही.

ज्या मॉर्लेबरो घराण्याने इंग्लंडला अनेक नामांकित पंतप्रधान आणि सेनापती पुरवले त्या घराण्यात चर्चिलचा जन्म झाल्यामुळे शौर्य, संपत्ती आणि मुत्सद्देगिरी या गुणांचा आनुवंशिक वारसा त्याला प्राप्त झाला. त्याचे वडील लॉर्ड रँडॉल्फ चर्चिल हेही ब्रिटिश मंत्रिमंडळात उपमंत्री होते. त्यांनी एका धनाढ्य आणि संगीततज्ज्ञ अमेरिकनाच्या सुंदर मुलीशी लग्न केले होते. म्हणून चर्चिल नेहमी म्हणत असे की, मी अर्धा इंग्रज आणि अर्धा अमेरिकन आहे. चर्चिलची विनोदबुद्धी त्याच्या वडिलांपासून त्याला मिळाली होती. रँडॉल्फ चर्चिलच्या मिश्या फार लांब होत्या, आणि ते कट्टर हुजूरपक्षीय होते. एका सामाजिक संमेलनात एक प्रतिष्ठित स्त्री त्यांना एकदा म्हणाली की, " रँडॉल्फ, मला तुझ्या मिश्या आणि राजकारण आवडत नाही." तेव्हा रँडॉल्फ ताडकन् तिला म्हणाला, ' बाईसाहेब, त्या दोन्ही गोष्टींशी तुमचा संबंध येण्याचा संभव नाही ! " वयाच्या सातव्या वर्षी चर्चिलला जेव्हा शाळेत प्रथम घालण्यात आले, तेव्हा त्याच्या शिक्षकाने प्रथमच त्याला ' लॅटीन ' व्याकरणाचे पुस्तक अभ्यासाला दिले, आणि ' मेन्सा ' ( टेबल ) ह्या शब्दाची विभक्तीची रूपे पाठ करायला सांगितली. ' मेन्सा 'च्या संबोधनाचे रूप होते ' मेन्सा. ' ( हे टेबला ! ) तेव्हा चर्चिल आपल्या मास्तराला म्हणाला, " व्याकरण शिकणे हा शुद्ध वेडेपणा आहे. आपल्याला वेड लागल्याखेरीज आपण टेबलाशी कधीही बोलत नसतो. म्हणून ' हे टेबला ! ' ( मेन्सा ) हे विभक्तीचे रूप पाठ करण्यात अर्थ काय ? " त्यावर शिक्षक संतापून त्याला म्हणाले, ' जास्त फाजिलपणा करशील तर तुझ्या पाठीचं धिरडं करीन. ' शाळेमधे चर्चिल हा अत्यंत मठ्ठ विद्यार्थी होता. त्याला आपल्या मातृभाषेखेरीज–म्हणजे इंग्रजीखेरीज–दुसरा कोणताही विषय येत नव्हता. म्हणून शिक्षेदाखल त्याचे शिक्षक त्याला इंग्रजीचे धडे पुन्हा पुन्हा पाठ करावयाला आणि लिहावयाला सांगत. त्याबद्दल पुढे बोलताना चर्चिल म्हणत असे की, ' ह्या गोष्टीमुळे इंग्रजी भाषेचे रहस्य मला आपोआपच उकलले आणि इंग्रजी भाषेवर मला नकळच प्रभुत्व मिळाले. शेक्सपीयरनंतर इंग्रजी भाषेवर जर कोणी चिरकालीन संस्कार केले असतील तर ते चर्चिलने असे म्हटले जाते, त्याची पार्श्वभूमी ही आहे.

वयाच्या एकविसाव्या वर्षी सैनिक म्हणून चर्चिल हिंदुस्थानात आला. त्या

निमित्ताने त्याचे वास्तव्य रावळपिंडी, पुणे आणि बंगलोर येथे झाले. बंगलोर येथे असताना त्याने आपल्या खाजगी वेळात निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करून आपल्या अंगी असलेला महाविद्यालयीन शिक्षणाचा अभाव भरून काढला. तथापि, सैनिक होण्यापेक्षा लेखनाची त्याला पहिल्यापासून आवड होती. म्हणून सैन्यातील नोकरीचा राजीनामा देऊन तो वायव्य सरहद्दीवरील पठाणी टोळ्यांच्या बंडामधे 'डेली टेलिग्राफ पत्रा'चा युद्ध-वार्ताहर म्हणून गेला. ही त्याची वार्तापत्रे पुस्तकरूपाने जेव्हा प्रसिद्ध झाली तेव्हा प्रिन्स ऑफ वेल्सने (पुढे सातवा एडवर्ड) त्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. त्यानंतर तो सुदानच्या मोहिमेमधे पुन्हा युद्ध-वार्ताहर म्हणून गेला. युद्धशास्त्राचा आणि लेखनशास्त्राचा अशा रीतीने त्याचा अभ्यास बरोबरच चाललेला होता. तथापि, दक्षिण आफ्रिकेतील 'बोअर' युद्धाच्या वेळीं त्याने जो एक रोमहर्षक पराक्रम केला, तेथून त्याच्या कीर्तीला खरा प्रारंभ झाला. बोअर युद्धात तो वार्ताहर असताना युद्धकैदी म्हणून पकडला गेला, आणि प्रिटोरियाच्या एका शालागृहात इतर अनेक युद्धकैद्यांबरोबरच स्थानबद्ध झाला. त्या कैदेतून तो कसा पळाला आणि जिवावर बेतलेल्या किती संकटांतून तो अखेर शेवटी सहीसलामत ब्रिटिश हद्दीत येऊन पोहोचला ती रोमांचकारी 'कादंबरी' त्याच्या आत्मचरित्रातून वाचल्याखेरीज तिची कल्पना येणार नाही. ह्या अद्भुतरम्य घटनेमुळे एका दिवसात त्याचे नाव साऱ्या इंग्लंडमध्ये ज्याच्या त्याच्या तोंडी झाले. एखाद्या वीर पुरुषासारखा तो इंग्लंडमध्ये परत आला. रस्त्यामधून हजारो लोकांनी त्याची मिरवणूक काढून त्याचे स्वागत केले.

ह्या कीर्तीच्या जोरावर १९०० साली वयाच्या सव्विसाव्या वर्षी हुजूरपक्षातर्फे तो पार्लमेंटच्या निवडणुकीला उभा राहिला आणि थोड्याशा मताधिक्याने का होईना पण निवडून आला. तेव्हापासून परवापर्यंत तो पार्लमेंटचा सभासद होता.

त्याच्या राजकीय आयुष्यात अनेक चढउतार आढळून येतात. एखाद्या नक्षत्रासारखा कधी तो सार्वजनिक जीवनाच्या आकाशात झळकेल आणि कधी तो मावळेल ह्याचा काही नेमच ठरलेला नव्हता. ज्या वेळीं तो अज्ञातवासात जाई, तेव्हा कधी त्याचे वाङ्मयलेखन तर कधी चित्रलेखन चाले. तो जसा उत्कृष्ट साहित्यकार होता, तसाच तो उत्तम चित्रकारही होता. त्याची काही काही चित्रे तर जगामधील उत्तमोत्तम प्रदर्शनांत दाखविण्यात आलेली आहेत.

मोठमोठ्या साहित्यकारांना जो मान मिळालेला नाही तो मान निरनिराळे ऐतिहासिक आणि युद्धविषयक ग्रंथ लिहून त्याने मिळविलेला आहे. ब्रिटनच्या पंतप्रधानपदावर आरूढ होणाऱ्या एका थोर पुरुषाने उत्कृष्ट वाङ्मयाबद्दल 'नोबेल प्राईज' मिळवावे, हा चमत्कार जगाच्या इतिहासात कुठे घडलेला आहे काय? साहित्य आणि चित्रकला ह्याखेरीज त्याला गवंडीकामाचीही आवड आहे. लंडनपासून काही अंतरावर चार्टवेल येथे असलेल्या आपल्या रमणीय निवासस्थानी त्याने स्वतः पोहण्याचा तलाव बांधलेला आहे, हे कोणाला ठाऊक आहे काय?

प्रभावी वक्ता म्हणून तर त्याचा नावलौकिक विश्वविख्यातच आहे. प्रतिपक्षाचा कठोर उपहास करून त्याला हास्यास्पद बनविणे हा तर त्याचा हातखंडा आहे. वैचारिक दृष्ट्या तो अत्यंत प्रतिगामी आणि गतानुगतिक आहे, हे सर्वविश्रुतच आहे. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये स्त्रियांनी निवडून येऊ नये, यावर त्याचा कटाक्ष होता. थोड्या दिवसांपूर्वी वारलेली लेडी ॲस्टर ही पन्नास वर्षांपूर्वी पार्लमेंटमध्ये निवडून आलेली पहिली इंग्रज स्त्री होय! पार्लमेंटमध्ये आपल्या शेजारी तिला बसलेली पाहून चर्चिलने नाक मुरडले. तेव्हा तिने त्याला विचारले, "का? असं तोंड करायला काय झालं?" तेव्हा चर्चिल तिला म्हणाला, "तू पार्लमेंटमध्ये आलेली पाहून मला माझ्या आंघोळीच्या खोलीत एखादी बाई शिरावी आणि माझ्या लज्जेचे संरक्षण करण्यासाठी एका स्पंजाखेरीज माझ्या हातात काही असू नये, असे मला वाटते." त्यावर लेडी ॲस्टरने त्याला टोमणा दिला, "इतका काही तू स्वतःला सुंदर समजू नकोस. तुझ्या आंघोळीच्या खोलीत एखादी बाई शिरली तरी ती तुझ्याकडे ढुंकूनसुद्धा पाहणार नाही." लेडी ॲस्टरच्या आणि चर्चिलच्या शाब्दिक चकमकी अशाच नेहमी घडत असत. एकदा लेडी ॲस्टर चर्चिलला म्हणाली, "तुझ्यासारखा नवरा जर मला मिळाला असता, तर मी त्याच्या कॉफीच्या कपात विष घातले असते." त्यावर तिच्या चेहऱ्याकडे क्षणभर पाहून चर्चिल म्हणाला, "तुझ्यासारखी बायको जर मला मिळाली असती, तर तो कॉफीचा कप मी जरूर प्यालो असतो."

दुसऱ्या महायुद्धाचा काळ हे चर्चिलच्या कर्तृत्वाच्या आणि लोकप्रियतेच्या पराकाष्ठेचे महान पर्व होय! ह्या संकटाच्या काळी ब्रिटिश लोकांना धैर्य आणि स्फूर्ती देणारे जे जे उद्गार चर्चिलच्या तोंडून निघाले ते इंग्रजी वाङ्मयात अमर होऊन बसलेले आहेत. 'Blood, Tears and Sweat' (रक्त, अश्रू आणि

याम) हे त्याच काळातील चर्चिलचे महान सुभाषित होय! लढाईच्या धुमश्चक्रीतही त्याच्या विनोदाला भलताच बहर आलेला होता. सुप्रसिद्ध ब्रिटिश सेनापती माँटगॉमरी (ऊर्फ माँटी) एकदा त्याला म्हणाला, "मी कधीही धूम्रपान करीत नाही किंवा कधी दारू पीत नाही. त्यामुळे माझी प्रकृती बघा कशी शंभर टक्के ठणठणीत आहे ती!" त्यावर चर्चिल त्याला म्हणाला, "मी एकसारखा दारू पितो आणि धूम्रपान करतो. माझी प्रकृती बघ कशी दोनशे टक्के ठणठणीत आहे ती!" एकदा चर्चिल अमेरिकेत गेला असताना 'व्हाईट-हाऊस'मधे तो रुझवेल्टचा पाहुणा म्हणून उतरला होता. एका सकाळच्या वेळी स्नानगृहातून आंघोळ करून चर्चिल नागव्याने बाहेर आला. एवढ्यात त्याला भेटायला रुझवेल्ट त्या खोलीत शिरला. त्या वेळी चर्चिल रुझवेल्टला हसून म्हणाला की, "इंग्लंडला अमेरिकेपासून काहीही लपवायचे नाही!"

चर्चिलची आठवण झाली की, आपल्या डोळ्यांसमोर त्याचा चिरूट आणि त्याची दारू उभी राहते. वयाच्या एकविसाव्या वर्षापासून तो दारू पितो आहे. तथापि तो दारुबाज नाही. "ज्याला दारू पचविता येत नाही, त्याला दारू पिण्याचा हक्क नाही," हे त्याचे वचन सुप्रसिद्ध आहे. राजकीय कामाचा प्रचंड डोंगर अंगावर असताना चर्चिलचे हे निरनिराळे कार्यक्रम कसे चालतात, ह्याचे पुष्कळांना आश्चर्य वाटते. म्हणून त्याच्या दैनिक कार्यक्रमाचा परिचय येथे करून दिला पाहिजे. चर्चिल सकाळी दहा वाजता उठतो आणि आपल्या विस्तीर्ण बिछान्यावरच न्याहारी करतो. न्याहारीच्या वेळी श्वेत मद्याची तो एक बाटली पितो. नंतर कमरेला टावेल गुंडाळून तो आपल्या तलावात आंघोळीला जातो. स्नान आटोपल्यानंतर कपडे करून तो पार्लमेन्टमधे कामाला जातो. साडेबाराच्या सुमारास तो भोजनासाठी परत घरी येतो. भोजनाच्या वेळी तो रक्त मद्याच्या दोन बाटल्या पितो आणि त्याबरोबर व्हिस्कीचे दोन 'पेग्ज' पितो. हा सर्व कार्यक्रम चालू असताना त्याचे चिरूट ओढणे चालू असतेच. दिवसातून तो सोळा चिरूट ओढतो. त्याच्या चिरूटाचे अर्धे जळके तुकडे जमा करून चर्चिलचे स्मरण म्हणून कित्येक लोक हौसेने आपल्याजवळ बाळगतात. भोजनोत्तर तो अर्धा तास वामकुक्षी घेतो. ही वामकुक्षी त्याच्या उत्कृष्ट आरोग्याचे रहस्य होय! नंतर दुपारी तो पार्लमेंटमधे जातो. तेथे भाषण करण्यापूर्वी आपल्या टेबलात असलेला व्हिस्कीचा अर्धा 'पेग' तो चटकन घेतो—आणि मग बोलावयास उभा राहतो. सायंकाळी सात वाजता त्याचे रात्रीचे भोजन सुरू



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

होते. त्या वेळीं पुन्हा दोन रक्त मद्याच्या बाटल्या आणि दोन ' पेग्ज ' व्हिस्की घेतो. गप्पागोष्टी करीत करीत त्याचे हे रात्रीचे भोजन चालते. त्यानंतर रात्री दहा वाजता त्याचे लेखनाचे काम सुरू होते. दिवसभर त्याच्या निरनिराळ्या चिटणिसांनी अनेक संदर्भ टिपणे लिहून तयार केलेली असतात, ती हातात घेऊन तो आपल्या लेखनिकाला तोंडी मजकूर सांगत असतो. हा मजकूर सांगत असता तो ब्रँडीचा प्याला हळूहळू प्राशन करीत असतो. हे त्याचे लेखन रात्री तीन वाजेपर्यंत चाललेले असते. चर्चिलचा कार्यक्रम वर्षानुवर्षे नियमितपणे चालू असतो. म्हणूनच निरनिराळ्या कामाच्या रगाड्यातूनही त्याने प्रचंड वाङ्मय-निर्मिती करून ठेवली आहे. आयुष्यामधे जवळ जवळ सत्तर वर्षे ज्याने नियमित मद्यपान आणि धूम्रपान करून आपले आरोग्य उत्तम तऱ्हेने राखले आणि लोकोत्तर पराक्रम केले, तो हा महापुरुष नजरेसमोर आणला म्हणजे ह्या देशातले राजकीय पुढारी डबक्यात बसून ' डरॉव डरॉव ' करणाऱ्या बेडका-सारखे क्षुद्र भासू लागतात, आणि दारूबंदीची बाष्कळ स्तोत्रे गाणाऱ्या बेवकूफ गांधीवाद्यांना तर शहाणपणा यावा म्हणून चर्चिलच्या पायाचे तीर्थ मुद्दाम पाजावेसे वाटते.

ब्रिटिश लोकांची शहामत ही आहे की, युद्धकाली ज्यांनी आपले नेतृत्व चर्चिलला दिले होते, त्यांनीच त्या युद्धात हिटलरचा पाडाव होताच सार्वत्रिक निवडणुकीत पराभवाचे माप चर्चिलच्या पदरात ओतले. यशाच्या ऐन शिखरावर असतानाच पराभवाचे हालाहल चर्चिलला प्राशन करावे लागले. पण तो धीर-गंभीर पुरुष त्याही संकटाच्या प्रसंगी डगमगला नाही. परवा जितक्या शांत-पणे त्यांनी पार्लमेंटचा निरोप घेतला तितक्या गंभीर चित्ताने देशाची सेवा करावयास आपल्याला संधी दिल्याबद्दल ब्रिटिश जनतेचे त्यांनी अंतःकरणपूर्वक आभार मानले आणि आपली पंतप्रधानकीची सूत्रे खाली ठेवली. चर्चिल हा कट्टर साम्राज्यवादी होता. ' ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे काढण्यासाठी काही मी इंग्लंडचा मुख्य प्रधान झालो नाही, ' ही त्याची घोषणा सुप्रसिद्धच आहे. भारताचा तो कट्टर दुष्मनच आहे. चर्चिलच्या आयुष्यातला भारतीयांना अप्रिय असणारा एवढा भाग वजा केला, तर असा ज्वलंत देशभक्त, झुंजार मुत्सद्दी आणि प्रचंड इतिहासकार जगाच्या पाठीवर आजपर्यंत दुसरा झालाच नाही, असे प्रांजलपणे म्हणावे लागेल !

मराठा : ३-८-१९६४

२५

## मावळते राष्ट्रपती

सतत बारा वर्षे भारताच्या प्रजासत्ताक राज्याच्या राष्ट्रपतिपदावर विराजमान असलेले स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद हे आज रोजी आपली अधिकारसूत्रे नवे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् ह्यांच्या हाती सोपवून सेवानिवृत्त होत आहेत, म्हणून ह्या मावळत्या राष्ट्रपतींना प्रेमाचा नि आदराचा अर्घ्य देणे आम्ही आपले कर्तव्य समजतो. ह्या महापुरुषाचा नि आमचा दोन वेळा प्रत्यक्ष संबंध आला होता असे सांगितले तर ते कोणाला खरे वाटणार नाही, आणि सव्वीस वर्षांपूर्वी त्यांनी आमच्या चित्रपटात लहानसे 'काम' केले होते असे आम्ही आणखी सांगितले तर लोक आम्हांला वेड्यात काढतील, पण ती खरी गोष्ट आहे. आम्ही लिहिलेल्या 'ब्रँडीच्या बाटली' या चित्रपटाचा प्रारंभ त्या वेळचे काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रबाबू आणि सरदार वल्लभभाई ह्यांच्या भाषणांनी केलेला आहे. ह्या चित्रणासाठी आम्ही जेव्हा त्यांना मुंबईच्या 'फिल्म सिटी' या स्टुडिओत घेऊन आलो, त्या वेळी त्यांच्याशी चार दोन वाक्ये आम्ही बोललो असू. अंगाने त्या वेळी ते फारच कृश होते. त्यानंतर १९५५ च्या ऑक्टोबर महिन्यात 'श्यामची आई' या आमच्या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपट म्हणून पाहिले राष्ट्रपती सुवर्णपदक मिळाले, त्या वेळी दुसऱ्यांदा त्याची भेट झाली. त्यांच्या हातून आमचा हा जो महान सन्मान झाला त्याचे स्मरणचिन्ह म्हणून आम्ही आमच्या थोरल्या नातवाचे नाव 'राजेंद्रप्रसाद' असे ठेवले आहे. हा व्यक्तिगत भाग केवळ मौजेदाखल आम्ही

सांगितला.

राजेंद्रबाबू ह्यांचे वय आज अठ्याहत्तर वर्षांचे आहे. गेली पन्नास वर्षे ते कॅाँग्रेसमध्ये आहेत. कॅाँग्रेसबद्दल आणि गांधीजींबद्दल त्यांची निष्ठा वज्रासारखी अभंग आहे. स्वातंत्र्याच्या झगड्यात अगदी प्रारंभापासून ते गांधीजींचे सहकारी होते. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशामध्ये ज्या ज्या म्हणून काही महत्त्वाच्या राजकीय घटना झाल्या त्यांच्यामध्ये त्यांनी महत्त्वाच्या भूमिका केलेल्या आहेत. कॅाँग्रेसचे ते दोनदा अध्यक्ष होते. १९४६–४७ च्या मध्यंतरात जे केंद्रीय सरकार स्थापन झाले त्याच्यात ते कृषी आणि अन्नमंत्री होते. त्यानंतर भारताची घटनासमिती निर्माण झाली. तिच्या अध्यक्षपदी त्यांची एकमताने निवड झाली. ब्रिटिशांनी सत्तान्तर केले त्या वेळी भारताच्या वतीने घटना-समितीचे अध्यक्ष या नात्याने त्या सत्तेचा ताबा त्यांनीच घेतला. देशाची फाळणी झाली तेव्हा त्या फाळणीचा सर्व तपशील त्यांच्याच प्रमुखत्वाखाली मुक्रर करण्यात आला, आणि गेली बारा वर्षे तर ते भारताचे राष्ट्रपतीच आहेत.

सारांश, स्वतंत्र भारताच्या निर्मितिकार्यात गांधीजी आणि नेहरू ह्यांच्या बरोबरीने त्यांनी भाग घेतला आहे. पण गांधी-नेहरूंपेक्षा त्यांचे वैशिष्ट्य फार वेगळे आहे. गांधी-नेहरूंच्या राजकारणावर प्रतिकूल टीका करणारे अनेक लोक आढळतील. गांधीजींच्या विरोधकाने तर त्यांची हत्याच केली, पण भारतीय राजकारणात गेली पन्नास वर्षे प्रामुख्याने भाग घेऊन त्यांनी कोणाकडून ‘ फट् ’ म्हणून घेतले नाही. कॅाँग्रेसमधले ते एकमेव ‘ अजातशत्रू ’ पुरुष आहेत. ज्यामुळे लोकांना दुःख होईल, लोकांमधे अप्रीती निर्माण होईल किंवा लोकांत त्यांचे हसू होईल असा एकही उद्गार उभ्या हयातीत त्यांच्या तोंडून निघाला नाही किंवा एकही कृत्य त्यांच्या हातून घडले नाही. त्यांची सर्वच राजकीय धोरणे वा मते पसंत पडण्यासारखी नाहीत. उदाहरणार्थ, त्रिपुरी कॅाँग्रेसच्या वेळी ते सुभाषचंद्र बोस विरोधी आघाडीत होते. सुभाषबाबूंना कॅाँग्रेसमधून काढून टाकले त्या वेळी कॅाँग्रेसचे अध्यक्ष तेच होते. धर्मकारणात आणि अर्थकारणात ते सनातनी आहेत. डॉ. आंबेडकरांच्या हिंदू कोड विधेयकाला त्यांचा विरोध होता. अन्नधान्याचा व्यापार सरकारने हाती घ्यावयाला, शेती सुधारणेला नि सहकारी शेतीला त्यांचा विरोध आहे, पण असे असूनही आपला विरोध ते इतक्या नम्रतेने आणि सभ्यतेने व्यक्त करीत की,

त्यामुळे त्यांच्याबद्दलचा विरोधकांचा आदर अधिकच वाढे.

काँग्रेसमधल्या सुप्रसिद्ध पुढाऱ्यांचा विश्वविद्यालयीन पराक्रमाबद्दल किंवा विद्याव्यासंगाबद्दल फारसा लौकिक नाही. पण राजेंद्रबाबू हे त्या गोष्टीला अपवाद आहेत. मॅट्रिकपासून तो बी. ए. होईपर्यंत त्यांनी विश्वविद्यालयीन परीक्षेमधला पहिल्या वर्गातला पहिला नंबर कधी सोडला नाही, राजकीय विषयावर त्यांनी अनेक महत्त्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. अंगात एवढे गुण आणि कर्तृत्व असून आणि आयुष्यात एवढी महत्त्वाची पदे, मानमान्यता आणि कीर्ती प्राप्त झाली असताही राजेंद्रबाबूंची राहणी इतकी साधी आणि निगर्वी असे की, गरिबातल्या गरीब माणसालासुद्धा त्यांच्याबद्दल आपलेपणा आणि आदर वाटावा. देशसेवेचे अगदी तरुणवयातच त्यांना आकर्षण वाटू लागले. महात्मा गांधींप्रमाणे गोपाळ कृष्ण गोखले ह्यांच्या ' भारत-सेवक-समाजा 'चे आजन्म सेवक होण्याचा त्यांनी निर्धार केला होता, पण सांसारिक जबाबदारीमधून त्यांची त्या वेळी सुटका होऊ शकली नाही. पुढे ' चंपारण सत्याग्रहा 'च्या काळी गांधीजींनी त्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणली. सारा जन्म राजकारणात राहून आपले चारित्र्य निष्कलंक ठेवणारा असा देवमाणूस किंवा साधुपुरुष आढळणे विरळा.

डॉ. राधाकृष्णन् ह्यांनी परवाच्या भाषणात राजेंद्रबाबूंची तुलना राजा जनकाशी आणि भरताशी केली. राजा असून आणि विलासी वातावरणात राहात असूनही जनक ज्याप्रमाणे ' विदेही ' झाला होता, त्याप्रमाणे दिल्लीच्या बादशाही राष्ट्रपतिभुवनात राष्ट्रपती राजेंद्रबाबूंनी एखाद्या संन्याशासारखे एक तप घालविले. कोणत्याही ऐहिक सुखोपभोगाची त्यांना मुळी आसक्तीच नाही. त्याचप्रमाणे राम वनवासात गेल्यानंतर चौदा वर्षे भरताने ज्याप्रमाणे त्याच्या पादुका सांभाळल्या, त्याप्रमाणे गांधीजींच्या ' पादुका ' केवळ त्यांच्या मागेच नव्हे, पण ते होते तेव्हापासून एकनिष्ठने जर कोणी सांभाळल्या असतील तर त्या राजेंद्रबाबूंनी." गाधीजींचेही त्यांच्यावर अनिर्वचनीय प्रेम होते. गांधीजी म्हणत, " मी विषाचा प्याला पुढे केला तर क्षणाचाही विलंब न करता तो पिऊन टाकणारा एकच माणूस आहे. आणि तो म्हणजे राजेंद्रबाबू ! " पण, गांधीजींच्या हातून त्यांना ' विषाचा प्याला ' न मिळता ' अमृताचाच प्याला ' मिळाला. पण अमृताचे आकर्षण त्यांना कधी वाटले नाही. म्हणून राष्ट्रपतिभुवनात प्रवेश करताना ते जितके अनासक्त होते, तितक्याच अनासक्तीने ते आता राष्ट्रपतिभुवनातून ' सदाकत ( सत्य ) आश्रमा 'त प्रयाण करीत आहेत.

परवाच्या निरोपाच्या समारंभात राजेंद्रबाबूंनी जे उत्तराचे भाषण केले, त्याच्यात त्यांच्या या वैराग्यवृत्तीचे अत्यंत हृदयस्पर्शी प्रतिबिंब उमटलेले आहे. ते म्हणाले, "सारा जन्म तुरुंगात काढल्यानंतर आता राष्ट्रपतिभुवनात राहताना कसे वाटते असे एका मित्राने मला विचारले. तेव्हा मी त्याला उत्तर दिले की, तुरुंगातल्या बराकीत पुष्कळांची सोबत असे, आणि बाहेर फक्त एकच पहारे-करी असे. पण राष्ट्रपतिभुवनात अनेकांच्या पहाऱ्यात मला एकट्यालाच राहावे लागते. हा दोहोंत फरक आहे. आता राष्ट्रपतिभुवनातून बाहेर पडताना मला अगदी मोकळ्या मोकळ्यासारखे वाटते. आता मला शांतपणे झोप घेता येईल आणि वाटेल तिकडे अनिर्बंधपणे संचार करता येईल. हा काय कमी लाभ झाला?" केवढे सौजन्य, केवढी नम्रता आणि केवढी विरक्ती! राजेंद्रबाबूंच्या जागी दुसरा कोणी काँग्रेसवाला असता तर राष्ट्रपतिभुवन सोडताना उंबरठ्यावर बसून त्याने भोकाडच पसरले असते! भारताच्या सेवेसाठी चंदनाप्रमाणे ज्यांनी आपला देह झिजविला त्या या तपस्वी कर्मयोग्याला—त्या या राष्ट्रभक्त राज-संन्याशाला—त्या या मावळत्या राष्ट्रपतीला आमचे भावपूर्ण अभिवादन!

मराठा : १३-५-१९६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: ........
नों: दि: ........

# २६

## सयाजी–जन्मशताब्दी

'भारतातील शेवटचा आदर्श राजा' म्हणून पंडित मदनमोहन मालवीय ह्यांनी प्रयाग येथील अस्थिविसर्जनप्रसंगी ज्यांचा यथार्थ गौरव केला होता, ते पूर्वीच्या बडोदे संस्थानचे महाराज पुण्यश्लोक सयाजीराव गायकवाड यांच्या जन्माला आज बरोबर शंभर वर्षे पूर्ण होतात, म्हणून त्यांच्या महान चरित्राचे आणि लोकोत्तर राजगुणांचे स्मरण करणे, हे आम्ही आपले पवित्र कर्तव्य समजतो. या देशात राजे–महाराजे आणि संस्थानिक ह्या शब्दांना पराकाष्ठेची दुर्गंधी प्राप्त झालेली आहे. त्यांची नावे कानावर पडली की, सर्व-सामान्य माणसाच्या तळपायाची आग मस्तकाला जाते. 'राजे-महाराजे' म्हटले म्हणजे दारूबाजी, स्त्रीबाजी, रेसबाजी, दंडुकेबाजी वगैरे सर्व घाणेरड्या 'बाज्यां'चे मूर्तिमंत उकिरडे डोळ्यांपुढे उभे राहतात. ह्या देशात इंग्रजांचे राज्य आल्यानंतर ते नष्ट होईपर्यंतच्या दीडशे वर्षांच्या काळात ह्या देशातल्या शेकडो संस्थानिकांनी आपापल्या संस्थानात जो भयानक धुमाकूळ घातला आणि आपल्या प्रजेचा जो अमानुष छळ केला त्याचा जर कोणी इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केला तर तो सबंध रक्ताच्या शाईत छापून प्रसिद्ध करावा लागेल. म्हणून ब्रिटिश साम्राज्याच्या दास्यातून भारताची मुक्तता झाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल ह्यांनी भारतातील सहाशे संस्थाने नुसत्या ओठाच्या फुंकरीने जेव्हा उडवून टाकली, तेव्हा भारतामधील कोट्यवधी जनतेने सुटकेचे आणि समाधानाचे निःश्वास टाकले.

हे सर्व आमचे म्हणणे सर्वसामान्यपणे कितीही सत्यास धरून असले, तरी ह्या भयानक संस्थानिक वर्गात काही काही अलौकिक अपवाद निपजले, ही गोष्ट अगदी खरी आहे. आणि त्या अलौकिक अपवादांचा एकमेव देदीप्यमान मेरूमणी म्हणून ज्यांचे नाव डोळे मिटून बेधडक कोणालाही घेता येईल, असा एकच नृपती आधुनिक काळात या भारतवर्षात होऊन गेला—आणि तो म्हणजे पुण्यश्लोक सयाजीराव गायकवाड हा होय! प्राचीन काळी या भारतात चंद्रगुप्त मौर्य किंवा सम्राट अशोक हे महान राजे होऊन गेल्याचे आपल्याला ठाऊक आहे. त्यांची माहिती आपल्याला केवळ इतिहासावरूनच मिळते. पण सयाजीरावांचा आदर्श राज्यकारभार आपण प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेला आहे. त्यांनी आपल्या प्रजेवर पित्याप्रमाणे कसे प्रेम केले आणि आपल्या संस्थानात नाना तऱ्हेच्या सुधारणा करून आपल्या प्रजेचे कसे कल्याण केले, ह्याचे शेकडो पुरावे ह्या क्षणापर्यंत आज उपलब्ध आहेत. सुधारणेच्या शिखरावर आरूढ झालेल्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना ज्या गोष्टी भारतात इतरत्र करता आल्या नाहीत, त्या सर्व सुधारणा एकट्या सयाजीरावांनी आपल्या राज्यात करून त्यांना लाजेने खाली माना घालावयाला लावल्या! ज्यांच्या वर्तनाबद्दल, चारित्र्याबद्दल आणि जीवनाबद्दल एकही प्रतिकूल गोष्ट त्यांच्या कट्टर शत्रूलाही कधी बोलता आलेली नाही असा अ-लांच्छन राजर्षी या भारतात आजपर्यंत दुसरा कोणी झालाच नाही, असे आमचे स्पष्ट मत आहे. सत्तेच्या, संपत्तीच्या आणि विलासाच्या मलिन वातावरणात रमूनही जलबिंदूचा जसा कमलपत्र आपल्याला स्पर्श होऊन देत नाही, त्याप्रमाणे त्या त्रिदोषांचा उपसर्ग सयाजीरावांनी आपल्या जीवनाला कसा लावून दिला नाही, हा खरोखरच एक आश्चर्यकारक चमत्कारच आहे.

सयाजीरावांना आम्ही प्रथम आमच्या वयाच्या दहाव्या वर्षी सासवड येथे पाहिले. सकाळची वेळ होती. आम्ही सरदार पुरंदऱ्यांच्या भुइकोट किल्ल्यासारख्या असलेल्या प्रचंड दगडी वाड्याच्या एका चौकात मुले मुले खेळत होतो. इतक्यात वाड्याच्या प्रवेश-दरवाजातून एक राजबिंडा गृहस्थ आपल्या गणवेषधारी लोकांसह प्रविष्ट झाला. आम्ही चकित होऊन त्याच्याकडे पाहू लागलो. सर्वांच्या आधी आम्ही स्वतः त्यांना ओळखले. कारण, त्यांचे चित्र आमच्या परिचयाचे होते. सयाजीरावांना पुरंदर किल्ल्यावर जावयाचे होते. पण वाटेत सरदार पुरंदऱ्यांचा प्रचंड वाडा पाहून, हाच कदाचित पुरंदर किल्ला असावा असा त्यांचा समज होऊन ते आत शिरले. त्यांना ओळखल्यानंतर आमची जी

काही तिरपीट उडाली, ती सांगता येत नाही. ‘ हा पुरंदर किल्ला नाही, ’ असे आमच्याकडून समजताच ते आल्या पावली बाहेर पडले. सयाजीरावांची आणि आमची समक्ष भेट १९३६ साली झाली. ती फक्त दहा मिनिटे. त्या वर्षी बडोद्याच्या वाङ्मय परिषदेचे आम्ही अध्यक्ष होतो. तेव्हा दिवाण सर व्ही. टी. कृष्णम्माचारी ह्यांच्या सांगण्यावरून महाराजांच्या दर्शनास आम्ही गेलो होतो. ते त्या वेळी आजारी होते. आमचे छापील अध्यक्षीय भाषण त्यांनी आपल्या चिटणिसांकडून वाचून घेतले होते, आणि त्यातील काही ओळींच्या खाली लाल पेन्सिलीच्या खुणा त्यांनी केलेल्या होत्या. विशेषतः, ‘ साहित्यिकांनी आपल्या लेखनातून सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला पाहिजे ’ हा आमच्या व्याख्यानातला एक मुद्दा आपल्याला फार आवडल्याचे त्यांनी आम्हांला सांगितले. त्यानंतर त्यांना नमस्कार करून आम्ही त्यांचा निरोप घेतला. ते ६ फेब्रुवारी १९३९ रोजी मुंबई येथे मरण पावले. त्यानंतर १९४६ साली आणि १९५६ साली आम्ही पुन्हा दोन वेळा बडोद्याच्या ‘ वाङ्मय परिषदेचे ’ अध्यक्ष झालो, पण प्रत्येक वेळी सयाजीरावांच्या पवित्र स्मृतीला अभिवादन केल्यावाचून आम्ही आमच्या भाषणाला प्रारंभ केला नाही.

सयाजीरावांचे चरित्र म्हणजे एक अद्‌भुतरम्य कादंबरीच होय. मनमाडपासून अठरा मैलांच्या अंतरावर असलेल्या कवळाणा या गावी १७ मार्च १८६३ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नांव काशीराव गायकवाड. त्यांचे जन्म नाम ‘ गोपाळ ’ असे होते. त्यांच्या थोरल्या भावाचे नाव आनंद आणि धाकट्या भावाचे नाव संपत असे होते. बडोद्याचे पूर्वीचे राजे मल्हारराव गायकवाड ह्यांना दुर्वर्तनाबद्दल इंग्रजांनी पदच्युत केल्यानंतर, त्यांच्या थोरल्या बंधूंच्या पत्नी जमनाबाई ह्यांना दत्तक घेण्याचा हक्क ब्रिटिश सरकारने दिला. बडोदे संस्थानचे संस्थापक दमाजी गायकवाड ह्यांचे काशीराव गायकवाड हे पणतू. तेव्हा त्यांच्या तीन मुलांपैकी कोणाला तरी दत्तक घ्यावे, अशी इंग्रज सरकारने शिफारस केल्यावरून, काशीराव आपल्या तीन मुलांना घेऊन बडोद्याला गेले. ‘ गोपाळ ’ हा त्या वेळीं बारा वर्षांचा होता. त्याची तरतरीत मुद्रा नि पाणीदार डोळे बघून जमनाबाईंनी त्यांनाच दत्तक घ्यावयाचे ठरविले. त्याप्रमाणे २७ मे १८७५ रोजी विधिपूर्वक दत्तविधान होऊन, बारा वर्षांचा ‘ गोपाळ ’ हा ‘ बडोद्याचे तिसरे सयाजीराव महाराज ’ या नावाने गादीवर आरूढ झाला! यापेक्षा अद्‌भुतरम्य चमत्कार कोणता कादंबरीकार आपल्या कल्पनेने वर्णन करू



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ...
अनुक्रम................... दि: ...................

शकेल बरे ?

त्यानंतर सयाजीरावांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. शीलाचे नि चारित्र्याचे बाळकडू जसे सयाजीरावांना त्यांच्या मातोश्री जमनाबाईसाहेब ह्यांच्याकडून मिळाले, त्याप्रमाणे विद्याभिरुचीचे आणि राजकारणाचे शिक्षण त्यांना त्यांचे त्या वेळचे दिवाण सर टी. माधवराव ह्यांच्याकडून मिळाले. 'आपण प्रजेकरिता आहोत. प्रजा आपल्याकरिता नाही. प्रजेचे कल्याण हेच खरोखर आपले कल्याण. प्रजा सुखी तर राजा सुखी. प्रजेकरिता राजाने वाटेल त्या स्वार्थावर तिलांजली द्यावयास सिद्ध असायला पाहिजे. राजाने संन्यास घ्यावयाचा नाही, फक्त आपल्या स्वार्थाचा त्याग करायचा,' हा आदर्श प्रजापतीचा गुरुमंत्र सयाजीरावांना सर टी. माधवरावांकडूनच मिळाला. राज्यकारभाराच्या निरनिराळ्या खात्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर २८ डिसेंबर १८८१ रोजी वयाच्या अठराव्या वर्षी संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे सयाजीरावांना देण्यात आली.

सयाजीरावांनी एकंदर चौसष्ट वर्षे राज्य केले. या चौसष्ट वर्षांत सयाजीरावांनी आपल्या राज्यात एवढ्या सुधारणा केल्या की, त्यांचे चरित्र सांगायचे म्हणजे ह्या सर्व सुधारणांचा इत्थंभूत इतिहासच सांगावयाला पाहिजे. ते येथे कसे शक्य आहे ? महाराजांनी शेतकी सुधारणा इतक्या केल्या की त्याचा एक निराळा ग्रंथच होईल. त्यानंतर ग्रामपंचायतीची मुहूर्तमेढ भारतात प्रथम महाराजांनी बडोदे संस्थानात रोवली. ग्रामपंचायतीच्या जोडीला तालुका पंचायती आणि म्युनिसिपालिट्या स्थापन केल्या. पुढे १९०८ साली त्यांनी कायदेमंडळ ऊर्फ धारासभा स्थापन केली. नंतर न्यायदानाच्या पद्धतीत नाना तऱ्हेच्या सुधारणा केल्या. १९०५ साली महाराजांनी 'हिंदु कायदा' कोडाच्या स्वरूपात प्रसिद्ध करून जे ब्रिटिशांना हिंदुस्थानात शक्य झाले नाही, एवढे नव्हे तर आता काँग्रेसच्या राज्यात कायदेमंत्री डॉ. आंबेडकरांनाही करता आले नाही, ते त्यांनी करून दाखविले. १९०७-८ साली त्यांनी न्यायखाते आणि अंमलबजावणी ह्यांची फारकत आपल्या संस्थानात काही प्रमाणावर करून दाखविली. महाराजांनी केलेल्या शैक्षणिक सुधारणा सांगावयाच्या झाल्या तरी तोही एक निराळाच ग्रंथ होईल. १९०६ सालापासून सर्व संस्थानभर महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. त्यामुळे त्यांची कीर्ती अखिल भारतात पसरली. १८९० साली महाराजांनी 'कलाभवन' ही संस्था स्थापन करून मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, सिव्हिल इंजिनियरिंग, आर्किटेक्चर हे

विषय शिकविण्याची सोय करून बडोद्याच्या नावानेवरती अपूर्व आकर्षण निर्माण केले. त्याच्या जोडीला संगीत, नृत्य आणि नाट्य ह्यांची शाळा महाराजांनी उघडली. अस्पृश्य, मागासलेल्या जातींच्या नि मुसलमान विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महाराजांनी जास्तीत जास्त सवलती दिल्या.

सयाजीरावांची दुसरी एक अमर कामगिरी म्हणजे सर्व बडोदे संस्थानात त्यांनी शेकडो वाचनालये उघडली. बडोद्याच्या मध्यवर्ती ग्रंथालयात एक लाख पुस्तके असून ती जनतेला फुकट वाचावयाला मिळतात. ग्रंथप्रकाशनाचे सयाजीरावांनी जे कार्य केले, ते तर अविस्मरणीय आहे. पदार्थसंग्रहालय आणि चित्रसंग्रहालय तर कमालीचे प्रेक्षणीय आहे. शिल्पकामाच्या दृष्टीने महाराजांनी बडोद्यात ज्या एकेक इमारती बांधल्या त्यांचे काय वर्णन करावे? लक्ष्मीविलास राजवाडा, मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, सचिवालय, श्रीसयाजी रुग्णालय, म्युझियम, पिक्चर गॅलरी, खंडेराव मार्केट ह्या एकेक इमारती पाहताना डोळे दिपतात. 'सयाजी सरोवर' बांधून बडोद्यातील लोकांना पाणीपुरवठा केल्याबद्दल महाराजांना जेवढे धन्यवाद द्यावेत, तेवढे थोडेच आहेत. बडोदे संस्थानभर रेल्वेचे जाळे पसरवून लोकांच्या प्रवासाची नि व्यापाराची महाराजांनी उत्कृष्ट सोय केली.

सामाजिक क्षेत्रात महाराजांनी सर्वांत जी क्रांतिकारक सुधारणा केली, ती म्हणजे घटस्फोटाच्या कायद्याची. ब्रिटिश हिंदुस्थानात त्या वेळी या कायद्याची वार्ताही नव्हती. पण महाराजांनी पुढाकार घेऊन हा कायदा पास केला. त्याचा फायदा बडोदे संस्थानातल्या लोकांपेक्षा बाहेरच्याच लोकांनी बडोद्यात जाऊन घेतला, ही गोष्ट मशहूर आहे. महाराजांचे खाजगी आणि सार्वजनिक आयुष्य अगदी यंत्राप्रमाणे नियमित आणि शिस्तबद्ध होते कोणत्या वेळी कोणी कसला पोषाख करावा, कोणत्या समारंभाच्या वेळी कोणी कसे वागावे, भोजनाचे पदार्थ कोणत्या प्रसंगी कसे करावेत आणि कसे वाढावेत, ह्याबद्दल महाराजांनी स्वतंत्र पुस्तके लिहवून घेतलेली आहेत. त्यांचा स्वतःचा पोषाख अगदी साधा आणि शुभ्र असे. नटवेपणा त्यांना मुळींच आवडत नसे. भाषेचा प्रश्न त्यांनी आपल्या राज्यात केव्हाच सोडवला होता. मराठी आणि गुजराती ह्या दोन्ही भाषा त्यांनी राज्यकारभाराच्या भाषा केल्या होत्या. शेवटी हिंदी ही राज्यभाषा आपल्या संस्थानात करावयाचा विचार त्यांच्या मनात घोळत असे. त्यांनी आयुष्यात खूपच प्रवास केला. कमीत कमी ते तीस वेळा तरी युरोपला जाऊन

आले. हुषार आणि तरुण मुलांना परदेशी शिक्षण देऊन आणावयाचे आणि आपल्या राज्यात अधिकाराच्या स्थानांवर त्यांची नेमणूक करावयाची, या गोष्टीचा त्यांना फार नाद होता. डॉ. आंबेडकरांना त्यांनीच प्रथम विलायतेला शिक्षणासाठी पाठविले!

सयाजीरावांच्या गुणांचे नि कर्तृत्वाचे जेवढे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे! असा राजा भारतात झाला नाही, पुढे होणार नाही! भारताच्या निरनिराळ्या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आपापल्या कार्यालयात गांधींचा फोटो टांगण्याऐवजी सयाजीरावमहाराजांचा फोटो लावावा, असे आम्हांला मनापासून वाटते. सयाजीरावांसारखा नेता किंवा पंतप्रधान ह्या भारताला कधीकाळी मिळेल काय हो? ह्याच स्वप्नरंजनात आम्ही हा लेख संपवतो. त्याचा अर्थ वाचकांनी समजून घ्यावा!

मराठा : १८-३-१९६३

# २७

## स्वातंत्र्याचा महाकवी

शंभर वर्षांपूर्वी ह्या महाराष्ट्रात स्वातंत्र्याचा एक महाकवी जन्माला आला. त्याचे नाव शिवराम महादेव परांजपे. स्फूर्ती देऊन राष्ट्राला जागे करणे हेच महाकवीचे कार्य असते. परतंत्र भारताला जागृत करण्यासाठीच शिवरामपंतांचा अवतार होता. अठराशे अठ्याण्णव साली शिवरामपंतांनी आपली लेखणी उचलली. तेव्हापासून तो एकुणीसशे आठ सालापर्यंत सतत दहा वर्षे त्यांच्या लेखणीमधून क्रांतिरसाची कारंजी उचंबळत होती. त्यांनी लिहिलेला शब्द न् शब्द, अक्षर न् अक्षर स्वातंत्र्यरसाने अगदी अंतर्बाह्य ओथंबलेले होते. जगामधे आजपर्यंत पुष्कळ लोकोत्तर लेखक होऊन गेले असतील, आणि त्यांनी आपल्या प्रतिभेच्या चमत्कारांनी हजारो लोकांना दिपवलेही असेल. पण केवळ स्वातंत्र्याच्या विचाराला सर्वस्वी वाहिलेले असे प्रचंड महाकाव्य लिहिणारा कवी पृथ्वीतलावर क्वचितच जन्माला आलेला असेल. होमर, डॅन्टे किंवा शेक्सपियर हे महाकवी स्वतंत्र राष्ट्रात जन्माला आलेले होते. मानवी स्वातंत्र्याचे ते महान उद्गाते होते. पण पारतंत्र्याच्या साखळदंडाने एखाद्या राष्ट्राचा विशाल देह चोहोकडून बांधला गेल्यानंतर स्वातंत्र्यासाठी त्याच्या आत्म्याचा कसा तडफडाट होतो, त्याचा अनुभव त्या महाकवींना असणे शक्यच नव्हते. परतंत्र भारतात शिवरामपंत जन्माला आले, म्हणूनच ते स्वातंत्र्याचे महाकवी झाले. दीडशे वर्षे गुलामगिरीच्या नरकात सडत पडलेल्या कोट्यवधी जनतेने स्वातंत्र्यासाठी फोडलेला हृदयभेदक टाहो केवळ ज्यांच्याच काव्यात ऐकायला मिळेल,

असा शिवरामपंतांसारखा महाकवी ह्या भारतातच काय पण जगातही कोठे आढळून येईल, असे आम्हांला वाटत नाही. कोमलता आणि प्रखरता ह्यांचा एवढा सामर्थ्यवान संगम फारच थोड्या लेखकांच्या प्रतिभेत झालेला आढळून येईल. कुसुमापेक्षा मृदुल आणि वज्रासारखी कठोर अशी शिवरामपंतांची लेखणी होती. त्यांच्या हृदयात काव्याचे नवनीत होते, तर बुद्धीत क्रांतीची आग होती. म्हणून जगात कोणत्याही कवीला न लाभलेली अशी विलक्षण तेजःपुंज प्रतिभा त्यांना प्राप्त झालेली होती.

अच्युतराव कोल्हटकर म्हणत असत की, शिवरामपंत हे स्वतः तलवार-बहाद्दर नसले, तरी ते तलवारींचे कारखानदार होते. पाणीदार तलवारी कशा कराव्यात हे त्यांना ठाऊक होते. अशा तलवारींपैकी एखादी तलवार पराक्रमी पुरुषाच्या हातात पडली, म्हणजे तीच 'भवानी तलवार' बनून त्यास शिवछत्रपतींचे यश देते. स्वतः शिवरामपंतांनी एके ठिकाणी लिहिले आहे की, "राष्ट्राला मार्ग दाखविण्याचे ज्यांचे काम असते, त्यांनी हातात शस्त्रच कशाला धारण करायला पाहिजे?" भगवंताची 'भगवद्गीता' हे सगळ्या शस्त्रांचे शस्त्र आहे! कुरुक्षेत्रात जमा झालेल्या भारतीय वीरांच्या हातात असलेली सारी शस्त्रे लुळी पडलेली होती. या सर्व शस्त्रांच्या धारा पुन्हा तीक्ष्ण करण्याचे अघटित काम भगवद्गीतेने केले.

अर्जुनाप्रमाणे शस्त्र खाली टाकून हतबुद्ध होऊन बसलेल्या भारताला स्वातंत्र्याची गीता सांगण्यासाठी शिवरामपंतांनी हातात लेखणी उचलली. मुसलमानी अंमलात 'दास' म्हणजे गुलाम झालेल्या लोकांना पारतंत्र्याच्या झोपेमधून उठविण्यासाठी ज्याप्रमाणे समर्थांनी आपला 'दासबोध' लिहिला, त्याप्रमाणे भारताच्या पस्तीस कोटी जनतेला पशू बनविणाऱ्या राक्षसी साम्राज्य-शाहीच्या नरडीचा घोट घेण्यासाठी कृतांत 'काळा'चे रौद्र स्वरूप धारण करून शिवरामपंत अवतीर्ण झाले. देशातील पस्तीस कोटी लोकांच्या हृदयाची प्रसिद्ध न होणारी वर्तमानपत्रे प्रत्येक आठवड्याला काळजीपूर्वक वाचून शिवरामपंत आपल्या 'काळा'चे लेखन लिहीत. त्या लेखनात विचाराची एवढी स्फोटक आणि ज्वालाग्राही दारू ठासून भरलेली असे की, ते लेख आपण लोकांच्या स्वाधीन केले तर त्या स्फोटक दारूच्या धडाक्याने ब्रिटिश साम्राज्याचे सिंहासन ते आकाशात उडवून लावतील, असा त्यांचा विश्वास होता. सतत दहा वर्षे आपल्या 'काळा'च्या स्तंभातून स्वातंत्र्याच्या ज्या नारसिंह गर्जना त्यांनी

केल्या आणि क्रांतिरसाचा जो लाव्हारस महाराष्ट्रावर उधळला, त्यामुळेच ह्या महाराष्ट्र भूमीमध्ये तीनशे वर्षांनंतर पुन्हा स्वातंत्र्यवीरांचे आणि क्रांतिकारकांचे तेजस्वी बीजारोपण झाले. त्या बीजांना अनेक अंकुर फुटले आणि त्या अंकुराचे पुढे वृक्ष झाले. त्यांपैकी एका महावृक्षाला आलेले शेंडेफळ म्हणजे विनायक दामोदर सावरकर हे होते.

देशाच्या स्वातंत्र्याकरिता ब्रिटिशांशी लढण्यासाठी लोकमान्य टिळकांना जे सैन्य पाहिजे होते, ते जमा करण्याचे अवघड कार्य शिवरामपंतांच्या वाणीने आणि लेखणीने केले. म्हणूनच लोकमान्य टिळकांपेक्षाही ब्रिटिश नोकरशाहीचा शिवरामपंतांवर अधिक राग झाला. लोकमान्य टिळकांना जास्तीत जास्त सहा वर्षांची शिक्षा झाली; पण शिवरामपंतांना जी शिक्षा भोगावी लागली, तशी भयंकर शिक्षा भोगण्याचे दुर्भाग्य कोणत्याही भारतीय नेत्याच्या कपाळी त्यापूर्वी आले नव्हते. इतर देशभक्तांना फक्त देहानेच स्थानबद्ध केले जात असे, पण ब्रिटिश सरकारने छत्तीस वर्षांची म्हणजे अडीचपट काळ्यापाण्याची महाभयंकर शिक्षा शिवरामपंतांच्या आत्म्याला फर्मावली. ज्या हजारो ओळींच्या लिखाणात शिवरामपंतांनी आपली हृदयातली आग ओकून ठेवली होती, ते त्यांचे सर्व महाकाव्य स्वतःच्या हाताने जाळून टाकण्याची भयंकर शिक्षा ब्रिटिशांनी त्यांना ठोठावली. एवढेच नव्हे तर त्या काव्यातले एक अक्षरही कोणाच्या दृष्टीस पडू नये किंवा त्यातला एखादा स्वरही कुणाच्या कानी येऊ नये, असा कायमचा बंदोबस्त त्यांनी करून ठेवला. त्या वेळी शिवरामपंत म्हणाले, ‘ देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा देऊनसुद्धा मला जितका धक्का बसला नसता, तितका सरकारने माझा प्रतिप्राण असणारे माझे दहा वर्षांचे वाङ्मय जप्त करून दिला हाच माझा तरुणपणीचा जिवंत मृत्यू होय. ’

शिवरामपंतांनी हे आपले समग्र महाकाव्य स्वहस्ताने कसे जाळून टाकले, त्याचे अत्यंत हृदयद्रावक वर्णन त्यांच्या पुत्राने एके ठिकाणी केले आहे. “ ती रात्र काळोखाची होती. चौकभर शेकोट्या पेटलेल्या होत्या. एका तपाच्या साहित्यसेवेचे हवन चालले होते. ‘ अण्णां ’चा चेहरा दुःखपूर्ण आणि गंभीर होता. त्यांच्या अंतरात्म्यात केवढा डोंब पेटला असेल! त्या आचीने त्यांचे अश्रू आटून गेले होते. निबंधांच्या पानांतून अग्नीच्या ज्वाळा निघत होत्या, तशाच त्यांच्या हृदयातूनही तितक्याच लाल क्रोधाच्या ज्वाळा उफाळत होत्या. होता होता सर्व पुस्तके भस्मसात झाली, पण अण्णांच्या अंतर्यामातील क्रोधांगार

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. क्रमांक १९१
अनुक्रमांक ......... दि: .........

अखेरपर्यंत तसाच धुमसत राहिला." भास कवीच्या नाटकांची होळी झाली, त्याबद्दल अनेक शतकांनंतर का होईना पण शिवरामपंतांनी केवढा टाहो फोडला! ज्या वनदेवतांच्या आणि जलदेवतांच्या सौंदर्याची वर्णने भासांनी आपल्या काव्यात केली, त्यांनी भासाची उपेक्षा केल्याबद्दल शिवरामपंतांनी त्यांची किती कठोर शब्दांनी निर्भर्त्सना केली! ते त्यांना उद्देशून म्हणाले, "अहो, तुम्ही पृथ्वीवरील देवता ना? मग, भासाची सुंदर काव्ये जेव्हा जाळण्यात आली, तेव्हा तुम्ही स्वस्थ कशा बसलात? त्याच्या काव्यांचा नाश हा तुमचाच नाश होय, हे तुमच्या मूढांच्या कसे लक्षात आले नाही? दुष्ट हात जेव्हा भासाची काव्ये जाळू लागले असतील, तेव्हा तुम्ही सृष्टीमधे भयंकर उत्पात का उत्पन्न केले नाहीत! तुम्ही अंतरिक्षात वादळ आणि धरणीवर धरणीकंप ह्यांचा कहर का करून सोडला नाहीत?" शिवरामपंतांच्या महाकाव्याची जेव्हा इंग्रज सरकारने राखरांगोळी करून टाकली, तेव्हा त्याबद्दल असा आक्रोश करण्याकरिता महाराष्ट्रातल्या एकाही कवीने कसे बरे आपले तोंड उघडले नाही.

ज्या दिवशी शिवरामपंतांचा आत्मा सरकारने त्यांच्यापासून हिरावून घेतला त्याच दिवशी त्यांचा अवतार संपला. पुन्हा त्यांच्या स्फूर्तीला तसा अग्निपुष्पांचा बहर कधीही झाला नाही. त्यानंतर पुढे वीस वर्षे त्यांचा अंतरात्मा एकसारखा धुमसत होता. त्यातच त्यांचा अंत झाला. इंग्रज सरकारने शिवरामपंतांना फाशीची शिक्षा दिली असती, तर मोठ्या आनंदाने त्यांनी त्या शिक्षेचा स्वीकार केला असता. पण त्यांचा आत्मा हिरावून घेऊन त्यांच्या निर्जीव देहाला तसेच जिवंत राहण्याची भयंकर शिक्षा त्यांना देऊन इंग्रजांनी त्यांच्यावर पुरता सूड उगवला. क्रूर शिक्षा देण्यामधे मोगल राज्यकर्त्यांचा हात धरता येणार नाही, असे आपण ऐकतो. आपल्या शत्रूचे डोळे काढून किंवा त्यांच्या अंगावरची कातडी सोलून ते त्याला ठार मारीत असत. पण डोळे फोडून, कातडी सोलून आणि आतडे काढून माणसाला पुन्हा जिवंत ठेवावयाचे आणि त्याला त्या सर्व यातना भोगावयाला लावायच्या, असली शिक्षा मोगलांना देखील माहीत होती की नाही कोणास ठाऊक? पण तसली अमानुष शिक्षा इंग्रजांनी शिवरामपंतांना भोगावयास लावली.

शिवरामपंतांच्या वाणीतून आणि लेखणीतून त्यांचे ज्वलंत महाकाव्य जेव्हा बाहेर पडत होते, तेव्हा त्याचा आस्वाद घेण्याचे भाग्य ज्या पिढीला लाभले, ती पिढी आता नष्ट झालेली आहे. शिवरामपंतांच्या आयुष्याचा उत्तरार्ध ज्यांनी

पाहिला त्यांना त्यावरून त्यांच्या जीविताच्या पूर्वार्धाची कल्पना येणे अशक्य आहे, कारण त्यांचे महाकाव्य त्या वेळी बंदीत पडलेले होते. त्यांची प्रतिभा सरकारने त्या वेळी हिरावून घेतली होती. सिंहाचे दात आणि नखे काढून घेतल्यानंतर त्याच्या सिंहत्वाचा साक्षात्कार पाहणाराला कसा होणार? असहकारितेच्या युगात शिवरामपंत बोलत होते, लिहीत होते; पण त्या त्यांच्या बोलण्यात आणि लिहिण्यात त्यांचा आत्मा नव्हता. सामान्य माणसांच्या महात्म्याचा तो काळ होता. गुडघ्याएवढे 'देशभक्त' आपल्या उथळ वक्तृत्वाने आणि बाष्कळ कार्यक्रमाने आपण बृहस्पतीचे बाप आणि वाचस्पतीचे चुलते आहोत असे भासविण्याचा प्रयत्न करीत होते. त्या सर्वांवर आपल्या उपराधाचे सुदर्शन चक्र सोडून त्यांची चांगली हबेलंडी उडवावी, असे शिवरामपंतांना कितीदा तरी वाटले असेल, पण त्यांचे मन ठिकाणावर नव्हते. त्यांच्या हृदयात निराळीच आग धुमसत होती. गाई-म्हशींच्या खिल्लारात ऐरावताने हिंडावे तसे विमनस्कपणे त्या काळच्या निर्जीव राजकारणातून ते एकटे एकटे वावरत होते. त्यांच्या नव्या रूपात त्यांचे पूर्वीचे वैभव लोकांना समजणे शक्य नव्हते.

शिवरामपंत हे स्वातंत्र्याचे महाकवी होते, ही गोष्ट तो वेळपर्यंत लोक विसरून देखील गेले होते. लोकांना वाटे की, वक्रोक्तीची तलवार कशी चालवावी किंवा उपरोधाचा पट्टा कसा फिरवावा, एवढीच विद्या फक्त शिवरामपंतांजवळ आहे. त्यांना हे कुठून माहीत असणार की, वक्रोक्ती किंवा उपरोध ही जरी त्यांच्या प्रतिभेची प्रभावी वैशिष्ट्ये असली, तरी ती काही त्यांचा आत्मा नव्हता. शिवरामपंतांचा आत्मा हा स्वातंत्र्यनिष्ठ कवीचा आत्मा होता. त्यांचे लेख हे स्वातंत्र्याची सूक्ते होती. मेलेल्या मनाला जिवंत करण्याचे आणि भ्यालेल्या मनुष्याला धैर्य देण्याचे सामर्थ्य त्यांच्या काव्यात होते. एवढेच नव्हे, तर मोठमोठ्या क्रांतिकारकांना जन्म देण्याची शक्ती त्यांच्या काव्यस्फूर्तीत होती. अशा क्रांतिकारक साहित्यिकाला ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी बंदीत टाकावे हे त्यांच्या साम्राज्यवादी दृष्टीने योग्यच होते.

स्वराज्य आले तेव्हा तीन तपांच्या बंदिवासातून शिवरामपंतांचे ते स्वातंत्र्यकाव्य अखेर बंधमुक्त झाले. तथापि, शिवरामपंतांच्या साहित्यावर ब्रिटिशांनी देखील जो सूड घेतला नाही, असा भयंकर सूड अखेर काळाने त्यांजवर उगवला. स्वातंत्र्यप्रेमाने आणि क्रांतिरसाने अंतर्बाह्य ओथंबलेले शिवरामपंतांचे महान वाङ्मय बंधमुक्त आणि पुनः प्रसिद्ध होऊनही आज जवळ जवळ विस्मृतिप्राय

होऊन गेले आहे, असे दुःखाने म्हणावे लागते. स्वतःचे वाङ्मय स्वतःच्या हातांनी जाळताना देखील शिवरामपंतांना त्या वेळी जे दुःख झाले नसेल, त्यापेक्षा अधिक यातना महाराष्ट्रातील लोक आपल्या वाङ्मयाला विसरून गेले, म्हणून त्यांच्या आत्म्याला आज होत असतील! खरे पाहता, स्वतंत्र भारतात शिवरामपंतांच्या स्वातंत्र्य-काव्यांची घराघरांतून आणि शाळा-शाळांमधून पारायणे व्हावयाला पाहिजेत. रामाचा अवतार होण्याआधी ज्याप्रमाणे वाल्मीकीने रामायण लिहिले, त्याप्रमाणे भारतात स्वातंत्र्य अवतीर्ण होण्यापूर्वी पन्नास वर्षे आधी शिवराम-पंतांनी स्वातंत्र्याचे महाकाव्य लिहून ठेवले होते. म्हणून ब्रिटिश राजसत्तेला कृतान्त काळाप्रमाणे भासणाऱ्या 'काळ'कर्त्याला त्याच्या जन्मदिवशी 'कालाय तस्मै नमः' असे कृतज्ञतेने म्हणून अभिवादन करावे का स्वातंत्र्याच्या ह्या महाकवीला आपल्या उदरात नष्टप्राय करून साम्राज्यवाद्यांपेक्षाही भयानक सूड त्याच्यावर उगवणाऱ्या कालपुरुषाला 'कालाय तस्मै नमः' असे उद्वेगाने म्हणावे हेच आम्हांला समजत नाही!

मराठा : २९-६-१९६४

## २८

# दादासाहेब खापर्डे

रामाचे नाव उच्चारले की जसे लक्ष्मणाचे नाव आपोआप ओठावर येते, त्याप्रमाणे लोकमान्य टिळकांचे स्मरण झाले की, त्यांच्या मागोमाग दादासाहेब खापर्ड्यांची आठवण झालीच पाहिजे, असा ह्या महाराष्ट्रात एक वेळ जमाना होता. तसे पाहिले तर टिळकांत नि खापर्ड्यांत कसलेच साम्य नव्हते. न पोषाखाचे, न स्वभावाचे, न आवडी-निवडीचे, न आहाराविहाराचे. टिळकांचा पोषाख जितका साधा नि आटोपशीर, तितकाच खापर्ड्यांचा पोषाख ऐषअरामी नि ऐसपैस. त्यांच्यासारखा अस्ताव्यस्त आणि बोंगेबाज फेटा बांधणारा माणूस लाखांत आढळावयाचा नाही. तेच त्यांचे वैशिष्ट्य. त्यामुळे खापर्डे येत असलेले एक मैलावरून दिसायचे. विलायतेला गेले तरी टिळकांनी विजारीखेरीज आपल्या पोषाखात बदल केला नाही, पण खापर्डे विलायतेला गेले की, एखाद्या लॉर्डाप्रमाणे त्यांचा संपूर्ण साहेबी थाट असायचा ! टिळक जितके गंभीर, तितके खापर्डे विनोदी. टिळक रंगेल तर खापर्डे रंगेल. टिळक जितके बुद्धिवादी तितके खापर्डे देवभोळे नि श्रद्धाळू. टिळक सुपारी खायचे, तर खापर्डे गुडगुडी ओढायचे. एक पुण्याचा ब्राह्मण, तर दुसरा वऱ्हाडचा नबाब. टिळकांपेक्षा खापर्डे दोन वर्षांनी वडील. पण एवढा फरक असूनही दैवाने त्या दोघांची अशी काही पक्की गाठ बांधली होती की, ती मृत्यूला देखील तोडता आली नाही.

१८९६ ते १९२० पर्यंतच्या दोन तपांच्या काळात कॅाँग्रेसच्या राजकारणात

टिळक-खापर्डे ही जोडी राम–लक्ष्मणाप्रमाणे तळपली. या कालखंडात टिळकांनी जे जे काही केले, त्या प्रत्येक कार्यात त्यांना खापर्ड्यांची प्रभावी साथ होती. टिळकांवर खापर्ड्यांची निरतिशय श्रद्धा होती आणि टिळकांचा खापर्ड्यांच्या कर्तृत्वावर संपूर्ण विश्वास होता. बेळगावपासून तो बनारसपर्यंत, कोलंबोपासून तो कलकत्त्यापर्यंत आणि सुरतेपासून तो मद्रासपर्यंत स्वातंत्र्याची आणि देशभक्तीची मशाल घेऊन ही अतुलनीय जोडी वर्षानुवर्षे हिंडली आणि तिने लोकप्रियतेचे सारे उच्चांक मोडले. तथापि, लोकांचे राजकीय स्मरण तोकडे असते. भारतीय राजकारणात टिळक अमर झाले आणि खापर्डे इतिहासात जमा झाले. पण ते तसे व्हायचेच. हा काळाचाच नियम आहे.

आज आम्हाला खापर्डे ह्यांचे स्मरण होण्याचे कारण, म्हणजे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव बाबासाहेब खापर्डे, जे आज ८२ वर्षांचे आहेत, त्यांनी आपल्या वडिलांचा साडेसातशे पानांचा प्रचंड चरित्रग्रंथ नुकताच छापून प्रसिद्ध केलेला आहे. (प्रकाशक : य. गो. जोशी, प्रसाद-प्रकाशन, किंमत रु. २०) ह्या ग्रंथाला चरित्र म्हणावे का आत्मचरित्र म्हणावे हा एक प्रश्न आहे. कारण, दादासाहेबांनी १८९४ पासून तो १९३८ पर्यंत (म्हणजे मृत्यूच्या उपान्त्य दिवसापर्यंत) पंचेचाळीस वर्षांच्या ज्या अत्यंत तपशीलवार रोजनिशा लिहिल्या आहेत त्यांच्याच आधाराने त्यांच्या आयुष्यक्रमाचे इत्थंभूत वर्णन त्यांच्या चिरंजिवांनी केले आहे. दादासाहेब म्हणजे एक अद्भुत गृहस्थ होते असे म्हटले पाहिजे. जन्मभर एवढे कामाचे डोंगर त्यांनी डोक्यावर बाळगले, पण सतत पंचेचाळीस वर्षे म्हणजे सोळा हजार चारशे पंचवीस दिवस (अर्थात काही अपवाद वजा करून) सकाळपासून संध्याकाळपर्यंत जे काय घडले, त्यांचे विगतवार वर्णन सुंदर आणि सुवाच्य इंग्रजीमध्ये न चुकता, न कंटाळता आणि न विसरता लिहावयाचे म्हणजे काय चेष्टा आहे? ह्या बाबतीत साऱ्या भारतवर्षात दादासाहेबांना कोणी जोड मिळेल असे आम्हाला वाटत नाही. ह्या सगळ्या रोजनिशा प्रसिद्ध करावयाचे म्हणजे त्याचा विस्तार विश्वकोशाएवढा होईल.

खापर्ड्यांच्या ह्या चरित्रग्रंथाची ओळखसुद्धा आम्हांला फारच त्रोटक स्वरूपात करून दिली पाहिजे. त्यांचा जन्म १८५४ मध्ये नि मृत्यू १९३८ मधे झाला. ते मॅट्रिक परीक्षेत दोनदा नापास झाले, कारण अभ्यासापेक्षा अवांतर वाचनाचे त्यांना विलक्षण वेड. १८७७ साली बी. ए. होऊन ते एल्फिन्स्टन कॉलेजात

फेलो झाले आणि संस्कृत नि इंग्रजीचे अध्यापक झाले. डॉ. रामकृष्ण भांडारकर ह्यांच्या हाताखाली संस्कृत आणि प्रा. वड्सवर्थ ह्यांच्या हाताखाली ते इंग्रजी शिकल्याने ह्या दोन्ही भाषांत त्यांनी असामान्य प्रभुत्व मिळविले. कॉलेजात असताना आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती ह्यांच्याशी त्यांनी संस्कृतात वाद केल्याने त्यांची कीर्ती मुंबईभर पसरली. त्या काळात प्रसिद्ध गुजराती कवी नर्मदाशंकर ह्यांच्याशी त्यांचा घनिष्ठ परिचय झाला. त्यांच्या सहवासात त्यांनी गुजराती भाषेवर एवढे असामान्य प्रभुत्व मिळविले की, मोठमोठे गुजराती वक्ते त्यांच्यापुढे फिके पडत. सुरतेची काँग्रेस त्यांनी जी पुढे गाजवली, ती ह्या गुजराती वक्तृत्वाच्या जोरावर. उर्दू आणि हिंदी भाषेतही त्यांनी तेवढेच प्रावीण्य मिळविले. त्यामुळे वऱ्हाडातील मुसलमानी समाजाचे ते कित्येक वर्षे अध्यक्ष होते. १८८४ साली ते एलएल. बी.ची शेवटची परीक्षा पास झाले. सारांश, १८७३ ते १८८४ हा अकरा वर्षांचा काळ त्यांनी मुंबईत घालवून विविध भाषांत प्रावीण्य मिळविले आणि कमालीची बहुश्रुतता संपादन केली. नंतर वऱ्हाडात परत येऊन त्यांनी चार वर्षे सरकारी नोकरी केली, आणि १८८९ पासून अमरावती येथे स्वतंत्रपणे वकिली करावयास सुरुवात केली. वकिलीत त्यांचा जम चांगला बसला.

१८९६ मधे वऱ्हाडात भयंकर दुष्काळ पडला. त्या वेळी हजारो दुष्काळ-ग्रस्तांना हस्तेपरहस्ते अन्नदान करून त्यांनी वाचविले. त्यामुळे त्यांच्या दानशूर-त्वाची आणि औदार्याची कीर्ती सर्वत्र पसरली, आणि तेव्हापासून रोज त्यांच्या घरी अतीताभ्यागतांची जत्राच भरू लागली. त्याच वेळी दक्षिण प्रांती पडलेल्या दुष्काळात टिळकांनी जिवापाड कष्ट करून फंड गोळा केले आणि 'केसरी'त कडक लेख लिहून ह्या दुष्काळाचे खापर सरकारच्या डोक्यावर फोडले. त्यामुळे खापर्ड्यांचे मन टिळकांकडे आकर्षित झाले. एवढ्यात पुण्यात प्लेगने कहर केला. सोजिरांनी घरादारात शिरून अत्याचार केले. रँडसाहेबाचा खून झाला, आणि 'वड्याचे तेल वांग्यावर' ह्या न्यायाने टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली पकडण्यात आले. त्यांच्या बचावाचा फंड आमरावतीला दादासाहेबांनी उभारला. त्याच सुमारास पुण्यात सरदार बाबामहाराज पंडित वारले. ते टिळकांचे मित्र नि खापर्ड्यांचे व्याही, म्हणून त्या दोघांची बाबामहाराजांच्या इस्टेटीचे ट्रस्टी म्हणून नेमणूक झाली. टिळक आणि खापर्डे एकत्र कसे आले त्याचा असा इतिहास आहे.

१८९९ साली मद्रासच्या काँग्रेस अधिवेशनाला टिळक आणि खापर्डे बरोबरच गेले. त्याच वेळीं अड्यारला जाऊन बेझंटबाईंच्या प्रभावाने दिपून खापर्ड्यांनी थिऑसफीची दीक्षा घेतली. टिळकांचा जसा घरोबा वाढला तसे सिंहगडावर त्यांच्या संगतीत खापर्डे पुष्कळदा येऊन राहू लागले. १९०५ च्या बनारस काँग्रेसला टिळक नि खापर्डे बरोबर गेले. तेथे त्यांचा प्रचंड सत्कार झाला. १९०६ मध्ये स्वदेशीच्या प्रचारासाठी त्यांनी गुजरात आणि बंगाल येथे दौरे काढले. त्या वर्षीची कलकत्याची काँग्रेस दादाभाई नौरोजी ह्यांच्या अध्यक्षते-खाली भरली होती. कलकत्ता येथे टिळकांचे नि खापर्ड्यांचे प्रचंड स्वागत झाले. टिळक हे देवाचा अवतार आहेत ह्या भावनेने लोकांनी त्यांची पूजा केली. त्या अधिवेशनात टिळकांची भाषणे खूपच गाजली. स्वदेशीचे नि बहिष्काराचे दोन्ही ठराव पास झाले. त्यामुळे 'स्वराज्या'चा पहिला मंत्रोच्चार शेवटच्या भाषणात दादाभाई नौरोजींना करावा लागला. राष्ट्रीय राजकारणातले टिळकांचे कट्टर दोस्त म्हणून सरकारची खापर्ड्यांवर वक्रदृष्टी झाली. जे १८९१ ते १९०७ पर्यंत सोळा वर्षे अमरावती म्युनिसिपालिटीचे उपाध्यक्ष होते, त्यांचे नाव म्युनिसिपल सभासदांच्या यादीतून काढून टाकण्यात आले.

१९०७ च्या डिसेंबरमधे सुरतेची ऐतिहासिक काँग्रेस भरली. जहाल-मवाळांचा झगडा विकोपाला गेला. खापर्ड्यांनी आपल्या गुजराती वक्तृत्वाने टिळकांच्या राष्ट्रीय राजकारणाला सुरतेच्या जनतेत कमालीची, लोकप्रियता प्राप्त करून दिली. एका मवाळाने टिळकांना जोडा मारला, तो सुरेन्द्रनाथ बानर्जींच्या पाठीत आणि सर फिरोझशहा मेथांच्या गालफडात बसला. त्यानंतर खूप मारा-मारी होऊन सुरत काँग्रेसचे तीन तेरा वाजले. त्याचाच सूड उगवण्यासाठी २४ जून १९०८ ला राजद्रोहाच्या आरोपावरून टिळकांना अटक झाली. त्या खटल्यात खापर्ड्यांनी आपल्या वकिली ज्ञानाची पराकाष्ठा केली. २२ जुलैला टिळकांना सहा वर्षांची शिक्षा होऊन त्यांची मंडालेला रवानगी झाली. त्यावर प्रिव्ही कौन्सिलकडे अपील करण्यासाठी १३ ऑगस्ट रोजी खापर्डे हे विलायतेला रवाना झाले. टिळकांना सोडविण्यासाठी त्यांनी तिकडे जंग जंग पछाडले, पण त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. प्रिव्ही कौन्सिलने अपील फेटाळले. हाऊस ऑफ लॉर्डसकडे अर्ज केला. राजेसाहेबांची भेट घेण्याची खटपट केली. मजूर पक्षाची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला. पण ते सर्व प्रयत्न व्यर्थ ठरले. सतत दोन वर्षे खापर्डे इंग्लंडमधे राहून हा प्रयत्न करीत होते. शेवटी निराश होऊन ते

परत आले आणि प्रथम मंडालेच्या तुरुंगात जाऊन टिळकांना भेटले आणि सर्व वृत्तांत सांगितला. त्यांचा निरोप घेताना अश्रुपूर्ण नयनांनी त्यांनी टिळकांना मिठी मारली. टिळकांच्या या खटल्यापायी खापर्ड्यांची तीन वर्षे वाया गेली. त्यांची वर्षाची प्राप्ती एका लाखाच्या घरात होती. त्यांचा संसार फार मोठा होता. टिळकांच्या प्रेमासाठी फार मोठा आर्थिक त्याग करून, ते जवळ जवळ कफल्लक बनले.

१५ जून १९१४ ला लो. टिळक सुटले, आणि त्यानंतर त्यांच्या 'होमरूल' लीगच्या झंझावाती राजकारणाचा प्रारंभ झाला. १ मे १९१६ ला बेळगावची परिषद खापर्ड्यांच्या अध्यक्षतेखाली भरली. त्यात टिळकांनी 'होमरूल'ची घोषणा केली. त्यानंतर लखनौच्या कॉंग्रेसला टिळक-खापर्डे गेले. ती संपल्यानंतर उभयतांनी सहा दिवसांचा उत्तर भारताचा दौरा काढला. कलकत्याला जाताना टिळकांच्या गाडीत गांधीजी होते. प्रत्येक स्टेशनावर टिळकांच्या नावाचा गगनभेदी जयजयकार गांधीजींना प्रत्यक्ष पाहायला नि ऐकायला मिळाला. त्यामुळे टिळकांच्याबद्दल साहजिकच गांधीजींना मनात वैषम्य उत्पन्न झाले. १९१८ साली व्हाइसरायांनी सर्व पुढाऱ्यांची परिषद दिल्लीला बोलावली. पण त्या परिषदेला टिळक, बेझंटबाई नि अलीबंधू ह्यांना आमंत्रण नव्हते. म्हणून त्या परिषदेवर बहिष्कार टाकावा असा आदल्या दिवशी गांधीजींनी पुकारा केला नि दुसऱ्या दिवशी स्वतःच ते परिषदेला हजर राहिले.

व्हाइसरॉयांना युद्धप्रयत्नात भारताची मदत पाहिजे होती. पण टिळकांची भूमिका अशी होती की, युद्ध संपताच भारताला होमरूल देण्याचे इंग्लंडने कबूल केल्याखेरीज त्याला मदत करायची नाही. त्याच्या उलट इंग्लंडवर कसलीही अट न लादता त्याला संपूर्ण सहकार्य द्यावे, अशी गांधीजींची भूमिका होती. म्हणून व्हाइसरॉयांच्या परिषदेत टिळकांची भूमिका प्रकट होऊच नये म्हणून गांधीजींनी त्या वेळीं अनेक खोडसाळ कारवाया केल्या. गांधीजी त्या वेळीं संपूर्ण सरकारजमा होते. पण पुढे गंमत ही की, दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं गांधीजींनी नेमकी हीच टिळकांची भूमिका घेऊन 'छोडो भारत'ची घोषणा केली!

टिळकांच्या आग्रहावरून खापर्डे वरिष्ठ कायदेमंडळाच्या निवडणुकीला १९१७ साली उभे राहिले आणि निवडून आले. पुढे दोन वेळा ते निवडून आले, म्हणजे १९१७ ते १९३६ पर्यंत एकोणीस वर्षे वरिष्ठ कायदेमंडळाचे ते

अखंड सभासद होते. १९१९ साली दडपशाहीचे ‘ रौलट बिल ’ आले. कौन्सिलमध्ये खापर्ड्यांनी त्याला कडकडून विरोध केला. त्याच वेळी गांधीजींनी सत्याग्रह सुरू केला. जालियनवाला बागेचे हत्याकांड घडले. टिळक त्या वेळी चिरोल केससाठी विलायतेला गेले होते. स्वराज्याची मागणी मागण्यासाठी कॉंग्रेसचे डेप्युटेशन घेऊन खापर्डेही विलायतेला गेले. इंग्लंडमध्ये टिळक व खापर्डे ह्यांनी ठिकठिकाणी जाहीर व्याख्याने देऊन भारतीय स्वराज्याची मागणी इंग्रज लोकांना समजावून सांगितली. खापर्डे हे इंग्रजीत इतकी विनोदी व्याख्याने देत की, भारताचे ‘ मार्कट्वेन ’ अशी इंग्लंडमध्ये त्यांना पदवी मिळाली. पण ह्या प्रयत्नांचा काही परिणाम न होता, मॉंटेग्यूंना हवा होता तसा सुधारणेचा कायदा पार्लमेंटकडून त्यांनी पास करून घेतला. १९१९ अखेर टिळक-खापर्डे भारतात परत आले.

१९२० हे टिळकांच्या जीवनातले शेवटचे वर्ष. त्या वर्षाच्या मार्च महिन्यापासून तो जूनपर्यंत टिळक आणि खापर्डे ह्यानी राजस्थान–सिंधचा दौरा काढला. सोलापूरची परिषद गाजवली. पुन्हा कॉंग्रेसच्या सभेसाठी ते बनारसला गेले आणि ५ जून १९२० ला परत आले. उत्तर भारतामधील असह्य उन्हाळ्यात एवढी दगदग केल्यानंतर टिळकांच्या उतार वयातल्या आणि मधुमेहाने ग्रासलेल्या प्रकृतीवर जो परिणाम व्हावयाचा तोच झाला. २० जुलै १९२० रोजी टिळकांना ताप आला. दि. २७ ला त्यांची शुद्धी गेली, तेव्हा खापर्ड्यांना तार करून मुंबईला बोलावण्यात आले. दि. ३१ रोजी बारा वाजून चाळीस मिनिटांनी ‘ टिळक गेले ! ’ टिळकांचे दहन मुंबईलाच करावे हा खापर्ड्यांनीच आग्रह धरला. अग्निसंस्काराच्या वेळी खापर्ड्यांना घेरी आली. दुसऱ्या दिवशी मुंबईच्या ‘ टाईम्स’ने टिळकांवर खोडसाळ लेख लिहिला. त्याची एका शोकसभेत खापर्ड्यांनी हजेरी घेतली. टिळकांनंतरची पहिली कॉंग्रेस नागपूला भरली. तिच्यात कॉंग्रेसची सूत्रे गांधीजींच्या हाती गेली, आणि खापर्डे कॉंग्रेसमधून बाहेर पडले. गांधीजींच्या काळात टिळकांचे राजकारण जगवण्याचा खापर्ड्यांनी अटोकाट प्रयत्न केला. त्यासाठी त्यांना अनेकदा मानहानी पत्करावी लागली आणि लोकप्रियतेचा त्याग करावा लागला. एवढेच नव्हे तर या गांधीवादामुळे महाराष्ट्रात जशी अनेक घरे भंग पावली, त्याप्रमाणे त्यांचे हे चरित्र लिहिणाऱ्या थोरल्या चिरंजीवांशीसुद्धा त्यांचे वितुष्ट आले. पण मरेपर्यंत दादासाहेबांनी टिळकांचे तत्त्व सोडले नाही.

येथपर्यंत खापर्ड्यांच्या राजकीय चरित्राचा आम्ही सारांश सांगितला. त्यांचे इतर चरित्र ह्याहीपेक्षा अद्‌भुतरम्य आहे. त्यांच्या औदार्याला नि दानशौर्याला तर मर्यादाच नव्हती. कोणीही त्यांच्याकडे येवो, रिक्त हस्ताने परत कधी गेलाच नाही. तेवढ्यासाठी कर्ज काढावे लागले, तरी त्याची त्यांनी पर्वा केली नाही. हरिदास, पंडित, शास्त्री, बुवा, फकीर, महाराज, गवई, ज्योतिषी, नाटकवाले आणि त्याखेरीज देशातले पुढारी, फंडवाले ह्यांना त्यांचे घर म्हणजे मुक्तद्वार होते. आधीच त्यांच्या घरात रोज पन्नास माणसे जेवायला. त्यातून हे पाहुणे! काही काही तर महिने दोन महिने मुक्काम करायचे. मग काय विचारायला पाहिजे? शिरडीचे साईमहाराज, साकोरीचे उपासनीमहाराज, शेगावचे गजाननमहाराज ह्यांचे त्यांच्यावर विलक्षण वर्चस्व। एकदा शिरडीला साईबाबांनी त्यांना बोलावून दोन महिने तेथे अडकवून ठेवले. घरी परत जाण्याची मुळीं आज्ञाच दिली नाही. तिकडे दोन महिने दादासाहेबांचे पक्षकार त्यांच्या नावाने ठणाणा करीत बसले! स्वप्ने, दृष्टांत, शकुन-अपशकुन, मुहूर्त, पंचांग, कुंडल्या ह्यांच्यावर त्यांचा विलक्षण विश्वास! 'ह्या महिन्यात आपल्याला पैशाचा योग नाही.' असे पंचांगात आढळल्यामुळे त्यांनी घरी पैसे घेऊन चालत आलेल्या एका पक्षकाराला परत घालवले. कोणताही निर्णय घ्यायचा झाल्यास ते देवावर हवाला ठेवीत. एकदा एका खटल्यातला वादी आणि प्रतिवादी दोघेही त्यांना वकीलपत्र द्यावयाला आले, तेव्हा त्यांनी देवा-पुढे त्यांच्या नावाने चिठ्ठया टाकून निर्णय घेतला.

त्यांचे वक्तृत्व जसे अमोघ होते, तसा त्यांचा विद्याभ्यासंगही गाढा होता. वर्षानुवर्षे रोज सायंकाळीं आपल्या घरी ते एक वर्ग चालवीत. त्यात वेदांतापासून तो ब्रह्मविद्येपर्यंत सर्व विषयांचे ते निरूपण करीत. काव्य, नाट्य आणि साहित्य ह्या विषयावर तर त्यांचा अधिकार फार मोठा. या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रात ज्या नाटक मंडळ्या होत्या—शाहुनगरवासी, किर्लोस्कर, वाशिमकर, पाटणकर, त्यांना पैशाची तर त्यांनी मदत केलीच, पण त्यांच्या अनेक नाटकांच्या तालमी घेऊन त्यांना ती नाटके उत्तम तऱ्हेने बसवून दिली, हे आज किती लोकांना माहीत आहे? मराठी रंगभूमीची त्यांनी जी बहुमोल सेवा केली तिचा तर एक स्वतंत्र ग्रंथच होईल. खापर्ड्यांच्या महान जीवनाला अनेक दालने होती, आणि त्यातले प्रत्येक दालन श्रीमंत, समृद्ध आणि देदीप्यमान होते. त्यांच्या धार्मिक आणि देवभोळ्या स्वभावावरून पुष्कळांना असे वाटेल की ते सनातनी होते.

एकदम चूक ! साकोरीला नि शिर्डीला साबुदाण्याची खिचडी खाणारे खापर्डे आणि सिमल्याला नि विलायतेला साहेबाच्या टेबलावर काट्यासुरीने जेवणारे खापर्डे ह्यांच्यात जमीन-अस्मानाचे अंतर होते. त्याचा अर्थ वाचकांनी आपल्या मनाशी समजून घ्यावा. पण त्यांच्या जीवनवृक्षाच्या विविध शाखांवर जर कोणत्या एका गुणाचा मनोहर फुलोरा फुलला असेल तर तो विनोदाचा ! टिळकांच्या गंभीर आणि रुक्ष काळात असा विनोदी वक्ता मुळी झालाच नाही. दादासाहेब खापर्डे म्हणजे हास्य, विनोद आणि आनंदाचे अहोरात्र उचंबळणारे मूर्तिमंत कारंजे ! त्यांच्या ह्या विनोदी वक्तृत्वाचा नि कोटिक्रमाचा एकही नमुना त्यांच्या ह्या चरित्रग्रंथात दिला जाऊ नये, ह्याचा आम्हांला सर्वात विषाद वाटतो. असो ' मृच्छकटिका 'त " दीनानां कल्पवृक्षः स्वगुणफलनतः सज्जनानां कुटुंबी । आदर्शः शिक्षितानां सुचरितनिकषः " हे चारुदत्ताचे जे वर्णन केले आहे, त्यानेच दादा-साहेबांच्या अलौकिक गुणांचा यथार्थ गौरव होऊ शकेल !

मराठा : १-४-१९६३

# ३०

## मावळते श्रीप्रकाश

महाराष्ट्राचे लोकप्रिय राज्यपाल श्री. श्रीप्रकाश पाच वर्षांची कारकीर्द संपवून आज आपली अधिकारसूत्रे खाली ठेवीत आहेत. आज सायंकाळी राजभुवनात त्यांना निरोप देण्याचा समारंभ आहे. आम्ही बाहेरगावी जात असल्याने त्या समारंभाला आम्हांला हजर राहता येत नाही. म्हणून 'दैनिक मराठ्या'तर्फे हा अग्रलेख लिहून आम्ही त्यांना मोठ्या प्रेमाने आणि आपुलकीने हा निरोप देत आहोत. काँग्रेसमधल्या ज्या हाताच्या बोटांवर मोजता येणाऱ्या व्यक्तींवर आमचे प्रेम आहे, त्यांत आम्ही श्रीप्रकाश ह्यांचा मोठ्या अभिमानाने समावेश करतो. ह्याचे कारण, प्रखर विनोदबुद्धीची विरळ देणगी त्यांना मिळालेली आहे. सामान्यतः, काँग्रेसचे पुढारी अत्यंत रुक्ष आणि अरसिक असतात. गाढवाला जशी गुळाची चव नसते, त्याप्रमाणे जीवनामधल्या मौजा कशा उपभोगाव्यात, ह्याची काँग्रेसवाल्यांना अक्कल नसते. खादीचा भकास आणि सुतकी पोषाख अंगावर घालून आणि बाप मेल्यासारखा अपशकुनी चेहरा करून ते रस्त्याने जेव्हा चाललेले असतात, तेव्हा संसारातल्या साऱ्या आनंदावर सूड उगविण्यासाठी तर ह्यांची पैदास झाली नसावी ना, असा विचार मनात आल्यावाचून राहात नाही. फुलांचा सुगंध ज्याप्रमाणे उकिरड्याच्या वाऱ्यालासुद्धा उभा राहात नाही, त्याप्रमाणे काँग्रेसवाला दिसला रे दिसला की जीवनातला विनोद आणि सौंदर्य मागल्या पावली धूम ठोकतात. 'वीस वर्षे पत्नीशी संबंध न ठेवल्याची जाहीरपणे घमेंड मारणारे' मोरारजी आणि 'शरीराची आसक्ती

नष्ट करण्यासाठी रोज सकाळी स्वतःच्या विष्ठेचे डोळे भरून दर्शन घ्यावे ' असे सांगणारे विनोबा हे ह्या किळसवाण्या काँग्रेसवाल्यांचे दोन प्रातिनिधिक नमुने समजावयाला हरकत नाही. असल्या या काँग्रेसवाल्यांच्या भणंग आणि कंटाळवाण्या गोटात श्रीप्रकाशांसारखा अत्यंत रसिक आणि विनोदी माणूस इतकी वर्षे कसा काय टिकून राहिला, ह्याचे आम्हांला सर्वांत आश्चर्य वाटते.

श्रीप्रकाशांच्या सौंदर्यसमीक्षकतेची ओळख पहिल्याने आम्हांला जी पटली, ती गेल्या वर्षी एका सौंदर्य-प्रसाधन कारखान्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या प्रसंगी त्यांनी जे फर्मास भाषण केले, त्या वेळी. त्या भाषणात ते म्हणाले, "निसर्गाने पशुपक्ष्यांमध्ये मादीपेक्षा नर अधिक नर सुंदर केला आहे. लांडोरीपेक्षा मोर अधिक सुंदर असतो, पण मनुष्यजातीत मात्र स्त्रीच अधिक सुंदर असते. फक्त आपण सुंदर आहोत, हे तिला समजत नाही. यामुळे तिला सौंदर्यप्रसाधानाकडे धाव घ्यावी लागते. पुरुष आपले सौंदर्य वाढावे म्हणून फारशी परवा करीत करीत नाही, पण स्त्री ही सौंदर्याची भोक्ती असते!" पंडित नेहरू आपल्या छातीवर रोज ताजे गुलाबाचे फूल लटकवितात, पण स्त्री-सौंदर्याचे एवढे मार्मिक रसग्रहण करणारे भाषण आजपर्यंत त्यांनी कधी केले आहे काय?

त्यानंतर महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार ह्यांच्या सत्तरीचा महोत्सव जेव्हा पुण्याच्या 'भारत इतिहास संशोधक मंडळा'ने गेल्या वर्षी साजरा केला, त्या वेळी श्रीप्रकाश ह्यांच्या दिलखुलास विनोदाचा आल्हादकारक प्रत्यय सर्वांना आला. ह्या सत्कारसमारंभात इतर वक्त्यांनी जी भाषणे केली, त्यांच्यात दत्तोपंतांच्या अंगामधल्या गुणांचा समुचित गौरव करण्यापेक्षा त्यांनी त्यांच्या ब्रह्मचर्यावरच विनोद निर्माण करून केवळ हश्या पिकवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा राज्यपाल श्रीप्रकाश ह्यांनी आपल्या भाषणात त्यांना खुमासदार टोमणा दिला. ते म्हणाले, "प्रा. पोतदार ह्यांच्या ब्रह्मचर्याची आतापर्यंत अनेकांनी स्तुती केली. त्यावरून ह्या वक्त्यांच्या घरी नवरा-बायकोमध्ये भांडणतंटे होत असावेत असे अनुमान निघू शकते. (हशा) आता ब्रह्मचर्याविषयीच बोलावयाचे झाले तर मी असे म्हणेन की, विद्वानांनी आणि बुद्धिमंतांनी ब्रह्मचर्य मुळीच पाळू नये. कारण विद्वान आणि व्यासंगी माणसांनी प्रजोत्पादन केले नाही, तर समाजात केवळ सामान्य माणसेच निर्माण होतील आणि त्यामुळे समाजाचे फार मोठे नुकसान होईल, म्हणून प्रा. पोतदारांसारख्या विद्वान माणसांनी या गोष्टीचा अजूनही विचार करावा!"

त्यावर दत्तोपंतांनी गंमतीने उत्तर दिले की, "आपण अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा केव्हाही केली नाही. तरुणपणापासून जेव्हा जेव्हा माझ्या लग्नाचा विषय निघाला, तेव्हा तेव्हा 'पुढल्या वर्षी पाहू!' असे म्हणून मी तो विषय टाळत असे, आणि ते पुढले वर्ष अद्याप उगवले नाही." तेव्हा श्रीप्रकाश ह्यांच्या विनोदाला आणखीनच भरती आली. ते म्हणाले, "प्रा. पोतदारांनी अविवाहित राहण्याची प्रतिज्ञा केली नाही हे ऐकून मला आनंद वाटला. आज आपण त्यांच्या सत्कारासाठी जमलो आहोत. आपण आशा करू या की, एखाद्या गोड मंगल प्रसंगासाठीही असेच एकत्र जमण्याची संधी प्रा. पोतदार आपणाला देतील." श्रीप्रकाशांच्या या उद्गारांनी सभागृहात एकच हशा पिकला.

गेल्या महिन्यात महाराष्ट्र राज्याच्या नव्या मंत्रिमंडळाला 'ताजमहाल' हॉटेलमधे 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'ने जेव्हा थाटाची मेजवानी दिली, त्या वेळी श्रीप्रकाश ह्यांनी जे विनोदी भाषण केले, ते ऐकून श्रोत्यांच्या हसता हसता मुरकुंड्या वळल्या. 'महाराष्ट्र चेंबर'चे अध्यक्ष लालचंद हिराचंद ह्यांच्या आकडेदार मिश्या बघून श्रीप्रकाश म्हणाले, "उत्तर भारतात अशी समजूत आहे की, व्यापाऱ्यांच्या मिश्या खाली पडलेल्या असतात. पण इथे मुंबईत पाहावे तर व्यापाऱ्यांच्या मिश्यांचे आकडे वर चढले आहे!" लालचंदांच्या मिश्यांकडून ते पलीकडे बसलेले महाराष्ट्र विधानसभेचे भूतपूर्व सभापती सीलम ह्यांच्या मिश्यांकडे वळले. ते म्हणाले, "सीलम ह्यांच्या मिश्यांच्या रुबाबदार आकड्यांनी पाच वर्षे विधानसभेत चांगला दरारा उत्पन्न केला." आजकालचे पुष्कळसे पुरुष मिश्या का राखीत नाहीत याची चिकित्सा करताना जेव्हा ते म्हणाले की, "स्त्रीवर्गाकडून पुरुषांच्या मिश्यांविरुद्ध तक्रारी येत असल्याचा हा परिणाम असावा!" तेव्हा खूपच हशा पिकला.

त्यानंतर महाराष्ट्र सरकारच्या मंत्रिमंडळाचे कौतुक करताना ते म्हणाले, "आमचे महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ फार चांगले आहे ह्यात काही शंका नाही. पण मला त्यांच्या बायकांचे विशेष कौतुक करावयाचे आहे. ह्यामुळे कोणीही माझ्याविषयी साशंक होऊ नये. (हशा) नवरे दिवसभर कामात व्यग्र असतात अन् घराची सर्व जबाबदारी त्यांना सांभाळावी लागते. आता आमचे जुने अर्थमंत्री शेषराव वानखेडे ह्यांचेच उदाहरण घेऊ या. मी त्यांच्या गावी असलेल्या बागायती शेतावर गेलो होतो. तेथे त्यांच्या पत्नीने इतकी सुरेख व्यवस्था ठेवली आहे की, ती पाहून मला वाटले की नवऱ्याऐवजी त्यांनाच पूर्वीच्या मंत्रिमंडळात

अर्थमंत्री नेमले असते, तर आज त्यांच्या घराण्यात आलेले अर्थमंत्रिपद त्यांना गमवावे लागले नसते. " एवढे बोलून थोड्या अंतरावर बसलेले नवे अर्थमंत्री श्री. स. गो. बर्वे ह्यांच्याकडे मिष्किलपणे पाहात श्रीप्रकाश म्हणाले, " म्हणूनच बायको नसलेल्या नव्या अर्थमंत्र्याच्या हातून महाराष्ट्र सरकारचे अर्थखाते कसे काय निभणार ह्याची मला चिंता वाटते ! " त्या वेळी सारी मंडळी पोट धरधरून हसली.

थोड्या दिवसांपूर्वी 'विधुरा'बद्दल बोलताना ते म्हणाले, " जगातले मोठमोठे लोक हे विधुर असतात. उदाहरणार्थ, आमचे पंतप्रधान नेहरूच पाहा की ! पत्नीच्या निधनाने कुटुंबाचा तोटा होत असेल, पण त्यामुळे समाजाचा नि राष्ट्राचा फायदा होतो. बायकोच्या पाशातून मनुष्य मोकळा झाला की तो अधिक चपळ, धाडसी आणि महत्त्वाकांक्षी होतो, आणि नव्या नव्या क्षेत्रांत मोठमोठे पराक्रम त्याच्या हातून घडतात. त्याच्या अंगात नवीन चैतन्य निर्माण होते आणि त्याचा विनियोग राष्ट्रविकासाच्या आणि मानवजातीच्या कल्याणाच्या कामी करता येतो. " श्रीप्रकाशांचा हा खोचक विनोद मार्कट्वेनसारख्या एखाद्या महान विनोदपंडिताच्या लेखणीतून उतरल्यासारखा वाटतो.

मागल्या रविवारी मुंबई विश्वविद्यालयाच्या वतीने जेव्हा त्यांना निरोप देण्यात आला, तेव्हा देखील त्यांनी अत्यंत मार्मिक आणि विनोदी भाषण केले. राजकारणी पुरुष हा देशात कसा गोंधळ माजवतो त्यासंबंधी त्यांनी एक विनोदी गोष्ट सांगितली. " एकदा एक डॉक्टर, एक इंजिनियर आणि एक राजकारणी पुरुष ह्यांच्यात वाद निर्माण झाला, की जगामधे या तिघांपैकी सर्वांत जुना धंदा कोणाचा ? डॉक्टर म्हणाला, 'माझा. कारण विश्वाच्या आरंभी 'ॲडम' नावाचा जो पहिला पुरुष निर्माण झाला तो 'ईव्ह'च्या तंगडीपासून. तेव्हा ते शस्त्रकर्म कोणातरी डॉक्टरने केले असले पाहिजेच.' त्यावर एंजिनियर म्हणाला, 'छे, छे, सर्वांत जुना धंदा माझा. कारण हे विश्व ( Cosmos ) निर्माण होण्यापूर्वी सर्वत्र गोंधळ ( Chaos ) होता, तेव्हा या गोंधळातून विश्वघटना करण्याचे काम कोणा तरी एंजिनियरनेच केले असले पाहिजे !' तेव्हा राजकारणी पुरुष त्याला म्हणाला, 'अरे, एंजिनियरने गोंधळातून विश्व निर्माण केले असेल. पण मूळचा गोंधळ कोणी निर्माण केला ? अर्थात, आम्ही राजकारणी लोकांनी. म्हणून सर्वांत जुना धंदा कोणाचा असेल तो तर आमचाच !' " विनोद निर्माण करताना स्वतःला खर्ची टाकल्याने त्या विनोदाची लज्जत जास्तच वाढते. लोकसभेत

सरकारतर्फे कशी उत्तरे दिली जातात, याचाही विनोदी नमुना श्रीप्रकाशांनी या भाषणात सांगितला. "आपण सरकारला एखादा प्रश्न विचारावा, म्हणजे सरकारचे अगदी ठराविक उत्तर येते. 'प्रश्नाचा विचार चालू आहे' (It is under consideration). पुन्हा सहा महिन्यांनी तोच प्रश्न विचारावा म्हणजे सरकारकडून पुन्हा उत्तर मिळते, 'प्रश्नाचा जोरात विचार चालू आहे.' (It is under active consideration)." गेल्या पाच वर्षांत श्रीप्रकाश ह्यांनी महाराष्ट्रात ठिकठिकाणी जी भाषणे केली, त्यामधील त्यांच्या विनोदाचा आणि सुभाषितांचा जर कोणी संग्रह केला तर तो एक मोठा मनोरंजक आणि उद्बोधक ग्रंथ होईल.

महाराष्ट्रातील जनतेचा संयुक्त महाराष्ट्रासाठी जीवनमरणाचा झगडा ज्या काळी चालू होता, त्याच वेळीं श्रीप्रकाशांची द्विभाषिकाचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाल्यामुळे, त्यांच्या विनोदाकडे, खेळाडूपणाकडे आणि चांगुलपणाकडे आपले जेवढे लक्ष जावे तेवढे जाऊ शकले नाही, ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांच्या अंतःकरणामधून माणुसकीचा आणि सहानुभूतीचा जिवंत झरा वाहात असे. त्याखेरीज मनुष्याच्या अंगी खेळाडूपणा आणि विनोदबुद्धी निर्माण होत नाही. काँग्रेसच्या पुढाऱ्यांत सामान्यत्वेकरून विनोदबुद्धीचा जो अभाव असलेला आढळतो, त्याचे कारण त्यांच्यात माणुसकी कमी असते. ह्या दृष्टीने पाहता श्रीप्रकाश हा काँग्रेसमधला एक तेजस्वी अपवाद होय. कारण, जनतेबद्दल त्यांना खरीखुरी सहानुभूती वाटते. गेल्या शुक्रवारी 'नशाबंदी सप्ताहा'च्या समारोपाचे भाषण करताना श्रीप्रकाश म्हणाले की, "लोक आपले दुःख व गरिबीतील हाल विसरण्यासाठी दारू पितात! ते दुःख दूर करण्यासाठी चीज आपण शोधून काढली पाहिजे. दारू पिण्यापासून जो फायदा होतो, तो होऊनही त्यापासून होणारे तोटे टळतील अशी काहीतरी नवी चीज शोधली पाहिजे!" हे अत्यंत समजुतीचे नि सहानुभूतीचे उद्गार काँग्रेसमधल्या कोणत्या 'हरीच्या लाला'ने आजपर्यंत काढले आहेत सांगा पाहू! उदार अंतःकरण आणि अथांग माणुसकी असल्याखेरीज जीवनाकडे पाहण्याची ही खेळकर दृष्टी येणार नाही. श्रीप्रकाशांसारखी निर्मळ मनाची आणि विनोदी वृत्तीची माणसे भारतात आज दुर्मिळ आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरून मावळणाऱ्या या 'प्रकाशा'ला आमचे सप्रेम आणि सादर अभिवादन!

मराठा : १५-४-१९६२

# ३१

## एसेम दीर्घायू होवोत !

संयुक्त समाजवादी पक्षाचे विद्यमान अध्यक्ष आणि संयुक्त महाराष्ट्र समितीचे भूतपूर्व नेते श्रीधर महादेव जोशी ऊर्फ एसेम ह्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होऊन आज त्यांना एकसष्टावे वर्ष लागत आहे, ह्याबद्दल 'दैनिक मराठा'च्या वतीने आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांना दीर्घायुरारोग्य इच्छितो. एसेम आमच्यापेक्षा सहा वर्षांनी लहान आहेत. म्हणजे तसे आम्हा उभयतांच्या वयात काही फारसे अंतर नाही. चाळीस सालापर्यंत आमचे पुण्यातच वास्तव्य होते, आणि एसेमप्रमाणेच आमच्याही सार्वजनिक आयुष्याला पुण्यातच प्रारंभ झाला. तथापि, पुण्यात असताना एसेमचा नि आमचा क्वचितच संबंध आला. त्या वेळी त्यांची नि आमची ओळख होती की नाही हेही नीटसे आम्हांला आठवत नाही.

पंचवीस साली काका गाडगिळांच्या नेतृत्वाखाली पुण्यामधे जी 'यूथ लीग'ची संघटना स्थापन झाली त्यात जी काही तडफदार तरुण मंडळी प्रामुख्याने दाखल झाली त्यात एसेम, ना. ग. गोरे आणि र. के. खाडिलकर ही नावे विशेष चमकून उठली आणि सर्वतोमुखी झाली. त्यानंतर काँग्रेसच्या राजकीय चळवळीत ह्या तिघांनी वेळोवेळी अत्यंत पोटतिडिकेने भाग घेतला अन् अधून-मधून कारावास पत्करला हे स्थानिक वृत्तपत्रांमधे आम्ही वेळोवेळी वाचत होतो. तथापि, त्या काळी काँग्रेसच्या सार्वजनिक व्यासपीठावर एसेम किंवा त्यांचे हे दोघे सहकारी प्रकट झाल्याचे आम्ही कधी पाहिले नाही वा ऐकलेही

नाही. आम्ही स्वतः १९३८ मध्ये कॅाँग्रेसमधे गेलो आणि पुणे नगरपालिकेच्या निवडणुका लढविल्या. त्या निवडणुकीच्या वेळींही एसेम आम्हांला कुठे दिसले नाहीत. र. के. खाडिलकर त्या वेळी नारायण पेठेमधून उभे राहिले, पण त्यांचे 'डिपॉझिट' जप्त झाले. पुणे नगरपालिकेच्या स्टँडिंग कमिटीचे आम्ही चेअरमन असताना एसेम कोणाचा तरी मोर्चा घेऊन आमच्याकडे एकदा आले असल्याचे आम्हांला आठवते. ह्या सर्व वर्णनावरून एसेम हे कमालीचे प्रसिद्धि-पराङ्मुख होते हे दिसून येईल. मागे मागे राहून राष्ट्रवादी तरुणांचे वैचारिक आणि संघटनात्मक मार्गदर्शन जेवढे करता येईल तेवढे करावे या एसेमचा विशेष कटाक्ष होता. तीस सालापासून ते सदतीस सालापर्यंत महाराष्ट्रातल्या कॅाँग्रेसमधल्या समाजवादी विचारांच्या युवकांची एसेमनी संघटना बांधली आणि त्यामुळे त्या मंडळींत त्यांनी कमालीची लोकप्रियता मिळविली, ह्यात काही शंका नाही.

एकोणचाळीस साली कु. ताराबाई पेंडसे ह्या सुविद्य तरुणीशी त्यांचा प्रेम-विवाह झाल्याचे त्या वेळी आमच्या कानावर आले, आणि त्यामुळे साहजिकच आम्हांला त्यांचे खूपच कौतुक वाटले. 'प्रेमविवाह करणारे पहिले मराठी पुढारी' म्हणून परवाच्या दिवाळीच्या एका अंकात एसेम ह्यांचा कोणी उल्लेख केला आहे, तो मात्र बरोबर नाही. कारण, त्यांच्यापूर्वी बारा वर्षे आधी कॉ. डांगे आणि कॉ. जोगळेकर ह्या राजकीय नेत्यांचे प्रेमविवाह झालेले होते.

बेचाळिसच्या आंदोलनात जे कॅाँग्रेस समाजवादी नेते भूमिगत झाले, त्यांत एसेम हे एक होते. त्यांपैकी अच्युत पटवर्धन आणि अरुणा असफअली ह्या भूमिगत नेत्यांचे अधूनमधून आमच्या घरी वास्तव्य होते. त्या काळात 'इमामसाहेब' या मुसलमानी नावाने आणि वेषभूषेने एसेम संचार करीत असताना एक दिवस रात्रीच्या वेळी आमच्या घरी आले. त्या वेळी 'ज्ञान-प्रकाश'चे काकासाहेब लिमये आमच्या घरी राहात होते. 'इमामसाहेबां'च्या अवतारात आम्ही प्रथम एसेमना काही ओळखू शकलो नाही. त्यांचे वेषांतर खरोखरच बेमालूम होते. उर्दू भाषेवर त्यांचे चांगलेच प्रभुत्व असल्याचे आम्हांला त्या वेळी प्रथम समजले. तथापि बेचाळिसच्या आंदोलनातही अच्युतराव, अरुणाबाई, शिरूभाऊ लिमये किंवा नाना पाटील ह्यांना जी प्रसिद्धी आणि जे महत्त्व प्राप्त झाले होते, ते एसेमच्या काही वाट्याला आले नाही.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम.......................... दि: ..................

लेखन किंवा वक्तृत्व ह्या क्षेत्रामध्ये अंगी पात्रता असूनही एसेमनी त्या काळी कधी संचार करण्याची पर्वा केली नाही. त्यामुळे प्रसिद्धीच्या प्रकाशाचा झोत वर्षानुवर्षे त्यांच्यावर कधी पडला नाही. तो सारा वचपा त्यांनी गोवा-विमोचनाच्या नि संयुक्त महाराष्ट्राच्या दोन्ही आंदोलनांमध्ये एकदाही तुरुंगात न जाता भरून काढला. १९५५ ते १९६० पर्यंतचा काळ हा एसेमच्या आयुष्यातला पराकाष्ठेच्या कर्तृत्वाचा नि लोकप्रियतेचा काळ होय. कुंडलीच्या भाषेत बोलायचे म्हणजे हाच त्यांच्या जीवनातला भाग्यकाळ होता. १९५६ च्या प्रारंभी संयुक्त महाराष्ट्राचे अनेक नेते तुरुंगात असताना भाई चितळे आणि एसेम ह्यांनी पुढाकार घेऊन संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली आणि एसेम समितीचे सरचिटणीस झाले. 'समिती' ही केवळ एक सत्याग्रहाची आघाडी व्हावी अशी एसेमची आणि प्रजासमाजवाद्यांची मूळ भूमिका होती. (तशा अर्थाचे एसेमच्या पत्नी सौ. ताराबाई जोशी ह्यांचे त्या काळातले एक पत्रही प्रसिद्ध आहे.) समितीचे व्यासपीठ होऊ नये, समितीच्या निशाणा-खाली निवडणुका लढवू नयेत आणि समिती हा एकजिनसी पक्ष होऊ नये अशी 'समिती'त सामील झालेल्या बहुसंख्य घटक पक्षांची भूमिका होती. तथापि, प्र. स. पक्षाने त्याबाबतीत जास्त चिडचिड आणि खळखळ केली. त्यामुळे एसेमना स्वपक्षीयांचा विलक्षण त्रास, मत्सर आणि द्वेष सहन करावा लागला. प्र स. पक्षाच्या काही अखिल भारतीय नेत्यांनी तर त्यांचे पाय ओढण्याचाही अनेकदा प्रयत्न केला. पण, हे सर्व 'हालाहल' कमालीच्या धैर्याने, सहनशीलतेने आणि शांततेने पोटात घालून त्यांनी समितीच्या नेतृत्वाची आपली जबाबदारी आणि संयुक्त महाराष्ट्रावरची आपली निष्ठा यत्किंचितही ढळू दिली नाही, ह्याबद्दल त्यांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. त्यांच्या अंगी असलेले संयम, सौजन्य आणि सोशिकता हे सद्गुण त्या वेळी कसोटीलाच लागले असे म्हणावयाला हरकत नाही.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या ऐन महापुरामध्ये ते उभे असल्याने लोकप्रक्षोभाचा झंझावात कोणत्या दिशेने आणि केवढ्या वेगाने वाहतो आहे, ह्याची त्यांना पूर्ण कल्पना होती. आणि म्हणून प्रजासमाजवादी पक्षाच्या काही असंतुष्ट नेत्यांनी त्यांच्याविरुद्ध रान पेटवण्याचे कितीही प्रयत्न केले तरी त्यांच्या रागालोभाची पर्वा न करता एसेम त्या आंदोलनाच्या लाटेवर बसून एकसारखे पुढेच दौडत राहिले. त्या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाशी ते इतके

तल्लीन झाले होते की, एका व्याख्यानात ते समितीमधल्या सर्व पक्षांना उद्देशून म्हणाले की, "गंगेला महापूर आलेला आहे. ह्या वेळीं सर्वांनी त्यात धडाधड उड्या मारल्या पाहिजेत. ते करायचे सोडून तुम्ही त्या पाण्यामधे आपापल्या पक्षाच्या घागरी आणि बादल्या कशाला भरीत बसला आहात ?" महाराष्ट्रात त्या काळीं एसेम लोकप्रियतेच्या अक्षरशः शिखरावर जाऊन बसले होते. एसेम हे प्रजासमाजवादी पक्षाचे आहेत हे लोक अजिबात विसरून गेले होते, आणि 'एस. एम. म्हणजेच संयुक्त महाराष्ट्र' असे महाराष्ट्रात समीकरण होऊन बसलें होते. तरी देखील पक्षनिष्ठा का समितीनिष्ठा ह्या ओढाताणीमध्ये अधूनमधून एसेम व्याकुळ झालेले आढळत. अशा वेळी आम्ही त्यांना एकदा म्हणालोसुद्धा होतो की, "एसेम, महाराष्ट्र आपल्या नेतृत्वाचा मुकुट तुमच्या मस्तकावर घालीत असताना, तुम्ही आपल्या पक्षाची लाल टोपी डोक्यावर घट्ट दाबून बसवण्याचा प्रयत्न करू नका !"

ठाण्याच्या तुरुंगात असताना एकदा कॉ. डांगे मला म्हणाले की, "उद्या आपले समितीचे राज्य महाराष्ट्रात प्रस्थापित झाले, तर आपण मुख्य प्रधानकीची माळ एसेमच्याच गळ्यात घालू !" यावरून एसेमचे नेतृत्व समितीमधल्या सर्व घटकपक्षांना किती मान्य होते हे दिसून येते. त्यांच्या ह्या लोकप्रियतेचे देदीप्यमान फळम्हणजे सत्तावन्न सालच्या निवडणुकीत पुण्याच्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसचे बाबूराव सणस ह्यांचा प्रचंड पराभव करून त्यांनी मिळविलेला अभूतपूर्व विजय होय. त्याच विजयानंतर 'दैनिक मराठ्या' तर्फे आम्ही वीस हजार रुपयांची थैली त्यांना लक्षावधी लोकांच्या साक्षीने शिवतीर्थावर अर्पण केली. महाराष्ट्र विधानसभेमधील समिती पक्षाचे नेतृत्व पहिल्याप्रथम त्यांना देण्यात आले ही गोष्ट क्रमप्राप्तच होती. विधानसभेतील आपली एक वर्षाची नेतेपणाची कारकीर्द एसेमनी अत्यंत रुबाबाने आणि यशस्वितेने पार पाडली. एसेमच्या अंगी संसदीय वक्तृत्व चांगल्या प्रकारचे आहे. इंग्रजीमध्ये किंवा मराठीमध्ये कोणताही प्रश्न अत्यंत मुद्देसूद आणि तर्कशुद्ध रीतीने ते सभागृहासमोर मांडू शकतात. तळमळ आणि प्रामाणिकपणा ह्यांचे प्रतिबिंब त्यांच्या भाषणात उमटत असल्यामुळे प्रतिपक्षावर त्याचा चांगला प्रभाव पडतो.

समितीच्या कालखंडात प्रजासमाजवादी पक्षावर तुटून पडण्याचे वारंवार प्रसंग आमच्यावर आले. तथापि, त्यातून एसेमना वगळण्याची आम्ही पराकाष्ठा केली. अखेर स्वपक्षीयांच्या आग्रहाला बळी पडून त्यांनी जेव्हा आमच्याशी

स्पर्धा करण्यासाठी म्हणून 'दैनिक लोकमित्र' काढले तेव्हा मात्र मग अधून-मधून त्यांची नि आमची चांगलीच 'जुंपू' लागली. विशेषतः महापालिके-समोरच्या निदर्शनात कोळी महिलांना आम्ही पायांतली वहाण दाखविली असा धादांत खोटा आरोप जेव्हा त्यांनी—म्हणजे त्यांच्या बातमीदारांनी—आपल्या पत्रामधून आमच्यावर केला, त्या वेळी आम्हांला त्यांचे नाव घेऊन फार वाईट शिवी हासडावी लागली. 'दैनिक लोकमित्र' ही एसेमच्या आयुष्यातली सर्वांत मोठी चूक होय. कदाचित त्यांना वाटले (किंवा कोणीतरी त्यांचे कान भरविले) की, ज्या अर्थी 'मराठा' एवढा लोकप्रिय होऊ शकतो, त्या अर्थी तुमचा 'लोकमित्र' का यशस्वी होऊ नये? आणि त्या भरीस पडून (आमच्या समजुतीप्रमाणे) ते निदान एक लाख रुपयाच्या तरी खड्डयात आले? त्यांच्या पत्नींनी 'सह्याद्री'त लिहिलेल्या लेखात 'दै. लोकमित्र काढून त्यांनी आपल्यावर केवढी आफत ओढवून घेतली' ही गोष्ट स्पष्टपणे कबूल केली आहे. 'लोकमित्रा'पासून एसेमच्या लोकप्रियतेला हळूहळू ओहोटी लागली असे म्हणावयाला हरकत नाही.

समितीचे अंतर्गत वाद एकसारखे वाढू लागले. पुढे भारताच्या सीमेचा चीनने काही भाग गिळंकृत केल्याचे जेव्हा उघडकीस आले तेव्हा समितीमधील भांडणे विकोपालाच गेली. 'एसेम'ना पहिल्यापासून कॉ. डांगे ह्यांच्याबद्दल आदर होता. वेचाळिसच्या आंदोलनात कम्युनिस्टांनी राष्ट्रवादी भूमिका घेतली असती, तर आपण त्याच पक्षात गेलो असतो, असे एकदा एसेम आम्हाला म्हणाले होते. कॉ. डांगे ह्यांच्या साठाव्या वाढदिवसाच्या सभेत 'डांगे हे महान देशभक्त आहेत' असे जाहीरपणे म्हणणाऱ्या एसेमनीच चिनी आक्रमणाचा वाद सुरू होताच 'डांग्यांच्या राष्ट्रद्रोही हातामध्ये आपण आपला हात घालणार नाही' असे जाहीरपणे उद्गार काढले. त्याच वेळी समितीचा कारभार आटोपला.

त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती होताच एसेम आणि त्यांचा प्रजा-समाजवादी पक्ष समितीतून बाहेर पडला आणि त्यांनी स्वतःचा नि स्वतःबरोबर समितीचा सत्यानाश करून घेतला. त्याची फळे बासष्टच्या सार्वत्रिक निवडणुकीत दोघांनाही भोगावी लागली. ज्या शुक्रवार पेठेत एसेमनी सत्तावन्न साली देदीप्यमान विजय मिळविला होता, त्याच ठिकाणी एका सामान्य उमेदवाराने त्यांचा पराभव केला आणि त्यांच्या असामान्य लोकप्रियतेला मूठमाती दिली

प्रजासमाजवाद्यांच्या नादी लागून एसेमनी समिती सोडली आणि महाराष्ट्रातले आपले महान नेतृत्व गमावले, ही त्यांच्या आयुष्यातली एक अक्षम्य चूक आहे. त्यामुळे लोकप्रियतेच्या शिखरावरून ते जे गडगडले ते वर दिल्लीच्या लोकसभेत जाण्याच्या ऐवजी पुणे म्युनिसिपालटीच्या कचऱ्यात येऊन पडले. एसेमच्या आयुष्याची ही सर्वांत मोठी शोककथा आहे.

एसेमच्या राजकीय आयुष्याची शोकांतिका झाल्याबद्दल त्यांच्या एका निःसीम भक्ताने दिवाळीच्या एका अंकात दुःख व्यक्त केले आहे, तर दुसऱ्या दिवाळीच्या अंकात त्यांचे सहकारी नारायणराव गोरे म्हणतात की, “ कर्तृत्वाची एवढी झेप दाखवून देखील एसेमना अखिल भारतीय नेतृत्वाचे शिखर गाठता आले नाही हा दैवदुर्विलास म्हटला पाहिजे ! ” महाराष्ट्राचेच काय, पण अखिल भारताचे लोकप्रिय नेते होण्यास लागणाऱ्या सर्व सद्‌गुणांची सिद्धता एसेममधे आहे, पण ‘ नैतिक मूल्ये ’, ‘ साधनशुचिता ’, ‘ जीवननिष्ठा ’ असल्या गांधीवादी ढोंगाने पछाडलेल्या मध्यमवर्गीय समाजवादाच्या वांझोट्या राजकारणात स्वतःला त्यांनी गुंतवून घेतल्यामुळे त्यांच्या आयुष्याचा अवसानघात होऊन आज ते उपान्त्य ( Penultimate ) नेते होऊन बसले आहेत. काँग्रेसमध्ये जर ते असते तर कदाचित ते महाराष्ट्राचे मुख्य मंत्री झाले असते, आणि कम्युनिस्ट पक्षात असते तर त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली असती, पण प्रजासमाजवादी पक्षात गेल्यामुळे आयुष्याची साठ वर्षे झाली तरी ते सदाशिव–नारायण पेठेच्या सरहद्दी-वर घोटाळत राहिले आहेत. पण आता त्याला काय इलाज आहे बरे ? संयुक्त समाजवादी पक्षाचे अध्यक्ष म्हणून एसेम जरी कोणाच्याही लक्षात राहिले नाहीत, तरी संयुक्त महाराष्ट्राचे एक निर्माते म्हणून महाराष्ट्र त्यांचा सदैव ऋणी राहील, हेच त्यांच्या आयुष्याचे खरे सार्थक होय !

मराठा : १३-११-१९६४

# ३२

## यशवंरावांचे अभीष्टचिंतन

भारतसरकारचे गृहमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण आज वयाच्या पंचावन्नाव्या वर्षात पदार्पण करीत आहेत. स्वराज्याच्या गेल्यां साडेवीस वर्षांमधे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, काकासाहेब गाडगीळ, हरीभाऊ पाटसकर, चिंतामणराव देशमुख आणि यशवंतराव चव्हाण या केवळ पाचच मराठी माणसांना भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान लाभले आहे. या मालिकेत 'मराठी माणूस' म्हणून स. का. पाटलांचा समावेश आम्हांला करता येत नाही, कारण महाराष्ट्रासाठी आणि मराठी माणसांसाठी त्यांनी खास असे काहीच केले नाही. केंद्रीय संरक्षणमंत्रिपद आणि केंद्रीय गृहमंत्री ही दोन महत्त्वाची खाती एकापाठोपाठ एक सांभाळण्याचा मान मिळालेले यशवंतराव हे केवळ एकमेवच महाराष्ट्रीय आहेत. वयाची पंचावन्न वर्षे उलटण्याच्या आत हे महत्पद यशवंतरावांनी हस्तगत केले हेही लक्षात ठेवले पाहिजे. यशवंतरावांना पिढीजाद श्रीमंती, नामांकित घराणे, वडिलोपार्जित नावलौकिक, अत्युच्च शिक्षण, अथवा एखाद्या श्रेष्ठ नि वजनदार नेत्याची प्रथमपासून मेहरनजर, यांपैकी कशाचेही पाठबळ नव्हते.

सातारा जिल्ह्यामधल्या देवराष्ट्रे या खेड्यातील एका सामान्य माणसाचा यशवंतराव हा मुलगा! अशा अशिक्षित, गरीब नि खेडवळ कुटुंबातला मुलगा जेमतेम शाळेच्या काही इयत्ता ओलांडण्याऐवजी कॉलेजमधे जाऊन, वकिलीची पदवी-परीक्षा उत्तीर्ण झाला, हाच सामान्यतः-विशेषतः त्या काळात-मोठा

‘ पराक्रम ’ मानला जायचा. पण केवळ तेवढ्यावर समाधान न मानता राजकारणात शिरून नि १९४२ मधील प्रतिसरकारच्या लढ्यात महत्त्वाची कामगिरी बजावून यशवंतरावांनी सातारा जिल्ह्यात स्वतःचे नाव गाजविले आणि पुढे मुंबई राज्याच्या विधिमंडळात आमदार म्हणून ते निवडून आले. पण तेवढ्यावरही न थांबता, प्रथम त्या राज्याच्या मंत्रिमंडळाचे संसदीय चिटणीस, मग त्या राज्याचे एक मंत्री, नंतर द्विभाषिकाचे आणि त्यामागून महाराष्ट्राचे मुख्य मंत्री, त्यानंतर भारताचे संरक्षणमंत्री आणि त्यापाठोपाठ भारताचे गृहमंत्री अशा एकाहून एक मोठ्या यशाच्या पायऱ्या यशवंतराव भराभर चढत जे गेले, ते निव्वळ प्रखर बुद्धिमत्तेच्या, असामान्य कर्तबगारीच्या, लवचिक मुत्सद्देगिरीच्या नि कणखर चिकाटीच्या बळावर होय, यात तिळमात्र शंका नाही.

यशवंतरावांशी आमची यापूर्वी अनेक प्रश्नांवर तीव्र मतभेद होते आणि आजही आहेत. त्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला विरोध करून द्विभाषिकाला दिलेला पाठिंबा, संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामधील हुतात्म्यांची ‘ गुंड ’ म्हणून त्यांनी केलेली बदनामी ( अर्थात, त्याच हुतात्म्यांचे स्मारक करावयास त्यांनी पुढे मदत केली नि त्याला अभिवादन करण्यासाठी ते स्वतः पायी चालत आले ती गोष्ट निराळी ), भाऊसाहेब हिऱ्यांना राजकारणातून उठवून स्वतः मुख्यमंत्री होण्यासाठी मोरारजींशी त्यांनी केलेले छुपे संगनमत, तांबव्याच्या विष्णू बाळा प्रकरणी त्यांनी केलेली निर्दय चकवाचकवी, महाराष्ट्र काँग्रेसमधील आपल्या कर्तबगार सहकाऱ्यांना डावलून स्वतःच्या निव्वळ होयबांची उच्चपदांवर वर्णी लावण्याचे त्यांचे गटबाज डावपेच, विरोधी पक्षात फूट पाडून काँग्रेसची खोगीरभरती करण्यासाठी त्यांनी वापरलेले संधिसाधू तंत्र, मराठी सीमाप्रदेशांच्या प्रश्नावर गेली बारा वर्षे त्यांनी पुनः पुन्हा घेतलेली दुटप्पी भूमिका नि विशेषतः त्या सीमाप्रदेशांचा घात करणाऱ्या महाजन कमिशनची नेमणूक करण्यात त्यांनी घेतलेला पुढाकार, महाराष्ट्राचा हाडवैरी निजलिंगप्पा याला काँग्रेसचा अध्यक्ष करायला त्यांनी दिलेली मूकसंमती, काँग्रेसच्या वरिष्ठ पुढाऱ्यांतील स. का. पाटील–अतुल्य घोष–कामराज इत्यादींच्या इरसाल प्रतिगामी ‘ सिंडिकेट ’ गटाशी अलीकडे त्यांनी केलेली हातमिळवणी, ‘ शिवसेने ’ला एकाच वेळी ‘ प्रतिगामी ’, ‘ प्रांतीयवादी ’, ‘ फॅसिस्ट ’ पण ‘ देशाभिमानी ’ म्हणण्याची त्यांची तारेवरील कसरत, इत्यादी बाबतीत त्यांची वागणूक आम्हाला कधी पटली नाही नि यापुढेही पटणार नाही. गेल्या सार्वत्रिक

निवडणुकांत नि त्यानंतर राजस्थान, पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेश, बिहार नि बंगाल या राज्यांमध्ये स्थापन झालेली काँग्रेसविरोधी पक्षांची मंत्रिमंडळे उलथून पाडण्याच्या लोकशाहीविरोधी कारवायांत यशवंतरावांनी जी भूमिका वठवली, ती त्यांना शोभा देणारी नक्कीच नाही. विशेषतः राज्यपालाच्या खास अधिकाराचा गैरवापर करून, बंगालमधील डाव्या पक्षांच्या आघाडीचे मंत्रिमंडळ खाली ओढण्याचा हा जो व्यूह यशवंतरावांनी रचला, तो अत्यंत लांच्छनास्पद होता. जनतेच्या इच्छेविरुद्ध काँग्रेसला वेगवेळ्या राज्यात पुन्हा अधिकारावर आणण्याची ही धडपड अखेर काँग्रेस पक्षाच्या नि व्यक्तिशः यशवंतरावांच्या अंगलटच येणार असल्याची स्पष्ट चिन्हे आताच दिसू लागलेली आहेत; पण यशवंतरावांच्या वाढदिवशी त्यांचे अभीष्टचिंतन करण्याऐवजी त्यांच्या केवळ उखाळ्यापाखाळ्याच काढत बसण्याची आम्हांला इच्छा नाही.

यशवंतरावांना आमच्याकडून त्यांची खोटी स्तुती आवडणार नाही अशी खात्री असल्यामुळेच त्यांच्या कारकीर्दीविषयी आमची काय टीका आहे, ती निर्भिडपणे आम्ही लिहिली. पण यशवंतरावांची बुद्धिमत्ता, मुत्सद्देगिरी नि कर्तृत्व त्यांनी योग्य तऱ्हेने वापरल्यास राष्ट्राचे नि महाराष्ट्राचे फार मोठे हित साधणे त्यांना शक्य आहे, यात आम्हाला तिळमात्र शंका नाही. म्हणूनच, महाराष्ट्राच्या सर्वांगीण उत्कर्षाचा ध्यास घेतलेला एक मराठी माणूस, तसेच लोकशाहीवर नि समाजवादावर श्रद्धा असलेला भारताचा एक नागरिक या नात्याने आम्हांला यशवंतरावांकडून काय अपेक्षा आहेत हे येथे थोडक्यात सांगतो. आमची पहिली अपेक्षा ही की, मराठी सीमाप्रदेशाच्या प्रश्नावर महाराष्ट्राला खरा नि संपूर्ण न्याय मिळावा म्हणून यशवंतरावांनी आपला केंद्रीय गृहमंत्रिपदाचा अधिकार खंबीरपणे वापरावा आणि खेडे हा सीमाघटक मानण्याच्या, तसेच त्या सीमाप्रदेशातील जनतेने आजवरच्या सर्व निवडणुकात दिलेला कौल स्वीकारण्याच्या स्पष्ट नि तत्त्वनिष्ठ भूमिकेतून त्या सीमाप्रदेशाचा प्रश्न तात्काळ सोडवावा. डांग जिल्हा, तसेच धुळे जिल्ह्यातील नि उंबरगाव तालुक्यातील मराठी खेडी गुजराथमधे डांबून महाराष्ट्रावर करण्यात आलेल्या अन्यायाचेही याच मार्गाने परिमार्जन करण्यासाठी यशवंतरावांनी कंबर कसावी. गोवे महाराष्ट्रामधे तात्काळ सामील व्हावे यासाठीही यशवंतरावांनी दमदार पावले उचलावी. कृष्णा-गोदावरीच्या नि त्यांच्या उपनद्यांच्या पाण्याचे वाटप, महाराष्ट्रातून भारत सरकारला करांच्या रूपाने मिळणाऱ्या उत्पन्नाचा योग्य

प्रमाणशीर वाटा महाराष्ट्राला परत मिळणे, इत्यादी हरेक बाबतीत महाराष्ट्राविरुद्ध केंद्रीय सत्ताधाऱ्यांकडून होणारा पक्षपात दूर करण्यासाठी यशवंतरावांनी झगडावे. सुब्रह्मण्यम् हे केंद्रीय अन्नमंत्री असताना, मद्रासमधील हिंदीविरोधकांची तळी उचलून धरण्यासाठी ते जर राजीनामा द्यायला निघाले, संजीव रेड्डी केंद्रीय पोलाद–मंत्री असताना आंध्रमधील विशाखापट्टम् येथे पोलादाचा कारखाना निघावा म्हणून त्यांनी जर खटपट केली, कामराज काँग्रेसचे अध्यक्ष असताना त्यांनी जर भारत सरकारला न जुमानता मद्रासमधल्या हिंदीविरोधकांची उघडपणे बाजू घेतली, तर महाराष्ट्रावरील अन्यायांचे निवारण करण्यासाठी यशवंतरावांनी आपल्या केंद्रीय गृहमंत्रिपदाची प्रतिष्ठा इरेला लावणे ‘ राष्ट्रीय ऐक्याला ’ बाधक, अथवा ‘ प्रांतीयवादी वृत्तीचे ’ ठरेल, असे मानायला काहीच कारण नाही. उलट हे अन्याय कायम राहिल्याने महाराष्ट्रामधे भारत सरकारविरुद्ध नि काँग्रेसविरुद्ध धुमसणारा वाढता असंतोषच यशवंतरावांना, भारत सरकारला नि महाराष्ट्रामधील काँग्रेसला जाचक ठरेल.

महाराष्ट्राच्या या प्रश्नांखेरीज सबंध राष्ट्राच्या आर्थिक नि राजकीय प्रश्नांबाबत केंद्रीय सत्ताधारी काँग्रेसवाले, जे थैलीशाहीधार्जिणे, जनताविरोधी, परावलंबी नि दिवाळखोर धोरण वाढत्या प्रमाणात स्वीकारीत आहेत, ते आमूलाग्र बदलून, त्या धोरणाला पुरोगामी दिशा लावण्यासाठी, तसेच राज्यकारभारातील वाढत्या भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री या नात्याने यशवंतरावांनी आपले सर्व वजन नि सामर्थ्य पणाला लावावे. काँग्रेसची कोसळती सत्ता सावरण्यासाठी, वेगवेगळ्या राज्यांतील काँग्रेसविरोधी मंत्रिमंडळांविरुद्ध लोकशाहीविरोधी कारवाया करण्याऐवजी, जनतेचा कौल मान्य करून, त्या मंत्रिमंडळांशी खरा निःपक्षपाती नि लोकशाहीवादी रीतीने वागण्याचा पायंडा यशवंतरावांनी पाडावा, मध्यवर्ती राज्यभाषेच्या प्रश्नावर खुद्द भारत सरकारमधे नि काँग्रेसमधे माजलेला सावळागोंधळ थांबवून, देशाच्या सर्व भागांमधील जनतेला न्यायाची, समानतेची नि विकासाची शाश्वती वाटेल, असे समजूतदार, पण त्याच वेळी खंबीर भाषाविषयक धोरण आखण्यात यशवंतरावांनी पुढाकार घ्यावा. राष्ट्रावरील चिनी आणि पाकिस्तानी लष्करी आक्रमणाबाबत, तसेच अमेरिकेच्या आर्थिक नि राजकीय आक्रमणाबाबत काँग्रेसवाल्या केंद्रीय सत्ताधाऱ्यांनी आजवर स्वीकारलेले लटपटीत नि नेभळट धोरण बदलून त्याऐवजी कणखर राष्ट्रधोरण स्वीकारले जावे, म्हणून यशवंतरावांनी कसून झगडावे, काँग्रेस राजवटीचा

डळमळता डोलारा यापुढे कायमचा सावरला जाणे अशक्य आहे आणि भारताचे भवितव्य विरोधी पुरोगामी पक्षांच्या हाती भारताची सत्ता येण्यामुळेच उज्ज्वल होईल, अशी आमची निष्ठा आहे. पण यशवंतरावांना ते मान्य होण्याची निदान सध्या तरी आम्हांला आशा नाही, म्हणून काँग्रेसपक्षीय केंद्रीय मंत्रि-मंडळामधे राहूनच यशवंतराव काय करू शकतील याविषयीच्या अपेक्षा आम्ही व्यक्त केलेल्या आहेत. यशवंतरावांच्या अंगी असलेल्या गुणांची आम्हांला ओळख असल्यामुळेच नि त्यांच्याविषयी आम्हांला आदर असल्यामुळेच या अपेक्षा आम्ही व्यक्त करीत आहोत, हे उघड आहे. नाही तर ज्याच्या अंगी लायकीच नाही त्याच्याविषयी अपेक्षा व्यक्त करण्यात काय अर्थ आहे? यशवंत-रावांच्या रक्तात समाजवाद मुरलेला आहे हे त्यांनी राजेलोकांच्या तनख्याबाबत जे पुरोगामी धोरण पत्करले आहे, त्यावरून स्पष्ट झाले आहे! यशवंतरावांशी आमचे कितीही राजकीय नि पक्षीय मतभेद असले, तरी व्यक्तिशः आम्ही त्यांना आमचे मित्र मानतो आणि त्यांनीही आमच्याशी व्यक्तिशः मैत्रीचेच वर्तन सदैव ठेवलेले आहे.

यशवंतरावांच्या बुद्धिमत्तेचा पल्ला केवळ राजकारणापुरताच मर्यादित नाही. ते एक साहित्यप्रेमी, कलाप्रेमी नि नाट्यप्रेमी रसिक आहेत. त्यांना समाज-जीवनाच्या सर्व अंगांविषयी रस आहे. ते उत्कृष्ट वक्ते आहेत. संभाषणचतुर आहेत. शिष्टाचारात निपुण आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न आहे. म्हणूनच आम्हांला त्यांच्याविषयी आपुलकी वाटते. आम्ही व्यक्त केलेल्या अपेक्षा यशवंतरावांकडून पूर्ण होवोत आणि अशा प्रकारे राष्ट्राचे नि महाराष्ट्राचे हित साधून त्यांचे 'यशवंत' हे नाव सार्थ करण्यासाठी त्यांना दीर्घ आणि निरोगी आयुष्य लाभो, अशी सदिच्छा व्यक्त करून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभीष्टचिंतन करतो.

मराठा : १३-३-६८

# ३३

## श्रीपाद अमृत डांगे

हिंदी कम्युनिस्ट पक्षाचे जनक म्हणून कॉ. डांगे हे केवळ भारतातच नव्हेत, तर साऱ्या जगात प्रसिद्ध आहेत. आंतरराष्ट्रीय कीर्तीची जी काही थोडीशी मराठी माणसे सध्या आहेत, त्यात कॉ. डांगे ह्यांना अग्रस्थान द्यावे लागेल. तथापि, त्या मानाने डांगे ह्यांच्या थोर चरित्राचा किंवा महान कर्तृत्वाचा महाराष्ट्रातील जनतेला त्यांच्या नावापलीकडे विशेष परिचय नाही. त्यांचे सर्वच आयुष्य तुरुंगात आणि कामगार चळवळीत गेले. आत्मप्रसिद्धीची त्यांना मुळीच हौस नाही. तेव्हा त्यांच्याबद्दल आपुलकीने कोण लिहिणार? 'कम्युनिस्ट' म्हटला की तो कोणी तरी एक भयंकर प्राणी असावा, अशी सर्वसामान्य मध्यमवर्गीयांची भांडवलदारवर्गाने समजूत करून दिलेली. त्यामुळे सामाजिक सभासंमेलनांत आणि समारंभात त्यांच्यावर कडक बहिष्कार पडला. वृत्तपत्रे आणि मासिके ही तर चुकून त्यांच्या वाटेला कधी गेली नाहीत. कम्युनिस्टांबद्दल ब्रिटिश सरकारचे जे धोरण होते, तेच काँग्रेस सरकारने पुढे चालविले. त्यामुळे राजकीय जीवनातही त्यांच्याभोवती अनुल्लेखाचा पिंजरा निर्माण झाला. देशातल्या आणि विशेषतः मुंबईतल्या कामगारवर्गात पराकाष्ठेचा लोकप्रिय असणारा त्यांच्यासारखा सव्यसाची आणि खंदा नेता महाराष्ट्राच्या मध्यमवर्गाला इतकी वर्षे विशेष परिचित असू नये हे विचित्र नव्हे काय?

पण ही परिस्थिती आता राहिलेली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा आणि चतुरस्र वक्तृत्वाचा गेल्या तीन-चार वर्षांत

महाराष्ट्रातील आबालवृद्धांना परिचय झालेला आहे. माझी आणि त्यांची ओळख जवळ जवळ चाळीस वर्षांची. पण नुसतीच ओळख, प्रत्यक्ष संबंध असा कधीच आला नाही. १९१९ साली मी मुंबईला कायद्याचा विद्यार्थी असताना डांगे यांचे नाव प्रथम माझ्या कानावर पडले. विल्सन कॉलेजमध्ये 'बायबल'च्या तासाला हिंदू विद्यार्थ्यांना सक्तीने हजर राहावे लागत असे. त्याविरुद्ध डांगे ह्यांनी विद्यार्थ्यांचे बंड उभारून मुंबई शहरात खूपच खळबळ उडवून दिली. त्या 'अपराधा'बद्दल डांगे आणि इतर बारा विद्यार्थी ह्यांना विल्सन कॉलेजमधून काढून टाकण्यात आले. त्यामुळे त्यांचे नाव त्या काळी सर्वतोमुखी झाले होते. त्यानंतर थोड्या दिवसांनी त्यांनी निमकर ह्यांच्या सहकार्याने 'यंग कॉलेजिएट' नावाचे एक इंग्रजी मासिक काढले. ह्या मासिकाला मोठमोठ्या भारतीय पुढाऱ्यांनी आशीर्वाद दिल्याचे मला आठवते. ह्या मासिकात गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी) ह्यांच्या 'एखाद्याचे नशीब' या कवितेचे इंग्रजी भाषांतर डांगे ह्यांनी करून छापले होते. त्या निमित्ताने त्यांची आणि माझी प्रथम गाठ पडली. डांगे ह्यांचे इंग्रजी भाषांतर फारच उत्तम वठले होते. त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन केले आणि गडकऱ्यांच्या काही उत्तमोत्तम कवितांची अशीच इंग्रजी भाषांतरे त्यांनी करावी अशी मी त्यांना विनंती केली. तथापि त्यांचे 'यंग कॉलेजिएट' मासिक दोन-तीन अंकांनंतर पुढे बंद पडले.

त्या वेळी टिळकांची होमरूल लीगची चळवळ जोरात होती. गांधीजीही भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर हळूहळू उदय पावू लागले होते. राष्ट्रीय भावनेचा महापूर वातावरणात सर्वत्र उसळू लागला होता. पण बहुसंख्य जनतेच्या भावना लक्षात न घेता 'मवाळ'पक्षाच्या काही पुढाऱ्यांनी टिळक-गांधीजींच्या विरुद्ध प्रचाराची मोहीम उघडली. ह्या मोहिमेला पायबंद घालण्याचे काम डांगे आणि त्यांचे सहकारी ह्यांनी हाती घेतले. टिळक आणि गांधी ह्यांच्या विरुद्ध कुठे कुणी जाहीर सभा घेतली की, ती ह्या मंडळींनी जाऊन हटकून उधळलीच म्हणून समजा. डांगे ह्यांच्या राजकीय जीवनाचा येथूनच प्रारंभ झाला असे समजावयाला हरकत नाही. पुढे टिळक वारले, आणि गांधीजींच्या असहकारयुगाला प्रारंभ झाला. डांगे त्या वेळी झेव्हिअर कॉलेजमध्ये सीनिअर बी. ए. च्या वर्गात होते. त्यांनी कॉलेजचे शिक्षण सोडून असहकारितेच्या चळवळीत उडी घेतल्याचे जेव्हा मी ऐकले, तेव्हा साहजिकच त्यांच्याबद्दलचा माझा आदर दुणावला. त्या आदरात काही दिवसांनंतरच

प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'गांधी आणि लेनिन' ह्या इंग्रजी भाषेत लिहिलेल्या लहानशा पण तेजस्वी निबंधाने भरच पडली. एकवीस सालाच्या अखेरीपर्यंत डांगे ह्यांच्या कार्याचा मला एवढाच परिचय होता. त्यानंतर मुंबई सोडून मी पुण्यास स्थायिक झालो. पुढे वर्तमानपत्रांमधून त्यांच्याबद्दल जेवढे ऐका वयाला मिळेल त्याच्या पलीकडे त्यांच्याशी माझा कधीच संबंध आला नाही.

पण योगायोग चमत्कारिक असा की, छप्पन्न सालच्या जानेवारी महिन्यात संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात आम्ही दोघेही स्थानबद्ध होऊन ठाण्याच्या तुरुंगात एकमेकांच्या शेजारी राहायला आलो. ह्या दोन महिन्यांत अहोरात्र आम्ही एकमेकांचे सोबती होतो. रात्रौ आमच्या कोठड्यांची दारे बंद झाली तरी आम्ही एकमेकांशी आपापल्या कोठड्यांतून बोलत होतो. ह्या दोन महिन्यांत मध्यंतरीच्या तीस-पस्तीस वर्षांच्या काळातील अनेक घडामोडींवर आम्ही मनसोक्त गप्पागोष्टी केल्या. राजकारणावरच सर्वांत कमी बोलल्लो असू. अनेक लहानमोठ्या व्यक्तींच्या आणि चित्रविचित्र घटनांच्या अनुभवांचे प्रचंड भांडार डांगे ह्यांच्या संग्रही साठलेले आहे. त्यांनी खूप पाहिले आहे, खूप अनुभवले आहे आणि विलक्षण वाचलेले आहे. केवळ राजकारणाचेच नव्हे तर जीवनामधील विविध क्षेत्रांचे त्यांना जबरदस्त आकर्षण आहे. आयुष्यातील वर्षानुवर्षे त्यांची तुरुंगात आणि हालअपेष्टांत गेली असूनही त्यांच्या स्वभावात कडवटपणाचा अंश आढळणार नाही. जीवनाबद्दलचा त्यांचा उत्साह आणि आशावाद एवढासासुद्धा ओसरलेला नाही. त्यांचा तरुणपणातला मिष्किलपणा किंवा वात्रटपणा आहे तसाच कायम आहे. तत्त्वचिंतनाचा त्यांना जेवढा हव्यास आहे, तेवढीच त्यांची विनोदबुद्धी तल्लख आहे. ह्यामुळे त्यांच्या समृद्ध आणि सप्तरंगी व्यक्तिमत्त्वाभोवती अद्भुतरम्यतेचे आकर्षक वलय निर्माण झाले आहे असे म्हणावयाला हरकत नाही. राजकारणात ज्यांची सारी हयात गेलेली आहे अशी माणसे बहुधा रुक्ष आणि जड असतात, पण डांगे ह्या अनुभवाला एकमेव अपवाद आहेत.

ज्या राजकारणासंबंधी भारतात आणि जगातही आज जास्तीत जास्त गैरसमज आहेत अशा राजकारणात पहिल्याने उडी घेण्याचा धोका पत्करून आणि त्या राजकारणातून निर्माण होणाऱ्या अनंत जोखिमी जन्मभर पचवून डांगे ह्यांच्यातला 'माणूस' अद्यापपर्यंत सुखरूप आणि जागृत राहिला आहे. त्यामुळे डांगे ह्यांच्या सहवासात एक प्रकारचा रुचकरपणा निर्माण झाला आहे.

स्थानबद्धतेमुळे कारागृहात शेजारी राहण्याचा योग जर आला नसता, तर डांगे ह्यांच्या सहवासातल्या आणि स्वभावातल्या मौजा मला कधी अनुभवता आल्या नसत्या. तुरुंग ही अशी जागा आहे की, तिथे माणसाच्या अंतर्बाह्य स्वरूपाचे समग्र दर्शन व्हावयाला मुळीच वेळ लागत नाही. कारण माणसाला तिथे काहीच लपवता येत नाही. तुरुंगात आला की तो उघडाच पडतो.

तो वेळपर्यंत डांगे ह्यांनी आपल्या आयुष्यातली एकंदर चौदा वर्षे तुरुंगात घालविली होती. चोवीस साली कानपूरच्या कटात त्यांना चार वर्षांची शिक्षा झाली. त्यानंतर मीरत कटात सात वर्षे त्यांनी तुरुंगात घालविली. दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा दोन वर्षे आणि पुन्हा पन्नास साली दोन वर्षे. त्यामुळे तुरुंगामधील जीवनात ते इतके रुळून गेले होते की, माहेरी आल्यानंतर मुलीला जसे वाटते तसे तुरुंगात आल्यानंतर त्यांना वाटत असावे, असा माझा समज झाला. तुरुंगात आल्यानंतर कोणकोणत्या गोष्टी बरोबर घेऊन यावयाच्या ह्यांच्या याद्या जणू काही त्यांच्याजवळ तयार होत्या. पूर्वी कारागृहात असताना त्यांनी ज्या अनेक ग्रंथांचे परिशीलन केले होते, त्यांची टिपणे त्या त्या वेळी त्यांनी वह्यांमध्ये करून ठेवली होती. अशा अनेक वह्या त्यांच्या संग्रही आहेत. तुरुंगात जाताना ह्या वह्यांचे गठ्ठे ते प्रथम बरोबर घेऊन जात. तुरुंगात लेखन किंवा मनन करताना संदर्भासाठी ह्या वह्यांचा त्यांना फार उपयोग होई.

तुरुंगात ते प्रकृतीला अतिशय जपत ही गोष्ट पहिल्याच दिवशी माझ्या नजरेला आली. सकाळी ते नऊ साडेनऊ वाजेपर्यंत उठत नसत, हे त्यांचे एक वैशिष्ट्य आहे. सकाळी त्यांना कोणी उठविण्याचा प्रयत्न केला तर ते भयंकर चिडतात. (फक्त कामगारांच्या बाबतीतच तेवढा ते अपवाद करतात असे मला पुढे त्यांनी सांगितले.) सकाळी उठल्यानंतर थंडी किंवा ऊन ह्यांचा उपसर्ग होऊ नये ह्याची ते फार काळजी घेतात. अंगात बाथगाऊन, गळ्याला मफलर अन् डोक्याला टॉवेल गुंडाळलेला अशा थाटात स्वारी आपल्या कोठडीतून आस्ते आस्ते साडेनवाच्या सुमारास बाहेर पडावयाची. त्यानंतर मग त्यांचे चहापानाचे साग्रसंगीत 'धर्मकृत्य' यथासांग चालावयाचे. आपल्या तुरुंगाच्या कोठडीत 'स्टोव्ह' आणण्याची खास परवानगी त्यांनी मिळवली होती. एखादी सुग्रण गृहिणी आपल्या खाष्ट यजमानासाठी जितक्या दक्षतेने आणि नेटकेपणाने चहा बनविते तितक्या काळजीने डांगे स्वतःसाठी चहा बनवीत. सर्व चहाच्या जातीमधे दार्जिलिंगचा 'लॉपचू' चहा उत्कृष्ट ही गोष्ट डांगे ह्यांच्यापासून मला

समजली. 'लॉपचू 'खेरीज दुसऱ्या कोणत्याही जातीच्या चहाला डांगे स्पर्श करीत नाहीत. डांगे ह्यांनी स्वहस्ते बनविलेला लज्जतदार 'लॉपचू' पिण्याचे त्या काळात मल जणू काही व्यसनच जडले होते. सकाळी चहा बनविण्याचा जसा त्यांचा विधी चाले, तसा संध्याकाळी 'दही' लावण्याचा त्यांचा कार्यक्रम असे. तीही कला त्यांना चांगलीच अवगत आहे.

दिवसभर डांगे ह्यांचा काही ना काही तरी उद्योग चाले. खोलीच्या कोपऱ्यातला केरकचरा काढणे, टेबल नि खुर्च्या लख्ख पुसणे, कपड्यांच्या घड्या वरचेवर चाळवणे, दुपारी उन्ह पडले की गजांना आतून घोंगडीचा पडदा लावून कोठडीत अंधार करणे ह्या गोष्टींचा कंटाळा म्हणून त्यांना कधी नसे. ह्या बाबतीत त्यांचा स्वभाव एखाद्या स्त्रीसारखा आहे. सर्वसामान्य पुरुषात आढळणारा गेंदीपणा नि गबाळेपणा त्यांच्या अंगी नाही.

डांगे ह्यांच्या पूर्वचरित्रातल्या कित्येक मनोरंजक गोष्टी त्यांच्याशी गप्पा-गोष्टी करताना सहज समजल्या. त्यांचा जन्म नाशिकचा. वीर सावरकरांना जेव्हा आठ साली पकडले तेव्हा ते दहा वर्षांचे होते. त्या वेळच्या राजकीय वातावरणाचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला. देवीची तपश्चर्या करून एक अदृश्य तरवार मिळवायची आणि तिने इंग्रजांना ठार करावयाचे असा निर्धार करून ते त्या वेळी एक दिवस जंगलात निघाले. चालून चालून थकले आणि आगगाडीच्या रुळावर जाऊन झोपले. तेवढ्यात त्यांना कुणी तरी पाहिले आणि उचलून घरी परत आणले. पुढे काही वर्षांनी ते मुंबईला आले. त्यांचे वडील सॉलिसिटरच्या ऑफिसात नोकरीस होते. स्वभावाने ते अतिशय प्रेमळ पण अबोल असत. पगाराचे पैसे ते डांगे ह्यांच्या हवाली करीत. पण खर्चाबद्दल ते त्यांना अवाक्षरही विचारीत नसत. तेवढ्यात डांगे ह्यांच्या बारीकसारीक सार्वजनिक चळवळी सुरू झाल्या. त्याला लागणारे पैसे कुठून आणायचे ? वडलांच्या पगारातले पैसे त्यांना वापरता आले असते, पण त्यातल्या एका पैलाही शिवण्याची त्यांची तयारी नव्हती म्हणून त्यांनी कांदेवाडीतल्या एका नायकिणीच्या मुलाची शिकवणी पत्करली. ती बातमी विकृत स्वरूपात त्यांच्या वडलांना कोणी तरी सांगितली की, तुमच्या मुलाला काल संध्याकाळी मी नायकिणीच्या माडीवरून उतरताना पाहिले. वडील मोठ्या चिंतेत पडले. आठ दिवसांनी त्यांनी डांगे ह्यांना विचारले, "काय रे, तुला लग्न करायचे का ?" डांगे म्हणाले, "नाही." वडील म्हणाले, "जेव्हा करायचे असेल तेव्हा मला सांग." पुढे काही

दिवसांनी वडिलांना खरा प्रकार कळून आला.

'यंग कॉलेजिएट' हे त्यांचे इंग्रजी मासिक दोन-तीन अंकांनंतरच बंद पडले पुढे लोटवाल्यांच्या साहाय्याने त्यांनी 'सोशालिस्ट' हे इंग्रजी साप्ताहिक काढले ते दोन वर्षे चालले. त्याला 'संततिनियमना'ची पुरवणी जोडण्यात आली. त्याचे संपादकत्व प्रा. ना. सी. फडके ह्यांच्याकडे असे. त्या वेळी डांगे ह्यांचा फडके ह्यांच्याशी प्रथम संबंध आला. एकदा डांगे ह्यांना पकडण्यासाठी पोलीस आले. तेव्हा त्यांनी आपल्या जवळचे सर्व कम्युनिस्ट वाङ्मय घाईघाईने फडके ह्यांच्याकडे लपवून ठेवले, पण पुढे ते सर्व वाङ्मय फडके ह्यांनी बंबात घालून जाळून टाकले. कम्युनिस्ट वाङ्मयाशी फडक्यांचा उभ्या आयुष्यात तेवढाच काय तो संबंध आला. त्यानंतर 'क्रांति' नावाचे एक मराठी पत्र डांगे काढीत असत. पण ते नियमित-पणे कधीच प्रसिद्ध होत नसे. सुप्रसिद्ध कादंबरीकार ग. त्र्यं. माडखोलकर ह्यांनी आपल्या 'मुक्तात्मा' कादंबरीत चंद्रशेखरचे जे पात्र रेखाटले आहे ते डांगे ह्यांच्यावरून. प्रा. फडके ह्यांना एका कादंबरीत गिरणीकामगारांच्या संपाचे चित्र रेखाटावयाचे होते. तेव्हा ते मुंबईला एका संपाच्या वेळी येऊन डांगे ह्यांच्या मागोमाग हिंडू लागले. डांगे ह्यांनी त्यांना बजावले की, "तुम्ही ह्या संपाच्या भानगडीत पडू नका. तुमचे डोके फुटेल!" पुढे फडके ह्यांनी एका कादंबरीत ह्या संपाचे चित्र रेखाटले. त्यात नायकाने संपाच्या वेळी कामगारांपुढे केलेले एक भाषण ऐकून नायिका त्याच्या प्रेमपाशात पडते असे त्यांनी दाखविले आहे. ती कादंबरी वाचून डांगे ह्यांची खूपच करमणूक झाली. ते उद्‌गारले, 'कामगारांचे संप हे काय प्रेमिकांच्या लग्नासाठी होतात की काय?'

'कम्युनिझमकडे तुमचे लक्ष प्रथम कसे वेधले?' असा मी एकदा त्यांना प्रश्न केला, तेव्हा ते उत्तरले, "मार्क्सचा चरित्रग्रंथ एकदा सहज माझ्या वाचनात आला. पुढे लेनिनचे चरित्र वाचावयाला मिळाले. ह्या दोन महापुरुषांनी माझ्या मनावर विलक्षण मोहिनी घातली. तीस सालापर्यंत मार्क्सचे वाङ्मय हिंदुस्थानात मुळीच येत नव्हते. तेव्हा मुंबईच्या कित्येक ग्रंथालयांचे डांगे सभासद झाले आणि त्यांच्यातर्फे कम्युनिस्ट वाङ्मय मागवून त्यांनी त्या ठिकाणी त्याचा अभ्यास केला. १९२३ साली एक इंग्रज कम्युनिस्ट डांगे ह्यांना रशियाला घेऊन जाण्यासाठी ऑस्ट्रेलियाच्या मार्गाने मुंबईस आला. मुंबईच्या ताजमहाल हॉटेलमध्ये तो उतरला. पुढे पोलिसांनी त्याला बोटीवर पकडले. तरीसुद्धा त्यांच्या कचाट्यातून निसटून तो 'मुंबई क्रॉनिकल'च्या कचेरीत आला

आणि तेथून त्यांनी डांगे यांना बोलावणे पाठविले. डांगे ह्यांनी त्याला स्पष्टपणे सांगितले, " भूमिगत मार्गाने रशियाला जाणे निषिद्ध वाटते. कम्युनिझमचा प्रचार मला उघडपणे ह्या देशात करावयाचा आहे. "

एकंदर चौदा वर्षांच्या शिक्षेच्या काळात ते पंधरा निरनिराळ्या तुरुंगात राहून आले. तुरुंगात त्यांनी निरनिराळ्या भाषांचा अभ्यास केला. बंगाली भाषा त्यांना चांगली येते. सिंधच्या तुरुंगात ते सिंधी शिकले. जाहीर भाषणे करावयास त्यांनी १९२४ च्या संपात सुरुवात केली. मुंबईच्या नागू सयाजी वाडीत त्यांची भाषणे होत. प्रत्येक भाषणाच्या वेळी ते पत्रके वाटीत. एका पेटीवर उभे राहून ते बोलत. एकदा श्रोते त्यांना दगड मारावयाला लागले. तेव्हा त्यांनी छत्री उघडून आपल्या डोक्यावर धरली अन् श्रोत्यांना ते म्हणाले, " तुमचे दगड संपेपर्यंत मी असा इथे उभा राहीन ! " तेव्हा दगडफेक थांबली. मग ते म्हणाले, " कामगार बंधूंनो, गिरणी तुमची आहे. आज ना उद्या तुम्हां कामगारांचे राज्य होईल ! " कामगारांना ते खरे वाटेना. पण डांगे ह्यांनी पत्रके वाटल्यानंतर ती वाचून त्यांचा त्या गोष्टीवर विश्वास बसला. भायखळ्याला एक खाचर असे. तेथेही त्यांच्या सभा भरत. गिरण्यांतल्या कारकुनांकडून संपाची पत्रके ते कामगारांना वाटीत. पण कारकून दोन्ही बाजूंकडून पैसे खायचे म्हणून डांगे त्यांच्यावर कधीही विश्वास ठेवीत नसत.

१९२८ साली मुंबई शहरात गिरणी कामगारांचा जो सर्वांत मोठा संप झाला त्यांचे नेतृत्व डांगे ह्यांच्याकडे होते. फार मोठ्या अग्निदिव्यातून त्या वेळी त्यांना जावे लागले. पण त्यामुळे वयाच्या अवघ्या एकोणतिसाव्या वर्षी लढाऊ कामगार पुढारी म्हणून त्यांचे नाव सबंध जगभर झाले. हा संप १६ एप्रिल १९२८ ला सुरू झाला आणि ६ ऑक्टोबर १९२८ रोजी तो मागे घेण्यात आला. ह्या संपकाळात आणि त्यानंतर डांगे ह्यांच्यावर नाना तऱ्हेची प्राणघातक संकटे आली. २३ एप्रिल १९२८ रोजी पोलिसांच्या गोळीबारात परशुराम जाधव हा कामगार मारला गेला. ११ डिसेंबर १९२८ रोजी ' सासून मिल ' मध्ये गडबड आहे असा खोटा फोन करून त्यांना बोलावण्यात आले आणि गिरणीच्या जवळ येताच त्यांच्यावर आणि निमकर यांच्यावर दहा पंधरा मवाल्यांनी हल्ला केला. त्या मवाल्यांचे नेतृत्व दादा बोरकर ह्यांच्याकडे होते. कासले–निमकर ह्या हल्ल्यात जखमी झाले तेव्हा दहा हजार कामगार चिडून दादा बोरकरांच्या घरावर चालून गेले आणि त्यांचे घर जाळून भस्मसात केले. लालबागच्या रस्त्यावरून ही मिरवणूक

परत येत असताना अग्रभागी असलेला लाल झेंडा हिसकावून घेण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. त्याचे पर्यवसान दंग्यात झाले. पोलिसांनी गोळीबार केला. त्यात चार कामगार मारले गेले आणि अठरा जखमी झाले. त्यानंतर काही दिवसांनी त्याच गुंडांनी डांगे ह्यांच्यावर ऑफिसात येऊन खुनी हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. पण डांगे तेथून शिताफीने निसटले म्हणूनच वाचले. त्यानंतर २८ डिसेंबर १९२८ रोजी ' पर्ल मिल ' मध्ये दावर नावाचा एक असिस्टंट वीव्हिंग मास्टर होता. त्याचा भर दुपारी दोन वाजता गिरणीत खून झाला. डांगे हे काही कामासाठी त्याच वेळी तेथे आले होते. म्हणून खुनी पापामियाकडून डांगे ह्यांचे नाव त्या खुनाच्या प्रकरणात गुंतवण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. पण पापामियांनी डांगे ह्यांचे नाव घेण्याचे साफ नाकारले म्हणून डांगे बचावले.

डांगे ह्यांची अनेक वर्षे तुरुंगात गेल्यामुळे तेथल्या अनेक गंमतीदार हकीगती ते रसभरीत रीतीने सांगतात. कानपूर कटाच्या खटल्यात त्यांना चार वर्षांची शिक्षा झाली. तेव्हा कैदेत त्यांच्या गळ्यात अन् पायांत लोखंडी तोडा अडकविण्यात आला. त्याच्या अनन्वित यातना त्यांनी बिनतक्रार सहन केल्या. तुरुंगात गेल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांची आणि शिपायांची मने आपल्याकडे कशी वेधून घ्यावीत ह्याची विलक्षण हातोटी त्यांना साधली होती. कुठे कोणा शिपायाचे भविष्य सांग, कुठे जेलरचे हिशेब लिहून दे अशा रीतीने ते सर्वांना खूष करीत. कानपूरच्या जेलमधे वैद्यकीय खात्यात साहाय्यकाचे काम त्यांनी मिळविले. तेथे वैद्यकशास्त्र, प्राणिशास्त्र आणि शरीरशास्त्र ह्या शास्त्रांचा त्यांनी अभ्यास केला. पुढे पुढे इंजेक्शने देण्याचे काम त्यांच्याकडे आले. कानपूरच्या तुरुंगात आपल्याला चार वर्षे दूध प्यायला मिळाले नाही. त्याचा अनिष्ट परिणाम आपल्या दातांवर झाला, असे डांगे सांगतात. मीरत कटाचा खटला, ही आयुष्यात त्यांच्यावर आलेली सर्वांत मोठी आपत्ती. त्यात त्यांना बारा वर्षांची शिक्षा झाली, पण त्यातली सात वर्षेच शिक्षा त्यांना भोगावी लागली.

ह्या खटल्यात त्यांनी जे बचावाचे इंग्रजी भाषण केले, त्याचा डेमी आकाराच्या पाचशे साठ पानांचा प्रचंड ग्रंथच झाला. डांगे ह्यांनी तो ग्रंथ मला वाचावयाला दिला. तो वाचून मी थक्कच झालो. तो लिहिण्यासाठी विलायतेमधून एक हजार पुस्तके डांगे ह्यांनी तुरुंगात मागवून घेतली. वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षी साम्यवादाच्या तत्त्वज्ञानावर आणि इतिहासावर डांगे ह्यांचे केवढे जबरदस्त प्रभुत्व होते हे त्या ग्रंथावरून दिसून येते. त्याखेरीज तुरुंगात असताना एक

हजार पानांचा ‘ समाजवादी क्रांतीचा इतिहास ’ त्यांनी लिहिला होता, पण या मूळ हस्तलिखितांच्या वह्या गहाळ झाल्या. ह्या खटल्यातल्या सर्व आरोपींना ठणठणीत शिक्षा झाल्या. त्या ऐकून बहुतेक सर्वजण हादरून गेले. तुरुंगात परत येताच झोपेचे सोंग घेऊन सारे पडले. पण डांगे कसले मिष्किल! त्यांनी सर्वांना उठवले आणि चहा पाजून त्यांची कळी खुलवली. अपिलात डांगे ह्यांचे सारे सहकारी सुटले आणि एकटे डांगे तेवढे मागे उरले. ‘ त्या वेळी माझ्या मनाची काय स्थिती झाली असेल ह्याची तुम्हीच कल्पना करा! ’ डांगे मला म्हणाले.

डांगे ह्यांचा सारा जन्म राजकारणात गेला असला तरी त्यांना वाङ्मयाची— अर्थात् पुरोगामी वाङ्मयाची फार आवड आहे. मराठी भाषेत शेतकरी जीवनावर एकही कादंबरी नसावी ह्याचे त्यांना फार वैषम्य वाटते. पुरोगामी वाङ्मयावर एकदा त्यांचे आणि प्रा. फडके ह्यांचे खाजगी बोलणे झाले. तेव्हा प्रा. फडके म्हणाले, “ तुम्ही म्हणता तसले पुरोगामी वाङ्मय रवींद्रनाथ टागोर ह्यांनी कुठे लिहिले आहे ? ” तेव्हा डांगे ह्यांनी टागोरांच्या ‘ ताशेर देश ’ आणि ‘ अचलायतन ’ ह्या दोन राजकीय नाटकांची नावे सांगून त्यांना निरुत्तर केले. सानेगुरुजींशी डांगे ह्यांचा स्नेह होता, आणि त्यांच्या वाङ्मयाबद्दल त्यांना फार आदर आहे. धुळ्याच्या गिरणीत चौपन्न माणसे काढली म्हणून गुरुजींनी प्राणांतिक उपोषण आरंभले. तेव्हा त्या संकटातून त्यांना डांगे ह्यांनी वाचविले. त्या वेळी विनोबांनी गुरुजींना लिहिले की, “ तुम्ही कम्युनिस्टांच्या नादी लागून हिंसावादी होत चालला आहात. ” गुरुजींना त्याचा राग आला. विनोबांनी त्यांना वर्ध्याला भेटावयाला बोलावले होते, पण गुरुजी गेले नाहीत. त्यांनी विनोबांना पत्र लिहून कळविले की, “ तुमचा संशय खोटा आहे. ”

तुरुंगात असताना गुरुजींविषयी आम्ही पुष्कळ बोलत असू. त्यांच्या मृत्यूची शोककथा जेव्हा मी त्यांना सांगितली तेव्हा डांगे म्हणाले, “ गुरुजी हे जनताजीवी पुरुष होते, त्यांची सर्व प्रेरणा जनतेची होती. जनतेपासून ते जेव्हा वियुक्त होत, तेव्हा त्यांना औदासीन्याचा झटका येई. त्यांच्या मृत्यूपूर्वीच्या मनःस्थितीत माझी आणि त्यांची भेट झाली असती, तर मी कदाचित त्यांना वाचवू शकलो असतो. ”

डांगे ह्यांच्या वक्तृत्वाच्या अनेक चमत्कारांची हकीकत ओघाओघाने त्यांच्याकडून समजली; मीरत कटाच्या खटल्यात बचावाचे जे भाषण त्यांनी केले त्याचा शेवट करताना त्यांनी ज्यूरीवर असा काही हल्ला चढवला म्हणता,

'Gentleman of the Bourgeoise' अशा संबोधनांनी त्यांनी प्रारंभ केला आणि 'Our parentage is more ancient and noble than the degenerate historious of the bougreoise think!' असा शेवट केला. ज्यूरीचे लोक अक्षरशः तोंडे वासून त्यांच्याकडे टकमका बघू लागले. अमळनेरच्या संपाच्या वेळी मोरारजींच्या पोलिसांनी गोळीबार करून नऊ कामगार ठार मारले, तेव्हा मुंबई असेंब्लीत त्यांनी अतिशय प्रभावी भाषण करून शेवटी मोरारजींना त्यांच्या तोंडावर सांगितले की, 'hang men also die!' १९४६ च्या औद्योगिक संबंधाच्या बिलावर त्यांनी असेंब्लीमध्ये सात तास अखंड भाषण करून अभूतपूर्व विक्रम केला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात तर मोठमोठ्या सभांतून त्यांनी भाषणे केली. ती वक्तृत्व गुणाच्या दृष्टीने आदर्श होत.

डांगे ह्यांच्या संगतीत ठाण्याच्या तुरुंगात दोन महिने बोल बोल म्हणता कसे निघून गेले ते समजलेच नाही. त्या काळात 'एक एप्रिल' आला. त्या दिवशी आमच्या एका स्थानबद्ध सहकाऱ्याच्या सुटकेचा बेमालूम सरकारी हुकूम तयार करून त्यांनी त्याला तास दोन तास असे काही बनविले की, त्याची आठवण झाली की अजून हसू कोसळते. डांगे ह्यांच्या आधी आम्हा सर्वांची सुटका झाली तेव्हा त्यांना तुरुंगात एकटे सोडून जाताना आमच्या जिवावर आले. पण डांगे अगदी स्थितप्रज्ञाच्या वृत्तीने म्हणाले, 'हा अनुभव मला काही नवा नाही!' असामान्य बुद्धिमत्ता, लोकोत्तर चारित्र्य, अमर्याद तपश्चर्या आणि उदंड मानवता ह्यांचा अपूर्व संगम कॉ. डांगे ह्यांच्या ठायी झाल्यामुळे त्यांचे नाव आज विश्वविख्यात झाले आहे. असा हा थोर पुरुष आपल्या या महाराष्ट्रात जन्माला आला ह्याबद्दल प्रत्येक मराठी माणसाला अभिमान वाटला पाहिजे!

नवयुग : १८-१०-१९५९

३४

# महाराष्ट्राचा माळकरी मार्क्सवादी

क्रांतिसिंह नाना पाटील ह्यांचे चरित्र मोठे अद्‌भुतरम्य आहे. एका सज्जन, कुलीन आणि भाविक मराठा कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडील, आजोबा आणि पणजोबा हे वारकरी पंथाचे. दर महिन्याला पंढरीची वारी करावयाचे. तेव्हा जन्माला आल्यानंतर अवघ्या बाराव्या दिवशीच नानांच्या गळ्यात पंढरीची माळ पडली. लहानपणी नानांचे शिक्षणाकडे फार थोडे लक्ष. खेळणे व दांडगाया करणे एवढाच त्यांचा आवडता उद्योग होता. व्यायामाचा नि कुस्तीचाही त्यांना नाद लागला. आईवडिलांना शेतावर ते मदत करीत असत. तेवढेच त्यांना समाधान. पुढे पोथ्यापुराणांचा नि भजनपूजनाचा त्यांना नाद लागला. त्यामुळे जुन्या पौराणिक ग्रंथांचे त्यांनी पुष्कळ वाचन केले. वयाच्या अठराव्या वर्षी ते मराठी शालान्त परीक्षा पास झाले.

आता पुढे काय करायचे हा त्यांच्यापुढे प्रश्न पडला. एवढ्यात सातारा जिल्ह्यात सत्यशोधक समाजाची चळवळ सुरू झाली. ठिकठिकाणी जलसे होऊ लागले. त्या चळवळीने महाराष्ट्रातला बहुजनसमाज खडबडून जागा झाला. ह्या चळवळीचा नाना पाटलांच्या तरुण मनावर फार परिणाम झाला. त्यांनी सत्यशोधक वाङ्मयाचा अभ्यास केला आणि बहुजनसमाजातले सर्व धार्मिक विधी ते स्वतःच लावू लागले. त्याप्रमाणे पोराबाळांना शिक्षण द्या, लग्नसणात कर्ज काढून भरमसाट खर्च करू नका, सावकाराच्या घराची पायरी चढू नका, अफू, गांजा, दारू ह्या व्यसनापासून दूर राहा. ह्या सामाजिक सुधारणांचा

प्रचार ते खेडेगावातून करू लागले. जनसमुदायासमोर भाषणे करण्याची संवय एव्हापासूनच त्यांना लागली.

वीस साली कऱ्हाड तालुक्यात तलाठी म्हणून त्यांची नेमणूक झाली. पण तलाठ्याच्या कामाकडे त्यांचे लक्ष होते कुठे? कुठे सत्यशोधकी प्रचारासाठी गावगन्ना हिंड, कुठे मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीसाठी ब्राह्मणेतर पक्षाच्या उमेदवारासाठी जिवाचे रान कर, तर बाकीचा सारा वेळ गावोगाव कुस्त्यांचे फड भरीव, असे त्यांचे एकसारखे उद्योग चालू असत. एकदा तलाठ्याच्या कामात वसुलाची रक्कम दोन आठवड्यांनी उशीरा भरली, म्हणजे ती रक्कम आठवडाभर वापरली असा त्यांच्यावर अन् मुलकी पाटलावर आरोप आला. त्यात पाटलाची काही चूक नाही, सारा दोष आपलाच आहे, असा नानांनी खुलासा केला. तेव्हा त्यांच्यावर पकडवॉरंट निघाले. तेवढ्यात १९३० ची महात्मा गांधींची चळवळ सुरू झाली होती. नाना सत्यशोधकी चळवळीतून बाहेर पडले आणि महात्माजींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या सत्याग्रही चळवळीत त्यांनी उडी घेतली. एका उंच काठीला तिरंगी झेंडा लावून ते गावोगाव महात्मा गांधींचा जयजयकार करीत हिंडू लागले अन् कॉंग्रेसचा प्रचार करू लागले. सातारा जिल्ह्यातल्या गावागावातून ते अशा रीतीने लोकजागृती करू लागले. त्याबरोबर त्यांना पकडण्याचे दुसरे सरकारी वॉरंट सुटले. पण नाना पोलिसांच्या हाती पुष्कळ दिवस सापडू शकले नाहीत. एकदा त्यांची एक सभा ऐन रंगात आली होती. तेवढ्यात पोलीस सभेत शिरले. आता काय करायचे? तेवढ्यात नाना काही तरी थाप मारून सभेतून जे सटकले ते मागच्या बाजूला बांधलेल्या घोड्यावर स्वार होऊन पोलिसांच्या डोळ्यांदेखत पसार झाले. त्यानंतर शिरोडे, सावंतवाडी, बेळगाव, पंढरपूर ह्या भागात व्याख्यानांचा दौरा काढीत काढीत ते शेवटी मुंबईपर्यंत येऊन थडकले. मुंबईतले त्यांचे त्या वेळचे ते भाषण ऐकून श्रोते खूष झाले असे म्हणतात. कारण, ग्रामीण भाषणाचा असा मनोरंजक नमुना त्यांनी पूर्वी कधी पाहिला नव्हता. दोन वॉरंटे चुकवीत चुकवीत अशा तऱ्हेचे फरारीपणाचे आयुष्य कित्येक दिवस नानांनी कंठले. पुढे गांधी-आयर्विन समेट झाला. सारे लोक सुटले. पण नानांच्या वरचे वॉरंट तसेच शिल्लक राहिले. शेवटी मित्रमंडळींच्या आग्रहावरून नाना अखेर प्रकट झाले आणि तलाठी प्रकरणातल्या दोषाबद्दल त्यांना सहा महिने सक्तमजुरी आणि शंभर रुपये दंड झाला. राजकीय कैदी म्हणून तुरुंगात जाण्याऐवजी

फौजदारी गुन्ह्यात त्यांना पहिला कारागृहवास घडला, हा एक चमत्कारिक योगायोगच म्हणावयास हवा. ह्या शिक्षेतून ते बाहेर पडले, पण तोपर्यंत त्यांची पत्नी, आजी, वडील ह्यांचा एकामागून एक काळ होऊन कौटुंबिक पाशातून त्यांची जवळ जवळ मुक्तताच झाली असे म्हणायला हरकत नाही.

त्यानंतर कॉंग्रेसच्या सत्यग्रहात ते राजरोसपणे शिरले. प्रथम दोन महिने ते स्थानबद्ध झाले. पण पॅरोलवर सुटले. पुढे पॅरोल मोडल्यावरून त्यांना सहा महिन्यांची आणि शंभर रुपये दंडाची शिक्षा झाली. त्यातून सुटल्यानंतर पुन्हा कायदेभंगाबद्दल त्यांना एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली. ही शिक्षा भोगून ते बाहेर आले, तोच गांधीजींनी सामुदायिक सत्याग्रह बंद करून वय्यक्तिक सत्याग्रह सुरू केला. त्यात ते पडले. तेव्हा त्यांना सहा महिने शिक्षा आणि पन्नास रुपये दंड झाला. ही शिक्षा भोगून नाना बाहेर पडले नि अवघ्या सात दिवसांच्या आत त्यांनी युद्धविरोधी घोषणा करून दुसऱ्यांदा सत्याग्रह केला. त्यात त्यांना तीन महिने शिक्षा व पंचवीस रुपये दंड झाला. ही शिक्षा संपल्यानंतर 'दुष्काळी परिषदे'चा प्रचार करीत नाना दक्षिणेतल्या संस्थानी भागातून प्रचार करू लागले. पण कोल्हापूर संस्थानात त्यांनी पाऊल टाकले न टाकले तोच संस्थानी पोलिसांनी त्यांच्या हातापायांत दंडाबेडी अडकवली. रीतसर त्यांच्यावर खटला होऊन त्यांना एक वर्षाची शिक्षा आणि पाचशे रुपये दंड झाला.

सारांश, ९ ऑगस्ट १९४२ चा 'छोडो भारत' चा ठराव कॉंग्रेसने मंजूर करण्यापूर्वी कॉंग्रेस स्वातंत्र्याच्या चळवळीत नाना पाटलांना एकदा नाही, दोनदा नाही, चांगली आठ वेळा शिक्षा झाली होती. पुष्कळांना नाना पाटलांचे हे पूर्वचरित्र माहीत नाही. त्यांना वाटते की, बेचाळीसच्या चळवळीतच साताऱ्याला 'पत्री सरकार' स्थापन करून नाना पाटील एकदम लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ होऊन बसले. तीस सालापासून तो बेचाळीस सालापर्यंतच्या बारा वर्षांत येरवड्याच्या अनेक वाऱ्या त्यांनी केल्यामुळे त्यांची स्वातंत्र्यनिष्ठा आणि देशाभिमान चांगलाच तावून सुलाखून निघाला होता. परवाच्या एकसष्टीच्या वाढदिवसाच्या समारंभात ते म्हणाले की, "मी गळ्यात पंढरीची माळ घातली खरी, पण वाऱ्या केल्या येरवड्याच्या! ज्या देवळाला सोन्याचा कळस आहे आणि ज्याची दारे रुप्या-चांदीची आहेत, त्या पंढरपुरात माझा विठोबा राहणे शक्यच नाही. माझा विठोबा येरवड्यामधेच राहात होता अशी माझी खात्री

पटल्यामुळे त्याला भेटायला मला येरवड्यालाच पुन्हा पुन्हा वाऱ्या कराव्या लागल्या ! ”

महात्मा गांधींनी ‘ भारत छोडो ’ची घोषणा केल्यानंतर नाना पाटलांच्या जीवनातील दुसऱ्या तेजस्वी कालखंडाला प्रारंभ झाला. मात्र ह्या चळवळीत आता तुरुंगात म्हणून जायचे नाही असा त्यांनी मनाचा निर्धार केला, आणि असा निर्धार करून त्यांनी सातारा जिल्ह्यात हजार-बाराशे सहकारी जमा करून आपल्या तुफानी व्याख्यानांच्या प्रचारास सुरुवात केली. नाना पाटलांचे खरे स्वरूप आता प्रकट झाले. त्यांच्या वक्तृत्व प्रतिभेला जणू काही नवीनच बहर फुटला. त्यांच्या व्याख्यानाला हजारो लोक जमू लागले. ‘ महात्मा गांधी की जय ’ आणि ‘ करेंगे या मरेंगे ’ ह्या घोषणा करून ते आपल्या व्याख्यानाला प्रारंभ करीत. त्यांच्या भाषणाचा धबधबा तीन तीन तास अस्खलितपणे वाहत असे आणि हजारो शेतकरी बांधव त्यांच्या त्या अथांग वाग्गंगेत मनसोक्त डुंबत असत. त्यामुळे नाना पाटलांची कीर्ती वाढू लागली आणि सर्वत्र पसरू लागली. सातारा जिल्ह्यातील गावागावातून आणि दऱ्याखोऱ्यांतून नवजवान हातात भाला-कुऱ्हाडी घेऊन बाहेर पडू लागले आणि नानांच्या मोर्चात सामील होऊ लागले.

२ सप्टेंबर १९४२ रोजी तासगावच्या मामलेदार कचेरीवर पहिला मोर्चा चालून गेला. पोलीस आणि अधिकारी ह्यांनी तो सशस्त्र लोकसमुदाय पाहताच त्यांची पाचावर धारण बसली. मामलेदार सज्जन गृहस्थ होता. तो मुकाट्याने बाहेर आला, आणि त्यांनी मोर्चाच्या पुढाऱ्यांशी बोलणे केले. पुढारी मामलेदाराला म्हणाले, ‘ आम्ही मामलेदार कचेरीवर तिरंगी झेंडा लावणार. त्यानंतर तुम्ही सरकारी अधिकाऱ्यांनी गांधी टोप्या घातल्या पाहिजेत आणि राष्ट्रीय सरकारचे नोकर म्हणून यापुढे काम केले पाहिजे. ’ मामलेदारांनी ते कबूल केले. एवढेच नव्हे, तर डोक्यावर गांधी टोपी चढवून त्याने चौकात ध्वजारोपण केले. तेव्हा महात्मा गांधींच्या नावाचा जयजयकार करीत मोर्चा विजयानंदाने परत गेला. त्यामुळे नाना पाटलांच्या चळवळीला आणखीन जोर चढला. ठिकठिकाणी त्यांच्या प्रचाराच्या सभा होऊ लागल्या. पोलिसांच्या सशस्त्र तुकड्या त्यांना पकडण्यासाठी त्यांच्यामागे धावू लागल्या. पण जनतेचा नाना पाटलांना प्रचंड पाठिंबा असल्याने त्यांचा थांगपत्ता लोकांनी पोलिसांना लागू दिला नाही. वडार, रामोशी ही सर्व जमात नाना पाटलांच्या बाजूला सामील झाली, आणि पोलिसांच्या हालचालीवर टेहळणी करून त्यांच्या इत्थंभूत बातम्या नानांना

पुरवू लागली.

त्यानंतर दुसरा मोर्चा ८ सप्टेंबर १९४२ ला निघाला. या वेळेपर्यंत पोलीस चांगलेच सावध झाले होते. चार-पाच हजारांचा मोर्चा इस्लामपूरला येऊन पोहोचतो न पोहोचतो तोच त्याजवर सशस्त्र पोलिसांनी हल्ला केला. किर्लोस्कर-वाडीचे पंड्या इंजिनीयर हातात तिरंगी निशाण घेऊन अग्रभागी चालले होते. त्यांना पोलिसांनी गोळी घालून ठार मारले. त्याखेरीज आणखी एकजण ठार झाला, आणि पंधराजण जखमी झाले. तिसरा मोर्चा त्याच दिवशी वडूज येथे काढण्यात आला. त्याच्या अग्रभागी हाती तिरंगी झेंडा घेऊन परशुराम पहिलवान चालला होता. मोर्चात एकंदर हजार दीड हजार लोक होते. मोर्चा कचेरीजवळ येताच फौजदारांनी त्यांना दरडावले, ' मागे हटा ! ' मोर्चातले वीर गर्जले, ' आम्ही कचेरीवर झेंडा लावणार. त्याखेरीज मागे हटणार नाही ! ' त्याबरोबर पोलिसांनी गोळीबार सुरू केला. पहिली गोळी परशुराम पहिलवानाच्या छातीतून आरपार गेली. तो मटकन खाली बसला. तोच दुसरी गोळी त्याच्या कपाळाच्या कवटीमध्ये शिरली आणि तो धाडकन खाली पडला. पण त्याच्या हातातला तिरंगी झेंडा काही खाली पडला नाही. पोलिसांच्या गोळीबाराने सत्तर लोक जखमी झाले. कोणाच्या मांडीतून गोळ्या गेल्या होत्या तर कोणाच्या हातातून गोळ्या गेल्या होत्या.

ह्यानंतर सत्याग्रही स्वरूपाचे निःशस्त्र मोर्चे सरकारी कचेऱ्यांवर नेण्याचे धोरण नाना पाटील ह्यांनी थांबविले. कारण त्यात निष्कारण प्राणहानी होते असे त्यांना आढळून आले. त्यानंतर सरकारी राज्ययंत्र बंद पाडण्यासाठी भूमिगत चळवळीला त्यांनी प्रारंभ केला. नाना पाटील ह्यांच्या मागे आता पोलिसांचा ससेमिरा खूपच लागला. त्यांना उघडपणे जिल्ह्यातून हिंडणे फिरणे मुष्किलीचे झाले. मग कुठे पिकात दडून राहा, मळ्यात मुक्काम कर, किंवा एखाद्या खेड्यातल्या घराच्या माळ्यावर लपून बस अशा रीतीने ते पोलिसांना हुलकावण्या देऊ लागले. ह्या कामी पुष्कळदा अगदी जिवावर बेतणारी अशी अनेक संकटे त्यांच्यावर येऊन गेली. एकदा एका खेड्यात एका पाटलाच्या घराच्या आढ्यावर ते दडून बसले असता, वरचा पत्रा उन्हाने तापल्यामुळे एक भला मोठा नाग बिळातून बाहेर आला व फणा काढून त्यांच्यासमोर डोलू लागला. ओरडण्याची तर सोयच नव्हती. कारण बाहेर रस्त्यावर पोलीस पार्टी उभी होती. नानांनी मनात विचार केला की ' पोलिसांच्या हातून मरण्यापेक्षा नाग चावून मरण

आलेले बरे.' काहीही हालचाल न करता ते तसेच त्या ठिकाणी बसून राहिले. तेव्हा काही वेळाने नाग आपल्या बिळात निघून गेला.

सातारा जिल्हा हा दरोडेखोरांचा जिल्हा म्हणून फार प्रसिद्ध आहे. मध्यंतरी नाना पाटलांना वाटले की, ह्या जमातीच्या लोकांशी आपण सहकार्य करून पोलिसांना तोंड द्यावे, पण दरोडेखोर ते दरोडेखोर! त्यांना राजकीय दृष्टी कुठून असणार? ते उलट नाना पाटलांच्या नावाचा गैरफायदा घेऊन लुटालूट करू लागले. त्यामुळे काही काळ लोकांची फार फसगत झाली आणि नाना पाटलां-बद्दल कित्येक लोकांचा फार गैरसमज झाला. एका बाजूला पोलिसांचे अत्याचार आणि दुसऱ्या बाजूला दरोडेखोरांची लूटमार ह्यांच्या जात्यात सातारा जिल्ह्यातील गरीब जनता भरडून निघू लागली. तेव्हा नाना पाटलांनी ह्या दरोडेखोरांचा त्रास नष्ट करण्याचे ठरविले. जे जे दरोडेखोर होते, किंवा जे कोणी गावगुंड होते आणि जे पोलिसांना फितूर होऊन नाना पाटलांच्या बातम्या पुरवीत होते अशांना पकडून त्यांच्या तळपायावर पंधरा लाठ्यांचे तडाखे मारण्यात येत असत. याच प्रकाराला 'पत्री' मारणे असे म्हणत. ह्या शिक्षेच्या धाकाने सर्व गुंडांचे धाबे दणाणले आणि नाना पाटलांचा सर्वत्र दरारा बसला. हे कार्य करण्यासाठी नाना पाटलांनी एक 'तुफानी सेना' स्थापन केली. ह्या सेनेतले सैनिक गावोगाव जाऊन तेथील गुंडांना आणि समाजकंटकांना अशी काही दहशत बसवू लागले की, त्यामुळे सातारा जिल्ह्यातील गुंडगिरी थोड्या दिवसांच्या आत नेस्तनाबूद झाली.

आता यानंतर नाना पाटलांच्यासमोर दुसरा महत्त्वाचा प्रश्न उभा राहिला. तो असा की, ह्या गडबडीत सातारा जिल्ह्यातून इंग्रज सरकारचे अस्तित्वच जवळ जवळ नाहीसे झाले होते. तेव्हा लोकांच्या दैनंदिन रक्षणाची जबाबदारी जशी त्यांच्या अंगावर येऊन पडली त्याप्रमाणे त्यांची दैनंदिन गाऱ्हाणी दूर करणे आणि त्यांच्या सामाजिक हिताची आणि मार्गदर्शनाची कामे करणे ह्या गोष्टींची जबाबदारीही त्यांच्याच शिरावर येऊन पडली. ह्या परिस्थितीमधूनच प्रतिसरकार स्थापन करण्याची आणि ग्राम्यराज्ये सुरू करण्याची कल्पना निर्माण झाली. या ग्रामराज्याची घटना तयार करण्यात आली. ग्रामपंचायती स्थापन करण्यात आल्या. खेड्यापाड्यांतील जनतेची आपापसातील भांडणे मिटविण्यासाठी तडजोड कमिट्या स्थापन करण्यात आल्या. साक्षरता प्रचाराची मोहीम, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण, अल्प खर्चाने 'गांधी विवाह पद्धती'ने

लग्ने लावणे अशी अनेक उपयुक्त कामे ग्रामराज्यातर्फे यशस्वी रीतीने करण्यात आली. जवळ जवळ तीन वर्षे साताऱ्याच्या दक्षिण भागात नाना पाटलांच्या या प्रतिसरकारची राजवट अबाधितपणे चालली होती. जवळ जवळ चारशे गावांत ग्रामराज्ये स्थापन करण्यात आली होती. भारतीय राजकारणातील ह्या अभूतपूर्व प्रयोगाने नाना पाटील आणि त्यांचे प्रतिसरकार ह्यांची कीर्ती सर्व भारतवर्षात पसरून त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

पुढे पंचेचाळीस साली दुसरे महायुद्ध संपले. त्याबरोबर मुंबई सरकारने आपले सारे लक्ष साताऱ्यावर केंद्रीभूत केले. नाना पाटलांच्या प्रतिसरकारची बदनामी करण्यासाठी त्यांनी एक मोहीमच सुरू केली. नाना पाटील आणि त्यांचे सहकारी म्हणजे भयंकर गुंड असून ते गरीब जनतेवर अनन्वित अत्याचार करीत आहेत. कोणाचे ते खून करीत आहेत, तर कोणाचे ते हातपाय तोडीत आहेत. कोणाच्या पायांना बैलाप्रमाणे पत्र्या मारीत आहेत, सरकारी खजिने आणि आगगाड्या लुटीत आहेत. अशा एक ना दोन छप्पन्न गोष्टी मुंबई सरकार तिखटमीठ लावून सांगू लागले. ज्यांचे हातपाय तोडण्यात आले अशा काही लोकांचे फोटोदेखील सरकारने 'टाईम्स'मधे छापून प्रसिद्ध केले. एवढेच करून सरकार थांबले म्हणता की काय ? त्याने साताऱ्याच्या दक्षिण भागात एक गोरे लष्करसुद्धा पाठवून दिले. लोकांना वाटले की आता त्या ठिकाणी मोठी लढाई होणार. पण थोड्याच दिवसांत मुंबई सरकारचा हा प्रचार धादांत खोटा आणि एकतर्फी आहे असे लोकांना कळून आले. त्यानंतर काही दिवसांनी सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि काँग्रेस सरकारचे राज्य मुंबई इलाख्यात प्रस्थापित झाले. त्याबरोबर भूमिगतांना अभयदान मिळून ते जनतेपुढे भराभर प्रकट होऊ लागले.

७ मे १९४६ रोजी सातारा प्रतिसरकारचे नेताजी नाना पाटील आणि त्यांचे शेकडो पराक्रमी सहकारी मोठ्या वैभवाने एकदम प्रकट झाले. सातारा जिल्ह्यामधील जनतेला आनंदाने वेड लागायचेच काय ते बाकी राहिले. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यामधून त्यांचे विराट सत्कारसमारंभ झाले. २६ मे १९४६ रोजी मुंबई शहरात नाना पाटील आणि त्यांचे सहक्रांतिकारक ह्यांचा जो अभूतपूर्व सत्कार झाला तो ज्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिला असेल, तो ते आमरण विसरणार नाहीत. सतत चार वर्षे नाना पाटील ह्यांनी इंग्रजांच्या हातांवर तुरी दिली. एकदाही ते त्यांच्या हाती सापडले नाहीत. यामुळे नाना

पाटलांच्या नावाभोवती एवढ्या चमत्कारांचे आणि दंतकथांचे वलय तयार झाले होते की, कुठला तरी पुराणातला वा कथाकादंबऱ्यातला नायकच आपण बघतो आहोत असे लोकांना वाटू लागले. ह्या गोष्टीला आज चौदा वर्षे झाली, पण नानांच्या अपरंपार लोकप्रियतेमधला एक कणही अद्याप कमी झाला नाही.

भूमिगत अवस्थेमधून नाना पाटील जेव्हा महाराष्ट्रापुढे प्रथम प्रगट झाले, तेव्हा ताबडतोब १२ मे १९४६ रोजी नवयुगने 'सातारा जिल्हा प्रतिसरकार विशेषांक' काढून त्याच्या भूमिगत जीवनावर आणि पराक्रमावर इत्थंभूत प्रकाश टाकला. नाना पाटील ह्यांच्या अद्‌भुतरम्य चरित्राची व रोमहर्षक व्यक्तित्वाची ओळख 'नवयुग'ने प्रथमच महाराष्ट्राला करून दिली, ह्याबद्दल साहजिकच आम्हाला अभिमान वाटतो. त्या वेळेपासून नाना पाटील आणि आम्ही ह्यांच्यामध्ये जो स्नेहाचा बंध निर्माण झाला आहे तो आजतागायत कायम आहे.

१९४६ सालानंतर नाना पाटलांच्या जीवनात आमूलाग्र क्रांती झाली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कॉंग्रेसचे भांडवलशाही आणि हुकूमशाही स्वरूप जेव्हा स्पष्ट-पणे प्रकट झाले, तेव्हा ते कॉंग्रेसमधून बाहेर पडले आणि 'शेतकरी-कामगार' पक्षात शिरले. ह्या पक्षात आल्यानंतर मार्क्सवादी विचारसरणीशी त्यांचा प्रथम परिचय झाला. शेतकऱ्यांचे कल्याण हा त्यांच्या तळमळीचा एकमेव विषय होता. त्यांचा सारा जन्म शेतकऱ्यांतच गेला. शेतकऱ्यांचा उद्धार करणे हे त्यांच्या जीवनाचे एकमेव ध्येय होते. तेव्हा ह्या देशात साम्यवाद आल्याखेरीज शेतकऱ्यांचे आणि कामगारांचे कल्याण होणे अशक्य आहे ही गोष्ट जेव्हा त्यांना उमगली, तेव्हा ते १९५३ साली, सरळ 'कम्युनिस्ट पक्षा'त दाखल झाले. आज कम्युनिस्ट पक्षाविषयी या देशात नाना तऱ्हेचा प्रचार करण्यात येतो आणि त्यांच्याबद्दल जनतेमधे नाना तऱ्हेचे गैरसमज निर्माण करण्यात येतात. पण नाना पाटील हे कम्युनिस्ट असूनही आणि असे तसे नाहीत पण 'कम्युनिस्ट म्हणूनच मी जगेन, आणि कम्युनिस्ट म्हणूनच मी मरेन!' अशा निर्धाराचे ते ज्वलन्त कम्युनिस्ट असूनही—कम्युनिस्ट विरोधी प्रचाराचा त्यांच्या लोकप्रियतेला यत्किंचितही उपसर्ग झालेला नाही. ह्याचे कारण, नाना पाटील हे काय आहेत हे महाराष्ट्रातील जनता उत्तम तऱ्हेने ओळखते. तेव्हा कॉंग्रेस सरकारच्या किंवा प्रजासमाजवादी पक्षाच्या बेचाळीस पिढ्या जरी खाली उतरल्या तरी ह्या महाराष्ट्रामधे नाना पाटलांविरुद्ध कोणीही गैरसमज निर्माण करू शकणार नाही

ही काळ्या दगडावरची रेघ आहे. नाना पाटील हे मराठी जनतेची अस्सल मराठमोळी भाषा बोलतात. शेतकऱ्यांच्या जीवनातल्या गोष्टी, रूपके आणि दृष्टान्त सांगून ते शेतकऱ्यांच्या काळजात हात घालतात. त्यांचा मराठी बाणा आणि महाराष्ट्रप्रेम म्हणजे बावनकशी सोने आहे !

ज्या बेचाळिसी क्रांतीचा वारसा आपल्याकडे आहे, असे प्रजासमाजवादी मोठ्या आढ्यतेने सांगतात, त्या क्रांतीचे त्यांचे त्या वेळचे तखलुपी पुढारी जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली अन् अच्युतराव पटवर्धन आज कोठे आहेत ? ' सर्वोदया 'च्या भगव्या कफन्या अंगात अडकवून आज ह्या साऱ्या पुढाऱ्यांनी राजकारणाचा संन्यास घेतला. पण बेचाळिसी क्रांतीचे एकमेव पुढारी जे क्रांतिसिंह नाना पाटील ते मात्र जनताक्रांतीच्या अग्रभागी होते तसे आजतागायत आहेत. भारत-चीनच्या सीमावादात कम्युनिस्ट हे चीनचे पक्षपाती म्हणून राष्ट्रद्रोही, अशी त्यांच्यावर टीका करण्यात आली, पण त्याबाबत नाना पाटलांची खणखणीत अन् दणदणीत भूमिका काय आहे ती पाहा ! ते म्हणाले, " महाराष्ट्राचा शेतकरी वीतभर बांधाकरिता रक्त सांडतो. दिवाणी कोर्ट करतो. वळचणीचे पाणी कसे वाहील यासाठी झगडतो. तो शेतकरी चीन आपली शीव ओलांडू पाहील तर गय करील काय ? शिवेच्या आत चीन आल्याचे नुसते जाहीर होऊ द्या. मग पक्ष असो-समिती असो-परवानगी द्या की न द्या-मी स्वतः शिवेवर झगडायला धावून जाईन ! " असा जाज्वल्य महाराष्ट्राभिमान ज्याच्या देहात धगधगतो आहे, तो कम्युनिस्ट पक्षात आहे म्हणून त्याच्याविषयी कोण गैरसमज करून घेईल ?

पंचावन्न सालापासून नाना पाटलांच्या जीवनात संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा तिसरा खंड सुरू झाला आहे. या चार वर्षांत नाना पाटलांनी आपल्या सिंह-गर्जनेने महाराष्ट्रातले गाव न् गाव हालविले आहे ! एक दिवसाची विश्रांतीसुद्धा कधी त्यांनी घेतली नाही. साऱ्या महाराष्ट्रातून झंझावाती दौरा काढून हजारो प्रचाराच्या सभा त्यांनी घेतल्या आहेत. ' मुंबईसह महाराष्ट्रराज्य ' आपण मिळवले म्हणून काँग्रेसवाल्यांनी आपले ' पटके ' कितीही आभाळात उडविले तरी त्या श्रेयात नाना पाटील ह्यांचा फार मोठा भाग आहे हे एखादा आंधळा-सुद्धा सांगू शकेल. अजूनही संयुक्त महाराष्ट्राचा लढा कुठे संपलाय ? बेळगाव-कारवारसाठी समितीने सत्याग्रहाची घोषणा केलीच आहे ! आणि सत्याग्रहाच्या आघाडीवर आपण दंड थोपटून उभे राहणार असल्याची नाना पाटलांनीही

गर्जना केली आहे ! ' समाजवादी भारतात समाजवादी महाराष्ट्र निर्माण झाल्याचे सुवर्णदृश्य माझ्या डोळ्यांनी मला पाहू द्या ! ' अशी तळमळीची इच्छा नाना पाटलांनी आपल्या एकसष्टीच्या समारंभाच्या वेळी परवा व्यक्त केली ! ह्यापेक्षा त्यांच्या महाराष्ट्रप्रेमाचा निर्वाळा अधिक तो आम्ही काय द्यायचा ? नाना पाटील हे ' माळकरी ' आहेत ह्यावरून महाराष्ट्राच्या प्राचीन परंपरेबद्दल त्यांची अथांग निष्ठा जशी व्यक्त होते, त्याप्रमाणे ते ' मार्क्सवादी ' आहेत यावरून महाराष्ट्रात समतावाद आणण्याचा त्यांचा निर्धार किती अभंग आहे हेही व्यक्त होते म्हणून अठ्ठावीस युगे विटेवर उभ्या राहिलेल्या 'समचरण' पांडुरंगाच्याच आशीर्वादाने ते या शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या महाराष्ट्रात ' समतावाद ' प्रस्थापित करू शकतील, अशी आशा करावयाला हरकत नाही. ते कार्य करण्यासाठीच त्यांना दीर्घायुष्य लाभावे ही इच्छा !

नवयुग : ७-८-१९६०

# ३५

# प्रबोधनकार ठाकरे

संयुक्त महाराष्ट्राच्या 'महाभारता'मधले एक झुंझार महारथी केशवराव ठाकरे ह्यांच्या वयाला आज पाऊणशे वर्षे पूर्ण होत आहेत. ह्या त्यांच्या अमृतमहोत्सवाच्या मंगल दिवशी मराठी जनतेकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा अभिषेक होईल ह्यात काय शंका? बावीस वर्षांपूर्वी त्यांच्या आकस्मिक मृत्यूची बनावट बातमी एका खोडसाळ माणसाने मुंबईच्या वृत्तपत्रात छापून आणली होती. त्यासंबंधी खुलासा करताना केशवरावांनी त्या वेळी म्हटले होते, 'महाराष्ट्राच्या सर्वक्षेत्रीय उत्कर्षाकांक्षेने वेडावलेला मी एक माथेफिरू मऱ्हाठा आहे. लांबलचक आयुष्याचा मी हावरा नाही. परंतु महाराष्ट्राची यावज्जन्म शक्य ती सेवा अखंड व्हावी ही मात्र इच्छा फार. माझा महाराष्ट्र माझ्या पाठीशी असो.' ह्या उद्गारांत केशवरावांच्या जीवनाचे सारसर्वस्व प्रकट झाले आहे. 'महाराष्ट्र' म्हटला की फिरलेच त्यांचे माथे. फुगल्याच त्यांच्या शिरा. आवळल्याच त्यांच्या मुठी अन् कडाडलीच त्यांची वाणी नि लेखणी. जन्मभर महाराष्ट्रावर एवढे जाज्वल्य प्रेम करणारी ज्वलंत माणसे आज थोडी आढळतील.

मराठी जनतेच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी 'शुद्ध महाराष्ट्रीय पक्ष' स्थापन करण्याची आवश्यकता त्यांनी दोन तपांपूर्वी प्रतिपादलेली आहे. त्या लेखात ते म्हणतात, 'महाराष्ट्राच्या मऱ्हाठा स्पिरिटला आवरणारा दमदार नेताच टिळकांच्या अन् शाहूमहाराजांच्या नंतर महाराष्ट्राला उरला नाही. अखिल महाराष्ट्राला आपलेपणाने पोटाशी धरून त्यांच्या नानाविध अडचणींचा आणि

आकांक्षांचा कडव्या मऱ्हाठी बाण्याने समन्वय करणारा नेता आज कोणीच नाही. मऱ्हाठ्यांची जूट फोडण्याचे प्रयत्न गेली वीस वर्षे सारखे चालू आहेत. महाराष्ट्राचा मऱ्हाठा परप्रांतीयाचा सनातन गुलाम राहावा, त्याच्या श्रमाची भाकरी ऐन घासाच्या वेळीं आपण गिळून गलेलठ्ठ घ्यावे, त्यांच्यातल्या पुढाऱ्यांचा त्यांच्याच हातून पाणउतारा करवावा आणि त्याला आपणच आपल्या दादागिरीच्या सौभाग्यासाठी निव्वळ ओझ्याचा बैल म्हणून राबवावा अशा तऱ्हेच्या कारवाया आणि कारस्थाने आज उघड्या माथ्याने चालू असूनही महाराष्ट्राचे डोळे उघडू नयेत ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे.' भारताच्या राजकारणातून महाराष्ट्राला नेस्तनाबूत करण्यासाठी देशात चाललेल्या कारस्थानांची चाहूल दोन तपांपूर्वी ठाकरे ह्यांना लागली होती, ही त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी लाथाडून द्विभाषिक राज्य महाराष्ट्रावर जबरदस्तीने लादले गेले, ही त्याच कारस्थानाची परिणती होय. म्हणून भाषिक महाराष्ट्र–राज्य निर्माण करण्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र समिती'चा जेव्हा अवतार झाला, तेव्हा 'शुद्ध महाराष्ट्रीय पक्ष' स्थापन करण्याची आपली आकांक्षा अखेर साकार झाली ह्या समाधानाने ठाकरे हे 'समिती'च्या झेंड्याखाली येऊन उभे राहिले.

ठाकरे ह्यांचे उभे आयुष्य सामाजिक आणि धार्मिक अन्यायाविरुद्ध बंडखोरी करण्यात आणि लढण्यात गेले. म्हणून त्यांच्या साठाव्या वाढदिवशी 'नवयुग'-मधे अभिनंदन करताना आम्ही त्यांचा उल्लेख 'महाराष्ट्राचे बंडखोर ब्राह्मणेतर' असा केला होता. विशेष इंग्रजी वा मराठी शिक्षण मिळाले नसतानाही लहानपणापासून धर्मशास्त्राच्या नि समाजशास्त्राच्या अभ्यासाकडे त्यांचा ओढा होता. लोकहितवादी, महात्मा फुले, आगरकर ह्यांच्या मतांचा नि विचारांचा त्यांच्या मनावर विशेष पगडा बसला. जन्मजात विषमतेने आणि भिक्षुकी वर्गाच्या वर्चस्वाने हिंदुसमाजाच्या सामर्थ्याचा ऱ्हास झालेला आहे, ही गोष्ट त्यांच्या मनास विशेष जाणवली. म्हणून ब्राह्मणेतर चळवळीत ते मोठ्या हिरीरीने दाखल झाले. 'भिक्षुकशाहीचे बंड' ह्या आपल्या ग्रंथात हिंदूंच्या सामाजिक संघटनेला विरोध करणाऱ्या भिक्षुकी संप्रदायाचा धार्मिक नाठाळपणा त्यांनी मोठ्या आवेशाने चव्हाट्यावर मांडला आहे. ब्राह्मणेतर चळवळीच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी 'प्रबोधन' पत्र काढले. सतत पाच सहा वर्षे निरनिराळ्या सामाजिक, राजकीय आणि ऐतिहासिक विषयांवर जळजळीत लेख लिहून महाराष्ट्रात त्यांनी खूप खळबळ केली आणि बहुजनसमाजाचे अक्षरशः

' प्रबोधन ' केले. ब्राह्मणेतर चळवळ ही वर्गद्वेषाची विषारी चळवळ नसून समता प्रस्थापनेची एक लोकहितवादी चळवळ आहे, अशी त्या चळवळींसंबंधी ठाकऱ्यांची शुद्ध आणि शास्त्रीय भूमिका होती. पुढे जेव्हा ह्या व्यापक समाजवादी चळवळीला विशिष्ट जातीच्या वर्चस्वप्रस्थापनेचे जातीयवादी आणि संधिसाधू स्वरूप प्राप्त होऊ लागले, तेव्हा ब्राह्मणेतर चळवळींमधून त्यांनी आपले अंग सर्वस्वी काढून घेतले.

ठाकरे ह्यांच्या बंडखोर लेखनाचे आणि स्वभावाचे स्वरूप ' भिक्षुकशाहीच्या बंडा 'त उघड होण्यापूर्वी ते ' कोदंडाच्या टणत्कारा 'त प्रथम प्रकट झाले होते. इतिहासाचार्य राजवाडे ह्यांनी आपल्या एका संशोधनात कायस्थ प्रभू ज्ञातीची बदनामी करणारी काही विधाने केली होती. त्यांचा फडशा पाडण्यासाठी ठाकरे हयांनी ' कोदंडाचा टणत्कार ' हे ज्वलज्जहाल पुस्तक लिहून महाराष्ट्रावर एक बॉंबगोळाच टाकला म्हणानात. ह्या टणत्काराने निधड्या छातीचा लढवय्या लेखक आणि प्राणघातक प्रहार करणारा टीकाकार म्हणून ठाकरे ह्यांचे नाव प्रामुख्याने महाराष्ट्रापुढे आले. त्यांच्या लढाऊ कर्तृत्वाला येथून खरा प्रारंभ झाला. वाङ्मयाच्या विविध दालनांतून ठाकरे ह्यांनी मोठ्या दिमाखाने संचार केलेला आहे. कोणाचीही भीडभाड न धरता मनात येईल ते छातीठोकपणे बोलायचे किंवा लिहावयाचे, मग जगाने काय वाटेल तो शंख केला तरी त्याची परवा करायची नाही, असा ठाकऱ्यांचा पहिल्यापासूनच खाक्या असल्याने, त्यांनी काहीही लिहिले तरी त्यामुळे खळबळ माजावयाची हे समीकरणच मुळीं ठरून गेले होते. त्यांच्या प्रत्येक शब्दावर आणि वाक्यावर त्यांच्या तडफदार, बाणेदार आणि लढाऊ व्यक्तिमत्त्वाचा ठणठणीत आणि खणखणीत ठसा उमटलेला आढळून येतो. त्यांचे जसे लिहिणे तसेच बोलणे. तमाशातले कडे जसे खणाण खणाण कडकडते, तसा त्यांच्या वक्तृत्वाला एक प्रकारचा विलक्षण नाद आहे. त्यांच्याजिभेचा पट्टा एकदा सुरू झाला म्हणजे मी मी म्हणणाऱ्या मर्दांना पळता भुई थोडी होते, आणि श्रोत्यांच्या हसता हसता मुरकुंड्या वळतात.

ठाकऱ्यांच्या ह्या लोकप्रिय व्यक्तिमत्त्वाला दुसरी एक महत्त्वाची बाजू आहे. ती म्हणजे अखंड स्वाध्यायशीलतेची. त्यांचा विविध आणि मौलिक ग्रंथसंग्रह पाहिला म्हणजे त्यांच्या त्या तपस्वी वृत्तीची साक्ष पटते. महाराष्ट्राच्या इतिहासाचा त्यांचा व्यासंग जबर असून त्यांचा ' रंगो बापूजी ' हा तेजस्वी ग्रंथ त्यांच्या अव्वल ऐतिहासिक संशोधनाचे चिरंतन स्मरण देत राहील. ऐतिहासिक

काळापासून कायस्थ मंडळींनी महाराष्ट्रात लेखणी आणि तलवार सारख्याच कौशल्याने गाजविलेली आहे. ते लिहिण्याचे नि लढण्याचे आनुवंशिक शौर्य ठाकरे ह्यांच्या अंगी एकाच वेळी उतरलेले आहे. उभ्या आयुष्यात ते कोठल्याही पंथात वा पक्षात दाखल झालेले नाहीत. उलट त्या गोष्टीचा त्यांना मनस्वी तिटकारा आहे. जेवढे जेवढे उत्कट आणि भव्य दिसेल तेवढे घ्यावे आणि तेवढेच वाखाणावे, आणि त्याला जो विरोध करील, त्याला तिथल्या तिथेच प्रत्युत्तर द्यावे हा त्यांचा बाणा आहे. त्यांच्या अंगातल्या ह्या सर्व उपजत गुणांचे उज्ज्वल स्वरूप संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात प्रकर्षाने पाहावयास मिळाले. किंबहुना लोकहितवादी, महात्मा फुले, आगरकर ह्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रातल्या बहुजनसमाजाला जागृत करण्याचे जे महान कार्य सतत दोन तपे ठाकरे ह्यांनी केले, ते संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात त्यांनी बजावलेल्या अविस्मरणीय कामगिरीने खचित सार्थकी लागले आहे. सत्तरी उलटली असतानाही शेलारमामाप्रमाणे ते साऱ्या महाराष्ट्रातून तळपत होते आणि शिवाजी पार्कवर एकसारखे गर्जत होते. महाराष्ट्रावरील त्यांच्या अपरंपार प्रेमाचा नि अथांग निष्ठेचा साक्षात्कार ह्या काळात हजारो लोकांना झाला. अशा रीतीने महाराष्ट्राच्या उद्धारासाठी सारा जन्म आपला देह चंदनाप्रमाणे झिजवणारा हा वयोवृद्ध वीर महाराष्ट्रातील तरुणांना स्फूर्ती देण्यासाठी आणि त्यांच्या स्वाभिमानाचा अंगार प्रज्वलित करण्यासाठी दीर्घायुष्मान होओ असे आम्ही इच्छितो.

मराठा : १७-९-१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वग्रंथ.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि. ........

# तिसरा विभाग

# १

## केशवसुत

आधुनिक मराठी कवितेचे जनक आणि महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीची 'तुतारी' फुंकणारे द्रष्टे कवी कृष्णाजी केशव दामले ऊर्फ 'केशवसुत' ह्यांचा जन्म १५ मार्च १८६६ रोजी रत्नागिरी जवळच्या 'मालगुंड' ह्या गावी झाला. त्याला उद्या नव्याण्णव वर्षे पुरी होत आहेत. पुढील वर्षी ह्याच तारखेला त्यांची जन्मशताब्दी साऱ्या महाराष्ट्रात साजरी होईल. ह्या आपल्या 'मालगुंड' नावाचा उल्लेख 'नैर्ऋत्येचा वारा' ह्या आपल्या काव्यात 'माल्यकूट' अशा सुंदर आणि संस्कृत नावाने केशवसुतांनी केलेला आहे. तर ज्या 'जगबुडी' नदीवर हे गाव वसलेले आहे, तिला त्यांनी त्याच काव्यात 'जगदुद्धरा' नदी करून टाकले आहे.

जन्मस्थान मदीय सुंदर असे त्या 'माल्यकूटा'तल्या
आनंदे वनदेवता मधुर जी गाने भली गाइल्या;
वेगाने 'जगदुद्धरा' नदिचिया तीराहुनी वात तो,
आशीर्वाद मदीय तातजननी यांचे मला आणतो.

आपल्या या जन्मग्रामाचे मनोहर वर्णन त्यांनी 'एक खेडे' या कवितेत

'सह्यगिरीच्या पायथ्याला सुपीक ।
रम्य खोरे कोकणामधी एक ।
नदी त्यामधुनी एक वाहताहे ।
एक खेडे तीवरी वसुनि राहे!'

असे मोठ्या तन्मयतेने केलेले आहे. कोकणामधील एका कुग्रामात जन्माला आलेल्या कवीला अगदी बालपणापासून फक्त एकच ध्यास लागून राहिला होता. तो हा की, पारतंत्र्यात पडलेला हा भारतवर्ष पुन्हा केव्हा स्वतंत्र होईल ?

मराठेशाही गेली आणि आंग्लाई आली. तेव्हा महाराष्ट्रात अनेक नवनवीन कवी उदयाला आले. तथापि, ते वामनपंडित, रघुनाथपंडित ह्या प्रगल्भ पंडितकवींच्या पारंपरिक चाकोरीतून कधीच बाहेर पडले नाहीत. देशाच्या पारतंत्र्याची जाणीव ज्यांना अत्यंत तीव्रतेने प्रथम झाली, ते महाराष्ट्राचे महाकवी केशवसुत हेच एक होत. म्हणून आपण त्यांना युगप्रवर्तक कवी असे म्हणतो. केशवसुत पुण्याच्या ' न्यू इंग्लिश स्कूल 'मध्ये विद्याभ्यासासाठी आले तेव्हा टिळक आणि आगरकर हे त्यांचे शिक्षक होते. त्यांच्या स्फूर्तिदायक शिक्षणाने आणि तेजस्वी प्रेरणेने देशसेवेचे आणि समाजसुधारणेचे ज्वलन्त विचार त्यांच्या मनामध्ये निर्माण केले हे उघडच आहे. वर्गातल्या कोणातरी शिक्षकाने त्यांना ' दुर्मुखलेला ' म्हटले तेव्हा त्याला ताडकन त्यांनी कवितेतच उत्तर दिले.

माझ्या दुर्मुखल्या मुखामधुनिया चालावयाचा पुढे,
आहे सुंदर तो सदा सरसवाङ्निष्यंद चोहीकडे,
तुम्ही नाहितरी सुतादि तुमचे धातील तो प्राशुनी,
कोणीही पुसणार नाहि कवि तो होता कसा आननी ?

शालेय वयातही आपल्या अंगी वास्तव्य करीत असलेल्या कवित्वसामर्थ्या-बद्दल केशवसुतांचा केवढा जबरदस्त आत्मविश्वास होता, हे यावरून दिसून येईल.

पुण्याला एकटे राहात असताना रात्रीच्या वेळी आपल्या कोकणातील गावाकडच्या आणि घराकडच्या गोष्टी जेव्हा ते मित्रमंडळींत बोलत असत, तेव्हा त्यांच्या डोळ्यांसमोर आपल्या कोकणातील घराचा नि तेथे निद्रिस्त झालेल्या कुटुंबातील माणसांचा चित्रपट सरकू लागे. पडवीमधे बांधलेली ती म्हैस हळूहळू रोमंथ करीत बसलेली आहे. ओसरीवरचे घड्याळ रात्रीच्या शांततेत जणू काही ' टक–टक ' असा टाळच कुटीच बसलेले आहे. तेथेच डाव्या बाजूला एका माच्यावर ' निद्रिस्त त्यावरि पिता अतिपूज्य माझा ' बघून त्यांचे हृदय भडभडून येते अन् त्यांना वाटते की, ' त्याच्या तरी पदयुगांवरि या पडूनी । न्हाणू तयास मग का वद आसवांनी ? ' आणि

तीर्थरूपांच्या उजव्या बाजूला केशवसुतांचा धाकटा भाऊ 'बापू' (सुप्रसिद्ध देशभक्त सीताराम केशव दामले) झोपलेला असतो त्याच्याबद्दल अगदी बालवयापासून केशवसुतांनी आपल्या मनात काय आकांक्षा धरल्या होत्या, त्या त्यांनी काव्यामधे व्यक्त केलेल्या आहेत. त्या वाचून आपले हृदय भरून येते.

बापू, गड्या ध्वज उभा करशील काय ?
तू देशकारण करू झटशील काय ?
बापू, जनात दिवटी धरशील काय ?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय ?

आपल्या धाकट्या बंधूने देशकारण करावे, पारतंत्र्याविरुद्ध बंडाचा झेंडा उभा करावा, स्वातंत्र्यदेवाची पूजा करावी आणि स्वातंत्र्याची मशाल हातात धरून निजलेली सारी जनता खडबडून जागी करावी असे केशवसुतांना अत्यंत उत्कटतेने वाटत होते. यावरून देशात राजकीय क्रांती घडवून आणण्यासाठी त्यांचा आत्मा कसा जळत होता आणि त्यांची आतडी कशी तुटत होती हे दिसून येते.

आपल्या वर्गातल्या मित्रांबरोबर त्यांच्या खोलीत ते अभ्यासापेक्षा राजकारणाचीच अधिक चर्चा करीत बसत असत.

देशाविषयी गोष्टी बोलत येथे
बसलो, विसरुनि कितीकदा निद्रेते
श्वासी अमुचे श्वास मिळाले तेव्हा
अश्रुमधे अश्रु गळाले तेव्हा !
तेव्हा आम्ही म्हटले, 'ही ऱ्हासाची
रजनी केव्हा जाइल विरुनी साची ?'
स्वतंत्रतेची पहाट ती येईल,
उत्कर्षाचा दिन केव्हा सुचवील ?

ती स्वतंत्रतेची पहाट आपल्या कमनशिबी डोळ्यांनी पाहण्याचे भाग्य आपल्याला कधी लाभेल काय ? किंवा ती पहाट लौकर उगवावी म्हणून आपल्या हातून काही प्रयत्न होतील काय हो ? हा एकच निदिध्यास त्या वेळी त्यांना लागून राहिला होता. त्यांच्या ध्यानी, मनी, स्वप्नी फक्त हाच एक विचार ! संध्याकाळी पश्चिमेला मावळणाऱ्या सूर्याची कांती जरी त्यांच्या दृष्टीस पडली तरी

त्यांना 'वाटे सद्यःस्थितिच अपुली मूर्त ती मन्माला !' वेलीवरची उमलणारी फुले त्यांना दिसत नसत आणि आकाशात स्वच्छंदानी गाणाऱ्या पाखरांची गाणी त्यांना ऐकू येत नसत. कारण

आम्हां डोळे नसति बघण्या पारतंत्र्यामुळे हो !
ऐकायाला श्रुतिही नसती पारतंत्र्यामुळे हो !

या पारतंत्र्याच्या दुःखद विचारामुळे त्यांच्या जीवनातला सारा आनंद नाहीसा झाला होता. पंचपक्वान्नाचे भोजन समोर पाहिले की, त्यात विष कालवले आहे असा त्यांना भास होई. रात्रंदिवस परमेश्वराला ते मनोभावे एकच प्रार्थना करीत :

देवा, केव्हा परवशपणाची निशा ही सरून
स्वातंत्र्याचा द्युमणि उदया यावयाचा फिरून
केव्हा आम्ही सुटुनि सहसा पंजरातून देवा
राष्ट्रत्वाला फिरुनि अमुचा देश येईल केव्हा ?

पारतंत्र्याच्या पिंजऱ्यातून आम्ही केव्हा सुटणार ? स्वातंत्र्याचा सूर्य या देशाच्या क्षितिजावर केव्हा उगवणार ? आणि एकराष्ट्रत्वाच्या पदावर आमचा देश पुन्हा केव्हा स्थानापन्न होणार ? असे ज्वलंत राष्ट्रवादी विचार आपल्या काव्यातून व्यक्त करणारा कोणता मराठी कवी केशवसुतांच्या आधी होऊन गेला आहे, ते सांगा !

कोकणात बोटीने जाण्याचा जेव्हा जेव्हा त्यांना प्रसंग येई तेव्हा तेव्हा समुद्राच्या त्या प्रचंड लाटा पाहून त्यांच्या मनात काय विचार येत असत ह्याची कल्पना आहे ?

" कधी कोणी राष्ट्र प्रबल दुसऱ्याला बुडविण्या ।
जहाजे मोठाली करिल जरि गे सज्ज लढण्या ।
तरी सांगोनीया प्रबर वरुणाला, खवळवू ।
समुद्रा तेणे त्या सकळ खलनौका चुथडवू ।
गुलामा आणाया निघतिल कुणी दुष्ट नर ते ।
तरी त्यांची फोडू अचुक खडकी ती गलबते ।
नरालागी त्या गे त्वरित अधमा ओढुनि करी ।
समुद्राच्या खाली दडपुनि भरू नक्रविवरी ॥ "

साम्राज्यवाद आणि गुलामगिरी यांचा या जगातून निःपात व्हावा ह्या

तळमळीने त्यांचा आत्मा किती तडफडत होता, ते या काव्यावरून दिसून येते.

स्वातंत्र्याएवढीच त्यांना सामाजिक सुधारणेबद्दल पोटतिडीक वाटत होती. आपल्या सामाजिक प्रगतीच्या मार्गात जे कोणी अडथळे उत्पन्न करतील त्यांना उचलून बाजूला फेकून दिले पाहिजे, असे ते त्वेषाने म्हणतात. आळस, लाचारी, षंढपणा, भ्याडपणा ह्यांची त्यांना मनस्वी चीड आहे. ' आपल्या नखांनी स्वतःचे हृदय फाडून आणि त्याच्या चिवट दोऱ्यांना त्वेषाचा पीळ घालून आणि वैराची गाठ मारून त्यांनी एक छानदार गोफण तयार केली. ' आणि त्या गोफणीतून ह्या सर्व दुर्गुणांवर ' कठिण शब्दाच्या धोंड्यांनी ' त्यांनी कडाडून हाणाहाण केली.

वैर तयाला, थप्पड बसता चोळिती जे गालास !
वैर तयाला, जे गरिबी शिकवितात बालांस !

केशवसुतांचा हा लढाऊ मराठी बाणा पाहून अहिंसावादी नि गांधीवादी बेशुद्धच पडतील ! ' नवा शिपाई ' या त्यांच्या कवितेत ' नव्या मनूतील, नव्या दमाचा शूर शिपाई ' कसा असावा ह्याची जी कल्पना त्यांनी मांडली आहे त्यात ' युद्धे नष्ट करून जगात शांतीचे साम्राज्य त्याने स्थापन केले पाहिजे ' ही कल्पना आजच्या आंतरराष्ट्रीय ध्येयवादाशी सर्वस्वी जुळणारी आहे. ' स्फूर्ति ' ह्या काव्यात त्यांनी ' रूढींच्या दासांविरुद्ध ' बंड उभारा आणि ' देव दानवा नरे निर्मिले ' हे लोकांना ओरडून सांगा असे स्पष्टपणे सांगितले आहे. आपल्या पद्यपंक्तीची तरफ जनता शीर्षावर टेकवून कवींनी जग उलथून टाकले पाहिजे आणि बंडाचा झेंडा उभारून आणि जिकडे तिकडे धामधूम उठवून जगातील जुल्मशाहीचे तुकडे तुकडे करून टाकले पाहिजेत हा केशवसुतांनी त्या वेळच्या कवींना आणि लेखकांना अत्यंत देदीप्यमान संदेश देऊन ठेवला आहे.

तथापि, ' तुतारी ' या एकाच प्रदीर्घ कवितेत केशवसुतांचे सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान समाविष्ट झालेले आहे. किंबहुना ' तुतारी ' ही कृष्णकवीची म्हणजे केशवसुतांची ' गीता 'च होय, अशी तेजस्वी आणि ज्वलन्त कविता मराठी भाषेत दुसरी नाही. राक्षसी रूढीच्या जुलमामुळे साऱ्या समाजाचे वाटोळे झालेले आहे. आधुनिकांचा द्वेष करणाऱ्या जुन्यापुराण्या सनातनी विचारांच्या ढेरपोट्या भिक्षुकांनी समाजाच्या प्रगतीचा प्रवाह अडवून धरलेला आहे, म्हणून केशवसुतांनी आपली ' तुतारी ' खणखणून फुंकून साऱ्या समाजाला खडसावून

बजावले आहे की,

जुने जाउ द्या मरणालागुनी
जाळुनि किंवा पुरुनि टाका
सडत न एक्या ठायी ठाका
सावध ! ऐका पुढल्या हाका,
खांद्यास चला खांदा भिडवुनी ?

सद्यःकाल हा जणू काही एक विशाल पर्वत आहे. त्यात आपल्या पराक्रमाची लेणी खोदा आणि त्यावर आपल्या नावाची काही तरी निशाणी नोंदा, हा केशवसुतांनी तरुणांना दिलेला केवढा स्फूर्तिदायक आदेश आहे बरे ? देशात संघशक्ती नाही. तिच्यात रुंद रुंद खंदक पडून त्या संघशक्तीचे शेकडो तुकडे पडले आहेत म्हणून ते बुजवण्यासाठी आपण आपले देहार्पण केले पाहिजे हे सांगताना ते आवेशाने म्हणतात :

रडतिल रडोत रांडापोरे
गतशतकांची पापे घोरे
क्षालायाला तुमची रुधिरे
पाहिजेत रे ! स्त्रैण न व्हा तर !

तुमची रांडा पोरे रडतील रडू द्या ! पण गतकाळामध्ये तुम्ही एवढी भयंकर पापे करून ठेवली आहेत की, ती धुऊन काढायला तुम्ही आपले रक्तच पाण्यासारखे वापरले पाहिजे. ह्यातच राजकीय आणि सामाजिक क्रांतीचे सारे सारसर्वस्व समाविष्ट झाले आहे.

आज समाजात सर्वत्र धर्माचे अवडंबर माजले आहे. रूढीचे जिकडे तिकडे दंभ आणि बंड पसरले आहे. म्हणून त्यावर हल्ला चढविण्यासाठी

शूरानो, या त्वरा करा रे,
समतेचा ध्वज उंच धरा रे
नीतीची द्वाही पसरा रे
आवेशाने गर्जत ‘ हर हर ! ’

ही सामाजिक आणि राजकीय समतेची आणि समाजवादाची ‘ तुतारी ’ पाऊणशे वर्षांपूर्वी केशवसुतांनी या महाराष्ट्रात फुंकून ठेवली आहे. म्हणूनच ‘ दिक्कालातुन आरपार अमुची दृष्टी पहाया शके ’ अशा सामर्थ्याचे ते महान द्रष्टे आणि युगप्रवर्तक कवी आहेत, असे मानण्यात येते. केशवसुतांच्या या पवित्र

जन्मदिवशी आम्ही श्रीशारदेच्या चरणी अशी प्रार्थना करतो की, नवकाव्याचा जो प्लेग आज महाराष्ट्रात सर्वत्र फैलावला आहे तो एकदम नष्ट होवो आणि आपल्या काव्यातून 'समतेचा ध्वज उंच धरण्याची' स्फूर्ती महाराष्ट्रातल्या सर्व विद्यमान कवींना होवो !

मराठा : १५-३-१९६५

# २

## कवींचे कवी : ‘बी’

गडकऱ्यांच्या कालखंडातले एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कवी नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ ‘बी’ (Bee) हे १९४७ च्या २९ ऑगस्टला छिंदवाडा येथे वयाच्या पंचाहत्तराव्या वर्षी निधन पावले. त्यांची सोळावी पुण्यतिथी येत्या गुरुवारी येते. वयाने ते जरी केशवसुतांचे समकालीन होते, तरी त्यांची ‘टला–ट, रीला–री। जन म्हणे काव्य करणारी’ ही ‘वेडगाणे’ नावाची अत्यंत सुंदर आणि नाद-मधुर कविता १९११ साली ‘मासिक मनोरंजना’त पहिल्याने प्रसिद्ध झाली. त्यानंतर पुढे फक्त बारा वर्षेच त्यांनी काव्यलेखन केले. एकंदर त्यांच्या पन्नासच कविता उपलब्ध नि प्रसिद्ध आहेत. एवढ्या थोड्याशा काव्याच्या भांडवलावर मराठी शारदेच्या मंदिरात अढळपद मिळविणारे तेच एकुलते एक कवी आहेत.

त्यांचा सर्व जन्म विदर्भामधे सरकारी नोकरीत गेला. एकमार्गी आयुष्यक्रम, थोडासा एकलकोंडा स्वभाव आणि प्रसिद्धिपराङ्मुख वृत्ती ह्यामुळे त्यांच्या आयुष्यात त्यांना लौकिक, कीर्ती त्या मानाने जवळ जवळ काहीच मिळाली नाही. त्यांच्या काव्याबद्दल कविमंडळींत आणि विद्वान टीकाकारांत गाढ आदर बसत असतानाही, महाराष्ट्रात त्यांचा जेवढा सन्मान नि गौरव व्हावयाला पाहिजे होता, तेवढा मुळींच झाला नाही. हयात असतानाच ते विस्मृतप्राय झाले होते, मग मृत्यूनंतर तर काय विचारावयालाच नको! पण इतर कोणीही त्यांना विसरलेले असो, व्यक्तिशः आम्ही तरी त्यांना आमरण विसरू शकणार नाही! कारण, १९३४ साली ‘फुलांची ओंजळ’ हा त्यांचा जो पहिला काव्यसंग्रह

प्रसिद्ध झाला, त्याला ‘ प्रस्तावना ’ लिहिण्याची आम्हांला संधी देऊन त्यांनी आमचा जो फार मोठा सन्मान केला, ते त्यांचे आमच्यावरचे ऋण कालत्रयीही फिटणार नाही.

‘ बी ’ कवींच्या काव्याचे सादर नि संपूर्ण रसग्रहण करणारी ही आमची पंचेचाळीस पानांची ‘ प्रस्तावना ’ मराठी वाङ्मयात अत्यंत कौतुकाने आणि आदराने उल्लेखिली जाते. ‘ बी ’ कवींच्या काव्यसंग्रहाच्या गेल्या अठ्ठावीस वर्षांत पाच आवृत्त्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यावरून त्यांच्या काव्याबद्दल सर्वसामान्य मराठी वाचकांचा आदर आणि आवड हळूहळू का होईना पण वाढत असावी, असा निष्कर्ष काढावयाला हरकत नाही. ‘ मनोरंजना ’त ‘ Bee ’ ह्या टोपण नावाने प्रसिद्ध झालेली ‘ वेडगाणे ’ ही कविता वाचून महाराष्ट्रातील रसिक वाचकांना ‘ वेड ’ लागले असे म्हणावयास हरकत नाही. ती कविता वाचून कविश्रेष्ठ रे. नारायण वामन टिळक तर इतके वेडावून गेले की, त्यांनी उत्तरादाखल ‘ To Bee ’ ही कविता ताबडतोब ‘ मनोरंजना ’त प्रसिद्ध केली आणि ‘ बी ’ कवींच्या प्रतिभेचे नि काव्यगुणांचे सहर्ष अभिनंदन केले. त्यानंतर ‘ बी ’ कवींच्या एकाहीपेक्षा एक सरस कविता ‘ मनोरंजना ’त जेव्हा प्रसिद्ध होऊ लागल्या, तेव्हा आमच्यासारखे काव्यप्रेमी तरुण वाचक त्यांजवर केवढ्या हर्षाने आणि उन्मादाने तुटून पडत होते, त्याचे स्मरण अजूनही आमच्या अंतःकरणात ताजे आहे.

‘ बी ’ कवींच्या कविता ज्या वेळी प्रसिद्ध होऊ लागल्या—तो म्हणजे मराठी कवितेच्या ऐन बहराचा काळ होता. गोविंदाग्रज, बालकवी ठोमरे, भास्करराव तांबे, नागेश, रेंदाळकर ह्यांच्यासारख्या नामवंत कवींच्या एकापेक्षाही एक सुरस आणि सुंदर कविता त्या वेळी प्रसिद्ध होत होत्या. त्यांच्या कीर्तीच्या दुंदुभींनी आणि चौघड्यांनी महाराष्ट्राचे नभोवितान निनादून गेले होते. गोविंदाग्रजांच्या नि बालकवींच्या कवितांनी तर रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकले होते. अशा बिकट चढाओढीच्या काळामधे एखाद्या कवीने प्रथमच पदार्पण करून एकदम काव्यवाचकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यावयाचे आणि आपले स्वतंत्र स्थान प्रस्थापित करावयाचे, ही काय सामान्य गोष्ट होती ? पण ते दुर्घट काम ‘ बी ’ कवींनी सहज लीलेने करून दाखविले. ह्याचे कारण ‘ बी ’ कवींचा काव्य-विषयक आणि तात्त्विक व्यासंग, चिंतन आणि तपश्चर्या जबरदस्त होती. मराठी भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. त्यांच्या भाषेची सरणी आणि

विचारांची धाटणी लक्षात घेतली, तर त्यांच्या कवितेवर संस्कृत काव्याच्या अध्ययनाचा, ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकारामादी प्राचीन संतकवींच्या परिश्रमपूर्वक केलेल्या परिशीलनाचा, तसेच ऐतिहासिक बखरींच्या नि लावण्या-पोवाड्यांचा विशेष परिणाम झालेला दिसतो. सारांश, संतांच्या नि शाहिरी काव्याचा मार्मिक अभ्यास करून ' बी ' कवींनी आपली शब्दसंपदा कमावलेली होती. त्यांच्याइतकी प्रसन्न आणि तेवढीच प्रगल्भ आणि सोज्वळ भाषा त्यांच्या पिढीतल्या तुल्यबळ कविश्रेष्ठांनासुद्धा साधली नाही.

त्यांच्या काव्यातली कोणतीही एखादी ओळ जरी घेतली तरी तिच्यात कलेची सहजता आणि भाषेचे प्रभुत्व ह्यांचा आल्हादकारक संगम झालेला आढळून येतो. केशवसुतांप्रमाणेच त्यांच्या प्रतिभेच्या जोपासनेला इंग्रजी काव्याची मदत झालेली आहे. पण काव्य करण्याची स्फूर्ती त्यांना संतकाव्यापासून मिळालेली आहे. केशवसुतांच्या काव्याचा उगम इंग्रजी काव्यामधून झालेला आहे. संतवाङ्मयाशी त्यांचे सुतराम् सख्य नव्हते. गडकऱ्यांच्या काव्यातला अलंकारिक नटवेपणा ' बीं 'च्या काव्यात आढळत नाही. त्यांची कविता प्रौढ-सुंदर आहे. चंद्रशेखर आणि लेंभे यांचे संस्कृतप्राचुर्य ' बीं 'मधे सापडणार नाही. त्यांचे काव्य क्वचित क्लिष्ट आणि दुर्बोध आहे हे खरे, पण तसे असूनही त्यांची कविता अस्सल मराठी ढंगाची नि वळणाची होती, हे कबूल करावयाला हवे. तांबे आणि बालकवी ह्यांचे काव्य सुबोध आणि नादमधुर होते, पण ' बीं 'चा अभिजात मराठमोळा त्यांच्या काव्यात दिसून येत नाही. ' बी ' कवींच्या शैलीला परंपरा आहे. घराणे आहे. सुप्रसिद्ध टीकाकार वामन नारायण देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे " बी कवींची कविता ऐटदार, धाटधार आणि वजनदार आहे. "

कोणताही कवी कितीही मोठा होऊन गेला असला आणि त्यांनी कितीही मोठी काव्यरचना केली असली, तरी त्यांची कीर्ती सर्वसामान्यपणे चारदोन कवितांवरच आधारलेली असते. जसे, शेलेचे नाव उच्चारले की, त्याची ' स्कायलार्क ' हीच कविता डोळ्यांपुढे प्रथम उभी राहते, तसे ' गोविंदाग्रज ' म्हटले की, राजहंस ' आणि ' मुरली ', बालकवी म्हटले की, ' आनंदी आनंद गडे ' आणि ' फुलराणी ', त्याप्रमाणे ' बी ' कवींचे स्मरण झाले की, ' चाफा ' आणि ' कमळा ' ह्या त्यांच्या दोन कवितांचे प्रामुख्याने स्मरण होते. ' बी ' कवींची ' चाफा ' ही कविता म्हणजे मराठी काव्याचे एक अमर भूषणच

आहे. शुद्ध प्रेमाचे ते नितांत सुंदर सूक्तच आहे. स्त्री-प्रेमविषयक कल्पनांचे असे उदात्त, विशुद्ध आणि ओजस्वी स्वरूप कोणत्याही मराठी काव्यात पाहावयास मिळणार नाही. ह्या कवितेची रचना प्रतीकात्मक असल्याने पुष्कळांना तिचा अर्थ कळत नाही. त्यामुळे ती गूढ आहे असे त्यांना वाटते. तथापि, प्रेम-मीलनास अत्यंत आतुर झालेली एक निर्व्याज नि निष्कपट भावनेची मैत्रीण गंभीरवृत्ती धारण करून मुखस्तंभाप्रमाणे बसलेल्या आपल्या जिवलग मित्राला 'चाफा' कल्पून हे गाणे म्हणत आहे ही भूमिका लक्षात घेतली, म्हणजे ह्या कवितेतील सर्व कल्पना आपोआप उलगडत जातील.

चाफा बोलेना, चाफा चालेना
चाफा खंत करी, काही केल्या फुलेना!

आता काय करायचे? तेव्हा ह्या रुसक्या 'चाफ्या'ला फुलविण्यासाठी, खुलविण्यासाठी आणि झुलविण्यासाठी त्यांच्या त्या आवडत्या सखीने त्याला आंब्याच्या बनात ओढून काय नेले, तेथे मैनांच्या गळ्यात गळा घालून त्यांनी गाणी काय म्हटली. नंतर केवड्याच्या बनात जाऊन नागांच्या बरोबर देहभान विसरून ती डोलू काय लागली. अशा रीतीने निसर्गाच्या दुनियेतील अनेक प्रक्षोभक दृश्ये दाखवून तिने त्याला चेतवण्याचा जंग जंग प्रयत्न केला, पण तो लेकाचा पडला अट्टल 'गांधीवादी.' तेव्हा निसर्गच त्याच्यावर चिडला.

सृष्टि सांगे खुणा
आम्हा मुखस्तंभ राणा,
मुळीं आवडेना। रे आवडेना.

उलट, निसर्गाच्या परिसरात आपल्या प्रियकराबरोबर शुद्ध प्रेमाच्या ज्या लीला त्याच्या सखीने निःशंकपणे चालविलेल्या होत्या, त्यामुळे तिची आर्तता अधिकच वाढली. मग ती आपल्या सवंगड्याच्या हातात हात घालून त्याच्याशी झिम्मा खेळू लागली. ती त्याला म्हणाली, "अरे बघ. आपल्या प्रेमाला हे विश्वाचे आंगणदेखील उणे पडेल. सामान्य जनाप्रमाणे आपले प्रेम कामुक थोडेच आहे? 'जन विषयाचे किडे, यांची धाव बाह्याकडे, आपण करू शुद्ध रसपान!'" त्याबरोबर 'चाफा' विरघळला. दृष्टीला दृष्टी मिळाली. गात्रे पांगळून गेली. अंगावर थरथरून रोमांच उभे राहिले आणि मग दोघेही देहभान विसरून एकमेकांना इतकी कडकडून भेटली की : 'कोण मी-चाफा? कोठे दोघेजण?' अशी एकमेकांच्या अस्तित्वाची त्यांना मुळीं जाणीवच राहिली नाही. असे

निर्मळ आणि उदात्त प्रेमकाव्य मराठी भाषेतच काय पण कोणत्याही भाषेत नसेल.

'कमळा' ही कविता तर 'बी' कवींच्या काव्यभांडारातील कोहिनूर आहे. त्यांच्या प्रतिभेचा तो एक महान चमत्कार आहे. प्रत्येक वाङ्मयात अशा कविता फारच थोड्या जन्माला येतात. जे कवी अशा अद्भुत कविता लिहितात, त्यांना पुन्हा तशा कविता क्वचितच लिहिता येतात. प्रतिभेच्या एका विशिष्ट समाधीच्या अवस्थेमध्येच अशा कवितांचा जन्म होतो. युवराज संभाजीसारख्या शूर, दिलदार पण विषयासक्त पुरुषाकडून थोरातांच्या 'पाक' कुळात जन्माला आलेल्या कमळेसारख्या अत्यंत ज्वलन्त स्वभावाच्या कुमारिकेची वंचना झाल्यामुळे, बेअब्रूचे जिणे कंठण्यापेक्षा मरण बरे अशा संतापाने तिने आत्मनाश केला, अशी ही प्रेमवंचनाची भयानक शोककथा आहे. गडावरून खालच्या दरीत उडी मारताना कमळेने आपल्या आईला जी विनवणी केली आहे की :

म्हणोत जन, पण म्हणू नको गे तू माझे आई !
'कुळबुडवी कारटी कशाला जन्माला येई ?'

ती वाचून आतड्यांना अक्षरशः पीळ पडतो. करुणरसाने आमूलाग्र ओथंबलेल्या ह्या कवितेची रचना इतकी चित्रात्मक आणि चिरेबंदी आहे की, डोळ्यांसमोर एखादा चित्रपट सरकतो आहे असे वाटते. तिच्यातली एक ओळ किंवा त्या ओळींतले एक अक्षर इकडचे तिकडे फिरविता येणार नाही. ही कविता जेव्हा 'मनोरंजन'मध्ये प्रसिद्ध झाली, तेव्हा तिच्या तेजाने साऱ्या महाराष्ट्राचे डोळे दिपून गेले. त्यात एका शब्दाचीही अतिशयोक्ती नाही. गोविंदाग्रज ह्यांच्या 'राजहंस' काव्याने महाराष्ट्राच्या काळजाला जसा हात घातला, तसा 'बी' कवींच्या 'कमळे'नेही महाराष्ट्राच्या आतड्यांना पीळ पाडला.

'बी' कवींची सर्वच कविता सोपी नाही. त्यांची कित्येक काव्ये तात्त्विक आणि आध्यात्मिक आहेत. योगाच्या नि अध्यात्माच्या क्षेत्रातही त्यांची चांगली प्रगती होती. त्यामुळे त्यांच्या कवितेमध्ये अध्यात्म विद्येतील पुष्कळशी रूपके आणि भाषासंकेत आढळून येतात. तथापि, इतके असूनही त्यांच्या विचारात कोठेही जुनाटपणा किंवा प्रतिगामिता आढळून येणार नाही. 'बी' हे वृत्तीने बंडखोर पण उत्क्रांतिवादी होते. समाजविघातक रूढींचा नि आचारांचा नायनाट होऊन समाज सामर्थ्यवान व्हावयाला पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत होते.

वृत्तीने ते आंतरराष्ट्रीय होते. त्यांना केवळ 'भारता'चे स्वातंत्र्य नको होते. जगातली सारी गुलाम राष्ट्रे स्वतंत्र झाली तर तुमच्या स्वातंत्र्याची किंमत असे त्यांचे मत होते.

ते स्वातंत्र्य खरे न, फक्त अपुली जे तोडते बंधने !
अन्यांच्या पदशृंखलांस बघते निष्कंप ऐशा मने !

जुन्या जमान्यात जन्माला आलेला हा कवी वृत्तीने आणि विचारांनी इतका ताजा आणि आधुनिक कसा ह्याचे कोणालाही आश्चर्यच वाटेल. आजकालच्या अनेक कवींना स्फूर्ती पुरविण्याइतके तेज नि चैतन्य त्यांच्या कवितेत काठोकाठ भरलेले आहे. म्हणून त्यांना आम्ही 'कवींचे कवी' म्हणतो.

'बी' कवींची नि आमची आयुष्यात एकदाच भेट झाली. १९३९ साली नागपूरला. त्या वेळी सुविख्यात कवी 'अनिल' नि काव्यरसिक र. वि. कुळकर्णी आमच्याबरोबर होते. त्या भेटीचे काढलेले एक छायाचित्र आहे. त्यांच्या मोहक संगतीत आमचे दोन तास कसे गेले हे आम्हाला समजलेच नाही. 'बी' कवी हे जसे भारताचे तसे महाराष्ट्राचे ज्वलंत अभिमानी होते.

नर-नारी रत्नांचा आकर महाराष्ट्र देश,
बल-विद्या-चापल्य-शील-शोभेचा अधिवास !

असे महाराष्ट्राचे त्यांनी वर्णन केलेले आहे. ज्याला भारताची सेवा करावयाची असेल, त्याने महाराष्ट्राचेच पूजन केले पाहिजे असे त्यांचे सांगणे आहे.

महाराष्ट्र-प्रतीकाने करा भारतपूजन !

तीस वर्षांपूर्वी आमच्या प्रस्तावनेत 'बी' कवींच्या काव्याचे आम्ही जे वर्णन केलेले आहे, त्याची पुनरुक्ती करून ह्या "'कवींच्या कवी'ला आम्ही भक्तिभावाने आज अभिवादन करतो. 'बी' कवींची कविता ही सोन्याच्या साखळ्या पायांत घालून संगमरवरी जिन्यावरून उतरणारी एखाद्या मराठा राजघराण्यातील तेजस्वी राजकन्या आहे !"

मराठा : २६-८-१९६३

# ३

# प्रतिभेचा सम्राट

राम गणेश गडकऱ्यांना जाऊन आज पन्नास वर्षे पूर्ण होतील. ही गेली पन्नास वर्षे महाराष्ट्र गडकऱ्यांचे अत्यंत भक्तिभावाने न चुकता पुण्यस्मरण करतो आहे आणि आजची पन्नासावी पुण्यतिथी तर नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या भारतात, किंबहुना साऱ्या जगात जेथे जेथे म्हणून मराठी माणूस वास्तव्य करतो आहे, तेथे तेथे श्रद्धेने, निष्ठेने आणि कृतज्ञतेने पाळली जाईल. मराठी भाषेत नि साहित्यात राम गणेश गडकरी ह्यांना जेवढी कीर्ती आणि लोकप्रियता मिळाली, तेवढी या शतकातल्या फारच थोड्या मराठी लेखकांच्या वाट्याला आली असेल. महाराष्ट्राने त्यांच्यावर जेवढे प्रेम केले आणि त्यांच्या गुणाचे जेवढे कोडकौतुक केले, तेवढे कोणत्याही मराठी लेखकाचे केलेले नाही.

जो कवी असतो, तो कदाचित नाटककारही असू शकेल, पण तो विनोदकार असू शकणार नाही; आणि जो विनोदाचा निर्माता असतो, तो नाटककार होऊ शकेल, पण उत्तम कवी असू शकणार नाही. मोलिअर नि शेक्सपीअर हे दोघेही महान नाटककार होऊन गेले. मोलिअरने हास्य निर्माण केले आणि शेक्सपीअरने काव्य निर्माण केले. पण मोलिअर हा कवी नव्हता नि शेक्सपीअर हा हास्यकार नव्हता. पण गडकऱ्यांनी मोलिअर आणि शेक्सपीअरवरसुद्धा मात केली. काव्य, नाट्य आणि विनोद ह्या परस्परविरोधी तीनही क्षेत्रांत ते सारख्याच वैभवाने आणि दिमाखाने तळपले. त्यांपैकी कोणत्याही एका क्षेत्रात जरी ते वावरले असते,

तरी त्यांनी तेवढेच यश मिळविले असते. पण साहित्यामधल्या अत्यंत बिकट म्हणून समजल्या जाणाऱ्या ह्या तीनही क्षेत्रांमधे एकाच वेळीं त्यांनी असामान्य प्रभुत्व मिळविले आणि अलौकिक यश संपादन केले! म्हणूनच त्यांच्या वाङ्मयाभोवती नि व्यक्तिमत्त्वाभोवती अद्‌भुततेचे रोमहर्षक वलय निर्माण झाले आणि त्यांच्या ओठांतून आणि बोटांतून बाहेर पडलेल्या प्रत्येक अक्षरा-अक्षराने महाराष्ट्राला अक्षरशः वेड लावले. अन् एवढा सारा दिग्विजय अवघ्या चौतीस वर्षांच्या वयात मिळवून ते निघून गेले. त्यांच्या अमर लेखनाचा नि कर्तृत्वाचा काळ अवघा सहा-सात वर्षांचा होता. १९११ पासून तो १९१८ पर्यंत! एवढ्या थोड्या काळात त्यांनी मराठी साहित्यात आपले जे क्रांतिकारक युग निर्माण केले ते अद्याप चालूच आहे. त्यांची सद्दी अजून संपली नाही. त्यांना जाऊन अर्धशतक झाले तरी त्यांची कीर्ती पहिल्याइतकीच प्रफुल्लित आणि टवटवीत आहे. किंबहुना त्यांच्या अवसानानंतर जशी जशी अधिकाधिक वर्षे लोटताहेत, तसा तसा त्यांचा लौकिक नि आकर्षण जास्त जास्तच वाढत चालले आहे.

संतकवींनंतर मराठी जनतेवर आपल्या लेखनाची नि शैलीची अशी मोहिनी घालणारा लेखक आधुनिक काळात मुळीं दुसरा झालाच नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आधुनिक मराठीचा पाया घातला. लोकमान्य टिळकांनी मराठी भाषेला सामर्थ्य दिले. वि. का. राजवाडे, शिवरामपंत परांजपे, श्रीधर व्यंकटेश केतकर, हरि नारायण आपटे, नरसिंह चिंतामण केळकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, श्रीपाद कृष्ण आणि अच्युत बळवंत कोल्हटकर ह्यांनी मराठी भाषेचे आणि साहित्याचे विशाल आणि वैभवशाली मंदिर उभारले आणि त्यावर आपल्या भाषासौंदर्याने आणि ऊर्जस्वल प्रतिभेने गडकऱ्यांनी देदीप्यमान सुवर्णकळस चढवला. आजपर्यंत मराठी भाषेत एवढे नामांकित कवी, कादंबरीकार, निबंधकार आणि नाटककार होऊन गेले असतानाही साहित्यात एक स्वतंत्र युग निर्माण करण्याचा मान फक्त गडकऱ्यांनाच मिळाला. म्हणूनच गेल्या पन्नास वर्षांत मराठी वाङ्मयात गडकऱ्यांच्याइतके अनुकरण दुसऱ्या कोणत्याही लेखकाचे झाले नाही. या कालखंडात निर्माण झालेल्या बहुतेक सर्व ललित वाङ्मयावर कमी-अधिक प्रमाणाने गडकऱ्यांच्या भाषेचा, शैलीचा नि विनोदाचा स्पष्ट ठसा उमटलेला जो आढळतो त्यातच गडकऱ्यांच्या अलौकिकत्वाचे नि अनन्यसाधारणत्वाचे रहस्य साठलेले आहे.

असे गडकऱ्यांच्या प्रतिभेत किंवा भाषेत लोकविलक्षण काय होते ? मराठी जनाला आणि मनाला लोहचुंबकासारखे आकर्षित करणारी अशी कोणती अपूर्व मोहिनी त्यांच्याजवळ होती ? त्याला अगदी थोडक्यात उत्तर द्यावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, त्यांच्या प्रतिभेची ठेवण आणि झेपच काही वेगळी होती. जे कोणाला सुचणार नाही ते त्यांना सुचे. जे कोणाला दिसणार नाही ते त्यांना दिसे. जे कोणाला बोलता येणार नाही ते ते बोलत आणि जे कोणाला लिहिता येणार नाही ते ते लिहीत. गडकऱ्यांचे सगळेच काही मुलखावेगळे होते. त्यांची भाषा वेगळी. त्यांचे विचार वेगळे. त्यांचे काव्य वेगळे नि त्यांचा विनोदही वेगळाच. त्यांच्या लेखन लालित्याचा एकंदर थाटमाट, झगझगाट आणि लखलखाट पाहून आपल्याला एखाद्या जवाहिऱ्याच्या दुकानात शिरल्यासारखे वाटते. जिकडे पाहावे तिकडे झकझक आणि लखलख आणि सारे कसे झकपक ! एका ठिकाणी जे चमकते, ते दुसऱ्या ठिकाणी दिसणार नाही, आणि दुसऱ्या ठिकाणी जे झळकते ते तिसऱ्या ठिकाणी आढळणार नाही. कुठे मालिन्य नाही, कोठे औदासीन्य नाही, कोठे वैगुण्य नाही की कोठे पौनःपुन्य नाही. सर्वत्र जिकडे तिकडे नावीन्यच नावीन्य आणि अमर्याद आणि अनावर वैलक्षण्य ! म्हणूनच गडकऱ्यांच्या शेजारी किंवा रांगेत कोणत्याही दृष्टीने त्यांच्याशी स्पर्धा करील असा एकही कवी किंवा लेखक गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रात निर्माण झाला नाही आणि पुढेही लौकर प्रकट होईल असे वाटत नाही. इतक्या पराकाष्ठेच्या स्वतंत्र प्रतिभेचा आणि अंतर्बाह्य नावीन्याने झगमगणारा लेखक केवळ मराठीतच काय पण कोणत्याही भारतीय भाषेत आजपर्यंत निर्माण झाला नाही असे आम्ही मोठ्या अभिमानाने सांगतो.

गडकऱ्यांच्या प्रतिभेचा मुळी झपाटाच वेगळा ! आजपर्यंत आपल्या पुस्तकांच्या ‘ अर्पणपत्रिका ’ पुष्कळ लेखकांनी लिहिल्या असतील. पण शिवछत्रपतींच्या चितेत आत्मार्पण करणाऱ्या त्यांच्या आवडत्या इमानी कुत्र्याला आपले ‘ राजसंन्यास ’ नाटक अर्पण करण्याची हृदयस्पर्शी कल्पना गडकऱ्यांखेरीज कोणत्या लेखकाला सुचली आहे ? त्यांच्या संकल्पित ‘ तोड–ही–माळ ’ नाटकाची अर्पणपत्रिका वाचा. “ सर्प जातीला फुलांचा वास फार आवडतो, असे पुष्कळांच्या तोंडून ऐकले आहे; म्हणून केवड्याच्या बनात दडलेल्या नागिणीची या तुटलेल्या माळेच्या फुलांनी पूजा बांधून ठेवीत आहे ! ” अशी कल्पना सुचावयाला चांगल्या चांगल्या लेखकांना दहा दहा जन्म घ्यावे लागतील. ‘ भुतांच्या

गाण्या 'तली त्यांची ही भयानक कल्पना बघा. स्मशानात भुते गाणे म्हणत आहेत आणि त्यांना साथ कोण करीत आहे? एक कुत्रे! कसे? ऐका. " श्वानहि साथ करोनी दमले। विधवेने मृत बालक त्यजिले। दूध तयाच्या मुखि सापडले। पिउनि तेवढे बघुनि कविकडे हासत पडले श्वान!" रौद्ररसाची ही परिसीमाच होय. ह्या ओळी वाचताना अंगावर काटा उभा राहतो. प्रतिभेची ही विलक्षणता जशी गडकऱ्यांच्या नाटकांत नि काव्यात दिसते, तशीच ती त्यांच्या विनोदातही आढळते. 'राजसंन्यासा 'त जिवाजी म्हणतो "वडील वारले तेव्हा त्यांची तयारी चालली होती. आमच्या मातोश्रींनी मंगळसूत्र तोडून टाकले. आमची बाळ-बुद्धीच, पण दूरदृष्टीची पोच केवढी—मंगळसूत्रातला टीचभरच दोरा-पण तो वावडीसाठी काढून ठेवला!" उलट्या काळजाचा असला मानवी स्वभावाचा नमुना सुचेल कोणाला?

'महान लेखकांच्या साहित्याची एक निश्चित कसोटी आहे. जो सुभाषिते निर्माण करतो तो अमर लेखक!' कारण, सुभाषितामुळेच भाषेला जीवन मिळते, सौंदर्य प्राप्त होते आणि तिचे स्थैर्य वाढते. सकाळी वा संध्याकाळी एखाद्या प्राजक्ताच्या झाडाखाली जसा सुगंधी फुलांचा सडा पडलेला आढळतो, त्याप्रमाणे गडकऱ्यांच्या लेखनातील पानापानावर शेकडो सुवासिक सुभाषितांची पखरण सांडलेली आढळते. 'जगण्यासारखे जोपर्यंत जवळ आहे, तोपर्यंत मरण्यात मौज आहे', 'मरणाने माणसाला मोल येते', 'लाखात एखादा हात खरा असतो', 'पाणी चंचल आहे, पण मन पाण्याहून चंचल आहे.', 'जिवाची भाषा अवघी अंगाने बडबडते.', 'रामाशी मन रमल्यावर माकडाशी मिठ्या मारण्यात काय अर्थ आहे?', 'पुरुष परमेश्वराची कीर्ती आहे, तर स्त्री ही परमेश्वराची मूर्ती आहे'. अशी एकापेक्षाही एक तेजस्वी आणि ओजस्वी सुभाषिते गडकऱ्यांनी आपल्या साहित्यात सर्वत्र उधळलेली आहेत. फुले चुरगाळून जसे त्यातून आपण अत्तर काढतो, त्याप्रमाणे मानवी जीवनातल्या कडूगोड भावनांचा नि अनुभवांचा अर्क काढून गडकऱ्यांनी तो आपल्या सुभाषितात ओतलेला आहे.

अनुप्रासाचा अलंकार मराठी भाषेवर प्रथम गडकऱ्यांनी चढवला, आणि एक नवीन कलात्मक सौंदर्य मराठी वाक्यरचनेत निर्माण केले. 'पाय मोडल्या-वर मैना कसली! गळा दाबल्यावर कोयल कसली! दात पाडल्यावर नागीण नाही! डोळे फोडल्यावर वाघीण नाही!', 'पतिव्रतांची पुण्याई पातकी पुरुषालाही परमेश्वराच्या पदवीला पोचविते आणि नरपशूला नारायणस्वरूप


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि: ...

बनविते. पतिव्रतेच्या पुण्याईपुढे पाप पांगळे पडून तिच्या पायापाशी लोळण घेते ?', 'जा, बाप भाऊ, माझे या जगात कोणी नाही. पतिव्रतेला नाती नसतात. ती बापाची मुलगी नसते, भावाची बहीण नसते, मुलाची आई नसते, देवाब्राह्मणांनी दिलेल्या नवऱ्याची ती बायको असते !' असा भाषेचा नि विचारांचा कलात्मक अन् तालबद्ध रुबाब कोणाच्या लेखनात आहे ? एका एका वाक्यात अर्थाचे ब्रह्मांड उभे करण्याचे सामर्थ्य गडकऱ्यांच्या बुद्धीत आहे. सिंधू अतिशय व्यथित मनःस्थितीत आपल्या मुलाला दूध पाजीत आहे. एवढ्यात शरद येते. तेव्हा सिंधू आपल्या मुलाला उद्देशून म्हणते, 'झाली पुन्हा दांडगाईला सुरुवात ? वन्सं, सांभाळा बाई तुमचं हे रत्न! तुमची माणसंच भारी अचपळ!" वाहवा, वाहवा, 'तुमची माणसंच भारी अचपळ!' केवळ भारतीय संस्कृतीतच निर्माण होऊ शकणारे गृहिणीच्या पतिप्रेमाचे नि पुत्रवात्सल्याचे इतके काव्यमय सूत्र निर्माण करणारा कोणता प्रतिभेचा पाणिनी या भारतात दुसरा झाला आहे ? 'लक्ष्मी अर्ध्या डावातून उठून गेली आणि हाती कवड्या राहिल्या!' असली अर्थपूर्ण नि हृदयविदारक भाषा गडकऱ्यांखेरीज दुसरे कोण लिहू शकणार ?

गडकरी हे नुसतेच भाषेचे जादूगार किंवा सूत्रधार नव्हते! तर ते उपनिषत्कारही होते. 'पुण्यप्रभावा'तले त्यांचे स्त्रीजातीवरचे उपनिषद वाचा. "मातृरूपाने तुम्हांला जन्म देणाऱ्या, पत्नीरूपाने तुमच्या जन्माची सोबतीण होणाऱ्या, कन्यारूपाने तुमच्या उदरी जन्म घेणाऱ्या, तुमच्या आयुष्यातल्या तीनही अवस्थांत तुम्हांला कोवळ्या प्रेमाची साक्ष पटवून पुत्र, पती आणि पिता या चढत्या पदवींना नेणाऱ्या स्त्रीजातीची किंमत इतकी कमी समजू नका! विश्वातल्या स्त्रीच्या प्रभावाची साक्ष जगातील प्रत्येक गोष्ट देईल! स्त्रीच्या एका दृष्टिपाताबरोबर वैराण वाळवंटावर रमणीय उद्यानाची वसती झाली आहे. स्त्रीच्या नावाच्या आधाराने नद्यांच्या खळखळाटाला वेदघोषाची पवित्रता आली आहे. स्त्रीहृदयात उचंबळणाऱ्या प्रीतीच्या पुराबरोबरच महाकवीच्या प्रतिभेचे प्रवाह वाहिले आहेत, आणि स्त्री-सौंदर्याच्या रंगछटा नुसत्या छायारूपाने रेखाटण्यासाठी कुशल चित्रकारांची कलमे आपापल्या रंगात रंगून गेली आहेत. स्त्रियांसाठी पर्वत समुद्राच्या पाठीवर नाचले आहेत आणि परमेश्वराने स्त्रियांसाठी साक्षात स्त्रीरूप घेतले आहे!"

'एकच प्याल्या'तले मद्यपानाच्या दुष्परिणामाचे त्यांचे ज्वलंत उपनिषद

वाचा. “आता या रिकाम्या प्याल्यात काय दिसतं तुला? काबाडकष्ट उपसून आलेला थकवा घालवण्यासाठी दारू पिणाऱ्या मजुरांच्या ह्या पाहा झोपड्या! निरुद्योगाचा वेळ घालविण्यासाठी म्हणून दारू पिणाऱ्या श्रीमंतांच्या या पाहा हवेल्या! प्रतिष्ठितपणाचे लक्षण म्हणून चोचल्याने दारू प्यायला शिकलेल्या पढतमूर्खांचा हा पाहा तांडा! उद्योगी गरीब, आळशी श्रीमंत, साक्षर पढतमूर्ख, निरक्षर व्यवहारी या सर्वांना सरसकट जलसमाध देणारा हा पाहा एकच प्याला! दारूबाज नवऱ्याच्या बायकांची ही पाहा पांढरी फटफटीत कपाळे, दारूबाजाच्या पोरक्या पोरांच्या उपासमारीच्या ऐका या किंकाळ्या! स्त्री-जातीला नटवण्यासाठी समुद्राच्या उदरातून जितकी मोती बाहेर निघाली, त्याच्या दसपट आसवांची मोती दारूमुळें स्त्रीजातीने या एकच प्याल्यात टाकली आहेत. जगावर अंमल चालविणारा शिकंदर दारूच्या अमलाखाली मारेकरी बनून तो पाहा आपल्या जिवलग मित्राचा खून करीत आहे! मेलेल्यांना सजीव करणारा दैत्यगुरू शुक्राचार्य तो पाहा आपल्या त्या संजीवनीसह या एकच प्याल्यात स्वतःच मरून पडलेला आहे! जगाच्या उद्धारासाठी अवतरलेल्या श्रीकृष्ण परमात्म्याचे हे पाहा छप्पन्न कोटी यादव वीर दारूच्या एकच प्याल्यात बुडून अधःपात भोगीत आहेत!” वाचक हो, सांगा अशी अमर नाट्योपनिषदे लिहिणारे कोणते कालिदास नि भवभूती गेल्या शतकात या आधुनिक भारतामध्ये निर्माण झाले आहेत? म्हणूनच महाराष्ट्र गडकऱ्यांना गेली पन्नास वर्षे डोक्यावर घेऊन नाचतो आहे.

आता ‘राजसंन्यासा’तले हे महाराष्ट्रोपनिषद वाचा “आळंदीच्या विधात्याने शेंद्रीच्या रानमाळातल्या मराठी दगडांनी देवपूजा रचिली. शिवनेरीच्या शिवशंकराने मावळच्या माकडांना अमृताला लाथाडणारे देवरूप दिले. अमृताशी आळी करणारी एकाची वाणी, तर अमृताला औषध चारणारी दुसऱ्याची करणी. ज्ञानोबाची मराठी वाणी आणि शिवबांची मराठी करणी—दिगंत उजळून दोघांनी मिळून मराठी हाकेने भूमंडळ गाजविले. आणि मराठी मोहिनीने जीवकोटीला भारून टाकले!” गडकऱ्यांची सुभाषिते, सूत्रे नि उपनिषदे गेली पन्नास वर्षे आम्ही महाराष्ट्राला सांगत आहोत. तरी त्यांच्या नावाची निशा अजून आमच्या मनातून उतरत नाही!

‘भावबंधनात’त प्रभाकर लतिकेचे वर्णन करताना तिच्या गालावरच्या तिळाला उद्देशून म्हणतो, “सौंदर्याचे हे चालतेबोलते काव्य सर्वांगपरिपूर्ण

केल्यावर काव्यरसाची सीमा झाली हे दाखविण्यासाठी विधात्याने या तिळाचा तिच्या गालावर हा जणू काही सुंदर पूर्णविरामच देऊन ठेविला आहे!" बोला वाचकहो, असले शृंगारिक काव्य तुम्ही कधी वाचले आहेत काय? जी कल्पकता शृंगारात, तीच हास्यरसात. 'खऱ्या नि खोट्या कवीमधे दोन बोटांचे अंतर असते' या एका साध्या विधानावर त्यांनी किती बहारीची कोटी केली आहे ते वाचा. ते म्हणतात, "खरा कवी स्वर्गात विहार करतो, तर खोट्या कवीला स्वर्ग दोन बोटे राहिलेला असतो." अशा रीतीने गडकऱ्यांचे सारे साहित्य–मग ते काव्य असो, विनोद असो वा नाट्य असो–मराठी भाषेचे अमर भूषण होऊन बसलेले आहे.

आतापर्यंत विविध सामर्थ्यांचे आणि प्रतिभेचे अनेक लहानमोठे लेखक महाराष्ट्रात होऊन गेले आहेत आणि यापुढेही ते होतील. पण 'नवनवोन्मेष-शाली प्रतिभे'चा असा महाकवी महाराष्ट्रात पुन्हा निर्माण होणार नाही. त्यांच्या चिंतनात, विचारात आणि लेखनात अपवित्र आणि अमंगल स्वरूपाचा एक अंशही कुठे आढळणार नाही. भारतीय संस्कृतीच्या विशुद्ध, अभिजात आणि ऊर्जस्वल परंपरेवर त्यांच्या आत्म्याचे पोषण झाले होते, म्हणून भारतीय जीवनात जे जे म्हणून काही मंगल नि ओजस्वी आहे, ते ते सर्व तुम्हांला गडकऱ्यांच्या साहित्यात आढळून येईल. काशीची गंगा आणि रामेश्वराचा सागर एकत्र आणून शिवछत्रपतींनी ज्याप्रमाणे रायगडावर 'गंगा-सागर' निर्माण केला, त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीचे पावित्र्य आणि मराठी भाषेचे सौंदर्य एकत्र आणून गडकऱ्यांनी आपला साहित्यसागर मराठी भाषेत निर्माण केलेला आहे. म्हणून शब्दसृष्टीच्या या ईश्वराला, कल्पनेच्या या कोट्याधीश कुबेराला आणि कंठात देदीप्यमान विचारांची 'वाग्वैजयंती' घालून महाराष्ट्राच्या हृदयसिंहा-सनावर अर्धशतक आरूढ होऊन बसलेल्या प्रतिभेच्या या सम्राटाला त्याच्या पन्नासाव्या पुण्यतिथीच्या प्रसंगी साऱ्या मराठी जनतेच्या वतीने आम्ही अनन्य-भावाने साष्टांग प्रणिपात करतो.

मराठा : २४-१-१९६९

४

# आठवतात तेवढे गडकरी !

ह्या गेल्या पन्नास वर्षांत गडकऱ्यांवर मी महाराष्ट्रात कुठे कुठे अन् किती किती बोललो आहे अन् किती किती लिहिले आहे त्याची आता मोजदाद-देखील करणे कठीण आहे. त्यांच्याबद्दल नवीन सांगण्यासारखे किंवा लिहिण्या-सारखे आता काहीच उरले नाही.

कारण होते नव्हते ते सगळे सांगून सवरून झाले आहे. तरी पण ते पुन्हा पुन्हा सांगण्याचा मोह काही सुटत नाही. इतकी गडकऱ्यांची गोडी अवीट आहे. त्यांचे बोलणे काय, त्यांचा विनोद काय, त्यांचा स्वभाव काय, त्यांचे लिहिणे काय, किती किती म्हणून सांगावे—

१९११ साली मी गडकऱ्यांना प्रथम पाहिले. त्या वर्षी पुणे शहरात प्लेग होता. म्हणून आम्ही गावाबाहेर एरंडवणे येथील झोपड्यांमध्ये राहावयाला गेलो होतो. त्या वेळी मी भावे स्कूलमधे इंग्रजी चौथीत शिकत होतो. ज्या झोपडीत मी अभ्यासाला बसे तिच्या नेमक्या मागल्या बाजूस असलेल्या झोपडीत एक खानावळ होती. तिच्यात पाच-सहा माणसे जेवायला येत. त्या खानावळीतल्या स्वयंपाकाचा नि वर्दळीचा आम्हाला भारी त्रास होत असे. विशेषतः तेथे एक माणूस जेवायला येत असे. तो आला की खड्या स्वरात त्याच्या तोंडाची जी टकळी सुरू होई की, एक तासभर ती अखंड चाले. पट्टीचा बडबड्या होता तो. मग कसला आला आहे अभ्यास न् काय ? मी पुस्तके बाजूला ठेवून त्यांची बडबड ऐकत बसे. त्यांचे ते भरघोस बोलणे

एकून त्यांच्या आजूबाजूचे भोजनभक्त हसत. पण मला काही हसू येत नसे. आली तर मला त्याची चीडच येई. एकदा मासिक मनोरंजनातल्या एका गोष्टी-संबंधी त्यांचे तिकडे बोलणे चालले होते. पण तिचे नाव काही त्याला आठवेना. मी ती गोष्ट वाचली होती. म्हणून मी माझ्या खोलीतूनच बसल्या बसल्या ओरडलो, "त्या गोष्टीचे नाव 'दंडधारी'". जेवण संपल्यानंतर तो बडबड्या माणूस माझ्या खोलीच्या दाराशी आला आणि माझे कौतुक करून चालता झाला.

त्या वेळीं मी गडकऱ्यांना प्रथम पाहिले. पाणीदार डोळे, साधारण चपटे नि अपरे नाक, अन् मोठ्या मिश्या ह्यांमुळे त्यांना पाहून मला क्षणभर भीतीच वाटली. मध्यम उंचीचे नि बांध्याचे, साधारण उजळ रंगाचे नि डोक्यावर आखूड केस, कमरेला पुढे सोगा सोडलेले धोतर नि अंगात आखूड बाह्यांची पातळ कोपरी असा त्यांचा त्या वेळीं अवतार होता. अर्थात त्यांचे नाव गडकरी होते हे काही मला त्या वेळीं ठाऊक नव्हते. मी त्यांना ते कसे विचारू ?

पुढे चार-आठ दिवसांनी आमच्या शेजारच्या झोपडीतले एक लहान मूल विलक्षण रीतीने मेले. सकाळीं बिछाने काढताना त्याच्या आईने मुलासकटच गादी गुंडाळून ठेवली. जेवायच्या वेळीं बापाला मुलाची आठवण झाली. मग शोधाशोध सुरू झाली. शेवटी बिछान्यात मेलेल्या स्थितीत ते मूल आईला आढळून आले. मग त्यांच्या शोकाला पारावार राहिला नाही. सारी झोपडीकर मंडळीं धावत आली. त्यात तो मिशाळ बडबड्या माणूस अग्रभागी होता. त्याच्या संतापाला सीमाच उरली नाही. तथापि, त्याच्या डोळ्यांतून एकसारखे पाणी वाहात होते. त्यामुळे मी त्या माणसाच्या चेहऱ्याकडेच पाहात राहिलो. त्याच्याबद्दल मला काही तरी विलक्षण आकर्षण वाटू लागले. (या अपघाताचा उल्लेख स्वयंपाकघराच्या गोष्टीमध्ये पुढे गडकऱ्यांनी केलेला मला आढळला.)

आमच्या कॅंपसमोर कायस्थप्रभू मंडळींचा निराळा कॅंप होता. तेथे कोणी तरी एक वृद्ध गृहस्थ वारले. तेव्हा इकडच्या कॅंपातली आम्ही काही मुले सहज तिकडे गेलो. पाहतो तो मृताची शेवटची बांधाबांधी चालली होती, आणि त्या मंडळींत डोक्याला टापशी बांधून आमचा तो मिशाळ बडबड्या प्राणी भलत्याच वेगाने नि उत्साहाने वावरत होता. त्याला पाहून मी थक्कच झालो. 'अरेच्या ! हेही काम हा करतो वाटते ?' मी स्वतःशीच पुटपुटलो.

त्यानंतर काही दिवसांनी सी. के. पी. मंडळींचे संमेलन त्यांच्या कॅंपमधे

भरले होते. मला पहिल्यापासून सभा-संमेलने-समारंभाचे भारी आकर्षण. मी त्या संमेलनात मागल्या बाजूला एका खुर्चीवर आमंत्रितासारखा जाऊन बसलो. स्वागतपर पद्यांचे कागद वाटण्यात आले. एक का दोन पदे होती त्यात. अन् त्यांच्या खाली ‘ राम गणेश गडकरी ’ असे नाव होते. मी त्या वयात कविता करू लागलो होतो, म्हणून कवीच्या नावाचे मला साहजिकच आकर्षण वाटत होते. मी कोणाला तरी विचारले ‘ हे गडकरी कोण ? ’ तेव्हा त्याने व्यासपीठाशेजारी उभ्या असलेल्या एका माणसाकडे बोट दाखविले—डोक्याला बंगलोरी काळी टोपी आणि अंगात आखूड कोट घालून फाजील नम्रतेने उभा असलेला तो माणूस दुसरा तिसरा कोणी नसून माझ्या पूर्वपरिचयाचा तोच तो बडबड्या मिशाळ प्राणी होता ! त्याला पाहून मी अक्षरशः हबकलोच ! “ कमाल आहे ! ” मी स्वतःशी बोललो, “ हा खाणावळीत जेवतो, मेलेले मूल पाहून रागावतो नि रडतो, ताटीवर प्रेते बांधतो नि लेकाचा पुन्हा कविताही पण करतो ! ”

प्लेग संपला. कॅम्प उठला. माणसांची पांगापांग झाली. अन् त्यानंतर दोन-तीन वर्षे गडकऱ्यांना मी पाहिले नाही किंवा त्यांचे नावही पण ऐकले नाही. तथापि, ‘ मासिक मनोरंजना ’त मी ‘ गोविंदाग्रजां ’च्या कविता नि बाळकरामाचे विनोदी लेख नियमितपणे वाचीत होतो. त्यांच्यावर मी बेहद्द खूष होतो. पण ‘ गोविंदाग्रज ’ किंवा ‘ बाळकराम ’ म्हणजेच गडकरी हे मला कसे ठाऊक असणार ? ‘ राजहंस माझा निजला ’ ह्या गोविंदाग्रजांच्या कवितेने सारा महाराष्ट्र हादरला ! मी तर ती कविता तोंडपाठ करून टाकली नि माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक मित्राला ओक्साबोक्सी रडून अंगविक्षेपासह ती कविता मी म्हणून दाखवू लागलो. भालचंद्र वामन ऊर्फ भाक्यामामा धडफळे नावाचे आमचे एक आप्तसदृश मित्र होते. ते नेहमी आमच्याकडे येत. मला कवितेचे वेड आहे नि मी कविता करतो हे त्यांना माहीत होते. एक दिवस ते आमच्याकडे आले असताना ‘ राजहंस माझा निजला ’ ही कविता मी त्यांना पूर्वोक्त पद्धतीने म्हणून दाखविली. तेव्हा ते म्हणाले, “ थांब, एक दिवस तुझी न् गडकऱ्यांची मी ओळखच करून देतो ! ” मी श्वास रोधून ओरडलो, “ गडकरी ! गडकरी कोण ? त्यांचा इथे काय संबंध ! ” भाक्यामामा हसून म्हणाले, “ अरे, ही कविता रचणारे ‘ गोविंदाग्रज ’ म्हणजेच राम गणेश गडकरी. ते माझ्या घराशेजारी राहतात ! ” ते ऐकून मी सपशेल कोलमडलोच—गडबडा लोळायचेच काय ते बाकी ठेवले ! पुन्हा इतक्या वर्षांनी तो मिशाळ बडबड्या प्राणी माझ्या आयुष्यात ‘ गोविंदाग्रज ’



अनुक्रम.................. दि: ..................

नाव घेऊन प्रकट झाला !

त्यानंतर थोड्याच दिवसांनी मी ' राक्षसी महत्त्वाकांक्षा ' नाटक पाहावयाला ' किर्लोस्कर नाटकगृहात ' गेलो होतो. कोठल्या तरी अंकाच्या सुट्टीत मी नाटक-गृहाच्या प्रवेशद्वाराशेजारील जोगळेकरांच्या हॉटेलात चहा घेत असता धडफळे आणि गडकरी चहा घेण्यासाठी म्हणून तेथे आले. मला पाहताच धडफळे ह्यांनी तात्रडतोब माझा हात पकडून मला गडकऱ्यांपुढे उभे केले आणि माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. मी त्यांना पाच मिनिटांच्या आत एरंडवणा प्लेग कॅंपातल्या जुन्या आठवणी भरभर सांगून टाकल्या. माझी तल्लख स्मरण-शक्ती बघून गडकरी माझ्यावर बेहद्द खूष झाले. दुसऱ्या दिवशी दुपारी आपल्या कविता घेऊन मला घरी यावयाला त्यांनी सांगितले. त्या वेळी मी मॅट्रिक पास होऊन नुकताच फर्ग्युसन कॉलेजात गेलो होतो. दुसऱ्या दिवशी मी पायी लकडी पुलाजवळून कॉलेजकडे जात असताना टांग्यात बसून तेही तिकडेच जात होते. मला पाहताच त्यांनी टांगा थांबवला नि दुपारी दीडच्या सुमारास घरी यावयाला सांगितले. मग मी कसला कॉलेजात जातो आहे ? अर्ध्या वाटेवरूनच घरी परतलो.

कसबा पेठेतील नदीकाठी असलेल्या सरदार पुरंदऱ्यांच्या जुन्या कोटामधे मी राहात होतो. तेथून दहा मिनिटांच्या रस्त्यावर गडकऱ्यांचे घर होते. त्यांचा घर नंबर होता ' १२६ कसबा. ' गडकऱ्यांचे हे घर म्हणजे एक अद्भुत इमला होता. त्याला तीन मजले होते आणि चारी बाजूंनी ते मोकळे होते. वर जायला रस्त्याच्या बाजूकडून मधोमध एक जिना होता. तो इतका अरुंद होता की केवळ महंमदअल्ली जीनासारखा हाडकुळा माणूसच त्या जिन्याने वर जाऊ शकेल. दुसऱ्या मजल्यावर गडकऱ्यांचे बिऱ्हाड म्हणजे आई ( ' मा ' ) आणि धाकटे बंधू ( मंजू ) राहात असत, आणि तिसऱ्या मजल्यावर केवळ गडकऱ्यांची बैठक असे. घरासमोर रस्त्याच्या पलिकडे मुंजाबाचा पार होता आणि त्या पारावर उगवलेल्या उंच पिंपळाच्या फांद्या घराच्या तिसऱ्या मजल्याच्या खिडकी-पर्यंत जेथे गडकरी बसत असत—आलेल्या होत्या. घराचा रंग काळा होता, आणि कसबा पेठेतील धूळ त्याच्यावर नेहमी उडत असल्याने त्याला विलक्षण औदासीन्याची कळा प्राप्त झाली होती. तळमजल्यावर जिन्याच्या बाजूला एका मारवाड्याचे वाणसौद्याचे दुकान असे.

तिसऱ्या मजल्याच्या खिडकीत गडकरी नेहमी बसलेले असत. रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्याकडे त्यांचे सारखे अवधान असे. आपल्या घरात वर जिना

चढून कोण येते आहे याबद्दल ते सदैव जागरूक असत. अगदी सलगीच्या किंवा आवडीच्या माणसांशिवाय दुसऱ्यांनी आपल्या घरात येऊन आपल्याला त्रास देऊ नये याविषयी त्यांचा फार कटाक्ष असे. नको असलेला मनुष्य खालून आपल्या रोखाने वर चालून येतो आहे असे त्यांना दिसताच ते वरून खिडकी-मधूनच एकदम ओरडत की, "आता येऊ नका तुम्ही. मी फार कामात आहे." याबाबतीत गडकरी कोणाचीही भीडमुर्वत ठेवीत नसत. भेटावयाला येणाऱ्या चांगल्या चांगल्या माणसांच्या—त्यांत महाराष्ट्रातले दोन-तीन नाणावलेले कवी होते—झटपट संभावनेचा हा प्रकार मी पुढे थोड्या दिवसांतच पाहिला—त्यामुळे त्यांच्याकडे जाताना प्रत्येक वेळी मला फारच भय वाटे. न जाणो आपलीही रवानगी खाली रस्त्यावरूनच व्हावयाची! कारण त्यांच्या नि माझ्या वयात तेरा वर्षांचे अंतर! पण तसा प्रकार मात्र माझ्या बाबतीत कधी झाला नाही!

गडकऱ्यांनी बोलावल्याप्रमाणे मी दिडाच्या सुमारास त्यांच्या घराचा जिना हलक्या पावलांनी चढू लागलो. त्याबरोबर तिसऱ्या मजल्यावरून वाघाच्या डरकाळीप्रमाणे गडकऱ्यांचा आवाज आला, "कोण आहे?" मी भीत भीत उत्तरलो "मी अत्रे!" "या वर!" वरून आज्ञा झाली. पहिला जिना संपवून मी दुसरा जिना वर चढतो आहे तोच समोर एक पत्र्याची काळी पाटी लोंबत होती. तिच्यावरची पांढरी अक्षरे 'गडकरी कामात आहेत—संध्याकाळी या!' मला भेडसावू लागली. मी थबकलो नि क्षीण स्वरात म्हणालो. "पण इथे तर ही पाटी आहे—" "काही हरकत नाही—या वर तुम्ही." वरून तो आवाज उमटला। इतक्या पहाऱ्यातून मी कसबसा जाऊन वर पोहोचलो. गडकरी आपल्या आवडत्या खिडकीशेजारी एका मळक्या वळकटीला टेकून पडले होते.

मी त्यांच्यासमोर जाऊन बसलो नि माझ्या कवितांची वही त्यांच्या हातात ठेवली. माझ्या कवितासंग्रहाचे नाव होते 'फुलबाग'. वहीचे आवरण वहीपासून अलग झाले होते. तेव्हा गडकरी हसून मला म्हणाले, "तुमच्या फुलबागेचे कुंपण तुटलेले दिसते आहे". माझ्या कविता त्यांनी चार-पाच मिनिटे चाळून पाहिल्या नि ते म्हणाले, "तुमची रचना चांगली आहे. पण जुन्या पद्धतीची आहे. तुम्ही केशवसुत, चंद्रशेखर, दत्त यांची कविता वाचली आहे काय?" मी काय बोलणार? मी ती नावेदेखील ऐकली नव्हती. मी हसून म्हणालो,

"मी तुमच्याखेरीज कोणाची कविता वाचलेली नाही." गडकरीही हसले. आधुनिक कवितेची जुजबी माहिती त्यांनी मला सांगितली. तेवढ्यात मी गडकऱ्यांच्या परिसराचे चोरट्या नजरेने निरीक्षण करून घेतले. ते बसले होते त्यांच्यापासून थोड्या अंतरावर श्रीशंकाराची नि श्रीविठ्ठलाची अशा दोन लहानशा तसबिरी शेजारी शेजारी ठेवल्या होत्या नि त्यांच्यासमोर तुकारामाच्या नि नामदेवाच्या अभंगांचे दोन गाथा होते. एका मधल्या खांबावर एका सुंदर मुलाचा फोटो होता नि त्याच्या खाली 'गा रे गा रे गाच जरा। माझ्या चिमण्या मुशाफरा' अशा काव्यपंक्ती लिहिल्या होत्या. (हा मुलगा म्हणजेच सुप्रसिद्ध कवी नि कादंबरीकार रघुनाथ वामन दिघे हे होत.) आतल्या बाजूला काचेचे एक मोठे कपाट होते. त्यात गडकऱ्यांनी इंग्रजी नि मराठी ग्रंथसंग्रह व्यवस्थितपणे लावून ठेवला होता. गडकऱ्यांनी आईला हाक मारून खालून चहा मागवून घेतला. चहा प्याल्यानंतर मी त्यांचा निरोप घेतला. त्या दिवसापासून सांज-सकाळ मी गडकऱ्यांच्या घरी जाण्याचा क्रम ठेवला.

गडकऱ्यांचा स्वभाव अत्यंत भाविक असे. परमेश्वरावर त्यांचा अढळ विश्वास होता. पुराणांतरी वर्णन केलेले परमेश्वराचे अद्भुत चमत्कार आपणास एकूण एक खरे वाटतात असे ते सांगत. पंढरीच्या पांडुरंगावर त्यांची अगदी भोळी-भाबडी भक्ती होती. संतकाव्याचे त्यांचे परिशीलन दांडगे होते. ते प्रत्येक एकादशी नियमाने पाळीत, आणि श्रीविठ्ठलाचे भक्तिपूर्वक पूजार्चन करून एक अभंग लिहीत. हे त्यांचे अभंग 'अनामिकाचे अभंग' या नावाने प्रसिद्ध झालेले आहेत. घरातून बाहेर पडताना प्रत्येक वेळी ते उशालगतच्या तसबिरींना नि घराच्या उंबरठ्याला वंदन करीत असत. त्यानंतर घरासमोरील पिंपळाच्या पारावरील मुंजाबा, पुढे कसब्याचा गणपती, नंतर कोतवाल चावडीजवळचा दत्त ह्यांना नमस्कार करावयाला ते कधी विसरत नसत. पुण्याचा ओंकारेश्वर हे त्यांचे आवडते दैवत होते. तेथे गेल्यावर घंटा वाजवायची, कान उपटायचे, गालावर चापट्या मारून घ्यायच्या नि शंकराची आरती म्हणायची हा त्यांचा कार्यक्रम अगदी ठरलेला असे.

चोवीस तास गडकरी विचारात किंवा वाचनात मग्न असत. एकसारखे त्यांच्या डोक्यात काही ना काही तरी चक्र फिरत असे. चार मित्रमंडळी जमली की त्यांच्या गप्पा सुरू होत. पण ह्या गप्पा हमखास वाङ्मयाबद्दल वा लेखनाबद्दल असत. बोलण्याचे सर्व काम अर्थात तेच स्वतः करीत. त्यांच्यापुढे इतरांना

बोलण्याची प्राज्ञाच होत नसे. त्यांनी नुसते श्रोत्यांचे काम करावयाचे. काव्य आणि विनोद ह्यांचा जिवंत झरा त्यांच्या वाणीतून सदैव खळाळत असे. विनोदाचा नि कोट्यांचा अक्षरशः पाऊस पडे. त्यांच्याएवढा आकर्षक वक्ता मी तरी माझ्या आयुष्यात दुसरा ऐकला नाही. मामुली आणि ठराविक बोलण्याची त्यांना अतिशय चीड असे. आता जे बोलले ते मग नसायचे. आज जे बोलले ते उद्या नसायचे. नावीन्य हा त्यांच्या जीवनाचा नि वाङ्मयाचा आत्माच होता जणू काही. गडकऱ्यांच्या गप्पा म्हणजे वाङ्मयाचे विद्यापीठच होते. केव्हाही जा, ते आपले उघडे असायचे. हे गप्पाष्टक चालू असताना अधूनमधून चहा पिणे, विड्या ओढणे, भेळ खाणे हा त्यांचा कार्यक्रम अहर्निश चालूच असे.

बोलण्याइतके गडकऱ्यांना वाचनाचे वेड होते. त्यांची वाचनपद्धती अतिशय बारकाव्याची होती. काय वाचावयाचे ह्याची त्यांना पूर्ण कल्पना होती. भलते-सलते वाचण्यात ते आपला वेळ कधीही दवडत नसत. पुराणे आणि ऐतिहासिक बखरी त्यांनी पूर्वी कधी वाचून ठेवल्या होत्या कोणास ठाऊक. संतवाङ्मयाचा नि लावण्या-पोवाड्यांचा त्यांचा अभ्यास चांगलाच होता. विष्णुशास्त्री चिपळूण-करांची निबंधमाला पुष्कळदा त्यांच्या हाताशीच असे. त्यांची पुष्कळ वर्षे नाटकमंडळीत गेली असल्याने बहुतेक मराठी नाटके त्यांना जवळजवळ पाठच होती. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे तर त्यांचे गुरूच. त्यांचे अक्षर अन् अक्षर त्यांना मुखोद्गत होते. किर्लोस्कर नि देवल ह्यांच्या नाटकांचाही त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला होता. संस्कृत वाङ्मयाचाही त्यांचा व्यासंग होता. तथापि इंग्रजी वाङ्मयाचेही त्यांचे परिशीलन जबर होते. मोलिअर, मार्क ट्वेन, जेरॉम के. जेरॉम ह्या विनोदी लेखकांची नावे मी त्यांच्या तोंडूनच प्रथम ऐकली. इब्सेनचे नावही मला त्यांच्याकडूनच प्रथम समजले. ह्या सर्व पाश्चात्त्य लेखकांची पुस्तके त्यांच्या संग्रही असत. गडकऱ्यांच्या सर्व लिखाणात अनेक वाङ्मयात्मक संदर्भ जे विखुरलेले आढळतात त्याचे कारण त्यांचे सूक्ष्म नि सतत वाचन हेच होय.

शक्य तितकी उत्कृष्ट पुस्तके स्वतःजवळ जमविण्यासाठी गडकऱ्यांची नेहमी खटपट चालू असे. अर्थात दारिद्र्यामुळे त्यांना कोरी पुस्तके विकत घेणे शक्यच नव्हते तेव्हा ते दर बुधवारी नि रविवारी शनिवारवाड्यासमोर भरणाऱ्या जुन्या बाजारात न चुकता जात. तेथून त्यांनी काही उत्कृष्ट नि दुर्मिळ पुस्तके खरेदी केली होती. पुण्याच्या लष्करात त्या वेळी साहेब लोकांचा ' पूना जिमखाना '

होता. त्यांच्या लायब्ररीतली जुनी पुस्तके दर महिन्याला ते विक्रीला काढीत. अगदी चांगली चांगली इंग्रजी पुस्तके एकएक दोनदोन आण्याला मिळत. तेथे गडकरी हटकून हजर असत. म्हणून गडकऱ्यांचा खाजगी ग्रंथसंग्रह एवढा समृद्ध झाला होता. गडकरी आपली पुस्तके सहसा दुसऱ्यांना देत नसत, तरीदेखील काही मित्र असे खष्पी होते की, ते त्यांच्याकडून ह्या ना त्या सबबीखाली पुस्तके मागून नेत आणि ती कधीही परत करीत नसत. अशा वेळी गडकरी वैतागाने म्हणत, " देवा, माझ्या शत्रूंचा समाचार घ्यावयाला मी समर्थ आहे. पण माझ्या मित्रा-पासून तूच माझे रक्षण कर ! " कित्येक पुस्तकांवर गडकऱ्यांची अगदी आंधळी माया होती. असे एक पुस्तक म्हणजे 'धाकट्या सूनबाई' हे होय. मित्रमंडळींत वारंवार गहाळ झाल्यामुळे ते पुस्तक आपण एकोणतीस वेळा विकत घेतले असे ते सांगत.

प्रत्यक्ष लिहिण्याला असा गडकऱ्यांना फारच थोडा वेळ लागे. पण विचार पूर्ण व्हावयाला त्यांना पुष्कळच अवधी लागे. कित्येकदा वर्षानुवर्षे लागत. माझी त्यांची गाठ पडली त्या वेळी त्यांचे 'प्रेमसंन्यास' रंगभूमीवर आले होते. 'पुण्यप्रभाव' पुष्कळच लिहून झाले होते. 'राजसंन्यास'चे थोडेसे प्रवेश लिहिण्याचे काम चालू होते. पण नाटके लिहिताना मी त्यांना प्रत्यक्ष असे कधीच पाहिले नाही. नाटक लिहिण्यापूर्वी ते त्या नाटकाच्या कथाभागाचे निरनिराळे नकाशे नि आराखडे काढीत आणि पात्रांच्या स्वभावाची नि संभाषणाची सूचक टिपणे करून ठेवीत. (अशी त्यांची स्वतःच्या अक्षरातली अनेक टाचणे आजही माझ्या संग्रही आहेत.) एवढी सारी तयारी झाल्यावर ते आपल्या लेखकाला नाटकाचे संवाद तोंडी लिहावयाला सांगत शेवटच्या अंका-पासून ते बहुधा आरंभ करीत. आपल्या माडीवर उभ्या आडव्या फेऱ्या मारीत जेव्हा ते एखाद्या पात्राचे संभाषण तोंडी सांगत, तेव्हा त्या पात्राचा जणू काही संचार त्यांच्या अंगात होत असे. 'राजसंन्यास' नाटकातला काही भाग सांगताना पुष्कळदा समोरून 'आबासाहेब' (थोरले छत्रपती) येत आहेत आणि त्यांना आपला धक्का लागू नये म्हणून आपण आपले अंग चोरून घेत असू असे ते पुष्कळदा आम्हाला सांगत.

कवितादेखील ते फारच झपाट्याने लिहीत. चार-दोन कविता माझ्या समक्षच त्यांनी लिहिलेल्या मला आठवतात. स्फूर्तीचा झटका आला की ते बोलता बोलता एकदम गप्प होऊन हाताचे कोपरे डोक्यावर उंच धरीत नि

हातांनी पाठ खाजवू लागत. म्हणजे मग आपण समजावे की आता ह्यांच्या डोक्यात स्फूर्तीचा संचार झाला म्हणून. मग शेजारी पडलेल्या वाटेल त्या कागदाच्या तुकड्यावर किंवा एखाद्या वहीवर पेन्सिलीने अगदी मुखोद्गत असल्यासारखी एखादी नवीन कविता झपाट्याने लिहून टाकीत अन् खाली तारीख नि सही घालीत. पुष्कळदा ते मोडीत सही करीत. 'चंद्रकांत राजाची कन्या' ही चाल त्यांच्या फार आवडीची असे. म्हणून त्यांच्या बहुतेक कविता त्याच चालीवर आहेत. गडकऱ्यांना गाण्याचा गळा बिल्कूल नसे. 'ड'च्या बाराखडीत ते कवितेची चाल बहुशः गुणगुणत. तेव्हा मला पुष्कळदा हसू येई. तथापि, संगीताचे त्यांना चांगलेच ज्ञान होते. स्वतः केलेल्या कविता ते कधीच म्हणून दाखवीत नसत वा गुणगुणत नसत. त्याला एकच अपवाद होता. 'मुरली'च्या अखेरच्या ओळी 'भोगुनी तापमय उष्णा। मुरलीची लागता तृणा। जग गाइल राधाकृष्णा। ही साक्ष मनोमन मुरली' पुष्कळदा त्यांना गुणगुणताना मी ऐकले आहे.

एवढे सगळे सांगितले तरी गडकऱ्यांच्या स्वभावात काहीतरी विलक्षण विक्षिप्तपणा भरला होता, ह्यात काही शंका नाही. असे ते मुद्दाम करतात की काय असा मला संशय येई. रात्री-बेरात्री ओंकारेश्वरावर जाण्यास न कचरणारे गडकरी आपल्या भित्रेपणाचे वारंवार प्रदर्शन करीत असत. अंधारात नि पावसात ते एकटे कधीच बाहेर पडत नसत. एकदा ते नि मी रस्त्याने जात असता त्यांच्या अंगावर एक कुत्रे भुंकले. त्याला घाबरून ते धूम पळत सुटले. तेव्हा त्यांच्या पाठीमागे धावत जाऊन मला त्यांना थांबवावे लागले. पुष्कळदा त्यांना आपल्या घराचा डोलारा हलतो आहे असा भास होई. मग शेजारी असलेल्या माणसाला रस्त्यावर पाठवून 'तसे काही नसल्याची' खातरजमा करून यावयाला ते सांगत. साथीच्या रोगाचे त्यांना अतिशय भय वाटे. 'भुतांचे गाणे' लिहिणारा हा कवी भुताखेताच्या गोष्टी ऐकून थरथर कापे. खुनाच्या, अपघाताच्या किंवा आत्महत्येच्या बातम्या कोणी त्यांना सांगितल्या म्हणजे त्यावर ते अतिशय संतापत. पण तसे म्हणावे तर कोणाच्या मर्तिकाचे बोलावणे आले की गडकऱ्यांचा पाय सर्वांच्या पुढे असे. 'या गडकऱ्याला माणसे जाळायचा फार नाद आहे!' असे किर्लोस्कर मंडळीतले एक 'विक्षिप्त' पेंटर म्हणत असत त्याचे कारण हेच. आंबा पाहिला की गडकरी मूर्च्छित पडत असे म्हणत. पण त्याचे प्रात्यक्षिक मी काही त्या वेळी कधी पाहिले नाही.

स्वभावाने ते जितके विक्षिप्त नि चमत्कारिक, तितकेच ते लहरी, हट्टी आणि शीघ्रकोपी होते. त्यांचे एकदा डोके भडकले म्हणजे त्यांना ताळ्यावर आणणे कठीण. नाटक मंडळ्यांच्या मालकांना तर ते 'शेराला सव्वाशेर' होते. आज एका कंपनीला नाटक देतो म्हणतील आणि जरा तिथे काही बिनसले की, नाटकाचे बाड काखोटीला मारून ते त्या कंपनीतून तडक निघतील, तर थेट दुसऱ्या कंपनीत जाऊन त्यांच्या अंगावर ते बाड फेकून देतील! तिथेही पुन्हा तोच प्रकार! त्यामुळे नाटक मंडळींचे मालक त्यांना फार भिऊन असत. किर्लोस्कर नाटकगृहाचे तिसऱ्या मजल्यावर ते एकदा राहात. तेथून एका दोरीला बांधलेली टोपली खाली सोडून तिच्यातून ते चहाची केटली नि कपबशा वर ओढीत. एकदा टोपली खाली सोडून बराच वेळ झाला तरी हॉटेलवाल्याने चहाचे सामान तिच्यात भरले नव्हते. त्यामुळे गडकरी भारी संतापले. काही वेळाने हॉटेलवाल्याने कपबशा नि केटली टोपलीत भरली नि दोरी हलवली. गडकऱ्यांनी ती टोपली भराभर वर ओढली नि ती खिडकीत पोहोचल्यानंतर पुन्हा तशीच हॉटेलवाल्याच्या डोक्यावर परत सोडून दिली आणि ताबडतोब किर्लोस्कर नाटक मंडळीतून आपला मुक्काम हालवला नाटकाच्या बाडासकट!

ह्या हट्टी नि संतापी स्वभावामुळेच गडकऱ्यांनी आपले मरण लौकर ओढवून घेतले. त्यांना 'पायोरिया' झाला होता. तेव्हा डॉक्टरांनी त्यांना दात अजिबात काढून टाकावयाला सांगितले. पण गडकरी त्या गोष्टीला मुळीच तयार होईनात. तेच उलट डॉक्टरांना सांगू लागले की, "दातांचा नि बुद्धीचा निकट संबंध आहे. मी बुद्धिजीवी माणूस आहे. माझे दात तुम्ही काढून टाकले तर माझ्या बुद्धीचे वाटोळे होईल. मग मी जगणार कसा!" शेवटी दात त्यांनी काढले नाहीत अन् त्यामुळेच निर्माण झालेल्या ज्वराचे पर्यवसान क्षयात झाले. गडकरी कोणाशी भांडतील अन् कोणाशी नाही त्याचा काही नेम नसे. ते 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्ये पंधरा रुपये महिन्यावर शिक्षक होते. त्यांचे असिस्टंट सुपरिंटेंडेंट डॉ. के. के. जोशी हे 'जर्मन रिटर्न्ड' होते. ते स्वभावाने चांगलेच घमेंडखोर होते. ते एकदा वर्गात सरळ शिरले नि गडकऱ्यांकडे दुर्लक्ष करून मुलांची अभ्यासपत्रके स्वतःच गोळा करू लागले. तेव्हा गडकरी आपली पुस्तके घेऊन वर्गाबाहेर जाऊ लागले. तेव्हा डॉ. जोशी रागाने त्यांना म्हणाले, "कुठे चाललात तुम्ही? मी इथे आलो आहे हे तुम्ही पाहिले नाहीत काय?" गडकरी शांतपणे म्हणाले, "हो, नीट पाहिले." "मग बाहेर कुठे

चाललात ? ” डॉ. जोशी ओरडले. तेव्हा गडकरी म्हणाले, “ मी ह्या वर्गाचा शिक्षक आहे. ह्या वर्गात खाली मी नि माझ्या डोक्यावर ईश्वर ह्याखेरीज तिसऱ्याची सत्ता मी कबूल करीत नाही. असे असताना माझी परवानगी न घेता तुम्ही खुशाल वर्गात शिरून मुलांशी परस्पर व्यवहार करू लागलात तर इथे मी राहून काय उपयोग ! ” असे म्हणून गडकरी ताडताड वर्गाबाहेर पडले अन् सरळ घरी गेले. पुन्हा ते त्या शाळेत कधीच परतले नाहीत.

गडकऱ्यांचा स्वभाव तुसडा, चिडखोर नि माणुसघाण्या होता. असा त्या काळात पुष्कळांचा समज झालेला होता अन् काही अर्थी तो खोटा नव्हता. पण त्याला काही कारण होते. मुळात त्यांचा स्वभाव तसा मुळीच नव्हता. पण गडकऱ्यांचे नाव जसे हळूहळू लोकांच्या तोंडी होऊ लागले आणि त्यांच्या काव्याने नि विनोदाने सुशिक्षित मध्यमवर्गीय अन् विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी त्यांच्याकडे जसे आकर्षित होऊ लागले, तसे त्यांना बघण्यासाठी नि त्यांची ओळख करून घेण्यासाठी पुष्कळसे निरुद्योगी लोक त्यांच्याकडे येरझाऱ्या घालू लागले. उमेदवार कवी नि लेखक आपल्या लेखांची बाडे काखोटीला मारून त्यांच्या जिन्याची चढउतार करू लागले. चोवीस तास वाचनात, चिंतनात आणि लेखनात व्यग्र असलेल्या गडकऱ्यांना हा सारा उपसर्ग असह्य झाला. तेव्हा त्यांना नाइलाजाने आपला स्वभाव बाह्यतः तरी निष्ठुर बनविणे भागच पडले. आणि जो कोणी आपल्याकडे येईल त्याला परस्पर बाहेरच्या बाहेर पिटाळून लावण्याचा त्यांनी सपाटा सुरू केला. त्यात ओल्याबरोबर वाळलेलेही जळू लागले. मग लोक त्यांच्या नावाने उघड उघड बोटे मोडू लागले आणि त्यांच्यासंबंधी वाटेल त्या खोट्यानाट्या अफवा अद्वातद्वा पिकवू लागले. एकदा एक माणूस खालचे सारे पहारे चुकवून थेट वर आला. तिसऱ्या मजल्याच्या जिन्यातून त्याचे मुंडके जेव्हा वर चढताना गडकऱ्यांना दिसले तेव्हा ते त्याच्या अंगावर एकदम ओरडले, “ मी कामात आहे हे ठाऊक नाही का तुम्हाला ? ” तेव्हा तो माणूस मख्खासारखा म्हणाला, “ पण तुम्ही तर कामात असलेले मला काही दिसत नाही. नुसत्या विड्या ओढीत बसला आहात ! ” तेव्हा गडकरी चिडून त्याला म्हणाले, “ मी जेव्हा कामात नाही असे जगाला दिसते, तेव्हाच मी खरा कामात असतो ! ”

एवढे सांगून झाल्यानंतर गडकरी हे अत्यंत नम्र, निगर्वी आणि विनयशील होते असे सांगितले तर वाचणाराला आश्चर्य वाटेल. अगदी निकटच्या मित्रा-

खेरीज स्वतःच्या लेखाविषयी ते इतरांजवळ क्वचितच बोलत असत. समाजात आपला मोठेपणा मिरविण्याचा त्यांना मनापासून तिटकारा असे. काव्यामुळे नि नाटकामुळे त्यांच्या हयातीत त्यांना काही कमी कीर्ती मिळाली नाही, पण एवढे असून कोणत्याही सन्मान-समारंभात किंवा सार्वजनिक कार्यक्रमात भाग घेण्याचा मोह त्यांना झाला नाही. किंबहुना आत्मप्रसिद्धीपासून ते कटाक्षाने दूर राहिले. स्वतःच्या काव्याचा वा लेखांचा संग्रह पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा विचारदेखील कधी त्यांनी आपल्या मनात आणला नाही. आपल्या हयातीत कोणत्याही मासिकात वा वृत्तपत्रात त्यांनी आपला फोटो प्रसिद्ध करू दिला नाही. काही मित्रांनी जर कधी त्यांना प्रेमळपणे धाक घातला की, "एक दिवस तुम्हाला न कळत आम्ही तुमचा फोटो घेऊ नि तुम्हाला न विचारता कुठे तरी प्रसिद्ध करू" तर ते चिडून म्हणत, "तसे कराल तर याद राखा, मी तुमच्यावर हटकून फिर्याद करीन!" आपल्या टीकाकाराबद्दल वा विरोधकाबद्दल कधीही कुत्सित वा अनादराची भाषा ते वापरीत नसत. एकदा गडकरी आपल्या विचारतंद्रीत गढून गेले असता बाहेर एक कुत्रे भुंकले. त्यामुळे त्यांची विचारमालिका तुटून ते अतिशय संतापले आणि त्या रागाच्या भरात त्यांनी त्या कुत्र्याला चार-पाच शिव्या हासडल्या. पण काही वेळाने त्यांना त्या गोष्टीचा पश्चात्ताप झाला आणि ते कुत्र्याला उद्देशून म्हणाले, "अरे, मी मासिकांची पानेच्या पाने जरी भुंकलो तरी मला चुकून कोणी 'हड' म्हणत नाही. मग तू एक क्षणभर भुंकलास तर तुला शिव्या देण्याचा मला काय अधिकार आहे?" या विषयावर ते एक कविताही लिहिणार होते.

गडकऱ्यांची सूक्ष्म बुद्धी त्यांच्या लेखातच नव्हे, तर त्यांच्या नेहमीच्या वागण्यातदेखील दिसून येत आहे. सदैव त्यांची दृष्टी काहीतरी हुडकून किंवा शोधून काढण्याकरता टपलेली असे. अमक्याच्या जिन्याला पायऱ्या किती नि किर्लोस्कर नाटकगृहापासून कोतवालचावडीकडे जाईपर्यंत दोन्ही बाजूंला दुकानाच्या पाऱ्या किती हे त्यांना हटकून ठाऊक असे. 'साऱ्या पुणे शहरात लहान घर कोणते?' असा एकदा त्यांनी मला प्रश्न केला. माझ्या काही ध्यानात येईना. शेवटी त्यांनी मला ते घर प्रत्यक्षच नेऊन दाखवले. बुधवार चौकाकडून जोगेश्वरीकडे जाताना डाव्या बाजूला जे बालाजीचे देऊळ आहे त्याला लागून ते घर होते. ते पाहून माझी खात्री झाली की इतके बुटबैंगण घर साऱ्या पुण्यात नसेल म्हणून. त्यांचा गणित विषय फार तल्लख असे. 'मॅट्रिकपर्यंतच्या गणितात

मी रँग्लर परांजप्यांनादेखील दाद देणार नाही' असे ते म्हणत. 'ज्याला लेखक व्हायचे आहे त्याने युक्लिडच्या सिद्धांताचा अभ्यास करावा' असे ते सांगत. त्यांची अवलोकनशक्तीही तशीच तीक्ष्ण आणि मार्मिक असे. माणसाच्या काही काही गोष्टींचे त्यांनी स्वतःशी ठोकताळे बांधून ठेवले होते. एक दिवशी मला त्यांनी विचारले, "काय हो, तुम्हाला धाकटी बहीण आहे काय?" मी म्हणालो, "आहे! माझ्यापेक्षा पाच-सहा वर्षांनी लहान आहे. तुम्हाला काय ठाऊक?" तेव्हा ते म्हणाले, "काल आमच्या घरावरून एक मुलगी गेली. तेव्हा मी कोणाला तरी सांगितले की, ही अत्र्यांची बहीण असली पाहिजे!" "हो, तिचा माझा तोंडावळा सारखा आहे!" मी हसून म्हणालो. तेव्हा ते म्हणाले, "नाही, तिचा तोंडवळा पाहून नाही मी सांगत तुम्हांला. तिच्या चालण्याची पद्धत पाहून सांगतो मी. एकाच कुटुंबातली माणसे एकाच रीतीने चालतात असे मी पाहिले आहे. त्यावरून मी हे सांगतो आहे!" ते ऐकून मी चकीत झालो.

रस्त्याने जाताना आजूबाजूने जाणाऱ्या-येणाऱ्या माणसांच्या हालचालीवर त्यांचे अगदी बारकाईने लक्ष असे. त्यांच्या परिचयात कोणीही नवीन माणूस आला रे आला की त्याच्या बोलण्याचालण्याच्या एकूण एक लकबी आणि खोडी ह्यांची नोंद त्यांनी केलीच आपल्या डोक्यात म्हणून समजावे. एकदा ते आजारी असताना कोणी तरी एक मद्रासी वैद्य त्यांची प्रकृती तपासण्यासाठी घेऊन आले. त्याने प्रकृती तपासून अनुमान आणि पथ्य सांगितल्यानंतर गडकऱ्यांनी त्याला विचारले की, "मीठ खायचे का?" तेव्हा तो वैद्य आपल्या मद्रासी हिंदीत त्यांना म्हणाला, "काहना, लेकीन टोडा काहना!' गडकऱ्यांनी त्यांचे ते हिंदी वाक्य नि त्याचे उच्चार बरोबर लक्षात ठेवले नि त्याचा उपयोग 'भावबंधन'मधे केला. तिसऱ्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशात कानडी गिरसप्पाचे सोंग घेऊन आलेल्या प्रभाकराला मालती विचारते, "पण गिरसप्पा, वडिलांना बोलण्यापेक्षा जरा दम खाल्लेला बरा नाही का?" त्यावर 'गिरसप्पा' प्रभाकर कानडी उच्चारात म्हणतो, "दम खाना, लेकिन थोडा खाना!" पाहा, कोठल्या संदर्भात ऐकलेल्या वाक्याचा उपयोग त्यांनी कोठल्या संदर्भात केला. गडकऱ्यांच्या तल्लख बुद्धिमत्तेचे हेच वैशिष्ट्य आहे. त्यांच्या विनोदी पात्रामधले तर एकही पात्र काल्पनिक नव्हते. गोकुळ, सुदाम, नूपुर, कंकण, देहू हे स्वभावाचे इरसाल नमुने तर त्यांनी आपल्या परिचयात आलेल्या

निरनिराळ्या व्यक्तींवरून उचलले होते. शेवटच्या बाजीरावावर ते एक नाटक लिहिणार होते. मला वाटते त्याचे नाव 'सुरती शिक्का' असावे. पण त्रिंबकजी डेंगळ्यांसारखा माणूस जोपर्यंत प्रत्यक्षात पाहावयाला मिळत नाही, तोपर्यंत ते नाटक लिहिणे आपल्याला सर्वस्वी अशक्य आहे असे ते म्हणत. अर्थात ते नाटक त्यांनी कधीच लिहिले नाही.

गुरुजनांबद्दल, गुणीजनांबद्दल नि स्वतःच्या परिजनांबद्दल (म्हणजे मित्रांबद्दल) गडकऱ्यांना विलक्षण अभिमान वाटे. किर्लोस्कर नाटक मंडळी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, फर्ग्युसन कॉलेज नि रँग्लर परांजपे ह्यांच्याविषयी गडकऱ्यांना अनन्यसाधारण भक्ती वाटे. त्यांच्यावर कोणी टीका केली रे केली की, गडकरी त्याच्यावर अक्षरशः तुटून पडत. रँग्लर परांजपे हे मिश्यांचे आकडे वळवितात म्हणून त्यांचे काही विरोधक त्यांच्यावर टीका करीत असत. अशा लोकांना उद्देशून गडकरी खवचटपणे विचारीत, "काय हो, रँग्लरांच्या टोकदार मिश्या टोचल्याची तुमच्या घरातून काही तक्रार तर आली नाही ना?" किर्लोस्करातून फुटून बालगंधर्व, बोडस नि टेंबे यांनी 'गंधर्व' मंडळी काढली. त्याचा सर्वांत कोणाला राग आला असेल तर तो गडकऱ्यांना. किर्लोस्करांच्या बिऱ्हाडातून ही मंडळी जेव्हा बाहेर पडली तेव्हा रागाने डोळे गरगरा फिरवीत गडकरी नाटकगृहाच्या प्रवेशद्वाराजवळ उभे होते. एवढ्यात बोडस परत आले. गडकऱ्यांनी चिडून विचारले, "का हो, का परत आलात?" बोडस म्हणाले, "माझे जोडे आत विसरले आहेत!" गडकरी ताडकन म्हणाले, "मग इकडे कशाला येताहात! बाहेर जा! तिकडे तुम्हाला वाटेल तितके जोडे मिळतील!" त्यानंतर काही दिवसांनी दत्ताच्या देवळासमोर त्यांना बोडस भेटले नि मोठ्या दिमाखाने ते गडकऱ्यांना म्हणाले, "मास्तर, आमच्या नव्या कंपनीचा नारळ फुटला!" गडकरी शांतपणे त्यांना म्हणाले, "ठीक आहे. कंपनीचा नारळ फुटला. आता कंपनी केव्हा फुटणार?" गंधर्व कंपनीवर गडकऱ्यांचा एवढा राग असतानासुद्धा आपले 'एकच प्याला' हे नाटक शेवटी त्यांनी 'गंधर्वां'नाच देऊन टाकले.

गडकऱ्यांच्या स्वभावात असे अनेक विरोधाभास भरलेले होते. गुरूंबद्दल नि मित्रांबद्दल त्यांना एवढा आदर असूनही एखादी कोटी त्यांना सुचली रे सुचली तर त्या सर्वांना बेधडक खर्ची टाकावयाला ते कधी मागेपुढे पाहात नसत. चिंतामणराव कोल्हटकरांबद्दल त्यांना विलक्षण प्रेम वाटे. कोणी एकदा त्यांच्या-

विरुद्ध बोलले तर त्याला त्यांनी ताडकन सांगितले की, "चिंतामणरावाबरोबर मी नरकात जाईन पण तुमच्याबरोबर मी स्वर्गात येणार नाही!" पण त्याच चिंतामणरावाविरुद्ध त्यांनी केलेला हा विनोद पाहा! पूर्वीच्या काळी वाघाची तोंडे छापलेली लाल-पिवळी ब्लँकेटे मिळत असत. असे एक ब्लँकेट पाहून ते म्हणाले, "आमच्या चित्याने ह्या ब्लँकेटला आपले तोंड पुसलेले दिसते आहे!" बन्या म्हणजे न. ग. कमतनूरकर हे त्यांचे आवडते शिष्य! पण त्यांच्याबद्दलच ते एकदा म्हणाले, "ह्या बन्याच्या बुटाचा बंद तुटला तर तो तुमचे आतडे तोडून मागेल!" आजचे एक सुप्रसिद्ध साहित्यिक हे त्या काळी काही थोडे दिवस गडकऱ्यांकडे जात असत. ते त्या वेळी पुण्यात एक कॉलेज-विद्यार्थी होते. ते गडकऱ्यांना एकदा म्हणाले, "मास्तर, तुमचे 'प्रेमसंन्यास' नाटक स्वतंत्र नाही. त्याचा तोंडावळा एका फ्रेंच नाटकासारखा दिसतो, असे माझ्या एका मित्राने मला सांगितले आहे." ते ऐकून गडकरी मनात फार चिडले. पण तोंडावर तो राग न दाखवता बाहेर खिडकीतून डोकावीत ते शांतपणे त्याला म्हणाले, "भावड्या, तो खालून एक भंगी चालला आहे ना! तो बघ! त्याचा तोंडावळा तुझ्यासारखा दिसतो आहे!" त्यानंतर सदर भाऊबुवांनी गडकऱ्यांची माडी काही पुन्हा चढली नाही!

तात्यासाहेब कोल्हटकरांबद्दल त्यांना एवढा आदर! तो त्यांनी एका काव्य-पंक्तीत व्यक्त केला होता. "तात्या, ती तलवार एक तुमची बाकी विळे कोयते!" त्यानंतर तात्यांचे 'सहचारिणी' नाटक पाहून त्यांची भारी निराशा झाली. असले भिकार नाटक आपल्या गुरूंनी लिहावे ह्याची त्यांना फार चीड आली. ते तात्यांना म्हणाले, "तात्या, प्रेमसंन्यास नाटक जेव्हा मी प्रथम तुमच्या पायांवर अर्पण केले, तेव्हा त्या नाटकातले माझे दोषही मी तुमच्या पायांवर अर्पण केले होते. असे असता ते माझे सारे दोष तुमच्या पायांपासून डोक्यापर्यंत वर कसे चढत गेले हे काही कळत नाही." म्हणून विनोदी नाटक कसे लिहावे हे तात्यांना शिकविण्यासाठी नि त्यांच्या 'सहचारिणी'वर मात करण्यासाठी गडकऱ्यांनी 'भावबंधन' लिहिले. पण असे असूनही 'भावबंधन' नाटकाच्या मंगलाचरणात त्यांनी आपल्या गुरूलाच अभिवादन केले!

> "कृपाचि ज्यांची कारण केवळ, मम पामर वचनाते।
> वंदूनी त्या 'श्रीपाद'पदाश्रित द्या या यश कार्याते!
> नव नाटक रचना सादर करिता रसिकजना!"

तात्यांची नाटके चुटकीसरशी मी 'बुधवार'ची नाटके करून टाकीन असेही कित्येकदा ते म्हणत. (पूर्वीच्या काळी चांगली नाटके शनिवार, रविवारी लागत नि भिकार नाटके बुधवारी लावीत!) 'स्वयंवर नाटकात कृष्ण रुक्मी नि शिशुपाल ह्या दोघांना दोन्ही दंडांना पकडून रंगभूमीवर ओढून आणीत असे.' ते पाहून विंगमध्ये उभे असलेले गडकरी एकदा म्हणाले "कोल्हटकर नि खाडीलकर ह्या दोघांना पकडून मी असा मराठी रंगभूमीवर आलेलो आहे!" विनय नि गर्व ह्यांचे अत्यंत विक्षित चित्रण गडकऱ्यांमध्ये अशा तऱ्हेने झालेले होते!

टिळकांच्या जहाल राजकारणाने त्या काळचे पुण्याचे वातावरण पराकाष्ठेचे भारून गेले होते. पण त्या राजकारणापासून गडकरी अगदी फटकून असत. टिळकांचा उल्लेख ते बी. जी. ह्या अद्याक्षरांनी करीत. त्यांच्या घरात 'केसरी' कधीही आलेला मी पाहिला नाही. मात्र ते चोरून कुठे तरी 'केसरी' वाचीत असत. खाडिलकरांच्या नाटकातील पदांची गडकऱ्यांनी जरी पुष्कळ थट्टा केलेली असली तरी रंगभूमीवरील खाडिलकरांचे श्रेष्ठ स्थान त्यांना मान्य होते. तथापि, 'केसरी'चे संपादक म्हणून गडकऱ्यांना खाडिलकर आवडत नसत. केळकरांचा 'केसरी' त्यांना आवडे. तथापि, टिळकांच्या राजकारणापेक्षा त्यांना गोखल्यांचे राजकारण जवळचे वाटे. १९०८ मधील राजकीय दडपशाहीमुळे त्यांच्या मनाला एक प्रकारची दडसच बसली होती. कीचकवधाच्या वेळी त्यांनी 'महाराष्ट्र-लक्ष्मी' नावाचे एक ज्वलज्जहाल नाटक लिहिले होते. पण 'कीचकवधा'वर सरकारने घातलेली बंदी पाहून त्यांनी आपले ते नाटक जाळून टाकले. नासिक येथे 'किर्लोस्कर नाटक मंडळी'च्या एका नाट्य प्रयोगाच्या वेळी कलेक्टर जॅक्सन ह्याचा कान्हेरेने खून केला. त्या वेळी त्या नाटक मंडळीसाठी गडकरी हे प्रल्हादचरित्रावर 'गर्वनिर्वाण' नावाचे नाटक लिहीत होते. पण त्यातला हिरण्यकश्यपूचा कथाभाग इंग्रजांच्या दडपशाहीचे रूपक म्हणून समजला जाईल असे कोणी त्यांना सुचवायचा अवकाश! की त्यांनी ते नाटक कंपनीतून काढून घेतले नि पुढे ते पुरे करण्याच्या भानगडीत कधीच पडले नाहीत!

जहाल राजकारणापासून ते कटाक्षाने फटकून दूर राहिले असले, तरी लो. टिळकांच्या नावाचा उल्लेख त्यांनी 'एकच प्याल्या'च्या पहिल्या प्रवेशात राम-लालच्या तोंडून केला आहे आणि लोकमान्य जेव्हा इंग्लंडला गेले तेव्हा तिकडून आपली 'भवानी तलवार' घेऊन यावयाची त्यांना विनंती त्यांनी

केलेली आहे. तथापि, गडकऱ्यांच्या सर्व लिखाणात देशाच्या पारतंत्र्याबद्दलची चीड कोठेही व्यक्त झालेली दिसून येत नाही. त्यांच्या प्रत्येक नाटकाच्या शेवटी 'ब्रह्मार्पणं ब्रह्महविः' हे गीतेतले भगवंताचे वचन न चुकता त्यांनी दिलेले असले, तरी त्यांनी 'भगवद्गीता' वाचलेली होती असे मला वाटत नाही. 'गीतारहस्य' त्यांनी चाळलेले असावे. कारण त्याच्या प्रस्तावनेतील 'ज्या विषयाच्या संगतीत आयुष्याची वेचाळीस वर्षे गेली तो विषय आज हातावेगळा करताना दुःख होत आहे' हे टिळकांनी लिहिलेले पहिले वाक्य वाचून गडकरी हळहळून म्हणाले, "अरेरे, नेमक्या ह्याच विचाराने मी माझ्या 'राजसंन्यासा'च्या प्रस्तावनेचा प्रारंभ करणार होतो." गडकऱ्यांना राजकारणाचे वावडे होते, तर मग त्यांचा पिंड काय समाजसुधारकाचा तरी होता काय? कोल्हट-करांच्या नाटकातून आगरकरांच्या सामाजिक विचारसरणीचा त्यांच्या मनावर निश्चित परिणाम झाला होता. तथापि आपल्या नाटकांतून समाजसुधारणेचा निःसंदिग्ध पुरस्कार त्यांनी कधीच केला नाही. म्हणून त्यांना 'प्रेमसंन्यास'चा शेवट दुःखान्त करावा लागला. तसे पाहिले तर ते सनातनीच होते. वृत्तीने ते भाविक आणि श्रद्धाळू होते. म्हणून आपल्या सर्व लिखाणातून हिंदुसमाजा-मधील पारंपरिक मूल्यांचा त्यांनी काव्यमय भाषेतून पुरस्कार केला आहे. त्यांच्या विचारात आणि दृष्टिकोणात अत्यंत आधुनिकत्व जर कोठे दिसत असेल तर ते त्यांच्या विनोदात. सामाजिक जीवनातील विसंवाद, विसंगती आणि विकृती ह्यांचा दंभस्फोट त्यांनी अगदी निर्भयपणे आपल्या विनोदामध्ये केलेला आहे. समाजसुधारणेचे एक प्रभावी शस्त्र या दृष्टीनेच गडकरी विनोदाकडे पाहात होते.

ह्याचा असा अर्थ मुळीच नव्हता की, गडकऱ्यांच्या अंगी देशाभिमान किंवा राष्ट्रीय नीती नव्हती. शिवछत्रपतींच्या चरित्राबद्दल आणि इतिहासाबद्दल त्यांना पराकाष्ठेचे प्रेम नि कमालीचा जिव्हाळा वाटत होता. रायगड पाहावयाला जाण्याचा एकदा काही मित्रांनी त्यांना आग्रह केला. तेव्हा ते म्हणाले, "रायगडच्या पहिल्या पायरीवर पाय टाकताच मी बेशुद्ध होऊन पडेन!" त्या त्यांच्या उद्‌गारातली ज्वलंत भावना कोणाच्याही लक्षात येण्यासारखी आहे. पुण्यापासून सिंहगड इतका जवळ असताना तो पाहण्यासाठी ते एकदाही गेले नाहीत. का? तर ते म्हणत, "सिंहगडाच्या पठारावर एकदा का मी उभा राहिलो तर 'इंडियन पीनल कोडा'ची १२४ (अ) नि (ब) ही कलमे मला आठवतात तेवढे गडकरी!

२८४३४

खाली ओढून आणावयास असमर्थ ठरतील!" महाराष्ट्राबद्दल आणि स्वातंत्र्याबद्दल मोठ्या कष्टाने अन्यत्र आवरून धरलेले आपले सर्व राजकीय विचार ते आपल्या 'राजसंन्यास' नाटकामध्ये व्यक्त करणार होते. ज्या अलौकिक ध्येयवादावर नि त्यागावर शिवछत्रपतींनी आपले स्वातंत्र्याचे दिव्य नि भव्य मंदिर महाराष्ट्रात उभारले होते त्याचे अत्यंत देदीप्यमान चित्र त्या नाटकात रेखाटण्याचा त्यांचा प्रयत्न होता. ते नाटक जर का पूर्ण झाले असते तर तो भारतीय नाट्यसृष्टीतला एक अजब चमत्कार म्हणून गणला गेला असता. तथापि त्यांनी लिहून ठेवला आहे तेवढा तरी भाग किती विलक्षण प्रभावी वाटतो. कुबेराच्या भांडारात डोकावल्यासारखे वाटते. अच्युतराव कोल्हटकर तर तो वाचून अक्षरशः वेडे झाले होते. ते त्या वेळी म्हणाले, "मला जर उद्या मुम्बई इलाख्याचा कोणी गव्हर्नर नेमले तर शाळेमधील सारी इतिहासाची पुस्तके जाळून त्याऐवजी 'राजसंन्यास' नेमण्याचा मी हुकूम सोडीन!"

परभाषेतील कवितांची अगर लेखांची स्वभाषेत भाषांतरे करून स्वतःच्या नावावर विकण्याचा गडकऱ्यांना अतिशय तिरस्कार असे. 'मोडकेतोडके लिहा पण स्वतःचे लिहा. विचार करून लिहा. काहीतरी नवीन लिहा' असा आमच्यासारख्या नवख्या लेखकांना त्यांचा पहिला उपदेश असे. एखाद्याने काही भाषांतर करून त्यांना दाखवायला आणले तर मग ते कितीही चांगले असले तरी ते हातात धरीत नसत. इंग्रजी वाङ्मयाचे पडसाद त्यांच्या स्वतःच्या वाङ्मयावर पुष्कळच पडले आहेत. पण त्यांनी जन्मात भाषांतर म्हणून कशाचे केले नाही. "परभाषेतील सर्वोत्कृष्ट पुस्तके मी वाचतो, ती त्यामधील विचारांचा नि कल्पनांचा माझ्या लेखनात उपयोग करण्याकरता नव्हे, तर माझे स्वतःचे विचार नि कल्पना त्यांच्यापेक्षा किती तोकड्या पडतात हे पडताळून पाहण्यासाठी!" गुजराती काव्याबद्दल नि साहित्याबद्दल त्यांना फार आदर वाटे. त्यांचा जन्म गुजरातेत गणदेवी प्रांतात नवसारी येथे झाला असल्याने गुजराती ही त्यांची जवळजवळ जन्मभाषाच झाला होती. 'भावबंधन' मधल्या घनश्यामच्या तोंडून गुजराती भाषेबद्दलचा त्यांनी केलेला उल्लेख आत्मचरित्रात्मकच आहे. "मला गुजराथी चांगलेच येते. जवळ जवळ माझी मातृभाषाच गुजराथी आहे." गुजरातेतला महाकवी कलामी हा त्यांचा अतिशय आवडता कवी होता. त्याचा 'केकारव' त्यांनी मला समजावून सांगितला होता.

गडकऱ्यांच्या बैठकीत अनेक मोठमोठ्या व्यक्तींची नि माझी गाठ पडली. अच्युतराव कोल्हटकर एकदा त्यांच्याकडे येत असताना गडकरी वरून ओरडले, " साहेब, जपून या. आमचा जिना अरुंद आहे ! " कोल्हटकर जिना चढता चढता म्हणाले, " Narrow is the way that leads to heaven ! ( स्वर्गाचा जिना अरुंदच असतो ! ) " नंतर कोल्हटकर वर आले आणि सतरंजीवर बसले तेव्हा गडकरी उद्गारले, " Now it is heaven. ( आता म्हणजे तुम्ही आल्याने हा स्वर्ग झाला आहे.)" बालकवी ठोमरे ह्यांची नि माझी, त्यांच्या माडीवर दोनतीनदा गाठ पडली होती. बालकवींबद्दल गडकऱ्यांना विलक्षण प्रेम वाटत होते. ' जगद्गायका बालकवे हे ऊठ ऊठ आता । तू निजला तरि सांग कोण या जागवील जगता ' ही कविता त्यांनी बालकवी ठोमरे ह्यांनाच उद्देशून लिहिलेली असून ' नव कवितेच्या जरिपटक्याचा अधिकार ' त्यांनी बालकवींनाच देऊन टाकला आहे. बालकवींच्या काव्याची पुष्कळशी छाया गडकऱ्यांच्या काव्यावर पडलेली आहे. ' आनंदी आनंद गडे ' या बालकवींच्या अमर आनंदगीताचा उल्लेख त्यांनी आपल्या ' प्रेमसंन्यास 'च्या शेवटच्या अंकात प्रामुख्याने केला आहे. गडकरी नि ठोमरे ह्यांची गाठ पडली की गडकरी एकसारखे तासन्तास बोलत राहावयाचे नि आपले हरिणासारखे पाणीदार डोळे निश्चल ठेवून त्यांचे ते बोलणे ठोमरे तल्लीनपणे ऐकत राहावयाचे. ते दृश्य अगदी अविस्मरणीय असे. ठोमरे आगगाडीच्या अपघातात मरण पावल्याची दुःखद वार्ता मीच गडकऱ्यांना प्रथम सांगितली. गडकऱ्यांच्या शेवटच्या आजाराला तेव्हापासूनच सुरुवात झाली. गोविंदराव देवलांबद्दल गडकऱ्यांना फार आदर वाटे. एकदा मी असताना देवल आले. गडकऱ्यांची अशी काही धांदल उडाली म्हणता. ' मा-मा-मास्तर आले ! ' असे ओरडून ते आईला सांगू लागले. देवल फारच देखणे पुरुष होते. ते येताच गडकऱ्यांनी त्यांच्या पायांवर अक्षरशः लोळण घेतली, आणि लहान मुलासारखे हातपाय मुडपून त्यांच्यापुढे एखाद्या पोरासारखे गुपचूप बसले. देवल वारले तेव्हा ' वंदन नाट्यमिलिंदा, गोविंदा, तव पदारविंदांना ! ' ही त्यांची कविता ' मनोरंजन 'मधे प्रसिद्ध झाली होती. ' प्रेमसंन्यास ' नाटकाची पहिली प्रत त्यांनी अण्णासाहेब किर्लोस्करांच्या गादीला अर्पण केली होती.

एकंदर अठरा नाटके लिहिण्याचा गडकऱ्यांचा मानस होता. ते विनोदाने म्हणत की " शेक्सपीअरने ३६ नाटके लिहिली. तो एक पूर्ण बुद्धीचा मनुष्य

होता. मी एक अर्धवट माणूस आहे, म्हणून मी अठरा नाटके लिहिणार आहे!" रोज ते कुठल्या ना कुठल्या तरी नवीन नाटकाच्या नावाशी नि कथानकाशी कुस्त्या खेळत बसायचे. थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दीवर एक नाटक लिहिण्याचा त्यांचा विचार होता. पानपतच्या लढाईत धारातीर्थी पडलेल्या सैनिकांना पिंड देण्यासाठी ओंकारेश्वराच्या स्मशानात श्रीमंत माधवराव साहेब नि इतर मराठी सरदार जमले आहेत. पुष्कळ वेळ झाला तरी पिंडाला कावळा शिवत नाही, तेव्हा माधवरावसाहेब मृतात्म्यांना उद्देशून म्हणतात, "तुमच्या उरलेल्या साऱ्या आशा मी तृप्त करीन नि पानपतच्या आघातामुळे कोसळलेली मराठी दौलत पुन्हा पूर्वीच्या वैभवात मी उभी करीन!" तेव्हा मग पिंडाला कावळा शिवतो, असा त्या नाटकात एक प्रवेश ते योजणार होते. त्या प्रसंगाला उद्देशून गडकरी म्हणत, "आजपर्यंत महाराष्ट्रातील नाटककारांनी निरनिराळ्या प्रकारचे प्राणी रंगभूमीवर ओढून आणले असतील, पण कावळा आणणारामात्र मीच पाहिला नाटककार होईन!" आपले शेवटचे नाटक 'वंदे मातरम्' हे लिहून त्यांनी नाट्यसंन्यास घ्यावयाचे ठरविले होते.

गडकऱ्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व जेवढे थोर होते तेवढेच त्यांचे व्यक्तिगत माहात्म्य प्रभावी होते; आणि विनोद हे तर त्यांचे श्वसन आणि निःश्वसन म्हणजे जीवन होते. इतक्या सहजपणे पण इतक्या विलक्षण आवेगाने त्यांच्या तोंडून एखादी कोटी किंवा विनोदी वचन बाहेर पडे की, ऐकणाऱ्याच्या हसता हसता मुरकुंड्या वळत आणि ज्याच्यावर त्या विनोबाचा रोख असेल त्याला 'दे माय धरणी ठाय' होऊन जाई. कोणत्याही प्रतिशब्दाला किंवा प्रत्युत्तराला विनोदी कलाटणी देताना त्यांना मुळीच कष्ट पडत नसत. सहजता आणि आकस्मिकता ही त्यांच्या विनोदाची वैशिष्ट्ये होती. पुण्याच्या लकडीपुलावर म्युनिसिपल कंदिलाशेजारीज एक ग्यासची बत्ती होती. त्याबद्दल कोणी तरी त्यांना विचारले, "ग्यासच्या बत्तीशेजारी इतक्या जवळ हा कंदील कशाला?" तेव्हा गडकरी अगदी सहजगत्या म्हणून गेले "ग्यासची बत्ती लागली आहे की नाही ते पाहण्यासाठी शेजारी कंदिलाची योजना करण्यात आली आहे!" बुधवार चौकात एक माणूस तावातावाने गडकऱ्यांशी भांडत होता. शेवटी तो चिडून त्यांना म्हणाला, "तुमच्यासारख्या मूर्ख माणसाशी यापुढे बोलायचे नाही, असा मी निश्चय केला आहे!" तेव्हा गडकरी शांतपणे म्हणाले, "मी नाही तसा निश्चय केला. माझी तुमच्याशी बोलायची तयारी आहे!" गायकवाड-

वाड्यात ते एकदा टिळकांचे व्याख्यान ऐकायला गुपचुप गेले होते. गर्दीत असेच कुठेतरी दाटीवाटीने बसले होते. इतक्यात एक पगडीवाले ' देशभक्त ' मागून वाट काढीत काढीत जोराने पुढे आले. त्यांचा पाय गडकऱ्यांना लागला. तेव्हा ' अरेरे, पाय लागला वाटते ' असे औपचारिक शिष्टाचाराने ते बोलून गेले. गडकऱ्यांचे त्यांच्याविषयी चांगले मत नव्हते. म्हणून त्यांना तडाखा द्यायची त्यांना आयतीच संधी मिळाली. गडकरी ताडकन् उत्तरले, " काही वाईट वाटून घेऊ नका. उलट तुम्हांला दोन पाय अधिक फुटावेत आणि ते चारी पाय आम्हांला असेच नेहमी लागून राहावेत अशीच देव गजाननाला आमची प्रार्थना आहे. "

पुण्यात एकदा लष्करभरतीसाठी किर्लोस्कर नाटकगृहामधे लो. टिळक आणि रँग्लर परांजपे ह्यांची जाहीर व्याख्याने झाली. त्या सभेला गडकरी गेले होते. सभा संपून गडकरी घरी परत आले नि ' गालात जीभ ' आडवी ठेवून म्हणाले, " आजच्या सभेत पुण्यातली दोन-तृतीयांश बुद्धिमत्ता बोलली ! " इत्यर्थ हा की, उरलेल्या एक-तृतीयांश बुद्धिमत्तेचे मालक आपण आहोत. अर्थात हा त्यांचा विनोद होता. गर्वोक्ती नव्हती. एकदा तात्यासाहेब कोल्हटकरांनी गडकऱ्यांना विचारले, " गडकरी, जगातले सर्वांत मोठे प्रदर्शन कुठे आहे ? " गडकरी म्हणाले, " मला नाही माहीत ! " कोल्हटकर गंभीरपणे म्हणाले, " अर्थात गाढवाच्या पोटात ! जगाच्या आरंभापासून जो उठतो तो शेकडो वस्तू गाढवाच्या पोटात फेकून देतो ! " गडकरी अधिक गंभीरपणे म्हणाले, " तात्या, छान विनोद केलात ! आता जेव्हा जेव्हा मला गाढव दिसेल, तेव्हा तेव्हा मला तुमची आठवण होईल ! " आपल्या तंगड्या आपले ' शिष्यवर ' आपल्याच गळ्यात अशा रीतीने अडकवतील अशी तात्यांना कल्पना नव्हती. एकदा एका समारंभाला कोल्हटकर नि गडकरी गेले होते. ऐनवेळी भाषण करण्याची त्यांना विनंती करण्यात आली. कोल्हटकर वकील होते. त्यांना भाषणे करण्याची सवय होती. तेव्हा सुरुवातीला ते बोलले. उत्तम भाषण केले त्यांनी. नंतर गडकऱ्यांची पाळी आली. गडकऱ्यांच्या अंगाला थरकाप सुटला होता. पण तो बाहेर न दाखवता गडकरी म्हणाले, " आता तात्यासाहेबांनी जे भाषण केले ते मीच करणार होतो. त्याचे मी आधी टाचण करून ठेवले होते. पण इकडे येता येता त्यांना ते वाचण्यासाठी मी सहज दिले. ते त्यांनीच इथे आपल्यासमोर करून टाकले. तेव्हा मला आता काही निराळे सांगावयाचे नाही ! " असे म्हणून ते खाली

बसले. श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. तात्यासाहेब गडकऱ्यांकडे 'आ' करून पाहातच राहिले!

अशा गडकऱ्यांच्या विनोदाच्या किती म्हणून गमती सांगाव्यात? गडकऱ्यांच्या परिचयात अशी पाच वर्षे मी काढली. त्यांच्या 'वशिल्याने म्हणा किंवा शिफारशीने म्हणा माझ्या कविता १९१५ सालापासून म्हणजे माझ्या वयाच्या सतराव्या वर्षापासून 'मासिक मनोरंजना'त प्रसिद्ध होऊ लागल्या, आणि महाराष्ट्रात 'कवी' म्हणून मला नाव मिळाले. १९१७ सालापर्यंत गडकऱ्यांची प्रकृती उत्तम होती. किंबहुना तेच त्यांच्या आयुष्यातले निरामय प्रकृतीचे शेवटचे वर्ष. १९१८ च्या उत्तरार्धात त्यांची प्रकृती बिघडली. त्याच सुमारास त्यांच्या मृत्यूची बातमी चुकीने मुंबईच्या 'इंदुप्रकाशा'त छापून आली. तेव्हा आता त्यांना दीर्घायुष्य लाभेल असे त्यांच्या मित्रांना वाटले. पण कसचे काय नि कसचे काय? १९१८ च्या अखेरीस त्यांचे थोरले बंधू विनायकराव ऊर्फ बाबुलभाई हे नागपूर भागात असलेल्या सावनेर गावी त्यांना घेऊन गेले. तेथे २३ जानेवारी १९१९ रोजी रात्रौ त्यांचे अवसान झाले. मरणापूर्वी थोडा वेळ आधी त्यांनी 'भावबंधन' नाटकाचा शेवटचा भाग लिहून पूर्ण केला. दुसऱ्या दिवसापासून 'राजसंन्यास' नाटक लिहिण्याला ते प्रारंभ करणार होते. आपल्या मरणाची त्यांना अगोदरच कल्पना येऊन चुकली होती. तेव्हा ते म्हणाले, "काय मौज आहे! नवसारीला जन्माला आलो नि सावनेरीला मेलो।" विनोदाने त्यांची सोबत शेवटपर्यंत सोडली नाही.

तात्यासाहेब कोल्हटकरांना ही दुःखद वार्ता जेव्हा समजली तेव्हा त्यांनी विनायकरावांना पत्र लिहिले, "महाराष्ट्रातील अत्यंत प्रतिभावान कवी, नाटककार व लेखक आज नाहीसा झाला. त्यांचा देह जरी नष्ट झाला आहे तरी ते कीर्तिरूपाने नेहमी अवशिष्टच राहतील यात काय शंका?" त्यांच्या मृत्यूला आज पन्नास वर्षे पूर्ण झाली, तरी त्यांची कीर्ती एकसारखी वाढतच आहे.

त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीला मी त्यांच्यावर लिहिलेली कविता वाचण्यात आली. दुसऱ्या पुण्यतिथीला आभार मानण्याचे काम माझ्याकडे आले. तिसऱ्या पुण्यतिथीपासून कुठे वक्ता तर कुठे अध्यक्ष या नात्याने मी त्यांच्या प्रत्येक पुण्यतिथीला जवळ जवळ पन्नास वर्षे (एखादे दुसरे वर्ष सोडून) बोलतोच आहे. गडकऱ्यांच्यावर मी जितके बोललो आहे नि जितके लिहिले आहे, तितके महाराष्ट्रात कोणीच लिहिले नाही असा माझा दावा आहे!

गडकऱ्यांमुळेच मला आजचे हे दिवस दिसताहेत. कोल्हटकर नसते तर गडकरी नसते! अन् गडकरी नसते तर माझे नावदेखील महाराष्ट्रात कोणाला ऐकू आले नसते! ही कृतज्ञता आहे. आढ्यता नाही.

मराठा : २३-१-१९६९

## ५

# बालकवी

' बालकवी ' म्हणजे त्र्यंबक बापूजी ठोमरे. मराठी वाङ्मयात ' ध्रुवा 'प्रमाणे ' बालकवीं 'ना अढळपद मिळालेले आहे. ' आनंदी आनंद गडे । इकडे तिकडे चोहिकडे ' हे बालकवींचे अमर आनंदगीत ज्याला माहीत नसेल असा कोणी एखादा करंटा मराठी माणूस असू शकेल काय हो ? ' बी ' कवींनी ' सृष्टीचा लडिवाळ बाळ वेल्हाळ कवी धाकटा ' असे जे कवीचे वर्णन केलेले आहे, ते जर कोणाला यथार्थ लागू पडत असेल तर ते बालकवींना. बालकवी म्हणजे खरोखरच निसर्गाचे लाडके बाळ होते. निसर्गाने त्यांना बाळकडू दिले. निसर्गाने त्यांना स्तन्य पाजले. निसर्गाच्या हिरव्यागार मखमली अंकावर ते खेळले नि वाढले. ' फुलराणी 'चे जे वर्णन त्यांनी आपल्या काव्यात केलेले आहे :

हिरवे हिरवेगार गालिचे । हरित तृणाच्या मखमालीचे
त्या सुंदर मखमालीवरती । फुलराणी ही खेळत होती !

ते जणू काही त्यांच्या स्वतःच्याच जीवनाचे वर्णन आहे. रानावनातून ह्या झाडावरून त्या झाडावर उडणारी स्वच्छंदी पाखरे ज्याप्रमाणे निसर्गाची गाणी गातात त्याप्रमाणे जन्मभर बालकवींनी निसर्गाचीच गाणी गायिली. पूर्व दिशेच्या क्षितिजाआडून लाल गुलाबी ' अरुण ' डोकावला रे डोकावला, की बालकवींच्या मुखातून कारंजाच्या धारेप्रमाणे कवितेच्या ओळी उचंबळू लागल्याच म्हणून समजावे :

पूर्वसमुद्री छटा पसरली रम्य सुवर्णाची,

कुणी उधळली मूठ नभी ही लाल गुलालाची ?

सकाळ होताच आभाळात पक्षी भराऱ्या मारू लागले की बालकवींनी त्यांना सांगितलेच की,

ना, गा, गा विहगा गीते। टाक भारुनी जगताते
जड जगताला। शून्य नभाला
जीवित नव अर्पायाते। गा, गा, गा विहगा गीते!

डोंगराच्या अंगाखांद्यावरून उड्या मारीत आणि रानावनाच्या मांडीवरून खिदळत चाललेला एखादा झरा पाहिला की बालकवी गाऊ लागलेच :

गिरिशिखरे वनमालाही, दरीदरी घुमवित येई
कड्यावरुनि घेऊन उड्या, खेळ लतावलयी फुगड्या
घे लोळण खडकावरती, फिर गरगर अंगाभवती!

एखाद्या पाणवठ्याशेजारचे ' औदुंबरा 'चे झाड त्यांना

पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर!

असे दिसू लागते. संध्याकाळ, चांदण्या आणि रात्र ह्यांची तर त्यांच्या मनावर विलक्षण मोहिनी होती. ' संध्यतारक ' दृष्टीस पडला की

दिनरजनीच्या हृदयावरले
प्रेमसंगमी उद्भवलेले
मुग्ध तान्हुले फूलच पहिले

असे त्यांना वाटे. रात्रीच्या वेळी सारे जग झोपल्यानंतर आकाशात लाजत लाजत आणि गात गात येणाऱ्या ' चांदण्यां 'चे गाणे फक्त त्यांनाच ऐकू येई :

कुणि नाही ग कुणि नाही, आम्हांला पाहत बाई!
शांति दाटली चोहिकडे, या ग, आता पुढे पुढे
लाजत लाजत। हळूच हासत,
खेळ गडे खेळू काही, कोणीही पाहत नाही!

फुलपाखरू ज्याप्रमाणे कळ्या-फुलांवरून बागडते, त्याप्रमाणे बालकवी हे जन्मभर निसर्गाच्या सौंदर्यावरून बागडले. ' ब्रह्मांड ' ही एक अक्षय फुललेली ' सदाफुली ' आहे. तिची ' फुले ' पाहिली की ते वेडे होत आणि एकदम गुंगू लागत :

तुला बघावे गुंगावे। गुंगतचि चुंबुनि घ्यावे

त्या सौंदर्यफुलांवरच जन्मभर बागडावे, त्या फुलातच झोपावे, त्या फुलातच

स्वप्नावे आणि ती स्वप्ने पाहता पाहता त्या स्वप्नातच मरून जावे ही एकच त्यांची इच्छा होती.

सुमकोषी आपोआप । क्षण घ्यावी साखरझोप
डोलतची जागे व्हावे । हासतची गुंगत जावे
सत्याची स्वप्ने व्हावी । सत्याला स्वप्ने यावी
स्वप्नीही स्वप्ने बघत । स्वप्नातच व्हावा अंत
मरण्याचे स्वप्नही गोड । जगण्याचे स्वप्नही गोड

बालकवींनी जगाची कधीच पर्वा केली नाही.

जगाचे बंध कोणाला ? जगाचा बांधला त्याला !

जगाचे सारे बंध बालकवींनी जन्मतःच तोडून टाकले होते. माणसांच्या जगात ते मुळी राहातच नव्हते. फुलांच्या, पाखरांच्या, झऱ्यांच्या आणि चांदण्यांच्या सृष्टीत ते जगले, खेळले, गायले ! म्हणून बालकवींच्या शब्दा-शब्दात अमृताची गोडी आणि पैंजणांची रुमझुम भरलेली आहे. असे नाद-मधुर काव्य मराठी भाषेत कोणी लिहिलेच नाही. बालकवींची कविता वाचताना पौर्णिमेच्या चांदण्यात प्राजक्ताच्या झाडाखाली बसल्यासारखे वाटते. म्हणूनच 'गोविंदाग्रजां'नी 'नवकवितेच्या जरिपटक्याचा तुलाच अधिकार' असा बालकवींचा त्यांच्या हयातीतच गौरव केला होता.

अशा या महाराष्ट्राच्या लाडक्या बालकवीचे रसाळ चरित्र सांगणारा आणि काव्यविवेचन करणारा एक सुंदर ग्रंथ वेळगावचे श्री. कृ. बा. मराठे ह्यांनी अनेक वर्षांचे परिश्रम करून लिहिलेला आहे. ( मौज प्रकाशन : किंमत साडेबारा रुपये ) नाशिकच्या प्रा. भा. ल. पाटणकरांनी 'बालकवींची समग्र कविता' वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध केली. तिला त्यांनी पाऊणशे पानांचे बालकवींचे एक चरित्र जोडलेले आहे. त्या चरित्रापेक्षा मराठ्यांनी लिहिलेले हे चरित्र अधिक तपशीलवार आणि वास्तविक आहे. ह्या ग्रंथाच्या शेवटी बालकवींची अडतीस पत्रे जी दिलेली आहेत, त्यांनी बालकवींच्या मानसिक जीवनावर चांगलाच प्रकाश टाकलेला आहे. बालकवींच्या चरित्राची साधनसामग्री अत्यंत त्रोटक आणि विस्कळीत असताना आणि त्यांच्या परिचयाची बहुतेक मंडळी भूत-काळात अंतर्धान पावलेली असताना श्री. कृ. बा. मराठे ह्यांनी बालकवींचे इतके सुंदर चरित्र लिहावे ही खरोखरच कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे. बालकवी ह्यांना तर आम्ही आमचे काव्यगुरूच मानतो. त्यांच्याशी आमचा

परिचय होता. त्यांचे धाकटे बंधू आमच्या वर्गात होते. तथापि, त्या काळी बालकवींबद्दल आम्हांला ज्या कित्येक गोष्टी माहीत नव्हत्या, त्या आम्हांला मराठ्यांच्या ह्या ग्रंथावरून समजल्या. विशेषतः, बालकवींच्या मृत्यूची जी एक भयानक पार्श्वभूमी मराठे ह्यांनी दिग्दर्शित केली आहे ती वाचून तर आम्ही हतबुद्धच होऊन गेलो. ५ मे १९१८ रोजी खानदेशामधील भादली (नशिराबाद) स्टेशनाकडे जाण्यासाठी रेल्वेचे रूळ ओलांडताना आगगाडीखाली सापडून बालकवींचा अंत झाला, हे सर्वांना माहीत आहे. पण रूळ ओलांडताना एका बाजूने आगगाडी येते आहे ह्याचे बालकवींना बिलकूल भान राहू नये ह्याचे कारण काय? एवढा भ्रमिष्टपणा त्यांच्यात कशामुळे निर्माण झाला! त्याचा इतिहास जो मराठ्यांनी सांगितला आहे तो अत्यंत विदारक आहे. तो असा :

जळगावला केशवराव सोनाळकर म्हणून एक वकील होते. ते चांगल्यापैकी कवी होते. बालकवींची नि त्यांची जानीदोस्ती होती. बालकवी त्यांना थोरल्या भावाप्रमाणे मानीत. पण सोनाळकर आणि बालकवी ह्यांच्या जीवनात जमीन-अस्मानाचे अंतर होते. बालकवी हे 'फुलपाखरू' होते, तर सोनाळकर हे 'चंडोल' होते; आणि ह्या 'चंडोला'ने ह्या 'फुलपाखरा'ला बनविले. सोनाळकरांची एक 'बाई' होती. तिचे नाव 'रमाई' किंवा 'रमाबाई'. ती एक तरुण विधवा होती. दिसावयाला फारच सुंदर होती. ती कविता करीत असे आणि तिला अध्यात्माचा थोडासा नाद होता. हिच्या सौंदर्याची आणि 'योगसामर्थ्या'ची अत्यंत भडक वर्णने सोनाळकर बालकवींच्याजवळ वेळोवेळी करीत असत. त्यामुळे तिला न पाहताच बालकवींच्या मनात तिच्याबद्दल साहजिकच प्रेमभाव निर्माण झाला. तथापि 'रमाई' ही सोनाळकरांची म्हणजे आपल्या बंधुतुल्य मित्राची 'प्रेयसी', तिच्यावर 'कामुक प्रेम' करणे हे पाप नव्हे का? म्हणून तिच्याबद्दल आपल्या मनात 'मातृभावना' निर्माण करण्याची बालकवींनी पराकाष्ठा केली, पण सोनाळकर त्यांना चिथावीत की, "एकाच स्त्रीच्या ठिकाणी पत्नीचे सौंदर्य आणि मातेची वत्सलता ह्यांचा अनुभव देणारी अशी ही ध्येयदेवता आहे 'रमाई!'" अशा तऱ्हेने सोनाळकरांनी बालकवींच्या भोवती एक प्रकारचा 'भूलभुलैय्या' निर्माण केला. बालकवी 'रमाई'ला आपली 'आई' समजू लागले, आणि स्वतःचा उल्लेख ते 'रमाईचा बाळ' असा करू लागले. 'संताचा अनुवाद' ह्या कवितेत 'देवे तुम्हा दिली आई।

तैशी ब्रह्मांडी रमाई' आणि 'म्हणे रमाईचे बाळ। हेचि आत सर्वकाळ' असे रमाईचे स्पष्ट उल्लेख आहेत. बालकवींच्या आईचे नाव गोदूबाई असताना, स्वतःला त्यांनी 'रमाईचे बाळ' असे संबोधावे हे आश्चर्य नव्हे काय? पण हा सारा सोनाळकरांचा उपद्व्याप! आणि असे असून एखाद्या 'प्रियतमे'ला भेटण्यासाठी 'प्रियकरा'ला जितकी आतुरता वाटावी, तितकी 'रमाई'ला भेटण्यासाठी बालकवींना उत्सुकता वाटत होती.

१९१७ च्या नोव्हेंबरात सोनाळकरांनी ठोमऱ्यांना पत्र लिहिले, की "आई आली रे भाऊ, आई आली!" पण हे पत्र ठोमऱ्यांना दहा दिवसांनंतर मिळाले. तेवढ्यात 'आई' निघून गेली होती. तेव्हा ठोमऱ्यांच्या आत्म्याची केवढी तडफड झाली, हे त्यांच्या पत्रावरून दिसून येते. ते सोनाळकरांना लिहितात, "तुझे पत्र—ते स्वर्गद्वारावरचे पासपत्र—मला उशिरा मिळाले. दुर्दैव माझे? आईला काय वाटले असेल? मी सहज आलो असतो. आईची भेट झाली असती. मनाच्या वेदना कमी केल्या असत्या. दुःख हलके केले असते. माझी आई मला केव्हा भेटेल? दैवाने दावा साधला. आईची भेट अंतरली. आईला कळव. मी दिवाळीला येईन. माझ्यावर दया करुणा काय पाहिजे ते कर. माझ्या आईची भेट हेच मी माझे भाग्य समजतो. आईच्या भेटीची मला फार फार आवश्यकता आहे!" स्वतःच्या आईला भेटण्याची बालकवींना काहीच अडचण नव्हती, मग त्यांनी आपल्या जिवाचा एवढा आटापिटा कशाला केला? त्यासाठी मध्यस्थाची जरुरी काय होती? आणि त्याची एवढी मनधरणी करण्याचे काय कारण? तेव्हा, ही 'आई' त्यांची जन्मदात्री आई नव्हती हे उघडच आहे.

मृत्यूच्या आदल्या दिवशी जळगावाहून सोनाळकरांची तार आली. बालकवी त्या वेळी आपल्या बहिणीकडे राहात होते. काय तार आली? तीच तार. 'आई आली रे भाऊ, आई आली?' ती तार वाचून बालकवी वेडे झाले. तोपर्यंत त्यांनी 'रमाई' पाहिलीच नव्हती. ते भादली स्टेशनकडे धावतच सुटले. त्यांना कशाचीच शुद्ध नव्हती. डोक्यात रमाई नि जळगावला जायची घाई! अशा मनःस्थितीत रेल्वे रूळ ओलांडताना तारेत जोडा अडकून ते खाली पडले. अंगावरून गाडी गेली नि देहाची खांडोळी झाली. जळगावच्या स्टेशनवर सोनाळककर वाट पाहात होते. तो त्या गाडीने ठोमरे येण्याऐवजी त्यांच्या मृत्यूची बातमी आली. ते ताबडतोब भादलीला आले आणि बालकवींच्या देहाचे

रक्तबंबाळ तुकडे त्यांनी पोत्यात भरले. बालकवींच्या कोटाच्या खिशातले ' घड्याळ ' मात्र ' टिक्–टिक् ' करीत होते ! बालकवींसारख्या भोळ्या जिवाची आपण उगाच दिशाभूल केली ह्याचा सोनाळकरांना पुढे पश्चात्ताप झाला. ' मधुगीते ' ह्या बालकवींच्या पहिल्या काव्यसंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत सोनाळकर लिहितात, " माय म्हटलेल्या मायविनीने दंश केलेल्या या प्रस्तुत कविमित्राच्या किंकाळीसरसा बालकवी धावून जात होता. तो मध्येच आगगाडी-खाली त्यांचा अंत झाला ! " यावरून ' रमाई ' ही ' माय ' नसून ' मायविनी ' होती. आणि तिने सोनाळकरांना दंश–का उपदंश ?–केलेला होता ! असल्या एका बाईला भेटण्यासाठी घाईघाईने जाता जाता बालकवींचा अंत झाला, ही त्यांच्या जीवनाची सर्वांत मोठी शोककथा आहे.–आणि गंमत ही की ' रमाई 'ची नि त्यांची आयुष्यात शेवटपर्यंत भेट झाली नाही ! जाऊ द्या झाले. आपल्या मरणा-बद्दल जगाने शोक करू नये, उलट आपले प्रेत पाहून जगाने गाणे गावे, अशी बालकवींची जिथे इच्छा होती, तेथे आपण का म्हणून छाती बडवून घ्यावी. बालकवी आणि त्यांचे काव्य अमर आहे ! त्याजवर मृत्यूची काहीच छाया नाही.

काव्यपाखरू हे मेले । जन म्हणतिल पाहुनि सगळे
नवलपरि यावर काही । मृत्यूचे चिन्हहि नाही !

मराठा : ८-७-१९६३

# ६

# केळकर : उदात्त आणि धीरगंभीर विभूती

पन्नास-पंचावन्न वर्षांपूर्वी पुण्यात राहणाऱ्या कोणाही जाणत्या मुलाला तीन नावांचे विलक्षण आकर्षण वाटत होते. एक, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, दुसरे कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, नि तिसरे नरसिंह चिंतामण केळकर. टिळक त्या वेळी तुरुंगात गेले होते नि त्यांच्या मागे त्यांचा राजकारणाची नि वर्तमानपत्रांची सूत्रे खाडिलकर आणि केळकर ह्यांच्याकडे आली होती.

खाडिलकर ह्यांनाच लोक त्या वेळी टिळकांचे पट्टशिष्य समजत. केळकरांचा अनुक्रम त्यांच्यानंतर लागे. खाडिलकर त्या वेळी 'काकासाहेब' नव्हते, नुसतेच कृष्णाजीपंत होते; आणि केळकर हेही तेव्हा 'तात्यासाहेब' नव्हते, नुसतेच 'नरसोपंत' होते. खाडिलकरांची वेषभूषा नि व्याख्यानाचा आवेश टिळकांसारखा होता, म्हणून तेच आम्हाला आवडत. नरसोपंतांजवळ विशेष वक्तृत्व नव्हते आणि 'जहाल' राजकारणाशी सुसंगत असा आवेश तर त्यांच्याजवळ बिलकूलच नव्हता. म्हणूनच त्यांची व्याख्याने आम्हाला आवडत नसत.

खाडिलकर हे नाटककार म्हणून त्या वेळी प्रसिद्धच होते, पण केळकरसुद्धा त्यांच्याप्रमाणे नाटके लिहू शकतील ह्याची आम्हांला सुतराम कल्पना नव्हती, पण केळकरानी लिहिलेले 'तोतयाचे बंड' जेव्हा रंगभूमीवर आले, तेव्हा आम्ही कोलमडलोच आणि त्यांचे 'मासिक मनोरंजन' मधून श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी जेव्हा अनेक लेखांक लिहून परीक्षण केले तेव्हा तर आमच्या

आश्चर्याला सीमाच राहिली नाही. कारण मी गडकऱ्यांचा शिष्य म्हणजे कोल्हटकरांचा नातशिष्य. आमच्या परात्परगुरूने ज्या नाटककाराला चांगले म्हटले तो चांगला असलाच पाहिजे असे आमचे सडेतोड समीकरण होते.

खरोखर केळकरांचे ' तोतयाचे बंड ' हे उत्कृष्टच नाटक होते. मला ते फारच आवडले. मी ते वीस-पंचवीस वेळा तरी पाहिले असेल. पैसे खर्च करून नाही, फुकट. ' चित्ताकर्षक नाटक मंडळी 'च्या मालकाची नि माझी चांगली ओळख होती. तेव्हा त्यांच्या वशिल्याने त्या कंपनीची सर्वच नाटके मला फुकट पाहावयास मिळाली. ' तोतयाच्या बंडा 'नंतर ' अमात्य माधव ' आणि त्यानंतर ' कृष्णार्जुन युद्ध ' ही केळकरांची नाटके तशीच सरस होती. ती नाटके मला आवडल्यामुळे माझ्या हिशेबी केळकरांचा भाव वधारला.

टिळकांचे जहाल राजकारण गडकऱ्यांना पचण्यासारखे नव्हते. टिळकांचे सबंध नाव उच्चारण्याची हिंमतसुद्धा त्यांना नव्हती. ' बी. जी. ' ह्या अद्याक्षराने ते त्यांचा उल्लेख करीत पण केळकरांचे खेळकर व्यक्तिमत्त्व नि सौम्य राजकारण गडकऱ्यांना फार आवडे. गडकऱ्यांचे गुरू जे कोल्हटकर त्यांची नि केळकर ह्यांची मैत्री असल्याने गडकऱ्यांचे नि केळकरांचे बरेच स्नेहसंबंध होते. आपल्या खासगी बैठकीत गडकरी केळकरांबद्दल नेहमी चांगले बोलत.

विशेषतः केळकरांच्या कोटिबाजपणाची गडकरी वारंवार वाखाणणी करीत. हरि नारायण आपटे हे ' गोखले ' पक्षाचे आणि केळकर हे ' टिळक ' पक्षाचे आणि ह्या दोन्ही पक्षांचे अगदी विळ्याभोपळ्याएवढे सूत होते. एकदा हरि-भाऊंनी आपल्या ' करमणुकीत ' " एका पैशाला पुण्यात पाच ' नाग नरसोबा ' विकत मिळतात. " अशी केळकरांची टर केली होती. तेव्हा हरिभाऊसारखे ' हरिचे लाल ' पुण्यामध्ये पैसा पासरी मिळतात असे केळकरांनी त्याला झणझणीत उत्तर दिले होते. ही गोष्ट आम्हांला गडकऱ्यांनीच सांगितली होती. गडकऱ्यांनी ' महाराष्ट्रगीत ' हे काव्य लिहिल्यानंतर प्रथम केळकरांना वाचून दाखविले. ते त्यांना फार आवडले. ते म्हणाले, " हे तुमचे काव्य महाराष्ट्रा-मधल्या सर्व क्रमिक पाठ्य-पुस्तकांत समाविष्ट करण्यात आले पाहिजे. " गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर मी लिहिलेली कविता प्रथम केळकरांना वाचून दाखविली. ती ऐकून त्यांनी माझी पाठ थोपटली.

टिळक वारल्यानंतर खाडिलकरांनी केसरी सोडून ' लोकमान्य ' काढला आणि 'केसरी'ची सर्व सूत्रे नरसोपंतांच्या हाती आली. टिळकांच्या राजकारणाचे

ते महाराष्ट्रामधले एकमेव वारस झाले. त्यानंतरच ते ‘तात्यासाहेब’ झाले नि त्यांच्या कर्तृत्वाला आणि वक्तृत्वाला एक निराळीच धार चढली. त्यामुळे ‘केसरी’ची लोकप्रियता पराकाष्ठेने वाढली. तर्कशुद्ध युक्तिवाद आणि मार्मिक कोटिक्रम ही त्यांच्या अग्रलेखाची दोन वैशिष्ट्ये होऊन बसली आणि टिळकांच्या काळातील ‘केसरी’ची लोकप्रियता केळकरांनी थोडक्या कालावधीत कायम केली.

महात्मा गांधींच्या असहकारितेच्या महापुरात केळकरांनी उडी मारली. त्या वेळी मी मुंबईला होतो. एकदा ‘मारवाडी विद्यालयात’ महात्मा गांधींची सभा होती. सभागृह तुडुंब भरून गेले होते. गांधीजींना यावयाला वेळ होता. तेव्हा केळकरांनीच व्याख्यान देऊन सभेला ते येईपर्यंत थोपवून धरले. नंतर गांधीजी आले. त्यांच्या मागोमाग प्रचंड जनसमुदाय आला. तेव्हा असे ठरले की, गांधीजींनी सभागृहात भाषण करावे नि बाहेरच्या समुदायापुढे केळकरांनी जाऊन भाषण करावे. कारण आतल्या सभागृहात केळकरांनी आधीच भाषण केले होते. त्याप्रमाणे गांधी आत गेले नि केळकर बाहेर आले. मी त्यांचा त्या वेळीं भक्त असल्याने मी त्यांच्याबरोबर बाहेर गेलो. बाहेरच्या समुदायापुढे बोलण्याला प्रारंभ करताना ते म्हणाले, “मी थोड्या वेळापूर्वी आत जे बोललो, तेच आता इथे बोलणार आहे. नाहीतर तुम्ही म्हणाल की ह्यांचे आत एक असते आणि बाहेर दुसरेच असते.” ते ऐकून श्रोत्यांत एकच हशा पिकला.

गांधीजींच्या असहकारितेच्या राजकारणातून केळकर बाहेर पडले नि चित्तरंजनदास नि मोतीलाल नेहरू ह्यांच्या ‘स्वराज्य पक्षा’त ते दाखल झाले. ‘कौन्सिलप्रवेश’ हा त्यांच्या पक्षाचा मुख्य कार्यक्रम होता. त्या वेळी मी गांधींच्या जहाल राजकारणाचा पुरस्कर्ता झालो होतो. म्हणून केळकरांचे मवाळ राजकीय धोरण आम्हा तरुणांना त्या वेळीं मुळीच आवडले नाही. म्हणून मी त्यांच्यावर त्या वर्षीच्या, पुण्याच्या मेळ्यासाठी एक विडंबन काव्य लिहिले, आणि त्यात केळकरांच्या कौन्सिलप्रवेशाची भरपूर थट्टाही केली. त्या गाण्याचे पहिले कडवे, “तात्या, कौन्सिलात जाणार रे। काय तिथे करणार? तात्या कौन्सिलात जाणार!” हे पद त्या वेळी पुण्यात खूपच लोकप्रिय झाले होते. पण त्याचा कर्ता मी होतो हे त्या वेळीं कोणालाच माहीत नव्हते.

विरोधकांची काव्यात्मक थट्टा करण्याच्या त्याच मानसिक अवस्थेमध्ये

असताना ' मी झेंडूची फुले ' लिहिली व ती ' शारदोपासक संमेलनात ' मी वाचून दाखविली. त्या वेळीं तात्यासाहेब तेथे हजर होते. त्यांना माझी विडंबन-काव्ये फारच आवडली. तेव्हापासून ते मला नावाने ओळखू लागले. पण त्यांच्या फार जवळ जाण्याच्या मी कधीच भानगडीत पडलो नाही.

१९२७ साली पुण्यात साहित्य संमेलन भरले होते. त्या वेळीं ' तात्या ' कोल्हाटकर होते संमेलनाध्यक्ष नि ' तात्या ' केळकर होते स्वागताध्यक्ष. ह्या दोन ' तात्यांच्या ' नेतृत्वामुळे संमेलनाला खूपच रंग भरला. त्याही संमेलनात पुन्हा ' झेंडूची फुले ' फार गाजली, भलतीच गाजली, त्यामुळे मी दोन्ही 'तात्यां'च्या चांगलाच लक्षात राहण्याइतका भरलो. त्यानंतर तात्यासाहेब केळकरांची नि माझी अधूनमधून कधी गाठ पडली तर ते एखाद-दुसरा शब्द तरी माझ्याशी हसून बोलू लागले.

एकोणीसशे सत्तावीस साली मी इंग्लंडला गेलो. तेव्हा माझ्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी माझ्या मदतीसाठी मी मुलांसाठी लिहिलेल्या ' गुरुदक्षिणा ' या नाटकाचा पुण्याच्या किर्लोस्कर नाटकगृहात प्रयोग करून मला साडेसातशे रुपये पाठविले. त्या नाट्य-प्रयोगाचे तात्यासाहेब अध्यक्ष होते. बोलूनचालून मुलांचे नाटक, ते काय पाहायचे ! म्हणून ' मी दहापाच मिनिटे येऊन बसेन ' असे तात्यांनी माझ्या विद्यार्थ्यांना सांगितले होते. पण त्यांना ते नाटक इतके आवडले की, ते सबंध नाटक पूर्ण होईपर्यंत थांबले. दुसऱ्या अंकानंतर भाषण करताना त्यांनी मला मुक्तकंठाने धन्यवाद दिले. माझ्या नाटकाचे नाव ' गुरुदक्षिणा ' आणि त्याच्या प्रयोगाचे साडेसातशे रुपये उत्पन्न, विद्यार्थी मला मदतीदाखल विलायतेला पाठविणार ह्या गोष्टीचा उल्लेख करून तात्या म्हणाले, " गुरूची विद्या गुरूला इतकी फळेल अशी त्याला कल्पना असेल की नाही कोणास ठाऊक ! " त्या वेळीं दोन मिनिटेपर्यंत साऱ्या नाटकगृहात हास्यकल्लोळ उसळला. त्या प्रसंगीचे तात्यांचे सारे भाषण माझ्या एका सहकारी शिक्षकाने टिपून घेतले होते. ' गुरुदक्षिणा ' नाटक हे जेव्हा पुढे मी छापून प्रसिद्ध केले तेव्हा प्रस्तावने-दाखल तात्यांचे ते भाषण त्यामध्ये मी छापले.

विलायतेहून परत आल्यानंतर मात्र तात्यासाहेबांच्या भेटीचा वरचेवर प्रसंग येई. कारण ते आमच्या ' महाराष्ट्र शारदा मंदिरा 'चे अध्यक्ष होते आणि मी होतो कार्याध्यक्ष. वर्षातून दोनदा आमच्या मंदिराचा वनविहाराचा कार्यक्रम होई. त्यामध्ये तात्या मोठ्या उत्साहाने भाग घेत. त्या वेळीं गप्पागोष्टींना जो

काही महापूर येई त्याला काही सीमा नसे. तात्यांच्या रसिकतेचे त्या वेळी खरे दर्शन आम्हाला होई. मात्र अशा कार्यक्रमात भाग घेण्याबाबत तात्यांची एक अट असे. ' जेवण झाल्यानंतर मी त्या ठिकाणी एक क्षणभरही थांबणार नाही. ' असे त्यांनी आम्हांला निक्षून सांगितलेले असे. जेवल्यानंतर ताबडतोब वामकुक्षी घेणे हा विन्स्टन चर्चिलप्रमाणे तात्यांचा शिरस्ता होता. तीच त्यांच्या दीर्घायुष्याची किल्ली होती. म्हणून ' वनविहारा 'मधला आमचा गप्पागोष्टींचा सर्व कार्यक्रम आम्ही सकाळीच उरकून घेत असू.

एकदा ' शिवाजीमंदिरात ' माझ्या ' झेंडूच्या फुलां 'चे माझे काव्यगायन झाले. ते लोकांना अतिशय आवडले. पण ' केसरी 'मधे दुसऱ्या दिवशी त्याच्यावर अत्यंत कडक टीका आली. माझे काव्य ग्राम्य नि अश्लील आहे असा त्या टीकेचा आशय होता. तो मजकूर ' केसरी 'च्या कोणा सहसंपादकाने लिहिला असल्याचे समजले. त्या टीकेला दुसऱ्या दिवशी ' ज्ञानप्रकाशात ' ' केसरी आणि कविता ' ह्या मथळ्याखाली मी एक झणझणीत उत्तर दिले नि त्यात त्या सहसंपादकाचा ' केसरीचे एकदशांश संपादक ' असा उल्लेख केला. त्या वेळच्या वाचकांना तो फारच आवडला. ' केसरी 'मधल्या त्या टीकेला माझ्याप्रमाणे ' भाऊसाहेब भोपटकरां 'नी आपल्या ' भाल्या 'तूनही ठणठणीत उत्तर देऊन माझ्या काव्याची प्रशंसा केली होती.

त्यानंतर ' केसरी ' कचेरीतल्या सहसंपादकांची नि माझी धुसफूस अधून-मधून वाढू लागली. प्रसंग सापडला रे सापडला की आम्ही दोघेही एकमेकांना बोचकारे घेऊ लागलो. ' वसंत व्याख्यान माले 'त ' अच्युत वाङ्मयावर ' बोलताना त्या वेळी मी म्हणालो, " अच्युतरावांनी अनेक पत्रे काढली नि अनेक बुडविली. पण ती सारी त्यांनी स्वतः काढलेली होती. दुसऱ्यांनी काढलेल्या पत्राच्या ' आयत्या बिळा 'मध्ये जाऊन बसण्याचे पाप त्यांनी कधी केले नाही ! "

अर्थात ही सर्व टीका ' केसरी ' पत्राच्या सह-संपादकावर होती. तिचा तात्यासाहेब केळकरांशी काहीच संबंध नव्हता. पुढे ' शारदा संमेलन ' आले. त्या वेळी कोणी तरी तात्यांचे कान फुंकले की, " अत्रे तुम्हाला आपल्या लेखा-तून आणि व्याख्यानातून वाटेल तशा शिव्या देत आहेत. असे असताना तुम्ही त्या ' शारदा संमेलना 'मध्ये जाऊन त्यांच्याबरोबर व्यासपीठावर बसणे हे काही तुमच्या प्रतिष्ठेला शोभत नाही. "

त्यावर तात्यांनी मला पत्र लिहिले. ( त्यांनी मला लिहिलेले ते पहिले

आणि शेवटचेच पत्र होय ). त्या पत्रात त्यांनी आपल्या कानावर आलेल्या त्या गोष्टीबद्दल माझ्याकडून खुलासा मागविला होता. मी त्यांना लिहिले, " तुमच्याबद्दल माझा आदर शब्दातीत आहे. तुमच्या कचेरीतली काही माणसे एकसारख्या माझ्या कुरापती काढीत असतात, आणि मी त्यांना परस्पर चपराकी देत असतो. ही आमची लहान माणसांची क्षुद्र भांडणे आहेत. याच्याकडे तुमच्यासारख्या थोर वडीलधाऱ्या माणसांनी लक्ष देऊ नये एवढीच माझी तुम्हांला विनंती आहे. " हे माझे उत्तर, तात्यांना आलेल्या पत्रांच्या एका संग्रहात छापलेले आहे.

त्या माझ्या खुलाशाने तात्या खूष झाले. त्यामुळे मोठ्या आनंदाने डुलत डुलत ते संमेलनाला आले. त्यांच्या उत्फुल्ल चेहऱ्यामुळे संमेलनाच्या वातावरणात एक प्रकारची प्रसन्नता निर्माण झाली अन् त्यामुळे संमेलनाला खूपच रंग भरला.

' विनोदा 'च्या चर्चेत मुख्य भाषण माझे होते. मी तात्यांच्या विनोदाचे कित्येक बहारीचे नमुने सांगून सभेत हास्यकल्लोळ उडवून दिला. शेवटी तात्यांचे भाषण झाले. तेव्हा त्यांनी एकेका उपमेत मराठी कवींचे यथार्थ वर्णन केले. ते श्रोत्यांना अतिशय आवडले. गिरीशांच्या कवितेचे वर्णन करताना ते म्हणाले, " एखाद्या ब्राह्मणाच्या बाईने कुणब्याचे सोंग मुद्दाम घेऊन यावे तशी गिरीशांची कविता आहे. "

त्यावर श्रोते ओरडले, " अत्र्यांची कविता कशी आहे ? "

तेव्हा माझ्याकडे मिष्किल मुद्रेने पाहात तात्या म्हणाले, " अत्र्यांची कविता अस्त्रलीच्या गुदगुल्यांसारखी आहे. ती हासून हासून मुरकुंड्याही वळविते आणि शेवटी जीवही घेते ! "

दोन मिनिटे ' गोखले हॉल ' हशा नि टाळ्यांनी हादरून गेला.

एकोणीसशे तेहतीस मधे ' साष्टांग नमस्कार ' ह्या माझ्या पहिल्या नाटकाचा प्रयोग पुण्याच्या ' विजयानंद नाटकगृहात ' झाला. माझ्या आयुष्यातील त्या क्रांतिकारक प्रसंगी तात्यांखेरीज मी दुसऱ्या कोणाला अध्यक्ष करणार ? तोपर्यंत त्यांच्या नि माझ्यात आपलेपणाचा एक जिव्हाळा निर्माण झालेला होता. माझी तात्यांनी मोठ्या आनंदाने विनंती मान्य केली. पण ती करताना जरा गंभीर मुद्रा करून त्यांनी विचारले, " चांगले लिहिले आहेत ना नाटक ? आतापर्यंतच्या साहित्यात तुम्ही मिळविलेले नाव वाढले पाहिजे–निदान आहे तेवढे तरी

राहिले पाहिजे."

माझ्याबद्दल तात्यांना वाटणारी ती चिंता केवळ माझ्या अंतःकरणालाच समजणारी होती. सद्‍गदित स्वराने मी त्यांना म्हणालो, "आताच मी काय सांगू? पण तुमची निराशा होणार नाही एवढेच मी सांगतो!"

तात्यांना नाटक फार आवडले. दुसऱ्या अंकानंतर भाषण करताना ते म्हणाले, "अत्रे विडंबनकार म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'झेंडूच्या फुला'चा प्रसाद मिळालेले कित्येक साहित्यिक इथे हजर आहेत. अत्रे यांची विनोदमूर्ती महाराष्ट्रीय साहित्यात सुप्रसिद्ध आहे. 'साष्टांग नमस्कार' नाटकाचा आतापर्यंत आपण जो भाग पाहिला आहे त्यातील विनोदाने आपणांस आनंदित केले आहे. पण सध्याच्या समाजातील गोष्टींवर या नाटकामध्ये जी विडंबनात्मक टीका केलेली आहे, ती एकंदरीत चांगल्या प्रकारची आहे.

"अत्रे यांच्या विडंबनात अश्लीलतेचा अभाव आहे असेही मी म्हणतो. ती फार चांगली गोष्ट आहे. अलीकडे रंगभूमीवर विनोद किंवा विडंबन याच्या नावाखाली अश्लीलता बोकाळते आहे हे तुम्हाला माहीतच आहे. 'साष्टांग नमस्कारा'ला कथानक नाहीच म्हटले तरी चालेल. नाटक पाहावयास वाटेल तेव्हा यावे अन् वाटेल तेव्हा जावे आणि आपली भरपूर करमणूक करून घ्यावी, हाही ह्या नाट्यकृतीचा एक गुणच असू शकेल. सध्या चोहीकडे फोफावलेल्या कविवर्गाला या नाटकात बराच प्रसाद मिळाला आहे. या नाटकातील रावबहादुरांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे अर्थात त्यांच्या आवाजाचे मला अनुकरण करता येत नाही, हे नाटक म्हणजे काय म्हणाल तर फार्सच आहे. अशीच सरस नाटके अत्रे ह्यांच्या हातून निर्माण होवोत हीच इच्छा!"

कोणतेही माझे नवीन नाटक निघाले म्हणजे मी तात्यासाहेबांना आवर्जून बोलवीत असे. माझ्या नाटकांवर ते नेहमी प्रसन्न असत. तथापि, 'उद्याच्या संसारा'ने त्यांच्या मनावर सगळ्यात जास्त परिणाम केला. शेवटच्या अंकात उपरणे तोंडासमोर धरून तात्यासाहेब गदगदून हुंदके देत होते. मी त्यांच्या शेजारीच बसलो होतो. नाटक संपल्यानंतर मी त्यांना रंगभूमीवर आत घेऊन गेलो. माझी पाठ थोपटून ते म्हणाले, "आयुष्याचा अर्क काढून ओतला आहात तुम्ही या नाटकात. जोपर्यंत तुमच्या प्रतिभेला असा बहर येतो आहे तोपर्यंत एकसारखे असेच लिहीत राहा. थांबू नका."

पुणे सोडून मी १९४१ साली मुंबईला गेलो, त्यानंतर माझा नि तात्यांचा

संबंधच तुटला. तात्या वारले त्या वेळी मी खंडाळ्याला होतो. कोणी तरी मला तिथे कळविले. तसाच मी पुण्याला आलो नि तडक 'डेक्कन जिमखान्या'वरील तात्यांच्या बंगल्यावर जाऊन तात्यांचे अन्त्यदर्शन घेतले. ना. गोखल्यांप्रमाणे तात्या मृतावस्थेतही अत्यंत कांतिमान दिसत होते. मृत्यूने जणू काही त्यांच्या देहाला स्पर्शच केला नव्हता.

त्यांच्या शवाला खांदा देताना ह्याच खांद्यावर पंधरा वर्षांपूर्वी एकदा आपले डोके टेकवून तात्या खदखदा हसले होते, ह्या गोष्टीची आठवण झाल्यावाचून राहिली नाही. ओंकारेश्वराच्या स्मशानात भाषण करताना पहिल्या वाक्यात महाराष्ट्राच्या भावना मी व्यक्त केल्या होत्या, "महाभरताचे एक महान पर्व समाप्त झाल्यासारखे आज वाटत आहे!"

आजही माझी तीच भावना आहे. तात्यासाहेबांची आठवण झाली की, महाभारतामधील एखादी उदात्त आणि धीरगंभीर विभूती आपल्या डोळ्यांसमोर उभी आहे असे वाटते!

केसरी : ५-११-१९६४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ९९०९९ वि. ...
क्रमांक ९८८५ नों. दि. ३-४-९२

७

# पुन्हा बांदेकर होणार नाही !

बांदेकर जाऊन आज तीन आठवडे पूर्ण झाले. ह्या तीन आठवड्यांत त्यांच्या अकाल नि आकस्मिक मृत्यूबद्दलचे शोक व्यक्त करणाऱ्या दुखवट्यांच्या पत्रांचा आमच्यावर अक्षरशः पाऊस पडलेला आहे. अनेक वृत्तपत्रांनी, साहित्य मंडळांनी, सार्वजनिक सभांनी आणि स्थानिक संस्थांनी त्यांच्या दुखवट्याचे लेख लिहून नि ठराव मंजूर करून त्यांच्या वाङ्मयीन सेवेबद्दल आणि हृदयाचा अचूक वेध घेणाऱ्या त्यांच्या विनोदाबद्दल आदर व्यक्त केला आहे. त्या सर्वांचे आम्ही आमच्या साप्ताहिकातर्फे आणि बांदेकर कुटुंबियांतर्फे आभार मानतो. उभ्या हयातीत बांदेकरांनी व्यक्तिगत प्रसिद्धी टाळली. त्यांच्या विनोदी लेखामुळे त्यांच्या नावाला जेवढी लोकप्रियता लाभली त्याच्यापेक्षा अधिक लौकिक मिळविण्याच्या भानगडीत ते कधीच पडले नाहीत. कधी कोणाशी त्यांनी मैत्री केली नाही, कधी कोणाच्या घरी ते गेले नाहीत किंवा कधी कोणाला आपल्या बिऱ्हाडी त्यांनी बोलावले नाही. सभा, संमेलने नि भोजने त्यांनी कटाक्षाने टाळली. आमच्या कार्यालयात त्यांना ‘ पाहण्यासाठी ’ म्हणून कित्येकदा काही माणसे येत. त्यांच्याशी ते इतक्या तुसडेपणाने वागत की, ती माणसे बिलकूल त्यांच्यापासून दूर पळत. पुष्कळ लोक मला विचारीत की, ‘ काय हो, बांदेकर कसे दिसतात ? ’ त्यावर मी त्यांना सांगे की, ‘ ज्यांना पाहिल्यावर ते बांदेकर नसावेत असे तुम्हांला खात्रीने वाटेल, तेच बांदेकर ! ’

अशा रीतीने लौकिक कीर्तीच्या आणि प्रसिद्धीच्या वाऱ्यालासुद्धा आयुष्यात

जे कधी उभे राहिले नाहीत, ते काळाच्या पडद्याआड अंतर्धान पावताच कीर्तीने त्यांच्या पाठीशी हात धुऊन लागावे हा मोठा चमत्कारिक योगायोग आहे, यात काही शंका नाही. बांदेकर आमच्याकडे वीस वर्षे आहेत; पण एकदाही मी त्यांच्या घरी गेलो नाही. तेही एवढ्या काळात माझ्याकडे दहापाच वेळेपेक्षा कधीही आले नाहीत. नवयुग कार्यालयात त्यांची आणि माझी जेवढी गाठ पडे तेवढीच. तेथेच त्यांच्याशी जे काय बोलणे होई तेवढेच. ह्याव्यतिरिक्त त्यांचा आणि माझा क्वचित संबंध येई.

ते नेहमी स्वतःच्या तंद्रीत असत. कधी लहर आली तर ते आपण होऊन माझ्या टेबलाजवळ येत अन् त्यांच्या मनात जे असेल ते भडाभडा सांगून टाकत. माझ्या लिखाणातला एखादा भाग त्यांना आवडला तर ते मला येऊन सांगत. त्यांच्या लेखनातला एखादा भाग मला विशेष कौतुकास्पद वाटला तर त्यांना मी मुद्दाम माझ्याकडे बोलावून घेऊन सांगे; पण ही 'परस्पर प्रशंसा' फारच त्रोटक आणि औपचारिक असे. एक-दोन वाक्यांपलीकडे तिचा फारसा विस्तार होत नसे. मला पुष्कळदा वाटे, की त्यांनी माझ्याबरोबर यावे, बसावे, जेवावे, हिंडावे; पण असा काही योग येण्याचा संभव त्यांना दिसला की, त्यांनी झुकांडी मारलीच म्हणून समजावी. नाही म्हणायला एक-दोन वेळा ते खंडाळ्याला माझ्या बंगल्यावर प्रतिवर्षी भरणाऱ्या साहित्यिक मेळाव्यामधे सामील झालेले मला आठवतात. दोन-चार वेळा मी त्यांना 'फोर्ट' मधील नामांकित हॉटेलात आग्रहाने जेवावयाला घेऊन गेलो होतो. पण वीस वर्षांच्या दीर्घकालीन साहचर्यात असे प्रसंग केवळ हाताच्या बोटांवरच मोजता येतील.

छप्पन्न सालच्या सात ऑगस्टला जेव्हा लोकसभेत महाराष्ट्रावर आणि गुजरातवर द्विभाषिक जबरदस्तीने लादले, त्याची भयानक प्रतिक्रिया अहमदाबाद-मधे घडली. कॅांग्रेस हाऊससमोर जमलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रचंड मेळाव्यावर मोरारजींनी राक्षसी गोळीबार केला. तेव्हा नऊ ऑगस्टला मी बांदेकरांना मुद्दाम घेऊन विमानाने मुंबईहून अहमदाबादला गेलो. तीन दिवस आम्ही तेथे एकत्र राहिलो आणि मोरारजीविरुद्ध लोकसंतापाचा जो भयानक ज्वालामुखी फुटला होता, त्याचे समक्ष अवलोकन केले. बांदेकर अन् मी जास्तीत जास्त एकत्र राहिलो असू तर केवळ त्याच वेळी. 'तुम्ही मला विमानात बसविले' असे म्हणून एखाद्या लहान मुलाप्रमाणे त्यांनी माझ्याभोवती नाचावयाचे तेवढेच शिल्लक ठेवले होते, इतका त्यांना त्याचा आनंद झाला होता.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ...

ह्या वीस वर्षांच्या काळात बांदेकरांचा नि माझा साहित्यिक किंवा राजकीय प्रश्नांत एक दिवस कधी मतभेद झालेला नाही. प्रत्येक आठवड्याच्या पहिल्या दिवशी मी त्यांना समक्ष वा फोनवरून सांगे की, या आठवड्यामधे अमुक अमुक प्रश्नाला राजकीय महत्त्व आहे आणि त्यावर मी माझे 'अत्रे उवाच' लिहिणार आहे. एवढे त्यांना सांगितले म्हणजे पुरे. मग त्या विषयाच्या अनुषंगाने ते आपल्या पहिल्या पानावरचा विनोदी मालमसाला तयार करीत. नवयुगाचे जुने अंक चाळून पाहणाऱ्यांना वर्षानुवर्षे त्यांचे नि माझे अशा रीतीने वैचारिक गोत्र जुळून आलेले आढळून येईल. एकच उदाहरण सांगतो. ५ जानेवारी १९५८ च्या अंकात 'यशवंतराव चव्हाणांच्या वल्गना' या मथळ्याचे माझे 'अत्रे उवाच' आहे. त्यात 'महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस'च्या पदाधिकाऱ्यांच्या नव्या निवडणुका होऊन मामा देवगिरीकरांच्या जागी मालोजीराव फलटणकर ह्यांची निवडणूक जी करण्यात आली तिला उद्देशून यशवंतराव चव्हाणांनी त्या वेळी केलेल्या भाषणावर मी कडक टीका केलेली आहे. त्याच अंकात 'म्हातारा नवरा गंमतीला' ह्या मथळ्याखाली बांदेकरांनी मालोजीरावांची मोठी बहारदार बंमेरी उडवली आहे :

पाहिजे ! पाहिजे !!
पुणेरी टांग्याला म्हातारा घोडा
पाहिजे !

गाडीसाठी घोडा पाहिजे. महाराष्ट्र काँग्रेसच्या टांग्याला जुंपण्यासाठी त्वरित जरुरी आहे. जुना घोडा (मामा देवगिरीकर) बराच थकला असून, त्याला विश्रांतीची आवश्यकता आहे. म्हणून नवा घोडा ताबडतोब पाहिजे. नवा घोडा तरुण नको. पोक्त आणि अनुभवी घोडा पसंत केला जाईल. कारण आमचा टांगा जुनाट व मोडकातोडका आहे. टांगा खड्डयात पडणार नाही याची खबरदारी घोड्याला घ्यावी लागेल. घोड्याला सर्कसीचा अनुभव असल्यास उत्तम. महाराष्ट्र काँग्रेसचा टांगा ओढताना खूपच सर्कस करावी लागते. एवढ्यात एक घोडेवाला येतो.

घोडेवाला : रामराम सूर्याजी पिसाळ, हा आमचा फलटणचा खानदानी घोडा पाहून घ्या. तुमच्या टांग्याला जसा पाहिजे तसा आहे.

भांडवलवाला, मोटरवाला
घोडा माझा फलटणवाला

राळ्याचा भात पंक्तीला
म्हातारा घोडा गंमतीला
माझा घोडा खातो पेढा
सभेमध्ये घेतो जोडा
घोडा माझा आपटीखाऊ
आपटीखाऊ आम्ही रडतराव
तुमचा टांगा आमचा घोडा
जमला कसा छान जोडा !

प्रत्येक आठवड्याला कोणता विषय किंवा कोणती व्यक्ती हास्यास्पद करावयाची ह्याबाबत एकदा आमची चर्चा झाली की, मग बांदेकर आपल्या स्वतंत्र प्रतिभेमधून अशी काही अद्‌भुत 'विनोदवल्ली' निर्माण करीत की, ती पाहून मी थक्क होत असे. शंकरराव देव, मालोजीराव निंबाळकर, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण ह्यांच्या मागे जेव्हा छप्पन्न-सत्तावन्न साली महाराष्ट्रातील जनता काळीं निशाणे घेऊन धावू लागली, तेव्हा

फलटणच्या मोरा
सासवडच्या चोरा
नाशिकच्या फितुरा
साताऱ्च्या मुजोरा
बांगड्या भरा अहो, बांगड्या भरा !

असे अद्‌भुत 'लोकगीत' बांदेकरांनी निर्माण केले तर त्रिंबकमामा देवगिरीकर 'राज्यपुनर्रचना समिती'चा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर जेव्हा पुणे ते दिल्ली वाऱ्या करू लागले तेव्हा

त्रिंबकमामा, त्रिंबकमामा
खाइ थालिपिठ आणि फुटाणा
कुंथत कुंथत जाई विमाना
दिल्लित जाऊन पडे उताणा

असे संयुक्त महाराष्ट्रामधल्या मुलाबाळांसाठी बांदेकरांनी एक अत्यंत प्रासादिक 'बालगीत' निर्माण केले होते. पण त्या वेळचे 'लोकमान्या'चे संपादक पांडोबा गाडगीळ ह्यांच्यावर त्यांनी जे 'शिशुगीत' लिहिले ते इतके अपूर्व आहे की, त्याची स्तुती करावयाला माझ्याजवळ शब्दच नाहीत. पांडोबा गाडगीळ

ह्यांचे बांदेकरांवर विलक्षण प्रेम होते. स्वतः पांडोबादेखील आपल्यावर बांदेकरांनी केलेले हे विडंबन वाचून पोट धरधरून हसले असतील.

पांडोबा, पांडोबा, भागलास का
शेटजीच्या डगल्याखाली लपलास का!
शेटजीचा डगला गुजराती
मंत्र्यांचा वाडा चिकणमाती
मंत्र्यांचा वाडा पाहून जा
तूपरोटी खाऊन जा
तुपात पडला 'मामा'
पांडोबा देई राजिनामा
पण—
दुसऱ्या दिवशी जाई कामा!

बांदेकरांची विनोदी प्रतिभा सर्वस्वी स्वतंत्र होती. त्यांचे जसे विषय स्वतंत्र, तसा त्यांचा दृष्टिकोण स्वतंत्र आणि त्यांचे तंत्रही स्वतंत्र. कोल्हटकर, गडकरी आणि चिं. वि. जोशी ह्या श्रेष्ठ विनोदी लेखकांनी मराठी वाङ्मयात ज्या महान परंपरा निर्माण करून ठेवल्या त्यांचा बांदेकरांच्या विनोदाला मुतराम संपर्क नाही. बांदेकरांचे वाचन वेताचे आणि इंग्रजी भाषेचे ज्ञानही सामान्य. म्हणून पाश्चात्त्य विनोदपंडितांचा त्यांच्यावर लवमात्र संस्कार झालेला आढळणार नाही. गरिबांचे नि दलितांचे प्रत्यक्ष जीवन हे विनोदाचा कच्चा माल जमविण्याचे त्यांचे क्षेत्र. त्या क्षेत्राकडे महाराष्ट्रातल्या पूर्वीच्या लेखकांनी ढुंकूनसुद्धा कधी पाहिले नाही.

बांदेकरांचे विनोदी लेखन हे अत्यंत विदारक असे. वास्तववादी असल्याने दैनंदिन राजकारणाशी त्यांचा रोजच्या रोज संबंध येई. त्यांचा सारा जन्म वृत्तपत्राच्या सृष्टीत गेल्यामुळे त्यांचा पिंड साहजिकच राजकारणावरच पोसला होता. त्यामुळे त्यांच्या विनोदात जो ताजेपणा आणि खमंगपणा आढळून येई, त्याचा मागमूसही इतरांच्या विनोदी लिखाणात आढळून येत नाही. बांदेकऱ्यांच्या विनोदावर टीका करताना काही मंडळींनी अशी टीका केली आहे की, त्यांचा पुष्कळसा विनोद तात्कालिक आहे. हा त्या मंडळींचा शुद्ध भ्रम आहे. गेल्या आठवड्यात बांदेकरांच्या सर्व विनोदांचे मी पुन्हा समग्र पारायण केले, आणि मला असे आढळून आले की, त्यांच्या विनोदाची लज्जत आणि बहार

होती तशीच अजूनही पण कायम आहे; किंबहुना बांदेकरांचा विनोद महाराष्ट्रातील बहुजनसमाजाला दीर्घकाळपर्यंत मनसोक्त आनंद देत राहील.

बांदेकरांच्या मृत्यूनंतर सर्वांनीच त्यांच्याबद्दल हळहळून लिहिले. पण त्यांचा 'हास्यास्पद' मृत्युलेख जर कोणी लिहिला असेल तर तो श्री. मो. ग. रांगणेकर ह्यांनी. रांगणेकर ह्या लेखात म्हणतात, "बांदेकर मुळात विनोदी लेखक होते असे मला वाटत नाही. माझे विनोदी लेखनाचे विविध प्रकार अल्पावधीत त्यांनी एवढे आत्मसात केले की, त्या काळातले त्यांचे लेखन कोणते आणि माझे लेखन कोणते हे आज मला निश्चितपणे सांगता येणार नाही. लेखनाच्या बाबतीत ते मला 'गुरुस्थानी' मानीत आणि कधी पत्रात 'आपला शिष्यवर' असा स्वतःचा उल्लेख करीत. मी वृत्तपत्रव्यवसाय सोडून वीस वर्षे झाली. या वीस वर्षांत बांदेकरांनी माझा वारसा चालवून महाराष्ट्राला हसविले. बांदेकरांच्या मृत्यूने माझी विनोदी लेखनपरंपरा आता संपुष्टात आली आहे." रांगणेकर हे पत्रव्यवसायात असताना थोडेबहुत विनोदी लेखन करीत हे आम्हांला माहीत आहे. पण बांदेकरांच्या मृत्यूवर त्यांनी लिहिलेला सदर लेख हा रांगणेकरांच्या 'विनोदा'चा सर्वोत्कृष्ट नमुना आहे हे आम्ही सपशेल कबूल करतो. ह्या विनोदातली खुमारी ही आहे की, रांगणेकर स्वतःचा मृत्युलेख लिहीत आहेत, का बांदेकरांचा लिहीत आहेत, ह्याचा वाचकांना बिलकुल थांगपत्ता लावता येत नाही! त्यांना आणि इतरांना आम्ही एवढेच बजावून सांगतो की, बांदेकरांचा 'गुरू' होण्याचा जसा कोणी प्रयत्न करू नये तसे त्यांचा 'शिष्य' होण्याच्याही भानगडीत कोणी पडू नये. बांदेकर ते बांदेकर. पुन्हा बांदेकर निर्माण होणार नाहीत.

नवयुग : २५-१०-१९६०

ग्रंथ

८

# बांदेकरांचे स्मरण

एक वर्ष झाले बांदेकरांना जाऊन. त्यांची आठवण होत नाही, असा एक दिवस जात नसेल. चित्रकार दलालांनी काढलेल्या त्यांच्या सुंदर चित्रातून रोजच आमच्या कचेरीत ते आम्हांला भेटतात अन् आपल्या ओशाळ्या डोळ्यांनी नि ओठांनी हसल्यासारखे करतात. त्यामुळे ते पूर्वीप्रमाणेच शेजारी बसल्यासारखे वाटतात. वीस वर्षे म्हणजे काही थोडाथोडका काळ नाही. वीस वर्षे ते माझे सहकारी होते. ह्या काळात सारी मराठी दुनिया त्यांनी हसवली अन् हसता हसता रडवली. लेखनाखेरीज त्यांनी दुसरे काय केले ? काही नाही. लेखन हेच त्यांचे जीवन. लेखन हेच त्यांचे श्वसन. चोवीस तास ते स्वतःच्या तंद्रीत असत. त्यांचे जगच निराळे होते. सभ्य आणि ढोंगी समाजाच्या वाऱ्यालाही ते उभे राहात नसत. जगातील दुःख हा त्यांच्या अवलोनाचा नि चिंतनाचा विषय असे. दुर्दैवी आणि दरिद्री लोकांचे ते सोबती होते. अन्यायाच्या नि विषमतेच्या उपहासातून त्यांचा विनोद निर्माण झाला म्हणून त्यांचे हास्य अश्रूपेक्षाही विदारक होते. एका ठिकाणी त्यांनी लिहिले आहे, 'वाङ्मय रक्ताने लिहावे असे म्हणतात, पण ते अश्रूंनी लिहावे लागते. रक्तापेक्षा या जगात अश्रूच जास्त पवित्र. रक्तात संकर होऊ शकतो, पण अश्रू ही निर्मळ गंगा आहे !'

विनोदाचा उगम दुःखातून होतो. कृत्रिम शब्दांच्या कसरतीतून होत नाही. गरिबांच्या जीवनामधल्या नानाविध दुःखांचे करुण पडसाद बांदेकरांच्या

विनोदात उमटले आहेत. अनाथ-अपंगांबद्दल आणि रंजल्यागांजल्यांबद्दल जिव्हाळा निर्माण करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या विनोदात आहे. समाजातील लफंग्यांची ढोंगे आणि ढंगे ह्यांची बांदेकरांनी विलक्षण रेवडी उडवली आहे. तथापि, त्यांच्या विनोदात दंश किंवा द्वेष ह्यांचा लवलेशही कुठे आढळत नाही. त्यांच्या विनोदाची जातच निराळी आहे. समाजातल्या अन्यायाचे निहालअपेष्टांचे खापर ते स्वतःच्या डोक्यावर फोडून घेतात. त्याबद्दल ते समाजाला दोष देत नाहीत. जसा बायकोच्या त्रासाला कंटाळून नवरा आपल्या गालफडात फडाफडा मारून घेतो. त्यामुळे त्यांच्या विनोदात अश्रू आणि हास्य ह्यांची आपोआपच गाठ बसते.

स्वतःच्या विनोदाची त्यांनी कशी मस्करी केली आहे ते पाहा : 'मी विनोदी लेखक आहे असा काहीजण माझ्यावर आरोप करतात. पण ते खरे नाही. माझ्या लेखनाने मला कधी आनंद झाला नाही. शहाण्या माणसाला स्वतःच्या बायकोप्रमाणे स्वतःचे लेखनही आवडत नसावे. लेख लिहून झाल्यावर प्लेगच्या उंदराप्रमाणे मी ते निरनिराळ्या वृत्तपत्र-कचेरीत फेकून देतो. लिहिताना मी काड्याची पेटी जवळ बाळगतो. विडी ओढण्यास आणि नको असलेले लिखाण जाळण्यास तिची मला मदत होते.' घमेंडखोर लेखकाचा एवढा प्रखर उपहास कोणी केला असेल? त्यांच्या विनोदाचे हे तीनच नमुने बघा. नवरा कसा ओळखावा? सिनेमा चालू असताना थिएटरच्या बाहेर मूल खेळवणारा माणूस हा एखाद्या प्रेमळ बाईचा नवरा आहे असे समजावे. चाळीतला एक नळ म्हणतो, 'रात्री फक्त मला विश्रांती मिळते. कारण दिवसा मला त्रास देणाऱ्या बायका रात्री आपल्या नवऱ्यांना त्रास देण्यासाठी आपापल्या बिऱ्हाडात जातात.' ट्रामच्या अपघातात पाय तुटलेला नवरा रडत म्हणतो, 'पाय गेल्याचे दुःख नाही. पण आता मी बायकोला लाथ कशी मारू?' मानवी स्वभावातील दोषांची त्यांनी केलेली थट्टा हृदय पिळवटून टाकणारी आहे. म्हणून रडणाऱ्या माणसांना हसवील आणि हसणाऱ्या माणसाला रडवील असे विनोदाचे विलक्षण जालीम रसायन बांदेकर निर्माण करू शकले.

नवयुग : २-१०-१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# १

# दत्तू बांदेकरांचा स्मृतिदिन

कैलासवासी दत्तू बांदेकर यांचा आज तिसरा स्मृतिदिन आहे. ता. ४ ऑक्टोबर १९५९ रोजी काही तासांच्याच आजाराने ते अकस्मात आमच्यातून निघून गेले. 'साप्ताहिक नवयुग' मध्ये ते वीस वर्षे आमचे सहकारी होते. बांदेकर गेले आणि आता साप्ताहिक नवयुगही गेले! आमच्या काळजाचे दोन लचके तुटल्याच्या यातना मात्र मागे राहिल्या आहेत. बांदेकरांची आठवण सहजी बुजण्यासारखी नाही. गेल्या तीन वर्षांत आम्हाला कितीदा तरी त्यांची तीव्रतेने आठवण झाली आहे आणि महाराष्ट्रालाही कारुण्याच्या या विनोदी शाहिराची आठवण विसरता येणार नाही. बांदेकर हे एक आगळ्या प्रतिभेचे आणि वेगळ्याच प्रकृतीचे गृहस्थ होते. त्यांचे सारे जीवन कष्टात गेले, पण त्यांच्या स्वभावात त्याचा कडवटपणा कधी उतरलेला कुणी पाहिला–अनुभवला नाही. त्यांनी सतत आणि सुंदर लेखन केले. विद्वानापासून गावंढळापर्यंत सर्वांना आवडेल असे मौलिक लिखाण वर्षोन्‌वर्षे ते करीत होते, पण त्याचा त्यांना कधी अहंभाव वाटला नाही. स्तुतीची त्यांनी कधी अपेक्षा केली नाही, आणि निंदेचे भय त्यांना कधी वाटले नाही. त्यांचे मन अहोरात्र कुठल्यातरी कल्पना-तरंगात स्वैर भटकत असे. जगात वावरत असूनही जगापासून अलिप्त राहण्याची किमया त्यांना साधली होती. त्यामुळे जगाचे सारे रंगतरंग त्यांनी तटस्थतेने पाहिले आणि त्यांच्या जिवंत छटा आपल्या असामान्य कुंचल्याने शब्दरूप करून पुन्हा जगासमोरच ठेवल्या. जगाच्यासमोर त्यांनी हा स्वच्छ आरसाच धरला

होत जसा काही. या आरशात बांदेकरांनी जगाला त्याचे रूप यथार्थ स्वरूपात दाखवले. त्यात बिलकूल अतिशयोक्ती नव्हती.

बांदेकर विनोदी लेखक म्हणून सर्वमान्य झाले होते, पण विनोदी लेखनाचा अतिशयोक्ती हा प्रायः प्राण मानला जात असूनही, बांदेकर कधी त्याच्या वाऱ्याला गेले नाहीत. अतिशयोक्तीपेक्षाही 'ऊनोक्ती'वर बांदेकरांचा भर फार होता. वाचकाला दोन घटका खदखदा हसण्याच्याच केवळ हेतूने बांदेकर लिहीत नसत, तर हसता हसता वाचकाला चटकन अंतर्मुख करून सोडण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या लेखणीत होते. मध्यंतरी मराठी वाङ्मयात 'साहित्य हे रक्ताने लिहिले गेले पाहिजे' असा एक विचित्र वाद सुरू झाला होता. रक्ताने लिहिलेल्या वाङ्मयापेक्षाही अश्रूंनी लिहिलेले वाङ्मय हे अधिक परिणामकारक असते, या श्रद्धेने बांदेकरांचे लेखन चाले. 'वाङ्मय रक्ताने लिहावे म्हणतात. पण रक्तापेक्षा अश्रू पवित्र असतात. रक्तात संकर होऊ शकतो, पण अश्रू ही निर्मल गंगा आहे!' असे बांदेकर म्हणतात ते खोटे नाही. वाचकाच्या अंतःकरणाचा तळठाव घेऊन त्याच्या डोळ्यांत अंतःकरणातील भाव अश्रुरूपाने उभे करण्याचे बांदेकरांच्या लेखणीचे सामर्थ्य अचाट होते. पददलिताविषयीच्या उदंड सहानुभूतीमुळे बांदेकरांना ही गोष्ट करता येत असे. त्यांचा स्वाभाविक कलच दलित व पीडित जनतेकडे असे. त्यांचे सारे साहित्य अशा मंडळींच्या दीन-दुःखांना वाचा फोडण्यासाठीच निर्माण झाले. हे कार्य त्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी साधले. कधी कवितेच्या तर कधी उखाण्यांच्या, कधी कथेच्या तर कधी शालेय पाठांच्या, कधी नाट्याच्या तर कधी लेखांच्या द्वारा त्यांनी आपल्या अंतरंगातील कढ वाचकांच्या अंतःकरणात नेऊन सोडले.

समाजाविषयीच्या अपरंपार सहानुभूतीमुळेच त्यांना, समाजाला पिळणाऱ्या, शोषणाऱ्या, धनिक वर्गाविषयी तिटकारा होता. समाजकंटकांची शब्दरूपाने व्यंगचित्रे काढून त्यांच्या अंगावरची ढोंगाची सालडी नाजुक हातांनी सोलून काढण्यात बांदेकरांचा हातखंडा होता! त्यांची कल्पकता ही अजब चीज होती. साध्या विषयात कवीला जसा मोठा आशय आढळतो, तद्वत साध्या प्रसंगातून बांदेकर लोकविलक्षण कल्पकतेच्या जोरावर असा काही प्रसंग आपल्या लेखणीने वाचकांच्या डोळ्यासमोर उभा करीत की, वाचक त्यामुळे कोलमडून जायचा!

मानवी जीवनाचे सारे रंगढंग त्यांनी पाहिले होते. लोकगंगेच्या तळाशी तळमळीने एकजीव झालेले बांदेकर, तेथल्या अवस्थेचे आपल्या साध्या, सरळ

पण भेदक लेखणीने चित्र रंगवू लागले, तेव्हा ‘सदाशिवपेठी’ संस्कृतीच्या साहित्याच्या स्वप्नील वातावरणातच मश्गुल होऊन राहिलेला मराठी वाचक खडबडून जागा झाला आणि अंधाला प्रथमच प्रकाश दिसावा तशी त्याची अवस्था होऊन, जीवनाचा वास्तववाद म्हणजे खरोखरी काय याची त्याला कल्पना येऊ लागली. बांदेकरांनी आपल्या वाचकाला कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंतच्या सौंदर्य-सहलीला कधी नेले नाही. त्यांच्या वाङ्मयाच्या वाचकाला त्यांच्याबरोबर चाळींचाळींच्या खुराड्यातून किंवा फुटपाथच्या आडोशाने अथवा मवाल्यांच्या मोहोल्ल्यांतून अथवा दलितांच्या झोपड्यांतूनच सतत भटकावे लागलेले आहे. या दुर्दैवी जीवांच्या कहाण्या उपरोधिक नर्म विनोदाच्या साहाय्याने बांदेकर रंगवीत, तेव्हा वाचकाला एकीकडे हसू आवरणे कठीण होई आणि दुसरीकडे त्यांचे डोळे पाण्याने डबडबून येत ! हसू आणि आसू यांचा असा अलगपणा बांदेकरांच्या वाङ्मयावाचून इतरत्र विरळाच पाहावयास मिळतो.

बांदेकर ही व्यक्ती आता आपल्यातून गेलेली असली, तरी त्यांनी निर्माण केलेले वाङ्मय आजही वाचकाला पूर्वीइतकाच आनंद देण्यास समर्थ आहे. ‘सख्या हरी’ ही त्यांनी निर्माण केलेली वाङ्मयीन व्यक्तिरेखा तर मराठी वाचक केव्हाच विसरणार नाहीत. या ‘सख्या हरी’च्या कलंदर वृत्तीनेच बांदेकर जगाकडे पाहात आणि आपले विविध विचार नि अनुभव अर्थपूर्ण आणि रस-युक्त शब्दात वाचकांना मोकळेपणाने सांगून टाकत. बांदेकरांचे लेखन मोठमोठ्या विद्वानांपासून तो रटफ करीत वाचणाऱ्या अडाण्यापर्यंत सारखेच लोभवीत असे. कारण, त्यात अंतःकरणाचा आर्तनाद प्रभावी असे. कुठल्याही प्रकारच्या कृत्रिमतेचा अगर औपचारिकतेचा स्पर्श त्यात नसे. मूक रुदन आणि मुक्त हास्य हातात हात घालून चालल्यासारखे त्यांचे साहित्य आहे. त्यांचे व्यक्तिगत जीवनही असेच होते. अनंत कष्ट त्यांनी काढले, पण चेहऱ्यावरचा किंवा वृत्तीमधला उमेद-पणा त्यांनी कधी मावळू दिला नाही. सोसा—येईल ते सारे सोसा, पण हसत हसत सोसा आणि आपले अश्रू हे दुसऱ्यासाठी—दलितांसाठी राखून ठेवा; त्यांना त्यांची जरूर आहे; असाच जणू बांदेकरांच्या जीवनाचा आणि साहित्याचाही संदेश आहे.

मराठा : ४-१०-१९६२

## १०

# भाषाप्रभू चर्चिल

गेले सात दिवस सारे जग चर्चिलच्या महान गुणांचे संकीर्तन करीत आहे. काल त्याच्या पार्थिव देहाचा अंत्यसंस्कार झाला. चर्चिलचे जीवन हे अनेक आघाड्या असलेल्या एखाद्या प्रचंड रणक्षेत्रासारखे होते आणि त्यांपैकी प्रत्येक आघाडीवर तो जन्मभर यशस्वीपणे लढत राहिला, आणि त्याने त्या त्या आघाडीवर एकापेक्षाही एक देदीप्यमान विजय मिळविले. त्यामुळे तो वीर होता, मुत्सद्दी होता, वक्ता होता, चित्रकार होता, का लेखक होता, का काय होता ह्याविषयी मनात संभ्रम उत्पन्न होतो. पण व्यक्तिशः आम्हांला जर त्याच्या कोणत्या गुणाचे सर्वांत मोठे आकर्षण वाटत असेल तर ते त्याच्या भाषाप्रभुत्वाचे. चर्चिल हा शब्दांचा ईश्वर होता आणि विनोद हा त्याच्या भाषावैभवाचा सर्वांत मोठा चमत्कार होता. इंग्रज माणसाला विनोदाचे देणे जन्मजातच प्राप्त झालेले असते, असे समजले जाते. पण त्या उपजत विनोदी बुद्धीने चर्चिलमध्ये उच्चांक गाठला होता असेच म्हटले पाहिजे.

शाळेत असताना त्याला फक्त एकच विषय येत होता आणि तो म्हणजे त्याची मातृभाषा इंग्रजी. बाकीच्या सर्व विषयांत तो ' ढ ' होता. आयुष्यात त्याने इंग्रजी भाषेखेरीज दुसऱ्या कोणत्याही विषयाचा अभ्यास केला नाही. वयाच्या आठव्या का नवव्या वर्षी तो शाळेत गेला. पहिल्याच दिवशी शिक्षकाने त्याच्या हातात लॅटीन व्याकरणाचे पुस्तक ठेवले आणि ' टेबल ' ह्या शब्दाची विभक्तीची रूपे पाठ करण्यास सांगितले. तासाभराने शिक्षकाने त्याला विचारले,

" काय, झाले पाठ ". चर्चिलने उलट शिक्षकालाच विचारले, " पण कशाला हे पाठ करायचे ? " शिक्षक भडकले, " कशाला म्हणजे ? अरे हे व्याकरण आहे ! " चर्चिल म्हणाला, " असेल, पण त्याचा उपयोग काय ? या टेबलाचे संबोधन आहे 'हे टेबला !' त्याचा अर्थ काय ? " शिक्षक अधिकच संतापले. ते म्हणाले, " अरे मूर्खा, टेबलाला उद्देशून जेव्हा आपण बोलतो तेव्हा 'हे टेबला' असे म्हणतो. " " पण सर, " चिमुकला चर्चिल निष्किलपणे म्हणाला, " आपल्याला वेड लागले तरच आपण टेबलाशी बोलू. एऱ्हवी आपल्याला टेबलाला उद्देशून बोलायचे कारणच काय ! " चर्चिलचे ते उत्तर ऐकून शिक्षकाने अक्षरशः तोंडात बोटच घातले.

चर्चिलला ही विनोदाची देणगी त्याच्या वडिलांकडून मिळाली असावी, कारण त्याचे वडील रॅन्डॉल्फ चर्चिल हेही असेच विनोदी होते. त्यांच्या मिश्या मोठ्या पिळदार होत्या. त्यांना उद्देशून एक बाई एकदा म्हणाली, " रॅन्डॉल्फ, तुझ्या मिश्या अन् तुझे राजकारण मला मुळींच आवडत नाही. " तेव्हा रॅन्डॉल्फ ताडकन् म्हणाला, " बाईसाहेब, काळजी करू नका. त्यांपैकी कोणतीही गोष्ट तुम्हांला तुमच्या आयुष्यात टोचण्याचा संभव नाही ! " प्रत्येक गोष्टीकडे नेहमीपेक्षा काहीतरी वेगळ्या दृष्टीने पाहावयाचे आणि त्याबद्दल काहीतरी निराळाच विचार मांडावयाचा ही विन्स्टन चर्चिलची अगदी जन्मजात खोड होती असे म्हणावयाला हरकत नाही; आणि हेच त्याच्या विनोदाचे नि भाषावैभवाचे भांडवल होय. एका लेखकाने त्याच्याविषयी असे म्हटले आहे, " कोणत्याही वेळीं, कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही बैठकीत, कोणत्याही विषयावर सदभिरुची न सोडता हास्य निर्माण करण्याचे सामर्थ्य असलेला ब्रिटनमध्ये फक्त एकच माणूस आहे आणि तो म्हणजे चर्चिल. "

स्त्रियांनी पार्लमेंटचे सभासद होण्याला चर्चिलचा अतिशय विरोध होता. त्याबाबतीत तो भलताच प्रतिगामी होता. लेडी ॲस्टर ही ब्रिटिश पार्लमेंटमध्ये निवडून आलेली पहिली स्त्री होय. ती जेव्हा पार्लमेंटमध्ये शपथविधी झाल्यावर आपल्या जागेवर जाऊन बसली, तेव्हा डोळे रागाने गरगर फिरवीत चर्चिल तिच्याकडे पाहू लागला. लेडी ॲस्टर हीदेखील काही कमी वस्ताद नव्हती. तिने त्याच्या नजरेला नजर देऊन विचारले, " का, असा काय पाहतो आहेस माझ्याकडे ? " तेव्हा चर्चिल म्हणाला, " पार्लमेंटमध्ये बाई आलेली पाहून मला माझ्या आंघोळीच्या खोलीत एखादी बाई शिरल्यासारखे वाटते, की जिथे स्वतःची

लज्जा झाकायला आपल्या हातात ' स्पंजा 'खेरीज काही नसते ! " तेव्हा लेडी ॲस्टर म्हणाली, " काही काळजी करू नकोस. तुझ्या आंघोळीच्या खोलीत शिरले तरी मी तुझ्या प्रेमात पडणार नाही. " पुढे ह्या दोघांची दोस्ती झाली, पण त्यांचे विनोदी भांडण नेहमीच चालू असे. एकदा पार्लमेंटच्या आरामकक्षेत चर्चिल बसला असता, लेडी ॲस्टर त्याच्याकडे आली आणि दातओठ खाऊन त्याला म्हणाली, " तू जर किनई माझा नवरा असतास, तर मी तुझ्या कॉफीच्या प्याल्यात विष घातले असते. " तेव्हा चर्चिल तिच्या चेहऱ्याकडे क्षणभर पाहून म्हणाला, " अन् तू जर खरोखरच माझी बायको असतीस ना, तर ती कॉफी मी प्यालो असतो. " दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी एकदा चर्चिल अमेरिकेला गेला होता, आणि तेथे ' व्हाईट हाऊस'मध्ये उतरला होता. एके दिवशी स्नानगृहातून अंग पुसून नागव्याने चर्चिल बाहेर पडला. तोच समोरून अध्यक्ष रूझवेल्ट आलेले त्यांनी पाहिले. तेव्हा क्षणाचाही विलंब न करता चर्चिल म्हणाला, " इंग्लंडला अमेरिकेपासून काहीही लपवावयाचे नाही. " पार्लमेंटमध्ये हजारजबाबी उत्तरे देण्यात तर चर्चिलचा विलक्षण हातखंडा होता.

दुसरे महायुद्ध जिंकूनही १९४५ च्या निवडणुकीत चर्चिलचा पराभव झाला आणि मजूर मंत्रिमंडळ अधिकारावर आले. त्या मंत्रिमंडळाचे आर्थिक धोरण उधळपट्टीचे होते. त्यामुळे राष्ट्राच्या खजिन्यातली अनेक वर्षांची शिल्लक संपुष्टात आली होती. पौंडाची किंमत कमी झाली होती. त्याला उद्देशून मजूर सरकारवर चर्चिलने एकदा जोराचा हल्ला चढविला. त्या वेळी चर्चिलजवळ एक शर्यतीचा घोडा होता तो घोडा होता अगदी सामान्य, पण त्याने कित्येक शर्यती जिंकल्यामुळे तो एकदम लोकप्रिय झाला होता. मजूर मंत्रिमंडळाच्या उधळपट्टीवर चर्चिल आपल्या भाषणात कडाडून हल्ला चढवीत होता. तो म्हणाला, " पौंडाला आता काही किंमत राहिली नाही—" त्यावर मजूर पक्षाचा एक सभासद ओरडला, " मग आता तुमचा घोडा विका, घोडा ! " तेव्हा चर्चिल शांतपणे उत्तरला, " तेवढी एकच वस्तू आता उरली आहे की, जी माझ्या ताब्यात असल्याने तिची किंमत वाढलेली आहे ! " तेव्हा सारे पार्लमेंट हास्यकल्लोळाने दणाणून गेले.

थोडक्या शब्दांत जास्तीत जास्त अर्थ कसा ठासून भरावा ही कला चर्चिलला विलक्षण साध्य झालेली होती. त्यामुळे त्याची काही काही वक्तव्ये ही इंग्रजी

वाङ्मयात सुभाषिते होऊन बसलेली आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी चेंबरलेनने राजीनामा दिल्यानंतर चर्चिल पंतप्रधान झाला तेव्हा ब्रिटनची परिस्थिती अत्यंत आणीबाणीची होती. साहजिकच चर्चिल पंतप्रधान झाल्या-नंतर लोकांना त्याच्यापासून काही अपेक्षा वाटत होत्या, पण चर्चिलने खंबीर गांभीर्याने पहिल्याच तडाख्यात राष्ट्राला सांगून टाकले की, " रक्त, श्रम, अश्रू आणि घाम यांखेरीज तुम्हांला देण्यासारखे माझ्याजवळ काहीच नाही. " चर्चिलचे हे शब्द ' Blood, Toil, Tears and Sweat ' इंग्रजी भाषेत अजरामर होऊन बसले आहेत. हिटलरच्या आक्रमणाचा केवळ आपल्या हवाईदलाच्या सामर्थ्यावर चर्चिलने धुव्वा उडवला. वास्तविक हिटलरच्या मानाने चर्चिलचे हवाईदल अतिशय लहान होते. पण त्या मूठभर हवाई सैनिकांनी इंग्लंडमधल्या असंख्य लोकांचे प्राण वाचविले. ही गोष्ट चर्चिलने आपल्या एका अमर वचनात नोंद करून ठेवलेली आहे. " Never in the field of human conflict was so much owed by so many to so few " ( मानवी युद्धात इतक्या थोड्या लोकांनी एवढ्या अनेक लोकांवर एवढे असंख्य उपकार केल्याचे दुसरे उदाहरण सापडणार नाही. ) चर्चिलची सर्वच सुभाषिते जर एकत्र देऊ म्हटले तर तो एक प्रचंड ग्रंथच होईल. शेक्सपीअरनंतर इंग्रजी भाषेवर जास्तीत जास्त संस्कार जर कोणी केले असतील तर ते चर्चिलने असे मानले जाते. खरोखरच एका वाक्यात विश्व व्यक्त करण्याचे सामर्थ्य शेक्सपीअरप्रमाणे चर्चिलच्या अंगी होते.

आपल्या सुखी वैवाहिक जीवनाचे वर्णन आपल्या ' पूर्वायुष्या 'च्या शेवटच्या अवघ्या एका वाक्यात त्याने केलेले आहे. "...Until September 1908, when I married and lived happily ever afterwards " (१९०८ च्या सप्टेंबरात माझे लग्न झाले आणि त्यानंतर मी पुढे आयुष्यभर सुखाने जगलो. ) आणि खरीच गोष्ट आहे की, चर्चिलच्या आयुष्यात एवढे मोठमोठे धरणीकंप झाले, उत्पात झाले, मानवतेचे मोठमोठे संहार झाले, सिंहासने उलथीपालथी झाली आणि जगाचे नकाशे बदलले, पण चर्चिलच्या संसारात सतत सत्तावन्न वर्षे अहोरात्र शरद ऋतूच्या पौर्णिमेचे चांदणे पडलेले होते. त्याचे सारे श्रेय त्याच्याइतकेच त्याच्या ' लाडक्या क्लेमी 'ला दिले पाहिजे. चर्चिलसारखा आदर्श नवरा आणि क्लेमीसारखी आदर्श पत्नी आजपर्यंत जगात क्वचितच होऊन गेली असेल. स्वतःच्या पत्नीखेरीज चर्चिलच्या जीवनात

एकाही स्त्रीचा कधी प्रवेश झालेला नाही. त्यामुळे महात्मा गांधींनाही खाली मान घालावी लागेल असेच चर्चिलचे चारित्र्य शुद्ध आणि निरपवाद होते.

चर्चिलच्या सांसारिक गमती कितीतरी सांगण्यासारख्या आहेत. १९२२ मध्ये पार्लमेंटच्या निवडणुकीत चर्चिलचा पराभव झाला. त्यामुळे मंत्रिमंडळातली त्याची जागा गेली. शिवाय त्याच वेळीं त्याचे अपेंडिसायटीसचे ऑपरेशनही झाले. तरी तशाही मानसिक आणि शारीरिक परिस्थितीत चर्चिल आपल्या बायकोला विनोदाने म्हणाला, " छान झाले; माझे मंत्रिपद गेले, सदस्यत्व गेले, पक्षातले स्थान गेले आणि माझे ॲपेंडिक्सही गेले ! ' युद्ध आणि राजकारण ह्यांचे चर्चिलला विलक्षण वेड होते. त्याबद्दल आपल्या बायकोशी बोलताना चर्चिल एकदा म्हणाला की, " राजकारण हे युद्धाइतकेच अंगात खून चढवणारे आणि तितकेच प्राणघातक आहे. मात्र, युद्धात एकदाच प्राण जातो. राजकारणात अनेकदा मरावे लागते. " आई-बापांना किती मुले असावीत. ह्याबद्दल आपल्या बायकोला बोलताना चर्चिल म्हणाला, " चार मुले असावीत एक आईसाठी, एक बापासाठी, एक अपघातासाठी आणि एक कुटुंब-वर्धनासाठी. " ' क्लेमी 'ने आपल्या नवऱ्याचे वर्णन अत्यंत थोडक्यात पण अगदी मार्मिकपणे केले आहे. ती म्हणते, " विन्स्टन असा माणूस आहे की, पहिल्याच भेटीत तुम्हाला त्याचे सारे दोष एकदम दिसतात. पण नंतर त्याच्या गुणांचा शोध करण्यात उरलेले आयुष्य तुम्हाला खर्च करावे लागते. "

मद्यपानाचा चर्चिलसारखा रसिक भोक्ता आजपर्यंत जगात झाला नसेल. तथापि तो ' मद्यपी ' किंवा ' दारूबाज ' नव्हता. ' दारूबाजीचा तिरस्कार करणाऱ्या घराण्यात मी जन्माला आलो ' असे तो अभिमानाने म्हणे. सकाळीं दहा वाजता उठल्यानंतर न्याहारीबरोबर श्वेतमद्याची ( White-wine ) एक बाटली तो पीत असे. दुपारी जेवणापूर्वी तो दोन पेग्ज व्हिस्की पिई. एक पेग पिण्याला त्याला अर्धा तास लागे. जेवताना तो मद्याच्या ( Sherry ) दोन बाटल्या पिई. जेवणानंतर अर्धा तास तो वामकुक्षी घेई. त्याच्या दीर्घ जीवनाचे ते खरे रहस्य होते. पार्लमेंटमधे भाषण करण्यापूर्वी आपल्या टेबलातून अर्धा पेग व्हिस्की काढून तो पिई अन् मग बोलायला उभा राही. संध्याकाळी सात वाजता जेवताना तो चार पेग व्हिस्की अन् दोन बाटल्या मद्य पिई. दिवसातून तो एकंदर सोळा सिगार ओढीत असे. रात्रीचे जेवण संपल्यानंतर दहा वाजता तो लेखनाला बसे. दिवसभर त्याचे चिटणीस निरनिराळ्या संदर्भांची जी टाचणे

करून ठेवीत असत ती हातात घेऊन तो आपल्या लेखकाला तोंडी मजकूर सांगे. हा मजकूर सांगत असताना तो हळूहळू ब्रॅण्डी पीत असे. रात्री १० ते पहाटे ३ पर्यंत चर्चिलचे हे लेखन चाले. वर्षानुवर्षे त्याचा हा लेखनक्रम असाच चाले. म्हणून त्याच्या हातून हजारो पानांचे ग्रंथ लिहून झाले आणि त्याला वाङ्मयाचे ' नोबेल प्राइझ ' मिळाले. जन्मभर दारू पिऊन संयम न सोडता काय जागतिक पराक्रम करता येतात ह्याचा चर्चिल हा एक अद्‌भुत आदर्श आहे. त्याच्या बुटाचे-सुद्धा पाणी पिण्याची मोरारजी देसाईंची लायकी नाही.

चर्चिल हा जसा लोकशाहीवादी होता तसाच तो साम्राज्यवादीही होता. " ब्रिटिश साम्राज्याचे दिवाळे पुकारावयाला काही मी ब्रिटनचा पंतप्रधान झालो नाही ! " ही त्याची घोषणा सुप्रसिद्ध आहे. महात्मा गांधींना तो ' नंगा फकीर ' म्हणे, पण नेहरूंबद्दल त्याच्या मनात फार आदर होता. नेहरूंची नि त्याची जेव्हा एकदा मुलाखत झाली तेव्हा त्याने नेहरूंची अविस्मरणीय शब्दांत प्रशंसा केली. " You have conquered two greatest failings of humanity. You hate none and fear none. " ( मानवतेच्या दोन महादोषांवर तुम्ही जय मिळविला आहे. तुम्ही कोणाला भीत नाही आणि कोणाचा द्वेष करीत नाही ! ) तथापि नेहरूंखेरीज करून बाकीच्या भारतीय नेत्यांबद्दल त्याला काडीचा आदर नव्हता. तो म्हणत असे, "We are handing over Government of India to men of straw, of whom in a few years, no trace will remain. " ( आम्ही भारताची राज्यसूत्रे कवडी किंमतीच्या माणसांच्या हाती देतो आहोत की ज्यांची थोड्याच दिवसांत नावनिशाणीसुद्धा उरणार नाही ! ) चर्चिलचे हे भाकित सध्याच्या राजकीय नेत्यांच्या बाबतीत किती तंतोतंत खरे आहे ह्याचा ज्याचा त्यानेच विचार करावा.

गेल्या शतकातल्या इतिहासाची पाने ज्याच्या चरणांवर वाहून पूजा करावी अशा ह्या युगकर्त्या महापुरुषावर जेवढे लिहावे तेवढे थोडेच आहे. आम्ही या भाषाप्रभूचे एक अमर सुभाषित सांगून ही श्रद्धांजली पूर्ण करतो.

In War : Resolution
In Defeat : Defiance
In Victory : Magnanimity
In Peace : Goodwill

'युद्धात खंबीर, पराभवात बेदरकार, विजयात उदार आणि शांततेत स्नेहभाव' ही चर्चिलच्या जीवनाची सूत्रचतुष्टयी प्रत्येकाने आपली ब्रीदावली करावी.

मराठा : १-२-१९६५

## ११

# अप्टन सिंक्लेर

आपल्या पंचायशी वर्षांच्या आयुष्यात ज्याने जवळ जवळ शंभर ग्रंथ लिहिले, बारीकसारीक प्रचार-पुस्तके आणि लेख तर त्याने किती लिहिले, त्याची तर गणनाच करता येणार नाही, अशा अमेरिकेमधल्या अप्टन सिंक्लेर नामक अग्रगण्य, समाजवादी आणि वयोवृद्ध लेखकाने साडेतीनशे पानांचे आत्मचरित्र नुकतेच लिहून प्रसिद्ध केले आहे. त्याची आमच्या वाचकांना ओळख करून देण्याचे आम्ही आज योजिले आहे.

सिंक्लेरचा जन्म १८७८ साली एका गरीब कुळात झाला. सिंक्लेरचा बाप कमालीचा दारुडा होता. आपला सारा पगार तो दारूत खर्च करून टाकी. त्यामुळे सिंक्लेरच्या आईला खर्चाची तोंडमिळवणी करता करता नाकी नऊ येत. ही परिस्थिती केवळ सिंक्लेरच्याच कुटुंबात होती असे नव्हे, तर त्या वेळी अमेरिकेत दारूच्या व्यसनाचा विलक्षण फैलाव झालेला होता. दारूच्या व्यसना-पायी सिंक्लेरच्या वडिलांनी आणि दोन चुलत्यांनी आपल्या आयुष्याची धुळधाण करून घेतली होती. ह्या गोष्टीचा बाल सिंक्लेरच्या मनावर एवढा परिणाम झाला, की आयुष्यभर त्याने दारूच्या थेंबाला तर स्पर्श केलाच नाही, पण तो दारूबंदीचा कट्टर पुरस्कर्ता झाला. एवढेच नव्हे, तर त्याने उभ्या आयुष्यात विडीला, चहाला किंवा कॉफीलासुद्धा कधीही स्पर्श केला नाही. मांसाहारही काही कारणाने त्याने सोडून दिला. तो पक्का शाकाहारी बनला आणि अलीकडे गेली कित्येक वर्षे तर तो फक्त भात आणि फळे खात असतो.

कॉलेजमध्ये असताना आपल्याला आवडतील तेवढ्याच विषयांचा त्याने अभ्यास केला. परीक्षेच्या दृष्टीने त्याने कधीही पुस्तकांना हात लावला नाही. पाच वर्षांच्या आपल्या कॉलेजातील काळात त्यांनी निरनिराळ्या युरोपियन भाषांचा अभ्यास करून त्यांजवर प्रभुत्व मिळविले. वयाच्या बाविसाव्या वर्षी त्याने लघुकथा आणि कादंबऱ्या लिहावयास सुरुवात केली. तथापि, त्यामुळे त्याला पैसा आणि कीर्ती ह्यांचा काही फारसा लाभ झाला नाही. तशा प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत त्याने लग्न केले. ह्या लग्नामुळे त्याच्या दारिद्र्यात आणखीनच भर पडली. पैशाच्या तंगीमुळे कुठेही एका ठिकाणी त्याला स्थायिक होऊन राहता आले नाही. स्वतः सिंक्लेर हा कुठे तरी एखाद्या झोपडीत नाही तर घराच्या माळ्यावर एकटा राही. बायकोला पुष्कळदा माहेरी पाठवून देई.

ह्या सर्व अडचणींना तोंड देऊन सिंक्लेरने एकामागून एक पुस्तके लिहिण्याचा सपाटा लावला. पण टीकाकारांचे किंवा जनतेचे लक्ष काही त्याच्याकडे जाऊ शकले नाही. ह्याचे कारण तोपर्यंत त्याच्या लिखाणाच्या मागे कसलेही सामाजिक तत्त्वज्ञान नव्हते. अमेरिकेत त्या काळी आर्थिक विषमता पराकाष्ठेला जाऊन पोहोचली होती. गरीब लोकांच्या गरिबीला आणि हालअपेष्टेला सीमा नव्हती, तर श्रीमंतांच्या श्रीमंतीला आणि विलासांनाही मर्यादा नव्हती. जगात काही लोक श्रीमंत का आणि काही लोक गरीब का हा प्रश्न अगदी लहान वयापासून त्याच्या मनाला डाचत होता. पण त्या प्रश्नाचे उत्तर त्याच्या आईला जसे देता आले नाही, त्याप्रमाणे त्याचे समकालीन लेखक आणि समाजसुधारकही देऊ शकले नाहीत.

एकदा एका धर्मगुरूच्या बायकोच्या अंगावरचे पन्नास हजार डॉलर किंमतीचे दागिने आणि जडजवाहीर चोरीला गेल्याची बातमी त्याने वर्तमानपत्रात वाचली, तेव्हा त्याला धक्काच बसला. ज्या येशू ख्रिस्ताने आपल्या सर्वस्वाचे बलिदान गरिबांच्या आणि दलितांच्या उद्धारासाठी आणि सर्व माणसे ही परमेश्वराची लेकरे–म्हणजे भाऊ भाऊ आहेत ही भावना प्रस्थापित करण्यासाठी केले, त्याच्या मंदिरातल्या एका पुजाऱ्याच्या बायकोच्या अंगावर पन्नास हजार डॉलर्सचे दागिने आले कोठून? ह्या विचाराने त्याला अस्वस्थ केले. सर्व समाजाची उभारणी सत्ताधारी वर्गाने श्रमजीवी वर्गाची संघटितपणे पिळवणूक करावयाची ह्या एकाच तत्त्वावर झाली आहे, ही गोष्ट त्याला कळून आली. अर्थात हे सर्व निष्कर्ष त्याने आपल्या स्वतःच्या अनुभवाने आणि अवलोकनाने काढले.

त्याच वेळी यूरोपमधे समाजवादी चळवळ जोरात सुरू झाली होती, हे त्याच्या कानावर आले होते. पण तोपर्यंत समाजवादी वाङ्मय त्याने वाचले नव्हते किंवा समाजवादी चळवळींच्या नेत्यांशी त्याचा प्रत्यक्ष संबंध असा आलेला नव्हता. तो १९०२ ते १९०४ च्या दरम्यान आला. त्या काळात त्याने बरेचसे समाजवादी वाङ्मय वाचले. बर्नार्ड शॉच्या नाटकांमधील क्रांतिकारक आणि समाजवादी विचारांचा त्याच्या मनावर फारच परिणाम झाला. १९०४ साली तो चिकागो येथे राहावयाला गेला.

चिकागो हे गुरांच्या कत्तलखान्यासाठी प्रसिद्ध आहे. लाखो गुरे ह्या शहराच्या कत्तलखान्यात मारली जातात आणि त्यांचे मांस डब्यात भरून अमेरिकेमधे सर्वत्र पाठविण्यात येते. मांस डब्यात भरण्याच्या (meat-packing) ह्या व्यवसायात हजारो मजूर गुंतलेले असत, आणि त्यांची स्थिती नरकातल्या किड्यांपेक्षाही फार भयंकर होती. पहिली गोष्ट ही की, या कत्तलखान्यातील वातावरण म्हणजे आरोग्याच्या आणि स्वच्छतेच्या दृष्टीने अतिशय घातुक होते. रात्रीच्या वेळीं कसाई लोक मेलेली, सडलेली आणि रोगट जनावरे ह्या कापाकापीत घुसडून देत. मांस खाण्यासाठी आलेल्या हजारो उंदरांचासुद्धा ह्या कत्तलीत स्वाहाकार होत असे. दुसरी गोष्ट अशी की, ह्या कत्तलखान्यामधे साचलेली सर्व घाण, मांस, रक्त, हाडे ही वहात वहात एका प्रचंड तळघरात नेऊन साठवण्यात येत असे. त्या ठिकाणी ती सर्व वाळवून आणि त्यांचा प्रचंड यंत्रात चुरा करून त्याचे खत बनविण्यात येत असे. ह्या खताच्या प्रचंड कारखान्याचे काम रात्रंदिवस त्या तळघरामधे चाललेले असे. तेथे सूर्यप्रकाश तर चुकून कधी येत नसे. तशा वातावरणात पुरुष, स्त्रिया आणि मुले नाकातोंडाला श्वासोच्छ्वासापुरते 'स्पंज' बांधून हाडे दळण्याच्या यंत्रावर कामे करीत. त्यांच्या सर्वांगावर हाडाच्या पुडीचे थर साचून बसलेले असत. त्यांच्या कानांत, नाकात डोळ्यांत, तोंडातही हाडांचे कण जात. फुफ्फुसांतही हाडांचे कण साचून बसत. नरकापेक्षाही अधिक दुर्गंधीत, अंधारात आणि शंभर अंश उष्णतेत कामे करणाऱ्या ह्या हजारो मजुरांची काय स्थिती असेल ह्याची कल्पना केलेली बरी.

हा विषय अप्टन सिंक्लेर ह्याने आपल्या कादंबरीसाठी निवडला. जवळ जवळ दोन महिने तो त्या मजुरांत राहिला. त्यांच्या भयानक जीवनाचा त्याने प्रत्यक्ष अभ्यास केला, त्यांचे सर्व प्रश्न त्याने त्यांच्या तोंडून समजावून घेतले आणि

मग त्याने आपली 'जंगल' ही क्रांतिकारक कादंबरी लिहावयास सुरुवात केली. अमेरिकेसारख्या सुधारलेल्या देशातही अशी भयानक आणि हिंस्र 'जंगले' असू शकतात, हे लोकांच्या मनावर ठसविण्यासाठी त्याने आपल्या कादंबरीला 'जंगल' हे नाव दिले. तीन महिन्यांत त्याने ती कादंबरी लिहून पूर्ण केली. ती त्याच्या मित्रांना फार आवडली. जॅक लंडन म्हणाला, "अंकल टॉम्स कॅबिननंतर एवढी हृदयविदारक कादंबरी कोणी लिहिलेली नाही. मानवी जीवनाचे अत्यंत पाशवी चित्र ह्यात प्रतिबिंबित झाले आहे. ही कादंबरी घाम, अश्रू, हुस्कारे आणि रक्त ह्यांनी लिहिलेली आहे." हे सर्व खरे. पण ती कादंबरी छापून प्रसिद्ध करावयाला अमेरिकेतला कोणताही प्रकाशक तयार होईना. कारण मांसाच्या नि खताच्या त्या राक्षसी उद्योगावर स्वतःची पोटे जाळणाऱ्या अमेरिकेतील पुंजीपतींना दुखवण्याची त्यांची हिंमत नव्हती. शेवटी ती कादंबरी त्याने स्वतःच छापली आणि मग ती छापून तयार झाल्यानंतर एका सामान्य प्रकाशकाकडून ती अखेर प्रकाशित करविली. १९०६ च्या फेब्रुवारीत ही कादंबरी प्रसिद्ध झाली, आणि ती प्रसिद्ध होताक्षणीच तिच्यावर वादाचे आणि चर्चेचे सर्व अमेरिकेत तुफान उठले.

अमेरिकेचे त्या वेळचे अध्यक्ष थिओडर रूझवेल्ट ह्यांचे त्या कादंबरीकडे एकदम लक्ष गेले. कारण, चिकागोमधील मांस डब्यात भरण्याच्या धंद्याचे वातावरण एवढे भयंकर असते ह्याची तोपर्यंत कोणालाच कल्पना नव्हती. सरकारला शिव्या देणारी शेकडो पत्रे लोकांकडून रोजच्या रोज रूझवेल्टला येऊ लागली. त्याचा परिणाम असा झाला की, रूझवेल्टने अप्टन सिंक्लेर ह्याला आपल्या 'व्हाईट हाऊस'वर भोजनाला बोलावले. त्यानंतर 'जंगल' कादंबरीत चिकागोच्या मांस–कारखानदारावर केलेल्या सर्व आरोपांची चौकशी करण्यासाठी सरकारी कमिशन नेमण्यात आले, आणि एका वर्षाच्या आत अन्नाच्या आणि औषधाच्या उत्पादनधंद्याचे नियंत्रण करणारा कायदा कॉंग्रेसने मंजूर केला.

विन्स्टन चर्चिल हा त्या वेळी बत्तीस वर्षांचा होता. त्याने ह्या कादंबरीवर उत्कृष्ट अभिप्राय दिला. सतरा भाषांत ह्या कादंबरीची भाषांतरे झाली. इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये ह्या पुस्तकाची भरमसाठ विक्री झाली. 'बायरन' कवीने जसे म्हटले आहे की, 'एका सकाळी मी उठलो आणि आपण प्रख्यात कवी झालो असल्याचे मला आढळून आले' तशीच जवळ जवळ अप्टन सिंक्लेरची

स्थिती झाली. ‘ जंगल ’ ह्या एका कादंबरीने तो विश्वविख्यात लेखक बनला. चिकागोच्या कत्तलखान्याचा प्रश्न उजेडात आणल्यानंतर न्यूयॉर्कच्या कत्तलखान्याचा प्रश्न त्याने हाती घेतला. त्यावर पुन्हा वादळ माजले. रूझवेल्टला त्याचा एवढा उपसर्ग झाला, की त्याने सिंक्लेरला निरोप पाठवला, “ जा बाबा, आता आपल्या गावी, काही वेळ मला इथला राज्यकारभार करू दे की ! ” ( Tell Sinclair to go home and let me run the country for a while ! )

‘ जंगल ’ कादंबरीसंबंधी एका ठिकाणी अप्टन सिंक्लेरने असे म्हटले आहे की, “ लोकांची अंतःकरणे काबीज करण्यासाठी मी ही कादंबरी लिहिली. पण दैववशात मी जनतेच्या आतड्यांनाच पीळ घातला ! ” अमेरिकेमधील मांसाच्या धंद्यात ह्या एका कादंबरीने क्रांती केली, आणि औद्योगिक कामगारांच्या संघटनाही तेव्हापासूनच स्थापन होण्यास अमेरिकेत सुरुवात झाली. सिंक्लेर हा एक ध्येयवादी लेखक होता. अमेरिकेमधील तरुण विद्यार्थ्यांमध्ये समाजवादाचा प्रचार करण्यासाठी त्याने ‘ आंतर महाविद्यालयीन समाजवादी संस्था ’ काढली. ‘ जंगल ’ कादंबरीवर मिळालेले पैसे त्याने एक ध्येयवादी आणि समाजवादी वसाहत स्थापन करण्यात खर्च केले. या वसाहतीला त्याने ‘ हेलीकॉन होम ’ वसाहत हे नाव दिले. समाजवादाचा पुरस्कार करणारे अनेक कार्यकर्ते आणि विचारवंत आपल्या बायकामुलांसह या वसाहतीत राहावयाला आले. पण एका रात्री ह्या वसाहतीला आग लागली आणि सिंक्लेरने आरंभलेला हा प्रयोग भस्मसात झाला. मांसाच्या धंद्यावर त्याने कादंबरी लिहून जशी क्रांती केली, त्याप्रमाणे कोळशाच्या धंद्यावर ‘ किंग कोल ’, तेलाच्या धंद्यावर ‘ ऑईल ’, पोलादाच्या धंद्यावर ‘ लिटल स्टील ’ ह्या कादंबऱ्या लिहून त्या त्या धंद्यातील कोट्याधीश कारखानदार मजुरांची जी पिळणूक करीत होते, त्यावर विदारक प्रकाश टाकला. त्यामुळे अमेरिकेतील भांडवलदारवर्ग सिंक्लेरवर खूपच संतापला. ‘ चिखल-उपशा इसम ! ’ ( Muckrake man ) म्हणून ते त्याला शिव्या देऊ लागले.

अमेरिकेतील वृत्तपत्रे तर अप्टन सिंक्लेरवर गिधाडासारखी तुटून पडली. कारण, त्या देशातल्या वृत्तपत्रव्यवसायाची सूत्रे ही सर्व बड्या भांडवलदारांच्या हाती होती. लोकशाही स्वातंत्र्याची गळचेपी कशी होईल, श्रमजीवी जनतेची पिळणूक कशी होईल आणि धनिकवर्गाच्या खास सवलती कशा सुरक्षित राहतील, ह्या-

खेरीज अमेरिकन वृत्तपत्रे दुसऱ्या कोणत्याही गोष्टीचा विचार करीत नसत. तेव्हा अमेरिकन वृत्तपत्रांच्या लोकविरोधी कारवाया उघडकीस आणण्यासाठी त्या विषयावर एक प्रक्षोभक कादंबरी लिहावयाचे सिंक्लेरने ठरविले. त्या कादंबरीला त्याने ' ब्रास चेक ' ( पितळी खूण ) असे नाव द्यावयाचे ठरविले. ' ब्रास चेक ' ह्या शब्दाला अमेरिकेत विशिष्ट अर्थ आहे. ही ' पितळी खूण ' हातात असली म्हणजे कोणत्याही वेश्येला पोलिसांचे संरक्षण मिळे. म्हणून वृत्तपत्राच्या पवित्र व्यवसायाचा वेश्याव्यवसाय करणाऱ्या भांडवलवाल्यांनी जणू काही ' पितळी खूणच ' त्यांच्या हाती दिलेली आहे, हे सूचित करण्यासाठी सिंक्लेरने त्या कादंबरीला ' ब्रास चेक ' हे अत्यंत समर्पक अभिधान दिले. ह्या एका कादंबरीने अमेरिकन वृत्तपत्रव्यवसायात क्रांती घडवून आणली. वृत्तपत्र-व्यवसायात काम करणाऱ्या सर्व श्रमजीवी पत्रकारांनी त्यानंतर आपापल्या संघटना बांधून वृत्तपत्राच्या मालकशाहीविरुद्ध आघाडी उभारली.

सिंक्लेर हा दारूचा कट्टर शत्रू होता म्हणून मागेच सांगितले. ' सामाजिक मद्यपान ' ( Social drinking ) म्हणजे सामाजिक समारंभात मद्यपान करणे हे एक भयंकर संकट असून, त्या संकटाच्या जबड्यात अमेरिकेतील मोठमोठ्या बुद्धिमान आणि कर्तबगार माणसांनी आपले प्राण गमावलेले आहेत. ह्या विषयावर सिंक्लेरने ' वेट परेड ' आणि ' कप ऑफ फ्यूरी ' ह्या दोन कादंबऱ्या लिहिल्या. दारूच्या व्यसनाने जॅक लंडन, युजीन ऑनेल, ओ. हेनरी, इसाडोरा डंकन, डग्लस फेअरबँक्स ह्यांच्यासारखे मोठमोठे लेखक आणि कलावंत कसे अकाली मृत्युमुखी पडले हे सिंक्लेरने आपल्या डोळ्यांनी पाहिलेले होते. तो अनुभव त्याने आपल्या कादंबऱ्यांतून वर्णन केला आहे.

१९०१ ते १९६० पर्यंतच्या साठ वर्षांत सिंक्लेरने डोंगराएवढे ग्रंथ लिहिले. त्याचे नुसते दिग्दर्शन करणेही येथे कठीण आहे. अमेरिकेतील धनिकवर्गाशी आणि उद्योगपतींशी संबंध आयुष्यभर त्याला झगडावे लागले. त्यामुळे त्याला एखाद्या निर्वासिताप्रमाणे आणि बहिष्कृताप्रमाणे स्वदेशी आणि परदेशी भरकावे लागले. कित्येक विश्वविद्यालयांमधे त्याला मज्जाव होता. सिंक्लेर हा काही नुसताच लेखक नव्हता, अनेक विषयांवर त्याने प्रयोग केले. शरीराचे रोग बरे करण्यासाठी उपास हा एकमेव उपाय आहे ह्यासंबंधी बर्नार्ड मॅकफेडन हा अमेरिकेचा आरोग्यतज्ज्ञ आपल्या संस्थेत प्रयोग करीत होता. त्या प्रयोगाचा सिंक्लेरने अभ्यास केला. त्याने स्वतः दहा बारा दिवसांचा उपास

केला आणि त्यानंतर तीन आठवडे त्याने दुधावर काढले. ह्या सर्व अनुभवाचे वर्णन त्याने ' फास्टिंग क्युअर ' या पुस्तकात केले आहे. पहिल्या बायकोशी त्याने काडीमोड घेतल्यानंतर दुसरे लग्न केले. हा त्याचा विवाह अत्यंत सुखकारक ठरला. ह्या दुसऱ्या पत्नीला काही अतींद्रिय शक्ती प्राप्त झालेली होती. अमेरिकेतील मोठमोठ्या मानसशास्त्रज्ञांसमोर सिंक्लेर ह्याने तिच्या त्या शक्तीचे काही प्रयोग करून दाखविले. प्रो. विल्यम मक्डुगलसारख्यांचा त्यावर विश्वास बसला, आणि अमेरिकेच्या कित्येक विश्वविद्यालयांत ' पॅरा-सायकॉलाजी 'च्या अभ्यासाचे त्यांनी विभाग उघडले. सिंक्लेर हा प्रत्यक्ष राजकारणात एकदाच उतरला. कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरच्या निवडणुकीसाठी तो डेमोक्रॅटिक पक्षातर्फे उभा राहिला. ' E P I C ' ( End Poverty In California ! ) ही त्याची त्या वेळची घोषणा फारच लोकप्रिय झाली होती. ह्या निवडणुकीत त्याचा पराभव झाला. दुसऱ्या बायकोच्या मृत्यूनंतर वयाच्या ऱ्याऐंशीआव्या वर्षी सिंक्लेरने एकोणऐंशी वर्षांच्या एका वृद्धेशी तिसरा विवाह केलेला.

आपल्या आत्मचरित्राच्या अखेरीस सिंक्लेर म्हणतो, " ह्या शतकाच्या प्रारंभापासून मी समाजवादी चळवळीत आहे. राजकारण आणि अर्थशास्त्र या विषयावरील माझी मते आणि श्रद्धा मी शंभर ग्रंथांत आणि अगणित लेखांत व्यक्त केल्या आहेत. माझ्या ग्रंथाची चाळीस भाषांत भाषांतरे झालेली असून लक्षावधी लोकांनी ती वाचलेली आहेत. यावरून सामाजिक न्याय ( Social Justice ) हा केवळ लोकशाहीच्याच मार्गाने साध्य होईल हा माझा सिद्धांत माझ्या वाचकांना परिचित झाला असेल. लोकशाहीसाठी मी आणि माझे शेकडो इतर सहकारी झगडत असताना, अर्ध्या जगावर साम्यवादी हुकूमशाही प्रस्थापित झालेली आहे. मध्यंतरी माणसाने विध्वंसाची इतकी भयानक साधने निर्माण करून ठेवलेली आहेत, की कदाचित एक दिवस पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्र नष्ट होऊन हा ग्रह अनंत अवकाशात अज्ञात स्वरूपात एकटाच भटकत राहील. ही घटना घडेल की नाही हे फक्त दोनच माणसांच्या निर्णयावर अवलंबून आहे किंवा कदाचित एकाच्याच हाती ती गोष्ट आहे ! त्यांपैकी एक ' K ' या आद्याक्षराने जगाला माहीत आहे (क्रुश्चेव्ह). दुसऱ्याच्या बिचाऱ्याच्या नावाचे आद्याक्षर ' S ' ( सिंक्लेर ) आहे. आपल्याला काय वाटते तो हा ' S ' नुसते बोलत राहणार. लोक आपले म्हणणे ऐकतील असा त्याला विश्वास वाटतो. सामाजिक न्याय आणि लोकशाही ध्येय यासाठी तो शेवटपर्यंत झगडत

राहणार! त्याची श्रद्धा आहे की, एक दिवस असा उगवेल, की जगातील लोक आपल्या राज्यकर्त्यांना वठणीवर आणतील आणि त्यांना सामाजिक न्यायाचा नि शांततेच्या मार्गाचा स्वीकार करावयाला भाग पाडतील!"

सिंक्लेरसारखा सामाजिक न्यायासाठी सबंध आयुष्यभर झगडणारा असा प्रचंड ध्येयवादी लेखक जगात क्वचितच झाला असेल!

मराठा : २०-५-१९६३

# १२

## महाराष्ट्राचा समाजवादी लेखक

काणेकरांची आणि माझी गेली पंचवीस वर्षे तरी ओळख आहे. नुसती ओळख नाही, मैत्री आहे. माझ्यापेक्षा वयाने ते सात-आठ वर्षांनी लहान आहेत. तेव्हा ते माझे समवयस्क नाहीत आणि समकालीनही नव्हेत. तेव्हा ते माझे दोस्त आहेत असे मी त्यांना म्हणू शकणार नाही. पण उभयतांच्या वयातल्या ह्या फरकाची जाणीव ठेवून आम्हा दोघांना एकमेकांच्या जेवढे जवळ येता येईल तेवढे आम्ही जवळ आलो आहोत, आणि आश्चर्याची गोष्ट ही की, आम्हा दोघांनाही एकमेकांबद्दल आदर वाटतो. त्यांना एक वेळ माझ्याबद्दल आदर वाटणे शक्य आहे; कारण वयाने मी वडील आहे. पण मला त्यांच्याबद्दल आदर वाटतो, ही गोष्ट विशेष आहे. पण हा माझा चांगुलपणा नसून त्यांचा मोठेपणा आहे. मी जितका चांगला आहे तितकाच वाईट आहे. गेली तीस वर्षे सार्वजनिक जीवनात मी वावरतो आहे, ह्या काळात माझ्या जीवनात शेकडो लोक आले. बरे आले, वाईट आले. सच्चे आले, लुच्चे आले. मित्रांचे शत्रू झाले, शत्रूंचे मित्र झाले; पण काणेकरांचे आणि माझे अगदी पहिल्यापासून जे नाते जडले, त्यात आजतागायत तसूभरसुद्धा फरक पडला नाही. कोणत्याही गोष्टीत त्यांचा माझा शब्दापुरतासुद्धा कधी मतभेद झाला नाही. माझी त्यांनी कधी पूजाही केली नाही आणि कधी निंदाही केली नाही. आजपर्यंत मी माझ्या लेखनात किंवा व्याख्यानात अनेक लोकांना जसे झोडून काढले आहे, तसे त्यांना डोक्यावर घेऊन नाचलो आहे, पण काणेकरांवर टीका तर राहोच पण त्यांच्या गुणांची

जाहीर प्रशंसा एकदाही कधी केल्याचे मला आठवत नाही. अशी वेळच मुळी आतापर्यंत आली नाही. त्या दृष्टीने काणेकर हे मोठे कठीण गृहस्थ आहेत. ते सगळ्यात असतात आणि कशात नसतात. त्यामुळे त्यांना पकडणे मोठे कठीण आहे. समजा मी उद्या काणेकरांचा शत्रू झालो आणि त्यांची रेवडी उडवावयाचे ठरविले, तर मला त्यांच्याविरुद्ध एक अक्षरही लिहिता यावयाचे नाही. त्यांच्या वैयक्तिक जीवनातला एकही दोष किंवा विसंगती मला दाखविता यावयाची नाही. माझ्यासारख्या चोखंदळ आणि थट्टेखोर माणसाची ही अडचण मग इतरांची काय कथा !

आता त्यांच्याबद्दल चांगले लिहायला किंवा त्यांच्यासंबंधी काही मौजेच्या आठवणी लिहायला मी बसलो आहे, तरीदेखील माझी तीच अडचण. त्यांच्याबद्दल चांगले लिहायचे म्हणजे ते फार चांगले आहेत, एवढेच सांगायचे. दुसरे काय ? चारचौघांपेक्षा माणसाचा चेहरा निराळा असला, त्याच्या बोलण्या-चालण्यात काही वेगळापणा असला, तर त्याच्या मौजा आणि आठवणी सांगता येतील. तसे काणेकरांचे काहीच सांगता येणार नाही. काणेकरांशी पंचवीस वर्षांची ओळख असून त्यांची एकही ‘ गंमत ’ मला सांगता येणार नाही. ही काय कमी गंमत आहे ? काणेकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे हेच खरे वैशिष्ट्य आहे. ते सर्वांच्या डोळ्यांत भरतात, पण कुणाच्याही डोळ्यांत खुपत नाहीत. काणेकरांचे अस्तित्व ते असताना भासणार नाही, पण नसले म्हणजे त्यांची उणीव जाणवल्याखेरीज राहात नाही. काणेकरांचे व्यक्तिमत्त्व जितके सौम्य तितकेच रम्य आहे. पण त्यातून त्यांची प्रतिभा आणि बुद्धिमत्ता प्रकट होत नाही. आजकाल त्यांचे वक्तृत्वही अत्यंत प्रभावी झाले आहे. तरीदेखील काणेकर काय आहेत, हे ज्याला जाणून घ्यावयाचे आहे त्याला त्यांचे वाङ्मयच वाचावयाला हवे. व्यक्ती म्हणून काणेकर जितके मोठे आहेत, त्यापेक्षा लेखक म्हणून ते शतपटीने थोर आहेत. काणेकरांचा पिंडच मुळी लेखकाचा आहे. काणेकरांशी बरोबरी करील असा कुशाग्र आणि सव्यसाची बुद्धीचा दुसरा लेखक आज तरी माझ्या डोळ्यांसमोर दिसत नाही.

माझी आणि त्यांची जेव्हा ओळख झाली, तेव्हा ते नुसतेच कवी होते. त्या काळच्या कवींत किंवा लेखकांत त्यांच्याइतका तरुण आणि सुंदर माणूस कोणीच नव्हता. त्यामुळे त्यांची छाप पाहणाऱ्यावर एकदमच पडे, पण त्यांचे काव्य त्यांच्यापेक्षाही आकर्षक होते. ‘ चांदरात ’ ह्या त्यांच्या काव्यसंग्रहाने एका

रात्रीत त्यांच्या नावाचा साऱ्या महाराष्ट्रात बोलबाला केला. त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य हे की, त्यांच्या पूर्वीच्या कोणत्याही लोकप्रिय कवीची किंवा काव्य-पद्धतीची त्यांच्या कवितेवर छाप नाही. ही फार अवघड गोष्ट आहे. नवीन कवी हा कोणा ना कोणाच्या तरी छायेत सापडतोच. त्याला काणेकर अपवाद आहेत. विशीपंचविशीच्या आत लिहिलेल्या ह्या त्यांच्या काव्यसंग्रहात त्यांच्या प्रतिभेचे अनेक गुण प्रगट झाले आहेत. ‘ तू माझी अन् तुझा मीच ! ’ असले सुरम्य भावकाव्य ते जसे लिहू शकतात, तसे ‘ कुठल्याशा जागी देख । बिल्डिंग मोडकी एक । पसरली ’ असले सुंदर विडंबनही करू शकतात. ‘ तेजाची आम्ही बाळे । रूप जरी अमुचे काळे ’ हे ‘ सावल्यांचे गाणे ’ लिहून ते कल्पनेच्या आकाशात जसे हृदयंगम विहार करू शकतात, त्याचप्रमाणे ‘ शंभरातली नव्वद जनता । धुरकटलेल्या कोंदट जगता । ‘ घरे ’ म्हणोनी त्यातच कुजता । औषधास त्या चंद्र न दिसे । ’ असली हृदयविदारक जाणीवही वास्तववादी जीवनाकडे पाठ फिरवून काव्य रचीत बसलेल्या समकालीन कवींना करून देतात. पुरोगामी दृष्टिकोण मराठी कवितेत प्रकट करण्याचा पहिला प्रयत्न काणेकर ह्यांनीच केला. नवकवी आणि भावकवी ह्यांचा ‘ सुरेख संगम ’ त्यांच्यात झाला असल्याने त्या वेळच्या तरुण पिढीत ते अतिशय लोकप्रिय झाले.

पण काव्याच्या क्षेत्रात ते जितक्या झपाट्याने प्रकट होऊन झळकले, तितक्याच वेगाने ते त्यातून अंतर्धान पावले. तथापि त्यामुळे मराठी काव्याचे नुकसान झाले तरी लघुनिबंधाचा फायदाच झाला. कारण, मराठी साहित्यात हे क्षेत्र सर्वांत जास्त उपेक्षित होते. प्रा. फडके ह्यांच्या ‘ गुजगोष्टी ’ हे तोपर्यंत आदर्श लघुनिबंध समजले जात होते. पण लघुनिबंधांच्या खऱ्या कसोटीला फडक्यांच्या ‘ गुजगोष्टी ’ फारशा उतरू शकणार नाहीत. ह्याचे कारण लघुनिबंध हा भाव-काव्यासारखा आहे. थोड्या शब्दांत जास्तीत जास्त भावना सहृदयतेने आणि मार्मिकपणे त्यामध्ये व्यक्त व्हावयाला पाहिजेत. फडक्यांच्या ‘ गुजगोष्टी ’ आटोपशीर तर नाहीतच नाहीत, पण त्यांच्यात काव्य नाही आणि विनोदही नाही. फक्त भाषा चांगली आहे. पण ती पाल्हाळिक आणि कृत्रिम आहे. आदर्श लघुनिबंधकाराच्या अंगी असावे लागणारे सर्व गुण काणेकरांमध्ये आहेत. जीवनातल्या अनेक विसंगती आणि मौजा ते इतक्या अचूक आणि भेदक शब्दात प्रकट करतात की प्रत्येक निबंधात चारदोन वेळा तरी थांबून वाचकाला अंतर्मुख व्हावे लागते. मानवी जीवनाकडे पाहण्याची फडक्यांची

दृष्टी फार उथळ आहे, तसे काणेकरांचे नाही. ते अंतःकरणाची एकदम तारच पकडतात. त्यांच्या निबंधाची सुरुवात मोठ्या खेळकरपणे होते. पण मध्येच एकदम वीज चमकावी तसे धगधगीत आणि रसरशीत मानवी जीवनाचे दर्शन त्यात एकदम घडून येते. खरे बोलून माणसाचे मन दुखवावे का यासंबंधी बोलताना ' माणसाच्या जीवापुढे मला तरी नाही खऱ्याची किंमत अधिक वाटत ! ' असे ते चटकन् उद्गारून जातात. ह्यात त्यांच्या लघुनिबंधांचे सामर्थ्य आहे. ' सामान्य माणसा 'बद्दल ते म्हणतात; " आम्ही बुद्धिवान लोक अपत्य-वात्सल्याविषयी रसाळ कविता लिहू किंवा मित्रप्रेमावर एखादा फर्डा लेखही खरडू. पण आमचा मित्र आजारी पडला असता इकडची काडी तिकडे करण्याचे काही आम्हांला जमणार नाही. पण तेच एखादा सामान्य माणूस आपल्या स्नेह्याच्या आजारात त्याची शुश्रूषा करण्याचे काम आमच्यापेक्षा अधिक चोखपणे करतो. सामान्यातच असामान्य माणुसकी असते, आणि बुद्धीपेक्षा मला माणुसकीची किंमत अधिक वाटत असल्याने सामान्यांचीच अधिक पसंत करणार. " मानवी जीवनाबद्दलचा हा शुद्ध आणि निर्भेळ आदर फडक्यांच्या लघुनिबंधात तुम्हांला कालत्रयी आढळून येणार नाही. काणेकरांच्या ' लघु-निबंधां 'ची यथार्थ समीक्षा करावयास एक स्वतंत्र निबंधच लिहावा लागेल, एवढी त्यांची योग्यता आहे. मानवी जीवन त्यामधे त्यांनी उभे आडवे फाडून अन् उलगडून दाखविले आहे. काणेकरांनी लघुनिबंधाला मराठी साहित्यात फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त करून दिली आहे, ह्यात शंका नाही. त्यांचे निबंध हे मराठी भाषेचे खचित भूषण म्हणून समजले जातील. प्रतिभाशाली लेखकाचे मुख्य लक्षण हे की, तो मोजक्या शब्दांत अगदी नेमके सांगतो आणि काळजाचा एकदम ठाव घेतो. हे सामर्थ्य काणेकरांच्या प्रतिभेत आहे. काश्मीरमध्ये प्रवासाला गेले असताना तेथे त्यांचे लक्ष कोणत्या दृश्याकडे जावे ? काश्मीरमधल्या सृष्टि-सौंदर्याकडे ? नव्हे; मोटारचा धक्का लागून मेलेल्या एका शेतकऱ्याच्या बैलाकडे. त्या बैलाभोवती त्याचा मालक आणि त्याच्या कुटुंबातली माणसे रडत बसलेली आहेत. एका मेलेल्या बैलासाठी शेतकऱ्याने रस्त्यावर एवढा गोंधळ घालावा हे पाहून काणेकरांच्या मोटारीतल्या सहप्रवाश्यांची खूपच करमणूक झाली. पण त्या शेतकऱ्याची भावना फक्त काणेकरांनाच समजली. " बैल मेला—चारचौघांचा अन्नदाता गेला—सावकाराचं कर्ज काढून विकत घेतलेला बैल कर्ज फिटावयाच्या आत भर जवानीत गेला. आता नवा बैल ? " काणेकरांच्या प्रतिभेचे असामान्यत्व

हे आहे.

लघुकथाकार म्हणून काणेकर काही प्रसिद्ध नाहीत. पण ' दिव्यावरती अंधेर ' हा त्यांचा लघुकथासंग्रह वाचून पाहावा. त्यामधील काही लघुकथा इतक्या विलक्षण प्रभावी आहेत की, त्या वाचून वाचक हतबुद्धच होईल. उदाहरणार्थ, ' प्रोफेसर ' ही गोष्ट पाहा. ह्यात चित्रित केलेल्या व्यक्ती आणि घटना काळीज अक्षरशः पिळवटून टाकतील. ' कामकरीण ' आणि ' कविवर्य ' ह्याही गोष्टी तशाच हृदयविदारक आहेत. मराठी साहित्यातले प्रायः असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यात काणेकरांनी संचार करून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविला नाही. ' धुक्यातून लाल ताऱ्याकडे ' हे त्यांचे प्रवासवर्णन मराठी साहित्यात तरी अपूर्व आहे. तीन महिन्यांचा परदेशचा प्रवास संपवून काणेकर जेव्हा स्वदेशी परत येतात, तेव्हा हिंदुस्थानच्या भूमीचे दर्शन होताच त्यांच्या मुखातून जे काव्य उचंबळते ते वाचून अंगावर रोमांच उभे राहतात. " छे, छे, देश म्हणजे नुसती आपली माणसे नव्हे. देश म्हणजे ती विशिष्ट भूमी, ती झाडे, ती फुले, ते वातावरण आणि ती माणसे. झाडे आपला जीवनरस ज्याप्रमाणे जमिनीतून शोषून घेतात, तसाच आम्ही माणसे देश ह्या शब्दात सामावलेल्या या सर्व गोष्टींतून आमचा जीवनरस शोषून घेतो, आणि आम्ही जे आहोत ते ' आम्ही ' होतो "

काणेकर हे नुसतेच कवी, निबंधकार किंवा ललितकथाकार नव्हेत. मानवी जीवनाकडे पाहण्याचा त्यांच्याजवळ निश्चित ओजस्वी आणि प्रभावी दृष्टिकोण आहे ह्यात काही शंका नाही, आणि त्यामुळेच त्यांनी काही लिहिले तरी त्यात एक वेगळेच तेज प्रगट होते. विविध विषयांतून दिमाखाने वावरणाऱ्या काणे-करांच्या प्रतिभेचे सामर्थ्य पाहिल्यानंतर त्यांच्याबद्दलच्या वाचकांच्या अपेक्षा साहजिकच वाढल्यावाचून राहात नाहीत. आतापर्यंत त्यांनी केलेली साहित्यसेवा संख्येनेसुद्धा काही कमी भरणार नाही. तथापि लेखनाकडे त्यांनी यापेक्षाही अधिक लक्ष पुरवावे असे पुष्कळांकडून म्हटले जाते, आणि त्या दृष्टीने ते आळशी आहेत, असा त्यांच्यावर आरोप केला जातो. अर्थात मी त्यांना आळशी म्हणणार नाही, कारण मी तसे म्हणालो तर ' जगाचा खरा उद्धार आळशांच्याच हातून होतो ! ' असे आपल्या लघुनिबंधातले सुप्रसिद्ध उत्तर ते मला दिल्याखेरीज राहणार नाहीत. मनुष्य जे करतो आणि जेवढे करतो त्याबद्दल दुसऱ्यांनी तक्रार करण्याचे कारण नाही.

वकिलीची परीक्षा पास होऊन काणेकरांनी वकिलीचा व्यवसाय केला नाही, राजकारणाचा अभ्यास करून राजकारणाच्या आखाड्यात प्रत्यक्ष ते उतरले नाहीत किंवा वृत्तपत्रासारख्या व्यवसायात शिरून ते वृत्तपत्रलेखक झाले नाहीत. अखेर ते फक्त महाविद्यालयातले प्राध्यापक झाले. हे त्यांचे निर्णय बरोबर होते का चुकीचे होते, हे दुसऱ्यांना कसे सांगता येणार? जे झाले ते त्यांच्या लेखनाच्या दृष्टीने उपकारक झाले. जर ते वकील, पत्रकार किंवा राजकारणी झाले असते तर आज त्यांच्या हातून जेवढे आणि ज्या दर्जाचे लेखन झाले, ते झाले नसते. काणेकर हे प्रतिभाशाली लेखक आहेत. प्रतिभाशाली लेखक हा क्वचितच बहुप्रसव असतो. म्हणून काणेकरांनी कमी लिहिले हा काही दोष होऊ शकत नाही. पण त्यांनी जे लिहिले त्यात जीवनाची उष्ण धग आहे, त्यात कढत भावना आहेत आणि त्यांतून विचारांच्या ठिणग्या उडताहेत.

पुष्कळ वर्षांपूर्वी काणेकरांनी माझ्यासंबंधी लिहिले आहे, "अत्रे हाही एक 'माणूस' आहे. चांगलाच भरभक्कम माणूस आहे आणि त्याला तुम्ही जितका अधिक जवळून पाहाल तितका तो तुम्हांला अधिक आवडू लागेल." काणेकरांबद्दल मीसुद्धा असेच म्हणेन. साहित्याचा व्यवसाय करताना आम्ही दोघेही आपली 'माणुसकी' कधी विसरलो नाही, हाच आम्हा दोघांमधला समान दुवा आहे. काणेकर यशस्वी लेखक झाले ह्याचे कारण त्यांनी आपल्यातला 'माणूस' कधीही दुर्बल होऊ दिला नाही! आपण 'लेखक' नसून 'माणूस' आहोत ही जाणीव ठेवून जो लिहितो तो प्रभावी लेखक होतो!

नवयुग : ९-१२-१९५६

१३

## प्रा. श्रीकृष्ण क्षीरसागर

मिरज येथे मे महिन्याच्या प्रारंभी भरणाऱ्या ४१ व्या 'मराठी साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी अखेर प्रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर ह्यांची बहुसंख्येने निवड झाली, ह्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. प्रा. क्षीरसागर ह्यांचे आणि आमचे स्नेहसंबंध जुने आणि घनिष्ठ आहेत. तेव्हा त्यांच्या अध्यक्षीय निवडणुकीचा जाहीर पुरस्कार आम्ही यापूर्वी आमच्या स्तंभांतून करावयाला हवा होता, अशी साहजिकच आमच्या काही मित्रांची अपेक्षा होती. पण आम्ही काही तसे करू शकलो नाही हे खरे. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीला राजकीय निवडणुकीचे स्वरूप येऊ नये असे आम्हांला वाटत होते. खेरीज, वाङ्मयीन गुणांच्या आणि कर्तृत्वाच्या बळावर प्रा. क्षीरसागर हे आज ना उद्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निश्चित निवडून येतील, त्यांना इतर आगंतुक साहाय्याची विशेष जरुरी नाही, अशी आमची धारणा होती; आणि त्याचप्रमाणे घडले. त्यामुळे आज आम्ही निर्मळ संतोषाने आणि प्रांजळ उत्कटतेने त्यांचे अभिनंदन करू शकतो.

प्रा. क्षीरसागर हे पुण्याच्या महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या महाविद्यालयात गेली कित्येक वर्षे मराठी भाषेचे नि साहित्याचे प्राध्यापक आहेत. तथापि, स्वतंत्र प्रतिभेचे, समतोल प्रज्ञेचे आणि सौंदर्यवादी वृत्तीचे ते मराठी भाषेतील एक नामांकित लेखक आणि निबंधकार म्हणून प्रख्यात आहेत. त्यांचे स्फुट लिखाण गेल्या दहा-बारा वर्षांत आणि मराठीमधल्या नामांकित नियतकालिकांतून

वेळोवेळी प्रसिद्ध झालेले आहे. त्यांच्या प्रत्येक लिखाणावर जसा त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटलेला असतो, त्याप्रमाणे त्यामधून प्रकट होणारा त्यांचा गाढ व्यासंग आणि त्यांचे मौलिक चिंतन ह्यांचाही प्रभाव वाचकांच्या मनावर पडल्यावाचून राहात नाही.

अलीकडच्या काळात विचाराची आणि अभ्यासाची प्रेरणा देणारे निबंधकार आढळणे जवळ जवळ दुर्मिळच झालेले आहे. लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, डॉ. केतकर, आहिताग्नी राजवाडे ह्यांनी मराठी साहित्यात उघडून ठेवलेले विचारांचे वैभवशाली मार्ग आज बहुतांशी बुजल्या-सारखेच झालेले आहेत आणि त्या मार्गांचा आता जीर्णोद्धार करण्याची कुवत फार थोड्या मराठी लेखकांत आज आहे. पण त्या थोर निबंधकारांनी घालून दिलेल्या परंपरांचे दृढ संस्कार प्रा. क्षीरसागर ह्यांच्यावर झालेले आहेत. ह्या गोष्टीचा निश्चित प्रत्यय त्यांच्या लेखनामधून आल्यावाचून राहात नाही.

सामाजिक समस्यांचा गंभीर विचार करणाऱ्या लेखकांची सर्वांत मोठी अडचण ही असते की, त्यांच्यामध्ये भाषेच्या शैलीचा नि लालित्याचा बहुधा अभाव असतो. ते वैगुण्य प्रा. क्षीरसागरांच्या लेखनात नाही. त्यांच्या शब्द-योजनेत तेज आणि विवेचनात वेग आहे. ‘ कवी ’ म्हणून ते प्रसिद्ध नसले, तरी वृत्तीने आणि भावनेने ते कवीच आहेत. प्रा. माधव ज्यूलियन ह्यांच्या काव्याचा नि सहवासाचा त्यांच्या रसिकतेवर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. स्वतः त्यांचाही उर्दू काव्याचा व्यासंग चोखंदळ असावा असे त्यांच्या लेखनामध्ये उर्दू काव्याची जी मार्मिक अवतरणे मधून मधून आढळून येतात, त्यावरून दिसून येते. ‘ सूफी पर्णे ’ ही त्यांची गद्यकाव्येही त्यांच्या काव्यात्मकतेचा आल्हाद-कारक प्रत्यय आणून देतात.

प्रा. क्षीरसागर ह्यांचे व्यक्तिमत्त्वही जितके तऱ्हेवाईक तितकेच चमत्कृतिपूर्ण आहे. त्यांच्याशी प्रत्यक्ष परिचय झाल्याखेरीज ती मौज उमगणार नाही. अनेक परस्परविरोधी तत्त्वज्ञानांची उपासना करताना ते आढळतात. त्यामुळे क्षणभर ते सनातनी आहेत का अध्यात्मवादी आहेत की अज्ञेयवादी आहेत ह्याचा त्यांच्याशी निकट परिचय असणाऱ्यांनाही पत्ता लागत नाही. व्यक्तिगत जीवनात अनेक विसंगतींचा समन्वय घडवून आणण्याची त्यांची जी धडपड चालू असते ती केवळ आमच्यासारखा विनोदी माणूसच सहृदयतेने हसण्यावारी नेऊ शकतो. ह्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक निराळेच हृदयस्पर्शी आकर्षण

निर्माण झालेले आहे. आणि म्हणूनच त्यांच्याशी बोलण्यात, वाद करण्यात वा त्यांच्या सहवासात काही काळ घालवण्यात कोणालाही समाधान वाटल्यावाचून राहात नाही.

सामाजिक जगात वावरण्याचा अनुत्साह आणि सार्वजनिक प्रसंगातून मिरवण्याचा कंटाळा ह्यामुळे प्रा. क्षीरसागरांच्या लौकिक प्रसिद्धीचे क्षेत्र त्यांच्या कर्तृत्वाच्या मानाने आजपर्यंत मर्यादित असले तरी मराठी लेखकाला मिळणारा सर्वोच्च मान साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी त्यांची निवड झाल्याने त्यांना आता मिळाला असल्यामुळे आणि त्या स्थानावरून ते जे भाषण नि मार्गदर्शन करतील ते निश्चयाने आजपर्यंतच्या त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वात भर घालणारे असेच होईल याबद्दल आमची खात्री असल्यामुळे, आतापर्यंत न लाभलेले कीर्तीचे गडगंज माप प्रा. क्षीरसागर ह्यांच्या पदरात पडल्यावाचून राहणार नाही याबद्दल आम्हाला समाधान वाटते.

मराठी साहित्यात आज 'नावीन्या'च्या नावावर सर्वत्र बेबंदशाही माजून राहिली आहे. ह्या अराजकाची मर्मभेदी मीमांसा करून अभिजात आणि पुरोगामी साहित्याचा ध्वज उंच फडकविण्याचे कार्य प्रा. क्षीरसागर ह्या संमेलनात निश्चितपणे करतील असा आम्हाला भरवसा वाटतो. त्याखेरीज मराठी परंपरा, संस्कृती आणि इतिहास ह्याबद्दलचा त्यांचा अभिमान कडकडीत असल्यामुळे स्वतंत्र भारताच्या राज्यकर्त्यांनी 'लोकशाही'च्या नावाखाली महाराष्ट्रावर द्विभाषिक राज्य लादून जो भयानक अन्याय केला आहे, त्याचाही जळजळीत प्रतिकार प्रा. क्षीरसागर आपल्या भाषणातून केल्यावाचून राहणार नाहीत. साहित्य आणि समाजजीवन ह्यांचे प्रभावी मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य अंगी असलेल्या प्रा. क्षीरसागर ह्यांच्यासारख्या एका तरुण पण अधिकारी साहित्यिकाची साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड केल्याबद्दल मिरजच्या स्वागत मंडळाला आम्ही धन्यवाद देतो.

मराठा : २४-३-१९५९

# १४

## आधुनिक रंगभूमीचे सुधारक

सुप्रसिद्ध साहित्यिक श्रीयुत भार्गवराम विठ्ठल ऊर्फ मामा वरेरकर यांच्या वयाला ता. २७ एप्रिल रोजी ऐंशी वर्षे पूर्ण होत असली तरी, त्याबद्दलचा त्यांचा सत्कार-समारंभ आज मुंबईत राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या अध्यक्षतेखाली साजरा होत आहे. ऐंशी वर्षांपूर्वी चिपळूण येथे सामान्य परिस्थितीत जन्मलेले आणि सुसंपन्नता, सुशिक्षण किंवा सुप्रतिष्ठा यांचे पाठबळ मुळापासूनच नसलेले श्रीयुत मामा वरेरकर आज ऐंशीव्या वर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते गौरविले जात आहेत ही खरोखरच मोठ्या आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. मामांच्या आयुष्याचा ' ग्राफ ' काढला तर त्यात अनेक उंच–सखल बिंदू दृष्टीस पडतील, पण त्या सर्वांत आजचा प्रसंग हा अत्यंत श्रेष्ठ गणावा लागेल. तसे मामांचे सत्कार-समारंभ आतापर्यंत काही थोडे झाले आहेत असे नाही. त्यांच्या एकसष्टीचा समारंभ अनेकांना अजून आठवत असेल. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे मामा अध्यक्ष निवडून आले तेव्हा, मराठी नाट्य-संमेलनाचे ते अध्यक्ष झाले तेव्हा, त्यांना भारत सरकारने ' पद्मभूषण ' हा मानाचा किताब दिला तेव्हा, त्यांचा अमृतमहोत्सव झाला तेव्हा, अशा अनेक कारणांनी, अनेक ठिकाणी त्यांचे सत्कार-समारंभ आजवर झालेले आहेत. पण आजच्या सत्काराचे वैशिष्ट्य काही आगळेच आहे. मामांचा सत्कार राष्ट्रपतींच्या हस्ते होत आहे आणि ते राष्ट्रपतीही स्वतः साहित्यिक असलेले असे आहेत ! गुणवानाचे मोल गुणी माणूसच करू शकतो. मामांच्या आजच्या सत्काराचे आणखी एक वैशिष्ट्य

म्हणजे या सत्कार-समारंभात सारे काही विसरून आज सर्वजण मोठ्या आनंदाने सामील होत आहेत.

मामांचा सत्कार हा मराठी साहित्याचा आणि पर्यायाने महाराष्ट्राचाही गौरव आहे असे आम्ही मानतो. मामांनी अर्धशतकाहून अधिक काळ मराठी साहित्याची व महाराष्ट्राची निरलसपणाने सेवा केलेली आहे हे कोणालाही कधी नाकारता येणार नाही. या सेवेचे मोल मामांना तरुण वयात अतिशय खडतर असे द्यावे लागलेले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारत सरकारने मामांच्या गुणांची बूज राखून त्यांना राज्यसभेत नियुक्त केल्यापासून मामांच्या जीवनात आर्थिक स्वास्थ्याने प्रवेश केलेला असला तरी तत्पूर्वीची मामांची सारी हयात कष्टात गेलेली आहे. या साऱ्या हालअपेष्टांना तोंड देताना मामांनी कधी तक्रार केली नाही आणि त्यापेक्षाही अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे परिस्थितीपुढे नांगी टाकून त्यांनी आपली लेखणी कधी बाजारी साहित्याच्या पैदाशीसाठी राबवली नाही! मामांनी लेखणी व वाणी या मानवाजवळच्या सर्वांत प्रभावी अस्त्रांचा अर्धशतकाहून अधिक काळ उपयोग केला, तो नेहमीच सदुपयोग होता असे जरी म्हणता येण्यासारखे नसले तरी एक गोष्ट निश्चित आहे की, त्यांनी पोटासाठी आपली लेखणी कधी कुणाला 'विकली' नाही! मामांनी चुकीचे लिहिले असेल, खोडसाळही लिहिले असेल, मुद्दाम वाईटही लिहिले असेल, पण मामांनी चार दिडक्या मिळतात म्हणून मनाला न पटणारे कागदावर उमटवलेले नाही. हे त्यांचे श्रेय त्यांना बिनतक्रार दिलेच पाहिजे.

मामांनी दीडशेच्या वर पुस्तके प्रसिद्ध केली आहेत व ग्रंथगत न झालेले असेही खंडोगणती लेखन त्यांनी केलेले आहे. लेखनाची त्यांची हौस जबरदस्त आहे. आज ऐंशी वर्षे झाली तरीही नवे लिखाण नव्या दमाने लिहिण्याची त्यांची उमेद दांडगी आहे. साहित्यात नवे नवे प्रयोग करण्याची, नव्या नव्या कल्पना मांडण्याची, जुन्या कथांना वा व्यक्तिचित्रांना नवा रंग देण्याची मामांची हौस अजून कायम आहे. वैचारिकता हा मामांच्या सर्वच वाङ्मयाचा स्थायिभाव आहे. चालू परिस्थितीबद्दल असमाधान आणि नवी समाजरचना आणण्याची हौस, यातूनच मामांचे बहुसंख्य वाङ्मय निर्माण झालेले आहे.

नाटक, कथा, कादंबऱ्या, प्रबंध वगैरे विविध तऱ्हेचे साहित्य वरेरकरांनी लिहिलेले असले तरी मामांची ओळख नाटककार म्हणूनच सर्वांना जास्त आहे, आणि मामांच्या नाट्यवाङ्मयामध्ये त्यांचा साहित्यनिर्मितीचा जो दृष्टिकोण

दिसून येतो तोच प्रायः त्यांच्या इतरही वाङ्मयाचा प्रेरकगुण आहे. वरेरकरांच्या नाट्यवाङ्मयासंबंधी आम्ही महाराष्ट्र नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना बावीस वर्षांपूर्वी म्हटले होते ते आजही खरे आहे. " श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना दोन बुद्धिमान शिष्य मिळाले; एक गडकरी आणि दुसरे वरेरकर ! गुरु हे स्वतः विश्वविद्यालयात संपूर्ण शिक्षण घेतलेले असे पदवीधर, तर त्यांचे दोघेही शिष्य बिनपदवीचे आणि अर्धवट शिक्षण घेतलेले होते. एक माजी शाळामास्तर तर दुसरे माजी पोस्टमास्तर. दोन्हीही पैशाच्या दृष्टीने सारखेच दरिद्री. तथापि कोल्हटकरांच्या ह्या दोन्ही शिष्यांनी गुरूची परंपरा काकणभर उज्ज्वलतेने आणि जास्त धडाडीने चालवून, ती गुरूंच्यापेक्षाही समाजात जास्त लोकप्रिय केली. कोल्हटकरांच्या काव्याचे आणि विनोदाचे वरदान गडकऱ्यांना मिळाले तर, सामाजिक अन्यायाबद्दल त्यांना वाटणारी चीड आणि तळमळ वरेरकरांच्या वाट्याला आली. कोल्हटकरांचा भूतदयावाद आणि समाजसुधारणेची तळमळ ही वरेरकरांच्या वाट्याला आली. "

खाडिलकर, कोल्हटकर आणि गडकरी ह्यांच्याइतका, शिक्षणाचा नि संस्काराचा लाभ वरेरकरांना मिळाला नसताही ह्या नाटककारांना जे एक अवघड कार्य साधता आले नाही, ते वरेरकरांनी यशस्वितेने साधले आणि ते म्हणजे मराठी रंगभूमीला अद्‌भुतरम्यतेच्या कृत्रिम वातावरणातून खेचून काढून तिला रक्तामांसाच्या माणसाच्या खऱ्याखुऱ्या आणि जिवंत जगात आणून सोडले आणि ह्या दृष्टीने वरेरकर हे पूर्वीच्या सर्व नाटककारांपेक्षा अधिक यथार्थत्वाने मराठीचे युगप्रवर्तक नाटककार म्हणून संबोधिता येतील. देवलांनी 'शारदा' नाटक लिहून वास्तववादी सामाजिक नाटकांची जी तेजस्वी सुरुवात केली होती, ती परंपरा कोल्हटकर-गडकरी ह्यांच्यापेक्षा अधिक तत्त्वनिष्ठेने वरेरकर ह्यांनीच पुढे चालविली. 'कुंजविहारी', 'ल्याचा ल्य', 'करीन ती पूर्व' इत्यादी पौराणिक वा ऐतिहासिक नाटके जरी वरेरकरांनी लिहिली असली तरी, त्यांच्या मनाचा आणि भावनेचा मूळचा कल भूतकालापेक्षा वर्तमानकालाकडेच जास्त झुकलेला आहे. देवादिकांच्या आणि राजेलोकांच्या काल्पनिक स्वप्नसृष्टीत रममाण झालेल्या रंगभूमीला सामाजिक अन्यायाने आणि आर्थिक विषमतेने गांजलेल्या कष्टाळू गरिबांच्या दुनियेमधून वरेरकरांनी हिंडवून आणले. सध्यांच्या मध्यम आणि मजूरवर्गापुढचे बहुतेक सर्व प्रश्न ह्या नाही त्या नाटकात वरेरकरांनी चितारण्याचा प्रयत्न केला. हुंडा, धर्मांतर आणि शुद्धीकरण, गिरणी-मालक, मजूर आणि

संप, असहकार आणि कोर्ट बहिष्कार, आकडे आणि सट्टे खेळण्याचे नवे व्यसन, जुगार, अपृश्योद्धार आणि खादी प्रसार, करमणुकीवरील कर, मद्यपानबंदी, किंबहुना गेल्या दीड तपात ज्या ज्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि राजकीय चळवळी महाराष्ट्रात होऊन गेल्या त्यांची नाट्यात्मक नोंद अगदी चिकाटीने आणि क्वचित अपयशाचा कडू वाटा पदरी पत्करूनही वरेरकरांनी केली. टिळकांच्या राजकारणाचे पडसाद जसे खाडिलकरांच्या नाटकात उमटले, तसे गांधींच्या नेतृत्वाखाली जिवंत झालेल्या काँग्रेसच्या राजकारणाचे प्रतिबिंब वरेरकरांच्या नाटकांत चित्रित झाले.

वरेरकरांच्या लेखनात सहजता आणि विपुलता हे गुण असल्याने पूर्वीच्या नाटककारांवर नाटकांच्या संख्येच्या दृष्टीनेही वरेरकरांनी मात केली. किंबहुना ह्या नाटककाराने कादंबरीच्या मुलखावर स्वारी करून तेथेही नाट्यसृष्टीतल्याप्रमाणेच त्यांनी आपली स्वतंत्र गादी स्थापन केली. फडके–खांडेकरादी यशस्वी कादंबरीकारांना रंगभूमीवरून पराभूत होऊन परत जावे लागले, ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे वरेरकरांच्या ह्या सव्यसाची यशाबद्दल खरोखरच कौतुक वाटू लागते.

वरेरकरांचे नाट्यविषय जितके वास्तववादी, त्याहीपेक्षा त्यांचे नाट्यतंत्र अधिक वास्तववादी आहे. किंबहुना आधुनिक नाट्यतंत्र हेतुपुरस्सर उपयोगात आणून रंगभूमी जास्त वास्तववादी आणि सजीव करावयाची हे ध्येय वरेरकरांच्या इतक्या निष्ठेने पूर्वीच्या कोणत्याही नाटककारांनी समोर ठेवलेले नाही. व्यवहारातील सोपी भाषा, आटोपशीर खटकेबाज संवाद, स्वगत भाषणांचा अभाव, एकप्रवेशी नाट्यरचना, दोन तासांची नाटके किंवा नाटिका, ह्या सर्व तांत्रिक सुधारणा वरेरकरांच्या नाटकात आढळतात. त्याव्यतिरिक्त रंगभूमीवरील पडद्यांची हकालपट्टी करून त्याऐवजी निश्चल भिंतींच्या खोल्या आणि दिवाणखाने दाखवण्याची सुधारणा त्यांच्याच नेतृत्वाखाली ललितकलादर्श नाटक मंडळीने केली. स्त्रियांच्या सर्वांगीण सुधारणेचे कार्य विलक्षण चिकाटीने महाराष्ट्रात महर्षी धोंडोपंत कर्वे यांनी जसे केले, तसे मराठी रंगभूमी सर्व बाजूंनी सुधारून तिला सामाजिक जीवनात परिणामकारक स्थान देण्याचे अवघड कार्य तितक्याच चिकाटीने वरेरकर ह्यांनी केले म्हणून मराठी नाटकाच्या इतिहासात 'आधुनिक रंगभूमीचे सुधारक' असा वरेरकरांचा उल्लेख केल्यावाचून गत्यंतर नाही. वरेरकरांचे नाट्य वाङ्मय, त्यातील गुण-बाहुल्यामुळे

अभ्यसनीय झालेले आहे. ' सारस्वत ', ' स्वयंसेवक ', ' हाच मुलाचा बाप ', ' सोन्याचा कळस ', ' संन्याशाचा संसार ' वगैरे त्यांची नाटके आजही वरेरकरांच्या नाट्यशक्तीची कल्पना देऊ शकतात.

वरेरकरांनी शरच्चंद्रांच्या कादंबऱ्यांचे केलेले अनुवाद हीही वरेरकरांची मराठी साहित्याला विलोभनीय देणगी आहे. मामांच्या स्वतंत्र कादंबऱ्यांपैकी ' गोदू गोखले ', ' विधवा कुमारी ', ' धावता धोटा ', ' सात लाखांतील एक ' ' मी—राम जोशी, वगैरे कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. समाजात खळबळ उडवण्याच्या हेतूने विरोधी शब्दांची जोडणी करून आपल्या नाटकाची वा कादंबऱ्यांची नावे निवडण्याचा वरेरकरांना हव्यास आहे. सामाजिक समस्यांबद्दल अंतःकरणपूर्वक जिव्हाळा, भाषेचा चित्तवेधी सुबोधपणा, व्यक्तिचित्रणातील सजीवता आणि हरेक प्रकारच्या नावीन्याचा विलक्षण सोस, हे सर्वच वरेरकरी वाङ्मयाचे विशेष आहेत. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयाने मराठी साहित्याला संपन्न करणारे मामा वरेरकर शतायू होवोत असे आजच्या त्यांच्या सत्काराच्या निमित्ताने आम्ही मनःपूर्वक चिंतितो !

मराठा : २३-४-१९६३

# १५

## नाट्यसंमेलनाध्यक्ष श्री. स. अ. शुक्ल

ह्या महिन्याच्या दि. २२ पासून पुणे येथे जे अठ्ठेचाळिसावे मराठी नाट्यसंमेलन भरत आहे, त्याच्या अध्यक्षपदी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गीतकार, नाटककार, चित्रपट–कथालेखक आणि साहित्यिक श्री. सदाशिव अनंत शुक्ल ह्यांची निवड झालेली आहे, ही गोष्ट नाट्यप्रेमी मराठी जनतेस ह्यापूर्वीच माहीत झालेली आहे. वास्तविक श्री. शुक्ल ह्यांना हा सन्मान यापूर्वीच मिळावयाला हवा होता. कारण, विद्यमान नाटककारांमध्ये अग्रपूजेचा मान ज्यांना देणे आवश्यक आहे, त्यांमध्ये शुक्लकवींचा समावेश प्रामुख्याने करावयाला हवा. आज त्यांच्या वयाला जवळ जवळ पासष्ट वर्षे पूर्ण होत आलेली असली, तरी आपल्या ऐन तारुण्यात त्यांनी आपल्या एकापेक्षाही एक लोकप्रिय नाटकांनी मराठी रंगभूमी कमालीची गाजवलेली आहे, ही गोष्ट आमच्यासारखे त्यांचे समकालीन अद्याप विसरलेले नाहीत. आम्ही स्वतः नाट्यसृष्टीत प्रवेश करण्यापूर्वी मराठी रंगभूमीवरील एक प्रतिभाशाली आणि उदयोन्मुख नाटककार म्हणून शुक्लकवींचे नाव सर्वतोमुखी झालेले होते. त्या दृष्टीने वडिलकीचा मान त्यांच्याकडेच जातो.

आम्ही त्यांना कमीत कमी चाळीस वर्षे तरी ओळखतो आहोत. त्यांचे नाव मराठी साहित्यात प्रथम जे झळकले ते कवी म्हणून. ‘ कुमुदबांधव ’ हे काव्यमय टोपणनाव घेऊन त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. त्यांच्या कवितांचा संकलित संग्रह हा प्रथम १९२७ साली प्रसिद्ध झाला. शुक्ल हे ज्या काळात

कवी म्हणून उदयास आले, तो काळ 'रविकिरण मंडळा'च्या लोकप्रियतेचा होता यशवंत, गिरीश, माधव-ज्यूलियन ह्यांच्या नव्या स्वरूपातील काव्यांनी मराठी रसिक त्या वेळी भारून गेले होते. अशा काळी एखाद्या नव्या कवीने आपला स्वतंत्र सुभा प्रस्थापित करणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. पण शुक्लांनी तो पराक्रम केला. ह्याचे कारण शुक्ल हे काही नुसतेच कवी नव्हते, तर ते गीतकार होते. गीत म्हणजे Lyric. 'रविकिरण मंडळ'वाले हे नुसतेच 'सुनीत'कार होते, पण गीते लिहिण्याचे भावसामर्थ्य त्यांच्यामध्ये मुळीच नव्हते.

भावना आणि संगीत ह्यांचा समन्वय झाल्याखेरीज गीतनिर्मिती होत नाही, म्हणून शुक्लांची गीते गायकांच्या मधुर स्वरांतून जेव्हा लोकांच्या कानांवर पडली, तेव्हा त्यांनी त्यांच्या अंतःकरणाची एकदम पकडच घेतली. त्यानंतरच्या पंधरा वर्षांच्या काळात अनेक नामांकित गायक-गायिकांनी गायिलेली त्यांची शेकडो भावगीते 'हिज मास्टर्स व्हाईस'ने ध्वनिमुद्रित केली, आणि त्या गीतांपैकी बहुसंख्य गीते कमालीची लोकप्रिय होऊन घरोघर गुणगुणली जाऊ लागली. 'रमला कुठे ग कान्हा ?', 'जरा हळू जपून चल बाई ग', 'देवा, कुठे गुंतला', 'गोजिऱ्या कळ्याफुलांनो', 'ब्रिजलाला गडे', 'बोल हसरे बोल प्यारे, बुलबुला हा विषाद का रे ?', 'झणि वेल्हाळा, मिठी घाल बाळा !', 'प्रभु देई शांतिसुखा', 'सखे ग, वृंदावनी जाऊ या', 'चल रानात सजणा, आंबेवनात जाऊ या दूर', इत्यादी शुक्लांच्या अनेक गीतांनी एकेकाळी महाराष्ट्राला अक्षरशः वेड लावले होते. सुबोध, भावमधुर, रसोत्कट, लालित्यपूर्ण आणि प्रासादिक गीतरचना अतिशय जलद करण्यात शुक्लांचा हातखंडा आहे. भावगीतांच्या क्षेत्रातले त्यांचे अपूर्व यश अक्षरशः हेवा करण्यासारखे आहे महाराष्ट्रात त्यांच्याएवढा लोकप्रिय भावगीतकार एक ग. दि. माडगूळकर सोडले, तर दुसरा झालाच नाही. त्यांच्या प्रतिभेचे काही काही उन्मेष जसे अविस्मरणीय तसेच अमर आहेत.

पण भावगीतकार म्हणून महाराष्ट्रात त्यांचे नाव गाजण्यापूर्वीच नाटककार म्हणून त्यांचा नावलौकिक सर्वत्र गाजलेला होता. ते नाटककार कसे झाले तो देखील एक चमत्कारच होता. कॉलेजशिक्षण अर्धवट सोडून ते उदरनिर्वाहासाठी मुंबईमधे आले. तेथे योगायोगाने त्यांची अनंतराव गद्रे ह्यांच्याशी ओळख झाली. त्यांच्या शिफारशीवरून 'महाराष्ट्र-कोकिळ' श्री. शंकरराव सरनाईक ह्यांच्या 'यशवंत संगीत मंडळी'साठी 'संगीत सौभाग्यलक्ष्मी' हे नाटक त्यांनी

लिहिले. हे नाटक पहिल्याने पुण्याच्या रंगभूमीवर आले आणि ते तडाख्याला यशस्वी झाले. त्या वेळी शुक्लजी हे अवघे तेवीस वर्षांचे होते. इतक्या तरुण वयात एका अज्ञात लेखकाने नाटक लिहिण्याचे धाडस करावे, आणि ते नाटक 'यशवंत संगीत मंडळी'सारख्या एका नामवंत नाट्यसंस्थेने रंगभूमीवर आणावे, एवढेच नव्हे तर पुण्यासारख्या चोखंदळ नाट्यप्रेक्षकांनी ते डोक्यावर उचलून धरावे, ह्या सर्वच घटना एकापेक्षाही एक आश्चर्यकारक होत्या. अनेक साहित्यिकांना शुक्लांचा ह्या वेळी मत्सर वाटू लागला. त्यांपैकी कित्येकांनी म्हणजे ज्यांची नाटके रंगभूमीवर यशस्वी झाली नाहीत, अशा पडेल नाटककारांनी त्यांच्या नाटकावर टीकेची सपाटून झोड उठवली. पण त्यामुळे शुक्लांच्या नाटकाच्या लोकप्रियतेला उलट अधिकच उधाण झाले. 'सौभाग्यलक्ष्मी' या नाटकाच्या भाषेवर आणि विनोदावर गडकऱ्यांची विलक्षण छाप पडलेली होती. म्हणून हा नाटककार आपल्याच गुरुघराण्यातला आहे या भावनेने त्यांच्याबद्दल साहजिकच आम्हांला आपलेपणा वाटू लागला.

'सौभाग्यलक्ष्मी'च्या पाठोपाठ 'आर्यसुबोध नाटक मंडळी'ने त्यांचे 'सम्राट कोण' हे नाटक बेळगाव मुक्कामी रंगभूमीवर आणले. त्या वेळचे नामांकित पत्रकार अच्युतराव कोल्हटकर आणि अनंतराव गद्रे ह्यांनी शुक्लांच्या दोन्ही नाटकांना आपापल्या पत्रांमधून कमालीची प्रसिद्धी दिली. त्यामुळे शुक्लांचे नाव ज्याच्या त्याच्या तोंडी झाले. त्यानंतर शुक्लांचे नाव पुन्हा जे महाराष्ट्राच्या समोर प्रामुख्याने आले ते त्यांच्या 'सिंहाचा छावा' या नाटकामुळे. हे नाटक सत्तावीस साली बालनटांच्या 'आनंद संगीत मंडळी'ने पुन्हा पुण्याच्याच रंगभूमीवर आणले आणि त्यानेही लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. त्यावरून आमची तरी त्या वेळी खात्री झाली की, यशस्वी नाट्यलेखनाच्या तंत्राचे रहस्य शुक्लांना नक्की सापडले आहे. कारण, पहिले नाटक अपघाताने यशस्वी झाले, असे प्रा. ना. सी. फडक्यांनी आमच्या पहिल्या नाटकासंबंधी जसे उद्गार काढले तसे आपण शुक्लांच्या नाटकाबद्दल घटकाभर समजलो, तरी दुसऱ्या नाटकाच्या यशाला काही कोणी अपघात म्हणू शकणार नाही.

येथून पुढे शुक्लांच्या रंगभूमीवरील यशस्वी कारकीर्दीला सुरुवात झाली असे म्हणावयास हरकत नाही. कारण, त्यानंतर सहासात वर्षांत एकामागून एक अशी त्यांची चार नाटके रंगभूमीवर आली आणि त्यांपैकी प्रत्येक नाटक हमखास यशस्वी झाले. अठ्ठावीस साली त्यांची 'स्वर्गावर स्वारी' ही नाट्यकृती

' बालमोहन नाटक मंडळी 'च्या रंगभूमीवर आली आणि ती कमालीची गाजली. तीस साली गानसम्राज्ञी हिराबाई बडोदेकरांच्या ' नूतन संगीत विद्यालया 'ने त्यांचे ' साध्वी मीराबाई ' हे नाटक घेतले. संगीत नाटकात त्या नाटकाने तर एक नवाच विक्रम प्रस्थापित केला. हिराबाईंचा स्वर्गीय आवाज, शुक्लांचे भावमधुर काव्य नि उत्कट नाट्यप्रसंग ह्यांचा सुंदर समन्वय ह्या नाटकात झाल्याने त्याने महाराष्ट्रातल्या प्रेक्षकांची मने हिरावून घ्यावीत ह्यात काय आश्चर्य ? त्याच साली ' अरुणोदय संगीत मंडळीं'च्या रंगभूमीवर त्यांचे ' साक्षात्कार ' हे नाटक आले. पंचवीस सालापासून नाटककार म्हणून शुक्लांनी महाराष्ट्रात जे अप्रतिम यश मिळविले त्यावर तेहतीस साली ' यशवंत संगीत मंडळीं 'च्या रंगभूमीवर आलेल्या त्यांच्या ' सत्याग्रही ' नाटकाने कळस चढविला. ह्या नाटकाने लोकप्रियतेचा उच्चांक गाठला.

त्यानंतर ' नाटककार ' म्हणून शुक्लकवी जे अकस्मात अंतर्धान पावले, ते छत्तीस वर्षे झाली तरी अद्याप मराठी रंगभूमीवर अवतीर्ण झाले नाहीत, हा त्यांच्या नि मराठी नाट्यसृष्टीच्या आयुष्यातला काय विचित्र योगायोग असावा, त्याचा आम्हास तरी काही बोध होत नाही. रंगभूमीवरून अस्तंगत झालेला हा प्रतिभाशाली नाटककार चित्रपटसृष्टीच्या आकाशात उदयाला आला. गेल्या तीस वर्षांत ' ध्रुव ', ' अकरावा अवतार ', ' राजा श्रियाळ ', ' देवयानी ', ' नारद-नारदी ', ' गोरा कुंभार ', ' भक्तीचा मळा ', ' गजाभाऊ ', ' नृसिंहावतार ', ' पंढरीचा पाटील ', ' खेळ चालला नशिबाचा ', ' नंदकिशोर ', ' सुदाम्याचे पोहे ' आणि ' विठु माझा लेकुरवाळा ' असे काही हिंदी नि काही मराठी मिळून तेरा चित्रपट त्यांनी लिहिले. त्यांतले काही चांगलेच लोकप्रिय झाले, पण रंगभूमीवर त्यांना जे अपरंपार यश मिळाले ते काही त्यांना रुपेरी पडद्यावर मिळू शकले नाही हे खरे.

ह्याखेरीज ' कमलेची कहाणी ', ' कुमारिकेची किंकाळी ', ' नवी राजवट ', ' देव जागा आहे ', ' सोनं पिकलंय शेतात ' ह्या कादंबऱ्या; ' भरारी ', ' कागदी बदाम ', ' आठवा सर्ग ', ' असत्याचे प्रयोग ' हे कथासंग्रह; तसेच ' सुनीतिका ', ' संगीतिका ', ' रुपेरी रसधारा ', ' कृष्णाची गाणी ', ' आवडती भावगीते ', ' राधेची गाणी ', ' शुक्लांची गाणी ', ' जयजयवंती ' हे गीतसंग्रह, त्याखेरीज मुलामुलींसाठी अनेक दीर्घकथा, श्रुतिका नि नाटिका त्यांनी गेल्या तीस-पस्तीस वर्षांत लिहिलेल्या आहेत. तसे पाहिले तर शुक्लांचा लेखनसंभार जेवढा विविध

आहे तेवढाच विस्तीर्ण आहे.

उभ्या आयुष्यात त्यांनी वाङ्मयाखेरीज कोणाचीही नोकरी केली नाही. सर्वस्वी लेखनावरच त्यांनी आपला चरितार्थ चालविला. उभ्या आयुष्यात त्यांना आर्थिक स्वास्थ्य कधीही लाभले नाही. पण त्याची मलिन छाया त्यांच्या प्रसन्न आणि सुबोध शैलीवर कधीच उमटली नाही. मराठी वाङ्मयाच्या सृष्टीत शुक्ल एकंदर चाळीस वर्षे वावरले, पण साहित्यिकांच्या अंगी सहसा आढळून येणाऱ्या राग, द्वेष, गर्व, अहंकार, मत्सर इत्यादी दुर्गुणांची झळ त्यांनी आपल्या स्वतःला कधीच लावून घेतली नाही. स्वतःच्या वाङ्मयाविषयी चुकूनही कोणाजवळ उल्लेख न करणारा आणि दुसऱ्याच्या लेखनाची चुकूनही निंदा-नालस्ती न करणारा शुक्लांसारखा देवमाणूस मराठी साहित्यसृष्टीत क्वचितच आढळून येईल. म्हणूनच की काय साहित्याच्या मंदिरात त्यांचा जेवढा मानसन्मान आणि कौतुक व्हावयाला पाहिजे होते, तेवढे झाले नसावे. त्यांचा-एवढा भिडस्त, अबोल आणि आत्मप्रसिद्धीचा मनापासून तिटकारा असलेला लेखक आमच्या पाहण्यात तरी दुसरा नाही. स्तुतीबद्दल त्यांना सुख नाही. निंदेबद्दल दुःख नाही. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान' ही त्यांची वृत्ती. लौकिक यशाबद्दल सर्वस्वी उदासीन अशा ह्या महाराष्ट्रातील सज्जन साहित्यिकाला अखेर नाट्यसंमेलनाचे अध्यक्षस्थान देऊन मराठी जनतेने त्यांनी केलेल्या रंगभूमीच्या सेवेची उशीरा का होईना पण कृतज्ञतेने अखेर पावती दिली. हा शुक्लांचा गौरव नसून तो नाट्यसंमेलनाचा गौरव आहे! त्यांचे मार्गदर्शन संमेलनाला स्फूर्तिदायक ठरो!

मराठा : १७-४-१९६७

१६

# प्रा. रामचंद्र श्रीपाद जोग

ठाणे येथे मे महिन्याच्या आरंभी भरणाऱ्या बेचाळिसाव्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी पुण्याचे प्रा. रामचंद्र श्रीपाद जोग ह्यांची तेथील स्वागतमंडळाने निवड केली हे ऐकून आम्हास फार आनंद झाला नि समाधानही वाटले. आनंद ह्यासाठी की आमच्या एका सुहृद स्नेह्याला हा मान मिळाला अन् समाधान ह्यासाठी की प्रज्ञा नि विद्वत्ता ह्यांची स्वागतमंडळाने चांगल्या प्रकारे वूज राखली. निवडणूक म्हणजे अलीकडे एक फार जिकिरीची बाब होऊन बसली आहे. मग ती राजकीय क्षेत्रातील असो किंवा साहित्यासारख्या निरागस अशा क्षेत्रातील असो. त्यामध्ये प्रचार येतो, स्वपरपक्ष येतो, खंडन-मंडन येते, अवास्तव प्रसिद्धीकरण येते, आणि ह्या गोष्टी विद्येच्या क्षेत्रात एकदा आल्या, की मोठमोठ्या साहित्यकारांचा नि विद्यावंतांचाही तोल सुटतो. आनंदाची गोष्ट ही की, यंदाच्या निवडणुकीच्या प्रसंगी ह्या वरीलपैकी एकाही गोष्टीचा शिरकाव स्वागतमंडळाने होऊ दिला नाही. ही जी दक्षता स्वागतमंडळाने घेतली तिच्याबद्दल त्या मंडळाला धन्यवाद दिले पाहिजेत. हे निःपक्षपातित्व त्यांना जसे भूषणास्पद आहे, तसेच इच्छुक जे उभय विद्वान त्यांनाही भूषणास्पद आहे. ह्या दोघांनीही आपल्या विद्वत्तेची नि त्या विद्वत्तेबरोबर येणाऱ्या महत्तेची पातळी निवडणुकीत कोठेही अन् केव्हाही ढळू दिली नाही. यंदाच्या निवडणुकीत असे हे जे विलोभनीय दृश्य दिसले, त्याचे सर्व श्रेय तेथील स्वागतमंडळाला आहे.

प्रा. रामभाऊ जोग ह्यांनी आजवर मराठी वाङ्मयक्षेत्रात—विशेषतः वृत्त, अलंकार, रस, समीक्षण वगैरे साहित्याच्या अंगोपांगांत विविध कार्य केले आहे आणि अद्यापिही अव्याहत रीतीने त्यांनी ते चालविले आहे. प्रा. जोगांचे लिखाण म्हणजे भरभक्कमच असायचे. त्यांनी आरंभी आरंभी जे काव्य केले ते थोडके असले तरी भक्कम, त्यांनी जी साहित्यचर्चा केली ती भक्कम, जो सौंदर्यशोध केला तो भक्कम, आणि जो आनंदबोध केला तोही पण भक्कमच. थोडक्यात म्हणजे प्रा. जोग हे जसे मराठीत भक्कम आहेत, तसेच ते संस्कृत-मध्येही भक्कम आहेत. किंबहुना मराठीतला त्यांचा भक्कमपणा हा त्यांच्या संस्कृतमधील भक्कमपणामुळेच आहे असे म्हटल्यास काही वावगे होणार नाही. मराठीच्या प्राध्यापकाला संस्कृतची उपस्थिती पदोपदी लागते. ती जर नसली तर त्याचे प्राध्यापन आणि लेखन केव्हा उघडे पडेल ह्याचा नेम नसतो. संस्कृतचे पाठबळ हे सध्याच्या मराठी प्राध्यापकात विरळ सापडते. ते प्रा. जोग ह्यांच्या-जवळ भरपूर आहे. त्यामुळे त्यांचे विवेचन निश्चित असते. त्यांचे सिद्धांत अविचल असतात. लेखनात लेचेपेचेपणा कधी असतच नाही. पायाच ठाम असल्यावर त्यावरील रचना कमकुवत कशी असणार ?

प्रा. जोग ह्यांची ही साहित्यसेवा जवळजवळ गेली तीस वर्षे चालली आहे. प्रथम प्रथम त्यांनी 'निशिगंध' ह्या नावाने काही थोडी काव्यरचना केली. काव्यात काही हात चालवून पाहिला, परंतु तो त्यांचा नाद सुटला. तो त्यांच्या व्यवच्छेदक प्रज्ञेला कसा मानवणार ? नंतर त्या प्रज्ञेला पोषक नि उपकारक असे क्षेत्र त्यांनी निश्चित करून त्यात त्यांनी ग्रंथरचना केली. त्यांचा पहिला ग्रंथ 'अभिनव-काव्यप्रकाश' हा होय. काव्यशास्त्रावरील हा ग्रंथ मराठीत एक प्रमाणभूत ग्रंथ म्हणून समजला जातो. 'काव्यप्रकाश' म्हटला म्हणून तो मम्मटाच्या ग्रंथाचा अनुवाद ठरत नाही. तो एक सर्व संकृत काव्यमंथनातून उद्भवलेला आणि मराठीशी आत्मसात झालेला, मराठी काव्याच्या धाग्यादोऱ्यांनी निगडित केलेला असा ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाने महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांत अलंकारशास्त्र–काव्यशास्त्र बद्धमूल तर केलेच, पण त्यांची एक परंपराच निर्माण केली. विद्यापीठातील मराठीच्या विद्यार्थ्यांनाच केवळ नव्हे, तर इतर सर्व-सामान्य काव्यरसिकांना प्रथम जे समीक्षणप्रवण नि साहित्यप्रवण केले, ते जोगांच्या 'अभिनव काव्यप्रकाशा'नेच.

त्यांचा दुसरा मोठा सर्वमान्य ग्रंथ म्हटला म्हणजे 'सौंदर्यशोध व आनंद-

बोध' हा होय. आपण सर्व काव्य वाचतो. त्याचा रसास्वादही घेतो. पण रसास्वाद घेण्याची ही क्रिया कशी होते ह्याकडे आपले लक्ष जात नाही. काव्यापासून मिळणारा आनंद नि इतर सौंदर्यनिष्ठ कलांपासून मिळणारा आनंद हे दोन्ही एक कसे, त्याचे घटक कोणते, थोडक्यात म्हणजे साहित्य ही सौंदर्यनिष्ठ कला कशी, ह्याचे सर्व विवेचन ह्या ग्रंथात आले आहे. काव्यानंदाच्या निरनिराळ्या उपपत्ती जशा आजवर निरनिराळ्या विद्वानांनी मांडल्या आहेत, तशी प्रा. जोग ह्यांनीही आपली उपपत्ती मांडली आहे. काव्यानंद प्राप्त जो होतो तो रसिकाच्या मानसिक वृत्तींच्या 'समधानतेने' होतो, असा प्रा. जोग ह्यांचा सिद्धांत आहे. हा ग्रंथ सौंदर्यशास्त्रावर आहे. अर्थात तो मानसशास्त्र नि तत्त्वज्ञान ह्यांतील सिद्धांतावर आधारलेला आहे. त्या दृष्टीने त्या शास्त्रावरील मराठीतील हा एक आद्य ग्रंथच म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

प्रा. जोग ह्यांचे समीक्षण वाङ्मय अशा ह्या शास्त्रशुद्ध पायावर आधारले आहे. त्यांचे समीक्षण वाङ्मय विपुल आहे. त्यातील दोन ग्रंथ तर विशेष उल्लेख करण्याजोगे आहेत. एक 'अर्वाचीन मराठी काव्य' नि दुसरा 'केशवसुतां'चे काव्य. समीक्षणशास्त्रात हे दोन्ही ग्रंथ प्रमाणभूत झाले आहेत. ह्यातील प्रत्येक कवितेची त्या त्या कवीच्या मानसिक नि सामाजिक वलयांनिशी पारख करून तिचे मूल्य ठरविले आहे. समीक्षणशास्त्र हे बहूवंशी व्यक्तिनिष्ठ शास्त्र असल्यामुळे त्यात व्यक्तीच्या मतांनाच प्राधान्य येते नि ह्या दृष्टीने प्रा. जोगांच्या काही मतांबद्दल इतर समीक्षणकारांचे मतभेद होणे शक्य आहे. जरी मतभेद असले तरी मूळ मतांचा प्रामाणिकपणा नि लेखकांचा एकदेशी का होईना पण शास्त्रीयपणा मान्य करायलाच पाहिजे.

समीक्षण आले की तेथे मुख्यार्थ–लक्ष्यार्थ–व्यंग्यार्थ हे आलेच; तेथे अभिरुचीही पण आलीच. कालाच्या ओघात समाज जसा बदलतो तशी त्याची अभिरुचीही बदलते. अभिरुचीची ही स्थित्यंतरे पारखणे नि त्या अभिरुचीप्रमाणे काव्याच्या आशयात नि अभिव्यक्तीत होणारे फरक पाहणे हे कार्य जसे मनोरंजक आहे तसेच ते सूक्ष्म चिकित्सेचे आहे. पण हेही कार्य प्रा. जोग ह्यांनी पुणे विद्यापीठामार्फत परवा दिलेल्या केळकर व्याख्यान मालेतील व्याख्यानात करून दाखविले आहे. ग्रंथरूपाने हे सर्व लवकरच उपलब्ध होईल. मुंबई ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने नुकत्याच झालेल्या व्याख्यानात प्रा. जोग ह्यांनी दिलेली शब्दशक्तींची कैफियत ही तर आपणा सर्वांच्या ताज्या स्मरणात आहेच.

त्यांचे समीक्षण सिद्धान्ती अन् प्रायोगिक असे द्विविध आहे. त्या दृष्टीने प्रा. जोग हे मराठीतील I. A. Richards होत.

प्रा. जोग ह्यांच्या एका कामगिरीचे विशेषतः आज तर अधिकच महत्त्व आहे. ह्या त्यांच्या कार्यालाही त्यांच्या नेहमीच्या शास्त्रीय नि सूक्ष्म अभ्यासाचे अधिष्ठान असल्यामुळे त्याचे महत्त्व कोणालाही मान्यच करावे लागेल. 'डांगी' भाषेसंबंधीचा प्रश्न ज्या वेळी अगदी ज्वलन्त होता त्या वेळी प्रा. जोग ह्यांनी 'डांगी' भाषेचा भाषाशास्त्राच्या दृष्टीने सूक्ष्म-अभ्यास करून 'केसरी'मध्ये एक लेखमाला लिहिली अन् डांगी ही मराठीचीच पोटभाषा कशी आहे हे निर्विवाद सिद्ध करून दाखविले. भारतातील प्रांतपुनर्रचनेच्या काळात ह्या त्यांच्या कार्याचे विशेष महत्त्व आहे. प्रा. जोग हे अशा काळात म. सा. संमेलनाचे अध्यक्ष होत आहेत हे अत्यंत उचित आहे. त्यांचे ह्याबाबत मार्गदर्शन संमेलनास फार उपयुक्त होईल.

आमचे रामभाऊ हे विद्वान आहेत; नाणावलेले ग्रंथकार आहेत; मराठीचे एक उत्तम जाणकार अन् समीक्षणकार आहेत. हे सर्व तर खरेच. परंतु ते एक सु-हृद् स्नेही आहेत. ते पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सेवक आहेत. ते प्रथम नाशिकच्या कॉलेजमध्ये संस्कृतचे प्राध्यापक होते. तेथे ते संस्कृतबरोबर मराठीही शिकवीत. आता ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये मराठीचे प्राध्यापक आणि तेही नाणावलेले प्राध्यापक आहेत. सर्व महाराष्ट्रात ते एक समीक्षक, गाढे विद्यावंत, सूक्ष्म चिकित्सक, विचारपूर्वक लेखन करणारे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. हे त्यांचे बाह्य महत्त्व झाले. त्यांचे आंतरिक महत्त्व ह्याहिपेक्षा मोठे आहे. त्यांची वृत्ती सरळ, स्वभाव सोज्वळ, अन्तःकरण शुद्ध नि उदार, बुद्धी सूक्ष्म अन् चिकित्सक, वर्तन निष्पाप, असे हे आमचे रामभाऊ आहेत. ते फारसे बोलत नाहीत. ते मोजकेच बोलतात. एखादाच शब्द—पण तो सर्वांना थक्क व चक्क करतो. अत्यंत मार्मिक, अत्यंत वेचक, कधी कधी क्वचित खोचकही. नाही तर त्यांचे नेहमीचे 'हुं, हं'च असायचे दुसरे भोवतालचे लोक आपले बोलतच असतात, परंतु जोगांचे आपले 'हुं, हुं'च चालते. दुसऱ्याच्या पुढे पुढे करणे; गडबड, धांदल, धावपळ ह्यांपैकी काहीही येथे आढळायचेच नाही. त्यांच्यात डावपेच नाहीत. त्यांच्यात स्पर्धा नाही. कधी वैमनस्य नाही. कधी कोणाचे वितुष्ट नाही. आपले काम बरे की आपण बरे. इतके जरी असले तरी ते लोकसंग्रही आहेत. स्नेह्यांचे ते षोकी आहेत. सहवासाचे, सहवासात

कलेचे, कलेच्या रसाचे—अलंकारिक नि लौकिक—भोक्ते, रसिक आहेत. त्यांना न्यायाची चाड अन् अन्यायाची चीड आहे. त्यांना औचित्याची मोठी आवड असून ती त्यांनी अलंकारशास्त्रातून लौकिक व्यवहारात उतरविली आहे. प्रा. जोगांचा स्वभाव संकोची आहे. इतका की तो कधी कधी तर 'कातर' झालासा वाटतो. स्वतः जोग, त्यांच्या पत्नी अन् मुले इतकी आतिथ्यशील आहेत की, पुण्यास जाऊन जोगांच्या घरी जर न गेलो तर काहीतरी चुकल्या-चुकल्यासारखे वाटते. असा हा प्रज्ञावान पंडित, प्रतिभावान समीक्षक, सत्प्रवृत्त लेखक, स्निग्धहृदयी स्नेही आज बेचाळिसाव्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवीत आहे, ह्याबद्दल व्यक्तिशः आम्हाला तर आनंद होतच आहे; पण पांडित्याबद्दल अन् सौजन्याबद्दल आदर असणाऱ्या अखिल महाराष्ट्रालाही आनंद होईल असा आमचा विश्वास आहे. प्रा. जोग ह्यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे येथील साहित्य संमेलनाचे कार्य यशस्वी होवो हीच इच्छा !

मराठा : २७-३-१९६०

## १७

# पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे

मराठीतील ख्यातनाम विनोदी लेखक, महान संगीतकार, उत्तम दिग्दर्शक, कुशल नट आणि आमचे परममित्र श्री. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांची ४७ व्या मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी निवड झाली, म्हणून परवा विलेपार्ले येथे त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. मुंबईतील अनेक सत्कार-समारंभ आम्ही पाहिले आहेत आणि स्वतः आम्हालाही अनेक वेळा या सत्कारांना ' तोंड ' द्यावे लागले आहे, परंतु काल ' पु. ल. ' यांचा आम्ही जो सत्कार पाहिला तो अक्षरशः अविस्मरणीय स्वरूपाचा होता. त्याची भव्यता, त्याची गोडी दीर्घकाळ मनात रेंगाळत राहणारी! जनतेचे पु. ल. यांच्यावर किती अमाप प्रेम आहे नि मराठी माणसाला राजकारणाप्रमाणेच नाट्याविषयीही किती ' रस ' आहे ह्याची ' पोचपावती ' काल पु. ल. यांच्या सत्काराला दहा हजारांच्यावर प्रचंड संख्येने गर्दी करून जनतेने दिली आहे. हा सत्कार जर ' शिवतीर्था 'वर झाला असता तर सारे ' शिवतीर्थ ' वाहून गेले असते! आम्ही स्वतः पु. ल. यांच्या विनोदावर, पु. लं. च्या नाट्यकृतींवर नि विशेषतः ' तुझे आहे तुजपाशी—'वर, त्यांच्या एकपात्री प्रयोगांवर आणि त्यांच्या संगीतावर बेहद्द खूष आहोत! महाराष्ट्रात एवढा बहुगुणी आणि निर्मळ वृत्तीचा माणूस आज तरी आम्हाला दिसत नाही! परवा हा जो पु. ल. यांचा भव्य सत्कार झाला त्या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आम्ही स्वतः होतो. आम्ही अध्यक्ष होतो म्हणून पां. वा. गाडगिळांनी पाठविलेल्या संदेशात मोठ्या

आपुलकीने पु. ल. यांच्याबरोबरच आमचाही गौरव केला. परंतु पु. ल. यांच्या सत्काराला आम्ही अध्यक्ष होतो ह्याचा पु. ल. पेक्षा आम्हालाच खरोखरी आनंद वाटला.

महाराष्ट्रात मराठी भाषेची, मराठी कलेची, मराठी नाट्याची ज्यांनी ज्यांनी मान उंचावली त्या प्रत्येकाचा मुक्तकंठाने गौरव करण्यात आम्ही धन्यता मानली आहे आणि पु. लं. चा आणि आमचा संबंध तर कितीतरी वर्षांपूर्वीचा आहे. आमच्या एका कीर्तनाला पु. लं. नी मागे टाळांची साथ देऊन तुकोबांचा एक अभंग रसाळपणे म्हटल्याचे आम्हांला आठवते. तेथपासून आम्ही पु. लं. च्या प्रत्येक गोष्टीचं कौतुक करीत आलो आहोत. ही व्यक्ती एवढी बहुरंगी आहे की, त्यांना काय येत नाही हाच मोठा प्रश्न आहे. त्यांच्या विनोदाचा वारसा त्यांना आजीकडून मिळाला असल्याचे ते सांगतात. ती गोष्टही मोठी गंमतशीर आहे. त्यांच्या आजीकडे त्यांचे मामा काही मंडळी घेऊन येत. ती बहुधा पेहेलवान असत. एकदा त्यांचे मामा आजीला म्हणाले की, 'आजी ही माणसे पेहेलवान आहेत बरं का.' तेव्हा आजी म्हणाली, "असं का, बरं झालं, मघापासून कोळशाचं पोतं घरात आणायला मी माणूस पाहातच होते!" पु. ल. यांचा आजचा विनोद, आजची व्याख्याने आणि सर्व लेखन वरवर पाहिले, तरीही त्यांच्या आजीच्या या धर्तीच्या उपजत विनोदावरच ते सारे पोसले आहे हे अगदी खरे आहे. 'तुझे आहे तुजपाशी' हे नाटक तसेच खोगीरभरती, नस्ती उठाठेव, गोळाबेरीज हे कथासंग्रह, अपूर्वाई, पूर्वरंग ही प्रवासवर्णने आणि 'पुढारी पाहिजे' या लोकनाट्यातील उपहासगर्भ विनोद यामागेही हीच वृत्ती आहे.

पु. लं. यांचा विनोद अत्यंत निर्मळ आहे. आयुष्यात त्यांनी वावगे काही लिहिले नाही. विनोदी लेखकांविषयी समाजात पुष्कळ गैरसमज असतात. विनोद ही अत्यंत अवघड गोष्ट आहे हे आम्ही अनुभवावरून सांगतो. विनोद करणारा माणूस समाजातील ज्या व्यंगावर विनोद करतो त्याचा त्याने सूक्ष्मपणे अभ्यास केलेला असावा लागतो. जीवनातील विसंगती हुडकताना त्याला सुसंगतीचा साक्षात्कार झालेला असतो. सर्कशीतील विदूषक वरून जरी बावळट दिसला, तरी सर्व 'क्रीडापटूंची' कला त्याला अवगत असते, ह्याची कितीकांना कल्पना असते? विनोदकरांचे असेच आहे. पु. लं. चा विनोद हा विनोदाचा एक स्वतंत्र प्रकार आहे आणि नाट्यातील त्यांचा विनोद तर खरोखरीच

अतिशय आल्हाद्कारक आहे. ‘ तुझे आहे तुजपाशी ’मधे ‘ सूत ’ कातणाऱ्या श्यामला काकाजी म्हणतो, ‘ ज्या वयात सूत जमवावयाचे त्या वयात सूत काय काततोस ? ’ हा विनोद किती श्रेष्ठ दर्जाचा आहे ! या विनोदात केवळ शाब्दिक कोटी नाही. जीवनाचे एक तत्त्वज्ञान त्यात सामावलेले आहे. नाट्य आणि राजकारण ह्यांचे बाळकडू मराठी माणसाला मिळाले आहे. म्हणून मराठी माणसाच्या जीवनात संघर्ष व नाट्य आहे. हे नाट्य आणि जीवनातील संघर्ष पु. लं. नी बरोबर ओळखला आहे. म्हणूनच पु. ल. यशस्वी नाटककार झाले आहेत.

एक गोष्ट सांगतो. पु. लं. च्या नाटकातील तंत्राविषयी आमचा थोडा मतभेद आहे. पु. लं. च्या नाटकात काही वेळा हास्य व अश्रू यांची गल्लत होण्याचा संभव वाटतो. पु. लं. यांचा प्रयत्न निःसंशय मोठा आहे. एकाच वेळी हसू ओठावरून रुंदावत असताना क्षणात डोळ्यांतून पाणी काढणे हे असामान्य सामर्थ्य आहे हे निःसंशय. पु. लं. तसाच प्रयत्न करीत आहेत. अर्थात अवघड प्रयत्न आहे हा. आणखी एक गोष्ट सांगतो. पु. लं. च्या विनोदामध्ये पुष्कळ वेळा ते पटकन आत्मलक्ष्यी बनतात. ह्याचे कारण त्यांची मूळची वृत्ती भावुक असेल हे खरे, परंतु यामुळे विषयाचा रसभंग होण्याची शक्यता असते. पण हे आमचे किरकोळ मतभेद आहेत. पु. ल. यांच्या गौरवाला, श्रेष्ठपणाला आणि समर्थ लेखणीला त्यामुळे जराही उणेपणा येत नाही. कारण पु. लं. चे लेखन मग ते नाट्य असो, कथा असो की प्रवासवर्णने असोत—इतकं सिद्धहस्त आहे की, एक-दोन मतभेदांतून त्याला कधीही कमीपणा येणार नाही.

पु. लं. यांच्या नाट्याचे आणि साहित्याचे समीक्षण करण्याची ही जागा नाही नि वेळही नाही. पु. लं. चे फक्त कौतुक करायची ही वेळ आहे. ते सिद्धहस्त आहेत. नाट्य-कलेबाबत बोलावयाचं तर फक्त आम्ही एवढंच म्हणू की, ‘ तुझे आहे तुजपाशी ’ हे एकच नाटक पु. लं. नी जरी लिहिले असते तरी आम्ही त्यांना ‘ नाटककार ’ म्हणून गौरविले असते. ह्या एकाच नाटकाने ते अमर झाले आहेत. आमच्या परवाच्या भाषणात पु. लं. च्या गौरवासंबंधी बोलताना आम्ही एक मुद्दा मांडला. आजपर्यंत अनेक वेळा आम्ही तो मुद्दा मांडला आहे. स्वतः आम्ही, पु. ल., विजय तेंडुलकर, बाळ कोल्हटकर, वसंत कानेटकर इत्यादी नाटककार मराठी रंगभूमीवर तेजस्वी कामगिरी बजावत असताना नटश्रेष्ठ केशवराव दाते ‘ मराठी रंगभूमी १९३० नंतर संपली ’ असे म्हणतात, याचे आम्हाला

परम दुःख होते. केशवरावांनी या नाटककारांना, नवीन नटांना आणि नटींना उत्तेजन द्यावयास हवे, आशीर्वाद द्यावयास हवा! आजची प्रगतिशील मराठी रंगभूमी नटवर्य दाते यांजकडून आशीर्वादाची अपेक्षा करीत आहे, प्रोत्साहनाच्या दोन शब्दांची अपेक्षा करीत आहे! आणि एवढेही सांगून केशवरावांना मराठी रंगभूमीचे आजचे तेजस्वी रूप दिसले नाही तरी तिच्या यशाची पावती लक्षावधी जनतेकडून आज मिळत आहे. हे अमाप यश रंगभूमी मेल्याचे लक्षण आहे काय? परवा भाषणात पु. ल. देशपांडे म्हणाले की, नाट्याच्या प्रेमाने प्रेरित होऊन मुंबईहून ऑफिस सुटताच डेक्कन क्वीनने पुण्याला जाऊन तीन वाजेपर्यंत तालमी उरकून नि पहाटेच्या पॅसेंजरने परत मुंबईत कामावर येऊन मी हजर होतो. रंगभूमीचे उज्ज्वल दिवस टिकवण्यासाठी धडपडणारी नवी नवी मंडळी काय 'मराठी रंगभूमी संपली' म्हणून ही आटापीट करताहेत? पु. ल. यांच्या सत्काराच्या निमित्ताने आज पुन्हा आम्ही ओघाने हे लिहिले.

मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची माळ पु. ल. यांच्या गळ्यात आज पडली आहे. ते काही फारसे गौरवाचे नाही. यापूर्वीच त्यांना तो मान मिळण्यास हवा होता. आणखी एकदोन वर्षांत ते साहित्य संमेलनाचेही अध्यक्ष होतील आणि मराठी भाषेतील हा विद्वान पंडित मराठीचा झेंडा आपल्या असामान्य, कोटिबाज विनोदाने नि खुसखुशीत शैलीने फडकत ठेवील यात काय शंका? आम्ही स्वतः गडकरी, कोल्हटकर, टोमरे यांच्या पिढीत वाढलो आहोत आणि परवा आम्ही म्हटल्याप्रमाणे त्या प्रतिभासंपन्न आणि थोर लोकांच्या परंपरेतील एक प्रतिनिधी म्हणून आम्ही पु. ल. यांच्या मस्तकावर आशीर्वादाचा हात ठेवीत आहोत! यापेक्षा आज ह्या क्षणी आम्ही अधिक लिहू शकत नाही. पु. लं. च्या असामान्य कर्तृत्वाने भारावलेल्या अवस्थेतच आम्ही पु. लं. च्या नव्या निवडीबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून सांगतो पुरुषोत्तम लक्ष्मण आगे बढो!

मराठा : ११-१-१९६५

## १८

# सोपानदेव

महाराष्ट्राला दोनच ' सोपानदेव ' माहीत आहेत. एक ज्ञानेश्वरांचे कनिष्ठ बंधू सोपानदेव आणि दुसरे महाराष्ट्रामधले विद्यमान विख्यात कवी सोपानदेव चौधरी. " सोपानदेव ' ह्या नावाचे आम्हांला जन्मापासूनच बाळकडू लाभलेले आहे. कारण, ज्या सासवड गावात आमचा जन्म झाला, त्याच गावी सोपानदेवांनी समाधी घेतली. म्हणून बोलता येऊ लागल्यापासून ' सोपानदेव ' हा शब्द उच्चारण्याची आमच्या जिभेला आणि चालायला येऊ लागल्यापासून ' सोपान-देवा 'ला जाण्याची आमच्या पायाला जणू काही सवयच जडली होती म्हणानात.

' चौधरी ' सोपानदेव हे आम्हाला १९२९ साली प्रथम भेटले. त्या वर्षी पुण्याला प्रा. नारायण केशव बेहरे ह्यांच्या अध्यक्षतेखाली ' पहिले कविसंमेलन ' ' भारत इतिहास संशोधक मंडळा 'च्या सभागृहात होते. आम्ही होतो त्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष. आमचे पुण्यात गाजलेले पहिले जाहीर भाषण त्या संमेलनाच्या प्रतिनिधींचे स्वागत करताना आम्ही केले. त्या भाषणाचा वृत्तांत सारांशरूपाने देण्याचे हे काही स्थळ नव्हे. तथापि, त्या भाषणाचा थोडासा मौजेचा भाग इथे सांगतोच : " तशाच या सणासुदीच्या कविता. चंद्राला ग्रिव्हाण लागले म्हणजे दान मागण्यासाठी जशी काही लोकांची धांदल उडते, तसे एखादा सण आला म्हणजे आमचे कवी लोक सैरावैरा धावू लागतात. संक्रांत आली की यांचा शिमगा सुरू झालाच. दसरा आला की हे घोड्यावर

बसून शिलंगणाला निघालेच. प्रेमाचा तीळ घ्या, भक्तीचा पाक घ्या, हृदयाची कढई करा, अन् अशा तऱ्हेने हलवा करा. या हलव्याल्या कविता वाचल्या की माझ्या अंगावर काटा उभा राहतो. होळीवरच्या एकूण एक कविता होळीत टाकण्याच्या लायकीच्या असतात. गोकुळात कृष्णाने जेवढा धुमाकूळ घातला नसेल तेवढा धुमाकूळ त्याच्या ' मुरली 'ने मराठी साहित्यात माजवलेला आहे. जो कवी उठतो तो वीतभर लाकडाचा तुकडा कृष्णाच्या तोंडी अडकवतो आणि सांगतो त्याला की ' वाजिव वाजिव कान्ह्या मुरली ! ' मुरली वाजवून वाजवून त्याच्या तोंडाला ' फेशल पॅरॅलिसिस ' होईल की काय अशी आपल्याला भीती वाटते. अन् ह्या कवितेवर एखादे चित्र दिलेले असते. ते पाहिले तर कृष्ण मुरली वाजवतो आहे की उसाचे कांडे दातांनी सोलतो आहे हे कळत नाही. " असो.

संमेलनाच्या रात्री पुण्याच्या शिवाजीमंदिरात उघड्यावर काव्यगायनाचा कार्यक्रम झाला. त्या प्रसंगी अक्षरशः हजारो पुणेकर उपस्थित होते. ह्याच काव्यगायनाच्या कार्यक्रमात सोपानदेव चौधरींनी पहिल्याने जाहीर पदार्पण केले, आणि एका रात्रीत त्यांनी त्या वेळीं जी अमाप लोकप्रियता मिळवून ठेवली, ती आजतागायत टिकून आहे. जाहीरपणे काव्यगायन करण्याचा सोपानदेवांचा तो पहिलाच प्रसंग होता. स्वभावाने ते पडले भिडस्त आणि वृत्तीने लाजाळू. पुण्याचा तो प्रचंड जनसंमर्द पाहून ते पहिल्या छूट बुजून गेले, पण त्यांना आम्ही चुकारून कसे तरी उभे केले. पण ' गोकुळींचा कान्हा माझा पाहिला की काय गे ' ही ओळ त्यांच्या अतीव मधुर स्वरातून जेव्हा बाहेर उचंबळली, तेव्हा त्या एका ओळीने पुण्याच्या हजारो श्रोत्यांची मने त्यांनी ताडकन जिंकली. श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. सोपानदेव पुन्हा बुजले. आम्ही त्यांना म्हणालो, " अहो, घाबरू नका, लोक तुमच्यावर बेहद्द खूष आहेत ! थांबू नका-गा ! "

सोपानदेवांच्या पूर्वी महाराष्ट्रात गायक कवी नव्हते असे नाही. आनंदराव टेकाडे, प्रा. वा. गो. मायदेव, गिरीश हे आपापल्या कविता तशा चांगल्या गाऊन दाखवीत असत. पण ते काही गायक नव्हते. सोपानदेवांची पठडी ही खऱ्या गायकाची होती. ' गांधर्व महाविद्यालया'च्या शास्त्रीय संगीताचा वारसा त्यांना मिळालेला होता. मूळचा त्यांचा आवाजच गोल अन् गोड. आणि स्वरात भावना कशी मिसळावी किंवा किती घुसळावी ही विद्या त्यांना जन्मजातच

अवगत. (त्याचे कारण पुढे सांगेन.) त्यामुळे पूर्वीच्या सर्व गायक कवींना त्यांनी कुठल्याकुठे उडवून लावले आणि मराठी जनतेच्या मनावर आणि कानावर त्यांनी आपल्या काव्यगायनाची त्या रात्री जी छाप टाकली ती आजतागायत !

सोपानदेवांच्या काव्यगायनाचे दुसरे अविस्मरणीव वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या काव्याला ते ज्या नवनवीन चाली लावतात, त्या लोकांनी पूर्वी कधी कुठेही ऐकलेल्या नसतात ! 'झोक तोल-तोल-तोल-ग, आडाचं पाणी लइ खोल !' ह्या त्यांच्या काव्याचे हे अकड-कडवे श्रोत्यांना एकदम धुंद करून टाकल्या-खेरीज राहात नाही. तशीच त्या रात्री पुणेकरांची स्थिती झाली. सोपानदेवांच्या नंतर दुसऱ्या कोणाही कवीची त्या प्रसंगी काव्यगायन करण्याची हिंमत झाली नसती. तथापि, अध्यक्ष म्हणून आम्ही काही 'झेंडूची फुले' म्हणून दाखविली आणि श्रोत्यांना गडबडा लोळावयाला लावले. त्या आमच्या काव्यगायनावर दुसऱ्या दिवशीच्या 'केसरी'त त्या वेळचे 'एकदशांश' संपादक 'वाकरू भावे' ह्यांनी प्रतिकूल टीका केली. पण त्याला भाऊसाहेब भोपटकरांनी आपल्या "भाल्या'त परस्पर खरमरीत उत्तर दिले आणि आमच्या 'झेंडूच्या फुलां'ची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

अशा रीतीने अडतीस वर्षांपूर्वी भरलेले ते पुण्याचे पहिले कविसंमेलन फारच गाजले. त्यानंतर १९३२ साली कोल्हापुरात 'महाराष्ट्र साहित्य संमेलन' भरले. त्या संमेलनात यशवंत, गिरीश, प्रा. मायदेव, सोपानदेव चौधरी, संजीवनी मराठे आणि स्वतः आम्ही अशा सहा कवींच्या काव्यगायनाने खूपच रंग भरला. त्या वेळी कोल्हापुरात व्ही. शांताराम ह्यांची 'प्रभात फिल्म कंपनी' होती. ते त्या वेळी आपला 'सिंहगड' हा बोलपट तयार करीत होते. साहित्य संमेलनाच्या अधिवेशनात आमचे काव्यगायन अत्यंत लोकप्रिय झाले असल्याची वार्ता शांतारामबापूंना कोणी तरी सांगितली. त्याबरोबर त्यांनी बाबूराव पेंढारकरांना आमच्याकडे पाठविले, आणि आमच्या काव्यगायनाचे सचित्र ध्वनिमुद्रण रुपेरी पडद्यावर करण्याची 'प्रभात कंपनी'ची इच्छा असल्याचे त्यांनी आम्हाला कळविले. आम्ही त्या गोष्टीला मोठ्या आनंदाने मान्यता दिली. कारण मराठी कवींचे काव्यगायन रुपेरी पडद्यावर चित्रित करण्याची शांताराम-बापूंची कल्पना जितकी अभिनव होती, तितकाच मराठी कवींना प्राप्त होणारा तो एक अनपेक्षित बहुमान होता. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही सहा कवी

'प्रभात स्टुडिओ 'त गेलो आणि आमच्या एकेक लोकप्रिय कविता म्हणत असताना त्यांचे ध्वनिमुद्रण आणि आमचे चित्रण करण्यात आले. आम्ही स्वतः 'परिटा, येशिल कधि परतून' ही कविता म्हटली आणि सोपानदेवांनी 'गोकुळीचा कान्हा माझा' ही कविता म्हटली. ह्या आमच्या काव्यगायनाचा छोटासा चित्रपट प्रभातच्या 'सिंहगड' ह्या चित्रपटाबरोबर प्रकाशित करण्यात आला. त्यामुळे आम्हा कविमंडळींना महाराष्ट्रात कमालीची प्रसिद्धी मिळाली.

त्यानंतर गेल्या पस्तीस वर्षांत आमची नि सोपानदेवांची नुसती अखंड मैत्री आहे असे म्हणण्यापेक्षा जवळ जवळ अखंड सहवास आहे असे म्हटले तर ते अधिक यथार्थ होईल. ह्या काळात किती दिवस, व किती रात्री, किती तास अन् किती प्रवास आम्ही एकमेकांच्या सहवासात घालवले आणि केले असतील त्याचे तपशीलवार वर्णन करावयाचे म्हटल्यास चार-दोन ग्रंथ निर्माण करावे लागतील. मुंबईला आले की ते आमच्या संगतीत असावयाचे आणि नाशिकला गेलो की आम्ही त्यांच्याच वास्तूत राहावयाचे. दोन शरीरे पण एकच श्वास असे त्यांच्या नि आमच्या स्नेहाचे वर्णन केले तर त्यात तिळमात्र अतिशयोक्ती होऊ नये. ह्या दीर्घ काळातील आमच्या जीवनातील प्रत्येक गौरवाच्या, आनंदाच्या, उत्साहाच्या नि दुःखाच्या प्रसंगी आम्हांला धन्यवाद द्यावयाला किंवा धीर द्यावयाला सोपानदेव आमच्या सान्निध्यात असत. आपल्या मैत्रीचा किंचितही कोणाला 'उपसर्ग होऊ' नये किंवा तिचा अवज्ञा वाटण्याएवढा अतिरेक होऊ नये याबद्दल ते सदैव सावध असतात. त्यांचा सहवास जाचत नाही; पण विरह मात्र फारच जाणवतो. अशी त्यांच्या स्नेहाची मौज आहे. १३ ऑगस्ट १९४७ रोजी आम्ही आमचा वाढदिवस खंडाळ्याला आमच्या बंगल्यामागच्या डोंगरावर आंब्याच्या हुंड्या लावून साजरा केला. पाऊस वरून धो धो पडत होता आणि आम्ही नि सोपानदेव आंब्यांची कलमे लावीत होतो. ती हकीकत सोपानदेवांनी पुढे सानेगुरुजींना सांगितली, तेव्हा गुरुजींच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. १९४८ साली आमच्या 'मोरूच्या मावशी' चित्रपटाचे त्यांना आम्ही साहाय्यक संगीत दिग्दर्शक नेमले होते. त्या चित्रपटात मधल्या दोन-चार गाण्यांच्या त्यांनी फारच सुंदर चाली आम्हांला दिल्या.

तथापि, १९५२ साली त्यांच्या प्रतिभेच्या उगमाचा आम्हांला अकस्मात शोध लागला. त्यांच्या मातोश्री बहिणाबाई चौधरी ह्या वयाच्या बहात्तराव्या वर्षी अधल्याच वर्षी मरण पावल्या. त्या कविता करीत असत ह्याबद्दल तोपर्यंत

सोपानदेवांनी आम्हांला मुळीच थांगपत्ता लागू दिला नव्हता. त्यांची आई एक अशिक्षित अन् शेती करणारी कष्टाळू गृहिणी होती. जात्यावर दळता दळता आणि चूल फुंकता फुंकता तिच्या तोंडातून ज्या ओव्या झऱ्याच्या पाण्याप्रमाणे आपोआप बाहेर पडत, त्या कोणीतरी जवळपासचे माणूस टिपून ठेवी. अशा कवितांची एक चतकोर चोपडी एक दिवस सोपानदेवांनी आम्हांला भीत भीत दाखवली. त्यांना भीती वाटत होती की खानदेशी वऱ्हाडी भाषेमधल्या आपल्या अडाणी आईच्या ओव्या वाचून कोणी हसणार तर नाही ? आम्ही पहिलीच ओवी वाचली, 'येहरीत दोन मोटा । दोन्ही मधी पानी एक । मोट हाकलतो एक । जीव पोसतो कितीक ' त्याबरोबर ती वही आम्ही सोपानदेवांच्या हातातून खसकन् ओढून घेतली आणि आधाशासारख्या साऱ्या कविता भराभर वाचून टाकल्या. आम्ही ओरडून सोपानदेवांना म्हणालो, "अहो, हे बावनकशी सोने आहे. हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे हा गुन्हा आहे." त्यानंतर थोड्याच दिवसांत 'बहिणाबाईची गाणी' हा सोपानदेवांच्या मातोश्रींचा सव्वाशे पानांचा कवितासंग्रह आमच्या सत्रा पानी प्रस्तावनेसह 'परचुरे प्रकाशन मंदिरा'ने प्रकाशित केला, आणि थोड्याच अवकाशात बहिणाबाईंच्या अभिजात काव्याने महाराष्ट्रातील मोठमोठ्या विद्वानांना आणि रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकले. मराठी मनाला मोहिनी घालील आणि स्तिमित करून टाकील असा भाषेचा, विचाराचा आणि कल्पनेचा विलक्षण गोडवा त्यांच्या काव्यात शिगोशिग ओथंबलेला आहे. काव्याचे नि विनोदाचे अद्भुत देणे सोपानदेवांना कोठून लाभले ह्याचा त्या वेळीं आम्हाला शोध लागला.

सोपानदेवांच्या सान्निध्यात वावरण्याची ज्यांना थोडा काळ तरी संधी लाभलेली आहे, त्यांना त्यांच्या सूक्ष्म विनोदबुद्धीचा प्रत्यय आल्यावाचून राहात नाही. ही विनोदबुद्धी निःसंशय त्यांना त्यांच्या मातोश्रींकडून मिळालेली आहे. त्यांच्या काही काही विनोदी कविता उदाहरणार्थ : 'रामत किती गोड तुझा ग झरका', 'गोळीं पुढे अन् हरण मागे', किंवा 'मी ताक पितो' ह्या कविता काव्यगायनाच्या कार्यक्रमात हमखास हशा पिकवणाऱ्या अन् टाळ्या मिळवणाऱ्या आहेत. नवकाव्याची मस्करी करणारी त्यांची 'रक्त हे फक्त आहे' असली मुक्तछंद रचना अत्यंत मर्मभेदी आहे. विषय प्रासंगिक असला तरी त्या निमित्ताने अमर काव्यरचना करण्यात त्यांचा हातखंडा विलक्षण आहे. मराठवाड्यात मराठी साहित्यसंमेलन भरले असताना 'माझी मायबोली आली आज माहेराला' हे

त्यांनी केलेले काव्य किंवा आमच्या 'शामच्या आई'ला पहिले राष्ट्रपती सुवर्ण-पदक मिळाले त्या वेळी त्यांनी रचलेले 'यमुनेच्या पाण्यावरहि उठले तरंग' हे गीत, हे त्यांच्या प्रतिभेचे दोन अविस्मरणीय उच्चांक होत! त्या काव्यामधल्या प्रत्येक कडव्याकडव्याच्या अंगी श्रोत्यांना वेहोष करण्याचे सामर्थ्य आहे.

सोपानदेवांच्या सर्वच गुणांचे सामग्र्याने वर्णन करणे अशक्य आहे. त्यांचे वक्तृत्वही वाखाणण्यासारखे आहे. औरंगाबादच्या 'तमाशा परिषदे'च्या अध्यक्षस्थानावरून त्यांनी जे उत्कृष्ट व्याख्यान दिले, ते 'मराठ्या'तून त्या वेळी आम्ही समग्र छापलेले आहे. 'ज्ञानेश्वरी'चा त्यांचा व्यासंग आणि पाठांतर चकित करून टाकणारे आहे, आणि ह्या त्यांच्या सर्व गुणांवर त्यांच्या स्वभावातला जो जातिवंत जिव्हाळा आहे, त्याने सुवर्ण कळस चढवलेला आहे. परवाच्या विजयादशमीला त्यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होऊन आता एकसष्ठाव्या वर्षात त्यांनी प्रवेश केला आहे. त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो आणि मराठी भाषेची आतापर्यंत त्यांच्या हातून जशी उज्ज्वल सेवा घडली तशीच यापुढेही त्यांच्याकडून घडो अशी 'मराठ्या'च्या वतीने आम्ही जाहीर प्रार्थना करतो.

मराठा : १६-१०-१९६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलांतर
अनुक्रम ...९१२६०... दि: ...
...

# चौथा विभाग

राठा
अनुक्रम

# १

## नव्वद – नाबाद !

महाराष्ट्रामधले एक विद्यमान आणि विख्यात महापुरुष डॉ. सर रघुनाथ ऊर्फ अाप्पासाहेब परांजपे हे आज रोजी नव्वदाव्या वर्षात प्रवेश करीत आहेत, ही आनंदाची वार्ता ऐकून त्यांच्या हाताखाली फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकलेल्या आमच्यासारख्या असंख्य माजी विद्यार्थ्यांना आणि त्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष ओळखणाऱ्या भारतातल्या नि महाराष्ट्रातल्या अगणित लोकांना आनंद नि हर्ष झाल्यावाचून राहणार नाही. लोकमान्य टिळक, नामदार गोखले, महर्षी कर्वे ह्यांच्याप्रमाणे ‘ रँग्लर परांजपे ’ हे आधुनिक महाराष्ट्राचे एक कुलदैवत म्हणून समजले जाते. जवळ जवळ सत्तर वर्षांपूर्वी केंब्रिज विद्यापीठात गणितशास्त्रामधे अभूतपूर्व विक्रम गाजवून त्यांनी ‘ सीनियर रँग्लर ’ ही पदवी मिळवून केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर भारताची मान उंच केली. भास्कराचार्यांचा हा अवतार ह्या महाराष्ट्रात निर्माण झालेला पाहून महाराष्ट्राला तर स्वर्ग दोनच बोटे राहिला. त्याला कुठे ठेवू नि कुठे न ठेवू असे मराठी माणसांना त्या वेळी होऊन गेले. ‘ रँग्लर परांजपे ’ ह्यांच्या नावाचे पोवाडे त्या वेळी घरोघर गायले जाऊ लागले. नामदार गोखले ह्यांच्याबद्दल वाटणाऱ्या निरतिशय आदरामुळे सरकारी नोकरीच्या आणि मानसन्मानाच्या मोहावर पाणी सोडून रँग्लर परांजपे ह्यांनी आपले सर्वस्व ‘ डेक्कन एज्युकेशन सोसायटी ’च्या चरणी समर्पण केले आणि अवघ्या पाऊणशे रुपये महिना पगारावर ते फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल झाले. अलौकिक बुद्धिमत्तेला असामान्य त्यागाची जोड मिळाल्यामुळे रँग्लर

परांजपे ह्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक प्रकारचे दैवी वलय निर्माण झाले.

इतक्या प्रभावी आणि आकर्षक आकृतीचा नि व्यक्तिमत्त्वाचा पुरुष गे[illegible]ल्या शंभर वर्षांत महाराष्ट्रामध्ये जन्माला आलेला नाही. बुद्धी आणि प्रतिभा ह्यांना शोभेल आणि साजेल असेच सुंदर शरीर प्राप्त होणे हे खरोखर [illegible] ईश्वराचे देणे होते. ते रँग्लर परांजपे ह्यांना लाभले होते. त्यांच्या ऐन ज्वानीच्या काळात त्यांना ज्यांनी पाहिले होते, ते सांगतात की त्यांच्या मुद्रेवर असे तेज झळझळत होते की, पाहणाराचे डोळे त्यांच्या मुखावर ठरत नसत. त्यांच्या त्या काळ्याभोर आकडेबाज मिश्या, तेजस्वी टपोरे डोळे, करारी मुद्रा, कडक इस्त्रीचा साहेबी सूट, डोक्यावर गोंडेबाज चौकोनी काळी टोपी (Mortar Board) आणि काळा रेशमी झगा अशी त्यांची ती वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती फर्ग्युसन कॉलेजच्या आवारातून वेगाने जाऊ लागली, की काय बिशाद आहे कोणी विद्यार्थी त्यांच्या वाऱ्याला उभा राहील किंवा मान वर करून कोणी त्यांच्याकडे बघेल! फर्ग्युसन कॉलेजचेच काय पण महाराष्ट्रातल्या अनेक कॉलेजांचे अनेक प्रिन्सिपल आजपर्यंत होऊन गेले असतील, पण रँग्लर परांजप्यांसारखा 'प्रिन्सिपल' आजपर्यंत कधी झाला नाही आणि पुढेही कधी होणार नाही. तुम्ही त्यांना पाहिले रे पाहिले की, तुम्ही त्यांच्या प्रेमात पडलाच म्हणून समजा. त्यांचा चेहरा कडक आणि आवाज उग्र असे. त्यांचे हसणे सहसा कुणाला पाहावयाला मिळत नसे. पण एवढे असूनही त्यांचे भय कुणाला वाटत नसे. त्यांना पाहताच पाहणाराच्या मनात कौतुकाची नि आदराचीच भावना निर्माण होत असे आणि त्यामुळे ते पुढे चालले की 'शिस्त' त्यांच्या मागून हात जोडून आणि मान खाली घालून चाले.

त्यांच्यासारखा प्रभावी गणिताचा प्राध्यापक तर कधी कोणी पाहिलाच नसेल. ते शिकवत असताना विद्यार्थी अक्षरशः मंत्रमुग्ध होऊन त्यांच्या शिकवण्याकडे लक्ष देत असत. फळ्यावरचे त्यांचे अक्षर म्हणजे खरोखर मोत्यांच्या ओळी. वर्तुळ म्हणा किंवा कोठलीही आकृती म्हणा, ते फळ्यावर इतक्या चातुर्याने आणि चपळाईने काढीत की, पाहणारांची बुबुळे जागच्या जागी थिजून बसत. खडूने आपली बोटे घाण न करता फळ्यावर झपाट्याने आणि सुंदर कसे लिहावे ह्याचा उत्कृष्ट आदर्श म्हणजे रँग्लर परांजपे हे होत. गणिताचे प्राध्यापक म्हणून रँग्लर परांजप्यांची कीर्ती साऱ्या भारतात विद्युद्वेगाने पसरली. त्यामुळे भारताच्या कोनाकोपऱ्यातून निरनिराळ्या प्रांतांतल्या विद्यार्थ्यांची फर्ग्युसन

कॉलेजकडे नुसती रीघ लागून राहिली, आणि भारताच्या शैक्षणिक नकाशात फर्ग्युसन कॉलेजचे नाव सोन्याच्या अक्षरामध्ये झळकू लागले. त्यांच्या हाताखालून चोवीस-पंचवीस वर्षांत किती गणिताचे प्राध्यापक आणि तज्ज्ञ तयार होऊन गेले त्यांची खानेसुमारी नुसत्या आठवणीच्या आधारावर आम्हाला करता येणे अशक्य आहे.

पण १९१४ च्या डिसेंबरमधे विश्वविद्यालयाचे वर्ष बदलले. डिसेंबरच्या परीक्षा मार्चमधे गेल्या, त्यामुळे मॅट्रिकची परीक्षा डिसेंबरात पास झालेल्या आम्हां विद्यार्थ्यांना कॉलेजच्या पहिल्या वर्षामधे सहा महिने जादा घालवावे लागले. पहिल्या वर्षाच्या (F. Y. A.) त्या वेळी तीन तुकड्या होत्या. त्या तीन तुकड्यांमधे एकंदर पाच-सहाशे विद्यार्थी होते. एवढी भुतावळ तीन-चार महिने सांभाळायची कुठे, कुणी आणि कशी ? तेव्हा ते काम प्रिन्सिपल परांजपे ह्यांनी स्वतः आपल्या हाती घेतले. रोज एक तासभर फर्ग्युसन कॉलेजच्या ‘ अँफी थिएटर ’मधे ते आमचा हा सारा पांजरपोळ एकत्र गोळा करून आम्हां सर्वांच्या टाळक्यावर ‘ गणिताच्या इतिहासा ’चे गंगोदक आपल्या प्रभावी इंग्रजी वक्तृत्वाच्या झारीमधून जोराजोराने शिंपडीत असत. रँग्लर काय शिकवीत असत त्यातले एक अक्षर आम्हांला कळत नसे. पण आपण काय शिकवतो आहोत त्यातले अक्षर आपल्या विद्यार्थ्यांना कळते आहे की नाही, याचीसुद्धा प्रिं. परांजप्यांनी क्षणमात्र कधी फिकीर केली नाही. एखाद्या नाटकातल्या नायकाप्रमाणे ते अँफी थिएटरच्या व्यासपीठावर प्रवेश करावयाचे आणि त्यांना पाहताच आम्ही पाचसहाशे शिरगोळे आपापल्या बाकावर एक तासभर त्यांच्याकडे अपक्ष्म लोचनांनी आणि उघड्या तोंडानी एकसारखे पाहात बसावयाचे. प्रिं. परांजपे ह्यांचा तास चालू असताना वर्गात बारीकसारीक आवाज नि हालचाल होण्याची गोष्ट तर बाजूलाच राहू द्या, पण आम्हां विद्यार्थ्यांना श्वास घेण्याची किंवा निःश्वास सोडण्याचीसुद्धा भीती वाटत असे. अशी शिस्त आणि अशी स्तब्धता आम्ही स्वतः अनेक वर्षे शिक्षकाचा व्यवसाय केलेला असूनसुद्धा कोणत्याही अध्यापकाच्या वर्गात आम्ही पाहिलेली नाही.

त्या वेळी ‘ डेक्कन कॉलेजा ’तील श्रीमंत विद्यार्थी, गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांच्या आमच्या ‘ फर्ग्युसन कॉलेज ’ची ‘ भटजी कॉलेज ’ अशा संबोधनाने हेटाळणी करीत असत. कारण, त्या वेळी डेक्कन कॉलेजमध्ये शिकवायला ‘ साहेब ’ प्रोफेसर असत. त्यामुळे डेक्कन कॉलेजातील विद्यार्थी साहेबाप्रमाणे

इंग्रजी बोलू शकत. त्या मानाने आम्हा फर्ग्युसन कॉलेजातील विद्यार्थ्यांना इंग्रजी बोलता येत नसे, आणि आमचे इंग्रजी उच्चारही अगदीच 'भटजी'सारखे असत. पण प्रिं. परांजपे हे आमचे एकच प्रोफेसर असे होते, की 'डेक्कन कॉलेजा'तील साऱ्या प्रोफेसरांना ते चालतेबोलते जिवंत आव्हान होते. कित्येकदा डेक्कन कॉलेजातील काही विद्यार्थ्यांना आम्ही मुद्दाम प्रिं. परांजप्यांच्या तासाला बोलावून आणीत असू. त्यांचा तास चालू असता शेपूट घातलेल्या कुत्र्यासारखे ते गपचिप वर्गात बसत, आणि मग त्यांना आम्ही छातीठोकपणे आव्हान देत असू की, "आणा तुमचे ते डेक्कन कॉलेजातील साहेब प्रोफेसर! आणि टाका ओवाळून त्यांना आमच्या रँग्लर परांजप्यांच्या वरून!" त्या आव्हानाला उत्तर द्यायला त्यांना तोंड नसे. १९१४ साली रँग्लर परांजप्यांचे तीन प्रख्यात गणितज्ञ शिष्य आमच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये 'फेलोज' होते. पहिले, नगिनदास माणिकलाल शहा; दुसरे, व्ही. एन्. भिडे आणि तिसरे, मोहिनीराज लक्ष्मण चंद्रात्रेय. एन्. एम्. शहा पुढे रँग्लर होऊन आले आणि न्यू पूना कॉलेजचे प्रिन्सिपल झाले. भिडे आय. सी. एस. झाले नि लौकरच वारले. चंद्रात्रेय हे गणिताचे नामांकित प्राध्यापक म्हणून प्रसिद्धीस आले.

वीस साली मॉंटफर्ड सुधारणा आल्या नि परांजपे मुंबई इलाख्याचे पहिले शिक्षणमंत्री झाले. त्यानंतर एकापेक्षाही एका उच्च पदावर ते एकसारखे चढत गेले. पुढे ब्रिटनमधे इंडिया कौन्सिलचे मेंबर म्हणून ते नियुक्त झाले. त्याच वेळीं आम्ही इंग्लंडमधे शिक्षणशास्त्राचा अभ्यास करावयाला गेलो होतो. तेव्हा अधून-मधून त्यांना आम्ही भेटत असू. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचे हायकमिशनर, लखनौ विश्वविद्यालयाचे व्हाइसचॅन्सेलर ह्या हुद्द्यावर त्यांच्या नेमणुका झाल्या. सार्व-जनिक जीवनातून सेवानिवृत्त झाल्यानंतर अगदी अलीकडे आप्पांनी जे महान् पद विभूषित केले, ते पुणे विद्यापीठाच्या व्हाइसचॅन्सेलरचे. अर्धशतकावर त्यांनी महाराष्ट्राची जी उज्ज्वल सेवा केली, त्यावर त्यांच्या ह्या सन्मानाने अक्षरशः सुवर्णकळस चढवला! आमचा स्वतःचा विषय गणित नसताना, केवळ 'आप्पां'च्या प्रेमामुळे आम्ही इंटरमीजिएट परीक्षेला गणित विषय घेऊन जवळ जवळ 'फर्स्ट क्लास-मार्क्स' मिळविले.

आम्ही लहानपणापासून टिळकपंथीय असल्याने आणि 'आप्पा' हे पहिल्यापासून गोखलेवादी असल्याने आम्हांला आप्पांचे राजकारण कधीही आवडत नव्हते. स्वातंत्र्यवीर सावरकरांना दंड करून आप्पांनीच त्यांना

कॉलेजातून ‘ रस्टिकेट ’ केले. टिळकांचे नि त्यांचे असे भांडण एकदा जुंपले की टिळकांनी त्यांच्यावर ‘ प्रिन्सिपॉल का शिशुपाल ’, ‘ हे आमचे गुरुच नव्हेत ! ’ आणि ‘ प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते ’ ( राजवाड्यावर कावळा बसला म्हणजे काही गरूड होत नाही ! ) असे तीन अग्रलेख लिहिले. टिळक विलायतेला जेव्हा जावयाला निघाले, तेव्हा त्यांना पुण्याच्या नागरिकांतर्फे जे मानपत्र दिले त्याला रँग्लर परांजपे ह्यांनी ( आणि कवी माधव ज्यूलियन ह्यांनी ) विरोध केला. तेव्हा लोकमान्य म्हणाले, “ आजच्या समारंभात ‘ केंब्रिजच्या मिठा ’चा खडा पडला ! ” तेव्हा हशाचा नि टाळ्यांचा एवढा कडकडाट झाला, की काही विचारू नका.

पण आम्ही त्या वेळचे फर्ग्युसन कॉलेजचे विद्यार्थी राजकारणात टिळकवादी असूनही आमच्या श्रद्धेत आणि निष्ठेत कट्टर परांजपेवादी होतो. रँग्लर परांजपे ह्यांच्याविरुद्ध कोणी काही टवाळी केली, तरी ती आम्ही त्यांचे निष्ठावंत विद्यार्थी कधीच सहन करीत नसू. आमच्या त्या भावना राम गणेश गडकरी ह्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उपरोधी विनोदात त्या वेळी व्यक्त करून ठेवलेल्या होत्या. कोणी तरी परांजप्यांची टवाळी करण्याच्या उद्देशाने गडकऱ्यांना म्हणाले, “ काय तुमचे ते परांजपे ? काय त्यांचे त्या मिश्यांचे आकडे ? ” तेव्हा गडकरी शांतपणे त्यांना म्हणाले, “ परांजप्यांच्या मिश्या टोचल्याची तक्रार तुमच्या ‘ घरा ’तून तर आली नाही ना ? ” या शतकातली पहिल्या वीस वर्षांची महाराष्ट्रातली सारी पिढी ही रँग्लर परांजप्यांवर आंधळे प्रेम करणाऱ्या आम्हा निष्ठावंत विद्यार्थ्यांची पिढी आहे. परांजप्यांचे राजकारण आम्हाला पसंत नसले, आणि आमचे राजकारण त्यांना पसंत नसले, तरी त्यांच्यावाचून आम्हाला करमत नसे आणि आमच्यावाचून त्यांना करमत नसे ! असे हे आमचे विलक्षण त्रांगडे होते.

उभ्या आयुष्यात आप्पांना रडताना आम्ही एकदाच पाहिले आहे. ते म्हणजे महर्षी कर्वे ह्यांच्या निधनाच्या वेळी ! त्या वेळी साश्रू लोचनांनी आणि सद्‌गदित कंठाने ‘ आप्पा ’ म्हणाले “ अण्णा गेल्यानंतर आता माझ्या पाठीवर हात ठेवून मला ‘ रघू ’ म्हणणारे कोणी राहिले नाही ! ” त्या वेळी आम्हीदेखील ढसढसा रडलो. आमच्या आप्पांचे किती गुण आम्ही सांगावेत नि काय सांगावे ? कधी ते आम्हाला भेटले, तर त्यांच्या पायांवर डोके ठेवल्यावाचून आम्ही त्यांच्याशी कधी बोललो नाहीत. नव्वदावे वर्ष आमच्या

आप्पांना लागले हे त्यांचे भाग्य नसून आमचे भाग्य आहे. आमच्या विद्यार्थि-जीवनातले आमचे हे आदर्श दैवत आम्ही जिवंत असे तोपर्यंत असेच आमच्यासमोर राहो, हीच ज्या परमेश्वराला—ज्याला आप्पा मानीत नाहीत—त्याला आमची प्रार्थना आहे! 'आप्पां'ना घरात कोणीच विचारीत नाही. न शकू, न सई, पण आम्हाला जेव्हा जेव्हा त्यांची आठवण होते, तेव्हा त्यांच्या सईने आम्हाला ढसाढसा रडू येते! असे आप्पा महाराष्ट्राला पुन्हा मिळणार नाहीत!

मराठा : १६-२-१९६५

२

# ब्रह्मर्षी सातवळेकर

या महाराष्ट्रात ब्रह्मर्षी, महामहोपाध्याय, साहित्यवाचस्पती, गीतालंकार, विद्यामार्तण्ड आणि आता पुणे विद्यापीठाने ज्यांना डी. लिट् ही सर्वोच्च पदवी द्यावयाचे ठरविले आहे, ते पंडितजी श्रीपाद दामोदर सातवळेकर ह्यांच्यापेक्षा अधिक दीर्घायुषी विद्वान, व्यासंगी आणि साक्षात्कारी महापुरुष कोणीही नाही हे आम्ही निश्चयाने सांगतो. पंडितजींना तीन महिन्यांपूर्वीच नव्याण्णवावे वर्ष लागलेले आहे. त्यांना भेटण्यासाठी आणि त्यांना अभिवादन करून त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी परवा आम्ही गुजरातेमधल्या 'पारडी' ह्या गावी आमच्या मोटारीने गेलो होतो. मुंबईपासून पारडी हे एकशे चौतीस मैल दूर आहे. तुम्ही विचाराल की, हा महाराष्ट्रातला एवढा मोठा महापुरुष महाराष्ट्र सोडून गुजरातेत का गेला? त्यासाठी आम्हांला त्यांचे चरित्र जेवढे माहीत आहे तेवढे सांगावे लागेल.

पंडितजी हे मूळचे सावंतवाडीचे. त्यांच्या संस्कृत विद्येचा पाया तेथे घालण्यात आला. पण जन्मतःच त्यांना चित्रकलेचे विलक्षण वेड. तेव्हा त्यांनी स्वतःला त्या कलेला वाहून घेतले. ते महान चित्रकार झाले. त्या काळी ते दक्षिण हैदराबाद संस्थानात स्थायिक झाले. तेथे त्यांनी वेदांचा अभ्यास सुरू केला. अथर्ववेदामधील मातृभूमीच्या वंदनाचे वैदिक गीत जेव्हा त्यांनी प्रसिद्ध केले, तेव्हा निझामाने त्यांना हद्दपार केले. तेव्हा ते महाराष्ट्रात औंध संस्थानात येऊन स्थायिक झाले. पुढे औंध संस्थानचे राजे बाळासाहेब पंतप्रतिनिधी ह्यांचा त्यांच्यावर फार लोभ

जडला. काही काळ त्या संस्थानच्या मंत्रिपदावर त्यांची नेमणूकदेखील झाली. त्याच सुमारास त्यांनी औंधला वेदांचा अभ्यास करण्यासाठी ' स्वाध्याय मंडळ ' ही संस्था काढली आणि वेदांच्या संहिता छापण्याला सुरुवात केली. पुढे अठ्ठेचाळीस साली गांधीजींचा खून झाला. दक्षिण महाराष्ट्रात भयंकर अत्याचार, प्राणघात आणि जाळपोळ झाली. पंडितजींच्या घरावर नि छापखान्यावर आगलाव्यांची टोळधाड आली. पण मोठ्या सुदैवाने नि योगायोगाने ते त्या जळितामधून वाचले, पण त्याच वेळी त्यांनी निर्धार केला की, ह्या जातीयवादी महाराष्ट्रात राहावयाचे नाही. त्याप्रमाणे त्यांनी आपला सर्व संसार गुजरात राज्यातल्या पारडी ह्या गावी हालविला. तेथे त्यांनी एकोणीस एकर क्षेत्रफळाच्या अत्यंत निसर्गसुंदर अशा वनभूमीत आपल्या नवजीवनाला प्रारंभ केला. पंडितजींचे सर्व आयुष्य काही आम्हांला माहीत नाही. पण ते लाहोरला आर्यसमाजात दहा वर्षे होते. नंतर हिमालयात कांगडी येथे दोन वर्षे होते. पुढे ते हैदराबाद येथे होते व नंतर औंध येथे स्थायिक झाले होते. आता गुजरातेत गेली सतरा वर्षे ते आहेत. संस्कृत, हिंदी, गुजराती आणि मराठी भाषा ह्या त्यांच्या घरी पाणी भरतात. महात्मा गांधींना गीता त्यांनीच समजावून सांगितली आणि त्यांना संस्कृत भाषा पण त्यांनीच शिकविली. संस्कृत भाषा कशी बोलावी या विषयावर पंडितजींनी चोवीस क्रमिक पुस्तके तयार केलेली आहेत. ह्या पुस्तकांचा जर नुसता सहा महिने अभ्यास केला तर कोणाही माणसाला उत्तम संस्कृत बोलता येईल.

पण ह्यावरून पंडितजींच्या जीवनकार्याची खरी कल्पना कोणालाही येणार नाही. गेली जवळ जवळ पंचवीस वर्षे त्यांनी वेदांच्या अभ्यासाला स्वतःला वाहून घेतलेले आहे. एकंदर वेद चार आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. ऋग्वेदामध्ये देवतांच्या गुणांचे वर्णन आहे. यजुर्वेदामधे नाना प्रकारचे यज्ञ कसे करावेत हे सांगितले आहे. सामवेदामध्ये अनेक मंत्रांचे उत्तम स्वरांत गायन कसे करावे ते आहे. अथर्ववेदामधे ब्रह्मज्ञान आहे. ह्या सर्व अथांग वेदसागरात गेली दोन तपे ते अहोरात्र अवगाहन करीत आहेत. सारे वेद जवळ जवळ त्यांना मुखोद्गत आहेत. एवढेच नव्हे, तर त्या वेदांच्या अर्थाचे आणि आशयाचे त्यांनी जेवढे मनन आणि चिंतन केलेले आहे तेवढे ह्या भारतात आजपर्यंत क्वचितच कोणी केले असेल. वेदांच्या पाठशुद्ध संहिता तर त्यांनी छापून प्रसिद्ध केलेल्या आहेतच, पण अथर्ववेदाचे विषयवार विश्लेषण करून

त्याचे पाच निरनिराळे ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केलेले आहेत. चारही वेदांतील निरनिराळ्या देवतांविषयक उल्लेखांचा त्यांनी स्वतंत्र ग्रंथ तयार केला आहे. सामवेदाचा त्यांनी सुबोध अनुवाद केलेला आहे. हे सर्व लेखन त्यांनी मुळात हिंदी भाषेत केलेले असून त्याचा अनुवाद त्यांनी मराठी आणि गुजरातीमधेही करवून घेतलेला आहे. सध्या ते ऋग्वेदाचा अनुवाद करण्यात गुंतलेले आहेत. आपल्या 'स्वाध्याय मंडळा'मार्फत त्यांनी केलेल्या एकंदर प्रकाशनाची संख्या चारशेपर्यंत भरेल. त्यांचा भारा नुसता डोक्यावर उचलावयाचा झाला तर चार भरभक्कम हमाल लागतील.

आपल्या नव्वाण्णव वर्षांच्या आयुष्यात पंडितजींनी ही जगड्व्याळ कामगिरी करून ठेविली आहे, तिच्याकडे जनतेचे आणि सरकारचे आजपर्यंत जेवढे लक्ष जावे तेवढे गेलेले नाही ही दुःखाची गोष्ट आहे. पंडितजी म्हणाले, "बायबल हा खिस्ती लोकांचा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी 'बायबल सोसायटी'ला तेरा कोट रुपये मिळाले. पण वेदांच्या प्रकाशनासाठी मला तेरा लाख रुपयेदेखील कोणी देण्यास तयार नाही, काय सांगावे?" महाराष्ट्र सरकार किंवा गुजरात सरकारने पंडितजींच्या ह्या कार्याला कवडीचीदेखील मदत केलेली नाही. केंद्र सरकार मात्र काही प्रमाणात त्यांना आर्थिक मदत करते. आपल्याला मदतनीस म्हणून किमान वीस-पंचवीस विद्वान पंडित आणि प्राध्यापक तरी असावेत अशी पंडितजींची इच्छा आहे. पण त्यासाठी त्यांनी पैसे कोठून आणायचे? सध्या त्यांच्या हाताखाली काम करणारे फक्त दोन का तीन पंडित आहेत. अशाही प्रतिकूल परिस्थितीत पंडितजींनी आपले ज्ञानसाधनेचे अग्निहोत्र एकसारखे प्रज्वलित ठेवलेले आहे. परवा त्यांच्या पवित्र संगतीत आम्ही जे दोन अडीच तास घालवले त्या वेळी त्यांनी जे काही स्फुट विचार आमच्याकडे बोलून दाखवले ते थोडक्यात येथे सांगतो.

ते म्हणाले, "वेद हे जुने आहेत ही जी सर्वसाधारण समजूत आहे ती चुकीची आहे. आजही ज्या गोष्टींचे शोध लागलेले नाहीत त्यांची नोंद वेदांत आहे. उदाहरणार्थ, सतत तीन रात्र नि तीन दिवस अंतरिक्षातून संचार करणाऱ्या विमानांचा उल्लेख ऋग्वेदात आहे. अशा तऱ्हेची विमाने आज ह्या मितीला जगात नाहीत. त्यांना काही कालावधीनंतर तरी जमिनीवर उतरावे लागते. युद्धामधे जर एखाद्या वीराचा पाय तुटला तर त्याऐवजी ताबडतोब लोखंडाचा पाय बसवून त्याला पुन्हा युद्धाला उभा करण्याची वैद्यकीय व्यवस्था

त्या काळी होती. मनुष्य कितीही वृद्ध झाला तरी त्याला तारुण्य देऊन संतती निर्माण करण्याचे सामर्थ्य त्या काळी देता येत असे. पाश्चात्त्य लोक जेव्हा ह्या देशात आले तेव्हा त्यांची सैन्यव्यवस्था आपल्यापेक्षा अधिक शिस्तबद्ध नि प्रभावी होती म्हणून ते आपला पराभव करू शकले. पण ऋग्वेदात 'मरुद्गणा'चे जे वर्णन दिले आहे, त्यात पाश्चात्त्य सैन्याप्रमाणे संघटना कशी करावी ह्याचे तपशीलवार मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. आमचे ब्राह्मण अर्थ न समजता नुसती वेदांची घोकंपट्टी करीत असत. त्यांनी जर ह्या मरुद्गणांची माहिती आमच्या राज्यकर्त्यांना त्या वेळी सांगितली असती, तर पाश्चात्त्य सैन्याच्या तोडीस तोड असे सैन्य त्यांना निर्माण करता आले असते. 'मरुत्' ह्याचा अर्थ काय? जोपर्यंत उठता येते आहे तोपर्यंत लढत लढत जो मरतो तो 'मरुत्.' अथर्ववेदाबद्दल लोकांचा गैरसमज आहे. पुष्कळांना वाटते की, त्यात जादुटोणे किंवा मंत्रतंत्र ह्यांची माहिती आहे. तसे नाही. अथर्ववेदात राजकारण, व्यवहार, आरोग्य, दीर्घायुष्य इत्यादी जीवनावश्यक गोष्टींचे ब्रह्मज्ञान भरलेले आहे. आमचे सारे संगीत सामवेदावर आधारलेले आहे. सामवेद ज्या तऱ्हेने म्हटला जातो त्या तऱ्हेने जर तो म्हटला तर ऐकणारांच्या मनावर तो काय चमत्कार करतो त्याचा एक प्रयोग करून मी पाहिलेला आहे. एका इस्पितळात एक माणूस आजारी होता. त्याला उठतासुद्धा येत नव्हते. तेव्हा ध्वनिमुद्रित केलेला सामवेदाचा काही भाग आम्ही त्याला पंधरा मिनिटे ऐकविला. त्याचबरोबर तो एकदम उठून आपल्या खाटेवर बसला. हे सर्व प्रयोग करून पाहिले पाहिजेत! पण करणार कोण?"

त्यानंतर हिंदुसमाजाचा अधःपात का झाला ह्यासंबंधी बोलताना पंडितजी म्हणाले, "ह्या देशावर मुसलमानांची जी आक्रमणे झाली त्यामधे आमच्या साऱ्या विद्येचा नाश झाला. त्या लोकांना ज्ञान किंवा संस्कृती ह्यांच्याबद्दल कवडीचाही आदर नाही. वस्तुतः आमच्या हिंदुधर्माचा प्रसार भारताबाहेर किती तरी लांब लांबच्या देशांत झालेला होता. अहो, 'मक्का' म्हणजे काय? तर 'महाकाय'चा तो अपभ्रंश आहे. ते मूळ महादेवाचे देऊळ होते. तेथे चारशे महादेवांची लिंगे होती. त्यांपैकी तीनशे नव्याण्णव लिंगे महंमदाने फोडली. एकच लिंग शिल्लक ठेवले. तोच त्यांचा 'काबा.' हे मी 'इस्लामिक एन्सायक्लोपीडिया'च्या आधाराने तुम्हाला सांगतो आहे. 'कुराणा'त प्रत्येक अध्यायाच्या वर 'आलीफ (अ) लाम (ल) आणि मीम (म)' अशी

अक्षरे लिहिलेली असतात. त्याचा अर्थ कोणाही अरबी विद्वानाला सांगता येत नाही. त्याचा अर्थ 'ओम' असा आहे हे मी सांगतो. एवढेच नव्हे तर 'कुराणा'चा पहिला मंत्र हे आपल्या 'अग्ने, नय सुपथान राये विश्वान' या वैदिक मंत्राचे अक्षरशः भाषांतर आहे. दुसरी गोष्ट सांगतो. सबंध कुराणात गाय मारावी अन् गाईचे मांस खावे असे कोठेही सांगितलेले नाही. उलट, गाईचे संरक्षण करावे असे पंचवीस ठिकाणी सांगितलेले आहे. ही कुराणाची आज्ञा जर मुसलमानांनी अक्षरशः पाळली तर हिंदूंचे नि मुसलमानांचे भांडण होण्याचे काही कारण आहे काय ? माझे सर्व मुल्ला–मौलवींना आव्हान आहे की, गाईंचे रक्षण करावे, गोमांस खाऊ नये असे कुरणात सांगितले नाही असे त्यांनी उघडपणे सांगावे !

मुसल्मानांइतकेच हिंदुधर्माचे नुकसान जर कोणी केले असेल तर ते बौद्धांनी. बुद्धाचा धर्म हा अज्ञानावर आधारलेला आहे. जीवन हे दुःखाने भरलेले आहे, जीवनात अर्थ नाही, आयुष्य क्षणभंगुर आहे, शरीरात मल-मूत्र-श्लेष्मा भरलेला आहे, असल्या नैराश्यवादाचा बुद्धाने प्रचार केला. सर्वसामान्य लोक आळशी असतात. त्यांना या नैराश्यवादाने आकर्षित केले. सुख हे प्रयत्नाने मिळते. प्रयत्न न करता स्वस्थ बसले म्हणजे दुःख तुमच्या पाचवीला पुजलेच आहे. वेद सांगतात : या जगात काही क्षुद्र नाही. काही क्षणभंगुर नाही. हे सर्व 'ब्रह्म' आहे. ह्या मानवी शरीरात मल–मूत्र–श्लेष्मा नाही. देवतांचे निवासस्थान आहे. हे शरीर डोळ्यात सूर्य, वाणीत अग्नी, बुद्धीत ब्रह्म अशा रीतीने 'सर्वाह्यस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते'- म्हणजे ज्याप्रमाणे गाई गोठ्यात राहतात त्याप्रमाणे सर्व देवता ह्या मानवी देहामध्ये राहतात. अहो, आपण काय क्षुद्र आहोत, बुद्ध म्हणतो त्याप्रमाणे ? नाही. आपण 'इंद्र' आहोत–म्हणजे शत्रूचे विदारण करणारे ! आपल्या अवयवांना 'इंद्रिये' का म्हणतात ? कारण त्या अवयवांतून इंद्राची साक्षात शक्ती प्रकट होत असते ! पण हे बुद्धाला समजले नाही. म्हणून सगळा घोटाळा झाला. इंद्राची शक्ती दाखवण्यासाठी हा 'इंद्रिय' शब्द बनला आहे. या 'इन्द्रशक्ती'ने शरीरात ह्या इंद्रियांची छिद्रे निर्माण केलेली आहेत. 'मी पाहणार !' असे ह्या शक्तीने म्हणताच नेत्राच्या ठिकाणी छिद्र उत्पन्न झाले. मी श्वासोच्छ्वास करणार असे म्हणताच नाकाच्या ठिकाणी छिद्र उत्पन्न झाले. सारांश, मी ब्रह्म आहे, मी इंद्र आहे ही प्रयत्नशील जाणीव माणसाने सतत आपल्या मनात ठेवली पाहिजे. थोडक्यात सांगायचे म्हणजे वेदांचा अर्थपूर्ण

अभ्यास केल्यावाचून भारताचा उद्धार होणार नाही !"

पंडितजींच्या ज्ञानसागराच्या अवाढव्य विस्ताराचे थोड्या वेळात जे आम्हांला दर्शन झाले, त्याचे धावते रेखाचित्र येथे आम्ही रेखाटले आहे. केव्हा तरी दोन चार दिवस आम्ही त्यांच्या सान्निध्यात राहू असे आश्वासन देऊन आम्ही त्यांचा निरोप घेतला. या महाराष्ट्राच्या महापुरुषाच्या चरणी आमचे अनंत प्रणाम असोत !

मराठा : २०-१२-१९६५

# ३

## शतायुषी ब्रह्मर्षी

ह्या महाराष्ट्रात ब्रह्मर्षी, महामहोपाध्याय, साहित्य-वाचस्पती, गीतालंकार, विद्यामार्तंड आणि डी. लिट्. अशा एकाहीपेक्षा एक महान पदव्यांनी ज्यांच्या विद्वत्तेचा, व्यासंगाचा नि तपश्चर्येचा आजपर्यंत गौरव झालेला आहे, ते पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर हे उद्या दि. १९ सप्टेंबर रोजी आपल्या शंभराव्या वर्षात प्रवेश करीत आहेत, ह्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी साऱ्या महाराष्ट्रातूनच नव्हे तर साऱ्या भारतातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाल्यावाचून राहणार नाही. आमच्या वाचकांना आठवत असेल की, गेल्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यात त्यांना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांचा आशीर्वाद घेण्यासाठी मुंबईपासून एकशे चौतीस मैल दूर असलेल्या गुजरातेतील पारडी ह्या त्यांच्या वास्तव्यस्थानी आम्ही आमच्या मोटारीने गेलो होतो, आणि त्यांना भेटून आल्यानंतर त्या भेटीचे अत्यंत स्फूर्तिदायक प्रतिवृत्त आम्ही आमच्या वाचकांना सांगितले होते. त्याचीच थोडीशी पुनरावृत्ती आम्ही त्यांच्या शंभरी-प्रवेशाच्या शुभप्रसंगी आज करीत आहोत.

सावंतवाडीजवळ असलेल्या कोलगाव नावाच्या एका लहानशा खेड्यात त्यांचा जन्म झाला. लहानपणी शास्त्रीय पद्धतीप्रमाणे त्यांचे वैदिक अध्ययन झाले. तथापि, त्या काळी संस्कृत अध्ययनापेक्षा चित्रकलेचे त्यांना जास्त आकर्षण होते. म्हणून त्या कलेचा अभ्यास करण्यासाठी ते मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये येऊन दाखल झाले, आणि अल्पावकाशात त्यांनी

नामांकित चित्रकार म्हणून नावलौकिक मिळविला. पुढे ते दक्षिण हैदराबाद संस्थानात जाऊन स्थायिक झाले. तेथे त्यांचा आर्यसमाजाशी संबंध आला आणि पुन्हा त्यांच्या वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासाला नवीन प्रेरणा मिळाली. महर्षी दयानंदांच्या ' सत्यार्थ-प्रकाशा 'चा त्यांनी मराठी अनुवाद केला. तेव्हा-पासून त्यांना ' पंडितजी ' असे संबोधण्यात येऊ लागले. नव्या दृष्टीने ते वेदांचा अभ्यास करू लागले आणि ऋचांचा नवा अर्थ लावू लागले. ' अथर्ववेदा 'मधील मातृभूमीच्या वंदनाचे एक वैदिक गीत आहे. त्याला अनुलक्षून त्यांनी 'वैदिक राष्ट्रीय गीत ' असा एक जळजळीत लेख लिहून प्रसिद्ध केला. ' वंदे मातरम् ' म्हणणे हा राजद्रोह आहे असे त्या काळी मानले जात होते. अशा काळी पंडितजींनी वेदातून अनुवादलेले मातृभूमीचे ते ज्वलंत गीत वाचून त्या वेळच्या राज्यकर्त्यांची काय स्थिती झाली असेल ? त्या गीतातला हा एक भागच वाचा. " जिच्यामधे आमच्या पूर्वीच्या पूर्वजांनी विशेष पराक्रम केले, जिच्यामधे देवांनी असुरांचा पराभव केला, ती आमची मातृभूमी आम्हाला भाग्यशाली करो ! ही भूमी माझी माता. मी या पृथ्वीचा पुत्र. हे मातृभूमी, जो आमचा द्वेष करील, आम्हाला दास बनविण्याची इच्छा करील, त्याला आमच्या हितासाठी नष्ट कर !" इंग्रज सरकारचे ताबडतोब ह्या गीताकडे लक्ष गेले. त्यांनी ते अक्षित ठरवून जप्त केले आणि हैदराबाद संस्थानातून पंडितजींची हकालपट्टी झाली.

त्यानंतर ते उत्तर भारतात गेले आणि हरिद्वारच्या ' गुरुकुला 'त जाऊन अध्यापन करू लागले. तेथे असता कोल्हापुराहून प्रसिद्ध होणाऱ्या ' विश्ववृत्त ' ह्या मासिकात त्यांनी 'वैदिक वाङ्मयाची तेजस्विता' नावाचा एक लेख लिहिला. त्याबद्दल त्यांना दीड वर्षाची शिक्षा झाली. त्या शिक्षेतून सुटका होताच ते पुन्हा पंजाबमध्ये जाऊन स्थायिक झाले. आर्यसमाजाशी आणि विशेषतः लाला लजपतरायांशी त्यांचा तेथे विशेष परिचय झाला. त्यांच्या प्रेरणेने त्यांच्या वैदिक संशोधनाच्या कार्याला विशेष जोर आला. तथापि, पंजाबातले राजकीय वातावरण दिवसेंदिवस जसजसे उग्र आणि प्रक्षुब्ध होत गेले, तसतसे त्यांना त्या वातावरणात राहणे अशक्य झाले. पंजाब सोडून ते १९१८ साली सरळ महाराष्ट्रात औंध संस्थानात येऊन स्थायिक झाले. संस्थानाधिपती बाळासाहेब पंत प्रतिनिधी ह्यांचा त्यांच्यावर फार लोभ जडला. इतका की, काही काळ औंध संस्थानच्या मंत्रि-पदावरही त्यांची नेमणूक झाली होती.

औंधला येताच त्यांनी वेदांचा अभ्यास करण्यासाठी ' स्वाध्याय मंडळ ' ही संस्था काढली आणि वेदांच्या संहिता छापण्याला त्यांनी सुरुवात केली. जवळ जवळ तीस वर्षे पंडितजींचा हा प्रचंड खटाटोप अव्याहतपणे चाललेला होता. ह्या काळात त्यांनी चारी वेदांच्या संहिता तर प्रसिद्ध केल्याच, पण त्याखेरीज त्यांनी रामायण महाभारताचा संपूर्ण अनुवाद केला. भगवद्गीतेवर ' पुरुषार्थ-बोधिनी ' नावाची प्रचंड टीका लिहिली. प्राचीन संस्कृत तत्त्वज्ञानातील असा एकही विषय नसेल की, ज्याचा पंडितजींनी अनुवाद केला नाही. शेकडो ग्रंथ त्यांनी स्वतः लिहिले आणि संपादन केले. मानवी बुद्धीचा नि परिश्रमांचा पंडितजी म्हणजे एक मूर्तिमंत चमत्कार आहेत. औंधसारख्या एका लहानशा खेडेगावात बसून पंडितजींनी अडीच तपे जे महान कार्य केले त्याची महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य जनतेला फारच थोडी कल्पना असेल. पुढे १९४८ साली गांधीजींच्या खुनानंतर दक्षिण महाराष्ट्रात भयंकर अत्याचार, प्राणहत्या नि जाळपोळ झाली. पंडितजींच्या घरावर नि छापखान्यावर आगलाव्यांची टोळधाड चालून आली. पण मोठ्या सुदैवाने नि योगायोगाने ते त्या जळितामधून कसेबसे वाचले.

त्याच वेळी त्यांनी निर्धार केला, की यापुढे जातीयवादी महाराष्ट्रात राहावयाचे नाही. महाराष्ट्रापासून लांब कोठे तरी जावयाचे. त्याप्रमाणे त्यांनी गुजरातमधे बलसाड जिल्ह्यातील पारडी या गावी आपले मुद्रणालय आणि प्रचंड ग्रंथसंग्रह हालविला. त्या ठिकाणी त्यांना एकोणीस एकरांची आम्रवृक्षांनी परिवेष्टित असलेली एक निसर्ग-सुंदर जागा मिळाली आणि त्या जागी त्यांनी वयाच्या ब्यायशीआव्या वर्षी आपल्या नव्या जीवनाची मुहूर्तमेढ रोवली. ह्या त्यांच्या आश्रमाला गेल्याच वर्षी आम्ही भेट दिली. ही जागा पूर्वी एका ख्रिस्ती मिशनची होती. त्यामुळे त्या जागा त्या मिशनने अनेक शोभिवंत नि ऐसपैस इमारती बांधून ठेवल्या होत्या. त्या आयत्याच पंडितजींना मिळाल्या. आश्रमाच्या प्रवेशद्वाराशी पूर्वी एक ख्रिस्ती प्रार्थनामंदिर होते. ते मिशनने पाडून नेले, पण त्याचा भक्कम पाया जमिनीत तसाच राहून गेला. त्या पायावर पंडितजींनी एक सुंदर ' वेदमंदिर ' बांधले. त्यासंबंधी पंडितजी आम्हांला म्हणाले की, " या देशात हिंदू मंदिराच्या पायावर उभारलेली अन्य धर्मांची अनेक मंदिरे आढळतील. पण चर्चच्या पायावर उभारलेले हे एकुलते एकच वेदमंदिर आहे. " ' स्वाध्याय मंडळा 'चे पूर्वीचे तीस वर्षांचे ग्रंथ-लेखनाचे, संपादनाचे नि मुद्रणाचे कार्य पारडीच्या आश्रमात गेली अठरा वर्षे अविरत चालू आहे.

आपल्या आयुष्यातली जवळ-जवळ पन्नास वर्षे ते वेदसागरात अवगाहन करीत आहेत. सारे वेद जवळ जवळ त्यांना मुखोद्गत आहेत. एवढेच नव्हे तर त्या वेदांच्या अर्थाचे आणि आशयाचे त्यांनी जेवढे मनन आणि चिंतन केलेले आहे, तेवढे ह्या भारतात आजपर्यंत क्वचितच कोणी केले असेल. वेदांच्या पाठशुद्ध संहिता तर त्यांनी छापून प्रसिद्ध केलेल्या आहेतच. पण अथर्ववेदाचे विषयवार विश्लेषण करून त्याचे पाच निरनिराळे ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केलेले आहेत. चारही वेदांतील निरनिराळ्या देवताविषयक उल्लेखांचा त्यांनी एक स्वतंत्र ग्रंथ तयार केला आहे. सामवेदाचा त्यांचा अनुवाद तर फारच सुबोध आहे. हे सर्व लेखन त्यांनी मुळात हिंदी भाषेत केलेले असून त्याचा अनुवाद त्यांनी मराठी आणि गुजरातीमधेही करवून घेतलेला आहे. आम्ही गेलो, त्या वेळीं ते ऋग्वेदाचा अनुवाद करण्यात गुंतलेले होते. आपल्या 'स्वाध्याय मंडळा' मार्फत त्यांनी केलेल्या एकंदर प्रकाशनाची संख्या चारशेच्यावर भरेल. त्याचा भारा नुसता डोक्यावर उचलावयाचा झाला तर चार भरभक्कम हमाल लागतील. त्याखेरीज संस्कृत भाषा कशी बोलावी या विषयावर पंडिजींनी चोवीस क्रमिक पुस्तके तयार केलेली आहेत. ह्या पुस्तकांचा जर नुसता सहा महिने अभ्यास केला तर कोणाही माणसाला उत्तम संस्कृत बोलता येईल. महात्मा गांधींना आणि सरदार पटेलांना त्यांनीच संस्कृत शिकविले.

उद्या पंडितजी शंभराव्या वर्षात प्रवेश करीत आहेत. वस्तुतः, हा त्यांचा वाढदिवस साऱ्या भारताने साजरा करायला पाहिजे. राष्ट्रपतीने स्वतः पारडीला जाऊन आणि त्यांना 'भारतरत्न' ही पदवी देऊन त्यांचा महान गौरव करावयाला पाहिजे. पण कसचे काय अन् कसचे काय ? पंडितजींनी भारतीय ज्ञानाची, तत्त्वज्ञानाची आणि संस्कृतीची जी जगड्व्याळ सेवा एवढ्या वयापर्यंत केलेली आहे, तिची माहिती तर जाऊ द्याच, पण तिची जाणीव तरी ह्या देशातल्या राज्यकर्त्यांना आहे काय ? पंडितजी आम्हांला गेल्या वर्षी म्हणाले, "बायबल हा ख्रिस्ती लोकांचा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी 'बायबल सोसायटी'ला तेरा कोट रुपये मिळाले. पण वेदांच्या प्रकाशनासाठी मला तेरा लाख रुपयेदेखील आजपर्यंत कोणी दिले नाहीत, काय सांगावे ?" महाराष्ट्र सरकार किंवा गुजरात सरकार ह्यांनी पंडितजींच्या ग्रंथलेखन नि प्रकाशन कार्याला कावडीचीदेखील मदत केलेली नाही. केंद्र सरकार मात्र काही प्रमाणात त्यांना आर्थिक मदत करते. पण ती फारच तोकडी पडते. आपल्या संशोधनकार्यात आपल्याला मदत करण्यास

किमान वीस-पंचवीस तरी विद्वान पंडित किंवा प्राध्यापक असावेत, अशी पंडितजींची इच्छा आहे. पण त्यासाठी पैसे आणावयाचे कोठून ?

तथापि, अशाही प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत पंडितजींनी आपले ज्ञान-साधनेचे अग्निहोत्र एकसारखे प्रज्वलित ठेवलेले आहे. वेदांकडे त्यांची पाहण्याची दृष्टी विलक्षण स्फूर्तिदायक आणि आशादायक आहे. ते आम्हांला म्हणाले, "वेद हे जुने आहेत ही जी सर्वसाधारण समजूत आहे, ती चुकीची आहे. आजही ज्या गोष्टींचे शोध लागलेले नाहीत, त्यांची नोंद वेदांत आहे. वेदांमधे काही केवळ तत्त्वज्ञानच नाही, तर युद्धातील सैनिकांची व्यूहरचना, वैद्यकशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी हजार गोष्टी वेदांत भरलेल्या आहेत. त्या लोकांपर्यंत पोहोचवल्या पाहिजेत. अथर्ववेदाबद्दल लोकांचा फार गैरसमज आहे. पुष्कळांना वाटते की, त्यात जादुटोणे किंवा मंत्रतंत्र ह्यांची माहिती आहे. पण तसे नाही. अथर्ववेदात राजकारण, व्यवहार, आरोग्य, दीर्घायुष्य इत्यादी जीवनावश्यक गोष्टींचे ब्रह्मज्ञान भरलेले आहे. आमचे सारे भारतीय संगीत तर सामवेदावर आधारलेले आहे. सामवेद ज्या तऱ्हेने म्हणावयाला पाहिजे, तसा जर तो म्हटला तर आजारी माणसांचे रोग बरे होतात. ह्याचा एक प्रत्यक्ष प्रयोग मी करून पाहिलेला आहे."

भारतीय संस्कृतीचे पंडितजी हे अत्यंत जाज्वल्य अभिमानी आहेत. पण 'भारतीय संस्कृती' म्हणजे काय ? ह्यासंबंधी लिहिताना पंडितजी म्हणतात की, "वैदिक संस्कृती हीच खरी भारतीय संस्कृती आहे. बुद्धापूर्वी किती तरी हजार वर्षे वैदिक धर्म हा भारतात नांदत होता. तो पुढेही टिकूनच राहिला. बुद्धधर्ममात्र लवकरच येथून नष्ट झाला. म्हणून जो धर्म आला व गेला तो धर्म भारतीय संस्कृतीचा मुळी आधार होऊच शकत नाही. जो वैदिक धर्म भारतात अनादी कालापासून आहे, तो धर्मच भारताचा आहे व त्यावर आधारलेली संस्कृती हीच भारतीय संस्कृती आहे."

वैदिक धर्माचे मुसलमानांइतकेच जर कोणी नुकसान केले असेल तर ते बौद्धांनी असे पंडितजींचे स्पष्ट मत आहे. ते आम्हांला म्हणाले, "बुद्धाचा धर्म हा अज्ञानावर आधारलेला आहे. जीवन हे दुःखाने भरलेले आहे. जीवनात अर्थ नाही. आयुष्य क्षणभंगुर आहे. असल्या नैराश्यवादाचा बुद्धाने प्रचार केला. पण वेद सांगतात, ह्या जगात क्षुद्र काही नाही, काही क्षणभंगुर नाही. हे सर्व 'ब्रह्म' आहे. मानवी शरीर हे देवतांचे निवासस्थान आहे. बुद्ध म्हणतो,

‘ आपण क्षुद्र आहोत. ’ वेद सांगतात, ‘ आपण इंद्र आहोत. ’ आपल्या अवयवांना इंद्रिये का म्हणतात ? कारण त्या अवयवांतून इंद्राची शक्ती प्रकट होत असते. या इंद्रशक्तीने शरीरात ही इंद्रियांची छिद्रे निर्माण केलेली आहेत. ‘ मी पाहणार ! ’ असे ह्या शक्तीने म्हणताच नेत्राच्या ठिकाणी छिद्र उत्पन्न झाले. ‘ मी श्वसन करणार ’ असे म्हणताच नाकाच्या ठिकाणी छिद्रे निर्माण झाली. सारांश, मी ब्रह्म आहे. मी इंद्र आहे, ही प्रयत्नशील जाणीव माणसाने सतत आपल्या मनात ठेवली पाहिजे. म्हणून वेदांचा अर्थपूर्ण अभ्यास केल्यावाचून भारताचा उद्धार होणार नाही ! ”

शंभर वर्षे वेदसागरात अवगाहन करून ब्रह्मर्षींनी हाच अमर सिद्धांत शोधून काढलेला आहे. पंडितजींच्या मते वैदिक धर्म हा आशावादी धर्म आहे. पृथ्वीवर स्वर्गाचे सुख मिळविण्याचा प्रयत्न करणे हाच वेदांचा आदर्श आहे. हिंदूंच्या सर्व देवता ‘ शस्त्रधारी ’ आहेत. स्वसंरक्षणाची आपली नेहमी सिद्धता असावी असेच त्या सुचवितात. केवळ अहिंसेने आक्रमकांचा नाश होत नाही, तर स्वसंरक्षणासाठी आवश्यक असेल तेव्हा हाती शस्त्र घेतलेच पाहिजे. तरच या पृथ्वीतलावर आपल्याला सुरक्षितपणे जगणे शक्य आहे. हाच पंडितजींचा आजच्या भारताला संदेश आहे. माणसाचे आयुष्य केवळ शंभर वर्षेच असते ही गोष्ट पंडितजींना मुळीच मान्य नाही. ते सांगतात, “ भगवद्‌गीता सांगितली, त्या वेळीं श्रीकृष्ण ऐंशी वर्षांचा होता नि अर्जुन तर साठ वर्षांचा तरणाबांड होता. वैदिक आयुर्मर्यादा एकशेवीस वर्षांची आहे. तेवढी वर्षे माणसांनी जगलेच पाहिजे ! ” म्हणून आम्ही भगवंताच्या चरणी प्रार्थना करतो की पंडितजींना एकशेवीस वर्षांचे आयुष्य लाभो नि त्यांच्या डोळ्यांदेखत भारतातून गांधीवादाचे बुद्धधर्मीय अवशेष नष्ट होऊन वैदिक धर्माचा, आचार-विचारांचा नि संस्कृतीचा संपूर्ण पगडा भारतीय जीवनावर उमटलेला पाहण्याचे भाग्य त्यांना लाभो.

मराठा : १९-९-१९६६

४

# गाडगेबाबांचे पुण्यस्मरण

श्रीसंतसद्‌गुरू गाडगेबाबा ह्यांनी दि. २० डिसेंबर १९५६ रोजी भुसावळ समीप चालत्या मोटारगाडीत आपला देह ठेवला. त्यांच्या पवित्र अस्थी त्यांचे एक भक्त श्रीमंत काननी प्रेमजी जोशी ह्यांच्याकडे आजपर्यंत जपून सुरक्षित ठेवलेल्या होत्या. त्या अस्थींची प्रतिष्ठापना आज श्रीदत्तजयंतीच्या मुहूर्तावर तापी, पूर्णा नि भोगावती या पवित्र नद्यांच्या त्रिवेणीसंगमावर प्रचंड हरि-नामाच्या गजरामधे होणार आहे. ह्या प्रसंगी बाबांचे हजारो भक्त त्यांच्या अस्थींच्या दर्शनासाठी जमणार आहेत. म्हणून आमच्या हजारो वाचकांच्या वतीने बाबांच्या अस्थींना अभिवादन करून, त्यांचे आज पुण्यस्मरण करणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. गाडगेबाबांच्या दर्शनाचे, कृपेचे नि सहवासाचे सौख्य अन् आनंद आम्हाला प्रत्यक्ष लाभला होता हे आम्ही आमच्या आयुष्यातले परमभाग्य समजतो; आणि आश्चर्याची गोष्ट ही की, आम्ही आपण होऊन त्यांच्या शोधार्थ गेलो नाही, पण ते आपण होऊन आमचा शोध करीत करीत आमच्याकडे आले आणि ज्या क्षणी त्यांची नि आमची भेट झाली त्या क्षणापासून या क्षणापर्यंत आमचे प्रेमसर्वस्व आम्ही त्यांच्या चरणी अर्पण केलेले आहे, असे समजावयाला हरकत नाही.

आम्ही आतापर्यंत पुष्कळ सत्पुरुषांबद्दल ऐकलेले आहे. अनेकांना लांबून-जवळून पाहिलेले आहे, पण गाडगेबाबांसारखा लोकविलक्षण आणि अद्‌भुत साधुपुरुष या भारतात पूर्वी क्वचितच जन्माला आला असेल! त्यांच्या चरित्राचा

फारच थोडा भाग त्यांना वर्षानुवर्षे पाहणाऱ्यांना माहीत होता. त्यांचे मूळचे नाव ' डेबूजी ', पण नागपूरकडे त्यांना ' चापरेबुवा ' म्हणत. कोकणात ' गोधडे महाराज ', साताऱ्याकडे ' लोटके महाराज ', गोकर्णाकडे ' चिंधेबुवा ' आणि पुण्या-मुंबईकडे ' गाडगेमहाराज '. त्यांचे बालपण गुरे राखण्यात आणि शेती-काम करण्यात गेले. शाळेचे तोंड कधी त्यांनी पाहिले नाही. मग लिहिता-वाचता कुठले येणार? पुढे लग्न केले. संसाराला प्रारंभ केला. पण वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी कोणातरी अज्ञात साधूच्या प्रेरणेने त्यांना वैराग्य आले. त्यानंतर घरदार व संसार सोडून बारा वर्षे ते रानावनात आणि अज्ञातवासात हिंडत होते. ह्या साधकावस्थेत त्यांनी सर्व देशभर प्रवास केला. एकतारीवर कीर्तने केली. गोरगरिबांच्या जीवनाचा अभ्यास केला. भिकाऱ्यांची, लंगड्या-पांगळ्यांची, महारोग्यांची आणि जनावरांची सेवा केली, आणि ही तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर एक दिवस ते आपल्या विचित्र अवतारामध्ये जगापुढे प्रकट झाले. डोक्यावर झिंज्या, अंगावर चिंध्या, तोंडावर दाढीमिश्यांचे जंगल, एका कानात लोंबती कवडी, दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, मस्तकी खापर, एका हातात खराटा, दुसऱ्या हातात मडके, एका पायात एक पादत्राण तर दुसऱ्यात दुसरेच. ह्याच स्वरूपात जवळ जवळ पन्नास वर्षे गाडगेबाबा एकसारखे जगात वावरत होते. प्रारंभी लोकांना कळेना, की हा माणूस वेडा आहे का दुधखुळा आहे. कुठे कुणाच्या घरात राहावयाचे नाही. छपराखाली झोपायचे नाही. सतरंजीवर किंवा खुर्चीवर बसायचे नाही. भीक मागून खापरातून भाकरतुकडा खायचा, त्यातूनच पाणी प्यायचे. ज्या गावी जायचे ते गाव हातातल्या झाडूने झाडून स्वच्छ करायचे. झाडूचे तंत्र नि दरिद्री—नारायणाची पूजा गांधींनी या देशात प्रथम आणली नाही—गाडगेबाबांनी! ज्या गावात सकाळी झाडायचे त्या गावात रात्रौ कीर्तन करायचे. ' गोपाळा गोपाळा। देवकीनंदन गोपाळा ' या भजनाच्या गजराने गाव दणाणून सोडावयाचे. कित्येक लोकांना वाटे की, हा माणूस कोणीतरी अवलिया आहे. ते त्यांच्या पाया पडायला धावत. त्याबरोबर त्यांच्या पाठीवर खराट्याचा तडाखा मारून बाबा मागल्या मागे पळालेच म्हणून समजा. उभ्या आयुष्यात बाबांनी कोणाचा धडपणे नमस्कार घेतला नाही, की कोणाला आपल्या पायांला हात लावून दिला नाही किंवा भूतभविष्य सांगून अथवा अंगारेधुपारे देऊन बुवाबाजी केली नाही.

कीर्तन हे गाडगेबाबांचे खरे सामर्थ्य. त्यांचे कीर्तन ज्याने ऐकले नसेल तो करंटा! आपल्या खेडवळ आणि लाडक्या वऱ्हाडी बोलीत तासन्तास ते हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध ठेवीत. काव्य आणि विनोद ह्यांचा धबधबा त्यांच्या मुखातून एकसारखा धो धो वाहायचा. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते, पण अभंगांचे त्यांचे पाठांतर केवढे प्रचंड! हे पाठांतर त्यांनी कधी केले, कसे कले, कोणी त्यांना ते शिकवले, ह्याचा कधी कोणाला पत्ता लागला नाही. त्यांचे काही काही अभंग स्वयंस्फूर्त नि स्वयंरचित असावेत अशी आम्हांला राहून राहून शंका येई. बाबांच्या कीर्तनाची प्रसिद्धी वा जाहिरात कोणत्याही वर्तमानपत्रातून कधी होत नसे. रस्त्यावर कुठेतरी एखाद्या लहानशा फाटक्या कागदावर किंवा लाकडाच्या फळकुटावर वेड्यावाकड्या अक्षरात 'आज रात्री गाडगेमहाराजांचे कीर्तन येथे आहे' असे लिहिलेले असे. कोणी या मजकुराकडे बघतही नसे. कोणी तो धडपणे वाचीतही नसे. पण संध्याकाळ झाली, अंधार पडला, की त्या ठिकाणी हजारो निरक्षर आणि अडाणी गरीब लोक गुपचूप जमा झालेले दृष्टीस पडत. पंधरा हजारांपासून तो पन्नास हजारांपर्यंत गर्दीचा विस्तार असे.

एऱ्हवी बाबांना पाहून त्यांच्या सामर्थ्याची कोणाला कल्पना येत नसे. सिंहाला पाहावे जसे वनात, हत्तीला पाहावे पाण्यात, तसे गाडगेबाबांना पाहावे कीर्तनात. हजारो माणसांच्या प्रचंड सामुदायामध्ये बाबा एकदा उभे राहिले म्हणजे पावसाळ्यातल्या मेघाप्रमाणे ते आभाळभर गडगडू लागत. श्रोत्यांच्या डोक्यावर सद्भावनेचा, सद्विचारांचा नि साहित्याचा असा काही वळवाच्या पावसासारखा मारा सुरू होई की, त्या कीर्तन-गंगेत हजारो श्रोते आपले देहभान विसरून अक्षरशः डुंबत राहात. कीर्तनासाठी बाबांना साहित्य लागत नसे. टाळ नाही, वीणा नाही, बाजाची पेटी नाही. मिळाली तर वाहवा न मिळाली तरी वाहवा. रस्त्यावरचे दोन दगड वेचून ते वाजवायला लागत. श्रोत्यांच्या टाळ्या आणि घोष हेच त्यांच्या कीर्तनाचे सारे भांडवल असे. गरिबांचा नि दलितांचा उद्धार हा एकच त्यांच्या कीर्तनाचा विषय असे. देवळात जाऊ नका. मूर्तीची पूजा करू नका, देवापुढे पैसाफुले ठेवू नका, तीर्थयात्रेला जाऊ नका. 'तीर्थी धोंडा पाणी'! सत्यनारायण पुजू नका, पोथीपुराणांतल्या चमत्कारावर विश्वास ठेवू नका, कोणाचा गुरुमंत्र वा उपदेश घेऊ नका, प्राण्याची हत्या करू नका, दारू पिऊ नका, सावकारांचे कर्ज काढू नका. अडाणी राहू नका, आपल्या मुलांना जास्तीत जास्त शिक्षण द्या ही शिकवण सतत पन्नास वर्षे हजारो कीर्तने

करून गाडगेबाबांनी जनतेला दिली.

गाडगेबाबा आपल्या कीर्तनात प्रश्नोत्तरपद्धतीच्या 'सॉक्रेटिक' तंत्राचा अवलंब करीत. म्हणजे एकेक प्रश्न विचारीत विचारीत श्रोत्यांना ते आपल्या चुका कबूल करावयाला लावीत आणि आपले म्हणणे त्यांच्या गळी उतरवीत. उदाहरणार्थ, 'बासुंदी चांगली का बोंबिल चांगलं ?' बाबा विचारीत. श्रोते उत्तर देत, 'बासुंदी !' पुन्हा बाबा विचारीत, 'श्रीखंड चांगलं का सागुती चांगली ?' श्रोते उत्तर देत, 'श्रीखंड !' मग बाबा त्यांच्यावर एकदम कडाडत, "असे तुम्ही तोंडाने इथे कबूल करता नि घरी जाऊन बोंबिल अन् सागुती खाता ! बोला, गोपाळा गोपाळा । देवकीनंदन गोपाळा !" या प्रश्नोत्तर-पद्धतीमुळे बाबांची कीर्तने अत्यंत सोपी अन् प्रभावी होत. त्यांचे सारे म्हणणे श्रोत्यांच्या बुद्धीत ठसे नि मनावर बिंबे ! बाबांचे कीर्तन अशांसाठी होते. दुःखितांसाठी होते. त्यांत अध्यात्म नव्हते. कर्मकांड नव्हते. पोथी नव्हती. पुराणे नव्हती. देवांची वर्णने नव्हती. मूर्तिपूजा तर नव्हतीच नव्हती. मूर्तिपूजेचा त्यांच्याएवढा विरोधक आम्ही तरी हिंदुसमाजात दुसरा पाहिलाच नाही. साऱ्या आयुष्यात ते कोणत्याही देवळात कधी गेले नाहीत किंवा कोणत्याही मूर्तीपुढे त्यांनी आपली मान कधी वाकविली नाही. हजारो वर्षे समाजाच्या आर्थिक सत्तेखाली आणि धार्मिक रूढीखाली भरडून निघाल्यामुळे दुधखुळ्या, देवभोळ्या आणि आंधळ्यापांगळ्या झालेल्या हीनदीन समाजाच्या उद्धाराचा झगझगीत प्रकाशझोत म्हणजेच गाडगेबाबांचे कीर्तन !

मार्क्स हा माणूस होता की माकड होते हेदेखील गाडगेबाबांना ठाऊक नव्हते. पण सतत पन्नास वर्षे आपल्या जीवनामधून आणि कीर्तनामधून गाडगे-बाबांनी शुद्ध मार्क्सवादाची शिकवणूक जनतेला दिली. गाडगेबाबा हे महा-राष्ट्रातले समाजवादाचे एक प्रचंड व्यासपीठ होते. सर्वांच्या प्रेमावर आधारलेल्या समतावादी तत्त्वज्ञानाचा सोज्ज्वळ प्रचार कसा करावा, याचा सात्त्विक आदर्श बाबांच्या कीर्तनामध्ये पाहावयाला मिळे. बाबांच्या बरोबर एक-दोन वेळा प्रवास करण्याचे नि त्यांच्या कीर्तनात दोन शब्द बोलण्याचे भाग्य आम्हांला लाभले होते. खंडाळ्याचा आमचा 'राजमाची' बंगला एकदा एका रात्रीच्या वास्तव्याने त्यांनी पुनीत केलेला आहे. आमच्या 'महात्मा फुले' चित्रपटात त्यांनी 'मंगलाचरण' म्हटले आहे. असे त्यांचे आमच्यावर प्रेम होते. जीवनातल्या दुःखाचे हालाहल प्राशन करण्याचे आणि पचविण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या

अंगी होते. त्यांची एकच गोष्ट सांगतो. त्यांचा एकुलता एक पुत्र गोविंद महाराज ऐन तारुण्यात अकस्मात मरण पावला. त्या वेळी गाडगेबाबा कोकणात कोठल्या तरी गावी कीर्तन करीत होते. पुत्राच्या अपघाती मृत्यूची तार पोस्टमास्तर स्वत: घेऊन कीर्तनाच्या ठिकाणी गेले. गाडगेबाबांच्या कीर्तनाचा दणका जोरात सुरू होता. म्हणून त्यांना ती तार दाखविण्याची पोस्टमास्तरांना हिंमत होईना. अखेर त्यांनी त्या तारेमधला मजकूर बाबांना कसाबसा सांगितला. बाबा क्षणभरच थांबले. त्यांनी डोळे मिटले नि एकदम त्यांच्या तोंडून पुढील ओळ बाहेर पडली. ' अरे, ऐसे गेले कोट्यानुकोटी । रडू काय तेथे एकाचेसाठी ? ' बोला, ' गोपाळा, गोपाळा, देवकीनंदन गोपाळा ' । पुन्हा त्यांच्या भजनाचा दणका पूर्वीसारखा सुरू झाला. आपल्या पुत्राचा मृत्यू एका क्षणात ते विसरूनही गेले ! असे महात्मे आजकालच्या जगात किती आढळतील ?

अंगावर चिंध्या नि डोक्यावर खापर हा भिकाऱ्याचा गणवेष सतत पन्नास वर्षे अंगावर घालून बाबांनी नुसतीच गावे झाडली नाहीत किंवा कीर्तने केली नाहीत. सार्वजनिक कार्यासाठी त्यांनी ह्या काळात पन्नास लाख रुपये तरी जमविले असतील. जास्तीच पण कमी नाही. गरिबांसाठी साऱ्या महाराष्ट्रात ठिकठिकाणी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. पंढरपूरला अस्पृश्यांसाठी एक लाख रुपयांची ' चोखामेळा धर्मशाळा ' बांधून त्यांनी ती डॉ. आंबेडकरांना देऊन टाकली. मुंबईच्या जे. जे. इस्पितळातल्या रोग्यांच्या नातेवाइकांना राहण्यासाठी त्यांनी बांधलेली धर्मशाळा हा तर त्यांच्या कल्पनाशक्तीचा अद्भुत चमत्कार म्हटला पाहिजे. या सर्व धर्मशाळांची व्यवस्था बाबांनी इतकी सुंदर आणि नमुनेदार ठेवलेली होती, की एखाद्या इंग्रजाने तोंडात बोट घालावे. एवढे लाखो रुपये जमवून त्यांतील एका सुतळीच्या तोड्याला त्यांनी कधी हात लावला नाही. त्यांच्यासारखा निरिच्छ आणि विरक्त पुरुष संसारात क्वचितच आढळून येतो.

या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातल्या सुशिक्षित पुढाऱ्यांनी किंवा सार्वजनिक संस्थांनी समाजसेवेचे जेवढे कार्य केले असेल त्याच्या अनेक पटींनी अधिक प्रभावी कार्य ह्या एका माणसाने हातात झाडू घेऊन आणि अंगावर चिंध्या घालून केलेले आहे. दुसरी त्यांनी केलेली अविस्मरणीय गोष्ट म्हणजे दलितांच्या उद्धाराच्या आपल्या तत्त्वज्ञानाचा महाराष्ट्रातून प्रचार करण्यासाठी त्यांनी बहुजन-समाजातून आपल्यासारखे अनेक प्रभावी स्त्रीपुरुष कीर्तनकार निर्माण केले.

त्यांनी गाडगेबाबांचा संदेश महाराष्ट्राच्या खेड्यातून, शेतामधून आणि कोनाकोपऱ्यातून पोहोचविण्याचे महान कार्य केले. महाराष्ट्र हा संतांचा देश आहे. संतांची परंपरा गेली सात शतके महाराष्ट्रात अखंडित चालू आहे. त्याचा पाया ज्ञानेश्वरांनी घातला. त्याच्या भिंती नामदेवांनी बांधल्या. एकनाथांनी त्यावर घुमट चढवला. तुकोबा त्याचे कळस झाले आणि गाडगेबाबांनी त्या कळसावर लोकजागृतीची पताका फडकविली. म्हणूनच गाडगेबाबा हे तुकोबांचे अवतार होते असे आम्ही म्हणतो. अशा ह्या महाराष्ट्राच्या संतश्रेष्ठाची बारावी पुण्यतिथी त्यांच्या पवित्र अस्थींची प्रतिष्ठापना तापी तीर्थाच्या काठी करून त्यांचे सहस्रावधी भक्त आज साजरी करीत आहेत. त्यांचे पुण्यस्मरण 'गोपाळा, गोपाळा। देवकीनंदन गोपाळा' ह्या बाबांच्या आवडत्या भजनाचा गजर उठवून सारा महाराष्ट्र करील असा आमचा विश्वास आहे!

मराठा : ५-१२-१९६८

## ५

# श्रीसमर्थांचा नवा अवतार !

आम्ही भोंदूगिरीचे आणि बुवाबाजीचे ज्याप्रमाणे कट्टर दुष्मन आहोत, त्याप्रमाणे साधूंचे नि संतांचे दासानुदास आहोत. आम्ही बुद्धिवादी तर आहोतच आहोत, पण त्याचबरोबर आम्ही भाविक आणि श्रद्धाळू आहोत. अडाणी-पणाला उर्मटपणाची जोड देणे म्हणजे काही बुद्धिवाद नव्हे. ज्ञान हे बुद्धिगम्य असले तरी श्रद्धा असल्यावाचून ते प्राप्त होत नाही, असे गीतेनेच सांगितले आहे. बुद्धी ही श्रद्धेशी विसंगत नाही. विश्वाची सर्वच रहस्ये आपल्याला उमगली असा मोठमोठ्या विद्वानांनी आणि शास्त्रज्ञांनीसुद्धा अहंकार धरू नये. ज्ञानाने आणि विज्ञानाने ह्या जगात कितीही प्रगती केली तरी त्यामुळे मानवाला मनःशांती लाभत नाही, असे मौल्यवान विचार डॉ. प्र. न. जोशी ह्यांनी परवाच ‘ वसंत व्याख्यानमाले ’त सांगितले.

ते सांगताना ते म्हणाले, “ विद्वानाने मानवाला अनेक भौतिक सुखसाधने प्राप्त करून दिली, पण तरीही मानव सुखी झाल्याचे आढळत नाही. विज्ञानाने मानवापुढील अनेक समस्या सोडविल्या, मानवावरील अनेक दुःखांचे आणि आपत्तींचे निराकरण केले. पण त्याचबरोबर अनेक नवे प्रश्न उपस्थित केले. एका काळी विज्ञानाने मानव सुखी होईल असे विज्ञानवेत्त्यांना वाटत होते, पण ती अपेक्षा फोल ठरली आहे. विज्ञानाने अनेक सुखे उपलब्ध करून दिली, तरी मानसिक शांतीसाठी मानवी मनावर योग्य संस्कार करण्याचे सामर्थ्य विज्ञानात नाही. त्यासाठी मानवाला चराचरात आंतरिक ऐक्य पाहण्यास शिकविणाऱ्या

साधुसंतांच्या विचाराकडे म्हणजे धर्मविचाराकडे वळणे जरुरीचे वाटू लागले आहे. ”

धर्म म्हणजे कर्मकांड नव्हे, की ईश्वरपूजेचे अन् जपजाप्याचे स्तोम नव्हे. ‘ ईशावास्यमिदम् सर्वं ’ हे जरी खरे असले, तरी ईश्वराचा साक्षात्कार हा प्रत्यक्ष कोणालाही होत नाही. तो साधुपुरुषामधूनच होतो हे त्रिकालाबाधित सत्य आहे. गाडगेबाबा म्हणत “ तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी. ” साधूंची आणि सत्पुरुषांची व्याख्या तुकोबांनी अनेक अभंगांत करून ठेविली आहे. “ भूतांची दया हे भांडवल संता । आपुली ममता नाही देही । तुका म्हणे सुख पराविया सुखे । ” हे संतांचे खरे लक्षण आहे. तथापि, “ संतचिन्हे लेवुनि अंगी । भूषणे मिरविती जगी ” असला ढोंगी भोंदूपणा फार चालत असल्यामुळे, बुवाबाजीचे उदंड पीक जगात माजले आहे. म्हणूनच राष्ट्रपती राधाकृष्णन् एकदा व्याख्यानात म्हणाले, “ एक संत झाला तर शंभर भोंदू असतात. ( For one saint, there are hundred frauds ) ते आपण साधू वा संत असल्याचा बहाणा करतात, पण त्यांच्यापासून सर्वांनी दूर राहण्याची आवश्यकता आहे. भगवी वस्त्रे घालून साधुत्व येत नाही. त्यागात साधुत्व आहे. ”

तथापि, अज्ञ जनांना खरे नाणे आणि खोटे नाणे यातला फरक समजत नाही म्हणून बुवांची पोळी पिकते. आमच्या मते सत्पुरुषांची एकच कसोटी आहे. तीही की, जो स्वतःच्या अंगी ईश्वराचा संचार झाल्याचे ढोंग करून, स्वतःचे देव्हारे समाजात माजवीत नाही. आणि ‘ परद्रव्य परनारीची अभिलाषा ’ नधरता जगाच्या कल्याणासाठी ‘देह कष्टवितो पर उपकारा’ तोच खरा संत. ‘तुका म्हणे सांगू किती । तोचि भगवंताची मूर्ती ’ ह्या कसोटीला उतरणारे अनेक साधुसंत आजपर्यंत जसे महाराष्ट्रात होऊन गेले आहेत तसे आजच्या काळीही महाराष्ट्रात विद्यमान आहेत. अशा चारदोन संतांचा नि आमचा प्रत्यक्ष परिचय होता नि आहे. म्हणून त्यांच्याच आशीर्वादाने आणि कृपाप्रसादाने आम्ही चार ‘ वेडीवाकुडी ’ मराठी अक्षरे समाजपुरुषाच्या चरणावर आतापर्यंत वाहू शकलो आहोत.

अशा विद्यमान महापुरुषांमध्ये आम्ही समर्थशिष्य श्रीधरस्वामींचा समावेश करतो. तशी त्यांची नि आमची काही ओळख नाही. त्यांचे पूर्वचरित्रही आम्हांला माहीत नाही. पुण्याच्या अनाथ विद्यार्थीगृहात ते बाल्यकाळात राहात होते नि आमच्या आवडत्या भावे स्कूलमध्ये ते काही काळ शिकत होते,

एवढीच त्रोटक हकीगत कोणी तरी आम्हांला त्यांच्याबद्दल सांगितली. त्यानंतर त्यांना समर्थांचा साक्षात्कार होऊन त्यांनी ध्यान, धारणा नि तपस्या ह्या साधनांचा जवळ जवळ तीन तपे अंगीकार करून महान योगसामर्थ्य प्राप्त करून घेतलेले आहे. आजच्या युगातला ते एक समर्थांचा नवा अवतारच आहेत असेच मानले जाते. कित्येक वर्षे त्यांचे वास्तव्य सज्जनगडावर होते. त्यानंतर तेथून त्यांनी कर्नाटकातील शिमोगा जिल्ह्यातील सागर तालुक्यामधल्या श्रीवरदपूर या ठिकाणी स्थलांतर केले आणि दि. ३ फेब्रुवारी १९६३ रोजी मौनयुक्त एकांत स्वीकारला. त्या एकान्तातून जरी ते आता बाहेर आले असले; तरी त्यांचे मौनव्रत अद्याप चालूच आहे. तथापि, त्यांचे पुष्कळसे वास्तव्य कुलाबा जिल्ह्यातील महाड तालुक्यातल्या निसर्गरम्य अशा शिवथर घळीमध्ये त्यांनी स्थापन केलेल्या श्रीसुंदरमठातच असते.

महाराष्ट्रात समर्थ रामदासस्वामींची जी अनेक तपश्चर्यास्थाने प्रसिद्ध आहेत, त्यांपैकीच शिवथर घळ हे स्थान प्रसिद्ध आहे. ग्रंथराज दासबोधाचे लिखाण ह्या ठिकाणी झाले. असे हे परमपवित्र ठिकाण एका महान गगनचुंबी डोंगराच्या कुशीत आहे. आजूबाजूला उंच उंच डोंगर असून जवळूनच ‘ काळ ’ नदी वाहते. पुणे भोरमार्गे आपण महाडला जाऊ लागलो की वाटेत कात्रजघाट, भाटघर धरण, भोर, हिरडोशी, नीरा नदीचे उगमस्थान, वरंधा घाट, घाटातील वाघजईचे देऊळ, माझेरी, नंतर पायरस्त्याने पारयाची नि सुनुभाऊ ही दोन खेडी अन् पुढे काळ नदी आणि नंतर शिवथर घळ येते. एकंदर तीन शिवथरे आहेत. तेथून महाड सुमारे वीस-बावीस मैल आहे. जवळच रायगड, तोरणा नि एका बाजूला प्रतापगड आहे. भोरहून आपण हिरडोशीकडे जाऊ लागलो की, डाव्या बाजूला किल्ला दिसतो. ह्याच किल्ल्यावरील स्वयंभू शंकराच्या पिंडीवर छत्रपती शिवाजीमहाराजांनी आपली करंगळी कापून रक्ताची संतत धार धरली नि ‘ हिंदवी स्वराज्य ’ स्थापन करण्याची प्रतिज्ञा केली.

हा सर्व भाग दुर्गम किल्ल्यांच्या नि संतांच्या वास्तव्यांनी पुनीत आणि भूषित झालेला आहे. घळीच्या अगदी वरच्या बाजूला मोठे पठार असून तेथे जावळीचे सरदार चंद्रराव मोरे ह्यांच्या वाड्याचे अवशेष आहेत. अजूनही त्यांच्या वंशजांचे त्या ठिकाणी वास्तव्य आहे. या घळीच्या वरच्या भागात शिवद्रोही चंद्रराव मोरे आपल्या लढ्या फौजेनिशी स्वराज्याच्या नाशाची कारस्थाने करीत बसला असता, त्याच्या खालच्या घळीत कौपीनधारी समर्थ

स्वराज्याचे राजकारण आणि महाराष्ट्राचे धर्मकारण करीत बसले होते. शिवरायांच्या नि त्यांच्या अनेक वेळा ह्या ठिकाणी गाठीभेटी झाल्या असतील आणि स्वराज्यस्थापनेसंबंधी उभयतांच्या मसलतीही झाल्या असतील. तीनशे वर्षांपूर्वीचा काळ ध्यानात घेतला तर हे ठिकाण किती एकांतवासात नि घनदाट अरण्याने व्यापलेले असेल ह्याची कल्पनाच करवत नाही. अशा या धार्मिक नि ऐतिहासिक ठिकाणी श्रीसमर्थशिष्य श्रीधरस्वामी ह्यांचे पाय लागावेत हा एक महान योगायोगच म्हणावयाचा.

घळीच्या वरच्या बाजूला आठनऊ कुंडे आहेत. त्यांपैकी एक कुंड तर फारच मोठे नि खोल आहे. जणू काय कोणी एखादा रांजणच त्या ठिकाणी बसविलेला आहे. घळीच्या डाव्या बाजूला पाण्याचा लोट पडतो. पावसाळ्यात तर त्याला मोठ्या धबधब्याचे स्वरूप प्राप्त होते. अशा वेळी त्या घळीत प्रवेश करणे कित्येक वेळा कठीण होते. घळीकडे फक्त सायंकाळी चार ते पाचच्या सुमारास सूर्यदर्शन होते. सध्या या घळीची पाच पन्नास फूट लांबीच वापरासाठी उपलब्ध आहे. तथापि, ती आणखी दोनतीन फर्लांग तरी आत खोल असावी नि आत उजेड अन् हवेसाठी एक झरोका असावा असे अंतर्ज्ञानाने जाणून श्रीधरस्वामींनी आपल्या भक्तांना सांगितले आहे. शिल्पकार केळकर ह्यांनी 'श्रीसमर्थ दासबोध सांगत आहेत आणि योगिराज कल्याण तो लिहून घेत आहेत' अशा तयार केलेल्या दोन भव्य मूर्ती तेथे स्थापन केलेल्या असून श्रीराम, लक्ष्मण नि हनुमान ह्यांच्याही मूर्ती त्या ठिकाणी बसविलेल्या आहेत.

पाच वर्षांपूर्वी दासबोध नवमीचा सोहळा सतत तीन दिवसपर्यंत चाललेला होता. त्या वेळी घळीपर्यंत जाण्यायेण्याच्या विशेष काही सोयी नसताना आजूबाजूच्या गावांतून आणि खेड्यांतून आबालवृद्धांची प्रचंड यात्रा श्रीसमर्थांच्या या पवित्र घळीचे नि श्रीधरस्वामींच्या दर्शनासाठी अन् आशीर्वादासाठी जमली होती. त्या वेळेपासून प्रतिवर्षी माघ शुद्ध नवमीला मोठ्या प्रमाणात दासबोध-जयंतीचा हा उत्सव त्या ठिकाणी साजरा होत असतो. ही शिवथर घळ हे दासबोधाच्या पारायणास आणि जपजाप्यास अत्यंत नितान्त असे रमणीय स्थान आहे. अशा या पवित्र स्थानाचे आयुष्यात एकवार तरी दर्शन घ्यावे आणि कृतार्थ व्हावे असेच कोणालाही वाटेल ह्यात काय शंका ?

अनेक वर्षांच्या तपश्चर्येमुळे आणि समर्थांच्या कृपेने श्रीधरस्वामींच्या अंगी अलौकिक योगसामर्थ्य आलेले आहे, असा अनेक भक्तांना अनुभव आलेला

आहे. दोन वर्षांपूर्वी श्रीवरदपूर येथे मौनयुक्त एकान्त स्वीकारण्यापूर्वी श्रीधर-महाराज ज्या ठिकाणी बसले होते तेथे काही खेडवळ लोक त्यांच्या दर्शनार्थ बसले असता एका 'यक्षा'ने एका खेडुताच्या अंगात संचार केला नि तो श्रींना बाहेर येण्यास पाचारण करू लागला. जेव्हा श्रींची स्वारी बाहेर आली तेव्हा त्या 'यक्षा'ने कानडी भाषेत श्रींना जे निवेदन केले त्याचा सारांश वेळगावचे श्रीधरस्वामींचे वयोवृद्ध भक्त डॉ. जठार ह्यांनी आम्हांला परवाच सांगितला, तो असा. "श्रीसमर्थकाळी धर्मरक्षणाकरिता ज्याप्रमाणे श्रीछत्रपती शिवाजी-महाराज ह्यांचा उदय झाला, तसाच महाराष्ट्रात एका व्यक्तीचा उदय होऊन समस्त महाराष्ट्राच्या साहाय्याने तो भारतावरील परराष्ट्राचे हल्ले परतवून लावील. सारांश, नावाप्रमाणेच महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त होईल. चीन-पाकिस्तान संघर्ष १९६५ च्या वैशाख-ज्येष्ठमध्ये सुरू होईल अन् अखेर भारत हा एक-संध नि अखंड देश होईल." दोन वर्षांपूर्वी यक्षाच्या तोंडून श्रींनी वदविलेले हे भविष्य खरे ठरण्याची वेळ काही आता फार दूर नाही. ते असो.

पण श्रीधरस्वामींचा नि आमचा व्यक्तिशः काही एक संबंध नसताना, किंबहुना त्यांच्या नावापलीकडे त्यांच्या अस्तित्वाची आम्हांला जाणीवही नसताना चातुर्मासासाठी बद्रिनारायणाला जाण्यापूर्वी आम्हांला भेटण्याची इच्छा त्यांनी आपल्या निकटच्या भक्तांकडे का व्यक्त करावी हे आम्हांला समजत नाही. म्हणून ते शिवशक्तीमध्ये येणार असल्याचे आम्ही दोनदा जाहीर केले, पण ते ठरलेल्या वेळी येऊ शकले नाहीत, म्हणून आमची आणि अनेक भक्तांची निराशा झाली. पण दि. १७ मे रोजी दुपारी आम्ही पुण्याहून महाबळेश्वराकडे जात असताना कात्रज घाटापलीकडच्या शिंदेवाडीला श्रीधर-स्वामींची मोटर समोरून येताना आम्हांला अकस्मात दिसली. तेव्हा उभयतांच्या मोटरी थांबल्या. आम्ही आमच्या मोटरीतून उतरून श्रीधरस्वामींच्या चरणांवर भक्तिभावाने मस्तक ठेवले. त्यांनी आमच्या कपाळावर आणि मस्तकावर आपला वरदहस्त दीर्घकाळपर्यंत ठेवून आम्हांला योगपूर्वक आशीर्वाद दिला. श्रीधरस्वामींच्या तोंडावरचे कारुण्य आणि वात्सल्य पाहून आम्ही अक्षरशः विरघळूनच गेलो. त्यांच्या मौनामध्ये त्यांची सर्व भावना आम्हांला समजली. अशा सत्पुरुषाचा आम्हांला नि आमच्या कार्याला अशा नाट्यपूर्ण योगायोगाने आशीर्वाद मिळाला, हे आम्ही आमचे महाभाग्य समजतो. त्या भाग्यात आमच्या दैनिक 'मराठ्या'चे सर्व वाचक भागीदार आहेत अशीच

आमची भावना आहे. असो.

महाराष्ट्राचे ' आनंदवनभुवन ' व्हावे अशी ज्याला रात्रंदिवस चिंता लागून राहिली आहे असा एक महान योगी पुरुष सांप्रत श्रीधरस्वामींच्या रूपाने महाराष्ट्रात वावरतो आहे, हे महाराष्ट्राचे केवढे थोर भाग्य आहे? त्यांच्या आशीर्वादाने भारताची नि महाराष्ट्राची सर्व ईप्सिते साध्य होवोत, हीच त्यांच्या चरणी प्रार्थना आहे.

मराठा : ५-१२-१९६८

६

# राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज

राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज यांचा आज छप्पन्नावा वाढदिवस असून, प्रत्येक व्यक्तीने आजच्या दिवसाची सुरुवात महाराजांना भक्तिभावाने वंदन करून त्यांच्या गुणसंकीर्तनानेच केली पाहिजे अशीच व्यक्तिशः तुकडोजीमहाराजांची आणि त्यांनी केलेल्या राष्ट्रसेवेची थोरवी आहे. राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांचे चरित्र हे अद्भुतरसाने नटलेले असून, स्वतः असामान्य असलेल्या व्यक्तीने सर्व-सामान्य माणसांच्या सुखस्वाथ्यासाठी चालवलेल्या अखंड आणि प्रचंड ' कार्य–यज्ञा 'चे स्वरूपच त्यांच्या चरित्राने घेतलेले आहे. तुकडोजीमहाराजांना बालपणा-पासूनच खंजिरीवर ईश्वरभजने गाण्याचा छंद होता. बालपणीची त्यांची उन्मादा-वस्था आणि आज त्यांनी साधलेली सामाजिक उन्नतावस्था पाहिली की, ' अब तो बदले ये भारत की शान समझ लो । अपने जिम्मे जो आये वो काम समझ लो ॥ ' या महाराजांच्या एका उत्कृष्ट भजनात सांगितलेला संदेश त्यांनी स्वतःच कसा प्रत्यक्ष आचरणात आणला आहे याची बरोबर कल्पना येते. खंजिरी आणि ईश्वरी भजन यांचा तुकडोजीमहाराजांना बालपणापासून छंद जडलेला. हाच छंद त्यांनी व्यक्तीपुरता मर्यादित न ठेवता त्याला सामाजिक आकार देऊन सारा समाज ईश्वरभक्तीबरोबरच देशभक्तीच्या भावनेने भारून टाकला ! ईश्वराची भक्ती ही केवळ वैयक्तिक मोक्षप्राप्तीचे साधन नसून ती समाजसेवेचे आणि राष्ट्रोद्धाराचेही उत्तम हत्यार होऊ शकते, हे तुकडोजी-महाराजांनी आपल्या कृतीने दाखवून दिले. म्हणूनच त्यांना सर्वजण ' राष्ट्रसंत '

म्हणतात.

तुकडोजीमहाराजांवर जन्मापासूनच सत्पुरुषांचा वरदस्त आहे. वऱ्हाडातील विख्यात संतशिरोमणी आडकोजीमहाराजांच्या कृपाप्रसादाचे फळ म्हणजेच तुकडोजीमहाराज! बालपणी शाळेत वर्गबंधूंना जो अभ्यास व्हायला दिवस लागत, तो तुकडोजीमहाराज काही तासांतच संपवून मोकळे व्हायचे. पण पुस्तकांची घोकंपट्टी करण्यात तुकडोजीमहाराजांचे बालपणातही मन कधी रमले नाही. पुस्तकात डोके खुपसून बसण्यापेक्षा गावातील हनुमानाच्या अगर शिवाच्या देवालयात जाऊन निवांतपणे ईशचिंतनात तल्लीन होऊन जाण्यातच तुकडोजी-महाराजांचे मन अधिक रंगून जाई. भजने म्हणण्यात त्या वयातही तुकडोजी-महाराजांचा असा गोड आवाज लागे की, शिक्षक, त्यांचे वर्गबंधू आणि अन्य श्रोते ती भजने ऐकण्यात गुंग होऊन जात. तुकडोजीमहाराजांची ही 'पाळण्यातील पावले' बरोबर ओळखूनच, श्रीआडकोजीमहाराज जेव्हा समाधिस्थ झाले, तेव्हा त्यांनी आपला वारसा तुकडोजीमहाराजांना बोलावून आणून त्यांना सर्वांसमक्ष बहाल केला. तेव्हापासून तुकडोजीमहाराजांनी लोकसेवेचा छंद घेतला आणि ग्रामसेवा हे आपले कार्य निश्चित केले.

समाजात खोल रुजून बसलेल्या अनिष्ट रूढी आणि दुराग्रही प्रवृत्ती उखडून काढून समाजाला नवे आचार-विचार शिकविण्यासाठी तुकडोजीमहाराजांनी आपल्या खंजिरी भजनांचा अतिशय कल्पकतेने उपयोग करून घेतला. आपल्या काहीशा घोगऱ्या पण आर्त आणि गोड वाणीने जेव्हा तुकडोजीमहाराज आपले एकेक भजन आळवू लागतात तेव्हा साक्षात सरस्वतीच त्यांच्या कंठातून वीणारव करीत आहे असा भास होतो! लक्षावधी लोक एकाच वेळी महाराजांच्या भजनांनी भान विसरून भक्तीमध्ये गुंग होतात. तुकडोजीमहाराज एकामागून एक भजन गात असतात आणि श्रीकृष्णाच्या मंजुळ बासरीने नादलुब्ध होणाऱ्या गोपगोपिकांप्रमाणे सारा स्त्रीपुरुष समाज त्यात 'धुंद' होऊन जातो; बेहोष होऊन जातो, स्वतःला संपूर्णपणे विसरून जातो. महाराज आपले भजन संपवून थांबतात, तेव्हाच एखाद्या सुखस्वप्नातून अचानक जाग यावी, तसा त्यांचा श्रोतृगण भानावर येतो! ह्या चमत्काराची कल्पना त्याची प्रत्यक्ष अनुभूती घेतल्यानंतरच यथार्थपणे येऊ शकेल! त्या ब्रह्मानंदाचे शब्दाने वर्णन करणे अशक्य आहे.

तुकडोजीमहाराजांच्या प्रभावाने वऱ्हाड–नागपूरकडे जे एवढे लोक वेडे

झाले आहेत ते उगाच नव्हेत. याच भजनभक्तीच्या जोरावर तुकडोजीमहाराजांनी प्रचंड समाजकार्य यशस्वी करून दाखविले आहे. राष्ट्रीय भावनेने भरलेली सुंदर भजने स्वतः रचून महाराज ती खंजिरीच्या तालावर गात असतात. त्यामुळे आपोआपच लोकमतामधे नवे विचार रुजवण्याचे काम सफल होत जाते. म. गांधींनीदेखील सेवाग्राममध्ये तुकडोजीमहाराजांना आग्रहाने बोलावून त्यांच्या भजन-संगीताचा लाभ करून घेतला होता. ग्रामसेवेबरोबरच देशातील राजकीय आंदोलनाशीही तुकडोजीमहाराजांचा लोकसेवेच्या व्रतामुळे अधिकाधिक संबंध येऊ लागला. चिमूर-अष्टीच्या स्वातंत्र्यसमरात महाराजांना तुरुंगवासही सोसावा लागला. महाराजांनी रचलेल्या "अब काहेको धूम मचाते हो!", "झाड झडूले शस्त्र बनेंगे भक्त बनेगी सेना", "पत्थर सबही बॉम्ब बनेंगे" वगैरे भजनांवर ब्रिटिश सरकारने जप्ती-हुकूम बजावला.

राजकीय आंदोलन काहीसे शांत झाल्यावर तुकडोजीमहाराजांनी विश्वशांती सप्ताहाची आयोजना केली. श्रीगुरुदेव मासिकाचे प्रकाशनही त्यांनी याच सुमाराला सुरू केले. जनशक्तीचा सर्वतोपरी सदुपयोग व्हावा या हेतूने त्यांनी तालीम आखाड्यांचे संघटन हाती घेतले. हरिजनोद्धाराचे त्यांचे व्रत तर अखंड सुरूच आहे. 'गुरुकुंज' हा त्यांनी स्थापिलेला आश्रमही मानवसेवेची एक आदर्श वसाहतच आहे! तुकडोजीमहाराजांनी साहित्यनिर्मिती पुष्कळ केलेली आहे आणि ती सारी गुणपूर्ण असून लोकप्रियही आहे. कलेसाठी कला या महामूर्खपणाच्या मतावर महाराजांचा विश्वास असणे अर्थातच शक्य नाही. ज्याची सारी हयात जनसेवेत गेली त्याला कलेसाठी कला हे 'पलंगनिवासी' तत्त्वज्ञान (!) कधीच पटणे शक्य नाही. तुकडोजीमहाराजांचे सारे साहित्य उदात्त भावनेने भरलेले आणि लोकजागृतीच्या एकमेव धोरणाने रचलेले आहे. सुमारे साठ पुस्तके त्यांनी हिंदी व मराठी या दोन भाषांत मिळून रचलेली आहेत. अद्याप त्यांचे बरेचसे साहित्य अप्रकाशितही आहे. तुकडोजीमहाराजांची भजने ही साहित्याला मिळालेली एक अलौकिक देणगीच आहे. "तुकाराम की वाणी गर्जे। उपदेशामृत अमृत बरसे" असे जे त्यांनी एका भजनात तुकाराम-महाराजांच्या गीतरचनेबद्दल म्हटले आहे ते तुकडोजीमहाराजांच्याही भजन-रचनेला बरेचसे लागू पडते! 'बजा रे तेरी बॉसरी,' 'भक्ति बिना मुक्ती नहीं,' 'गुरुके चरणमें मेरा ध्यान है,' 'स्वराज्य आया, स्वराज्य आया, क्यों बतलाते यार', 'किसान की बलहारी', वगैरे त्यांची भजने अती प्रभावी आहेत.

भूदानाच्या कार्यालाही त्यांनी खूप चांगला हातभार लावला आहे. ग्रामसेवा ह्या विशिष्ट कार्यावर तुकडोजीमहाराजांनी अलीकडे विशेष भर दिलेला असून, भारताच्या उन्नतीचा पाया ग्रामसुधार हाच आहे असा त्यांचा विश्वास आहे. ग्रामसुधार आणि गरीबसेवा हे महाराजांचे अवतारकार्यच झाले आहे. कोणत्याही विशिष्ट छांदिष्टपणाच्या आहारी न जाता, जनतेच्या सर्वांगीण सुधारणेवर महाराजांचा कटाक्ष आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच ते क्रीडा-विकासाचा पुरस्कार करतात. जातिभेदाच्या निर्मूलनाबरोबरच आरोग्य आणि औषधोपचाराची सोय झाली पाहिजे ह्याची जाणीव ते बाळगतात; ईश्वरभक्ती-बरोबरच मुक्या प्राण्यांबद्दल प्रेम आणि आस्था समाजाला शिकविली पाहिजे असेही ते म्हणतात. तुकडोजीमहाराजांचा दृष्टिकोण सर्वच बाबतींत सर्वस्वी समाजवादी असतो; म्हणूनच त्यांच्या हातून एवढे प्रचंड काम होऊ शकले आणि अजून होत आहे. त्यांनी जो 'धर्म-ध्वनि' काढला आहे त्यात ते म्हणतात की 'सर्व मिळुनि सकळांना साह्य देउनी। जीवनोन्नति व्हावयास झटा समजुनी। सत्य सदा वदनिं वदा, स्मरुनि ईश्वरा। साह्य करा सकळिकांस करुनिया त्वरा' हे त्यांच्या विचाराचे आणि कार्याचेच केवळ नव्हे, तर राष्ट्रसंत तुकडोजीमहाराजांच्या जीवनाचेदेखील सार आहे असे म्हणणे यथार्थच ठरेल.

मराठा : २९-४-१९६५

७

# गुरुकुंजातील ती संध्याकाळ !

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज ह्यांचा नि माझा चोवीस वर्षांचा परिचय आहे. चाळीस साली नागपूर भागात त्यांचे खंजिरीवरचे भजन मी पहिल्यांदा ऐकले आणि ते ऐकून मी त्यांच्या हजारो श्रोत्यांप्रमाणे अक्षरशः पागल झालो. महाराजांचे खंजिरीवादन म्हणजे एक विलक्षण चमत्कार आहे. त्यांच्या बोटा-बोटातून जणू काही वीज संचारल्यासारखी ती त्या खंजिरीच्या पृष्ठभागावर इतक्या वेगाने आणि कौशल्याने नाचू लागतात की, त्यातून निघणारे ते मादक ध्वनी एखाद्या अप्सरेच्या नृत्यामधून रुणझुणणाऱ्या पैंजणांच्या स्वर्गीय निनादासारखे कानातून हृदयात शिरतात आणि मस्तकात उन्माद निर्माण करतात, आणि त्यांच्या तालावर जेव्हा महाराजांच्या मुखातून

सबके लिये खुला है
मंदीर यह हमारा
मतभेदको भुला है
मंदीर यह हमारा !

अशासारख्या एखाद्या राष्ट्रगीताची तारमधुर ललकारी रजतरसाच्या कारंजा-सारखी अस्मानात उचंबळू लागते, तेव्हा हजारो श्रोत्यांच्या सर्वांगावर हर्षाचे रोमांच उभे राहतात. केवळ शाब्दिक वर्णन करून ह्या गोष्टीची कल्पना येणार नाही. तो अनुभव प्रत्यक्ष घेतला तरच त्याच्या अतीव गोडीची कल्पना येईल. महाराज हे साक्षात्कारी राष्ट्रकवी आहेत. हिंदी आणि मराठी भाषेत त्यांनी

हजारो राष्ट्रीय काव्ये लिहिली आहेत, आणि ती शेकडो पुस्तकांमधून प्रसिद्ध केलेली आहेत. महाराजांच्या जिभेवर सरस्वती साक्षात नाचते आहे. त्यांच्या जिभेतून काव्याचा धबधबा एकसारखा धो धो वाहतो आहे, असे म्हटले तरी चालेल. महाराज हे केवळ कवी नाहीत, पण देदीप्यमान गायक आहेत. त्यांची वाणी भक्तिरसाने अंतर्बाह्य ओथंबलेली आहे. त्यामुळे श्रोत्यांच्या मनावर तिचा विलक्षण प्रभाव पडतो. महाराजांना हे सामर्थ्य केवळ ईश्वरी कृपाप्रसादामुळेच प्राप्त झाले असावे हे उघडच आहे.

विदर्भातील वरखेड क्षेत्री समर्थ अडकोजी महाराज म्हणून जे शतायुषी संत होऊन गेले, त्यांचा बाळपणापासून महाराजांच्या मस्तकावर वरदहस्त होता. म्हणूनच इतर मुलांप्रमाणे सामान्य खेळ न खेळता एकतारी नि खंजिरीवरून भजने म्हणणे आणि लोकांसमोर कीर्तने करणे ह्याखेरीज त्यांना दुसरा छंद नव्हता. वयाच्या चवदाव्या वर्षी रामटेकच्या जंगलात त्यांना कोणा एका महायोगी पुरुषाचे दर्शन झाले, आणि त्यांच्या मदतीने त्यांनी योगाभ्यास केला. वयाच्या सोळाव्या वर्षापासून त्यांनी संतांच्या नि तीर्थांच्या दर्शनासाठी साऱ्या भारतात दौरा काढला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभाव महात्मा गांधीजींवर पडून त्यांनीही त्यांना काही काळ आपल्याजवळ ठेवून घेतले. बेचाळीसच्या आंदोलनात भाग घेतल्यामुळे महाराजांना काही काळ कारागृहात जावे लागले. स्वराज्यप्राप्तीनंतर भारत विकासाच्या विविध क्षेत्रांत महाराजांनी देशभर संचार केला. त्या त्यांच्या राष्ट्रीय कार्याचा इतिहास म्हणजे एक महाभारत होईल.

पण त्यापेक्षाही ·तुकडोजीमहाराजांच्या कार्याचे महत्त्व अजिबात वेगळेच आहे. नवभारतामधील नवसमाज निर्माण करणारे ते एक प्रतिभाशाली शिल्पकार आहेत आणि त्यांचे हे महान शिल्पकार्य ज्याला प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहावयाचे असेल, त्यांनी अमरावतीजवळील मोझरी ह्या गावी त्यांनी निर्माण केलेला ' गुरुकुंज ' हा आश्रम पाहावा. महाराजांची फार दिवस इच्छा होती, की आम्ही त्यांच्या आश्रमाला भेट द्यावी. तो योग थोड्या दिवसांपूर्वी आला. ' गुरुकुंज ' म्हणजे एक काव्य आहे. ते एक स्वप्न आहे. महाराजांनी आपल्या तपश्चर्येच्या बळावर निर्माण केलेली ती एक अजब दुनियाच आहे म्हणानात ! इतकी रेखीव रचना, इतके शोभिवंत वातावरण, इतकी आकर्षक टापटीप अन् सुबक स्वच्छता, आणि मनाला मुग्ध करून टाकणारी इतकी मोहक शिस्त आणि शांतता ! एखाद्या महान चित्रकाराने जसे काही एखादे अद्वितीय चित्र काढून

ठेवावे ना तसा हा 'गुरुकुंज' आहे. निरनिराळ्या प्रवेशद्वारांमधून फरसबंदी वाटेने अगदी सरळ तो जातो. दोन्ही बाजूंला ती वाट आणि मधेच पाणी खेळते आहे. ही वाट सरळ 'प्रार्थनामंदिरा'कडे जाते. मधेच त्या पाटस्थळात एक तीर्थवापी आहे. ह्या वापीत भारतामधील सर्व तीर्थांचे जल एका शतायुषी महात्म्याच्या हस्ते टाकण्यात आलेले आहे. त्यामधे दिवंगत झालेल्या महापुरुषांची एखादी अस्थी टाकण्यात येते. गुरुकुंजातील प्रार्थनामंदिर म्हणजे नवभारताचे आदर्श धर्ममंदिरच जणू काही. भितीवर सर्व धर्मसंस्थापकांच्या, साधुसंतांच्या नि भारतीय स्वातंत्र्यवीरांच्या सुंदर नि शोभिवंत तसबिरी लावण्यात आलेल्या आहेत. मध्यभागी श्रीगुरुमहाराजांची गादी ठेवण्यात आलेली आहे. धूपाच्या, उदबत्त्यांच्या नि फुलांच्या सुगंधाने सारे प्रार्थनामंदिर सदैव दरवळत असते.

ह्या प्रार्थनामंदिराचे दर्शन घेतल्यावर आम्ही गुरुकुंजाचा सर्व परिसर पाहून आलो. ह्या परिसरातील सर्व विभाग यथांबुज वर्णन करावयाचा म्हणजे एक ग्रंथ होईल. तेथे काय नाही? तेथे अस्पृश्यता निर्मूलनविभाग आहे. भजनी विभाग आहे. महिलाविभाग आहे. कृषिविभाग आहे. विद्यामंदिर आहे. बालकमंदिर आहे. गुन्हेगार-सुधार-केंद्र आहे. अनेक वसतिगृहे आहेत. संगीत मंदिर आहे. मुद्रणमंदिर आहे. कोठवर ही यादी सांगावी. शिक्षणाप्रमाणे नानातऱ्हेचे उद्योग त्या ठिकाणी शिकण्याची व्यवस्था आहे. आश्रमाचा विस्तार शेकडो एकर आहे. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला आयुर्वेद महाविद्यालय असून इस्पितळ आहे. त्यात साठ रोग्यांची सोय आहे. त्यात सर्व तऱ्हेच्या शस्त्रकर्मांची उत्तम व्यवस्था आहे.

पलीकडे एक टेकडीची टेकडी महाराजांनी घेतली असून तेथे आदिवासींची वसाहत नि शेती करण्याचा त्यांचा विचार आहे. ह्या टेकडीवर महाराजांनी स्वतःच्या ध्यानासाठी आणि चिंतनासाठी एक उत्कृष्ट निवासस्थान बांधून ठेवले आहे. महाराजांनी निर्माण केलेल्या ह्या सर्व विश्वाला घाईघाईने प्रदक्षिणा घालून आम्ही प्रार्थनामंदिराबाहेरील अधिष्ठानावर आलो.

सूर्योदयाच्या आणि सूर्यास्ताच्या वेळी सामुदायिक प्रार्थना करणे हे 'गुरुकुंज' आश्रमाचे सर्वात प्रभावी वैशिष्ट्य आहे. आम्ही प्रार्थनास्थळी गेलो तेव्हा शेकडो आश्रमवासीय स्त्रीपुरुष अत्यंत शांततेने आणि शिस्तीने बसलेले होते. महाराजांनी आणि त्यांच्या शिष्यांनी पेटीच्या सौम्यमंद स्वरावर प्रार्थना

म्हणावयास प्रारंभ केला.

है प्रार्थना गुरुदेवसे,
यह स्वर्गसम संसार हो.
अति उच्चतम जीवन बने,
परमार्थमय व्यवहार हो,
ना हम रहे अपने लिये,
हमको सभीसे गर्ज है,
गुरुदेव, यह आशीस दे,
जो सोचनेका फर्ज है

ह्या प्रार्थनेची आठ कडवी आहेत. ती सर्व येथे देता येत नाहीत. पण प्रत्येक भारतीयाला—मग त्याचा धर्म, जाती, भाषा कोणतीही असो—जर प्रार्थना सांजसकाळ करावयाची असेल, तर ती कशी करावी ह्याचा हे प्रार्थनाष्टक म्हणजे एक आदर्श आहे. ही सामुदायिक प्रार्थना चालू असता सभोवतालच्या वातावरणात पावित्र्यता नि मांगल्याचा सुगंध जणू काही दरवळत असल्याचे भासमान होत होते, आणि अंतःकरणात अननुभूत भावनांच्या ऊर्मी उचंबळत होत्या. 'ईश्वर अल्ला तेरे नाम ! सबको सन्मति दे भगवान' असली बनावट बाजारी छापाची ती प्रार्थना नव्हती.

प्रार्थना संपल्यानंतर 'आया हुं दरबार तुम्हारा' हे भक्तिगीत अत्यंत मधुर स्वरावर सर्वांनी म्हटले. नंतर 'सामुदायिक नमस्कार' होऊन महाराजांच्या आज्ञेवरून आश्रमवासीयांसमोर आमचे त्या प्रसंगाला अनुसरून प्रवचन झाले. भजनातली सर्व गाणी ही स्वतः महाराजांनी रचलेली आहेत, किंबहुना महाराजांनी निर्माण केलेले विविध वाङ्मय हाच ह्या आश्रमीय जीवनाच्या दैनंदिन कार्यक्रमाचा पाया आहे.

प्रार्थना झाल्यानंतर महाराजांनी स्वतःसाठी भुयारात बांधलेले त्यांचे सुंदर निवासस्थान पाहून आलो. महाराज मोठे कल्पक स्थापत्यशास्त्रज्ञ आहेत. ते नुसतेच स्वप्नकार किंवा शब्दकार नसून ते कर्मयोगी शिल्पकार आहेत, आणि नवभारत निर्मितीची अनंत स्वप्ने त्यांच्या कल्पनेच्या क्षितिजावर क्षणोक्षणी नाचत आहेत.

सारांश, 'गुरुकुंज' हा आश्रम नाही, ही तपोभूमी नाही, हे भजनपूजनाचे प्रार्थनामंदिर नाही, तर महाराज म्हणतात त्याप्रमाणे नव्या भारतासाठी नवा

माणूस निर्माण करण्याचा हा महन्मंगल प्रयोग आहे. महाराजांच्याबरोबर त्यांच्या प्रशस्त भोजनगृहात त्यांचा प्रसाद ग्रहण करून आम्ही महाराजांच्या प्रार्थनेचे शेवटचे चरण गुणगुणत नागपूरला परतलो.

'तुकड्या' कहे, ऐसा अमरपद
प्राप्त हो संसारमें।
छोडें नहीं घरबारपर,
हो मस्त गुरुचरणारमें।

मराठा : १७-१०-१९६८

८

# नानांचे पुण्यस्मरण

दि. १२ जून १९६४ रोजी महाराष्ट्रातले एक नामांकित भाषापंडित, वैय्याकरणी, व्युत्पत्तिकार, इतिहास-संशोधक, विद्वान साहित्यिक, व्यासंगी प्राध्यापक आणि आमचे परममित्र कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी ह्यांचे अवसान झाले. त्यांची तिसरी पुण्यतिथी व्यक्तिशः आम्ही गेल्या रविवारी म्हणजे दि. ११ ला भक्तिभावाने साजरी केली, आणि त्याच वेळी आम्ही जाहीर केले, की रविवारी दि. १८ जून रोजी सायंकाळी साडे सहा वाजता नानांचे आप्त अन् इष्टमित्र ह्यांच्या उपस्थितीत नानांच्या तैलचित्राचे अनावरण 'शिवशक्ती'च्या 'सुभाषगृहा'त आम्ही करू. ते ठरल्याप्रमाणे आज तर होणारच आहे. हा समारंभ आम्हा उभयतांचे ज्येष्ठ बंधू तीर्थस्वरूप दत्तोपंत पोतदार ह्यांच्या हस्ते करण्याचे आम्ही (म्हणजे मी) योजिले होते. पण तनाने दत्तोपंत आज हजर राहू शकत नसले, तरी मनाने ते त्या वेळी हजर राहतीलच यात काय शंका ?

नानांची एक अशी इच्छा होती की 'शिवशक्ति' बांधून पूर्ण झाली, की तिच्या सौधतली बसून 'थालिपीठ-लोणी' लायचे. हा त्यांचा 'प्रसाद' आज उपस्थित असणाऱ्यांना यथाक्रम मिळणार आहेच. ह्या प्रसंगी आम्ही काय लिहावे ? लिहावयाचे म्हटले तर ब्रह्मांड लिहावे लागेल ! ते कसे शक्य आहे ? म्हणून १९५२ साली नाना जेव्हा अमळनेर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले, तेव्हा त्यांचा दादर येथे आमच्या अध्यक्षतेखाली जो सत्कार झाला, त्याप्रसंगी झालेल्या आमच्या नि नानांच्या भाषणांचा वृत्तांतच आम्ही या अग्रलेखात

देतो. तो आमच्या वाचकांना आवडेल असा आमचा विश्वास आहे.

"सत्तावीस वर्षांपूर्वी नाना आणि मी ट्रेनिंग कॉलेजमध्ये एकत्र होतो. ते आमच्यापेक्षा वडील होते. डोक्याला रुमाल, अंगात जाकीट अन् कोट आणि हातात छत्री अशी त्यांची मूर्ती पाहिल्यावर मला रेव्हेन्यू खात्यातील मामलेदाराची किंवा फडणिसाची आठवण झाली. (हशा). त्यांचा चेहरा पाहिल्याबरोबर मी त्यांच्याकडे आकर्षिलो गेलो. 'प्रथमदर्शनीच प्रेमपाशात पडलो'! (हशा) वाटले, की ह्यांचे अन् आपले गोत्र जमणार! (हशा) अन् ते जमले. इतकी वर्षे झाली, अजून त्यांच्या नि माझ्या मैत्रीत काही भानगड निर्माण झाली नाही. (हशा). सहाध्यायी असताना आम्ही तासन्तास गप्पा मारावयाचे. समुद्रावर फिरावयाला जावयाचे. त्यांनी आपल्या विद्वत्तेचा आणि संशोधनाचा आम्हांला पत्ता लागू दिला नाही. आम्हांला वाटायचे, की हा माणूस आमच्यासारखाच आपला सामान्य मगदुराचा आहे. (हशा) पण पुढे भाषाशास्त्रावर मराठीमध्ये अन् संस्कृत नाटकावर नि प्राचीन भारतीय शिक्षण-पद्धतीवर इंग्रजीमध्ये त्यांनी ग्रंथरचना केली आहे, हे जेव्हा आम्हांला समजले तेव्हा आम्ही हबकलोच. (हशा) एवढा विद्वान विद्यार्थी आपल्या वर्गात आहे हे समजल्यावर आमच्या प्रोफेसरांच्या छातीतसुद्धा धडकी भरली! (हशा).

संशोधनाची दीक्षा त्यांना इतिहासाचार्य विसूभाऊ राजवाडे ह्यांच्याकडून मिळाली. आधुनिक महाराष्ट्राच्या विभूत्यामधे राजवाड्यांचा अंतर्भाव करावा लागेल. त्यांच्या विद्वत्तेला मर्यादाच नव्हती. पण वागण्यात माणूस भारी विक्षिप्त. जन्मात त्यांचे कोणाशी जमावयाचे नाही. पण नानांचे अन् त्यांचे जमले. नाना हे पहिल्याने व्युत्पत्तीची चेष्टा करणारे होते. (हशा). 'जैमिनी' शब्दापासून 'चिमणी' शब्द झाला, असे कुचेष्टेने हे म्हणावयाचे. पण राजवाड्यांनी ह्यांना व्युत्पत्तिशास्त्राची दीक्षा दिली अन् त्यांना भाषापंडित बनविले. साहित्य-संमेलनाशी त्यांचा एकोणतीस सालापासून संबंध आला. शुद्धलेखन समितीचे नियम ह्यांनीच बनविले. कोल्हापूरच्या साहित्य संमेलनात नानांनी जे विलक्षण आवेशपूर्ण भाषण केले, ते अद्याप माझ्या स्मरणात आहे. त्या भाषणातले एक अक्षर आम्हांला कळले नाही, पण त्याचा परिणाम एवढा आमच्या मनावर झाला की काही विचारू नका. (प्रचंड हशा).

इंग्रज सरकारने पेशवे दप्तराचे संशोधन सुरू केले. तेव्हा गोविंदराव

सरदेसायांच्या हाताखाली नानांची नेमणूक झाली. इतिहासाचे हजारो कागद त्या वेळी ह्यांच्या हातून गेले, आणि मराठ्यांच्या इतिहासाबद्दल नवीन दृष्टी नानांना प्राप्त झाली. पुढे मध्यभारत संशोधक मंडळाच्या एका वार्षिक अधिवेशनाचे हे अध्यक्ष झाले. त्या वेळी 'मराठ्यांच्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा' ह्या विषयावर त्यांनी जो निबंध वाचला, तो ऐकून न्या. भवानीशंकर नियोगी म्हणाले, 'मराठ्यांच्या इतिहासाची इतकी शास्त्रीय मीमांसा न्यायमूर्ती रानड्यांनंतर दुसऱ्या कोणी महाराष्ट्रात केल्याचे मला तरी आठवत नाही!' (प्रचंड टाळ्या).

अडतीस सालच्या साहित्य संमेलनाने 'व्युत्पत्ति-कोश' लिहिण्याचे काम त्यांच्याकडे सोपविले. ना. जयकरांनी त्यांना एक हजार रुपये दिले. आठदहा वर्षे रात्रंदिवस खपून त्यांनी नऊशे पानांचा हा कोश तयार केला. त्यात पन्नास हजार धातू आहेत. सत्तावीस भाषांचे संदर्भ आहेत. सव्वाशे पानांची प्रस्तावना आहे. हा कोश म्हणजे मराठी भाषेचे एक अमर भूषणच आहे. (टाळ्या). कोणी म्हणेल व्याकरणाचा अन् व्युत्पत्तीचा काय उपयोग? पण नानांची व्याकरणाकडे पाहण्याची दृष्टी केवळ तांत्रिक नाही. सामाजिक अन् राष्ट्रीय दृष्टीने ते व्याकरणाकडे पाहतात. भाषेत जेवढी क्रियापदे अधिक, तेवढी त्या समाजाची क्रियाशीलता अधिक असा त्यांचा सिद्धांत आहे. (टाळ्या).

आयुष्याची तीस-पस्तीस वर्षे त्यांनी अभ्यासात, संशोधनात आणि लेखनात घालविली. दहा दहा वर्षे श्रम केल्यावाचून त्यांनी कोणताही ग्रंथ लिहिलेला नाही. तथापि, एवढे असून त्यांची स्वभावजात नम्रता आणि विनय आहे तसाच आहे. ज्ञानी आणि व्यासंगी माणसे तामसी अन् एककल्ली होतात, असा आपला अनुभव आहे. स्वतःच्या सामर्थ्यासंबंधी ते अवास्तव कल्पना करून घेतात. दुसरे विद्वान ते कःपदार्थ समजतात. आपापले आखाडे ते स्थापन करतात अन् आपल्या भगतगणांच्या टोळक्यात बसून ते जगातील साऱ्या विद्वानांना धमक्या आणि आव्हाने देत सुटतात. (प्रचंड हशा) 'कोण म्हणतो तो अमका माणूस विद्वान आहे? येऊ द्या त्याला माझ्या समोर! त्याचा फडशा पाडतो! त्याचे तुकडे करून टाकतो!' (एकदोन मिनिटे हशाच हशा) पण अशी अहंकाराची भाषा आमच्या नानांच्या तोंडात कधीही निघायची नाही. सर्वांबद्दल सदा चांगले बोलणारा महाराष्ट्रातला हा एकमेव विद्वान आहे! (टाळ्या). ह्याचा असा अर्थ नव्हे, की त्यांचे सर्वांशी पटते. (हशा).

पण कोणाशी कितीही मतभेद असले, तरी त्याच्याबद्दल वाईट म्हणून बोलावयाचे नाही, ही आपली नानांची रीत आहे. फडक्यांशी अन् वरेरकरांशी माझी केवढी भांडणे झाली! पण नाना माझे मित्र असूनही फडके नि वरेरकर ह्यांच्याशी त्यांची उत्तम दोस्ती आहे. (हशा). माझा स्वभाव असा आहे, मनात आले की मी खाडकन बोलून टाकतो. (हशा) आमचे मित्र ह. रा. महाजनी हेही असेच फटकळ आहेत. पां. वा. गाडगीळ समक्ष भेटले म्हणजे बोलतात चांगले, पण अग्रलेखात लिहितात भलतेच. (प्रचंड हशा). पण नाना कोणाशी भांडत नाहीत. त्यांचे जे काही मतभेद असतील, ते मी 'साष्टांग नमस्कारा'त म्हटल्याप्रमाणे अगदी 'मनातल्या मनात'. ह्यामुळे त्यांच्या मनाला विलक्षण ताण पडतो. मतभेद असूनही दुसऱ्या विषयी चांगले बोलावयाचे, ह्यामुळे नानांचा 'केविलवाणा विनोद' निर्माण झाला आहे. आयरिश माणसाच्या विशिष्ट स्वभावामुळेच त्याचा विनोद निर्माण झालेला आहे. आयरिश माणसाला वाटते की, आपण फार मोठे शहाणे आहोत. तो दुसऱ्याला फसवायला जातो, अन् स्वतःच फसतो. पण ते त्याला कळत नसल्याने विनोद निर्माण होतो. एक आयरिश माणूस म्हणाला, 'मी रेल्वे कंपनीला परवा फसविले. रिटर्न तिकीट घेतले. अन् पुन्हा परत गेलोच नाही.' (प्रचंड हशा) शीख माणसाचा असाच विनोद आहे. एक सरदारजी मोटारीत बसून चालले होते. वाटेत मोटार एकदम थांबली. ड्रायव्हर म्हणाला, 'साहेब, पेट्रोल संपले.' सरदारजी म्हणाले, 'अस्से? मग मोटार घराकडे वळव.' (प्रचंड हशा)

नानांचा हा विनोद निराळ्या छापाचा आहे. अती चांगुलपणातून तो निर्माण झालेला आहे. मतभेद असूनही दुसऱ्याविषयी वाईट बोलावयाचे नाही. एकदा नाना वर्गात शिकवताना म्हणाले, "दादोबा पांडुरंग माणूस फार मोठा होऊन गेला. पण त्याचे व्याकरणाचे पुस्तक आपले सामान्यच! पण माणूस मोठा बरं का!" (प्रचंड हशा) सर्वांविषयी चांगले बोलावयाचे आणि सर्वांशी चांगल्या रीतीने वागावयाचे, ह्याने नानांचा आयुष्यात मोठा फायदा झाला आहे असे नव्हे. माझी आजपर्यंत इतक्या लोकांशी भांडणे झालीत, तरीपण मी नानांच्या आधी दहा वर्षे साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होऊन गेलो. (हशा) अन् सर्वांशी मैत्री करून नाना आता कुठेसे अध्यक्ष होताहेत! (प्रचंड हशा) दुसऱ्याविषयी ते चांगले बोलतात अन् स्वतःविषयी मात्र काहीही बोलत नाहीत. कोणी त्यांची स्तुती केली तर तीही त्यांना आवडत नाही. आता त्यांच्या ज्या

गुणांचे आम्ही वर्णन करतो आहोत, ते आपल्या अंगात नाहीत असेच ते ह्यानंतर आपल्या व्याख्यानात सांगतील. ( हशा ) पण तुम्ही त्यांच्या त्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. ( हशा ) प्रेमळपणा हा नानांचा मुळीं उपजत स्वभावच. कुटुंबातल्या मंडळींशी जसे ते मायाळूपणाने वागतात, तसेच ते सर्वांशी वागतात. त्यांचे अंतःकरण अतिशय हळवे आहे. भावनेने ते सदैव ओथंबलेले असते.

त्यांचा ' व्युत्पत्ती-कोश ' त्यांनी आपल्या मृत पत्नीला अर्पण केला आहे. ती अर्पणपत्रिका डावलून या ग्रंथात प्रवेश करणे सहृदय माणसाला फार कठीण पडते. ह्या त्यांच्या भावनामय स्वभावामुळेच, त्यांच्या शास्त्रीय लेखनातही लालित्य आणि प्रसाद निर्माण झालेला आहे. साहित्यात ते आनंदवादी आहेत ते ह्याचमुळे. मी त्यांना अध्यात्मवादी म्हणतो. साहित्याचा हेतू आनंद देण्याचा आहे, आणि ह्या आनंदाने माणसामध्ये देवपणा उत्पन्न केला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. मराठी भाषेची आणि साहित्याची जन्मभर तपश्चर्या केलेली त्यांच्यासारखी विद्वान माणसे आज महाराष्ट्रात फार थोडी आहेत. साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांना देऊन महाराष्ट्राने त्यांचा जो गौरव केला आहे तो यथार्थच आहे ! " ( टाळ्या )

यानंतर सत्काराला यथोचित उत्तर देताना प्रा. कृ. पां. कुलकर्णी म्हणाले, " दादरच्या चौदा संस्थांनी माझा जो सत्कार केला, त्याबद्दल त्यांचे मी आभार कसे मानू ? दादरकर मला ओळखत नाहीत, मी रस्त्यातून चाललो तर माझ्याकडे दुर्लक्ष करतात, अशी मघाशी येथे तक्रार करण्यात आली. ती बरोबर नाही. छे, छे, छे ! दादरचे लोक माझ्याकडे मुळीच दुर्लक्ष करीत नाहीत बरे. त्यांचे माझ्यावर फार प्रेम आहे. (कौतुकाचे हास्य) आतापर्यंत माझी फार स्तुती झाली. स्तुती ऐकताना माणसाला गोड लागते. आपुलकीच्या भावनेने माणसे बोलून जातात. अत्रे दहा वर्षांपूर्वी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होऊन गेले. पण त्या वेळीं त्यांना जो आनंद झाला नसेल, तितका आनंद मी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष झाल्याने त्यांना आज झालेला आहे. ( टाळ्या ) आतापर्यंत माझ्या गुणांचे जे वर्णन झाले, त्यात अर्थवादच पुष्कळ होता. माझ्या गुणांचे वर्णन मी नाकबूल करीन असे अत्र्यांनी मघाशी सांगितले. त्यामुळे आता माझी फारच पंचाईत झाली आहे. ( हशा ) पण मी खरेच सांगतो. हे लोक समजतात तेवढा मी विद्वान नाही. ( हशा ) म्हणे मला सत्तावीस भाषा

येतात! अहो, कसचे काय अन् कसचे काय! भाषा येणे म्हणजे काय सोपी गोष्ट आहे? मराठी भाषा मला सगळी येते असे देखील मी म्हणू शकणार नाही. (हशा) माणूस माणसाला समजत नाही. त्याप्रमाणे जन्मभर अभ्यास केला तरी भाषा समजणे कठीण आहे.

भाषाशास्त्राचा मी अभ्यासू आहे. पण म्हणून मी स्वतःला साहित्यिकापेक्षा मोठा समजत नाही. शास्त्रीय साहित्यिकापेक्षा सृजक साहित्यिकच श्रेष्ठ. सृजक साहित्यिक अंतःकरणाची शुद्धी करतो. शास्त्रीय साहित्याने बुद्धीचे सामर्थ्य वाढते. पण बुद्धीचे सामर्थ्य वाढले, तर त्यातून ॲटमबॉम्ब निर्माण होतात. अंतःकरणाचे शुद्धीकरण वाढले, तर त्यामुळे कालिदास, शेक्सपीयर, भवभूती आणि व्यास निर्माण होतात. म्हणून शास्त्रीय वाङ्मयापेक्षा मी ललित वाङ्मयच श्रेष्ठ मानतो. हो, पण वाटेल ते ललित वाङ्मय शास्त्रीय वाङ्मयापेक्षा श्रेष्ठ नाही बरे का? (हशा) ज्यात चिरंतन तत्त्वे आहेत, त्या ललित वाङ्मयाविषयी हा माझा सिद्धांत आहे. साहित्य संमेलनावर ललित साहित्यिकाचा निश्चित अधिकार आहे.

पां. वा. गाडगीळ म्हणाले, की मी वृत्तपत्रांना संदेश द्यावा. मी पत्रकारांना काय संदेश देणार? समाजात पत्रकारांचे फार महत्त्व आहे. ललित साहित्यिकाप्रमाणे पत्रकार हेही कलावंत आहेत. आनंद देणे हे जे कलेचे ध्येय, तेच पत्रकारांचे ध्येय आहे. प्रचाराचे कार्य करावयाचे आणि वर पुन्हा आनंद द्यावयाचा हे काम सोपे नाही. आमच्या तरुणपणी 'केसरी', 'काळ' आणि 'भाला' ह्या पत्रांच्या अग्रलेखावर आम्ही अगदी तुटून पडत असू. केवढे सामर्थ्य असे त्या लेखात म्हणता! पण मध्यंतरीच्या काळात वृत्तपत्रांचे अग्रलेख कोणी वाचीनासे झाले होते. वृत्तपत्रातील बातम्या तेवढ्या चाळावयाच्या अन् अग्रलेख गाळावयाचे अशी सर्वसामान्य वाचकांची समजूत झाली होती. पण ती समजत दूर करून अग्रलेखाकडे वाचकांचे लक्ष वेधण्याचे कार्य आमच्या गाडगिळांनी केले. प्रभाकर पाध्ये, ह. रा. महाजनी आणि पां. वा. गाडगीळ ह्यांनी मराठी वृत्तपत्रव्यवसाया-बद्दल मुंबई शहरात फार मोठे आकर्षण निर्माण केले आहे.

आजच्या समारंभाला नानासाहेब चाफेकर आले आणि त्यांनी मला आशीर्वाद दिला, ह्याबद्दल मी स्वतःला धन्य समजतो. त्यांच्या आशीर्वादाला फार मोठे मोल आहे. बदलापुरला त्यांच्या मातोश्रींच्या श्राद्धाला महाराष्ट्रातल्या मोठमोठ्या साहित्यिकांना ते बोलावीत असत. अशा कित्येक प्रसंगी मी हजर

होतो. त्या वेळी आमचे परस्परांशी जे सुखसंवाद होत, ते अविस्मरणीय आहेत. आपण सर्वांनी येथे माझा सन्मान केला. माझ्या गळ्यात हार घातलात. पण, हार गळ्यात पडला म्हणजे आनंद होण्यापेक्षा मला हादरा बसतो. (हशा) हा हार म्हणजे जबाबदारी आहे. मराठी भाषेवरची आक्रमणे तुम्ही मला थांबवायला सांगता! मी ही आक्रमणे कशी थांबवणार? तुम्ही माझ्याबद्दल ज्या अपेक्षा बाळगता, त्या माझ्या हातून कशा पुऱ्या होतील याबद्दल मला चिंता वाटते. फार मोठमोठे प्रश्न आज मागे पडल्यासारखे झाले आहेत. गेल्या पाच वर्षांत ह्या दृष्टीने आमच्या विद्यापीठांच्या हातून काही एक कामगिरी झाली नाही. इंग्रजी भाषा गेल्यानंतर आम्ही हातपाय हालवावयाला लागणार! हे सर्व प्रश्न सोडवण्याचा आतापासून प्रयत्न व्हावयाला पाहिजे. वैद्यकशास्त्र, स्थापत्यशास्त्र किंवा विज्ञान मराठीतून शिकवता यावयाचे नाही, असे काहींचे म्हणणे आहे. ठीक आहे. मग ही शास्त्रे (Humanities) मराठीमधून शिकवायला सुरुवात करा. पण स्वस्थ बसू नका. मी स्वतः पंगू आहे. एकटा मी काय करणार? तुमच्या सदिच्छेने आणि साहाय्याने माझ्या हातून मराठी भाषेची नि साहित्याची सेवा होवो, एवढीच माझी इच्छा आहे. ह्या सत्काराबद्दल मी आपला ऋणी आहे." (टाळ्या) ह्यानंतर आभारप्रदर्शन होऊन हा अडीच तासपर्यंत चाललेला सत्कार समारंभ समाप्त झाला.

मराठा : १९-६-१९६७

# १

# ' महाराष्ट्ररत्न ' बाबूराव जगताप

पुणे महानगरपालिकेचे महापौर बाबूराव गणपतराव जगताप ह्यांच्या वयाला आज पाऊणशे वर्षे पूर्ण होतात. त्यांच्यापेक्षा मी दहा वर्षांनी लहान. परवा माझ्या पासष्टाव्या वाढदिवशी त्यांनी महानगरपालिकेतर्फे महापौर म्हणून माझ्या गळ्यात जो प्रचंड पुष्पहार घातला, त्याच्या भारापेक्षा त्यामधे ओथंबलेल्या त्यांच्या भावनांनी मी फार भारावून गेलो. बाबूरावांची आणि माझी किती वर्षांची मैत्री आहे हे कोणाला ठाऊक आहे का? जवळ जवळ चाळीस वर्षांची. मी बावीस साली मुंबईहून जेव्हा पुण्याला परत आलो, तेव्हा त्यांच्या शाळेत शिक्षकाची नोकरी मिळविण्यासाठी मी अर्ज केला होता. त्या वेळीं मी जोगेश्वरीच्या बोळात राहात होतो. माझ्या घरासमोर कै. रा. ब. रामजी पांडुरंग जगताप ह्यांचे चिरंजीव पांडुरंग रामजी जगताप राहात असत. बाबूराव हे त्यांचे चुलतभाऊ. त्यांचे पालनपोषण त्याच घरात झाले. तेव्हा एक दिवस पांडुरंगराव मला बाबूरावांच्या ' शिवाजी मराठा हायस्कूल 'मधे घेऊन गेले. बाबूरावांचा तो गौरवर्ण चेहेरा, त्यांच्या त्या रुबाबदार काळ्याभोर मिश्या, त्यांच्या डोक्यावरचा तो पांढराशुभ्र बाणेदार मराठा फेटा आणि त्यांच्या ओठावर सदैव खेळणारे ते त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण सौम्य स्मित पाहून मी एकदम त्यांच्याकडे आकर्षित झालो. त्या वेळीं आमची मुलाखत पाचदहा मिनिटेच झाली असेल. पण तेवढ्याच भेटीमधे आम्ही जन्माचे मित्र झालो.

बाबुरावांच्या बोलण्यातला नि वागण्यातला गोडवा किती मिठास आहे, हे

त्यांच्याशी प्रत्यक्ष संबंध आल्याखेरीज कोणाला समजणार नाही. त्यांचा स्वर इतका मधुर आहे की, ते बोलतात का गातात ह्याचा ऐकणाराला भ्रम पडतो. त्यामुळे बाबूरावांचा द्वेष करणारा माणूस औषधालासुद्धा सापडावयाचा नाही. बाबूराव हे अजातशत्रू आणि जगन्मित्र आहेत. त्यांनी उभ्या आयुष्यात कोणाची निंदा किंवा निर्भर्त्सना केलेली नाही. ज्या काळात पुणे शहरात ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद विकोपाला गेला होता, त्या काळात बाबूरावांनी त्या वादाचा एक शिंतोडा-सुद्धा आपला अंगावर उडवून घेतला नाही. ही काही सामान्य गोष्ट नव्हे. राजकारणाचे एवढे महापूर इतक्यांदा पुण्यावरून वाहून गेले, पण बाबूराव त्यामध्ये कधीही सापडले नाहीत आणि कधीही वाहवत गेले नाहीत. कमल, पत्राप्रमाणे ते सदैव अलिप्तच राहिले. मला नेहमी राहून राहून वाटते की-महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार नि आमचे हे बाबूराव जगताप जर राज-कारणात पडले असते, तर आज कोठल्या कोठे जाऊन पोहोचले असते! कोठले भाऊसाहेब हिरे नि कोठले यशवंतराव चव्हाण? अन् कोठले केशवराव जेधे नि कोठले शंकरराव मोरे?

बाबूरावांसारखा विद्वान, कर्तबगार आणि चारित्र्यसंपन्न माणूस मराठा काय किंवा ब्राह्मण समाजातही सहसा आढळावयाचा नाही. उभ्या आयुष्यात बाबूरावांच्या अंगाला वा नावाला एकही अफवा कधी चिकटलेली नाही, इतके त्यांचे चारित्र्य निर्लेप आहे. ज्या शिक्षणाच्या कार्याला त्यांनी चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी स्वतःला वाहून घेतले, त्या कार्यावरील निष्ठेला आणि श्रद्धेला त्यांनी ह्या क्षणापर्यंत अंतर दिलेले नाही. त्या दृष्टीने ते महर्षी अण्णासाहेब कर्वे किंवा कर्मवीर विठ्ठलराव शिंदे अथवा भाऊराव पाटील यांच्याच रांगेत जाऊन बसतील. सेवा, सौजन्य आणि विनय ह्यांचा मूर्तिमंत त्रिवेणीसंगम म्हणजे बाबूराव जगताप. बी. ए. झाल्यानंतर त्यांच्यासारख्या तेजस्वी नि सुस्वरूप मराठा तरुणाला कोणी नेमके निवडून आपल्या पदरी नेले असेल बरे? बडोदाधिपती श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनी! त्यांनी त्यांना आपले ए. डी. सी. केले! आता सयाजीराव कितीही मोठे असले, तरी बाबूराव काय त्यांच्या ए. डी. सी. चे काम करणार? दिवसातून चार वेळा कपडे बदलायचे, मिश्यांना 'पोमेड' लावून त्यांचे आकडे वळवायचे आणि 'महाराजा'च्या प्रत्येक हाकेला हात जोडून हजर राहावयाचे असला धंदा बाबूरावांसारखा ध्येयवादी माणूस किती दिवस करणार? थोड्याच दिवसांत त्या कामाचा त्यांना

वीट आला. आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन ते तडक पुण्याला आले नि त्यांनी 'शिवाजी मराठा हायस्कूल'ची स्थापना केली. बाबूरावांचे सारे जीवन एखाद्या सरळ रेषेसारखे आहे. त्यात वळणे कुठेच नाहीत.

बाबूराव जसे उत्तम शिक्षक आहेत, तसेच ते उत्तम नट आहेत, हे कोणाला सांगितले तर खरे वाटेल काय ? एका काळी बाबूराव 'संत तुकारामा'ची भूमिका करीत असत. त्यांचा स्वभावच मुळीं तुकोबांसारखा सात्त्विक आणि धीरगंभीर असल्याने, त्यांची ती भूमिका किती उत्कृष्ट वठत असेल हे सांगावयाला नको. मी त्यांची ती भूमिका प्रत्यक्ष पाहिलेली आहे. त्यांची मुलगी शकुंतला नि मुलगा जयवंत ही दोघे तुकोबांच्या मुलांची कामे सुंदर करीत असत. ते भावपूर्ण दृश्य अद्याप माझ्या स्मरणात आहे. माझा जन्म जसा ऑगस्ट महिन्यातला तसा बाबूरावांचाही जन्म ऑगस्टमधलाच आणि गंमत ही की, बाबूरावांचा पंचेचाळिसावा वाढदिवस माझ्याच अध्यक्षतेखाली शिवाजी मराठा हायस्कूलमधे साजरा झाला. त्या वेळीं मी म्हणालो होतो की, "आम्ही दोघेही नावांनी बाबूरावच. दोघेही पुण्याच्या दोन शाळेचे हेडमास्तर ! दोघेही एकाच आळीत राहणारे ! पण दोघांची घरे समोरासमोर असूनही उभ्या आयुष्यात दोघांमधे कधी विरोध निर्माण झालेला नाही !" इतक्या वर्षांनंतर आजही मी तेच म्हणू शकेन. उभ्या आयुष्यात आमच्या स्नेहात नि प्रेमात कधी अंतराय पडलेला नाही. पुणे नगराने त्यांना 'महापौर' करून त्यांच्या अर्धशतकाच्या शिक्षणसेवेचा जो गौरव केलेला आहे, तो अगदी यथायोग्यच आहे. बाबूरावांच्या ह्या पाऊणशे वर्षपूर्तीच्या सुमंगल दिनी 'दैनिक मराठ्या'च्या वाचकांच्या वतीने मी त्यांना दीर्घायुष्य नि आरोग्य इच्छितो नि त्यांना 'महाराष्ट्ररत्न' ही पदवी अर्पण करतो. यापेक्षा मी त्यांना दुसरे काय देणार ?

मराठा : १७-८-१९६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ... वि ...
क्रमांक ... नों. दि ...

## १०

# प्राचार्य बाबूराव जगताप

पुण्याच्या 'शिवाजी मराठा हायस्कूल'चे संस्थापक आणि जवळ जवळ तेहतीस वर्षे त्या शाळेचे प्राचार्य श्री. बाबूराव जगताप ह्यांच्या वयाला गेल्या सतरा तारखेला अठ्ठ्याहत्तर वर्षे पुरी होऊन त्यांनी एकोणऐंशीव्या वर्षात पदार्पण केले, याबद्दल आम्ही त्यांचे अंतःकरणापासून अभिनंदन करतो. बाबूराव हे अगदी गरीब मराठा कुळात जन्माला आले. त्यांचे वडील गणपतराव जगताप हे पुण्यातील 'फोटो झिंको' ऑफिसात पट्टेवाल्याचे काम करीत होते. त्यांचे चुलते रामा पांडू जगताप हे सामान्य पोलीस शिपायाच्या हुद्द्यापासून पुढे ते 'डेप्युटी सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस' या मानाच्या हुद्द्यापर्यंत पोहोचले आणि त्यांना 'रावबहादूर' हा किताब मिळाला. रँडसाहेबांच्या खुनाच्या तपासात रामा पांडूंनी स्वतःचा जीव धोक्यात घालून जी कामगिरी केली त्यामुळे त्यांना ही बढती मिळाली. जोगेश्वरीच्या बोळात लक्ष्मी रोडच्या कोपऱ्यावर रामा पांडूंचा वाडा आहे. बाबूराव तेथेच पहिल्याने राहात असत. आम्ही स्वतः १९१६ साली जोगेश्वरीच्या बोळात रामा पांडूंच्या घरासमोरच राहावयाला गेलो. त्या वेळी रामा पांडू हे मरण पावले होते. तथापि, त्यांचे चिरंजीव पांडुरंगराव जगताप ह्यांची आमची साहजिकच ओळख झाली आणि त्यांच्यामुळेच बाबूरावजींचा आणि आमचा परिचय झाला. त्या गोष्टीला आज पन्नास वर्षे झाली. म्हणजे त्यांचा आणि आमचा स्नेह जवळ जवळ अर्ध शतकाचा आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

बाबूरावांचे शिक्षण ' नूतन मराठी विद्यालया 'त झाले. लहानपणापासून त्यांना व्यायामाचा नाद होता. त्यामुळे त्या वेळीं त्यांनी जे सुदृढ शरीर संपादन करून ठेवले आहे, त्यातच त्यांच्या दीर्घायुष्याचे रहस्य आहे. त्यांचे कॉलेजचे शिक्षण ' फर्ग्युसन कॉलेजा 'त झाले. रँग्लर परांजपे यांच्या त्यागाचा आणि अध्यापनाचा त्यांच्या मनावर फार परिणाम झाला. महामहोपाध्याय दत्तोपंत पोतदार हे त्यांचे कॉलेजमध्ये सहाध्यायी होते. आपल्या स्नेहाच्या जुन्या आठवणी मोठ्या रसिकतेने दोघेही अद्यापि सांगत असतात. कॉलेजमध्ये असताना उत्तम क्रिकेट खेळणारे असा बाबूरावांचा लौकिक होता. तेरा साली बी. ए. होताच आपल्या चुलत्याच्या शिफारसीने पोलिस इन्स्पेक्टर म्हणून त्यांची नेमणूक झाली. तथापि, तो व्यवसाय त्यांच्या स्वाभिमानी प्रकृतीला फारसा मानवणारा नव्हता. त्यामुळे त्यांनी ती नोकरी सोडून दिली. त्यानंतर पुढे बडोद्याच्या श्रीमंत चिमणाबाई राणीसाहेब ह्यांचे ए. डी. सी. म्हणून त्यांची नेमणूक झाली. पण दिवसभर नुसते कडक कपडे घालावयाचे आणि राणीसाहेबांच्या तैनातीत निर्जीवपणे वावरायचे, ह्या गोष्टीचा त्यांना उबग आला.

त्यामुळे त्या नोकरीचा राजीनामा देऊन ते अठरा साली पुण्याला परत आले, आणि आपले उर्वरित आयुष्य बहुजनसमाजाच्या शिक्षणासाठी नि उद्धारासाठी घालवावयाचे त्यांनी ठरविले. पैशाची किंवा सहकाऱ्यांची फारशी मदत नसताना केवळ स्वतःच्याच आत्मविश्वासावर आणि सामर्थ्यावर त्यांनी अठरा साली पुण्याच्या दक्षिण भागात ' श्रीशिवाजी मराठा हायस्कूल 'ची स्थापना केली. पुण्यामध्ये त्या वेळेला ' न्यू इंग्लिश स्कूल ' आणि ' नूतन मराठी विद्यालय ' या दोन शिक्षणसंस्था पुण्यातील पांढरपेशा वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य करीत होत्या. बहुजनसमाजातील मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी तोपर्यंत पुण्यामध्ये एकही शैक्षणिक संस्था नव्हती. ती गरज बाबूरावांनी स्थापन केलेल्या ' श्रीशिवाजी मराठा हायस्कूल 'ने अत्यंत प्रभावीपणे दूर केली. अठरा साली एका लहानशा घरात स्थापन झालेल्या ह्या ' श्रीशिवाजी मराठा हायस्कूलला ' आज जे विशाल, भव्य स्वरूप प्राप्त झालेले आहे, ते सर्व बाबूरावांच्या तपश्चर्येचे एकमेव फळ आहे. मुंबईमधला आमचा कायद्याचा अभ्यास अर्धवट सोडून आम्ही बावीस साली पुण्याला परत आलो, आणि कुठल्यातरी शैक्षणिक संस्थेमध्ये नोकरी मिळेल किंवा काय याचा शोध करू लागलो. साहजिकच आम्ही प्रथम बाबूराव जगताप ह्यांच्याकडे गेलो. तथापि, त्यांच्या शाळेत त्या वेळेला

शिक्षकाची जागा रिकामी नसल्याने आम्हांला ते नोकरी देऊ शकले नाहीत. त्यानंतर पुढे पुण्याच्या लष्कर विभागातल्या 'कॅंप एज्युकेशन सोसायटी' या शाळेच्या प्रमुखपदी आमची नेमणूक झाली. चाळीस साली पुणे सोडीपर्यंत जवळ जवळ अठरा वर्षे दोन दुय्यम शाळांचे प्रमुख म्हणून आम्हां दोघांचा अतिशय निकट संबंध आला. त्यामुळे बाबूरावांच्या स्वभावाची, कार्याची आणि कर्तृत्वाची आम्हांला जेवढी ओळख झाली, तशी क्वचित दुसऱ्या कोणाला झालेली असेल.

शिवाजी मराठा हायस्कूलची वाढ नि विकास अक्षरशः आमच्या डोळ्यांसमोर झाला. अनेक शैक्षणिक कार्यांत, संमेलनांत, परिषदांत आम्ही दोघांनी बरोबरीने भाग घेतला. पुण्यात आजपर्यंत पुष्कळ हेडमास्तर होऊन गेले असतील, पण बाबूरावजींसारखा नम्र, निगर्वी, निष्ठावंत आणि नेकजात असा शिक्षक क्वचितच होऊन गेला असेल. कोणत्याही बाबतीत बाबूरावांचा कोणाशी कधी मतभेद झाल्याचे निदान आम्हांला तरी आठवत नाही. ते वृत्तीने जरी अबोल असले, तरी सस्मित मुखाने आणि उत्साहाने प्रत्येक कामात ते हिरीरीने भाग घेत. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवती एक वेगळेच आकर्षण निर्माण झालेले आहे. त्यांचा रुबाबदार मराठी बाण्याचा पोषाख हा त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामधला काही कमी महत्त्वाचा भाग नव्हे. त्यांच्या डोक्यावर चापूनचोपून बांधलेला ऐटबाज मराठी फेटा, त्यांचा तेजस्वी गौरवर्ण चेहरा, त्यांच्या काळ्याभोर शोभिवंत मिश्या, गळेबंद लांब काळा कोट आणि पांढरी स्वच्छ विजार ह्या त्यांच्या वेषभूषेत गेली पन्नास वर्षे कधीही फरक पडलेला कोणी पाहिला नसेल. पुण्यातला हेडमास्तर हा टापटिपीच्या पोषाखाबद्दल कधीच प्रसिद्ध नव्हता. परंतु बाबूरावांचा पोषाख इतका वैशिष्ट्यपूर्ण आहे, की कोठल्याही मोठ्या समुदायात पाहणाऱ्याचे लक्ष प्रथम त्यांच्याकडेच जावे. आमची आणि बाबूरावांची इतक्या वर्षांची मैत्री पण डोक्यावर फेटा नसलेली बाबूरावांची उघड्या डोक्याची मूर्ती आजपर्यंत आम्ही पाहिल्याचे आम्हांला आठवत नाही. अगदी भोजनाला बसताना देखील आपल्या डोक्यावरचा फेटा ते खाली उतरत नसत. बाबूरावांच्या या सौम्य आणि सात्त्विक व्यक्तिमत्त्वामुळे साहजिकच त्यांच्या विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या परिचयात येणाऱ्यांना त्यांच्याबद्दल अतीव आदर वाटे.

उभ्या आयुष्यात शिक्षणाखेरीज दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रात शिरण्याचा

बाबूरावांनी उपद्व्याप केला नाही. ते नेहमी म्हणत की, ' माझ्या डोक्यावर बांधलेला फेटा ज्याप्रमाणे मी कधीही बदलणार नाही, त्याप्रमाणे शिक्षणाचे व्रत जे मी एकदा अंगीकारले आहे त्यापासून कधीही विचलित होणार नाही. ' शिक्षणाच्या खालोखाल त्यांना मराठी रंगभूमीचे आकर्षण आहे. ' मराठा स्टुडंट ब्रदरहुड ' नावाची एक संस्था त्यांनी स्थापन केलेली होती. त्या संस्थेतर्फे ते कधी ' संत तुकाराम ' हे नाटक करीत. त्या नाटकात ते स्वतः तुकारामाची भूमिका करीत आणि तुकारामाच्या मुलांच्या भूमिका शकुंतला आणि जयवंत ही त्यांची मुले करीत. बाबूरावांच्या स्वभावातच मुळी संतवृत्ती बाणलेली असल्यामुळे तुकारामाची भूमिका फारच साजून दिसे.

पुण्याच्या सार्वजनिक आयुष्यात इतकी वर्षे काम करून बाबूराव हे अजातशत्रू राहिले ह्याबद्दल त्यांचे सर्वांत जास्त कौतुक करावयास हवे. गेल्या चाळीस-पन्नास वर्षांत पुण्यामधे इतके नाना तऱ्हेचे वाद झाले, इतकी अटीतटीची भांडणे झाली, पण त्यांपैकी एकाही वादाचा किंवा भांडणाचा उपसर्ग बाबूरावांनी स्वतःला चिकटवून घेतलेला नाही. राजकारणापासून आणि जातीयवादापासून बाबूराव हे कटाक्षाने नेहमी दूरच राहत. एक्कावन्न साली ' श्रीशिवाजी मराठा हायस्कूल '-मधून निवृत्त झाल्यानंतर साठ सालापर्यंत त्यांनी महाराष्ट्रातील अनेक शैक्षणिक जबाबदारीची कामे पत्करली. काही काळ ते कोल्हापुरात शिक्षणाधिकारी होते, पुणे स्कूल बोर्डाचे चेअरमन, मुंबई प्रांतिक प्राथमिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, शारीरिक शिक्षण समितीचे अध्यक्ष, गारगोटी येथील मौनी विद्यापीठाचे अध्यक्ष अशी अनेक महत्त्वाची कामे त्यांनी केली.

आम्हा उभयतांचा जन्मही ऑगस्टमधला. दोघांची घरगुती नावेही सारखीच. त्यांचा एक वाढदिवस ' श्रीशिवाजी मराठा हायस्कूल'मध्ये आमच्या अध्यक्षतेखाली साजरा झाल्याचे आम्हांला आठवते. अठ्ठेचाळीस साली त्यांच्या वयाला जेव्हा साठ वर्षे पूर्ण झाली, तेव्हा रियासतकार सरदेसाई ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. त्यांच्या शिष्यांनी आणि चहात्यांनी त्या निमित्ताने त्यांना एकसष्ट हजार रुपयांची थैली अर्पण केली. अर्थात ती त्यांनी आपल्या संस्थेला देऊन टाकली. अगदी अलीकडे पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदावर त्यांची निवड झाली. त्यागाच्या आणि तपश्चर्येच्या पायावर उभारलेल्या त्यांच्या महान आयुष्यावर पुण्याच्या नागरिकांनी उभारलेला हा सुवर्ण-कळसच होय ! उभ्या आयुष्यात कीर्तीची आणि संपत्तीची ज्यांनी कधीच पर्वा केली

नाही. आत्मप्रसिद्धीपासून कटाक्षाने दूर राहून आपले अंगीकृत कार्य निष्ठेने आणि निग्रहाने ज्यांनी वर्षानुवर्षे केले, असा बाबूरावजींसारखा आकर्षक देहयष्टीचा, रुबाबदार चेहऱ्याचा आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा पुरुष पुण्याच्या सार्वजनिक आयुष्यात आम्ही दुसरा पाहिला नाही. स्थलांतरामुळे आणि व्यवसायभिन्नत्वा-मुळे आज जरी आम्ही दोघे एकमेकांपासून दूर गेलेलो असलो, तरी बाबूरावांची आठवण आम्ही कधीही विसरलेलो नाही. परमेश्वर त्यांना दीर्घायुष्य देवो आणि अद्यापि त्यांची अपूर्ण राहिलेली काही उद्दिष्टे असतील, तर ती पूर्ण करण्याचे सामर्थ्य त्यांना लाभो एवढीच प्रार्थना.

मराठा : २१-८-१९६६

## ११

# दत्तो वामन पोतदार

मी परवाच दत्तोपंतांकडे गेलो होतो. मी त्यांना म्हणालो, "दत्तोपंत, तुमच्या वयाला ह्याच सुमारास साठ वर्षे पूर्ण होतात, ह्याची मला कल्पना होती. पण तुमची नक्की जन्मतारीख मला माहीत नव्हती. आज वर्तमानपत्रात वाचले म्हणून मी मुद्दाम आलो." दत्तोपंत आपल्या नेहमीच्या आसनावर मांडी घालून बसले होते. त्यांच्या कपाळावर आणि डोक्यावर चंदनाचे पिवळसर गंध फासलेले होते. अंगात एक काळी गरम बंडी होती. वयाला साठ वर्षे पूर्ण झाली म्हणजे काही मोठी विशेष गोष्ट झाली अशा तऱ्हेची कसलीही भावना प्रकट न करता दत्तोपंत शांतपणे म्हणाले, "माझी जन्मतारीख ५ ऑगस्ट. पण हिंदू तिथीप्रमाणे यंदा माझी साठ वर्षे पूर्ण होतात एक सप्टेंबरला. तथापि ह्या वर्षी दोन श्रावण असल्यामुळे अजूनही माझी साठ वर्षे पुरी व्हायला तसा अवकाश आहे. काहीतरी मंडळींनी करावयाचे ठरविले आहे. मी काही त्याचा विशेष विचारही केलेला नाही." दत्तोपंतांची बोलायची नेहमी हीच पद्धती असते. महाराष्ट्रात बोलणारी माणसे मी पुष्कळ पाहिली आहेत, पण इतक्या विपुलतेने आणि प्रसन्नपणाने बोलणारे गृहस्थ फक्त एकच आणि ते म्हणजे दत्तोपंत.

दत्तोपंतांची आणि माझी गेल्या पंचवीस वर्षांची ओळख आहे. पुढे आमच्या संबंधाला काहीसे नात्याचे आणि घरोब्याचेही स्वरूप आले. ह्या पंचवीस वर्षांत आम्ही कितीतरी बोललो असू. रात्रीच्या रात्री आणि दिवसाचे

दिवस ! पण दत्तोपंतांच्या बोलण्याचा कधी कंटाळा म्हणून मला वाटला नाही. त्यांचे बोलणे ऐकण्याचा जणू काही मला छंदच लागलेला आहे म्हणाना. मराठीच काय कोणतीही भाषा दत्तोपंतांवर जन्मापासूनच मुळी प्रसन्न आहे. एखाद्या कड्यावरून जशा धबधब्याच्या धारा एकसारख्या कोसळत असतात, तसा विचारांचा, वाक्यांचा आणि शब्दांचा अस्खलित ओघ दत्तोपंतांच्या जिभेवरून मोठ्या लीलेने आणि दिमाखाने वाहत असतो. सभेत त्यांच्या भाषणाचा जो थाट तोच खाजगी संभाषणातही.

महाराष्ट्रात नवीन नवीन वाङ्मयप्रकार पुष्कळ निघाले आहेत. पण बोलण्याची म्हणून जी एक सुंदर कला आहे तिला कोणी फारशी किंमत देताना दिसत नाहीत. या कलेचे तंत्र दत्तोपंतांपासूनच शिकावे. दत्तोपंतांच्या या गुणामुळे त्यांना घाईघाईने पाच-दहा मिनिटांत भेटून येणे अगदी अशक्य असते. दत्तोपंतांकडे जायचे म्हणजे दोन-तीन तासांच्या मुक्कामाचा बेत करून जायला पाहिजे.

दत्तोपंतांचा वाक्प्रवाह एकदा सुरू झाला म्हणजे मग काही विचारू नका. त्यांनाही भान राहात नाही आणि श्रोत्यालाही शुद्ध राहात नाही. गेल्या का त्याच्या मागच्या वर्षाची गोष्ट. मी असा सकाळी आठच्या सुमाराला गेलो तो संध्याकाळी साडेपाचला उठलो. तरीदेखील जिन्यावरून अंगणात आणि माझी मोटर सुरू होईपर्यंत दत्तोपंत माझ्याबरोबर बोलत आलेच. अशी दत्तोपंतांच्या बोलण्याची अवीट जादू आहे. पुनरावृत्ती आणि आत्मप्रौढी हे संभाषकांचे दोन मोठे शत्रू असतात. त्यांचा मागमूसही तुम्हांला दत्तोपंतांच्या भाषणात आढळणार नाही.

दत्तोपंतांचे बोलणे अतिशय मिष्टास आणि तपशीलवार असते. एखादा कादंबरीकार ज्याप्रमाणे बारीकसारीक गोष्टींचे वर्णन करतो तसे दत्तोपंत बोलतात. "काल संध्याकाळी मी आलो. गाडीत भयंकर गर्दी. स्टेशनवर उतरलो तो समोर तुमचे कुळकर्णी भेटले. ते म्हणाले, 'चला.' मी म्हटले, 'बरे आहे'. ते माझे विद्यार्थीच. गेलो त्यांच्याबरोबर. तुमचा लेख लिहायची मला आठवण होतीच. मी म्हटले, 'फाटकांच्या घरी लिहिले काय अन् कुलकर्ण्यांच्या घरी लिहिले काय?' कुलकर्णी म्हणाले, 'जेवा.' मी त्यांना सांगितले, 'मी रात्रीचे जेवत नाही.' थोडेसे पाणी प्यालो अन् बसलो तिथेच कोपऱ्यात लिहायला ! एवढीशी लहान जागा ती. कुलकर्णी म्हणाले, 'दुसरीकडे व्यवस्था करतो.' मी म्हणालो,

'काही नको; इथे काय अन् तिथे काय.' डोळे दुखत होते म्हणा, का चष्मा बिघडला होता म्हणा, का दिव्याचा उजेडच कमी होता म्हणा, मला काही नीटसे दिसत नव्हते. पण काढला तसाच लेख लिहून." असा दत्तोपंतांच्या भाषणाचा मजेदार नमुना असतो. तंबोरा चांगला लागला म्हणजे त्याच्या तारांचा जसा एकसारखा नाद झंकारत राहतो तसा दत्तोपंतांच्या बोलण्यामधून एक सुरेल प्रवाह अखंडपणे वाहतो आहे असे वाटते.

दत्तोपंतांच्या बोलण्याची जशी ही गंमत तशीच त्यांच्या विचाराची, वागण्याची अन् लिहिण्याचीही पण फार मोठी मौज आहे. त्यांच्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टीत त्यांचे ओजस्वी आणि निर्मळ व्यक्तिमत्त्व उमटलेले दिसते. त्यांच्या वयाला आता साठ वर्षे पूर्ण झाली असतील, पण त्यांचा प्रसन्न आणि हसतमुख चेहरा पाहिला की कॅलेंडराची पाने त्यांच्या डोक्यावरून पाचोळ्या-सारखी उडत गेली आहेत असे वाटते. त्यांना मी गेली २५ वर्षे जसे पाहतो आहे तसे ते आज या मितीला आहेत. काय दहापाच केस त्यांचे काळ्याचे पांढरे झाले असतील तेवढच. याखेरीज त्यांच्यामध्ये कोणताही बदल झालेला मला दिसत नाही की भासत नाही. फार कठीण गोष्ट आहे ही! अहो, पंचवीस वर्षे कशाला? पाच पाच वर्षांत माणसे बदलतात, कोलमडतात, अन् सपशेल मोडून पडतात. काल एका ठिकाणी जी माणसे असतात ती उद्या कुठल्या कुठे वाहून जातात अन् परवा तर त्यांची नावनिशाणीदेखील शिल्लक राहात नाही. पण गेल्या पंचवीस वर्षांत सार्वजनिक कार्याचे जे अनेक डोंगर दत्तोपंतांनी निर्माण केले ते सारे तसेच्या तसे हातावर घेऊन हनुमंताप्रमाणे दत्तोपंतांचे उड्डाण या क्षणापर्यंत आपले चालूच आहे.

दत्तोपंतांचा उत्साह, दत्तोपंतांचे तेज, दत्तोपंतांची बुद्धी, दत्तोपंतांचा कुर्रा, दत्तोपंतांचा पीळ ह्यामधला एक धागादेखील साठाव्या वर्षी सैल झालेला नाही. 'त्या अमक्याचे अलीकडे काही विशेष ऐकू येत नाही बरे का, तो आता मागे पडला, त्याचे पूर्वीचे ते काही निराळेच होते,' असे दत्तोपंतांबद्दल बोलण्याची अद्यापपर्यंत कोणावर पाळी आलेली नाही आणि पुढेही कधी येईल असे मला वाटत नाही. दत्तोपंत मागेही गेले नाहीत अन् पुढेही गेले नाहीत. ते होते तिथेच आहेत. पण दत्तोपंत मात्र आहेत त्यापेक्षा फार पुढे जाऊ शकले असते असे मला नेहमी वाटत असते. जनतेचे नेते होण्याचे सर्व गुण दत्तोपंतांच्या अंगी आहेत. दत्तोपंत जर राजकारणात पडले असते तर फार मोठी कीर्ती त्यांनी मिळवली

असती आणि अखिल भारतात महाराष्ट्राचे नाव त्यांनी दुमदुमवले असते याविषयी तर मला मुळी शंकाच नाही. काँग्रेसचे तर ते केव्हाच अध्यक्ष होऊन गेले असते. पण का कोण जाणे, राजकारणात प्रवेश करण्याची त्यांनी कधी महत्त्वाकांक्षाच बाळगली नाही. एवढेच नव्हे, तर राजकारणाच्या कधी ते वाऱ्यालाही फिरकले नाहीत. बाकी हीही गोष्ट खरी की पक्षीय राजकारणात पडण्याचा दत्तोपंतांचा मुळी पिंडच नाही. तत्त्वांना सोईस्कर मुरड घालून पक्षाला तसेच चिकटून राहावयाचे हा यशस्वी राजकीय नेत्यांच्या अंगी असावा लागणारा 'गुण' दत्तोपंतांमध्ये औषधापुरताही सापडणार नाही.

प्रखर तत्त्वनिष्ठा आणि निरपवाद चारित्र्य ह्या दोन सद्गुणांत दत्तोपंत कोणालाही हार जाणार नाहीत. दुसऱ्याला खूष करण्यासाठी किंवा दुसऱ्याला वाईट वाटेल म्हणून दत्तोपंत आपली मते कधीही लपविणार नाहीत किंवा बदलणार नाहीत. परवाच सानेगुरुजींच्या मृत्यूबद्दल आमचे बोलणे चालले होते. तेव्हा दत्तोपंत सरळ मला म्हणाले, "तुम्हांला काहीही वाटो, पण गुरुजींनी अशा तऱ्हेने आपल्या जीवनाचा शेवट करावा ही गोष्ट मला मुळीच पसंत नाही. मागे सेनापती बापट ह्यांनी जलसमाधी घ्यावयाचे ठरविले. त्याबाबत शनिवारवाड्यासमोर एक सभा भरली. तिचा मी अध्यक्ष होतो. त्या वेळी मी माझ्या भाषणात स्पष्टपणे सांगितले की, समाजाच्या सेवेला ज्यांनी आपले जीवित अर्पण केलेले आहेत त्यांना समाजाच्या परवानगीवाचून आपल्या जीवनाचे बरेवाईट करण्याचा मुळी अधिकारच नाही. देश किंवा समाज जेव्हा तुम्हांला आज्ञा करील त्या वेळी तुम्ही सर्वस्वाचाच काय पण प्राणांचाही त्याग करायला सिद्ध असायला पाहिजे. एवढी एकच गोष्ट मला कळते."

कोणत्याही प्रश्नावर दत्तोपंतांचा विचार स्वतंत्र असतो. हेच त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य आहे. परवा अनेक विषयांवर आम्ही बोलत होतो. बोलता बोलता दत्तोपंतांनी मधेच एक लहानशी बाटली काढली. मी विचारले, "हे काय आहे?" बाटलीतून आवळ्याच्या नवीन तऱ्हेने बनविलेल्या वड्या माझ्या हातावर ठेवीत दत्तोपंत म्हणाले, "पाहा तर खरे. एक नवीन चूष आहे." खरोखरच त्या आवळ्याच्या वड्या अतिशय चवदार होत्या. तशा मी पूर्वी कधीच चाखल्या नव्हत्या. मी विचारले, "कुठून आणल्यात या?" दत्तोपंत हसून म्हणाले, "आणल्या कुठल्या? त्या वीरकरांनी हा एक नवीन उद्योग सुरू केला आहे.

मला पसंत आहे." एक अगदी बारीकशी गोष्ट ही, पण त्यात दत्तोपंतांच्या स्वभावाचे रहस्य भरलेले आहे. समाजात कोण कुठे काय नवीन करतो आहे किंवा काय कुठे नवीन चालले आहे याबद्दल दत्तोपंत नेहमी जागरूक असतात. म्हणून दत्तोपंतांच्या संशोधनात आणि संग्रहात एका प्रकारचे निराळेच नावीन्य आढळून येते. बाकीचे संशोधक ठराविक मार्गांनी जात असतात. पण दत्तोपंत आपला मार्ग स्वतंत्रपणे चोखाळीत असतात.

मागे एकदा ते मला म्हणाले, "अलीकडच्या तरुण लोकांना वस्तू जमविण्याचा मुळी नादच नाही. काय मौज असते त्याच्यात ? आता आपले स्वतःचे अक्षरच घ्या. किती लोकांच्या संग्रही दहा वर्षांपूर्वीचे त्यांचे अक्षर आढळून येईल बरे ? माझ्या स्वतःच्या संग्रही माझे आठव्या वर्षी लिहिलेले एक पत्र आहे. ह्या लग्नाच्या आमंत्रणपत्रिकाच घ्या. ह्या आमंत्रणपत्रिकांमध्ये कालमानाने किती फरक पडलेला आहे ? गेल्या पन्नास वर्षांतल्या महाराष्ट्रातल्या लग्नपत्रिका माझ्याजवळ आहेत. त्यांचे मी एक प्रदर्शनच भरवणार आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे वार्षिक रिपोर्ट. ह्या पुण्यातल्या सर्व संस्थांचे कित्येक वर्षांचे रिपोर्ट माझ्याजवळ आहेत. शिक्षणप्रसारक मंडळीचा पहिल्या वर्षाचा रिपोर्ट त्या संस्थेजवळ नाही, पण माझ्याजवळ आहे. त्यांनी तो मजकडे मागितला होता. पण मी त्यांना दिला नाही. त्यांना मी सांगितले की, "घरी येऊन कॉपी करून न्या!" मी विचारले, "सगळे रिपोर्ट्स अन् पत्रे तुम्ही जमवून ठेवता ?" दत्तोपंत म्हणाले, "हो. ह्या घरात जे जे येते त्यातले काही एक नष्ट होत नाही." "मग त्यांचे खूपच घरात हसू झाले असेल!" मी म्हणालो. तेव्हा दत्तोपंत हसत म्हणाले, "कपाटाला किंवा घडवंच्यांना त्याचे ओझे! मला स्वतःला त्याचे थोडेच ओझे आहे ?"

दत्तोपंतांनी आपल्या घराचे जसे वर्णन केले तसेच त्यांच्या डोक्याचेही आपल्याला वर्णन करता येईल. जे जे म्हणून एकदा त्यांच्या डोक्यात शिरते, ते कधीही नष्ट होत नाही. साठ वर्षांच्या आयुष्यात दत्तोपंतांनी ब्रह्मांड आपल्या डोक्यामध्ये भरून ठेवले असेल! पण त्या मानाने त्यांनी लेखन काहीच केलेले नाही ही दत्तोपंतांच्याविरुद्ध आमच्यासारख्या त्यांच्या मित्रांची आणि भक्तांची मोठी तक्रार आहे. दत्तोपंतांनी स्फुट आणि प्रासंगिक लिखाण पुष्कळच केलेले आहे. फर्डे आणि शैलीदार लेखन करण्यात त्यांचा हात कोणीही धरणार नाही. व्याख्यानात जशी ते मौज उडवून देतात, तसेच लेखनात विचारांची आणि

कल्पनांची अशी काही आरास ते उभी करतात की, ती बघून वाचकांचे डोळेच दिपून जातात. पुण्याच्या साहित्यसंमेलनामध्ये स्वागताध्यक्षपदावरून त्यांनी जे भाषण केले तो त्यांच्या लेखनशैलीचा एक मनोहर नमुना आहे. त्याचप्रमाणे आमच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या चरित्रासंबंधी त्यांनी जो एक लेख लिहिला आहे तसा संयमपूर्ण पण हृदयस्पर्शी मृत्युलेख मराठीत कोणी लिहिला आहे असे मला वाटत नाही. दत्तोपंतांनी मनात आणले तर कोणत्याही विषयावर ते उत्कृष्ट ग्रंथरचना करू शकतील हे काही सांगायला पाहिजे असे नाही.

पण दत्तोपंत लेखन करीत नाहीत अशी तक्रार करणारे आमच्यासारखे लोकच मुख्यत्वेकरून त्या परिस्थितीबद्दल जबाबदार आहेत. दत्तोपंतांच्या भेटीगाठीसाठी येणारे राष्ट्रातले लोक त्यांचा किती वेळ घेतात ह्याचा कोणी विचार केला आहे काय? नाना तऱ्हेच्या आणि नाना व्यवसायांच्या लोकांनी गेल्या वीस-पंचवीस वर्षांत दत्तोपंतांना व्याख्यानासाठी आणि समारंभासाठी बोलावून आणि ह्या ना त्या संस्थेत त्यांना गुंतवून मराठी वाङ्मयाचे फार मोठे नुकसान केले आहे. दोन-चार वर्षांची शिक्षा देऊन दत्तोपंतांना जर कुठे तुरुंगात नेऊन बसविता आले तरच त्यांच्या हातून यापुढे ग्रंथरचना होईल असे मला वाटते. (अर्थात तुरुंगाचे संशोधन करण्याचे काम त्यांनी त्या ठिकाणी सुरू केले नाही तर!) तथापि दत्तोपंतांनी ग्रंथलेखन केले नाही म्हणून मला वाईट वाटत असले, तरी तो काही त्यांच्या चरित्रामधला उणेपणा आहे असे समजावयाला मी तयार नाही. आपल्या प्रभावी जिव्हेने गेल्या दोन तपांत मराठी भाषेची, मराठी साहित्याची आणि मराठी इतिहासाची त्यांनी जी थोर सेवा केली आहे ती शेकडो ग्रंथलेखकांपेक्षा अधिक परिणामकारक आणि स्फूर्तिदायक ठरलेली आहे यात मुळीच शंका नाही.

दत्तोपंतांसारखी अद्‌भुत व्यक्तिमत्त्वाची माणसे यापुढे या महाराष्ट्रात पाहावयालासुद्धा मिळणार नाहीत. त्यांच्याशी माझी मैत्री आहे हे मी तर स्वतःचे भाग्य समजतो. आजच्या तरुण पिढीने त्यांची ओळख करून घ्यावी आणि त्यांच्यापासून वाङ्मयोपासनेचा नि समाजसेवेचा गुरुमंत्र घ्यावा असे मला वाटते. काय वाटेल त्या अडचणी आणि दुःखे असली तरी त्यांना न भिता आपले कार्य निरलसपणे सतत करीत राहावयाचे हे दत्तोपंतांच्या जीविताचे सार आहे.

एकदा पावसाळ्याच्या दिवसात ते माझ्याकडे खंडाळ्याला आले. गाडी तेथे

एकच मिनिट उभी राहते. दत्तोपंतांचा डबा प्लॅटफॉर्मपासून पुष्कळच पुढे राहिला. त्यामुळे घाईघाईने उतरताना पाय घसरून ते उंचावरून खाली पडले आणि पाय मुरगळला व पाठीला मार बसला. ह्या दुखण्यामुळे पुढे दत्तोपंत दोन महिने अंथरुणावर खिळून पडले होते, इतकी गंभीर स्वरूपाची इजा त्यांना झाली होती. पण स्टेशनावरून तसेच ते लंगडत माझ्या बंगल्यापर्यंत चालत आले. डब्यातून पडल्याचे त्यांनी मला सांगितले. पण त्यांना किती लागले त्याची मला कल्पना आली नाही. मी त्यांना तसेच आणखी वर डोंगरावर फिरावयाला घेऊन गेलो. चांगला एक तास ते लंगडत लंगडत माझ्याबरोबर चढउतारावरून गप्पा मारीत फिरले. त्यांच्या पायातून असह्य कळा निघत होत्या. पण त्यांनी हूं का चूं सुद्धा केले नाही. खाली बंगल्यात आम्ही आलो आणि ते पलंगावर पडले. मग मात्र त्यांना उठून नुसते उभे राहणेदेखील अशक्य झाले. त्यांच्या दुखापतीची मला जेव्हा कल्पना आली तेव्हा मी हळहळून म्हणालो, "पण दत्तोपंत, मला तुम्ही आल्यावर सांगितले का नाहीत? मग आपण डोंगरावर फिरलो नसतो." दत्तोपंत म्हणाले, "मी पहिल्या प्रथमच आलो; मला तुमची सगळी जागा पाहावयाची होती, आणि माझ्या दुखण्याचे लक्षण मला ठाऊक होते. एकदा मी खाली बसलो असतो की कोलमडलो असतो. मग पुन्हा काही उभा राहू शकलो नसतो!" दत्तोपंतांच्या जीवनाचे हेच रहस्य आहे की खाली म्हणून कधी बसावयाचे नाही. सतत एकसारखे पायावर उभे राहायचे. मग आपले स्वतःचे दुःख काहीही असो. कारण जो एकदा खाली बसला, तो कायमचा कोलमडला! दत्तोपंतांच्या जीवनाचा हा मौल्यवान संदेश आजच्या तरुण पिढीने सतत आपल्या डोळ्यांसमोर ठेवण्यासारखा नाही काय?

नवयुग : २२-१०-१९५०

# १२

## मराठी भाषेचे भीष्माचार्य

महामहोपाध्याय प्रा. दत्तो वामन पोतदार ह्यांच्या वयाला आज रोजी पंचाहत्तरावे वर्ष लागत आहे. ह्याबद्दल दैनिक ' मराठ्या 'च्या हजारो वाचकांच्या वतीने आम्ही त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करीत आहोत. गेल्या पन्नास वर्षांत दत्तोपंतांनी मराठी भाषेची, साहित्याची, इतिहासाची, संशोधनाची आणि शिक्षणाची जी महान सेवा केलेली आहे, तिच्यामुळे त्यांचे एकाच शब्दाने वर्णन करावयाचे झाल्यास, त्यांना ' महाराष्ट्रपुरुष ' ह्याच एका नावाने संबोधावे लागेल. महाराष्ट्रात जे जे म्हणून काही श्रेष्ठ आहे, उज्ज्वल आहे, अविस्मरणीय आहे, आणि अभिमान बाळगण्यासारखे आहे, त्याचे ज्वलन्त आणि जिवंत प्रतीक म्हणजे दत्तोपंत हे होत. त्यामुळे ज्याला महाराष्ट्राचे दर्शन घ्यावयाचे असेल, त्याला ते दत्तोपंतांच्या व्यक्तिमत्त्वामधे एकत्र आणि सामग्र्याने घेता येण्यासारखे आहे. दत्तोपंत म्हणजे महाराष्ट्राचा चालताबोलता इतिहास आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात अशी कोणतीही थोर विभूती होऊन गेली नसेल, किंवा अशी कोणतीही ऊर्जस्वल घटना घडलेली नसेल की जिची सांगोपांग माहिती दत्तोपंतांच्या जिव्हाग्री नाचत नसेल. दत्तोपंत म्हणजे ज्ञानाचा, माहितीचा, चळवळीचा आणि उत्साहाचा प्रचंड धबधबा होय. ह्या धबधब्याच्या विविध स्रोतांखाली सारा महाराष्ट्र गेली कित्येक वर्षे एकसारखा सहर्ष न्हातो आहे.

दत्तोपंतांच्या जीवनाला इतके विविध पैलू आहेत की, त्यांचे यथार्थ वर्णन

करावयाचे झाल्यास एक मोठा ग्रंथच होईल. त्यांचे सारे जीवन धगधगीत ध्येय-वादावर आणि पराकाष्ठेच्या त्यागावर आधारलेले आहे. समर्थ रामदासांच्या जीवनाच्या नि वचनांच्या संस्कारांनी त्यांच्या बुद्धीचा आणि मनोवृत्तीचा पिंड घडलेला आहे. रामदासी पंथाची भगवी गणवस्त्रे त्यांनी अंगावर धारण केलेली नसली, आणि राजकारणाचा प्रपंच जरी त्यांनी प्रत्यक्ष केलेला नसला, तरी रामदासी पंथाचा अखंड लोकजागृतीचा आणि अहर्निश देशसंचाराचा बाणा त्यांनी आपल्या आयुष्यात अक्षरशः अंगिकारलेला आहे. मराठा तितुका मेळविण्यासाठी आणि महाराष्ट्रधर्म वाढवण्यासाठी आपल्या उभ्या आयुष्यात त्यांनी एका क्षणाचाही कधी तकवा केलेला नाही. आपणांसी जे जे ठावे आहे, ते ते इतरांसी शिकवून सकळ जनांना शहाणे करण्यात त्यांनी आपले आयुष्य वेचलेले आहे. समर्थांनी सांगितल्याप्रमाणे दत्तोपंतांनी आपल्या जीवनात जे जे उत्कट आणि भव्य आहे, तेच तेवढे घेतलेले आहे; आणि 'मिळमिळीत' आहे ते अगदी कटाक्षाने टाळलेले आहे. समर्थांप्रमाणे दत्तोपंतांचे वैराग्य आणि ब्रह्मचर्य अगदी कडकडीत आहे. ऐहिक ऐश्वर्याची, धनदौलतीची किंवा नाव-लौकिकाची कधीही त्यांनी पर्वा केली नाही. कित्येक गांधीवादी 'ब्रह्मचारी' आपल्या ब्रह्मचर्याचे जसे स्तोम माजवतात आणि त्या स्तोमाच्या ऐसपैस पांघरुणाखाली अनंत ब्रह्मघोटाळे करतात, त्यांनी खरोखरच दत्तोपंतांच्या पायाचे तीर्थ घ्यावे, म्हणजे ब्रह्मचर्य काय असते ह्याची अक्कल त्यांना येईल; ब्रह्मचर्य आणि ब्रह्मचारी ह्या गोष्टी आजकाल हास्याच्या आणि थट्टेच्या होऊन बसलेल्या आहेत. दत्तोपंतांनी आपल्या ब्रह्मचर्याचा जसा कधी बभ्रा केला नाही, तसा त्याचा कधी टेंभाही मिरवला नाही.

महाराष्ट्राचा संसार उभा करण्याची त्यांनी ऐन तारुण्यात प्रतिज्ञा केली असल्यामुळे, त्यांना स्वतःचा संसार साजरा करण्याची कधी इच्छाही झाली नाही आणि तशी त्यांना कधी सवडही मिळाली नाही. एवढीच त्यांच्या ब्रह्मचर्याची भूमिका! काही गांधीवादी ब्रह्मचाऱ्यांच्या बाबतीत काही ना काही तरी अफवा आपल्या कानावर आल्यावाचून राहात नाहीत. दत्तोपंतांचे खाजगी आणि सार्वजनिक जीवन इतके निर्मळ आणि पारदर्शक आहे, की त्यामध्ये कसलीही अशुद्धता दोषदृष्टीच्या टीकाकारांनासुद्धा लवमात्र आढळणार नाही. इतके त्यांचे चारित्र्य स्वच्छ आणि निरपवाद आहे. त्यांचे चालणे, वागणे आणि राहणे इतके शुचिर्भूत आहे, की त्यांच्या सन्निध्यात आलेल्या माणसाला

आपल्या ओवळेपणाची जाणीव झाल्याखेरीज राहात नाही. दिवस थंडीचे असोत किंवा पावसाचे असोत, ते घरी असोत, दारी असोत वा परदेशी असोत, सकाळीं उठून स्वच्छ आंघोळ करून त्यांनी अंगाला भस्मविलेपन केले नाही किंवा कपाळाला नि मस्तकाला चंदनाचे गंध चर्चिले नाही असा आतापर्यंत त्यांच्या आयुष्यात एक दिवसही कधी गेला नसेल. त्यामुळे कधीही त्यांच्याकडे गेले तरी ते ताजेतवाने आणि तरतरीत दिसतात. चेहरा मलिन झालेला आहे किंवा अंग मरगळलेले आहे, अशा स्वरूपात तुम्हांला ते एक दिवसही कधी दिसणार नाहीत. सदैव हसतमुख आणि प्रसन्न. उत्साह तर त्यांच्या देहाच्या कणाकणातून नाचतो आहे. पंचाहत्तरावे वर्ष त्यांना लागलेले आहे, पण त्यांच्या अंगातली चालण्या–बोलण्याची चपलता आणि त्यांच्या कामाचा एकंदर झपाटा पाहिला म्हणजे विशी-पंचविशीच्या तरुणांनी लाजावे. त्यांच्या कमरेला अजून बाक नाही किंवा पाठीला पोक नाही. आपले तेज आणि तारुण्य इतक्या वयापर्यंत त्यांनी जे शाबूत ठेवलेले आहे, ते त्यांच्या नैष्ठिक ब्रह्मचर्याचे फळ आहे हे उघड आहे. इतर ब्रह्मचाऱ्यांचा ह्या वयात अगदी गळाठा झालेला आढळून येतो.

त्यांच्या ध्येयवादाप्रमाणे त्यांचा राष्ट्रवादही बावनकशी आहे. त्यांच्या राष्ट्रवादाचा उगम लोकमान्यांबद्दल त्यांना वाटत असलेल्या आदरातून अन् मराठ्यांच्या इतिहासाच्या दीर्घकालीन व्यासंगातून झालेला आहे. इतिहासाच्या अभ्यासाची आणि संशोधनाची प्रेरणा त्यांना इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्याकडून मिळालेली आहे. त्याच प्रेरणेमधून पुण्याचे भारत इतिहास संशोधक मंडळ स्थापन झाले. ह्या भारत इतिहास संशोधक मंडळासाठी त्यांनी आपल्या हाडांची काडे आणि रक्ताचे पाणी केले आहे. अखिल भारतात केवळ इतिहास-संशोधनाला सर्वस्वी वाहून घेतलेली अशी दुसरी संस्था नाही! ह्या मंडळाच्या मार्फत गेली चाळीस-पन्नास वर्षे मराठ्यांच्या इतिहासाचे जे प्रचंड संशोधन झाले आणि त्या संशोधनाला अखिल भारतात जी मान्यता मिळाली, त्यात दत्तोपंतांचा फार मोठा भाग आहे. त्यामुळे श्रेष्ठ दर्जाचे इतिहासज्ञ म्हणून त्यांना भारतात फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

समर्थ रामदास, लोकमान्य टिळक आणि इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्याप्रमाणे दत्तोपंतांच्या जीवनावर प्रभावी संस्कार करणारी चौथी विभूती म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर ही होय. शास्त्रीबुवांचे स्मारक म्हणून जी ‘ शिक्षण

प्रसारक मंडळी' पुण्यात स्थापन करण्यात आली, तिचे ते आजन्म सदस्य झाले, आणि त्यांनी आपली उभी हयात शिक्षणकार्यात घालविली. नूतन मराठी विद्यालय याच्या दोन्ही शाखांचे ते जसे प्राचार्य होते तसे सर परशुरामभाऊ कॉलेजमधे अनेक वर्षे ते मराठी भाषेचे प्राध्यापक होते. मराठी भाषेचा कडवा अभिमान त्यांना शास्त्रीबुवांपासून मिळाला. 'महाराष्ट्र साहित्य परिषद' आणि 'मराठी साहित्य संमेलन' ह्यांच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी आपले आयुष्य चंदनासारखे झिजवले. साहित्य परिषदेमार्फत महाराष्ट्रात आतापर्यंत जी जी साहित्य संमेलने भरली, त्यांपैकी प्रत्येक संमेलनाला हजर राहून त्यांनी त्याबाबतीत उच्चांकच मोडलेला आहे. प्रत्येक साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर त्यांची तळपणारी उत्साहमूर्ती हे त्या संमेलनाचे भूषणच समजले जाते. तीस वर्षांपूर्वी नगरच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देऊन महाराष्ट्राने त्यांच्या थोर साहित्यसेवेचा गौरव केलेला आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या राजकीय आंदोलनात जरी त्यांनी प्रत्यक्ष असा भाग घेतलेला नसला, तरी भाषिक महाराष्ट्र निर्माण व्हावा ह्या दृष्टीने अनेक लेख लिहून आणि व्याख्याने देऊन त्यांनी महाराष्ट्रातले लोकमत जागृत केले ह्यात मुळीच शंका नाही. आज जो 'पुणे युनिव्हर्सिटी'चा प्रचंड वटवृक्ष पुण्यात उभा राहिलेला आपल्याला दिसतो आहे, त्याचे बीजारोपण अडतीस वर्षांपूर्वी 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी असोसिएशन' स्थापन करून दत्तोपंतांनी केलेले आहे. त्यामुळे 'पुणे युनिव्हर्सिटी'च्या कुलगुरुपदावर गेल्या तीन वर्षांसाठी त्यांची जी नियुक्ती झाली होती, तो त्यांचा यथायोग्य सन्मानच होता. सारांश, गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रामधे ज्या ज्या साहित्यिक, शैक्षणिक आणि इतिहास-संशोधनविषयक चळवळी झाल्या, त्यांमधे दत्तोपंतांचा फार मोठा भाग आहे. म्हणूनच प्रारंभी आम्ही म्हटल्याप्रमाणे 'महाराष्ट्र-पुरुष' ह्या पदवीला ते यथार्थ शोभतात.

लेखणीमधे ते जितके बाके आहेत, तितकेच वक्तृत्वात फर्डे आहेत. तासचे तास द्रुत गतीने, अस्खलितपणे आणि प्रसन्न वृत्तीने वक्तृत्व करण्यात त्यांचा हात कोणी धरणार नाही. विषय कोणताही असो. रंगवून श्रोत्यांना तल्लीन करण्याची त्यांची हातोटी काही विलक्षण आहे. शब्दांचे वैपुल्य हे त्यांच्या भाषणशैलीचे वैशिष्ट्य आहे. सर्वसामान्यपणे आभाराची भाषणे ही अत्यंत मामुली आणि ठराविक स्वरूपाची होतात. पण दत्तोपंतांची आभाराची भाषणे ही काही एक वेगळीच मौज आहे. सभेतील मुख्य वक्त्यांच्या भाषणापेक्षा

दत्तोपंतांच्या आभारांची भाषणेच जास्त परिणामकारक आणि आनंददायक होतात. अवघ्या दहा-पंधरा मिनिटांच्या आत हशा नि टाळ्यांचा ते धुमधडाका उडवून देतात. खाजगी संभाषणात म्हणा किंवा जाहीर भाषणात म्हणा, कंटाळवाणे असे एक अक्षरदेखील दत्तोपंतांच्या तोंडून कधी निघणार नाही. त्यांचे मराठी वक्तृत्व जितके अस्खलित आणि ठसकेबाज, तितकेच त्यांचे इंग्रजी, हिंदी (वा उर्दू) आणि संस्कृत वक्तृत्वही भरधाव! भाषाप्रभुत्वाचे आणि भाषाप्रावीण्याचे जणू काही त्यांना उपजत देणेच मिळालेले आहे. त्यांनी ग्रंथलेखन जरी त्या मानाने कमी केलेले असले, तरी हजारो भाषणांनी आणि स्फुट लेखनांनी मराठी भाषेचा झेंडा त्यांनी साऱ्या महाराष्ट्रात वर्षानुवर्षे फडकत ठेवलेला आहे.

दत्तोपंतांचा लोकसंग्रह फार मोठा. त्यांचा स्वभाव अत्यंत प्रेमळ आणि मनमोकळा. कोणाची भीडभीड धरणार नाहीत. पण मनाला वाटते, ते निर्भीडपणे बोलणार आणि एवढे असून कोणाला निष्कारण दुखवणार नाहीत की तोडणार नाहीत. म्हणून लहानापासून थोरापर्यंत सर्वांना ते हवेहवेसे वाटतात. समोर कामाचे डोंगर पडले आहेत. भोवताली पुस्तकांचा नि कागदपत्रांचा पसारा पडलेला आहे. माणसांची ये-जा एकसारखी चालूच आहे. निरनिराळ्या विषयांवर दत्तोपंतांच्या गप्पा ऐन रंगात आलेल्या आहेत. त्यामधे श्रोत्यांना बोलायला फारसा वेळ मिळत नाही. दत्तोपंतांच्या मित्रमंडळींना परिचित असलेले त्यांचे हे स्फूर्तिदायक दर्शन कोणालाही मंत्रमुग्ध करून टाकील असेच आहे. मराठी भाषेच्या ह्या भीष्माचार्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवशी आम्ही त्यांचे सहर्ष अभिनंदन करतो आणि परमेश्वराने त्यांना दीर्घायुष्य द्यावे नि त्यांच्या हातून 'शिवचरित्रा'चे काम पूर्ण करून घ्यावे अशी त्याच्या चरणी प्रार्थना करतो.

मराठा : ६-८-१९६४

# १३

## रोमचे डॉ. सुखात्मे

रोममध्ये 'यूनो'ची जी अन्न-शेती-संघटना (FAO) आहे, त्याच्या आकडे-विभागाचे डायरेक्टर डॉ. पांडुरंग वासुदेव सुखात्मे हे एक महाराष्ट्रीय गृहस्थ असून ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे एक महान आकडेशास्त्रज्ञ आहेत हे महाराष्ट्रातल्या किती लोकांना माहीत असेल? त्यांचे चरित्र म्हणजे एक अद्‌भुतरम्य कादंबरी आहे. परवा रोमला चार दिवस आम्ही त्यांचे पाहुणे होतो. त्यांनी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. इन्दूताई ह्यांनी आमचे जे आदरातिथ्य केले, तसे परदेशात आजपर्यंत कधीच कोणी आमचे केले नाही. डॉ. सुखात्मे ह्यांची आमची पुष्कळ वर्षांपासून ओळख आहे. आम्ही दोघेही पुण्याच्या भावे स्कूलचे विद्यार्थी. १९३२ साली ते बी. एससी. पहिल्या वर्गात पास झाल्यानंतर जेव्हा विलायतेला गेले, तेव्हा भावे स्कुलात त्यांना निरोप देण्याचा जो समारंभ झाला, तो आमच्या अध्यक्षतेखाली झाला. ती त्यांची नि माझी पहिली ओळख.

डॉ. सुखात्मे हे सातारा जिल्ह्यामधील खटाव तालुक्यातल्या बुध-पाचेगावचे राहणारे. १९१८ साली त्या गावातले आपले वडिलार्जित घर आणि शेतीवाडी विकून त्यांचे वडील वासुदेवराव सुखात्मे आपले सर्व कुटुंब घेऊन कायमचे पुण्याला राहावयाला आले. त्या वेळीं त्यांचे दारिद्र्य म्हणजे अठरा विसवे होते. त्यांच्या मुलांना पुण्यातल्या शाळेमध्ये प्रवेशसुद्धा मिळेना. शेवटी त्यांना भावे स्कूलमध्ये जावे लागले. तेथे वाटेल त्या मुलांना केव्हाही प्रवेश

मिळत असे. भावे स्कूलमध्ये झांबरे नावाचे एक भयंकर शिक्षक होते. ( ते सासवडला पूर्वी आमचे शिक्षक होते. ) त्यांनी आठ वर्षांच्या पांडुरंगाला ( म्हणजे डॉ. सुखात्मे ह्यांना ) एक गणित घातले की, ‘ शहाण्णव-शहाण्णव किती ?’ बिचारा पांडुरंग काय उत्तर देणार ! तेव्हा झांबरे मास्तर त्या गणिताचे उत्तर स्वतःच ओरडले, “ शहाण्णव-शहाण्णव सोळा-ब्याण्णव ” म्हणजे ब्याण्णवशे सोळा ! पूर्वीच्या काळीं लोकांचे शंभरापर्यंतचे पाढे पाठ असत. पांडुरंगाला भावे स्कूलमध्ये प्रवेश मिळाला खरा, पण भविष्यकाळी आंतरराष्ट्रीय आकडेशास्त्रज्ञ होणारा हा पांडुरंग त्या वेळी गणितात नापास झाला, हे आज कोणाला खरे वाटणार नाही. घरी गेल्यावर वडिलांनी त्याला चांगलाच चोप दिला. तेवढ्यात इन्फ्लुएंझाची साथ आली. त्यामुळे ह्या कुटुंबाची जी दाणादाण झाली तिचे काय वर्णन करावे ? त्या वेळच्या त्या परिस्थितीची अत्यंत हृदयद्रावक कहाणी डॉ. पांडुरंग सुखात्मे ह्यांच्या मातोश्री श्रीमती सत्यभामाबाई सुखात्मे ह्यांनी ‘ गेले ते दिवस ’ ह्या आपल्या आत्म-चरित्रात लिहिलेली आहे. ह्या आत्मचरित्राला आम्ही प्रस्तावना लिहिलेली आहे. पांडुरंग आणि त्याचा वडील भाऊ अनंत हे शाळेत सदरा आणि चड्डी घालून जात. घरी सर्व मंडळी अर्धपोटी किंवा एक वेळ जेवत, आणि सगळ्यात आश्चर्याची गोष्ट ही की, पांडुरंग हा पुण्याच्या बुधवार चौकात ‘ ज्ञानप्रकाश ’ आणि ‘ सकाळ ’ ही पत्रे विकून रोजी काय मिळतील ते चार-दोन आणे मिळवीत असे. ही गोष्ट आपल्या रोमच्या चौथ्या मजल्यावरल्या सर्वांगसुंदर ‘ फ्लॅट ’मध्ये डॉ. सुखात्मे ह्यांनी जेव्हा आम्हांला सांगितली, तेव्हा आमच्या हृदयाला अक्षरशः पीळ पडला. पुण्याच्या बुधवार चौकात वर्तमानपत्रे विकणारा एक पोरगा आज आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शिखरावर महान शास्त्रज्ञ म्हणून आरूढ व्हावा हा दैवाचा काय विलक्षण योगायोग आहे हो !

मॅट्रिकच्या परीक्षेत पांडुरंग सुखात्मे हा पुण्यात पहिला आला. तथापि, कॉलेजात जावयाला नि पुस्तके घ्यावयाला त्याच्याजवळ पैसे नव्हते. ती मदत त्याला बॅ. खाजगीवाले ह्यांनी केली. एवढेच नव्हे तर बॅ. खाजगीवाल्यांनी पांडुरंगाला कुस्ती आणि वेताचा मलखांब शिकवला. १९३२ साली पांडुरंग हा गणित घेऊन फर्स्ट क्लासमधे बी. एससी परीक्षा पास झाला. त्याच वर्षी तो आय. सी. एस. होण्यासाठी मित्रमंडळींचे कर्ज काढून विलायतेला गेला. तथापि प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे त्याला आय. सी. एस. ला बसणे अशक्य झाले.

१९३६ साली आकडेशास्त्रात पीएच. डी. ची श्रेष्ठ पदवी मिळवून पांडुरंग परत आला. यापुढे आपण त्याला डॉ. सुखात्मे म्हणून संबोधू या.

त्यानंतर त्यांना कानपूरच्या 'इंपीरियल इन्स्टिट्यूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी'-मधे नोकरी मिळाली. पुढे त्यांची कलकत्याच्या 'ऑल-इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ हायजीन ॲण्ड पब्लिक हेल्थ' या संस्थेमधे असिस्टंट प्रोफेसरच्या जागेवर नेमणूक झाली. तेथेच १९३९ साली त्यांना लंडन युनिव्हर्सिटीची सर्वोच्च डी. एससी. ही पदवी मिळाली. लंडनची पीएच. डी. आणि डी. एससी. ह्या लागोपाठ दोन 'डॉक्टरेट्स्' मिळविणारे विद्वान जगात फारच थोडे आहेत. डी. एससी. ही पदवी त्यांनी ज्या संख्याशास्त्रामधील अत्युच्च संशोधनावर मिळवली, तो 'Bi-Partitional Functions' हा निबंध लंडनच्या 'रॉयल सोसायटी'ने प्रसिद्ध केला. हा डॉ. सुखात्मे ह्यांचा महान सन्मान होय. पुढे त्यांची नेमणूक दिल्लीच्या 'इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिचर्स' ह्या संस्थेच्या आकडेशास्त्रीय सल्लागार या थोर पदावर झाली. त्यानंतर स्वातंत्र्य आले. सगळेच वातावरण बदलले. पंडित नेहरूंशी हांजी हांजी करणाऱ्या प्रो. महालनवीससारख्या लोकांची 'स्टॅटिस्टिकल ॲडव्हायसर टु द गव्हर्मेंट ऑफ इंडिया' या जागेवर वर्णी लागली आणि त्यांच्या हाताखाली काम करण्याची नामुष्की डॉ. सुखात्मे ह्यांच्यावर येऊन कोसळली. पण डॉ. सुखात्म्यांनी नेहरूंना साफ सांगितले की, "प्रा. महालनवीस हे हुषार असतील पण आकडे-शास्त्रातले त्यांना काहीही समजत नाही. म्हणून त्यांच्या हाताखाली दुय्यम आकडे-शास्त्रज्ञ म्हणून काम करण्याची माझी इच्छा नाही." हा वाद खूपच विकोपाला गेला. डॉ. सुखात्मे हे सरकारी नोकरीचा राजीनामा द्यावयाला तयार झाले. पण अखेर ह्या वादामधून तडजोडीचा मार्ग निघून संयुक्त राष्ट्रसंघटनेत (UNO) आकडे-शास्त्रीय सल्लागार म्हणून पाच वर्षांसाठी त्यांची नेमणूक झाली. त्या वेळी 'केसरी' मधे त्यांच्याविषयी पुढील गौरवपर मजकूर प्रसिद्ध झाला होता.

"लोकमान्यांचे असामान्यत्व हे अर्थातच महाराष्ट्राचे वरदानच नव्हे तर काय ? पण महाराष्ट्राच्या कुशीतून अशी कितीतरी नररत्ने निघालेली आहेत, ही तर त्याहीपेक्षा अभिमानाची गोष्ट आहे. गेल्या आठवड्यात येथून 'यूनो'ला निघालेले डॉ. सुखात्मे हेही आपल्या क्षेत्रातील एक लोकोत्तर पुरुष आहेत. संख्याशास्त्रामधे त्यांचे स्थान भारतात तरी 'एकमेवाद्वितीयम्' असेच आहे. शास्त्रज्ञांमधे सर सी. व्ही. रमण किंवा डॉ. भाभा ह्यांचे जे स्थान आहे,


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

तेच संख्याशास्त्रज्ञामधे डॉ. सुखात्मे ह्यांचे आहे. पण दुर्दैवाने आपल्या देशात गुणी माणसांची जितकी वूज राखावयास पाहिजे, तितकी राखली जात नाही. म्हणूनच ज्या ज्ञानाचा आजच्या आणीबाणीच्या काळीं भारताला उपयोग व्हावयाला पाहिजे होता, ते ज्ञान परदेशाच्या अधिक उपयोगी पडत आहे. डा. सुखात्मे हे भारत सरकारचे एक सल्लागार म्हणून काम पाहात असता आता संयुक्त राष्ट्रसंघटनेने पाच वर्षांसाठी त्यांची आकडेशास्त्रीय सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे. डॉ. सुखात्मे ह्यांचा हा व्यक्तिशः बहुमानच होय आणि जगात भारताचे नाव उजळ करण्याच्या दृष्टीनेही या नेमणुकीचा उपयोग होईल. पण त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा भारताला प्रत्यक्षपणे उपयोग होऊ शकणार नाही. हा भारताचा विलक्षण तोटाच नव्हे काय? त्यांना निरोप देण्यासाठी झालेल्या एका समारंभात अन्नमंत्री श्री. कन्हैयालाल मुन्शी म्हणाले की, " डॉ. सुखात्मे ह्यांची उणीव भरून निघणे कठीण आहे ! "

रोमला गेल्यानंतर डॉ. सुखात्मे ह्यांची काही महिन्यांकरिता अमेरिकेमधील ' आयोवा स्टेट युनिव्हर्सिटी 'मधे प्राध्यापकपदावर नेमणूक झाली. तेथे त्यांचा पहिला महत्त्वाचा ' Sampling Theory of Surveys ' हा पाचशे पानांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. आतापर्यंत त्याच्या तीन आवृत्त्या निघालेल्या असून त्याची स्पॅनिश आणि पोर्तुगीज भाषांत भाषांतरे झालेली आहेत. १९५२ साली ते पुन्हा रोमला गेले. तेथे गेली बारा वर्षे ते FAO ( अन्न-शेतकी-संघटनेचे ) आकडे-शास्त्रीय सल्लागार म्हणून काम करीत आहेत. त्यांचे दुसरे पुस्तक ' Statistical Methods for Agricultural Workers ' हे तीनशे पानांचे असून त्याच्याही तीन आवृत्त्या निघाल्या आहेत. ही पुस्तके आज अमेरिकन विश्व-विद्यालयात पाठ्यपुस्तके म्हणून नेमलेली आहेत. १९६१ च्या मे महिन्यात त्यांच्या ' The World's Hunger and Future Needs in Food Supplies ' या स्वतंत्र संशोधनात्मक निबंधाबद्दल त्यांना ग्रेट ब्रिटनच्या रॉयल सोसायटीकडून सर्वोच्च सन्माननिदर्शक असे ' गाय ( Guy ) मेडल ' मिळालेले आहे. जगात ' गाय मेडल ' मिळविणारे लॉर्ड स्टॅम्प, सर नेपिअर शॉ, सर आर्थर बाऊले आणि सर रोनाल्ड फिशर असे बोटावर मोजण्याइतके थोडेच शास्त्रज्ञ आहेत, आणि भारतात तर ' गाय मेडल ' मिळविणारे डॉ. सुखात्मे हे ' एकमेवाद्वितीय ' असेच शास्त्रज्ञ आहेत.

ह्या त्यांच्या संशोधनात्मक निबंधाचा थोडक्यात निष्कर्ष असा, की जगातील

लोकांचे समाधानकारक अन्नपोषण होण्यासाठी सध्या जगात जे अन्नोत्पादन होत आहे, त्याच्या दुप्पट १९८० साल अखेर आणि ह्या शतकाच्या अखेर ते तिप्पट व्हावयाला पाहिजे. हा निष्कर्ष जगातल्या मोठमोठ्या शास्त्रज्ञांनी मान्य केलेला आहे. त्यांचे 'Six Billions to Feed' हे ताजे पुस्तक 'यूनो'ने प्रसिद्ध केले असून, त्याची जगातल्या प्रमुख भाषांमधे भाषांतरे झालेली आहेत. 'अन्न आणि पोषण' ह्या विषयावर त्यांच्याएवढा अधिकारी तज्ज्ञ आज जगात दुसरा नाही. नेहरूंचे लाडके जे प्रा. महालनवीस यांनी 'रॉयल सोसायटी'कडे एक असाच निबंध पाठविला होता. पण त्यावर संस्थेच्या तज्ज्ञांनी 'प्रसिद्धीस अयोग्य' असा शेरा मारला. तथापि ते 'एक भारतीय' आहेत एवढ्यासाठी त्यांच्यावर मेहेरबानी करून त्यांना 'एफ. आर. एस.' ही पदवी देण्यात आली. ह्यासंबंधीचे मूळचे कागद आम्ही स्वतः डोळ्यांनी पाहिले आहेत.

वस्तुतः, डॉ. सुखात्मे ह्यांची योग्यता आज अशी आहे, की त्यांना आपल्या सरकारने भारतात बोलावून ह्या देशाच्या अन्नाचा अवघड प्रश्न सोडविण्याचे काम सर्वस्वी त्यांच्या हाती सोपवायला पाहिजे. आजचे भारताचे अन्नमंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांची डॉ. सुखात्मे ह्यांच्या जोड्यापाशीदेखील बसण्याची लायकी नाही. पण खऱ्या गुणी आणि लायक माणसांना या देशात मुळी स्थानच नाही हेच खरे! असो. रोममधे आम्ही डॉ. आणि सौ. सुखात्मे ह्यांच्या सहवासात जे तीन-चार दिवस घालविले, त्याच्या सुखद आठवणी आम्ही कदापि विसरणे शक्य नाही. आंतरराष्ट्रीय कीर्तीचा हा एवढा मोठा विद्वान माणूस—पण स्वभावाने इतका साधाभोळा, प्रांजळ आणि विनम्र आहे की काही विचारू नका. महाराष्ट्राचा हा सुपुत्र आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या शिखरावर आरूढ झालेला पाहून आम्हांला जी धन्यता आणि जे समाधान वाटले, त्याचे वर्णन शब्दांनी कसे करता येणार!

मराठा : ६-८-१९६४

# १४

## देवाची मुले

दीड महिन्यापूर्वी आम्ही दक्षिण हैदराबादच्या साहित्य संमेलनाला गेलो असताना तेथे आम्हांला श्री. व्ही. के. ढगे ( भूतपूर्व एम्. पी. ) हे भेटले. त्यांची नि आमची पूर्वीची थोडीशी ओळख होती, नाही असे नाही. पण ते हैदराबादला राहतात किंवा काय, आणि तेथे राहात असले तरी त्या ठिकाणी ते काय काम करतात, ह्याची आम्हांला सुतराम माहिती नव्हती. पण हैदराबादेला गेल्यानंतर महाराष्ट्रातल्या ह्या विलक्षण माणसाची इत्थंभूत माहिती आम्हांला समजली.

एका अत्यंत दरिद्री आणि सनातनी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. जन्मापासूनच ते अत्यंत बंडखोर होते. त्यांच्या वडिलांचा स्वभाव अत्यंत कोपिष्ट होता. पण त्यांच्या रागालोभाची यत्किंचितही पर्वा न करता ढगे हे मुंबईला आले, आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विद्याभ्यास पूर्ण करून त्यांनी तेथे वकिलीचा व्यवसाय सुरू केला. त्याच काळात त्यांनी श्रीमती टेहमीनाबाई नावाच्या एका पारशी बाईशी लग्नाचा करार करून, तिच्याशी विवाह केला. भारतात त्यापूर्वी अशा तऱ्हेचा विवाह कोणीही केलेला नव्हता. प्रचलित विवाहाच्या कायद्याला नि पद्धतीला एक प्रकारचे ते उघड उघड आव्हानच होते. पुढे लोकसभेत जेव्हा ‘ स्पेशल मॅरेज बिल ’ ( विशेष-विवाह-विधेयक ) आले, तेव्हा ढगे-टेहमीना करार-विवाहाबद्दल खूपच चर्चा झाली, आणि त्या कायद्यात पति-पत्नीच्या संमतीने काडीमोड करण्याच्या कलमाचा जो समावेश

झाला त्याला कारण स्वतः ढगे हेच होते. हे कलम म्हणजे भारतासारख्या प्राचीन आणि सनातनी देशाने पाश्चात्त्य देशावर केलेली एक विलक्षण मातच होय !

अगदी लहानपणापासून सामाजिक अन्यायांबद्दल ढगे ह्यांना विलक्षण तिडिक वाटत असे. हैदराबादच्या मोहल्ल्यातील उकिरड्यांवर वारंवार टाकून दिलेली चिमुकली अर्भके पाहून ते अक्षरशः रडत असत. ते म्हणत, 'ह्या बिचाऱ्या अर्भकांनी काय हो पाप केले आहे ?' प्रेमाच्या आकर्षणामुळे एकत्र आलेल्या स्त्री–पुरुषांच्या संबंधातून निर्माण झालेली ही मुले वस्तुतः औपचारिक आणि बाजारू संबंधातून जन्माला आलेल्या मुलांपेक्षा केव्हाही श्रेष्ठच होत. जगाचा उद्धार करणारे मोठमोठे साधू आणि योगी अशाच विवाहबाह्य संबंधातून जन्माला आलेले आहेत, असा पुराणांचा नि इतिहासाचा स्पष्ट दाखला आहे. अशा परिस्थितीत पुरुष नामानिराळा राहतो, स्त्री समाजाच्या क्रोधाला बळी पडते आणि बिचाऱ्या अर्भकाला मरेपर्यंत लाजिरवाणे जीवन जगावे लागते. आईबापांनी टाकलेल्या नि समाजानें झिडकारून दिलेल्या अशा दुर्दैवी अर्भकांनाच इंग्रजीत 'Blossoms in the Dust' (धुळीतली फुले) असे म्हणतात. अशा मुलांचा सांभाळ करून त्यांना शिष्ट नि सभ्य समाजात प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी ६ जानेवारी १९५५ रोजी त्या वेळचे उपराष्ट्रपती डॉ. स. राधाकृष्णन् ह्यांच्या हस्ते हैदराबादमधे 'राधाकिशन होम' ची स्थापना केली.

जगाच्या आरंभापासून समाजात विवाहबाह्य संतती निर्माण होत आहे. अशा संबंधाचा नि संततीचा समाजाने नेहमीच धिक्कार आणि तिरस्कार केलेला आहे. त्याची कधीही गय केली नाही. पण ही जी विवाहबाह्य संतती निर्माण होते, ती स्त्री-पुरुषांमधे मानवतेच्या स्वसंरक्षणाची जी मूलभूत प्रवृत्ती असते, तिच्या अनिवार्य आकर्षणातून होत असते. प्राणिशास्त्राच्या ज्या अनियंत्रित प्रवृत्ती माणसात असतात, त्यांचा सामाजिक नीतिनियमांशी आणि रूढि-संकेतांशी नेहमीच विरोध असतो. पण त्याचा सारा भूर्दंड फक्त स्त्रीलाच भोगावा लागतो. शारीरिक दृष्ट्या आणि मानसिक दृष्ट्याही गर्भवती झालेल्या स्त्रीच्या त्या शारीरिक अवस्थेमधे कोणत्याही तऱ्हेचा अधिक्षेप करणे हा एक भयंकर गुन्हा समजला जातो, आणि तो गुन्हा करणाऱ्याला राजसत्ता जास्तीत जास्त शिक्षा देत असते. त्यामुळे समाजात 'अविवाहित गर्भवती'ची समस्या अत्यंत बिकट होऊन बसलेली आहे. अनिवार्य मोहाच्या प्रवाहात वाहवत गेलेली

एखादी तरुण कुमारिका गर्भवती झाली म्हणजे 'मला ह्या संकटातून वाचवा' असा ती आक्रोश करू लागते. पण तिला कोण वाचवणार? तिच्याजवळ जर भरपूर पैसा असेल तर तिला त्या संकटातून गुप्तपणे वाचवणारे डॉक्टर समाजात पुष्कळ भेटतात. आलतूफालतू डॉक्टर जर त्या भानगडीत पडले तर ती बाई तरी मरते, नाहीतर त्या डॉक्टराला तरी जबर शिक्षा होते. त्या चोरट्या गर्भारपणातून बाईची समजा हातीपामी नीट सुटका झाली, तर काय होते? समाजात दोन अनावश्यक अन् शोचनीय गोष्टी निर्माण होतात. एक 'अविवाहित माता' नि दुसरी 'बिनबापाचे मूल'. म्हणून पुष्कळशा अविवाहित माता स्वतःची बेअब्रू होऊ नये म्हणून भ्रूण-हत्या करतात. त्या गुन्ह्यात त्या सापडल्या तर तुरुंगात जातात आणि तुरुंगातून काही वर्षांनी बाहेर आल्या तर त्यांना वेश्याव्यवसाय करण्यावाचून दुसरा मार्ग उरत नाही.

सारांश, अविवाहित मातांचे संरक्षण करणे आणि नको असलेल्या मुलांचे संगोपन करणे हे एक महान सामाजिक कर्तव्य आहे. ते कार्य महात्मा फुल्यांनी प्रथम केले, आणि आज हैदराबादेत ते पवित्र कार्य श्री. व्ही. के. ढगे हे करीत आहेत. त्यांनी हैदराबादेत 'बालक साहाय्य समिती' (Children's Aid Society) काढलेली आहे. ह्या संस्थेच्या मार्फत 'वेजबाई बालनिवास', 'राधाकिशन बालिका भवन', 'राधाकिशन होम' आणि 'राधाकिशन बाल स्वास्थ्यालय' अशा चार संस्था काढल्या आहेत. त्या कामी त्यांनी स्वतःजवळच्या तीन-चार लाख रुपयांचा 'ट्रस्ट' स्थापन केला आहे. भारताच्या साऱ्या महान पुढाऱ्यांनी श्री. ढगे ह्यांच्या ह्या संस्थांना भेटी देऊन त्यांच्या कार्याचे मनसोक्त कौतुक केलेले आहे.

श्री. ढगे ह्यांच्या 'राधाकिशन होम'चे उद्घाटन करताना राष्ट्रपती राधाकृष्णन ह्यांनी महाभारतातील एका श्लोकाचा संदर्भ सांगितला. 'न त्वहम् कायमे राज्यम् न स्वर्गम्, न पुनर्भवम् कामये दुःखतप्तानाम् प्राणिनाम् आर्तिनाशनम्" (मला राज्य नको. स्वर्ग नको. पुनर्जन्म नको. मला दुःखितांच्या डोळ्यातले अश्रू पुसून टाकण्याची संधी पाहिजे!) त्यानंतर विवाहबाह्य जन्मलेल्या संततीबद्दल डॉ. राधाकृष्णन म्हणाले, "छांदोग्य उपनिषदात सत्यकाम आणि जाबाला यांची अशीच एक गोष्ट आहे. सत्यकाम हा बालक एका ऋषीकडे गेला आणि आपले उपनयन करा अशी त्याने त्या ऋषीला विनंती केली. ऋषीने त्याला विचारले, 'बाळा, तुझे गोत्र काय? तुझे आईबाप कोण?' तेव्हा सत्यकामाने

आपल्या आईला तोच प्रश्न विचारला. तेव्हा ती म्हणाली, 'ब्रह्हम् चरन्ति परिचारिणी यौवने त्वम् अलभे' (पुष्कळांच्या घरांत तरुणपणी मोलकरणीचे काम करीत असताना तू माझ्या उदरी जन्माला अलास.) तेव्हा तू कोणाचा मुलगा नि तुझे गोत्र काय हे मला कसे माहीत असणार? माझे नाव जाबाला नि तुझे नाव सत्यकाम एवढेच मला माहीत आहे.' तेव्हा सत्यकामाने ती हकीकत त्या ऋषीला सांगितली. तेव्हा ते ऋषी म्हणाले, 'गणिकागर्भसंभूतो वसिष्ठश्च महामुनिः। तपसा ब्राह्मणो जातः संस्काराः तत्र कारणम्।' (गणिकेच्या पोटी जन्माला आलेले वसिष्ठ महामुनी तपश्चर्येने आणि संस्काराने ब्राह्मण झाले.) सारांश, आईबापांचा ठावठिकाणा नसलेल्या मुलांनाही समाजात जास्तीत जास्त महत्पदाला चढण्याची पात्रता आहे आणि अधिकार आहे. तुम्ही आम्ही जे आईबापाच्या पोटी जन्माला आलेलो आहोत, ते केवळ नशिबाने. नाही तर आपणही ह्या 'नको असलेल्या मुलां'च्या सारखे असू शकलो असतो. जगात कोण पापी आहे नि कोण पुण्यवान आहे हो? महाभारतात म्हटले आहे की, 'दृष्टम् किमपि लोकस्मिन् न निर्दोषो न निर्गुणः?' ह्या जगात एकतरी माणूस निर्दोष किंवा निर्गुण असलेला तुम्ही पाहिला आहे काय? कोणीही नाही. म्हणून आपण कोणालाही कमी लेखू नये नि कोणापुढेही आपला मोठेपणा मिरवू नये. तर 'आत्मौपम्येन सर्वत्रम्' म्हणजे 'सर्व माणसे जणू काही आपणच आहोत' अशा भावनेने आपण त्यांच्याशी वागावे. ह्या जगात माणसापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. 'गुह्यम् ब्रह्म तदिदम् भो ब्रवीमि न मानुषात् श्रेष्ठतरम् हि किंचित्' (देव अदृश्य आहे. तो गुप्त आहे. म्हणून मी सांगतो की, ह्या जगात मनुष्यापेक्षा काहीही किंवा कोणीही श्रेष्ठ नाही.)" श्री. ढगे ह्यांच्या 'राधाकिशन होम'चे उद्‌घाटन करताना मनुष्याच्या श्रेष्ठतेचे डॉ. राधाकृष्णन् ह्यांनी गायिलेले हे उपनिषद् अमर आहे.

श्री. व्ही. के. ढगे ह्यांनी आपल्या या 'राधाकिशन गृहा'मधल्या 'देवांच्या मुलां'चे दर्शन घडवून आम्हाला धन्य केले. 'देवांच्या मुलां'ना पाहून आम्ही कृतार्थ झालो. आमच्या 'उद्याच्या संसारा'त 'अविवाहित मातृत्वा'चा प्रश्न आम्ही समाजापुढे पंचवीस वर्षांपूर्वी मांडलेला आहे. त्या नाटकात आम्ही म्हटले आहे की, 'मातृत्व हे सदैव मंगल असते– ते कधीही पापी नसते.' आमच्या 'घराबाहेर' नाटकात, 'स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत कालाची माता असते.' म्हणून 'अविवाहित मातां'च्या प्रश्नाकडे समाजाने माणुसकीच्या

दृष्टीने पाहिले पाहिजे असा आमचा आग्रह आहे. कोणतीही माता—मग ती विवाहित असो वा अविवाहित असो—ती देवताच आहे नि बापाने टाकलेली नि आईला सोडावी लागलेली मुले ही 'देवाची 'च मुले आहेत, ह्यात काय संशय ? 'देवाच्या मुलां 'ना पित्याच्या वात्सल्याने सांभाळणाऱ्या हैदराबादच्या श्री. व्ही. के. ढग्यांच्या चरणी महाराष्ट्रातील असंख्य जनतेच्या वतीने 'दैनिक मराठ्या 'ची अनंत लोटांगणे असोत !

मराठा : ६-२-१९६६

# १५

# डॉ. जगदीशचंद्र जैन

आमचे परम मित्र, ' रुईया कॉलेजा 'तील हिंदी नि अर्धमागधीचे विद्वान प्राध्यापक नि हिंदी साहित्यातील नामवंत ग्रंथकार डॉ. जगदीशचंद्र जैन, एम. ए., पीएच. डी. ह्यांच्या वयाला आज रोजी साठ वर्षे पूर्ण होत आहेत, म्हणून त्यांचा सत्कार आज मुंबईत म. म. पद्मभूषण डॉ. दत्तो वामन पोतदार ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचे मित्र नि असंख्य शिष्य मोठ्या थाटामाटाने करीत आहेत. त्या समारंभात आम्ही तर अंशभागी आहोतच; पण ' दैनिक मराठा 'च्या वाचकांतर्फे आम्ही त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो आणि त्यांना दीर्घायुरारोग्य इच्छितो.

मुंबईत त्यांचे वास्तव्य ' शिवाजी पार्क 'समोर आणि आम्ही ज्या ठिकाणी पूर्वी राहात होतो त्याच रस्त्यावर अगदी तीन-चार मिनिटांच्या अंतरावर आहे. रोज सकाळीं समुद्रावर फिरावयाला जाताना आम्हा उभयतांची गाठ पडायची आणि मग फिरता फिरता साहित्य, राजकारण अन् तत्त्वज्ञान त्या विषयांवर आमची मनसोक्त चर्चा व्हावयाची; शिवतीर्थावर ' संयुक्त महाराष्ट्रा 'च्या लढ्याच्या वेळीं समितीच्या ज्या जाहीर सभा होत असत, त्या त्यांनी स्वतः ऐकलेल्या आहेत. ते जरी हिंदी भाषिक असले तरी मुंबईतल्या मराठी भाषिकांच्या जीवनाशी आणि राजकीय आकांक्षांशी ते संपूर्णतया समरस झालेले आहेत. ' दैनिक मराठा ' ते नियमितपणे रोजच्या रोज वाचतात आणि अनेक बाबतीत आम्हाला उत्तेजन देऊन आमचे मार्गदर्शनही करतात.

आमच्याबद्दल त्यांना फार प्रेम वाटते, आणि आम्हालाही त्यांच्याबद्दल कौतुक आणि आदर वाटतो. आमच्या 'लग्नाच्या बेडी'चे त्यांनी 'विवाह का बंधन' हे सुंदर हिंदी रूपांतर केलेले आहे. त्यांच्या काही साहित्याचा आम्ही 'मराठ्या'तून यापूर्वी आमच्या वाचकांना परिचय करून दिलेलाच आहे. त्यांचे काही लेखही 'मराठ्य'तून प्रसिद्ध झाले आहेत. असा आम्हा उभयतांचा परस्परांशी अनेक वर्षांपासून घनिष्ट संबंध आहे.

त्यांचा स्वभाव अत्यंत शांत, समतोल नि आशावादी असून परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी त्यांच्या वृत्तीचा धीमेपणा यत्किंचित्‌ही ढळत नाही. त्यांच्या शब्दकोशात नैराश्य हा शब्दही नसावा. मनुष्याच्या आयुष्यात नाना तऱ्हेचे कडूगोड अनुभव वारंवार येतात. त्यामुळे मनाची अतिशय चलबिचल होते. अशा वेळी त्यांच्या पाठीवर धीराचा हात ठेवून त्याला उत्तेजन देणारा सोबती जवळ असावा लागतो. डॉ. जैन ह्यांच्याशी ज्यांचा ज्यांचा प्रत्यक्ष संबंध आला आहे त्यांना त्यांना त्यांच्यापासून अशा तऱ्हेची सोबत लाभलेली आहे. आम्हांला स्वतःलाही त्यांच्या ह्या धीरगंभीर सोबतीचा कित्येकदा लाभ मिळालेला आहे. आमचा नि त्यांचा स्वभाव एकमेकांशी इतका जुळून गेला आहे, की त्यांचा नि आमचा परिचय नक्की कोणत्या कारणामुळे कुठे झाला नि त्याचे पर्यवसान एवढ्या मैत्रीत कसे झाले, ते आम्हाला आता आठवतही नाही. त्यांची मैत्री हे आमच्या जीवनातले एक गृहीत कृत्यच होऊन बसलेले आहे. म्हणून त्यांचे पूर्वचरित्र परवांपर्यंत आम्हांला माहीतही नव्हते, ते त्यांच्या ह्या साठीच्या समारंभानिमित्त आम्ही त्यांच्याकडून मुद्दाम विचारून घेतले.

उत्तर प्रदेशात मुझफरनगर येथे त्यांचे वडील एक गरीब दुकानदार होते. त्यांचे प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण जुन्या पद्धतीप्रमाणे गुरुकुलात नि संस्कृत पाठशाळेत झाले. नंतर काशीला ते शास्त्री पाठशाळेत गेले. तेथे साहित्य, धर्म नि न्याय यांचा अभ्यास त्यांनी केला. १९२६ साली प्रवेश-परीक्षा पास होऊन बनारस हिंदू युनिव्हर्सिटीत त्यांनी पहिल्या नि दुसऱ्या वर्षांच्या विज्ञान विभागात अभ्यास केला. पुढे संस्कृत नि तत्त्वज्ञान हे दोन विषय घेऊन ते बी. ए. झाले नि १९३२ साली ते तत्त्वज्ञान विषयाचे एम. ए. झाले. त्यानंतर ते गुरुदेव टागोरांच्या 'शांतिनिकेतन'मधे दाखल होऊन तेथेही एक वर्ष त्यांनी जैन तत्त्वज्ञानाचे संशोधन केले. शांतिनिकेतनमधे असताना महान चित्रकार नंदलाल

बोस आणि टागोरांच्या गूढवादाचे अभ्यासी क्षितिमोहन सेन ह्यांच्या सान्निध्यात ते आले आणि त्यांच्या व्हक्तिमत्त्वाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. शांतिनिकेतनमधे असताना साहजिकच बंगाली भाषेशी त्यांचा संबंध आला आणि तिजवर त्यांनी प्रभुत्व मिळविले. पुढे ते 'जैन-प्रकाश' नावाच्या एका गुजराती पत्राचे संपादक म्हणून मुंबईला आले. पण अवघ्या सहा महिन्यांनी त्यांनी ते पत्र सोडले नि मुंबईच्या सेंट मेरीज युरोपियन स्कूलमधे हिंदी भाषेचे शिक्षक म्हणून त्यांनी एक वर्षभर काम केल्यानंतर १९३८ साली 'रामनारायण रुइया कॉलेज'मधे संस्कृत नि अर्धमागधी या भाषांचे प्राध्यापक म्हणून त्यांची नेमणूक झाली. ह्याच काळात त्यांनी मुंबई विश्वविद्यालयाच्या 'स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'मधे अभ्यास करून अर्थशास्त्र नि समाजशास्त्र या विषयांत 'डॉक्टरेट' ( Ph. D. ) ही उच्चतम पदवी मिळविली.

अशा रीतीने मुंबईच्या शिक्षणाच्या क्षेत्रात डॉ. जैन हे बाह्यतः वावरत असले तरी त्यांचा अंतरात्मा देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यामधे गुंतलेला होता. म्हणून १९४२ मधे 'छोडो भारत'चे रणशिंग जेव्हा महात्माजींनी फुंकले, तेव्हा 'ऑगस्ट क्रांती'च्या भूमिगत लढ्यात त्यांनी उडी घेतली. त्यामुळे एक वर्षभर स्थानबद्ध करून त्यांना वरळीच्या तुरुंगात ब्रिटिश सरकारने ठेवले होते. त्याच काळात त्यांचा मार्क्सवादी स्थानबद्धांशी संबंध आल्यामुळे साहजिकच मार्क्सच्या तत्त्वज्ञानाकडे त्यांचे लक्ष वळले आणि नंतर त्यांनी तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. स्थानबद्धतेमधून सुटल्यानंतर परत ते रुईया कॉलेजमधील आपल्या प्राध्यापक पदावर रुजू झाले. १९४७ साली सदर कॉलेजमधे जेव्हा 'हिंदी विभाग' काढण्यात आला, तेव्हा त्या खात्याच्या प्रमुखपदावर त्यांची नेमणूक झाली. १९५२ साली ते चीनला गेले. तेथे अठरा महिने 'पेकिंग युनिव्हर्सिटी'त हिंदीचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. चीनच्या राज्यक्रांतीचा उगम कोणत्या कारणामुळे आणि कोणत्या परिस्थितीत झाला, ह्याचा अगदी जवळून अभ्यास करण्याची त्यांना अशा रीतीने संधी मिळाली. चिनी लोकांच्या सामाजिक जीवनाचाही त्यांनी ह्या काळात सूक्ष्म रीतीने अभ्यास केला. तेथून परत आल्यानंतर पुढे १९५९ साली ते बिहारमधे गेले. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर प्राकृत भाषा नि साहित्य ह्यांचा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या एका संस्थेमधे त्यांनी एक वर्षपर्यंत प्राध्यापन केले. १९६५ साली मुंबईहून जे दोन प्राध्यापकांचे शिष्टमंडळ 'सोविएट रशिया'त गेले, त्यामधे ते एक होते.

रशियातले काम संपल्यानंतर पूर्व जर्मनी आणि युगोस्लाव्हिया या दोन देशांतून प्रवास करून ते स्वदेशी परत आले.

त्यांची ग्रंथसंपदा जितकी विविध तितकीच विशाल आहे. त्यांनी अदमासे वीस हजार पृष्ठसंख्येचे पन्नास ग्रंथ लिहिले आहेत. प्राकृत भाषा नि साहित्य, प्राचीन भारताचा इतिहास, भारतीय समाजदर्शन, भारतीय तत्त्वचिंतन, पाश्चात्य समीक्षा दर्शन, वेदांत अशा विविध विषयांवर त्यांची ही ग्रंथरचना आहे. त्यांच्या 'प्राकृत साहित्य' ह्या ग्रंथाला उत्तर भारत शासनाने बक्षीस दिले आहे, आणि सोव्हिएट रशियामधून त्यांनी आपल्या मुलीला जी पत्रे लिहिली, त्यांच्या संग्रहाला 'सोव्हिएट देश'कडून त्यांना 'नेहरू प्रदान' (Award) मिळालेले आहे. गेली तीस वर्षे त्यांनीच लिहिलेली 'हिंदी क्रमिक पाठ्यपुस्तके' मुंबई नि महाराष्ट्र राज्यात या क्षणापर्यंत अभ्यासिली जात आहेत. सारांश, अनेक विषय अनेक पाठशाळांतून, महाविद्यालयांतून आणि विश्वविद्यालयातून शिकलेला आणि शिकवलेला, अनेक देशांमधून प्रवास नि वास्तव्य करून आलेला, स्वातंत्र्याच्या राजकारणात देहदंड भोगलेला, जैन तत्त्वज्ञानापासून तो मार्क्सच्या तत्त्वज्ञानापर्यंत अभ्यास केलेला, हजारो पानांची ग्रंथरचना केलेला त्यांच्यासारखा भाषापंडित, व्यासंगी संशोधक नि पुरोगामी विचारांचा समृद्ध विद्वान आज तरी आम्हाला भारतात दुसरा दिसत नाही!

एवढे सर्व सांगूनही डॉ. जैन ह्यांच्या विविध व्यक्तिमत्त्वाचे यथार्थ आकलन वाचकांना होणार नाही! त्यांच्या आयुष्यातले सर्वांत महत्त्वाचे नि खळबळकारक प्रकरण—की ज्यामुळे त्यांचे नाव केवळ साऱ्या भारतातच नव्हे तर साऱ्या जगात झाले—ते आता आम्ही शेवटी सांगतो. ऐका! महात्मा गांधींचा जो खून झाला, तो मुळींच झाला नसता. वाचक हो, तो कदापि झाला नसता—जर मुंबई राज्याचे त्या वेळचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर नि गृहमंत्री मोरारजी देसाई ह्यांनी डॉ. जैन यांचे ऐकले असते तर! त्या खून खटल्यातले एक महत्त्वाचे आरोपी श्री. मदनलाल पोहवा हे निर्वासित स्थितीत मुंबईला आले. डॉ. जैन ह्यांची पुस्तके विकून काही काळ ते आपली उपजीविका करीत होते. डॉ. जैन ह्यांना ते अगदी आपल्या पित्यासमान मानीत होते. म्हणून पुढे काही काळानंतर मदनलाल जेव्हा गांधी-खून-कटाच्या मंडळींत दाखल झाले, तेव्हा त्यांनी मुंबईला येऊन त्या कटाचा उद्देश अस्पष्टपणे प्रथम डॉ. जैन ह्यांच्या

कानावर घातला. डॉ. जैन हतबुद्ध झाले. त्यांनी त्या पातकी दुष्कृत्यापासून दूर राहण्याची त्याच्याकडून शपथ घेवविली. पण मदनलालने ते वचन पाळले नाही नि थोड्याच दिवसांनी दिल्लीला जाऊन महात्माजींवर 'हँडग्रेनेड' टाकला. तेव्हा पुढे काय होणार ह्याची डॉ. जैन ह्यांना पुरेपूर कल्पना आली. ते तसेच धावत धावत खेर–मोरारजींकडे गेले नि जीव तोडून त्यांनी ती सारी हकीगत त्या दोघांना सांगितली. पण–पण–नकोच ती आठवण–प्राण कंठात येतात. त्यांनी डॉ. जैन ह्यांचा अपमान करून त्यांना हकलून दिले नि पुढे दहा दिवसांनंतर महात्माजींचा खून झाला! गांधी-खून खटल्यात डॉ. जैन हे फिर्यादी पक्षाचे पहिल्या क्रमांकाचे साक्षीदार होते! इतक्या वर्षांनंतर आता 'गांधी-खून' प्रकरणी जी 'पाठक' अन् 'कपूर' ही दोन कमिशने नेमण्यात आली आहेत, त्यांच्यापुढेही साक्ष देण्यास डॉ. जैन ह्यांना बोलावण्यात आलेले आहे. तथापि, आता ह्या शिळ्या कढीला कितीही कोणी ऊत आणला, तरी त्यातून काय निष्पन्न होणार आहे? त्या वेळच्या मुंबई सरकारने डॉ. जैन ह्यांचे म्हणणे ऐकले असते तर महात्माजींचा खून कदापि होऊ शकला नसता! हे सर्व प्रकरण डॉ. जैन ह्यांनी 'बापूजी को मैं नहीं बचा सका!' ह्या हिंदी आणि 'I could not save Gandhji' ह्या इंग्रजी अशी दोन पुस्तकांत अत्यंत हृदयद्रावक भाषेत सांगितले आहे. त्यांचे ते इंग्रजी पुस्तक तर साऱ्या जगात खपलेले आहे.

'बापूजींना मी वाचवू शकलो नाही!' हे एकच दुःख डॉ. जैन ह्यांच्या जीवनात आज आहे. त्याचे स्मरण झाले की ते लहान मुलासारखे ढसढसा रडू लागतात! डॉ. जैन ह्यांचे म्हणणे खेर-मोरारजींनी आणि सरदार पटेल यांनी ऐकले असते तर —?—तर? साऱ्या भारताचा इतिहास आज बदलला असता ह्यात काय शंका आहे? म्हणूनच मौलाना आझादांनी आपल्या 'India Wins Freedom' या आत्मचरित्रात म्हटले आहे की, जय-प्रकाशजींच्या मते गांधीखुनाची जबाबदारी पटेल नि त्यांचे गृहखाते ह्यांच्याच डोक्यावर येऊन सर्वस्वी पडते. असे आहेत आमचे डॉ. जैन! भारताच्या इतिहासाला कलाटणी देण्याची संधी त्यांच्या जीवनात आली होती! पण नतद्रष्ट कॉंग्रेसश्रेष्ठींनी त्याचा फायदा घेतला नाही! दुर्दैव त्यांचे नि भारताचे! सुखी कुटुंब, सुखी संसार नि सुखी जीवन असे कृतार्थ आयुष्याच्या सर्व साफल्याचे समाधान आज त्यांना लाभले आहे! फक्त 'बापूजीको मैं नहीं



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

वचा सका!' एवढे एकच दुःख त्यांच्या जीवनात आहे. पण त्याला कोण काय करणार? डॉ. जैन ह्यांना दीर्घायुरारोग्य मिळो नि त्यांच्या हातून भारताची सेवा घडो!

मराठा : २१-१-१९६९

# १६

# पत्रपंडित गाडगीळ

'नवशक्ती'चे संपादक श्री. पां. वा. गाडगीळ हे १ सप्टेंबरपासून आपल्या संपादकीय पदावरून निवृत्त झाले आहेत. अर्थात, यापुढे ते अधूनमधून वृत्त-पत्रीय लेखन करतीलच, पण यानंतर ते वृत्तपत्राच्या दैनंदिन व्यवसायातून मात्र मुक्त झाले आहेत, असाच त्यांच्या ह्या निवृत्तीचा अर्थ आम्ही करतो; आणि तेवढ्यासाठी जवळ जवळ गेली तीस वर्षे मराठी वृत्तपत्रसृष्टीत संपादक म्हणून त्यांनी जी अमोल कामगिरी केली, तिचा जाहीरपणे गौरव करणे हे आम्ही आपलेकर्तव्य समजतो.

गाडगीळ अन् आम्ही दोवेही पुण्याचे नि अजमासे समवयस्क. तथापि, ते पत्रव्यवसायात केव्हा नि कसे शिरले त्याची स्पष्ट माहिती आम्हांला नाही. त्यांची नि आमची पहिली भेट १९३५ साली झाली. 'खग्रास प्रभाकर' नावाची एक कादंबरी त्यांनी लिहिली होती. ती दाखविण्यासाठी ते आमच्या-कडे प्रथम आले त्या वेळी किंवा त्यानंतर ते 'केसरी' कार्यालयात मुद्रिते दुरुस्त करण्याच्या किंवा इतर सर्वसामान्य लेखन करण्याच्या कामावर असावेत, असा आमचा अंदाज आहे. तथापि वाचण्याचा, अभ्यास करण्याचा, चिंतनाचा नि लेखनाचा पहिल्यापासून त्यांना नाद होता. ती त्यांची मुळी वृत्तीच होती. टिळकांच्या नि गांधींच्या राजकारणाचे उत्तमोत्तम संस्कार त्यांच्या मनावर झाले होते, आणि काँग्रेसमधे सदतीस साली स्थापन झालेल्या समाजवादी गटाच्या विचारसरणीचेही त्यांना विशेष आकर्षण वाटत होते.

'केसरी' कार्यालयात काम करीत असताना तात्यासाहेब केळकरांशी त्यांचा संबंध आला; आणि त्यांच्यापासूनच संपादकीय कर्तृत्वाची प्रेरणा त्यांना मिळाली असावी. पुढे दोन-तीन वर्षांनी पुण्यात 'लोकमत' नावाचे एक दैनिक सुरू झाले. त्याच्या संपादकीय पदावर पां. वा. गाडगीळ ह्यांची प्रथम नेमणूक झाली. पण हे दैनिक अवघे दहाबारा दिवसच चालले. त्याच सुमारास आम्ही पुण्यात 'नवयुग' साप्ताहिक सुरू केले. आमच्या पत्राचा राजकीय विभाग सांभाळण्यासाठी आम्हाला एखाद्या तज्ज्ञ लेखकाची जरुरी होती. गाडगीळ त्या वेळी मोकळे होते. म्हणून आमचे सहकारी संपादक होण्याची आम्ही त्यांना विनंती केली. ती त्यांनी मोठ्या आनंदाने मान्य केली. २१ जानेवारी १९४० ला 'साप्ताहिक नवयुग'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्यावर आमच्या नावाबरोबर 'सहसंपादक पां. वा. गाडगीळ' ह्यांचे नाव त्या पत्राच्या मुखपृष्ठावर छापलेले आढळेल. त्या वेळी 'नवयुगा'त साहित्यविषयक लिखाण फक्त आम्ही करीत असू, आणि अग्रलेख, राजकीय स्फुटे, टीका, टिपणे हा सर्व मजकूर गाडगीळ लिहीत असत. त्या विषयावरील त्यांचा अभ्यास नि अधिकार आमच्यापेक्षा निःसंशय अधिक होता. कित्येकदा आमचे टीकालेख वाजवीपेक्षा जास्त कडक असत. ते सौम्य करण्याचीही परवानगी आम्ही गाडगिळांना देऊन टाकली होती. एवढा त्यांच्याबद्दल आम्हाला आदर वाटत होता.

चाळीस सालच्या जुलै महिन्यात आम्ही पुणे सोडून मुंबईला स्थायिक झालो. साहजिकच आमचे 'साप्ताहिक नवयुग' आम्हाला त्या वर्षाखेर पुण्याहून मुंबईला आणावे लागले. तेव्हा पां. वा. ह्यांनाही पुणे सोडून मुंबईला येणे प्राप्त झाले. तथापि, मुंबईला आल्यानंतर त्यांचे सहकार्य आम्हाला फार दिवस लाभू शकले नाही. दैनिक 'लोकमान्य' पत्राच्या संपादकीय स्थानावर त्यांची नेमणूक झाली, तेव्हा दुःखाने त्यांना आम्हाला निरोप द्यावा लागला. 'लोकमान्य' पत्राच्या संपादकीय स्थानावर नियुक्त झाल्यानंतर गाडगीळ ह्यांच्या संपादकीय कर्तृत्वाला खरीखुरी सुरुवात झाली. वाचनीय अग्रलेख लिहिण्याची प्रथा अलिकडच्या काळात त्यांनीच सुरू केली असे म्हणावयाला पाहिजे. त्यांचा प्रत्येक अग्रलेख अभ्यासपूर्ण असे. त्यांच्या व्यासंगाचा नि विद्वत्तेचा प्रकाश त्यांच्या प्रत्येक अग्रलेखामधून लकाकत असे. थातुरमातुर किंवा मामुली असे ते कधीही लिहीत नसत. वाचकांना आपण काहीतरी सांगतो

आहोत, शिकवतो आहोत, नवीन दृष्टिकोण देत आहोत, अशा भूमिकेनेच ते लिहीत. त्यांची भाषा अत्यंत सोपी, सोज्वळ आणि प्रासादिक असे. स्वतःला साहित्यिकच काय पण पत्रकार म्हणवून घेण्याचाही त्यांना संकोच वाटे. आपण 'पोटासाठी खर्डेघाशी करणारे केवळ पोटभरू लेखक आहोत' असे ते अनेक प्रसंगी स्वतःबद्दल म्हणत. पण त्यांचे अग्रलेख वाचल्यानंतर ते श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिक आणि पत्रकार आहेत ह्याविषयी त्या व्यवसायात वावरणाऱ्या कोणाही पत्रकाराला वा साहित्यिकाला तिळमात्र शंका वाटत नसे.

वृत्तपत्रव्यवसाय हा गाडगिळांना मनापासून आवडे. ते त्यामधे जणू काही धुंद झालेले होते. त्या व्यवसायाची निशा चोवीस तास त्यांच्या डोक्यात चढलेली असे. दिवसचे दिवस नि वर्षानुवर्षे ते त्या व्यवसायात रंगून गेले होते. तल्लीन झाले होते. वृत्तपत्रलेखन हेच जणू काही आपले जीवितकार्य आहे अशा निष्ठेने आणि श्रद्धेने वृत्तपत्रव्यवसायात वावरणारा असा नादी माणूस आम्ही आमच्या आयुष्यात तरी क्वचित पाहिला असेल. त्यामुळे झाले काय, तर त्यांचा स्वभाव एकांतिक बनला, आणि त्यांच्या पक्षनिष्ठेला थोडेसे दुराग्रहाचे स्वरूप आले. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी भारताची फाळणी झाली. त्या वेळी आम्ही काँग्रेस सोडली आणि 'जयहिंद' हे सायंदैनिक काढून आमच्या टीकेची प्रखर आग त्या पत्रातून रोजच्या रोज काँग्रेसनेत्यांवर पाखडू लागलो. पां. वा. हे काँग्रेसनिष्ठ असल्याने ते देशाच्या फाळणीचे आपल्या पत्रातून रोजच्या रोज समर्थन करू लागले. त्यामुळे आम्ही दोघे एकमेकांवर सपाटून टीका करू लागलो. गाडगीळ एका भाषणात माझ्याबद्दल म्हणाले, "अत्रे ह्यांच्या ठिकाणी कलावृत्ती इतकी गाढ आहे की, त्यांना राजकीय वा सामाजिक व्यवहाराचे शास्त्रीय नि वास्तव आकलन होणे शक्य नाही आणि झाले नाही. कलेचे क्षेत्र सोडून अत्रे राजकारणात पडल्याने राजकारणाची नि कलेची हानी झाली आहे." त्यावर आम्ही लिहिले, "राजकारणशास्त्राचा वर्षानुवर्षे अभ्यास करणारे गाडगिळांसारखे बुद्धिमान पत्रकार हे आपले लेखन विषयाच्या किंवा पक्षाच्या दृष्टीने करतात. जनतेच्या भावनेच्या दृष्टीने राजकारणाचा विचार करणे त्यांना परवडत नाही."

ह्यालाच राजकारण 'खेळणे' असे आम्ही म्हणतो. त्याची दोनच उदाहरणे येथे देतो. आचार्य कृपलानी हे प्रारंभी 'अखंड हिंदुस्थान'वादी होते. मागाहून ते फाळणीचा पुरस्कार करू लागले. ते काँग्रेसचे अध्यक्ष असतानाच देशाची फाळणी झाली, पण फाळणीनंतर त्यांच्या स्वतःच्या सिंधप्रांतातच जेव्हा

अमानुष अत्याचार झाले, तेव्हा नेहरू-पटेलांच्या नेतृत्वावर जळजळीत टीका करून त्यांनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला नि ते काँग्रेसमधून बाहेर पडले. कृपलानींच्या टीकेला उत्तर देण्याचे नेहरू-पटेलांनासुद्धा धैर्य झाले नाही. पण त्यांच्या साहाय्याला पां. वा. धावून गेले. त्यांनी लिहिले, "आचार्य कृपलानी हे नालायक आणि अप्रामाणिक आहेत. कदाचित कृपलानींचे सर्व आक्षेप मान्य करून नेहरूंनी त्यांची माफी मागितली तरीसुद्धा कृपलानींचे आक्षेप चुकीचे असून नेहरू-पटेलांचे धोरणच योग्य होते, हे आमचे मत आम्ही कधीही बदलणार नाही !" एवढेच लिहून पां. वा. थांबले नाहीत, तर 'देशाची फाळणी करण्यात काँग्रेसने द्विराष्ट्रवाद पत्करला' या कृपलानींच्या आक्षेपाला पां. वां. नी असे उत्तर दिले की, "फाळणीला द्विराष्ट्रवाद म्हणणे चूक आहे. विशिष्ट भौगोलिक प्रदेशास लोकशाही हक्काने वेगळे राज्य तोडून दिले इतकेच।" आहे की नाही ? गाडगिळांचे येथपर्यंतचे 'राजकारण' कसे तरी पचण्यासारखे आहे, पण "लोकसंख्येच्या अदलाबदलीची आधीपासून तरतूद न करता तीन जून्या फाळणीची योजना स्वीकारण्यात काँग्रेसनेत्यांनी फार चूक केली", या कृपलानींच्या आक्षेपाला उत्तर देताना गाडगिळांनी जो भयंकर युक्तिवाद केला, तो वाचून आम्ही बेशुद्ध पडावयाचेच काय ते बाकी राहिलो. ते म्हणाले, लोकसंख्येची अदलाबदल करण्याची योजना शांतपणे आणि सुव्यवस्थितपणे अंमलात आणणे कधी तरी शक्य झाले असते काय ? लक्षावधी लोकांच्या मालमत्तेची अदलाबदल किंवा खरेदी-विक्री करण्यासाठी किती तज्ज्ञांना आणि किती कमिशनना किती वर्षे राबावे लागले असते, ह्याचा कोणी विचार केला आहे काय ? दंगल माजली नसती तर लक्षावधी लोकसंख्या एक मुलूख सोडून दुसऱ्या मुलखात जाण्यास राजी झाल्या असत्या काय ? गाडगिळांच्या या म्हणण्याचा आशय हा की, फाळणी होताच दंगली झाल्या, अत्याचार झाले, कत्तली झाल्या, रक्ताचे पूर वाहिले, बायकांच्यावर बलात्कार झाले, घरादारांना आगी लागल्या, तेव्हा लक्षावधी लोक झक मारीत आपली घरेदारे, वतने अन् शेते सोडून दुसऱ्या मुलखात पळत सुटले. म्हणून लोकसंख्येच्या अदलाबदलीचा प्रश्न आपोआप सुटला !" त्यावर "पांडोबा माणूस नसून राक्षस आहे !" असा अत्यंत जळजळीत लेख आम्ही 'नवयुगात' लिहिला.

'संयुक्त महाराष्ट्रा'च्या लढ्याच्या वेळी ह्याच एकांतिक पक्षनिष्ठेच्या अतिरेकाने गाडगिळांचा नि त्यांच्या 'लोकमान्या'चा बळी घेतला. काँग्रेसची बाजू

घेऊन त्यांनी संयुक्त महाराष्ट्राला आपल्या पत्रातून विरोध केला आणि द्विभाषिकाची तरफदारी केली. परिणाम काय झाला ? 'लोकमान्य' दैनिक बंद पडले नि गाडगिळांना मुंबईतून मनमाडला परागंदा व्हावे लागले. वर्षानुवर्षे एकाच विचाराच्या चाकोरीतून डोळे मिटून जाण्याच्या संवयीमुळे पां. वां. च्या स्वभावात पुष्कळसा तऱ्हेवाईकपणा निर्माण झाला आहे. सांगली पत्रकार संमेलनाचे अध्यक्ष असताना व्यासपीठावर हरिभाऊ भिडे ह्यांच्याशी त्यांनी अक्षरशः झोंबाझोंबी केली ! 'नगर पत्रकार संमेलना'च्या भोजनप्रसंगी एका स्वयंसेवकाने त्यांच्या पानात मोतीचुराचा 'दुसरा' लाडू ते नको नको म्हणत असताना वाढला. तेव्हा, त्याचा हात पकडून, 'अरे महामूर्खा, राष्ट्रात हजारो लोक उपाशी मरत असताना तू हा लाडू मला वाढून अन्नाचा निष्कारण नाश का करतोस ?' अशी जेव्हा त्यांनी आरोळी मारली, तेव्हा सर्व पंगतीची काय मनःस्थिती झाली असेल ते काय सांगावे ?

पण काहीही असले नि आमचे दोष त्यांना माहीत असले किंवा त्यांचे दोष आम्हांला माहीत असले, तरी आम्ही दोघे एकमेकांचे मित्रच आहोत. त्यांच्या प्रचंड राजकीय व्यासंगाबद्दल आम्हांला नितांत आदर आहे. त्यांचा 'कॅपिटाल–सारग्रंथ' म्हणजे एक चमत्कार आहे. मार्क्सवादाचा त्यांचा अभ्यास हेवा करण्यासारखा आहे. पण, गंमत ही की, मार्क्सवादाचा एवढा अभ्यास करून ते कम्युनिस्ट व्हायच्याऐवजी कॉंग्रेसनिष्ठच झाले ! पण त्या वादात पडण्यात अर्थ नाही. त्यांच्याबद्दल आम्हांला जसा आदर वाटतो, तसा त्यांच्याही अंतःकरणात आमच्याबद्दल एक 'मऊ कोपरा' आहे. तीस वर्षे संपादकीय तपश्चर्या करून पत्रव्यवसायातून निवृत्त होणाऱ्या या पत्रमहर्षीला महाराष्ट्रीय जनतेच्या वतीने आम्ही अभिवादन करतो नि त्यांना दीर्घायुरारोग्य इच्छितो !

मराठा : ६-९--१९६८

# १७

## वसंत-मालती

महाराष्ट्रात एका काळीं सुविख्यात असलेल्या मुंबईच्या ' मासिक मनोरंजना 'चे संस्थापक नि आद्य संपादक काशीनाथ रघुनाथ मित्र नावाचे जे एक अत्यंत कल्पक अन् धाडसी साहित्यिक होऊन गेले, त्यांची ज्येष्ठ कन्या कुमारी मालती मित्र ही मंगळवार दि. १ जून १९६५ रोजी दुपारी दीड वाजता मुंबईलाच आपल्या राहत्या घरी ' कॅन्सर 'च्या विकाराने निधन पावली ही बातमी आम्ही आमच्या ' मराठ्यात ' परवा छापलेली आमच्या वाचकांनी वाचली असेलच.

मरणसमयी मालतीचे वय अदमासे साठ वर्षांचे असावे. ' मासिक मनोरंजन ' बंद होईपर्यंत ती त्या मासिकाची कित्येक वर्षे संपादिका होती. त्यानंतर गेली कित्येक वर्षे ती मुंबईच्या ' अलेक्झॅण्ड्रा कन्याशाळे 'मध्ये संस्कृतची अध्यापिका होती. वस्तुतः मालतीच्या मृत्यूची ही बातमी दुःखद तर खरीच, पण तिचा आम्ही आमच्या अग्रलेखात उल्लेख करण्यासारखे असे विशेष तिच्यात काय आहे असेच कोणीही आम्हांला विचारील. म्हणून मालतीच्या या मृत्यूमागील तिच्या दुर्दैवी प्रेमाची आणि निष्फळ जीवनाची एक अत्यंत भयानक अन् हृदय-विदारक करुण कथा या ठिकाणी सांगणे, हे आम्ही आमचे एक पवित्र कर्तव्य समजतो. कारण, तिच्या अगदी निकटच्या थोड्या आप्तांखेरीज तिच्या आयुष्याची ही शोककथा आमच्यावाचून इतरांना ठाऊक असणे मुळीं शक्यच नाही. कोणी विचारील की एका सामान्य व्यक्तीची खाजगी जीवनकथा वृत्त-पत्राच्या अग्रलेखातून प्रसिद्ध करण्यासारखे सार्वजनिक महत्त्व ते तिला काय

आहे ? बरोबर आहे हा प्रश्न. तथापि, या कथेचे खाजगी स्वरूप आता नष्ट झालेले आहे; कारण, त्या कथेमधले दोन्हीही प्रेमिक जीव आता इहलोकामधून निघून गेलेले आहेत. खेरीज, त्या कथेत अपवादास्पद असे काहीही नाही. मानवी जीवनातील जास्तीत जास्त दुःखाची आणि दुर्दैवाची ही एक विलक्षण आश्चर्यकारक आणि हृदयद्रावक कथा आहे. म्हणून ती प्रत्येकाला समजली पाहिजे, या एकाच भावनेने आम्ही ती आज आमच्या वाचकांना सांगत आहोत.

चला, पन्नास वर्षे मागे चला. उगवले आता १९१५ साल. त्या वर्षाच्या प्रारंभी आम्ही मॅट्रिक परीक्षा पास होऊन फर्ग्युसन कॉलेजच्या प्रथम वर्षाच्या वर्गात दाखल झालो होतो. मुंबई विद्यापीठाच्या विद्यालयीन वर्षाचा प्रारंभ त्याच साली जानेवारी महिन्यामधून बदलून जून महिन्यामधे गेला. त्यामुळे कॉलेजच्या पहिल्या वर्षात आम्हांला पहिले सहा महिने निष्कारण रेंगाळावे लागले. आमच्या पहिल्या वर्षाच्या तीन तुकड्या होत्या. त्या फर्ग्युसन कॉलेजच्या विस्तीर्ण 'ॲम्फी थिएटर'मधे त्या तीन तुकड्यांतील आम्हा सहाशे विद्यार्थ्यांना एकत्रित करून घाऊक आणि ठोकळ स्वरूपाचे शिक्षण देण्यात येत असे. शिक्षण कसले ते ? विद्यार्थ्यांच्या वेळेचे वाटोळे करण्याची ती एक गांवढळ व्यवस्थाच होती झाले. प्रि. (सर) रघुनाथ परांजपे आम्हांला गणित शिकवावयाला आले, म्हणजेच काय ते आम्ही माणसासारखे वागत असू. त्या वेळी आम्ही सारे विद्यार्थी चोरासारखे माना खाली घालून शांतपणे बसत असू. बाकीच्या प्रोफेसरांच्या वेळीं काही विचारूच नका. त्या ॲंफी थिएटरला नुसते गुराच्या बाजाराचे स्वरूप येई. विद्यार्थ्यांच्या दंग्याला आणि आरडाओरडीला काही सुमारच राहात नसे. अशा त्या धुळवडीत आम्हांला एकच विद्यार्थी असा भेटला की, जो एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे शांत आणि निर्विकार चित्ताने नि मुद्रेने आपली मान खाली घालून प्रोफेसरांच्या बडबडीची टिपणे आपल्या वहीमधे व्यवस्थित रीतीने उतरून घेत असे. प्रारंभी आम्ही त्याची टवाळी करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याचा त्याच्यावर काहीही परिणाम होत नसे. त्याने ढुंकून आमच्याकडे कधी पाहिले नाही की आमच्या थट्टामस्करीने आपल्या कामात व्यत्यय येत असल्याचे नापसंतीच्या त्रासिक मुद्रेने एवढेसेसुद्धा आम्हांला कधी दर्शविले नाही. त्याच्या त्या उग्र तपश्चर्येचा अखेर उलट आमच्यावरच परिणाम झाला. त्याला त्रास देण्याचे आम्ही तर सोडूनच दिले, पण त्याच्या त्या निर्विकार व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि गंभीर ज्ञानलालसेबद्दल आम्हांलाच

आदर वाटू लागला, आणि त्याच्याशी स्नेहसंबंध जोडण्याची आम्ही संधी शोधू लागलो, त्याच्या शेजारी जाऊन बसण्याचा एक दिवस आम्ही उपक्रम सुरू केला. एकदा लिहिता लिहिता त्याच्या हातून पेन्सिल खाली पडली. ती आम्ही लागलीच त्याच्या हाती उचलून दिली. तेव्हा तो आमच्याकडे पाहून किंचित हसला. तेव्हा आम्हीही त्याच्याकडे पाहून हसलो. त्याचे हास्य इतके सौम्य आणि सुंदर होते म्हणता. त्या त्याच्या हास्याने आम्ही मंत्रमुग्ध झालो, आणि तेव्हापासून त्याचा नि आमचा परिचय झाला.

हजार विद्यार्थ्यांमध्ये उठून दिसेल असे त्याचे रेखीव आणि शोभिवंत व्यक्तिमत्त्व होते. वर्णाने तो सावळा पण तांबूस अन् तेजस्वी होता. त्याच्या लंबवर्तुळ मुद्रेवर नि काळ्याभोर डोळ्यांमध्ये बुद्धिमत्तेचे असे काही पाणी चमकत होते म्हणता, की पाहणाराची दृष्टी काही काळ त्याच्या चेहऱ्यावर खिळून बसल्यावाचून राहात नसे. त्याच्या त्या उंच नि सडपातळ आकृतीला त्याचा लांब गळेबंद निळा कोट आणि चापूनचोपून काचा मारलेले शुभ्र नि स्वच्छ धोतर फार शोभून दिसे. त्याचे आमच्या दृष्टीने सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे त्याची काळ्या चकमकीत रंगाची सुंदर सायकल. ती तो घासूनपुसून इतकी स्वच्छ ठेवीत असे म्हणता! कॉलेज सुटल्यानंतर कोणाशीही न बोलता तो आपल्या सायकलवर सफाईने टांग मारून इतक्या ऐटीने निघून जात असे की, आम्ही गावामधून 'वन टू' करीत अनवाणी पायांनी कॉलेजात येणारी दरिद्री पोरे त्याच्याकडे लोभसवाण्या नजरेने टकमका पाहात असू. शरीर आणि बुद्धी यांचा अत्यंत आल्हादकारक समन्वय ज्याच्या व्यक्तिमत्त्वामध्ये झालेला होता, त्या ह्या विद्यार्थ्याचे नाव वसंत महादेव लोटलीकर असे होते. त्याचे वडील त्या वेळी पुणे म्युनिसिपालिटीत कुमठेकरांच्या हाताखाली असिस्टंट चीफ ऑफिसर होते, आणि ते त्या वेळी मोती-चौकाच्याजवळील पासोड्या मारुतीसमोर असलेल्या तिकीट ऑफिसाच्या इमारतीमध्ये तिसऱ्या मजल्यावर राहात होते. पाच-सहा महिन्याने आम्ही सायकल विकत घेतल्यानंतर दोघे बरोबर कॉलेजात जात असू आणि बरोबरच परत येत असू तथापि त्यापेक्षा त्याचा नि आमचा अधिक परिचय होऊ शकला नाही. तो वृत्तीने तसा अबोल असे. आमचा स्वभाव त्याच्या उलट. आम्ही साऱ्या गावचे बडबडे. काव्याचा, नाटकाचा नि क्रिकेटचा आम्हांला विलक्षण नाद. वसंत ह्या गोष्टींच्या वाऱ्यालाही कधी उभा राहत नसे. सदान्‌कदा तो अभ्यासाच्या धुंदीत आणि पुस्तकांच्या

वाचनात व्यग्र असे. पहिल्या वर्षाची परीक्षा त्या वेळी प्रथमच कॉलेजच्या वतीने घेण्यात आली. त्या परीक्षेत वसंत हा पहिल्या वर्गात पहिला आल्यानंतर त्याचे नाव कॉलेजात सर्वतोमुखी झाले, आणि सर्व प्राध्यापकांच्या नजरा आपोआपच त्याच्याकडे वळल्या.

इंटरमीजिएटच्या वर्गात आम्ही रँग्लर परांजपे ह्यांच्या आकर्षणाने गणित हा ऐच्छिक विषय घेतला, त्यामुळे पुन्हा वसंत आणि आम्ही एका वर्गात शेजारी शेजारी आलो. आम्ही पहिल्या वर्षाच्या परीक्षेत तिसऱ्या वर्गात अगदी काठावर कसेबसे पास झालो होतो. त्यामुळे इंटरला आम्ही गणित विषय घेतलेला पाहून आमच्या अनेक मित्रांना जसे आश्चर्य वाटले तसे वसंतालाही वाटल्यावाचून राहिले नाही. तो आम्हाला म्हणाला देखील की "तुम्ही कशाला या भानगडीत पडता? (तो 'एकेरी' शब्दांनी आमच्याशी कधीही बोलावयाचा नाही!) तुम्हाला हे जमायच नाही!" आम्ही त्याला काय उत्तर देणार? आम्ही नुसते हसलो नि त्याला म्हणालो, "तुम्ही आपल्या फर्स्ट क्लासची काळजी करा! आमच्या भानगडीत पडू नका!" इंटर ही परीक्षा त्या वेळी फार अवघड परीक्षा समजली जात असे. पुष्कळसे विद्यार्थी तिच्यात हटकून नापास होत असत. म्हणून त्या वर्षी आम्ही पूर्वीपेक्षा अभ्यासाकडे अधिक लक्ष दिले. त्यामुळे आम्ही जरी तिसऱ्या वर्गात पास झालो तरी संस्कृतमधे नि गणितामधे आम्हाला जवळजवळ शेकडा छप्पन्न टक्के म्हणजे सेकंड क्लासचे मार्क पडले. वसंत अर्थातच अपेक्षेप्रमाणे फर्स्ट क्लासमध्ये पहिला आला.

त्यानंतर डॉ. पां. दा. गुणे ह्यांच्या आग्रहावरून वसंतने बी. ए. ला संस्कृत ऑनर्स घेतले. आम्ही सुरुवातीला 'एंजिनियर' होण्याच्या आकांक्षेने बी. ए. ला सायन्स विषय घेतला, पण त्या विषयातले अक्षर जेव्हा आम्हांला कळेना, तेव्हा आम्ही शेवटी संस्कृतच्या वर्गात धडपडत आलो, आणि फिरून वसंतच्या वर्गात त्याच्या शेजारी येऊन बसलो. बी. ए. च्या वर्गात असल्यापासूनच वसंत हा पुढे आय. सी. एस. ला जाणार आणि आयुष्यात कोणीतरी बडा सरकारी अधिकारी होणार अशा अनेकांनी त्याच्याविषयी अटकळी बांधून ठेवल्या होत्या. प्रिन्सिपल परांजप्यांपासून तो यच्चयावत प्राध्यापकापर्यंत तो सर्वांचा लाडका होता. तथापि एवढे असूनही त्याच्या विनम्र आणि प्रांजळ स्वभावात कधीही बदल झाला नाही. सर्वांशी तो अत्यंत विनयाने वागे. अपेक्षेप्रमाणे तो बी. ए. मधे फर्स्ट क्लास ऑनर्समधे उत्तीर्ण झाला, आणि आम्ही तिसऱ्या वर्गात नुसते

बी. ए. (ऑनर्स नव्हे) कसेबसे पास झालो नि त्यानंतर एकोणीस साली कायद्याच्या अभ्यासासाठी मुंबईला आलो.

एके दिवशी धोबी तलावाच्या ट्रॅम स्टॅंडवर वसंत आम्हाला अचानक भेटला. त्याने आपादमस्तक इंग्रजी पोषाख केला होता. अंगात निळा सर्जचा सूट नि डोक्याला फेल्ट हॅट घातली होती. त्याचा तो नवा आकर्षक अवतार पाहून आम्ही अक्षरशः चाटच पडलो. आपण पंधरा दिवसांनी आय. सी. एस. साठी विलायतेला जाणार असून इंग्रजी पद्धतीप्रमाणे काटेचमच्यांनी जेवण्याची आपल्याला सवय व्हावी म्हणून आपण 'ताजमहाल' हॉटेलमधे भोजनासाठी जात असल्याचे त्याने आम्हांला सांगितले. ते ऐकून आम्हांला मनस्वी आनंद झाला, आणि मनातल्या मनात त्याच्या भाग्याचा हेवा वाटल्यावाचून राहिला नाही. त्यानंतर तो थोड्या दिवसांनी विलायतेला निघून गेल्यावर मग आम्हांला 'मनोरंजन' कार्यालयात समजले की, 'मासिक मनोरंजन'चे काशीनाथपंत मित्र ह्यांनी वसंतच्या आय. सी. एस. चा सर्व खर्च देण्याचे कबूल केले असून वसंत आय. सी. एस. होऊन परत आल्यानंतर मग त्याचा नि काशीनाथपंतांची थोरली कन्या मालती हिचा विवाह होण्याचे ठरले आहे. आम्ही स्वतः 'मासिक मनोरंजन'चे त्या वेळी कवी असल्याने काशीनाथपंत मित्रांच्या कन्येशी आमच्या मित्राचा विवाह ठरल्याचे ऐकून साहजिकच आम्हांला आनंद झाला.

वसंत-मालती यांच्या जीवननाट्याचे 'मंगलाचरण' इतक्या आनंददायक, उत्साहकारक आणि आशादायक वातावरणात म्हटले गेले, पण पुढे दुर्दैवाच्या अवकृपेचा काय फेरा अकस्मात त्यांच्यावर यावा हे एक परमेश्वरच जाणे. विलायतेत गेल्यावर वर्ष दीड वर्षाच्या आत वसंतचे एकदम डोके फिरले आणि त्याला वेड लागले! त्याच्यासारख्या उत्तम प्रकृतीच्या अत्यंत संयमी आणि बुद्धिमान तरुणाचा अशा तऱ्हेने मतिभ्रंश का व्हावा ह्याची कारणे त्या वेळी काही आम्हांला समजली नाहीत. पण पुढे चार-पाच वर्षांनी आम्ही स्वतः जेव्हा इंग्लंडला गेलो, तेव्हा कित्येक गोष्टींचा तेथे आम्हांला उलगडा झाला. वसंत हा इंग्लंडला जाईपर्यंत एखाद्या निरागस बालकाप्रमाणे आयुष्यातील अनेक गोष्टींबाबत अनभिज्ञ आणि अजाण होता. पण इंग्लंडच्या मोहमय वातावरणात गेल्यानंतर त्याचे चित्त विचलित झाले आणि त्याचा तोल ढासळून तो तेथल्या मोहजालात गुरफटला गेला. अशा परिस्थितीत साहजिकच अभ्यासाकडे त्याचे दुर्लक्ष्य झाले. मग आय. सी. एस. ची परीक्षा जशी जवळ

आली तसा तो एकदम शुद्धीवर आला. आय. सी. एस. मधे जर आपण नापास झालो तर आपल्या मातापितरांशी नि ज्यांचे पैसे घेऊन आपण विलायतेला आलो त्यांची केवढी निराशा होईल या जबरदस्त भीतीचा तडाखा त्याच्या स्वाभिमानी मनाला बसला. तशा मानसिक अवस्थेत आपल्या खोलीचे दार बंद करून त्याने रात्रंदिवस अभ्यास करण्याचा तडाखा सुरू केला. त्याचेच पर्यवसान अखेर त्याच्या बुद्धिभ्रंशात झाले. त्याचा पहिला वेडाचा झटका इतका जबर होता की, त्याला आवरतां आवरता त्याच्या मित्रांचा जीव अगदी मेट्टयास आला. अंगावरचे कपडे तो टराटरा फाडून फेकून देऊ लागला. तशा स्थितीत त्याला बोटीवर चढवून पुन्हा परत हिंदुस्थानात कसे आणले हा सारा वृत्तांत सांगितला तर अंगावर काटा उभा राहील. पुण्यास आल्यानंतर त्याला काही वर्षे येरवड्याच्या 'मेंटल हॉस्पिटल'मधे ठेवण्यात आले. तेथे तो अगदी पहिल्या-सारखा शांत आणि संयमित झाला. पण त्याच्या डोक्यातले वेडमात्र कधीही नाहीसे झाले नाही. 'असाध्य वेडा' म्हणून येरवड्याच्या हॉस्पिटलमधून त्याला घरी परत पाठवून देण्यात आले. तत्पूर्वीच्या काळात त्याचे वडील आणि काशीनाथपंत मित्र निधन पावले होते. १९२४ सालापासून तो १९४८ सालापर्यंत सतत चोवीस वर्षे वसंताचे लालनपालनपोषण त्याच्या वृद्ध विधवा मातोश्रीने अगदी एकटीने केले.

आम्ही इंग्लंडहून परत आल्यानंतर गावातून लष्करमधल्या आमच्या शाळेकडे जाण्याचा रस्ता वसंतच्या घरावरूनच होता. जेव्हा जेव्हा आम्ही त्या घरावरून जात असू किंवा येत असू तेव्हा तिसऱ्या मजल्यावरच्या उघड्या खिडकीत बिचारा वसंत विडी ओढीत आकाशाकडे शून्य दृष्टीने पाहात बसलेला पाहून आमच्या आतड्यांना अक्षरशः पीळ पडे. त्याचा पूर्वीचा चेहरा पार बदलून गेला होता. त्याचा रंग अगदी काळा आणि चेहरा भयाण झालेला होता. डोक्याचे नि दाढीचे केस पिकून अर्धे पांढरे झाले होते. ज्याच्या भाग्यशाली भवितव्याकडे सारे फर्ग्युसन कॉलेज एक वेळ मोठ्या आशेने बघत होते, तो तेजस्वी नि सस्मित चेहऱ्याचा अन् अद्वितीय बुद्धिमत्तेचा तरुण विद्यार्थी वसंत महादेव लोटलीकर हाच काय असा त्याच्याकडे पाहताना आम्ही अनेकदा आमच्या मनाला व्याकुळ भावनेने प्रश्न विचारीत असू. चिंतामण द्वारकानाथ देशमुख किंवा मधुसूदन दामोदर भट हे वसंतच्या एक-दोन वर्षे आधीच आय. सी. एस. झाले नि आयुष्यात केवढ्या महत्पदाला नि वैभवाला

चढले! आणि आमच्या दुर्दैवी वसंताला मात्र सतत पंचवीस वर्षे त्या पासोड्या मारुतीसमोरील इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या खिडकीत मतिभ्रष्ट स्थितीत आकाशाकडे पाहात कंठावी लागली! मानवी आयुष्याला काय न्याय आहे काय? वसंत सदान्कदा त्या खिडकीत बसलेला असे. तो बाहेर कोठेही जात नसे. घरी त्याच्याकडे कोणी विद्यार्थी शिकावयाला आला, तर त्याला तो इंग्रजी किंवा संस्कृत उत्तम रीतीने शिकवीत असे. त्या वेळीं त्याचे वेड कोठल्या कोठे नाहीसे होई.

आपल्या एकुलत्या एक मुलाला त्या बेहोष अवस्थेत सांभाळणाऱ्या वृद्ध मातेच्या मनाची काय स्थिती झाली असेल ह्याची जशी कोणाला कल्पना होणार नाही, त्याचप्रमाणे वसंताची वाग्दत्त वधू जी मालती तिच्या तरुण हृदयाची किती शतधा शकले झाली असतील, ह्याची तरी कोण कल्पना करू शकणार? आपल्या संसाराचा काल्पनिक मनोरा आपल्या डोळ्यांदेखत उद्ध्वस्त झालेला पाहून किती मानसिक मरणाच्या दाहक अग्निदिव्यामधून मालतीला जावे लागले असेल बरे? वसंतासाठी आमरण अविवाहित राहून तिने आपल्या सर्वस्वाचा होम केला, आणि त्यामुळेच तिला 'कॅन्सर'सारखा असाध्य नि दुर्धर रोग जडला. वसंत लोटलीकर १९४८ साली मरण पावला, त्या वेळीं आमच्या 'दैनिक जयहिंद' मधे त्याजवर आम्ही भावनाविवश होऊन जो मृत्युलेख लिहिला तो हृदयाशी धरून मालती किती ढसढसा रडली ते आम्हांला माहीत आहे. आता मालतीच्या मृत्यूने या दुर्दैवी प्रेमकथेचा हृदयद्रावक उत्तरार्ध पूर्ण झालेला आहे. परमेश्वराच्या घरी जर काही न्याय असेल, तर आता तरी त्याने वसंत–मालतीचे मीलन घडवून आणून जिवंतपणी त्यांच्या आत्म्यांना न लाभलेले सौख्य नि समाधान प्राप्त करून द्यावे असे 'भरतवाक्य' म्हणून आम्ही हे शोक-नाट्य संपवतो.

मराठा : ७-६-१९६५

# १८

# दयेचे काव्य–गाय

महात्मा गांधींनी आपल्या ' यंग इंडिया ' या इंग्रजी साप्ताहिकात पंचेचाळीस वर्षांपूर्वी ' गाय ' या विषयावर एक अत्यंत करुणरम्य अग्रलेख लिहिला होता. त्या अग्रलेखातले त्यांचे पहिलेच वाक्य असे होते की, ' Cow is a poem of pity '. गाय हे एक दयेचे काव्य आहे. निरनिराळे प्राणी पाहिले की माणसाच्या मनात निरनिराळ्या भावना निर्माण होतात. पण गाय हा असा एकच प्राणी आहे की, त्याला किंवा तिला पाहिल्यानंतर आपल्या मनात दयेखेरीज दुसरी कोणतीही भावना निर्माण होत नाही. गाय पाहिली की, तिच्याबद्दल कीव वाटते. प्रेम वाटते. ममता वाटते. आपण हिंदू लोक गाईला आई मानतो ह्याबद्दल कोणाला आश्चर्य वाटत असेल ते वाटो. पण त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. ती सर्व मानवाची एक साहजिक भावना आहे. ती माणुसकीची एक उपजत ऊर्मी आहे. आईच्या दुधात जे वात्सल्य असते तेच गाईच्या दुधात असते. गोरस हा अमृताहूनही गोड असतो.

' गोरस पिऊनी कान्हा<br>
जगताचा झाला राणा ! '

असे आम्ही एका काव्यात मागे म्हटलेले आहे. गाय हे समाजाचे गोधन आहे, असे जे समजले जाते ते काही उगाच नाही. हे गोधन जे राष्ट्र सांभाळते, त्याच राष्ट्राचा खरा उत्कर्ष होतो. भगवान श्रीकृष्ण हा 'गो'पाळ होता. तो 'गो'कुळामधल्या गोपांचा आणि गोपींचा अनभिषिक्त सम्राट होता. म्हणून

अरुणोदय झाला की, गोकुळातले त्याचे सर्व सवंगडी त्याच्या दाराशी येऊन आपल्या गोड गळ्यांनी त्याला भूपाळी आळवावयाचे :

'ऊठि गोपाळजी, जाई धेनूकडे । पाहती संवगडी वाट तूझी ।'

आणि मग ते सारे यमुनेच्या काठावर आपली गाईगुरांची खिल्लारे घेऊन त्यांना चारावयाला जावयाचे. त्या काळात सर्वसामान्य जनतेच्या जीवनाच्या कासंड्या सुखासमाधानाच्या गोरसाने अगदी काठोकाठ भरून ओसंडत होत्या. गाय ही जी आमची राष्ट्रीय देवता झाली आहे ती काही उगाच नाही. गाय ही आमच्या पावित्र्याचे नि मांगल्याचे प्रतीक झालेली आहे. आमच्या लहानपणी एक भिकारी दुपारी आमच्या दारावरून गाईचे गाणे गात जावयाचा. ते गाणे अद्याप आमच्या स्मरणात आहे.

गाई भरून गाईची पाठ
जशी पंढरपूरची वाट !
गाई भरून गाईचे प्वाट,
जशी कापसाची म्वाट,
गाई भरून गाईचे कान
जसे नागवेलिचे पान
गाई भरून गाईचे डोळे
जसे हिऱ्यामाणकाचे गोळे,
गाई भरून गाईची शिंगे
जशी महादेवाची लिंगे !
गाई भरून गाईचे पाय,
जशी दुधावरची साय !

अशी हृदयाला गहिंवर आणणारी अत्यंत रसाळ कडवी त्या गाण्यात होती.

गाईचे हे स्मरण आज होण्याचे कारण म्हणजे परवा आम्ही सांगलीला जात असताना आणि तेथून परत येत असताना दक्षिण महाराष्ट्रात येऊ घातलेल्या दुष्काळाची जी निरनिराळी भयानक दृश्ये आम्हाला दिसून आली. त्यामध्ये तर सर्वांत अत्यंत हृदयद्रावक दृश्य जर आम्हाला कोणते दिसले असेल तर ते रस्त्यारस्त्याने वांद्र्याच्या कसाईखान्याची वाट तुडवीत चाललेल्या शेकडो गाईबैलांच्या कळपांचे ! मनुष्याच्या क्रौर्याचे, दुष्टपणाचे नि कृतघ्नतेचे ते चालते हंबरते प्रदर्शन पाहून आमच्या आतड्यांना अक्षरशः पीळ पडला.

नोव्हेंबरचा महिना असून डोक्यावर ग्रीष्माची आग खरखत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंला असलेल्या शेतामधली पिके आई नसलेल्या मुलासारखी जागच्या जागी सुकून, वाळून आणि खुरटून गेलेली होती. वाऱ्याची एखादी तरी झुळूक आपल्या अंगावर यावी म्हणून झाडावरची पाने त्या तलखीत डोळ्यात प्राण आणून निश्चलपणे फांद्यावर ताटकळत बसली होती. ओढ्यानाल्यांना पुढच्या भीषण भवितव्याची कल्पना आल्यामुळेच की काय त्यांच्या तोंडचे पाणी कुठल्या कुठे पळून गेले होते. एवढेच नव्हे तर दक्षिण महाराष्ट्राला जीवनरस पुरविणाऱ्या कृष्णानदीच्या प्रवाहाची गालफडे वाळवंटाच्या रूपाने तिच्या पात्रातून वर आलेली पाहून तर आमच्या काळजात धस्सच झाले. पुण्या–मुंबईसारख्या शहरात राहणाऱ्या लोकांना आम्ही सांगितले तरीसुद्धा कल्पना होणार नाही की, दुष्काळाचा केवढा अक्राळविक्राळ काळपुरुषाचा वेढा महाराष्ट्राला चहूकडून हळूहळू पडत चाललेला आहे. आणखी दोन महिन्यांनी काय होणार ह्याचा विचारही आमच्या कल्पनेला करवत नाही.

पण खेडेगावातले कित्येक लोक आपापली घरे-दारे सोडून आणि गाईगुरे कसायांना विकून हळूहळू स्थलांतर करू लागले आहेत. कसायांना विकलेल्या त्या गायबैलांच्या भर उन्हातून रस्त्याने चाललेल्या दुर्दैवी कळपांच्या खुरातून उडणाऱ्या धुळीमध्ये आम्हांला उद्याच्या भीषण दुष्काळाचे भेसूर दृश्य स्पष्टपणे पाहावयाला मिळाले. त्या गाईंच्या पाणावलेल्या डोळ्यांत आम्हांला एवढे कारुण्य दिसले की हजारो भवभूतींना आपल्या नाटकात अशा कारुण्याचा कधीही परिपोष करता येणार नाही ! त्या गाई–बैलांना बिचाऱ्यांना कल्पना तरी असेल काय, की चारापाणी न देताना भर उन्हातून शेकडो मैल आपल्या पाठीवर आसुडाचे फटकारे मारीत आपल्याला कोठे आणि कशासाठी नेण्यात येत आहे ? ज्यांच्या घरात आणि शेतात आपण जन्म काढला ते धनी, त्यांच्या धनिणी, त्यांची मुलेबाळे, ह्यांच्या प्रेमळ वातावरणातून एकदम आपल्याला तडकाफडकी हद्दपार का करण्यात आले असावे ह्याचा विचार त्यांच्या डोक्यात चालला असावा असे त्यांच्या केविलवाण्या दृष्टीवरून आम्हाला वाटले.

गाई–बैलांची आतापर्यंत एवढीच कल्पना असली पाहिजे की, जंगलातले वाघ, सिंह, चित्ते आणि तरस हेच काय ते आपले शत्रू आहेत. पण त्यांना बिचाऱ्यांना काय ठाऊक की चार पायांच्या जनावरांपेक्षा दोन पायांचा माणूस हा आपला अधिक भयंकर शत्रू आहे ते ! स्वतःच्या पोटाची खळगी भरण्या-

साठी आणि स्वतःचे प्राण वाचवण्यासाठी माणूस कोणाला विकील आणि कोणाचा प्राण घेईल हे काही सांगता येणार नाही. अरे, ज्यांच्या गोरसावर ज्यांनी आपली मुलेबाळे वाढविली आणि श्रमावर ज्यांनी खंडोगणती धान्य निर्माण केले त्या गाईंना आणि बैलांना त्यांनी स्वतःचे प्राण वाचविण्यासाठी खुशाल चार चार, पाच पाच रुपयांला कसायांना विकून टाकवे ह्यापेक्षा जगात अधिक राक्षसीपणा काही असू शकेल काय? त्या गाईंनी आणि बैलांनी बिचाऱ्यांनी काय करावे? आमच्या मनात सहज कल्पना येऊन गेली की, अशा दुष्काळाच्या परिस्थितीत जर माणसे आपल्या आईबापांना अशा तऱ्हेने जर दोन दोन चार चार रुपयांना विकू लागलीं आणि त्यांच्या झुंडी भर उन्हातून फटके खात जर रस्त्यातून कत्तलखान्याकडे जाऊ लागल्या तर ते दृश्य कसे काय दिसेल? गाईबैलांना वाचा नाही म्हणून का त्यांना कसायांना विकायचे आणि माणसांना बोलता येते म्हणून का त्यांची कत्तल करायची नाही? वारे न्याय! वारे माणुसकी! हिंदू धर्मात गोमांसभक्षण हे एक महापाप समजले जाते. पण स्वतःची गाय कसायाला विकायची आणि तिचे मांस कोणा तरी गोभक्षकाच्या तोंडात कोंबायचे ह्यापेक्षा अधिक भयानक पाप जगात नसेल! जो समाज आपल्या गाय नि बैल कसायांना विकतो त्याचे कधी कधी कल्याण होणार नाही ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

महाराष्ट्रातल्या जनतेला आमची अशी विनंती आहे की, मुंबईच्या रस्त्यावरून हे गाईबैलांचे कळप जाऊ लागले की, त्यांना तिने अडवून कसायांच्या हातून सोडवावेत आणि आपापल्या गावातल्या पांजरपोळात घालावेत. महाराष्ट्राचे हे गोधन सांभाळण्यासाठी सरकारने लाखो रुपये खर्च करून हे काम एव्हापासून आधी करावे. गाईबैलांची कत्तल करून लोकांचे आणि सरकारचे कदापि कल्याण होणार नाही. परवापासून तर आमची झोपच उडाली आहे. जरा डोळे मिटले की कत्तलखान्याकडे जाणाऱ्या गाईबैलांचे ते दुर्दैवी कळप आमच्या अंतश्चक्षूंना दिसू लागतात आणि गाईंच्या डोळ्यांतले केविलवाणे कारुण्य जणू काही आमच्याकडे आशेने पाहात आहे असा आम्हांला भास होऊ लागतो. गाईबैलांचे बळी देऊन दुष्काळरूपी राक्षसांची भूक भागेल अशी जर जनतेची आणि सरकारची कल्पना असेल तर ती साफ चूक आहे. एवढे सांगण्यासाठीच त्यांचे हंबरडे आम्ही हृदय पिळवटून आज त्यांच्या कानावर घालीत आहोत.

मराठा : ११-११-१९६५

## १९

# नीलकंठ

बद्रीनाथच्या पश्चिमेला पाच मैल अंतरावर एकदम सुळक्यासारखे आभाळात गेलेले 'नीलकंठ' नावाचे एकटे एकच बर्फाच्छादित शिखर हिमालयाच्या मधोमध आहे. त्याची उंची एकवीस हजार सहाशे चाळीस फूट आहे. ते जितके सुंदर आहे, तितकेच भयंकर आहे. त्याला पाहताना छातीत धडकी भरते. पण डोळे मात्र एकसारखे त्याच्यावर खिळून बसतात. त्याच्यापेक्षा अधिक उंच असलेली हिमालयाची अनेक शिखरे आहेत, पण नीलकंठाचे आकर्षण काही निराळेच आहे. हिमालयातल्या सर्व शिखरांपेक्षा दिसायला सुंदर व चढावयाला अवघड असे जर कोणते शिखर असेल तर ते नीलकंठ असा त्याचा लौकिक आहे.

त्याचे नाव नीलकंठ पडण्याचे कारण असे की, समुद्रमंथनानंतर चौदा रत्ने निर्माण झाली. त्यात अमृत जसे होते तसे विषही होते. बाकीची सर्व रत्ने देवदानवांनी आपापसात वाटून घेतली, पण विष घ्यावयाला कोणी तयार होईना. तेव्हा ते शंकराने प्राशन केले. पण भगवान विष्णूंनी ते विष शंकराच्या गळ्याखाली उतरू दिले नाही. त्यामुळे शंकराचा गळा निळा झाला, आणि त्याचे नाव नीलकंठ पडले. त्या नीलकंठाचे हे शिखर प्रतीक मानले जाते म्हणून त्याचे नाव नीलकंठ असे पडले. तथापि, त्या परिसरात राहणारे गिरिवासी लोक त्याला 'गढवालची राणी' असे म्हणतात. कारण हा भाग गढवाल प्रदेशात येतो.

अठ वर्षांपूर्वी हिमालयाचे सर्वोत्तुंग शिखर जे एव्हरेस्ट ते तेनसिंग ह्याने जिंकून हिमालयाएवढे विराट आणि धवल यश मिळविले. गेल्या दहा वर्षांत वीस हजार फुटांपेक्षा अधिक उंच असलेल्या हिमालयाच्या बारा शिखरांवर जाऊन पोहोचण्याचा भारतीय गिर्यारोहकांनी पराक्रम केला. तेवीस हजार तीनशे साठ फूट उंचीच्या ' त्रिशूळ ' ह्या शिखरावर आपले गिर्यारोहक एक्कावन्न ते अठ्ठावन्न सालापर्यंत तीनदा चढले. गेल्या वर्षी ब्रिगेडियर ग्यानसिंग हा कांचनगंगा शिखरावर अठ्ठावीस हजार तीनशे फूट उंचीपर्यंत चढू शकला. पण प्रतिकूल हवेमुळे त्याला माघारी फिरावे लागले. अवघ्या पाच आठवड्यांपूर्वी चोवीस हजार आठशे अठ्ठावन्न फूट उंचीचे ' अन्नपूर्णा ' ( क्रमांक ३ ) हे शिखर लेफ्टनंट एम्. एस्. कोहली यांनी जिंकले. अशा रीतीने हिमालयाच्या निरनिराळ्या उत्तुंग शिखरांवर चढण्याचे महापराक्रम अनेक गिर्यारोहक एकामागून एक करीत असता, नीलकंठ शिखर जिंकण्याच्या कामी मात्र आजपर्यंत कोणालाही यश प्राप्त झाले नव्हते. ते अद्वितीय आणि अलौकिक यश मंगळवार, जून तेरा रोजी सायंकाळी सव्वापाच वाजता कॅप्टन एन्. कुमार ह्यांच्या संघातले तरुण गिर्यारोहक श्री. ओ. पी. शर्मा आणि त्यांचे दोन सहकारी ' शेर्पा ' ह्यांनी मिळवून भारताची कीर्ती दिगंत पसरवली आहे !

' नीलकंठ ' जिंकण्याचा प्रयत्न गेल्या पंचवीस वर्षांत सहा निरनिराळ्या वेळी होऊनही ते शिखर आतापर्यंत अजिंक्य राहिले होते. हा त्याचा इतिहास समजल्याखेरीज ओ. पी. शर्मा ह्यांनी गेल्या आठवड्यात मिळविलेल्या या अभूतपूर्व यशाचे महत्त्व उमगणार नाही. नीलकंठ चढण्याचा पहिला प्रयत्न १९३७ साली स्माईथ ह्या ब्रिटिश गिर्यारोहकाने केला. दक्षिणेच्या बाजूच्या कड्यावरून वर जाण्याचा त्याने प्रयत्न केला. पण तो कडा अगदी सरळ कापल्यासारखा उभा होता. तेव्हा त्याजवर चढणे सर्वस्वी अशक्य होते. त्यानंतर पूर्वेच्या बाजूने जाण्याचा त्याने प्रयत्न केला. पण तोही निष्फळ ठरला. त्यानंतर दहा वर्षांनी वायली नावाच्या दुसऱ्या एका ब्रिटिश गिर्यारोहकाने आग्नेय दिशेकडून आणि पश्चिम दिशेकडून अशा दोन्ही बाजूंनी या शिखरावर चढण्याचा प्रयत्न केला. पण तो एकोणीस हजार फुटांपेक्षा अधिक उंच वर चढू शकला नाही. त्यानंतर काही महिन्यांनी ' स्विस अल्पाईन क्लब'ची मंडळी ते शिखर चढण्याच्या उद्देशाने तेथे आली. त्यांनी सहा आठवडे त्या प्रदेशात खर्च केले. पण ते शिखर चढण्याचे धैर्य काही त्यांना झाले नाही.

१९५१ साली न्यूझीलंडचे सुप्रसिद्ध गिर्यारोहक सर एडमंड हिलरी ह्यांनी हे शिखर जिंकण्याचा दोनदा प्रयत्न केला, पण दोन्ही वेळेला ते सत्रा ते अठरा हजार उंचीपेक्षा अधिक वर चढू शकले नाहीत. त्यानंतर लागलेच पुढील वर्षी ब्रिटिश गिर्यारोहकांनी हे शिखर चढण्याचा तिसऱ्यांदा प्रयत्न केला. पण त्यांना हात हालवीतच परत जावे लागले. त्यानंतर सहावा प्रयत्न भारतीय हवाई दलाचे व्हाईस-मार्शल गोयल ह्यांनी दोन वर्षांपूर्वी केला. त्यांनी उत्तरेच्या बाजूने गिर्यारोहण करण्याचे ठरविले. पण ते एका बर्फाच्या सुळकेदार भिंतीच्या पायथ्याशी जे अडकून बसले, तेथूनच त्यांना विन्मुख होऊन मागे फिरावे लागले. सारांश, मोठमोठ्या अनुभवी आणि निष्णात गिर्यारोहकांनी निरनिराळ्या दिशेने 'नीलकंठ' जिंकण्याचा आजपर्यंत निकाराचा प्रयत्न केला असता त्यांपैकी कोणाच्याही पदरात यशाचे माप पडले नाही. ही गोष्ट लक्षात घेतल्यानंतर ओ. पी. शर्मा ह्यांनी केलेला हा दिग्विजय केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक गिर्यारोहणाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा आहे, असे कोण म्हणणार नाही ?

नीलकंठ जिंकण्याच्या निर्धाराने कॅप्टन कुमार आपल्या पाच सहकाऱ्यांसह बद्रीनाथहून ३१ मे रोजी निघाले. कॅ. कुमार हे एक लष्करी अधिकारी असून गेल्या वर्षी कांचनगंगा शिखरावर अठ्ठावीस हजार तीनशे फुटापर्यंत पोहोचलेल्या गिर्यारोहक संघामध्ये ते होते. त्यांच्या चार सहकाऱ्यांना गिर्यारोहणाचा पूर्वीचा अनुभव होता. फक्त ओ. पी. शर्मा हा सर्वांत तरुण असून त्याचे हे पहिलेच गिर्यारोहण होते. तो एका शाळेत शिक्षक असून दोन वर्षांपूर्वी त्याने दार्जिलिंग येथील 'हिमालय गिर्यारोहण संस्थे'चा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. शर्मा हा एक उत्कृष्ट गिर्यारोहक होईल असा तेनसिंगने पूर्वीच अभिप्राय दिलेला होता. ह्या मंडळींच्या बरोबर जे पाच 'शेर्पा' जाणार होते, त्यांचीही निवड स्वतः तेनसिंगनेच केली होती. एकतीस मे रोजी बद्रीनाथहून निघताना ह्या सर्व मंडळींनी तेथील देवळात जाऊन ईश्वराची भक्तिभावाने प्रार्थना केली आणि मंदिराच्या पुरोहिताकडून आशीर्वाद घेतले. भगवान शंकर खरोखरच त्यांना प्रसन्न झाले असले पाहिजेत. नाहीतर हवा अत्यंत प्रतिकूल असताना आणि बर्फाचे डोंगर समोरून मधून मधून कोसळत असताना ही सारी मंडळी दरकूच दरमजल करीत बारा दिवसांच्या आत एकवीस हजार दोनशे फुटांच्या उंचीवर सुरक्षितपणे पोहोचलीच नसती. तेथे या मंडळींनी आपली छावणी ठोकली. तेथून



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

नीलकंठाचे हिमशिखर अवघे चारशे चाळीस फूट उंच उरले होते. तेरा जूनला हे शेवटचे अंतर चढण्यासाठी ओ. पी. शर्मा दोन शर्पांना घेऊन मोठ्या धैर्याने निघाला. प्रत्येक पाऊल टाकताना त्यांनी आपले प्राण अक्षरशः मुठीत घेतले होते. एखादे पाऊल चुकले की, त्यांना गिळावयासाठी मृत्यू आपला भेसूर जबडा वासून खाली बसलाच होता. हळूहळू एकेक पाऊल टाकीत-टाकीत निश्चयाने-धडाडीने शर्मा पुढे नि शर्पा मागे दोघे असे ते तिघेजण-एकेक फूट-एकेक फूट चढत चढत नीलकंठाच्या रोखाने चालले होते खालच्या छावणीतून कॅप्टन कुमार आणि फ्लाईट लेफ्टनंट चौधरी डोळ्यांत प्राण आणून वर जात असलेल्या त्या बर्फामधल्या तीन ठिपक्यांकडे पाहात होते. प्रत्येक क्षण त्यांना युगायुगासारखा वाटत होता. आकाशातले सारे देव तो चमत्कार पाहण्यासाठी ढगाढगावर उतरून बसले होते. भगवान नीलकंठाचे हे लाडके शिखर शतकानु-शतके जीवकोटीतला कोणीही प्राणी जिंकू शकला नव्हता. तो अद्भुत पराक्रम विसाव्या शतकामधे करणारा हा धाडसी पुरुष कोण ते पाहण्याचे कुतूहल देवादिकांना वाटावे ह्यात आश्चर्य काय ?

तीन वाजले-चार वाजले-पाच वाजले-पहिला ठिपका नीलकंठाच्या अत्युच्च शिखराच्या अगदी जवळ जवळ पोहोचतो की काय, असा सर्वांना भास झाला. सगळ्यांनी आपले श्वास रोधले. त्यांच्या नाड्यांचे ठोके एकाएकी थांबले. डोळ्यातली बुबुळे एकदम थिजून अगतिक झाली. पाच वाजून पंधरा मिनिटांनी पहिला ठिपका नीलकंठाच्या शिखरावर उभा राहून भारताचा तिरंगी राष्ट्रध्वज हालवतो आहे, असे खालच्या छावणीतल्या त्याच्या सहकाऱ्यांना दिसताच त्यांच्या तोंडून 'भारतमाता की जय!' असा जयजयकार आपोआपच उचंबळला! आकाशातल्या देवांनी नीलकंठाच्या शीर्षावर उभ्या असलेल्या शर्माच्या नि शेर्पांच्या मस्तकावर हिमपुष्पांचा धवल वर्षाव केला! हिमालयाच्या सर्वांगावर खर्व खर्व रोमांच उठले. कांचनगंगा आणि गौरीशंकर ही त्याची अत्युच्च शिखरे हर्षाने बेहोष होऊन आपल्या हिमधवल माना डोलावू लागली. अष्ट दिशांच्या क्षितिजांवर उभ्या असलेल्या दिग्गजांनी आपल्या सोंडांच्या तुताऱ्यांतून वाजवलेल्या गगनभेदी वाद्यस्वरांबरोबर साऱ्या दिक्पालांच्या नि यक्ष-गंधर्व-किन्नरांच्या कंठांमधून एकाच सांघिक गीताचा गगनभेदी घोष गरजला,

'जय जय जय नीलकंठ।<br>
धन्य धन्य हे भारत!'

जय शर्मा । जय शेर्पा ।
जय कुमार । जय चौधरी ।
धन्य धन्य तेनसिंग ।
धन्य धन्य ग्यानसिंग ।
जय जय नीलकंठ ।
आज धन्य हे भारत ! ’

मराठा : २१-६-१९६१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम........................ दि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ....................

# २०

## आनंदवन

नागपूरपासून पासष्ट मैलावर चांदा जिल्ह्यात वरोडा नावाचे एक गाव आहे. ह्या गावाच्या बाहेर महर्षी आमटे ह्यांनी वसवलेली ' आनंदवन ' नावाची एक महारोग्यांची वसाहत आहे. ही वसाहत म्हणजे भारतातील एक चमत्कार आहे. सर्व रोगांत महारोग हा अत्यंत भयंकर रोग मानला जातो. म्हणूनच त्याला ' महारोग ' म्हणतात. मनुष्याला ह्या रोगाचा उपसर्ग झाला म्हणजे तो माणसाच्या समाजातून उठतो. बाप मुलाला ओळखत नाही. मुलगा आईला ओळखत नाही. नवरा बायकोला ओळखत नाही. बहीण भावाला ओळखत नाही. जिवलग नात्याचे सारे बंध तेथल्या तेथे नष्ट होतात. अशा महारोग्याने काय करावे? रस्त्यावर बसून भीक तरी मागावी नाही तर सगळ्या जगाच्या द्वेषांचे हालाहल पीतपीत मरेपर्यंत जगावे.

म्हणून महारोग्यांची सेवा करणे हे सर्वांत मोठे अग्निदिव्य समजले जाते. सामान्य माणसांचे ते काम नव्हे. महात्म्याखेरीज महारोग्याबद्दल कोणाला ममता वाटणार? आजपर्यंत तसा मुळी इतिहासच आहे. महर्षी आमटे हे अशा महात्म्यांच्या कोटीतले एक सत्पुरुष आहेत. आपला वकिलीचा धंदा ऐन उमेदीत सोडून देऊन ते आणि त्यांच्या पत्नी या उभयतांनी दहा-अकरा वर्षांपूर्वी ह्या महाकार्याला वाहून घेतले. आज त्यांच्या कार्याला एवढे विस्तृत स्वरूप प्राप्त झाले आहे की, साऱ्या जगाचें लक्ष त्यांच्या ह्या ' आनंदवना 'कडे लागले आहे, असे आम्ही म्हटले तर त्यात अक्षराचीही अतिशयोक्ती होणार

नाही. महारोग्यांना उपचार करणाऱ्या किंवा आश्रय देणाऱ्या भारतात किंवा जगात अनेक संस्था असतील. पण महर्षी आमटे ह्यांचे हे ' आनंदवन ' ही संस्था ह्या सर्व संस्थांपेक्षा वेगळी आहे. तिचे वैशिष्ट्य अभूतपूर्व आहे.

महारोग हा प्रारंभीच्या अवस्थेत वैद्यकीय उपचारांनी थांबतो. पण हाता-पायाचे अवयव एकदा झडले म्हणजे ते कसे दुरुस्त होणार ? त्यांची सांसर्गिकता फार झाले तर थांबवता येईल, पण अशा माणसांना समाजात प्रेमाने आणि विश्वासाने कोण परत घेणार ? एकदा एखाद्या माणसाला महारोग झाला असा बभ्रा झाला, म्हणजे मग तो बरा झाला तरी समाज त्याच्यावर बहिष्कार घालतो. अशा परिस्थितीत, महारोग्यांना वैद्यकीय उपचार करून किंवा त्यांना बरे करून त्यांची समस्या सुटत नाही. ही गोष्ट महर्षी आमटे ह्यांनी ओळखली. अशा रोग्यांना स्वावलंबनाचे आणि आत्मविश्वासाचे नवे जीवन दिले तरच त्यांना सुखाने शेवटपर्यंत आपले जीवन कंठिता येईल, ह्या दृष्टीने महर्षी आमटे ह्यांनी हे ' आनंदवन ' काढले. ह्या संस्थेतले रहिवासी ' महारोगी ' आहेत ही भावनाच त्यांनी ह्या वातावरणातून अजिबात खुडून टाकली आहे. त्यामुळे इतर महा-रोग्यांच्या संस्थांत जी भयानक कारुण्याची हवा पसरलेली आढळते, तिचा लवलेशही येथे भासणार नाही. नावाप्रमाणे खरोखरच अक्षरशः हे आनंदवन आहे. हात तुटलेला, पाय तुटलेला किंवा एखादा डोळा गेलेला माणूस जसा आपण भयंकर समजत नाही, त्याच दृष्टीने आणि भावनेने ह्या आश्रमात महारोग हे एक सामान्य व्यंग आहे असे समजून ते उपेक्षिले जाते. ह्या रोगावर आधुनिक पद्धतीचे जे वैद्यकीय उपाय आहेत ते यथासांग ह्या आश्रमात तर केले जातातच, पण त्याची निष्कारण वाच्यता केली जात नाही. महत्त्व त्या गोष्टीला दिले जात नाही. महत्त्व ह्या रोग्याभोवती आनंदाचे जीवन कसे निर्माण करता येईल त्याला आहे. ह्या दृष्टीने महर्षी आमटे ह्यांनी फार मोठी सिद्धी प्राप्त केली आहे.

दहा वर्षांपूर्वी चार रोग्यांनी ह्या आश्रमाला प्रारंभ झाला. आज येथे पाचशे रोगी असून ह्या वसाहतीचे एकंदर अडीचशे एकर क्षेत्रफळ आहे. चांदा जिल्ह्यातील जंगलातील ही मूळची खडकाळ जागा. पण त्या ठिकाणी महर्षी आमटे ह्यांनी आज नंदनवन उभे केले आहे. एखाद्या शेतकी कॉलेजात शेतीविषयक जे प्रयोग कोणी करीत नाही ते आज या वसाहतीमधे महारोग्यांच्या हातून म. आमटे हे करून घेत आहेत असे आम्ही सांगितले तर ऐकणारे थक्क

होतीऽ. ह्या सर्व वसाहतीत एकंदर दहा विहिरी खोदल्या आहेत, आणि त्यांचे पाणी निरनिराळी कारंजी बांधून सर्व परिसरात खेळविले आहे. ह्या शेतीमधून निर्माण न होणारी अशी एकही गोष्ट नसेल. कोथिंबिरीपासून तो उसापर्यंत सर्व पालेभाज्या आणि अन्नधान्ये येथे निर्माण होतात आणि तीदेखील असामान्य प्रकारची. इतकी की, प्रदर्शनात त्यांना पहिल्या नंबरची बक्षिसे मिळतील. येथील बटाटे आदर्श म्हणून दूर दूर ठिकाणाहून लोक घेऊन जातात. वांगी, दुध्या भोपाळ्याच्या आकाराची आणि मिर्च्या एक एक मुठीच्या आकाराच्या आम्ही डोळ्यांनी पाहिल्या. कोथिंबीर आणि कांदे तर असे भरत की त्यांचा सुगंध साऱ्या आसमंतात दरवळून राहिला होता. ऊस तर असा बेदरकारपणे डोलत होता म्हणता की वारे वा! सगळ्यात आम्हांला आश्चर्य वाटले गुलाबाच्या एका लहानशा रोपट्याचे. एका रोपट्याला सातशे गुलाबाची फुले. म्हणजे पाने जवळ जवळ नाहीतच. एका पाच सहा फूट उंच आंब्याच्या रोपट्याला मोहर आलेला आम्ही पाहिला. ही सगळी कामे आणि हे सगळे प्रयोग महर्षी आमटे हे महारोग्यांच्या हातून करून घेतात. कित्येकांना बोटे नसल्यामुळे त्यांना वस्तू उचलता येत नाहीत. त्यासाठी त्यांनी शेतीची निरनिराळी उपकरणे आणि आयुधे मुद्दाम बनवून घेतली आहेत. ती पाहून आम्ही थक्कच झालो. नेहमीच्या कोयत्याची किंवा खुरप्याची मूठ चार हजार वर्षे होऊन गेली तरी पाच इंच लांबीची आहे ती तशीच आहे. या ठिकाणी म. आमटे ह्यांनी चार चार फूट लांबीच्या काठ्यांच्या टोकांना ती उपकरणी बसविली आहेत. त्यामुळे महारोग्यांना वाकावे लागत नाही. उभ्या उभ्याच आरामाने त्यांना खुरपण्याचे किंवा कापण्याचे काम करता येते.

आनंदवनातले दूध, भाज्या नि धान्य बाहेर विक्रीला पाठवण्यात येते आणि त्याला सर्वत्र फार मागणी असते. अशा रीतीने स्वावलंबनावर ह्या संस्थेचा सर्व संसार उभारलेला आहे. शेतकीला उद्योगधंद्याची जोड देण्यात आलेली आहे. निरनिराळ्या वस्तूंसाठी एऱ्हवी जे पत्र्याचे डबे आपण वापरतो ते काम झाल्यावर फेकून देतो, ते जमा करून यंत्राच्या साहाय्याने त्याच्या निरनिराळ्या आकाराच्या वस्तू अगदी कोऱ्याप्रमाणे बनविण्याचा प्रयोग येथे सुरू झाला आहे. चाळण्या, कंदिल, पंचपाळी, रॉकेलचे पंप अतिशय झपाट्याने तयार केले जातात आणि किंमतीच्या दृष्टीने ह्या वस्तू स्वस्त असल्याने खेडेगावच्या लोकांची त्यांना फार मागणी येते. अशा रीतीने ‘ आनंदवन ’ ही महारोग्यांना

स्वावलंबी बनवून नवजीवन देणारी एक कृषि-उद्योगप्रधान संस्था आहे.

वसाहतीच्या सर्व भागांत अलग अलग बांधलेल्या अशा सुंदर आणि शोभिवंत इमारती आहेत. सर्व मिळून पाच लाखांचा तरी पसारा असेल. पण आश्चर्याची गोष्ट ही की, एवढ्या या अभूतपूर्व संस्थेला केंद्रीय सरकारने किंवा पूर्वीच्या मुंबई नि आता महाराष्ट्र सरकारने आजपर्यंत एका कवडीचीही मदत केलेली नाही किंवा कोणा धनिकाने वा श्रीमंताने तिला मोठमोठ्या देणग्याही दिलेल्या नाहीत. 'दान घेतले की कामाचा नाश होतो' असा महर्षी आमटे ह्यांचा सिद्धांत आहे. मग कोणी विचारील की हा पसारा म. आमटे ह्यांनी कशाच्या जोरावर उभारला? केवळ आपल्या जबरदस्त व्यक्तिमत्त्वाच्या जोरावर.

म. आमटे ह्यांचे व्यक्तिमत्व विलक्षण प्रभावी आहे. मानवतेचा जणू काही त्यांच्या अंगात संचार झालेला आहे. आपल्या कार्याने ते इतके झपाटून गेले आहेत की त्याव्यतिरिक्त त्यांना बाहेरच्या जगाचे भानच राहिलेले नाही. एखाद्या परमेश्वराच्या प्रेषिताप्रमाणे सदैव तंद्रीने आणि तल्लीनतेने ते बोलत असतात आणि चालत असतात. अशा या महापुरुषाची कीर्ती युरोप आणि अमेरिकेमध्ये दुमदुमत असताना ह्या देशात त्यांचे नावसुद्धा पुष्कळांना माहीत असू नये, ह्याचे आम्हांला दुःख होते. दूरदूरच्या देशांतून मोठमोठ्या मानवतावादी व्यक्ती आणि संस्था त्यांना शेकडो रुपयांचे साहाय्य करीत असतात हे पाहून तर आम्ही थक्कच झालो. अमेरिकेतील मोठमोठ्या अधिकारी व्यक्तींची त्यांच्या कार्याचा अमाप गौरव करणारी शेकडो पत्रे त्यांच्या फायलीत आहेत. ती आम्ही स्वतः वाचली आहेत. 'डॉ. आमटे' ह्या नावाने पाश्चात्त्य देशांतील वैद्यकीय नियतकालिकांत त्यांचा वारंवार उल्लेख होतो. त्याबाबत ते आम्हांला हसून म्हणाले की, "मी वकील होतो. मी काही डॉक्टर नाही. माझ्या नावाची आद्याक्षरे एक्त एम्. डी. आहेत. पण पाश्चात्त्य देशांत मी खरोखरीचा 'एम्. डी.' ठरलो आहे."

केंद्र सरकारने त्यांना मदत द्यावयाची तर बाजूलाच राहिली, पण अमेरिकेतल्या काही औषधांच्या कंपन्यांनी त्यांना तीन लाख रुपयांची औषधे मोफत पाठवतो असे कळविले, तर त्या औषधाच्या आयातीचा परवाना देण्याचे सुद्धा आमच्या केंद्र सरकारने नाकारले. म्हणजे आहे की नाही? हे तर काहीच नाही. अमेरिकेतील काही डॉक्टर्स आणि नर्सेस 'आनंदवना'त येऊन काही वर्षे राहावयास नि वैद्यकीय उपचार करण्यास तयार होते, त्यांना देखील केंद्र सरकारने

परवानगी दिली नाही. देशोदेशीचे अनेक अधिकारी लोक भारतात आल्यानंतर प्रथम 'ताजमहाल' पाहतात आणि नंतर वरोड्याला येऊन 'आनंदवन' पाहतात, ही कदाचित कोणाला दंतकथा वाटेल; पण त्यात अतिशयोक्तीचा लवलेश नाही. मागल्याच पंधरवड्यातली गोष्ट. स्वित्झरलंडचे भारतातील राजदूत स्वतः 'आनंदवना'त आले आणि त्यांनी आपल्या सरकारतर्फे तीस हजारांची देणगी महर्षी आमटे ह्यांच्या कार्याला दिली. त्या समारंभासाठी म. आमटे ह्यांनी पंडित नेहरूपासून तो यशवंतराव चव्हाणांपर्यंत निमंत्रणे धाडली. पण औपचारिक उत्तरापलीकडे कोणीही त्याची दखल घेतली नाही. स्वित्झरलंडच्या राजदूतांनी सबंध दिवस आणि अर्धी रात्र 'आनंदवना'त घालविली आणि महारोगी मंडळींनी केलेले नाटक पाहून अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांनी 'आनंदवना'चा निरोप घेतला.

काँग्रेसचे मंत्री आपल्या आश्रमासमोरून मोटरी उडवीत जातात, पण इथे आतमधे आम्ही काय करतो ह्यांची ढुंकूनसुद्धा वास्तपुस्त करीत नाहीत असे महर्षी आमटे ह्यांनी जेव्हा विषादाने आम्हाला सांगितले, तेव्हा आम्ही कडवट विनोदाने म्हणालो, 'ह्या मंत्र्यांना महारोग झाल्याखेरीज ते तुमच्याकडे कशाला येतील?' वाहवा! महर्षी आमटे म्हणजे विलक्षण सामर्थ्याचा नि योग्यतेचा महापुरुष आहे, आणि त्यांचे 'आनंदवन' म्हणजे मानवतेचे महन्मंगल तीर्थक्षेत्र आहे! त्यांचा निरोप घेताना आम्ही त्यांना कडकडून मिठी मारली आणि म्हणालो, 'ह्या आनंदवनात तुम्ही महारोगाला खरोखर मारून टाकले आहेत!' तेव्हा महर्षी आमटे ह्यांच्या तोंडून ईश्वरी वाणी उचंबळली. 'जेथे भीती असते तेथे प्रीती नसते, अंतःकरणातून भीतीला हाकलून दिल्या-खेरीज मानवावर प्रीती करता येत नाही!' महारोगावर रामबाण औषध अजून निघाले नाही म्हणतात. ठीक आहे. निघेल केव्हा तरी. पण महारोगाच्या यातनांचा विसर पाडून आनंदाचे नवजीवन देणारी एक अद्‌भुत संजीवनी महर्षी आमटे ह्यांनी या भारतात निर्माण केली आहे ह्यात काही शंका नाही. त्यांच्या जीवनाचे ब्रीदवाक्य असे आहे : 'मी देवाच्या शोधाला गेलो. देव मला सापडला नाही. मी आत्म्याच्या शोधाला गेलो. आत्मा मला सापडला नाही. मग मी माझ्या भावांच्या सेवेला गेलो. तेथे मला देवही दिसला नि आत्माही मिळाला.'

मराठा : १८-१२-१९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम.
अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

# पाचवा विभाग

मराठी ग्रंथ ... ठाणे. स्थळप्रत
वि: ...
नों. क्र: ...

१

# रंगभूमीचा राजराजेश्वर

'गणपतराव' हे नाव उच्चारल्याबरोबर आमच्या पिढीतल्या लोकांच्या डोळ्यांपुढे फक्त 'शाहूनगरवासी' चे 'गणपतराव जोशी' हे उभे राहात. अजूनही तेच होते. तसे म्हटले, तर त्या काळी गणपतराव भागवत आणि गणपतराव बोडस हे आपापल्या परीने अत्यंत श्रेष्ठ नट होऊन गेले. मराठी रंगभूमीवर आपल्या वैशिष्ट्यपूर्ण अभिनयाचा अविस्मरणीय ठसा त्या दोघांनी उमटविला, हे अगदी खरे. पण 'गणपतराव' म्हणजे 'गणपतराव जोशी' हे अगदी अविभाज्य समीकरण त्या काळी ठरून गेल्यासारखे होते; छत्रपती शिवाजीमहाराजांसारखा क्रांतिकारक वीरपुरुष साऱ्या जगात आजपर्यंत कधी झाला नाही; लोकमान्य टिळकांपेक्षा महान द्रष्टा नेता ह्या भारतवर्षात आजपावेतो होऊन गेला नाही; बालगंधर्वांसारखी स्वरदेवता महाराष्ट्रातच काय पण या देशात अद्याप जन्माला आलेली नाही; आणि भारताच्या रंगभूमीवर गणपतरांव जोश्यांसारखा नटसम्राट आजतागायत अवतरलेला नाही. अशा मराठी माणसाच्या चार वज्रलेप श्रद्धा आहेत. त्या अढळ आणि अपरिवर्तनीय आहेत. त्याला काय करायचे? शौर्य, साधुत्व आणि नाट्य ह्या तीन गुणांवर महाराष्ट्र आपला जीव नेहमीच ओवाळून टाकीत आलेला आहे. म्हणूनच भारतातील इतर सर्व प्रांतांच्या आधी जवळ जवळ सवाशे वर्षांपूर्वी मराठी नाटक महाराष्ट्रात जन्माला आले. त्यानंतर सदतीस वर्षांनी गद्य आणि संगीत नाटक मंडळ्यांचा जमाना सुरू झाला. १८८० साली अण्णासाहेब किर्लोस्करांनी आपली

‘ किर्लोस्कर संगीत मंडळी ’ स्थापन केली. तर १८८१ साली ‘ श्रीशाहूनगरवासी ’ ही गद्य नाटक मंडळी साताऱ्याचे कृष्णाजी बजाजी जोशी ह्यांनी सुरू केली. त्याच वर्षी वयाच्या चौदाव्या वर्षी गणपतराव जोशी त्या मंडळीत दाखल झाले.

गणपतरावांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर येथे दि. १५ ऑगस्ट १८६७ रोजी झाला. त्याला उद्या बरोबर शंभर वर्षे पूर्ण होत असल्याने त्यांचा जन्मशताब्दिमहोत्सव महाराष्ट्रात सर्वत्र अत्यंत उत्साहाने साजरा होत आहे. गणपतराव उंच नव्हते. त्यांचा बांधा ठेंगणा, ठुसका नि ठसठशीत होता. रंग गोरापान. भुवया कमानदार. आवाज खाळसेदार आणि वाणी अस्खलित. लहानपणी गणपतरावांना गीता पाठ करण्याचा अभ्यास होता. म्हणून त्यांच्या आवाजात गोडवा आणि वाणीत अस्खलितपणा निर्माण झाला असे म्हणतात. वयाच्या पंचविसाव्या वर्षांपर्यंत गणपतरावांनी अनेक निरनिराळ्या नाटकांत कामे केली. तथापि, तोपर्यंत त्यांच्या महान अभिनयाचा साक्षात्कार महाराष्ट्राला झालेला नव्हता. पण १८९२ साली पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातील इंग्रजीचे विख्यात प्राध्यापक वासुदेवराव केळकर ह्यांचा गणपतरावांशी संबंध आला. प्रा. केळकर ह्यांचा शेक्सपीअरच्या नाटकांचा व्यासंग फार दांडगा होता. त्यांनी ‘ Taming of the Shrew ’ चे त्राटिका हे भाषांतर करून ते गणपतरावांना बसविण्यास दिले. त्या नाटकात गणपतराव ‘ प्रतापरावा ’ची भूमिका अत्यंत बहारीची करीत. तेव्हापासून त्यांच्या नावाचा बोलबाला महाराष्ट्रात होऊ लागला. बाळाभाऊ जोग नावाचे एक स्त्रीभूमिका करणारे तुल्यगुणी नट गणपतरावांना लाभले होते. ते नायिकेच्या भूमिका विलक्षण तडफेने करीत. त्यामुळे थोड्याच दिवसांच्या आत ‘ शाहूनगरवासी ’ नाटक मंडळीचे आणि गणपतराव –बाळाभाऊ ह्या जोडीचे नाव साऱ्या महाराष्ट्रात ज्याच्या त्याच्या तोंडी झाले.

तथापि, ‘ हॅम्लेट ’ नाटकाने गणपतरावांना कीर्तीच्या शिखरावर नेऊन बसविले, ते अगदी कायमचे. फर्ग्युसन कॉलेजचे प्रिन्सिपल गोपाळराव आगरकर ह्यांनी डोंगरीच्या तुरुंगात असताना शेक्सपीअरच्या ‘ हॅम्लेट ’चे ‘विकारविलसित’ ह्या नावाचे एक भाषांतर केलेले होते. प्रा. केळकर ह्यांच्या सांगण्यावरून गणपतरावांनी ते नाटक बसविण्यास घेतले. हॅम्लेटच्या भूमिकेची सर्व मर्मस्थाने प्रा. केळकरांनी गणपतरावांना समजावून दिली. कोणत्या प्रसंगी कसा अभिनय केला पाहिजे, ह्यासंबंधी त्यांनी त्यांच्याशी चर्चा करून त्याचे यथायोग्य मार्गदर्शन केले.

सारांश, प्रा. केळकरांनी गणपतरावांच्या रोमरोमांत ' शेक्सपीअर ' भिनवला आणि गणपतरावांच्या रूपाने मराठी रंगभूमीवर ' महाराष्ट्राचा गॅरिक ' निर्माण केला. गणपतरावांचा ' हॅम्लेट ' रंगभूमीवर येताच त्यांच्या कीर्तीचे चौघडे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर महाराष्ट्राबाहेर दुमदुमू लागले. केवळ मराठी प्रेक्षकच नव्हे तर ज्यांची मातृभाषा मराठी नव्हती किंवा ज्यांना मराठीचे एक अक्षरही समजत नव्हते, असे इंग्रज अधिकारीसुद्धा गणपतरावांची ' हॅम्लेट ' ची भूमिका पाहून बेहद्द खूष होऊ लागले. इंग्रजी वृत्तपत्रांनी तर त्यांच्या त्या भूमिकेवर स्तुतिसुमनांचा वर्षाव केला. त्यानंतर गणपतराव म्हणजे हॅम्लेट आणि हॅम्लेट म्हणजे गणपतराव असे एक अभेद्य समीकरणच महाराष्ट्रात होऊन बसले. ' हॅम्लेट ' खेरीज ' त्राटिका, ' ' झुंझारराव ', ' तुकाराम ', ' राणा भीमदेव ' आणि ' पन्नारत्न ' ही गणपतरावांची नाटके महाराष्ट्रात खूपच गाजली. पण ' हॅम्लेट 'ची सर कशालाच आली नाही. गणपतरावांच्या पूर्वी महाराष्ट्राला जसा ' हॅम्लेट ' पाहावयाला मिळाला नाही, त्याप्रमाणे गणपतरावांसारखा ' हॅम्लेट ' महाराष्ट्राला त्यांच्यानंतर पुन्हा पाहावयास मिळणार नाही, ही अगदी काळ्या दगडावरची रेघ आहे. गणपतरावांची ' हॅम्लेट ' ची भूमिका ही अविस्मरणीय आणि अमर होती ह्यात काय शंका !

प्रा. केळकर ह्यांनी ' हॅम्लेट ' ची भूमिका करणाऱ्या गणपतरावांच्या वेषभूषेत फार महत्त्वाचा फरक केला. तत्पूर्वी आपल्या सर्व भूमिका गणपतराव हे लांब शेंडी आणि घेरा डोक्यावर ठेवूनच करीत असत. प्रा. केळकरांनी त्यांचा घेरा नि शेंडी ' कटाप ' केली नि त्यांना इंग्रजी पद्धतीचे केस ठेवावयाला लावले. तेव्हापासून मराठी रंगभूमीवर, तोच प्रघात पुढे पडला. आम्हांला जेव्हा समजू लागले तेव्हा गणपतराव हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत होऊन बसलेले होते. मराठी रंगभूमीच्या आकाशात एखाद्या देदीप्यमान तारकापुंजाप्रमाणे ते झळकत होते. १९१२ साली म्हणजे आमच्या वयाच्या चौदाव्या वर्षी आम्ही पुण्याच्या ' किर्लोस्कर नाटकगृहा'त गणपतरावांचे ' हॅम्लेट ' नाटक प्रथम पाहिले. त्या वेळी गणपतराव पंचेचाळीस वर्षांचे होते. ' शाहूनगरवासी ' च्या ' तुकाराम, ' ' राणा भीमदेव ' आणि ' पन्नारत्न ' या सुप्रसिद्ध नाटकांचे कर्ते वासुदेव रंगनाथ शिरवळकर हे ' भावे स्कूल ' मधील आमच्या पाचव्या इयत्तेचे वर्गशिक्षक होते. ते वर्गात पुष्कळदा आपल्या नाटकांची वा कादंबरीची मुद्रिते तपाशीत बसत. त्यामुळे त्यांच्याबद्दल आमच्या मनात एक अद्भुतरम्य आकर्षण निर्माण झाले

होते. त्यांच्याशी लांगूलचालन करून आम्ही 'हॅम्लेट' नाटकाचे सहा आण्याच्या रांगेतले दोन फुकट पास मिळवले. एक स्वतःसाठी आणि दुसरा आमच्या एका दोस्तासाठी. नाटकगृह तुडुंब भरून गेले होते. गणपतरावांना पाहण्यासाठी डोळ्यात प्राण आणून आम्ही दाटीवाटीने कसे तरी बसलो होतो. पडदा वर गेला. नाटक सुरू झाले. पहिल्या प्रवेशात 'हॅम्लेट'चे काम नाही. तो संपून राजाच्या दरबाराचा प्रवेश सुरू झाला. त्यात एका बाजूला गंभीर नि विषण्ण मुद्रेने बसलेल्या 'हॅम्लेट' च्या भूमिकेत आम्ही गणपतरावांना प्रथम पाहिले. 'गणपतराव—गणपतराव' असा सबंध नाटकगृहात एकच कुजबुजाट झाला. आणि टाळ्यांच्या सौम्य कडकडाटाने प्रेक्षकांनी गणपतरावांचे स्वागत केले.

गणपतरावांना पाहून सकृद्दर्शनी आमची मात्र निराशा झाली. त्यांचे पोट त्या वेळी सुटले असल्याने, ते जास्त स्थूल दिसत होते. डोक्यावर कसाबसा फेटा गुंडाळलेला. चेहरा वाटोळा. मिश्या पडक्या. अंगात पांढरा अंगरखा. पायांत सुरवार नि चढाव. अशा स्वरूपातले त्यांचे ते दर्शन आम्हांला विशेष आकर्षक वाटले नाही. त्या प्रवेशात त्यांना एकच स्वगत वाक्य आहे. 'एकच मात्रा जास्त झाली. नाहीतर पक्का काकच होतास' त्याखेरीज, दोन तीन भाषणे आहेत. पण ती गणपतराव इतक्या साधेपणाने आणि उपेक्षेने बोलले की, त्यामुळे आम्ही जास्तच खट्टू झालो. तो प्रवेश संपला. आणि फेटा—अंगरखा फेकून देऊन नुसत्या सदरा, जाकिट, सुरवारीत गणपतराव बाहेरच्या पडद्यावर प्रविष्ट झाले आणि 'हे कठोर मांस जर झडून जाईल तर फार फार बरे होईल!' हे स्वगताचे पहिलेच वाक्य त्यांनी उच्चारले मात्र! सर्वांगातून एकदम वीज चमकून जावी तशी साऱ्या प्रेक्षकांची स्थिती झाली. आम्हांला तर आमच्या धमन्यांतले रक्त जागच्या जागी गोठल्यासारखे वाटले. आणि पायापासून डोक्यापर्यंत झिणझिण्या उठल्या. खऱ्या गणपतरावांचा साक्षात्कार ते स्वगत ऐकताना आम्हांला प्रथम झाला. त्यांच्या त्या अलौकिक अभिनयाचे वर्णन शब्दांनी कसे आणि किती करावे?

गणपतरावांच्या आवाजाचा धर्मच मुळी निराळा होता. त्यांच्या आवाजात यत्किंचितही कर्कशपणा नसून तो इतका गोल, बांधेसूद आणि नादपूर्ण होता, की तो तिसऱ्या मजल्यावरच्या प्रेक्षकांना स्पष्टपणे ऐकू येत असे. स्वराची वरखाली आंदोलने घेताना त्यांच्या मुद्रेवर कसलेही श्रम किंवा ओढाताण दिसून येत नसे. त्यामुळे डोळ्यांत किंवा चेहऱ्यावर निरनिराळ्या भावनांचे प्रतिबिंबित झालेले

स्पष्ट आविष्कार प्रेक्षकांना स्पष्टपणे पाहावयास मिळत. शब्दांमध्ये जो जो रस असेल तो तो प्रकट करण्यासाठी त्या त्या शब्दांवर आघात देण्याची गणपतरावांची लकब तर अवर्णनीय होती. गणपतराव बोलू लागले किंवा हलू लागले की, प्रेक्षकांच्या डोळ्यांना त्यांच्याखेरीज काही दिसत नसे नि त्यांच्या कानांना त्यांच्या भाषणाखेरीज दुसरे काहीही ऐकू येत नसे. हजारो प्रेक्षकांचे अवधान, एवढ्या एकाग्रतेने स्वतःकडे खेचून घेण्याचे गणपतरावांचे सामर्थ्य जबरदस्त होते. चवथ्या प्रवेशात हॅम्लेटला आपल्या बापाचे भूत दिसते, त्या वेळचा गणपतरावांचा अभिनय बघून प्रेक्षकांच्या अंगावर काटा उठे आणि आपण साक्षात भूतच पाहात आहोत असे वाटे. तिसऱ्या अंकातले 'जगावे का मरावे' हे स्वगत बोलताना आति त्यानंतर वेडाचे सोंग पांघरून ऑफेलियाला 'मठात जा—मठात जा' हे रुद्ध कंठातले शब्द उच्चारताना गणपतराव प्रेक्षकांची हृदये अक्षरशः दुभंग करीत असत. त्यानंतर पुढच्या प्रवेशात 'नाटकातले नाटक' होते. ते पाहताना चुलत्याने केलेल्या आपल्या पित्याच्या खुनाचे रहस्य आपोआपच प्रकट होते, ते पाहून हॅम्लेटला जो अपरंपार आनंद होतो तो आपल्या मित्राजवळ व्यक्त करताना गणपतराव एखाद्या वीस वर्षांच्या तरुणासारखे नाचत अन् खिदळत असत. त्या वेळी प्रेक्षकांच्या टाळ्यांचा एवढा प्रचंड कडकडाट होई, की नाटकगृह कोसळते की काय असे वाटे.

आईच्या महालातला प्रवेश हा गणपतरावांच्या अभिनयाचा उच्चांक होता. त्या प्रवेशात आधी पोलोनीयसचा 'खून', नंतर 'हे चित्र पाहा नि हे चित्र पाहा' हे ज्वलंत भाषण अन् नंतर पित्याचे भूत प्रगट होणे ही त्या प्रवेशाची तीन शिखरे होत. ह्या तिन्ही प्रसंगी गणपतरावांच्या अभिनयपराकाष्ठेची तीन विविध आणि विदारक स्वरूपे पाहून प्रेक्षकांच्या काळजाचे अक्षरशः पाणी पाणी होत असे. पाचव्या अंकातल्या स्मशानामधल्या पहिल्या प्रवेशात 'येऱ्या'ची कवटी हातात धरून जीवनाचे भयानक तत्त्वज्ञान जेव्हा गणपतराव प्रेक्षकांना सांगत—विशेषतः उजव्या बाजूच्या गॅलरीत बसलेल्या वेश्यांना उद्देशून—की, "जन्मभर तुम्ही आपल्या तोंडाची कितीही रंगरंगोटी केलीत तरी अखेर शेवटी तुमची ही स्थिती होणार!" तेव्हा सर्वांगाचा थरकाप होत असे.

गणपतरावांची हॅम्लेटची भूमिका पहिल्यापासून शेवटपर्यंत एवढी चढत जाई आणि त्यांच्या अभिनयाचे विविध चमत्कार पाहून प्रेक्षक इतके मंत्रमुग्ध होत की, 'असा नट पूर्वी झाला नाही आणि पुढे होणार नाही' असे झोपेतून

उठलेल्या माणसासारखे तोंडातल्या तोंडात पुटपुटत प्रेक्षक नाटकगृहाबाहेर पडत. असा कोणताही रस नव्हता किंवा अशी कोणतीही भावना नव्हती, की जी गणपतराव आपल्या स्वरातून आणि मुद्रेतून प्रकट करू शकत नव्हते. ' हॅम्लेट ' नाटकातील एक नाटकी पात्र ज्याप्रमाणे म्हणते की, " नटाने आपल्या भाषणाला सुरुवात केली की आपली मनोवृत्ती अशी पालटून टाकावी, की अश्रू म्हटले की अश्रू, ग्लानी म्हटली की ग्लानी, गहिवर म्हटला की गहिवर—सारांश, अर्थांतराप्रमाणे कपाळ, डोळे, भुवया, तोंड आणि आवाज ही त्याला वाटेल तशी करता यावीत, " यातच जणू काही गणपतरावांच्या अभिनयाचे सारसर्वस्व आले असे म्हणावयाला हरकत नाही. त्यामुळेच गणपतरावांच्या हयातीत ते स्वतःच अनेक दंतकथांचा विषय होऊन बसले.

पण दुर्दैवाने गणपतरावांच्या गुणांपेक्षा त्यांच्या दुर्गुणांचा बभ्रा जास्त झाला. महाराष्ट्रात गुणग्राहकापेक्षा कुटाळखोर लोक फार. गडकऱ्यांच्या दारूपेक्षा गणपतरावांच्या दारूबाजीवर अरबी भाषेतल्या सुरस नि चमत्कारिक गोष्टीपेक्षाही जास्त कपोलकल्पित कथा रचण्यात आल्या. म्हणे, नाटक सुरू होण्याच्या आधी गणपतराव दारू पिऊन एवढे बेहोष होत की, त्यांना त्या दिवशी कोणते नाटक आहे ह्याचे मुळी भानच नसे. मग ' आज तुकाराम आहे किंवा हॅम्लेट आहे ! ' असे त्यांच्या कानांत ओरडून त्यांना रंगभूमीवर ढकलण्यात येई. तेव्हा मग ते त्या नाटकाचे संवाद म्हणे बोलू लागत. असल्या धादांत बनावट गोष्टी रचून सांगणारे आणि त्यावर विश्वास ठेवणारे चांडाळ कोण असतील ते असोत. शतकाशतकातून एकदाच जन्मास येणाऱ्या गणपतरावांसारख्या युगप्रवर्तक नटाची अशी खोडसाळ बदनामी करणाऱ्या अधमाधमांची अक्षरशः मुस्काटेच फोडावयाला पाहिजेत. असो.

गणपतराव वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी ७ मार्च १९२२ रोजी मुंबईमधे निधन पावले. अभिनयाखेरीज त्यांनी कशाचीही पर्वा केली नाही. न नेपथ्याची, न वेषभूषेची. पांढऱ्या धोतराचे पडदे करून त्यावर त्यांनी आपली नाटके तेवढ्याच यशस्वितेने करून दाखविलेली आहेत. ते अभिनयाचे बादशहा होते. नाट्यकलेचे सम्राट होते. मराठी रंगभूमीच्या ह्या राजराजेश्वराच्या चरणी त्यांच्या जन्माशताब्दिमहोत्सवाच्या प्रसंगी आमची अनंत लोटांगणे !

मराठा : १५-८-१९६७

# २

## बालगंधर्व साठ वर्षांचे झाले

काल रोजी श्री. नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण होऊन त्यांना एकसष्ठावे वर्ष लागले. याबद्दल बालगंधर्वांचे अभिनंदन करावे का आपल्या सौंदर्याने दोन अडीच तपे महाराष्ट्राला वेड लावणाऱ्या या स्वर्गीय कलावंताच्या जीवनावर वार्धक्याचा ' कृतान्तकटकामलध्वज ' यापुढे जाहीरपणे फडकू लागणार म्हणून दुःख व्यक्त करावे हे आम्हांला कळत नाही तारुण्य आणि सौंदर्य या कल्पनांशी बालगंधर्वांचे जीवित आणि व्यक्तिमत्त्व इतके निगडित होऊन बसलेले आहे की त्या व्यक्तिमत्त्वाला वार्धक्याचा उपसर्ग लागणे हा विचारसुद्धा मनाला सहन होत नाही. त्यातून बालगंधर्वांच्या नावातल्या ' बाल ' या विशेषणाने तर जणू काही त्यांना चिरतारुण्याचे वरदानच प्राप्त झाले आहे किंवा काय असाच सर्वसामान्य समज होऊन बसलेला आहे. कामिनीला जरा प्राप्त होणे हे सप्तशल्यांपैकी एक शल्य आहे असे भर्तृहरीने नमूद करून ठेवले आहे. त्याच न्यायाने स्त्रीरूपाने इतकी वर्षे महाराष्ट्राला मोहिनी घालणाऱ्या या रूपसुंदर नटाला वृद्धापकाळ यावा ही गोष्टही तीव्र शल्याप्रमाणे आमच्या अंतःकरणाला टोचते आहे. काही काही गोष्टींना काळाचा दाहक हात लागू नये असेच आपल्याला वाटते. गुलाबाच्या फुलांनी कधीही कोमेजू नये, फुलपाखराच्या पंखावरची रंगभूषा कधीही विटू नये, झाडमाथ्यावर नाचणारी सकाळची पिवळी तांबूस उन्हे कधीही प्रखर होऊ नयेत अशीच आपली अपेक्षा असते. त्याचप्रमाणे आसामान्य प्रतिमेच्या कलावंतांना चिरकालीन तारुण्याची देणगी मिळावी अशी

आपण इच्छा करतो. पण मृत्यूने ग्रासलेल्या या पृथ्वीतलावर तसे कोठून होणार? ज्या लोकात मृत्यू नसतो त्या लोकातच वार्धक्य नसते. स्वर्गातले देव अमर आहेत म्हणूनच ते अजर आहेत. मर्त्य माणसांच्या जगात अगदी देवाच्या प्रतिष्ठेला जाऊन पोहोचलेल्या व्यक्तींनाही वार्धक्य चुकवणे अशक्य असते. म्हणून बालगंधर्व वृद्ध झाले ही गोष्ट कितीही असह्य वाटत असली तरी ती अपरिहार्य आहे हेच खरे. ' म्हातारे फुलपाखरू ' हा शब्दप्रयोग जसा अशक्य वाटतो तसा ' वृद्ध बालगंधर्व ' हा शब्दसमुच्चयही मनाला असंभाव्य वाटतो. बालगंधर्वांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली या कल्पनेने डोळ्यांत अश्रू उभे राहण्याइतक्या जरी आम्हांला यातना होत असल्या तरी तशा खिन्न आणि व्याकुळ मनःस्थितीतही बालगंधर्वांच्या एकसष्ठाव्या वर्षी आम्ही त्यांचे अन्तःकरणपूर्वक अभिनंदन करतो.

बालगंधर्वांच्या वैभवाचा आणि पराक्रमाचा बहुतेक सर्व काळ आम्हांला डोळ्यांनी प्रत्यक्ष पाहावयाला मिळाला याबद्दल आम्हांला धन्यता वाटते. लोकमान्य टिळकांकडून ' बालगंधर्व ' ही पदवी मिळवून एकोणिसशेपाच साली नारायणरावांनी किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रथम प्रवेश केला त्या वेळी त्यांचे वय सतरा वर्षांचे होते. आपल्या नैसर्गिक सौंदर्यामुळे आणि कंठमाधुर्यामुळे अगदी रंगभूमीवर पाऊल टाकल्यापासून बालगंधर्वांनी रसिकांची अंतःकरणे जिंकली ही गोष्ट जरी खरी असली तरी एकोणीसशे अकरा साली कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांचे ' मानापमान ' नाटक रंगभूमीवर आल्यापासूनच बालगंधर्वांच्या असामान्य लोकप्रियतेची कारकीर्द खरी सुरू झाली असे म्हणावयाला हरकत नाही. या नाटकातल्या त्यांच्या भामिनीच्या अभिनयाने आणि गायनाने महाराष्ट्राला अक्षरशः वेड लावले आणि त्याच वेळी महाराष्ट्राने त्यांना प्रथम डोक्यावर उचलून घेतले. तो काळ अद्यापही आमच्या डोळ्यांसमोर दिसतो आहे.

त्यानंतर अवघ्या दोनच वर्षांनी किर्लोस्कर नाटक मंडळीतून ते निघाले आणि त्यांनी स्वतःच्या गंधर्व नाटकमंडळीची स्थापना केली. तेव्हापासून सतत दोन तपे बालगंधर्वांनी मराठी रंगभूमिवर एखाद्या सम्राटाप्रमाणे राज्य केले आणि वैभव उपभोगले. हा सर्व कालखंड एखाद्या चित्रपटाप्रमाणे यावेळी आमच्या डोळ्यांसमोरून सरकतो आहे.

आधुनिक काळामध्ये एवढी पराकाष्ठेची आणि इतकी दीर्घकालीन लोकप्रियता मिळविणारे बालगंधर्व हे भारतवर्षातील एकमेव कलावन्त असावेत अशी आमची

समजूत आहे. लोकप्रियतेचा कोणताही उच्चांक मोडावयाचा बालगंधर्वांनी बाकी ठेवला नाही. महाराष्ट्राने बालगंधर्वांवर जेवढे प्रेम केले आणि त्यांचे जेवढे लाड पुरवले तेवढे त्याने दुसऱ्या कोणत्याही कलावंताचे आजपर्यंत कधीही पुरवले नसतील. एखाद्या दैवताचीदेखील जेवढ्या भक्तिभावाने कोणी उपासना केली नसेल, तेवढी महाराष्ट्राने बालगंधर्वांची मनोभावाने आणि एकनिष्ठेने पूजा केली. किंबहुना बालगंधर्व हे जवळजवळ दोन पिढ्यांपर्यंत महाराष्ट्रीय जीवनाचा एक अपरिहार्य भागच होऊन बसले होते. या काळात लोक घराघरांतून बालगंधर्वांची गाणी ऐकत होते नि गुणगुणत होते आणि स्त्रिया बालगंधर्वांच्या रंगभूमीवरील वेषभूषेचे अनुकरण करून आपल्या पतींची मने आकर्षित करीत होत्या. त्या दृष्टीने बालगंधर्वांनी महाराष्ट्राच्या जीवनावर फार मोठा परिणाम करून ठेवलेला आहे यात मुळीच संशय नाही. नाटक हे जीवनाचे प्रतिबिंब आहे असे समजले जाते. पण त्याच्या उलट गेल्या दोन पिढ्यांतील महाराष्ट्राच्या जीवनात पुष्कळ अंशी बालगंधर्वांच्या नाटकांचे प्रतिबिंब पडलेले आहे. महाराष्ट्राच्या डोक्यावर गांधी टोपी विराजमान होण्यापूर्वी गंधर्व टोपी झळकत होती. हे आज कदाचित पुष्कळांच्या स्मरणातही नसेल. कोणत्या कलावन्ताचा एवढा सन्मान आजपर्यंत महाराष्ट्राने केलेला आहे ?

गेल्या दहा-पंधरा वर्षांत बालगंधर्वांची स्त्रीभूमिका ज्यांनी पाहिली आहे त्यांना बालगंधर्वांच्या असामान्य लोकप्रियतेचे रहस्य कळू शकणार नाही. बालगंधर्वांच्या आवाजात पूर्वीची कोमलता आणि माधुर्य अलीकडे तितकेसे जरी राहिलेले नसले तरी अजूनही कधीकधी ते आपल्या पूर्वीच्या स्वर्गीय गायनाची आठवण करून देतात. तथापि त्यांच्या चेहऱ्यात आणि आकृतीत वयोमानाप्रमाणे पुष्कळच फरक पडल्यामुळे आज त्यांच्याकडे बघणारांना त्यांच्या पूर्वीच्या रूपसंपदेचा प्रत्यय येणे कठीण आहे. म्हणून आजच्या तरुण पिढीला बालगंधर्वांचे सौंदर्य ही एक कपोलकल्पित कथा वाटते. पण वस्तुस्थिती तशी नव्हती. बालगंधर्व रस्त्यातून पायाने जाऊ लागले म्हणजे त्यांना पाहावयाला स्त्रियांचे थवेच्या थवे जमत हे आम्ही स्वतः डोळ्यांनी पाहिले आहे. जवळ जवळ चाळिशी उलटेपर्यंत बालगंधर्वांनी आपले शरीरसौंदर्य शाबूत ठेवले होते. बोलपटाचे युग सुरू झाल्यापासून आणि रुपेरी पडद्यावर नटींचे चेहरे दिसू लागल्यापासून स्त्रीभूमिका करणाऱ्या पुरुष-नटांबद्दल लोकांना तितके कौतुक वाटेनासे झाले; म्हणून अलीकडच्या पिढीला बालगंधर्वांविषयी विशेष आकर्षण वाटत नसल्यास नवल

नाही. पण बालगंधर्वांनी आपल्या मोहक सौंदर्याने आणि आकृतिसौष्ठवाने महाराष्ट्रातील आबालवृद्धांना अनेक वर्षेपर्यंत मोहिनी घातली होती यात मुळीच संशय नाही. ही गोष्ट आम्ही पाहिली आहे आणि अनुभवली पण आहे.

किर्लोस्कर नाटक मंडळीमध्ये बालगंधर्व येण्यापूर्वी मुख्य स्त्रीभूमिका भाऊराव कोल्हटकर हे करीत होते. त्यांच्याही निरुपम सौंदर्याबद्दल आणि मादक स्वर-माधुर्याबद्दल जुन्या पिढीतील वृद्ध गृहस्थांच्या तोंडून आम्ही पुष्कळ अद्‌भुतरम्य वर्णने ऐकलेली आहेत. तथापि आम्ही भाऊरावांना पाहिले किंवा ऐकले नसल्यामुळे त्याविषयी आम्ही काही सांगू शकत नाही. पण मराठी रंगभूमीवर स्त्रीभूमिक करणारे जे जे प्रसिद्ध पुरुष-नट होऊन गेले त्या सर्वांमध्ये आकृतीच्या आणि आवाजाच्या दृष्टीने बालगंधर्वांना निसर्गाची अधिक अनुकूलता होती असे म्हणावयास हरकत नाही. बालगंधर्वांच्या तोंडवळ्याची कोमल ठेवण, त्यांची रेखीव शुभ्र दंतपङ्क्ती, त्यांच्या गालावरच्या गोड खळ्या आणि त्या खळ्यांमध्ये खेळणारे मोहक हास्य, त्यांची मान आणि हनुवटी हलवण्याची लचकदार पद्धती आणि त्यांच्या हालचालीतील तरलमधुर हास्य यामुळे एखाद्या जातिवंत स्त्रीपेक्षाही बालगंधर्वांची स्त्रीभूमिका अधिक खरीखुरी आणि आकर्षक वाटत असे.।

बालगंधर्वांच्या गायनाइतकेच त्यांचे अभिनयकौशल्यही असामान्य होते-त्यामुळे कोणत्याही नाटकात रंगभूमीवर प्रवेश करताक्षणीच प्रेक्षकांची अंतःकरणे ते एकदम आकर्षून घेत. बालगंधर्व हे नुसतेच स्वरसम्राट नव्हते, तर ते नटसम्राटही पण होते. कित्येक वेळा नुसत्या दृष्टिपाताने किंवा अभिनयाने अथवा एखाद्या वाक्याच्या उच्चाराने ते प्रेक्षकांकडून टाळ्यांच्या कडकडाटाचा नजराणा घेत, हे अनेक उदाहरणे देऊन सिद्ध करता येईल. त्यांनी उच्चारलेल्या कित्येक नाटकातील काही काही वाक्यांचे आणि शब्दांचे पडसाद इतकी वर्षे होऊन गेली तरी अद्यापिही आमच्या कानांत घुमत आहेत. 'सौभद्र' नाटकातील प्रेमविव्हल सुभद्रा, 'मृच्छकटिका'तील अभिसरणोत्सुक वसंतसेना, मानापमानातील उच्छृंखल भामिनी, 'स्वयंवरा'तील शृंगारमूर्ती रुक्मिणी, 'संशयकल्लोळा'-तील थट्टेखोर रेवती आणि 'एकच प्याल्या'तील कारुण्यमूर्ती सिंधू या विविध भूमिका मराठी रंगभूमीवर बालगंधर्वांनी अमर करून ठेवल्या यात मुळीच संशय नाही.

ज्या मराठी रंगभूमीचा पाया अठराशे त्रेचाळीस साली विष्णुदास भावे यांनी सांगली येथे घातला आणि ज्या रंगमंदिराच्या भिंती अण्णासाहेब किर्लोस्कर अन्

त्यांचे सहकारी यांनी बांधल्या त्याजवर बालगंधर्वांनी आपल्या अद्वितीय कर्तृत्वाने झगझगीत सोनेरी कळस चढविला असे म्हणावयास हरकत नाही. बालगंधर्वांचा ऐन उमेदीचा काळ म्हणजे मराठी रंगभूमीच्या पराकाष्ठेच्या वैभवाचाच काळ होय. असे देदीप्यमान स्वरूप मराठी रंगभूमीला पुन्हा लौकर प्राप्त होईल असे आम्हांला वाटत नाही. बालगंधर्वांची नाटके बघणे हा अनेक वर्षेपर्यंत महाराष्ट्राच्या जीवनातला एक फार मोठा आनंद होता, आणि या आनंदाचा महाराष्ट्राने यथेच्छ उपभोग घेतला हेही पण तितकेच खरे. बालगंधर्वांच्या नाटकांचे त्या वेळचे ते बादशाही वैभव आज शब्दाने वर्णनही करून सांगणे कठीण आहे. त्यांच्या नाटकागृहाबाहेर लागणाऱ्या मोटारींच्या लांबलचक रांगा ज्यांनी डोळ्यांनी पाहिल्य- असतील त्यांना ते दृश्य विसरणे अशक्य आहे. त्यांच्या प्रेक्षकवृंदाएवढा प्रेक्षणीय जनसमुदाय इतर प्रसंगी क्वचितच आढळून आला असता. मखमलीच्या पडद्याने भूषविलेल्या त्यांच्या रंगभूमीचा दरबारी थाटमाट बघून प्रेक्षकांचे डोळे अक्षरशः दिपून जात. पडदा वर गेल्यानंतर विजेच्या प्रकाशात झळकणाऱ्या पात्रांच्या वस्त्रभूषेचा भरजरी झगझगाट पाहिल्याबरोबर प्रेक्षकांना आपण इंद्रलोकांत आहोत असेच वाटे. ऑर्गनच्या मधुर ध्वनीत दोन्ही बाजूंच्या सारंग्यांच्या कोमल स्वरांची भर पडली आणि त्या साथीवर बालगंधर्वांची लयबद्ध स्वरभरणी एकदा सुरू झाली म्हणजे नाटकगृहातला सारा प्रेक्षकवृंद संगीताच्या सागरामध्ये अक्षरशः खालीवर पोहू लागे. असा स्वर्गीय अनुभव मराठी रंगभूमीवरील दुसऱ्या कोणत्याही नटाने आपल्या प्रेक्षकांना आणून दिलेला नाही ही गोष्ट रंगभूमीच्या इतिहासात नमूद करून ठेवावयाला हवी.

महाराष्ट्रीय जनतेत गायनाची अनिवार आवड बालगंधर्वांनी निर्माण केली एवढेच नव्हे तर गायनाला कमालीची लोकप्रियता आणि प्रतिष्ठाही पण त्यांनीच प्राप्त करून दिली. मधुर कंठाचे अनेक गायक या महाराष्ट्रात आजपर्यंत होऊन गेले असतील. पण बालगंधर्वांच्या कंठातले माधुर्य आणि रसवत्ता ज्याच्या आवाजात आहे असा एकही दुसरा गायक आजवर आमच्या आठवणीत होऊन गेला नाही आणि पुढेही लौकर होईल असे आम्हांला वाटत नाही. संगीताची एखादी गूढ सिद्धी जणू काही त्यांना निसर्गतःच प्राप्त झाली होती असे म्हटले तरी हरकत नाही. गार जशी पाण्यामध्ये वितळते तसे पदांचे शब्द आणि ओळी त्यांच्या गोड गळ्यामध्ये जणू काही आपोआप विरघळत आहेत अशी त्यांची गाण्यातल्या शब्दोच्चारांची घाटणी आहे.

काही वर्षांपूर्वी भर दुपारी मुंबईच्या रस्त्यामधून आम्ही जात असता एका सार्वजनिक ठिकाणी ध्वनिक्षेपकावरून ' पुष्पपराग सुगन्धित शीतल ' ही बालगंधर्वांची ध्वनिमुद्रिका आमच्या कानावर पडली. त्याबरोबर उन्हाची प्रखरता आणि उकाडा विसरून आम्ही तसेच रस्त्यात उभे राहिलो. डोक्यावर बटमोगऱ्याच्या ताज्या आणि सुवासिक फुलांचा जणू काही सडाच सांडावा असे ते गाणे ऐकताना आम्हांला वाटले. बालगंधर्वांच्या आवाजात काय जादू भरलेली आहे याचा पुनः-प्रत्यय त्या दिवशी आम्हांला आला. ज्ञानेश्वरानंतर मराठी भाषेत ओवी लिहिणे हे जसे ' अमृताच्या ताटी नरोटी ठेवण्या ' सारखे आहे त्याप्रमाणे बालगंधर्वांखेरीज दुसऱ्या कुणी मराठी रंगभूमीवर स्त्रीभूमिकेतली गायकी करणे म्हणजे अमृताच्या कलशात ताकाचे पाणी भरून ठेवण्यासारखे नव्हे काय ?

आपल्या कलेशी इतका रममाण आणि तल्लीन झालेला बालगंधर्वांसारखा कलावन्त आम्ही तरी दुसरा पाहिला नाही. नाटकगृहात शंभर प्रेक्षक असोत वा हजार प्रेक्षक असोत ते आपली भूमिका सारख्याच तन्मयतेने करीत असत. मराठी रंगभूमीवरील त्यांच्या प्रेमाला सीमा नाही आणि रंगभूमीची आजपर्यंत सेवा करताना त्यांनी ती ज्या हौसेने केली त्या हौसेलाही पण तुलना नाही. पोट भरण्याचे आणि पैसे मिळविण्याचे एक साधन अशा बाजारी दृष्टीने त्यांनी आपल्या कलेचा कधी उपयोग केला नाही. प्रेक्षकांना सतत प्रसन्न आणि प्रफुल्लित ठेवणे हेच त्यांच्या कलात्मक जीवनाचे ध्येय होते. जनतेने लक्षावधी रुपये त्यांच्या पदरात ओतले तरी लक्ष्मीच्या उन्मादाने त्यांच्या कलेची एकतानता कधी भंग पावली नाही आणि कर्जाचा भला मोठा डोंगर त्यांच्या डोक्यावर जमा झाला तरी कर्जफेडीच्या विवंचनेने त्यांच्या कलोपासनेतील तीव्रता कधी मंदावली नाही, किंवा कर्ज फेडण्याचे सामर्थ्य अंगी न आल्यामुळे नादारी पत्करून आज त्यांना दारिद्र्याचे जीवन कंठावे लागत असले तरी त्यांची कलेवरील आसक्ती रतिमात्रही कमी झालेली.

बालगंधर्वांचे कर्तृत्व ज्या काळात घडले त्या काळात मोठे मोठे कलावंत उदयाला येऊन गेले. फार मोठ्या स्पर्धेचा आणि चढाओढीचा काळ होता तो ! तथापि आपल्या असामान्य गुणांनी बालगंधर्वांनी दुसऱ्या कोणत्याही समव्यवसायी कलावंताला आपल्या आजूबाजूलादेखील फिरकू दिले नाही. रंगभूमीवरील त्यांच्या अद्वितीय स्थानाला धोका पोहोचण्याचा संभव आजपर्यंत एकदाही कधी निर्माण झाला नाही. बालगंधर्वांच्या अंगातील निरनिराळ्या गुणविशेषांच्या

जेवढ्या आठवणी कराव्यात तेवढ्या थोड्याच आहेत. आज जरी त्यांना दारिद्र्य आले असले आणि वार्धक्य प्राप्त झाले असले तरी त्यांनी आपली अमदानी एखाद्या सम्राटाप्रमाणे गाजवली आणि उपभोगली यात मुळीच संशय नाही. असे भाग्य फारच थोड्यांच्या नशिबी असते. मराठी रंगभूमीसाठी आजपर्यंत त्यांनी जे जे केले त्यापेक्षा जास्त असे कोणालाही काही करता आले नसते म्हणून आता या वयात आणि अशा स्थितीत त्यांच्याकडून अधिक सेवेची अपेक्षा करणे हे योग्य होणार नाही.

नाटककाराच्या नाट्यकृती जशा त्याच्यामागे शिल्लक उरतात तसे रंगभूमीवरील नटाचे अभिनयकर्तृत्व काही त्याच्यामागे पाहावयाला मिळण्याची शक्यता नसते. बालगंधर्वांचे गोड गायन ध्वनिमुद्रिकेमधून ऐकावयाला मिळण्याची तरी सोय आहे, पण रंगभूमीवरील त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा आणि मोहक अभिनयाचा पुरावा पुढील पिढ्यांना दाखवून देण्याचे काय साधन आहे? बालगंधर्वांच्या प्रतिभेचा खरा विलास ज्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिला आणि कानांनी ऐकला त्यांनाच बालगंधर्व ही महाराष्ट्राच्या जीवनात एक वेळ केवढी शक्ती होती हे ठाऊक असणार. इतरांना त्याचा पडताळा कसा येणार? तथापि एकेकाळी बालगंधर्व हे महाराष्ट्राच्या निस्सीम प्रेमाचे एक निधान होते ही गोष्ट इतिहासाला भावी पिढ्यांना सांगावी लागेल, आणि मराठी रंगभूमीची बालगंधर्वांनी अडीच तीन तपेपर्यंत जी एकनिष्ठपणे उज्ज्वल सेवा केली तिच्याबद्दल पुढील पिढ्यांना कृतज्ञ राहावे लागेल यात मुळीच शंका नाही. बालगंधर्वांना साठ वर्षे पूर्ण होऊन एकसष्टावे वर्ष लागले तरी महाराष्ट्राच्या हिशेबी बालगंधर्व हे सदैवच 'बाल' राहतील आणि त्यांच्यावरचे महाराष्ट्राचे प्रेम यत्किंचितही कमी होणार नाही याविषयी आमची खात्री आहे.

नवयुग : २७-६-१९४८


अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...

३

# बालगंधर्व

बालगंधर्व ! फक्त पाचच अक्षरे, पण महाराष्ट्राचे पंचप्राण या पाच अक्षरांत सामावलेले आहेत. बालगंधर्वांना आज पंचाहत्तर वर्षे पूर्ण होऊन ते शहाहत्तराव्या वर्षात पदार्पण करीत आहेत. कालगणनेने पाहिले तर ' अवघे पाऊणशे वयमान ' झालेला हा कलावंत महाराष्ट्राला मात्र अजून ' बालगंधर्व 'च वाटतो. लो. टिळकांनी बालवयात नारायणराव राजहंसांचे गाणे ऐकून त्यांना सहज स्फूर्तीने ' बालगंधर्व ' म्हटले आणि नंतर अखिल महाराष्ट्राने त्यांचा तो किताब कधीही जरासुद्धा शंकिला नाही. बालगंधर्वांनी महाराष्ट्राला कलेचा आनंद अलोट पुरवला आहे. ज्यांनी त्यांची नाटके पाहिली आहेत आणि त्यांचे गाणे ऐकले आहे, त्यांच्या मनातील त्या नाटकांचा आणि त्या गाण्यांचा आनंद कधीही पुसला जाणार नाही. अजून बालगंधर्वांचे नुसते नाव कानावर पडले, किंवा कुठल्याही कारणाने त्यांचे स्मरण झाले तरी त्यांची फार फार वर्षांपूर्वी पाहिलेली सारी नाटके, काल पाहिल्यासारखी मनश्चक्षूंसमोर नाचू लागतात; त्यांच्या गाण्याचे ते ' गोड आणि गुंगवणारे ' स्वर अजून कानात काल ऐकल्यासारखे ताजे आठवतात. एवढी जादू रसिकमनावर ठेवणारा कलावंत विरळाच.

बालगंधर्वांना नाटक आणि गायन यांखेरीज जीवनात दुसऱ्या कशाचीही कधी मातब्बरी वाटली नाही. त्यांचे व्यक्तिगत जीवन एखाद्या चित्रपटासारखे सुखदुःखांच्या प्रसंगांनी भरलेले आहे. त्यात सुखाचे प्रसंग आहेत ते त्यांच्या नाट्यजीवनाशी निगडित असेच जास्त आहेत, आणि दुःखाचे प्रसंग आहेत ते

त्यांच्या खाजगी जीवनाशी संबंधित आहेत. पण बालगंधर्वांनी आपल्या खाजगी जीवनातील कुठल्याही दुःखाच्या प्रसंगाची किंचितही छाया आपल्या कला-जीवनावर कधी पडू दिली नाही. नाट्यरसिकांबाबतच्या आपल्या कर्तव्याची त्यांच्याइतकी कठोर जागरूकता आणि कृतज्ञ जाणीव फार थोड्या नटांच्या ठिकाणी दिसून येते! आपले अवघे जीवन बालगंधर्वांनी नाट्यकलेलाच सर्वस्वी वाहिले होते. १९०५ साली बालगंधर्वांनी किर्लोस्कर नाटक मंडळीत प्रवेश केला; त्या वर्षी त्या नाटक मंडळीचा रौप्यमहोत्सव होता. १९०५ पासून तो १९५५ पर्यंत पन्नास वर्षे बालगंधर्व रंगभूमीवर वावरले. या काळातली पहिली पंचवीस वर्षे त्यांच्या नाटकांचा दर्जा महाराष्ट्रात अद्वितीय होता आणि त्यांच्या गायनाला तर तुलनाच नव्हती. १९३० नंतरची पंचवीस वर्षे त्यांनी, बोलपटांनी आणि बालगंधर्वांच्या वार्धक्याने ओढवलेल्या, परिस्थितीशी झगडत झगडत रसिकांची सेवा केली. १९५५ मध्ये त्यांचे दोन्ही पाय अधू होऊन बालगंधर्व प्रकृतीने पंगू झाले तेव्हाच त्यांनी रंगभूमीवरून आपले पाऊल मागे घेतले. अर्धशतकभर त्यांनी रसिकांची अखंड सेवा केली आहे. त्यांनी रसिकांना मनमुराद आनंद लुटू दिला आहे. आधीच स्वर्गीय असलेले त्यांचे गाणे त्यांनी नाट्य–रसिकांना आकंठ ऐकवले आहे.

बालगंधर्वांना कुठल्याच बाबतीत कंजूषपणा कसा तो माहीत नव्हता. आपली रंगभूमी तऱ्हेतऱ्हेने नटवण्यासाठी त्यांनी पाण्यासारखा पैसा ओतला आणि आपल्या 'अन्नदात्या' रसिकांच्या समाधानासाठी उरी फुटेतो गायन ऐकवले. वन्समोर देणारे कंटाळले तरी बालगंधर्वांनी गायनात किंवा अभिनयात कधी कसलीही कसूर किंवा अंगचोरपणा केला नाही. त्यांची नाटके वैभवसंपन्न होती, तशी ती कलासंपन्नही असत. म्हणूनच ती पुनःपुनः पाहणे ही एक विलक्षण धुंद होती. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जन्मलेल्या ज्या कोणा महाराष्ट्रीय माणसाने बालगंधर्वांचे नाटक पाहिले नसेल, किंवा त्यांचे गायन ऐकले नसेल त्याच्या हतभागीपणाची आम्ही कीवच करू! आम्ही बालगंधर्वांची किती नाटके पाहिली त्याची गणतीच नाही. 'स्वयंवर', 'एकच प्याला', 'संशयकल्लोळ', 'मानापमान', 'विद्याहरण', 'द्रौपदी', 'मृच्छकटिक', 'मेनका', 'सौभद्र' वगैरे त्यांच्या नाटकांची तर आमच्या पिढीने पारायणेच केलेली आहेत.

बालगंधर्व हे त्या काळात स्त्री–भूमिकेत दिसतही मोहक. त्या सुदर्शनाला लाडिक अभिनयाची आणि अजोड गायनाची जोड मिळालेली होती त्यांच्या

गायनाचा गोडवा काही अलौकिकच असे. रसनिष्ठ गायन हे त्यांचे प्रधान वैशिष्ट्य, त्यामुळे त्यांची गाणी अंतःकरणात पटकन शिरत. मधुर स्वरांचा झोला निर्माण करून श्रोत्यांना त्यावर खेळवण्याचे त्यांचे कसब काही अजबच होते. 'कशि या त्यजू पदाला', 'करि न यदुमनी', 'ठरला जणु मत्सर राजा', 'मम सुखाची', 'वद जाऊ कुणाला शरण', 'एकला नयनाला', 'सत्य वदे वचनाला', 'नुरले मानस उदास', वगैरे बालगंधर्वांची कितीतरी पदे या क्षणी आमच्या कानाशी गुणगुण करीत आहेत. ती रसिली धुंद अजून मन गुंग करून सोडते! त्यांच्या अभिनयातील भूमिकेला साजेसे बारकावे, मानलचक, हातवारे आणि चेहऱ्यावरील भावपालट सारेच काही अलौकिक आणि अविस्मरणीय! त्याचा आनंद किती म्हणून सांगावा. बालगंधर्वांनी रसिकांना कलानंद भरपूर दिला आहे, ते त्यांचे महाराष्ट्रावरचे ऋण कधीही फिटण्यासारखे नाही.

आज दुर्दैवाने बालगंधर्वांना पंगुपणा आला आहे. ज्या कलावंताने सारी ह्यात रसिक जनसेवेत निरलसपणे वेचली, कशाचा हव्यास नाही की कशाची क्षिती नाही, अशा एक प्रकारच्या योगावस्थेत ज्याने महाराष्ट्राच्या रंगभूमीचा कलात्मक दर्जा उंचावला, त्या नटराज योग्याची आजची विकलावस्था पाहिली की अंतःकरणात कालवाकालव होते. परमेश्वराच्या न्यायीपणावरचा विश्वास डळमळू लागतो! बालगंधर्व हे अर्ध शतकभर महाराष्ट्राचे आनंदनिधान होते आणि या अर्ध शतकात त्यांनी महाराष्ट्राला जे दिले आहे ते इतके मोठे विपुल आहे की, कित्येक शतके महाराष्ट्र या नटराजयोगी बालगंधर्वांच्या कलात्मक ऋणात राहण्यातच धन्यता मानीत राहील!

मराठा : २६-६-१९६३

# ४

## बालगंधर्व

सौंदर्य नि माधुर्य ह्या दोन गुणांचा संगम ह्या जगामध्ये क्वचितच आढळून येतो. चंद्रासारखे सौंदर्य ह्या विश्वामधे कोणाला तरी लाभले आहे काय ? नाही. पण त्या चंद्राच्या तोंडावर लहानसा काळा डाग आहे, आणि त्याला क्षयरोगा-सारख्या भयंकर रोगाची बाधा झालेली आहे, महिन्यातले पहिले पंधरा दिवस तो फुगत जातो नि पुढले पंधरा दिवस तो एकसारखा खंगत जातो. गंगा नदी-सारखी भारताची तीर्थस्वरूप लोकमाता लक्षावधी लोकांना जीवन देणारी नि पावन करणारी, पण तिच्याही मागे भरती-ओहटीची भानगड लागलेली आहे, म्हणूनच ' नलदमयंती-स्वयंवराख्याना 'त रघुनाथपंडितांनी म्हटलेले आहे.

> चंद्रासि लागति कळा उप-राग येतो,
> गंगेशि भंग बहु पाण-उतार होतो;

गुलाबाच्या फुलाला जेवढे सौंदर्य प्राप्त झालेले आहे, तेवढाच सुगंधही प्राप्त झालेला आहे, पण अशा सुगंध सुंदर फुलाच्या देठालाही निसर्गाने काट्यांचे वरदान दिलेले आहे. पाखरामधे सर्वांत गोड गाणारा पक्षी कोण ? तर कोकिळा ! वसंत ऋतूमधे मोहरलेल्या आंबराईत बसून जेव्हा कोकिळा ' कु-हू-कु-हू ' असा टहुकार करते, तेव्हा प्रेमवेड्या नि विरही पुरुषाच्या छातीमधे अशा काही गोड गोड कळा उठतात की काही विचारू नका. पण एवढे असूनही कोकिळा ही रंगारूपाने काळी कुळकुळीत आहे. जगामधे सर्व गुणांचा संगम नि समन्वय क्वचितच होतो. ह्याची प्रथम जाणीव जर कोणाला झाली असेल तर ती राजा

भर्तृहरी ह्या महाकवीला. त्याच्या त्या काव्याचे भाषांतर वामनपंडितांनी केलेले तुम्हांला आठवत नसेल तर आम्ही सांगतो :

चंद्राला दिवसा प्रकाश नसणे,
ये कामिनीला जरा,
पद्मावीण तळे, निरक्षर मुखी,
जो साजिरा गोजिरा,
दात्याला धनलोभ, नित्य वसते,
दारिद्र्य विद्वज्जनी,
दुष्टांचा पगडा मही-पति गृही,
ही सात शल्ये मनी !

ह्या विश्वात अनेक शल्ये आहेत. त्यांपैकी फक्त सात शल्यांचा महाकवी भर्तृहरीला बोध झाला. चंद्राला दिवसा प्रकाश नसतो हे पहिले शल्य. सुंदर स्त्रीला म्हातारा पण येते हे दुसरे शल्य. सरोवरात कमळे नसावीत हे तिसरे शल्य. चेहऱ्याने गोरागोमटा माणूस असावा आणि तो निरक्षर असावा हे चौथे शल्य. ( अशी गोरीगोमटी नि अडाणी करंटी माणसे आजकाल काँग्रेस पक्षात भरपूर आहेत. ) माणूस वृत्तीने कर्णासारखा दाता असावा, पण त्याला जर का धनाचा लोभ जडला तर मात्र त्याच्या त्या दातृत्वावर पाणीच पडले म्हणून समजा. हे पाचवे शल्य. विद्वान लोक दरिद्री असावेत हे सहावे शल्य. ( त्याचे कारण विद्वान लोकांना आजकालच्या सरकारी अधिकाऱ्याप्रमाणे पैसे खाण्याची सवय नसते ना ! ) आणि देशाच्या राज्यकारभारात ( मोरारजी देसायासारख्या ) हलकट दुष्टांचा पगडा असावा हे सातवे शल्य !

पण ह्या सर्व शल्यांना अपवाद असलेले एक अलौकिक आणि सर्वांगसुंदर उदाहरण आज या महाराष्ट्रात जिवंत आहे आणि ते म्हणजे बालगंधर्व ! सौंदर्य नि माधुर्य ह्यांचा असा आल्हादकारक समन्वय केवळ महाराष्ट्रातच नव्हे–तर ह्या भारतात आढळणार नाही. सौंदर्य हा काही पुरुषाचा गुण मानण्यात येत नाही. आदर्श पुरुष हा धिप्पाड, राकट नि ओबडधोबड असावा अशी कल्पना आहे. पण आदर्श स्त्री मात्र रंभा, मोहिनी, किंवा तिलोत्तमा हिच्यासारखी असली पाहिजे अशी समजूत आहे. रंभा ही इंद्राची 'कोणी तरी' होती असे म्हणतात. भस्मासुराला मारण्यासाठी भगवान विष्णूंनी 'मोहिनी' चे रूप धारण केले, त्यावरून मोहिनी ही किती सुंदर असली पाहिजे ह्याची कल्पना येते. आणि

जगातल्या उत्तमोत्तम स्त्रियांच्या सौंदर्याचा ‘ तिळ–तिळ ’ जमा करून मग ब्रह्मदेवाने तिलोत्तमा ’ निर्माण केली, हे ऐकून तर कोणाही सौंदर्यासक्त माणसाचे हृदय .तिळ–तिळ ’ तुटल्यावाचून राहणार नाही. तथापि, पुरुष हा रंभा, मोहिनी किंवा तिलोत्तमा ह्यांच्यासारखा सुंदर असू शकतो असे जर कोणी कोणाला सांगितले, तर लोक त्याला वेड्यात काढतील. पण असा एक अद्वितीय सुंदर पुरुष ‘ राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा ’ असे ज्याचे वर्णन गडकऱ्यांनी केले आहे त्या देशात जन्माला आला. त्याचेच नाव बालगंधर्व.

आपल्या ह्या भारतामध्ये सुंदर पुरुष काही कमी जन्माला आले नाहीत. भारताचे पंतप्रधान जे पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्यासारखा राजबिंडा पुरुष ह्या भारतात किती शतकांनी जन्माला आला हो ? आम्हांला तर नेहमी वाटते की ते स्वरूपसुंदर आहेत, म्हणूनच भारताचे पंतप्रधान झाले. त्यांचा चेहरा जर आमच्या शंकरराव देवांसारखा विद्रूप असता तर ते भारताचे पंतप्रधान राहू द्याच–पण केंद्र सरकारातले एखादे सामान्य मंत्री तरी होऊ शकले असते काय ? ( काटजू नि पाटसकर ह्यांनी आम्हांला क्षमा करावी. ) पण नेहरू एवढे सुंदर असून त्यांचा बोलण्याचा स्वर पाहावा तर तो अत्यंत बसका नि भसरा आहे. त्यांच्या आवाजात माधुर्य औषधालाही मिळायचे नाही. नेहरू हे मोरासारखे आहेत. दिसायला सुंदर पण आवाज भिक्कार.. म्हणूनच देवी सरस्वतीने मोराला आपले आसन जरी केले असले तरी त्याने ‘ केका ’ टू नये म्हणून त्याच्या तोंडात मोत्याची माळ देऊन ठेवलेली आहे. ज्यांना सौंदर्य आहे, त्यांना माधुर्य नाही, आणि ज्यांना माधुर्य आहे, त्यांना सौंदर्य नाही. आज ह्या भारतात लता मंगेशकरसारखी स्वरमोहिनी ‘ गायित्री ’ कोण आहे बरे ? गायकी लोकप्रियतेचे तिने साऱ्या जगातले उच्चांक मोडून टाकलेले आहेत. पण एवढ्या महान गायिकेला सामान्य स्वरूपाचाही लाभ झालेला नसावा हे केवढे दुर्दैव ! सारांश, स्वर आहे तर रूप नाही, रूप आहे तर रंग नाही आणि रंग आहे तर रूपही नाही आणि स्वरही नाही, ही ह्या जगातील बहुतेक माणसांची शोककथा आहे. पण ह्या सर्व नियमांना एकटे बालगंधर्वच अपवाद ठरतील. असा सुंदर पुरुष नि मधुर स्वरांचा गायक ह्या जगात आजपर्यंत झालेला नाही. मराठी रंगभूमीचे हे सुदैव की महाराष्ट्राच्या रंगभूमीच्या क्षितिजावर हा शुक्रतारा सत्तावन्न वर्षांपूर्वी उगवला.

भारतात अनेक भाषा आहेत नि अनेक राज्ये आहेत. त्यांच्या त्यांच्या रंगभूमीवरही आजपर्यंत फार मोठमोठे नट होऊन गेलेले आहेत. पण बालगंधर्वा-

सारखा स्वरूपसुंदर नि स्वरमधुर नट भारताच्या कोणत्याही इतर राज्यांत जन्माला आलेला नाही. त्याला जन्म देण्याचे दुर्मिळ भाग्य फक्त ह्या महाराष्ट्राला लाभले. महाराष्ट्र हा काही उगाच कोणाच्या मेहेरबानगीने ‘ महा ’ झालेला नाही. ह्या महाराष्ट्राच्या भूमीत ज्ञानेश्वरांसारखे महान संत नि शिवप्रभूंसारखे अलौकिक वीर जसे जन्माला आले, तसे बालगंधर्वांसारखे अपूर्व सुंदर कलावन्तही पण निर्माण झाले. म्हणून महाराष्ट्र हा जसा संतांचा नि वीरांचा देश आहे, तसा तो गंधर्वांचाही देश आहे. हे आमच्या अन्य भारतीय बांधवांनी लक्षात ठेवावे, असे आम्ही अत्यंत प्रेमाने त्यांना सांगतो.

बालगंधर्वांना ती यथार्थ पदवी कोणी दिली बरे? अहो, आमच्या ‘लोकमान्य’ बाळ गंगाधरांनी! महाराष्ट्रात असा एक काळ होता की, ज्या वेळी बाळ गंगाधर नि बालगंधर्व ह्या दोघांची प्रत्येक घराघरांत रामकृष्णांसारखी पूजा व्हावयाची. ह्या दोघांची चित्रे ज्याच्या घरात नाहीत, असे एक घर त्या वेळी महाराष्ट्रात नव्हते. राजकारण नि रंगभूमी ही दोनच महाराष्ट्राची शक्तिस्थाने. ह्या शक्तिस्थानांची ही दोन्हीही अधिष्ठात्री दैवते. तमाम मराठी जनतेच्या हृदयावर ह्या दोघाही महापुरुषांनी वर्षानुवर्षे अनभिषिक्त सम्राटासारखे राज्य केले.

बालगंधर्वांच्या सौंदर्याचे नि स्वरमाधुर्याचे काय वर्णन करावे? त्यांच्या गाण्याच्या ध्वनिमुद्रिका निदान उपलब्ध तरी आहेत. म्हणून त्यांच्या स्वरमाधुर्याचा प्रत्यय आजही मिळू शकतो. पण त्यांचे सौंदर्य? वाहवा, वाहावा, क्या बात है! रंभा, मोहिनी आणि तिलोत्तमा ह्यांनी त्यांच्या पायाशी लोळण घ्यावी असे अप्रतिम नि स्वर्गीय ‘ स्त्री ’-सौंदर्य त्यांना विधात्याने जन्मतःच देऊन टाकले होते.

बालगंधर्वांनी रंगभूमीवर पाऊल टाकले म्हणजे त्यांच्या नुसत्या दर्शनाने हजारो प्रेक्षक अक्षरशः वेडे होत, पागल होत. ह्यात एका शब्दाचीही अतिशयोक्ती नाही. ते कोठल्याही भूमिकेत नि कसल्याही वस्त्रात येवोत, शकुंतला म्हणून येवोत, सुभद्रा म्हणून येवोत, वसंतसेना म्हणून येवोत, भामिनी किंवा रुक्मिणी म्हणून येवोत, रेवती म्हणून येवोत, किंवा फाटके लुगडे नेसणारी सिंधू म्हणून येवोत, ते आले रे आले की खुर्च्यांवर किंवा बाकावर बसलेल्या प्रेक्षकांचे बसल्या जागी ‘ मुड्दे ’ पडलेच म्हणून समजा. मग त्यांचे गाणे ऐकणे तर दूरच राहो!

जगात पुष्कळ गुणवंत, कलावंत नि शोभिवंत नट ( किंवा नटीही ) झाले असतील, पण बालगंधर्व म्हणजे ‘ ह्यासम हा! ’ बालगंधर्वांचे काय काय

आठवावे नि काय काय सांगावे ? महाराष्ट्राला गाण्याची शिकवण त्यांनीच दिली नि गाण्याची गोडी पण त्यांनीच लावली. आज महाराष्ट्राला जे जे म्हणून लोकप्रिय गायक आहेत, ते ते बालगंधर्वांच्या स्वराने गातात, ते बालगंधर्वांच्या ताना मारतात नि बालगंधर्वांच्याच ढंगाची रागबाजी करून श्रोत्यांकडून टाळ्या मिळवितात. बालगंधर्व नुसते गळ्यांनी गात नसत. ते ओठांनी गात असता त्यांच्या ओठांतून शब्द बाहेर कसा पडावयाचा हे माहीत आहे ? लोण्यात खडी-साखर विरघळावी तसा. म्हणून त्यांचे गद्य बोलणेही संगीतासारखे सुरेल नि सुमधुर वाटावयाचे. त्यांच्या गाण्याबद्दल आजच्या पिढीला काय सांगावे ? ' शाकुंतल ' नाटकातील त्यांचे ' मना तळमळशी ' आणि ' मी तप्त जरी मदन-शरे, विनय सोडू का ? '; ' सौभद्रा ' तील ' बलसागर तुम्ही वीरशिरोमणी, ' ' किती किती सांगू तुला ग ', ' पुष्पपराग सुगंधित शीतल ' आणि ' पांडु नृपति जनक जया '; ' मानापमाना ' तील ' हा टकमक पाही ' ', खरा तो प्रेमा ' मला वदन भासे, ' नि ' नाही मी बोलत आता ';' विद्याहरणा ' तील ' मधु-मधुरा गिरा मोहना ', ' मधुकर वनवन फिरत करी गुंजारवाला ' आणि ' आता राग देई मना '; ' स्वयंवरातील ' नाथ हा माझा, ' ' सुजन कसा मन चोरी, ' ' मम आत्मा गमला ', ' स्वकुल तारक सुता ', ' करी यदुमना सदना, ' ' मम सुखाची ठेव देवा, ' ' मम मनी कृष्णसखा रमला, ' ' अजि राधा बाला, ' ' अमृताचे गोपाला ' नि ' नृपकन्या तव जाया '; ' संशय कल्लोळा ' तील ' संशय का मनि आला ' किंवा ' मजवरी तयांचे प्रेम खरे ' आणि ' एकच प्याला ' तील ' मानस का बधिरावे ', ' दया छाया घे ', ' शंकाही नाही कालि ज्या ', ' कशि या त्यजू पदाला ' आणि ' सत्य वदे वचनाला नाथा ' ही बालगंधर्वांची गाणी म्हणजे साक्षात अमृताची कारंजी होत. ह्या क्षणापर्यंत ती आमच्या कानांत नि मनात उचंबळत आहेत.

बालगंधर्वांच्या गाण्यात नुसतेच माधुर्य नव्हते तर त्यात रस नि भावना होत्या. आपल्या स्वरातून कारुण्य नि शृंगार हे दोन रस प्रकट करण्याची विलक्षण शक्ती त्यांच्या गायनात होती. गद्य भाषण बोलता बोलता इतक्या नाजुक रीतीने गाण्याचा आरंभ कसा करावा ही कला बालगंधर्वांइतकी कोणालाच साधली नाही. १९४४ साली बालगंधर्व हे मुंबईच्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवाचे अध्यक्ष होते, आम्ही त्याचे स्वागताध्यक्ष होतो. त्या वेळी आम्ही म्हणालो, "बालगंधर्वांच्या संगीताने महाराष्ट्राच्या तीन पिढ्या पोसल्या आहेत. त्यांच्या वेषभूषेचे अनुकरण



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक.........

करून हजारो महिलांनी आपल्या पतींना मुठीत ठेविले नि आपले संसार सुखाचे केले ! " जवळ जवळ अर्धशतक ज्यांनी महाराष्ट्राला संगीताचा नि सौंदर्याचा गुरुमंत्र दिला त्या बालगंधर्वांचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. त्यांचे सौंदर्य पाहून नि गायन ऐकून आम्ही तृप्त झालो आहोत, धन्य झालो आहोत, धुंद झालो आहोत. त्या आनंदाचे वर्णन आजच्या पिढीला करून द्यावयाला, आमच्या-जवळ शब्द नाहीत — अन् शक्तीही पण नाही !

असे हे चिर तरुण नि अजरामर बालगंधर्व वृद्ध झाले नि विकलांग झाले नि आता त्यांचे देहावसान झाले, हे जगाने वाटल्यास म्हणावे. पण निदान आम्ही तरी तसे म्हणणार नाही. त्यावर आमचा विश्वासच मुळी बसू शकत नाही. माडखोलकरांनी म्हटल्याप्रमाणे " गंधर्व नाटक मंडळीची रंगभूमी म्हणजे जणू काही गंधर्व लोक. अलका आणि अमरावती यांचे सारे वैभव या रंगभूमीवर एक-वटलेले. बालगंधर्व म्हणजे त्या रंगभूमीची उर्वशी. सर्व ललितकलांची मूस ओतून विधात्याने जणू तिलोत्तमेप्रमाणे बालगंधर्वांना ईर्षेने निर्माण केले. अशा या अलौकिक प्रतिभेच्या भू-गंधर्वाला काळ काय करू शकणार ? त्यांचे सौंदर्य, संगीत आणि नाट्य अमर आहे. त्यांच्या यौवनाची स्मृती अजर आणि अविनाशी आहे ! "

मराठा : २३-७-१९६७

५

# परि मनाला नटवर झाला मंत्र महान !

सुवासिक फुलांच्या सहवासाने मातीलाही सुगंध चिकटतो, तद्वत थोरांच्या सहकार्याने सामान्य गोष्टींनाही असामान्यत्व लाभते. सव्वीस जून या तारखेचेही तसेच झाले आहे. एरवी जूनमध्ये–जूनमध्येच कशाला ? दर महिन्यात येणाऱ्या इतर अन्य तारखांप्रमाणेच सव्वीस जून हीही एक सामान्य तारीखच आहे. पण या तारखेला महाराष्ट्राच्या कलात्मक जीवनात एक आगळेच महत्त्व आलेले आहे. नटसम्राट बालगंधर्व सव्वीस जून १८८८ रोजी जन्माला आल्यामुळे सव्वीस जून या तारखेला महत्त्व आले. चिंतामणीच्या स्पर्शाने निर्जीव दगडांनाही तेज येते, तद्वत महापुरुषांच्या जन्माने सामान्य दिनांकही राष्ट्रीय महत्त्वाचे ठरतात ! अण्णासाहेब किर्लोस्करांच्या जन्मामुळे ३१ मार्च हा दिनांक महाराष्ट्रात संस्मरणीय झाला. भाऊराव कोल्हटकरांच्या जन्माने ५ मार्च या दिवसाला महत्त्व आणून दिले. ९ ऑगस्ट ही तारीख केशवराव भोसल्यांच्या जन्माने पुनीत झाली तर १५ ऑगस्ट हा दिवस गणपतराव जोशी यांच्या जन्मामुळे कलासंसारात पवित्र ठरला ! तीच गोष्ट २६ जून या दिवसाची बालगंधर्वांच्या जन्माने झालेली आहे. दरसाल जूनची सव्वीसावी तारीख उगवली की आम्हाला नटसम्राट बालगंधर्वांची आठवण तीव्रतेने होते. आज आपल्या जीवनाची अठ्ठ्याहत्तर वर्षे पुरी करून बालगंधर्व एकोणऐंशीव्या वर्षात प्रवेश करीत आहेत, पण आम्हांला ते आजही आठवतात ते ‘ बालगंधर्व ’ म्हणूनच !

‘ बालगंधर्व ’ ऐंशी वर्षांचे होत आहेत हे मुळी मनाला काही केल्या

पटतच नाही ! ' बालगंधर्व ' हे नुसते नाव कानावर पडले, किंवा मनात सहज स्फुरले; तरीही मन, कान आणि लोचन निमिषार्धात पन्नास–पंचावन्न वर्षांचा कालखंड विसरून पटकन् पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळात प्रवेश करतात. त्या काळातली आमची दैवते दोनच : एक लोकमान्य बाळ गंगाधर आणि दुसरे बालगंधर्व ! लोकमान्यांनीच नारायण श्रीपाद राजहंस या छोट्या मुलाला कौतुकाने ' बालगंधर्व ' म्हटले आणि नंतर सर्व महाराष्ट्राने ते नाव एकमुखाने स्वीकारले ! बालगंधर्वांना आज ७८ वर्षे संपत आहेत पण आमच्या नजरेसमोर ते अठ्ठावीस वर्षांचेच वावरत आहेत ! बालगंधर्व म्हटले की अजून आठवते ती ' दादा, पण ते आले ना ? ' म्हणत प्रेमाने भांबावलेली लाडिक रुक्मिणी ! बालगंधर्व म्हटले की, ' नाही मी बोलत आता ' म्हणून नाजुक रुसवा दाखविणारी भामिनीच चटकन् डोळ्यांपुढे उभी राहते. बालगंधर्व म्हटले की, ' माडीवरी चल ग गडे ' म्हणून उतावळेपणाने भारलेली लोभसवाणी वसंतसेनाच नाचू लागते समोर. बालगंधर्व म्हटले की, ' सत्य वदे वचनाला नाथा ' म्हणून शपथ घेणारी कारुण्यमूर्ती सिंधू अजून आमचे डोळे पाण्याने डबडवून टाकते आणि त्यामुळे आज ज्या अवस्थेत बालगंधर्व आहेत ती त्यांची विकलांगावस्था आम्हांला दिसेनाशीच होते ! आम्ही तरी काय करावे ? बालगंधर्वांची आमच्या मनःपटलावरची ती पन्नास वर्षांपूर्वीची प्रतिमा काही केल्या पुसली जात नाही. एवढेच नव्हे तर ती जरादेखील पुसटही होत नाही. उलट, दिवसगतीने ती अधिकच स्पष्ट, अधिकच सजीव होते आहे ! असे आमच्यासारखे अनेक रसिक आज महाराष्ट्रात आहेत यात काहीही शंका नाही.

ज्यांनी बालगंधर्वांचे नाटक एकदा तरी पाहिले असेल त्यांना त्यांच्या अभिनयाचे, गायनाचे विस्मरण होणे कदापि शक्य नाही ! आम्ही बालगंधर्वांची किती नाटके पाहिली आणि ती कितीदा पाहिली याची गणतीच नाही. बालगंधर्वांचे गाणे व त्यांचे नाटक म्हणजे आंबरसासारखे सर्वांना सदा आवडणारे आणि कधीही नकोसे न वाटणारे अवीट गोडीचे पक्वान्नच ! आमच्यासारख्या ज्यांनी त्यांचे आकंठ पान केलेले आहे त्यांना त्याच्या तृप्तीचे ढेकर अजून सुख देत आहेत ! अजूनही बालगंधर्वांचे ते लाडिक लाडिक स्वर कानात खेळत आहेत असा भास होतो. अजूनही त्यांचे ते गोड माना वेळणे, ते नाजुक हातवारे, तो मोहक रुसवा, ते मधुर, खोडकर हसू आणि अंतःकरण पिळवटून टाकणारे ते भाव-कारुण्य सारे सारे काही काल पाहिलेल्या नाटकाइतक्या ताजेपणाने आमच्या नजरेसमोर नाचत

आहे ! त्या कलानंदाच्या नशेतून क्षणभरही बाहेर यावे असे आम्हांला कधीच वाटले नाही; वाटतही नाही ! असा कोण अरसिक प्राणी असेल की, ज्याला बाल-गंधर्वाच्या कलेची धुंदी आपल्या मनावरून नाहीशी व्हावी असे वाटत असेल ? एखाद्या कृपणाच्या हावऱ्या वृत्तीने बालगंधर्वांनी दिलेल्या त्या कलाधनाची रसिक जपणूक करतात ! कारण तसा आनंद पुन्हा कोठेच कधी मिळाला नाही. आजही नाटके होतात आणि त्यात गाणीही असतात. पण बालगंधर्वांची नाटके आणि बालगंधर्वांचे गाणे दोन्हीही असामान्यच ! ती कला वेगळी, ती धुंदी निराळी, आणि ती व्यक्तीही आगळीच ! बालगंधर्व या व्यक्तीची दुसरी आवृत्ती संपूर्ण अथवा संक्षिप्त स्वरूपातही कधी निघाली नाही. महाराष्ट्राच्या नाट्य-नभांगणात बालगंधर्व हे बाल ध्रुवासारखे अढळपद मिळवून बसलेले आहेत.

१९०५ साली त्यांनी किर्लोस्कर नाटक मंडळीत पाऊल टाकले आणि पायामध्ये विकृती निर्माण होऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे कठीण झाल्यामुळे १९५५ मध्ये त्यांनी रंगभूमीवरून कायमचा काढता पाय घेतला. तब्बल पन्नास वर्षे त्यांनी रंगभूमीची आणि रसिकांची सेवा निरलसपणे केली.यापैकी पहिली पंचवीस तीस वर्षे त्यांच्या कलेचा बहर सर्वत्र बहार उडवून देत होता. नंतरच्या वीस वर्षांत बालगंधर्व जुन्या कीर्तीवर नाट्यसंस्था ढकलीत होते. पण त्यांच्या नावाची मोहिनी मराठी माणसाच्या मनावरून कधीही पुसली गेली नाही. त्यांचे गायन ही एक विलक्षण धुंद होती. तसे ते शास्त्रीय दृष्ट्या पट्टीचे गायक नव्हते. पण त्यांच्या आवाजामध्ये जो गोडवा होता, जी जव्हार होती, जो लाडिकपणा होता, त्याला तोड नव्हती. नाटकातील प्रसंग आणि रस यांना उठाव देणारे भावभरित गायन करण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यामुळे रंगभूमीवरील त्यांचे गाणे हा एक स्वर्गीय आनंद होता. त्यांच्या गाण्यातला स्वरन्स्वर टिपून घेण्यासाठी रसिकांचे कान टपलेले असत. तेच ते पद पुन्हा पुन्हा ऐकावे तर ते बालगंधर्वांच्या गळ्यातूनच. प्रत्येक वन्समोअरच्या वेळी वेगळाच आनंद पदरात पडायचा. अशा अप्रतिम आनंददायक गाण्याला उत्कृष्ट अभिनयाची जोड मिळालेली असल्यामुळे पन्नास वर्षांत बालगंधर्व हे नाट्य रसिकांचे एकमेव नटराज होऊन राहावेत यात नवल नव्हते.

बालगंधर्वांनी अनेक भूमिका केल्या, पण त्यांपैकी सुभद्रा, वसंतसेना, भामिनी, देवयानी, रुक्मिणी, रेवती, सिंधू या सात भूमिका त्यांच्या विशेष लोकप्रिय ठरल्या. व्यक्तिचित्रणाचे वेगळेपण या भूमिकांच्या आविष्कारात बालगंधर्वांना

विशेषत्वाने प्रकट करता आल्यामुळेही असे झाले असेल. पण मिळालेली कोणतीही भूमिका, लोकप्रिय असो वा नसो, बालगंधर्व ती निरलसपणे रंगभूमीवर वठवीत असत हे नाकरता येणार नाही. प्रत्येक भूमिकेचे हृद्गत समजून घेऊन ते सहज-सुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनाला प्रतीत करून देण्याच्या कलेतील बालगंधर्वांच्या आदर्श नैपुण्याला त्यांच्या गळ्यातील अवीट गोडव्याची जोड मिळाल्यामुळे पन्नास वर्षांच्या नाट्य-संसारामध्ये बालगंधर्व हे ' एकला नयनाला विषय तो झाला ' या वर्णनाला पात्र ठरले होते.

गेली दहा वर्षे तर बालगंधर्व विकलांग अवस्थेत जीवन व्यतीत करीत आहेत. ही त्यांची दुर्दशा आमच्यासारख्या त्यांच्या चाहत्यांना दुस्सह होते. पण बालगंधर्व एखाद्या स्थितप्रज्ञाप्रमाणे या अवस्थेला तोंड देत आहेत. आपले शरीर विकलांग झाल्याच्या दुःखापेक्षाही त्यांना यातना होतात त्या आपला आवाज पहिल्यासारखा ' लागत ' नाही या गोष्टीच्याच ! स्वतःच्या शरीरापेक्षा स्वतःच्या कलेला श्रेष्ठ मानण्याच्या याच त्यांच्या मनोधर्मामध्ये त्यांचे मोठेपण साठलेले आहे. त्यांचे सारे नाट्यजीवन याच मनोभावनेने भरलेले आहे. स्वतःच्या पोटचा गोळा मृत्युमुखी पडला तरी नव्या नाटकाच्या पहिल्या प्रयोगात भूमिका करण्यास त्यांनी नकार दिला नाही ! स्वतःची तब्येत त्यांनी सांभाळली तीही रसिकांची ' तब्येत ' नाट्यगृहात दिलखुष ठेवता यावी याच एका हेतूने ! एरवी स्वसुखाची अभिलाषा त्यांनी कधी धरली नाही. त्यांनी नारायणराव राजहंस या व्यक्तीसाठी चैनीच्या वस्तू खरेदी केल्या नाहीत; पण रंगभूमीवरील आपल्या भूमिकांसाठी त्यांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. त्यापायी स्वतःवर कर्जाचा डोंगरही ओढवून घेतला. रंगभूमीची सजावट, कलेचे कौतुक वाढविण्यासाठी त्यांनी खुल्या मुठीने पैसा खर्च केला; पण स्वतःच्या वैयक्तिक मालकीचे असे जवळ काहीही ठेवले नाही ! अवघे जीवन नाट्यकलेला वाहिलेला असा कलावंत विरळाच ! रसिकांनी मुठी भरभरून त्यांना पैसा दिला आणि बालगंधर्वांनी तो सारा पैसा मुठी पूर्ण खुल्या करून रंगभूमीचे वैभव वाढविण्यासाठीच वापरला ! त्यामुळे आज वयाच्या ऐंशीच्या उंबरठ्यावर आलेल्या या नटसम्राटाजवळ रसिकांच्या उदंड प्रेमांखेरीज दुसरे कसलेही धन असे नाही. त्याची बालगंधर्वांना खातरही नाही. ' करिन जन-मनी सदना ' हाच जणू त्यांचा बाणा आहे.

मराठी नाटककार आणि मराठी प्रेक्षक यांच्याविषयी त्यांच्या मनात कमालीचा पूज्यभाव आहे. नाटकाचा धंदा सोडून दहा-अकरा वर्षे लोटली तरी त्यांच्या त्या

श्रद्धेत किंचितही कमतरता आलेली नाही. म्हणूनच आम्ही ‘ शिवशक्ती ’ मध्ये राहावयास आल्याचे कळताच बालगंधर्व विकलांग अवस्थेतही धावत आमच्या भेटीला परवा आले होते. आमच्या नव्या नाटकाबद्दल त्यांनी चौकशी केली ! अजून या श्रेष्ठ नटाचे मन रंगभूमीभोवतीच रुंजी घालीत आहे. त्यांना पाहून आमचे डोळे भरून आले. पाण्याने डबडबलेल्या डोळ्यासमोरून आजचे वृद्ध व विकलांग बालगंधर्व मागे सरकत गेले नि पन्नास वर्षांपूर्वीची त्यांची ती एकाहून एक लोभसवाणी ‘ सोंगे ’ आमच्या डोळ्यांसमोर भराभरा नाचू लागली. बालगंधर्व निरोप घेऊन गेले तरीही आमचे मन त्या जुन्या काळच्या धुंदीतच रमलेले होते. निरोप घेताना बालगंधर्व आम्हांला म्हणाले की, ‘ येईन पुनः परतोनी ’. पण आमच्या मनोभूमीवर बालगंधर्वांची जी चित्रे त्या वेळी नाचत होती ती पाहून आमच्या जिभेवर बालगंधर्वांचेच एक गोड पद खेळत होते—

> ‘ उगीच का तळमळसी, अरे वेड्या मना,
> तळमळसी–रंगमंचकी सुख सेवाया
> मिळेल का ते पुन्हा ?. . .तळमळसी ! ’

मराठा : १९६६

# ६

## बालगंधर्वांसंबंधी आठवले तेवढे !

मी पुण्याला १९१० च्या अखेरीस आलो. पुण्यामध्ये मी कसबा पेठेत सरदार पुरंदऱ्यांच्या ' जुन्या कोटा 'त राहात होतो. आणि ' नानाच्या हौदा '-शेजारील भावे स्कूलमध्ये शिकत होतो. ( नानाचा हौद आता बुजवण्यात आलेला आहे, आणि भावे स्कूलही तेथून दुसरीकडे हालवण्यात आले आहे. ) शाळेला जाण्याचा माझा रस्ता शनिवारवाड्याच्या उजव्या भिंतीकडून अन् गणेश दरवाजावरून जात असे. त्या दगडी भिंतीसमोर असलेल्या एका जुनाट लांब-लचक घराच्या पहिल्या मजल्यावर बालगंधर्वांच्या आईचे बिऱ्हाड असे. त्या बिऱ्हाडात मी बालगंधर्वांना कधीच पाहिले नाही. कारण ते त्या वेळी किर्लोस्कर कंपनीच्या बिऱ्हाडी राहात असावेत. पण घराच्या गॅलरीत बालगंधर्वांची आई, थोरले बंधू दादा आणि धाकटी बहीण वेणू ह्यांना मी पुष्कळदा पाहात असे. गंधर्वांची आई मोठी गर्गशा बाई होती. तिची आरडाओरड कधी कधी खाली रस्त्यावर ऐकू येत असे. ती अंगाने थोराड असून तिचा चेहरा पुष्कळसा गंधर्वांसारखा दिसे. तिच्या कपाळावरचे भले मोठे कुंकू तिला शोभून दिसे. गंधर्वांची धाकटी बहीण वेणू ही खूपच गोरी असून तिचा चेहरा तर तरुणपणी हुबेहुब गंधर्वांसारखा दिसे. पण तिला जन्मतःच एक व्यंग होते. ती कुबडी होती. त्यामुळे तिच्या सौंदर्यामध्ये फारच मोठे वैगुण्य निर्माण झाले होते. कुंकवाला आधार म्हणून लहानपणी तिचे लग्न लावून देण्यात आले होते. पण ती नवऱ्याकडे कधीही राहात नसे. त्याने दुसरे लग्न केले होते. गंधर्वांचे थोरले बंधू

दादा हे रूपानें ओबडधोबड अन् स्वभावानें अर्धवट होते. आपण गंधर्वांचे थोरले भाऊ आहोत हे ज्याला त्याला ते सांगत. गंधर्वांचे वडील श्रीपादराव राजहंस हे हाडकुळे, किरकोळ बांध्याचे नि मध्यम उंचीचे होते. त्यांच्या भुवयांत शेंदूर आणि कानांत रुद्राक्षांची कुंडले असत. ते आपल्या घरी राहात असलेले मी कधीच पाहिले नाहीत. त्यांचा अहर्निश मुक्काम तेथून थोड्याच अंतरावर शनिवारवाड्याच्या पिछाडीला असलेल्या श्रीमंत विनीवाल्यांच्या वाड्यात असे. त्यांना गाण्याचा नाद होता असे म्हणतात; पण वृत्तीने ते धार्मिक असावेत असे त्यांना पाहताच वाटे.

गंधर्वांचा आणि ' भावे स्कूल 'चा फार जुना संबंध होता. किर्लोस्कर कंपनीत जाण्यापूर्वी गंधर्व ह्या शाळेत इंग्रजी पहिल्या का दुसऱ्या इयत्तेत शिकत होते. आमचे संस्कृतचे शिक्षक गोविंद हरि थोरात हे गंधर्वांचे विलक्षण अभिमानी होते. ते त्यांच्या अनेक गोष्टी आम्हाला सांगत. तसे पाहिले तर आमचे भावे स्कूल म्हणजे नाटक मंडळ्यांशी या ना त्या रीतीनें संबंध असलेल्या ' नाटकी ' मास्तरांचा एक अड्डाच होता. थोरात मास्तर, पेटकर मास्तर हे जसे गंधर्वांचे अभिमानी, तसे दामूअण्णा नगरकर मास्तर, रानडे ड्रॉइंग मास्तर हे सवाई गंधर्वांचे अभिमानी. भावे स्कूलच्या जवळ जवळ समोर असलेल्या किर्लोस्कर नाटकगृहाच्या उजव्या बाजूला एक भडभुंजाचे दुकान असे. त्याच्यावरच्या माडीत एका लहानशा खोलीत शाळा सुटली की रानडे–नगरकर ही सवाई गंधर्वांची अभिमानी मंडळीं चकाट्या पिटीत बसत. बाहेर सवाई गंधर्वांच्या ' नाट्यकला प्रवर्तक मंडळ 'चा एक तक्ता लावलेला असे. ज्यावर शनिवारी ' लीलावती ', बुधवारी ' सिंबेलिन-तारा ' ह्या त्या त्या वारी लागणाऱ्या नाटकांच्या पाट्या दर आठवड्याला बदलल्या जात असत. त्या पाट्या रस्त्यावर उभे राहून मिटक्या मारीत वाचणे हा आमचा आवडता उद्योग असे.

बालगंधर्वांच्यापेक्षा पाच–सहा वर्षांनी लहान असलेले त्यांचे बंधू बापूराव राजहंस हेदेखील आमच्या भावे स्कूलमध्येच शिकत होते. मी इंग्रजी चौथीत जेव्हा आलो तेव्हा ते नुकतेच शाळेतून बाहेर पडलेले असावेत. ते मॅट्रिक पास झाले नसावेत असे वाटते. त्यांच्या मॅट्रिक परीक्षेसंबंधी गंधर्वांची एक गंमत त्या वेळीं आम्हांला सांगण्यात येत असे. गंधर्व कोणाला तरी म्हणाले वाटते की, " बापू मॅट्रिक पास झाला तर त्याला मी येरवड्याच्या कॉलेजात ( म्हणजे डेक्कन कॉलेजात ) घालीन. नापास झाला तर मग मात्र मी त्याला चतुःशृंगीच्या

कॉलेजात ( म्हणजे फर्ग्युसन कालेजात ) घालीन. " बापूराव राजहंस हे वर्णाने गोरे आणि अंगाने सडपातळ होते. त्यांच्या मुद्रेवर पाहणाऱ्याला भासण्याइतके गंधर्वांच्या सौंदर्याशी साम्य होते. त्यांचा गळाही गोड असे. त्यांना लहानपणापासून जर उत्तेजन मिळाले असते, तर त्यांनीही गायक नट म्हणून चांगले नाव कमावले असते. पण गंधर्वांच्या चौवड्यापुढे बापूरावांची टिमकी कशी वाजणार ? बापूराव सरळ ' महाराष्ट्र नाटक मंडळी 'त प्रविष्ट होऊन स्त्रीभूमिका करणारे गद्य नट झाले.

गंधर्वांचे पहिले नाटक पाहिले मी ते ' मानापमान '. १९१२ साल असावे ते. गंधर्व या वेळीं तेवीस—चोवीस वर्षांचे असावेत. नारायणराव जोगळेकर त्याच्या आधीच वारलेले होते. जोगळेकरांना मी रंगभूमीवर असे कधीच पाहिले नव्हते. फक्त एकदाच त्यांना पुण्याच्या बुधवार चौकातून घाईघाईने जाताना प्रत्यक्ष पाहिले होते. भरदार शरीरयष्टी, डोक्याला जरीच्या काड्यांचा करवंदी रंगाचा रुमाल, कानात टपोरी भिकबाळी, अंगावर करवती काठी उपकरणे असा स्वारीचा नोकझोक पाहून मी सर्दच झालो. ते गेल्यानंतर ' मानापमान ' नाटकाचा जो मी प्रयोग पाहिला त्यात धैर्यधराचे काम गोविंदराव टेंबे ह्यांच्याकडे देण्यात आले होते. बालगंधर्व हा जसा स्त्री-सौंदर्याचा आदर्श, तसा गोविंदराव हा पुरुष-सौंदर्याचा आदर्श; आणि संगीताचे तर ते दर्दी. गोविंदरावांचा आवाज पुढे बसला. पण ज्या काळी त्यांनी धैर्यधराचे काम करण्यास प्रारंभ केला, त्या काळात अदमासे सहा महिनेपर्यंत त्यांचा आवाज आणि त्यांची तान म्हणजे एक चमत्कार होता. धैर्यधर टेंबे, भामिनी गंधर्व आणि लक्ष्मीधर बोडस म्हणजे सौंदर्य, संगीत आणि विनोद ह्यांचा महान त्रिवेणीसंगम होता. एक गेला की दुसरा अन् दुसरा गेला की तिसरा ! कोणाला किती पाहावे, कोणाला किती ऐकावे अन् कोणाचे किती कौतुक करावे ह्याच्या भोवऱ्यात प्रेक्षक बेभान होत असत.

गंधर्वांच्या मुद्रेत, नजरेत, हसण्यात, लाजण्यात, मुरकण्यात, चालण्यात, बोलण्यात, नेसण्यात साक्षात स्त्रीचा संचार झालेला होता. पुरुषाच्या देहातून स्त्रीचे सौंदर्य इतक्या मोहकतेने कधीच प्रकट झाले नसेल. त्यामुळे स्त्रीरूपात जेव्हा गंधर्व रंगभूमीवर प्रकट होत, तेव्हा पुरुष तर पागल होत असतच, पण स्त्रियाही अक्षरशः वेड्या होऊन त्यांच्याकडे अपक्ष्म लोचनांनी पाहात बसत. मी प्रथम पाहिलेल्या ' मानापमान ' नाटकात जेव्हा ' हा टकमक पाही ' हे गाणे

गात गंधर्व पहिल्याने प्रकट झाले तेव्हा एकदम थंडगार वाऱ्यातून मोगऱ्यांच्या फुलांचा घमघमाट एकदम अंगावर यावा तसा नाटकगृहाच्या सर्व भागातून ' अहाहा 'चा सौम्य धुंदकारा उमटला. गंधर्वांचे गाणे हे नुसते श्रवणीयच नव्हते, तर प्रेक्षणीयही होते; म्हणजे गंधर्वांच्या गाण्याला प्रतिक्षणी प्रेक्षकांची जी साद मिळे, ती पाहिल्याखेरीज त्या गाण्याची गोडी अनुभवता येत नाही. त्या काळी ध्वनिक्षेपणाची सोय नसल्याने गंधर्वांचा गद्य आवाज फार दूरवर ऐकू येत नसे. निदान मला तरी ते काय बोलत आहेत हे पुष्कळदा ऐकू आले नाही. तथापि गंधर्व काय बोलताहेत ह्याची कोणाला परवा होती ? गंधर्वांचे गाणे सर्वांना ऐकू येत होते आणि त्यांचे सौंदर्य सर्वांना दिसत होते. मग यापेक्षा लोकांना आणखी काय पाहिजे होते ?

बालगंधर्वांना व्यक्तिशः मी कधीच पाहिले नव्हते. त्यानंतर थोड्याच दिवसांनी मी बुधवार चौकातून येत असताना बरेचसे लोक एका दिशेने धावताहेत असे मी पाहिले. मला कळेना काय भानगड आहे ती ? मीही त्या गर्दीत घुसलो. पाहतो तो बालगंधर्व ! रंगभूमीवर जितके सुंदर दिसले, तितकेच ते सुंदर होते. तेजस्वी गौरवर्ण, हसतमुख, डोक्यावरचा काळाभोर केशसंभार उंच काळ्या फरच्या टोपीने झाकलेला, स्वच्छ पांढरा सदरा आणि पांढरी लांडी विजार, कर्दळीच्या रंगाच्या निमुळत्या सुंदर पोटऱ्या नि पायात कोऱ्या कोल्हापुरी चपला अशी स्वारी चालली होती. लोक त्यांच्याभोवती गर्दी करून राहिले होते, आणि गंधर्व खाली मान घालून लाजत, हसत चालले होते. ते त्यांचे कमनीय दर्शन अद्याप मी विसरलो नाही.

पुढे बऱ्याच दिवसांनी किर्लोस्कर कंपनी फुटली आणि बोडस, टेंबे ह्यांच्या सहकार्याने बालगंधर्वांनी स्वतःच्या नावाने ' गंधर्व नाटक मंडळी ' काढली. नव्या कंपनीचा मुक्काम तपकीरगल्लीत सांगलीकरांच्या वाड्यात होता. मी आणि माझे मित्र त्या वाड्यावरून उगाच इकडून तिकडे चकरा मारावयाचे, आणि आत काय चालले आहे त्याचा बाहेरून सुगावा घ्यावयाचे ! बाहेरून काय सुगावा लागणार ? लांब केसांची गोरी गोमटी कार्टी अधूनमधून दिसायची. पण तेवढ्यावरच आम्ही खूष असावयाचे. गंधर्व मंडळी जणू काही आम्हीच काढली अशा अभिमानाने आम्ही दिवसभर त्या मंडळीसंबंधी मनाला जे सुचेल ते बोलत राहायचे. किर्लोस्कर कंपनी मोडली त्याचे आम्हाला सुतक नव्हते. पण गंधर्व मंडळी निघाली त्यामुळे स्वर्ग आम्हाला दोन बोटे राहिला

होता. पण किर्लोस्कर मंडळी फुटल्याचे अतिशय दुःख आणि गंधर्व मंडळी निघाल्याबद्दल पराकोटीचा संताप जर पुण्यात कोणा एका व्यक्तीला झाला असेल, तर तो राम गणेश गडकरी ह्यांना !

एक दिवस गंधर्व मंडळींत गेलेल्या नटांचे सामान किर्लोस्कर नाटकगृहातून बाहेर आणले जात होते आणि रस्त्यावर गाड्या भरल्या जात होत्या. त्या वेळी गडकरी आगगाडीच्या एंजिनसारखे:संतापाच्या धुराचे भपकारे टाकीत दारात उभे होते. गाड्या निघाल्या. इतक्यात बोडस बाहेरून धावत नाटकगृहाकडे परत आले. गडकऱ्यांनी क्रुद्ध आवाजात विचारले, " काय हो, काय राहिले ? " बोडस म्हणाले, " माझे जोडे मी विसरलो ! " गडकरी त्याच स्वरात म्हणाले, " आता बाहेर पुष्कळ मिळतील की तुम्हाला ! " त्यानंतर काही दिवसांनी एका संध्याकाळी कोतवाल चावडीजवळच्या दगडू हलवायाच्या दत्ताजवळ गडकरी आणि बोडस ह्यांची गाठ पडली. गडकऱ्यांना चिडवण्यासाठी बोडस खवचटपणे म्हणाले, " मास्तर, आमच्या गंधर्व नाटक मंडळीचा नारळ फुटला ! " गडकरी शांतपणे म्हणाले, " नारळ फुटला ? ठीक झाले ! आता तुमची कंपनी केव्हा फुटणार ? "

एक दिवस गडकऱ्यांकडून पास घेऊन मी आणि बालकवी ठोमरे 'प्रेम-संन्यास नाटक' पाहावयास गेलो. त्या नाटकात बापू राजहंसाची 'लीले'ची भूमिका पाहिली. ती मला फार आवडली. अगदी बालगंधर्वांचा भाऊ शोभत होता तो. स्वतःच्या घरची कंपनी निघाली असताना आता बापूने गंधर्व कंपनीत न जाता तिऱ्हाईत महाराष्ट्र नाटक मंडळीत काम करावे ह्याचे मला फार वाईट वाटले. मी पुष्कळांना त्याबद्दल विचारलेदेखील, पण कोणाकडूनही समाधानकारक उत्तर मला मिळाले नाही.

नव्या गंधर्व नाटक मंडळीची नाटके जेव्हा पुण्यात किर्लोस्कर नाटकगृहात सुरू झाली तेव्हा आमची कोण धांदल आणि तारांबळ ! नाटकाच्या सर्व व्यवस्थेचे काम आमच्याकडे आले होते. कोठल्या ! रस्त्यावरच्या ! संस्थानिकांच्या गाड्या कशा येताहेत, बाहेर त्या व्यवस्थित कशा लागताहेत ह्याचा बंदोबस्त पोलिस तर करीत होतेच. पण आम्ही लांबून त्यावर देखरेख करीत होतो. आणि काय, आम्ही काय सांगितले होते ? अशा आविर्भावाने एकमेकांच्या हातावर हर्षभराने टाळ्या मारीत होतो. गंधर्व नाटक मंडळीच्या नाटकाला येणाऱ्या प्रेक्षकांच्या गाड्या, मोटारी आणि गर्दी पाहणे हाच एक अद्भुतरम्य

अनुभव होता. मोठमोठे श्रीमंत सरदार, जहागिरदार, संस्थानिक, राजे, महाराजे तसे आणि त्यांच्या एकापेक्षाही एक सुंदर नि सालंकृत नायका यांची अगदी झुंबड तुटून पडायची. खिशात पैसे नसल्याकारणाने नाटकगृहात प्रवेश मिळवणे आम्हाला मुष्कील होते, पण जोगळेकरांच्या हॉटेलात दोन पैशाचा चहा मागवून ही बाहेरची गंमत आम्ही पुष्कळदा पाहात बसायचे.

अशाही परिस्थितीत सहा–सहा आण्यांच्या दरात गंधर्वांची मी अनेक नाटके पाहिली. नूतन आर्यभूषण नाटकगृहात कंपनीचा एकदा मुक्काम असताना सौभद्र नाटक हे मी पाच–सहा वेळा तरी पाहिले. दुसऱ्या अंकात गंधर्व आपल्या संगीताची नि अभिनयाची पराकाष्ठा करीत असत. एकदा किर्लोस्कर नाटकगृहात स्वयंवर नाटक चालू असता गंधर्वांचे 'नरवर कृष्णासमान' हे पद सुरू झाले. मधे ऑर्गनची साथ, बाजूला दोन सारंग्या नि त्यांतून अमृताच्या कारंजासारखा वर उचंबळणारा गंधर्वांचा 'हा–हा–हा–नरवर कृष्णा–समान !' हा गंधर्वतुल्य आवाज, सर्वत्र स्वरब्रह्म निर्माण झाल्याचा साक्षात्कार त्या क्षणी मला झाला. शेकडो प्रेक्षक अर्धोन्मीलित नेत्रांनी त्या स्वरसमाधीचा ब्रह्मानंद अनुभवीत होते– तो प्रसंग मी कधीच विसरणार नाही ! गंधर्वांच्या गाण्याचे किती वर्णन करावे– अन् काय सांगावे ?

सोळा–सतरा साली 'संशयकल्लोळ' नाटक रंगभूमीवर आले तेव्हा गंधर्वांनी लोकप्रियतेचे गौरीशंकर गाठले. तर वीस साली 'एकच प्याला' नाटक येताच ते कीर्तीच्या कांचनगंगेवर विराजमान झाले. महाराष्ट्रात त्यांच्या लोकप्रियतेला काही सीमाच राहिली नाही. सारा महाराष्ट्र गंधर्वमय होऊन गेला. लोकमान्य टिळकांची पगडी महाराष्ट्रात त्यांच्या काळी जेवढी लोकप्रिय झाली नसेल, तेवढी गंधर्व टोपी झाली आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येक तरुणाच्या डोक्यावर जाऊन ती बसली. नुसती गंधर्व टोपीच काय पण गंधर्व सुपारीपासून गंधर्व चपलांपर्यंत गंधर्व हे 'स्थिरचर व्यापुनि दशांगुळे उरले !' घराघरातून गंधर्वांच्या ध्वनिमुद्रिका वाजू लागल्या. भिंतीभिंतीवरून गंधर्वांची स्त्रीभूमिकेतील आकर्षक चित्रे हसू लागली. मानापमान, विद्याहरण, स्वयंवर, संशयकल्लोळ ह्या नाटकांनी गंधर्व हे गंधर्वतुल्य गायक आणि शृंगाराचे बादशहा आहेत हे जगाला पटवून दिले, तर एकच प्याला नाटकाने गंधर्व हे महान अभिनेते आणि करुणरसाचे सम्राट आहेत ह्याचा जगाला प्रत्यय आणून दिला, आणि त्याच कीर्तिशिखरावर पुष्कळ वर्षेपर्यंत ते स्थिर होऊन बसले. त्यानंतर त्यांची गायनात वा अभिनयात

प्रगती झाली नाही.

एवढी अथांग लोकप्रियता आणि गडगंज संपत्ती गंधर्वांना प्राप्त झाली असताना कालांतराने गंधर्व कर्जाच्या डोहात का गटांगळ्या खाऊ लागले, ह्याचा बोध मराठी जनतेला होईना. त्यांचे सहकारी टेंबे त्यांना पूर्वीच सोडून गेले होते. ' एकच प्याला 'नंतर बोडस सोडून गेले. बालगंधर्व हे एकमेव कंपनीचे मालक झाले. नंतर ते बाळासाहेब पंडितांच्या कचाट्यात सापडले. त्यांनी हजारो रुपयांची टांग मारली. पुढे ते लाड सॉलिसिटरकडे गहाण पडले. ह्या सर्व गोष्टी आम्ही लांबून ऐकत होतो, आणि एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत होतो. त्या गोष्टींचे आम्हांला काहीच कुतूहल नव्हते. आम्ही गंधर्वांच्या गुणांचे चहाते होतो. कर्जाचे नव्हतो. डोक्यावर कर्जाचा एवढा बोजा असताना-सुद्धा गंधर्व खाजगी जीवनात किती बादशाही रुबाबाने राहात असत त्याचेच पोवाडे आम्ही गात असू.

एखादा संस्थानिक काय राहील असा गंधर्वांचा थाट असे. त्यांच्या व्यक्तिगत तैनातीत सात-आठ नोकर असत. एक नोकर कुत्री सांभाळायला. एक स्वतंत्र गवळी म्हशींवर. एक रात्रीची कोंबडी शिजवायला. एक संत्र्याचा रस काढावयाला. एक बर्फाचे थंडगार पाणी तयार करावयाला. एक आंघोळ घालायला. एक नाटकाचे वेळी कपडे नेसवायला. गंधर्व हे तसे निर्व्यसनी होते. किर्लोस्कर मंडळीत दारूचे फार मोठे प्रस्थ असे. त्यांच्या संगतीत त्या वेळी बालगंधर्व दारू प्यायला लागले. ' ब्लॅक ॲण्ड व्हाईट ' व्हिस्कीची निम्मी बाटली ते तशीच तोंडाला लावून संपवीत असत. एकदा ते सोलापुरात एका श्रीमंताच्या घरी बसले असताना त्यांचा तो मद्यपनाचा अघोरी प्रकार पाहून तो श्रीमंत उद्गारला, " नारायणराव, तुम्ही जर अशा रीतीने दारू प्याल तर लौकर म्हातारे व्हाल आणि सौंदर्य हे तर तुमच्या आयुष्यातले मुख्य भांडवल ! " त्या क्षणी गंधर्वांनी हातातली दारूची बाटली ताडकन् खाली आपटून तिचा चक्काचूर केला. त्यानंतर उभ्या आयुष्यात त्यांनी दारूच्या थेंबाला स्पर्श केलेला नाही. लोकमान्य टिळक वारले तेव्हा त्यांनी चहा सोडला. त्यानंतर त्यांना फक्त तंबाखूचे व्यसन उरले. रंगभूमीवरचे गाणे संपवून ते ' विंग 'मधे आले म्हणजे त्यांचा नोकर तंबाखू चुन्यात मळून तयार ठेवीत असे. एकदा तेथे त्यांच्या पत्नी उभ्या होता. नारायणराव तंबाखू तोंडात टाकणार तोच त्यांना टोचून त्या म्हणाल्या, " अमक्यासाठी तुम्ही दारू सोडली, तमक्यासाठी तुम्ही चहा

सोडलात, मग माझ्यासाठी तुम्ही काय सोडणार? का मी मेल्यानंतर काही सोडणार?" तोंडाजवळ नेलेली तंबाखू तशीच खाली फेकून देऊन गंधर्व म्हणाले, "तू मेल्यानंतर कशाला! ही आजपासून तुझ्यासाठी मी तंबाखू सोडली!" त्यानंतर त्यांनी तंबाखूला कधीच स्पर्श केला नाही.

संत्र्याचा रस आणि थंडगार पाणी एवढ्यातच नंतर त्यांच्या जीवनाची आसक्ती उरली. मात्र पाण्यात बर्फ घालून ते थंड केलेले त्यांना चालत नसे. भोवताली बर्फ घालून थंड केलेल्या पाण्याने भरलेले चार-पाच थर्मास नेहमी एक गडी घेऊन त्यांच्या सान्निध्यात सिद्ध असे. रात्री नाटक असले म्हणजे सहा साडेसहा वाजता ते थंडगार पाण्याने आंघोळ करीत. थंड पाण्याने काठोकाठ भरलेल्या एका पिंपाशेजारी ते लंगोट घालून ओणवे उभे राहात. नंतर एक गडी एक मोठा टोप घेऊन ते पिंप रिकामे होईपर्यंत त्यातून त्यांच्या अंगावर पाणी ओतीत असे. नारायणराव अंगाला साबण कधी लावीत नसत. 'साबणाने कातडी खराब होते, असे त्यांचे मत होते. स्नान झाल्यावर ते रंगपटात जात. तोंड रंगून झाल्यानंतर लुगडे नेसण्यापूर्वी हिन्याचे अत्तर चांगले ओंजळभर ओतून ते आपल्या सर्वांगाला चोपडीत असत. आपल्या अंगाच्या अत्तराचा सुगंध प्रेक्षकांच्या पहिल्या सात-आठ रांगांपर्यंत तरी पोहोचला पाहिजे असा त्यांचा त्याबाबत युक्तिवाद असे. नंतर जामदार नावाचा त्यांचा नोकर त्यांची वस्त्रभूषा करीत असे. ती पूर्ण झाली आणि नारायणरावांनी डोक्यावर एकदा पदर घेतला म्हणजे मग ते त्या स्त्रीभूमिकेत इतके तन्मय होत असत की अगदी ओळखीचा माणूस जरी रंगपटात आला तरी त्याच्याकडे ते ढुंकून पाहात नसत. बाकीचे स्त्रीपार्टी पडद्याच्या आत आले म्हणजे गळ्याभोवती पदर गुंडाळून विड्या फुंकीत बसताना पाहिले म्हणजे ओकारी येत असे. पण नारायणरावांचे तसे नव्हते. नारायणरावांची स्त्रीभूमिका म्हणजे साक्षात कायाप्रवेश होता.

नाटक संपले म्हणजे त्रिम्हाडी जाऊन आंघोळीचा तोच प्रकार पुन्हा चाले. थंडगार पाण्याचा सबंध हौद ते आपल्या अंगावर रिकामा करून घेत. त्यानतर मग पूजा अन् पुढे जेवण. जेवायला रात्रीचे तीन तरी होत. रात्री जेवायला कोंबडीच लागे. त्यांना एक आचारी असा मिळला होता की, तो कोंबडी शिजवताना तिच्यात अफूची बोंडे घाली. त्यामुळे कोंबडीची लज्जत वाढे अन् ती खाता खाता खाणाऱ्याला गुंगी येई. हे जेव्हा नारायणरावांना समजले तेव्हा त्यांनी त्या माणसाला काढून टाकले. नारायणरावांची शय्या पाहण्यासारखी

असे. अगदी कातणीच्या घरासारखी पांढरी सफेत चादर अन् उशी त्यांना लागे.

खर्चाकडे नारायणरावांनी कधीच पाहिले नाही. अत्तरे घ्यायची म्हणजे हजारो रुपयांची घ्यायची. कापडवाला आला की तोच प्रकार. गरज असो वा नसो हजारो रुपयांची पातळे, लुगडी नि पैठण्या. जरीचे कपडे म्हणजे खऱ्या जरीचे कपडे. सोन्याचे मुकुट म्हणजे चांदीच्या मुकुटाला खऱ्या सोन्याचे पाणी द्यावयाचे. 'कान्होपात्रा' नाटकातला विठ्ठलमंदिराचा देखावा म्हणजे भरीव आणि कातीव खांबाचे खरे विठ्ठलमंदिर. तो एक देखावा परगावी न्यावयाला एक वॅगन लागावयाची. राजाच्या घरात जे जेवायला मिळावयाचे नाही, असे सुग्रास आणि पक्वान्नांचे भोजन सामान्य गड्यापासून मालकापर्यंत मिळावयाचे. त्यामुळे कंपनीत येणाऱ्या नटाचा आकार जर प्रारंभी बाटलीसारखा सडपातळ असला तर सहा महिन्यांच्या आत तो बरणीसारखा भरभक्कम दिसावयाला लागावयाचा. ह्या बिनहिशेबी खर्चिकपणामुळे लाखो रुपयांचे उत्पन्न होऊनही कर्जाच्या राक्षसाने गंधर्वांची पाठ कधीही सोडली नाही, पण काहीही असले तरी रंगभूमीने नारायणरावांचे जेवढे लाड पुरविले, त्यापेक्षाही नारायणरावांनी रंगभूमीचे अधिक लाड पुरविले.

माझी आणि नारायणरावांची प्रत्यक्ष भेट अशी १९२८ च्या नोव्हेंबरमध्ये झाली. मी नुकताच इंग्लंडहून परत आलो होतो, आणि माझी प्रथम पत्नी त्याच सुमारास मरण पावली होती. ते कोणीतरी नारायणरावांना सांगितले. तेव्हा त्यांना फार हळहळ वाटली. तेव्हा त्यांनी माझे मित्र श्री. शं. कृ. देवभक्तांना सांगितले की, "अरे, त्या बाबूरावांना आज नाटकाला घेऊन या रे!" मला पहिल्यापासून ते 'बाबूराव' किंवा 'बाबूराया' ह्या नावाने संबोधीत असत. त्या रात्री किर्लोस्कर नाटकगृहात त्यांचे 'एकच त्याला' नाटक होते. पहिला अंक संपल्यानंतर मी आत गेलो. तेव्हा त्यांनी माझे दोन्ही हात आपल्या हातात दाबून धरले. त्यांचे डोळे भरून आले. माझाही कंठ भरून आला. तेव्हा मग नारायणराव आपल्या नेहमीच्या लाडक्या आवाजात म्हणाले, "देवा, वाईट वाटून घ्यायचं नाही हो! प्रभूची इच्छा–त्याला काय इलाज!" नाटक संपल्यावर थोडा वेळ आम्ही हसत, खेळत गप्पा मारू लागलो. तेव्हा मी सहज म्हणालो, "नारायणराव, तुम्ही गाताना तो हातरुमाल हातात कशाला खेळवता?" "का देवा! काही चुकले काय?" नारायणरावांनी मला विचारले. मी मला म्हणालो, "नारायणराव, तोंड किंवा नाक पुसावयाला हातरुमा-

लाचा उपयोग करतात. त्याचे चारचौघांत प्रदर्शन करणे हे पाश्चात्त्य देशांत असभ्यपणाचे लक्षण समजतात !" त्या वेळी आपले चुकले हे दाखविण्यासाठी त्यांनी असा काही चेहरा केला की शब्दांनी त्याचे वर्णन करता येणार नाही. तेव्हापासून जवळ जवळ गेली चाळीस वर्षे—म्हणजे परवा त्यांची शुद्ध जाईपर्यंत त्यांचा नि माझा स्नेह होता.

गंधर्वांसारखा गायक नि अभिनेता महाराष्ट्रात आजपर्यंत कधी झाला नाही. हे सर्व सांगून झाल्यानंतर आता त्यांच्या व्यक्तिगत स्वभावाबद्दल बोलणे क्रमप्राप्त आहे. गंधर्व अत्यंत खर्चिक होते. व्यवहार त्यांना फारसा समजत नसे. हेही मान्य केले. तरी ते जेवढे दिसत किंवा दाखवीत तेवढे बावळटमात्र मुळींच नसत. त्यांनी एखादी गोष्ट करावयाची ठरविले — मग ती कितीही मूर्खपणाची असो — म्हणजे ब्रह्मदेव जरी खाली उतरला तरी ते केल्यावाचून कधीही राहात नसत. हे त्यांच्या स्वभावाचे मुख्य सूत्र होते. एखाद्याबद्दल त्यांच्या मनात पूर्वग्रह निर्माण झाला की, ते त्याचे तोंडही पाहात नसत. नकट्या नाकाची किंवा गरूड नाकाची माणसे त्यांना कधीही आवडत नसत. 'देवा, तसल्या नाकाची माणसे फार वाईट !' असे ते विव्हळून म्हणत. नारायणरावांना दुसऱ्याचा मत्सर करावयाचे काही कारण होते का ? पण कंपनीत एखादा नट तानबाजी करू लागला की नारायणराव त्याची कानउघाडणी करायचे, "कशाला उगाच शिरा ताणून गाताय ? तुमचे गाणे एकायला का लोक माझ्या नाटकाला येतात ?"

पण एवढे असून नारायणराव अर्धवटच होते. एक बापूराव राजहंस वजा केले की, स्वतः नारायणराव, त्यांची आई आणि त्यांचे थोरले बंधू दादा ही मंडळी म्हणजे अर्धवटांचाच बाजार होता. एकदा बोडसांच्या मुलीला पोटाचा काही आजार झाला. तेव्हा त्याबद्दल ते नारायणरावांच्या आईशी बोलत होते. तेव्हा आई म्हणाल्या, "तुम्ही गणपतराव, आपल्या मुलीला गाढवीचे दूध द्या. आम्ही आमच्या नारायणाला लहानपणी गाढवीचे दूधच द्यायचे !" तेव्हा गणपतराव गंभीरपणे म्हणाले, "तरीच !" त्यांच्या बोलण्याची खोच आईच्या कोठून लक्षात येणार ?

दादा राजहंसना वाटावयाचे की नारायणाला काही कळत नाही. माझ्यासारखा गायक हिरो घरातल्या घरात असता हा नारायण बाहेरचे हिरो का शोधून आणतो कोणास ठाऊक ! पण नारायणरावांनी आपल्या थोरल्या बंधूंना हिरोचा चान्स कधीच दिला नाही. शेवटी त्यांच्याकडे कंपनीच्या नाटकात दोनच कामे

आली : एक पारिपार्श्वकाचे नि दुसरे धृतराष्ट्राचे. सूत्रधार हा चांगलाच गाणारा असे, त्याच्या भोवती जे दोन पारिपार्श्वक उभे असत, ते सूत्राधाराबरोबर गात असत. पण दादांना गाता येत नसे. सूत्रधार गाऊ लागला की ते तोंड हालवीत. त्यामुळे ते गाताहेत, का नुसतेच तोंड हलविताहेत हे प्रेक्षकांना कळत नसे. एकदा सूत्रधाराने मधेच गाणे थांबवले. नुसती पेटीच वाजत होती. दादा जोरजोरात तोंड हालवीत होते, आणि प्रेक्षकांना गाणे तर काही ऐकू येत नव्हते. तेव्हा दादांच्या गाण्याचे बिंग प्रेक्षकांच्या लक्षात आले, आणि नाटकगृहात हास्याचा नि टाळ्यांचा प्रचंड प्रस्फोट झाला.

धृतराष्ट्राचे काम असले, म्हणजे दादा त्या सकाळीं जो भेटेल त्याला सांगत की, " या नाटकात आज आमचे काम आहे ! " कौरवांच्या दरबारात सिंहासनावर डोळे मिटून बसावयाचे आणि फक्त एकच वाक्य बोलावयाचे एवढेच दादांच्याकडे काम असे. दरबाराचा देखावा आत मांडला जात असताना, बाहेर कव्हरच्या पडद्यावर गंधर्वांचे पुष्कळ वेळ गाणे चालत असे. तेव्हा गाणे संपावयाच्या सुमारास आतली मंडळीं आपापल्या जागी जाऊन बसत असत. पण नारायणरावांचे गाणे बाहेर सुरू झाले की, धृतराष्ट्राच्या वेषातले दादा सिंहासनावर जाऊन डोळे मिटून बसत. कुणी म्हणाले की, " दादा, अजून वेळ आहे. इतक्यातच डोळे मिटून कशाला बसता ? " तर दादा म्हणत, " तसे नाही, आयत्या वेळीं घाई नको ! " एकदा काय झाले की, दादा डोळे मिटून आत बसले होते. बाहेरचे नारायणरावांचे गाणे संपले. पडदा वर उचलला गेला. दरबाराचा देखावा सुरू झाला. दादांचे वाक्य आले. पण दादा बोलेनात. कारण त्यांना लागली होती झोप. तेव्हां मागल्या चौरीवाल्याने त्यांना हळूच चिमटा घेतला. तेव्हा दादांनी दचकून ' ऑं ' करून डोळे उघडले. धृतराष्ट्राने डोळे उघडलेले पाहताच प्रेक्षकांनी कडाडून टाळी दिली. तेव्हा दादांनी घाबरून गपकन् डोळे मिटून घेतले, त्यावर हास्याचा प्रचंड स्फोट झाला. मग तो देखावा पुढे कसा तरी पार पाडला. पण त्या प्रसंगाला अनुलक्षून दादा नेहमी कौतुकाने सांगायचे की, " आम्ही प्रेक्षकांकडे नुसते पाहिले अन् टाळीं घेतली ! "

जसे दादा तसेच नारायणराव. एक दिवस नारायणराव पत्ते खेळत होते. एवढ्यात कंपनीतला एक तरुण आचारी एका दहा वर्षांच्या पोराला पकडून नारायणरावांकडे आला नि म्हणाला, " नाना, ह्या पोराने मला आईवरून शिवी दिली ! " नारायणरावांनी पत्ते बाजूला ठेवले नि त्या पोराकडे दयार्द्र दृष्टीने

पाहात ते म्हणाले, "अरे, तू दहा वर्षांचा. हा आचारी वीस वर्षांचा. ह्यांची आई निदान चाळीस वर्षांची आहे. तुला 'ते' शक्य आहे काय? अरे, शक्य असेल तीच शिवी द्यावी! धर आंगठे तिथे!" त्यावर ओणवे होऊन त्या पोराने आंगठे धरले. आचारी निघून गेला. नारायणराव पत्तें खेळू लागले. काही वेळाने ते पोरगे हळूहळू मागे सरकत सरकत बाहेर पळून गेले. तें जेव्हा नारायणरावांच्या कोणी लक्षात आणले, तेव्हा नारायणरावांच्या तोंडून चटकन् शिवी बाहेर पडली, "हात् त्याच्यायला–" तेव्हा त्यांच्याशी पत्ते खेळणाऱ्या एकाने ताबडतोब नारायणरावांची पाठ थोपटून त्यांना सांगितले, "ही शिवी अगदी बरोबर आहे–कारण ती शक्य आहे!"

नारायणरावांना मुलगा नव्हता. झाला तर जगत नव्हता. एकदा केडगावच्या नारायणमहाराजांनी त्यांना सांगितले की "या वर्षी तुम्हांला मुलगा होईल!" त्या वर्षी कंपनीचा मुक्काम पुण्याहून नागपूरला हालत होता. पण नारायणरावांची बायको म्हणाली, "मी नागपूरला तुमच्याबरोबर साफ येणार नाही. मला मुलींच्या शिक्षणासाठी पुण्यालाच राहिले पाहिजे." त्यामुळे नारायणरावांच्या आयुष्यात प्रचंड समस्या निर्माण झाली. भयंकर चिंतातुर चेहरा करून आणि कपाळाला हात लावून नारायणराव आपल्या पत्नीला सांगू लागले, "यंदा आपल्याला मुलगा होणार असा सद्गुरूंनी आशीर्वाद दिला आहे. आता आम्ही जाणार नागपुरला अन् तुम्ही राहणार इथे पुण्याला! मग हा सद्गुरूंचा आशीर्वाद खरा कसा ठरणार? 'नाही-नाही- मी विचारतो, मग हा सद्गुरूंचा आशीर्वाद खरा कसा ठरणार?' 'आम्ही तिकडे-तुम्ही इथे'. ही नारायणरावांच्या युक्तिवादाची पुनरावृत्ती, त्यांच्या गाण्यासारखी चांगली पाऊण तास चालली, तेव्हा अखेर 'सद्गुरूंचा आशीर्वाद' खरा ठरविण्यासाठी पत्नीने नारायणरावांच्या बरोबर नागपूरला जाण्याचा निर्णय घेतला. तथापि, नागपूरला जाऊनही 'सद्गुरूंचा आशीर्वाद' वांझोटाच ठरला!

कोणत्या प्रसंगी काय बोलावे ह्याचा नारायणरावांना पाचपोच नव्हता. तोंडाला येईल ते तासन्तास ते बोलत राहत. पुण्याच्या 'वसंत व्याख्यानमले'त दुर्गाबाई खोटे ह्यांच्यासंबंधी असेच ते काहीतरी बोलून गेले. त्याचा परिणाम असा झाला की, वकिलाची नोटीस आली नि त्यांना माफी मागावी लागली. एकदा 'बालमोहन नाटक मंडळी'तर्फे आम्ही पुण्यात नाट्यसंमेलन भरविले. त्या वेळीं अध्यक्षपद आम्ही दिले नारायणरावांना. नारायणराव बोलायला उठले.

विषय लहान मुलांची नाटक कंपनी. ते म्हणाले, " लहान मुलांना नाटक कंपनीत घेऊ नये असे आमचे मत आहे. कारण, लहान मुलांना कंपनीत फार त्रास होतो. ( हशा ) काय त्रास होतो हे मला तुम्हांला सांगता येत नाही. (प्रचंड हशा ) मला त्याचा अनुभव आहे ना ! ( अनावर हशा ) कारण मी देखील लहानपणीच नाटक मंडळीत गेलो ! " ( पांच मिनिटे नाटक गृहातले प्रेक्षक हसून हसून गडबडा लोळू लागतात. )

गोहरबाई जेव्हा गंधर्व मंडळीत आली, तेव्हा माझ्या अध्यक्षतेखाली त्यांच्या ' संशयकल्लोळ ' नाटकाचा प्रयोग ' विजयानंद ' नाटकगृहात होता. नारायणराव होते अश्विनशेट. गोहरबाई होत्या रेवती. नारायणराव नि गोहरबाई ह्यांचे संबंध जगजाहीर होते. त्या प्रयोगाला नारायणरावांच्या पत्नीही हजर होत्या.

पहिल्या अंकातल्या दुसऱ्या प्रवेशात नारायणराव प्रविष्ट झाले आणि अश्विनशेटजीचे भाषण बोलू लागले, " मी आज करणार आहे, त्या गोष्टीला माझा जिवलग मित्र वैशाखशेट ह्याचासुद्धा मनापासून सल्ला नाही, पण करावं काय ? ऐन पंचविशीच्या जवानीत लागोपाठ तीन बायका दगावल्या. शेवटी अगदी जिकिरीस येऊन माघमावेश्वर म्हणून कोणी नामांकित ज्योतिषी आले होते त्यांना पत्रिका दाखविली. ते म्हणाले, ' तुम्हांला मंगळ अनिष्ट असून लग्नाची बायको काही तुम्हाला लाभायची नाही ! ' ( येथून हशाला सुरुवात झाली ) लग्नात काही प्रकार करून पाहिलात तर मात्र स्त्रीसुखाचा संभव दिसतो ( हशा वाढू लागला ! ) हे मला पटून लग्नाचा बेत अजिबात सोडून दिला आणि ज्योतिषीमहाराजांनी सुचविल्याप्रमाणे एखादी उत्तम चालीरीतीची नायकिणीची मुलगी पाहून तिच्याशी विवाहाच्या स्त्रीप्रमाणे संसारसुख घ्यावं असा निश्चय केला ! "

त्याबरोबर हास्याचा एवढा प्रचंड बॉंबगोळा नाटकगृहात फुटला की, त्या स्फोटाने पुष्कळ वेळपर्यंत नाटकगृह एकसारखे हादरत होते.

१९२८ पासून माझी नि नारायणरावांची प्रत्यक्ष ओळख होती, पण मी नाटक लिहू शकेन ह्याची त्यांना कल्पना नव्हती. १९३३ साली माझे ' साष्टांग नमस्कार ' हे नाटक रंगभूमीवर येताच ' नाटककार ' म्हणून माझे नाव सर्वतोमुखी झाले. एका प्रयोगाला ते आले होते. त्यांना ते नाटक आवडले की नाही, हे सांगता येणार नाही. पण जाता जाता, ' बाबूराया, आमच्यासाठी एखादे लिहा की चांगले ! ' असे हसत हसत ते म्हणाले. मी मान हलवल्यासारखे केले.

पुढे त्याच वर्षाच्या नोव्हेंबरमधे मी ‘ घरांबाहेर ’ हे नाटक लिहिले. शं. कृ. देवभक्तांनी नारायणरावांना कळविले. तेव्हा ‘ नाटकाच्या वह्या घेऊन मुंबईला या’ अशी त्यांची मला तार आली. त्याप्रमाणे वह्या घेऊन मी मुंबईला गेलो. कंपनीत माझे नाटक मी वाचून दाखविले. सर्वांना ते आवडले. नाटक बसवण्याचे नारायणरावांनी ठरविले. माझा मुक्काम कंपनीतच होता. संध्याकाळी नारायणराव मला म्हणाले, “ तुमचे नाटक तर फार चांगले आहे. पण आमच्या आईला नाटकाचे नाव आवडले नाही. ती म्हणते ‘ घराबाहेर ’ हे नाव अशुभ वाटते. ” मी हसून म्हणालो, “ तुमची आई असे म्हणते, पण आमची आई म्हणते की ह्या नावासारखे दुसरे चांगले नावच नाही ! ” तेव्हा ते बोलणे तितक्यावरच थांबले. पुढे पात्रयोजना झाली. नटांची नावे बोर्डावर लागली. संगीताच्या चाली मास्तर कृष्णरावांनी द्यावयाचे ठरले. पण मास्तर तेवढ्यात कुठे बडोद्याला निघून गेले. त्यामुळे माझ्या नाटकाचे काम तसेच रखडून पडले. आम्ही दोन्ही वेळीं कंपनीत पुरवा झोडून ‘ रॉयल ऑपेरा ’ थिएटरामधल्या एका खोलीत मुक्काम करून होतो. त्या वेळीं वसंत शांताराम देसाई ह्यांच्या ‘ अमृतसिद्धी ’ चे प्रयोग चालू होते. पुष्कळदा प्रयोगाला गोहरबाई नि त्यांच्या भगिनी अमीरबाई येत. त्या वेळीं त्या तरुण होत्या आणि रंगाने काळ्या असल्या तरी तेजस्वी होत्या. नाटकाचा एखादा अंक संपला की, कंपनीचे मॅनेजर बापूराव राजहंस यांना गोहरबाई भेटत आणि नारायणरावांना भेटायची इच्छा प्रदर्शित करीत. मी त्या वेळीं बहुधा रंगपटात असे. तेव्हा तोंड वेडेवाकडे करून नारायणराव गोहरबाईंच्या नावाने एखादी ग्राम्य शिवी हासडत अन् बापूला म्हणत, ‘ बापू , मला नाही रे त्या XX ला भेटायचं ! ’ ज्या गोहराबाईंचे तोंड पाहायची नारायणरावांची एक वेळ तयारी नव्हती, त्याच गोहरबाईंच्या गळ्यात अखेर त्यांना जाऊन पडावे लागले.

वस्तुतः ज्या वेळी नारायणराव सौंदर्याच्या आणि कीर्तीच्या शिखरावर होते, त्या वेळी मोठमोठ्या राजघराण्यातल्या स्वरूपसुंदर स्त्रिया त्यांमागे हात धुऊन लागल्या होत्या. त्यांच्या प्रेमपत्राचा त्यांच्यावर वर्षाव पडत होता, पण नारायणरावांनी ढुंकून त्यांच्याकडे कधी पाहिले नाही. पण त्याच नारायणरावांना अखेर ‘ बाबा—माझा बाबा ’ असा गोहराबाईंच्या मागे आक्रोश करीत धावावे लागले. ‘ बलीयसी केवलमीश्वरेच्छा ! ’ १९३४ च्या हिवाळ्यात नारायणरावांचाच आवाज बसला. काकासाहेब खाडिलकरांनी त्यांना सांगितले की, तुम्ही आता

सोलापूरला जा. पण सोलापूरला जाण्यासाठी भाड्याला पैसे नव्हते. बायकोच्या समोर सुतकी चेहरा करून दिवसभर नारायणराव बसायचे. ते दृश्य मला बघवेना. माझ्या नाटकाची कुंडली तर आता स्पष्टच दिसत होती. एक दिवस मी बापूरावांना म्हणालो, " मला, यापुढे कंपनीत राहणे अशक्य आहे. मला नानांचा चेहरा बघवत नाही. " बापूराव हळूच माझ्या कानात म्हणाले, "अहो, बाबूराव, आमचे बंधू नट आहेत हे विसरू नका. सोलापूरच्या भाड्यासाठी बायकोने अंगावरचे दागिने विकावेत, म्हणून आमच्या बंधुरायांनी हे नाटक चालवलेले आहे. त्यात खरे काही नाही ! " तरीदेखील मी नारायणरावांना न भेटता पुण्याला निघून गेलो. माझ्या नाटकाच्या वह्या मागण्याची हिंमत मला झाली नाही. आजतागायत मला त्या मिळाल्या नाहीत. त्यांची दुसरी प्रत घरी होती ती मी लागलीच ' बालमोहन 'ला पाठवून दिली. नारायणरावांचा अभिनय यशस्वी झाला. वहिनींनी दागिने विकले. कंपनी सोलापूरला गेली नि बंद पडली. आणि नारायणराव ' धर्मात्मा ' चित्रासाठी ' प्रभात 'मधे दाखल झाले.

आता पुढे काही फारसे सांगावयाचे उरले नाही. मुंबईस आल्यानंतर ते माझ्या घरापासून फारच थोड्या अंतरावर माहीम बाजारात राहात असत. मधून मधून ते मला मुद्दाम घरी बोलावून घ्यावयाचे. पहिल्या नाट्यमहोत्सवात ते अध्यक्ष होते. मी स्वागताध्यक्ष होतो. त्यांचा अमृतोत्सव ' शिवाजी पार्क '-वर साजरा झाला. त्या वेळी मीच प्रमुख वक्ता होतो. ' दैनिक मराठा ' निघाल्या-नंतर नारायणराव रोज नियमाने ' मराठा ' वाचीत असत.

गोहरबाईने त्यांना छळले, लुबाडले असा पुष्कळ प्रवाद आहे. पण त्यात काही अर्थ नाही. सतत पंधरा वर्षे नारायणराव पांगळ्यासारखे पडून होते. त्यांचे मलमूत्र साफ करावयाचे, न्हाऊ खाऊ घालायचे म्हणजे काही चेष्टा नाही. आई-देखील जे काम करणार नाही ते गोहरबाईने केले. माझ्याकडे ती नेहमी येई. तिच्या मृत्यूपूर्वी ती एक दिवस माझ्याकडे येऊन निर्वाणीने म्हणाली, " दादा, आता हे भंग्याचे काम मी किती दिवस करू ? मी आता थकले. आता जगायची मला इच्छा नाही ? " त्यानंतर थोड्या दिवसांनी तिचा देहान्त झाला.

ती जिवंत असताना तिचा ' महंमद ' नावाचा एक भाचा होता. त्याला आपल्या मांडीवर दत्तक घ्यावयाचा आपला विचार नारायणरावांनी मला बोलून दाखविला. मला हसावे का रडावे कळेना. मी म्हणालो, " नारायणराव, तुम्ही आजपर्यंत जगाला पुष्कळ चमत्कार करून दाखवलेत, पण मेहेरबानी करा आणि

'महंमद नारायण राजहंस' हा चमत्कार जगाला दाखवू नका!"

गोहर गेल्यानंतर त्या भयानक वातावरणातून त्यांना हालविण्याचा मी पुष्कळ प्रयत्न केला. मी त्यांना दम दिला की, "मराठ्यातून मी तुमच्यावर भयंकर लेखमाला लिहीन!" तेव्हा ते म्हणाले, "मी तुमच्या शिवशक्तीसमोर येऊन प्राणांतिक उपोषण करीन आणि टाच घासून मरेन. पण या घरातून हालणार नाही!" तेव्हा मी नाद सोडला. मी आजारी असताना दोन माणसांच्या पाटुंगळीला बसून ते मला भेटावयाला 'शिवशक्ती'च्या तिसऱ्या मजल्यावर आले होते. त्यांची आठवण म्हणून त्यांचे सुप्रसिद्ध 'ऑर्गन' त्यांच्याकडून विकत घेऊन मी माझ्या 'सुभाष सभागृहात' ठेवले आहे.

ज्या दिवशी ते बेशुद्धावस्थेत गेले त्याच दिवशी मी प्रथम त्यांच्या घरी जाऊन त्यांना पाहिले. तारुण्याच्या नि सौंदर्याच्या शिखरावर ज्या डोळ्यांनी गंधर्वांना पाहिले त्याच डोळ्यांना त्यांचे ते भेसूर कलेवर पाहताना काय वाटले असेल? सारे ब्रह्मांड माझ्याभोवती फिरू लागले. अश्रूंनी डबडबलेले डोळे मी एकदम मिटले नि तसाच परत आलो.

आपल्या स्वर्गीय गायनाने सतत चाळीस वर्षे महाराष्ट्राच्या हृदयसिंहासनावर ज्यांनी सम्राटासारखे राज्य केले, त्यांनीच आपल्या व्यक्तिगत अवगुणांनी आपल्या जीवनाचा शेवटी विध्वंस करून घेतला. पण आपल्याला त्याच्याशी काय करायचे आहे? आपण त्यांच्या गंधर्वतुल्य गाण्याचे उन्मादक सूर मनसोक्त कानांत नि मनात भरून धुंद होऊ या—बेहोष होऊ या—

दूषण वगळुनि भूषणमात्रे प्रभुपूजन करी
काळ असे
तुम्ही आम्ही कष्टी होणे हा कुठला
मग न्याय असे!

# ७

## बालगंधर्व रंगमंदिर

महाराष्ट्राच्या नाट्यकलेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखी एक देदीप्यमान घटना आज पुण्यनगरीत घडत आहे. सतत पन्नास वर्षे ज्यांनी आपल्या गंधर्वतुल्य गायनाने आणि अप्सरातुल्य अभिनयाने महाराष्ट्रातील लक्षावधी प्रेक्षकांना डुलवले, फुलवले आणि खुलवले, ते महाराष्ट्राचे नटसम्राट नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांच्या स्मरणार्थ ' बालगंधर्व रंगमंदिर ' या नावाचे त्यांच्या कीर्तीला साजणारे आणि पुण्याच्या लौकिकाला शोभणारे, असे सर्वांगसुन्दर नाट्यमंदिर पुणे महानगरपालिका जनतेच्या चरणी आज सादर करीत आहे. या नाट्यमंदिराचे उद्‌घाटन आणि त्यातील रंगमंचाचे अनावरण अनुक्रमे भारताचे गृहमंत्री ना. यशवंतराव चव्हाण आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक हे महाराष्ट्राचे दोन लोकप्रिय आणि रसिक नेते करीत आहेत, त्यामुळे ' समसमां संयोग की जाहला ' असेच सहजोद्गार प्रत्येकाच्या तोंडून निघतील. या ऐतिहासिक प्रसंगाचे अध्यक्षस्थान व्यक्तिशः आमच्याकडे सोपविण्यात आलेले होते, पण दुर्दैवाने गेले दहा दिवस आम्ही रुग्णशय्येवर पडून असल्याकारणाने आम्हांस या वैभवाच्या आनंदाचा आस्वाद घेण्यासाठी त्या स्थळीं उपस्थित राहणे अशक्य आहे. त्यामुळे आमच्या नैराश्याला खरोखर पारावार उरलेला नाही. तथापि कल्पनेने आणि भावनेने आम्ही या प्रसंगी उद्‌घाटकांच्या सान्निध्यात रंगमंचावर उपस्थित आहोत, याबद्दल रसिकांनी विश्वास बाळगावा.

एके काळी पुणे हे भारतीय राजकारणाचे, सामाजिक सुधारणांचे, विद्या-व्यासंगाचे नि ज्ञानोपासनेचे आणि साहित्य-संगीत-नाट्यकलेच्या उत्कर्षाचे जे अग्रेसर केंद्र समजले जात होते, ज्या पुणे शहरात शिवकालीन नि पेशवेकालीन इतिहासाचे अमर अवशेष अद्यापही प्रत्यक्ष पाहावयाला मिळतात; भारताला आदर्शभूत होतील अशी अनेक विद्यालये, महाविद्यालये आणि विद्यापीठे ज्या पुणे शहराच्या परिसरात आज दिमाखाने उभी आहेत, त्या पुणे शहराच्या चतुःसीमेत अद्ययावत सुखसोईंनी आणि तांत्रिक साधनांनी समृद्ध असलेले एकही नाटकगृह, देश स्वतंत्र होऊन वीस वर्षे झाली तरी असू नये, ही खरोखरच नामुष्कीची गोष्ट होती. मराठी नाटकांना प्रत्यक्ष अशी सुरुवात सन अठराशे त्रेचाळीस साली सांगली येथे विष्णुदास भावे ह्यांनी केली. म्हणून विष्णुदास भावे हे मराठी नाटकाचे नि रंगभूमीचे आद्य जनक, सांगली ही मराठी नाटकाची गंगोत्री आणि अठराशे त्रेचाळीस हे वर्ष मराठी रंगभूमीच्या प्राणप्रतिष्ठेचे वर्ष म्हणून संबोधिले जाते. अशा रीतीने सांगली हे मराठी रंगभूमीचे जरी जन्मस्थान समजले जात असले, तरी जन्म झाल्यानंतर पुढील शंभर-सव्वाशे वर्षांत मराठी रंगभूमी आपल्या जन्मग्रामी क्वचितच मुक्कामाला गेली असेल. माहेरपणाचे आणि सासरपणाचे जे सुख पुढे मराठी रंगभूमीला मिळाले किंवा तिचे जे सर्व कोडकौतुक झाले ते सारे पुण्या-मुंबईकडेच. मुलीच्या गुणांचे कौतुक माहेरी होत असले, तरी त्या गुणांची कसोटी सासरीच लागते. या दृष्टीने मुंबई हे मराठी रंगभूमीचे माहेर, तर पुणे हे तिचे सासर आहे, असे विनोदाने म्हटले जाते. उत्तम नटाची, नाटकाची खरी परीक्षा पुण्यात होते, असा आजपर्यंत या शहराचा लौकिक आहे. त्याबद्दल कोणाचे दुमत असेल असे वाटत नाही. न आवडणाऱ्या नाट्यप्रयोगावर किंवा नटावर भजी किंवा पाव मारण्याचा शोध प्रथम पुण्यामधेच लागला असावा, असे काही विद्वान संशोधकांचे मत आहे, आणि पुण्यात भजी खाऊन पसार झालेल्या पुष्कळशा नाटक मंडळ्या पुढे मुंबईच्या आश्रयाला जात असत. यावरून पुणे हे मराठी रंगभूमीचे सासर, आणि मुंबई हे तिचे माहेर आहे असे जे मौजेने म्हटले जाते, त्यात पुष्कळसे तथ्य असावे असे वाटू लागते.

ज्याला थोड्याफार प्रमाणात 'नाटकगृह' असे म्हणता येईल असे पुण्यातील पहिले नाटकगृह म्हणजे 'किर्लोस्कर नाटकगृह'! हे पुण्यात १९०८ च्या सुमारास बांधण्यात आले. याच्या आधी 'जुने आर्यभूषण', 'विजयानंद'

आम्ही स्वतः पाहिलेले नाही. ज्या नाटकगृहामधे प्रेक्षकांना बसण्याची सोय नाही, रंगभूमीवर काय चालले आहे हे दिसण्याची किंवा ऐकण्याची व्यवस्था नाही, अशा अरुंद आणि कोंदट नाटकगृहात दाटीवाटीने रात्रीच्या रात्री बसून लोकांनी या पुण्यात मराठी नाटकांचे नि नटांचे गडगंज कोडकौतुक केले आणि मराठी रंगभूमीला पराकाष्ठेचे वैभव प्राप्त करून दिले. त्याबद्दल पुणेकरांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

मराठी जनता स्वभावतःच नाटकाची वेडी आहे. कारण महाराष्ट्रीयांच्या स्वभावात जन्मतःच मुळी नाट्य भरलेले आहे. जो मनुष्य परिस्थितीला शरण जातो, त्याच्या आयुष्यात नाट्य असू शकत नाही. महाराष्ट्रीय माणूस हा आपल्या परिस्थितीला आजपर्यंत शरण गेला नाही, असा शिवकालीन स्वराज्याच्या लढ्यापासून तो संयुक्त महाराष्ट्राच्या संग्रामापर्यंतचा इतिहासाचा दाखला आहे. प्रतिकूल परिस्थितीशी महाराष्ट्रीय माणसे शेवटपर्यंत लढत राहतात, म्हणून त्यांच्या जीवनात नाट्याला स्थान आहे. जोपर्यंत महाराष्ट्राची झगडण्याची वृत्ती शाबूत आहे, तोपर्यंत महाराष्ट्रात नाट्यकला अमर आहे. पूर्वीच्या करमणुकीची सर्व मिरासदारी एकट्या नाटकाकडे होती. पण पुढे मूकचित्रपटाचा नि बोलपटाचा शोध लागल्यानंतर, रंगभूमी आणि नाट्यकला आता सर्वस्वी नाहीशा होतात की काय, अशा तऱ्हेचे संशयग्रस्त आणि भीतिग्रस्त वातावरण केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर साऱ्या जगात निर्माण झाले.

१८८० ते १९३० पर्यंतचा पन्नास वर्षांचा काळ हा मराठी रंगभूमीच्या वृद्धीचा, विकासाचा, वैभवाचा आणि सुधारणेचा काळ समजला जातो. तीस सालानंतर बोलपटाचा जमाना जोरात सुरू झाला. चित्रपटांनी रंगभूमीवर आक्रमण केले. महाराष्ट्रातील बहुतेक नाटकगृहे ही चित्रपटगृहे झाली. नाटकगृहे फारशी उरलीच नाहीत. बहुतेक नाटक मंडळ्या बंद पडल्या. धंदेवाईक नटांची अन्नान्नदशा झाली. नाट्यव्यवसायाखेरीज ज्यांना उपजीविकेचे दुसरे साधन नव्हते, अशी काही वृद्ध नट मंडळी देवळाच्या आणि धर्मशाळेच्या आश्रयाने गावगन्ना हिंडू लागली. तथापि, एवढ्या प्रतिकूल अग्निदिव्यातून जाऊनसुद्धा मराठी नाट्यकला या क्षणापर्यंत जिवंत राहिली. एवढेच नव्हे तर विद्यमान काळी मराठी रंगभूमीमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याची आशादायक चिन्हे सर्वत्र दिसू लागलेली आहेत. कारण, आताच सांगितल्याप्रमाणे मराठी जनता ही स्वभावतःच नाटकाची वेडी आहे. रंगभूमीवर तिचे अलोट प्रेम आहे. प्रेक्षकांची वाण

आहे, अशी निदान या महाराष्ट्रात तरी कोणालाही तक्रार करता येणार नाही. म्हणून रंगभूमीवर जोपर्यंत जनतेचे प्रेम आहे, तोपर्यंत रंगभूमी जिवंत राहणारच राहणार हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

गेली कित्येक वर्षे पुणे शहरात मराठी नाटकांना उभे राहायला जागाही नसताना, त्यांचा झेंडा पुणेकरांनी मोठ्या घडाडीने उचलून वर धरलेला आहे याचे एक विशेष कारण म्हणजे, गेल्या सव्वाशे वर्षांत मराठी रंगभूमीवर ज्या नामवंत नाटक मंडळ्या आणि मोठमोठे नट होऊन गेले, त्यांच्या उत्कर्षाचा नि अपकर्षाचा इतिहास पुणे शहराने स्वतःच्या डोळ्यांनी पाहिला आहे, म्हणून मराठी रंगभूमीबद्दल पुणेकरांना जो विलक्षण जिव्हाळा वाटतो, तसा महाराष्ट्रात अन्यत्र वाटणे कठीण आहे. असे म्हटले तर, कोणी रागावण्याचे कारण नाही.

नटसम्राट बालगंधर्व हा मराठी रंगभूमीच्या इतिहासाचा तर मूर्तिमंत आत्माच होय ! म्हणून त्यांच्या नावाने पुण्यात लाखो रुपये खर्चून हे जे रंगमंदिर बांधण्यात आलेले आहे तो जणू काही मराठी रंगभूमीच्या भविष्यकालीन कल्याणाचे मार्गदर्शन करण्यासाठी पुणेकरांनी दीपस्तंभच उभा करून ठेवला आहे. ज्या नटसम्राटाचे 'अमृतमधुर नामाभिधान' या रंगमंदिराला दिले आहे, त्या बालगंधर्वांच्या गायनाचे, अभिनयाचे आणि सौंदर्याचे काय वर्णन करावे ? ते करायचे झाल्यास 'शाकुंतल,' 'मेघदूत' आणि 'ऋतुसंहार' ही अमर काव्ये लिहिणाऱ्या कविकुलगुरू कालिदासाच्या प्रतिभेचेच सामर्थ्य अंगी असावयाला हवे. लोकमान्य टिळकांनी दिलेली 'बालगंधर्व' ही पदवी त्यांना जितकी शोभत असे, तितके त्यांचे कुलनाम 'राजहंस' हेही त्यांना शोभून दिसत असे. नाव आणि जीवन यांचा एवढा अढळ सुंदर मिलाफ ज्यांच्याध्ये झालेला आहे, अशा व्यक्ती जगात फारच थोड्या. बालगंधर्व हे मराठी रंगभूमीचे 'गानगंधर्व' होते तसेच ते रंगभूमीचे 'राजहंस'ही होते. रंगभूमीला त्यांनी एखाद्या राजाच्या वैभवाने नटविले आणि हंसाच्या रसिकतेने त्यांनी रंगभूमीचे सारे लाड पुरविले.

महाराष्ट्राचा असा एक काळ होता की, ज्या वेळी बाळ गंगाधर नि बालगंधर्व या दोघांची प्रत्येक घराघरात रामकृष्णासारखी पूजा व्हावयाची. त्यांची चित्रे ज्या घरात नाहीत असे एकही घर त्या वेळी महाराष्ट्रात नव्हते. रंभा, मोहिनी आणि तिलोत्तमा यांनी ज्यांच्या पायाशी लोळण घ्यावी, असे अप्रतिम स्वर्गीय स्त्री—सौंदर्य विधात्याने त्यांना जन्मतःच देऊन टाकले होते. ते कोठल्याही भूमिकेत आणि कसल्याही वेशभूषेत रंगभूमीवर येवोत. 'आश्रमहरिणी' शकुंतलेच्या वल्कलात

आणि कसल्याही वेशभूषेत रंगभूमीवर येवोत. 'आश्रमहरिणी' शकुंतलेच्या वल्कलात येवोत किंवा राजकन्या रुक्मिणीच्या भरजारी वस्त्रांत आणि रत्नखचित अलंकारांत येवोत. गणिका वसंतसेनेचा साजशृंगार अंगावर घालून येवोत किंवा गृहिणी सिंधूचे फाटके लुगडे अंगावर परिधान करून येवोत. त्यांच्या नुसत्या दर्शनाने हजारो प्रेक्षक अक्षरशः वेडे होत. यात एका शब्दाचीही अतिशयोक्ती नाही.

बालगंधर्वांचे काय आठवावे आणि काय सांगावे? महाराष्ट्राला गाण्याची शिकवण त्यांनीच दिली, आणि गाण्याची गोडीही त्यांनीच लावली. विद्यमान काली महाराष्ट्रात जे जे लोकप्रिय गायक आहेत ते ते बालगंधर्वांच्या स्वराने गातात, ते बालगंधर्वांच्या ताना मारतात नि बालगंधर्वांच्या ढंगाची रागदारी गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतात. बालगंधर्व हे नुसते गळ्याने गात नसत. ते डोळ्यांनी गात, ओठांनी गात, सर्वांगांनी गात आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट की, ते आपल्या हृदयाने गात. लोण्यात खडीसाखर विरघळावी तसे त्यांचे गद्य बोलणेही संगीतासारखे सुरेल नि सुमधुर वाटे. बालगंधर्वांची गाणी म्हणजे साक्षात अमृताची कारंजी होत. या क्षणापर्यंत ती महाराष्ट्राच्या कानात आणि मनात उचंबळत आहेत. बालगंधर्वांच्या गाण्यात नुसते माधुर्य नव्हते, तर त्यात रस होता. भावना होत्या. आपल्या स्वरातून कारुण्य नि शृंगार प्रकट करण्याची विलक्षण शक्ती त्यांच्या गायनात होती.

१९४४ साली बालगंधर्व हे मुंबईच्या पहिल्या शतसांवत्सरिक नाट्यमहोत्सवाचे अध्यक्ष होते. आम्ही त्याचे स्वागताध्यक्ष होतो. त्या वेळीं आम्ही म्हणालो, "बालगंधर्वांच्या संगीताने महाराष्ट्राच्या तीन पिढ्या पोसलेल्या आहेत. बालगंधर्वांच्या अभिनयाचे आणि वेषभूषेचे अनुकरण करून हजारो महिलांनी आपल्या पतींचे प्रेम संपादन केले, नि आपले संसार सुखाचे केले. मराठी मनांवर बालगंधर्वांच्या स्वरमाधुर्याची आणि रूपसौंदर्याची जी एकदा नशा चढून बसली आहे, ती नाहीशी होणे अशक्य आहे. बालगंधर्वांसारखा लोकोत्तर कलावंत शतकातून एकदाच जन्माला येतो. बालगंधर्व हा मराठी रंगभूमीचा मूर्तिमंत इतिहास होय!" महाराष्ट्राला संगीताचा नि सौंदर्याचा गुरुमंत्र ज्यांनी दिला, त्या बालगंधर्वांचे महाराष्ट्रावर अनंत उपकार आहेत. त्यांच्या सौंदर्याचे नि गायनाचे निरनिराळे बहार आणि आविष्कार पाहून आम्ही स्वतः तृप्त झालो आहोत. धन्य झालो आहोत. धुंद झालो आहोत. त्या ब्रह्मानंदाचे वर्णन आजच्या पिढीला करून द्यावयाला आमच्याजवळ शब्द नाहीत.

कोणत्याही जिवंत राष्ट्राच्या जीवनात रंगभूमीला महत्त्वाचे स्थान असते. किंबहुना राष्ट्राच्या भावना आणि ध्येये जिवंत ठेवून समाजाला एकसारखे उद्दीपित करण्याचे कार्य रंगभूमीच करीत असते. या दृष्टीने मराठी रंगभूमीने यापुढे अधिक आक्रमक आणि जागरूक राहिले पाहिजे. राष्ट्राच्या दडपलेल्या आकांक्षा आणि भावना यांना मराठी नाटकामधून अधिक जोमाने वाव मिळावयाला पाहिजे. बहुजनसमाजाचे विविध जीवन अधिक जिव्हाळ्याने नि तळमळीने मराठी रंगभूमीवर यापुढे चित्रित झाले पाहिजे. ते महान कार्य भारताच्या गृहमंत्र्यांनी आताच अनावृत केलेल्या या ' बालगंधर्व रंगमंदिरा 'च्या रंगमंचावरून अधिक प्रभावीपणाने होवो, अशी इच्छा प्रकट करून, हे महान स्मारक ज्यांच्या नावाने या गंधर्वभूषीत आज उभारण्यात आलेले आहे, त्या महाराष्ट्राच्या चिरतरुण, अजरामर आणि युगप्रवर्तक कलावंताच्या परमपवित्र स्मृतीस आम्ही भक्तिभावाने अभिवादन करतो. जय महाराष्ट्र, जय हिंद !

मराठा : २७-६-१९६८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ... स्थळप्रत
अनुक्रम..... .... दि: ....................
क्रमांक ... .................... नों: दि: ..............

८

# ‘ ते ’ गणपतराव कुठे आहेत ?

गणपतरावांच्या वयाला ऐशी वर्षे आज पूर्ण होत आहेत. ह्या जाणिवेने मनात अनेक संमिश्र भावनांची गर्दी उडाली आहे. इतके दीर्घायुष्य त्यांना लाभले म्हणून आनंद वाटणे किंवा तो व्यक्त करणे हा एक लौकिक उपचार झाला. पण ज्या अलौकिक नाट्यगुणांमुळे मराठी रंगभूमीवर गणपतरावांनी अद्वितीय कीर्ती मिळवली, ते त्यांचे ‘ कीर्तिस्वरूप ’ जसे जसे त्यांचे वय वाढेल, तसे तसे पुन्हा आपल्याला मुळीच पाहायला मिळणार नाही ह्या विचाराचा विषाद मनाला वाटल्यावाचून कसा राहील ?

काळ हा नटाचा फार मोठा शत्रू आहे हे अशा प्रसंगी जाणवते. काळाने सर्वांपेक्षा बालगंधर्वांवर जास्त भयानक सूड घेतला आहे, हे खरे असले तरी गणपतरावांची त्याने काही कमी हानी केली नाही. तेरा साली ‘ गंधर्व नाटक मंडळी’च्या ‘ मानापमान ’ नाटकात लक्ष्मीधराच्या भूमिकेत गणपतरावांना मी प्रथम पाहिले. त्या वेळी ते बत्तीस-तेहतीस वर्षांचे असतील. त्या वेळचे त्यांचे ते डोळ्यांतले तेज, आकृतीची चपलता आणि आवाजाची धार अजून मी विसरलो नाही. गंधर्वांच्या ‘ मानापमाना ’मधला त्या वेळचा संचच अद्‌भुत होता. बालगंधर्व त्या वेळी कीर्तिशिखरावर होते. गोविंदराव टेंब्यांसारखा देखणा पुरुष नट मराठी रंगभूमीवर त्या वेळी दुसरा कोणी नव्हता, आणि त्या काळात ( काही दिवस ) तरी त्यांचा आवाज उत्तम स्थितीत होता. बालगंधर्व ‘भामिनी’ आणि टेंबे ‘ धैर्यधर ’ ह्या दोघांच्या उन्मादक संगीताच्या स्वरसागरात श्रोते

अक्षरशः देहभान विसरून डुंबत असल्यास नवल नाही.

संगीताने भारलेले रंगभूमीवरचे हे वातावरण एकदम हास्यरसाच्या महापुरात बुडवून टाकण्याचे विलक्षण सामर्थ्य गणपतरावांच्या अभिनयात होते. लक्ष्मीधराच्या भूमिकेत गणपतरावांनी रंगभूमीवर पाऊल टाकले रे टाकले की त्यांच्या संस्थानिक थाटाच्या वस्त्राभरणाचा तो झगमगाट बघून प्रेक्षकांच्या हसता हसता मुरकुंड्या वळत. बालगंधर्वांच्या गाण्याइतकीच गणपतरावांच्या गद्य बोलण्यात धार असे आणि बालगंधर्वांच्या तानेइतकेच गणपतरावांचे उच्चार स्पष्ट आणि दाणेदार असत. गणपतरावांच्या डोळ्यांत आणि हावभावात इतका मिष्किलपणा आणि वात्रटपणा भरला होता आणि तो शब्दाशब्दांमधून आणि वाक्यांवाक्यांमधून खोचक रीतीने प्रकट करण्याची त्यांची हातोटी इतकी विलक्षण होती की, बालगंधर्वांच्या गाण्याइतकीच त्यांच्या अभिनयाची छाप प्रेक्षकांच्या मनावर पडल्यावाचून राहात नसे. फार कठीण गोष्ट होती ही! अंगात असामान्य नाट्यगुण असल्याखेरीज का बालगंधर्वांच्या नाटक मंडळीत राहून त्यांच्या लोकप्रियतेशी यशस्वी स्पर्धा करणे त्या काळीं त्यांना शक्य झाले?

लक्ष्मीधराच्या भूमिकेत जी अमाप लोकप्रियता बोडसांनी महाराष्ट्रात मिळविली त्यामुळे ते ' गणू 'चे एकदम ' गणपतराव ' झाले. त्यापूर्वी त्यांना एवढे यश दुसऱ्या कोणत्याही भूमिकेत मिळाले असल्याचे मला माहीत नाही. लहानपणापासून विनोदाचे मला आकर्षण असल्यामुळे गणपतरावांबद्दल मला विलक्षण प्रेम वाटू लागले. तो काळ मराठी रंगभूमीच्या वैभवाचा होता. विविध गुणांचे किती तरी नामांकित नट निरनिराळ्या नाटक मंडळ्यांमधून त्या वेळीं पाहावयाला मिळत. बालगंधर्व, केशवराव भोसले, सवाई गंधर्व ह्या गायक नटांनी त्या वेळीं महाराष्ट्राला वेड लावले होते. गद्य रंगभूमीवर गणपतराव जोशी हे तर अनभिषिक्त सम्राट म्हणून मानले जात होते. त्याखेरीज नानबा गोखले, ओबा लिमये, त्र्यंबकराव प्रधान, केशवराव दाते, रघुनाथराव गोखले, वामनराव पोतनीस, काका कंपली, शिवरामपंत परांजपे ह्या गद्य नटांनीही त्या त्या वेळी महाराष्ट्रात फार मोठे नाव मिळविले होते. तथापि ' विनोदी नट ' ही लोकप्रियता ह्यांपैकी फारच थोड्यांना प्राप्त झाली होती. ' कृष्णार्जुन युद्ध 'मधली नारदाची भूमिका नानबा गोखले मोठ्या मिष्किल मार्मिकतेने करीत असत. ' तोतयाच्या बंडा 'मध्ये बगंभटाच्या भूमिकेतही काका कंपली पुष्कळ हास्य निर्माण करीत. पण ह्या दोघाही नटांना ' विनोदी नट ' असे काही म्हणता

आले नसते. ‘प्रेमसंन्यास’मधले गोकुळ हे पात्र तर बोलूनचालून विनोदी. ती भूमिका शिवरामपंत परांजपे चांगली वठवीत खरी, पण त्यांचा सारा अभिनय ‘महाराष्ट्र नाटक मंडळी’च्या कृत्रिम छापाचा आणि हेंगाड्या उच्चाराचा. तो पाहून प्रेक्षक हसत, पण त्या हसण्यात काही आल्हाद नसे. ह्या दृष्टीने विचार केला म्हणजे विनोदी अभिनयाची मुहूर्तमेढ मराठी रंगभूमीवर गणपतराव बोडसांनीच रोवली असे म्हटले पाहिजे.

आवाजाच्या नि अंगविक्षेपाच्या माकडचेष्टा केल्यावाचून रंगभूमीवर हास्य निर्मिती होणार नाही अशीच पुष्कळशा विनोदी नटांची त्या काळात कल्पना होती. अजूनही ती आहे. पण गणपतरावांना विनोदाचे खरे रहस्य समजले होते. म्हणून विनोदसिद्धीसठी बाह्य उपायांचा उपयोग करण्याची त्यांना कधीच आवश्यकता वाटली नाही. विनोदी माणूस हा प्रकृतीने गंभीर असतो हा कोणाला विरोधाभास वाटेल, पण ते खरे आहे. गणपतरावांची नि माझी त्या काळात ओळख नव्हती. पण पुण्याच्या रस्त्यातून चार दोन वेळा जाताना त्यांना लांबून पाहण्याचा जो त्या वेळीं मला प्रसंग आला, त्यावरून ते विनोदी तर नाहीतच नाही, पण भलतेच कडक आणि रागीट असावेत असा माझा समज झाला. त्यांचा पोषाख नाटकी नसे, पण त्यात छानछोकीची ऐट आणि मिजास असे. त्यांची डाळ्यांची गरगर आणि चेहऱ्यावरचा कुर्रा पाहून कोणालाही त्यांचे भयच वाटले असते. हा माणूस फारसा कोणात न मिसळ-णारा आणि तुसड्या स्वभावाचा असावा अशीच माझी त्या वेळीं कल्पना झाली. म्हणून अशा स्वभावाची ही चमत्कारिक स्वारी रात्री रंगभूमीवर प्रेक्षकांना खदखदा कशी हसवू शकते ह्याचे मला फार नवल वाटे.

तरी लक्ष्मीधराचा पोषाख आणि शृंगार हा हास्य निर्माण करणारा होता. कारण त्या त्या भूमिकेला संस्थानिकाच्या विडंबनाचे स्वरूप गणपतरावांनी दिले. पण लक्ष्मीधराच्या भाषणात विनोदी असे काहीच नव्हते. गडकऱ्यांची विनोदी भाषणे कोणी कशीही उच्चारली तरी हास्य पिकू शकते, तसे खाडिलकरांचे थोडेच होते? लक्ष्मीधराची भूमिका गणपतरावांखेरीज दुसऱ्या कोणाही नटाने केली असती तर ‘मानापमान’ नाटकात आज त्या भूमिकेला जे महत्त्व प्राप्त झाले आहे, ते मुळींच प्राप्त झाले नसते. गणपतरावांनी त्या भूमिकेवर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा असा काही जबरदस्त ठसा उमटवून ठेवला आहे की, त्यांच्याच स्वरूपात लक्ष्मीधर रंगभूमीवर जर प्रकट झाला नाही, तर

मराठी प्रेक्षकाला त्याची ओळख मुळीच पटत नाही.

चेहऱ्याची आणि शरीराची मूळची ठेवण गंभीर असताही, नुसत्या चेहऱ्यावरच्या फरकाने, आवाजाच्या चढउताराने, शब्दांवरील कमीजास्त सूचक आघातांनी आणि शरीराच्या सूक्ष्म हावभावाने विनोद निर्माण करण्याची अजब कला गणपतरावांनी अगदी तरुण वयात साध्य करून घेतली होती. डोळे आणि वाणी ह्यांची फार मोठी देणगी निसर्गाने गणपतरावांना देऊन ठेवली होती. मराठी भाषा कशी उच्चारावी आणि बोलावी ह्याचा तेजस्वी आदर्श गणपतराव जोश्यांप्रमाणेच गणपतराव बोडसांनी मराठी रंगभूमीवर घालून दिलेला आहे, असे म्हणावयाला हरकत नाही.

त्यानंतर गणपतरावांच्या ज्या दुसऱ्या भूमिकेचा ठसा माझ्या मनावर त्या काळात उमटला, ती भूमिका म्हणजे 'सोभद्रा'तील कृष्णाची. लक्ष्मीधराचे त्यांचे काम पाहिल्यानंतर दोन-तीन वर्षांनी पुन्हा त्यांचे नाटक पाहण्याचा योग आला. 'सौभद्र' नाटकातला पहिला अंक अर्जुनाचा, दुसरा सुभद्रेचा अन् तिसरा कृष्णाचा, अशी अण्णासाहेब किर्लोस्करांनी चांगल्या नटांना आपले गायन आणि अभिनयकौशल्य स्वतंत्रपणे दाखविण्याच्या दृष्टीने सोईस्कर वाटणी करून ठेवलेली आहे. लक्ष्मीधराच्या सोंगाप्रमाणे कृष्णाच्या सोंगात विनोदी असे काही नव्हते, आणि सुभद्राहरणाच्या कपटकारस्थानाचा नायक स्वतः कृष्ण असल्याने आपल्या विचाराचा यत्किंचितही सुगावा इतरांना न लागेल अशी एकसारखी त्याला बतावणी करायची असल्यामुळे चेहऱ्याची तबकडी जितकी जास्त गंभीर ठेवता येईल तेवढी त्याला ठेवणे जरूर होते. डोळ्यांच्या सूक्ष्म हालचालीवाचून आणि आवाजाच्या सूचक आंदोलनाखेरीज आपल्या दुटप्पी स्वभावातील विरोधाभास मार्मिकपणे व्यक्त करण्याला नटाला दुसरा मार्गच नाही. या भूमिकेतले ह्या दृष्टीने गणपतराव बोडसांचे काम फारच उत्कृष्ट वठत असे. आधी नाटकातले कृष्णाचे पात्र म्हणजेच अण्णासाहेब किर्लोस्करांच्या प्रतिभेचा तेजस्वी विलास. अर्जुन, सुभद्रा, बलराम आणि रुक्मिणी ही सारी पात्रे एका कृष्णाच्या आसाभोवती फिरत राहतात. म्हणून कृष्णाच्या भूमिकेला ह्या नाटकात फार महत्त्व आहे. ती गणपतराव इतक्या खुमारीने आणि बहारीने वठवीत की सांगता सोय नाही. कृष्णाच्या विनोदाला शृंगाराची आणि त्याबरोबर संगीताचीही जोड दिलेली असल्याने, ही भूमिका केवळ गद्य नटाच्या आवाक्याबाहेरची आहे. इथे गणपतरावांच्या गुणांची खरी

कसोटी होती. पण त्या अग्निदिव्यातून सहीसलामत पार पडण्याइतके संगीतावर त्यांचे प्रभुत्व होते, एवढेच नव्हे तर 'लाल शालजोडी', 'नच सुंदरि करू कोपा' आणि 'प्रिये, पहा रात्रीचा' ह्या पदांना गणपतराव 'वन्समोअर' घेत. मोठमोठ्या गायक नटाच्या सान्निध्यात गणपतरावांनी काही फुकट वर्षे घालविली नव्हती. ठराविक मर्यादेत भावानुकूल, सुरेल आणि लयबद्ध रागदारीचे गाणे गणपतराव व्यवस्थितपणे गाऊ शकत.

त्यानंतर गणपतरावांची अतिशय गाजलेली अशी भूमिका म्हणजे 'संशयकल्लोळा'तील फाल्गुनरावाची. फाल्गुनराव हे नाटक पूर्वी गणपतराव भागवत करीत असत. पण त्यांनी फाल्गुनरावाचे चित्रण अतिशयच गंभीर केलेले होते असे म्हणतात. त्यांचे ते काम पाहण्याचा मला काही योग आला नाही. पण गणपतराव बोडसांनी फाल्गुनरावाचा अवतार आमूलाग्र बदलून टाकला. अगदी सोंगापासून तो त्याच्या बारीकसारीक ढंगापर्यंत. त्यामुळे लक्ष्मीधराच्या भूमिकेवर गणपतरावांनी जसा आपला छाप उमटवला, तसा फाल्गुनरावाच्या भूमिकेवरही त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसठशीत ठसा मारून ठेवला. इतका की फाल्गुनराव दुसऱ्या वेषभूषेत रंगभूमीवर जर आला, तर त्याला महाराष्ट्रात ओळखणार नाही.

नटांच्या मोठेपणाचे हेच गमक असते. नाटककाराने एखादे पात्र निर्माण करण्यात कितीही प्रतिभा खर्च केली, तरी त्यावर शेवटचा शिक्का मारण्याचे सामर्थ्य केवळ नटाचेच असते. महाराष्ट्रात हॅम्लेट म्हणजे गणपतराव जोशी, तुकाराम म्हणजे शुक्ल, नाना फडणवीस म्हणजे नानबा गोखले, कीचक म्हणजे गणपतराव भागवत, भामिनी किंवा रुक्मिणी म्हणजे बालगंधर्व, त्याप्रमाणे लक्ष्मीधर आणि फाल्गुनराव म्हणजे गणपतराव बोडस ही सर्व समीकरणे आतापर्यंत तरी ठरून गेली आहेत. लक्ष्मीधराचे आणि कृष्णाचे सोंग तरुण तरी होते, पण फाल्गुनराव म्हणजे चांगला उतार वयाचा. तेव्हा ते वयाचे ओझे सबंध नाटकभर डोक्यावर वहावयाचे ही एक नवीन जबाबदारी या भूमिकेमधे गणपतरावांवर आली. गणपतराव भागवत फाल्गुनरावाचे तरुण सोंग काढीत, पण आपल्या तरुण बायकोबद्दल नवऱ्याला उतारवयात जेवढा संशय वाटतो तेवढा तरुणपणी वाटत नाही. ह्या दृष्टीने बोडसांनी काढलेले फाल्गुनरावांचे सोंग अधिक समर्पक वाटते.

ह्या नाटकातल्या निरनिराळ्या प्रसंगी गणपतरावांनी आपल्या अभिनय-

कौशल्याचे एकापेक्षाही एक जे चमत्कार दाखविले ते महाराष्ट्र कधीही विसरणार नाही. त्यांची काही वैशिष्ट्यपूर्ण संभाषणे आणि स्वगत भाषणे तर अद्याप आमच्या कानांत निनादत आहेत. रस्त्यात मूर्च्छित पडलेल्या रेवतीला 'जरा मोरावळा घेतेस का' हा त्यांचा प्रश्न, अश्विनशेटची तसबीर कृत्तिका न्याहाळीत बसली असताना आणि 'हा तुझा जंगली महाराज' असे म्हणत मागून होणारे त्यांचे एकदम प्रकटन, त्या तसबिरीचे साम्य प्रत्यक्ष अश्विनशेटच्या चेहऱ्याशी पडताळून पाहण्याच्या वेळी होणारा त्यांचा बहारीचा अभिनय, 'अश्विनशेटची चिठ्ठी माझ्या बायकोला का!' हे त्यांचे सर्वोत्कृष्ट स्वगत ज्याने कोणी एकदा ऐकले किंवा पाहिले असेल, तो ते कधीही विसरणेच शक्य नाही. सारांश, फाल्गुनरावांना गणपतरावांनी जसे अमर केले आहे तसेच फाल्गुनरावाने गणपतरावांना अमर करून ठेवले आहे. गेल्या वीस वर्षांत तर महाराष्ट्रातल्या जनतेपुढे फाल्गुनरावांखेरीज दुसऱ्या भूमिकेत गणपतराव मुळी प्रकटच झाले नाहीत, आणि आजच्या एवढ्या उतारवयातही त्यांना करता येण्यासारखी त्यांची एवढीच भूमिका आता उरलेली आहे.

मला आवडलेली त्यांची चौथी भूमिका म्हणजे 'एकच पाल्या'तील सुधाकराची. हास्यरसाप्रमाणे करुण रसाचाही परिपोष आपण प्रभावीपणे करू शकतो हे त्यांनी ह्या भूमिकेत सिद्ध करून दाखविले. सिंधूच्या रूपाने बाल-गंधर्वांनी मराठी रंगभूमीवर साक्षात कारुण्यमूर्ती उभी केली. पण अतिरेकी आणि व्यसनी सुधाकराची कृष्णपार्श्वभूमी गणपतरावांनी अतिशय विदारक रीतीने चितारली नसती तर सिंधूच्या कारुण्याला एवढा उठाव मिळालाच नसता. व्यसनाच्या कर्दमात अधिकाधिक बुडत चाललेल्या सुधाकराच्या दुर्दैवी आणि असहाय जीवनाचे अतिशय हृदयस्पर्शी चित्रण गणपतराव करीत असत. शेवटच्या अवस्थेतील सुधाकराच्या प्रदीर्घ भाषणात गडकऱ्यांच्या प्रतिभेने साक्षात तांडवनृत्यच घातलेले आहे. पण त्यातील रौद्र आणि भयानक रस तेवढ्याच उत्कटतेने आणि अभिनिवेशाने प्रकट करून दाखवण्यात गणपतराव आपल्या नाट्यकौशल्याची पराकाष्ठा करीत असत. लक्ष्मीधर किंवा कृष्ण ह्यांची भूमिका करणारा नट हाच बंडगार्डनमधे ओळखीच्या लोकांकडे नोकरी मागायला येणाऱ्या भणंग सुधाकराची भूमिका करतो आहे, असे कोणाला सांगूनसुद्धा खरे वाटायचे नाही. मी पाहिलेली गणपतरावांची एवढीच गंभीर भूमिका. विनोदी भूमिका करण्यात जे यश गणपतरावांनी मिळविले तेच गंभीर भूमिकेतही

त्यांनी मिळवून दाखविले हे त्यांच्या अलौकिक नाट्यप्रतिभेचे द्योतक आहे.

आजमितीस बालगंधर्व आणि गणपतराव बोडस हे मराठी रंगभूमीच्या वैभवशाली इतिहासाचे दोन महान वारसदार हयात आहेत हे महाराष्ट्राचे मोठे भाग्य होय. गणपतरावांचे जीवन म्हणजे नाट्यकलेसाठी मूर्तिमंत पंचाग्निसाधन. मराठी रंगभूमीच्या सेवेवाचून गणपतरावांनी उभ्या आयुष्यात दुसरे काहीच केले नाही. महाराष्ट्राच्या नाट्यकलेचा गेल्या पाऊणशे वर्षांचा जिवंत इतिहास त्यांच्या रूपाने आज आपणामध्ये वावरतो आहे. वीस वर्षांपूर्वी 'माझी भूमिका' ह्या नावाने त्यांनी जे आपले 'आत्मचरित्र' लिहून प्रसिद्ध केले ती मराठी रंगभूमीची एक अद्भुतरम्य कादंबरीच आहे. मराठी रंगभूमीच्या इतिहासाचे एवढे हृदयंगम आणि उद्बोधक चित्रण क्वचितच कोणा नटाने वा नाटककाराने आजपर्यंत केले असेल. रंगभूमीवरील आपल्या निरनिराळ्या भूमिकांचे ह्या आत्मचरित्रात गणपतरावांनी जसे मार्मिक विश्लेषण केले आहे, तसे रंगभूमीच्या उद्धाराचा प्रयत्न करणाऱ्या नाट्यनिर्मात्यांचे आणि दिग्दर्शकांचे त्यांनी अचूक मार्गदर्शन केले आहे. हे आत्मचरित्र वाचल्यानंतर गणपतरावांच्या व्यक्तिमत्त्वातील एका निराळ्याच सामर्थ्यावर उजेड पडतो.

ते सामर्थ्य म्हणजे त्यांची बुद्धिमत्ता. लौकिक दृष्ट्या जरी ते अशिक्षित असले आणि यांचा सारा जन्म जरी नाटकाच्या धंद्यात गेला असला, तरी त्यांच्या बुद्धीचा मगदूर सर्वसामान्य नटासारखा आहे अशी जर कोणी समजूत करून घेईल तर ते चुकीचे ठरेल. असामान्य नाट्यगुणाप्रमाणे त्यांना तीव्र आणि विदारक बुद्धिमत्तेचेही देणे जन्मतः प्राप्त झाले आहे. ह्याच सामर्थ्यावर अभिनयकौशल्याचा एवढा मोठा पल्ला ते गाठू शकले. केवळ अनुकरणशक्तीच्या आधारावर पुष्कळसे नट नावलौकिकाला चढतात. पण गणपतराव हे काही दुसऱ्याचे अनुकरण करून एवढ्या पदवीला चढलेले नाहीत. त्यांची नाट्य-प्रतिभा स्वयंभू आहे, आणि स्वतंत्र प्रज्ञेच्या शक्तीवर अभिनयाच्या क्षेत्रात त्यांना एवढे चमत्कार करून दाखवता आले. बुद्धिमत्ता व भांडवल असल्या-खेरीज ही सिद्धी मिळत नाही.

गणपतरावांचे पाठांतर आणि स्मरणशक्ती अलौकिक आहे असे म्हटले तर त्यात अक्षराचीही अतिशयोक्ती होणार नाही. एक नाही, दोन नाही, चांगली आठ-दहा नाटके अगदी नांदीपासून तो भरतवाक्यापर्यंत संपूर्ण संभाषणासह आणि पदासह ते या वयातदेखील घडाघडा म्हणून दाखवतात. पाठांतराचा

ह्या चमत्कार करून दाखवणारा असा आश्चर्यकारक नट अजूनपर्यंत तरी आम्हाला भेटलेला नाही. रात्रीच्या रात्री गणपतरावांच्या ह्या नाट्यपठणाचा अपूर्व कार्यक्रम तल्लीनतेने ऐकत आम्ही घालविलेल्या आहेत. जुन्या मराठी रंगभूमीचे जिवंत चित्र ते ज्याप्रमाणे आपल्या डोळ्यांसमोर उभे करतात त्याप्रमाणे भाऊराव कोल्हटकर, बाळकोबा नाटेकर किंवा नारायणराव जोगळेकर ह्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गाण्याचाही साक्षात्कार घडवण्याचे कसब अजून त्यांच्या गळ्यात आहे. त्यांची निरीक्षणशक्ती जितकी सूक्ष्म आहे, तितकीच विनोद-बुद्धीही अत्यंत तल्लख आहे. एखाद्या प्रतिभाशाली विनोदी लेखकाच्या शैलीने कोणत्याही व्यक्तीच्या स्वभावातल्या वैशिष्ट्यपूर्ण खुब्या किंवा कोणत्याही प्रसंगातल्या मार्मिक मौजा ते बहारदार रीतीने रंगवू शकतात. त्यांच्या बैठकीत ज्यांनी काही काळ घालवला असेल किंवा त्यांचे आत्मचरित्र ज्यांनी वाचले असेल, त्याला हे पटेल. मराठी भाषेवर त्यांचे चांगलेच प्रभुत्व आहे. एखाद्या पट्टीच्या लेखकाप्रमाणे शैलीदार भाषेत ते प्रासादिक मराठी लिहू शकतात. त्यांचे बाळबोध आणि मोडी अक्षर तर मोत्यासारखे आहे. सारांश, उत्तम नटाप्रमाणे उत्तम नाटककार होण्याचीसुद्धा कुवत त्यांच्या प्रतिभेत होती, ह्याविषयी मला तरी तिळमात्र शंका नाही.

अगदी लहानपणापासून वर्तमानपत्रे आणि ग्रंथवाचनाचे त्यांना विलक्षण वेड आहे. गेल्या साठ-सत्तर वर्षांत देशात ज्या ज्या राजकीय आणि सामाजिक घडामोडी झाल्या त्यांचे त्यांना समग्र ज्ञान आहे. त्यांची प्रवृत्ती चिंतनशील आहे. निरनिराळ्या अनुभवांचे मंथन करून निष्कर्ष काढण्याची त्यांच्या मनाला सवय आहे. महाराष्ट्रातल्या अनेक बुद्धिमान लेखकांशी आणि पुढाऱ्यांशी वेळो-वेळी त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत गेल्याने बहुश्रुतता आणि सर्वांगीणपणा हे दोन गुण प्रामुख्याने त्यांच्यामधे आढळून येतात. गोविंदराव देवल आणि राम गणेश गडकरी ह्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि सहवासामुळे रंगभूमीकडे, वाङ्मयाकडे आणि जीवनाकडे पाहण्याची अभिनव आणि प्रसन्नपूर्ण दृष्टी त्यांना प्राप्त झाली आहे.

सांसारिक जीवनात तर त्यांच्याएवढा सुखी आणि समाधानी माणूस सहजा-सहजी आढळणार नाही. रंगभूमीच्या आणि कलेच्या व्यवसायात शेकडो नटांच्या संसाराची आणि कुटुंबांची धूळधाण आणि वाताहात झालेली त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिली असेल. पण अशा सांसर्गिक आणि ज्वालाग्रही वातावरणात सारा जन्म काढूनसुद्धा त्यांनी आपल्या चारित्र्यावर किंवा संसारावर एवढासा-

सुद्धा शिंतोडा उडवून घेतला नाही गणपतरावांच्या कट्टर शत्रूलासुद्धा त्यांच्या निरपवाद नैतिक चारित्र्याची मुक्तकंठाने स्तुतीच करावी लागली. मातृभक्त पुत्र, निष्ठावंत पती आणि अपत्यवत्सल पिता ह्या नात्याची जी जी म्हणून कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या असतात, त्या त्या त्यांनी अत्यंत धार्मिक एकनिष्ठतेने पार पाडल्या आहेत. कौटुंबिक सुखाचा आणि प्रेमाचा आजपर्यंत त्यांनी आकंठ आस्वाद घेतलेला आहे आणि त्यांच्या वयाला आज ऐंशी वर्षे पूर्ण होत असली तरी ते घेत आहेत. म्हणूनच त्यांच्या जीवनात आत्मिक तृप्ततेचा नि समाधानाचा एकसारखा सुगंध दरवळत असलेला आढळतो.

आणि त्यांच्या माझ्या ऋणानुबंधातला अलीकडचा एक तेजस्वी दुवा म्हणजे संयुक्त महाराष्ट्राबद्दल त्यांना वाटणारे उत्कट प्रेम. गेल्या चार-पाच वर्षांत त्यांनी मला अनेक पत्रे लिहिली असतील. महाराष्ट्राच्या नितांत प्रेमाने ही पत्रे आमूलाग्र ओथंबलेली आहेत. महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती आणि परंपरा ह्याबद्दल त्यांना किती ज्वलन्त अभिमान वाटतो ही गोष्ट ती पत्रे जेव्हा प्रसिद्ध होतील तेव्हा प्रकाशात येईल. गणपतरावांचा आणि माझा अनेक वर्षांचा ऋणानुबंध आहे. गडकऱ्यांचे ते बन्धुतुल्य मित्र म्हणून गंमतीने मी त्यांना माझे 'नाट्य-चुलते' असे म्हणतो. पण गेल्या आठ-दहा वर्षांत केवळ मराठी रंगभूमीचे प्रेम एवढेच त्यांच्या आणि माझ्या ऋणानुबंधाचे मर्यादित स्वरूप राहिलेले नाही. महाराष्ट्रप्रेमाच्या व्यापक पार्श्वभूमीवर एकमेकांबद्दल वाटणाऱ्या आपुलकीमधे एक निराळाच जिव्हाळा उभयतांमधे निर्माण झालेला आहे. मी पुन्हा एखादे नवीन नाटक लिहावे आणि त्याचे आपण दिग्दर्शन करावे ही एकच निकड एकसारखी त्यांची माझ्यामागे असते. ती त्यांची इच्छा लौकरात लौकर माझ्या हातून पूर्ण झाली तर मला केवढी कृतार्थता वाटेल!

महाराष्ट्राच्या रंगभूमीवर अलौकिक पराक्रम केलेल्या या महापुरुषाच्या वयाला आज ऐंशी वर्षे पूर्ण होत आहेत म्हणून महाराष्ट्रातील नाट्यरसिकांना खचित आनंद वाटेल. ह्या प्रसंगी जवळ जवळ चाळीस वर्षांपूर्वी पाहिलेल्या त्यांच्या अमर भूमिकांचा चित्रपट माझ्यासारख्या त्यांच्या निःसीम भक्ताच्या मनश्चक्षूंसमोरून सरकतो आहे, आणि त्या तल्लीनतेत पर्युत्सुक होऊन एकच प्रश्न मनातल्या मनात मी स्वतःला विचारतो की, "ते गणपतराव मराठी रंगभूमीवर पुन्हा दिसतील काय?"

नवयुग : ३-७-१९६०

९

# नटवर्य दाते

मराठी रंगभूमीवरील विख्यात नट आणि श्रेष्ठ दिग्दर्शक केशवराव दाते ह्यांच्या वयाला आज रोजी पाऊणशे वर्षे पूर्ण होत आहेत, ह्याबद्दल आम्ही आमच्या असंख्य वाचकांच्यातर्फे त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो.

गणपतराव जोशी आणि गणपतराव भागवत ह्यांच्यानंतर ज्यांचे नाव घेता येईल, अशा योग्यतेचे आणि अधिकाराचे केशवराव दाते हे नटश्रेष्ठ असून गद्य नाटकांची सृष्टी एक वेळ त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रभावी अभिनयाने गाजविलेली आहे. ते नुसतेच नट नाहीत, तर रंगभूमीचा आणि नाट्यशास्त्राचा मार्मिक अभ्यास केलेले एक विचारवंत तज्ज्ञ आहेत. रंगभूमी-वरील केशवरावांचे अद्वितीय स्थान आणि नाट्यशास्त्रावरील त्यांचा अधिकार महाराष्ट्रानेच नव्हे तर भारताच्या संगीत-नाट्य-ॲकॅडमीनेही मान्य केलेला आहे. १९५३ साली मुंबई साहित्य संघाने भरविलेल्या नाट्यमहोत्सवाचे अध्यक्षस्थान त्यांना देण्यात आलेले होते आणि यंदा भारतीय संगीत-नाट्य ॲकॅडमीने त्यांना 'उत्कृष्ट नट' म्हणून पारितोषिक दिलेले आहे. आम्ही स्वतः आमच्या लहानपणापासून केशवरावांच्या अभिनयगुणांचे निस्सीम भोक्ते आहोत आणि जेव्हा जेव्हा त्यांच्याबद्दल बोलण्याचा आम्हांला प्रसंग आलेला आहे, तेव्हा तेव्हा आम्ही त्यांनी अमर केलेल्या निरनिराळ्या भूमिकांची मुक्तकंठाने प्रशंसाच केलेली आहे. १९५१ च्या मार्च महिन्यात पुण्याच्या नाट्य-महोत्सवात नेक नामदार बाबासाहेब जयकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली

केशवरावांचा जेव्हा षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ झाला, तेव्हा त्यांच्या गौरवाचे भाषण करण्याची आम्हालाच संधी मिळाली. तें आमचे भाषण आम्ही गेल्या रविवारच्या ' मराठ्या ' त पुनर्मुद्रित केलेले आमच्या वाचकांनी वाचलेच असेल. त्यामध्ये आम्ही त्या वेळच्या काँग्रेस सरकारला असे स्पष्टपणे सुचविले होतें की, " पुण्या–मुंबईसारख्या ठिकाणी सरकारने एखादे सार्वजनिक थिएटर बांधून केशवराव दातें ह्यांच्या ताब्यात द्यावे आणि त्यांना महिना दोन हजार रुपये पगार देऊन सांगावे की, ' केशवराव, तुमच्या अंगात जे नाट्यगुण आहेत, त्यांचा ह्या समाजाला भरपूर फायदा आणि करा ह्या नाटकगृहामधून उद्याचे गणपतराव जोशी नि गणपतराव भागवत निर्माण ! ' " तें आमचे उद्‌गार ऐकून त्या वेळच्या हजारो श्रोत्यांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला होता.

देश स्वतंत्र होऊन सतरा वर्षे झाली आणि महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन चार वर्षे झाली. एवढ्या काळात पूर्वीच्या मुंबई सरकारने आणि सध्याच्या महाराष्ट्र सरकारने केशवरावांच्या नाट्य–ज्ञानाचा जेवढा फायदा घ्यावयाला पाहिजे होता तेवढा घेतला नाही याबद्दल आम्हांला अत्यंत विषाद वाटतो. त्याबरोबर केशवरावांनीही गेल्या पंचवीस–तीस वर्षांत मराठी नाट्यसृष्टीत जे नवनवीन प्रतिभाशाली नट आणि नाटककार निर्माण झाले, त्यांचे कौतुक करून, त्यांना जेवढे उत्तेजन द्यावयाला पाहिजे होतें नि त्यांचे जेवढे मार्गदर्शन करावयाला पाहिजे होतें, तेवढे त्यांनी केले नाही, ही गोष्ट अनेक वर्षांपासून आम्हांला स्वतःला खटकतें आहे. केशवरावांच्या काढदिवशी हा अप्रिय उल्लेख करणे बरोबर नाही हे आम्ही जाणतो. पण त्यांच्याविषयी पराकाष्ठेचा आदर बाळगणाऱ्या आमच्यासारख्या त्यांच्या मित्रांनी जर नम्रतेनें आणि सद्‌भावनेने आम्हाला वाटणाऱ्या काही शंका आज त्यांच्या पुढे मांडल्या, तर त्यांचा तें अनादर करणार नाहीत, असा आमचा विश्वास आहे.

गेल्याच रविवारी महाराष्ट्रातले एक रसिक कलासमीक्षक श्री. गोपाळकृष्ण भोबे ह्यांनी केशवरावांची जी नाट्यविषयक मुलाखत घेतली आहे, ती 'महाराष्ट्र–टाईम्स 'मध्ये प्रसिद्ध झालेली आहे. तिच्यात स्वतंत्र्योत्तर काळातील मराठी रंगभूमीबद्दल केशवरावांनी पुढीलप्रमाणे उद्‌गार काढलेले आहेत. तें म्हणाले, "स्वतंत्र्यानंतरच्या काळात जे एक शैथिल्य येते, जी आळसावलेली परिस्थिती निर्माण होतें, ती परिस्थिती गेली सतरा वर्षे मी पाहतो आहे. काहीशी निष्क्रिय अवस्था मला तरी दिसली. आज जी प्रगती दिसते आहे ती

'सूज' आहे. जे नवे दिसते आहे ते सारे पाश्चात्त्यांचे अनुकरण आहे. स्वातंत्र्यानंतरची जी नाट्याची प्रगती झाली तिच्यात अस्सल भारतीयपणा आहे काय ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ह्या काळात लिहिली गेलेली आणि सादर केली गेलेली नाटके मराठी माणसाच्या मनावर काहीतरी परिणाम करून गेलेली आहेत किंवा त्यायोगे समाज कार्यान्वित झालेला आहे, असे मला वाटत नाही. माझी रंगभूमीकडे पाहण्याची दृष्टी ही जीवनोन्मुख आहे. नाटकांनी काहीतरी दिले पाहिजे असे माझे स्वतःचे मत आहे—तें तुम्ही सनातनी म्हणा वाटल्यास—पण जो सामाजिक विषय नाटककार निवडतो, त्या विषयाने समाजाला धक्का दिला पाहिजे. १९३० पर्यंत जी सामाजिक नाटके रंगभूमीवर आली त्यांनी समाजाला काय दिले हे मी सांगावयाला पाहिजे असे नाही."

नव्या नाटककारांविषयी बोलताना केशवराव म्हणाले, "नाटककारांच्या डोळ्यांसमोर समाज, राष्ट्र आदी सर्व थर असले पाहिजेत. गेल्या वीस वर्षांत मी काही नाटके अशी पाहिली की, तेव्हा मला वाटले कशाला ह्यांनी ही निर्मिती केली ? माझ्यासारख्यांना असे वाटले. इतरांचे मी सांगत नाही." नटांबद्दल ते म्हणाले, "नट हा शिकून तयार होईल असे मला मुळीच वाटत नाही. शिक्षण हे व्यापक दृष्टिकोणापुरतेच मर्यादित असू शकते; म्हणजे नट हा जन्मावाच लागतो, असे मला वाटते. तो म्हणेल त्या प्रसंगाशी ताबडतोब तादात्म्य होतो. रंगतो. शिक्षणाने फार तर व्यापकपणा वाढेल एवढेच." नाटकातील 'विनोदा' बद्दल केशवराव म्हणाले, "सुशिक्षित लोक देखील आज अचकटविचकट विनोदाला पोट धरून हसतात. आनंद मानतात. घरगुती चावटपणा रंगभूमीवर आणायचा असेल तर त्या गोष्टींना 'रंगमंदिरे' कशाला ? विनोद उच्च पातळीवरचा असावा. काही कांही प्रसंग पाहून तर आमच्यासारख्यांना शरमेने मान खाली घालावी लागते. अशा वेळीं काही सभ्य कुटुंबे या गोष्टीचा निषेध कसा करीत नाहीत ह्या बद्दल आश्चर्य वाटते. नाटक हे संसाराचे चित्र आहे. तो प्रत्यक्ष संसार नाही." आधुनिक मराठी नाटकांबद्दल आणि विशेषतः त्यांतील विनोदाबद्दल केशवराव दाते ह्यांची ही मते आजकालची नाहीत. अकरा वर्षांपूर्वी मुंबईच्या नाट्यमहोत्सवाच्या अध्यक्षीय भाषणामधे त्यांनी जवळ जवळ हेच उद्गार काढलेले आहेत.

मराठी रंगभूमीला 'आज' ओहोटी का लागली आहे ह्याची मीमांसा करताना

त्या वेळी ते म्हणाले, " नाट्याचार्य खाडिलकरांचा काळ हे मराठी रंगभूमीवरचे 'सुवर्ण-युग' होय. समाजकल्याणाचे कंकण हाती बांधून लेखणी हातात धरणारे ते तपस्वी नाटककार होते. त्यांच्या मागे मराठी रंगभूमीवरील चैतन्यास ओहोटी लागली. वैयक्तिक सुखदुःखाच्या आणि क्षुद्र व्यक्तिनिष्ठेच्या आकुंचित जागेत मराठी नाट्यलेखन गुदमरून गेले. शाश्वत मूल्यावरील श्रद्धा उडून गेली. स्वार्थाचा आविष्कार करण्यात आणि थिल्लर विनोदात नाट्यकला भ्रष्ट झाली. विनोदकारांनी तिला उकिरड्यावर आणून सोडली. प्रभावी नाटककार निष्प्रभ झाले. शाब्दिक कोटिबाज आणि क्षुद्र विनोदकार पुढे आल्यावर रंगभूमीला 'बुधवारा'तून 'शुक्रवारा'त जावे लागले नाही तरच आश्चर्य! कसलेल्या नटाला ईर्ष्या वाटेल अशी एक तरी भूमिका गेल्या वीस-पंचवीस वर्षांत मराठी नाट्यवाङ्मयात निर्माण झाली आहे काय? शिळोप्याच्या गप्पा, शुष्क संवाद, पांचट विनोद ह्यांनी काबीज केलेली रंगभूमी अद्यापि जिवंत आहे हे मोठे भाग्य!"

मराठी नाटकांवरील, नाटककारांवरील आणि नाटकातील विनोदावरील केशवरावांचे हे जे विचार १९५३ साली होते तेच आज १९६४ साली आहेत. त्यांच्या मते १९३० सालानंतर नाव घेण्यासारखे एकही नाटक मराठी रंगभूमीवर आलेले नाही. नाटकांना आज आलेले उधाण दिखाऊ स्वरूपाचे आहे. आज जी ही काही नाटकाची प्रगती झालेली दिसते आहे, ती 'सूज' आहे. विनोदाने नाट्यकला भ्रष्ट केली आहे. सारांश, खाडिलकरांनंतर मराठी रंगभूमीचा सर्वस्वी अधःपात होऊन ती रसातळाला गेलेली आहे. आधुनिक मराठी रंगभूमीचे केशवरावांनी हे जे निदान केलेले आहे ते संपूर्णतया एकांगी आणि पूर्वग्रहदूषित असून ते मराठी रंगभूमीच्या कोणाही भक्ताला वा निःपक्षपाती टीकाकाराला सुतराम मान्य होण्यासारखे नाही. खाडिलकरांचा काळ हे मराठी रंगभूमीवरचे सुवर्ण-युग मानले आणि केशवराव दाते हे त्या सुवर्णयुगातील नाट्यमंदिराचे सुवर्णकळस होते असे मान्य केले, तरी खाडिलकरांच्या नंतर आणि दात्यांच्यानंतर मराठी रंगभूमीवर कोणी प्रभावी नाटककार नि नट मुळी अवतीर्ण झालाच नाही, असे म्हणणे अत्यंत हास्यास्पद आहे, असे केशवरावांच्या मताबद्दल योग्य तो आदर बाळगून आम्ही म्हणतो. आजकालच्या नाटकात केवळ पाश्चात्त्य अनुकरण आहे, अस्सल भारतीयपणा नाही, प्रेक्षकांच्या मनांवर त्याचा मुळीच परिणाम होत नाही, समाजाला त्यामुळे धक्का

बसत नाही, समाज त्यामुळे कार्यान्वित होत नाही, ही केशवरावांची समजूत सर्वस्वी निराधार आहे. हे त्यांना पटवून द्यावयाचे म्हणजे गेल्या पंचवीस वर्षांत झालेल्या अनेक यशस्वी नाटककारांची, त्यांच्या नाटकांची आणि त्यात कामे करणाऱ्या नटांची नावेच त्यांच्यापुढे मांडून, त्याबद्दल त्यांच्याशी वादच घालावा लागेल. तेवढा आम्हांला वेळ नाही, आणि त्याची जरुरी पण नाही.

खाडिलकरांच्या श्रेष्ठपणाबद्दल कोणाचेही दुमत नाही. पण शाश्वत मूल्याची केवळ त्यांनीच उपासना केली आणि त्यांच्यानंतरचे सारे नाटककार काय निव्वळ उपरे, स्वार्थी आणि पोटभरू होते काय ? नव्याला नावे ठेवावयाची आणि जुन्याचे देव्हारे माजवावयाचे, ही प्रवृत्ती केवळ केशवरावांमधेच आहे असे नाही. पुष्कळशा नावाजलेल्या जुन्या नटांचा ( आणि नाटककारांचाही ) हाच आम्हाला अनुभव आहे. आपल्या काळात निर्माण झालेली नाटके आणि नट ह्यापलीकडे त्यांना दुसरे काही एक मंजूर नसते. त्यांचे युग तेवढे ' सुवर्णयुग ' आणि त्यांच्यानंतरचे युग ते ' लोखंड-युग. ' गडकऱ्यांच्या ' भावबंधन 'मधला ' धुंडिराज ' नाही का म्हणत " अण्णा किर्लोस्करांचा दंड हा एवढा ! " तसल्याच प्रकारची ह्या वृद्ध लोकांची ही भाषा आहे.

विनोदावर दात्यांनी जी आग पाखडली आहे, ती निरर्थक आहे. ज्या खाडिलकरांच्या नाटकांना दाते किंवा आम्ही स्वतः डोक्यावर घेऊन नाचतो, त्यांच्या कित्येक नाटकातला विनोद थिल्लर आणि पोरकट आहे हे खुद्द दात्यांना-सुद्धा कबूल करावे लागेल ! कोल्हटकर-गडकऱ्यांच्या विनोदाची परंपरा आज महाराष्ट्रात आम्ही स्वतः, पु. ल. देशपांडे आणि विजय तेंडुलकर ह्यांनी चालविलेली आहे. आमचा विनोद ' अचकट-विचकट ', रंगभूमीला ' बुधवारा ' तून ' शुक्रवारा 'त नेणारा आणि दात्यांसारख्यांना शरमेनें मान खाली घाला-वयाला लावणारा आहे, असा जर त्यांचा दावा असेल, तर त्याबाबत आम्ही त्यांच्याशी जाहीर वाद करावयाला तयार आहोत. ' विनोद उच्च पातळीवरचा असावा ' असली ठोकळेबाज निरर्थक सुभाषिते उच्चारून कोणाचेही नाव न घेता किंवा कसलेही पुरावे न देता, उगाच हवेत गोळीबार करून सर्वसामान्य लोकांना घाबरून सोडायचे आणि त्यांची दिशाभूल करावयाची ही टीकेची पद्धत जबाबदारीची आहे असे कोणी म्हणणार नाही.

ज्या नाटकात कसलाही नाट्यगुण नाही आणि ज्यांच्यात अचकट-विचकट विनोद भरला आहे. अशी नाटके या महाराष्ट्रात कधीही लोकप्रिय झालेली

नाहीत. जेव्हा कोणतेही एखादे नाटक लोकप्रिय होते—पराकाष्ठेचे लोकप्रिय होते, तेव्हा त्यात काहीतरी ज्वलंत नाट्यगुण असले पाहिजेत ही गोष्ट सूर्यप्रकाशासारखी स्वच्छ आहे. आमची 'लग्नाची बेडी' किंवा 'तो मी नव्हेच' ही नाटके दाते ह्यांनी आजतगायत पहिली नाहीत ह्याबद्दल आमची खात्री आहे. श्री. पु. ल. देशपांडे ह्यांचे 'तुझे आहे तुजपाशी', बाळ कोल्हटकरांचे 'दुरितांचे तिमिर जावो', वसंत कानेटकरांची 'रायगडाला जेव्हा जाग येते', विद्याधर गोखले ह्यांचे 'पंडितराय जगन्नाथ', विजय तेंडुलकरांचे 'मी जिंकलो मी हरलो', ही नाटकेही केशवरावांनी पाहिलेली नसावीत. मामा पेंडसे, दत्ताराम, बापूराव माने, बाबा वैशंपायन, परशुराम सामंत, दाजी भाटवडेकर, दत्ता भट, श्रीराम लागू, शरद तळवलकर, प्रभाकर पणशीकर, काशीनाथ घाणेकर, राजा परांजपे, राजा नेने, विजया खोटे ह्या नटनटींना आज महाराष्ट्रात जी पराकाष्ठेची लोकप्रियता प्राप्त झालेली आहे, ती काय त्यांना ईर्ष्या वाटेल अशा भूमिका नाटककारांनी निर्माण केल्या नाहीत म्हणून ? 'नट जन्मावा लागतो' हे केशवरावांचे म्हणणे काही मर्यादेपुरतेच खरे आहे. कवी जन्मावा लागतो, नट जन्मावा लागतो, पुढारी जन्मावा लागतो, असे जर आपण मानत गेलो, तर प्रयत्नाला आणि शिक्षणाला जीवनात मुळी अर्थच राहणार नाही. सारांश, आजकालच्या नट, नाटककार नि नाटकांकडे पाहण्याची केशवरावांची ही जी नैराश्यपूर्ण दृष्टी आहे, ती रंगभूमीचा अवसानघात करणारी आहे.

केशवरावांचे वय नि अधिकार आज एवढा आहे की, त्यांनी नव्या नटांचे नि नाटककारांचे तोंड भरून कौतुक करावे. त्यांची पाठ थोपटून त्यांना उत्तेजन द्यावे. केशवरावांच्या नाट्यगुणांचा आज महाराष्ट्र जो गौरव करतो आहे, त्याचा अर्थ त्यांनी आजच्या मराठी रंगभूमीला नावे ठेवावीत आणि तिची 'प्रगती ही केवळ सूज' आहे असे म्हणावे म्हणून नव्हे. नव्यांनी जुन्यांना मान द्यावा नि जुन्यांनी नव्यांचे कौतुक करून स्वतःचा मान राखून घ्यावा, ह्यातच खरी शोभा आहे. एका कलावंताने दुसऱ्या कलावंताला तर कधीच नावे ठेवू नयेत. ही एक व्यावसायिक नीती आहे, आणि कलेला आश्रय देणाऱ्या जनतेपुढे तर कलावंतांनी नेहमी लोटांगण घालावे. आजच्या नाटकांची प्रगती ही 'सूज' आहे असे म्हणणे म्हणजे त्या नाटकांना आश्रय देणारे जे हजारो प्रेक्षक आहेत, ते वेडेच आहेत असे म्हणण्यासारखे आहे. असो. आजच्या मराठी नटांबद्दल आणि नाटककारांबद्दल केशवरावांचे काहीही मत असले तरी आजच्या

त्यांच्या वाढदिवशी रंगभूमीचे हे सारे सन्मान्य सेवक भक्तिभावाने अभिवादन करून, त्यांना दीर्घायुरारोग्य इच्छितील आणि त्यांच्याकडून अधिक विधायक मार्गदर्शनाची अपेक्षा करतील ह्यात काय शंका ?

मराठा : २५-९- १९६४

# १०

# बाबूरावांचे पुण्यस्मरण

रुपेरी पडद्यावरचे नि रंगभूमीवरचे महाराष्ट्राचे ख्यातनाम नटश्रेष्ठ आणि आमचे अडीच तपांचे जीवश्च कंठश्च मित्र श्री. बाबूराव पेंढारकर ह्यांना जाऊन आज एक वर्ष पूर्ण होत आहे. ते आमच्यापेक्षा तीन वर्षांनी वडील होते. तरुणपणी त्यांनी कोल्हापूरच्या लाल मातीत पहिलवानी मेहनत केलेली असल्यामुळे त्यांना कौतुकास्पद शरीरसंपदा नि आरोग्य लाभले होते. म्हणून त्यांच्या आयुष्याची अखेर कॅन्सरसारख्या भयानक रोगानें होईल, अशी कल्पनादेखील कधी आमच्या मनाला शिवली नाही. मरण्याच्या आधी दीड–दोन वर्षे मुंबईत त्यांच्या पोटावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. ती यशस्वी झाली असावी असे त्यांना नि आम्हांला वाटत होते. पण एका वर्षानंतर पुन्हा त्या रोगाने पलटी खाऊन त्यांचा अमानुष छळ करावयाला सुरुवात केली होती. त्या सुमारास त्यांना भेटावयास आम्ही मुद्दाम कोल्हापूरला गेलो होतो. तथापि, त्या वेळी देखील ते आपल्या प्रकृतीबद्दल एवढे निराश झाले नव्हते. पण पुढे त्यांची प्रकृती इतकी झपाट्याने बसरत गेली, की त्यांचे मरण आम्हाला अपघातासारखे आकस्मिकच वाटले. मरणापूर्वी त्यांनी आम्हांला लिहिलेल्या एका पत्रात ‘मृत्यूच्या हाकेला ओ देण्यास आता सिद्ध आहे !’ असे लिहिले होते, त्यावरून आम्हांला त्यांच्या मानसिक आणि शारीरिक स्थितीची कल्पना आली.

शेवटच्या आजारीपणाचा काही काळ वजा केला तर बाबूरावांनी वयाची

सत्तरी गाठली आहे, ह्याची त्यांच्या अगदी परिसरात वावरणाऱ्या माणसाला-सुद्धा कल्पना येणार नाही. त्यांनी जन्मभर आपल्या तारुण्याचे एवढे काटेकोर-पणे संरक्षण केले, की त्यांच्या शरीराच्या कोणत्याही भागाला स्पर्श करण्याची वार्धक्याला कधी हिंमतच झाली नाही. त्यांचा जोम आणि उत्साह पाहून तर पंचवीस वर्षांच्या जवानांनी लाजावे असा त्यांचा एकंदर रुबाब होता. आयुष्यात त्यांनी कोणत्याही गोष्टीचा कधी विधिनिषेध बाळगला नाही. अनियमितपणा नि अतिरेक ह्या गोष्टी तर त्यांच्या पाचवीला पुजल्या होत्या. पण एवढे असून त्यांनी आपल्या शरीराची नि आरोग्याची हेळसांड कधी केली नाही, असे आम्ही सांगितले तर ऐकणाराला आश्चर्य वाटेल. खाण्याच्या बाबतीत ते अतिशय चोखंदळ असत. एखादा नबाब काय खातो आहे, असा त्यांचा खाना असे. प्रत्येक जेवणात मुबलक फळे खाल्ल्यावाचून नि शेवटी दुधाची घट्ट साय प्याल्यावाचून ते कधीही राहिले नाहीत. कित्येकदा तीन तीन चार चार रात्री सतत जागून चित्रपटातल्या भूमिका त्यांना कराव्या लागत. त्यानंतर अर्धा पाऊण तासच ते दंड नि बैठकांचा व्यायाम करीत, की त्यांचे शरीर पुन्हा पहिल्यासारखे बांधेसूद नि आटोपशीर दिसू लागे. आम्ही या गोष्टी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या आहेत. आंघोळीचाही त्यांना विलक्षण षोक होता. साधुसंतांवर त्यांची श्रद्धा होती. दुःखी, निराश नि रडका चेहरा करून बसलेले आम्ही त्यांना कधी पाहिलेले नाही. नेहमी हसतमुख नि आशावादी. रोज डोक्यातून काहीतरी नवनवीन कल्पना काढावयाचे. शिक्षणाच्या मानाने त्यांच्या बुद्धीची झेप विलक्षण असे आणि भाषेवर त्यांचे पराकाष्ठेचे प्रभुत्व असे. एकदा लहरीत येऊन ते बोलायला लागले म्हणजे एखादा साहित्यिक काय बोलतोय ! आयुष्यातले काही काही अनुभव ते इतक्या कलात्मक रीतीने आणि सुभाषितपूर्ण भाषेत सांगायचे की, त्यांच्या प्रतिभेचे ते तेज बघून ऐकणाराचे डोळे दिपून जायचे. असे काही काही अद्‌भुत गुण त्यांच्या अंगी होते.

आत्मचिंतन हे तर त्यांचे वैशिष्ट्य होते. कोणतीही नवीन भूमिका बसवण्या-पूर्वी ते तिच्याकडे इतक्या वेगवेगळ्या दृष्टिकोणातून पाहात, की खुद्द लेखकानेही त्या भूमिकेचा तसा विचार केला नसेल. आपल्या भूमिकेत काही तरी वेगळे नावीन्य आणण्याची ते पराकाष्ठा करीत. सारांश मनाने, वृत्तीने नि विचाराने ते अंतर्बाह्य जिवंत असत. कलावंत कसा असावा असे आम्हांला जर कोणी विचारले तर आम्ही चटकन् सांगून टाकू की, तो बाबूराव पेंढारकरांसारखा

असावा. ह्या त्यांच्या सदैव जागरूकपणामुळे आयुष्यात सहसा कधी ते आजारी पडले नाहीत. एकदाच् पडले, ते अगदी शेवटी, अन् त्यातच त्यांचा अंत झाला.

बाबूरावांच्या स्वभावाला दुसरीही आणखी एक बाजू होती की, ते जितके बोलके होते तितके ते मितभाषी वा अल्पभाषी होते. तासन्तास ते आपल्या मित्रमंडळीत बसून एखादी काडी सिगरेटसारखी दातांनी ओढीत, पण त्या मंडळींच्या संभाषणात एका अक्षरानेही कधी भाग घेत नसत. त्यामुळे पुष्कळांचा त्यांच्याबद्दल गैरसमज होई, की बाबूराव अत्यंत घुमे आहेत, मेणघुमे आहेत. पण त्या बाबतीत बाबूरावांची वृत्ती, एखाद्या कवीसारखी होती. लहर लागल्या-खेरीज किंवा स्फूर्तीचा झटका आल्याखेरीज ते कधीही बोलत नसत. बोलायचे तर असे बोलायचे की, तसे कधी कोणी बोलले नाही, नाहीतर अजिबात बोलायचे नाही, असा त्यांचा खाक्या असे.

बोलण्याच्या बाबतीत बाबूरावांच्या ज्याप्रमाणे या तऱ्हा असत, त्याप्रमाणे दुसऱ्याशी वागण्याच्या दृष्टीनेही त्यांच्या स्वभावाची काही काही वैशिष्ट्ये ठरून गेली होती. बाबूरावांच्या अंगी विलक्षण गुणग्राहकता होती. माणसाच्या अंगातील गुणांचे त्यांना उपजतच आकर्षण होते. एखाद्या माणसाच्या अंगात कितीही दोष असले तरी त्या दोषांकडे दुर्लक्ष करून त्याच्या गुणांचे कौतुक कसे करता येईल आणि त्याला उत्तेजन कसे देता येईल इकडेच बाबूरावांचे अहर्निश लक्ष असे. गुणी माणसाचा द्वेष किंवा मत्सर करण्याची कल्पनाही बाबूरावांच्या चित्ताला कधी शिवली नाही. दुसऱ्याच्या उत्कर्षात आणि यशात आनंद मानण्याकडे त्यांचा कल होता. त्यामुळेच चित्रपटाच्या अमर्याद सृष्टीत ते कुठेही वावरले तरी सर्वांना ते हवेसे वाटत आणि सर्वत्र त्यांचे मुक्तकंठाने स्वागतच होत असे. त्या दृष्टीने ते एक अजातशत्रू निर्माते आणि नट होते. स्वभावाने बाबूराव अतिशय उदार, दिलदार आणि खेळाडू असत, त्यामुळे उभ्या आयुष्यात त्यांनी कोणत्याही नटाशी, नटीशी वा निर्मात्याशी अप्रिय स्वरूपाचा कधी वाद केला नाही. जन्मभर प्रत्येकाबद्दल ते चांगलेच बोलले, आणि अनेकांचे त्यांनी तोंड भरून कौतुक केले. मराठी चित्रपटसृष्टीत बाबूरावांनी जे जे नवनवीन प्रयोग केले त्यांचे तपशीलवार वर्णन इतक्या थोड्या अवकाशात या ठिकाणी करता येणे अशक्य आहे, पण थोडक्यात सांगायचे म्हणजे, मराठी चित्रपटसृष्टीत त्यांनी कितीतरी नवनवीन कलाकार आणले.

पण आम्हांला त्यांचे सर्वांत जे कौतुक वाटते हे की, वस्तुतः मराठी साहित्याशी किंवा कथावाङ्मयाशी त्यांचा तसा संबंध नसताना त्यांनी खांडेकरांसारख्या किंवा आमच्यासारख्या साहित्यिकांना एवढ्या जिव्हाळ्याने आणि आग्रहाने चित्रसृष्टीमध्ये आणून कसे काय सोडले? कारण बंगाली चित्रपट वजा केले तर भारतातले कोणतेही चित्रपटनिर्माते साहित्यिकाच्या वाऱ्यालाही उभे राहिलेले नाहीत. आमच्या 'घराबाहेर' नाटकाने पस्तीस साली लोकप्रियतेचा उच्चांक मोडण्यापूर्वी बाबूरावांची आणि आमची मुळीच ओळख नव्हती. पण 'घराबाहेर'चे यश पाहून बाबूरावांनी अक्षरशः आमच्यावर झडपच घातली आणि आमचा हात धरून त्यांनी आम्हांला चित्रपटाच्या धंद्यामध्ये सुप्रतिष्ठित करून जे टाकले, ते आम्हांला राष्ट्रपतीची सुवर्ण आणि रौप्य अशी दोन पदके मिळेपर्यंत! यशस्वी चित्रकथा कशी लिहावी याचा गुरुमंत्र बाबूरावांनीच आम्हांला दिला. दिवसचे दिवस, रात्रीचे रात्री आम्ही नवनवीन कथा आणि नवनवीन भूमिका शोधून काढण्याच्या विचारात खर्च केल्या. आमच्या प्रतिभेच्या सामर्थ्यावर बाबूरावांचा पूर्ण विश्वास होता. म्हणून 'ज्वाले'च्या अपयशानंतर 'हंस' पिक्चर्स प्राणांतिक संकटात सापडले असता 'ब्रह्मचारी' बोलपट लिहून 'हंस' ला पुनर्जन्म देण्यासाठी त्यांनी आम्हांला पुन्हा आमंत्रण दिले.

पुष्कळसे महाराष्ट्रातले चित्रनट हे ठराविक ठशाच्या भूमिका करतात. त्यांची एखादी चित्रपटातली भूमिका दुसऱ्या चित्रपटासारखीच असते. त्यांत औषधापुरतेही नावीन्य आढळत नाही. या नियमाला बाबूराव पेंढारकर हेच एक अपवाद आहेत. नवे काही तरी करावे, व्यासंगाने आपला अभिनय नटवावा हा त्यांना छंद असे. विविध व्यक्तिमत्त्वाच्या वेगवेगळ्या भूमिका सरस वठवण्याचा त्यांना जणू काही सोसच होता. 'अयोध्येच्या राजा'तला गंगानाथ महाजन त्यांनी जगाला एकदाच दाखवला. पुन्हा काही त्याचा मागमूस त्यांच्या अभिनयात पाहावयास मिळाला नाही. त्यापेक्षा संपूर्णतः अगदी विरुद्ध अशी आमच्या 'महात्मा फुले' चित्रपटातील त्यांची ज्योतिबाची भूमिका होती. ही भूमिका करताना बाबूरावांनी जे अपार कष्ट केले त्याची आमच्याशिवाय कोणाला कल्पना असणार? त्या काळात त्यांनी संपूर्ण विनोबा वाचून काढला, आणि 'ज्योतिबा'ची भूमिका यशस्वी व्हावी म्हणून खरोखर चित्तशुद्धी प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला. या भूमिकेत ते इतके समरस आणि तल्लीन झाले होते की, त्यांना पाहून पुष्कळदा आम्हाला महात्मा फुल्यांचा साक्षात्कार झाल्याचा

भास होई. गेल्या पन्नास वर्षांत मराठी रंगभूमीवर किंवा भारतीय चित्रपट-सृष्टीमधे जे जे मोठे मोठे यशस्वी नट होऊन गेले त्यांच्याबद्दल बाबूरावांना मनस्वी आदर वाटत असे. त्यांच्या अभिनयाचे अत्यंत सूक्ष्म तऱ्हेने विश्लेषण त्यांनी आपल्या मनाशी करून ठेवले होते. गणपतराव जोशी आणि बालगंधर्व ह्यांच्याबद्दल ते एकदा बोलू लागले, की ऐकणारा आपले देहभान विसरून जाई. सात-आठ वर्षांपूर्वी ' चित्र आणि चरित्र ' हे आत्मचरित्र त्यांनी लिहून प्रसिद्ध केले आणि आपल्या जीवनाचा आणि कलेचा एक विलक्षण देदीप्यमान पैलू मराठी जनतेला दाखवून तिला आश्चर्यचकित करून सोडले. ' प्रभात ' कंपनीच्या मॅनेजरचा नट होणे हा जेवढा चमत्कार त्यापेक्षाही त्याने आत्मचरित्र लिहून प्रतिभेचा आणि साहित्याचा उच्चांक मोडणे हा सर्वांत मोठा चमत्कार होय ! बाबूरावांना दीर्घायुष्य मिळाले असते तर याहीपेक्षा तेजस्वी चमत्कार चित्रपटाच्या आणि रंगभूमीच्या क्षेत्रात करून दाखवला असता.

बाबूराव हे सौंदर्याचे उपासक होते. केवळ आपल्या कलेतच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक अंगोपांगात सौंदर्य निर्माण करण्याचा त्यांनी उत्कटतेने प्रयत्न केला. त्यांची राहणी एखाद्या राजपुत्रासारखी असे. चांगले कपडे किंवा चांगल्या वस्तू त्यांना कोठेही दिसल्या की त्या त्यांनी खरेदी केल्याच म्हणून समजा. प्रवासाला निघाले की त्यांचा बिछाना, त्यांच्या चादरी, त्यांच्या उश्या आणि त्यांच्या दुलया एखाद्या श्रीमंतांनी हेवा कराव्या अशा असत. सुंदर ठिकाण दिसले की, सबंध रात्रची रात्र त्या परिसरात त्यांनी घालवलीच म्हणून समजा. दोन्ही बाजूंला लांबलचक पसरलेल्या समुद्राच्या मधोमध डोंगरावर असलेल्या वेंगुर्ल्याच्या डाक बंगल्यात त्यांनी एक पौर्णिमेची रात्र कशी घालवली याचे वर्णन एक महिनाभर ते मिटक्या मारीत आम्हांला ऐकवीत असत. बाबूराव जीवनात नबाब होते, तसे कलेच्या क्षेत्रात ते बादशहा होते आणि त्याच मिजाशीने आणि रुबाबाने ते शेवटच्या क्षणापर्यंत जगले आणि त्याच कृतकृत्य-तेच्या समाधानाने त्यांनी आपल्या जीवनाचा आणि कलेचा निरोप घेतला. मागे कसलाही खेद नि खंत त्यांनी ठेवला नाही.

मराठा : १०-११-१९६८

## ११

# दुर्गा खोटे

पुढील महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दिल्ली येथे भरणाऱ्या त्रेचाळिसाव्या मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी महाराष्ट्राच्या श्रेष्ठ नटी दुर्गा खोटे ह्यांची निवड झाली ह्याबद्दल आम्हांला अतिशय हर्ष होत आहे. अखिल भारतीय कीर्तीच्या ज्या थोर महाराष्ट्रीय नटी आज विद्यमान आहेत, त्यांमध्ये दुर्गाबाईंना अग्रेसर स्थान द्यावे लागेल, त्याबद्दल कोणाचाही मतभेद असण्याचे कारण नाही.

मुंबईमधल्या एका प्रसिद्ध आणि घरंदाज कुळामधे सुसंस्कृत आणि रसिक आईबापांच्या पोटी त्यांचा जन्म झाला, त्यामुळे कलेची आणि नाट्याची आवड उपजतच त्यांना प्राप्त झाली. अठ्ठावीस वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध दिग्दर्शक शांताराम ह्यांनी 'अयोध्येचा राजा' हा आपला पहिला बोलपट जेव्हा काढला, तेव्हा त्या बोलपटाची नायिका जी तारामती तिच्या भूमिकेसाठी शांतारामबापू ह्यांनी दुर्गाबाईंची निवड मोठ्या रसिक दूरदृष्टीने केली. त्या काळात दुर्गाबाईंसारख्या महाराष्ट्रातील एका कुलीन, सुसंस्कृत आणि विद्यासंपन्न तरुणीने रजतपटावर पदार्पण करणे हे फारच मोठे धाडस होते, पण केवळ कलेच्या अनिवार प्रेमामुळे दुर्गाबाईंनी ते धाडस केले आणि महाराष्ट्रातल्या कलाप्रेमी युवतींना कर्तृत्वाचे एक नवे क्षेत्र त्यांनी खुले करून दिले. 'अयोध्येचा राजा' या बोलपटातील तारामतीची भूमिका त्यांनी इतकी अप्रतिम सुंदर केली, की त्या पहिल्याच भूमिकेने त्यांनी साऱ्या भारतवर्षाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. त्या गोष्टीला

आज एक नाही, दोन नाही, चांगली बत्तीस वर्षे झाली, पण ह्या बत्तीस वर्षांत भारतीय चित्रपटाच्या क्षेत्रात प्रथम श्रेणीच्या तारका म्हणून त्यांनी आपला लौकिक आजतागायत सतत कायम ठेवला आहे.

चित्रपटसृष्टीतले आपले श्रेष्ठ स्थान इतका दीर्घकाळपर्यंत अढळ ठेवणारी महान नटी अजून पाश्चात्त्य देशांत जन्माला यावयाची आहे. ह्या बत्तीस वर्षांत दुर्गाबाईंनी शेकडो चित्रपटांत किती तरी निरनिराळ्या भूमिका केल्या असतील, पण कोठल्याही चित्रपटातील त्यांची कोणतीही भूमिका पाहा. मग ती लहान असो अगर मोठी असो त्यांच्या अभिनयाची पातळी यत्किंचितही कोठे तुम्हांला उतरल्यासारखी आढळावयाची नाही. सतत बत्तीस वर्षे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा नि अभिनयाचा दर्जा पहिल्यासारखा ताजातवाना आणि आकर्षक ठेवावयाचा ही काही सामान्य गोष्ट नव्हे !

स्वतःच निसर्गाने फार मोठी कृपा करून ठेवली आहे दुर्गाबाईंवर! अभिनेत्रीला लागणाऱ्या सर्व प्रमाणबद्ध आकृतीची नि आकर्षणाची निसर्गाने त्यांच्यावर मुक्तहस्ताने खैरात करून ठेवलेली आहे. डौलदार बांधा, रुंद कपाळ, तेजस्वी डोळे, हसरी दंतपंक्ती एवढ्याने निसर्गाचे समाधान झाले नाही म्हणून की काय त्याने गालावर खळ्याही ठेवून दिल्या आहेत. रुपेरी घंटेसारखा मधुर आणि खणखणीत आवाज हे दुर्गाबाईंचे सर्वांत मोठे सामर्थ्य आहे, आणि ह्या सर्व गुणांना शोभा देणाऱ्या त्यांच्या आनंदी, खेळकर आणि मनमिळाऊ स्वभावाने तर ' सोन्याला सुगंधा ' ची जोड मिळाल्याचा भास होतो. त्यामुळे दुर्गाबाईंबरोबर काम करण्यात नटनटींना आणि दिग्दर्शकालाच नव्हे, तर अगदी सामान्य सेवकांनाही अतिशय हुरूप वाटतो.

आमचा नि दुर्गाबाईंचा स्नेह वीस वर्षांचा आहे. चाळीस साली आम्ही आमच्या ' पायाची दासी ' ह्या चित्रपटात सासूची भूमिका करण्यासाठी दुर्गाबाईंना प्रथम पाचारण केले. त्या वेळी आमच्या मनात अशी भीती वाटत होती की, मोठमोठ्या चित्रपटांतून नायिकेच्या भूमिका करणाऱ्या या थोर नटीला आपण एका वृद्ध सासूची भूमिका करावयाला सांगून त्यांचा अपमान तर करीत नाही ना ? इतर दुसऱ्या नटींना जर आम्ही असे विचारले असते तर त्यांचे नि आमचे जन्माचे वैर जडले असते, पण दुर्गाबाई ह्यांचा पिंडच मुळी अभिनेत्रीचा. वृद्ध सासूची भूमिका म्हणजे आपल्या अभिनयाचा नवा चमत्कार दाखविण्याची एक नवीन संधी या भावनेने त्यांनी आमच्या विनंतीचा स्वीकार

केला आणि काय सांगावे ? 'पायाची दासी' मधली ती सासूची भूमिका त्यांनी इतक्या समजुतीने आणि नम्रतेने केली की, भारतीय चित्रपटाच्या दुनियेत एक अमर भूमिका जन्माला आली. पायाची दासी हा आमचा चित्रपट लोकप्रियतेच्या नि आर्थिक व्यवहाराच्या दृष्टीने अत्यंत यशस्वी झाला त्याचे फार मोठे श्रेय दुर्गाबाईंना द्यावे लागेल. तो बोलपट ज्यांनी पाहिला असेल ते दुर्गाबाईंच्या नथेच्या नाकाचा 'तो' फणकारा कधीच विसरू शकणार नाहीत. दुर्गाबाई सत्यसृष्टीत जेव्हा खऱ्याच सासूबाई झाल्या तेव्हा त्यांनी आपल्या गौरकाय सुनेला जर आपला कोणता बोलपट प्रथम दाखवला असेल तर तो 'पायाची दासी'. आपल्या शेजारी बसलेली आपली हसतमुख नि खेळकर सासू 'रुपेरी दुनियेत' इतकी खाष्ट आणि जहांबाज सासू होऊ शकेल अशी त्या बिचाऱ्या नवस्नुषेला कल्पनाही नव्हती. म्हणून 'I am not as bad as that (इतकी मी वाईट नाही ग बाई !) अशी जेव्हा दुर्गाबाई तिची समजूत घालू लागल्या तेव्हा आमच्या हसता हसता मुरकुंड्या वळल्या.

त्यानंतर आमच्या 'दिल-की-बात' ह्या हिंदी चित्रपटात मावशीची आणि 'मोरूची मावशी' ह्या मराठी चित्रपटात कांदा संस्थानच्या राणीची अशा त्यांनी दोन भूमिका केल्या. त्याही त्यांच्या लौकिकाला साजतील अशाच वठल्या. ह्या चित्रनिर्मितीच्या काळात दुर्गाबाईंचे सान्निध्य जे आम्हांस लाभले, त्यामुळे त्यांच्या अभिनयसामर्थ्याचे नि स्वभावसौजन्याचे जे संस्कार आमच्या मनावर झाले आहेत, ते अविस्मरणीय आहेत.

चित्रपटक्षेत्रात अपरंपार कीर्ती मिळविल्यानंतर पुढे 'मुंबई साहित्य' संघातर्फे प्रतिवर्षी होत असलेल्या नाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने त्यांनी मराठी रंगभूमीवर पदार्पण केले, आणि आनंदाची गोष्ट ही की, रजतपटावर त्यांनी मिळविलेले सर्व यश मराठी रंगभूमीवर संपूर्णतया सार्थकी लागले. रंगभूमीवर नावाजलेले नट चित्रपटामधे क्वचितच यशस्वी होतात, आणि रुपेरी पडद्यावर गाजलेले नट रंगभूमीवर बहुधा अपेशी ठरतात, ह्या सर्वसामान्य नियमाला अपवाद असे जे काही अतिशय थोडेसे नट किंवा नटी ह्या भारतात आज आहेत, त्यांत दुर्गाबाईच अग्रेसर ठरतील. खाडिलकरांच्या 'भाऊबंदकी' नाटकातील त्यांची आनंदीबाईची भूमिका म्हणजे त्यांच्या अभिनयचारित्र्याचा सुवर्णकळसच ठरेल. गेल्या पन्नास-साठ वर्षांत 'भाऊबंदकी' नाटकात अनेक नटांनी आनंदीबाईच्या भूमिका केल्या असतील, पण खाडिलकरांनी रंगविलेली राघोबाची 'आनंदीबाई'

खऱ्या स्वरूपात दुर्गाबाईनीच महाराष्ट्राला प्रथम दाखविली. ह्या भूमिकेबद्दल महाराष्ट्रातील हजारो प्रेक्षकांनी दुर्गाबाईंना धन्यवाद दिले आणि अखेर भारताच्या राष्ट्रपतींनी त्यांचा यथार्थ गौरव केला. वस्तुतः, भारत सरकारने 'पद्मभूषण' ही पदवी देऊन त्यांचा यापूर्वीच गौरव करावयाला पाहिजे होता. दुर्गाबाईंशी ज्यांची तुलनाच होऊ शकणार नाही अशा इतर कनिष्ठ नट्या पद्मश्री' होतात आणि दुर्गाबाईंचे स्मरणदेखील भारत सरकारला अद्याप होत नाही याचा अर्थ आम्ही मराठी माणसांनी काय समजावा ? अर्थात्, जो समजावयाचा तोच आम्ही समजतो. असो.

भारताच्या राजधानीत प्रथमच भरणाऱ्या मराठी नाट्यसंमेलनाच्या अध्यक्ष-स्थानी दुर्गा खोटे ह्यांची निवड करून भारतीय चित्रपटाची नि मराठी रंगभूमीची त्यांनी जी आजपर्यंत थोर सेवा केली, तिचा महाराष्ट्राने यथार्थ गौरव केलेला आहे यात मुळीच शंका नाही. ही निवड ज्यांनी केली त्यांच्या रसिकतेची आणि योजकतेची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. दुर्गाबाईंचे वय, चुकलो, दुर्गाबाई आता काही तरुण नाहीत, पण ह्या प्रौढ वयातही त्यांनी आपले शरीरसौष्ठव आणि यौवन किती चांगले राखले आहे, हे त्यांना प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज समजावयाचे नाही. कालपुरुष भिऊन अद्याप त्यांच्या वाटेलाच गेलेला नाही. म्हणून मराठी रंगभूमीवर त्यांचे विलोभनीय दर्शन पुष्कळ वर्षे होऊ शकेल असा आमचा विश्वास आहे. दिल्लीच्या मराठी नाट्यसंमेलनाचे प्रभावी मार्गदर्शन त्यांच्या हातून होवो, आणि मराठी रंगभूमीचे वैभव उत्तरोत्तर त्यांच्या अभिनयाने वाढो हीच आमची इच्छा !

मराठा : १२-२-१९६१

दा. क्र. १७३०२